TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL
LIBRARY

OU_196296

UNIVERSAL
LIBRARY

॥ श्रीगणेशायनमः ॥

(महर्षिव्यासप्रणीत)

श्रीभविष्यमहापुराण.

मध्यमपर्व व प्रतिसर्गपर्व.

भाग २ रा.

(मूळ व भाषांतर)

भाषांतरकार

वें० शा० सं०रा० रा० विष्णुशास्त्री बापट.

पुराणप्रकाशक मंडळीचे व्य. दामोदर लक्ष्मण लेले यांनी

वाई येथें आपल्या ' मोदवृत्त ' छापखान्यांत

छापून प्रसिद्ध

केले

सन १९११ इ०

किंमत ३॥ रुपये.

अनुक्रमणिका.

मध्यमपर्व व प्रतिसर्गपर्व.

अध्याय:— प्रथमभाग.
१–मंगलाचरण व भविष्यपुराणाची प्रशंसा
२–ब्रह्माडाची उत्पत्ती व विस्तार
३–स्वर्गपातालादिकांचे व०
४–ज्योतिश्चक्रविषयक व०
५–ब्राह्मणाच लक्षण व कर्तव्य
६–गुरुगुण वर्णन
७–पुराणश्रवणाचें महात्म्य
८–अंकमहात्म्यकथन
९–पूतनिर्णय.
१०–वृक्षारोपण विधिवर्णन
११–कूप, वापी, तडाग प्रतिष्ठा व०
१२–प्रतिमालक्षण
१३–कुंडविधानाविषयींवर्णन.
१४–होमाच्या प्रमाणाविषयीं व०
१५–अष्टादशकुंडसंस्कार
१६–नित्यनैमित्तिकहोम व०
१७–अग्नीनामवर्णन
१८–होमास लागणारे द्रव्याचे प्रमाण.
१९– वदर्वीनिर्णय.
२० पूर्णाहुतीहोम
२१–मंडलवर्णन.

द्वितीयभाग.

१–मंडलोद्धारवर्णन
२–क्रैं चघ्राणविधी
३–दक्षिणामूल्याविषयीं व०
४–यज्ञातील पूर्णपात्राच प्रमाण.
५–कलशाचा विषयनिर्णय
६–मासनिरूपण
७–तिथीनिर्णय
८–तिथीवर्णन
९–गोत्रप्रवरसंतानवर्णन.
१०–वास्तुयाग.
११–पूजाक्रमविधी
१२–अर्घ्यदानविधि
१३–गृह्य अग्निविधी
१४– ”
१५–देवांचें उत्तम ध्यानाविषयीं
१६– ”
१७–प्रतिष्ठाकर्म
१८–यज्ञकर्मांत उपयुक्त ब्राह्मणांची योजना
१९–प्रतिष्ठा योग्यकालनिर्णय
२०–ग्रहवास्तुप्रतिष्ठा.

तृतीय भाग.

१–आरामादिकांच्या उत्सर्गाचा विशेष.
२–गोप्रचारनामक कर्म.
३–बागेची प्रतिष्ठा.
४–अश्वत्थाची प्रतिष्ठा.
५–सरोवर, मोठी विहीर व तळें यांचें विधान.
६–महान आरामाची प्रतिष्ठा.
७–वृक्षांच्या उत्सर्गाचा विधी
८–अश्वत्थ प्रतिष्ठा.
९–वटस्थान.
१०–बिल्वप्रतिष्ठा.
११–फलांनीं युक्त वास्तुपूजा.
१२–वृक्षपाषाणमय मंडपांची प्रतिष्ठा.

१३–महायूपप्रतिष्ठा.
१४–फुलझाडाच्या बागेची प्रतिष्ठा.
१५–तुलसीची यथाविधी प्रतिष्ठा.
१६–वृक्षादिकाची उत्तम, मध्यम व कनिष्ठ प्रतिष्ठा.
१७–गोप्रचारप्रतिष्ठा.
१८–प्रतिष्ठाविधी.
१९–काली इत्यादिकाची प्रतिष्ठा.
२०–दुष्टनिमित्य जनितारिष्ट शांतीप्रकार.

प्रतिसर्गपर्व

अध्याय:— प्रथमखंड
१–कृतयुगातील राजाचा वृत्तांत.
२–त्रेतायुगातील राजाचा वृत्तांत.
३–द्वापरयुगातील राजाचा वृत्तांत.
४–द्वापारातील राजाच वर्णन.
५–कलियुगातील राजाचें वर्णन
६– ”
७– ”

द्वितीयखंड.

१–पद्मावती कथा
२–मधुमतीवरनिर्णय कथा.
३–वीरवरकथावर्णन.
४–चंद्रवती कथा
५–हरिदासकन्यामहादेवीची कथा.
६–कामांगीकन्या कथा.
७–त्रैलोक्यसुंदरी कथा.
८–कुसुमदादेवी चिरजीव कथा.
९–मालसाकन्येची कथा.
१०–गुणशेखर राजाची कथा.
११–धर्मवल्लभ राजाची कथा.
१२–ब्राह्मणहत्या कथा.
१३–मुग्धमंत्रिणीची कथा.
१४–चंद्रावतीची कथा.
१५–गरुडाची कथा.
१६–कामावरुथिनीची कथा.
१७–गुणाकरराजपुत्राची कथा.
१८–मोहिनीची कथा.
१९–विप्रपुत्र कथा
२०–अनंगमंजिरीची कथा.
२१–विष्णुस्वामीच्या चार पुत्रांची कथा.
२२–क्षत्रसिंहनृपतीची कथा.
२३–भर्तृहरी वृत्तांत व.
२४–सत्यनारायण कथा.
२५–सत्यनारायण व्रत व.
२६–सत्यनाराण व्रतातील चंद्रचूड राजाची कथा.
२७–भिल्लाची कथा.
२८–साधुवाण्याची कथा.
२९– ”
३०–कलियुगाची प्रवृत्ती.
३१–पाणिनी महर्षींचा वृत्तांत.
३२–बोपदेवाचा वृत्तांत.
३३–व्याधकर्मी ब्राह्मणाचा वृत्तांत.
३४–सप्तशतीचें महात्म्य.
३५–पतंजली वृत्तांत.

तृतीय खंड

१–भारतयुद्धाच्या कथेची प्रस्तावना.
२–शालीवाहन काल.
३–शालीवाहनाच्या वंशातील राजे.
४–भोजराजाच्या वंशातील अनेक राजाचें वर्णन.
५–जयचंद्राचा वृत्तांत.
६– ”
७–भीष्मराजाची कथा
८–जंबुक राजाचा वृत्तांत.
९–देशराजाचा वृत्तांत.
१०–कृष्णाश चरित्र.
११–कृष्णान महीराजाचा पराभव केल्याचा वृत्तांत.

१२–कृष्णाश व बलखानी यांच्या युद्धाचें वर्णन
१३– "
१४–जयतावतार वृत्तांत
१५ "
१६– "
१७–पृथ्वीराजाचा वृत्तांत.
१८– "
१९–इंदुला व पद्मिनी यांच्या विवाहाचा वृत्तांत
२०–बलवर्धन राजाची कथा.
२१–मयुरध्वज राजाची कथा.
२२–कृष्णाश व पुष्पवती याचा संवाद.
२३–चित्ररेखा व इंदुल याचें विवाहवर्णन.
२४–चंदुभट्टाचे पृथ्वीराजापुढे वर्णन.
२५–शारदानंदनराजाच्या मुलीच्या स्वयंवराचे वर्णन.
२६–महावर्तीतील युद्धप्रसंगाचें वर्णन.
२७–कच्छ देशातील युद्धाचे व.
२८–कृष्णाशाचा शोभा नामक वेश्येबरोबर झालेला संवाद.
२९–किन्नरीकन्येच्या उत्पत्तीची कथा.
३०–लक्षण आणि पद्मिनी याची कथा.
३१–कृष्णाशाचा शालेशी विवाह.
३२–चंद्रवंशातील राजांचा शेवटचा महाघोर संग्राम.

चतुर्थखंड.

१–व्यासमहामुनींचे भविष्य कथा व.
२–भजमेरपुराचा वृत्तांत.
३–शुक्र नामक राजाचें वर्णन
४–परिहरराजाशाच्या वंशाचे वर्णन.
५–भगवानाच्या अवतारांचें वर्णन.
६–देहलीच्या म्लेच्छ राजाचें वर्णन.
७–सूर्यमहात्म्य वर्णन.
८–मध्वाचार्यांच्या उत्पत्तीची कथा.
९–धन्वंतरीच्या उत्पत्तीची कथा.
१०–कृष्ण चैतन्याची व शंकराचार्यांच्या उत्पत्तीची कथा.
११–आनंदगिरीच्या उत्पत्तीची कथा.
१२–भारतीशादिकान्या उत्पत्ती विषयीं
१३–अघोरपंथी व भैरव इत्यादिकां विषयी
१४–रुद्रमहात्म्य वर्णन व रामानुजांची उत्पत्ती
१५–त्रिलोचनदेवाच्या विषयी
१६–एकण नामक वैशाच्या उत्पत्तीं विषयीं
१७–कबिरादिकाच्या उत्पत्तीविषयीं
१८–अश्विनीकुमारांच्या उत्पत्तीविषयीं
१९–कृष्णचैतन्याच्या शिष्याविषयीं.
२०–जगन्नाथाच्या चरित्राविषयीं.
२१–कृष्णचैतन्याच्या चरित्राविषयीं.
२२–गुरुड व मौनरोज वर्णन.
२३–भूतनंदीच्या वंशाचें वर्णन
२४–दैत्याचे हरिखंडाप्रतं गमन.
२५–ब्रह्मदेवानें भगवानाची केलेली स्तुती
२६–कलकीविजय कथा.

मध्यमपर्व व प्रतिसर्गपर्व समाप्त.

॥ श्रीः ॥

श्रीमहर्षिव्यासप्रणीतं

श्रीभविष्यमहापुराणम् ।

मध्यमपर्व ।

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नम कमलदलनयनाभिरामाय श्रीरामचन्द्राय । स्वच्छं चन्द्रावदात कविकरमकरक्षोभमजातफेनं ब्रह्मोद्गीतिमसूक्तैर्व्रतनियमपरैः सेवित विप्रमुख्यैः । ओंकाराङ्कितेन त्रिभुवनगुरुणा ब्रह्मणा दृष्टपूतं सभोगाभोगगम्यं जनमशुभहरं पौष्करं वः पुनातु १ जयति भुवनदीपो भास्करो लोककर्ता जयति च शितिदेहः शार्ङ्गधन्वा मुरारिः । जयति च शशिमौली रुद्रनामाभिधेयो जयति सकलमौलिर्भानुमांश्चित्रभानुः २ नमस्कृत्याब्जमेयाय देवाय ब्रह्मरूपिणे । पुराण सम्प्रवक्ष्यामि यदुक्तं ब्रह्मयोगिना ३ पुराणसंहितां पुण्यां पप्रच्छु रौमहर्षणिम् । वक्तुमर्हसि चास्माक पुराणार्थविशारद ४ मुनीनां वचन श्रुत्वा सूतः पौराणकोत्तमः । प्रणम्य मनसा प्राह गुरुं सत्यवतीसुतम् ५ सूत उवाच ॥ नमस्कृत्य जगद्योनिं ब्रह्मरूपधरं

नमस्तस्मै भगवते चारुचन्द्रार्धमौलये ।
यच्छीर्षे जाह्नवीफेनो धत्ते पुष्पस्रजः श्रियम् ॥

श्रीगणेशायनमः । ज्याचे नेत्र कमलपत्रांप्रमाणे आहेत अशा मनोहर रामचंद्राला नमस्कार असो. स्वच्छ, चंद्राप्रमाणे शुभ्र, (स्नान करणाऱ्या) विद्वान् लोकाच्या हस्तरूपी मकराच्या योगानें क्षुब्ध झाल्यामुळें फेनयुक्त असलेलें, वेदांतील सूक्तांचा जप करणाऱ्या आणि व्रत व नियमनिष्ठ असणाऱ्या ब्राह्मणश्रेष्ठांना सेवन केलेलें, ॐ काराच्या योगानें त्रिभूषित असणाऱ्या त्रैलोक्यगुरु ब्रह्मदेवान आपल्या दृष्टीनें पवित्र केलेले, वैषयिक सुख आणि वैराग्य ह्या दोहोंच्याही प्राप्त्यर्थ गमन करण्यास योग्य, लोकाच्या अशुभाचें हरण करणारें पुष्करनामक तीर्थ आपणांस पवित्र करो १. जगतास प्रकाशित करणारा व ह्मणूनच लोकास प्रदीपाप्रमाणें असणारा ब्रह्मदेव, शार्ङ्गनामक धनुष्य धारण करणारा श्यामकांति श्रीविष्णु, मस्तकावर चंद्र धारण करणारा श्रीरुद्र आणि सर्वश्रेष्ठ किरणसंपन्न श्रीसूर्य ह्यांचा जय असो २. अज्ञेय अशा ब्रह्मस्वरूपी देवास नमस्कार करून योगनिष्ठ ब्रह्मदेवानें पूर्वी कथन केलेले पुराण सागतो ३. पूत्रों रोमहर्षणि सूत याजकडे जाऊन ऋषींनी पवित्र अशा पुराणसंहितेविषयी प्रश्न केला. (ते ह्मणाले,) हे पुराणार्थज्ञा, आह्मांला आपण कृपा करून (पुराण) सांगा ४. हे मुनींचें भाषण श्रवण करून पौराणिकश्रेष्ठ सूत आपले गुरु सत्यवतीपुत्र व्यासमुनि ह्यांस अंतःकरणानें नमस्कार करून सागू लागले ५. सूत ह्मणाले.- जगताच्या उत्प-

हरिम् । वक्ष्ये पौराणिकीं दिव्यां कथां पापप्रणाशिनीम् ६ यच्छ्रुत्वा पापकर्माऽपि स गच्छेत्परमां गतिम् । पुण्य पवित्रमायुष्यमिदानीं शृणुत द्विजाः ७ भविष्यपुराणमखिल यज्जगाद गदाधरः । मध्यपर्व ह्यथो वक्ष्ये प्रतिष्ठादिविनिर्णयम् ८ धर्मप्रशंसनं चात्र ब्राह्मणादिप्रशंसनम् । आपद्धर्मस्य कथनं विद्यामाहात्म्यवर्णनम् ९ प्रतिमाकरण चैव स्थापना चित्रलक्षणम् । कालव्यवस्था सर्गादिप्रतिसर्गादिलक्षणम् १० पुराणलक्षणं चैव भूगोलस्य च निर्णयम् । निरूपण तिथीनां च श्राद्धकल्पमनन्तरम् ११ मुमूर्षोरपि यत्कर्म दानमाहात्म्यमेव च । भूत भव्य भविष्यं च युगधर्मानुशासनम् १२ उद्भवविधानं च प्रायश्चित्तादिक च यत् । षष्ट्याधिकाष्टसाहस्र नवश्लोकशतोद्भवम् १३ पञ्चतन्त्रसमायुक्तं प्रतितन्त्रे च विंशतिः । पञ्चोत्तरं तथाऽध्यायाः पुराणेऽस्मिन्द्विजोत्तमाः १४ त्रयाणामाश्रमाणां च गृहस्थो योनिरुच्यते । अन्येऽपि सुपजीवन्ति तस्माच्छ्रेष्ठो गृहाश्रमी १५ एकाश्रमं गृहस्थस्य त्रयाणां सूतिदर्शनम् । तस्माद्गार्हस्थ्यमेवैक विज्ञेय धर्मशासनम् १६ परित्यजेदर्थकामौ यौ स्यातां धर्मवर्जितौ । सर्वलोकविरुद्ध च धर्ममप्याचरेन्न तु १७ तडागस्य च सान्निध्य तडाग परिवर्जयेत् । प्रपास्थाने प्रपा वर्ज्या मठस्थाने मठं भवेत् १८ धर्मात्सजायते ह्यर्थो धर्मात्कामोऽभिजायते । धर्ममेवापवर्गोऽय तस्माद्धर्मं समाश्रयेत् १९ धर्म चार्थं च काम च त्रिवर्गस्त्रिगुणो मतः । सत्त्व रजस्तमश्चेति तस्माद्धर्मं समाश्र-

---

स्तीचें स्थान असणाऱ्या, वेदस्वरूप धारण करणाऱ्या श्रीविष्णूस नमस्कार करून मी पातकाचा नाश करणारी पुराणस्वरूपी दिव्य कथा सागतों ६. हे द्विजहो, ज्याचे श्रवण केलें असता पापकर्मे करणारा मनुष्य देखील उत्कृष्ट प्रकारच्या गतीस जातो व जें श्रीविष्णूंनीं सागितलें तें पुण्यकारक, पवित्र आणि आयुष्याची अभिवृद्धि करणारें सर्व भविष्यपुराण आता आपण श्रवण करा. आता, ज्यामध्यें देवप्रतिष्ठादिकाचा निर्णय आहे असे त्यातील मध्यमपर्व सागतों ७,८. ह्यामध्यें धर्माची प्रशंसा, ब्राह्मणादिकाची स्तुति, आपद्धर्माचें कथन, विद्येच्या माहात्म्याचें वर्णन, देवप्रतिमेची कृति आणि तिची स्थापना, चित्राचे लक्षण, काळाची व्यवस्था, सृष्टि आणि प्रलय ह्यांची लक्षणें, पुराणाचें लक्षण, भूगोलाचा निर्णय, तिथींचें निरूपण, श्राद्धकल्प, आसन्नमरण झालेल्या मनुष्याचें कर्तव्य, दानाचें माहात्म्य, वर्तमान, भूत, भविष्य ह्या तीनही कालाच्या युगधर्माचें कथन, इतर लहानमोठ्या कृत्याचा विधि आणि प्रायश्चित्तें वगैरे सागितलेली आहेत. ह्यातील श्लोक आठ हजार नऊशें साठ असून हे द्विजश्रेष्ठहो, ह्यात पाच तंत्रें व प्रत्येक तंत्रामध्यें पंचवीस अध्याय आहेत ९—१४. असो. गृहस्थाश्रम हा तीनही आश्रमाचें उत्पत्तिस्थान आहे असें सागितलेलें आहे. ह्याजवरच इतर आश्रमातील लोक उत्कृष्ट प्रकारें उपजीविका करितात. ह्मणून गृहस्थाश्रमी मनुष्य श्रेष्ठ होय. गृहस्थाश्रमी मनुष्याचा एक आश्रम तीनही आश्रमाच्या उत्पत्तीस कारणीभूत आहे. ह्यास्तव, गृहस्थाश्रमांतील धर्म ह्याच केवळ धर्माच्या आज्ञा होत १५,१६. जे अर्थ आणि काम हे पुरुषार्थ धर्माच्या विरुद्ध असतील त्यांचा त्याग करावा. तसेंच, सर्व लोकाच्या विरुद्ध असणाऱ्या धर्माचेंही आचरण करूं नये १७. ज्या ठिकाणीं एक पाणपोई असेल त्या ठिकाणीं दुसरी पाणपोई व एक मठ असेल त्या ठिकाणीं दुसरा मठ करूं नये १८. धर्मापासूनच अर्थ उत्पन्न होतो; धर्मापासूनच कामाचीही उत्पत्ति आहे व धर्म हाच मोक्षास कारणीभूत आहे. ह्यास्तव, धर्माचाच आश्रय करावा १९. धर्म, अर्थ आणि काम ह्या त्रिवर्गाचे अनुक्रमें सत्त्व, रज आणि तम

---

१ ह्या ठिकाणीं लोकशब्दाने धर्मनिष्ठ लोकांचेच ग्रहण करावयाचा भाग समजावा

येत् २० ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसा । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः २१ यस्मिन्धर्मस्त्वमायुक्तो ह्यर्थकामौ व्यवस्थितौ । इहलोके सुखी भूत्वा प्रेत्यानन्त्याय कल्पते २२ तस्मादर्थं च कामं च त्यक्त्वा धर्मं समाश्रयेत् । धर्मात्सजायते कामो धर्मादर्थोऽभिजायते २३ एवं धर्मस्य मध्येऽस्य चतुर्वर्गः प्रदर्शितः । एवं च धर्मकामार्थमोक्षस्थापि च मानव २४ माहात्म्यं वाऽनुतिष्ठेच्च स चानन्त्याय कल्पते । तस्मादर्थं च कामं च मुक्त्वा धर्मं समाचरेत् २५ धर्मात्संजायते सर्वमित्याहुर्ब्रह्मवादिनः । धर्मेण धार्यते सर्वं जगत्स्थावरजङ्गमम् २६ अनादिनिधना शक्तिः सैषा ब्राह्मी द्विजोत्तम । कर्मणा प्राप्यते धर्मो ज्ञानेन च न संशय २७ तस्माज्ज्ञानेन सहितं कर्मयोगं समाचरेत् । प्रवृत्तिश्च निवृत्तिश्च द्विविधं कर्म वैदिकम् २८ ज्ञानपूर्वा निवृत्तिः स्यात्प्रवृत्तिर्वर्ततेऽन्यथा । निवृत्तिं सेवमानस्तु याति तत्परमं पदम् २९ तस्मान्निवृत्तं सेव्यमन्यथा संसरेत्पुनः । शमो दमो दया दानमलोभस्त्याग एव च ३० आर्जवं चानसूया च तीर्थानुसरणं तथा । सत्यं संतोष आस्तिक्यं श्रद्धा चेन्द्रियनिग्रहः ३१ देवताभ्यर्चनं पूजा ब्राह्मणानां विशेषतः । अहिंसा सत्यवादित्वमपैशुन्यमकल्पता ३२ शौचाचारश्चानुकम्पा सर्ववर्णेऽब्रवीन्मनुः । श्रद्धापूर्वाः स्मृता धर्माः श्रद्धामध्ये तु संस्थिता ३३ श्रद्धानिष्ठाः प्रतिष्ठाश्च

हे गुण आहेत (अर्थात् धर्म हा सत्त्वगुणी आहे) म्हणून धर्माचा आश्रय करावा २०. सत्त्वस्थ अर्थात् धर्मनिष्ठ लोक ऊर्ध्व (स्वर्गास) जातात. रजोगुणयुक्त अर्थात् अर्थसंज्ञक पुरुषार्थाच्या ठिकाणी आसक्त झालेले लोक मध्ये (भूलोकामध्यच) रहातात आणि निकृष्ट वृत्तीने अर्थात् कामासक्त होऊन रहाणारे लोक अधोगतीस जातात २१. ज्या पुरुषाच्या ठिकाणी अर्थ आणि काम हे पुरुषार्थ धर्माचाच आश्रय करून वास करीत असतील तो इहलोकी सुखी होऊन मोक्षास जाण्याविषयी समर्थ होतो २२. ह्यास्तव, अर्थकामाचा त्याग करून धर्माचाच आश्रय करावा. कारण, धर्मापासूनच अर्थ निर्माण होत असून धर्मापासून कामही उत्पन्न होतो २३ ह्याप्रमाणे धर्ममध्येच हा चतुर्वर्ग [धर्मादिक चार पुरुषार्थ] आहे असे दाखविलेले आहे. ह्याप्रमाणे जो मनुष्य धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्यांचे माहात्म्य जाणून तदनुसार वर्तन करील तो मोक्षास जाण्याला योग्य होतो. ह्यास्तव, अर्थ आणि काम ह्यांचा त्याग करून धर्माचेच आचरण करावें. धर्मापासून सर्व उत्पन्न होते असे ब्रह्मवादी लोकांनी सांगितले आहे. धर्म हाच ह्या सर्व स्थावरजगमात्मक जगताचे पालन करितो २४-२६. हे द्विजश्रेष्ठ, धर्म ही आदितःहित अशी ब्रह्मशक्तिच होय. कर्म आणि ज्ञान ह्या दोहोंच्या योगाने निसंशय धर्मप्राप्ति होते २७. यास्तव, ज्ञानयोगासहवर्तमानच कर्मयोगाचे आचरण करावे. प्रवृत्ति आणि निवृत्ति असे दोन वैदिक कर्माचे प्रकार आहेत २८. ज्ञानपूर्वक असणाऱ्या कर्मास निवृत्ति आणि ताद्भिन्न कर्मास प्रवृत्ति असे म्हणतात. निवृत्तीचे सेवन करणारा मनुष्य श्रेष्ठ अशा ब्रह्मपदास जातो (अर्थात् मुक्त होतो) २९. यास्तव, निवृत्तिसंज्ञक कर्माचेच आचरण करावे. कारण, तसे न केल्यास पुनः संसारात पडावें लागते. शम, दम, दया, दान, लुब्धपणा नसणे, कर्मफलाचा त्याग, सरळपणा, मात्सर्यशून्यता, तीर्थयात्रा, सत्य, संतोष, आस्तिकपणा, श्रद्धा, इंद्रियनिग्रह, देवतापूजन, विशेषतः ब्राह्मणाचे अर्चन, हिंसा न करणे, सत्य भाषण करणे, दुष्टपणा न करणे, प्रभुत्व न गाजविणे, शुद्धतासंपादक आचरण आणि कळकळ हे धर्म सर्वही वर्णाचे होत असे मनूने सांगितलें आहे. धर्माचा आरंभ श्रद्धेतच असून त्याचा मध्य व अंत ही श्रद्धेतच आहेत. तसेच, श्रद्धेन्याच योगानें

---

१ धर्मेण गमनमूर्ध्वं गमनमधस्ताद्भवत्यधर्मेण । अशी ईश्वर कृष्णाची कारिकाही आहे

धर्माः श्रद्धैव कीर्तिताः । प्राजापत्यं ब्राह्मणानां श्रुत स्थानं क्रियावताम् ३४ स्थानमैन्द्र क्षत्रियाणां सङ्ग्रामेष्वपलायिनाम् । वैश्यानाममृतं स्थान स्वधर्ममनुवर्तताम् ३५ गान्धर्व शूद्रजीवानां परिचारेण वर्तताम् । अष्टाशीतिसहस्राणां मुनीनामूर्ध्वरेतसाम् ३६ स्मृतं स्थान तु यत्स्थान तदेव गुरुवासिनाम् । सप्तर्षीणां तु यत्स्थान श्रुतं तद्वै वनौकसाम् ३७ प्राजापत्यं गृहस्थानां स्थानमुक्तं स्वयम्भुवा । यतीनां यतचित्तानां तदेव वनवासिनाम् ३८ हिरण्यगर्भं यत्स्थान तस्मान्नावर्तते पुनः । योगिनाममृत स्थान व्योमाख्य परमाकरम् ३९ आनन्दमैश्वरं नाम सा काष्ठा परमा गतिः ४० इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

सूत उवाच ॥ इदानीं विस्तर चैव विभाग रूपमैश्वरम् १ वक्ष्ये कल्पानुसारेण मन्वन्तरशतानुगम् २ आसीत्तमोमय सर्वमप्रज्ञानमलक्षणम् । तत्र चैको महानाद्युद्रु. परमकारणम् ३ आत्मना स्वयमात्मान सचिन्त्य भगवान्विभु । मनः संसृजते पूर्वमहंकार च पृष्ठत ४ अहकारात्प्रजातानि महाभूतानि पञ्च च । अष्टौ प्रकृतयः सोक्ता विकाराश्चैव षोडश ५ शब्दः

म्यर्थ पावत असल्यामुळे श्रद्धा ही धर्म होय असें सांगितले आहे. कर्माचरण करणाऱ्या ब्राह्मणास प्राजापत्यनामक स्थान मिळते अशी श्रुति आहे ३०–३४. सग्रामात पलायन न करणाऱ्या क्षत्रियास ऐंद्र [इंद्राचे], आपल्या धर्मास अनुसरून वागणाऱ्या वैश्यांना अमृत आणि सेवावृत्तीने राहणाऱ्या शूद्र प्राण्यास गांधर्व स्थानाची प्राप्ति होते. ब्रह्मचर्यशाली अठ्ठ्यायशी हजार मुनींस जे स्थान मिळते असें सांगितले आहे तेच गुरुकुलामध्ये वास करणाऱ्या (अर्थात् ब्रह्मचर्याने वागणाऱ्या) लोकांस मिळते. सप्तऋषींचे जे स्थान आहे तेच वानप्रस्थाश्रमीयांस मिळते ३५–३७. गृहस्थांस प्राजापत्य स्थानाची प्राप्ति होते व वानप्रस्थ आणि मनोनियमयुक्त यति ह्यांस, जेथून (ससारामध्ये) फिरून यावे लागत नाहीं अशा हिरण्यगर्भनामक स्थानाची प्राप्ति होते असे प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने सांगितले आहे. श्रेष्ठत्वाची केवळ खाणच असे व्योम [परब्रह्म] सज्ञक जे मोक्षस्थान त्याची प्राप्ति योगी लोकास होते ३८, ३९. ते स्थान केवळ आनदस्वरूपी असून ईश्वरसंबंधी आहे, तोच मोक्ष आणि तीच उत्कृष्टत्वाची सीमा होय ४०. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील प्रथम भागातील पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥

सूत ह्मणतात.– आता शकडों मन्वतरापासून चालत आलेला विश्वविस्तार, त्याचा विभाग आणि ईश्वरस्वरूप ही कल्पानुसारानें सागतो १, २. पूर्वी हे सर्व विश्व स्वरूपशून्य, अज्ञेय आणि केवल तमोमय होतें. त्यामध्ये जगताचे श्रेष्ठ असें कारण असणारा केवल महारुद्र वास्तव्य करीत होता ३. त्या भगवान् प्रभूने स्वत. आपल्याशीं विचार करून प्रथम मन उत्पन्न केले व नंतर अहकार निर्माण केला ४. अहकारापासून पंचमहाभूते उत्पन्न झालीं. ह्या सृष्टीपैकी आठ प्रकृति असून सोळा

---

१ व्योमशब्द आकाशवाचक असून आकाशशब्द ब्रह्मवाचक आहे, असें आकाशस्तल्लिगात् ह्या सूत्राने भगवान् व्यासमुनी वेदातदर्शनामध्ये सांगितलें आहे

२ प्रकृति ह्या शब्दाचा अर्थ उपादानकारण असा आहे सांख्यानी जी चोवीस तत्त्वें मानिली आहेत त्यांपैकी काही केवल कारण असून काही कारण आणि कार्य व काही केवल कार्य (विकृति) आहेत तथापि केवल कारण व कार्य आणि कारण असणारी तत्त्वें ही प्रकृति असें धरून ह्या ठिकाणी आठ प्रकृति असें सांगितलें आहे प्रकृति [माया], महत्तत्त्व, अहकार आणि पंचतन्मात्रें ह्या आठ प्रकृति असून पचमहाभूतें, पाच कर्मेंद्रियें, पाच ज्ञानेंद्रियें आणि मन ह्या सोळा विकृति होत (सांख्यदर्शन पहा)

स्पर्शश्च रूप च रसो गन्धस्तथैव च । प्राणोऽपानः समानश्चोदानव्यानौ तथैव च ६ सत्त्वं रजस्तमश्चैव गुणाः प्रोक्तास्तु ते त्रयः । तस्माद्भगवतो ब्रह्मा तस्माद्विष्णुरजायत ७ ब्रह्मविष्णुमोहनार्थं ततः शम्भुस्तु तेजसा । अशरीरो वासुदेवो ह्यनुत्पत्तिरयोनिजः ८ व्यामोहयित्वा तत्सर्वं तेजसाऽमोहयज्जगत् । तस्मात्परतरं नास्ति तस्मात्परतर न हि ९ ब्रह्मा विष्णुश्च द्वावेतावुद्भवौ भगवत्सुतौ । कल्पे कल्पे तु तत्सर्वं सृजतेऽसौ जनं जगत् १० उपसंहरते चैव नानाभूतानि सर्वशः । द्वासप्ततियुगान्येव मन्वन्तर इति स्मृतः ११ चतुर्दश तु तान्येव कल्पमेव विधीयते । दिनैकं ब्रह्मणः प्रोक्तं निशि कल्पस्तथोच्यते १२ एव मास च वर्ष च तथा चाब्दशतं द्विजाः । एव बुद्धीन्द्रियस्यास्य विष्णोश्च निमिष स्मृत १३ ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तं निमेषश्च ध्रुवस्य वै । निमेषजीवनं सर्वं सर्वलोकचराचरम् १४ भूर्लोकोऽथ भुवर्लोकः स्वर्लोकश्च प्रकीर्तितः । जनस्तपश्च सत्य च ब्रह्मलोकश्च सप्तमः १५ पातालाद्यितलं तद्धि तलातलरसातले । पञ्चम विद्धि सुतलमतल सप्तक स्मृतम् १६ एतेषु सप्त विख्याता अधः पातालवासिनः । तेषामादौ च मध्ये च अन्ते रुद्रः प्रकीर्तितः १७ ग्रसते जायते लोकान्क्रीडार्थं तु महेश्वरः । ब्रह्मलोकपरीप्सूनां गतिरूर्ध्वं प्रकीर्तिता १८ पृथिवीं चान्तरिक्षं च दिशश्च विदिशस्तथा । समुद्राणां गिरीणां च अधस्तिर्यक्प्रसरणया १९ समुद्राणां च विस्तार प्रमाणं च ततः शृणु ।

विकृति आहेत ५. पुढे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध व प्राण, अपान, समान, उदान आणि व्यान ह्यांची उत्पत्ति झाली ६. सत्त्व, रज आणि तम हे तीन सुप्रसिद्ध असे गुण होत. त्या (प्रकृतिस्वरूपी असल्यामुळे) ऐश्वर्यसंपन्न असणाऱ्या गुणत्रयापासून ब्रह्मा आणि विष्णु हे निर्माण झाले ७. तदनंतर शरीरशून्य, अयोनिज, सृष्टीच्या प्रलयानंतरही वास्तव्य करीत असून स्वयंप्रकाश असणारा, अनादि भगवान् श्रीशंकर आपल्या तेजानें ब्रह्मा आणि विष्णु ह्यांस मोहित करण्यासाठीं (स्वत निर्माण झाले) ८ व त्या उभयतांस मोहित करून त्यानीं तें सर्वही जग आपल्या तेजाने मोहयुक्त करून सोडिले. त्या श्रीशंकराहून श्रेष्ठ अशी देवता खास नाहीं ९. ब्रह्मदेव आणि विष्णु हे उभयता जे निर्माण झाले ते त्या भगवान् शंकराचे पुत्र होत. हा भगवान् प्रत्येक कल्पामध्ये प्राणियुक्त असणारें सर्व जगत् निर्माण करितो आणि अनेक प्रकारच्या प्राण्यांचा संहार करितो. असो. ब्रह्मांतर युगांस मन्वंतर असें ह्मणतात. ही चौदा मन्वंतरें ह्मणजे एक कल्प होय. हा कल्प ब्रह्मदेवाचा एक दिवस असून त्यांची रात्रही एक कल्पाची असते. ह्याप्रमाणे त्यांची आठशें एक वर्षे व एक महिना ह्मणजे बुद्धींद्रियाचा अधिपति श्रीविष्णु ह्याचा एक निमेष होय १०–१३. ब्रह्मादिस्तंबपर्यंत यच्चयावत् सृष्टीच्या अस्तित्वाचा काल हा ध्रुवाचा एक निमेष होय. ह्या सर्व चराचर विश्वाचे आयुष्य अर्थात् अस्तित्व ह्या एका निमेषापर्यंत असतें १४. भूर्लोक, भुवर्लोक, स्वर्लोक, जनलोक तपोलोक,(महर्लोक) आणि सातवा ज्यास ब्रह्मलोक असेंही ह्मणतात तो सत्यलोक (हे सात लोक असून)१५ पाताल, महातल, वितल, तलातल, रसातल, सुतल आणि अतल ही सात पाताले असून भूलोकाच्या अंतर्भागीं व ह्मणूनच अधोभागी असणाऱ्या ह्या सात लोकांमध्ये पातालवासी लोक रहातात. त्याच्या आदीं, मध्ये व अंतीं श्रीरुद्र वास्तव्य करितो असे सांगितले आहे १६,१७. हा महेश्वर रुद्र केवल क्रीडेसाठीं जन्म घेऊन लोकाचा संहार (आणि सृष्टि) करितो. ब्रह्मलोकप्राप्तीची इच्छा करणाऱ्यांची गति ऊर्ध्वभागीं असते १८. पृथ्वी, आकाश, दिशा, विदिशा आणि समुद्र व पर्वत ह्यांचे अधोभाग आणि तिर्यक् प्रदेश हे सर्व त्या ईश्वरानेंच ज्ञानदृष्ट्या निर्माण केले १९. असो. आता समुद्राचा विस्तार आणि प्रमाण

स्थावराणां च शैलानां देवानां च दिवौकसाम् २० चतुष्पदानां द्विपदां तथा धर्मैकभाविणाम् । सहस्रगुणमाख्यातं स्थावराणां प्रकीर्तितम् २१ सहस्रगुणशीलाश्च इत्याह भगवान्मुनिः। ऋषिस्तु प्रथमं कुर्वन्प्रकृतिं नाम नामतः २२ तस्या ब्रह्मा प्रकृत्यास्तु उत्पन्नः सह विष्णुना । तस्माद्बुद्ध्या प्रकुरुते सृष्टिं नैमित्तिकीं द्विजाः २३ तस्मात्स्वयम्भुवो ब्रह्मा ब्राह्मणान्समकल्पयत् । पादहीनान्क्षत्रियांश्च तस्माद्धीनांस्तु वैश्यकान् २५ चतुर्थपादहीनांश्च आचारेषु बहिष्कृतान् । पृथिवीं चान्तरिक्षं च दिशश्चैवाप्यकल्पयत् २५ लोकालोकस्य संस्था च द्वीपानामुदधेस्तथा । सरितां सागराणां च तीर्थान्यायतनानि च २६ मेघस्तनितनिर्घोषरोहितेन्द्रधनूंषि च । उल्कानिर्घातकेतूश्च उर्यातीष्यायतनानि च २७ उत्पन्नं तस्य देहेषु भूयः कालेन पीडयेत् २८ [६९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वाणि प्रथमभागे द्वितीयोऽध्यायः॥ २ ॥

सूत उवाच ॥ ध्रुवाद्ऊर्ध्वं महर्लोकः कोटियोजनविस्तरः । कल्पाधिकरणं तस्य संस्थितिर्द्विजपुङ्गवाः १ जनलोको महर्लोकात्तथा कोटिद्वयात्मकः । सनन्दनादयस्तत्र संस्थिता ब्रह्मणः सुताः २ जनलोकात्तपोलोकः कोटित्रयसमन्वितः । विराजन्ते तु देवा वै स्थिता दाहविवर्जिताः ३ प्राजापत्यस्तु भूर्लोकात्कोटिषट्केन संयुतः । सनत्कुमारकस्तत्र ब्रह्मलोकस्तु स स्मृतः ४ तत्र लोकगुरुर्ब्रह्मा विश्वात्मा विश्वतोमुखः । आस्ते यत्तोगिभिः पीत्वा योगं मृत्योः परं गतम् ५

तसच स्थावर, त्याचे शील, स्वर्गवासी देवता, चतुष्पद, द्विपद आणि केवल धर्मयुक्त करणारे लोक ह्यांचें प्रमाण ऐक. स्थावराची संख्या सर्वांहून सहस्रपट आहे व त्याचे शीलही सर्वांहून सहस्रपट अधिक आहे असे भगवान् मुनीने सांगितले आहे. असो. प्रथम त्या ज्ञानमय परमात्म्याने प्रकृतिनामक तत्त्व उत्पन्न केले व त्यातून विष्णूसहवर्तमान निर्माण झालेला ब्रह्मदेव हे द्विजहो. आपल्या ज्ञानदृष्टीने नैमित्तिक सृष्टि करीत असतो २०-२३. तदनंतर ब्रह्मदेवाने ब्राह्मण निर्माण केले. त्याहून एक चतुर्थांशाने हीन असणारे क्षत्रिय, क्षत्रियापेक्षा एक चतुर्थांशाने निकृष्ट असणारे वैश्य आणि केवल उत्कृष्टतेमध्ये एक चतुर्थांशच अवशिष्ट असलेले व ह्यांहूनच सर्व प्रकारच्या आचरणापासून बहिष्कृत झालेले शूद्र हे त्याने निर्माण केले. पृथ्वी, अंतरिक्ष आणि दिशा हींही त्यानेंच उत्पन्न केली २४,२५. लोकालोकपर्वत, द्वीपे, सरोवरे, नद्या, समुद्र, तीर्थे, देवमंदिरे, मेघाची गर्जना, विजेचा कडकडाट, इंद्रधनुष्य, उल्कापात, निर्घात, धूमकेतु, नक्षत्रे आणि मठ ही सर्व त्याच्याच देहापासून निर्माण झाली असून तोच मृत्यूच्या द्वारे त्यास प्रेरित करितो २६-२८. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील प्रथम भागांपैकी दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥

सूत म्हणतात — हे द्विजश्रेष्ठहो, ध्रुवाच्या ऊर्ध्वभागी महर्लोक असून त्याचा विस्तार एक कोटि योजने आहे. ह्याचे अस्तित्व एक कल्पपर्यंत असते १. जनलोक हा महर्लोकाच्याही ऊर्ध्वभागी आहे व त्याचा विस्तार दोन कोटि योजने असून त्या ठिकाणी सनंदनादिक ब्रह्मपुत्र वास्तव्य करितात २. जनलोकाच्या ऊर्ध्वभागी तपोलोक असून त्याचा विस्तार तीन कोटि योजने आहे. या ठिकाणी तापशून्य असणाऱ्या देवता विराजमान आहेत ३. प्राजापत्यलोक हा भूर्लोकाच्या ऊर्ध्वभागी असून त्याचा विस्तार सहा कोटि योजनें आहे. त्या ठिकाणी सनत्कुमार वास्तव्य करितात; ह्यासच ब्रह्मलोक असे म्हणतात. त्या ठिकाणी सर्व लोकाचा पितामह विश्वात्मा आणि सर्व दिशांकडे मुखें असणारा ब्रह्मदेव वास्तव्य करितो. मृत्यूचेंही अतिक्रमण करून असलेल्या ह्याच ठिकाणी योगी लोक योगाचरण केल्यामुळे गमन करितात ४,५. ब्रह्मवादी,

गायन्ति यतयो गाथा ह्यास्तीका ब्रह्मवादिनः । योगिनस्तापकाः सिद्धा जापकाः परमेष्ठिनम् ६ द्वारं तु योगिनामेकं गच्छतां परम पदम् । तत्र गत्वा न शोचन्ति स विष्णुः स च शंकरः ७ सूर्यकोटिप्रतीकाशं पुरं तस्य दुरापदम् । न मे वर्णयितुं शक्यं ज्वालामालासमाकुलम् ८ तत्र नारायणस्यापि भवनं ब्रह्मणः पुरे । शेषे तस्य हरिः श्रीमान्मायासहचरः परः ९ स विष्णुर्लोककथितः पुनरावृत्तिवर्जितः । प्रयान्ति च महात्मानो ये प्रपन्ना जनार्दनम् १० ऊर्ध्वं ब्रह्मसनात्पूर्वं पुरं ज्योतिर्मयं शुभम् । वह्निना उपरि क्षिप्तं तत्रास्ते भगवान्भवः ११ देव्या सह महादेवश्चिन्त्यमानो मनीषिभिः । योगिभिः शतसाहस्रैर्वृतैकत्वैश्च संवृतः १२ तत्र ते यान्ति नियता द्विजा वै ब्रह्मवादिनः । महादेवपरेशानास्तापसा ब्रह्मवादिनः १३ निर्ममा निरहंकाराः कामक्रोधविवर्जिताः । द्रक्ष्यन्ति ब्रह्मणा युक्ता रुद्रलोकः स वै स्मृतः १४ एते सप्त महर्लोकाः पृथिव्यां परिकीर्तिताः । महातलादयश्चाधः पातालाः सन्ति वै द्विजाः १५ महातलं हैमतलं सर्ववर्णोपशोभितम् । प्रासादैर्विविधैः शुभ्रैर्देवतायतनैर्युतम् १६ अनन्तेन समायुक्तं मुचुकुन्देन धीमता । बलिना चैव पाताल स्वर्गवासिना १७ शैलं रसातलं विप्राः शाङ्करं हि रसातलम् । पीतं सुतलमित्युक्तं वितलं विद्रुमप्रभम् १८ सितं तलातलं प्रोक्तं तलं चैव सितेतरम् । सुवर्णेन मुनिश्रेष्ठास्ततो वासुकिना शुभम् १९ रसातलमिति ख्यातं सर्वशोभासमन्वितम् ।

यति, योगी, तपोनिष्ठ, सिद्ध, आस्तिक आणि जपनिष्ठ लोक गाथान्या योगाने ह्या ठिकाणी ब्रह्मदेवाचे स्तवन करितात ६. हा लोक मोक्ष पावणाऱ्या योग्याचे मुख्य असे द्वार होय. त्या ठिकाणी गेलेले लोक शोक पावत नाहीत. (तो ब्रह्मदेवच) विष्णुस्वरूपी व तोच शंकरस्वरूपी आहे ७. प्राप्त होण्यास कठिण असे त्याचे नगर कोट्यवधि सूर्याप्रमाणे प्रकाशमान असून ज्वालाच्या मालिकानी व्याप्त आहे; त्याचे वर्णन मला करिता येणे शक्य नाही. त्या ब्रह्मदेवाच्याच नगरात श्रीविष्णूचेही मंदिर आहे. त्या ठिकाणी लक्ष्मीस्वरूपी मायेसहवर्तमान श्रीहरि शेषावर शयन करितो ८, ९. त्यासच लोक श्रीविष्णु असे म्हणतात. त्याला पुनर्जन्म नाही. श्रीविष्णूस शरण जाणारे महात्मे लोक ह्याच ठिकाणी गमन करितात. ब्रह्मदेवाच्या आसनाच्या ऊर्ध्वभागी पूर्वेस एक तेजोमय उत्कृष्ट नगर असून त्याची वरची बाजू अग्नीने व्याप्त झालेली आहे. त्या ठिकाणी देवी पार्वतीसहवर्तमान ज्ञानी लोकानीं चिंतन केलेला भगवान् श्रीशंकर अद्वैतमार्गाचा स्वीकार केलेल्या लक्ष योगी जनासहवर्तमान वास करितो १०–१२. जेथे नियमनिष्ठ ब्रह्मवादी श्रीशंकरच परमेश्वर आहे अशी निष्ठा ठेवणारे, तपोनिष्ठ, वेदघोष करणारे, ममता, अहंकार, काम आणि क्रोध ह्याचा संपर्क नसलेले योगी ब्रह्मदेवासहवर्तमान गमन करून श्रीशंकरास पहातात, त्या लोकास रुद्रलोक असे म्हणतात १३,१४. हे सात पृथ्वीच्या ऊर्ध्वभागी असलेले महर्लोक कथन केले आहेत. हे द्विजहो, भूतलाच्या अधोभागी महातलादि पाताललोकही आहेत १५. महातलाचा तलप्रदेश सुवर्णमय असून ते सर्व प्रकारच्या वर्णानीं सुशोभित आणि नानाप्रकारच्या राजगृहानी व देवमंदिरानी युक्त आहे १६. तसेच तें पाताल शेष, ज्ञानसंपन्न मुचुकुंद व पुढे स्वर्गात वास्तव्य करणारा राजा बलि ह्यानीं युक्त आहे १७. हे विप्रहो, रसातल हें शिलामय आहे व तेथील देवता शंकर ही आहे. सुतल पीतवर्ण असून वितलाची कांति पोवळ्यासारखी आहे. तलातलाचा वर्ण शुभ्र असून तल कृष्णवर्ण आहे. हे मुनिश्रेष्ठहो, उत्कृष्ट प्रकारचा वर्ण असणाऱ्या वासुकीने युक्त व ह्मणूनच शुभकारक असणारें रसातलनामक पाताल सर्व प्रकारच्या शोभानीं युक्त व वैनतेय, कालनेमि, शंकुकर्ण, नमुचि व इतरही अनेक प्रकारचे नाग ह्यानीं युक्त असून त्याचा तल अतिशय उत्कृष्ट आहे १८–२१. त्यांच्याही अधो-

वैनतेयादिभिश्चैव कालनेमिपुरोगमैः २० शङ्कुकर्णेन सहितं तथा नमुचिपूर्वकम् तथाऽन्यैर्विविधैर्नागैस्तलं चैव सुशोभनम् २१ तेषामधस्तान्नरका रौरवाद्याश्च कोटयः । पापिनस्तेषु पात्यन्ते न तेऽवनमितुं क्षमाः २२ पातालानामधश्चान्ते शेषाख्या वैष्णवी तनुः । कालाग्निरुद्रयोगात्मा नारसिंहोऽपि माधवः २३ योऽनन्तः पठ्यते देवो नागरूपी जनार्दनः । तदाधारमिदं सर्वं स कालाग्निमुपाश्रित २४ तमाविश्य महायोगी कालस्तद्वदनानलः । विषज्वालासमोऽनन्तो जगत्संहरति स्वयम् २५ तामसी शाम्भवी मूर्तिः कालात्मा परमेश्वरः । स एव गर्भमाश्रित्य प्रकाशयति नित्यशः २६ [९४] इति श्रीभविष्ये महापुराण मध्यमपर्वणि प्रथमभागे पातालवर्णन नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

सूत उवाच ॥ एतद्ब्रह्माण्डमाख्यात चतुर्विधविध महत् । अतः पर प्रवक्ष्यामि भूर्लोकस्य विनिर्णयम् १ तद्द्वीपप्रधानो जम्बुः प्लक्ष शाल्मल एव च । कुशः क्रौञ्चश्च शाकश्च पुष्करश्चैव सप्तमः २ एते सप्त महाद्वीपा समुद्रै सप्तभिर्वृताः । द्वीपाद्द्वीपो महानुक्तः सागरादपि सागरः ३ सुरोदेक्षुरसोदश्च क्षारोदश्च घृतोदकः । दध्योदः क्षीरसलिलो जलोदश्चेति सागराः ४ पञ्चाशत्कोटिविस्तीर्णा समुद्रवलया स्मृता । द्वीपैश्च सप्तभिर्युक्ता योजनानां समानतः ५ जम्बुद्वीपः समस्तानां द्वीपानां मध्यतः शुभः । तस्य मध्ये महामेरुर्विश्रुतः कनकप्रभः ६ चतुरशीतिसाहस्रयोजनैरस्य चोच्छ्रयः । प्रविष्टः षोडशाधस्ताद्द्वात्रिंशन्मूर्ध्नि विस्तृतः ७ मूले षोडशसाहस्रं विस्तारस्तस्य सर्वतः । भूपमूरुश्च शैलोऽसौ कलिकात्वेन संस्थितः ८ हिमवान्हिमकूटश्च निष-

---

भागीं रौरवादिक कोटयवधि नरक आहेत. त्यामध्ये पापी लोक टाकले जातात. ह्या नरकांची अवनति होणे अशक्य आहे २२. पातालाच्या अधोभागी शेवटी शेषसंज्ञक विष्णुमूर्ति आहे. ह्यात नागरूपी जनार्दनास माधव, नारसिंह, अनंत असे म्हणतात. ह्याच्या शरीराशी कालाग्नि रुद्राचा संबंध आहे. ह्या सर्व विश्वास त्याचाच आधार असून त्यालाही कालाग्नि रुद्राचा आश्रय आहे २३,२४. महायोगी अनंत काल हा स्वतः त्याच्याच ठिकाणी संचार करून विषमय ज्वालाप्रमाणें असणाऱ्या त्याच्याच मुखातील वायूच्या रूपानें जगताचा संहार करितो. तसेंच तोच तमोगुणयुक्त शंकराची मूर्ति असणारा कालस्वरूपी परमेश्वर ब्रह्मांडगर्भाचा आश्रय करून प्रत्यही सर्वास प्रकाशित करितो २५,२६. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील प्रथम भागांपैकीं तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

सूत म्हणतातः— हे तुला विशाल ब्रह्मांडाचे चार भेद सांगितले; आतां भूर्लोकाचा निर्णय सांगतों १. ह्या भूर्लोकामध्ये जंबुद्वीप हा मुख्य असून प्लक्ष, शाल्मल, कुश, क्रौंच, शाक आणि पुष्कर हे सहा असे सात द्वीप आहेत २. हे सात महासागरांनीं वेष्टिलेले आहेत. ह्यांपैकीं एका द्वीपाहून दुसरा द्वीप व एका सागराहून दुसरा सागर उत्तरोत्तर मोठा आहे. सुरोद, इक्षुरसोद, क्षारोद, घृतोद, दध्योद, क्षीरोद आणि जलोद असे सात समुद्र आहेत ३,४. सात द्वीपांनी युक्त असलेल्या ह्या समुद्रवलयांकित पृथ्वीच्या विस्ताराचें प्रमाण पन्नास कोटि योजनें आहे ५. उत्कृष्ट प्रकारचा जंबुद्वीप हा सर्वही द्वीपांच्या मध्यभागी असून त्याच्याही मध्यभागीं सुवर्णाच्या योगानें कांतिमान् असलेला महामेरुनामक पर्वत आहे ६. त्याची उंची ८४ हजार योजनें असून तो १६ हजार योजनें भूमीमध्यें गेलेला आहे व अग्रभागीं ह्याचा विस्तार ३२ हजार योजनें आहे ७. तसेंच मूलभागीं ह्याचा विस्तार सोळा हजार योजनें असून हा पर्वत सर्वांहून मुख्य आणि भूमीवर कर्णिकेप्रमाणें राहिलेला आहे ८. त्याच्या दक्षिणेस हिमवान्, हि (हे) मकूट, निषध आणि उत्तरेस नील,

धस्तस्य दक्षिणे । नीलः श्वेतश्च शृङ्गी च उत्तरे वर्षपर्वतः ९ लक्षप्रमाणौ द्वौ मध्ये दशहीनास्तथाऽपरे । सहस्रद्वितीयं दीर्घास्तावद्विस्तारिणश्च ते १० भारतं दक्षिणं वर्षं ततः किंपुरुषं स्मृतम् । हरिवर्षं तथैवान्यन्मेरोर्दक्षिणतो द्विजाः ११ चम्पकं चोत्तरं वर्षं तथैवाथ हिरण्मयम् । उत्तरा कुरवश्चैव यथैते भारतास्तथा १२ नवसाहस्रमेकैकमेतेषां द्विजसत्तमाः । इलावृतश्च तन्मध्ये तन्मध्ये मेरुरुच्छ्रितः १३ मेरोश्चतुर्दिशस्तत्र नवसाहस्रविस्तृतम् । इलावृतं महाभागाश्चत्वारस्तत्र पर्वताः १४ विष्कम्भा रचिता मेरोर्योजनायुतमुच्छ्रिताः । पूर्वेण मन्दरो नाम दक्षिणे गन्धमादनः १५ विपुलः पश्चिमे भागे सुपार्श्वश्चोत्तरे स्थितः । कदम्बश्चेषु जम्बूश्च पिप्पलो वट एव च १६ जम्बूद्वीपस्य सा जम्बुर्नामहेतोर्महर्षयः । महागजप्रमाणानि जम्बून्यस्य फलानि च १७ पतन्ति भूभृतः पृष्ठ शीर्यमाणानि सर्वशः । रसेन चैव प्रख्याता तस्य जम्बुनदी इति १८ सरित्तु वर्तते साऽपि पीयते तत्रवासिभिः । न स्वेदो न च दौर्गन्ध्यं न जरा नेन्द्रियक्षय १९ उत्पन्ना स्वच्छमनसो नरास्तत्र भवन्ति वै । तीरस्तत्र समं प्राप्य वायुना च विशोषितम् २० जम्बूनदाख्यं भवति सुवर्णं सिद्धभूषणम् । भद्राश्व पर्वतो मेरोः केतुमालश्च पश्चिमे २१ वर्षे द्वे तु मुनिश्रेष्ठास्तयोर्मध्ये इलावृतम् । मेरोरुपरि विप्रेन्द्रा ब्रह्मणः स्थानमुत्तमम् २२ तदूर्ध्वं वामवस्थानं तदूर्ध्वं शंकरस्य च । तदूर्ध्वं वैष्णवं लोकं दुर्गालोकं तदूर्ध्वतः २३ ज्योतिर्मयं परं स्थानं निराकारं हिरण्मयम् । भक्तस्थानं तदूर्ध्वं च देवो हि भगवान्रविः २४

श्वेत व शृंगी हे सप्त वर्षपर्वत आहेत. ह्यांपैकीं मध्यभागीं असणाऱ्या दोहोंचें प्रमाण लक्ष योजनें असून इतरांचें प्रत्येकीं एक दशांश कमी आहे. ते दोन हजार योजनें लांब असून तितकेच रुंदही आहेत ९,१०. भारत हे अगदीं दक्षिणेकडील वर्ष असून त्याच्या उत्तरेस किंपुरुष व त्यापलीकडे हरिवर्ष ह्याप्रमाणे हे द्विजहो, मेरूच्या दक्षिणेस हीं तीन वर्षें आहेत ११. तसेंच, मेरूच्या उत्तरेस चंपकवर्ष व हिरण्मयवर्ष ही असून दक्षिणेस ज्याप्रमाणें भारतवर्ष आहे त्याप्रमाणेंच उत्तरेस त्या दोहोंच्या पलीकडे उत्तरकुरु हे वर्ष आहे १२. हे द्विजश्रेष्ठहो, ह्यांतील प्रत्येक वर्ष नऊ नऊ हजार योजनें आहे. ह्या सर्वांच्या मध्यभागी इलावृतवर्ष असून त्याच्याही मध्यभागीं उंच असा मेरुपर्वत आहे १३. हे महाभागहो, मेरूच्या चोहों बाजूस तें इलावृतवर्ष नऊ हजार योजनें विस्तृत असून त्यामध्यें दहा हजार योजनें उंच असे मेरूस टेकू दिल्यासारखे असणारे चार पर्वत आहेत. त्यांपैकीं पूर्वेस मंदर, दक्षिणेस गंधमादन, पश्चिमेस विपुल आणि उत्तरेकडे सुपार्श्व हा आहे. ह्या द्वीपामध्यें कदंब, जंबू, पिप्पल आणि वट इत्यादिक वृक्ष आहेत १४–१६. हे महर्षींनो, त्यांपैकी जंबुवृक्ष हा जंबुद्वीप असें नांव पडण्याचें कारण असून त्यास मोठ्या हत्तीसारखीं स्थूल जांभळें लागतात १७ आणि तीं त्या पर्वताच्या चोहों बाजूस पडून फुटल्यामुळे त्यातून निघालेल्या रसाची जी नदी निर्माण झाली आहे तिला जंबुनदी असें ह्मणतात १८. ती नदी त्या ठिकाणी असून तेथील लोक तिचेंच जल प्राशन करितात त्यामुळे त्यास खेद, दुर्गंध, जरा आणि इंद्रियदौर्बल्य हीं होत नाहींत १९. तिच्या तीरावर उत्पन्न झालेल्या लोकांचीं अंतःकरणें शुद्ध होतात. तसेंच, तिच्या तीरावर दोरा मारल्यासारखी सरळ जी एक रेषा पडलेली असते ती वायूनें वाळली ह्मणजे (जंबुनदीमध्ये उत्पन्न झाल्यामुळे) जांबुनद असें नांव पडलेले आणि सिद्धांच्या अलंकारास साधनीभूत असणारे सुवर्ण होते. हे मुनिश्रेष्ठहो, मेरूच्या पूर्वेस भद्राश्व आणि पश्चिमेस केतुमाल अशी दोन वर्षें असून त्याच्या मध्यभागी इलावृत हें वर्ष आहे. हे ब्राह्मणश्रेष्ठहो, मेरूच्या वर ब्रह्मदेवाचें स्थान असून त्याच्या ऊर्ध्वभागीं इंद्राचें व त्याच्याही वर शंकराचें स्थान असून त्याच्या ऊर्ध्वभागीं विष्णु-

ज्योतिश्चक्रस्थितः शुद्धो निश्चलः परमेश्वरः । राशिचक्रे च भ्रमति मेरोरुपरि सत्तमाः २५ सप्ताश्वशालिनस्तस्य रथचक्रं दिवानिशम् । वातरज्जुनिबन्धेन ध्रुवाधारे प्रतिष्ठितम् २६ दिक्पालाद्या ग्रहास्तत्र दक्षिणादुत्तरायणम् । प्रतिमास गतः पन्था हूरासवृद्धिदिनक्षयः २७ रविणा लङ्घितो मासश्चान्द्रः ख्यातो मलिम्लुचः । द्वादशात्मा विभुः सूर्यः प्रत्यहं भक्तसेवितः २८ कृत्वा चतुर्थ्वहोरात्रं तारामण्डलगो विभुः । यामे यामे चोदयश्च देशे देशे च शर्वरी २९ दिवा चरति सूर्यो वै रात्रौ चरति चन्द्रमाः । नक्षत्राणि दिवारात्रौ सूर्यचक्रे प्रतिष्ठितम् ३० देशान्न चावगमनं यत्र तस्माद्दिवाऽभवत् । यत्र चन्द्रक्षयो भवति तत्र सूर्यः प्रवर्तते ३१ दिवारात्रिं विजानीयाज्ज्योतिश्चक्रे प्रतिष्ठितम् । उदयास्तमन नास्ति नक्षत्राणां विशेषत ३२ यन्नक्षत्रं च यो देशः स तेषामुदयः स्मृतः । यत्रास्तो जीवशुक्राणां सूर्यादीनां च सर्वशः ३३ तदा काले नियोक्तव्या भार्गवास्तादिकी क्रिया । सूर्यः सौम्यो बुधश्चन्द्रो भार्गवश्चैव शीघ्रगः ३४ दक्षिणायनमास्थाय यदा चरति रश्मिमान् । तदा सर्वग्रहाणां स सूर्योऽधस्तात्प्रसर्पति ३५ विस्तीर्णमण्डलं कृत्वा तस्योर्ध्वे चरते शशी । नक्षत्रमण्डलं कृत्स्नं सोमादूर्ध्वं प्रसर्पति ३६ नक्षत्रेभ्यो बुधश्चोर्ध्वं बुधादूर्ध्वं तु भार्गवः । गुरुस्तु भार्गवादूर्ध्वं गुरोरूर्ध्वं शनै-

लोक व त्याच्याही वर दुर्गालोक आहे २०–२३. त्याच्याही वर तेजोरूपी, निराकार, केवल सुवर्णमय, भक्त लोकाचे वसतिस्थान, परमपदस्वरूपी, पवित्र, अविनाशी आणि ज्योतिश्चक्रामध्ये वास्तव्य करणारा परमेश्वर भगवान् सूर्य राशिचक्रातून मेरूच्या ऊर्ध्वभागी (प्रदक्षिणक्रमाने) भ्रमण करीत असतो२४,२५. सात अश्वांच्या योगाने शोभणाऱ्या त्या सूर्याच्या रथाचे चक्र वायुरूपी रज्जूचे बंधन असल्यामुळे ध्रुवरूपी आधाराच्या ठिकाणी रात्रंदिवस स्थिर होऊन राहिले आहे २६. त्या सूर्यरथामध्ये दिक्पालादिक देवता आणि ग्रह हेही आहेत. त्या रथाचा प्रतिमासी जावयाचा आणि दिवसाचा ऱ्हास, वृद्धि आणि क्षय होण्यास कारणीभूत असणारा मार्ग दक्षिणायनातून उत्तरायणाकडे गेलेला आहे २७. जो चांद्रमास सूर्याने उल्लंघन केलेला (अर्थात् सूर्यसंक्रांति नसलेला) असेल त्यास मलिम्लुच [मलमास अथवा अधिकमास] असे ह्मणतात. द्वादशमूर्ति धारण करणारा व भक्त लोकांनी प्रत्यही सेवन केलेला भगवान् सूर्य तारकामंडलातून गमन करून (वस्त्रोकसाराप्रभृति) चार नगरींच्या ठिकाणी रात्र आणि दिवस ही निर्माण करितो. ह्मणूनच, त्या प्रत्येक देशामध्ये वेळोवेळी सूर्योदय आणि रात्र ही होत असतात २८,२९. सूर्य दिवसा, चंद्र रात्री आणि सूर्यचक्रामध्ये स्थिरपणे वास्तव्य करणारी नक्षत्रे रात्रंदिवस भ्रमण करीत असतात. (दिवसा) सूर्याचे त्या देशातून इतरत्र गमन होत नाही ह्मणूनच त्यास (दिवसास) दिवा असे ह्मणतात. ज्या ठिकाणी चंद्र अदृश्य असेल त्या ठिकाणी सूर्य विद्यमान असतो. दिवस आणि रात्र ही ज्योतिश्चक्रामध्ये [नक्षत्रमंडलामध्ये] निश्चलपणे वास्तव्य करितात. विशेषेकरून नक्षत्रास उदय अथवा अस्त ही नाहीत. जे नक्षत्र ज्या देशास प्रथम दिसेल त्या देशास त्याचा उदय होय. ज्या वेळी गुरु, शुक्र आणि सूर्यप्रभृति ग्रहांचा सर्वथैव अस्त झालेला असेल त्या वेळी शुक्रास्तादिनिमित्तक कर्म करावे. सूर्य, चंद्रपुत्र बुध, चंद्र व शुक्र ह्या ग्रहांची गति शीघ्र आहे ३०–३४. ज्या वेळी सूर्य दक्षिणायनामध्ये असून भ्रमण करीत असतो त्या वेळी तो सर्वही ग्रहांच्या खालून चाललेला असतो ३५ आणि त्याच्याही ऊर्ध्वभागी आपले मंडल विस्तृत करून चंद्र गमन करीत असतो. सर्वही नक्षत्रमंडल चंद्राच्या ऊर्ध्वभागी असणाऱ्या मार्गांनी गमन करीत असते ३६. नक्षत्रांवरून बुध, बुधाच्या वरच्या बाजूने

अर. ३७ तस्माच्छनैश्चरादूर्ध्वं ततः सप्तर्षिमण्डलम् । ऋक्षीणां चैव सप्तानां ध्रुवश्चोर्ध्वं व्यवस्थितः ३८ कालचक्रमये चक्रे सूर्यो भवति सर्वदा । राश्यर्धेषु गतिर्यत्र तिथ्यर्धे च तिथौ स्मृता ३९ स्तम्भते चरते शीघ्रं ह्रासे चापि दिनक्षये । पादास्तं चापि शुक्रस्य महास्तं तच्च दृश्यते ४० पादास्ते पक्षमात्रं स्यान्महास्ते मासमात्रकम् । वक्रे पक्षार्धमास स्यादतिचारोऽष्टवासरान् ४१ न गण्यते देशभेदे नक्षत्रेण च गण्यते । बाल्यवृध्यस्तताः शुक्रस्य न स्युः सेवाकरस्य च ४२ बालवृद्धौ क्षत्रियस्य न गण्येते सदा बुधैः । पादादूर्ध्वं महास्तश्च वैश्यस्य द्विजसत्तमाः ४३ शेषार्धं भागमस्तस्य शूद्राणामतिगर्हितम् । अतिचारे च वक्रे च न शूद्रस्य विधीयते ४४ वर्जयेद्वासरान्सप्त इति चाथर्वणी श्रुतिः ४५ [१३९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे ज्योतिश्चक्रे चतुर्थोऽध्याय ॥ ४ ॥

सूत उवाच ॥ त्रयाणामेव वर्णानां जन्मतो ब्राह्मणः प्रभुः । संस्कृता ब्राह्मणाः पूर्वं तपस्तप्त्वा द्विजोत्तमाः १ हव्यानामिह कव्यानां सर्वस्यापि च गुप्तये । अश्नन्ति च मुखेनास्य हव्यानि त्रिदिवौकसः २ कव्यानि चैव पितरः किंभूतमधिकं ततः । जन्मना चोत्तमोऽयं च सर्वार्चा ब्राह्मणोऽर्हति ३

शुक्र, शुक्रावरून गुरु आणि गुरूच्याही वरून शनि चाललेला असतो ३७. शनीच्या ऊर्ध्वभागी सप्तर्षिमंडल असून सप्तर्षींच्याही ऊर्ध्वभागी ध्रुव आहे. सूर्य हा कालचक्रस्वरूपी चक्रामध्ये वास्तव्य करीत असून त्यामुळेच त्याची राशि, राश्यर्ध, तिथि आणि तिथ्यर्ध इत्यादिकास कारणीभूत अशी गति असते ३८,३९. तिथीचा ह्रास अथवा क्षय होण्याच्या वेळी सूर्य शीघ्र गमन करीत असतो आणि (वृद्धीच्या वेळी) तो स्तब्ध होतो. पादास्त आणि महास्त असे शुक्रास्ताचे दोन भेद आहेत ४०. ह्यांपैकी पादास्त केवल पंधरा दिवस आणि महास्त एक महिना (अथवा त्याहून अधिक) असतो. तो पंधरा दिवस वक्री असून त्याचा अतिचार आठ दिवस होतो ४१. देशभेदाने ह्या अतिचारादिकांची गणना दिवसावरून न करिता नक्षत्रावरून करितात. सेवा करणाऱ्या लोकास (त्याच्या कामी) शुक्राचे बाल्य, वृद्धि अथवा अस्त ह्याचा दोष नाही ४२. हे द्विजश्रेष्ठहो, विद्वान् लोक क्षत्रियाच्या कृत्यास शुक्राचे बाल्य आणि वृद्धि ही मानीत नाहीत व पादास्ताहून अधिक दिवस अस्त झाल्यास वैश्यांच्या कृत्यास तो महास्तच असे समजतात. शुक्राच्या अस्ताचा शेवटला अर्धा भाग हा शूद्रकृत्यांस अत्यंत निंद्य असून शूद्रास शुक्राचा अतिचार आणि वक्रीभवन असल्यास शुभ कर्म करिता येत नाही. ह्यास्तव, त्यानी त्यासाठी सात दिवस टाकावे अशी आथर्वणश्रुति आहे ४३–४५. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील पहिल्या भागांपैकी ज्योतिश्चक्रविषयक चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥

सूत ह्मणतात:– तीनही वर्णांमध्ये ब्राह्मण हाच उत्पत्तिसिद्ध असणाऱ्या जातीच्या योगानें सिद्ध होय. कारण, हे द्विजश्रेष्ठहो, या लोकामध्ये हव्यकव्ये इत्यादिक सर्वांचेंही संरक्षण व्हावें ह्मणून पूर्वी तपश्चर्या करून ब्रह्मदेवाने ब्राह्मण निर्माण केले. ह्याच्याच मुखाच्या द्वारानें सर्व देव हव्य व पितर कव्य भक्षण करितात. मग त्याहून अधिक असे काय असणार ? ब्राह्मण हा जन्मतःच उत्कृष्ट असल्यामुळे तो सर्व प्रकारच्या संमानास योग्य आहे १–३. हे द्विजश्रेष्ठहो,

१ ग्रहांचा एक राशि भागण्यास जो काल लागतो त्यापूर्वीच त्याचें दुसऱ्या राशीस गमन होणें ह्यास अतिचार असें ह्मणतात हा दोन प्रकारचा आहे. एक वक्रातिचार व दुसरा केवलातिचार. ग्रह ज्या राशीत असेल त्या राशीतून पूर्वीच्या राशीत गेल्यास वक्रातिचार व पुढील राशीत गेल्यास केवलातिचार असें ह्मणतात गुरूचा मात्र, अतिचारानें राश्यंतरास जाऊन तो पुनः पूर्वराशीस आला नाही तर, महातिचार होतो.

स्वकीयं ब्राह्मणो भुङ्क्ते विधत्ते द्विजोत्तमाः । त्रयाणामिह वर्णानां भावाभावाय वै द्विजः ४ भवे द्विज न संदेहस्तुष्टो भावाय वै भवेत् । अभावाय भवेत्क्रुद्धस्तस्मात्पूज्यः सदा हि सः ५ गर्भाधाना दिना चेह संस्कारा यस्य सत्तमाः । चत्वारिंशत्तथा चाष्टौ निर्दृष्टा शास्त्रतो द्विजाः ६ स याति ब्रह्मण स्थान ब्राह्मणत्वे न संशयः ॥ संस्कारपूत प्रथम वेदपूत द्वितीयकम् ७ विद्यापूतं तृतीयं स्यात्तीर्थपूतमनन्तरम् । क्षेत्रपूतं पवित्राप्य वित्त पूजयेद्द्विजाः ८ स्वर्गापवर्गफलदमन्यथा श्रमतामियात् । पूतानां परमः पूतो गुरूणां परमो गुरुः ९ सर्वसत्त्वान्वितो विप्रो निर्मितो ब्रह्मणा पुरा । पूजयित्वा द्विजान्देवाः स्वर्गं भुञ्जन्ति चाक्षयम् १० मनुष्याश्चापि देवत्वं स्वं स्व राज्यं समश्नसाः । यस्य विप्राः प्रसीदन्ति तस्य विष्णु प्रसीदति ११ तस्माद्ब्राह्मणपूजार्थां विष्णुस्तुष्यति तत्क्षणात् । तस्माद्विष्णुमुखाद्विप्रः समुद्भूतः पुरा द्विजा १२ वेदास्तत्रैव संजाताः सृष्टिसंहारहेतवे । तस्माद्विप्रमुखे वेदाश्चार्पिताः पुरुषेण हि १३ पूजार्थं ब्रह्म लोकानां सर्वज्ञत्वार्थतो ध्रुवम् । पित्र्यद्युद्विधिहोत्रेषु वह्निकार्येषु शान्तिषु १४ प्रशस्ता ब्राह्मणा नित्यं सर्वस्वस्ययनेषु च । देवा भुञ्जन्ति हव्यानि बलिं प्रेतादयोऽसुराः १५ पितरो हव्यकव्यानि विप्रस्यैव मुखाद्ध्रुवम् । देवेभ्यश्च पितृभ्यश्च यो दद्याद्यत्कर्मसु १६ दानं होमं बलिं चैव विना

ब्राह्मण ज्यावर आपले स्वत्व असेल त्याच वस्तूचा उपभोग घेऊन कर्म करीत असतो. हे विप्रहो, तो तीनही वर्णाच्या अस्तित्वास आणि नाशास निःसंशय कारणीभूत आहे. कारण, तो संतुष्ट झाला असता अस्तित्वास आणि क्रुद्ध झाल्यास नाशास कारणीभूत होतो. ह्यास्तव, निरंतर त्याचे पूजन केले पाहिजे ४,५. हे साधुश्रेष्ठ द्विजहो, ज्यांचे गर्भाधानादिक अठ्ठेचाळीस संस्कार यथाशास्त्र झाले असतील तो ब्राह्मण ब्रह्मपदास पावतो. मग त्याच्या ब्राह्मणत्वाविषयी तर संशयच नको. संस्काराच्या योगाने पवित्र झालेला ब्राह्मण पहिल्या प्रतीचा असून केवळ वेदाध्ययनाने पवित्र झालेला दुसऱ्या प्रतीचा, विद्येच्या योगाने पवित्र झालेला तिसऱ्या प्रतीचा, तीर्थवासामुळे पवित्र झालेला हा त्यानंतरचा व क्षेत्रवासामुळे शुद्ध झालेला शेवटचा; ह्याप्रमाणे हे द्विजहो, अत्यंत पवित्र असणाऱ्या व स्वर्ग आणि मोक्ष एतद्रूपी फल देणाऱ्या ब्राह्मणांची प्रार्थना करून त्यांचे पूजन करावे, नाहीतर केलेले कर्म केवळ श्रमप्रद होते. पवित्र वस्तूंमध्येही अत्यंत पवित्र व गुरूंमध्येही श्रेष्ठ प्रतीचा गुरु असून कोणत्याही प्राण्याशी विरोध न करणारा व ह्मणूनच सर्वांशी अनुकूल असणारा असा हा ब्राह्मणवर्ण ब्रह्मदेवाने पूर्वी निर्माण केला आहे. ब्राह्मणांची पूजा केल्यामुळेच देव अक्षय्य स्वर्गाचा उपभोग घेत आहेत, मनुष्यासही त्याच्या योगाने देवत्वाची प्राप्ति होते आणि समजस राजास ह्याच्याच योगाने आपापले राज्य मिळते. ज्यास ब्राह्मण प्रसन्न होतात त्यास श्रीविष्णुही प्रसन्न होतो ६–११. ह्यास्तव, ब्राह्मणाचे पूजन केले असता तत्काल श्रीविष्णु संतोष पावतो. हे द्विजहो, त्या श्रीविष्णूच्याच मुखापासून पूर्वी ब्राह्मण निर्माण झाला व वेदही त्याच ठिकाणी प्रकट झाले. पुढे परम पुरुष श्रीविष्णु ह्याने जगताची सृष्टि व संहार ह्यासाठी ब्राह्मणाच्या मुखामध्ये वेदाची स्थापना केली १२,१३. वेद हे सर्व प्रकारच्या ज्ञानास व लोकाकडून होणाऱ्या समानासही निःसंशय कारणीभूत आहे. पितृयज्ञ, विवाह, अग्निकार्ये, शांतिकर्मे आणि सर्व प्रकारची मंगलकृत्ये ह्याविषयी ब्राह्मण हेच प्रशस्त होत. ब्राह्मणाच्याच मुखाच्या द्वारानें देव हव्याचें, प्रेतादिक देवयोनि आणि असुर हे बलीचे आणि पितर हव्य व कव्य ह्यांचे भक्षण करितात. जो मनुष्य यज्ञादिक कृत्यामध्ये देव आणि पितर इत्यादिकास दान, होम आणि बलि अर्पण करील त्याने तो ब्राह्मणावांचून केल्यास निष्फल होतो. ब्राह्मणावाचून केलेला धर्म हा केवल प्रयासासच कारणीभूत असन

विप्रेण निष्फलम् । विना विप्रं च यद्धर्म प्रयासफलमात्रकम् १७ भुञ्जते चासुरास्तत्र प्रेता भूताश्च राक्षसाः । तस्माद्ब्राह्मणमाहूय तेषु पूजां च कारयेत् १८ काले देशे च पात्रे च लक्षकोटिगुणं भवेत् । श्रद्धया च द्विजं दृष्ट्वा प्रकुर्यादभिवादनम् १९ दीर्घायुस्तस्य वाक्येन चिरजीवी भवेन्नरः । अनभिवादिनां विप्रं द्वेषादश्रद्धयाऽपि च २० आयुः क्षीणं भवेत्पुंसां भूमिनाशश्च दुर्गतिः । आयुर्वृद्धिर्यशोवृद्धिर्वृद्धिर्विद्याधनस्य च ॥ पूजयित्वा द्विजश्रेष्ठान्भवेन्नास्त्यत्र संशयः २१ न विप्रपादोदककर्दमानि न वेदशास्त्रप्रतिघोषितानि । स्वाहास्वधास्वस्तिविवर्जितानि श्मशानतुल्यानि गृहाणि तानि २२ षड्विंशतिं दोषमाहुर्नरा नरकभीरवः २३ विमृश्यैव वसेन्नीर्थे ग्रामे वा पत्तने वसेत् । ते स्वर्गे पितृलोके च ब्रह्मलोकेष्ववस्थिताः २४ अन्यथा न वसेद्यस्तस्तस्मात्स्तेयी न पालयेत् । अधमो विषमः पशुः पिशुनः कृपणस्तथा २५ पापिष्ठो नष्टकष्टश्च रुष्टो दुष्टश्च पुष्टकः । हृष्टः कुण्ठश्च अन्धश्च काणश्चैव तथाऽपरः २६ चण्डः खण्डश्च वक्ता च दत्तस्यापहरस्तथा । नीचः खलश्च वाचालः कदर्यश्चपलस्तथा २७ मलीमसश्च ते दोषाः षड्विंशतिरमी मता । एतेषां चापि विप्रेन्द्राः पञ्चाशीतिर्निगद्यते २८ शृणुध्व द्विजशार्दूलाः शास्त्रेऽस्मिन्ब्रुवतः क्रमात् अधमोऽत्र त्रिधा विद्याद्विषमः स्याद्द्विधोचितः २९ पशुश्चतुर्विधश्चैव पिशुनोऽपि हि वै द्विधा । द्विधा चापि च पापिष्ठो नष्टः सप्तविधः स्मृतः ३० कष्टः स्यात्पञ्चधा ज्ञेयो रुष्टोऽपि स्याद्द्विधा भवेत् । दुष्टः स्यात्सप्तविधो ज्ञेयः पुष्टश्चैव भवेद्द्विधा ३१ हृष्टश्चाष्टविधः प्रोक्तः

ज्या ठिकाणी अशा प्रकारचा धर्म झाला असेल त्या ठिकाणी दैत्य, प्रेत, भूत आणि राक्षस हेच त्या धर्माचा उपभोग घेतात. ह्यास्तव, कोणत्याही कर्मात ब्राह्मणास बोलावून त्याची पूजा करावी. त्यातल्या त्यात काल, देश आणि पात्र पाहून धर्म केल्यास तो लक्षगुणित अथवा कोटिगुणित होतो. ब्राह्मणास पाहताच श्रद्धेनें नमस्कार करावा. त्याने "दीर्घायुष्य असो!" असे म्हटले म्हणजे मनुष्य चिरजीवी होतो. द्वेषामुळे असो अथवा अविश्वासामुळे असो, जे लोक ब्राह्मणास नमस्कार करीत नाहींत त्याचे आयुष्य क्षीण होऊन भूमीचा नाश होतो, व त्यास दुर्गति मिळते. ब्राह्मणाचे पूजन केल्याने आयुष्य, कीर्ति, विद्या आणि द्रव्य ह्याची निःसंशय अभिवृद्धि होते. ज्या ठिकाणी ब्राह्मणाच्या चरणोदकाने चिखल झालेला नाही, ज्या ठिकाणी वेदशास्त्रादिकाचा ध्वनि नाही आणि ज्या ठिकाणी स्वाहाकार, स्वधाकार अथवा इतरही मंगलकृत्ये चाललेली नाहींत अशी ती गृहे स्मशानतुल्य होत १४—२२. नरकाची भीति असणारे लोक सव्वीस प्रकारचे दोष आहेत असे सांगतात. जे लोक ह्या दोषांचा त्याग करूनच तीर्थ, गाव अथवा नगर ह्या ठिकाणी वास करितात ते स्वर्गलोकामध्ये, पितृलोकामध्ये अथवा ब्रह्मलोकामध्येच वास करितात असे समजावें २३,२४. ह्यास्तव, ह्याचा त्याग केल्यावाचून कोठेही वास करू नये. स्तेयी, सरक्षण न करणारा, अधम, विषम, पशु, पिशुन, कृपण, पापिष्ठ नष्टकष्ट, रुष्ट, दुष्ट, पुष्ट, हृष्ट, कुंठ, अंध, काण, चंड, खंड, वक्ता, दिलेल्या दानाचा अपहार करणारा, नीच, खल, वाचाल, कदर्य, चपल आणि मलीमस; ह्याप्रमाणें हे विप्रश्रेष्ठहो, हे सव्वीस दोषोत्पादक पुरुष शास्त्रानें मानले आहेत. ह्या सर्वांचे मिळून पंचायशी भेद ह्या शास्त्रात सांगितलेले आहेत. हे द्विजश्रेष्ठहो, ते मी आपणास क्रमाने सांगतों, ऐका. ह्यांपैकीं अधम तीन प्रकारचा, विषम दोन प्रकारचा, पशु चार प्रकारचा, पिशुन दोन प्रकारचा, पापिष्ठ दोन प्रकारचा, नष्ट सात प्रकारचा, कष्ट पांच प्रकारचा, रुष्ट दोन प्रकारचा दुष्ट सहा प्रकारचा, पुष्ट दोन प्रकारचा, हृष्ट आठ प्रकारचा, कुंठ तीन प्रकारचा, अंध आणि काण हे दोन प्रकारचे असून

कुण्डश्चैव त्रिधोदितः । अन्धः काणश्च तौ द्वौ द्वौ स्याद्वै च सगुणोऽगुणः ३२ द्वौ चण्डौ चपलश्चैकः खण्डचण्डौ द्विगुर्भवेत् । दण्डपण्डौ तथा ज्ञेयौ खलनीचौ चतुर्दशम् ३३ वाचालस्य तथा लोके त्रयो भेदा उदाहृताः । कदर्यश्चपलश्चैव तथा ज्ञेयो मलीमसः ३४ द्वावेकश्चतुरश्चैव स्तेयी चैकविधो भवेत् । पृथग्लक्षणमेतेषां शृणुध्वं द्विजसत्तमाः ३५ सम्यग्यस्य परिज्ञाने नरो देवत्वमाप्नुयात् । उपानच्छत्रधारी च गुरुदेवाग्रतश्चरन् ३६ उच्चासनं गुरोरग्रे तीर्थयात्रां करोति यः । यानमारुह्य विप्रेन्द्रा सोऽप्येकत्राधमो मतः ३७ निमज्ज्य तीर्थे विधिवद्ग्राम्यधर्मेण वर्तयन् । द्वितीयश्चाधम प्रोक्तो निन्दितः परिकीर्तितः ३८ वाक्चैव मधुरा श्लक्ष्णा हृदि हालाहलं विषम् । वदत्यन्यत्करोत्यन्यद्द्वावेतौ विषमौ स्मृतौ ३९ मोक्षचिन्तामतिक्रम्य योऽन्यचिन्तापरिश्रमः । हरिसेवाविहीनो य स पशुर्योनितः पशु ४० प्रयागे विद्यमानेऽपि योऽन्यत्र स्नानमाचरेत् । दृष्ट देव परित्यज्य अदृष्ट भजते तु यः ४१ आयुषस्तु क्षयार्थाय शास्त्रीयमृषिसंमतम् । योगाभ्यासं ततो हित्वा तृतीयश्चाधमः पशुः ४२ बहूनि पुस्तकानीह शास्त्राणि विविधानि च । तस्य सारं न जानाति स एव जम्बुकः पशुः ४३ बलेन च्छलछद्मेन उपायेन प्रबन्धनम् । सोऽपि स्यात्पिशुनः क्रूरातः प्रणयाद्वा द्वितीयकः ४४ मधुरान्नं प्रतिष्ठाप्य दैवे पित्र्ये च कर्मणि । म्लानं चापि च तिक्तान्नं यः प्रयच्छति दुर्मतिः ४५ कृपणः

सगुण आणि निर्गुण असे त्याचे आणखीही दोन भेद आहेत २९–३२. चंडाचे प्रकार दोन असून चपल एक प्रकारचा आहे व चंडाप्रमाणेच खंडही दोन प्रकारचा आहे. दंड आणि पंड हेही त्याच प्रकारचे असून खल व नीच ह्याचे भेद अनुक्रमे चार व दोन आहेत ३३. वाचालाचे भेद तीन प्रकारचे सांगितले आहेत. कदर्य, चपल आणि मलीमस हे अनुक्रमे दोन, एक आणि चार प्रकारचे असून स्तेयी एक प्रकारचा आहे. हे द्विजश्रेष्ठहो, आता मी ज्याचे ज्ञान झाले असता मनुष्यास देवत्वाची प्राप्ति होईल असे ह्याचे लक्षण निरनिराळे सांगतो, ऐक. हे विप्रश्रेष्ठहो, जो मनुष्य देव आणि गुरु ह्याच्या पुढे जोडा आणि छत्री घेऊन चालतो, गुरूच्या समोर उच्चासनावर बसतो अथवा वाहनात बसून तीर्थयात्रा करितो तो एक प्रकारचा अधम होय ३४–३७. तीर्थामध्ये यथाविधि बुडया मारून ग्राम्यधर्माने वर्तन करणारा मनुष्य दुसऱ्या प्रकारचा होय. हा निंद्य होय असे शास्त्रांनी सांगितले आहे ३८. ज्याची वाणी मधुर आणि मृदु असून अंतःकरणात केवल कालकूट भरलेले आहे तो एक व एक बोलून भलतेंच करणारा हा दुसरा ३९. जो मनुष्य मोक्षाविषयी विचार करावयाचा सोडून दुसऱ्या गोष्टीविषयी परिश्रम करितो आणि ईश्वरसेवाविरहित असतो तो जन्मतःच पशु होय ४०. प्रयाग सन्निध असताही जो दुसऱ्या ठिकाणी स्नान करील अथवा जो प्रत्यक्ष देवाचा त्याग करून अप्रत्यक्ष देवाची उपासना करील तो दुसरा पशु होय. जो मनुष्य शास्त्र आणि ऋषि याना समत असणाऱ्या योगाभ्यासाचा त्याग करून केवळ आयुष्याच्या क्षयास कारणीभूत झाला असेल तो तिसऱ्या प्रकारचा अधम पशु होय ४१,४२. पुष्कळ पुस्तके व अनेक प्रकारचीं शास्त्रे जवळ असून त्यांचें तात्पर्य काय आहे हे ज्यास समजत नाहीं तोच जंबुकसंज्ञक पशु होय ४३. बलात्कारानें, काही तरी मिषानें, कपटाने अथवा काहीं तरी उपायानें दुसऱ्यास बद्ध करणारा हा पहिल्या प्रकारचा पशु असून प्रेम दाखवून बंधनात पाडणारा दुसऱ्या प्रकारचा पशु होय ४४. मधुर अन्न ठेवून देऊन दैवी कर्मात अथवा पितृकर्मात जो दुर्बुद्धि मनुष्य सुकलेलें अथवा कटु असे अन्न अर्पण करितो त्यास कृपण असें समजावें. ह्याला स्वर्गही मिळत नाहीं व मोक्षही मिळत नाही. दान थोडेच पण तेही आनंद न होता करणारा

स तु विज्ञेयो न स्वर्गी न च मोक्षभाक् । कुदाता च मुदा हीनः सङ्क्लेशेन यजेत्तु यः ४६ स एव कृपणः ख्यातः सर्वधर्मबहिष्कृतः । अदोषेण शुभत्यागी शुभकायोपविक्रयी ४७ पितृमातृगुरुत्यागी शौचाचारविवर्जितः । पित्रोरग्रे समश्नाति स पापिष्ठतमः स्मृतः ४८ जीवत्पितृपरित्यक्तं सुतं सेवन्न वा क्वचित् । द्वितीयस्तु स पापिष्ठो ह्यमलोपी तृतीयकः ४९ साध्वाचारं च मच्छास्त्र सेवन चापि दर्शयेत् । स नष्ट इति विज्ञेयः क्रयक्रीतं च मैथुनम् ५० जीवद्देवलवृत्तिः स्याद्वार्धुषिपणजीवकः । कन्याशुल्केन जीवेद्वा स्त्रीधनेन च वा क्वचित् ५१ षडेव कष्टा शास्त्रे च न स्वर्गमोक्षभागिनः । सदा क्रुद्धं मनो यस्य हीनं दृष्ट्वा प्रकोपवान् ५२ भ्रुकुटीकुटिलः क्रुद्धो रुष्टः पञ्चविधोदितः । अकार्ये भ्रमते नित्यं धर्मार्थे न व्यवस्थितः ५३ निद्रालुर्व्यसनासक्तो मद्यपस्त्रीनिषेवकः । दुष्टैः सह सदालापः स दुष्टः सप्तधा स्मृतः ५४ एकाकी मिष्टमश्नाति वञ्चकः साधुनिन्दकः । यथा सूकर पुष्टः स्यात्तथा पुष्टः प्रकीर्तितः ५५ निगमागमतन्त्राणि नाध्यापयति यो द्विजः । न शृणोति च पापात्मा स दृष्ट इति चोच्यते ५६ श्रुतिः स्मृतिश्च विप्राणां नयने द्वे विनिर्मिते । एकेन विकलः काणो द्वाभ्यामन्धः प्रकीर्तितः ५७ विवादः सोदरैः सार्धं पित्रोरप्रियकृद्वदेत् । द्विजाधमः स विज्ञेय स चण्डः शास्त्रनिन्दितः ५८ पिशुनो राजगामी च शूद्रसेवक एव च । शूद्रान्नागमनो विप्रः स चण्डश्च द्विजाधमः ५९ पक्वान्न शूद्रगेहे च यो भुङ्क्ते

व क्रुद्ध होऊन याग करणारा हाही कृपणच होय. हा सर्व धर्मांतून बहिष्कृत आहे असे समजावे. दोष नसता चागल्याचा त्याग करणारा, सुदर शरीराचा विक्रय करणारा, पिता, माता आणि गुरु ह्यांचा त्याग करणारा, शौचप्रभृति सदाचारांनीं विरहित असणारा आणि आईबापांचे पूर्वी जेवण करणारा हा अत्यत पापिष्ठ होय. जो मनुष्य पिता जिवत असून त्याने त्याग केलेल्या (अर्थात् पोरक्या) मुलाचें मुळीच सेवन करीत नाहीं तो दुसरा व होमाचा लोप करणारा तिसरा पापिष्ठ होय. जो सदाचार झाकून ठेवून सेवा केली असे दाखवितो तो पहिला नष्ट होय. हा एक व वेश्यादिक पण्य स्त्रियान्या सभोगावर उपजीविका करणारा, देवद्रव्यावर उपजीविका करणारा, पत्नीचा विक्रय करून उदरनिर्वाह करणारा, कन्येचा विक्रय करून आलेल्या द्रव्यावर चरितार्थ चालविणारा आणि स्त्रीधनावर निर्वाह करणारा असे सहा प्रकारचे कष्ट शास्त्रामध्ये सांगितले आहेत, ते स्वर्गास अथवा मोक्षास जात नाहीत. ज्याचे अतःकरण सदोदित क्रुद्ध असून ज्यास हीन स्थितींतील प्राणी पाहताच क्रोध येतो, ज्यानें सदोदित भिवया चढविलेल्या असतात, जो अंतःकरणाचा कुटिल असतो आणि जो सर्वथैव क्रुद्ध असतो तो; ह्याप्रमाणे रुष्ट पुरुषाचे पाच भेद सांगितले आहेत. सदोदित दुष्कृत्याकडे धावणारा, धर्माकडे मुळींच लक्ष्य न देणारा, झोपाळू, व्यसनामध्ये आसक्त असलेला, मद्यपान करणारा, अगम्य स्त्रीशी गमन करणारा आणि सदोदित दुष्टाशीं संभाषण करणारा असे सात प्रकारचे दुष्ट सांगितले आहेत ४५–५४. एकटाच मिष्ट भोजन करणारा, साधूची निंदा करणारा, दुसऱ्यास फसविणारा आणि डुकराप्रमाणें पुष्ट होऊन राहिलेला अशा मनुष्यास पुष्ट असें म्हणतात ५५. जो ब्राह्मण वेद, शास्त्र आणि तंत्रें हीं दुसऱ्यास पढवीत नाहीं अथवा आपणही ऐकत नाहीं त्या दुष्टास हृष्ट असे म्हणतात. परमेश्वरानें श्रुति आणि स्मृति हे दोन ब्राह्मणाचे नेत्र निर्माण केले आहेत; त्यापैकीं ज्यास एक नसेल तो काण आणि ज्यास दोनही नसतील तो अंध होय ५६,५७. आपल्या बंधूशीं विवाद करणारा, मातापितरास न रुचेल तें करणारा आणि बोलणारा पुरुष द्विजाधम होय. त्यास चंड असें नाव असून तो शास्त्रामध्यें निंद्य मानलेला आहे ५८. राजाकडे जाऊन

सकृदेव वा । पञ्चरात्रं शूद्रगेहे निवासी चण्ड उच्यते ६० अष्टकुष्ठान्वितः कुष्ठी त्रिकुष्ठी शास्त्रनिन्दितः । एतैः सह सदालापः स भवेन्नरसमोऽधमः ६१ कीटवद्भ्रमणं यस्य कुव्यापारी कुपण्डितः । अज्ञानाच्च वदेद्धर्ममन्यवृत्तिः प्रधावति ६२ अविमुक्तं परित्यज्य योऽन्यदेशे वसेच्चिरम् । स द्विधा सूकरपशुर्निन्दितः सिद्धसंमतः ६३ कपोलेन हि संयुक्तो भ्रुकुटीकुटिलाननः । नृपदण्डयेद्यस्तु स दण्डः समुदाहृतः ६४ ब्रह्मस्वहरणं कृत्वा नृपदेवस्वमेव च । धनेन तेन इतरं देवं वा ब्राह्मणानपि ६५ संतर्पयति योऽश्नाति यः प्रयच्छति वा क्वचित् । स खरश्च पशुश्रेष्ठ. सर्ववेदेषु निन्दितः ६६ अक्षराभ्यासनिरतः पठ्यते न च बुध्यते । पदशास्त्रपरित्यक्तः स पशुः स्यान्न संशयः ६७ वदत्यन्यत्करोत्यन्यद्गुरुदेवाग्रतो यतः । स नीच इति विज्ञेयो ह्यनाचारस्तथाऽपरः ६८ षड्गुणालङ्कृतेः साधोर्दोषान्मृगयते खलः । वने पुष्पफलाकीर्णे करभः कण्टकानिव ६९ दैवेन च विहीनो यः कुस्सभावां वदेत्तु यः । स वाचाल इति ख्यातो ह्यनपत्रपसयुतः ७० चाण्डालैः सह आलापः पक्षिणां पाषणे रतः । मार्जारैश्चापि सभुङ्क्ते यत्कृत्यं मर्कटोपमम् ७१ तृणच्छेदी लोष्टमर्दी वृथा मांसाशनश्च यः । चपलः स तु विज्ञेयः परभार्यैस्तथाऽपरः ७२ स्त्रहा-

---

दुष्टपणा करणारा, शूद्राची सेवा करणारा अथवा शूद्रस्त्रीशी गमन करणारा जो अधम ब्राह्मण त्यासही चंड असे ह्मणतात. जो शूद्राच्या घरी शिजावलेले अन्न एकवारही भक्षण करितो अथवा पाच दिवस शूद्राच्या घरी वास करितो त्यास चड असे म्हणतात ५९,६०. आठ प्रकारच्या कुष्ठानी युक्त असणारा अथवा तीन प्रकारचें कुष्ठ झालेला, कुष्ठी पुरुष आणि शास्त्रात निंद्य मानलेल्या ह्यान्याशीं सदोदित संभाषण करणारा नीच मनुष्य हाही चडतुल्यच होय ६१. जो कीटकाप्रमाणे भ्रमण करीत असतो, ज्याचे व्यापार आणि पांडित्य हीं कुत्सित प्रकारचीं असतात, जो ज्ञान नसता धर्मशास्त्र सांगतो, जो वृत्तीसाठीं पुढेपुढें धावत असतो आणि काशीक्षेत्राचा त्याग करून दुसऱ्या देशामध्यें चिरकाल जाऊन रहातो तो दोनही प्रकारचा सूकरसंज्ञक पशु असून सिद्धान्या मतें निंद्य मानला गेला आहे ६२,६३. गाल चागले असून भिवया वक्र असल्यामुळे मुख किंचित् तिरपे दिसणारा (सारांश, राजासारखी चर्या असणारा व म्हणूनच स्वतःस राजा समजून), राजाप्रमाणे लोकास दंड करणारा जो मनुष्य असतो त्यास दंड असे म्हणतात. ब्राह्मणाचे, राजाचें अथवा देवाचे द्रव्य घेऊन त्या द्रव्याच्या योगाने जो इतर देव अथवा ब्राह्मण ह्यास तृप्त करितो अथवा स्वतःच त्याचा उपभोग घेतो किंवा एखाद्या ठिकाणी त्याचे दान करितो तो सर्वही वेदांनीं निंद्य मानलेला पशुश्रेष्ठ गर्दभ होय ६४–६६. जो केवळ अक्षराची घोकंपट्टी करण्यात गढून गेला असून केवळ वाचतो मात्र, पण अर्थ जाणत नाहीं तो व्याकरणशास्त्रशून्य असणारा मनुष्य निःसंशय पशुच होय. गुरु आणि देव ह्यान्याही पुढे एक सांगून भलतेच करणारा हा एक आणि अनाचाराविषयीं तत्पर असणारा हा दुसरा असे नीचाचे दोन प्रकार आहेत ६७,६८. अरण्य जरी पुष्प आणि फले ह्यानीं व्याप्त असले तरी उंट ज्याप्रमाणे त्यात कटकाचा शोध करीत असतो त्याप्रमाणे सहा प्रकारच्या गुणानी अलंकृत असणाऱ्या सज्जनाचे दोष तेवढे शोधून काढणारा मनुष्य खर होय. जो भाग्यहीन असून निर्लज्ज आणि कुत्सित भाषण करणारा असतो त्यास वाचाल असे म्हणतात ६९,७०. चांडालाबरोबर भाषण करणारा, पक्ष्याचे पोषण करण्यांत गढून गेलेला, मांजराच्या सागांत जेवणारा, मर्कटासारख्या क्रिया करणारा, व्यर्थ तृणच्छेद करणारा, ढेकळें फोडणारा आणि कारणावाचून मास भक्षण करणारा मनुष्य चपल होय. परस्त्रीच्या ठिकाणी आसक्त होणाऱ्यासही चपल असें

दूषणहीनो यो गन्धचन्दनवर्जितः । नित्यक्रियासु मधावी नित्य स च मलीमसः ७३ अन्यायेन गृह वित्तादन्यायेन तथा धनम् । शास्त्रादन्यद्गृह मन्त्र स स्तेयी ब्रह्मघातकः ७४ देवपुस्तकरत्नानां मणिमुक्ताश्वमेव च । गोभूमिस्वर्णहरणः स स्तेयीति निगद्यते ७५ देवैरपि भावयेत्पश्चान्मानुषैरपि न संशय । अन्योन्यभावना कार्या स स्तेयी यो न भावयेत् ७६ गुरोः प्रसादाद्यजति पित्रोश्चापि प्रसादत । करोति च यथार्ह च स च स्वर्गे महीयते ७७ न पोषयति दुष्टात्मा स स्तेयी चापरः स्मृतः । उपकारजनं प्राप्य न करोति परिक्रियाम् ७८ स तस्य नरके शेते शोणिते च पतत्यधः । सर्वेषां च सवर्णानां धर्मतो ब्राह्मणः प्रभुः ७९ पृथिवीपालको राजा धर्मचक्षुरुदाहृत । प्रजापतेर्मुखोद्भूतो होरातन्त्रे यथोदित ८० तद्विदो गणनाभिज्ञा अन्यविप्राः प्रचक्षते । गङ्गाहीनं हतं देशं विप्रहीना यथा क्रिया ८१ होराज्ञविहीनो यो देशोऽसौ विप्लवप्लवः । अपदीपा यथा रात्रिरनादित्य यथा नभः ८२ तथाऽसांवत्सरो राजा भ्रमत्यन्ध इवाध्वनि । स्थापयेद्धर्मतो विप्र भावयेत्कर्मवृद्धये ८३ श्मश्रुयुक्तो द्विजः पूज्यः सूर्यो विप्रस्तु श्मश्रुल. । प्रत्यक्षदर्शनात्पुण्य त्रिदिनं कल्मषापहम् ८४ दर्शने व्रात्यविप्रस्य सूर्यं दृष्ट्वा विशुध्यति । न व्रात्यत्व सूर्यविप्र पूजयेद्यज्ञसिद्धये ८५ उर्ध्वातिवेदस्याधिकारः सूर्यविप्रस्य वै द्विजाः ।

ह्मणतात ७१,७२. जो अगास तेल लावीत नाही, चोळीत नाही, सुगधी पदार्थ लावीत नाही अथवा नित्यक्रियान्या प्रसगीही चदन लावीत नाही तो मनुष्य जरी बुद्धिमान् असला तरी त्यास मलीमस असे ह्मणतात ७३. जो अन्यायाने गृह अथवा द्रव्य मिळवितो व शास्त्रविरुद्ध असणाऱ्या गृहाचा अथवा मत्राचा स्वीकार करितो त्या ब्रह्मघातकी मनुष्यास स्तेयी असे ह्मणतात ७४. तसेच देव, पुस्तके, रत्ने, माणके, मोती, घोडी, गाई, भूमि अथवा सुवर्ण ह्याचा अपहार करणाऱ्यासही स्तेयी असे ह्मणतात ७५. देवानेही आपली काळजी वहावी ह्मणून मनुष्यानें प्रथम त्याजविषयी काळजी बाळगली पाहिजे. ह्याप्रमाणे परस्पराची काळजी वाहणे आवश्यक असता जो ती वाहणार नाही त्यास स्तेयी असे ह्मणतात ७६. गुरूच्या प्रसादाने जो मनुष्य याग करितो अथवा जो मातापितराच्या प्रसादानेही यथायोग्य याग करितो तो स्वर्गलोकी मान्य होऊन राहतो ७७. जो मनुष्य मातापितरादिकांचे पोषण करीत नाही तो दुष्ट दुसरा स्तेयी होय. उपकारी मनुष्य मिळाला असताही जो त्याचा बहुमान करीत नाही तो त्याच्या नरकामध्ये अथवा रक्तामध्ये वास करितो व अधोगतीस जातो. ब्राह्मण हा धर्मत सर्वही वर्णाचा प्रभु होय. तो सर्व पृथ्वीचा पालक केवल राजाच असून धर्मदृष्टि आहे असे सागितले आहे. हा होरातत्रात सागितल्याप्रमाणे ब्रह्मदेवाच्या मुखापासून उत्पन्न झालेला आहे ७८-८०. गणितशास्त्राचे ज्ञान असलेले इतर ब्राह्मण होरातंत्रज्ञ होत असे सागितले आहे. ज्याप्रमाणे भागीरथी नसणारा देश हा मृत देश असून ब्राह्मणशून्य असणारी क्रिया निष्फल होय त्याचप्रमाणे होराशास्त्राचे ज्ञान नसणारा ब्राह्मण निष्फल असून त्याने युक्त असणारा देशही केवल विपत्तिरूपी नौकेचा अवलंब करणारा आहे. ज्याप्रमाणे दीपावाचून रात्रि अथवा सूर्यावाचून आकाश त्याचप्रमाणे ज्योतिषी जवळ नसणारा राजा होय. तो मार्गातून चालणाऱ्या अंधाप्रमाणे भ्रमण करीत असतो. राजाने ब्राह्मणास धर्माप्रमाणे वागवावे आणि कर्माची अभिवृद्धि होण्यासाठी त्याजविषयी काळजी वहावी ८१-८३. ज्यास मिशा असतील अशा ब्राह्मणाचे पूजन करावे. कारण, मिशाळ ब्राह्मण ह्मणजे प्रत्यक्ष सूर्य होय. त्याचे प्रत्यक्ष दर्शन झालें असतां लागणारे पुण्य तीन दिवसाच्या पातकाचा नाश करिते ८४. व्रात्य [उपनयनादि संस्कारशून्य] ब्राह्मणाचे दर्शन झाल्यास सूर्याचे अवलोकन केल्याने शुद्धि येत. पण सूर्यब्राह्मणाचे ठिकाणी व्रात्यत्व असू

जातिभेदाश्च चत्वारो भोजकः कथितस्तथा ८६ शिवविप्रः सूर्यविप्रश्चतुर्थो परिपठ्यते । कथितो मध्यमस्तेषां सूर्यविप्रस्तथोत्तमः ८७ शिवलिङ्गार्चनरतः शिवविप्रस्तु निन्दितः । सूर्यविप्रस्य विप्रस्य वैद्यस्य च नृपस्य च ८८ प्रवासयेदक्षतेन सपुत्रपशुबान्धवः । अवध्यः सर्वलोकेषु राजा राज्येन पालयेत् ८९ वसुभिर्वस्त्रगन्धाद्यैर्मालयैश्च विविधैरपि । देशाचक्रविदः पूज्या होराचक्रविदः पराः ९० सूर्यचक्रविदः पूज्या नावमन्येत्कथञ्चन । सिद्धिवृद्धिं च धनजिं च य इच्छेदायुषा समम् ९१ गणविप्रसमः पूज्यो दैवज्ञः समुदाहृतः । जाते बाले निरूप्ये च लग्नग्रहनिरूपणम् ९२ सस्थान सूर्यविप्रो यः सूर्यस्य विप्रसत्तमाः । द्विमात्रिकां समभ्यस्य सर्ववेदफलं लभेत् ९३ [२३२] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

सूत उवाच ॥ चतुर्णामपि वर्णानां नान्यो बन्धुः प्रचक्षते । पित्राद्दते द्विजश्रेष्ठा इतीयं नैगमी स्मृतिः १ त्रयोऽपि गुरव श्रेष्ठास्तस्मान्माता परो गुरु । ये सोदरा ज्येष्ठश्रेष्ठा उत्तरोत्तरतो गुरु २ द्वादश्यां तु अमावास्यामथवा रविसङ्क्रमे । वासांसि दक्षिणा देया मणिमुक्ता यथारुचि ३ अयने विषुवे चैव चन्द्रसूर्यग्रहे तथा । प्राप्ते चापरपक्षे तु भोजयेच्चापि शक्तितः ४ पश्चात्प्रवन्दयेत्पादौ मन्त्रेणानेन सत्तमाः । विधिवद्वन्दनादेव सर्वतीर्थफलं लभेत् ५ स्वर्गापवर्गयद-

---

शकत नाही. ह्यास्तव, यज्ञसिद्धयर्थ सदोदित त्याचे पूजन करावे ८५. हे द्विजहो, ज्योतिषशास्त्राचा अधिकार सूर्यब्राह्मणाचा आहे. त्याच्या जातीचे चार भेद आहेत. ते भोजक, कथित, शिवविप्र आणि सूर्यविप्र हे होत. त्यांपैकी कथित हा मध्यम असून सूर्यविप्र हा उत्तम होय ८६–८७. शिवलिंगार्चन करण्यात आसक्त झालेला शिवविप्र हा निंद्य होय. सूर्यविप्र. वैद्यविद्या जाणणारा विप्र आणि राजा ह्यान्याशी संबंध करून पुत्र, पशु आणि बांधव यान्यासहवर्तमान अक्षय्य वास्तव्य करावें. राजधर्माने वागून लोकांचे पालन करणारा राजा अवध्य होय ८८,८९. द्रव्य, वस्त्रे, गंध आणि नानाप्रकारची माल्ये ह्याच्या योगाने देशसमुदाय आणि होराशास्त्र जाणणाऱ्या श्रेष्ठ ब्राह्मणाचे पूजन करावे. सिद्धि, अभ्युदय, धनाभिवृद्धि आणि आयुष्य ह्यांची ज्यास इच्छा असेल त्याने सूर्यचक्रज्ञ ब्राह्मणाचे पूजन करावे, त्याचा अपमान केव्हाही करूं नये. ९०–९१. बालक उत्पन्न होताच इतर ब्राह्मणसमुदायाप्रमाणे दैवज्ञ ब्राह्मणाची पूजा करून त्याजकडून त्याचे लग्न आणि ग्रह याचा विचार करावा असें सांगितले आहे. हे ब्राह्मणश्रेष्ठहो, सूर्यविप्र म्हणजे प्रत्यक्ष श्रीसूर्याचीच मूर्ति आहे. ह्याने वेदांतील दोन मात्रांचे जरी अध्ययन केले तरीही त्यास सर्व वेदफलाची प्राप्ति होते ९२,९३. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वांतील पहिल्या भागापैकी पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

सूत म्हणतातः—हे द्विजश्रेष्ठहो, चारही वर्णांस मातापितरांसारखा दुसरा बंधु नाही अशी वेदमूलक स्मृति आहे १. (माता, पिता आणि गुरु) हे तीनही श्रेष्ठच होत. तथापि, त्यांतही माता हाच श्रेष्ठ प्रतीचा गुरु होय. ज्येष्ठ, कनिष्ठ इत्यादि जे आपले बंधु असतील ते यथापूर्व उत्तरोत्तर श्रेष्ठ होत २. द्वादशी, अमावास्या आणि रविसंक्रमण, तसेच अयनसंक्राति, विषुवसंक्राति आणि चंद्रसूर्यग्रहणे ह्या वेळी (पितरांच्या उद्देशाने) ब्राह्मणास वस्त्रे आणि आपल्या इच्छेप्रमाणे माणिक्यें अथवा मौक्तिक इत्यादि दक्षिणा अर्पण करावी. कृष्णपक्ष आला म्हणजे त्यास यथाशक्ति भोजन घालावे आणि हे सज्जनश्रेष्ठहो, ह्या मंत्राच्या योगाने त्यांच्या चरणास नमस्कार करावा. कारण, यथाशास्त्र केवल

मेकमाद्यं ब्रह्मस्वरूप पितरं नमामि । यतो जगत्पश्यति चारुरूपं तं तर्पयामः सलिलैस्तिलैर्युतम् ६ पितरो जनयन्तीह पितरः पालयन्ति च । पितरो ब्रह्मरूपा हि तेभ्यो नित्यं नमो नमः ७ यस्मा-द्विजयत लोको यस्माद्भूमः प्रवर्तते । नमस्तुभ्यं पितः साक्षाद्ब्रह्मरूप नमोऽस्तु ते ८ या कुक्षि बिभरे कृत्वा स्वय रक्षति सर्वतः । नमामि जननीं देवीं परां प्रकृतिरूपिणीम् ९ कृच्छ्रेण महता देवि धारितोऽहं त्वयादरे । त्वत्प्रसादाज्जगद्दृष्टं मातर्नित्य नमोऽस्तु ते १० पृथिव्यां यानि तीर्थानि सागरादीनि सर्वशः । वसन्ति यत्र तां नौमि मातर भूतिहेतवे ११ गुरुदेवप्रसादेन लब्धा विद्या यशस्करी । शिवरूप नमस्तस्मै संसारार्णवसेतवे १२ वेदवेदाङ्गशास्त्राणां तत्त्व यत्र प्रतिष्ठितम् । आधारः सर्वभूतानामग्रजन्मन्नमोऽस्तु ते १३ ब्राह्मणो जगतां तीर्थ पावनं परमं यत । भूदेव हर मे पापं विष्णुरूपिन्नमोस्तु ते १४ पितामहं च प्रणमेत्सर्वादौ मातरं गुरुम् । मातामह च तदनु आचार्यमथ ऋत्विजम् १५ मातृमन्त्रैश्च प्रथमं प्रणमेद्भक्तिभावतः । तथाऽग्रजस्तथा ज्येष्ठः पितृव्योऽपि द्विजोत्तमाः १६ दृष्टादृष्टे च स गुरुर्गुरुर्माता तथा पिता । दृष्टादृष्टस्तृतीयः स्यात्सूर्योऽग्निश्चन्द्र एव च १७ मन्त्रदाता गुरु रूढातः सप्तमः परिकीर्तितः । स एव च गुरुः श्रेष्ठः स्वर्गापवर्गहेतुकः १८ दृष्टदेवं च यो हित्वा अदृष्टं च निषेवते । पापात्मा

वंदन केलें असताही सर्व प्रकारच्या तीर्थांचे फल मिळतें ३-५. (तो मंत्र असा.) स्वर्ग आणि मोक्ष देणारा, अद्वितीय, आदिभूत आणि ब्रह्मस्वरूपी असणाऱ्या पित्यास मी नमस्कार करितो. ज्याच्या योगानें हा पुत्र (अर्थात् मी) हें सुंदर स्वरूप असलेलें जग पहात आहे त्या पित्याचें मी तिलयुक्त जलानें तर्पण करितों ६. इहलोकामध्यें पितर हे जन्मदाते असून पालन करणारे आहेत तसेंच, पितर हेही ब्रह्मरूपी आहेत; त्यास सदोदित नमस्कार असो ७. ज्याच्या योगानें लोकाचा अभ्युदय होतो व ज्यापासून धर्माची प्रवृत्ति होते त्या साक्षात् ब्रह्मतुल्य पित्यास नमस्कार असो ८. जी आपल्या उदरामध्यें धारण करून सर्व बाजूनी स्वतः संरक्षण करिते त्या श्रेष्ठ आणि प्रकृति-स्वरूपी मातृदेवीस मी नमस्कार करितो. हे देवि, तू मोठ्या कष्टाने मजला आपल्या उदरामध्यें धारण केलेंस व तुझ्याच प्रसादानें मजला हे जग दिसलें; तेव्हा हे माते, तुजला नित्य नमस्कार असो ९,१०. पृथ्वीवर असणारीं जीं समुद्रादिक सर्व तीर्थें तीं जिच्या ठिकाणीं वास करितात त्या मातेस मी कल्याणप्राप्त्यर्थ नमस्कार करितो ११. ज्या गुरुदेवाच्या प्रसादाने मजला कीर्तिदायक विद्येची प्राप्ति झाली त्या संसारसागरातून तरून जाणाऱ्यास सेतूप्रमाणें असणाऱ्या शिवस्वरूपी गुरूस नमस्कार असो १२. वेद, वेदांगे आणि शास्त्रे ह्यांचीं तत्त्वे ज्याच्या ठिकाणीं निश्चलपणे वास्तव्य करितात त्या सर्वांही प्राण्यास आधारभूत असणाऱ्या तुज ब्राह्मणास नमस्कार असो १३. ब्राह्मण हें सर्व जगतास पवित्र करणारें आणि श्रेष्ठ असें तीर्थ आहे. ह्यास्तव, हे विष्णुस्वरूपी भूदेव, आपण माझ्या पातकाचा नाश करा. आपणास नमस्कार असो १४. सर्वांच्या पूर्वी पितामहास, तदनंतर मातेस व नंतर अनुक्रमें पिता, मातामह, आचार्य आणि ऋत्विज ह्यास नमस्कार करावा. मातृ-देवतात्मक मंत्र म्हणून प्रथम भक्तिभावानें मातेस नमस्कार करावा आणि हे द्विजश्रेष्ठहो, आपल्याहून वडील आणि सर्वांत वडील असणारे बंधु आणि चुलता ह्यासही नमस्कार करावा १५, १६. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फलदायक अशा शास्त्राचा उपदेश करणारा गुरु, माता, पिता, सूर्य, चंद्र आणि अग्नि हे तीन दृष्टादृष्ट गुरु आणि मंत्रदाता असे सात प्रकारचे गुरु सांगितले आहेत. स्वर्ग आणि मोक्ष ह्यांच्या प्राप्तीस कारणीभूत असणारा जो गुरु तोच श्रेष्ठ गुरु होय १७,१८. (हा प्रत्यक्ष दे-वता आहे.) प्रत्यक्ष देवतेचा त्याग करून जो पापिष्ठ मनुष्य अप्रत्यक्ष देवतेची सेवा करितो तो

परमः सैकस्तिर्यग्योनिं च गच्छति १९ यथा पिता ज्येष्ठपिता कनीयांश्च तथा द्विजाः । ज्येष्ठो भ्राता पितृतुल्यो मान्यः सत्कारमार्हयतः २० आचार्यो ब्रह्मणो मूर्तिः पिता मूर्तिः प्रजापतेः । माता पृथिवीमूर्तिश्च भ्रातरो मूर्तिरात्मनः २१ पिता मेरुर्वसिष्ठ स्याद्धर्ममूर्तिः सनातनः । स चापि दृष्टदेवः स्यात्तदाज्ञां परिपालयेत् २२ पितामह च पित्र्ये हव्यकव्यैश्च तर्पयेत् । स याति ब्रह्मण स्थानं यस्मान्नावर्तते पुनः २३ तस्य पादोदकस्नानाद्गङ्गा नार्हति केवलम् । तथाऽवलोकनात्तस्य ज्योतिर्लिङ्गशतैश्च किम् २४ द्वात्रिंशत्कुण्डकशिलास्पर्शने यादृश फलम् । तादृशं कोटिगुणितं पितामहप्रदक्षिणे २५ शतमातृवरिष्ठाश्च पितामह्याश्च पोषणे । गुणास्तद्दर्शने विप्राः संसारे न पुनर्विशेत् २६ [२५८] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे गुरुगुणवर्णनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

सूत उवाच ॥ समाख्यामीह विप्रेन्द्रा इतिहास पुरातनम् । श्रवणेऽपि च धर्मात्मा शूयतां यन्मया पुरा १ पृष्टोवाच महातेजा विरिञ्चो भगवान्प्रभुः । हन्त ते कथयाम्येष पुराणश्रवणे विधिम् २ इतिहासपुराणानि श्रुत्वा भक्त्या द्विजोत्तमा । मुच्यते सर्वपापेभ्यो ब्रह्महत्याशतं च यत् ३ साय प्रातस्तथा रात्रौ शुचिर्भूत्वा शृणोति यः । तस्य विष्णुस्तथा ब्रह्मा तुष्यते शंकरस्तथा ४ प्रत्यूष भगवान्ब्रह्मा दिनान्ते तुष्यते हरिः । महादेवस्तथा रात्रौ शृण्वतां पठतां

निकृष्ट प्रतीचा असून त्यास तिर्यग्योनीची प्राप्ति होते १९. हे द्विजहो, ज्याप्रमाणे पिता अथवा वडील चुलता त्याचप्रमाणें लहान चुलत्याचीही योग्यता आहे. हे द्विजहो, ज्येष्ठ भ्रात्याचीही योग्यता पित्याप्रमाणेंच असल्यामुळें त्याचे संमानपूर्वक पूजन करावे. गुरु हा साक्षात् ब्रह्मदेवाची मूर्ति असून पिता प्रजापतीची, माता पृथ्वीची आणि बंधु आत्म्याची मूर्ति आहे २०,२१. पिता हा प्रत्यक्ष मेरु अथवा वसिष्ठ असून सनातन धर्माची मूर्तिच आहे. तो प्रत्यक्ष देव असल्यामुळें त्याच्या आज्ञेचें पालन केलें पाहिजे २२. पित्याच्या अग्रभागीं हव्य आणि कव्य ह्यांच्या योगानें पितामहास तृप्त करणारा मनुष्य, ज्या ठिकाणीं गेले असतां पुनर्जन्माची प्राप्ति होत नाहीं, अशा ठिकाणीं जातो २३. त्याच्या चरणतीर्थानें स्नान केले असता गंगेचेंही स्नान करण्याची आवश्यकता नाही. त्याचे दर्शन घेतल्यानंतर शेंकडों ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन तरी काय करावयाचे आहे ? २४ बत्तीस कुंडाच्या शिलास स्पर्श केला असता अथवा त्याचें दान केलें असता ज्या प्रकारचे फल मिळते त्या प्रकारचें कोटिगुणित फल पितामहास प्रदक्षिणा केली असता मिळते २५. पितामहीचें पोषण केले असता हे विप्रहो, श्रेष्ठ अशा शंभर माताचे पोषण केल्याचें फल मिळते. तिचे दर्शन घेतलें असता पुन संसारामध्यें प्रवेश होत नाही हे फल आहे २६. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील प्रथम भागांपैकी गुरुगुणवर्णन ह्या नांवाचा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥

सूत ह्मणतातः— हे विप्रश्रेष्ठहो, ह्याविषयीं मी आपणाला पूर्वीचा इतिहास कथन करीन. त्यापूर्वी मी जो पुराणश्रवणाचा केवल धर्मात्मक विधि ऐकिला आहे तो आपण श्रवण करा १. पूर्वी मीं प्रश्न केला असता महातेजस्वी भगवान् ब्रह्मदेव ह्मणालेः—हा मी तुला आतां पुराणश्रवणाचा विधि आनंदाने सांगतों २. हे द्विजश्रेष्ठहो, इतिहास आणि पुराणे ह्यांचे भक्तिपूर्वक श्रवण केले असता जरी शेकडो ब्रह्महत्या असल्या तरी त्या सर्वही पातकापासून मनुष्य मुक्त होतो ३. जो मनुष्य शुचिर्भूत होऊन प्रातःकाली, सायंकाली आणि रात्रीं पुराणश्रवण करील त्यावर ब्रह्मा, विष्णु आणि श्रीशंकर प्रसन्न होतात ४. प्रातःकाली श्रवण अथवा पठण करणाऱ्या मनुष्यास भगवान् ब्रह्मदेव, सायंकाली विष्णु आणि रात्री श्रवणपठण करणाऱ्यास श्रीशंकर प्रसन्न होतात. शुभ्र वस्त्र परिधान

कृणाम् ५ शुक्लवस्त्रधरश्चैव चैलाजिनकुशोत्तरः । प्रदक्षिणत्रयं कुर्याच्चस्तस्मिन्देवव्रतागुरौ ६ आत्मुच्छित्त नातिनीच स्वासन भजते ततः । दिक्पतिभ्यो नमस्कृत्य ॐकाराधिष्ठितानपि ७ पुस्तक धर्मशास्त्रस्य धर्माधिष्ठानशाश्वतम् । आगमानां शिवो देवस्तन्त्रादीनां च शारदा ८ यामलानां गणपतिर्डामराणां शतक्रतु । नारायणो भारतस्य तथा रामायणस्य च ९ वासुदेवो भवेद्देवः सप्तानां शृणु सत्तमाः । आदित्यो वासुदेवश्च माधवो रामकेशवौ १० वनमाली महादेवः सप्तानां सप्त पर्वणाम् । विष्णुधर्मादिकानां च शिवो ज्ञेयः सनातनः ११ अथ चादिपुराणस्य विरिञ्चिः परिकीर्तित । शुद्धौदन यवक्षीरं पायस कृसर तथा १२ कृसरान्न च वा दद्यात्कमाद्बलिगण विदुः । शालिभक्त समोधृमं तिलाक्षतविमिश्रितम् १३ गव्य च सफल चैव देयः कांस्येष्वयं बलिः । पृथक्पृथक्चैव कांस्ये विन्यसेद्दिक्षु मध्यतः १४ पडप्यापि विधानेन स याग षाण्मयः पर. । शीतोदक मधु क्षीरं सितक्षौद्रश्च रसं गुडम् १५ स धर्मश्च परो ज्ञेयः षाण्मयश्चायो बलिः । शालितण्डुलप्रस्थ तु तदर्ध वा तदर्धकम् १६ क्षीरेणापि च सभक्तं यवक्षीरमिदं स्मृतम् । क्षीर भागाष्टक ग्राह्य सप्तभागेन संस्थितिः १७ हैमन्तिक सिताढ्य च ताण्डुल प्रपचेच्चरुम् । अर्शातिपलमानेन सिद्धमासादयेत्ततः १८ भागार्धेन ददेत्पश्चान्माक्षिक वा सितामपि । गुडमिश्रेण यो देयः स संपर्कोऽभिजायते १९ संपर्को माक्षिकस्यापि देय इक्षुरसस्य च । गृहीत्वा वाचकः शुद्ध शृणुत द्विजसत्तमाः २० शृणुते बाधी-

---

करून दर्भ, कृष्णाजिन आणि वस्त्र हीं एकावर एक ठेवून त्यांचें आसन करावें आणि देवता व गुरु ह्यास तीन प्रदक्षिणा कराव्या व नंतर फार उंचही नाहीं व फार सखलही नाहीं अशा आपल्या आसनाचा स्वीकार करावा आणि नंतर दिक्पाल, ओंकारामध्ये अधिष्ठित असलेल्या देवता आणि धर्माचें शाश्वत अधिष्ठान असलेलें धर्मशास्त्राचें पुस्तक ह्यास नमस्कार करावा. आगमाची देवता श्रीशिव असून तंत्रादिकाची शारदा, यामलाचा गणपति, डामराचा इंद्र, भारताचा श्रीनारायण आणि रामायणाचा श्रीवासुदेव ही देवता होय. हे साधुश्रेष्ठहो, रामायणातील सात काडाच्या देवता ऐका. आदित्य, वासुदेव, माधव, राम, केशव, वनमाली आणि महादेव ह्या सात काडाच्या सात देवता होत. विष्णुधर्मादिक ग्रंथाची देवता सनातन श्रीशिव ही होय ९–११. आदिपुराणाची देवता भगवान् ब्रह्मदेव आहे असें सांगितलें आहे. ह्या देवतास क्रमानें केवल भात, यवक्षीर, पायस, कृसर [खिचडी], कृसर आणि अन्न ह्याचा क्रमानें बलि द्यावा. गहू घातलेला आणि तिल व अक्षता ह्यांनीं युक्त असलेला साळीचा भात, गाईचें दूध आणि फल हीं सर्व निरनिराळीं कास्यपात्रात घालून प्रत्येक दिशेच्या मध्यभागीं नेऊन ठेवावीं व यथाविधि ग्रंथपठण करावें. हा श्रेष्ठ असा षाण्मयसंज्ञक याग होय. शीत जल, मध, दूध, खडीसाखर, उंसाचा रस आणि गूळ हा दुसरा षाण्मयसंज्ञक बलि असून त्याचें दान ह्मणजे उत्कृष्ट प्रकारचा धर्म असें समजावें. एक शेर, अर्धा शेर अथवा पावशेर साळीचे तांदूळ आणि दूध ह्याच्या योगानें केलेल्या भातास यवक्षीर असें ह्मणतात. दूध आठ भाग घ्यावें व तें आटवून सात भाग ठेवावें. खडीसाखर आणि तांदूळ घालून ८० पल [३२० तोळे] हैमंतिक नावाचा चरु शिजवावा. शिजल्यानंतर तो काढून घेऊन त्यात त्याच्या अर्ध्या भागाइतका मध अथवा तितकीच खडीसाखर घालावी. अशा प्रकारें सिद्ध केलेल्या चरूस–हा गुडमिश्रित करून घ्यावयाचा असतो– संपर्क असें ह्मणतात. हा संपर्क मधाचा अथवा उंसाच्या रसाचाही देता येतो. हे द्विजश्रेष्ठहो, हा संपर्क घेतला असतां वाचक शुद्ध होतो १२–२०. जो ऐकणारा

यानो यो दद्याद्गुरुभ्यो च पुस्तकम् । समुत्थाय च गृह्णीयात्प्रणम्य विनिवेदयेत् २१ पूर्वस्थः श्रावको विप्रो विरुद्यात्तु तस्य दक्षिणे । पश्चिमाशामुखं नैव तर्जन्यङ्गुष्ठयोः सह २२ प्रस्तरेणापि हस्तेन विन्यासः पण्डितैः सदा । इतोऽन्यथा न कर्तव्यः कृत्वा न्यासमथाप्नुयात् २३ असकृद्विन्यसेद्विप्राः पात्रमानीं जले जपेत् । वेदाङ्गागमवेदान्तविधिरेष स्मृतो बुधैः २४ यमदिक्संमुखे श्रोता वाचकश्चोत्तरामुखः । पुराणभारताख्यान एष वै कथितो विधिः २५ वैपरीत्येन विधिना विज्ञेया द्विजसत्तमाः । रामायणे धर्मशास्त्रे हरिवंशे च सत्तमाः २६ इतोऽन्यथा यातुधानाः प्रकुर्वन्ति फलं यतः । तस्माद्विधिविधानेन शृणुयादथ वा पठेत् २७ श्रुत्वा प्रोक्तपुण्यविद्यां योऽश्नीयान्मांसमेव तु । स याति गार्दभीं योनिं यदि मैथुनिनः क्वचित् २८ यदि देवालये तीर्थे वाचयेच्छृणुयादथ । यस्य देवगृहे तस्य तस्य तीर्थस्य वर्णनम् २९ माहात्म्यश्रवणादेव गोदानस्य फलं लभेत् । महागुरोश्च माहात्म्यं पित्रोरग्रे न च स्मरेत् ३० पितुर्माहात्म्यं यत्पुत्रैर्वाच्यं संसदि पर्वणि । वासुदेवाग्रतश्चापि रुद्रमाहात्म्यवर्णनम् ३१ रुद्राग्रे वासुदेवस्य कीर्तनं पुण्यवर्धनम् । दुर्गाग्रे शिवसूर्यस्य वैष्णवाख्यानमेव च ३२ यः करोति विमूढात्मा गार्दभीं योनिमाविशेत् । गुरोरनुज्ञया पित्रोः प्रकुर्यादभिवादनम् ३३ अनुज्ञया तथा पित्रोर्हरेः कुर्यात्प्रदक्षिणम् । न विष्णुर्न च ब्रह्मा च न च रुद्र शचीपतिः ३४ सर्ववेदेन तत्तुल्य सर्वधर्मपरायणम् । सर्वज्ञानमय चैव सर्वज्ञेन च तत्समम् ३५ तस्माद्द्विजन्मपित्रोर्हि श्रवणाद्ब्रह्म शाश्वतम् । गुरुभ्यो

अथवा अध्ययन करणारा मनुष्य हातात पुस्तक देईल त्याजकडून तें आपण उठून ग्रहण करावें आणि नमस्कार करून साधू लागावे. ऐकणाऱ्या मनुष्याने पूर्वकडे व त्याच्या दक्षिणेस सांगणाऱ्यानें बसावें; मात्र पश्चिमेकडे करूं नये. नतर हात पसरून तर्जनी व अगुष्ठ ह्याच्या योगानें विद्वान् लोकानीं सदोदित न्यास करावा; यावाचून इतर प्रकारानें केव्हाही करूं नये. न्यास केल्यानंतरच वेदादिकांचें ग्रहण करावें २१–२३. हे विप्रहो, हा न्यास अनेकवार करावा व जलामध्यें असतां पात्रमानीमंत्राचा जप करावा. ह्याप्रमाणें वेद, त्याचीं अंगें, आगम आणि वेदांत ह्याविषयींचा हा विधि सांगितला आहे व हा विधि ज्ञानी लोकानीं सांगितलेला आहे २४. श्रोत्यानें दक्षिणाभिमुख आणि वाचकानें उत्तराभिमुख बसावें असाच पुराण आणि भारत हीं सांगण्याचा विधि सांगितला आहे २५. हे साधुवर्य द्विजश्रेष्ठहो, रामायण, धर्मशास्त्र आणि हरिवंश ह्याविषयींचा विधि मात्र त्याच्या अगदीं उलट आहे असें समजावे २६. ह्याच्या उलट विधीचे आचरण केलें असता राक्षस त्या कर्माच्या फलाचा नाश करितात. ह्यास्तव, श्रवण करणें अथवा पठण करणें तें शास्त्रोक्त विधीलाच अनुसरून करावें २७. ह्या पवित्र विद्येचें श्रवण केल्यानंतर जो मासभक्षण करील तो आणि स्त्रीसभोग करणारा हे गर्दभाच्या जन्मास जातात. जर एखाद्या देवालयात अथवा तीर्थावर तें देवालय किंवा तीर्थ ज्या देवतेचें असेल त्या देवाचें अथवा तीर्थाचें वर्णन पठण केलें किंवा श्रवण केलें तर त्या केवल माहात्म्यश्रवणापासूनही गोप्रदानाचे फल मिळतें. मातापितराच्या पुढें महागुरूच्या माहात्म्याचें स्मरण करूं नये २८–३०. पित्याचे माहात्म्य पुत्रानीं सभेमध्यें पर्वकालीं कथन करावें. विष्णूच्या पुढें रुद्राचें आणि रुद्रापुढें विष्णूचे माहात्म्य वर्णन करणें हे पुण्याच्या अभिवृद्धीस कारणीभूत होतें. जो मूर्ख मनुष्य दुर्गेच्या पुढें श्रीशंकर, सूर्य अथवा विष्णु ह्याचें माहात्म्य वर्णन करील तो गर्दभजन्म पावतो. असो. गुरूच्या अनुज्ञेनें मातापितरास प्रणाम करावा ३१-३३. मातापितराचें अनुमोदन घेऊन श्रीविष्णूस प्रदक्षिणा करावी. ब्रह्मदेव, विष्णु, श्रीशंकर आणि इंद्र हे पित्याच्या बरोबरीचे नाहींत ३४. पितृरूपी देवत सर्व वेदाच्या तोडीचे, सर्व धर्माचे केवल आश्रयस्थान आणि सर्वज्ञानस्वरूपी असून सर्वज्ञ भगवान् श्रीशंकर ह्याच्या

बन्धनं व्यर्थं पितरं यो न तर्पयेत् ३६ जीवन्तं तर्पयेन्मुख्यं गङ्गायां मरणेऽपि च । उभयोस्तर्पणं नास्ति जीवन्नपि न जीवति ३७ पुराणश्रवणं पुण्यं शून्यं भागवतं यदि । व्यर्थं भागवतं विप्रा नारसिंहविहीनकम् ३८ आदिपर्वणि हीने तु भारताख्यं न धारयेत् । विनाऽश्वमेधिकं विप्रा विना यज्ञाननं विना ३९ दानधर्मविहीनं च मोक्षधर्मं न धारयेत् । भारतं च दिवारोहधारणाद्धि परं व्रजेत् ४० वायुपुराणकं श्रुत्वा शास्त्रं च यौगिकं विना । वायुहीनं दोहिकुलं वृथा तस्य न धारकम् ४१ तथा वायुपुराणं यद्विहेयं श्रव्यमन्यकम् । तथा सुन्दरकाण्डेन आरण्यं च न धारयेत् ४२ लङ्कां विना चादिकाण्डं तल्लिखित्वा न धारयेत् ४३ पाराशरं विना व्यासं याज्ञवल्क्यं विना मनुम् ४४ दक्षं विना न शङ्खं च शङ्खहीनं बृहस्पतिम् । वर्धयेच्छ्रवणाद्येन न च युक्तिमथापयेत् ४५ संस्थापना देवगृहे न च किमपि राक्षसैः । न देयमर्थकादिभ्यो न विक्रीयेत्कथञ्चन ४६ न हरेत्पुस्तकं चापि न हरेदक्षराणि षट् । ब्रह्माक्षरस्य हरणाद्दौरवान्न निवर्तते ४७ आद्याक्षरस्य हरणात्ताम्रकुष्ठी भवेदिह । मुखवृत्तस्य हरणाद्यावदाचन्द्रतारकम् ४८ कुचले असिपत्रे च पततीह न संशयः । स्वाक्षरस्यापहरणं स्वमातृहरणेऽपि च ४९ तस्मात्पुस्तकमात्रं यो हरेन्नरकमाप्नुयात् । यद्भारतं यत्पुराणं स्तोत्ररूपाणि तानि च ५० तानि वेदागमादीनि पुस्तकेष्वपि वाचयेत् । वेदानां पुस्तकं यच्च लिखित्वा तन्न वाचयेत् ५१

योग्यतेचें आहे ३५. ह्यास्तव, हे द्विज, पितरांचें सेवन केल्यापासून शाश्वत अशा परब्रह्माची प्राप्ति होते. पितरास तृप्त केल्यावाचून गुरूंस वंदन करणें व्यर्थ होय ३६. पिता जिवंत असतां त्यास तृप्त करणें हें मुख्य होय. तो मृत झाल्यानंतर गयेमध्यें त्याचें तर्पण करावें. ज्याच्या हातून हीं दोहों प्रकारचींही तर्पणें घडत नाहींत तो जीवन्मृत होय ३७. पवित्र भागवतावाचून पुराणश्रवण हें व्यर्थ असून हे विप्रहो, नारसिंहपुराणावाचून भागवत श्रवण करणें व्यर्थ होय ३८. आदिपर्व, आश्वमेधिक पर्व आणि यज्ञप्रारंभाच्या वर्णनाचा भाग ह्यावाचून महाभारत हातीं धरूं नये ३९. दानधर्मावाचून मोक्षधर्म हातीं घेऊं नये. स्वर्गारोहणपर्वासह भारत श्रवण करणारा मनुष्य परम पदास जातो. योगशास्त्रावाचून वायुपुराण ऐकणाऱ्या मनुष्याचें सर्व कुल वायुशून्य अर्थात् मृतप्राय होय ४०,४१. अशा प्रकारचें जें वायुपुराण असेल तें त्याज्य असून याहून भिन्न असेल तें श्रवण करण्यास योग्य होय. सुंदरकाडावाचून अरण्यकाड हातीं घेऊं नये ४२. लंकावर्णनाच्या भागावाचून आदिकाड लिहून हातीं घेऊं नये ४४. पराशरस्मृतीवाचून व्यासस्मृति, याज्ञवल्क्यस्मृतीवाचून मनुस्मृति, दक्षस्मृतीवाचून शंखस्मृति आणि शंखस्मृतीवाचून बृहस्पतिस्मृति ग्रहण करूं नये. श्रवणादिकाऱ्या योगानें पुराणादिकांचें अध्ययन वाढवावें, पण त्याच्यार्गी युक्ति लढवूं नये. पुस्तक देवगृहामध्ये ठेवावें; राक्षसादिकांनीं युक्त असलेल्या ठिकाणीं ठेवूं नये. याचकादिकास तें अर्पण करूं नये अथवा त्याचा कोणत्याही प्रकारें विक्रय करूं नये ४३-४६. पुस्तकाचा अपहार करूं नये आणि षडक्षरी मंत्राचाही अपहार करूं नये. कारण, तीं ब्रह्माक्षरें असून ब्रह्माक्षराचा अपहार केल्यास रौरवनरकातून सुटका होत नाहीं ४७. पुस्तकातील पहिल्या अक्षराचा अपहार करणारा इहलोकांतच ताम्रकुष्ठरोगानें ग्रस्त होतो व त्यातील आरंभींचा श्लोक चोरून घेणारा मनुष्य यावच्चंद्रादिवाकर ताम्रकुष्ठी होतो ४८. आपण लिहिलेल्या पुस्तकाचा (अर्थात् पित्रापाशी असलेल्याचा) अपहार करणें आणि आपल्या मातेला ओढणें हीं सारखींच असल्यामुळें त्याचा कर्ता निःसंशय कुचले आणि असिपत्र ह्या नरकात पडतो ४९. साराश, कोणत्याही प्रकारचे पुस्तक हरण करणारा मनुष्य नरकास जातो. असो. भारत आणि पुराणे हीं स्तोत्ररूपी असून वेद, आगम इत्यादिकाप्रमाणे योग्य-

तथा तन्त्रोदितान्मन्त्रांल्लिखित्वा तत्र वाचयेत् । पुस्तकं निगमानां च मन्त्रव्याख्यानसग्रहम् ५२ स्फुटं कृत्वा पुरः स्थाप्य यावत्काल प्रवर्तते । तावत्स नरके घोरे प्रेतत्वं जन्मजन्मनि ५३ न वाचयेच्च व्याख्याता वाचकोऽपि प्रवाचयेत् । पौष्करे च श्लोकपादमश्वमेध पदे पदे ५ वेदार्थं वाचयेद्यस्मादुपरीतोऽप्यवाचकः । तावुभौ पतितौ क्लेयौ पावमानीशतं जपेत् ५५ आदिमध्यावसाने च मन्त्रे च प्रणव दिशेत् । बलिभिर्गन्धपुष्पैश्च पुस्तकं देवनिर्मितम् ५६ त्रिदेवं पुस्तकं ख्यातमत्र वासुकिरुच्यते । अमानकरणं दोषस्तस्मान्नच्च न हापयेत् ५७ पत्राणि भगवन्ब्रह्मा ऊर्ध्वदीर्घाणि यानि च । जनार्दनश्चाक्षराणि मात्रा प्रकृतिरव्यया ५८ लिपीभङ्गी महेशः स्यात्तस्या मात्रा सरस्वती । एकरेखा च एकात्मा पादाच्च पादविच्युतिः ५९ चतुष्पादान्तर युग्म मध्यमोऽन्ते युग युग्मम् । विपत्कर युग्मपङ्क्तावयुग्मं स्वर्गसाधनम् ६० भारते चेतिहासे च पुराणे द्विजसत्तमाः । अयुग्मपङ्क्तौ स्वर्गः स्याद्युग्मं नरकमाविशेत् ६१ आत्मासशुद्धिमशुद्धां धारयेद्धर्मसंहिताम् ६२ इतोऽन्यथा भवेद्दोषस्तस्मात्तत्परिवर्जयेत् ६३ रिपुः सूर्यस्तथा विष्णुर्यक्षोऽनन्तः सरस्वती । ब्राह्मी च यक्षिणी चैव गायत्री नवमी स्मृता ६४ विष्वन्ते च भवेन्मुक्तिः सूर्यान्ते पदविच्युतिः । रिपौ भय भवेन्नस्य यक्षे दुर्गतिमादिशेत् ६५ अनन्ते विपुला कीर्ति सरस्वत्यां धनागमः ।

तेचे ते ग्रथ पुस्तकरूपानें लिहून वाचावेत. ज्याप्रमाणे तंत्रात सागितलेले मत्र लिहून वाचावयाचे नाहींत त्याचप्रमाणें वेदाचें पुस्तक लिहून वाचूं नये. निगमाचे पुस्तक आणि मंत्राच्या व्याख्याचा संग्रह हा उघडपणें जोपर्यंत पुढें ठेविलेला राहील तितक्या कालपर्यंत तसे करणारा मनुष्य प्रत्येक जन्मामध्यें घोर नरकात प्रेत होऊन रहातो ९०–९३. ज्यानें व्याख्यान करावयाचें त्याने वाचूं नये व वाचकानेही उत्कृष्ट प्रकारें वाचावें. पुष्करतीर्थावर श्लोकाचा एक चरण वाचला तरीही पदोपदीं अश्वमेध केल्याचे श्रेय मिळतें ९४. जो मनुष्य विपरीतदृष्टया वेदाचा अर्थ वाचील अथवा जो अयोग्य प्रकारें वाचन करील ते उभयताही पातकी असल्यामुळें त्यानीं त्या पातकाच्या निवृत्तीसाठीं पावमानीचा शंभर वेळ जप करावा ९५. वेदवाचनाच्या वेळीं आरंभी, मध्यें व शेवटीं प्रणवाचा उच्चार करावा. पुस्तक हें देवाने निर्माण केलें असल्यामुळें बलि, गध, पुष्प इत्यादिकाच्या योगानें त्याचें आराधन करावें ९६. पुस्तक हें देवस्वरूपात्मक असून त्यास बाधावयाचें सूत्र प्रत्यक्ष वासुकि आहे. ह्यामुळें त्याचा अपमान केल्यानं दोष लागतो. ह्मणून त्याच्या पूजनाचा केव्हाही त्याग करूं नये ९७. उभट आणि लाब असणारीं पुस्तकाचीं पत्रें हा भगवान् ब्रह्मदेव असून त्यातील अक्षरे ह्मणजे श्रीविष्णु व मात्रा ही अविनाशी प्रकृति होय ९८. लिहिण्याची शैली हे श्रीशंकराचें स्वरूप असून त्याचे प्रमाण हे सरस्वती होय. एक रेषा एकाच आकारानें काढलेली असावी. एका चरणापासून दुसरा चरण सुटलेला असावा. दोहो श्लोकाच्या मध्यें दोन रेषा आणि प्रत्येक श्लोकाच्या मध्यभागीं व शेवटीं दोन दोन रेषा असाव्या. पृष्ठावर पंक्ति सम असल्या तर त्या विपत्तीस कारणीभूत होतात व विषम असतील तर स्वर्गप्राप्तीस कारणीभूत होतात ९९.१००. हे द्विजश्रेष्ठहो, भारतस्वरूपी इतिहास आणि पुराणे ह्यांच्या पुस्तकाच्या पृष्ठावर पंक्ति विषम असतील तर स्वर्गप्राप्ति होते व सम असतील तर नरकप्राप्ति होते १०१. धर्मसंहिताचे पुस्तक, अंतःकरणाची अशुद्धता नष्ट करून शुद्धिपूर्वक हातीं धरावें. ह्याखेरीज अन्य प्रकारें हातीं घेतल्यास दोष लागतो. ह्यास्तव, तसें करणें वर्ज्य करावें १०२.१०३. रिपु, सूर्य, विष्णु, यक्ष, अनंत, सरस्वती, ब्राह्मी, यक्षिणी आणि नववी गायत्री अशीं पुस्तकाच्या पंक्तींचीं नऊ नावे आहेत. पृष्ठाच्या शेवटीं विष्णुसंज्ञक पंक्ति आल्यास मोक्ष मिळतो, सूर्यसंज्ञक पंक्ति आल्यास स्थानभ्रंश होतो, रिपुसंज्ञक पंक्ति

ब्राह्मी ब्रह्मत्वमाप्नोति यक्षिणी यक्षमन्दिरम् ६६ मुक्तिमाप्नोति गायत्री इति पङ्क्तिफलोदयः । चतुर्धा प्रतिभक्तिः स्यात्पुस्तकं धर्मनिर्मितम् ६७ ब्रह्मेन्द्रवैष्णवं शैव शाक्तिक च महेश्वरी ब्रह्मरूप चेतिहासमैन्द्र रामायणात्मकम् ६८ वैष्णवं परम दैव यच्छैव तल्ललाटकम् । पावकोऽस्य तथा मूले मध्ये भागे शतक्रतुः ६९ अग्रे स्थिता ग्रहा. सर्वे दिशामीशास्तथा द्विजाः । मेरुः सुमेरुरुद्दिष्टः सङ्ख्यान्काम उच्यते ७० द्यावापृथिव्यौ पाताल तस्यान्त समुदाहृतम् । पौराणि ककथायुक्तपुस्तको देवपूजित. ७१ प्रशस्यः पूजनीयश्च गृहे स्थाप्येत मानवै. । यो यस्मै शूद्रो विप्राय वृत्तिं दद्याच्च मानवः ७२ स याति ब्रह्मसदन मणिवर्मादिकुट्टिमम् ७३ पत्राणामग्रभागे तु वेध कुर्यात्सुवर्तुलम् । श्रवणार्थं च मन्त्रेण तत्र पद्म च वर्तुलम् ७४ संहितागमतन्त्रेषु प्रतिवेधे च सङ्कुलम् । प्रकुर्याच्चित्र तापेन ततः शक्रपुर व्रजेत् ७५ मध्ये तस्य हरेदायुः पार्श्व वेध शिव हरेत् । युग्मवेध जय दद्यादेकवेधे बली भवेत् ७६ परम प्रकृतेर्गुह्य स्थानं देवैर्विनिर्मितम् । पूरयेत्ताम्रलिङ्गेन अथ रैत्यमयेन वा ७७ अशक्तौ बिल्वकाष्ठस्य तथा श्रीपर्णिकस्य च । न काष्ठस्य न वंशस्य न लौह योजयेत्क्वचित् ७८ प्रागारम्भश्लोकशतं धर्मशास्त्रस्य वै लिखेत् । संहितायां पुराणायां युग्मकल्प तदर्धकम् ७९ ब्रह्मचर्येण विलिखेन्न मोहाद्ब्रह्मणः

आल्यास भयप्राप्ति होते आणि यक्षमञ्जक पंक्ति असल्यास नरकप्राप्ति होते. अनंतसञ्जक पंक्ति असल्यास विपुल कीर्ति, सरस्वतीनामक पंक्ति असल्यास द्रव्यप्राप्ति, ब्राह्मीनामक पंक्ति असल्यास ब्रह्मपदाचा लाभ आणि यक्षिणीसञ्जक पंक्ति असल्यास यक्षमंदिरप्रवेश ही घडतात ६४–६६ व गायत्रीसञ्जक पंक्ति शेवटी असल्यास मोक्षप्राप्ति होते. ह्याप्रमाणे ही पंक्तींच्या योगाने होणारी फलोत्पत्ति आहे. धर्माचरणार्थ (ईश्वराने) निर्माण केलेल्या पुस्तकाची भक्ति चार प्रकारची आहे ६७. पुस्तकाच्या देवता ब्रह्मा, विष्णु, इंद्र, श्रीशिव, शक्ति आणि महेश्वरी ह्या आहेत. इतिहास हा ब्रह्मस्वरूपी आहे. रामायणाच्या पुस्तकाची देवता इंद्र ही आहे. ह्या पुस्तकात विष्णुविषयीचा जो भाग असेल तो त्याचें दैव असून शिवविषयक भाग हे त्याचे ललाट होय. ह्याच्या मूळाशी अग्नि असून हे द्विजहो, मध्यभागी इंद्र आणि अग्रभागी सर्व ग्रह व दिक्पाल वास्तव्य करितात. त्याचा मेरु हा प्रत्यक्ष मेरुपर्वत असून सुटा न होणारा जो भाग तो काम होय असे सांगितले आहे ६८–७०. पुस्तकाच्या खालचा व वरचा भाग पृथ्वी आणि स्वर्ग असून मध्यभाग पाताल होय. पौराणिक कथांनी युक्त असणारे पुस्तक देवांसही पूज्य असल्यामुळे मनुष्यांनी त्याची प्रशंसा व पूजा करून गृहामध्ये स्थापना करावी. असो. जो शूद्र ब्राह्मणास उपजीविकेचे साधन अर्पण करील तो रत्नखचित फरसबंदी मार्ग असलेल्या ब्रह्मसदनास जातो ७१ ७३. पत्राच्या अग्रभागी चागलें वर्तुलाकार छिद्र पाडावें व पुस्तक श्रवणास योग्य व्हावे एतदर्थ मंत्र म्हणून त्याजवर वर्तुल असें कमल काढावें. संहिता, आगम आणि तंत्रें ह्यांच्या पुस्तकास छिद्र पाडताना प्रत्येक छिद्रास अंतःकरणास ताप झाला असता मनुष्य इंद्रलोकास जातो ७४,७५. पुस्तकाच्या मध्यावर पडलेले छिद्र आयुष्याचा नाश करितें. अगदीं बाजूस पडलेले छिद्र कल्याणाचा नाश करितें. दोन छिद्रे पडल्यास जयप्राप्ति होते व एकच छिद्र पडल्यास बलिष्टता येते ७६. हें छिद्र म्हणजे अत्यंत उत्कृष्ट असें प्रकृतीचे गुह्यस्थान होय. ह्यास्तव, त्यात ताम्रमय अथवा पित्तलमय लिंगाकार सळई घालून तें भरून काढावे ७७. तशी शक्ति नसेल तर बिल्व अथवा कुंभी ह्याच्या काष्ठाने ते भरून काढावे. मात्र, इतर काष्ठे, वेळु किंवा लोह ह्यांचा त्या कामीं उपयोग करू नये ७८. धर्मशास्त्र लिहितेवेळीं प्रथमारंभी

क्वचित् । तथापि चाखिलव्यासलिखनात्संततिक्षय. ८० न लिखेत्खिलभागं च हरिवंशस्य सत्तमाः ८१ गारुडस्य च स्कान्दस्य न लिखेन्मध्यतन्त्रकम् । लिखनं हरिवंशस्य व्रतस्थो नियमैर्युतः ८२ गृहस्थो न लिखेद्ग्रन्थं लिखेच्च मथुरां विना । लिखने पारिजातस्य मत्स्यमांसादिन लिखेत् ८३ वाल्मीकिसंहितायाश्च लिखने च तथा क्वचित् । स्तोत्रमात्र लिखेद्विप्रा अव्रती न लिखेत्क्वचित् ८४ अब्राह्मणेन लिखित निष्फलं परिकीर्तितम् । पतितैरपि पाखण्डैर्म स्त्री विलिखति क्वचित् ८५ दुर्विचारो दुष्टभार्यो दुर्मतिश्चापि लेखकः । न लिखेद्धर्मशास्त्र च पुराणं स्तोत्रसंहितम् ८६ तल्लेखनं च कर्तव्य सुवर्णरजतस्य च । कज्जलैर्मलिन कुर्यान्मन्धी नियांसनिश्चितैः ८७ जीवन्त्याश्च रसैर्युक्तैर्मणिकर्दमसन्निभैः । वल्कजन्मयुतैर्वापि पीतयोगैरथापि वा ८८ कृष्णे वायुप्रदं विद्यात्पीते वायुक्षयो भवेत् । रक्ते पुष्टिमवाप्नोति कृष्णे च सपदागमः ८९ इतिहासपुराणानि विलिखेद्यन्मुखः शृणु । वायव्यादिमुखेनैव कोष्ठ वेद च लिखेत् ९० पूर्वामुखे चार्थहानिरुत्तरे च मुखं श्रियः । मरण दक्षिणास्ये तु पश्चिमास्ये धनक्षयः ९१ पितृमेधे भुवः कम्पे न लिखज्जन्मवासरे । अशौचे मृतके सूतावमायां रविसंक्रमे ९२ अत्र लेखाद्दरिद्रः स्याच्छथा पुत्रविनाशनम् । बल धर्म क्षय चैव तस्माद्यत्नेन वर्जयेत् ९३ पितृश्राद्धदिने लेखः

शंभर श्लोक लिहावे. पुराणसंहिता लिहिताना जवळजवळ त्याच्या दुप्पट अथवा अर्ध्या-इतकी लिहावी ७९. ब्रह्मचर्य धारण करून ब्राह्मणानें पुस्तक लिहावें. ते लिहिताना केव्हांही अंत.करणास भ्रम असू नये. अशा प्रकारें आचरण करूनही जर समास न सोडिता लिहिले तर संततीचा क्षय होतो. हे साधुवर्यहो, हरिवंशाचा शेवटचा भाग लिहूं नये आणि गरुडपुराण व स्कदपुराण ह्यांचें मध्यतंत्र लिहूं नये. हरिवंश लिहिणें तो व्रतस्थपणें आणि नियमनिष्ठ राहून लिहावा ८०-८२. गृहस्थाश्रमी यानें हरिवंशग्रंथ लिहूं नये. लिहावयाचा झाल्यास तो मथुरेवाचून इतरत्र लिहावा. पारिजाताचें वर्णन लिहावयाचें असल्यास मासभक्षकाचें जे वर्णन आहे तेंही लिहावें ८३. हे विप्रहो, वाल्मीकिसंहिता एखादे वेळीं लिहावयाची असेल तर तींतील केवळ स्तोत्रे असतील तींच लिहावीं. व्रतस्थ राहिल्यावाचून केव्हाही पुस्तक लिहूं नये. ब्राह्मणावाचून इतरानें, पतितानें आणि पाखंडी मनुष्याने लिहिलेलें पुस्तक निष्फल होय. स्त्रियानीं केव्हाही पुस्तक लिहूं नये. ज्याचे विचार आणि बुद्धि वाईट असून स्त्रीही दुष्ट आहे अशा लेखकानें ज्यात स्तोत्राचा संबंध आहे असे पुराणग्रंथ व धर्मशास्त्र हीं लिहूं नयेत ८४-८६. पुस्तक लिहिण्यासाठी लेखणी सुवर्णाची अथवा रौप्याची करावी व तें लिहून झाल्यानंतर निर्यास [डिंक] युक्त कज्जलाने युक्तीने मलिन करावें ८७. जीवंतीनामक वनस्पतीच्या माणिक्यपंकाप्रमाणें आरक्तवर्ण दिसणाऱ्या रसानें, सिंदूराच्या योगाने अथवा पीतवर्णानें ते मलिन करावें ८८. पुस्तकाचा वर्ण कृष्ण झाल्यास ते वायुप्रद होतें; पीत असल्यास वायूचा क्षय होतो; आरक्त असल्यास पुष्टीची प्राप्ति होते व कृष्णवर्ण असल्यास संपत्तीचा लाभ होतो ८९. आतां, इतिहास आणि पुराणें कोणत्या दिशेस मुख करून लिहावीं ते ऐक. वायव्यादिक दिशांकडे मुख करून कोष्टकें अथवा वेद ह्याचे लेखन करावें ९०. पूर्वेकडे मुख केल्यास द्रव्यहानि, उत्तरेकडे मुख केल्यास संपत्तीची प्राप्ति, दक्षिणाभिमुख असल्यास मृत्यु आणि पश्चिमेकडे मुख केल्यास द्रव्यक्षय हीं होतात ९१. श्राद्धदिवशीं, भूकंप झाला असता, जन्मतिथीस, अशुद्ध स्थितींत, वृद्धि आणि अशौच असतांना, अमावास्येचे दिवशीं आणि रविसंक्रातीस लिहूं नये ९२. ह्या दिवशीं लिहिलें असतां दारिद्र्य प्राप्त होऊन पुत्राचा नाश आणि बल व धर्म ह्याचा क्षय होतो. ह्यास्तव, त्या दिवशीं प्रयत्नपूर्वक लेखनकृत्य वर्ज्य करावें. पितराच्या श्राद्धदिवशीं केलेला लेख कुलक्षय

कुलक्षयकरो भवेत् । एकरात्रं भुवः कम्पे तस्मिन्लेखे धनक्षयः ९४ अशौचेऽपि दरिद्रः स्याज्जन्माहे चायुषः क्षयः । लिपिच्छन्दःपदज्ञश्च युवा धीमाञ्जिताक्षरः ९५ द्रुतलेखी च तेजस्वी यो लेखयति लेखकः । असवलितभावेन ऊर्ध्वाधो स्यात्समाक्षरम् ९६ लिपियुक्तः समायुक्तः स एवागमलेखकः । नान्दीनागरकैर्वर्णैः शुद्धनागरकैरपि ९७ कामरूपाक्षरैर्वापि यावच्च संहितागणः । अचेतने च लिखितं यावत्कालं प्रवर्तते ९८ यावदक्षरसंस्थान तावत्स्वर्गे महीयते । अनुक्तो वाचयेद्यस्तु धर्मशास्त्रस्य वेतनम् ९९ लिखित्वा यस्तु पापात्मा यावदक्षरसख्यया । तावत्काल तु नरके पच्यते नात्र संशयः १०० कुटुम्बभरणार्थं तु गृह्णीयादपि वेतनम् । न जीवति स दुष्टात्मा धनवस्त्रफलान्वितः १ पतितैरन्त्यजैर्म्लेच्छै रोगी कुष्ठी क्षयी तथा । रोगी शिलीपदैश्चैव मूकोऽपि धर्मसंहतः २ एतैर्विलिखितं यच्च धारयेन्न गृहाश्रमी । अनायुष्यकरं यस्मात्तस्मात्तत्परिवर्जयेत् ३ हीनाङ्गा प्रतिमा चैव पुस्तक मानहीनकम् । न कलौ धारयेद्देह अनायुष्यकर भवेत् ४ द्वात्रिंशदङ्गुलैर्युक्तं कर्तव्य पुस्तकोत्तमम् । स वै नारायण ख्यातो धारणाच्च कुतोऽप्यलम् ५ चतुर्विंशाङ्गुलं यच्च तद्वै मध्यममुच्यते । शंकरः स तु विज्ञेयो धर्मकामफलप्रदः ६ अष्टाङ्गुल भवेद्यच्च तत्कनिष्ठमिहोच्यते । तस्माद्ब्रह्ममयं ज्ञेयं त्रिवर्गफलदायकम् ७ ताडतालजपत्रे च अथवा चागुरुत्वचि । एषां पत्रकृते मान भूर्जे मानं न विद्यते ८ द्वादशाङ्गुलक यच्च भूर्जताडादिनिर्मितम् । अङ्गुलानां

करणारा होतो. एक दिवसभर भूकंप झाला असता त्या दिवशीं लेखन केलें तर द्रव्यक्षय होतो ९३,९४. अशौचामध्यें लिहिल्यास दारिद्र्यप्राप्ति आणि जन्मदिवशीं लिहिल्यास आयुष्यक्षय होतो. लिपि, छंद आणि पदें जाणणारा, तरुण, बुद्धिमान्, अक्षरें केवल हस्तगत असलेला, त्वरेनें लिहिणारा, तेजस्वी, स्पष्ट लिहिणारा, उत्तरोत्तर सारखीं अक्षरें काढणारा, अंतःकरण एकाग्र असणारा आणि लेखनकर्मामध्यें आसक्त असलेला मनुष्य शास्त्रलेखन करण्यास योग्य होय. नादी, नागरक अथवा शुद्धनागरकवर्ण किंवा कामरूपनामक अक्षरें ह्याच्या योगानें सर्वही संहिताच्या समुदायाचें लेखन करावें. पाषाणादिकावर जोंवर लेखन चाललें असेल तोंवर जितकीं अक्षरें लिहिलीं जातील तितकीं वर्षेंपर्यंत लेखक स्वर्गामध्यें पूज्य होऊन राहतो जो पापिष्ठ अंतःकरणाचा मनुष्य धर्मशास्त्र लिहून दुसऱ्यानें प्रश्न केल्यावांचून लेखनाचे वेतन सांगतो तो जितकीं अक्षरें लिहिलीं असतील तितकीं वर्षें नरकामध्ये फलोपभोग घेत रहातो ह्यात संशय नाहीं९५–१००.कुटुंबपोषण करण्यासाठीं हवें तर वेतन घ्यावें. परंतु, जो द्रव्य, वस्त्र इत्यादिकांनीं युक्त असून देखील वेतन घेईल तो दुष्ट जीवंत रहात नाहीं. पतित, अंत्यज, म्लेच्छ, रोगी, कुष्ठ असलेला, क्षयरोगी, शिलीपदनामक रोग झालेला आणि मूक (मुका) हे जरी धर्माकडे लक्ष्य देणारे असले तरीही त्यानीं लिहिलेलें पुस्तक आयुष्यास घातक असल्यामुळें गृहस्थाश्रमी मनुष्यानें हातीं न धरितां वर्ज्य करावें १—३. अंगें कमी असलेली देवप्रतिमा व प्रमाणबद्ध नसणारें पुस्तक हीं आयुष्याचा नाश करणारीं असल्यामुळें कलियुगामध्यें हातीं धरूं नयेत ४. पुस्तकाचें प्रमाण बत्तीस अंगुलें ठेवावें; कारण, तें प्रत्यक्ष विष्णुस्वरूपी असतें व त्याचा अंगीकार केल्यास मनुष्य सर्व बाजूंनीं समर्थ होतो. २४ अंगुले प्रमाण असलेलें पुस्तक मध्यम असून तें धर्म, काम इत्यादिक फल देणाऱ्या श्रीशंकराचेंच स्वरूप होय ५,६. आठ अंगुलें प्रमाणाचें जें पुस्तक असेल तें सर्व पुस्तकांमध्यें कनिष्ठ असून ब्रह्मस्वरूपी व धर्मार्थकामरूपी फल देणारें आहे असें समजावें ७. ताड अथवा ताल यांचीं पत्रें अथवा अगुरूची त्वचा ह्याच्या योगानें केलेल्या पुस्तकाचें असे प्रमाण असलें पाहिजे. भूर्जपत्राच्या पुस्तकास प्रमाण नाहीं ८; अथवा भूर्ज,

मणं यत्नेनापि ज्ञानपुस्तकम् ९ हस्तसंस्थापिते तस्य तेन नायुष्कर भवेत् । धर्मशास्त्रस्य साहस्रं धर्मशास्त्रस्य वेतनम् ११० स्वर्गमार्गस्य गमने भारते च तदर्धकम् । हरिवंशे स्वर्णमाने कृते मूल्यसहस्रके ११ युगे युगे पादहीनं धर्मं कुर्यादथारुचि । प्रणम्य शिरसा सर्वान्व्यासादीन्संहिताश्रुतान् १२ जैमिनिं च ततो व्यासं शंकरं च तथा हरिम् । नमस्कारमथैषां तु आदिमध्यावसानके १३ ततः प्रवाचयेद्विप्रो धर्मशास्त्रार्थकोविदः । अलक्षितमनास्तद्वद्रूपं स्पष्टमुच्चरन् ११४ असंयुक्ताक्षरपदं स्पष्टभागसमन्वितम् । सप्तस्वरसमायुक्तं सप्तनादविभूषितम् १५ सामगाथा समाश्रित्य रागयुक्तान्तरं पठेत् । मल्हारो धानसी चैव गान्धारी मालवस्तथा १६ श्रीरागश्चैव हिल्लोलरागो वासन्तिकस्तथा । एव क्रममापेन शृणुयाद्धर्मसंस्थितः १७ ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चापि विशेषतः । अश्वमेधमवाप्नोति सर्वान्कामानवाप्नुयात् १८ पापैः प्रमुच्यते सर्वैर्महापुण्यं च विन्दति । शूद्राणां पुरतो वैश्यो वैश्यानां क्षत्रियः परः १९ क्षत्रियाणां तथा विप्राः शृण्वतां चायतः सदा । न शूद्रो वाचयेद्धर्मांस्तपसाध्यापन तथा११० नैहिकत्वं परत्वं च न शुभं न परां गतिम् । शूद्रेणाधिगतं नास्ति विशेषाच्छब्दलक्षणम् २१ यद्विज्ञस्य कृतो दासो ब्रह्मणाऽव्यक्तयोनिना । श्वशृगालखरीक्षीरभक्षिणं हि यथा भवेत् १२ एवं शूद्रमुखाद्धर्मा न ग्राह्याः शब्दसंस्कृताः । अभेध्य शुध्यते तोयैः शूद्रः

ताड इत्यादिकाच्या पत्रावर लिहिलेल्या पुस्तकाचे प्रमाण द्वारा अगुलें असावें. हे जे अंगुलाचें प्रमाण सांगितले आहे त्यास अनुसरून असणारें पुस्तक ज्ञानदायक असतें ९. (वाचनकालीं) पुस्तक हातांत धरल्यास ते आयुष्याची हानि करणारे होते. धर्मशास्त्राचे पुस्तक लिहिले असता दर हजारीं एक हजार रुपये वेतन द्यावें १०. स्वर्गारोहणपर्व व भारताचा इतर भाग ह्यास त्याचें अर्धें आणि हरिवंशास एक हजार सुवर्ण (एक प्रकारचें नाणें) हें वेतन आहे. प्रत्येक युगास संहितामध्ये विश्रुत असलेल्या व्यासादिकास नमस्कार करून आपल्या इच्छेनुसार चतुर्थांश चतुर्थांश कमी असा धर्म करावा ११,१२. प्रारंभीं, मध्यें आणि अंतीं जैमिनि, व्यास, श्रीशंकर आणि विष्णु ह्यास नमस्कार करावा. तदनंतर, धर्मशास्त्रनिष्णात अशा ब्राह्मणाने अंत.करण एकाग्र करून पुस्तकातील अक्षरे जशीं असतील तशी स्पष्ट उच्चारावीं. तीं परस्परांत गुंतवूं नयेत. वाचण्याच्या श्लोकांच्या प्रत्येक भागाचें स्पष्टीकरण केलेले असावें. वाचनास सप्तस्वर आणि सप्तनाद ह्यांच्या संबंधामुळें शोभा आलेली असावी १३–१५. सामवेदातील गाथांच्या पद्धतींचा आश्रय करून मध्यें मध्यें रागयुक्त असें वाचन करावे. मल्हार, धानसी (धुमाश्री), गांधारी, मालव, श्रीराग, हिल्लोळ (हिंदोल) राग आणि वसंतराग ह्या क्रमानें रागाचे आलाप काढून पुराणवाचन करावे आणि धर्मनिष्ठ श्रोत्याने ते श्रवण करावें १६,१७. ह्याप्रमाणें श्रवण केलें असता ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्रजातीय श्रोता सर्व पातकापासून मुक्त होतो आणि त्यास अश्वमेधाचें फल प्राप्त होऊन मोठें पुण्य लागतें; तसेच, त्याचे सर्वही मनोरथ पूर्ण होतात. पुराणश्रवणास बसतेवेळीं शूद्राच्या पुढें वैश्य, वैश्याच्या पुढें क्षत्रिय आणि क्षत्रियाच्याही पुढें अर्थात् सर्वही श्रोत्याच्या अग्रस्थानीं ब्राह्मण असावे. शूद्रानें धार्मिक ग्रंथ वाचूं नयेत, तपश्चर्या करूं नये व कोणास अध्ययनही सांगूं नये १८-२०. कारण, असें केलें असता त्यास इहलोकींचें अथवा परलोकींचें फल किंवा उत्कृष्ट प्रकारची गति ह्यांची प्राप्ति होत नाहीं व कल्याणही होत नाहीं. विशेषेंकरून विद्याविषयक शब्दांच्या स्वरूपांची प्राप्ति शूद्रास झालेली नाहीं. कारण, अव्यक्तापासून निर्माण झालेल्या ब्रह्मदेवानें त्यास ब्राह्मणादिक तीन वर्णाचा दास केलेला आहे. ज्याप्रमाणे श्वान, शृगाल आणि गर्दभ ह्यांचे दुग्ध प्राशन करण्यास

श्रोता हि शुध्यति २३ एव शूद्रोऽप्यशुचिः स्याद्यदि व्याकरणार्थवित् । यः शूद्र उद्दिशेद्धर्मं तथा चागमवैदिकम् २४ स वै वध्यो नरेन्द्रेण जिह्वां चक्रेण च्छेदयेत् ॥ बुध्यमानः सदा ह्यर्थं ग्रन्थार्थं कृत्स्नमेव च २५ य एव वाचयेत्सम्यक्स विप्रो व्यास उच्यते । देशे स पत्तने ग्रामे पुण्यदेशे प्रकीर्तितः २६ ते धन्यास्ते कृतात्मानस्ते कृतार्था न संशयः । वसन्ति पत्तने तस्मिन्व्याख्याता यत्र सवसेत् २७ यथाऽर्कहीनं दिवस चन्द्रहीना यथा निशा । न रराज सभा तद्वत्स्वनीतिरहिता द्विजाः २८ यद्गृहे नैव शिशवो न रराज पुरं क्वचित् । अथैकतो ग्रहा सर्वे एकतस्तु दिवाकरः १२९ [३८७] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

सूत उवाच ॥ शृणुध्वं विप्रसङ्घाताः पुराणं देवसंमतम् । यच्छ्रुत्वा मुच्यते पापात्पुरुषो ब्रह्महत्यया १ तृतीयं शैवमाख्यातं ततो भागवतं परम् । पञ्चमं च तथा मात्स्यं भविष्यं षष्ठमुच्यते २ असामर्थ्ये च मात्स्योक्तं वैष्णव च भविष्यकम् । भारते चापि पर्व च शान्तिभैष्मीयकं तथा ३ पराशरमतं गृह्य गोभिलोक्तानि यानि च । कात्यायनोक्तमपरमभ्यसेल्लिगमादितः ४

अयोग्य होय, त्याप्रमाणें संस्कारविशिष्ट असलेलेही धार्मिक ग्रंथ शूद्राच्या मुखातून निघाले असता अग्राह्य होत. अपवित्र वस्तु ज्याप्रमाणे जलसंपर्काने शुद्ध होते त्याप्रमाणें शूद्र श्रवणाच्या योगानें शुद्ध होतो २१—२३, असे जरी आहे तरीही व्याकरणातील अर्थाचें ज्ञान झालें असता तो अपवित्रच रहातो. जो शूद्र धर्म, वेद आणि आगम ह्यांचा उपदेश करील त्याच्या जिव्हेचा चक्रानें छेद करून राजानें त्याचा वध करावा. सदोदित वेदादिकाचा अथवा वाचन चालूं असलेल्या ग्रंथाचा अर्थ पूर्णपणें जाणून जो ब्राह्मण पूर्वी सांगितल्याप्रमाणें वाचन करील त्यास व्यास असें ह्मणतात. हा जेथें असेल तो ग्राम, तें नगर अथवा तो देश पवित्र होय २४—२६. ज्याठिकाणीं पुराणाचें व्याख्यान करणारा हा व्याससंज्ञक ब्राह्मण वास्तव्य करीत असेल, त्या नगरात वास करणारे लोक धन्य असून त्याचें शरीर कृतकृत्य झालें आहे व तेही कृतार्थ झालें आहेत ह्यात संशय नाहीं २७. ज्याप्रमाणें सूर्यावाचून दिवस, चंद्रावाचून रात्रि अथवा हे द्विजहो, नीतिशून्य असणारी राजसभा (त्याचप्रमाणें,) हा व्याससंज्ञक ब्राह्मण नसणारें नगर होय. ज्या गृहामध्यें बालक नसतील त्या गृहास कोणत्याही ठिकाणीं शोभा येत नाहीं; (त्याचप्रमाणें) व्याससंज्ञ नगरास कोठेंही शोभा येत नाहीं; अथवा ज्याप्रमाणें सर्व ग्रह एकीकडे व एकटा सूर्य एकीकडे (त्याचप्रमाणे इतर सर्व लोक एकीकडे आणि व्याससंज्ञक द्विज एकीकडे होय. कारण, तो सर्वांहूनही श्रेष्ठ आहे.) १२८, १२९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील पहिल्या भागापैकी सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

सूत ह्मणतात:—हे विप्रसमुदायहो, जें श्रवण केलें असता मनुष्य ब्रह्महत्येपासूनहीं मुक्त होतो तें देवासही मान्य असलेलें पुराण श्रवण करा. पूर्वी सांगितलेल्या पुराणापैकीं तिसरें शिवपुराण, चवथें भागवत, पाचवें मत्स्यपुराण आणि सहावें भविष्यपुराण होय. (हीं सर्वेहीं श्रवण करावीं). हीं श्रवण करण्याचें सामर्थ्य नसेल तर मत्स्यपुराण, विष्णुपुराण आणि भविष्यपुराण ह्यांचेंच पठन करावें. तसेंच, भारतांतील (सर्व पर्वाचें पठन करणें अशक्य असल्यास) शांतिपर्व आणि भीष्मपर्व हींच पठन करावीं १-३. प्रथम वेद आणि नंतर पराशर, गोभिल आणि कात्यायन इत्यादिकांनीं कथन केलेलीं गृह्यसूत्रें ह्यांचें अध्ययन करावें ४. अध्ययन करितेवेळीं (गुरु आणि शिष्य ह्यांच्या) मध्यें मनुष्य

अन्तरेणागते मर्त्ये शास्त्रं नाध्यापयेत्क्वचित् । एकरात्रं गते मर्त्ये त्रिरात्रमजमेषयोः ५ मण्डूके पञ्चरात्रं तु सर्पे रात्रिचतुष्टयम् । संवत्सरं तु तुरगे गजे द्वादश वत्सरान् ६ मासमेकं खरे काके स्थानत्यागान्न कुत्रचित् ७ त्रिरात्रमपि मार्जारे नकुले मूषके खरे । हंसे दिनमनध्यायं क्षुद्रजन्तौ न दूषणम् ८ अध्यापयेद्गुरोः पुत्रं ज्ञानिनं धार्मिकं शुचिम् । भक्तं शान्तं वैष्णवं च जितक्रोधं जितेन्द्रियम् ९ अथ नाध्यापयेदेभ्यः शठं पापकरं द्विषम् । अन्यायेनैव गच्छन्तमभयं दाम्भिकं द्विषम् १० निरर्थकं मन्थरं च विशुश्रूषुमयाजकम् । षण्डं चैवानृजुं क्रुद्धं कृपणं व्यसनार्थिनम् ११ निन्दकं चाविधिज्ञं च दूरतः परिवर्जयेत् । अपच्छन्नं न तं ब्रूयात्पुत्रपौत्रादिकादृते १२ विद्यया सह मर्तव्यं न दद्याच्च पृथग्जने । यतो विद्या वदत्येवं पाठयन्तं द्विजोत्तमम् १३ मा दद्याद्भक्तिहीनाय दुर्जनाय दुरात्मने । अप्रमादाय विप्राय शुचये ब्रह्मचारिणे १४ सार्थकाय विधिज्ञाय साधवे देहि सत्तम । दद्याद्यदि निषिद्धाय विद्याधनमनुत्तमम् १५ तयोरेकतरो गच्छेदचिरेण यमक्षयम् । अन्यायेन ग्रहन्विद्यामन्यं पाठयते सुखात् १६ स याति नरकं घोरं विद्यावर्ज्यः स उच्यते । आध्यात्मिक वैदिक च लौकिकं वाथ यो वदेत् १७ भानुमादौ प्रणम्याथ ततोऽधीयेत सुव्रताः । कर्मकाण्ड ज्योतिषस्य तद्विना न समभ्यसेत्१८ श्च्युतभागः समभ्यासाद्दरिद्रश्चाभिजायते। वेदभागसमभ्यासा-

---

दिवस, मेडूक (बेडूक) आल्यास पाच दिवस, सर्प आल्यास सात दिवस, अश्व आल्यास एक वर्ष, गज आल्यास बारा वर्षे आणि गर्दभ आल्यास एक मास अध्यापन करूं नये. मध्ये काक आल्यास केवल अध्ययनस्थानाचा त्याग करावा ह्मणजे झाले. मार्जार, नकुल (मुंगुस), मूषक आणि गर्दभ हे मध्यें आल्यास तीन दिवसपर्यंत अनध्याय असावा असेही मत आहे. हंस मध्यें आला असता एक दिवस अनध्याय करावा. क्षुद्र जंतु मध्ये आले असता दोष नाहीं. गुरुपुत्र आणि बुद्धिमान्, धर्मनिष्ठ, शुद्धिसंपन्न, प्रेमयुक्त, शांत, विश्वव्यापक परमात्म्याचें आराधन करणारा आणि क्रोधशून्य वर्जितेंद्रिय असणारा मनुष्य ह्यास अध्ययन सागावें. तसेच, शठ, पाप करणारा, द्वेष्टा, अन्यायानें वागणारा, निर्भय, दाभिक, मंदबुद्धि, ज्यास दिलेली विद्या निष्फल होईल असा, सेवा न करणारा, होम न करणारा, क्लीब, सरळ नसणारा, क्रोधी, कृपण, संकटें यावीं अशी इच्छा करणारा, निंदक आणि विधीचें ज्ञान नसणारा, ह्याना अध्ययन सागू नये; इतकेंच नव्हें तर त्याचा दुरूनच त्याग करावा. पुत्र, पौत्र इत्यादिकावाचून इतरास उघड (दुसऱ्याच्या देखत) काहीं बोलूं नये ५—१२. विद्येबरोबर मरून जावें, पण पृथ्वी सांगितलेल्याहून इतरांस तिचें केव्हाही दान करूं नये. कारण, शिष्य पढविणाऱ्या ब्राह्मणश्रेष्ठास विद्या असे सागते कीं, भक्तिशून्य आणि अंतःकरण दूषित असलेल्या दुष्टांस आपण माझें दान करूं नका. दुर्लक्ष्य न करणारा, पवित्र, ब्रह्मचारी, सार्थक्य करणारा, विधीचें ज्ञान असलेला आणि सज्जन ह्यासच हे साधुवर्या, माझे दान करा. जर अत्युत्कृष्ट विद्याधन निषिद्ध मनुष्यास अर्पण केलें तर (तें देणारा व घेणारा ह्या दोहोंपैकीं एक) मनुष्य, लवकरच यमनगरास जातो. अन्यायानें विद्या ग्रहण करून दुसऱ्यास सुखानें पढविणारा मनुष्य घोर नरकास जातो. आध्यात्मिक आणि वैदिकग्रंथासह लौकिक आहेत असें ह्मणणाऱ्या मनुष्यास विद्यावर्ज्य अशी संज्ञा आहे. हे सुव्रतहो, अध्ययन करणाऱ्या मनुष्यानें श्रीसूर्यास प्रथम नमस्कार करून अध्ययन करावें. विशेषकरून कर्मकांड आणि ज्योतिष ह्याचें तर अध्ययन त्याखेरीज करूं नये १३—१८. कारण, त्यांचें अध्ययन अशा प्रकारें केल्यास अध्ययन करणारा सुखोपभोगापासून भ्रष्ट होऊन दरिद्री होतो. वेदभागाचे अध्ययन केलें असता द्र-

जननाशोऽभिजायते १९ निधिभागसमभ्यासाज्जायते नारके कुले । यान्युक्तानि शास्त्राणि माननीयानि यानि च २० म्लेच्छोक्तानि महिम्नानि नाभ्यसेद्दूरतस्त्यजेत् । लोकानां ज्ञानबृद्ध्यर्थं यः कुर्याद्धर्मसंग्रहम् २१ प्रवर्तयित्वा स गुरुर्भवेज्ज्ञानप्रदः पिता । ज्ञानदाता च लोकानां तेषु धर्मः प्रवर्तते २२ निगमानां ज्योतिषाणां वेदानां नाटकस्य च । व्याख्यानसग्रहं कृत्वा कलौ नाशमवाप्नुयात् २३ वेदानां धर्मशास्त्राणां पुराणानां तथैव च । मीमांसाज्योतिषां चैव नाटकानां विरञ्चिना २४ भागावसाने कथितः पुराणाध्याय एव च । पुष्पकश्च परिच्छेदः खण्डश्च प्रतिखण्डकः २५ व्यवहारश्चार्थशास्त्रमश्वशास्त्रस्य चैव हि । यस्य भागावसाने तु प्रयोक्तव्यः स एव हि २६ तत्संग्रहेऽपि कविना नियोक्तव्यः स एव हि । यस्य नाम्नोपदेशे तु प्रवर्तयति सग्रहः २७ तत्तदक्षररूपाणां ब्रह्मलोकान्न तच्च्युतिः । न सग्रहस्तत्र मन्त्रे वेदमन्त्रे च वर्जयेत् २८ मोहात्कृत्वा होमधेनुं दत्त्वा शुद्धिर्भविष्यति । कृत्वा चारुख्यायिकाग्रन्थस्वरूपान्स दिवं व्रजेत् २९ धर्मशास्त्रस्य गम्यस्य व्यवहारस्य चैव हि । कलौ यः संग्रह कुर्यात्समुक्त चैव केशवे ३० यावत्प्रवर्तते लोकस्तावत्स्वर्गे महीयते । सिंहे पौषे च चैत्रे च न कुर्यात्संग्रहं क्वचित् ३१ प्रातःकाले न कुर्वीत तथा मध्यन्दिने द्विजाः । पक्षान्ते भूमिदाहे च भुवः कम्पे दिनक्षये ३२ मलमासे विशेषेण सन्ध्ययोश्च विवर्जयेत् । अमेध्याक्तं च पत्रं च लिप्यक्षरविभूषितम् ३३ पूतं स्यात्त-

---

व्याचा नाश होतो १९. निधिसंज्ञक भागाचा अभ्यास केल्यास नरकात वास करणाऱ्या प्राण्याच्या कुलामध्यें जन्म प्राप्त होते. हीच गोष्ट येथें न सांगितलेलीं पण मान्य असणारीं अशा शास्त्राविषयीं आहे, म्लेच्छांनीं सांगितलेली शास्त्रे जरी महत्त्वयुक्त असलीं तरी त्यांचे अध्ययन न करिता तीं दूर फेंकून द्यावीं. लोकाच्या ज्ञानाभिवृद्ध्यर्थ जो त्याची धर्माकडे प्रवृत्ति करून धर्मसंग्रह करील तो ज्ञानदाता गुरु केवल पिताच होय. लोकास ज्ञान देणाऱ्या ह्या गुरूच्या ठिकाणी धर्माची प्रवृत्ति असते २०–२२. निगम, ज्योतिषे, वेद आणि नाटके ह्यांच्या व्याख्यानाचा कलियुगामध्यें संग्रह करणारा मनुष्य नाश पावतो. वेद, धर्मशास्त्रे, पुराणे, मीमांसा, ज्योतिष आणि नाटके ह्यांच्या भागाच्या शेवटास पुराणाध्याय, पुष्पक, परिच्छेद, खंड, प्रतिखंडक अशा ब्रह्मदेवाने संज्ञा दिल्या आहेत. व्यवहार, अर्थशास्त्र आणि अश्वशास्त्र ह्यांच्याही भागाच्या शेवटास अशीच नावें आहेत. ज्या भागाच्या शेवटास जी संज्ञा असेल तीच त्यास लावावी २३—२६. व्यास सांगितले असता ह्या संज्ञाचा संग्रह केला जाईल अशाच मनुष्याची, ह्या संज्ञा संग्रह करण्याचा कार्मी विद्वान् मनुष्याने योजना करावी २७. कारण, तसे केले असता त्या संज्ञेची जितकीं अक्षरे असतील तितकीं वर्षेपर्यंत त्याचा ब्रह्मलोकापासून भ्रंश होत नाहीं. हा संग्रह मंत्रासाठी करूं नये. वेदमंत्राधिपर्यंतही हा वर्ज्य समजावा व मोहामुळें कदाचित् संग्रह केला तर होमधेनूचे दान केलें असता शुद्धि येते. जो मनुष्य आख्यायिकाग्रंथाची रचना करील तो स्वर्गास जातो २८,२९. तसेंच, श्रीविष्णूनीं शयन केले असता अर्थात् चातुर्मास्यात जो मनुष्य सुबोध अशा धर्मशास्त्रवचनाचा व व्यवहारसंबंधी वचनाचा संग्रह करील तो, जोपर्यंत हा लोक अस्तित्वात आहे तोपर्यंत स्वर्गामध्यें पूज्य होऊन रहातो. मात्र सिंहसंक्रमण, पौष आणि चैत्र ह्या महिन्यामध्ये कोठेही हा संग्रह करूं नये ३०,३१. तसेंच, हे द्विजहो, अगदीं प्रातःकालीं, भर दोनप्रहरी, शुक्लादिक पक्षाच्या शेवटीं, भूमि सतत झाली असतां, भूकंप झाला असता किंवा अधिकमासामध्ये हा संग्रह करूं नये व विशेषेंकरून दोहों संध्याच्या काली हे संग्रहकर्म वर्ज्य करावें. कागदास अथवा लिहिण्याच्या पत्रास जर कांहीं अपवित्र पदार्थ लागला असेल तर हे विप्रहो, तें चतुरक्षर अथवा पंचाक्षर

लक्षणाद्विगाश्चतुःपञ्चाक्षरेण वा । नारसिंहस्य विन्यासे पूतो भवति तत्क्षणात् ३४ मायाविभव-विन्यस्ते महापापकलेवरे । मुहूर्तार्धेन पूतत्वं प्रभोर्यान्ति परां गतिम् ३५ स्त्रियो वा निन्दितो वापि म्लेच्छो याति परां गतिम् । यो मूढो मन्यते दोष तस्य शौचं समाचरेत् ३६ स गर्दभीं खरीं योनिं प्रविशेन्नात्र संशय । एकमेवात्मकं ब्रह्म तत्प्रकृत्यात्मक द्वयम् ३७ नवात्मकं भैरवं च दशमं च जनार्दनम् । रुद्रमेकादश चैव अर्कार्कं चापि द्वादशम् ३८ त्रयोविंशे च भूतात्मा षड्विंशे मनुरीरितः । त्रिंश्यात्मकं पञ्चदशं षोडशारूया कला परा ३९ वातात्मकं सप्तदश मन्त्रं समनुवर्तते । अष्टादशाक्षर मन्त्रं पुराणात्मकमेव च ४० ऊनविंशश्चन्द्रमाः स्यादिंशो नारायणो वपुः । ज्योतिर्मयश्चैकविंशे द्वाविंशे केशवार्चनम् ४१ नक्षत्राणि त्रयोविंशे चतुर्विंशे वितानकम् । पञ्चविंशे च तीर्थानि षड्विंशे च त्रियम्बकः ४२ अष्टाविंशे धनेशश्च ऊनत्रिंशे सरस्वती । त्रिंशत्यांगे शिवः प्रोक्तः पातालमेकत्रिंशके ४३ अहोरात्रश्च द्वात्रिंशे चतु-स्त्रिंशे च जाह्नवी । पञ्चत्रिंशे तदन्त. स्याच्छते पूर्णे दिवाकरः ४४ सहस्रे च शिवो ज्ञेयश्चायुते मेरुरुच्यते । लक्षे ब्रह्मा तथा कोट्यां देवो नारायणः परः ४५ पुमप्रकृत्यात्मक चान्यच्छारदा लिपिमातृका । शुद्धब्रह्ममयं नित्यं ज्ञानरूप पर महत् ४६ यस्मिन्न व्यसनादेव शुचौ चाप्य-शुचिस्थल । क्षणे ब्रह्ममयं याति इत्याह भगवान्मनुः ४७ [४३४] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागेऽङ्कमाहात्म्यकथन नामाष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

मंत्रांतील अक्षराच्या लेखानें विभूषित झालें असतां शुद्ध होते. नारसिंह हीं अक्षरें लिहिलीं असताही ते तत्काल पवित्र होतें. मायावैभवरूपी संसारामध्ये ईश्वरानें ठेविलेल्या ह्या महापापी शरीर देखील ह्या प्रभूचें नामग्रहण केलें असता एका घटकेत पवित्र होतें व तो मनुष्यही उत्कृष्ट प्रकारच्या गतीस जातो. स्त्री असो, निंद्य असो अथवा म्लेच्छ असो, तोही शुद्ध होऊन मोक्षास जातो. जो मूर्ख हे नामग्रहण केलें असता देखील दोष राहतोच असे मानील व त्याच्या शुद्धीसाठीं इतर कर्में करील तो गर्दभाच्या जातीमध्ये निर्माण होईल ह्यात संशय नाहीं. (पुस्तकाच्या पत्रावर जे अंक घालावयाचे त्याच्या देवता अशा आहेत–) एकाची देवता ब्रह्म, दोहोंची प्रकृतियुक्त ब्रह्म ३२–३७, नऊ भैरवस्वरूपी असून दहा जनार्दनात्मक आहेत; अकरा रुद्रस्वरूपी, बारा सूर्यस्वरूपी, तेवीस भूतात्मस्वरूपी, सव्विसाची देवता मनु, पंधराची तिथि, सोळाची उत्कृष्ट अशा कला, सतरा हे वायुस्वरूपी असून सतरा अक्षराच्या मंत्राचीही देवता तीच आहे, अठरा अक्षराचा मंत्र पुराणस्वरूपी आहे; एकोणिस अक्षरांची देवता चंद्र ही असून वीस ही श्रीनारायणाचे स्वरूप होय; एकविसाची देवता ज्योतिर्मय ही असून बावीस अक्षराचा मंत्र श्रीविष्णूचें अर्चन करण्यास साधनीभूत आहे. तेविस अक्षरांच्या ठिकाणीं नक्षत्रे असून चोविसाच्या ठिकाणीं यज्ञ वास्तव्य करितात. पंचविसाच्या ठिकाणीं तीर्थे, सव्विसाच्या ठिकाणीं त्र्यंबक, अठ्ठाविसाच्या ठिकाणीं धनेश, एकोणतिसाच्या ठिकाणीं सरस्वती, तिसाच्या ठिकाणीं शिव, एकतिसाच्या ठिकाणी पाताल, बत्तिसाच्या ठिकाणीं अहोरात्र, चौतिसाच्या ठिकाणीं जान्हवी, पस्तिसाच्या ठिकाणीं भागीरथीच्या शेवटचा प्रदेश, पूर्ण शंभराच्या ठिकाणीं सूर्य, सहस्राच्या ठिकाणीं शिव, दशसहस्राच्या ठिकाणीं मेरु, लक्षाच्या ठिकाणीं ब्रह्मा आणि कोटीच्या ठिकाणीं श्रेष्ठ अशी नारायणसंज्ञक देवता वास करिते ३८–४५. ह्याहून इतर केवल पुरुषस्वरूपी असून शारदा ही लिपीची माता आहे. ह्यास्तव, शुद्धब्रह्मस्वरूपी, नित्यज्ञानाची मूर्ति, श्रेष्ठ आणि महत्त्वयुक्त असणारे हे लेख शुद्ध अथवा अशुद्ध अशा कोणत्याही स्थलीं ठेवू नयेत. ह्मणजे तसे करणारा मनुष्य तत्काल ब्रह्मस्वरूपीं लीन होतो असें भगवान् मनूंनी सांगितले आहे ४६,४७.

सूत उवाच ॥ अन्तर्वेदि यवक्ष्यामि ब्रह्मणोक्तं युगान्तरे । बहिर्वेदि तथैवोक्तं शस्तं स्याद्द्वापरे कलौ १ ज्ञानसाध्यं तु यत्कर्म अन्तर्वेदीति कथ्यते । देवतास्थापनं पूजा बहिर्वेदिरुदाहृता २ अपां पूर्तादिकं चैव ब्राह्मणानां च तोषणम् । गुरुभ्यः परिचर्या च बहिर्वेदी द्विधा मता ३ अकामेन कृतं कर्म कर्म च व्यसनादिकम् । अन्तर्वेदी तदेवोक्तं बहिर्वेदीविपर्ययः ४ धर्मस्य कारणं राजा धर्ममेतद्ध्वजाश्रयः । तस्मात्तमं समाश्रित्य बहिर्वेदी ततो भवत् ५ सप्ताशीतिर्बहिर्वेदी सारमेषां तृतीयकम् । देवतास्थापनं चैव प्रासादकरणं तथा ६ तडागकरणं चैव तृतीयं न चतुर्थकम् । पञ्चमं पितृपूजा च गुरुपूजापुरःसरम् ७ अधिवास. प्रतिष्ठा च देवतानामपि क्रिया । प्रतिमाकरणं चैव वृक्षाणामथ रोपणम् ८ त्रिविधा सा विनिर्दिष्टा उत्तमं चाथ मध्यमम् । कनिष्ठं शेषकल्पं च सर्वकार्येष्वयं विधिः ९ त्रिधा भवति सर्वत्र प्रतिष्ठादिविधिर्मत । पूजाहोमादिभिर्दानैर्मानतश्च त्रिभागतः १० त्र्यहसाध्यविधानेन अष्टाविंशतिदेवताः । त्रिधा भवति सर्वत्र प्रतिष्ठादिविधिर्मनः ११ प्रत्यहं पूजयेत्तत्र याजकास्तत्र षोडश । उत्तमोऽसौ विधिः कृत्स्न अश्वमेधफलप्रदः १२ चत्वारो याजकास्तत्र त्रयोविंशतिदेवताः । ग्रहदिक्पालवरुण पृथिवी च शिवं तथा १३ एकाहेनैव पूजा च मध्यमः कथितो विधिः । गणेशग्रहदिक्पालान्वरुण च शिव तथा १४ सपूज्य पूज्यते यत्र कनिष्ठोऽसौ विधिः

ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील प्रथम भागांपैकी अकमाहात्म्यकथन नावाचा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥

सूत ह्मणतात.— युगांतरामध्ये ब्रह्मदेवानें कथन केलेले अंतर्वेदिसंज्ञक आणि द्वापरयुगामध्ये अनुष्ठान करण्यास प्रशस्त असलेले बहिर्वेदिसंज्ञक कर्म आता मी कथन करितो १. जे कर्म ज्ञानसाध्य आहे त्यास अंतर्वेदि व देवताची स्थापना, पूजा इत्यादिकास बहिर्वेदि कर्म असे ह्मणतात २. पाणपोई, पूर्तसंज्ञक कर्म, ब्राह्मणाना संतुष्ट करणें आणि गुरूची सेवा करणें ही कर्मेंही बहिर्वेदिसंज्ञकच होत. निष्कामपणे केलेले आणि संकटादिकामुळे अर्थात् फलाच्या अभिलाषानें केलेलें असे बहिर्वेदीचे दोन प्रकार आहेत व बहिर्वेदीच्या उलट असणाऱ्या अंतर्वेदिसंज्ञक कर्माचेही असेच दोन प्रकार आहेत ३, ४. राजा हा धर्माचें कारण आहे इतकेंच नव्हे तर तो त्या धर्माची एक मूर्तिच आहे. ह्यास्तव, राजाचा आश्रय करूनच बहिर्वेदिसंज्ञक कर्में करावी ५. बहिर्वेदिसंज्ञक कर्माचे एकंदर ८७ प्रकार आहेत. तथापि, त्यात देवताची स्थापना, देवालय यांचें निर्माण आणि तडाग बांधणे ही तीन सारभूत आहेत; तसें चवथे नाही. (आतां, ह्या तिहींवेरीज आणखी जीं कर्में आहेत तीं सागतो.) गुरुपूजा ही चवथी व पितृपूजा ही पांचवी, अधिवासन, देवताची प्रतिष्ठा करणे, प्रतिमा करणें आणि वृक्ष लावणें ६—८. उत्तम, मध्यम आणि अवशिष्ट राहिलेले कनिष्ठ असे ह्या क्रियाचे तीन प्रकार आहेत. सर्वही कर्मांमध्ये हे प्रकार आहेत ९. पूजा, होम आणि दान ह्याच्या योगानें प्रतिष्ठादिक कर्में सर्वत्र तीन प्रकारची आहेत. तसेच, प्रमाण आणि भाग ह्याच्या योगानेही त्या कर्माचे प्रकार तीन होतात. अठ्ठावीस देवताच्या प्रतिष्ठेचा विधि तीन दिवसांनीं सिद्ध होणारा असल्यामुळे सर्वत्र तीनच प्रकारचा मानिलेला आहे १०, ११. त्यापैकीं प्रत्यही पूजा करणें आणि सोळा ब्राह्मण याजक (याग करण्यास) असणें हा सर्व विधि उत्तम असून अश्वमेधफल देणारा आहे १२. याजक चार असून ग्रह, दिक्पाल, पृथ्वी आणि शिव (व स्थापन करावयाची देवता) अशा तेवीस देवता असणें व एकाच दिवसामध्ये पूजाविधि आटोपणें हा विधि मध्यम होय. गणेश, ग्रह, दिक्पाल, वरुण आणि शिव ह्याचीच केवल पूजा करून

स्मृतः । एकवृक्षश्चैकरूपाः प्रतिमाक्षुद्रदेवताः १५ नलिनीदीर्घिकागर्तवापीजलयुतादिकम् । एषां संस्कारकार्येषु प्रतिमानो विधिक्रिया १६ अग्निकार्यं ततः कृत्वा न कुर्याद्विधिविस्तरम् । गणेशग्रहदिक्पालान्पूजयेदुपचारतः १७ वाप्यादेः पुष्करिण्याश्च क्षिपेद्गङ्गाजलं ततः । उदूखलद्वयेनापि जीर्णानां तु कदाचन १८ सेतुप्रासादवापीनां प्रतिष्ठां नैव कारयेत् । प्रासादः सेतवश्चैव तडागाश्चास्तथैव च १९ त्रिभिर्वर्णैः प्रतिष्ठार्हा जीर्णानां तु समुद्धृताः । मुनयो मानमिच्छन्ति अमाने न हि दृश्यते २० तस्मान्मानं प्रवक्ष्यामि यन्मानं यादृशं फलम् । षष्टिहस्तप्रमाणेन तदुक्तं वारणोदितम् २१ एकषष्टिहस्तमितं प्रासादं चोत्तमं विदुः । मध्यं तदर्धं विज्ञेयं कनिष्ठं तत्परं स्मृतम् २२ अथवा देवमानेन कर्तव्यो भूतिमिच्छता । यस्तडागं नवं कृत्वा जीर्णं वा नवतां नयेत् २३ सर्वं कुलं समुद्धृत्य स्वर्गलोके महीयते । वापीकूपतडागानि उद्यानप्रवहाणि च २४ पुनःपुनश्च संस्कार्यो लभते मोक्षिकं फलम् । गुणानां च प्रमाणेन प्रतिमानं विधागतः २५ द्विशतेन शतेनापि प्रासादमेष निश्चय । सहस्रहस्तविस्तार दैर्घ्येणाष्टाधिकं भवेत् २६ तडागं तं विजानीयात्प्रथमं मानमीरितम् । मध्य चतुःशतेनापि प्रस्तारे दशहीनकम् २७ कनिष्ठ त्रिशतं चैव प्रस्थे स्याद्विंशहीनकम् । तदर्धेन कलौ ज्ञेयं तदर्धेन तदर्धकम् २८ तडागमानं विज्ञेयं त्रिवर्गफलदायकम् । अथ पुष्करिणीपक्षे द्वे शते मानमुत्तमम् २९ तडागे द्विगुणानेमि

ज्यामध्यें स्थापना करावयाच्या देवतेचें आराधन केले जातें तो विधि कनिष्ठ होय. मुख्य मुख्य वृक्ष, आकृतीने सारख्या असणाऱ्या क्षुद्र देवता, कमलवल्लींनीं युक्त असणाऱ्या मोठमोठ्या विहिरी, डबकी, साधारण विहिरी, पाणपोई इत्यादिकाचा संस्कारार्थविधि करावयाच्या वेळी देवप्रतिमाही विभूषित कराव्या १३–१६. पुढें अग्निकार्य करावें, हा विधि विशेषमा लावतूं नये. गणेश, ग्रह आणि दिक्पाल ह्यांचें यथाविधि पूजन करावें व नंतर, विहिरी व पुष्करिणी (मुद्दाम खोदलेली डबकीं) ह्यामध्ये उदूखलनामक पात्रातून गंगाजल घेऊन ओतावें. सेतु, देवमंदिर अथवा वापी (विहिरी) हीं जीर्ण झाल्यानंतर त्यांची केव्हाही प्रतिष्ठा करूं नये. देवमंदिर, सेतु आणि तडाग ह्यांची प्रतिष्ठा तीनहि वर्णांस करिता येते; परंतु, ते जीर्ण झाले असतील तर मात्र त्यांच्या प्रतिष्ठेच्या विधीचा काल निघून गेला आहे असे समजावें. ऋषींनीं ह्या सेतुप्रभृतींची प्रमाणें सांगितली आहेत. प्रमाणावाचून शास्त्रांत ह्यांचे विधान केलेलें कोठेही दिसत नाही. ह्यास्तव, ह्यांचे प्रमाण आणि कोणत्या प्रमाणाचें काय फल आहे हे मी कथन करितो. वारणानें सांगितल्याप्रमाणें ते प्रमाण साठ हातांचें असावें असे सामान्यतः झटले आहे १७–२१. ६१ हातांचें प्रमाण असलेला प्रासाद (देवमंदिर) उत्तम, त्याच्या अर्ध प्रमाण असलेला मध्यम आणि त्याहूनही कमी प्रमाण असलेला कनिष्ठ होय. अथवा ऐश्वर्येच्छु पुरुषाने देवप्रतिमेच्या मानाने हा प्रासाद करावा. जो मनुष्य तडाग नवीन करील अथवा जीर्ण असलेल्याची दुरुस्ती करून त्यास नव्याप्रमाणे करील तो आपल्या सर्व कुलाचा उद्धार करून स्वर्गलोकीं मान्य होऊन राहील. वापी, कूप (आड), तडाग (तलाव), उद्यानें आणि झरे ह्यांची वारंवार दुरुस्ती करणाऱ्या मनुष्यास मोक्षरूपी फल मिळतें. प्रतिमाच्या अवयवविभागाच्या अनुरोधाने व फलाच्या मानाने प्रासादाचें प्रमाण दोनशे अथवा शंभर हात असावें असा सिद्धांत आहे. तडागाचे मुख्य प्रमाण एक हजार हात रुंद व आठ हजारांहून अधिक हात लांब असें सांगितलें आहे. चारशे हात लांब आणि तीनशे नव्वद हात रुंद हे प्रमाण मध्यम असून तीनशें हात लांब आणि दोनशें ऐंशी हात रुंद हे प्रमाण कनिष्ठ होय. हेच पूर्वोक्त प्रमाणाचें अर्ध कलियुगामध्यें अनु-

मानार्धे गर्तमीरितम् । तत्क्षेत्रं वारुणं स्थानं त्रैदशं तद्बहिः स्मृतम् ३० चतुर्थे चैव गान्धर्वं पैशाचं पञ्चमं विदुः । यक्षस्थानमितो भागे एवं सर्वे क्रमेण हि ३१ अशीतिहस्तमानेन नलिन्या मणिरुच्यते । पञ्चहीनं च शस्तावे एवं मानाबुधो विदुः ३२ षष्टिहस्तेन नलिनी शस्तावे तूर्यहीनकम् । चतुःषष्टिहस्तमिता दीर्घिका च प्रकीर्तिता ३३ तुर्यहीनं च शस्तावे गर्तं मानं न विद्यते ३४ अग्नौ रोगं बन्धुनाशश्च याम्यां मृत्युश्चनैर्ऋ. पाप्यते राक्षसे च । भीतिश्चोग्रा प्राप्यते वायवीये तस्मादेता वर्जनीयाः प्रयत्नात् ३५ विप्रादीनां देवतानां समाजे मेरुस्थाने यत्नतैव कुर्यात् । नद्यास्तीरे वर्जयेद्वा श्मशाने तडागानामाश्रमादौ जनानाम् ३६ यदा प्रतिष्ठां न करोति मूढः प्रासादवाप्यादिषु पापचेताः । भयं समाप्नोति च पापमुग्रं पदेऽहिना वै वधभागितां व्रजेत् ३७ यदा तु दीर्घासरसीतडागप्रासादकूपादिषु निर्मितेषु । कुर्वन्ति चान्यानि यदा मखानि भवन्ति तान्यल्पफलप्रदानि ३८ यदप्रतिष्ठेषु निपानकेषु प्रासादकूपेषु वनादिकेषु । प्रतिष्ठिते यत्फलमाप्नुवन्ति फलं तदाल्पाल्पकमाहुरस्य ३९ तस्मात्प्रतिष्ठां विधिना जलादेः कुर्याद्यथेष्टं प्रयतो मनुष्यः । पुण्यार्जनेनैव धनेन काले स्वशक्तिसाध्यस्य शुभाशयस्य ४० प्रासादे मृन्मये पुण्यं मयैतत्कथितं द्विजाः । तस्माच्चतुर्गुणं प्रोक्तं तृणकाष्ठमये तथा ४१ तृणमये

क्रमे उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ प्रमाण होय. ह्याप्रमाणे धर्मार्थकामरूपी त्रिवर्गजन्य फल देणारें हे तडागाचे प्रमाण होय. पुष्करिणीचे प्रमाण दोनशें हात असणे उत्तम होय. तडागाचा परिघ दुप्पट असावा व त्यांतील खळग्याचे प्रमाण त्याचे अर्धे असावे. ती तडाग असलेली भूमि हे वारुणस्थान असून त्याचा बाह्यभाग हे देवताचे स्थान होय. तडागातील भागापैकी क्रमाने चवथा, पांचवा आणि त्याच्या पुढील भाग हे गंधर्व, पिशाच आणि यक्ष ह्यांचीं क्षेत्रे होत. ज्या तडागाची लांबी ऐंशी व रुंदी पंचाहत्तर हात असेल त्यास नलिनीमणि असें प्रमाणज्ञ लोक ह्मणतात २२-३२. साठ हात लांब आणि रुंदीला त्याचा चतुर्थांश कमी असणाऱ्या तडागाचे नांव नलिनी असून चौसष्ट हात लांब आणि रुंदीत त्याच्या चतुर्थांशाने कमी असणाऱ्या तडागास दीर्घिका असें ह्मणतात. गर्ताविषयी मात्र कोणत्याही प्रकारचे प्रमाण नाहीं. तडाग आग्नेयीदिशेस केला असता रोग होतो, दक्षिणेस केला असता बंधूंचा नाश होतो, नैर्ऋत्येस केला असता भयंकर रीतीने मृत्यु येतो आणि वायव्येस केला असता अत्यंत भीति प्राप्त होते. ह्यास्तव, ह्या दिशा प्रयत्नपूर्वक वर्ज्य कराव्या. ज्याठिकाणीं ब्राह्मणाचे आणि देवताचे समूह वास्तव्य करीत असतील त्याठिकाणीं आणि मेरुपर्वतावरील प्रदेशावर बांधेल तेथे तडाग निर्माण करावे. नदीचे तीर, स्मशान आणि लोकाच्या आश्रमाची वगैरे स्थाने ह्यांच्या ठिकाणी तडाग कधीं नयेत ३३-३६. जर एखादा मूर्ख आणि अंतःकरण पापी असलेला मनुष्य देवमंदिर आणि वापी इत्यादिकांची प्रतिष्ठा न करील तर त्यास भीति उत्पन्न होईल आणि भयंकर पातक लागून तो पायास सर्पदंश होऊन मृत्यु पावेल. दीर्घिका, सरोवरें, तडाग, देवमंदिरे आणि कूप ही निर्माण केलीं असता त्यासंबंधीं याग न करितां दुसरेच यज्ञ केले तर ते अल्पफलदायक होतात ३७, ३८. कूपाच्या समीप जलप्राशनासाठीं केलेली जागा, प्रासाद आणि कूप ह्यांची प्रतिष्ठा केल्याचेवांचून जर दुसरीं कर्मे केलीं तर त्यापासून मिळणारें फल हें अत्यंत अल्प असतें ३९. ह्यास्तव, मनुष्यानें आपल्या संपत्तीचा व्यय करून तयार केलेल्या आणि मध्यभाग उत्कृष्ट असलेल्या जलाशयादिकांची प्रतिष्ठा पुण्यार्जनासाठीं द्रव्याचा व्यय करून यथाविधि, प्रयत्नपूर्वक, यथेच्छ आणि वेळेवर करावी ४०. हे द्विजहो, मृत्तिकेचे देवालय बांधिले असता लागणारे पुण्य मीं आपणास सांगितले. तृण आणि काष्ठ ह्या दोहोंच्या योगानें

शतगुणं तदर्धं नववङ्कले । तस्माद्दशगुणं प्रोक्तं कुंते दारुमये भवेत् ४२ ततो दशगुणं प्रोक्तमिष्टिकारचिते शुभे । तस्माच्छतगुणं शैले सहस्रं ताम्ररौप्यके ४३ ततश्च शतसाहस्रं सौवर्णे द्विजसत्तमाः । अनन्तफलमाप्नोति रत्नादिरचिते तथा ४४ यदतीतं भविष्यं च कुलानामयुतं नरः । विष्णुलोकं नयत्याशु कारयित्वा हरेर्गृहम् ४५ कनिष्ठं मध्यमं श्रेष्ठं कारयित्वा हरेर्गृहम् । अर्धं च वैष्णवं लोकं मोक्षं च लभते क्रमात् ४६ हस्तानां षोडशैर्यावत्प्रस्थे स्यात्कर्हानकम् । तृणवंशमयं मानं मध्यं चार्कगृहं भवेत् ४७ कनिष्ठं दशहस्तं स्यादुत्तमं पञ्चविंशतिम् । सर्वोत्तमं च द्वात्रिंशच्चतुष्कोणे महाफलम् ४८ पुरद्वारं च कर्तव्यं चतुरस्रं समं भवेत् । अष्टकोणं न कर्तव्यं त्रिकोणं च कलौ युगे ४९ सुरवेश्मनि यावन्तो द्विजेन्द्रा परमाणवः । तावद्वर्षसहस्राणि स्वर्गलोके महीयते ५० कर्तुर्दशगुणं प्रोक्तमापानपरिपालके । पतितान्युद्धरेद्यस्तु स सर्वं फलमश्नुते ५१ पतितं पतमानं च तथार्द्धस्फुटितं तथा । समुद्धृत्य हरेर्वेश्म द्विगुणं फलमाप्नुयात् ५२ पतितस्य तु यः कर्ता पतमानस्य रक्षिता । विष्णोरधितलस्थैव मानवः स्वर्गभाग्भवेत् ५३ यः कुर्याद्विष्णुप्रासाद ज्योतिर्लिङ्गस्य वा क्वचित् । सूर्यस्यापि विरिञ्चेश्च दुर्गायाः शांशिवस्य च ५४ स्वयं स्वकुलमुद्धृत्य कल्पकोटिं वसेद्दिवि । स्वर्गाद्भ्रष्टो भवेद्राजा धनी पूज्यतमोऽपि वा ५५ देवीलिङ्गेषु यानौ वा कृत्वा देवकुलं नरः । स्मरत्व प्राप्नुयाल्लोके पूजितो दिवि

देवालय केले असता त्याच्या चौपट पुण्य सांगितले आहे ४१. केवळ तृणाच्या योगाने ते केलें असता शंभरपट, झाडांच्या नवीन साली च्या योगाने केले असता त्याचे अर्धे आणि ते काष्ठाचे केलें असता त्याचे दसपट पुण्य लागते असे सांगितले आहे ४२. विटाच्या योगाने उत्कृष्ट प्रकारचें देवमंदिर बांधिले असता त्याहून दसपट, पाषाणाचे बांधिले असता त्याच्या शंभरपट, ताम्र अथवा रौप्य ह्याचें बांधिले असता सहस्रपट आणि हे द्विजश्रेष्ठहो, सुवर्णाचे बांधिले असता लक्षपट पुण्य लागते. रत्नादिकाच्या योगाने देवमंदिर निर्माण केले असता अनंत फल मिळते ४३.४४. श्रीविष्णूचे मंदिर निर्माण करणारा मनुष्य, आपल्या वंशात पूर्वी होऊन गेलेल्या आणि पुढें होणाऱ्या दहा हजार कुलाना सत्वर विष्णुलोकास पोहोचवितो ४५. कनिष्ठ, मध्यम आणि श्रेष्ठ असे श्रीशिवमंदिर निर्माण केले असता त्याचे अर्धे पुण्य मिळून विष्णुलोकाची व क्रमाने मोक्षाचीही प्राप्ति होते ४६. सोळा हात लांब आणि रुंदी त्याहून एक हात कमी अथवा पंधरा हात रुंद असे गवत आणि वेळू ह्याच्या योगाने केलेले सूर्यमंदिर मध्यम होय. दहा हात असणारे मंदिर कनिष्ठ असून पंचवीस हात असणारे उत्तम आणि बत्तीस हात असल्यास सर्वोत्कृष्ट होय. ते चतुष्कोणी असल्यास महाफलदायक होते ४७, ४८. त्याचे गोपुर चौकोनी आणि सम असावे. अष्टकोनी अथवा त्रिकोणी गोपुर कलियुगात करूं नये ४९. हे द्विजश्रेष्ठहो, देवमंदिरामध्ये जितके परमाणु असतील तितकी हजार वर्षपर्यंत ते मंदिर निर्माण करणारा मनुष्य स्वर्गलोकामध्ये पूज्य होऊन राहतो ५०. पाणपोई करण्यापेक्षा तिचें संरक्षण करणाऱ्यास दसपट अधिक पुण्य लागते. जो मनुष्य पडलेल्या देवमंदिरादिकाचा उद्धार करील त्यास पूर्ण फल उपभोगावयास मिळते ५१. पडलेल्या, पडत असलेल्या अथवा अर्धवट भगलेल्या श्रीविष्णुमंदिराचा उद्धार केल्यास द्विगुणित फलाची प्राप्ति होते ५२. भूतलावर पडलेल्या श्रीविष्णुमंदिराचे उद्धरण करणारा आणि पडत असलेल्याचे संरक्षण करणारा मनुष्य स्वर्गलोकास जातो ५३. जो मनुष्य श्रीविष्णु, ज्योतिर्लिंग, सूर्य, ब्रह्मा, दुर्गा आणि श्रीशिव ह्यांचा प्रासाद निर्माण करील तो आपल्या कुलाचा उद्धार करून एक कोटि कल्पपर्यंत स्वर्गामध्ये वास्तव्य करील आणि स्वर्गभ्रष्ट झाल्यानंतर राजा

सर्वदा ५६ यावत्कालं स्थितं तोयमग्निष्टोमफलं लभेत् । शरत्कालस्थितं तोयं यज्ञतोयाद्विशिष्यते ५ निदाघकाले पानीयं यस्य तिष्ठति वापिन । स्वर्गे गच्छेत्स नरकं न कदाचिदवाप्नुयात् ५८ एकाह तु स्थित तोयं पृथिव्यां द्विजसत्तमा । कुलानि तारयेत्तस्य सप्तसप्तपराणि च ५९ पूर्वं पितृकुले सप्त तद्वन्मातृकुले द्विजाः । चतुर्दशमिद ज्ञेयं शतलेखं तत शृणु ६० पितुरूर्ध्वं कुलं विंशं मातुरूर्ध्वं कुलं तथा । तद्वत्पर विजानीयाद्भार्यायाः पञ्च एव च ६१ पञ्च वै मातृतश्चास्य पितुर्मातामहे कुले । पञ्चपञ्च विजानीयान्मातुर्मातामहस्य च ६२ गुरोः पितृकुले पञ्च तस्य मातृकुलं तथा । आचार्यस्य कुलं द्वन्द्वं दश राजकुलस्य च ६३ राज्ञो मातामहकुले पञ्च चैव प्रकीर्तिताः । एकोत्तर शतकुल परिसख्यातमेव च ६४ आत्मना सह विप्रेन्द्रा उद्धारः समतः स्मृत. । कुर्यादेवार्चनं तीर्थं स्वविमुक्तये दशार्णवे ६५ समुद्धरत्कुलशतं शृणु विंशकुलं द्विज । पञ्चपञ्च च पित्रोश्च पितुर्मातामहस्य च ६६ मातुर्मातामहस्चैव जातिद्वन्द्वमुदाहृतम् । गुरो सन्तानके द्वन्द्वं तद्वत्स्यादात्मना सह ६७ परपक्षस्य चैकं स्यादेकविंश कुल क्रमात् । पानीयमेतत्सकल त्रैलोक्यं सचराचरम् ६८ पानीयेन विना वनिर्लोके नास्तीति कर्हिचित् । वारस्वस्थ पुष्पखण्ड तोय पतति यावति ६९ तावत्काल वसेत्स्वर्गे अन्ते ब्रह्मत्वमाप्नुयात् । तस्मात्तोयोपरि गृह प्रासादोपरि वर्जयेत् ७० सूर्य

अथवा अत्यंत पूज्य असा धनिक होईल. देवीची प्रतिमा, शिवलिंग आणि शाळुंकार असलेले त्याठिकाणी देवमंदिर निर्माण करणाऱ्या मनुष्यास मदनत्वाची प्राप्ति होऊन तो स्वर्गामध्ये सदोदित पूज्य होऊन राहतो ५४-५६. ज्याने केलेल्या लोकोपयोगी विहिरीमध्ये वर्षाकाली जल असेल त्यास अग्निष्टोमफलाची प्राप्ति होते. शरत्कालीं असणाऱ्या जलाची योग्यता यज्ञजलादिसबंधाहून अधिक आहे. ज्याच्या विहिरीमध्ये ग्रीष्मकाली पाणी असेल तो स्वर्गास जातो; त्याला कधीही नरकाचे दर्शन होत नाही ५७,५८. हे द्विजश्रेष्ठहो, विहिरीमध्ये एक दिवसही जरी पाणी असले तर ते त्याच्या पूर्वीच्या व पुढच्या सात सात कुलाचा उद्धार करिते ५९. हे द्विजहो, पितृकुलातील सात आणि मातृकुलातील सात असे चौदा पुरुष चतुर्दशकुले होत असे समजावे. आता, श्वशुर कुल सागतो ऐका ६०. पित्याच्या पुढील वीस व मातेच्या पुढील वीस पिढ्या आणि पिता, माता, तसेच, भार्या, तिची माता, पिता आणि मातामह ह्यांच्या कुलातील प्रत्येकी पाचपाच पुरुष व मातेच्या मातामहाचे पितृकुल आणि मातृकुल ह्यांपैकी प्रत्येकी पाचपांच पुरुष, गुरूच्या पितृकुलातील पाच आणि मातृकुलातील पाच पुरुष, आचार्यांच्या कुलातील दोन, राजकुलातील दहा आणि राजाच्या मातामहकुलातील पाच, ह्याप्रमाणे हे द्विजश्रेष्ठहो, आपल्याशीसमवर्तमान एकशे एक कुले होत. ह्याचा उद्धार सर्वसंपन्न आहे. आपणास मुक्ति मिळण्यासाठी तीर्थावर देवार्चन करावे. समुद्रकाठी देवपूजन केल्यास दहा कुलाचा उद्धार होतो ६१—६५ अथवा शंभर कुलाचाही उद्धार होतो. हे द्विज, आता अपणास वीस कुले सागतो, पिता, माता आणि पित्याचे मातामहकुल ह्यातील प्रत्येकी पाचपाच, मातेच्या मातामहकुलातील दोन, गुरूच्या वंशातील दोन, आपण एक आणि शत्रुपक्षाचे एक, ह्याप्रमाणे क्रमाने ही एकवीस कुले होत. जल हे सर्व स्थावरजंगमात्मक त्रैलोक्य आहे. जलावाचून लोकामध्ये केव्हाही कोणाचेही जीवन चालत नाही, जेवढ्या जलामध्ये उत्कृष्ट प्रकारचे पुष्पखंड पडेल तेवढ्या जलातील परमाणूंइतक्या वर्षपर्यंत (पुष्पखंड टाकणारा) मनुष्य स्वर्गामध्ये वास करून अंती ब्रह्मपद पावतो. सूर्याची किरणे न पडणारे जल नित्य होय. ह्यास्तव, त्याच्या काठी गृह अथवा देवमंदिर (त्याजवर पड-

रस्थ्युतं यद्वै तत्तोयं तु विनिन्दितम् । चन्द्ररश्मिविहीनं यत्तामृतत्वाय कल्पते ७१ तस्माद्दशगुणं कुण्डं तस्माद्दशगुणं ह्रदे । देवानां स्थापनं कुर्यादविमुक्तफलं शुभम् ७२ सुस्थितं दुःस्थितं वापि शिवलिङ्गं न चालयेत् । चालनाद्धीरव याति न स्वर्गं न च स्वर्गभाक् ७३ उच्छ्रयनगरग्रामे स्थानत्यागे च विप्लवे । पुनः संस्थानधर्मेण स्थापयेदविचारयन् ७४ बाहुदन्तादिप्रतिमा विष्णोश्चान्यस्य सत्तमाः । न चालयेत्स्थापिते च विप्रवृक्षं न चालयेत् ७५ केशवं हरिवृक्षं च मधूकं किंशुकं तथा । नाकाले स्थापयेज्जातु चालनाद्ब्रह्महा भवेत् ७६ देवालयस्य पुरतः कुर्यात्पुष्करिणीं द्विजाः । ब्राह्मणानां समाजे च राजद्वारे च पथे ७७ देवार्थे ब्राह्मणार्थे च सुखं कुर्याच्च सर्वतः । पश्चिमे पुष्टिकामं तु उत्तरे सर्वकामदम् ७८ याम्ये स्वार्थं न कुर्वीत कोणे तु नरकं भवेत् । मुखं प्रकल्पयेन्मध्ये केचिदुत्तरलङ्घनम् ७९ कुर्यादक्षिणपूर्वे तु अर्कहस्तप्रमाणतः । तडागे तु फलं हस्त हस्तिकं ह्रासयेत्क्रमात् ८० तृप्त्यै हस्तं नलिन्यादावतो हीनं न कारयेत् । गतंतृण कलाहस्त तडागेऽत्र प्रचक्ष्यते ८१ हीने हीनतरं कुर्याद्धस्तमानेन ह्रासयेत् । यूपस्तथा खादिर एव कार्यः श्रीपर्णिकाधात्रिसमुद्भवश्च । मानस्तथा षोडशहस्तसम्मितो रत्नादिभिर्भास्वर एष योजितैः ८२ आनाहभागे च भवेच्च तस्य विंशाङ्गुलो द्विगुणो

णाऱ्या सूर्यप्रकाशास प्रतिबंध होईल ह्मणून) बांधूं नये. ज्यावर चंद्रकिरण पडणार नाहींत ते जल मोक्षदायक होत नाहीं ६६--७१. (इतर जलावर चंद्रसूर्यकिरण पडले असता जे फल मिळते) त्याहून कुंडातील जलावर ते पडले असता दसपट आणि डोहातील जलावर पडले असता त्याऱ्याही दसपट फल प्राप्त होतें. देवाची स्थापना केली असता मोक्षरूपी शुभ फलाची प्राप्ति होते ७२. शिवलिंग चागल्या अथवा वाईट स्थितीत जरी असले तरी ते हालवूं नये. कारण, ते हालविलें असता स्वर्गप्राप्ति होत नाहीं. इतकेच नव्हे तर तसे करणारा मनुष्य स्वर्गामध्ये असला तरी रौरवनरकात जातो ७३. पण देशाचा अथवा गावाचा उच्छेद झाला असून स्थानत्याग करावा लागला अथवा संकटे ओढवली तर पुनः प्रतिष्ठा करण्याऱ्या विधीस अनुसरून निःशंकपणें स्थापना करावी ७४. हे साधुवर्यहो, श्रीविष्णु अथवा इतर देवता ह्याचे बाहु, दंत इत्यादि अवयवाची प्रतिमा आणि एकवार स्थापन केलेला वृक्ष हीं हालवूं नयेत ७५. श्रीविष्णु, ज्याची देवता विष्णु आहे असा वृक्ष, मोहा आणि पळस ह्याची स्थापना अकाली करूं नये. तसेंच, त्यांस (हालवूंही नये. कारण,) हालविणारा मनुष्य ब्रह्मघातक होतो ७६. हे द्विजहो, देवालयाच्या पुढे, ब्राह्मणाचा समुदाय वास करीत असेल तेथें, राजद्वारामध्ये आणि चव्हाट्यावर पुष्करिणी (एक प्रकारच्या विहिरी) कराव्या ७७. देव आणि ब्राह्मण ह्यांच्यासाठी त्या वाटतील तेथे खुशाल कराव्या. पश्चिमदिशेस केलेली पुष्करिणी पुष्टिदायक, उत्तरेस सर्वांचा मनोरथ पूर्ण करणारी, दक्षिणेस आपले (कर्त्याचे) मनोरथ पूर्ण करणारी आणि आग्नेयादि कोणास केली असता नरकप्रद होते. तडागाच्या मध्यभागीं त्याचे तोंड करावे, उत्तरदिशा सोडून इतरत्र तोंड करावे असे कित्येकाचे मत आहे ७८, ७९. आग्नेयीस बारा हात प्रमाणाचे तडागाचे तोंड केले असता ते फलदायक होते. पूर्वी जे तडागाचे इतर भेद सांगितले आहेत त्याच्या मुखाच्या प्रमाणांत क्रमानें उत्तरोत्तर एक एक हात (देवतादिकाच्या संतोषार्थ) कमी करावा. नलिनीप्रभृति तडागभेदामध्यें ह्याहून अधिक हात कमी करूं नयेत. या तडागाच्या खळग्यामध्यें सोळा हातपर्यंत गवत असावे असे सांगितलेलें आहे. कमी प्रमाणाऱ्या तडागामध्यें एक एक हात अशा मानाने ते कमी करून लावावे. तडागावर कराव्याचा स्तंभ खैर, कुंभा अथवा आवळी ह्या वृक्षाचा असावा, त्याचे प्रमाण सोळा हात असावें आणि

मध्यगं च ८३ एवविधश्चैव तडागयूपो माने तथा षोडशहस्तसमितः ८४ कूपे च यूपोऽप्यथ हस्तमात्रस्ततश्चतुर्हस्तमित प्रकीर्तितः । आरामयोगेऽप्यथ मण्डपे च कार्यश्चतुर्हस्तमितोऽथ यूप ८५ संपूर्णमाने कथित प्रमाणं हीने तु हीन प्रवदन्ति तज्ज्ञाः । हस्तद्वयं प्रापितव्यस्तडागो हस्तं सार्धं पुष्करिण्यां प्रदेयः ८६ प्रादेशं वै हस्तमान कूपकूपस्य रोपतः । न कुर्याज्जलमग्नं च यूपं सर्वत्र सत्तमाः ८७ तडागे चापि आरामे स्थापयेच्च जलोपरि । हस्तमर्धं तदर्धं स्यान्मानेनानेन दापयेत् ८८ वाप्यां गतें पुष्करिण्यां प्रकुर्याज्जलसंमितम् । यावत्तोलीगतरेणुसदृग्घसल्यागणो नो जरतामुपैति ८९ तावत्सुरेशः सुरलोकवासी प्रासादकृज्जातु न जायते हि । किं वा बाच्यः पुष्करिण्याः प्रभावः कर्ता यः स्याद्दारुणाद्ब्रह्मलोकात् ९० यावत्कालो बाहुमात्रोद्धृता स्याद्दृष्टिर्यस्मात्रा निवर्तेत्कदाचित् । लक्षैकमारामममयोत्तमः स्यान्मध्यं तदर्धं च कनिष्ठमाः ९१ तदर्धं वा स्यात्प्रशस्त तदन्यन्न स्याच्छस्त मुनयो वै वदन्ति । विनार्जुनैर्बदरैः शैलुकैश्च हीन कुर्याच्छानलैः पातिलैश्च ९२ [५२६] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे पूर्तनिर्णयो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

सूत उवाच ॥ शोधयेत्प्रथम भूमिं मितां कृत्वा ततो द्विजाः । दशहस्तेन दण्डेन पञ्चहस्तेन

तो त्यावर लावलेल्या रत्नादिकाच्या योगाने शोभायमान झालेला असावा ८०–८२. ज्या ठिकाणी रत्नादिकांचे बंधन करावयाचे त्या स्तंभभागाचे प्रमाण बारा अंगुले असावें. त्याचा मध्यभाग त्याच्या दुप्पट असावा ८३. ह्याप्रमाणें तडागावरही सोळा हात प्रमाणाचा स्तंभ करावा. कूपावरील स्तंभ एक हात अथवा चार हात प्रमाणाचा करावा. पण त्या कूपास जोडून उद्यान करावयाचे असल्यास अथवा मंडप करावयाचा असल्यासच तो स्तंभ चार हात प्रमाणाचा असावा असें समजावें ८४, ८५. तडागादिकांचे जे पूर्ण प्रमाण सांगितले आहे ते बरोबर असेल तरच हे स्तंभांचें प्रमाण स्वीकारावे; ते कमी असेल तर स्तंभांचेही प्रमाण कमी करावे असे तज्ज्ञ लोकांनी सांगितले आहे. तडागावर लावण्याचा स्तंभ दोन हात, पुष्करिणीवरील दीड हात आणि कूपावरील स्तंभ ज्या हाताच्या प्रमाणाने घेतला असेल त्या हाताचा प्रदेशमात्र (टीचभर) जमिनांत पुरावा. हे साधुवर्यहो, स्तंभ पाण्यात बुडून जाईल असे मात्र करूं नये ८६,८७. तडाग आणि उद्यान ह्यांतील यूप क्रमाने अर्धा हात आणि पाव हात तरी जलाच्या वर राहील अशा मानानें बसवावा. वापी, डबकी आणि पुष्करिणी ह्यांतील स्तंभ पाण्याच्या बरोबर राहील इतका करावा. देवमंदिर बांधणारा मनुष्य त्या मंदिरास केलेल्या राजमार्गावरील परमाणुसमुदायाची संख्या जोंवर अजीबात नष्ट झाली नाही तोंवर पुनः जन्म पावत नसून देवलोकामध्ये वास करून देवाधिपति होऊन रहातो. जिच्या कर्त्यास वरुणलोकाची अथवा ब्रह्मलोकाची प्राप्ति होते त्या पुष्करिणीचा प्रभाव काय सांगावा ? ती साधारण दोन हात खोदलेली का होईना, जोंवर दृष्टिगोचर होण्यासारखी असेल तोंवर तिच्या कर्त्याची (वरुणादि लोकापासून) केव्हाहि निवृत्ति होत नाहीं. एक लक्ष हात प्रमाण असणारें उद्यान उत्तम, त्याच्या अर्धे प्रमाण असणारे मध्यम आणि त्याजहूनही अर्ध्या प्रमाणाचे कनिष्ठ होय. हीं उद्याने प्रशस्त असून ह्याहून कमी प्रमाणाचे उद्यान कनिष्ठ होय असे मुनींनी सांगितलें आहे. अर्जुन, बोर आणि शैलुक, शानल आणि पातिलसंज्ञक वृक्ष उद्यानामध्यें लावू नयेत ८८–९२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील पहिल्या भागांपैकीं पूर्तनिर्णय ह्या नांवाचा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥

सूत म्हणतात:—हे द्विजहो, प्रासाद वगैरे करण्याच्या वेळी दहा अगर पांच हाताची काठी

वा पुनः १ वाहयेत्सदा वृषभैस्तडागार्थेऽपि भूमिकाम् । देवागारस्य या भूमिः श्वेतैश्च वृषभैरपि २ या भूमिर्ग्रहयागार्थे तां न वाहैरपि स्पृशेत् । आरामार्थे कृष्णवृषैः कूपार्थं खननैरपि ३ वाहयेत्त्रिदिनं विप्रा पञ्चव्रीहींश्च वापयेत् । देवपक्षे समगुणमारामकरणे तथा ४ मुद्गमाषौ धान्यतिलाः श्यामाकश्चेति पञ्चमः । मसूरश्च कलायश्च सप्तव्रीहिगणः स्मृतः ५ सर्षपश्च कलायश्च मुद्गो माषश्चतुर्थकम् । व्रीहित्रयं माषमुद्गौ श्यामाकाश्च मतो गण ६ सुवर्णा मृत्तिका ग्राह्या वर्णानामनुपूर्वशः ७ अरत्निमात्र विज्ञेयं प्रशस्त यद्विदीपकम् । ऊर्णासूत्रमयीं वर्तिं कृत्वा कुर्याच्चतुष्टयम् ८ क्षीरदारु गर्तयुत द्वादशाङ्गुलमेव च । उज्वालयेत्तिलतैलेन तथा केशरजेन वा ९ पूर्वदिक्प्रवणे सिद्धिः पश्चिमाशागतिः शुभा । मरणं दक्षिणायां च हानिः स्यादुत्तरे स्थिते १० कोणे विपत्कर विद्यात्तथा चैवाप्यदिग्गते । नारसिंहेन मनुना चाग्निं प्रज्वाल्य दापयेत् ११ मासे घटे तथा मीने कुर्याद्भूमिपरिग्रहम् । सत्रयेत्कीलयेत्पश्चान्महामाने द्विजोत्तमा १२ ततो वास्तुबलिं दद्यात्खनित्र परिपूजयेत् । आब्रह्मन्निति मन्त्रेण खनयेन्मध्यदेशतः १३ आज्येन मधुयुक्तेन गात्रमेक प्रलेपयेत् । स्वर्णतोयैस्तथा रत्नतोयैः स्नात्वा प्रलेपयेत् १४ ईशानाभिमुखेनैव कूपपक्षे विदुर्बुधाः । अकृत्वा वास्तुयाग च यस्तडाग समुत्सृजेत् १५

करून प्रथम भूमी मोजावी आणि नंतर ती शुद्ध करावी १. तडागार्थ जमिनीवर अथवा मंदिरार्थ जमिनीवर योजलेली जमीन बैलाकडून नांगरावी. देवमंदिरासाठी भूमि, श्वेतवर्ण वृषभाकडून नांगरावी जी भूमि ग्रहयज्ञासाठी असेल तिजला तर अश्वाचा स्पर्शही होऊ देऊ नये. उद्यानाकरिता आणि कूपाकरिता करावयाची जमीन तीन दिवसपर्यंत कृष्णवर्ण वृषभ लावून नांगरावी आणि हे विप्रहो, कुदळी वगैरे जी खणण्याची साधने ओहत त्याच्या योगाने ती खणावी. नंतर तिजमध्ये पंचव्रीहिसंज्ञक धान्ये पेरावी. देवपक्षी अथवा उद्यान करावयाचे असेल तर सप्तव्रीहि पेरणे प्रशस्त होय. मूग, उडीद, घणे, तीळ आणि साव हे पंचव्रीहि होत. ह्यातच, मसूर आणि वाटाणे हे मिळविले असता सप्तव्रीहि होतात २–५. मटकी, वाटाणे, मूग आणि उडीद हे चतुर्व्रीहि होत. उडीद, मूग आणि साव हा व्रीहित्रयाचा वर्ग होय. ब्राह्मणादिक वर्णास अनुक्रमे सुवर्णादिकासारख्या वर्णाची भूमि असणे प्रशस्त होय. बारा अंगुळे प्रमाणाचे काष्ठ दीपिका करण्यास योग्य होय. त्याला लोकर अथवा सूत ही गुंडाळून त्याची वात करावी. ह्या वाती चार असाव्या ६–८. वडाचे लाकूड, आत खळगा असलेले, बारा अंगुळे घेऊन त्यामध्ये ह्या वातीचा दिवा तिळाचे अथवा केशराचे तेल घालून लावावा त्याची ज्योत पूर्वेकडे वळेल तर सिद्धि मिळेल, पश्चिमेकडे वळल्यास उत्कृष्ट प्रकारची गति मिळेल दक्षिणेकडे वळल्यास मरण येईल आणि उत्तरेकडे वळल्यास हानि होईल असे समजावे ९,१०. तसेच, ती आग्नेयादि कोणाकडे वळल्यास अथवा कोण याही दिशेकडे न वळल्यास दीप विपत्तिकारक होतो. नारसिंहमंत्र ह्मणून अग्नि प्रदीप्त करावा आणि नंतर त्यावर हा दीप लावून ठेवावा ११. कुंभ अथवा मीन महिन्यामध्ये भूमीचा स्वीकार करावा. नंतर, तिचे दोऱ्याने माप घेऊन हे द्विजश्रेष्ठहो, जर प्रमाण मोठे असेल तर तीमध्ये लाकडाच्या कुण्या माराव्या १२. पुढे वास्तुपुरुषास बलिदान करून खणण्याच्या हत्याराची पूजा करावी आणि मध्यभागापासून आब्रह्मन् हा मंत्र ह्मणून खणण्यास आरंभ करावा. घृत आणि मध ह्यांचे मिश्रण करून त्याने जमिनीचा एक भाग सारवावा व त्याजवर सुवर्ण आणि रत्न ह्यांचे पाणी ओतून तो लिंपावा १३,१४. कूप (आड) खणावयाचा असेल तर ईशान्येपासूनच खणण्यास आरंभ करावा असे विद्वानांचे मत आहे. वास्तुयाग केल्यावाचून जो मनुष्य तडागादिकाचा उत्सर्ग करील

तस्य वैवस्वतो राजा धर्मस्यार्धं निकृन्तति । प्रासादे च तथाराम महाकूप तथैव च १६ गृहारम्भे च विप्रेन्द्रा दद्याद्वास्तुबलिं तत. । शालैश्च खादिरैश्चैव पलाशै कंशरस्य च १७ बिल्वस्य बकुलस्यैव कलौ यूपः प्रशस्यते । सुनाचकोदरकृत तत्पार्श्वे तु ध्वजद्वयम् १८ सर्पाकारस्तडागे च कूपे कुम्भाकृतिर्भवेत् । आराम पद्मपुष्पाभ छत्राकार तु मण्डले१९ कुर्यात्सुनाकृतिं सतौ विष्णुगेहे गदाकृतिः । अश्वाकार चाश्वमेधे नरमेधे नराकृतिः २० गोयागे च वृषाकार गृहयागे ध्वजाकृतिः २१ चक्राकारं लक्षहोमे कोटिहोमे हलाकृति । नक्षत्रेषु तथा मूल शस्यते द्रुमरोपणे २२ एव शस्योदितां भूमिं शुद्धां पूर्वैश्चवाञ्छिताम् । परिगृह्य यजेद्देव वनपाल शिखिध्वजम् २३ सोमं च नागराजान ततो बीज सुशोधयेत् । आनयेद्धारयेत्पश्चाद्दोहनान्ते तापयेत् २४ दिनद्वयान्तरे चैव मन्त्रैश्च परिमन्त्रयेत् । गर्भाधान तत. कुर्याद्विष्णुमन्त्रं जपस्त्रिधा २५ एवमभ्येति मन्त्रेण त्रिधा जप्त्वाऽपि मार्जयेत् । देहि मेति च मन्त्रेण सप्तोक्ष्य दश वारिणा २६ इत्थं गृहीत मनुना पञ्चधा परिमन्त्रितम् । त्र्यम्बकेनेति मन्त्रेण बीजमारोपयेत्ततः २७ भार्याऽप्यृतुमती स्नात्वा पञ्चमेऽहनि सत्तपाः । उत्सङ्गे स्थापयित्वा च चुम्बयेन्मन्त्रयेत्ततः २८ एव वृक्षस्य सस्कारमर्भेऽपि त्वनुगच्छति । तेन पुत्रत्वमाप्नोति नात्र कार्या विचारणा २९ तुलस्या बीजमादाय वैष्णवर्क्षे द्विजोऽहनि । खानयेदपि गोमूत्रबिन्दुतोयै. प्रसेचयेत् ३० एवं

त्याच्या धर्माचा अर्धा भाग यम कापून घेतो. ह्यास्तव, हे द्विजश्रेष्ठहो, देवमंदिर बांधणे, उद्याने करणे, मोठमोठे कूप खणणें आणि गृहाचा आरंभ करणे ह्या प्रसंगी प्रथम वास्तुबलीचें दान करावे. साग, खैर, पळस, नागकेशर, बेल आणि बकुल ह्या वृक्षांचा स्तंभ करणे कलियुगात प्रशस्त होय. मध्यभागी पक्ष्यांच्या वज्रस्थानांतील चक्राप्रमाणे आकार असलेले दोन ध्वज त्या यूपाच्या दोहो बाजूस लावावे. तडागावर हे चक्र सर्पाच्या आकाराचे, कूपावर कुंभाच्या आकाराचे, उद्यानामध्ये कमलपुष्पाच्या आकाराचे, मंडलामध्ये छत्राच्या आकाराचे, सेतूवर पूर्वोक्त वज्रस्थानांतील चक्राच्या आकाराचें, विष्णूच्या मंदिरामध्ये गदेच्या आकाराचे, अश्वमेधामध्ये अश्वाच्या, नरमेधामध्ये मनुष्याच्या, गोयागामध्ये वृषभाच्या आणि गृहयज्ञामध्ये ध्वजाच्या आकाराचे हे चक्र असावे. लक्षहोम करावयाचा असेल तर चक्राच्या आकाराचे आणि कोटिहोम करावयाचा असेल तर नागराजाच्या आकाराचे हे सर्व चक्र असावे. नक्षत्रामध्ये झाडे लावण्यास मूलनक्षत्र प्रशस्त होय. ह्याप्रमाणे धान्य पेरण्यास सांगितलेल्या, शुद्ध आणि पूर्वीकडच्या बाजूस सखल असलेल्या जमिनीचा स्वीकार करून नंतर, वनपालक देव कार्तिकेय, सोम आणि सर्पराज ह्यांचे आराधन करावे आणि नंतर बीज शुद्ध करावे. प्रथम बीज आणावे आणि नंतर त्यास धार देऊन आर्द्रानक्षत्राच्या उन्हात ते तापवावे. ह्याप्रमाणे दोन दिवस झाल्यानंतर मंत्राने ते अभिमंत्रित करावे. तदनंतर, तीन वेळ विष्णुमंत्राचा जप करून त्यास गर्भाधानसंस्कार करावा. त्याचप्रमाणे एवमस्य ह्या मंत्राचा तीन वेळ जप करून त्याजवर मार्जन करावे व देहि मेधां हा मंत्र दहा वेळ म्हणून त्याजवर जलाने प्रोक्षण करावे १९-२९. ह्याप्रमाणे मंत्र म्हणून पांच प्रकारे अभिमंत्रित केलेले ते बीज त्र्यंबकेन ह्या मंत्राने पेरावे २७. हे साधुवर्यहो, ऋतुमती असलेल्या भार्येच्या पतीने पांचवे दिवशी स्नान करून ते बीज मांडीवर घेऊन त्याचें चुंबन घ्यावें व विधि झाल्यानंतर पुनः त्याचे अभिमंत्रण करावे २८. ह्याप्रमाणे वृक्षाच्या संस्काराला जो अनुसरेल त्यास पुत्रप्राप्ति होईल ह्याविषयी विचार करावयास नको २९. ब्राह्मणाने ज्याची देवता विष्णु आहे अशा नक्षत्रावर तुलसीचे बी घेऊन जमीन खणावी व गोमूत्राचे बिंदु आणि पाणी ह्यांचा तिजवर सेक करावा ३०. व ते बीज एकरात्र शुभ्रवर्ण बुधामध्ये घालून ठेवून नंतर भूमीत

तु स्वर्गमाप्नोति सितकुम्भे निपातयेत् । एकरात्र परिस्थाप्य तत आरोपयेद्भुवि ३१ अविधौ कूपवाप्यादौ खननेऽपि च ये क्वचित् । कुर्वन्ति सहकारादिरोपणं ये नराधमाः ३२ लभन्ते न फलं तेषामिह चाम्येत्यधोगतिम् । नदीतीरे श्मशाने च स्वगृहस्य च दक्षिणे ३३ तुलसीरोपणं कृत्वा याति कर्ता यमालयम् । पत्रपुष्पफलानां च रजोरेणुसमागमाः ३४ पोषयन्ति च पितरं प्रत्यहं प्रतिकर्मणि । यस्तु वृक्षं प्रकुरुते छायापुष्पफलोपगम् ३५ पथि देवालये चापि पापात्तारयते पितॄन् । कीर्तिश्च मानुषे लोके प्रत्यभ्येति शुभं फलम् ३६ अतीतानागतांश्चातः पितॄणां स्वर्गतो द्विजाः । तारयेद्वृक्षरोपी च तस्माद्वृक्षं प्ररोपयेत् ३७ अपुत्रस्य पुत्रत्वं पादपा एव कुर्वते । यत्नेनापि च विप्रेन्द्रा अश्वत्थारोपणं कुरु ३८ शतैः पुत्रसहस्राणामेक एव विशिष्यते । कामेन रोपयेद्विप्रा एकद्वित्रिप्रसङ्गया ३९ मुक्तिहेतुः सहस्राणां लक्षकोटीनि यानि च । धनी चाश्वत्थवृक्षे च अशोकः शोकनाशनः ४० श्लक्षो भार्यामदश्चैव बिल्व आयुःप्रदः स्मृतः । धनप्रदो जम्बुवृक्षो ब्रह्मदः प्लक्षवृक्षकः ४१ तिन्दुक कुलवृद्धिं स्याद्दाडिमी कामिनीप्रदा । बकुलो बन्धुलश्चैव पापहा बलबुद्धिमान् ४२ स्वर्गप्रदा धातकी स्याद्वटो मोक्षप्रदायकः । सहकारः कामप्रदो गुवाकः सिद्धिमादिशेत् ४३ सर्वंशस्यं चलदले मधुके चार्जुने तथा । कदम्बे विपुला कीर्तिस्तिन्तिडी धर्मदूषकः ४४ जीवन्ती रोगशान्तिः स्यात्करीरः शत्रुमर्दनः । धनप्रदश्चैव वटो वटः श्वेतवटस्तथा ४५ पनसे मन्दबुद्धिः स्यात्कलिवृक्षः श्रियं हरेत् ।

पेरावे. असे केलें असता स्वर्गप्राप्ति होते ३१. अशास्त्रीय रीतीने कूप अथवा वापी इत्यादि खणून त्याठिकाणी जे नराधम आम्रवृक्षादिकांची लागवड करितील त्यास इहलोकी त्याचे फल मिळावयाचे नाहीं; इतकेच नव्हे तर ते अधोगतीसही जातील. नदीच्या तीरावर, स्मशानामध्ये आणि आपल्या गृहाच्या दक्षिणदिशेस तुळशीची लागवड करणारा मनुष्य यममंदिरास जातो. पत्रे, पुष्पे आणि फळे ह्यावरील रजाचा समागम प्रतिदिवशी आणि प्रत्येक कर्मामध्ये पितरास संतुष्ट करितो. जो मनुष्य वृक्ष छाया, पुष्प, फलें ह्यांनी युक्त होईल अशा रीतीने मार्गामध्ये अथवा देवालयात लावतो तो आपल्या पितराचा पातकापासून उद्धार करितो व मनुष्यलोकामध्ये शुभ फल व कीर्ति ही मिळवितो ३२,३६. हे द्विजहो, वृक्षाची लागवड करणारा मनुष्य स्वतः स्वर्गास जाऊन पुढे होऊन गेलेल्या आणि वर्तमानकालीं असलेल्या पितराचा उद्धार करितो. ह्यास्तव, वृक्षाची लागवड करावी ३७. वृक्ष हेच ज्यास पुत्र नसेल त्यास पुत्रसंपन्न करितात. ह्यास्तव, हे विप्रेंद्रहो, प्रयत्न करावा लागला तरीही अश्वत्थाची लागवड करावी. सामान्य पुत्र लक्षावधि असत्यापेक्षा सर्वगुणसंपन्न एकच असणें उत्कृष्ट होय (व अश्वत्थाची लागवड केल्याच्या योगाने अशा प्रकारचा पुत्र प्राप्त होतो.) ह्यास्तव, हे विप्रश्रेष्ठहो, आपल्या इच्छेप्रमाणे एक, दोन अथवा तीन अश्वत्थ लावावे ३८,३९. हजारों, लक्षावधि अथवा कोट्यावधि अश्वत्थाची लागवड करणे हें मुक्तीस कारणीभूत आहे. अश्वत्थवृक्षाच्या योगाने द्रव्याची प्राप्ति होते. अशोक शोकाचा नाश करितो. पायरी स्त्रीदायक असून बेल आयुष्य देणारा आहे. जांभळ द्रव्यदायक आणि लाखा पिंपरी ब्रह्मप्रद आहे ४०,४१. टेंबुरणीचा वृक्ष कुलाची अभिवृद्धि करणारा, डाळिंबाचा स्त्री देणारा आणि बकुलाचा व अशोकाचा वृक्ष पापनाशक व बल आणि वृद्धि देणारा आहे ४२. धायटी स्वर्गदायक, वट मोक्ष देणारा, सुपारी आम्रवृक्ष मनोरथ पूर्ण करणारा व सुपारीचा वृक्ष सिद्धि देणारा आहे. अश्वत्थ, मोहा आणि अर्जुनवृक्ष ह्यांची लागवड केली असता सर्व प्रकारच्या धान्याची प्राप्ति होते. कदंब (कळंब) वृक्षाच्या योगानें विपुल कीर्ति मिळते. चिंचेचा वृक्ष धर्म दूषित करणारा आहे. हरणवेल ही रोगशांति करणारी असून

कलिवृक्षं च शाकोटमुदारावर्तकं तथा ४६ पर्कटीं च तशा नीपं रोपणात्सन्ततिक्षयः । शिंशपां चार्जुनं चैव जयन्ती हयमारकान् ४७ श्रीवृक्षं किंशुकं चैव रोपणात्स्वर्गमादिशेत्। न पूर्वं रोपये-ज्ज्ञातु समिधं कण्टकिद्रुमम् ४८ कुशं पद्मं जलजानां रोपणाद्दुर्गतिं व्रजेत् । मन्दारे कुलहानिः स्याच्छाल्मले शुक्रबुद्धिमान् ४९ निम्बे पशुविनाशः स्याच्छत्राके कुलपांसनः । उत्पन्ने कुल-पातः स्यात्पशुरेव क्षयो भवेत् ५० शम्बुबुद्धिः काकनासे बलापूगे हतिः श्रियः । विना क्रतु-विरुद्धं च न शुभं द्विजसत्तमाः ५१ क्रतौ हि स्याद्विरुद्धं च ग्राम्यायान्नरकाकृतिम् । सहस्कार-सहस्रात्तु वरिष्ठं धातकीद्रुमम् ५२ तस्माच्चैव सहस्राद्धि पाटलैका विशिष्यते । पाटलानां शतं पश्चा-दंकरक्तवट भवेत् ५३ वटानां द्विसहस्राणि पञ्चक नागकेसरम् । तस्माद्वरिष्ठः श्रीवृक्षो जम्बु-वृक्षः प्रशस्यते ५४ तस्माद्धि भवतो ज्ञेय श्रीपर्णीवृक्ष उत्तमः । तिन्दुकस्य त्रयश्चैव जम्बुवृक्षस्य पञ्चकम् ५५ कदम्बार्जुनवृक्षस्य नारिकेरस्य च त्रयम् । एवं कृत्वा स धर्मात्मा विन्दते कीदृशं फलम् ५६ कल्पकोटिसहस्राणि कल्पकोटिशतानि च । स्वर्गभोग समश्नाति विधिवद्द्रु-मरोपणे ५७ जन्मत्रयादिक पाप विनाश्य स्वर्गमाविशेत् । शतरोपी च ब्रह्मत्व विष्णुत्वं च सहस्रके ५८ तुलसीरोपणाच्चैव आधिव्याधियुतो भवेत् । वैशाखे कीर्तिमाप्नोति ज्येष्ठे तु मरण भवेत् ५९ आषाढे कीर्तिमाप्नोति श्रावणे परमां गतिम् । भाद्रे धनागमश्चैव

नागकेशराचा वृक्ष शत्रूंची खोड जिरविणारा व वट अर्थात् श्वेतवर्ण वटवृक्ष धनप्रद आहे ४३-४५. फणसाच्या योगाने बुद्धि मंद होते व बिब्याचा वृक्ष लक्ष्मीचा नाश करितो. बिल्वा, वच्चा, उदारा-वर्तकसंज्ञक वृक्ष, पिंपरी आणि कळंब ह्यांची लागवड केली असता वंशक्षय होतो. शिसवा, अर्जु-नसादडा, थोरेएराण, घायमारी, बेल आणि पळस ह्याची लागवड केली असता स्वर्गप्राप्ति होते. प्रथम समिधोपयोगी आणि काटेरी वृक्षाची लागवड करूं नये ४६–४८. दर्भ, कमले आणि इतरही जलामध्ये उत्पन्न होणाऱ्या वनस्पति ह्यांचा लागवड करणारा दुर्गति पावतो. मंदारवृक्षाच्या योगाने कुलक्षय होतो व सावरीची लागवड करणारा वीर्य आणि बुद्धि ह्यांनीं संपन्न होतो ४९. निंबवृक्षाच्या योगानें पशूंचा नाश होतो. रामना लावणारा मनुष्य कुल दूषित करणारा होतो. ती उगवून येताच कुल हीन दशेस पोहोंचते आणि पशूचा क्षय होतो ५०. कावळीच्या योगानें शत्रूची अभिवृद्धि होते व चिकणानामक वनस्पतीचा समूह लाविला असता लक्ष्मीचा नाश होतो. हे द्विज-श्रेष्ठहो, याग केल्यावाचून ही लागवड करणे विरुद्ध व अशुभकारक आहे. आणि त्या यागा-मध्येही जर शास्त्राविरुद्ध गोष्ट घडली तर नरकप्राप्ति होते. एक हजार सुगंधी आम्रवृक्षापेक्षा धायटीचे दोन तरु वरिष्ठ होत ५१,५२. धायटीच्या हजार वृक्षाहून एका सुपारीच्या वृक्षाची योग्यता अधिक आहे. सुपारीच्या शंभर वृक्षाहून एका आरक्तवर्ण वटवृक्षाची योग्यता अधिक ५३. दोन हजार वटवृक्षाची योग्यता नागकेशराच्या पाच वृक्षास आहे. त्याहूनही बिल्ववृक्ष श्रेष्ठ असून जंबुवृक्षही प्रशस्त आहे ५४. त्याहूनही कुंभी उत्तम असून टेंबुरणीचे तीन वृक्ष आणि पाच जंबुवृक्ष ह्याची योग्यता सारखीच आहे. कदंब आणि अर्जुन ह्याचा एकेक वृक्ष आणि नारळीचे तीन वृक्ष हे योग्यतेनें तुल्यच होत. असो. ह्याप्रमाणे वृक्षाची लागवड करणाऱ्या धर्मनिष्ठ पुरुषास कोणत्या प्रकारचें फल मिळतें ते सागतों, ऐका ५५,५६. वृक्षाची लागवड यथाशास्त्र केली असता मनुष्यास एक हजार एकशें कोटि कल्पपर्यंत स्वर्गोपभोग मिळतो ५७. तसेच, तो तीनही जन्मांमध्ये केलेल्या पातकाचा नाश होऊन स्वर्गास जातो. शंभर वृक्ष लावणाऱ्यास ब्रह्मपदाची आणि हजार वृक्ष लावणाऱ्यास विष्णुपदाची प्राप्ति होते ५८. चैत्रमासीं तुळशीची लागवड करणारा मानसिक व्यथा आणि रोग ह्यांनीं युक्त

आश्विने कार्तिके क्षय ६० तुलसी त्रिविधा लोके कृते श्वेता प्रशस्यते । किञ्चिच्छेदं च यः कुर्यादश्वत्थस्य वटस्य च ६१ श्रीवृक्षस्य च विप्रेन्द्राः स भवेद्ब्रह्मघातकः । मूलच्छेदेन विप्रेन्द्रा कुलपातो भवेदनु ६२ वृक्षच्छेदी भवेन्मूक आधिव्याधिशतं भवेत् । सायंप्रातश्च घर्मान्ते शीतकाले दिनान्तरे ६३ फलमाषकुलत्थश्च माषो मुद्गास्तिला यवाः । नृत्यगीतपयःकेशफलपुष्पप्रदो भवेत् ६४ अस्थिकीकसकृच्चूर्णं यवचूर्णानि यानि च । गोमांसमुदकं चैव सप्तरात्रं निधापयेत् ६५ तमेकं सर्ववृक्षाणां फलपुष्पादिवृद्धिदम् । रोहिमत्स्यस्य पित्तानि धन्याकं तत्र स्थापयेत् ६६ तेनोदकादिसेकश्च कृतो वै वृद्धिमादिशेत् । तित्तिडीबीजमादाय इक्षुदण्डेन मर्दयेत् ६७ तेनाशोकेन प्रसेकः स्यात्सहकारस्य वृद्धिमान् । नारिकेरोदकं चैव माक्षिकैः सह सेचयेत् ६८ दोहदं सर्ववृक्षाणां पूगमर्दानां विशेषत । दशशिराबीजयुतादम्भिषेकाच्च जीवति ६९ प्राक्प्रसूतेर्गवादीनां छागादिमक्षिषस्य च । जरायुतोयं वृक्षाग्रे स्थापयेदविचारयन् ७० परस्य सहकारस्य फल स्यान्नात्र संशयः । मत्स्यस्य च बिडालस्य यवागूं च समाहरेत् ७१ तत्र मांसैः सर्षपैश्च पूरयेन्मर्दयेत्ततः । गृधाकवृक्षक देव घर्षयेन्मर्दयेत्त्रिभिः ७२ मृतोऽपि जीवयेच्छीघ्रं म्रियमाणोऽपि जीवति । निम्बपत्रं योगपत्रं शतावरिपुनर्नवाम् ७३ क्षीरिकाताम्रकैः पत्रैर्धूमं

होतो, वैशाखामध्ये लागवड करणारा कीर्ति पावतो, ज्येष्ठामध्ये लागवड केली असता मृत्यु येतो, आषाढामध्ये केली असता कीर्ति मिळते, श्रावणामध्ये केली असता उत्कृष्ट प्रकारची गति मिळते, भाद्रपदामध्ये केल्यास धनप्राप्ति होते आणि आश्विन व कार्तिक मासांमध्ये तुळशीची लागवड केल्यास कर्त्याचा नाश होतो. लोकामध्ये तीन प्रकारच्या तुलसी प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी श्वेतवर्ण तुलसी प्रशस्त होय. हे द्विजश्रेष्ठहो, जो मनुष्य अश्वत्थ, वट आणि बिल्ववृक्ष ह्यांचा थोडा सुद्धा छेद करील तो ब्रह्महत्या करणारा होय. हे विप्रेंद्रहो, त्याचे मूल तोडले असता लागलीच कुलक्षय होतो ९९—९२. वृक्षाचा छेद करणारा मनुष्य मुका होतो आणि त्यास शेकडो आधिव्याधि जडतात. ग्रीष्मऋतूमध्ये सायंकाली व प्रातःकाली आणि थंडीच्या दिवसांत दोनप्रहरीं पक्व न झालेल्या कुळथ्या, उडीद, मूग, तीळ, जव, केश, फले, पुष्पे आणि जल ही वृक्षास घालावीं व त्यापुढे नृत्य आणि गायन करावे ९३,९४. शेळ्यान्या अस्थींचें चूर्ण, जवाचे चूर्ण, गोमास आणि जल ही सात दिवस एकत्र करून ठेवावीं (व नंतर ते मिश्रण वृक्षास घालावे). हें सर्वही वृक्षांस फलें आणि पुष्पे देणारें असून त्याची वृद्धि करणारे मुख्य औषध आहे. रोहित (देवमासा) नामक मत्स्याचे पित्त आणि धणे हेही त्यात घालून ठेवावे. ह्या जलाने वृक्षास सेक केला असतां तो वृक्षाची वृद्धि करितो. चिचोके घेऊन ते उसाबरोबर कुटावे. त्याच्या सेकानें अशोकवृक्ष वृद्धिंगत होतो. नारळाचे पाणी आणि मध ह्या दोहोचा आम्रवृक्षावर सेक करावा म्हणजे तो वृद्धि पावतो. सर्वही वृक्ष व विशेषेंकरून सुपारी वगैरे वृक्ष ह्यांचेंही हेच औषध होय. दोडक्याच्या बियांचे पाणी शिंपडल्यासही वृक्षास जीव येतो ९५—९९. गाई, शेळ्या अथवा ह्यशी ह्यांची प्रसूति होण्यापूर्वी पडणारें वारेचे पाणी निःसंशय वृक्षांवर घालावें. ह्याच्या योगाने उत्कृष्ट प्रकारच्या आम्रवृक्षास फल येतें ह्यांत संशय नाहीं. मेष आणि माजर ह्याचा रसा करून त्यामध्ये मास आणि मोहऱ्या घालून त्याचे मर्दन करावे व तो सुपारीच्या झाडास तीन वेळ चोळून लावावा ७०-७२. असें केलें असता तो वृक्ष जरी मेला असला तरीही पुनः जीवंत होतो व मरत असला तरीही जगतो. निंब, योगसंज्ञक वृक्ष, शतावरी, पांढरी वसु, खिरणी आणि तंबाकु ह्याच्या पानाची आम्रवृक्षाच्या मुळास तीन दिवस धुरी दिली असता त्यास कीटकाचा उपद्रव होत नाहीं. (आणि

दद्याद्दिनत्रयम् । सहकारस्य मूलेन कीटरोधो न जायते ७४ ततः प्राधान्यतो वक्ष्ये द्रुमाणां दोहदोऽन्यथा । मत्स्योदकेन सिक्तेन आम्राणां वृद्धिरिष्यते ७५ पक्वान्न रुधिरं चैव दाडिमानां प्रशस्यते । यवोदकं सगोमांस केतकीनां प्रशस्यते ७६ क्षीरकेवलवृद्धिः स्यात्तिन्दुकः करमर्दकः । मांसपूतिवसामज्जाशोकतालं गुवाकके ७७ सपूतिमांसं सघृत नालिकेरस्य रोहितम् । मधुयष्ट्युदकैः सेकात्सामान्येन हित भवेत् ७८ कपित्थबिल्वयोः सेकं गुडतोयेन सेचयेत् । जातीनां मल्लिकानां स कुन्दर न्तिकस्य च ७९ गन्धतोय सितकरं सर्पनिर्मोकधूपकम् । कूर्ममांसमन्नरसं विडङ्गस्य च पुष्पकम् ८० रथ्यावृक्षे प्रतिष्ठाप्य फलवाञ्जायते ततः । पीतसर्पस्य निर्मोकं तगराजगवस्य च ८१ दद्याद्धूप धान्यमध्ये धान्यवृद्धिश्च जायत । मयूरपत्रमादाय च्छागरोमाणि सप्त वै ८२ एरण्डतैलयोगेन दद्याद्धूप निशागमे । हिङ्गुकुसुमसयोगान्मूषिकाणां परिन्यसेत् ८३ करिविष्ठामच्छविष्ठां कृत्तिकायां समाहरत् । निशातोये प्रसेकः स्यात्तथाऽऽर्द्र मूलकं हरेत् ८४ अश्वत्थमूले दशहस्तमात्र क्षेत्रं पवित्रं पुरुषोत्तमस्य । अश्वत्थछायासलिलस्य मध्ये विशेषतो वै त्रिपथेव गङ्गा ८५ बाहुर्विशान्तरे रोपस्सहकार स धर्मवित् । कलाहस्तान्तर धात्री बकुलं वञ्जुल तथा ८६ औपणिकं च पुन्नाग श्रीवृक्षं द्विगुणान्तरे । हस्ते शैलमये चैव उत्तम मानमीरितम् ८७ शैलेष्टकादिरचिते चतुर्हस्ते तु समिते । वाप्यादीनां तु कूपानामेव वृक्षादिकस्य च ८८ श्रीविष्णोर्वृक्षपक्षे च वरुणेष्टं च

झाला असेल तरी तोही नष्ट होतो) ७३,७४ आता वृक्षांचीं मुख्य औषधें दुसऱ्या प्रकारें सागतो. मत्स्याचें पाणी करून त्याचा सेक केला असता आम्रवृक्षाची वाढ होते ७५. पिकलेले आंबे आणि रक्त हीं डाळिंबास घालणें योग्य होय. गोमासमिश्रित जवाचे पाणी केवडयास घालणें प्रशस्त होय. ह्याच्याच योगानें खिरणी, टेंबुरणी आणि करवद हीं जोरावतात. मास, दुर्गंधि, वसा आणि मज्जा ही ताड आणि सुपारी ह्याच्या वृक्षासं उत्तम ७६,७७. दुर्गंधि, मास आणि तूप मिश्र केलेलें रक्त नारळाच्या वृक्षास उत्तम. ज्येष्ठमधाच्या पाण्याचा सेक केला असता तो सामान्यतः सर्वही वृक्षास हितकारक होतो. कवठ आणि बेल ह्यास गुळाच्या पाण्याचा सेक करावा. जाई, मोगरी, पालख आणि दाती ह्याजवर कापुर घातलेल्या गुलाबपाण्याचा सेक करावा व सापाच्या कातीची धुरी द्यावी.. राजमार्गावर लावलेल्या वृक्षावर कासवाचें मास, मातीची पेज आणि वावडिंगाचे फूल हीं मिश्र करून ओतल्यास तो फलयुक्त होतो. तगारी आणि अजगरसंज्ञक वृक्ष ह्यास पीतवर्ण सर्पाच्या कातीची धुरी द्यावी. धान्याच्यामध्येही धूप घातल्यास धान्याची अभिवृद्धि होते. मोराची सात पिसे आणि शेळीचे केश एरंडाच्या तेलात घालून त्यात हिंग आणि कुसुंबा (करडा) हीं घालून रात्रीच्या आरंभीं त्याचा धूप घालावा; ह्मणजे मूषकाचा नाश होतो ७८–८३. हत्ती आणि अस्वल ह्याची विष्ठा कृत्तिका नक्षत्रावर आणून हळदीच्या पाण्यातून तिचा सेक करावा. ह्याच दिवशीं वृक्षांचीं मुळें आणावीं ८४. अश्वत्थाच्या मुळाशीं दहा हातपर्यंत श्रीविष्णूचे पवित्र क्षेत्र असतें. ज्या जलावर अश्वत्थाची छाया विशेषकरून पडली असेल तें जल प्रत्यक्ष भागीरथी होय ८५. धर्मज्ञ मनुष्याने सुगंधि आम्रवृक्ष बीस हाताच्या अंतराने लावावे. तसेंच, आवळी, बकुल आणि अशोक हीं सोळासोळा हाताच्या अंतरावर लावावीं ८६. कुंभ्या, नागचाफा आणि अश्वत्थ ह्यामध्ये ह्याच्या दुप्पट अंतर असावें. वृक्षादिकास पार करावयाचा झाल्यास त्याचे प्रमाण सात हात उत्तम असें सांगितलें आहे. पाषाण आणि विटा ह्या उभयतानी बांधरे मिळून रचल्यास त्याचे प्रमाण चार हात असावें. वापी, कूप इत्यादिकाचे व वृक्षादिकांचेंही प्रमाण असेच

कूपके । गणेशं पूजयेत्कुम्भं दिक्पालांश्च विशेषतः ८९ अग्निकार्यं विना कुर्यात्पयायाच्च सतां गतिम् । श्रुत्वा कृतिं विधानेन अन्येषां वा तथोद्भवम् ९० अन्येषां चैव वृक्षे च तथा च तुलसीवने । कुम्भे वनस्पतिं स्थाप्य पूजयेद्धोमयेत्ततः ९१ वृक्षान्वाऽनेन संस्कृत्य वासोभिरभिवेष्टयेत् । उच्यमानमिदं श्रेयमन्येषां वा तथोद्भवम् ९२ तुलस्याः सहकारस्य ब्रह्मवृक्षस्य चैव हि । अश्वत्थस्य वटस्यैव स्वर्णं ताप्यार्थ वेधयेत् ९३ [६१९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे दशमोऽध्यायः ॥ १० ॥

सूत उवाच ॥ अथ तन्त्रविधिं वक्ष्ये पुराणेष्वपि गीयते । तन्त्रे चैव प्रतिष्ठां च कुर्यात्पुण्यतमेऽहनि १ शतवृक्षक्षुद्रवृक्षे दशद्वादशवृक्षके । दृष्टिमात्रान्तरे सेतौ कूपयागं समुत्सृजेत् २ न कूपमुत्सृजेज्जातु वृक्षयागे कथञ्चन । तुलसीवनयागे तु न चान्यं यागमाचरेत् ३ तडागयागे सेत्वादीन्न चारामे कदाचन । न सेतुर्देवयागं तु तडाग न समुत्सृजेत् ४ तन्त्रे श्राद्धं पृथङ्नास्ति कर्तुर्भेदं पृथग्भवेत् । शिवलिङ्गस्थापने च न चान्यदेवस्थापनम् ५ स्वदेशे वर्जयेत्तन्त्रं स्वतन्त्रेण विधीयते । विपरीते कृते चापि आयुःक्षय इति स्मृतिः ६ तडागे पुष्करिण्यां वा आरामेऽपि द्विजोत्तमाः । मानहीने मानपूर्णे दशहस्ते न दूषणम् ७ द्विसहस्राधिके यत्र तत्प्रतिष्ठां समाच-

---

असावे ८७,८८. वृक्षासबंधी याग करावयाचा झाल्यास श्रीविष्णूचे व कूपासबंधी याग करावयाचा झाल्यास वरुणाचें आणि गणेश, दिक्पाल व कुंभ ह्याचे विशेषकरून पूजन करावे. हे पूजन अग्निकार्याव्यतिरिक्त करावें आणि सज्जनास मिळणारी गति संपादन करावी. शास्त्राप्रमाणे कृति ऐकून अथवा इतर वृक्षाच्या उत्पत्तीचा लौकिक प्रकार श्रवण करून (त्याप्रमाणे वृक्ष लावल्यानंतर) इतर वृक्ष आणि तुलसीवनाविषयीचा वास्तुयाग करितेवेळी वनस्पति कुंभामध्ये ठेवावा आणि नंतर त्याचे पूजन करून होम करावा. ह्या विधीप्रमाणे वृक्षास संस्कार केल्यानंतर त्यास वस्त्र गुंडाळावे. मी जे सांगत आहे ते समजून घ्यावे अथवा दुसऱ्याच्या मतेही वृक्षाच्या उत्पत्तीचे जे प्रकार आहेत ते जाणावे ८९–९२. तुलसी, आम्रवृक्ष, ब्रह्मवृक्ष, अश्वत्थ आणि वट ह्यास हा सैस्कार केल्यानंतर सुवर्ण तापवून त्याच्या योगाने वेध करावा ९३. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील पहिल्या भागापैकी दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥

सूत ह्मणतात:—आता पुराणांमध्ये आणि तंत्रामध्येही सांगितलेला (एकाहून अधिक कर्मे एकदम व मंत्र वगैरे एकदाच ह्मणून करणे इत्यादि) विधि कथन करितो. प्रतिष्ठा शुद्ध दिवशी करावी १. शंभर वृक्ष, अनेक क्षुद्र वृक्ष, दहा वृक्ष किंवा बारा वृक्ष ह्याची प्रतिष्ठा तंत्राने करावी. दृष्टीस पडेल इतक्या दूर सेतु असेल तर कूपयागाच्या वेळी त्याचाही उत्सर्ग करावा २. वृक्षयागाच्या वेळीं कूपाचा उत्सर्ग केव्हाही करूं नये. तुलसीवनासबंधी याग करितेवेळीं दुसरा याग करूं नये. तडागयाग व आरामयाग ह्याविषयी केव्हाही सेतुयागादिक कर्मे करूं नयेत. देवयागाच्या वेळी सेतुयाग करूं नये आणि तडागाचा उत्सर्गही करूं नये. ३-४. तंत्रानें विधि करावयाचा असल्यास वृद्धिश्राद्ध निराळें करावयाचें नाहीं. मात्र कर्ता निराळा असेल तर श्राद्ध निराळे केलें पाहिजे. शिवलिंगाची स्थापना करितांना दुसऱ्या देवाची स्थापना करूं नये. आपल्या देशामध्ये तंत्रविधि वर्ज्य करावा. आपल्या मताप्रमाणें तंत्रानें विधि केला असता अथवा तो विपरीत केला असता आयुष्याचा क्षय होतो अशी स्मृति आहे ५,६. हे द्विजश्रेष्ठहो, तडाग, पुष्करिणी आणि आराम ही वास्तविक प्रमाणाहून कमी असतील तर अथवा त्याचे प्रमाण अगदीं बरोबर असले तर किंवा ती दहा हातच असतील तर असें करणें दूषणावह नाहीं. ७. दोन हजारहून अधिक हात ज्याचे प्रमाण असेल त्या आरामाची प्रतिष्ठा केली

रेत् । दशद्वादशवृत्ते च आरामे पूर्ववद्द्विजा ८ प्रतिष्ठां बिल्ववृक्षे च अन्यथा कर्णवेधनम् । कुर्याद्धोमदानं च तत्र निर्मन्थनादिकम् ९ अनन्तरं प्रदातव्यं लाजान्मूर्ध्न्यक्षतादिकम् १० [७२९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि पूर्वभागे एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

सूत उवाच ॥ प्रतिमालक्षणं वक्ष्ये यथा शास्त्रमतं द्विजाः । प्रतिमां लक्षणैर्हीनां गृहीतां नैव पूजयेत् १ शैलजा दारुजा ताम्री मृद्वा सर्वकामदा । एकहस्ता द्विहस्ता वा साधहस्ता तथापि वा २ प्रासादमानमथवा अथवा सर्वलक्षणम् । अष्टाङ्गुलोत्सेधक च न तु गेहेऽर्चयेत्कृती ३ देवागारस्य यद्द्वार तस्मादष्टाङ्गुलेन तु । विभागपिण्डिका कार्या द्वौ भागौ प्रतिमा भवेत् ४ अङ्गुल वै भवेद्वृद्धिरशीतिश्चतुरुत्तरा । विस्तारमानत कार्य वदन द्वादशाङ्गुलम् ५ मुखत्रिभागे चिबुक ललाटं नासिकां तथा । कर्णे नासिकया ग्रीवा तुल्यौ वा नियतौ तु यौ ६ नयने द्व्यङ्गुल स्यातां त्रिभागं तारका भवेत् । तृतीयतारकाभाग शुभदृष्टिं विचक्षणः ७ ललाटमस्तकग्रीवा कुर्यात्तत्सममेव तु । परिणाहस्तु शिरसा भवेद्द्वात्रिंशदङ्गुल. ८ तुल्या नासिकया ग्रीवा मुखेन हृदयान्तरम् । अथ विस्तारपङ्क्तिस्तु ततोऽर्ध तु कटि. सदा ९ बाहू च बाहुतुल्यौ च ऊरू जङ्घे च जाघनम् । गुल्फावस्थरतु पादः स्याद्घाटितश्चतुरङ्गुलः । षडङ्गुलस्तु विस्तारस्तुल्याङ्गुष्ठोऽङ्गुलत्रयम् १० प्रदेशिनी च तत्तुल्या हीनाशेषाङ्गखानखम् । चतुर्दशाङ्गुलः पादस्यायामः परिकीर्तितः ११ एव लक्षणसंयुक्ता

पाहिजे. परंतु, दहावारा वृक्षांचेंच जर उद्यान असेल तर हे द्विजहो, पूर्वी सांगितले आहे त्याचप्रमाणें करावे ८. बिल्ववृक्षाची प्रतिष्ठा करावी व ती न केल्यास कर्मवेधन करावे. निर्मथनप्रभृति औपचें त्यास लावावीं आणि नतर त्याच्या अग्रभागावर भाताच्या लाह्या व अक्षता टाकाव्या ९, १०. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील पूर्वभागांपैकीं अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥

सूत ह्मणतात --हे द्विजहो, आता शास्त्रसमत असलेले देवप्रतिमेचे लक्षण सागतो. लक्षणावाचून असलेल्या प्रतिमेचा स्वीकारही करू नये आणि पूजनही करू नये. पाषाण, काष्ठ, ताम्र आणि मृत्तिका ह्याची एक, दोन अथवा दीड हात असणारी प्रतिमा सर्व मनोरथ पूर्ण करणारी होते. अथवा देवमदिराच्या मानाने प्रतिमेच्या लक्षणाचे प्रमाण ठरवावे. सूज्ञ मनुष्याने आठ अगुलाहून अधिक उचीच्या प्रतिमेचे गृहामध्यें पूजन करूं नये १--३. देवमंदिराचे जें द्वार असेल त्याच्या प्रमाणामध्ये आठ अगुलें मिळून त्याच्या तृतीयाशाइतकें उच देवपीठ करावे व अवशिष्ट राहिलेल्या दोन भागाइतकी उच प्रतिमा करावी ४. चौऱ्यायशीं अगुलेंपर्यत हें प्रमाण वाढवावें. विस्ताराच्या मानाने साधारणपणें बारा अंगुले मुख करावे, मुखाच्या तृतीयाशाएवढा हनुवटीच्या खालील भाग असावा व नासिका आणि ललाट ह्याचेही प्रमाण प्रत्येकी तितकेंच असावे. कर्ण, नासिका आणि ग्रीवा ह्याचे प्रमाण सारखेच असावे व ज्याचे प्रमाण परस्पराशी नियमाने सारखे असते त्याचेही ते सारखेंच ठेवावे ५,३. नेत्राचें प्रमाण दोन अंगुले असावे, त्याचा तृतीयाश तारका (बाहुल्या) आणि त्याच्याही तृतीयाशाएवढी उत्कृष्ट प्रकारची दृष्टि सुज्ञ मनुष्याने करावी ७. ललाट, मस्तक आणि कंठ ह्याचें प्रमाण सारखेच असावे. मस्तक बत्तीस अंगुले विशाल असावे ८. नासिकेचे प्रमाण ग्रीवेएवढें असावे व छातीचे प्रमाण मुखाएवढे असावे. अंगुलीचा विस्तार सहा अंगुलें असावा आणि अंगुष्ठाचा तीन अंगुले असावा. तर्जनी हीही इतर अंगुलीसारखीच असावी. इतर अंगुलींचे प्रमाण एक एक नखानें कमी असावे. पायाची लाबी चौदा अंगुले असावीं असे सांगितले आहे. अधरोष्ठ, माड्या, भिवया, ललाट आणि गंडस्थल ही मूर्तीचीं अंगे नियमाने उन्नत करावीं. प्रतिमेचे प्रभामं-

सा पूज्या प्रतिमा शुभा । अधरोष्ठस्तथैवोरुभ्रूललाट तथैव च १२ मण्डं च नियतं मूर्तौ कुर्यादङ्गसमन्वितम् । सुप्रभामण्डला चारुविचित्रमणिकुण्डला १३ कराभ्यां काञ्चनीं मालां बिभ्रद्दन्तीं शिरोरुहान् । एव लक्षणसंपन्नां कारयेदीहितप्रदाम् १४ सुस्निग्धां वरदां सौम्यां द्वितीयाश्रमिणामिमाम् । नवतालो भवेद्विष्णुर्वासुदेवस्त्रितालकः १५ नृसिंहः पञ्चतालः स्याद्धयग्रीवस्तु पञ्चमः । नारायणश्चाष्टतालो महेशस्तालपञ्चमः १६ नवताला भवेद्दुर्गा लक्ष्मीस्तालत्रय ततः । वाणी तालत्रय विद्यात्सविता सप्ततालकः १७ दक्षिणे वासुदेवस्य करे चक्र प्रतिष्ठितम् । शङ्ख भवेच्च तदधो वामार्धे तस्य वै गदा १८ तदर्धश्च भवेत्पद्म श्रीवत्सेनोपशोभितम् । सव्येऽर्धे तारकारातिं त्रिनेत्रमपरार्धकम् १९ पार्श्वे नलिनसिंहौ द्वौ सुभद्रां दक्षिणे न्यसेत् । रुक्मिणीं वामभागे च तदधस्तादिवीन्द्रकम् २० कृताञ्जलिपुटोऽग्रस्थो नारदः कपिलस्तथा । धर्माधर्मावुभौ पार्श्वे कर्तव्यौ स्रग्विणौ वरौ २१ यद्रूप वासुदेवस्य तथा नारायणस्य च । वैपरीत्यं विजानीयान्माधवस्य तथैव च २२ तीर्थे गिरौ तडागे च समीपे स्थापयेत्सुधीः । नगरग्रामामध्ये वा ब्राह्मणानां च समदि २३ अविमुक्ते विशेषेण सिद्धक्षेत्रे दशार्णके । त्रीण्युत्तरसहस्राणि पञ्चपञ्चोत्तराणि षट् २४ कुलानि पूर्व विपेन्द्राः समुद्धरति नान्यथा । कलौ दारुमयः कार्यो ह्यशक्तो मृन्मयेन वा २५ चन्दनागुरुभि कुर्याद्विल्वश्रीपर्णिकस्य च । पद्मकाष्ठमयश्चैव वाममस्य तथैव हि २६ [७५५] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

डल उत्तम असावें व तिजला अनेक प्रकारची चित्रविचित्र रत्नकुडले घातलेली असावी व तिच्या हातीं सुवर्णाची माला दिलेली असावी, तिचे केश उत्कृष्ट असावे. ह्याप्रमाणे लक्षणानीं युक्त अशी प्रतिमा करावी ह्मणजे ती इष्टफलदायक होते ९–१४. अत्यत स्निग्ध, वरप्रदान करीत आहे अशी दिसणारी आणि सौम्य अशी प्रतिमा गृहस्थाश्रमी लोकासाठी करावी. (आगठा आणि मधले बोट ही लाब केलेल्या तळहातास ताल असे ह्मणतात.) विष्णूचे प्रमाण नऊ ताल असावें, वासुदेवाची प्रतिमा तीन ताल असावी, नरसिंह पाच ताल, हयग्रीव पाच ताल, नारायण आठ ताल, श्रीशंकर पाच ताल, दुर्गा नऊ ताल, लक्ष्मी तीन ताल, सरस्वती तीन ताल आणि सूर्य सात ताल असावा १५–१७. वासुदेवाच्या उजवीकडील वरच्या हातामध्ये चक्र व खालील हातामध्यें शख असावा. डावीकडील वरील हातामध्ये गदा व खालील हातामध्यें पद्म असावें. तसेच, त्याची प्रतिमा श्रीवत्ससंज्ञक चिन्हाने सुशोभित असावी. त्याच्या शरीराच्या डावीकडील अर्ध्या भागाजवळ कार्तिकेय आणि उजवीकडील अर्ध्या भागासमीप श्रीशंकर हे असावे. दोहो बाजूस नंदी आणि सिंह हे दोघे, उजवीकडे सुभद्रा. डावीकडे रुक्मिणी आणि खालच्या बाजूस देवेंद्र ह्याची स्थापना करावी १८–२०. नारद आणि कपिल हे उत्कृष्ट हात जोडून पुढे उभे राहिलेले असे करावे. धर्म आणि अधर्म हे उत्कृष्ट प्रकारची माला धारण केलेले असे दोहो बाजूस असावे २१. वासुदेव आणि नारायण ह्याचे जे स्वरूप असेल त्याच्या विपरीत माधवाचे स्वरूप आहे असे समजावे २२. तीर्थ, पर्वत आणि तडाग ह्याच्या समीप, नगर अथवा गाव ह्यांच्या मध्यभागी, ब्राह्मणाच्या सभेमध्ये, दशार्णदेशामध्यें सिद्ध क्षेत्रात आणि विशेषकरून काशीक्षेत्रामध्यें सुज्ञ मनुष्यानें मूर्तीची स्थापना करावी. असे केलें असतां हे ब्राह्मणश्रेष्ठहो, प्रतिमेची स्थापना करणारा मनुष्य पुढे होणाऱ्या तीन हजार कुलाचा आणि पर्वीच्या सहा हजार पंचावन्न कुळाचा उद्धार करितो. कलियुगामध्ये विष्णूची प्रतिमा काष्ठाची

सूत उवाच ॥ अतः परं प्रवक्ष्यामि कुण्डानामथ निर्णयम् । तस्योद्धारं च संस्कारं शृणुध्वं द्विजसत्तमाः १ चतुरस्रं च वृत्तं च पादार्धं चार्धचन्द्रकम् । योन्याकारं चन्द्रकं च अष्टार्धमथ पञ्चमम् २ सप्तार्धं च नवार्धं च कुण्डं दशकमीरितम् । भूमिं सशोध्य विधिवत्तृणकेशादिवर्जिताम् ३ भ्रामयेच्चोर्ध्वतस्तस्या भस्माङ्गाराणि यत्नतः । अङ्कुरार्पणकं कुर्यात्सप्ताहादेव बुद्धिमान् ४ स्थानं विमर्दनं कुर्यात्खनित्वा सेचयेज्जलैः । पुष्टिहस्ताच्छायामित प्रकुर्यात्परिसूत्रयेत् ५ अर्काङ्गुलमितं सूत्रं चतुरस्रं प्रकल्पयेत् । अष्टादशाङ्के क्षेत्रे न्यसेदेकं बहिस्ततः ६ मापयेत्तेन मानेन विवृत्तं कुण्डमुज्ज्वलम् । पूर्ववद्विभजेत्क्षेत्रं भागैक पुरतो न्यसेत् ७ वृत्तानि कालिकादीनि बहिस्त्रीणि विवर्जयेत् । पद्मकुण्डमिदं प्रोक्तं विलोचनमनोहरम् ८ दशधा भेदयेत्क्षेत्रे ऊर्ध्वाधोऽर्धाङ्गुलद्वयम् । संपरिपातयेत्सूत्र पाटयेत्तत्प्रमाणतः ९ पञ्चधा भेदिते क्षेत्रे कामं वा विभजेत्सुधीः । न्यसेत्पुरस्तादेवाङ्गं कोणार्धार्धप्रमाणतः १० योनिस्थानं प्रतिष्ठाप्य अश्वत्थस्य दलाकृति । सूत्रद्वय ततो दद्यात्कुण्डं परिमितं भवेत् ११ चतुरस्रं समुद्धृत्य सूत्रं संकल्पयोगतः । दिशं प्रति यथान्यायं पातयेच्च द्विजोत्तमाः १२ शृङ्गाटक युग्मपुट षडस्रं कुण्डत्रयं बुधाः । जलाशयारामकूप नित्ये गृहमये यथा १३ चतुरस्रं भवेत्कुण्ड द्विजसंस्कारकर्मणि । देवप्रतिष्ठायागे च गृहवास्तौ चतुर्थकम् १४ वसुन्धरायागभेदे प्रपञ्चे वृत्तमादिशेत् । सोमेष्टौ

करावी व तसे करण्यास शक्ति नसेल तर ती मृत्तिकेची करावी. चंदन, अगुरु, बिल्व, खिरणी आणि पद्मकाष्ठ ह्या काष्ठाची श्रीविष्णूची सुंदर प्रतिमा करावी २३—२६. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातिल प्रथम भागापैकी बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥

सूत ह्मणतातः—आता यापुढे कुंडाचा निर्णय सागतो. हे उत्तम ब्राह्मणहो, कुडाचा उद्धार व संस्कार ऐका १. चतुरस्र, वृत्त, पादार्ध, अर्धचद्र, योन्याकार, चंद्रक, अष्टार्ध, पचम २, सप्तार्ध, व नवार्ध अशी दहा कुंडें सागितलेली आहेत. तुष (कोडा, भुस वगैरे) व केश यानी रहित अशा भूमीची यथाविधि शुद्धि करून ३ तिच्यावरून मोठ्या यत्नाने भस्माचे अगार फिरवावे. बुद्धिमान् पुरुषाने सात दिवसात अंकुरार्पण करावे ४. ती जागा खणून चागली कुटावी व तिच्यावर पाणी शिपडावे. कुंड पुरे हातभर उच करावे. त्याच्या चारी बाजूस सूत्रे मारावी ५. बारा अगुले सूत्र चौकोनी मारावे. तें कुडाकरिता जे क्षेत्र तयार केले असेल त्याच्या बरोबर अठराव्या भागात यावे. त्याच्या बाहेरच्या बाजूस एक सूत्र मारावे ६ व त्या प्रमाणाने त्रिवृत्त उज्ज्वल कुड मापावें. पूर्वीप्रमाणे क्षेत्राचा विभाग करावा. त्यातील एक भाग पुढे सोडावा ७ व कालिकादिक तीन वर्तुळें बाहेर सोडावीं. ह्यास पद्मकुंड असे ह्मणतात. हें नेत्रास मनोहर दिसत असते ८. क्षेत्राचा दशधा भाग करावा व वर आणि खाली दोन अगुलप्रमाणाने चोहों बाजूंनी सूत्र मारावे आणि त्या प्रमाणाने क्षेत्राचे खणून भाग पाडावे ९. किंवा शहाण्याने पाच भाग केलेल्या क्षेत्रात पाहिजे तर भाग पाडावे. कोणाच्या अर्धाच्या अर्ध्या प्रमाणाचे ह्मणजे पाव कोणाच्या प्रमाणाचे अंग पुढेच सोडावे १०. अश्वत्थाच्या पर्णाच्या आकृतीचे योनिस्थान स्थापावे व नंतर दोन सूत्रे मारावीं ह्मणजे परिमित क्षेत्र होते ११. हे उत्तम ब्राह्मणहो, चोकोनी खणून संकल्पाप्रमाणे प्रत्येक दिशेस सूत्र मारावे. शृंगाटक, युग्मपुट व षडस्र हीं तीन कुंडे, जलाशय, बाग, कूप व नित्य गृहमय कृत्ये यात ग्राह्य आहेत १२,१३. द्विजाच्या संस्कारकर्मामध्ये चौकोनी कुंड करावे. देवप्रतिष्ठायाग व गृहाची वास्तुशांति यामध्ये चवथे अर्धचंद्रकुंड करावें १४. वसुंधरायागाचे निरनिराळे भेद व कृत्यप्रपच यामध्ये वर्तुल कुट सांगावे. सोमेष्टीमध्ये

पञ्चम मोक्षे नरमेधाश्वमेधयोः १५ अङ्कुरार्पणयागे च वैष्णवे यागकर्मणि । शिवदेव्योश्च जन्मादावष्टम्यां चार्धचन्द्रकम् १६ मार्जारपौष्टिके वैरे रम्ये च शान्तिके तथा । शान्तिप्रतिष्ठायागे तु शाक्तानां काम्यकर्मणि १७ पुरश्चरणकाम्येषु ज्वरादीनां विमोक्षणे । एवंविधेषु कार्येषु योनिकुण्डं प्रशस्यते १८ देवतातीर्थयात्रादौ महायुद्धप्रवेशने । सौरे शान्ते पौष्टिके च षट्पुर कुण्डमुत्तमम् १९ मारणोच्चाटने चैव तथा रोगोपशान्तये । वैष्णवानां कोटिहोमे नृपाणामतिशोचने २० अष्टास्रमब्जकुण्डं च सप्तास्र निधिसाधने । राज्ञा साध्ये च पञ्चास्र कन्याप्राप्तौ त्रिरस्रकम् २१ यावल्लिङ्ग भवेदेव विस्तारस्तावदेव तु । कुण्डानुरूपतः कार्या मेखला सर्वतो बुधैः २२ अयुतादिषु होमेषु मेखलां योजयेत्सुधीः । निम्नप्रमाणं चात्रापि मूले साधाङ्गुलं त्यजेत् २३ कोणबदरसैमानं यथायोग्यमनुक्रमात् । मुष्टिहस्ते समुत्सेधे साधाङ्गुलपरिष्कृतः २४ अरत्निमात्रे कुण्डे तु त्रिश्चैकाङ्गुलतः क्रमात् । एकहस्तमिते कुण्डे वेदाग्निनयनाङ्गुलाः २५ सप्तमेखलक युक्तं लक्षहोमे प्रशस्यते । पञ्चमेखलकं वाथ लक्षकोट्यां च योजयेत् २६ एकाङ्गुलादिमानेन नेमिं सवर्धयेत्सुधीः । चतुर्हस्तमिते कुण्डे तावदेव गुणाङ्गुलाः २७ वसुहस्ते भानुदन्तिर्युग्महीनेऽपि ताः क्रमात् । सर्वाः समा ग्रहमख मेखलाश्च सहस्रके २८ पार्श्वतो योजयेत्तत्र मेखलास्ता यथाक्रमम् । साधाङ्गुलादिमानेन नेमिं संवर्धयेत्सुधीः २९ एकमेखलयोगेन योजय-

---

पाचवे कुड सागितलेले आहे. नरमेध, अश्वमेध, अकुरार्पणयाग, वैष्णवयज्ञकर्म, शिव व देवी यान्या जन्मादिकाली व अष्टमीकृत्यात अर्धचंद्रकुंड करावे १५, १६. मार्जार, पौष्टिक, वैर, रम्य, तसेच शातिक व शातिप्रतिष्ठायाग यामध्ये, शाक्तान्या काम्य कर्मामध्ये १७, पुरश्चरणादिक काम्य कर्मामध्ये, ज्वरादिकापासून सुटका झाल्यावर इत्यादि प्रकारच्या कर्मामध्ये योनिकुंड प्रशस्त आहे १८. देवता, तीर्थ, यात्रा इत्यादिकामध्ये, मोठ्या युद्धामध्ये प्रवेश करावयाचा असता, सौर, शात, पौष्टिक इत्यादिकामध्ये षडस्र कुड उत्तम होय १९. मारण, उच्चाटन, त्याचप्रमाणे रोगान्या उपशातिसमयी, वैष्णवाचा कोटि होम कर्तव्य असता व राजास अतिशय शोक झाला असता २० अष्टास्र व अब्जकुंड करावे. निधीची सिद्धि कर्तव्य असताना सप्तास्र व राजाकडून काही साध्य असल्यास पंचास्र कुंड करावे. कन्या प्राप्त करून घ्यावयाची असल्यास त्रिरस्र कुड असावे २१. कुड जितके खोल असेल तितकेच विस्तृत करावे. शहाण्यानीं कुडानुरूप चारी बाजूस मेखला कराव्या २२. दहा हजारापासून पुढे होम कर्तव्य असता सुज्ञानें मेखलेची योजना करावी. खोलीचे जे प्रमाण असेल त्यात येथेंही मुळाशीं अर्ध अंगुल सोडावे २३. चार व सहा कोणानी युक्त असे क्रमाने यथायोग्यपणे प्रमाण करावे. मूठ झाकलेल्या हाताइतक्या प्रमाणाने उंची असता कुडाचा परिष्कार दीड अगुलप्रमाणाचा करावा २४. अरत्निमात्र प्रमाणाचे कुंड असल्यास क्रमाने तीन व एक अंगुलाचा परिष्कार करावा. एका हाताच्या प्रमाणाचे कुड असल्यास चार, तीन व दोन अंगुलाचें प्रमाण ठेवावे २५. लक्षहोमामध्ये सात मेखलाचे कुंड प्रशस्त होय किंवा लक्ष व कोटि होमामध्ये पाच मेखलाचे कुड योजावे २६. एक अंगुल इत्यादि मानाने शहाण्याने नेमि वाढवावी. चार हात प्रमाणाचे कुंड असल्यास नेमि तितकीच अगुले करावी २७. आठ हात, बारा हात, दहा हात किंवा पाच, सात इत्यादि युग्महीन प्रमाणाचे कुंड असल्यास नेमीचेही प्रमाण क्रमाने तेंच ठेवावे. ग्रहमखामध्ये सहस्रहोम कर्तव्य असतां सर्व मेखला सारख्या कराव्या २८. पण तशा अवस्थेत त्या मेखला मागून क्रमाने योजाव्या व दीड अंगुलापासून पुढच्या प्रमाणाने सुज्ञाने नेमि वाढवावी २९. व एका मेखलेचाही उपयोग करावा. शक्ति

च्छक्तिभावतः । होमाधिक्ये बहुफलमन्यूनं नाधिकं भवेत् ३० कुण्डस्य रूपं जानीयात्परमं प्रकृतेर्वपुः । ततो होमे शतगुणं स्थण्डिले स्वल्पकं फलम् ३१ षट्चतुर्धा गुणायाम-विस्तारोन्नतिशालिनि । एकाङ्गुलं तु योन्यग्रं कुर्यादीषदधोमुखम् ३२ एकैकाङ्गुलतो योनिं कुण्डशून्येषु वर्धयेत् । समग्रंथं मेखलायाः सपर्यायां सुलक्षणां ३३ स्थापयेत्कुण्डकोणेषु योनिं तां द्विजसत्तमाः । कुण्डानां कल्पयेन्नाभिं स्फुटमम्बुजसन्निभाम् ३४ तन्तु कुण्डानुरूपं वा सुव्यक्तं सुमनोहरम् । योनिकुण्डे योनिमब्जकुण्डे नाभिं च वर्जयेत् ३५ यावद्द्वयप्रमाणेन अर्धाङ्गुलक्रमाद्बहिः । नाभिं प्रवर्धयेदेकां कुण्डानां रूपतो यथा ३६ तत्र तत्र भवेत्कुण्डं बिम्ब-शून्यं न होमयेत् । शिवशक्तिसमायोगात्काम उत्पद्यते यतः ३७ अवटोऽपि उमादेवी बिम्बः कर्यात्तः सदाशिवः । न कुर्यादेकया हीन मरणं च समुद्दिशेत ३८ त्रयोदशाङ्गुलं हित्वा वह्नि-हस्तमथापि वा । महातीर्थे सिद्धक्षेत्रे यत्र शम्भुगृहं कुले ३९ तस्य दक्षिणदिग्भागे अग्रतो मण्डलं लिखेत । तत्र पूजा प्रकर्तव्या पूर्वमानेन चाश्रयेत् ४० अर्कहस्तान्तरे कुर्याच्छतो-र्ध्वान्ते शतेन वा ४१ [७९६] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे त्रयो-दशोऽध्यायः ॥ १३ ॥

सूत उवाच ॥ यस्य यज्ञस्य यन्मानं तन्तु तेनैव योजयेत् । अमानेन हुतो यज्ञस्तस्मान्मानं न ह्रापयेत् १ शतार्धं प्रथमं मानं शतसाहस्रमेव च । अयुतं च तथा लक्षं कोटिहोमपरतःपरम् २

असल्यामुळे होम अधिक केल्यास फल पुष्कळ मिळतें व न्यून न करिता जेवढा हवा तितकाच केल्यास अधिक फल मिळत नाहीं ३०. प्रकृतीचे परम शरीर असें जे कुंडाचें रूप तें जाणावें. कारण, त्याच्या योगाने होमामध्ये शतपट फल मिळते व स्थंडिल करून त्यावर होम केल्यास फल थोडें मिळतें ३१. सहापट किंवा चारपट लांब, रुंद व उंच असलेल्या कुंडात एक अंगुल व थोडें अधोमुख असें योनीचें अग्र करावें ३२ व कुंडाच्या पोकळीमध्ये एकेक अंगुलप्रमाणानें योनि वाढवावी. ती मेखलेच्या बरोबर मध्ये, पर्यायुक्त व उत्तमलक्षणयुक्त असावी ३३. हे उत्तम ब्राह्मणहो, त्या योनीची कुंडाच्या कोणामध्ये स्थापना करावी. कुंडास नाभि करावी. ती शुद्ध कमला-सारखी असावी. ते नाभिकमल कुंडानुरूप अतिव्यक्त व अतिमनोहर असावें, पण योनिकुंडामध्यें योनीचा व अब्जकुंडामध्ये नाभीचा परित्याग करावा ३४,३५. कुंडाचे जसें रूप असेल त्याप्रमाणें क्रमाने अर्ध्या अंगुलापासून दोन अंगुलप्रमाणापर्यंत बाहेर एक नाभि वाढवावी ३६. कुंड बिंब-शून्य झाल्यास त्यात होम करूं नये. कारण, शिव व शक्ति याच्या संयोगापासून कामाची उत्पत्ति होत असते ३७. भूमीतील छिद्र ही उमादेवी व बिंब सदाशिव होय असें सांगितले आहे. ह्यांतील एकास सोडून कुंड करूं नये कारण, त्याचें मरण हें फल प्राप्त होतें. असो, तेरा अंगुलें किंवा तीन हात अंतर सोडून महातीर्थ व सिद्धक्षेत्र ह्यामध्ये कोणत्याही शंभूच्या मंदिरात व नदीच्या तीरा-वर कुंडाच्या दक्षिणदिशेस पुढेच मंडल काढावें व त्यामध्ये पूजा करावी. पूर्वप्रमाणाच्या अनुरोधानेंच ह्या पूजेच्या प्रमाणाचा आश्रय करावा ३८–४०. अथवा बारा हात अंतरावर किंवा शंभ-राहून अधिक हात अंतर सोडून शतप्रमाण पूजा करावी ४१. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील प्रथम भागापैकीं कुंडविधानाधिपर्यी तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥

सूत ह्मणतातः— ज्या यज्ञाचे जे मान सांगितले आहे त्या यज्ञामध्यें त्याचाच उपयोग करावा. कारण, मानावाचून यज्ञ केल्यास तो नष्ट होतो. यास्तव, प्रमाणाचा त्याग करवूं नये १. पन्नास हे होमाचें पहिले मान आहे. नंतर शत, सहस्र, दशसहस्र, लक्ष, कोटि असें क्रमानें मान

अतःपरं तु विभवे राजा वाऽन्यो द्विजोत्तमाः। न स सिद्धिमवाप्नोति अयागफलभाग्भवेत् २ विपाक कर्मणां सर्वं नरः प्राप्नोति सर्वदा। शुभाशुभं ततो नित्यं प्राप्नोति मनुजः किल ४ युक्ताश्चापि ग्रहास्तत्र नित्यं शान्तिकपौष्टिके। तस्मात्यत्नतो भक्त्या नित्यं पूज्या यथाविधि ५ अद्भुते च तथा शान्तिं कुर्याद्भक्तिसमन्वितः। तस्माद्ग्रहाभिजनितं शुभाशुभफलं खलु ६ अद्भुतेषु च सर्वेषु अयुतं कारयेन्नरः। होमं यथाभिरुचितं पौष्टिके काम्यकर्मणि ७ लक्षहोमं कोटिहोमं राजा कुर्याद्यथाविधि। अन्यः शतादिकं कुर्यादयुतं विभवे सति ८ ग्रहाणां लक्षहोमस्तु कोटिहोमस्तथा कलौ। निधिहोमं चाभिचारं तत्र कुर्याद्गृहाश्रमी ९ यत्रतत्र जपः कार्यो होमो वा यत्कुत्रचित्। मानं नैव च कर्तव्यं मानादौ चाष्टकं त्यसेत् १० युग्मसाध्यं न कर्तव्यं युग्मतो भयमादिशेत्। लक्षे सप्त कालसंख्या कोटिहोमे च विंशतिः ११ एकविंशदिनैर्वापि न कुर्याद्व्यत्ययं क्वचित्। आरम्भस्त्रिसहस्रं स्याद्द्वितीयेऽष्टसहस्रकः १२ तृतीये तु सहस्रं स्याद्ग्रहसाध्यः स्मृतो विधिः। पञ्चाहे च समारम्भे सहस्रं जुहुयाद्बुधः १३ द्वितीयेऽह्नि द्विसाहस्रं तृतीये तु सहस्रकम्। गुणसाहस्रकं तुर्ये पञ्चाहे शेषमीरितम् १४ नवाहे कल्पयेल्लक्षमेकैकाङ्गं दिने दिने। पञ्चमे च तथा षष्ठे कुले भागद्वयाधिकम् १५ कोटिहोमे च तिथ्यङ्गे शतभागेन कल्पयेत्। न न्यूनं नाधिकं कार्यमेतन्मानमुदाहृतम् १६ नित्यमेकं दिने दद्यात्पृथक्नित्यं न

सांगितलें आहे २. हे उत्तम द्विजहो, वैभव असलें तरी राजाने किंवा दुसऱ्या कोणींही याहून अधिक होम करूं नये. कारण, त्यामुळा त्यापासून सिद्धि प्राप्त होत नाहीं व उलट तो यज्ञाच्या फलास अपात्र होतो ३. मनुष्य सर्वदा आपल्या कर्माच्या सर्व फलास प्राप्त होत असतो आणि त्यामुळें मनुष्यास शुभ व अशुभ ह्यांची सतत प्राप्ति होत असते ४. ह्यास्तव, शांतिक व पौष्टिक होमामध्ये ग्रहही अनुकूल असावयास पाहिजेत. तरी प्रयत्नानें व भक्तीनें सतत यथाविधि पूजा करावी ५. त्याचप्रमाणें अद्भुत कर्मामध्यें भक्तियुक्त होऊन शांति करावी. साराश, ग्रहापासून शुभ व अशुभ फल नियमाने उत्पन्न होत असतें ६. सर्व अद्भुत कर्मामध्यें दहा हजार होम करवावा. व पौष्टिक काम्य कर्मामध्ये इच्छेप्रमाणें यज्ञ केल्यास चालेल ७. राजाने अद्भुतसमयीं लक्ष किंवा कोटि होम प्रयत्नानें करावा. इतरानें शंभर किंवा हजार करावा. पण वैभव असल्यास राजाहून इतरानेंही दहा हजार होम करावा ८. ग्रहाचा होम कलियुगामध्यें एक लक्ष व तसाच कोटि सांगितलेला आहे. निधीकरितां व अभिचार (जारण, मारण, उच्चाटनादि) होम गृहस्थानें करूं नये ९. जेथें तेथें जप करावा. किंवा कांहीही झाला तरी होम करावा; मान ठरवूं नये व त्यातही अष्टकाचा त्याग करावा १०. सम दिवसानीं साध्य होणारे कर्म करूं नये. कारण, युग्मान्या योगानें भय उत्पन्न होतें. लक्षहोमामध्यें सात ही दिनसंख्या व कोटिहोमामध्यें बीस ही संख्या सांगितलेली आहे ११. किंवा एकवीस दिवसानीं होम समाप्त करावा. पण त्यामध्यें कधीं व्यत्यय करूं नये. तीन हजारानीं आरंभ करावा; दुसऱ्या दिवशीं आठ हजार होम करावा व तिसऱ्या दिवशीं हजार होम करावा. हा ग्रहसाध्य विधि सांगितलेला आहे. पाच दिवसांच्या विधीचा आरंभ केलेला असल्यास प्रथम दिवशीं शहाण्यानें हजार होम करावा. त्याच्या दुसऱ्या दिवशीं दोन हजार, तिसऱ्या दिवशीं दोन हजार, चवथ्या दिवशीं तीन हजार व पांचव्या दिवशीं राहिलेला चार हजार होम करावा १२-१४. नवदिनसाध्य होमाचा आरंभ केल्यास त्या अवधींत प्रतिदिनीं लक्षाच्या एक एक अंगाची कल्पना करावी व पाचव्या आणि सहाव्या दिवशीं त्यांतील प्रत्येकीं अर्धा ह्या रीतीनें दोन भाग अधिक योजावेत १५. कोटिहोम करावयाचा असता तिथीच्या अंगांत शंभर

चारयेत् । सप्तमाजे जपेन्नित्यं पञ्चवारेण स्विष्टकृत् १७ अयुते लक्षहोमे च कोटिहोमे च सर्वदा । प्रथमे दिवसे कुर्यादेवतानां च स्थापनम् १८ महोत्सवे द्वितीये तु बलिदानं तथैव च । त्र्यहसाध्ये त्रिराज्ये च पूर्णं कृत्वा विसर्जयेत् १९ पञ्चाहे तु तृतीयेऽह्नि बलिदानं प्रशस्यते । सप्ताहे चाष्टदिवसे नवाहे पञ्चमेऽहनि २० पञ्चाहेऽह्नादशाहे तु द्वात्रिंशत्षोडशेऽहनि । इतोऽन्यथा न कुर्वीत नाश यज्ञफल लभेत् २१ [८१७] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

सूत उवाच ॥ कुण्डानामथ संस्कारं वक्ष्ये शास्त्रमतं यथा । असंस्कृते चार्थहानिस्तस्मात्संस्कृत्य होमयेत् १ अष्टादश स्युः संस्काराः कुण्डानां तत्र देशिताः । तारेणावेक्षयेत्स्थान कुशतोयैः प्रसेचयेत् २ त्रिसूत्रीकरणं पश्चाद्वृत्तसूत्रं निपातयेत् । वारेण कीलकं दद्यान्नारसिंहेन कुड्मलम् ३ जिह्वां प्रकल्पयेत्पश्चात्तस्मादग्निं समाहरेत् । न च म्लेच्छगृहादग्निं न शूद्रनिलयात्क्वचित् ४ नदीपर्वतशालाच स्त्रीहस्तात्परिवर्जयेत् । संस्कृत्य परिगृह्णीयात्त्रिधा कृत्वा समुद्धरेत् ५ तमग्निं प्रतिगृह्णीयादात्मनोऽभिमुख यथा । वह्निबीजेन मातिमाच्छिवबीजेन मोक्षयेत् ६ वाणीश्वरीमृतुस्नातां वाणीश्वरसमागताम् । ध्यात्वा समीरणं दद्यात्कामम्युत्पद्यते ततः ७ कालबीजेन ऐशान्यां योनावग्निं विनिक्षिपेत् । पश्चाद्देवस्य देव्याश्च दद्यादाचमनी-

---

भागाची योजना करावी; ह्याहून कमी किंवा अधिक मान करूं नये. असो. हें मान सांगितलें १६. ह्यांतील एक मान प्रतिदिवशीं नियमानें द्यावें. रोजरोज पृथक् प्रमाण घेऊन अनुष्ठान करूं नये. समाजासह जप करावा. व सदा पांच प्रणवानीं स्विष्टकृत् होम द्यावा १७. दहा हजार, लक्ष व कोटि होम करावयाचा असता सर्वदा प्रथम दिवशीं देवताची स्थापना करावी १८. दुसऱ्या दिवशीं महोत्सव करून बलिदान करावें व तीन दिवसांनीं साध्य असा होम कर्तव्य असता तीन दिवसव्रत होम संपूर्ण करून विसर्जन करावें १९. पण पांच दिवसात कर्म समाप्त कर्तव्य असल्यास तिसऱ्या दिवशीं बलिदान करणें प्रशस्त होय. सप्तदिनसाध्य, अष्टदिनसाध्य व नवदिनसाध्य कर्ममध्यें बलिदान पांचव्या दिवशीं करावें २०. बारा दिवसांत कर्म समाप्त कर्तव्य असतानाही पाचव्या दिवशीं व बत्तिस दिवसांनीं कर्म कर्तव्य असल्यास सोळाव्या दिवशीं बलिदान करावें. याप्रमाणे सांगितलेल्या रीतीस सोडून कर्म कधींही करूं नये. कारण, तसें केल्यास यज्ञाचें फल प्राप्त होत नाहीं २१. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या प्रथम भागाचा होमाच्या प्रमाणाविषयीं चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

सूत ह्मणतातः—आता शास्त्रास जसा मान्य आहे तसा कुंडांचा संस्कार सांगतो. कारण कुंडाचा संस्कार न केल्यास अर्थाची हानि होत असते. ह्यास्तव, संस्कार करून होम करावा १. शास्त्रात कुंडाचे अठरा संस्कार सांगितलेले आहेत. प्रणवाने स्थान पहावें. दर्भोदकानें त्याच्यावर सेक करावा २. मागून त्रिसूत्रीकरण करून वर्तुळ सूत्र ठोकावें. वारानें कीलक रोवावा. नारसिंहानें कुड्मल द्यावा ३. त्यानंतर जिव्हेची योजना करावी व अग्नि आणावा. पण म्लेच्छाच्या गृहातून किंवा शूद्राच्या गृहातून अग्नि कधींच आणूं नये ४. नदी, पर्वत व शाला ह्या ठिकाणचा अग्नि व स्त्रीच्या हातून आणलेला अग्नि यांचा परित्याग करावा. अग्नीस संस्कार करून नंतर त्याचें ग्रहण करावें व तीन भाग करून त्याचा उद्धार करावा ५. तात्पर्य, त्या अग्नीचें अशा रीतीनें ग्रहण करावें कीं तो आपल्या संमुख येईल. सुज्ञानें वह्निबीजाने व शिवबीजानें त्याचें प्रोक्षण करावें. वाणीच्या ईश्वरासह प्राप्त झालेल्या ऋतुस्नात वागीश्वरीचें ध्यान करून वारा घालावा. ह्मणजे अग्नि यथेच्छ उत्पन्न

षकम् ९ पितृपिङ्गल दह दह पच पच युग्ममुदीर्य च । सर्वज्ञाज्ञापय स्वाहा मन्त्रोऽयं वह्निपूजने १० वह्निवर्हिषि संयुक्ताः सादियान्ताः सबिन्दवः । वह्निमन्त्राः समुद्दिष्टा द्विजानां मन्त्रनीरितम् ११ जिह्वास्तास्त्रिविधाः प्रोक्ता यज्ञे दत्तेन सत्तमाः । हिरण्यामाज्यहोमेषु होमयेत्संयतात्मनः ११ त्रिमध्यक्तैर्यत्र होमं कर्णिकायां च होमयेत् । कनका स्यात्तु कृष्णा स्याद्धिरण्या शुभ्रता तथा १२ बहुरूपातिरूपा च सात्त्विका योगकर्मसु । विश्वमूर्तिस्फुलिङ्गिन्यौ धूम्रवर्णा मनोजवा १३ लोहिता स्यात्करालाख्या स्यात्काली भासस्य इत्यपि । एताः सप्त नियुञ्जीत विद्वेयाः क्रूरकर्मसु १४ समिद्धेदेषु या जिह्वास्तासु तेनैव याजयेत् । हिरण्यामाज्यहोमेषु होमयेत्संयतात्मनः १५ त्रिमध्यक्तैर्यथा होम कर्णिकायां च होमयेत् । शुद्धक्षीरेण रक्तायां नैत्यिकेषु प्रभा स्मृता १६ बहुरूपा पुष्पहोमे कृष्णा चान्नेन पायसैः । इक्षुहोमे पद्मरागा सुवर्णा पद्महोमके १७ लोहिता पद्महोमे च श्वेता वै बिल्वपत्रके । धूमिनी तिलहोमे च काष्ठहोमे करालिका १८ लोहिता स्यात्पितृहोमे ततो ज्ञेया मनोजवा । वैश्वानरं स्थित होमे समिद्धोमेषु सत्तमा १९ समानमाज्यहोमे च निष्पण्ण शेषवस्तुषु । आस्यात्तु जुह्वयाद्धव्यौ पिपर्ति सर्वकर्मसु २० कर्णहोमे वै विद्याधिनेत्रे तद्द्वयमीरितम् । नासिकायां मन पीडा मस्तके ध्वानसशय २१ गुह्ये विपत्करं चैव तस्मात्तत्र न होमयेत् । साधारणमथो वक्ष्ये वह्नेर्जिह्वाश्च कीर्तिताः २२ प्रवक्ष्यामि

होतो ६,७. कालबीजमंत्राने ईशान्यदिशेतील योनींत अग्नि टाकावा. नंतर देवास व देवीस आचमन द्यावें ८. " पितृपिंगल दह दह पच पच " असें ह्मणून व " सर्वज्ञ आज्ञापय स्वाहा " हा मंत्र अग्नीच्या पूजनसमयी ह्मणावा ९. अग्नीच्या ज्वालेशीं सयुक्त व ज्याचा ' स ' या अक्षराने आरंभ व ' य ' या अक्षरानें अंत आहे व जे बिंदुयुक्त आहेत असे अग्नीचे मंत्र सांगितलेले आहेत. तात्पर्य, द्विजाकरिता कोणता मंत्र घ्यावा तें सांगितले १०. हे सज्जनहो, दक्षाने यज्ञामध्यें तीन प्रकारच्या जिह्वा सांगितलेल्या आहेत. हे योगी पुरुषहो, आज्यहोमामध्ये हिरण्यानामक जिह्वेमध्यें हवन करावें ११. अशा प्रकारच्या होमामध्ये मधानें भिजलेल्या तीन आहुत्या कर्णिकेमध्यें द्याव्या. कनका, हिरण्या व तशीच शुभ्रता, बहुरूपा व अतिरूपा अशा ज्वाला उत्पन्न होतात. या सात्त्विक ज्वाला योगकर्ममध्ये उपयोगी आहेत. विश्वमूर्ति, स्फुलिंगिनी, धूम्रवर्णा, मनोजवा, लोहिता, कराला काली व भासस्या ह्या सात जिह्वा क्रूरकर्ममध्ये जाणाव्या १२–१४. समिधांच्या भिन्न प्रकारामध्यें ज्या जिह्वा आहेत त्यांचा त्याच्यामध्येच योजना करावी. आज्यहोमामध्ये हिरण्येमध्ये होम करावा. त्रिमधुक्त द्रव्याचा होम कर्तव्य असता तो कर्णिकेमध्यें करावा. शुद्ध दुधानें रक्तानामक जिह्वेमध्यें होम करावा. नित्यकर्ममध्ये प्रभानामक ज्वाला सांगितलेली आहे १५,१६. पुष्पहोमामध्ये बहुरूपा, अन्न व पायस ह्यानी हवन करावयाचें असता कृष्णा, इक्षूचा होम कर्तव्य असता पद्मरागा, पद्महोमामध्ये सुवर्णा १७, इतर कमलाचा होम कर्तव्य असता लोहिता, बिल्वपत्राचा होम करावयाचा असल्यास श्वेता, तिलहोमामध्ये धूमिनी, काष्ठहोमामध्यें करालिका १८, पितृहोमामध्ये लोहिता व नंतर मनोजवा जाणावी. हे सज्जनहो, समिधाचा ज्यात होम होतो त्या होमात वैश्वानर अग्नि असतो १९. आज्यहोमामध्ये समान व बाकी सर्व वस्तूंच्या होमात निष्पण्णनामक अग्नि असतो. सर्व कर्ममध्ये मुखातून अग्नीमध्ये हवन करावें, ह्मणजे तें कर्म पूर्ण होतें २०. कर्णीमध्ये होम केल्यास व्याधि, नेत्रामध्ये होम केल्यास नेत्रपीडा, नासिकेत होम केल्यास मन पीडा, मस्तकावर आहुति दिल्यास मार्गसंशय २१ व गुह्यस्थानीं होम दिल्यास विपत्ति प्राप्त होते. ह्यास्तव, त्या त्या स्थानीं हवन करूं नये. अग्नीच्या

विधिं कृत्स्नं यद्विशेष पुन शृणु। घृताहुतौ हिरण्यारुया गगणा पाणिहोमत २३ वक्रा ख्याता महद्धोमे कृष्णा भासा क्रतौ मता। सुप्रभा मोदकविधौ बहुरूपाऽतिरूपिका २४ पुष्पपत्र-विधियुक्ता होमे बहुजिह्वा प्रकीर्तिताः। न वा सकल्पयेत्कुण्डे शूद्राकारविभेदतः २५ इन्द्रकाष्ठ मस्तक स्यादीशाग्नेये च मस्तके। तत्काष्ठपार्श्वे द्वे नेत्रे द्वौ करौ च पादकमात् २६ अवशिष्ट भवेत्पुच्छ मध्ये चोदरसभवम्। उदर होमयत्पुष्टिमन्न पायसक च यत् २७ हुत्वा व्रीहिगण तत्र कर्णे पुष्पाहुतिं हुनेत्। वामकर्णं वामनेत्रं हुनेदेव्जादिकं बुध २८ श्रवणं चैव नेत्रं च दक्षिणे चेक्षुखण्डकम्। वामपार्श्वं वामकर अभिचारेषु शस्यते २९ मारणे पुष्पदेश तु न चान्यं होमयेत्क्वचित्। विपत्कर विजानीयादध्वनि सर्वविनाशकृत् ३० चन्दनागरुकर्पूरपाटलाघ्राथि-कानिभः। पावकस्य सुतो गन्ध. समस्तात्सुमहोदय. ३१ प्रदक्षिणात्यत्कफलपा च्छत्राकारा शिथिला शिखा। शुभदा यजमानस्य राज्यस्यापि विपत्तः ३२ छिन्नपुना. शिखा. कुर्यान्मृत्युर्धनपरि-क्षय.। निर्वाप्य मरण विद्यान्महाधूमाकुलेऽपि च ३३ एवविधेषु दोषेषु प्रायश्चित्त च नाचरेत्। अष्टुविंशाहुतीस्त्यक्त्वा ब्राह्मणान्भोजयेत्तत ३४ मूलेनाऽथ जुहुयाज्जुहुयात्पञ्चविंशतिम्। महास्नान प्रकर्तव्यं त्रिकाल हरिपूजनम् ३५ [८५२] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभाग पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

सूत उवाच ॥ नित्य नैमित्तिकं चैव यागादौ च समारके। होमावसाने प्रजपेदुपचारांश्च

जिह्वा सांगितल्या. आता साधारण विधि सांगतो २२ व संपूर्ण विधीही सांगतो. आता त्यातील विशेष ऐक. घृताच्या आहुतीमध्ये हिरण्यानामक ज्वाला, पाणिहोमामध्ये गगणा २३ व मोठ्या होमामध्ये वक्रा सांगितल्या आहेत. क्रतूमध्ये कृष्णा व भासा, मोदकविधानामध्ये सुप्रभा, पुष्पपत्र-विधियुक्त होमामध्ये बहुरूपा व अतिरूपिका अशा अग्नीच्या जिह्वा सांगितलेल्या आहेत. किंवा शू-द्राच्या आकारविभागाप्रमाणे कुंडामध्ये कल्पना करू नये २४.२५. इंद्रकाष्ठाचे मस्तक करावे. ईश व आग्नेय ही दोन मस्तके होत. त्या काष्ठाच्या बाजूस दोन नेत्र, दोन कर व दोन पाय त्याची क्रमानें कल्पना करावी २६. बाकी राहिलेले पुच्छ होय. मध्ये उदर समजावे. पुष्टिरूप अन्न व पायस ह्याचे उदरामध्ये हवन करावे २७. त्या ठिकाणी व्रीहींचा समुदाय देऊन कर्णामध्ये पुष्पाची आहुति द्यावी. डावा कान व डावा नेत्र ह्यामध्ये सुज्ञाने कमलादिकाचें हवन करावें २८. उजवा कान व नेत्र ह्यामध्ये उसाच्या तुकड्याचें हवन करावे आणि डावा पाय व डावा हात ह्यामध्ये अभिचारक कर्मामध्ये हवन करणें प्रशस्त होय २९. मारणकर्मामध्ये पुष्पप्रदेशी दुसऱ्या कोणत्याही द्रव्याचें हवन कधीच करू नये. कारण, तसें केल्यास ते विपत्तीस कारण होते असे समजावें. ध्वनि हा सर्वस्वाचा विनाश करणारा आहे ३०. चंदन, अगुरु, कापूर, पाटला, जुई इत्यादिकासारखा अग्नीपासून चोहोंकडून उत्पन्न होणारा गंध अतिमहोदयकारी होय ३१. प्रदक्षिण, कल्पशून्य, छत्राकार व शिथिल अशी शिखा, यजमान व विशेषत. राज्य यांना शुभद होय ३२. तुटलेली व वर्तुल अशा शिखा मृत्यु व धनाचा क्षय करिते. आहुतीचा त्याग केल्यावर अग्नि महाधूमाने आकुल झाला असता ते मरणदायि समजावे ३३. अशा प्रकारचे दोष घडले असता प्रायश्चित्त करावे म्हणजे अठ्ठावीस आहुति देऊन नंतर ब्राह्मणास भोजन द्यावे ३४. मूल-मंत्राने आज्याच्या आहुति देऊन पंचवीस वेळ हवन करावे, महास्नान करावें व त्रिकाल हरीचे पूजन करावे ३५. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणांतील मध्यमपर्वाच्या प्रथम भागाचा पंधरावा अध्याय संपूर्ण झाला ॥ १५ ॥

षोडश १ दद्यात्सभीरणं पश्चात्पीठपूजां समाचरेत् । गृहीत्वा रक्तपुष्पं च ध्यायेद्वह्निं यथा-विधि २ हृष्टं शक्तिस्वस्तिकाभीतिमुद्वहंतं दोर्भिरायतैः वरान्तम् । हेमाकल्पं पद्मसंस्थं त्रिनेत्रं ध्यायेद्वह्निं बद्धमौलिं जटाभिः ३ पूर्वादिद्वारदेशेषु कामदेवं शतक्रतुम् । वराहं षण्मुखं चैव गन्धाद्यैः साधु पूजयेत् ४ आवाह्य स्थापयेत्पश्चादष्टौ मुद्राः प्रदर्शयेत् । दत्त्वासनं स्वागतं च दद्यात्पाद्यादि च त्रयम् ५ अत पूर्वादिपात्रेषु यावता च हुताशनम् । सुवर्णवर्णममलं समिद्धं सर्वतोमुखम् ६ महोदरमहाजिह्वमाकाशत्वेन पूजयेत् । तारकादीन्समादे च गन्धैः पुष्पैः पृथ-ग्विधैः ७ तत्रैव जिह्वास्त्रिविधा ध्यायेन्मन्त्रपुरसराः । वक्ष्यमाणेन मन्त्रेण उपचारैरनन्त-रम् ८ त्वमादिः सर्वभूतानां ससारार्णवतारकः । परज्योतीरूपस्त्वमासनं सफलीकुरु ९ दद्यादासनमंत्रेण पुष्पगुच्छत्रयेण तु । पुटाञ्जलिं ततो बद्ध्वा पृच्छेत्कुशलपूर्वकम् १० वैश्वानर नमस्तेऽस्तु नमस्ते हव्यवाहन । स्वागत तु सुरश्रेष्ठ शान्तिं कुरु नमोऽस्तु ते ११ नमस्ते भगवन्देव आपोनारायणात्मक । सर्वलोकहिताथाय पाद्यं च प्रतिगृह्यताम् १२ नारायण पर धाम ज्योतीरूप सनातन । गृहाणार्घ्यं मया दत्तं विश्वरूप नमोऽस्तु ते १३ जगदादित्यरूपेण प्रकाशयति यः सदा । तस्मै प्रकाशरूपाय नमस्ते जातवेदसे १४ धनञ्जय नमस्तेऽस्तु सर्वपाप-प्रणाशन । ह्यानीयं ते मया दत्त सर्वकामार्थसिद्धये १५ हुताशन महाबाहो देवदेव सनातन ।

सूत ह्मणतातः— नित्य व नैमित्तिक असें कर्म सागतां. यागाच्या आरंभीं व समाप्तिकालीं आणि होम समाप्त झाला असता जप करावा. षोडशोपचार समर्पण करावे; वारा घालावा व पीठपूजा करावी. लाल पुष्प घेऊन अग्नीचें यथाविधि ध्यान करावें. (ध्यानाचा प्रकार असा--) आपणास इष्ट, उंच व दीर्घ हातानीं शक्ति, स्वस्तिक, अभीति व वर यास धारण करणारा, ज्याचा वेष सुवर्णाचा आहे, जो पद्मावर बसलेला आहे, ज्यास तीन नेत्र आहेत व ज्यानें जटानीं मस्तकावरील केश बाधले आहेत अशा अग्नीचें ध्यान करावें १–३. पूर्वादिक दिशाच्या द्वारप्रदेशीं कामदेव, इंद्र, वराह व षण्मुख याची गंधादिकाच्या योगानें उत्तम प्रकारें पूजा करावी ४. त्याचें आवाहन करून स्थापना करावी व आठ मुद्रा दाखवाव्या. आसन देऊन त्याचें स्वागत करावें व पूर्वादि पात्रांमध्यें पाद्य, अर्घ्य व आचमनीय द्यावें ५. त्यानंतर ज्याचा वर्ण सुवर्णासारखा आहे, जो मलरहित आहे, जो उत्तम प्रकारें देदीप्यमान झाला आहे, जो सर्वतोमुख आहे, ज्याचें उदर मोठें आहे व ज्याच्या जिह्वा मोठ्या आहेत अशा अग्नीचें आकाश-रूपानें प्रणवादि मंत्राचा उच्चार करून होमाच्या समाप्तिकालीं निराळ्या प्रकारच्या गंधानीं व पुष्पानीं पूजन करावें ६,७. तेव्हाच मंत्रपुरःसर तीन प्रकारच्या जिव्हाचें ध्यान करावें; नंतर उपचारानीं पूजन करावें. ध्यानाचा मंत्र आताच सागणार आहें ८. " तूं सर्व भूताचें कारण आहेस; तूं संसारसागरातून तारणारा आहेस व तूं परम ज्योतीरूप आहेस. तूं हें आसन सफल कर. " अशा अर्थाच्या मंत्रानें आसन समर्पण करावें व पुष्पाचे तीन गुच्छ द्यावे. नंतर हात जोडून अगो-दर कुशल विचारावें ९,१०. "हे वैश्वानरा, तुला नमस्कार असो; हे हव्यवाहन, तुला मी वंदन करितों. बा श्रेष्ठ देवा, तुझें स्वागत असो; शाति कर; तुला नमस्कार असो ११. हे भगवन्, हे देव, हे आपोनारायणरूप, सर्व लोकाच्या हिताकरितां ह्या पाद्याचे ग्रहण कर १२. हे नारायणा, हे परम धाम, हे ज्योतीरूप, हे सनातन, मीं दिलेलें हें अर्घ्य घे. हे विश्वरूप, तुला नमस्कार असो १३. जो आदित्यरूपानें सर्व जगास प्रकाशित करितो त्या तुज प्रकाशरूप जातवेदास नमस्कार असो १४. हे धनंजय, हे सर्व पापाचा नाश करणाऱ्या, तुला वंदन करितों. मीं सर्व काम व अर्थ ह्याच्या

शरणं ते प्रयच्छामि देहि मे परमं पदम् १६ ज्योतिषां ज्योतीरूपस्त्वमनादिनिधनाच्युत। मया दत्तमलङ्कारमलङ्कुरु नमोऽस्तु ते १७ देवी देवा मुदं यान्ति यस्य सम्यक्समागमात्। सर्वदोषोपशान्त्यर्थं गन्धोऽयं प्रतिगृह्यताम् १८ त्वं विष्णुस्त्वं हि ब्रह्मा च ज्योतिषां गतिरीश्वर। गृहाण पुष्पं देवेश सानुलेपं जगद्धवन् १९ देवतानां पितॄणां च सुखमेकं सनातनम्। धूपोऽयं देवदेवेश गृह्यतां ते धनञ्जय २० त्वमेक सर्वभूतेषु स्थावरेषु चरेषु च। परमात्मा पराकारः प्रदीपः प्रतिगृह्यताम् २१ नमोऽस्तु यज्ञपतये प्रभवे जातवेदसे। सर्वलोकहितार्थाय नैवेद्यं प्रतिगृह्यताम् २२ हुताशन नमस्तुभ्यं नमस्ते रुक्मवाहन। लोकनाथ नमस्तेऽस्तु नमस्ते जातवेदसे २३ इत्यनेन तु मन्त्रेण दद्याद्विष्वेऽप्यधीतकम्। सर्वस्वं यज्ञसूत्रं च परमान्नं समाक्षिकम् २४ [८७६] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

सूत उवाच ॥ यज्ञभेदं त्रिभेदं च कर्मभेदं यथा यथा। यथा वेदानुसारेण यथा ग्रहणयोजनम् १ शतार्धे वह्निरुद्दिष्टः शतार्धे काश्यपः स्मृतः। घृतप्रदीपके विष्णुस्तिलयागे वनस्पतिः २ सहस्रे ब्राह्मणो नाम अयुते हरिरुच्यते। लक्षहोमे तु वह्निः स्यात्कोटिहोमे हुताशनः ३ वरुणः शान्तिके ज्ञेयो मारणे ह्यरुणः स्मृतः। नित्यहोमेऽनलो नाम प्रायश्चित्ते हुताशनः ४ लोहितश्चान्नयज्ञे यो ग्रहाणां प्रत्यनुक्रमात्। देवप्रतिष्ठायागे तु लोहितः परिकीर्तितः ५ प्रजापतिर्वा-

---

सिद्ध्यर्थ तुला हे स्नानीय उदक दिलें आहे १५. हे हुताशन, हे महाबाहो, हे देवाधिदेवा, हे सनातना, मी तुझा आश्रय करीत आहें. मला तूं परम पद दे १६. हे अनादिनिधना, हे अच्युता, तूं ज्योतींच्याही ज्योतीरूप आहेस. मीं दिलेले हे अलकार अंगावर घालून तूं अलकृत हो. तुला नमस्कार असो १७. ज्याचा संयोग झाला असता देवस्त्रिया व देव आनंदित होतात तो हा गंध सर्व दोषांच्या शात्यर्थ ग्रहण करावा १८. तू विष्णु, तूंच ब्रह्मदेव, तूंच सर्व ज्योतींचे कारण व ईश्वर आहेस. हे देवाधिदेवा, ह्या पुष्पाचें ग्रहण कर. ह्यान्या योगानें सर्व जग अनुलेपानें युक्त होईल १९. देवता व पितर ह्यास नित्य सुख देणारा असा हा धूप, हे देवाधिदेवा धनजया, तू ग्रहण करावास २०. तूंच एक सर्व चराचर भूतामध्ये आहेस. ह्यास्तव, तूं परमात्मा व श्रेष्ठस्वरूपी आहेस. ह्या उत्तम दीपाचें ग्रहण करावें २१. यज्ञाचा पति व प्रभु असा जो अग्नि त्यास नमस्कार असो. हे देवा, सर्व लोकान्च्या हिताकरितां नैवेद्याचा स्वीकार कर २२. हे हुताशना, तुला नमस्कार असो. हे रुक्मवाहना, तुला मी वंदन करितों. हे लोकनाथा, तुला नमस्कार असो; तुज जातवेदास मी वंदन करितो " २३. ह्या मंत्रानें दिव्य मंत्रपुष्प, सर्वस्व, यज्ञोपवीत व मधासह परमान्न समर्पण करावें २४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वापैकी प्रथम भागाचा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥

सूत ह्मणतातः—शास्त्राला जसे मान्य आहेत तसे यज्ञाचे भेद व कर्मभेद मी सागेन. ग्रहण कसें करावे व योजना कशी करावी हेही मी वेदास अनुसरून असेल तेच सागेन १. पन्नास आहुतींकरिता वह्नि व शतार्धहोमामध्ये काश्यप अग्नि सागितलेला आहे. घृतदीपकामध्ये विष्णु, तिलाच्या होमामध्यें वनस्पति २, सहस्रहोम कर्तव्य असता ब्राह्मणनामक व दहा हजार आहुति द्यावयाच्या असल्यास हरिनामक अग्नि सागितलेला आहे; लक्षहोमामध्यें वह्नि, कोटिहोमामध्यें हुताशन ३ व शातिकर्मामध्ये वरुणनामक अग्नि जाणावा. मारणकर्मामध्यें अरुण सागितलेला आहे. नित्यकर्मामध्ये अनलनामक अग्नि जाणावा. प्रायश्चित्तामध्यें हुताशन ४ व अन्नाच्या यज्ञामध्यें लोहितनामक अग्नि जाणावा. पण हे सर्व अग्नि ग्रहांच्या उलट अनुक्रमाने घ्यावे. देवाच्या प्रतिष्ठाकालीं जो

स्तुयागे मण्डपे चापि वह्निके । प्रपायां चैव नागाख्यो महादाने हविर्भुजः ६ गोदाने च भवेद्रुद्र कन्यादाने तु गोऽजकः । तुलापुरुषदाने च धाताऽग्निः परिकीर्तितः ७ वृषोत्सर्गे भवेत्सूर्योऽवसानान्ते रविः स्मृतः । पावको वैश्वदेवे च दीक्षापन्ने जनार्दन ८ त्रासने च भवेत्कालः कव्यादः शवदाहने । पर्णदाहे यमो नाम ह्यस्थिदाहे शिखण्डिक ९ गर्भाधाने च मरुतः सीमन्ते पिङ्गलः स्मृतः । पुंसवने रविन्द्र आख्यात प्रशस्तो यागकर्मणि १० नामसंस्थापने चैवमुपन्यस्ते च पार्थिव । निष्क्रम हाटकश्चैव प्राशने च शुचिस्तथा ११ षडानन्श्च चूडायां व्रतादेश समुद्भवः । वीतिहोत्रश्चोपनये समावर्ते धनञ्जयः १२ उदरे जठराग्निश्च समुद्रे वडवानलः । शिखायां च विभुर्ज्ञेयः स्वरस्याग्निः सरीसृपः १३ अश्वाग्निर्मन्थरो नाम रथाग्निर्जातवेदसः । गजाग्निर्मन्दरश्चैव सूर्याग्निर्विन्ध्यसञ्ज्ञकः १४ तोयाग्निर्वरुणो नाम ब्राह्मणाग्निर्हविर्भुजः । पर्वताग्निः क्रतुभुजो दावाग्निः सूर्य उच्यते १५ दीपाग्निः पावका नाम गृह्याग्निर्धरणीपतिः । घृताग्निश्च नलो वायुः सूतिकाग्निश्च राक्षसः १६ [८९२] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागेऽग्निनामवर्णनं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

सूत उवाच ॥ अथातो होमद्रव्याणां प्रमाणमभिधीयते । प्रमाणे चाप्रमाणे च निष्फलं भवति ध्रुवम् १ कर्षमात्रं घृतं होमे शुक्तिमात्रं पयः स्मृतम् । तत्सम पञ्चगव्यं च दधि दुग्धं तथा मधु २ मुष्टिमात्रेण पृथुका लाजाः स्युर्मुष्टिसंमिताः । शर्करा मुष्टिमात्रं च शर्करा तोलकं

याग होतो त्यात लोहिताग्नि सांगितलेला आहे ९. वास्तुयागामध्ये प्रजापति, मंडप, पद्मक, प्रपा इत्यादिकांच्या स्थापनादिकाली नागसंज्ञक व महादानामध्ये हविर्भुज अग्नि जाणावा ६. गोदानामध्ये रुद्र, कन्यादानामध्ये गोऽजक व तुलापुरुषदानामध्ये धातानामक अग्नि उक्त आहे ७ वृषोत्सर्गामध्ये सूर्य व अवसानाच्या अगी रवि सांगितलेला आहे. वैश्वदेवकर्मामध्ये पावक व अग्निहोत्राची दीक्षा घेतली असल्यास जनार्दन जाणावा. त्रासनकर्मामध्ये काल, शवाचे दहन कर्तव्य असता कव्याद, पर्णदाह कर्तव्य असता यमनामक व अस्थिदाह करावयाचा असल्यास शिखंडकनामक अग्नि समजावा ८, ९ गर्भाधानसंस्कारामध्ये मरुत् व सीमंतोन्नयनामध्ये पिंगल सांगितलेला आहे. पुंसवनकर्मामध्ये इंद्रनामक अग्नि सांगितलेला आहे. हा यागकर्ममध्ये प्रशस्त होय. नामकरणात पार्थिव असें अग्नीचे नाव ठेवावे. निष्क्रमणकाली हाटकसंज्ञक व तसाच अन्नप्राशनकाली शुचिसंज्ञक अग्नि जाणावा १०,११. चूडासंस्कारामध्ये षडानन व व्रतोपदेशसमयी समुद्भव अग्नि घेतात. उपनयनामध्ये वीतिहोत्र व समावर्तनसमयी धनंजयनामक अग्नि सांगितलेला आहे १२. उदरामध्ये जठराग्नि, समुद्रात वडवानल व शिखेमध्ये विभु अग्नि जाणावा. स्वराचा अग्नि सरीसृप होय १३. अश्वाच्या अग्नीचे नाव मंथर व रथाच्या अग्नीचे जातवेदस होय. गजाचा अग्नि मंदर व सूर्याचा अग्नि विंध्यनामक आहे १४. जलाच्या अग्नीचे नाव वरुण, ब्राह्मणाग्नीचे नाव हविर्भुज, पर्वताग्नीचे नाव क्रतुभुज व दावाग्नीस सूर्य म्हणतात १५. दीपाच्या अग्नीचे नाव पावक असे आहे. गृह्याग्नीचे नाव धरणीपति, घृताग्नीचे नाव नल व वायु आणि सूतिकेचा अग्नि राक्षस होय १६. ह्याप्रमाण श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वापैकी प्रथम भागाचा अग्निनामवर्णननामक सतरावा अध्याय संपूर्ण झाला ॥ १७ ॥

सूत म्हणतात:—आता ह्यापुढे होमाच्या द्रव्याचे प्रमाण सांगतो. भलतेच प्रमाण घेतल्यास किंवा प्रमाणावाचून हवन केल्यास कर्म खचित निष्फल होते १. होमामध्ये घृत कर्षप्रमाण (८० गुंजाभार) व दूध शिपीभर सांगितलेले आहे. पंचगव्य, दही, दूध व तसाच मध ह्यांचेही हेच मान

त्रिद्रुः ३ द्वितोलक गुडं विद्यादिक्षुपर्वविधिर्भवेत् । एकैक पत्रपुष्पाणि शालूकस्य त्रिमुष्टिकम् ४ एकलग्नेन जुहुयान्न पृथग्जुहुयात्क्वचित् । सबृन्तक जपापुष्पं केशरं तत्सबृन्तकम् ५ एकैकशश्च पद्मानां जलजानां तथैव च । जीवन्त्याः फलमानेन पिष्टकानां प्रसरूयया ६ वसन्तक धात्रिमाने मोदकस्य प्रमाणतः । एकैकशः फलानां च मातुलिङ्गस्य खण्डकम् ७ अष्टधा नालिकेरस्य पनसं दशधा भवेत् । पक्वबीजप्रमाणेन कूष्माण्डं चाष्टधा भवेत् ८ उर्वारुकं चाष्टधा च गुडूची चतुरङ्गुलम् । पूगमानं च मांसस्य सगुडं तत्र दृश्यते ९ अन्यत्र बदरीमानं तिन्दुकं च त्रिधा कृतम् । काष्ठ मादेशमात्रं स्यादूर्वायाश्च त्रिपत्रकम् १० पत्रभूर्जं च गृह्णीयाच्छमी प्रादेशमात्रकम् । व्रीहयो मुष्टिमात्राः स्युः शुक्तिमानेन सर्षपाः ११ मरीचाः स्युर्विमानेन मृणाल चाथ मूलकम् । सतखण्ड च वार्ताकी त्रिपुटा च त्रिधादितम् १२ चन्दनागुरुकर्पूरकस्तूरीकुङ्कुमानि च । तिन्तिडीबीजमानेन समुद्दिष्टानि देशिकैः १३ सनिधाप्लवने ऽप्युक्ततिलानामपि मध्यतः । दशक प्लावनेनैव सहस्राणां शतं विना १४ एवं व्रीहिप्लावने च काष्ठवदिक्षुदण्डकम् । भक्षणं मृदुपुष्पाणां लतादीनां तथैव च १५ पायसान्न तथाऽन्ने च मोदके पिष्टकेऽपि च । शाल्या शक्तेन जुहुयाद्व्ययेऽथ व्ययय फलम् १६ बिल्व-

जाणावे २. मुष्टिमानाने पोहें, मूठभरच लाह्या व साखरही मुष्टिमात्र सांगितलेली आहे किंवा साखरेचे प्रमाण एक तोळा सांगितलेले आहे ३. गुड (गुळ) दोन तोळे जाणावा. ऊंस एक पेरभर घ्यावा. पत्र व पुष्प एक एक घ्यावे. कमलाच्या कंदाचें प्रमाण तीन मुष्टि आहे ४. कोणतेंही द्रव्य एकदम घेऊन त्याची आहुति द्यावी. त्याचे भिन्नभिन्न हवन कधींही करूं नये. जासवदीच पुष्प देंठासह अग्नीत टाकावे व केशरपुष्पाचाही देंठासकट होम करावा ५. कमलें व तशींच जलात झालेली सर्व पुष्पे आहुतीमध्ये एक एक अशा प्रमाणाने घ्यावीं. हरणदोडी ह्मणून जी एक वेल आहे तिचा फलाच्या प्रमाणाने होम करावा. वडयाचे मान मोजून ठरवावे. मोदकाच्या प्रमाणाने वसंतातलि आवळीचे मान घ्यावे. कोणत्याही फलाचें एक एक हे साधारण मान होय. पण माहाळुगाचे तीन तुकडे करून त्यांतील एकेकाची आहुति द्यावी ६,७. नारळाच्या आठव्या भागाची व फणसाच्या दहाव्या भागाची एक आहुति होते. कमलाच्या बीजाच्या प्रमाणाने कोव्हाळ्याचे आठ भाग करावे ८. वालुकाच्या आठव्या भागाची आहुति द्यावी. गुळवेल आहुतीकरिता चार अगुंल घ्यावी. मासाचे सुपारीएवढे प्रमाण आहे. पण ते गुडासह असल्यास हे प्रमाण आढळते व इतरत्र त्याचे बोराएवढे प्रमाण सांगितलेले आहे. टेंभुरणीच्या फलाचे तीन भाग करून होम करावा. कोणत्याही काष्ठाचे प्रमाण टीचभर सांगितलेले आहे. दूर्वाच्या तीन पानाची आहुति द्यावी ९,१०. भूर्जाच्या एका पत्राचे प्रमाण घ्यावे. शमी टीचभर घ्यावी. व्रीहि मूठभर व मोहऱ्या शिर्पाभर घ्याव्या ११. मिऱ्याचे विशेष प्रमाण काहीच नाही. कमलाचे नाल व मूल ह्याच्या सातव्या भागाची एक आहुति द्यावी. डोरले, वागे व तेंडू ह्याच्या तिसऱ्या भागाचे आहुतिप्रमाण सांगितलेले आहे १२. चंदन, अगुरु, कापूर, कस्तूरी व कुंकूं ह्याचे प्रमाण आचार्यानीं चिचुक्याएवढे सांगितले आहे १३. समिधा घृतादिकात बुडवून अग्नीवर द्याव्या. तिळामध्ये घृत ओतावे. तात्पर्य, समिधा इत्यादिकाचे दशक बुडवूनच अग्नीवर द्यावें. पण सहस्र व शत ह्या संख्येस सोडून प्रस्तुत विधि करावा १४. व्रीहीच्या प्लावनामध्येही हाच प्रकार जाणावा. इक्षुदंडास काष्ठाप्रमाणेच बुडवावें. मृदु पुष्पे व लता ह्याचे प्रोक्षण करावें १५. पायसान्न, अन्न, तसेच मोदक व पिष्टही ह्याविषयीं जो अशक्त असेल त्याने साळीच्या योगाने हवन करावे. कारण, क्रमांमध्ये व्यत्यय झाल्यास त्याचे व्यत्यय हे फल सांगितले आहे १६. बिल्वफलाचे

पत्रस्य प्लवनं दण्ड हित्वा च प्लावयेत् । वृन्तसंप्लावनादेव फलं हरति राक्षसः १७ बिल्व-पत्रस्य पूर्वार्धप्लावमात्रेण योजयेत् । पत्रत्रयं तथा होमे छिन्ने भिन्नेऽतिदूषणम् १८ न विच्छि-न्नवनं कुर्यात्कृत्वा याति रसातलम् । तस्माच्च पुत्रशिष्यार्थैर्ब्राह्मणैस्तत्त्वकोविदैः १९ पूर्वाशाभि-मुखो भूत्वा पावयेच्च यथाक्रमात् । न न्यूनं नाधिकं कुर्याच्छान्तिपक्ष उदङ्मुखः २० पायसा-न्यन्यदेवेषु यत्नेन परिवर्जयेत् । न चाग्नौ दापयेत्प्राज्ञादेतेभ्यः प्रतिपादयेत् २१ कनिष्ठाङ्गु-लिमात्राद्य पर्वभूषणम् । गुणदोरकमानेन तावद्धोमगतिर्बुधा. २२ अङ्गुलैर्द्वित्रिचतुरैः पत्रहोमःक्रमात् २३ [९१५] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागेऽष्टा दशोऽध्याय. ॥ १८ ॥

सूत उवाच ॥ श्रीपर्णी शिंशपा क्षीरी बिल्वः खदिर एव च । स्रुवे प्रशस्तास्तरवः सिद्धिदा यागकर्मणि १ प्रतिष्ठायां प्रशस्तास्तु धात्रीखदिरकेशराः । संस्कारे शाशिभिन्नौ च धात्री धात्रा विनिर्मिता २ सप्राशोयः स्रुवः प्रोक्त संस्कारे यज्ञसाधने । प्रतिष्ठायां तु कथितास्तदन्यच्छास्त्रवे-दिभिः ३ स्रुव स्रुचमथो वक्ष्ये यदधीनश्च जायते । यज्ञेन सर्वक धार्यमक्षरेण च व्यत्ययः ४ तस्यादौ च स्रुव वक्ष्ये पच्च मान यदास्पदम् । काष्ठ गृहीत्वा बिल्वस्य रिक्तादितिथिव-र्जिते ५ समुपोष्य च रचयेदामिषाणि न च स्मरेत् । वर्जयदग्राम्यधर्मं च निर्माणे स्रुक्स्रुवस्य

प्लवन करावयाचे असल्यास त्याचे डेग्व सोडून तें भिजवावे. कारण, डेंग्व बुडविल्यामुळेंच राक्षस फल हरण करितो १७. तात्पर्य, बिल्वपत्राचा पुढील जो अर्धा भाग असतो तेवढाच घृतादिकामध्ये बुडवावा. त्याचप्रमाणे होममयी त्रिदल असावे. ते छिन्न किंवा भिन्न झालेले असल्यास फार मोठा दोष लागतो १८. विशेषत त्यास तीन वेळ बुडवू नये. कारण, तसें केल्यास कर्ता रसातळास जातो. ह्यास्तव, पुत्र, शिष्य इत्यादिकांनी व तत्त्वज्ञ ब्राह्मणांनी १९ पूर्वदिशेकडे तोंड करून अनुक्रमाने द्रव्य पवित्र करावे. हे प्लवन कमी किंवा अधिक करू नये. शांतिपक्षामध्ये उत्तराभिमुख होऊन हे कर्म करावे २०. पायसान्ने इतर देवांचे ठायी प्रयत्नानें वर्जावी ह्मणजे ती अग्नीमध्ये टाकू नयेत; तर प्रयत्नपूर्वक त्यास अर्पण करावी २१. कनि-ष्ठांगुलीच्या मानाचे पर्वभूषण करावे. ते धनुष्याच्या गुणाच्या दोरीसारखे असावे. हे ज्ञानी पुरुष-हो, तेवढीच होमाची गति आहे २२. साराश, पत्रहोमाची आकृति क्रमानें दोन, तीन किंवा चार अंगुलानी करावी २३. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या प्रथम भागाचा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥

सूत ह्मणतात — स्रुवा करण्यास शिवर्णा, शिसवा, खैर, रुई व बेल हे वृक्ष प्रशस्त व यज्ञ-कर्मामध्ये सिद्धि देणारे आहेत १. प्रतिष्ठाकर्मामध्ये आवळी, खैर व कुडिण हे वृक्ष प्रशस्त होत. संस्कारामध्ये व शाशिभिन्न कर्मामध्ये स्रुवा करण्याकरिता ब्रह्मदेवाने आवळीचा वृक्ष निर्माण केला आहे २. यज्ञाने सिद्ध होणाऱ्या संस्कारामध्ये सप्राशोय स्रुवा सांगितलेली आहे. पण प्रतिष्ठाकर्मी-मध्ये शास्त्रवेत्त्यानी त्याहून भिन्न स्रुवा सांगितलेली आहे ३. आता स्रुवा व स्रुचा ह्याचे वर्णन करितो. कारण, यज्ञ त्याच्या द्वाराच होत असतो. यज्ञाच्या योगानेच सर्वांचे धारण करावे. स्रुवा व स्रुचा ह्यामध्ये एका अक्षरानेच व्यत्यय झाला आहे ४. आता प्रथमत स्रुवेचे काय प्रमाण असावे व त्याचे अधिष्ठान काय आहे ते सागतो. रिक्तादिरहित अशा शुभ तिथीवर बिल्वकाष्ठ घेऊन व त्या दिवशी उपोषण करून तिची रचना करावी. आमिषादि अमंगल पदार्थाचे स्मरण करूं नये. स्रुचा व स्रुवा ह्यास तयार करीत असता ग्राम्य धर्माचा त्याग करावा ५,६. असो, पूर्वोक्त

वै ६ काष्ठ गृहीत्वा विभजेद्भागं विंशत्तथा पुनः । विंशदङ्गुलमान तु कुण्डवेदिसमोदरम् ७ कटाहाकारनिम्न च स्रुव कुर्याद्विचक्षणः । धात्रीफलसमाकार स्वधानिम्न सुशोभनम् ८ वेद्यां शूर्पाकृतिं कुर्यात्कुलानि परिकल्पयेत् । हंसवत्त्रिगुणो वापि हस्तेनानु मुख लिखेत ९ स्रुव चतुर्विंशतिभिर्भागैश्च रचयेद्ध्रुवम् । द्विविंश स्यात्कुण्डमानमदैवे तस्य कीर्तितम् १० चतुर्भिरङ्गैरानाह. कर्षाग्र्य ततः स्रुवः । अङ्गद्वयेन लिखयेत्पद्मं मृगमदाकृतिः ११ दण्डमूलाश्रये दण्डी भवेत्कङ्कणभूषितः । सौवर्णस्य च ताम्रस्य कार्या दर्वी प्रमाणतः १२ श्रैपर्णिकोद्भव यच्च इन्दुवृक्षसमुद्भवम् । क्षीरवृक्षसमुद्भूतं द्वादशाङ्गुलसमितम् १३ द्व्यङ्गुलं मण्डल तस्य दर्वी सा यज्ञसाधने । चत्वारिंशत्तोलिकाभिरिति ताम्रमयस्य च १४ पञ्चाङ्गुल मण्डल च अष्टहस्त च दण्डकम् । अन्नादिपायसविधौ दर्वी यज्ञस्य साधने १५ दशतोलकमानेन सा च दर्व उदाहृता । आज्यसंशोधनार्थं तु सा तु ताम्रमयस्य च १६ षोडशाङ्गुलमानेन सर्वाभावे च पैप्पलम्। आज्यस्थाली काष्ठमयी मृन्मयी च समाश्रयेत् १७ अथ ताम्रमयी कार्या न च ता तत्र योजयेत् १८ [९३३] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे स्रुवदर्वीनिर्णयो नामैकोनविंशोऽध्याय. ॥ १९ ॥

सूत उवाच ।. अथ पूर्णविधिं वक्ष्ये यथा शास्त्रार्थवेदिनाम् । यस्य सम्यक्समुत्थानात्सपूर्णं स्यादिति स्थितिः १ होमपूर्तौ मोक्षकल्पः पूजान्तेऽर्घ्यो विधीयते । अथ तस्य च पूर्णायां हत-

---

काष्ठ घेऊन ते विरावे व त्याचे पुनरपि तीस भाग करावे. जिचे प्रमाण वीस अंगुले आहे, जिचे उदर (मध्यभाग) कुंडाच्या वेदीसारखे आहे व जी कढईसारखी खोल आहे अशी स्रुवा बुद्धिमानानें करावी. त्याचप्रमाणे ती आवळ्याच्या फळासारखी चागली खोल व सुदर असावी ७,८. वेदीमध्यें शूर्पाकृति करावी. त्याला कुलाची कल्पना करावी. हंसाप्रमाणे किंवा तिप्पट भागावर हाताने मुखाची आकृति लिहावी. चोवीस भागानीं स्रुवा करावी. दैवकर्मावाचून इतर कर्मामध्यें दोन किंवा तीन अश हे त्याचे प्रमाण सागितलेले आहे. चार अंगानीं त्याचा बध करावा; कर्षादि प्रमाणाचें अग्र करावें व नतर दोन भागानी स्रुवा खोदावी. चिखलामध्ये कस्तूरीचा आकार करावा ९–११. दंडाच्या मूलाचा आश्रय केल्यास ककणाने भूषित असा यजमान दडयुक्त होतो. असो, प्रमाणानें सुवर्णाची किंवा ताब्याची दर्वी करावी, यज्ञाच्या साहित्यामध्ये जी दर्वी घ्यावयाची असेल तिचें मंडल शिवणीचें, किंवा इदुवृक्षाचे अथवा क्षीरवृक्षाचे बारा अगुलप्रमाणाचें असावे व ताब्याची दर्वी कर्तव्य असल्यास चाळीस तोळे ताबे घेऊन त्याची करावी १२–१४. तिचे मडल पाच अगुलें विस्तृत असावे व दड आठ अगुलें किंवा हातभर असावा. अन्नादि, पायस इत्यादि कर्तव्य असता दर्वीचा यज्ञाच्या साधनात उपयोग होतो. आज्याच चागले शोधन करण्याकरिता जी ताम्रमय दर्वी कर्तव्य असते ती दहा तोळे प्रमाणाने करावी असे सागितलेले आहे १५,१६. ह्यापैकी कोणतीच दर्वी नसल्यास षोडशागुलप्रमाणाची पिंपळाची करावी. आज्यस्थाली काष्ठमयी किंवा मृन्मयी घ्यावी १७. आता ताम्रमयीही करणें योग्य आहे, पण तिची प्रत्यक्ष कर्मामध्ये योजना करू नये १८. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या प्रथम भागाचा स्रुवदर्वीनिर्णयनामक एकोणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥

सूत ह्मणतातः—आता शास्त्रार्थवेत्त्यास जसा संमत आहे तसा पूर्णविधि सागतों. जो विधि चागल्या प्रकारे झाला असता यज्ञ संपूर्ण होतो अशी स्थिति आहे १.होम पूर्ण झाला असता यजमान मोक्षास समर्थ होतो. पूजेच्या अंती अर्घ्याचें विधान आहे व हा विधि पूर्ण न झाल्यास यजमान श्रीशून्य होतो व

श्रीयुक्तश्चेतां २ तस्मात्सर्वप्रयत्नेन स्रुवार्धौ विन्यसेच्चरुम् । पूर्णां दत्त्वा संविशेऽथ ब्राह्मणान्भोजयेत्ततः ३ गृहं प्रविश्य च ततः कुलपूजां समाचरेत् । सत्ते देहि मे पूर्णा पुनातीति ऋचा क्रमात् ४ नियोजयेत्प्रतिष्ठायां नित्यनैमित्तिके शृणु । पुनातीति ऋचा पूर्णा प्रथमा परिकीर्तिता ५ सत्ते इति द्वितीया स्याद्देहि मेति तृतीयका । पूर्णा दर्वी चतुर्थी स्यात्कुलेऽवस्थाप्य शेषिकः ६ उत्थाय दद्यात्पूर्णां तु नोपविश्य कदाचन । कनकायां च जिह्वायां रक्तायां ग्रहयागके ७ ग्रहहोमे शतान्ते च पूर्णा एका विधीयते । सहस्रान्ते युगं दद्यादयुतान्ते चतुर्थकम् ८ सहस्रान्ते ददेदेकं पुष्पहोमे च सत्तमाः । पूर्णा त्वेकसहस्रं तु दद्याद्यज्ञफलेप्सया ९ मृदुपुष्पाकृतौ त्वेका केवले चेक्षुहोमके । शतं हे च शते चैव गर्भाधानान्नप्राशने १० सीमन्तोन्नयने चैव प्रायश्चित्ताकृतीषु च । वैश्वदेवे च नित्ये च पूर्णा त्वेका विधीयते ११ एवं स्रुचौ समौ कृत्वा उपर्युपरि विन्यसेत् । यथा न व्ययते कृत्वा न कल्पयति यावता १२ ऋषिश्छन्दादिकं श्रुत्वा प्रतिमन्त्रस्य सत्तमाः । अन्यथाऽल्पाल्पकफलं तस्मात्सन्यस्य होमयेत् १३ सत्ततेति ब्राह्मणस्य ऋषिः कौण्डिन्यभाषितः । जगती च भवेच्छन्दो देवताऽग्निः प्रकीर्तितः १४ देहि मेति च मन्त्रस्य प्रजापतिर्ऋषिः स्मृतः । अनुष्टुप च भवेच्छन्दो देवताऽस्याः प्रजापतिः १५ पूर्णा दर्वीति मन्त्रस्य शतक्रतुर्ऋषिः स्मृतः । छन्दोऽनुष्टुप्समाख्यातं वह्निश्चैवात्र देवता १६ पुनातीति च मन्त्रस्य ऋषिः स्यात्पवनः स्मृतः । छन्दोऽपि जगती ख्यात देवताऽग्निश्च कीर्तितः १७ तूष्णीं पूर्णां यज्ञमध्येन कुले द्विजसत्तमाः । न चाशिषं यज्ञमध्ये अभिषेकं च तर्पणम् १८ ऋत्विक्छन्दः स्पृशन्मन्यग्दक्षि-

---

यज्ञाचा भ्रंश होतो २. ह्यास्तव, मोठ्या प्रयत्नानें स्रुवेच्या खालीं चरु ठेवावा; पूर्णाहुति देऊन सूर्यास अर्घ्य द्यावें व नंतर ब्राह्मणभोजन घालावें ३. तदनंतर गृहामध्ये प्रवेश करून कुलपूजा करावी. 'सत्त ते०' 'देहि मे०' 'पूर्णा' 'पुनातु०' या ऋचांच्या योगानें क्रमानें प्रतिष्ठेमध्ये नित्य व नैमित्तिक कर्मांमध्यें योजना करावी. ती कशी ह्मणाल तर ऐका. 'पुनातु०' इत्यादि मंत्रानें प्रथम पूर्णाहुति सांगितलेली आहे ४,५. 'सत्त ते०' इत्यादि मंत्रानें दुसरी, 'देहि मे०' ह्या मंत्रानें तिसरी व 'पूर्णा दर्वी०' ह्या मंत्राने चवथी आहुति द्यावी ६. पूर्णाहुति उठून द्यावी, बसून कधींही देऊ नये. ती इतर सर्व कर्मांमध्यें कनकानामक जिव्हेंत व ग्रहयज्ञात रक्तानामक जिव्हेंत द्यावी. ७. ग्रहयज्ञामध्ये शंभर होमाच्या अंतीं एक पूर्णाहुति सांगितलेली आहे. हजाराच्या अंतीं दोन व दहा हजाराच्या अंतीं चार पूर्णाहुति द्याव्या ८. हे सज्जनहो, पुष्पहोमामध्यें हजार आहुतींच्या अंतीं एक पूर्णाहुति द्यावी. ह्याप्रमाणें यज्ञफलाच्या इच्छेनें सामान्यतः एक सहस्र होमामागें एक पूर्णाहुति द्यावी. मृदु पुष्पाच्या होमामध्ये किंवा केवल उसांच्या होमामध्यें एक आहुति द्यावी. गर्भाधान व अन्नप्राशन ह्यामध्ये शंभर व दोनशे ह्याच्या मागे एक द्यावी ९,१०. सीमंतोन्नयन, प्रायश्चित्ताकृति व नित्य वैश्वदेव ह्यामध्ये एक आहुति सांगितलेली आहे ११. ह्याप्रमाणें दोन स्रुचा सारख्या करून विच्छेद होणार नाहीं किंवा स्पर्शादि होणार नाहीं अशा बेताने वर वर आहुति सोडावी १२. हे सज्जनहो, प्रत्येक मंत्राचा ऋषि, छंद इत्यादि ऐकून आहुति द्याव्या. कारण, तसें न केल्यास होमाचें अतिअल्प फल मिळतें. ह्यास्तव, न्यास करून होम करावा १३. 'सत्त ते' इत्यादि ब्राह्मणाचा ऋषि कौंडिन्य सांगितलेला आहे. छंद जगती आहे व देवता अग्नि सांगितली आहे १४. 'देहि मे' ह्या मंत्राचा ऋषि प्रजापति, छंद अनुष्टुप् व देवता प्रजापति होय १५. पूर्णा दर्वी ह्या मंत्राचा ऋषि शतक्रतु, छंद अनुष्टुप् व देवता अग्नि सांगितलेली आहे १६. 'पुनातु' ह्या मंत्राचा ऋषि पवन होय; जगती छंद व देवता अग्नि झणून लटलेलें आहे १७. हे ब्राह्मणहो, चवथी पूर्णाहुति यज्ञामध्ये देऊ नये, तर कुलामध्ये द्यावी.

णाङ्गमथापि वा । यजमानः सपत्नीको महोत्सवपुरःसरम् १९ विश्वामित्रोऽयुतं तत्र होमं कुर्याद्विचक्षणः । लवली बदरी शस्ते पिचुमन्दकच्छव्रकम् २० नागरङ्गं धातकी च पूर्णायां च विवर्जयेत् । जप्यहानिरसख्याते होमभ्रंशश्च जायते २१ तस्मात्प्रागेव च तिलान्गणित्वा स्थापयेत्पृथक् । युगपन्नगणेद्यस्तु न चाङ्केन कदाचन २२ धातक्याश्च फलैः सख्या कर्तव्या फलमिच्छता । बदर्याश्च लवल्याश्च फलैः सर्वार्थसिद्धये २३ नागरङ्गफलैरेव धातक्या बकुलैः फलैः । यज्ञहानिकरं यस्मात्तस्मात्तत्परिवर्जयेत् २४ कर्पूरचन्दनै कुर्याद्धालिकां यज्ञसिद्धये । गङ्गामृत्तिकया युक्तः शुनिकामथवा द्विजः २५ रक्तगुञ्जफलैः सख्या पुष्टिकामेषु योजयत् । शतार्धे च शते चैव सहस्रे च तथैव हि २६ होता स्यादयुतेनापि एकाह्ने वेदसख्यया । ऋणमाधर्यो भवेद्धोता त्रय एव द्विजोत्तमाः २७ लक्षहोमे तु होतारः षडेव परिकीर्तिताः । कोटिहोमे तु विप्राः स्युः प्रशस्ता. पक्तिसंख्यया २८ न वा पञ्चदश दशक पञ्चविंशमथापि वा । कामक्रोधविहीनाः स्युरृत्विज शान्तचेतस. २९ नवग्रहमखे विप्राश्चत्वारो वेदवर्तिनः । अथवा ऋत्विजौ शान्तौ द्वावेव परिकीर्तितौ ३० कार्यावयुतहोमे तु न प्रयोजयत विस्तर । तद्वत्स दशधा चाष्टौ नवहोमे तु ऋत्विजः ३१ कर्तव्याः शक्तितस्तद्वच्चत्वारोऽपि विमत्सराः । तेषां पूजयेद्ब्रह्मा द्वौ वा त्रीन्वा यथाविधि ३२ एकमप्यर्चयेद्ब्रह्मा सहस्रे त्वेकब्राह्मणम् । दक्षिणाभिः प्रयत्नेन निर्वहेदल्पवित्त-

त्याचप्रमाणे आशीर्वाद, अभिषेक व तर्पणही यज्ञामध्ये वर्ज्य आहे १८. छंदास स्पर्श करून किंवा पूर्णपणे उजव्या अंगास स्पर्श करून ऋत्विजांनी, महोत्सवपुरःसर सपत्नीक यजमानाने अथवा विश्वामित्रगोत्रीयाने होमाची गणना करावी. अशा अवस्थेत शंभर होमांनी दहा हजार होम करावा. लवली व बोरे प्रशस्त आहेत पण लिंबोळ्या, छत्रक, नारिंग व धातकी ह्यांचा भोजनाकडे उपयोग करू नये. भोजनावाचून जप केल्यास जपाची हानि व होमाचा भ्रंश होतो १९–२१. ह्यास्तव, पूर्वीच तिल भाजून एकीकडे ठेवावे किंवा एकाच काळी भाजावे; थोडेथोडे कधीच भाजू नयेत २२. ज्यास फलाची इच्छा असेल त्याने धायटीच्या फलांनी गणना करावी किंवा सर्वार्थसिद्धिकारिता बोरीच्या किंवा लवलीच्या फलांनी भोजदाद करावी २३. नारिंगफले, धायटी व बकुलफले यांनी गणना केल्यास यज्ञाची हानि होत असते. ह्यास्तव, त्याचा परित्याग करावा २४. कापूर व चंदन ह्यांच्या योगाने यज्ञाच्या सिद्धयर्थ होळी करावी किंवा हे ब्राह्मणहो, गंगेच्या मृत्तिकेनें युक्त होऊन शुनिका करावी २५. पुष्टीची इच्छा असता पन्नास, शंभर व तसाच सहस्र होम असल्यामही त्या त्या काम्य होमाची संख्या लाल गुंजांनी करावी २६. दहा हजार होमामध्येही तो होम एका दिवसात समाप्त व्हावयाचा असल्यास चार होते करावे. मुख्य होता द्रव्यसाध्य असतो व हे उत्तम ब्राह्मणहो, इतर तीनही द्रव्यसाध्यच आहेत २७. लक्षहोमामध्ये सहा होते सांगितलेले आहेत. कोटिहोमामध्ये तर हे ब्राह्मणहो, दहा होते प्रशस्त होत २८. पंधरा होते कधीच प्रशस्त नाहीत. दहा किंवा पंचवीस हीच त्याची प्रशस्त संख्या होय. ऋत्विज काम व क्रोध ह्यांनी रहित व शांत चित्ताचे असावेत २९. नवग्रहांच्या यज्ञामध्ये वेदवेत्ते चार ब्राह्मण असावेत किंवा दहा हजार होमामध्ये दोनच शांत ऋत्विज असावेत असे सांगितलेलें आहे. तात्पर्य, फार विस्तार करू नये. त्याचप्रमाणे नवग्रहांच्या होमामध्ये दहा किंवा आठ ऋत्विज करावे किंवा आपल्या शक्तीप्रमाणे मत्सररहित असे चार ऋत्विजच करावे. ब्रह्मयाने त्या एका, दोन किंवा तीन ऋत्विजांची पूजा यथाविधि करावी ३०–३२. ब्रह्मयाने एकाचीही पूजा करावी. ज्याच्या जवळ थोडें वित्त असेल अशा गरीब यजमानानें सहस्रहोमामध्ये एका ब्राह्मणासच दक्षिणेच्या योगानें प्रयत्न-

वान् ३३ लक्षहोमस्तु कर्तव्यो यदा वित्त भवेन्नरा। यत सर्वमवाप्नोति कुर्यात्कामविधानतः ३४ पूज्यते शिवलोके च वस्वादित्यमरुद्गणै । यावत्कल्पशतान्यष्टावन्ते मोक्षमवाप्नुयात् ३५ अकामो यस्त्विम कुर्याल्लक्षहोम यथाविधि । शतकामनवाप्नोति पद चानन्त्यमश्नुते ३६ पुत्रार्थी लभते पुत्रं धनार्थी लभते धनम् । भार्यार्थी लभते भार्यां कुमारी च शुभं पतिम् ३७ भ्रष्टराज्यस्तथा राज्य श्रीकामः श्रियमाप्नुयात् । य य कामयते कामं सर्वं प्राप्नोति पुष्कलम् ३८ निष्कामः कुरुते यस्तु परं ब्रह्माधिगच्छति । तस्माच्छतगुणः प्रोक्तः कोटिहोमः स्वयम्भुवा ३९ आचार्य एव होता स्याद्ब्राह्मणानामसभवे । न योजयेदेकमेव चायुते होमकर्मणि ४० दर्भासनेऽतो न कुर्श तृण पत्रे त्वचेऽपि च । पाषाणे मृत्तिकायां च न च वस्त्रासने क्वचित् ४१ तत्र दारुमय कुर्यादागम भजत द्विज. । दान दद्याच्च होमान्ते पूर्णादौ च यथा भवेत् ४२ द्विजसस्कारकार्येषु पूर्णादौ चापि दक्षिणा । मन्त्रोपासनकार्येषु सामयागेऽश्वमेधके ४३ [९७६] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभागे विंशोऽध्यायः ॥ २० ॥

सूत उवाच ॥ अथातो मण्डलं वक्ष्ये पुराणेषु यथोदितम् । यदर्धाना भवेत्सिद्धिस्तस्मात्कुर्यात्समाहितः १ देवा. पद्मासनस्थाश्च भविष्यन्ति वसन्ति च । विनाऽब्जं नार्चयेद्देवमर्चिते यक्षिणी हरेत् २ अतो मण्डलविच्छेद यस्माद्दोषगुणं भवेत् । रजःसाध्ये शतगुण केवल द्विगुण फलम् ३ त्रिशत वन्दने साध्ये सहस्र च रजोऽष्टके । रजोभिः षोडशैर्बिम्ब शत शतम-

पूर्वक सतुष्ट करावे ३३. जेव्हा वित्त असेल तेव्हाच लक्षहोम करावा. कारण, काम्य विधान केल्याने सर्व फल प्राप्त होते ३४. एकेक आठ कल्पपर्यंत तो याजक शिवलोकी वसु, आदित्य व मरुद्गण ह्यान्याकडून पूजिला जातो व शेवटी त्यास मोक्ष मिळतो ३५. जो निष्काम पुरुष यथाविधि हा लक्षहोम करितो त्याचे शभर मनोरथ परिपूर्ण होतात व त्यास अनत फलाची प्राप्ति होते ३६. जो पुत्रार्थी असेल त्यास पुत्र होतो, जो धनार्थी असेल त्यास धन मिळते, ज्याला आपल्यास भार्या मिळावी अशी इच्छा असते त्याचा विवाह होतो व कुमारीस शुभ पतीची प्राप्ति होते ३७. जो राजा राज्यापासून भ्रष्ट झालेला असेल त्यास राज्य व ज्यास सपत्तीची इच्छा असेल त्यास सपत्ति प्राप्त होते. तात्पर्य, यजमान ज्या ज्या कामाची कामना करितो तो तो सर्व त्यास पुष्कळसा प्राप्त होतो ३८ व जो कामनेवाचून हे कर्म करितो त्यास परब्रह्माची प्राप्ति होते. ह्यास्तव, कामनेवाचून केलेला कोटिहोम शतपट फल देतो असे स्वयभूने सागितले आहे ३९. ब्राह्मणाचा असभव असल्यास आचार्यच होता होतो. अयुतहोमामध्ये एकाचीच योजना करू नये ४०. ह्यास्तव, दर्भासनावर ब्राह्मणाचे आव्हान करावे. कुश, तृण, पत्र, त्वचा, पाषाण, मृतिका व वस्त्रासन ह्यावर त्याचे आवाहन कधीही करू नये ४१. काष्ठमय आसन करून आह्वान केल्यानें त्यावर ब्राह्मण येऊ शकतो. होमाच्या शेवटी दान द्यावे. पण ते पूर्णाहुतीच्या पूर्वी द्यावे ४२. ब्राह्मणाच्या सस्कारकर्मामध्ये पूर्णाहुतीच्या पूर्वी दक्षिणाही द्यावी. त्याचप्रमाणे मंत्रोपासनकर्मामध्ये, सोमयागामध्ये व अश्वमेधामध्येही असेच करावे. ४३. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या प्रथमभागाचा विसावा अध्याय सपूर्ण झाला ॥ २० ॥

सूत ह्मणतात:— पुराणामध्ये जसे सागितले आहे तसे आता मी मडल सागतो. मडलाच्या योगानेच सिद्धि होत असल्यामुळे सावधानपणें मडल करावे १. देव पद्मासनावर वसतात व तेथेच राहतात. कमलावाचून देवाची पूजा करू नये. केल्यास यक्षिणी तिचे हरण करिते २. ह्यास्तव. मंडल अवश्य करावे. त्याच्या योगाने दसपट फल मिळते. पुष्पातील परागानी मंडलें केल्यास

नन्तकम् ४ यन्त्रे मणौ शालग्रामे प्रतिमायां विशेषत । महालये महायोनौ रक्तलिङ्गे च साधिकम् ५ रजोयुक्तं लिखेद्यस्तु पूजाकाये विभूतये । मरणादिफल यस्मात्तस्मात्तत्परिवर्जयेत् ६ चतुरस्र नवव्यूहं क्रौञ्चघ्राणं चतुर्विधम् । कामबीज वज्रनाभ विघ्नराज गजाह्वयम् ७ पारिजातं चन्द्रबिम्बं सूर्यकान्त च शेखरम् । शतपत्र सहस्रार नवनाभ च मुष्टिकम् ८ पञ्चाब्ज चैव मैनाक कामराजं च पुष्करम् । अष्टास्र चैव श्रीबिम्ब षडस्रं त्र्यस्रमेव तु ९ चत्वारिंशत्तथा पञ्चभिरधिक परिसंख्यया । चतुरस्र नवव्यूह वैष्णवे यागकर्मणि १० प्रशस्त चापि गोमेधे क्रौञ्च घ्राण चतुर्विधम् । सुभद्र चाश्वमधे च नरमेधे नराशनम् ११ सर्वत्र सर्वतोभद्र चतुरस्रं सुभद्रकम् । कामराज तथा त्र्यस्रमष्टास्र च षडस्रकम् १२ शक्तानां कामपक्षे च पञ्चसिंहासनं महत् । धान्याचले मेरुपृष्ठ मणिमुक्ताचलेष्वपि १३ सहस्र शतपत्र च अन्नदाने तिलाचले । हरिवल्लभं राजसूये सोमयागेषु शस्यते १४ प्रतिष्ठायां सुभद्र च सर्वतोभद्रमेव च । जलाशयप्रतिष्ठायां विघ्नराज प्रशस्यते १५ घटप्रस्थापने चैव गजाह्व तुरगासनम् । शतपत्र लक्षहोमे अयुते चतुरस्रकम् १६ यस्य यस्त्रस्य यद्बिम्ब तत्तु तेनैव योजयेत् । इतोऽन्यथा भवेद्दोषो विपरीतेष्वधोगति १७ द्विहस्त चतुरस्र च वेदिका परिकीर्तिता । चतुरङ्गुलोच्छ्रायमित षडङ्गुलमथापि वा १८ षडङ्गुल नवव्यूहे वर्धयेद्यज्ञकोविद । एकाङ्गुलसमुत्सेध. कर्तव्यः सुसमाहितैः १९ कौञ्चघ्राणे तूर्यहस्त मुष्टिहस्त समुच्छ्रितम् । मध्यद्वये

शतपट व केवल सामान्य मंडल केल्यास द्विगुणित फल प्राप्त होते ३. ते वदनक्रियासाध्य असल्यास तीनशेपट फल व आठ प्रकारच्या रजानी केलेल्या मडलापासून सहस्रपट फल प्राप्त होते. सोळा प्रकारच्या रजानी बिंब करावें. ह्मणजे शतपट व अनतपट फल मिळते. महालय, महायोनि, लाल लिंग इत्यादिक साधन कर्तव्य असल्यास व ऐश्वर्याकरिता पूजा कर्तव्य असता रजोयुक्त मंडल जो लिहितो त्यास मरणादिरूप फल सांगितलेले असल्यामुळे असल्या मंडलाचा त्याग करावा ६. चतुरस्र, नवव्यूढ, क्रौंच, चार प्रकारचें घ्राण, कामबीज, वज्रनाभ, विघ्नराज, गजाह्वय ७, पारिजात, चंद्रबिंब, सूर्यकांत, शेखर, शतपत्र, सहस्रार (हजार पाकळ्यांचे), नवनाभ, मुष्टिक पंचाब्ज, मैनाक, कामराज व पुष्कर, अष्टास्र, श्रीबिंब, षडस्र, त्र्यस्र, इत्यादि मोजून चाळीस किंवा त्याहून पाचानी अधिक ह्मणजे पंचेचाळीस प्रकारचीं मंडले आहेत. विष्णुदेवताक यज्ञकर्मामध्ये चतुरस्र व नवव्यूह मंडल प्रशस्त होय. गोमेधामध्ये क्रौंच व चार प्रकारचे घ्राणनामक मडल विहित आहे. अश्वमेधामध्ये सुभद्र व नरमेधामध्ये नराशननामक मंडल प्रशस्त होय ८–११. सर्व कर्मामध्यें सर्वतोभद्र, चतुरस्र व सुभद्रक, कामराज, तसेंच त्र्यस्र, अष्टास्र व षडस्र मंडल विहित समजावे १२. त्र्यास शक्ति असेल अशा पुरुषानीं काम्य कर्मामध्ये मोठे पंचसिंहासन करावे. धान्याचली व मणिमुक्ताचली मेरुपृष्ठ करावे १३. अन्नदान व तिलाचल ह्यामध्ये सहस्र व शतपत्र, राजसूयामध्ये व सोमयागामध्ये हरिवल्लभमंडल सांगितलेले आहे १४. प्रतिष्ठेमध्ये सुभद्र व सर्वतोभद्र व जलाशयाच्या प्रतिष्ठेमध्ये विघ्नराजमंडल प्रशस्त आहे १५. घटप्रस्थापनेमध्ये गजाव्ह व तुरगासन, लक्षहोमामध्ये शतपत्र आणि अयुतहोमामध्ये चतुरस्रक मडल प्रशस्त समजावे १६. ज्या यज्ञाचे जे बिंब असेल त्याची त्याच्यामध्येच योजना करावी. नाहींपेक्षा दोष उत्पन्न होतो व विपरीत प्रकारचे अवलंबन केल्यास अधोगति मिळते १७. दोन हात प्रमाणाची चौकोनी वेदि सांगितलेली आहे. तिची उंची चार अंगुले किंवा सहा अंगुले असावी १८. यज्ञकृत्यातील पंडितानें नवव्यूह मंडलामध्ये सहा अंगुले विस्तार करावा व अतिशय शांत पुरुषानी त्याची उंची एक

हीनकरं कनिष्ठं व्यङ्गुलाधिकम् २० तुर्यादृद्विविक्रमाद्धीनमुच्छ्राये द्विजसत्तमाः । पारिजातं चन्द्रबिम्बं सूर्यकान्तं च शेखरम् २१ ग्रहाणां पौष्टिके पक्षे बाह्यग्रामादिसाधने । लिखेज्जयेच्च तत्र वेदिका चक्रकत्रयम् २२ प्रथमं मुष्टिहस्तः स्यात्संपूर्णे शेषमानकैः । नवलाभे च पञ्चाज्ज करत्रयमुदाहृतम् २३ शेषा चैव वरिष्ठा च लवला भित्तिवेदिका । विज्ञेया द्विजशार्दूला यथा काम्येषु योजयेत् २४ अयथा व्यत्ययं दोषस्तस्माद्यत्नेन साधयेत् । दश हस्ते चार्धहस्तमष्टहस्ते च षोडशम् २५ मुष्टिबाहौ च मादशं वर्धयेत्षोडशांशके । हस्तोत्सेधं च कर्तव्यं हीने हीनं च ह्रासयेत् २६ दर्पणाकारकं कुर्याद्यागके शान्तिकर्मणि । हीनं कुर्यात्प्रयत्नेन वपाकारं परिस्तवेत् २७ निशारणैर्गोमयेश्च वेदिकां च प्रलेपयेत् । स्वर्णरत्नमयैस्तोयैरभिषिच्य कुशोदकैः २८ हीनवीर्यगवानां च पुरीष धेनुक तथा । कपिलायाश्च यत्नेन कुण्डमण्डललेपने २९ वर्जयेत्सर्वयागेषु स्थण्डिलेषु प्रयत्नतः । विना सूत्रैः कीलकैश्च मण्डले नैव सूत्रयेत् ३० तस्मात्प्रयत्नतः कार्यं यत्नेन यच्च कीलकम् । अर्कहस्तमितं सूत्रं मृदु लाक्षामयं तथा ३१ पीतकार्यं स्रुजं चैव कीलकं स्वर्णनिर्मितम् । रौप्यं ताम्रमयं कुर्याद्वैष्णवे यागकर्मणि ३२ गणनायके सुप्रशस्तं शैवे स्वामार्गमेव च । ग्रहपक्षे तथोशस्य कच्छपस्य द्विजोत्तमाः ३३ षोडशे चार्कहस्तं च तत्र

अंगुल ठेवावी १९. क्रौंच व ग्राण ह्यामध्ये चार हात लांबी व मुठा हात उंची धरावी. पण दोन्ही बाजूंच्या मध्यभागी एका हाताहून किंचित् न्यून प्रमाण असावे. ह्याहून तीन अंगुलें अधिक मान धरल्यास तेंच ह्याचे कनिष्ठ मान होय २०. हे ब्राह्मणहो, लांबीमध्ये चाराहून कमी मान ठेवावयाचे असल्यास ते क्रमाने दोन व तीन हात ह्या प्रमाणाने न्यून धरावे. ग्रहाच्या यज्ञामध्ये. पौष्टिक पक्षामध्ये व बाह्य ग्रामादि ग्र वनात पारिजात, चद्रबिंब, सूर्यकांत व शेखर ह्या मंडलांची योजना करावी व त्या त्या मंडलामध्ये वेदिकेची तीन चक्रे करावीं २१,२२ प्रथम मंडलात मुठा हात किंवा संपूर्ण कामातील मंडलाचे मान संपूर्ण धरावे. नूतन ग्रामामध्ये पचाज्ज मंडल करावे व ते तीन हात असावे असे सांगितलेलें आहे २३. हे उत्तम ब्राह्मणहो, शेषा, वरिष्ठा, लवला व भित्तिवेदिका ह्यांची काम्यकर्मामध्यें यथास्थित रीतीने योजना करावी २४. यथास्थित रीतीने मंडलसाधन न केल्यास दोष सांगितलेला आहे. ह्यास्तव, त्यास प्रयत्नपूर्वक तयार करावे. दहा हातामध्ये अर्धा हात; आठ हातामध्यें सोळा अंगुळे, मुठा हातामध्ये ठीचभर व षोडशांशामध्यें एक हातभर उंची धरावी. पण ह्याहून कमी प्रमाण असल्यास उंचीही कमी करावी २५,२६. यज्ञामध्यें व शांतिकर्मामध्ये ते दर्पणाकार करावे. ते हीन प्रमाणाचे धरून प्रयत्नपूर्वक तटाच्या आकाराचें रचावे. मातीने चोपून गोमयानें वेदिका लिपावी. स्वर्णरत्नमय उदक व कुशोदक ह्यानीं अभिषेक करावा २७,२८. ज्याचे वीर्य कमी झालें आहे अशा बैलाचे शेण व कपिला गाईचे शेण कुंड व मंडल ह्यास लेप देण्यास २९ कोणत्याही कर्मामध्ये घेऊ नये. स्थंडिलास लेप द्यावयाचा असल्यास त्याचा प्रयत्नपूर्वक त्याग करावा. सूत्र व खिळे ह्याच्यावाचून मंडलावर सूत्र कधींच मारूं नये ३०. ह्यास्तव, जे सूत्र व जो खिळा विहित आहे तोच प्रयत्नानें संपादन करावा. बारा हात लांब सूत्र ध्यावें. ते मृदु व लाख लावून घट्ट केलेलें व पिवळे असावे. व खिळा सुवर्णाचा करावा. पण विष्णुविषयक यज्ञकर्मामध्ये रुप्याचा व ताम्याचा खिळा करावा ३१,३२. गणनायकाला उद्देशून जे कर्म कर्तव्य असेल त्यांत अतिप्रशस्त असा खिळा करावा. शिवाच्या कर्मामध्ये उत्तम प्रकारें तयार केलेला व हे उत्तम द्विजहो, ग्रहाच्या व ईश्वर जो कच्छप त्याला उद्देशून कर्तव्य अशा कर्मामध्ये व ३३ षोडश कर्मामध्यें बारा हात मंडल करावे व ते

नेमियुतं भवेत् २४ [१०१६] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि प्रथमभाग एकविंशति-समोऽध्यायः ॥ २१ ॥

॥ इति मध्यमपर्वणि प्रथमभागः समाप्तः ॥ १ ॥

सूत उवाच ॥ अथोद्धारं प्रवक्ष्यामि चतुरस्रादिकस्य च । अर्काङ्गुलमितं क्षेत्रं चतुरस्रं प्रकल्पयेत् १ गुणाङ्गुलं प्रतिदिशं वर्धयेत्सुविचक्षणः । चतुरस्रं सम कुर्यादिष्टैरष्टादशाङ्गुलम् २ द्विहस्ते चैव सूत्राग्रे त्र्यङ्गुलानि समन्ततः । चतुरस्रीकृते पश्चाद्द्विहस्तमपि जायते ३ एवं षोडशहस्तान्त वर्धयेत्क्रमतः स्वयम् । हस्ते विनिर्णय विप्रा रचयेन्मण्डलं सुधीः ४ द्वादशाङ्गुलकल्पाभ्यां मधुहस्ते च मण्डले । द्विहस्ते हस्तमात्र स्याद्द्विहस्तं तु चतुष्करे ५ पद्ममान चतुर्धा तु वृत्तं कुर्यात्समन्ततः । प्रथमे कर्णिका कार्या केसराणि द्वितीयके ६ तृतीये दलसन्धीश्च दलाग्राणि चतुर्थके । कर्णिका पीतवर्णेन शुक्लेन पङ्कजं लिखेत् ७ केसरास्त्रिविधाः प्रोक्ता मूलमध्याग्रदेशतः । मूले शुक्लाऽरुणा मध्ये पीताश्चाग्रे प्रतिष्ठिताः ८ पत्रसन्धिर्भवेच्छ्यामः कोणे रक्तेन रञ्जयेत् । देवास्त्राणि लिखेद्बाह्ये पुरमध्ये च कोणके ९ अष्टाङ्गुलप्रमाणं यद्यथावर्ण विनादितः । शम्भुगौरी तथा ब्रह्मा रामकृष्णेत्यनुक्रमात् १० समिरेखाङ्गुलोच्छ्राय तत्तदर्धेन योजयेत् । शिवविष्ण्वोर्महायोगे शम्भुमारभ्य दापयेत् ११ प्रतिष्ठायां च रामान्तं कृष्णान्त च जलाशये । दुर्गायागे च श्रीपक्षे ब्रह्मादीन्परिकल्पयेत् १२ ग्रहयागे च पीतादीन्कुर्याच्च न तद-

---

नेमियुक्त असावे ३४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या प्रथम भागाचा एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥

ह्याप्रमाणें मध्यमपर्वाचा प्रथम भागही येथें संपूर्ण झाला ॥ १ ॥

सूत ह्मणतातः—आतां चतुरस्रादिकाचा उद्धार सागतों. बारा अंगुलप्रमाणाचें चौकोनी क्षेत्र तयार करावे १. चतुर पुरुषाने प्रत्येक दिशेस ते तीन अगुलें वाढवावें व तें सारखें चौकोनी करावें. इष्टीमध्ये तें अठरा अंगुलप्रमाणाचें असावें २. दोन हात सूत्राच्या अग्रभागीं चोहोकडून तीन अंगुलें वाढवून तें कुंड चौकोनी केलें असतां मागून ते दोन हातही होतें ३. सारांश, ह्याप्रमाणें स्वतः क्रमाने तें सोळा हातापर्यत वाढवावें. हे ब्राह्मणहो, हा हस्ताविषयीं स्पष्ट निर्णय झाला. नंतर शहाण्यानें मंडलाची रचना करावी ४. बारा अगुलाच्या दोन प्रकारच्या रचनेमध्ये दोन मधुहस्तक मंडलाची योजना करावी. दोन हातामध्ये हस्तमात्र व चार हस्तामध्यें दोन हात प्रमाण धरावें ५. कमलाच्या प्रमाणाचे चार भाग करावे व तें चोहोकडून वर्तुल असावे. प्रथम भागामध्यें कमलाची कर्णिका (मधील वर्तुल भाग) करावी. दुसऱ्या भागात केसरे काढावीं ६. तिसऱ्या भागात कमलाच्या पत्राचीं संधि करावी व चवथ्या भागात कमलपत्राचीं अग्रें लिहावीं. कर्णिका पिंवळ्या रंगानें व कमल पाढऱ्या रगानें लिहावें. मूलप्रदेश, मध्यप्रदेश व अग्रप्रदेश अशा प्रकारें केसराचे तीन भाग सागितलेले आहेत. मूलप्रदेशीं शुभ्रवर्ण, मध्यभागी रक्तवर्ण व अग्रभागीं तो पिवळी झालेली असतात ७,८. पाकळ्याची सधि काळी करावी व कोणामध्ये लाल रंग द्यावा. त्याच्या बाह्यप्रदेशीं पुराच्या मध्यभागीं व कोणामध्ये देवाचीं अस्त्रें लिहावीं ९. जें कमल आठ अंगुलप्रमाणाचें असेल तें योग्य रंगानीं शंभु, गौरी, ब्रह्मा, राम, कृष्ण ह्या अनुक्रमाने चित्रित करावें. त्याची लाबी सीमेच्या रेखेच्या अंगुलाइतकी असावी व त्यातील मूर्तीची योजना त्याच्या त्याच्या अर्ध्या प्रमाणानें करावी. शिव व विष्णु ह्यांच्या महायज्ञामध्ये शंभूपासून आरंभ करून चित्रें लिहावी १०,११. प्रतिष्ठाकर्मामध्यें रामापर्यंत व जलाशयामध्ये कृष्णापर्यत चित्रें लिहावीं. दुर्गायागामध्यें श्रीपक्षीं ब्रह्मादिकाची परिकल्पना

न्यथा । नवव्यूहमथो वक्ष्ये पुराणमतसम्मतम् १३ सर्वं च पूर्ववत्कार्यं पङ्कजं विलिखेत्सुधीः । तावत्सरुग्राहरणयोर्वेष्टयेत्पत्रकमादपि १४ शुक्लारुणैस्तथा पीतैः पीतारुणसितैरपि । पीताऽरुणसितैरेव स्वभावे प्रतिभागके १५ कलायन्त्र लदन्ते च गुह्यपत्राग्रकेण तु । षोडशैर्विंशमाने तु सलिङ्गं चाष्टपत्रके १६ एव मण्डलमन्त्राणां वर्जयेत्परमार्थतः । तद्वन्मूलेषु कोणेषु केसराणि प्रकल्पयेत् १७ दशदण्ड समाकारं त्रिवर्णं प्रतिरञ्जितम् । आर दद्याद्दशाग्रे तु सवांङ्गुलप्रमाणतः १८ पीतेनार च सर्वत्र तन्मध्ये शोणतुण्डकम् । नवव्यूहमिदं प्रोक्तं धर्मकामार्थदायकम् १९ न शूद्रैर्मण्डलं कुर्याच्च कुर्याद्ब्रह्मण्यबुद्धेः । कुर्याच्च संगमे तीर्थे देवतायतनेषु च २० लिखित्वा नार्चयेद्यस्तु अग्निकार्यविहीनकः । आविद्धो जायते सोऽपि परिजन्मनि जन्मनि २१ [१०३१] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

सूत उवाच ॥ क्रौञ्चघ्राणं प्रवक्ष्यामि यथा वेदार्थवादिनाम् । संमतं सर्वतन्त्रेषु गोपनीयं प्रयत्नतः १ आत्मनोऽरत्निमानेन द्विगुण परिकल्पयेत् । मध्ये वृद्ध्या तु तत्सूत्रं भ्रामयेत्कीलकोपरि २ चतुष्टयं न्यसेदवृत्त मध्यमाधमभावतः । कर्णिका प्रथमे वृत्ते द्वितीये त्वथ केसरम् ३ तृतीये पद्मपत्राणि चतुर्थे षोडशच्छदाः । शोभोपशोभे कुर्याच्च चतुरस्रे समे शुभे ४ तद्दक्षिणाग्रं विलिखेत्पार्श्वयोः पक्षकद्वयम् । तत्र पद्मयुग्मं कुर्यान्मध्ये चाङ्गुलमन्तरम् ५ शुक्लं पीतं

करावी १२. ग्रहयागामध्यें पीतादि रंगाची योजना जशीच्या तशीच करावी. पुराणाच्या मते संमत असे आता नवव्यूह सांगतो १३. सर्वही पूर्वीप्रमाणें करावें व शहाण्यानें कमल लिहावे. पूर्वी सांगितलेली संख्या व प्रमाण ह्यांच्या योगानें ते सभोंवार परिवेष्टित करावे १४. शुभ्र, लाल व त्याचप्रमाळें पिवळा किंवा लाल व शुभ्र ह्या रंगाच्या क्रमानें त्यास रंगवावे. व स्वाभाविक होणाऱ्या प्रत्येक भागामध्ये पिवळा, लाल व शुभ्र ह्या रंगानींच कलायंत्र व त्याच्या अतीं गुह्यपत्राच्या अग्रानें लिहावें. बीस ह्या प्रमाणामध्ये सोळानी व अष्टपत्रामध्यें सलिंग ह्याप्रमाणे मंडलमंत्रास वस्तुतः वर्ज्य करावें. त्याचप्रमाणें मूलकोणामध्यें केसराची योजना करावी १५-१७. ज्याला दहा दंड आहेत; व जे सारख्या आकाराचे आहे; ज्याच्यामध्ये तीन वर्ण असून त्याच्या योगाने जे उत्तम प्रकारे रंगविलेलें आहे असें दशपत्राच्या अग्रभागीं आर द्यावे. ते दशागुलप्रमाणाचं असावें. सर्वत्र तें आर पिवळ्या रंगानें रंगवावे व मध्यभागीं त्याचें तोड लालट असावे. असो; धर्म, अर्थ व काम देणारे असे हें सांगितले १८,१९. शूद्रानी मंडल करू नये व त्याचप्रमाणें ब्राह्मणाचे गुण नसताना मी ब्राह्मण आहें असे मानणाऱ्या पुरुषानींही तें करूं नये. नद्याचा संगम, तीर्थ व देवस्थान ह्या स्थळीं हे करावे २०. जो अग्निकार्यशून्य असणारा पुरुष हे मडल लिहून त्याची पूजा करीत नाहीं तो जन्मोजन्मीं हीनाग निर्माण होतो २१. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या द्वितीयभागाचा पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥

सूत ह्मणतातः—वेदाचा अर्थ करणाऱ्या विद्वानास जसे संमत आहे तसे क्रौंचघ्राणमंडल मी तुह्मास सागतों. सर्व तंत्रशास्त्रामध्यें हे मोठ्या प्रयत्नानें गुप्त ठेवण्यासारखें आहे १. आपल्या अरत्नीच्या प्रमाणानें दुप्पट सूत्र मोजून घ्यावें व मध्यभागीं वाढत्या प्रमाणानें धरून ते खिळ्यावरून फिरवावें २. नंतर मध्यम, अधम इत्यादि भावाने चार वर्तुळे काढावीं. प्रथम वर्तुळात कर्णिका, दुसऱ्यात केसर ३, तिसऱ्यात कमलाच्या पाकळ्या व चवथ्यामध्यें सोळा बारिक पत्रें काढावीं. चौकोनी, सम व शुभ अशी शोभा व उपशोभा त्याच्याजवळ करावी ४. त्याचें दक्षिणेकडील टोंक

तथा रक्तं कृष्णं लोहितसन्निभम् । संख्यातं ताम्रवर्णं च श्यामलं चाष्टकं रजः ६ शुक्लं तण्डुलचूर्णोत्थं पीतं तु निशया स्मृतम् । रक्तं तु निशया योगाच्छङ्खचूर्णादिभावितम् ७ कृष्णं पुलाकादिदग्धं रक्तं पीतस्य योगतः । कुङ्कुमाभं पाण्डुवं च रक्तश्वेतैर्विनिर्मितम् ८ ताम्रवर्णं कुसुम्भेन श्यामलं बिल्वपत्रजम् । यवगोधूमचूर्णादियोगेन तु रजः स्मृतम् ९ सर्वरेखासु विभजेच्छुक्लं मध्ये तु पीतकम् । कर्णिकायां केसरेषु शुभ्रमेव निपातयेत् १० पूर्वादिक्रमयोगेन शुक्लादीनि प्रयोजयेत् । पत्रसन्धौ तु विभजेद्रजः सेकान्तरक्रमात् ११ ततः षोडशपत्रेषु पूर्वादिक्रमतो भवेत् । शुक्लं पीतं तथा ताम्र ततः संख्यातमेव च १२ श्यामलं कुङ्कुमाभ च रक्तं शुक्लं च कृष्णकम् । पीतं ताम्रं च संख्यात श्यामं कुङ्कुमरक्तकम् १३ एव दद्याद्द्विजाः पूर्वं ईशानं तं विभावयेत् । कौञ्चमूर्ध्नि भवद्रक्तं चतुरङ्गुलमानतः १४ तुण्डभागे भवेत्पीतं ग्रीवायां शुक्लमेव च । पुच्छे विंशतिपत्राणि आदौ पञ्च रजः क्रमात् १५ षडङ्गुलेष्वण्डभागे पीतेन परिकल्पयेत् । ग्रीवायां शुक्लरजसा भावितायां विशेषतः १६ तत्र पीतादिकं लेखं पूर्वोक्तं च यथा भवेत् । शुक्लादिकं प्रपश्चान्तु पत्रेऽष्टैकैकशः पृथक् १७ चतुरङ्गुलकं पादे जानोरूर्ध्वं तु पीतकम् । अधस्तान्तु भवेद्रक्तं तदेव चतुरङ्गुलम् १८ द्व्यङ्गुलेन भवेच्छ्यामम्रङ्गुलीष्वपि विन्यसेत् । एव पक्षद्वयेनापि लिखेच्छुक्लं विभावयेत् १९ पदे शुक्लं चाङ्गुलीषु रक्तं श्यामेन भावयेत् । पूर्वपश्चिमदिग्भागे शुक्लं स्याद्द्वारदेशत २० दक्षिणोत्तरतश्चैव रक्तवर्णं विनिर्दिशेत् । महाक्रौञ्चमिद ज्ञेय मध्यक्रौञ्चमिदं शृणु २१ कनिष्ठं सर्वयज्ञेषु विद्यानां स्थानमुत्तमम् । अथ ।-

---

लिहावें. त्याच्या दोन्ही बाजूस दोन पक्ष लिहावे. त्यात एक अंगुल अंतर सोडून दोन कमलें काढावीं. शुभ्र, पिवळें, तसेंच लाल, काळें, गुलाबी, चित्रविचित्र, ताम्रवर्ण व काळसर असें चार प्रकारचें रज (रागोळी) सांगितलें आहे ५,६. तादुळाच्या चूर्णापासून झालेले शुभ्र; हळदीपासून होणारें पिवळें; हळद व चुना याच्या मिश्रणानें केलेलें लाल; तुषादि जाळून केलेले काळें; लाल व पिंवळी हळद ह्याच्या मिश्रणापासून होणारें लोहित आणि लाल व शुभ्रवर्ण यांच्या मिश्रणानें होणारें चित्रविचित्र रज समजावें. ताम्रवर्ण रज कुसुंभ्याचें करावें व श्यामल बेलाच्या पत्राचें करावें. तसेंच यव, गहू इत्यादिकाच्या चूर्णाच्या योगानेंही रज करावें असें सांगितलें आहे. शुभ्रवर्णाच्या योगानें सर्व रेखाचा मधोमध विभाग करावा. मध्ये पिवळा रंग भरावा. कर्णिका व केसर ह्याच्यामध्यें शुभ्रवर्णच सोडावा ७–१०. पूर्व, आग्नेय इत्यादि दिशाच्या क्रमानें शुभ्रादि वर्णाची योजना करावी. पत्राच्या संधींमध्यें रंगाच्या भिन्न क्रमानें विभाग करावा ११. तदनंतर षोडशपत्रामध्ये पूर्वादि दिशाच्या क्रमाने रग भरावे. म्हणजे शुक्ल, पीत, त्याचप्रमाणें ताम्रवर्ण, नंतर चित्रविचित्र १२, काळसर, गुलाबी, लाल, शुक्ल, कृष्ण, पीत, ताम्रवर्ण, चित्रविचित्र, काळसर, गुलाबी व लाल ह्याप्रमाणें हे ब्राह्मणहो, पूर्वदिशेपासून ईशान्यदिशेपर्यंत रंगांची कल्पना करावी. क्रौंचाच्या मस्तकीं चार अंगुलप्रमाणाचा लाल रंग लावावा १३, १४. मुखप्रदेशीं पिवळा द्यावा; गळ्यास शुभ्रवर्ण लावावा; पुच्छामध्यें बीस पंखाची योजना करावी व आरंभी क्रमानें पाच रंग द्यावे १५. अंडप्रदेशीं सहा अंगुलें पिंवळा रग लावावा. विशेषतः शुक्ल रंगानें रंगविलेल्या मानेवर पूर्वी सांगितल्याप्रमाणेच पीतादिक रग द्यावा. अष्टपत्रांवर प्रत्येकावर भिन्न भिन्न असे शुक्लादि वर्ण लावावे १६,१७. चार अंगुलप्रमाण पायांच्या पुढें गुडघ्यांच्या वर पिवळा व खालीं चार अंगुलें लाल रंग द्यावा १८. अंगुलींचे ठायीं दोन अंगलें काळा रंग लावावा. ह्याप्रमाणें दोन्ही पक्ष लिहून त्यासही शुभ्रवर्णाची छाया द्यावी १९. पायांस शुक्ल व अंगुलींस लाल रंग लावून काळ्या रंगाची छाया द्यावी. पूर्व व पश्चिम दिशातील द्वारप्रदेशीं पाढरा रंग लावावा २०. दक्षिण व उत्तर दिशेतील द्वारांस लाल रंग

परं प्रवक्ष्यामि सर्वतन्त्रमतं क्रमात् २२ रक्तगीतं रक्तपातैः कुर्यात्पुच्छचतुष्टयम् । पूर्वादिक्रमयोगे तु पञ्चान्ते धरणीतले २३ विलिखेन्मूलसंलग्नं बाह्यः कोणचतुष्टयम् । कनिष्ठेऽष्टकुले कुर्यात्पुच्छं कुर्याच्चतुर्विधम् २४ त्रिवृत्त वेष्टयेत्पश्चात्सितरक्तासितैः क्रमात् । दृष्ट्वा जन्मशतोद्भूतं पापं नाशयते ध्रुवम् २५ पीतौ वा विलिखेद्विप्राश्शयन्ति सकलापदः । अन्तश्चक्रं बहिश्चक्रं क्षेत्रे च प्रतिदर्शनम् २६ तस्य कल्पशतोद्भूतं पापं नाशयते ध्रुवम् । मयूरं वृषभं चैव सिंहं क्रौञ्चं च वै कपिम् २७ प्रसादाद्वा गृहं क्षेत्रे वृक्षाग्रे चापि भो द्विजाः । उत्थाय वन्दनं कुर्याद्ब्रह्महत्याशतं दहेत् २८ पोषणात्कीर्तिमाप्नोति दर्शनात्पापविच्युतिः । दर्शनादुर्धते लक्ष्मीरायुर्वृद्धिश्च जायते २९ मयूरो ब्रह्मणो मूर्तिर्वृषभश्च सदाशिवः । सिंहे च सर्वदुर्गा वैष्णवो विधिरुच्यते ३० क्रौञ्चो नारायणो देवो व्याघ्रस्त्रिपुरसुन्दरी । कालिका कृष्णव्याघ्रश्च लक्ष्मीश्चित्रकपोतकः ३१ स्नातः पश्यति यत्यद्धि ब्रह्मदेवैर्न जायते । तस्मात्प्रयत्नतो भूत्वा धारयेत्पोषयेद्गृहे ३२ अतः परं प्रवक्ष्यामि मण्डले मण्डलेष्वपि । रजोद्रव्यप्रमाणं च यथोक्तं यत्नवर्जनम् ३३ तण्डुलोत्थं यवोत्थं वा वर्ज्यं मकररोपणम् । यद्वाल्यश्राबणे जातं हैङ्गुलं गन्धकं तथा ३४ हरितालं सुभद्रं च सदा विघ्नं विवर्जयेत् । हैमन्तिकोद्भवं पञ्च सितपाषाणमेव च ३५ काञ्चन्याश्च प्रभेदं यच्छस्तं शुक्लगुणं द्विजाः । शेफालिवृन्त निशया अतसीकुसुमानि च ३६ किंशुकस्य च पुष्पाणि शस्तं पीतं गुणं भवेत् । नागजं गैरिकं चैव

फासावा. हें महाक्रौंच होय असें जाणावे. आता हे मध्यक्रौंच ऐक २१. हे सर्व यज्ञांमध्यें कनिष्ठ जरी आहे तरी विद्याचें उत्तम अधिष्ठान आहे. ह्यास्तव, आता हे दुसरे सर्व तत्रास समत असलेलें मंडल क्रमाने मी सागतों. लाल, पिवळा व मिश्र लाल रंगाच्या योगानें चार पुच्छें करावीं २२–२४. व नंतर त्यास क्रमानें शुभ्र, लाल व काळा ह्या रंगानीं तिहेरी रेघ मारावी. हें मंडल पाहून शंभर जन्मात घडलेलें पाप निश्चयाने नाश पावतें २५. हें मंडल पानस्थळीं ब्राह्मणाच्या हातून लिहवावे. ह्मणजे सर्व आपत्ति नष्ट होतात. ज्याच्या आत व बाहेर चक्र आहे अशा क्षेत्राचें प्रत्येक दर्शन मनुष्याच्या हातून शंभर कल्पामध्ये घडलेलें पाप नियमानें नाहींसें करितें. मयूर, बैल, सिह, क्रौंच व वानर ह्याचे सहज गृहात, क्षेत्रांत व वृक्षाच्या अग्रभागीं जरी दर्शन झालें तरी, हे ब्राह्मणहो, उठून वंदन करावे. असें केल्याने शंभर ब्रह्महत्यांचें पाप दग्ध होतें २६–२८. ह्याचें पोषण केल्याने कीर्ति प्राप्त होते व दर्शनानें पापाचा क्षय होतो. त्याच्या दर्शनानें लक्ष्मी व आयुष्य ह्याची वृद्धि होते २९. मयूर ही ब्रह्मदेवाची मूर्ति; वृषभ हा सदाशिव व सिहाचे ठायीं दुर्गाचा संभव असतो. आता विष्णूविषयींचा विधि सागतो ३०. क्रौंच हा साक्षात् नारायण देव आहे. व्याघ्र ही त्रिपुरसुंदरी होय. काळा वाघ ही कालिका व चित्रविचित्र कपोत ह्मणजे लक्ष्मी होय ३१. स्नान करून ह्याचे जो नित्य दर्शन घेतो त्यास ब्रह्माची पीडा होत नाहीं. ह्यास्तव, मोठ्या प्रयत्नानें त्यास धरावें व घरी पाळावें ३२. आता ह्यापुढें प्रत्येक मंडलाचे ठायीं रजोद्रव्याचे प्रमाण शास्त्रामध्यें जसें सागितलें आहे तसेंच मी सागतों व प्रयत्नानें कोणते रज वर्ज्य करावें तेंही सागतों ३३. तादळाचें व यवाचें पीठ वर्ज्य होय, तसे पूर्वश्रावणामध्ये झालेला हिंगुल, गंधक व शुभ हारताल ह्याचें चूर्ण सर्वदा विघ्नकर असल्यामुळें वर्ज्य होय. हेमंतऋतूंत झालेल पांढऱ्या पाषाणाचें चूर्ण व हे ब्राह्मणहो, जें चूर्ण हळदीच्या निरनिराळ्या प्रकारापासून झालेलें व शुभ्रवर्ण असते ते प्रशस्त

कुसुम्भकुसुमानि च ३७ कुशीतं गुडक चैव मञ्जिष्ठां पञ्चरङ्गकम् । विजयापत्रकं चैव बिल्व-पत्र तथैव च ३८ पुनर्नवाया पत्रं च केसरस्य बकस्य च । कृष्णपाषाणक चैव कृष्णाभ्र समचूथकम् ३९ नागपाषाणकं चैव पुन्नाग दग्धपञ्चकम् । शङ्खचूर्ण लोहविष्ठां नागविष्ठां च वर्जयेत् ४० कर्पूर कुङ्कुमं चैव रोचनारोचनां श्रयेत् । यवशालीयकैर्भिन्न शुक्लं च कारयेत्सुधीः ४१ लाक्षां च यदि गृह्णीयात्तद्भर्जित्वा प्रदापयेत् । आकाशं पृथिवीं चैव भौम रामं तथाऽशनी ४२ धरणीसदनस्थाने पञ्चधा विभजेद्बहिः । पद्ममुल्लिख्य प्रथम कर्णिकां तदनन्तरम् ४३ तर्जन्यमध्यपूर्वोत्थं विभजेद्वा समाहितः । तर्जन्यङ्गुष्ठयोर्गैर्वा तृणमारभ्य वै भवेत ४४ तृणमारभ्य सामान्ये शक्ते वा मध्यमादितः । राक्षसादिप्रतिष्ठायां ग्रहपक्षेऽग्रिमादितः ४५ अङ्गुल्यग्रे च विभजेत्सर्वकामार्थसिद्धये । प्रतिष्ठायां ग्रहमखे काम्येषु परिवर्जयेत् ४६ सुभद्रं मण्डलं वक्ष्ये शुभदं शुभमादिशेत् । अतः सुभद्रमुद्दिष्ट स्वर्गमोक्षप्रदायकम् ४७ सार्धहस्तेन मानेन कुर्यान्मण्डलमुत्तमम् । चतुर्विशाङ्गुलैः पूर्ण सर्वत्र हस्तमादिशेत् ४८ कर्तुर्मध्यसहस्रस्य मध्यमामध्यपर्वणि । मध्यमादीर्घमानेन मानाङ्गुलमिति स्मृतम् ४९ रेखद्वयान्तर यच्च मूलरेखां न चाश्रयेत् । वृद्धाङ्गुष्ठनखद्वन्द्वं मानाङ्गुलमथापि वा ५० मध्ये निधय शङ्कु च मुष्टिबाहुप्रमाणतः । बिम्बं कारयेन्मध्ये ज्येष्ठोत्तरकनीयकम् ५१ प्रकल्प्य कर्णिकादीनि मध्ये चाष्टदलं लिखेत् । बहिश्चार्कदलं कुर्यादृणानां क्रमकेण तु ५२ पञ्चम श्वेतवर्णेन बहिः, कुर्यात्त्रिवेष्टनम् ।

होय. काळी निर्गुडी, हळकुड, जवसाची फुले ३४-३६ व पळसाची फुले हा प्रशस्त पिवळा रंग होय. शेंदूर, गेरु, कुसुंब्याची पुष्पे, कुशीत, गुडक, मंजिष्ठा, पंचरंग, विजयापत्र, बिल्वपत्र, पुनर्नवा (घेंटुळीचे)पत्र, उडीण व रुईमदार ह्यांची पत्रे, कृष्णपाषाणाचे चूर्ण, कृष्णाभ्रचूर्ण, नागपाषाणाचे चूर्ण, उडद्याचे चूर्ण, दग्धपचक, शखचूर्ण, लोहविष्ठा व नागविष्ठा ह्यास वर्ज्य करावे ३७-४०. कापुर, कुंकू व गोरोचन ह्याचा स्वीकार करावा. यव व साळी ह्यान्या चूर्णावाचून शहाण्याने कोणतेंही शुभ्र चूर्ण करवावे ४१. लाख जर घ्यावयाची असेल तर ती भाजून घ्यावी व आकाश, पृथ्वी, भौम, बागेसारखे स्थान व त्याचप्रमाणे अशनी ह्या रीतीने पृथ्वीवरील गृहस्थानात बाहेरन्या बाजूस पाच प्रकारे विभाग करावा. प्रथम कमल लिहून तदनंतर कर्णिका काढावी ४२,४३ किंवा तर्जनी व मधल्या बोटावांचून कोणतेही बोट ह्याच्या योगाने प्रथम आरंभ करून सावधपणे विभाग पाडावे. किंवा तर्जनी व आगठा ह्यान्या योगाने तृण धरून आरंभ करावा ४४. तृणानें आरंभ करावा असे जे झटलें आहे ते सामान्यत. होय. पण ज्यास शक्ति असेल त्याने राक्षसादिप्रतिष्ठेमध्यें मध्यम अंगुलापासूनच आरंभ करावा. ग्रहपक्षामध्यें अग्रीपासून आरंभ करावा ४५. सर्व कामांमध्यें सिद्धि व्हावी ह्मणून अंगुलाचे अग्रभागी विभाग करावेत. पण हा विधि प्रतिष्ठाकर्म, ग्रहयज्ञ व काम्यकर्म ह्यामध्ये वर्ज्य होय ४६. आता सुभद्रमंडल सागतो. ते शुभ देणारे असल्यामुळे त्यास शुभ ह्मणावें. ह्यास्तवच सुभद्र हे स्वर्ग व मोक्ष देणारें आहे असे झटलेलें आहे ४७. अर्ध्या हातान्या प्रमाणाने उत्तम मंडल करावें. चोवीस अंगुलांनीं पूर्ण कर्तव्य असल्यास सर्वत्र हस्तप्रमाण मंडल उक्त आहे ४८. कर्त्याच्या मध्यसहस्रसंख्येच्या मधल्या बोटाच्या मधल्या पेरामध्ये मधल्या बोटाच्या लाबीच्या प्रमाणानें प्रमाणांगुल ध्यावे.असे सांगितलेले आहे ४९. दोन्ही रेखाच्या मधील जे अंतर आहे तेच प्रमाण होय. पण मूलरेखा त्यात घेऊ नये. किंवा मधले बोट व आंगठा ह्यान्या नखयुग्मान्या प्रमाणाचें प्रमाणागुल समजावे ५०. मध्ये शंकु बाधून मुंडग्या हातान्या प्रमाणाने तिष्पट करावे व त्यांचा क्रम मध्ये अधिक पुढे कमी असा ठेवावा ५१. मध्यभागी कर्णिकादिक व अष्टदले

ततः पीतारुणं कुर्यात्पश्चाद्वेदाङ्गुलान्तरे ५३ वेष्टयेच्छुक्लवर्णेन मध्ये कल्पलतां लिखेत् । सुभद्रं मण्डलात्पूर्वं सर्वतोभद्रकं शृणु ५४ सर्वकार्येषु यज्ञेषु सर्वकल्याणमाप्नुयात् । मण्डलं सर्वतोभद्रं सर्वयज्ञेषु पुष्टिदम् ५५ साधकानां हितार्थाय ईश्वरेणैव भाषितम् । चतुर्विंशत्यङ्गुलेन हस्त मथमतो भवत् ५६ कोणे सूत्रद्वयं दद्यान्मध्ये सूत्रद्वय पुनः । ततो मत्स्यानि रचयेत्कर्णे सूत्राणि साधकम् ५७ चतुःसूत्रं पातयेच्च पूर्वापरविभागतः । पुनर्दद्याच्चतःसूत्र कर्णसूत्र पुनर्ददेत् ५८ शतद्वयपदं यावत्षट्पञ्चाशाधिक तथा । पातयेच्च तथा सूत्रमेवं सप्तदशं भवेत् ५९ ऊर्ध्वपङ्क्तिक्रमा पदयुगं चाधे पदचतुष्टयम् । द्वारपार्श्वे भवेद्यावदन्तपङ्क्तिक्रमा पदत्रयम् ६० रेखा सर्वत्र शुक्लेन रचयेद्यौगिकोत्तमः । पङ्कज शुक्लवर्णेन वैष्णवे यागकर्मणि ६१ शक्तियागे भवेद्रक्त शैवे पीत विनिर्दिशेत् । प्रतिष्ठासु च सर्वासु शुक्लमेव प्रशस्यते ६२ पीतेन कर्णिका कार्या चतु भागेन मानतः । शुभ चकोरावस्थाने तापयित्वा विचक्षणः ६३ कर्णिकामूलमारभ्य रेखाः षोडश कल्पयेत् । रेखामूले भवेच्छुक्ल मध्ये रक्त निपातयेत् ६४ अग्रे पीतं भवेदेव कृत्वा पङ्कज वेष्टनम् । शुभ्रवर्णेन तद्दद्यात्पीतवर्णेन सर्वत ६५ मध्ये रक्त भवेच्चैव एवं षोडश कल्पयेत् । कोणेषु रक्तं दद्याच्च पद्मं क्षेत्रेषु निर्दिशेत् ६६ शुक्लेन पीठगात्राणि पीठकोणे पदत्रये । पीतवर्णेन रचयेद्द्विधापङ्क्तिद्वय तथा ६७ शुक्लेन रचयेत्पादौ पुनः पीतादिवर्णकै । चित्र सुशोभन कार्य तत्र कल्पलतां न्यसेत् ६८ मानं कल्पलतां यावद्दशाङ्गुलं परिकीर्तितम् । द्वे द्वे शस्त च भ्रमण

लिहावीं. वर्णाच्या क्रमानें बाहेर बारा दळे काढावीं ९२. त्यातील पाचवें दल श्वेतवर्णानें काढावें व बाहेरच्या बाजूस वृत्त वेष्टन लिहावें. नतर चार अंगुलाच्या अंतरावर पिवळट व लालट करावे ९३. त्यासही शुभ्रवर्णानें वेष्टित करून मध्ये कल्पलता लिहावी. पण सुभद्रमडलाच्या पूर्वी सर्वतोभद्र-मंडल कसे करावें ते ऐक ९४. हे मडल सर्व कार्यामध्येच यज्ञामध्ये कल्याण प्राप्त करून देत असतें. सर्वतोभद्रमंडल सर्व यज्ञामध्ये पुष्टि देणारे आहे ९५. साधकाच्या हिताकरिता स्वत: ईश्वरानेंच त्याचें विधान सागितलें आहे. प्रथमत चोवीस अगुलाचा हात होतो ९६. कोणामध्यें दोन सूत्रें व पुन: मध्यें दोन सूत्रें द्यावीं. नंतर मत्स्यांची रचना करावी. कर्णामध्ये सूत्रादि साधन काढावे ९७. पूर्व व पश्चिम ह्या विभागानें चार सूत्रें मारावी, पुनरपि चार सूत्रे मारावी व पुन: कर्णसूत्र लिहावे ९८. तात्पर्य, दानशें छप्पन्न घरें पडेपर्यंत अशी सूत्रे मारावीं. हा सर्व सूत्रे मारण्याचा प्रकार सतरा वेळ होतो ९९. ह्मणजे वरील पंक्तीनें दोन व आद्य पक्तीने चार, द्वाराच्या बाजूस चारचार व शेवटच्या पंक्तीने तीन अशी एकंदर सतरा पदें होतात १००. उत्तम युक्तिवानाने सर्वत्र शुक्लवर्णाच्याच रेखा लिहाव्या. विष्णुसंबंधी यज्ञकर्मामध्यें शुक्ल वर्णानें कमल काढावे १०१. शक्तियज्ञामध्यें तेंच लाल असावे व शैवयज्ञामध्यें पिवळें प्रशस्त होय. सर्व प्रतिष्ठामध्ये शुक्लच प्रशस्त होय १०२. विवेकी पुरुषानें देठाजवळ शुभ व चार विभाग आणि प्रमाण ह्यानीं युक्त अशी पिवळ्या रगाने कर्णिका करावी १०३. कर्णिकेच्या मूळापासून सोळा रेखा काढाव्या. त्या रेखाच्या मूलप्रदेशीं शुक्ल व मध्यभागीं लाल रंग घालावा १०४ आणि अग्रभागीं पिवळा रंग लावावा. ह्याप्रमाणें करून शुभ्रवर्णाने कमलाचें वेष्टन काढावें व त्याच्या चोहों बाजूंनीं पिवळा रंग द्यावा १०५. पण ते वेष्टनही मध्यभागीं लाल असावें. तात्पर्य, ह्याप्रमाणें सोळा रेषाची कल्पना करावी. कोणामध्यें लाल रंग घालावा व ह्याप्रमाणे क्षेत्रामध्यें कमल तयार करावे १०६. शुक्ल वर्णानें पीठाचे अवयव रगवावे. व पीठाच्या कोणातील तीन घरामध्यें व त्याचप्रमाणें दुहेरी दोन पंक्तीमध्यें पिवळ्या रंगाने सुंदर रचना करावी १०७. शुक्लवर्णाने पाय काढावे व पुनरपि पिवळा, तांबडा इत्यादि रंगांनीं ते चित्र अतिशय सुंदर करावे. नंतर त्यामध्यें कल्पलता काढावी १०८. त्या कल्पलतेचें मान दोन

शङ्खावर्तक्रमात्त्रयम् ६९ ग्रन्थौ ग्रन्थौ पुष्पफलं नानावर्णेन भावयेत् । नानापशुगणैर्युक्तं नाना-पक्षिगणैर्युतम् ७० वैष्णवे गारुडं शस्तं शैवे कीशवृष लिखेत् । शाक्ते व्याघ्रं तथैशे च शरभ हरिमालिखेत् ७१ शोभां पीते च रचयेदुपशोभां च पीतकैः । कोणेषु कृष्णवर्णेन बहिः स्याद्वे-ष्टनत्रयम् ७२ शुक्लपीतारुणैः कार्यं मण्डलं स्यान्मनोरमम् । सर्वतोभद्रमपरं सर्वसिद्धिप्रदाय-कम् ७३ सर्वज्ञानमयं शुद्धं धर्मकामार्थदायकम् । चतुरस्रं समं कृत्वा दिग्भ्यो द्वादशधा द्विजाः ७४ पातयेत्तत्र सूत्राणि कोष्ठानां दृश्यते शतम् । चतुश्चत्वारिंशदाद्यं पश्चात्षट्त्रिंशताऽम्बुजम् ७५ कोष्ठं प्रकल्पयेत्पीठं पङ्क्त्या चैवात्र वीथिका । द्वारशोभे यथापूर्वमुपशोभे च दृश्यते ७६ अवशिष्टैः पदैः कुर्यात्सद्भिस्तन्त्राणि मन्त्रवित् । विदध्यात्पूर्ववच्छेषमेवं वा मण्डलं भवेत् ७७ पूर्वोक्तमण्डलं विद्वन्धरणीसदनं बहिः । मध्ये कल्पलता कार्या बहिः कोणेषु सप्तमा ७८ गुलालीतूपवर्णेन महामत इति स्मृतः । शोभोपशोभे शोभाऽग्रा कुर्याद्वै मण्डलं भवेत् ७९ एतद्धि सर्वतोभद्र राशियुक्तमतः परम् । शतपत्रं वज्रनाभं त्रिम्बनाभं सहस्रकम् ८० गजाह्वं च गजाकार मध्ये तं समलङ्कृतम् । चतुश्चन्द्रे चन्द्रबिम्बैश्चन्द्रकान्तमुदाहृतम् ८१ बहिर्द्वादशभिः सूर्यैः सूर्याक्रान्तं प्रकीर्तितम् । शेखरी त्रिपुटं चैव शतपत्रं च प्रक्रमात् ८२ सहस्रमेव विप्रेन्द्राः पद्मान्ते यस्य स्वस्तिकम् । स्वस्तिकं तद्भवद्भिः पुष्करं व्रजसंमितम् ८३ चिन्ता-

---

अगुलेंपर्यंत सांगितलेलें आहे. शंखाच्या आवर्तीप्रमाणें प्रत्येक वेळीं दोनदोन अशा रीतीने क्रमाने तीन वर्तुलें काढावीं ६९. प्रत्येक गाठीमध्ये अनेक रंगानीं पुष्पे व फले ह्यांची रचना करावी व ती लता अनेक पशूंच्या समूहानीं वेष्टित व अनेक पक्ष्यान्या समूहानीं युक्त आहे असे दाखवावे ७०. विष्णुसंबंधी यागामध्यें गारुड व शिवसंबंधी कर्मामध्ये वानर किंवा वृष हें चिन्ह लिहावे. शक्तीच्या यागामध्ये व्याघ्र व ईश्वराच्या यागामध्ये शरभ व सिंह काढावा ७१. पिवळ्या रंगानें शोभा व मिश्र पिवळ्या रंगानें उपशोभा ह्याची रचना करावी. कोणामध्ये काळ्या रंगानें सुशोभित करावें व बाहेर-च्या बाजूस तीन वेष्टने शुभ्र, पीत व लाल रंगानीं काढावीं. अशा प्रकारें केलेले मंडल अतिशय मनोरम होतें. दुसरे सर्वतोभद्र सर्व सिद्धि देणारे आहे ७२, ७३. ते सर्वज्ञानमय, शुद्ध व धर्म, अर्थ आणि काम देणारे आहे. हे ब्राह्मणहो, ते मंडल चौकोनी व सारखे करून चारी दिशास बारा प्रकारें सूत्रे मारावीं. म्हणजे शंभर कोष्टके दिसू लागतात. चव्वेचाळीस कोष्टकाचे पहिले व छत्तीस कोष्ट-काचें मागचे कमल करावे ७४,७५. एका कोष्टाचे पीठ करावे व एका पंक्तीनें मार्गाची कल्पना करावी. म्हणजे पूर्वीप्रमाणेंच द्वारान्या शोभा व उपशोभा दिसतात ७६. नंतर बाकी राहिलेल्या कोष्टानी सज्जनांनीं तंत्रे करावीं व मंत्रवेत्त्या पुरुषाने बाकी सर्व रचना पूर्वीप्रमाणेच करावी. साराश, असेही एक सर्वतोभद्रमंडल होते ७७. हे विद्वाना, पूर्वोक्त मंडलामध्ये बाहेरच्या बाजूस पृथ्वी-गृह सांगितलेले आहे. ते करून मध्यभागी व बाह्य कोणामधून, हे उत्तम पुरुषहो, कल्पलता काढावी. नंतर गुलालासारख्या चवथ्या वर्णाने रंगवावें. ह्यास महामत असें म्हटलेलें आहे. ह्या मंडलामध्येही शोभा, उपशोभा व अग्रशोभा करावी. म्हणजे मंडल पूर्ण होतें. हें सर्वतोभद्र-मंडल होय. ह्यापुढे राशियुक्त, शतपत्र, वज्रनाभ, त्रिवनाभ, सहस्रक ७८-८०, गजाव्ह व मध्यभागी उत्तम प्रकारे अलंकृत केलेले गजाकार आणि चार चंद्रामध्ये चंद्रबिंबयुक्त असें चंद्र-कातमंडल सांगितलेले आहे ८१. जें मंडल बाहेरच्या बाजूस बारा सूर्यानीं युक्त असते ते सूर्यक्रात म्हणून म्हटलेले आहे. तसेच शेखरी, त्रिपुट, पुढे शतपत्र व हे उत्तम ब्राह्मणहो, सहस्रनामक मंड-लही उक्त आहे. ज्या कमलान्या शेवटी स्वस्तिक असते ते, हे ब्राह्मणहो, स्वस्तिक होय. पुष्कर,

मणिं कुङ्कुमांशं खातं च हरिवल्लभम् । पञ्चसिंहासनस्थं च पञ्चसिंहासन विदुः ८४ तदुद्वृपासनं ज्ञेयं शिखिरूपं शिखिध्वजम् । नारसिंहं पद्मगर्भं कपोतास्य तथा भवेत् ८५ गारुडं मेघगर्भं च नीलकण्ठं नराकृतिम् । शतक्रतुसमारूढं श्रीबिम्बनवसूत्रकम् ८६ अष्टास्रमष्टकोणाढ्यं बाह्ये पद्मवनं कृतम् । कामदैर्येन पुटितं सहस्रं पद्मवेष्टितम् ८७ त्र्यस्रगर्भं पङ्कजं च त्र्यस्रं तत्परिकीर्तितम् । अष्टपत्राणि वै मेरु सुमेरुं तद्विपर्यये ८८ महामहामेरुपृष्ठे शतत्रयच्छदैर्वृतम् । छिद्रत्र्यक्तं त्रयच्छादि यथा मानेन भो द्विजा. ८९ वसु ८ दिग १० विंशकैश्चैव २० चत्वारिंशत् ४० शतार्धकम् ५० । दण्डिश्रवणसंपन्न ६० माकाशं वसुसमितम् ९० शतविंशाधिकं चैव ११० दलानि तदनन्तरम् । शुक्लरक्त चाष्टवर्णैर्बिम्बोष्ठ परिपूरयेत् ९१ शुक्लेन पङ्कज तत्र पश्चात्कुर्यात्त्रिवेष्टनम् । शतपत्रमथो वक्ष्य बिम्बराजानि कथ्यते ९२ स्थण्डिले कुशहस्ते च पूर्ववद्वेष्टयेत्क्रमात् । वसु ८ पञ्चकला १६ पञ्चविंशकं २५ तत्र पत्रकात् ९३ चत्वारिंशत्ततः पश्चा ४० दष्टोत्तरशत १०८ भवेत् । शुक्ल शोण तथा पीतं श्यामशुक्लैरनन्तरम् ९४ विलोमे दलसन्धीनि शाक्ते शैवे तु षट्पुरम् । वेष्टयेत्पञ्चवर्णेन शुक्लादीनि समन्ततः ९५ रक्तपीतैः समास्तीर्य कोणाच्छुक्लेन पूरयेत् । स्थण्डिले तारहस्तेन अष्टहस्त प्रकल्पयेत् ९६ मण्डल बिम्बराजस्य अष्टोत्तरच्छदैर्वृतम् । वसुपञ्चशाक्तिविंशचत्वारिंशच्छतार्धकम् ९७ त्र्यतुपत्रं सुवृत्तं स्याद्वृत्तयुक्त सबिल्वकम् । चत्वारिंशद्द्वयं चैव गगनेन समावृतम् ९८ शतं विंशाधिकशत द्विशतं विंशमुत्तमम् । वेष्टनासे च त्रिशत प्रक्रमादथ वर्धयेत् ९९ लवलाभमथो वक्ष्ये सार्धहस्तप्रमाणतः । नवविंश

वज्रसंमत ८२,८३, चिंतामणि, कुंकुमाश, खात, हरिवल्लभ व पाच सिंहासनावर असलेलें पंचसिंहासन होय; असे जाणतात ८४. त्याचप्रमाणे वृपासन जाणावे. शिखिरूप, शिखिध्वज, नारसिंह, पद्मगर्भ व कपोतास्य ह्मणून मंडल आहे ८५. गारुड, मेरुगर्भ, नीलकंठ, नराकृति, इंद्रगजारूढ, श्रीबिंब, नवसूत्रक ८६, अष्टास्र, अष्टकोण इत्यादि, ज्याला बाहेर पद्मवन केलेले आहे, दोन कामानीं युक्त, कमलानीं वेष्टित असें सहस्रदल व ज्याच्या आंत तीन पाकळ्याचे कमल आहे अशा कमलास त्र्यस्र ह्मणावे; ह्मणून सांगितलेले आहे. मेरूस आठ व सुमेरूस त्याच्या उलट पत्रे असावीं ८७,८८. महामेरूच्या पृष्ठभागी तीनशे पत्रानीं आच्छादित अशी छिद्राची जाळी असते पण हे ब्राह्मणहो, त्याचे आतां प्रमाण ऐका ८९. आठ, दहा, वीस, चाळीस, पन्नास, साठ, नव्वद व तदनंतर एकशें वीस दळे असावीं. शुभ्र व लाल बिंबोष्ठ आठ वर्णानीं भरावे ९०,९१. तेथे शुक्ल वर्णानें कमल करावे व मागून त्रिवेष्टन लिहावे. आता शतपत्रमंडल कसें करावें तें सांगतों. त्यालाच बिंबराज असें ह्मणतात ९२. स्थांडिलामध्यें किंवा कुशहस्तप्रमाण भूमीवर पूर्वीप्रमाणेंच क्रमानें परिवेष्टित करावें. ह्मणजे आठ, सोळा, पंचवीस पत्रें काढून तदनंतर चाळीस व पुढें एकशे आठ पत्रे लिहावी. शुभ्र, काळसर, लाल, तसाच पिवळा व नंतर भगवा ह्या रंगानीं त्यास रंगवावे ९३,९४. विलोमप्रदेशीं दलाच्या संधि स्पष्ट दाखवाव्या. शक्तीच्या व शिवाच्या यज्ञात सहा पुरें लिहावीं व त्या शुक्लादि वर्णानीं लिहिलेल्या पुरांस पाच वर्णानीं चोहोकडून वेष्टन घालावे ९५. लाल व पिवळा ह्या रंगानीं त्याला उत्तम प्रकारें आस्तरण घालून त्याचे कोण शुक्ल वर्णाने भरावे. स्थंडिलाचे ठायी तारहस्ताने आठ हात प्रमाणाचे हे कमल करावे ९६. हें बिंबराजाचें मंडल एकशे आठ पत्रांनी आच्छादित करावे. आठ, पाच, तीन, वीस, चाळीस, पन्नास असा त्याचा क्रम ठेवावा. जे मंडल चागलें वर्तुळ असते तें त्र्यतुपत्र व जे केवल वर्तुलयुक्त असते तें सबिल्वक होय. ते चाळीस, दोन व पाच इतक्या पत्रानीं आच्छादित ९७,९८ करून शेभर, एकशें वीस,

कल्पयेत्तु चतुःसूत्राणि पातयेत् १०० दक्षिणोत्तरतश्चैव तद्वदेव विचारविद्वान् । पीतेन रेखापुटिता मध्ये शुक्लं विभाज्यते १ ग्रहपक्षेन पीतेन मध्ये रक्तं प्रतिष्ठितम् । सर्वा रेखाश्च शुक्लेन पौष्टिके पीतमादिशेत् २ स शान्तिके न योक्तव्यः कामे रक्तं विनिर्दिशेत् । मध्यं तु पङ्कज रक्त युग्मे सोमस्य पङ्कजम् ३ शुक्लवर्णेन तत्कुर्यात्पीतवर्णमुदस्य च । ऐशान्यां चोत्तरे भागे गुरोः पीत तु पङ्कजम् ४ पूर्वस्यां दिशि शुक्रस्य पङ्कज शुभ्रवर्णकम् । वारुणे तु शनेः कृष्णं नैर्ऋत्यां धूम्रवर्णकम् ५ राहोः प्रकल्पयेत्तच्च केतोरपि नियोजयेत् । वायव्यां दिशि संयोज्य पङ्कज विलिखेत्ततः६ विलोमे दलसन्धीनि पूरयेत्सुविचक्षणः । बाह्यैः पञ्चरजैः कार्यं युवदुर्गविभूषितम् ७ पूर्वपश्चिमदिग्भागे शुक्लं स्याद्द्वारदेशतः । दक्षिणोत्तरदिग्भागे रक्तमेव प्रशस्यते ८ त्रिस्थाने सममध्ये च द्वादशाङ्गुलमुत्तमात् । द्विहस्तादावङ्गुलेन वर्द्धयेत्तद्विभागतः ९ पञ्चाब्जमण्डलं ज्ञेयं चतुःस्वस्तिकभूषितम् ११० [११४१] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

सूत उवाच ॥ न कुर्याद्दक्षिणाहीनं मानहीन न कारयेत् । अमानेन हतो यज्ञस्तस्मान्मान प्रशस्यते १ यस्य यज्ञस्य यन्मानं तत्तु तेनैव योजयेत् । अमानेन कृते सर्वे व्रजेयुर्नरकं पुनः २ आचार्यहोतृब्रह्माणो विधिज्ञः सहकर्तृकः । यस्य यज्ञे पापकश्च जातिहीनः प्रवेशयेत् ३ अशी-

---

दोनशें, आणखी वीस व तीनशे ह्या प्रमाणानें वेष्टनाच्या पृष्ठभागीं क्रमानें वाढवावें ९९. आता लवलाभसञ्ज्ञक मंडल सागतों. दीड हाताच्या प्रमाणाने नऊ व वीस अगुले भूमीची कल्पना करावी व त्यावर दक्षिणोत्तरतः चार सूत्रें मारावीं. हा सर्व प्रकार बहुतेक सर्व मडलामध्यें सारखाच आहे. पिवळ्या रंगानें कमलाचें आच्छादन रंगवून मध्यें शुक्ल रग द्यावा. ग्रहपक्षामध्यें पिवळ्या रंगानें रगवू नये. मध्यभागीं लाल रंग घालावा आणि सर्व रेखा शुभ्र वर्णानें काढाव्या. पौष्टिक कर्मामध्यें पिवळा रंग द्यावा १००–१०२. पण शातिक कर्मामध्यें त्याची योजना करूं नये. काम्य कर्मामध्यें लाल वर्ण लावण्यास सागावें. मध्यभागीं कमल लाल करावें. युग्मकर्मामध्यें सोमाचें कमल उक्त आहे३. तें पिवळा वर्ण सोडून शुक्लवर्णानें करावें. ईशान्यदिशा व उत्तरेचा भाग ह्यामध्यें गुरूचें पिवळें कमल करावें. पूर्वदिशेमध्यें शुक्राचें कमल शुभ्र वर्णानें काढावें. पश्चिमदिशेमध्यें शनीचे कमल कृष्णवर्ण व नैर्ऋत्यदिशेमध्यें राहूचे धूम्रवर्ण कमल काढावें. केतूचेही कमल काढून तें वायव्यदिशेमध्यें ठेवावें; नंतर मुख्य कमल लिहावें ४–६. विचारवानाने त्याच्या पत्र्याच्या सधि विलोमभागीं भराव्या. तें पाच प्रकारच्या रजानीं बाहेरच्या बाजूस सुदर किल्ला काढून त्यानें सुशोभित करावें ७. पूर्व व पश्चिम दिशाच्या प्रदेशीं द्वाराजवळ तें शुक्र करावें व दक्षिण आणि उत्तर ह्या दिशामध्यें तें रक्तवर्ण करणेच प्रशस्त होय ८. त्रिस्थान व सममध्यभाग ह्यांच्यामध्यें बारा अगुलापासून आरंभ करून द्विहस्तादि प्रमाणामध्यें अंगुलप्रमाणानें वाढवावें. पण हा प्रकार विभागपूर्वक झाला पाहिजे ९. जें मंडल चार स्वस्तिकानीं सुशोभित केलेलें असतें तें पंचाब्ज होय असें जाणावे ११०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या द्वितीयभागाचा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥

सूत ह्मणतातः–कोणतेंही कर्म दक्षिणेवांचून किंवा प्रमाणावाचून करू नये व करवूं नये. कारण, प्रमाणावाचून केलेला यज्ञ नष्ट होत असतो. ह्यास्तव, प्रमाण प्रशस्त होय १. ज्या यज्ञाचें जें मान असेल त्याचीच त्यामध्यें योजना करावी. कारण, प्रमाणावाचून कर्म केल्यास आचार्य, होता, ब्रह्मा व विधि जाणणारा साहाय्यकारी हे सर्व नरकास जातात. तसेच ज्याच्या यज्ञामध्यें पापी व हीन जातीचा असा कोणी प्रवेश करील त्याचा तो यज्ञ व्यर्थ होतो २,३.

त्रिभिर्वराटैश्च पण इत्यभिधीयते । तैस्तु षोडशभिर्ज्ञेय पुराणं सप्तभिस्तु तैः ४ राजतैश्चाष्टभिः स्वर्ण यज्ञादौ दक्षिणा स्मृता । महारामे द्विसौवर्ण कूपे स्वर्णार्धमेव च ५ तुलस्यामलकीयागे सुवर्णैकं प्रचक्षते । यकृल्लोके च सौवर्ण लक्षे स्वर्णचतुष्टयम् ६ नवमे कोटिहोमे च देवतानां च स्थापने । प्रासादस्य समुत्सर्गे अष्टादश सुवर्णकाः ७ तडागे पुष्करिण्यां च अर्धार्ध परिकीर्तितम् । महादाने च दीक्षायां वृषोत्सर्गे च सत्तमाः ८ जीवतश्च वृषोत्सर्गे गयाश्राद्धे तथैव च । अवित्तसाध्यमानेन यज्ञं कुर्यात्कलौ युगे ९ दम्पत्योश्च वृषोत्सर्गे मानमेकमुदाहृतम् । बहुभिः क्रियमाणोऽपि याग एको महोत्तमै. १० राज्ञः करग्रहे चैव दीक्षायां दानकर्मणि । अशीतिरत्तिकं स्वर्ण श्रवणे भारतस्य च ११ ग्रहयागे प्रतिष्ठायां सुवर्णशतरत्तिकः । लक्षहोमे चायुते च कोट्यामेव विधीयते १२ देवानां ब्राह्मणानां च दान यस्य प्रकल्पितम् । तस्यैव देयं तद्दानं साङ्गोपाङ्ग सदक्षिणम् १३ नानाऽस्य किञ्चिद्दातव्य सङ्गभङ्गो भवेद्यतः । गृही तु कृत्वा यद्दान तदा तस्य ऋणी भवेत् १४ यज्ञेषु होम्य यद्द्रव्य काष्ठमाज्यादिक च यत् । तन्नायकस्य पूजायां द्रव्यमाहुर्विनिर्मितम् १५ अनादिदेवतार्चायां पूजास्नानादिकर्मणि । यस्याहर्णादिक द्रव्य तस्य देवस्य तद्भवेत् १६ प्रत्यक्ष दक्षिणां दद्याद्यज्ञदानव्रतादिके । अदक्षिणं नैव कार्य प्रकुर्याद्धरिदक्षिणम् १७ अतो दत्तं पुरा दत्तं दातव्य चैव सप्रति । परस्वोद्धारबुद्धीनां सा सा हि दक्षिणा

ऐशी कवड्याचा एक पण होतो असे सांगितले आहे. सोळा पणांचे एक पुराण व सात पुराणांनी राजत होतें ४. व आठ राजतानीं स्वर्ण होतें व तीच यज्ञादिकाच्या ठिकाणची दक्षिणा सांगितलेली आहे. मोठ्या आरामाच्या उत्सर्गकर्मामध्ये दोन सुवर्ण ही दक्षिणा व कूपाचा उत्सर्ग कर्तव्य असता अर्धे सुवर्ण ही दक्षिणा द्यावी ५. तुलसी व आवळी ह्यांच्या यागामध्ये एक सुवर्ण दक्षिणा सांगतात. यकृल्लोकसंज्ञक कर्मामध्ये एक सुवर्ण व लक्षहोमामध्यें चार सुवर्ण इतकी दक्षिणा द्यावी ६. नवमयाग, कोटिहोम, देवताची स्थापना, व प्रासादाचा उत्सर्ग ह्यामध्ये अठरा सुवर्णे ही दक्षिणा होय ७. तडाग व पुष्करिणी ह्यांच्या उत्सर्गसमयीं, तसेंच हे ब्राह्मणहो, महादानामध्ये, दीक्षेमध्ये व वृषोत्सर्गसमयीं पाव स्वर्ण हें दक्षिणेचें मान सांगितलेले आहे ८. जीवत असताना वृषोत्सर्ग कर्तव्य असल्यास त्याचप्रमाणे गयाश्राद्धप्रसंगींही पाव स्वर्ण दक्षिणा उक्त आहे. कलियुगामध्ये यज्ञ थोडया दक्षिणेंत होईल अशा मानाने करावा ९. स्त्री व पुरुष ह्या दोघाचा वृषोत्सर्ग करावयाचा असल्यास एक सुवर्ण हे प्रमाण सांगितलेलें आहे. अति उत्तम अशा पुष्कळांनीं एकच यज्ञ केला असता त्यात, राजाच्या विवाहात, दीक्षेमध्ये, दानकर्मात व भारताचे श्रवण केले असता ऐशी रती सुवर्ण ही दक्षिणा द्यावी १०,११. ग्रहयज्ञामध्ये व प्रतिष्ठाकर्मामध्ये शंभर रती सुवर्ण दक्षिणा द्यावी. लक्षहोम, दहा हजार होम व कोटिहोम ह्यामध्येही दक्षिणेविषयीं हेंच विधान आहे १२. देव किंवा ब्राह्मण ह्यांपैकीं ज्यास जे दान द्यावे असा संकल्प केला तें दान त्यासच सांगोपांग व दक्षिणेसह द्यावे १३. अनुदिष्ट असें कोणतेही दान कोणास देऊ नये. कारण, असे केल्याने प्रेमभंग होत असतो. गृहस्थ पुरुष तर असे दान जेव्हां करितों तेव्हां त्याचा ऋणी होत असतो १४. यज्ञांत यें जे होम्य काष्ठे, आज्य इत्यादि द्रव्य असते तेच नायकाच्या पूजेमध्ये द्रव्य निर्माण केलेले आहे असे सांगतात १५. अनादि देवतेच्या अर्चेमध्ये व पूजा, स्नान इत्यादि कर्मामध्ये ज्याचे जे पूजोपयोगी इत्यादि द्रव्य सांगितलेले असेल त्या देवाचें तेच द्रव्य होय १६. यज्ञ, दान, व्रते इत्यादिकांमध्ये प्रत्यक्ष दक्षिणा द्यावी. दक्षिणेवांचून कोणतेही कर्म करू. नये. पूर्वी दिलेले, आता नुकतेच दिलेले व साप्रतकाळी द्यावयाचे इत्यादि

भवेत् १८ दत्तानि विधिवत्पुसां देवदानानि यानि हि । दासीदासगवादीनि मनसा यानि कर्हिचित् १९ दातव्यान्यपि तान्येव कारयेत्परिवर्तनम् । एकस्यानेकदानं च देदेत्कश्चित्पृथक्पृथक् २० वरण च कदा कुर्यात्तत्रे कुर्याच्च दक्षिणाम् । रत्नस्य दक्षिणा देया काञ्चन समुदाहृतम् २१ काञ्चनस्य भवेद्रौप्यं रौप्ये काञ्चनमुद्दिशेत् । भूमेर्भूमिर्दक्षिणा स्याद्वस्त्रस्य वस्त्रदक्षिणा २२ पानीयस्य तु पानीय व्रीहीणां व्रीहिदक्षिणा । गजस्य दक्षिणा च्छागो ह्यश्वस्य मेष इरित २३ पशूनां च चतुष्पादा देवस्य देवदक्षिणा । यज्ञे मानस्य षड्भागो दक्षिणा परिकीर्तिता २४ आचार्यस्यैव भागैक यजमानः प्रदास्यति । पापकैस्तु कलत्राणां भागैक तदनन्तरम् २५ पात्राणामृत्विगादीनां भागत्रयमुदाहृतम् । सर्वसत्त्वस्य भागैकं स्वल्प चेच्छिष्टगौरवात् २६ आचार्याद्यगतः कश्चित्क्षीणवित्त समाहरेत् । अमूल्य वर्गमूल्यं यद्भवेद्वै दक्षिणोत्तमा २७ मानाशक्तौ तु यज्ञानां यद्देय यज्ञसिद्धये । देवता पुस्तकं रत्नं गावो धान्यं तिलास्तथा २८ नमेरुफलपुष्पाणि देयान्येतानि सर्वतः । चतुश्चक्राङ्कितो यस्तु सान्द्रो वृत्तो जनार्दनः २९ देवताप्रतिमाद्य च शिरोनाभिस्तथैव च । श्वेतलिङ्ग रत्नलिङ्गमिन्द्रनीलादिक च यत् ३० दक्षिणावर्तशङ्ख च हरिवंशस्तथाऽखिलः । कपिलो नीलवृषभः सोमधान्यस्तथैव च ३१ अमूल्यान्याहुरेतानि दत्त्वाऽनन्तफलानि च । स्वर्णपादो भवेन्मूल्य शालिग्रामस्य दक्षिणा ३२ क्षुद्रलिङ्ग स्वर्णमूल्य पादार्ध श्रीधरेऽपि च ।

सर्वही दान पुष्कळ दक्षिणा देऊन करावें. तात्पर्य, दुसऱ्यास देण्याविषयी ज्याची बुद्धि उदार आहे अशा पुरुषाची ती तीच दक्षिणा होय १७, १८. पुरुषानीं यथाशास्त्र दिलेलीं जीं देवदानें, तशीच जीं दासी, दास, गाई इत्यादिकांचीं दानें व मनानें केव्हाही दिलेली जीं दानें असतात तीच पुनः द्यावीं. म्हणजे त्यांची आवृत्ति करावी. कोणी तर एकालाच भिन्न भिन्न अनेक दानें द्यावीं १९,२०. कधीं वरणी द्यावी व कधीं तत्रानें दक्षिणा द्यावी. रत्नाची दक्षिणा सुवर्ण सांगितलेली आहे २१ सुवर्णाचें दान द्यावयाचें असल्यास रुप्याची दक्षिणा व रुप्याचें दान द्यावयाचे असल्यास सोन्याची दक्षिणा द्यावी. भूमीदानाची दक्षिणा भूमि व वस्त्रदानाची दक्षिणा वस्त्र द्यावें २२. पानीयाच्या दानामध्यें पानीयाची दक्षिणा व व्रीहींच्या दानामध्यें व्रीहीची दक्षिणा द्यावी. गजाची दक्षिणा मेंढा व अश्वाची दक्षिणा मेष (बकरा) सांगितलेला आहे २३. पशूंची दक्षिणा चतुष्पाद पशु व देवाची दक्षिणा देव द्यावी. यज्ञाचें जे मान असेल त्याच्या सहाव्या भागाची दक्षिणा सांगितलेली आहे २४. त्यांतील एक भाग यजमानानें आचार्यास द्यावा. दुसरा भाग ब्राह्मणाच्या सुवासिनींस द्यावा २५. सत्पात्रे व ऋत्विज ह्यांच्या करिता तीन भाग सांगितलेले आहेत व सर्व प्राण्याचा एक भाग होय. शिष्ट पुरुषाच्या गौरवामुळें तें प्रमाण स्वल्प आहे असें जर वाटत असेल तर २६ आचार्यादिक कोणींही आपल्या दक्षिणेतील द्रव्य दुसऱ्या दरिद्र्यास अंशतः द्यावें. साराश, अमूल्य किंवा निष्पट मूल्यवान् अशी जी दक्षिणा असेल ती उत्तम होय २७. यज्ञामध्यें दक्षिणेचें जे प्रमाण सांगितलेलें आहे तितकी दक्षिणा देण्यास जर कोणी असमर्थ असला तर त्याने यज्ञाच्या सिद्धयर्थ देवता, पुस्तक, रत्न, गाई, धान्य, तसेंच तीळ २८, नमेरूची फुलें व पुष्पें इत्यादिकांतील यथाशक्ति दक्षिणा सर्व कर्मामध्यें द्यावी. जो जनार्दन (शालग्राम) चार चक्रानीं चिन्हित व अति वर्तुळ असेल त्याची दक्षिणा द्यावी २९. किंवा देवताची प्रतिमा वगैरे, तसाच शिरोनाभिनामक शालग्राम, श्वेतलिंग, रत्नलिंग, इंद्रनीलादिक ३०, दक्षिणावर्त शंख, तसाच संपूर्ण हरिवंश, कपिलवर्ण व नीलवर्ण वृषभ व सोमधान्य ही सर्व अमूल्य आहेत असें सांगतात. हीं दिल्यानें अनंत फल मिळतें. शालिग्रामाची दक्षिणा स्वर्णाचा

अनन्तेऽनन्तमित्युक्तं पादार्धं बाणलिङ्गके ३३ यथा पुस्तकमात्रेण स्वर्णपादार्धमिष्यते । ज्योतिषेऽर्धं सुवर्णस्य रजतार्धं वृषे तथा ३४ हरिवंशे श्लोकशते स्वर्णमेकं प्रकीर्तितम् । धर्मशास्त्रस्य साहस्रे रजतत्रयमीरितम् ३५ कपिलायां सुवर्णार्धं धेनुमात्रे पुराणकम् । प्रायश्चित्तविधौ ज्ञेय धेनुमात्र पुराणकम् ३६ पुराणात्रितयं चान्य वीर्यहीने द्वयं भवेत् । कृष्णे वृषे षट्पुराण श्वेते नवपुराणकम् ३७ द्वात्रिंशच्च पुराणं स्याद्वृषे नीले तथैव च । नमेरो. प्रतिचक्रे च द्वादश स्वर्णरात्तिकाः ३८ मूल्य श्रीफलमात्रेऽपि पुराण द्वितयं भवेत् । पङ्क्तयेऽपि तूर्यक विद्यात्कलौ पणद्वयवस्थया ३९ धात्रीफलस्य प्रत्येक भवेद्रजतमाषकम् । एतान्याहुः प्रशस्तानि मूल्ययोगे पर विदु ४० [११८१] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे मूल्यकथने तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

सूत उवाच ॥ पूर्णपात्रमथो वक्ष्ये यज्ञे साधारणेऽपि च । कामहोमे भवेन्मुष्टिर्मुष्टिरष्टौ तु कुञ्चिका १ एकैककुञ्चिकानेन कुर्यात्पात्राणि वै सदा । पात्राणि च पृथक्कृत्वा स्थापयेद्द्वारदेशतः २ सिद्धान्नां खड्गधारायां प्रत्येकस्य दिनक्रमात् । तत्रैव दद्यान्नान्यत्र न कुर्याद्व्ययं क्वचित् ३ कुण्डानां कुड्मलानां च वेतन यादृशं शृणु । चतुरस्रपदस्यापि रौप्यार्धं च कलौ युगे ४ द्वे रौप्ये सर्वतोभद्रे क्रौञ्चघ्राणे चतुर्थकम् । महासिंहासने पञ्चरूपपात्रं तदर्धकम् ५

पाद ३१, ३२, क्षुद्र लिंगाची दक्षिणा एका स्वर्णाची किंमत; श्रीधराची दक्षिणा पादार्ध; अनंताची दक्षिणा अनंत व बाणलिंगाची पादार्ध असें सांगितलें आहे ३३. ज्याप्रमाणें केवल पुस्तकाची दक्षिणा स्वर्णाचा आठवा भाग असें मानलेलें आहे त्याप्रमाणें ज्योतिऱ्या दानामध्ये अर्धं सुवर्ण व वृषदानामध्यें अर्धं रजत हें दक्षिणेचें मान सांगितलें आहे ३४. हरिवंशाच्या शंभर श्लोकाची दक्षिणा एक स्वर्ण असें म्हटलें आहे. व धर्मशास्त्राच्या सहस्र श्लोकाची दक्षिणा तीन रजत असें सांगितलें आहे ३५. कपिला गाईचें दान देताना अर्धं सुवर्ण व सामान्य धेनूच्या दानसमयीं एक पुराण हें दाक्षिणेचें मान ठेवावें. प्रायश्चित्तविधीमध्यें केवळ धेनु व एक पुराण दक्षिणा उक्त आहे असें जाणावें ३६. गोदानावाचून जें प्रायश्चित्त होत असेल त्यात तीन पुराणें व वीर्यहीन अशा दानामध्यें दोन पुराणें द्यावीं. काळ्या वृषभाचें दान देताना सहा पुराणे, शुभ्रवर्ण बैलाचें दान करिताना नऊ पुराणें आणि त्याचप्रमाणे नील वृषाचे दान कर्तव्य असता बत्तिस पुराणे दक्षिणा द्यावी. नमेरूच्या प्रतिचक्राची दक्षिणा सुवर्णाच्या बारा रती ३७, ३८, केवल श्रीफलाचें दान करावयाचे असताही दोन पुराणाचें मूल्य ही दक्षिणा व पंक्तीमध्ये चार पुराणें इतकी दक्षिणा वाटावी. पण कलियुगामध्यें हेंच मान-पणाच्या व्यवस्थेनें जाणावें ३९. प्रत्येक धात्रीफलाचें एक मासा रुपें ही दक्षिणा सांगितलेली असून हें सर्व दाक्षिणाप्रमाण प्रशस्त आहे असें म्हटलेलें आहे. मूल्ययोग असता तें मान ह्याहून अधिक ठेवावें असें ज्ञाते समजतात ४०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणांतील मध्यमपर्वाच्या द्वितीय भागाचा दक्षिणामूल्याविषयी तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

सूत म्हणतात.— आता साधारण यज्ञांतीलही पूर्णपात्राचे प्रमाण सांगतों. कामहोमामध्यें एक मुष्टि प्रमाण ठेवावें. आठ मुठी म्हणजे एक कुचिका होते १. एकेक कुचिकेन्या प्रमाणानें सर्वदा पात्रे करावीं. पात्रें पृथक्पृथक करून त्याची द्वारप्रदेशीं स्थापना करावी २. सिद्धखड्गधारांतील दिनक्रमानें प्रत्येकास तेथेंच द्यावें व त्याम तेथून दुसऱ्या कोठें नेऊ नये व व्ययही कधी करूं नये ३. कुंडें व कमलें ह्यांचें वेतन कसे असतें तें आता ऐका. कलियुगामध्येही चतुरस्र पदांचे रौप्यार्ध हें प्रमाण आहे ४. सर्वतोभद्रामध्यें दोन रौप्ये व क्रौंचघ्राणामध्ये रौप्य चतुर्थ प्रमाण धरावें.

सहस्रारे मेरुपृष्ठे तुर्यरौप्यवृषाधिकम् । वृषे गले च वृषभ शेषे रौप्यसहस्रकम् ६ चतुरस्रस्य निर्माणे स्वर्णपाद कलौ युगे । महाकुण्डे तु द्विगुणं वृत्ते रौप्य निवेदयेत् ७ पद्मकुण्डे तु वृषभमर्धचन्द्रे तु रौप्यकम् । योनिकुण्डे ददेद्धेनुमष्टार्धे स्वर्णमाषकम् ८ षडस्रे तु तदर्धं स्याद्यागे माषद्वय भवेत् । शैवे चोद्यापने चैव प्रत्यहा स्वर्णमाषकम् ९ दारुणे हस्तमात्र स्यात्स्वर्णकृष्णलक भवेत् । इष्टकाकरणे चैव प्रत्यहा स्यात्पणद्वयम् १० खण्डे दशवराट स्याद्बृहन्माने तु काकिणी । तडागे पुष्करिण्यां च खनने प्रथमाङ्कके ११ सप्तहस्तमिते कूपे निम्ने आबद्धमात्रकम् । पुराणस्य च एकांशं वेतन परिकीर्तितम् १२ वर्धयेत्पणमात्रेण निम्ने पत्रे च शकमात्र । बृहत्कूपस्य निर्माणे प्रत्यहं च पणद्वयम् १३ शैले क्षेयं काञ्चनस्य रत्निका गृहकर्मणि । काष्ठे क्षेय सार्धपणं रङ्गादिरचिते पणम् १४ वृक्षाणां रोपणे दद्यात्प्रत्यहा सार्धमाषकम् । सेतुबन्धे पङ्किले च पणद्वयं च काकिणी १५ पणे पणे तु ताम्रस्य दद्यात्पणचतुष्टयम् । घटने कांस्यशीसानां पणत्रयमुदाहृतम् १६ अथवा दिनसंख्यानं पणैक च सकाकिणी । सुवर्णस्य पणैके तु पुराणं रत्नकुट्टिमे १७ रजते तु तदर्धं स्यात्स्फटिकस्य च दारुणे । दिनसंख्यापणद्वन्द्वं रत्नावासेषु कुड्यलम् १८ मणिबन्धे मणौ क्षेय काकिणी परिकीर्तिता । चतुर्वराटमधिकं स्फाटिके मणिबन्धने १९ कांस्यतालस्य निर्माण धमने तु पणत्रयम् । लाक्षा-

महासिंहासनामध्ये पंधरा पात्रात त्याचे अर्धे प्रमाण ९; आणि सहस्रार व मेरुपृष्ठ ह्यामध्ये रौप्यचतुर्थ प्रमाण ठेवावें. वृष व गल ह्यामध्यें वृषभ व इतर सर्व स्थळीं रौप्यसहस्र प्रमाण उक्त आहे ६. कालियुगामध्यें चतुरस्राच्या निर्माणसमयीं स्वर्णपाद, महाकुंडामध्यें त्याच्या दुप्पट व वृत्तामध्यें रौप्य हें प्रमाण सांगावें. पद्मकुंडामध्ये वृषभ, अर्धचंद्रामध्यें रौप्य व योनिकुंडामध्यें धेनु द्यावी. अष्टार्धामध्यें सुवर्णाचा मासा ७, ८; षडस्रामध्यें त्याच्याहूनही अर्धे व यागामध्यें दोन मासे असावे. शैवकर्म व उद्यापन ह्यामध्यें प्रतिदिनीं सुवर्णाचा मासा हे मान ठेवावें. हस्तमात्र प्रमाण खोदावयाचे असल्यास स्वर्णकृष्णलक; इष्टकाकरणामध्यें प्रतिदिनीं दोन पण; खंडामध्यें दहा वराट व मोठ्या प्रमाणाचा तडाग, पुष्करिणी इत्यादिकास खणावयाचें असता पूर्व अंगामध्ये काकिणी (पाव पण) हें वेतन द्यावें९-११. सात हात प्रमाणाचें कुंड केवल हातभरच खोल असल्याम पुराणाचा एकांश हें वेतन सांगितलेले आहे १२ व तें जसें जसें खोल असेल त्या त्या मानानें क्रमाने एकेक पण वाढवावा. मोठा कूप खणावयाचा असल्यास प्रतिदिनी दोन पण वेतन द्यावे. पर्वताच्या उंचवट्यावर गृह खोदावयाचे असल्यास सोन्याची रत्ती हें वेतन समजावें. धान्यागार करावयाचें असता अर्ध पण व रंगादि लावून अंतर्गृह करावयाचे असल्यास पण वेतन द्यावें १३,१४. वृक्षास लावावयाचें असल्यास रोज अर्धा मासा द्यावा. सेतु बांधावयाचा असल्यास दोन पण व चिखल करावयाचा असल्यास पाव पण द्यावा १५. प्रत्येक पणाच्या जागीं ताब्याचे चार पण द्यावे. कांसे, शिसे इत्यादिकाची घडणावळ तीन पण द्यावी असें सांगितलेलें आहे १६. किंवा दिवस मोजून प्रतिदिनी सव्वा पण ह्या हिशेबाने वेतन द्यावें. रत्नजडित फरसबंदी करावयाची असल्याम सुवर्णाचा एक पण व पुराण हे वेतन द्यावे १७. रुप्याचा चौथरा करावयाचा असल्यास त्याच्या अर्धे वेतन द्यावे. स्फटिकाच्या भव्य कामामध्ये दिवस मोजून रोज दोन पण द्यावे. तसेच रत्नाच्या कमलामध्येही वेतनाचें मान तेच ठेवावे १८. मण्यास वेध करावयाचा असल्यास पाव पण वेतन सांगितलेले आहे असे जाणावें. स्फटिकाच्या मण्यास वेध करावयाचा असल्यास चार वराट अधिक वेतन द्यावें १९. काशाचा टाळ करावयाचा असल्यास किंवा ते आटवावयाचें असल्याम तीन पण वेतन द्यावें लाखेच्या योगानें एखादें काही करावयाचें

निर्माणके कार्ये तदर्धमपि कीर्तितम् २० गवानां दोहने चैव वराटं तूर्यवेतनम् । वेतनं वस्त्र-निर्माणे पञ्च हस्तपणत्रयम् २१ अविवस्त्रस्य निर्माणं स्यन्दनं दशकाकिणी । पिधानवस्त्रनिर्माणं त्रिपणं परिकीर्तितम् २२ दशकाकिणी ऊर्ध्वाधस्तद्वयोः पण्यवेतनम् । वशाजीवस्य प्रत्यहा पणस्यार्धं सकाकिणी २३ लोहकारस्य च तथा नापितस्य च वेतनम् । शिरसा तस्य वपने विज्ञेया दशकाकिणी २४ सश्मश्रुनखमाने तु प्रदद्यात्काकिणीद्वयम् । नारीणामथ संस्कारे नखचित्रादिरञ्जने २५ सकाकिणीपणं तच्च सविंशे च पयोधरे । पणानां तुर्यकं दद्यात्सीमन्तस्यालके तथा २६ पदचित्रे तु सार्द्धं स्याद्वीणां गुह्यधारणे । धान्यानां रोपणे चैव दिनैकं पणवेतनम् २७ लवने तु तथा देया गुवाकानां च रोपणे । दण्डपत्रस्य संस्कारे मरीचानां तथैव च २८ पणद्वयं वराटानामधिकं दशमेव तु । हले हले पणैकं स्यात्काकिण्यधिकमेव च २९ पणत्रयं चक्रपणे महिषाणां पणाधिकम् । नराणां वाहने चैव पणैकं दशकाकिणी ३० दासीनां गर्दभानां च अधिकं काकिणीद्वयम् । क्षालने चापि वस्त्रस्य तैलक्षारविवर्जिते ३१ वस्त्रे प्रतिपणं दद्याद्दीर्घे प्रस्थेऽपि वर्धयेत् । सद्यः प्रक्षालनेऽप्यर्धं दिनादावधिकं भवेत् ३२ श्वेतवस्त्रे भवेन्न्यूनं पदे सूक्ष्मे च वर्द्धयेत् । मृत्तिकानां समुद्धारे कुद्दाले चेक्षुपीडने ३३ वेतनं पुष्पसंस्कारे सहस्रे दशकाकिणी । काकिणीसूत्रनिबद्धे

असल्यास त्याच्या अर्धे वेतन द्यावे असे सांगितलेले आहे २०. गाईच्या दोहनकाली एकचतुर्थांश वराट वेतन द्यावे. वस्त्र तयार करावयाचे असल्यास एक हातास तीन पण ह्याप्रमाणे वेतन द्यावें २१. लोकरीचे वस्त्र करावयाचे असल्यास दहा काकिणी ह्मणजे अडीच पण द्यावे. आच्छादन करावयाचे वस्त्र विणावयाचे असल्यास तीन पण सांगितलेले आहेत २२. वर व खालीं विणकाम करावयाचे असल्यास दहा काकिणी व तो खर्च होऊन गेल्यावर जे विणकाम राहिले असेल त्याचे एक पण वेतन द्यावें. बुरुडाचे काम करणारास रोज काकिणीसह अर्धा पण द्यावा २३. लोहार व नापित ह्यासही तितकेंच वेतन द्यावें. पण त्यानें सर्व मस्तकाचें वपन केल्यास दहा काकिणी २४ व केवळ श्मश्रु-नखेच काढल्यास दोन काकिणी द्याव्या. स्त्रियांच्या संस्कारात नखावर रंगादि लाविले असता काकिणीसह पण व तेच वस्त्र स्थली चित्रादि काढणाऱ्या स्त्रीस चार पण द्यावे. केशप्रसाधनामध्येही तितकीच मजुरी द्यावी २५, २६ पायावर चित्र काढले असता त्याच्या अर्धे व गळ्यावर गुह्य चित्रे काढल्यासही तितकेच वेतन द्यावे. धान्य पेरावयाचे झाल्यास एका दिवसाचें पण वेतन द्यावें २७. धान्य कापतानाही तितकेच वेतन द्यावे. सुपारीची झाडे लावितांना, दंडपत्रास संस्कार करिताना व मिऱ्यास संस्कार करितांना २८, दोन पण व दहा वराट अधिक इतके वेतन द्यावें. प्रत्येक नांगराचे ठिकाणी एक पण व काकिणी अधिक असे वेतन द्यावें २९. कापणी करितांना तीन पण वेतन व रेट्याचे वेतन आणखी एक अधिक पण द्यावे. नरांच्या वाहनामध्ये एक व दहा काकिणी द्याव्या ३०. दासी व गर्दभ ह्यांचे वेतन आणखी दोन काकिणी द्यावे. तेल व क्षार न घालता वस्त्र धुवावयाचें असल्यास प्रतिवस्त्रीं एक एक पण द्यावा. मोठ्या प्रमाणाचे वस्त्र असल्यास वेतनही वाढवावें. तेव्हाच धुवून द्यावयाचे असल्यास अर्धा पण व काही दिवस सारखे धुतावयाचे असल्यास अधिक वेतन द्यावें ३१. ३२. शुभ्र वस्त्राचे वेतन कमी करावें व तेच वस्त्र नाजुक असल्यास वेतन वाढवावें. मृत्तिका वर काढावयाची असल्यास किंवा कुदळीने खणावयाची असल्यास, उंसाचा रस काढावयाचा असल्यास व हजार पुष्पास संस्कार कर्तव्य असल्यास दहा काकिणी वेतन द्यावे. माला गुफावयाची असल्यास एक काकिणी व पुष्पाची मुंडमाला करावयाची असल्यास

च द्विगुणं कण्ठमालिका ३४ अबद्धे द्वादशगुलं यावन्मुण्डमाला प्रकीर्तिता । हस्तत्रयं कण्ठमाला आनाभिकमलादधि ३५ काकिणीकत्रयं चैव निर्माणे द्विजसत्तमाः । मालत्याश्च तुलस्याश्च जातियूथ्याश्च सत्तमाः ३६ तदर्धार्धं मारुतेन दमने बकुलस्य च । वेतनं दीपतैले च आज्यस्य परिवर्धयेत् ३७ यामे यामे रौप्यमाष स्नेहे चैव तु काकिणी । सार्धाङ्गुलप्रमाणेन वस्त्रवर्ति विदुर्बुधाः ३८ षडङ्गुलेन दैर्घ्यं च न न्यूनं नाधिकं भवेत् । पञ्चविंशतिभिः संख्या नन्तुभिर्द्विजसत्तमाः ३९ पञ्चाङ्गुलेन मानेन कर्तव्यः सुसमाहितः । हस्तोच्छ्राये प्रदद्यात्तु मुष्टिहस्ते तु मध्यमम् ४० त्रिहस्ते चतुर्हस्ते वा उत्तमं मानमीरितम् । स्वर्णधारे हृता राजा रजते सर्वकामदः ४१ ताम्रे चायुःक्षयकरमायसे दुर्गतिप्रदः । शस्तस्य करमर्दस्य प्रशस्तोत्तर उच्यते ४२ दीपाधारं कांस्यमयं तथा रीतिमयस्य च । अभावे मृन्मयस्यैव मृन्मयं मानवर्जितम् ४३ दशाङ्गधूपके मूल्यं विंशके तु पणत्रयम् । द्वादशकाङ्गुलेऽप्यर्धवर्ति धूपाय वर्तयेत् ४४ हस्ते पञ्चप्रमाणं च वस्त्रैः कुर्याच्च वर्तिकाम् । पञ्चविंशतिभिर्वा यः समूहा वर्तिरुच्यते ४५ [११२६] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

सूत उवाच ॥ अतःपरं प्रवक्ष्यामि कलशानां विनिर्णयम् । यस्यार्पिते च साङ्गल्ये यात्रासिद्धिश्च जायते १ सप्ताङ्गं कलशं ज्ञेयं पञ्चाङ्गमथवा पुनः । वारिमात्रेण संपूर्णं न सा सिद्धिः

त्याच्या दुप्पट वेतन द्यावें. दोन अंगुलापर्यंत जी बाधलेली नसते तिला मुंडमाला असें ह्मटलेलें आहे. तीच तीन हात लांब झाली असता कंठमाला ह्या संज्ञेस पात्र होते. ती नाभिकमलापर्यंत पोंचते. अशा प्रकारची माला निर्माण करावयाची असता, हे उत्तम ब्राह्मणहो, तीन काकिणी द्याव्या. मालतीची, तुलसीची, जाईची व जुईची माला करावयाची असताही तितकेंच वेतन द्यावें व बकुलपुष्पाची माला वाऱ्याच्या साहाय्याने करावयाची असल्यास त्याच्या पावपट वेतन द्यावें. आता दिव्याच्या तेलाचें वेतन सांगतों. तुपाचा दिवा लावावयाचा असल्यास वेतन वाढवावें ३३-३७. प्रत्येक प्रहरास दिव्याचें वेतन एक मासाभर रुपें व तेलाचें काकिणी द्यावें. वस्त्राची वात करावयाची असल्यास ती दीड अंगुलप्रमाणाच्या वस्त्राची करावी ३८. व ती लांबीमध्यें सहा अंगुलें असावी. ह्या प्रमाणाहून ती अधिक किंवा कमी नसावी. किंवा हे उत्तम ब्राह्मणहो, पचवीस तंतूंनी पांच अंगुलप्रमाणाची वात शास्त्रपणें करावी. हे प्रमाण दीप एक हातभर उंच असल्यास धरावें. पण दिवा मुडा हात असल्यास वातीचें मध्यम मान करावें ३९,४०. दिवा तीन हात किंवा चार हात असल्यास उत्तम मान सांगितलेलें आहे. दिव्याचा आधार सुवर्णाचा केल्यास तो राजास आनिष्ट होय, रजताचा केल्यास तो सर्व कामना देत असतो ४१; ताम्याचा दीपाधार सर्व आयुष्याचा क्षय करितो. लोखंडाचा असल्यास तो दुर्गति देत असतो. विवाहामध्ये लोखंडाचा दीपाधार प्रशस्त ह्मणून सांगितलेला आहे ४२. असो; दीपाचा आधार कांस्यमय असावा. त्याचप्रमाणें पितळेचाही न मिळाल्यास मृत्तिकेची पतीच प्रशस्त होय. पण मृन्मय दीप असता वात मानरहित करावी ४३. दशांग धूपामध्ये मूल्य द्यावें. वीस ह्या प्रमाणाचा धूप असल्यास तीन पण वेतन द्यावें. द्वादशांगुल प्रमाणापैकींही अर्धी वात धूपाकरिता वळावी ४४. हातभर दीपप्रमाणे असल्यास वस्त्रांनीं पंचांगुलप्रमाण वात करावी किंवा पंचवीस तंतूंची वात सांगितलेली आहे ४५. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या द्वितीयभागाचा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥

सूत म्हणतातः— आता यापुढे मी कलशाचा विशेष निर्णय सांगतों. ह्या निर्णयाचा मगल

भजायते २ अथवा क्षतपुष्पेषु देवमावाह्य पूजयेत् । न चान्यत्र यजेद्देवान्विफलं परिकीर्तितम् ३ वटस्याश्वत्थवृक्षस्य पालाशबिल्वकस्य च । पञ्चपल्लवमुद्दिष्टं विन्यसेत्कलशोपरि ४ सौवर्णा राजता वापि ताम्राद्या मृन्मयैस्तथा । कलशा. क्रमशः प्रोक्ता यथाविभवानुसारतः ५ अभेद्या सुघमाः श्लक्ष्णाः सर्वे आद्याः सुपूरिता. । निश्छिद्रा ऋजवश्चैव सेचनान्येककर्षकः ६ एकत्रिंशाङ्गुलं कुर्यात्कालाद्द्विगुणं शतम् । मुखं चाष्टाङ्गुलं तस्य ह्यङ्गुले च वरार्थिने ७ तैजसैः कारयेन्मानं मृन्मये मानमुच्यते । कलशोदकनिर्माणे मानं नैव योजयेत् ८ कलशस्थापनं वक्ष्ये यत्र साऽऽहिता सुरा । व्युत्क्रमेण प्रविन्यासे यातुधानो हरेत्किल ९ यज्ञे साधारणं वक्ष्ये यद्विधानं यथा मतम् । स्वस्तिकोपरि विन्यासे संपूर्णस्यार्धमानके १० चतुरस्राकारं भित्त्वा चोर्ध्वाधोमानतः समम् । तुर्यसूत्राणि मतिमान्पञ्च पूर्वायतनानि च ११ मार्जयेत्स्वस्तिकाकार तुर्यमान यथा भवेत् । स्वस्तिक जायते तत्र कलशानां तथासनम् १२ स्योना पृथिवीति मन्त्रेण कुर्याद्भूमिपरिग्रहम् । मध्यमानामिकाभ्यां च न्यसेत्पातालसंमुखम् १३ ऋषिर्नारायणोऽस्य स्याद्गायत्री देवता रविः । विनियोगः स्थापने च तथा भूमिपरिग्रहः १४ धान्यमसीति मन्त्रेण धान्य सूक्तं परिस्तवेत् । अस्य मन्त्रस्य च ऋषिर्गौतमः परिकीर्तितः १५ अनुष्टुप्च भवेच्छन्दो

कृत्यामध्ये विनियोग केला असता यात्रासिद्धि होते १. कलशाचे ठायीं सात अंगें किंवा पाच अंगें तरी असतात असें जाणावें. केवळ पाण्यानें भरलेल्या कलशानेच सिद्धि प्राप्त होत नसते २. किंवा अक्षता व पुष्पें ह्याचे ठायीं देवाचें आव्हान करून पूजन करावें. ह्यावाचून अन्यत्र कोठेंही देवाचें पूजन करूं नये. कारण, तें निष्फल होतें असें सांगितलेलें आहे ३. वड, अश्वत्थ, धायटी, बेल इत्यादि पंचपल्लव सांगितलेले आहेत. ते कलशावर ठेवावे ४. सुवर्णाचे, रुप्याचे, ताम्र्यादिकाचे व तसेंच मातीचे कलश क्रमानें आपल्या शक्तीप्रमाणे सांगितले आहेत ५. ते मजबूत, अगदीं सारखे, सुरेख व सर्व नवे आणि पाण्यानें भरलेले असावेत. छिद्ररहित व सरळ असलेले असे ते कलश एक कर्षप्रमाण उदक त्यात राहील असं करावें ६. त्याचा विस्तार एकतीस अंगुलें करावा. पण तें कर्म काहीं दिवस चालवावयाचें असल्यास तेच प्रमाण ह्याच्या दुप्पट किंवा शंभर अंगुलें धरावें. कलशाचें मुख आठ अंगुलें रुंद असावे व वराची इच्छा असल्यास ते दोन अंगुलेच रुंद ठेवावें ७. हें सांगितलेलें प्रमाण धातूंचे कलश करावयाचे असल्यास त्याविषयीं समजावें. आता मृन्मय कलशाचें मान सांगावयाचें आहे. कलशोदक निर्माण करावयाचें असता मानावांचून त्याची योजना करूं नये ८. आता जेथे देव सर्वदा रहातात ती कलशस्थापना सांगतों. शास्त्रविरुद्ध पद्धतीनें कलशस्थापना केल्यास राक्षस त्याचें हरण करीत असतात ९. शास्त्रास जसें मान्य आहे तसं यज्ञातील साधारण विधान सांगतों. संपूर्ण कलशाचा स्वस्तिकावर विन्यास करावा व प्रमाणाचा कलश असल्यास चौकोनाच्या उत्तर प्रदेशाचा विभाग करून ऊर्ध्व व अधोमानाने चार सूतें गुंडाळावीं व बुद्धिमानानें पांच पूर्वायतनाचें मार्जन असें करावें कीं ज्याच्या योगानें तें स्वस्तिकाकार व तुर्यप्रमाण होईल. तेथें जें स्वस्तिक होतें तेच कलशाचें आसन होय १०-१२. ' स्योना पृथिवी ' ह्या मंत्रानें भूमिपरिग्रह करावा. ह्मणजे मध्यमा व अनामिका ह्या अंगुलींनीं पातालाच्या संमुख स्पर्श करावा १३. ह्या मंत्राचा ऋषि नारायण, छंद गायत्री व देवता रवि आहे आणि त्याचा विनियोग कलशस्थापनेकडे व भूमिपरिग्रहाकडे केला आहे १४. " धान्यमसि " ह्या मंत्रानें धान्याची स्तुति करावी. ह्यास धान्यसूक्त असें ह्मणतात. ह्या मत्राचा ऋषि गौतम ह्मणून सांगितलेला आहे १५.

देवताऽस्य गुरुः स्मृतः । आजिघ्रं कलश मह्या स्थापयेत्कलशं ततः १६ कनिष्ठाङ्गुष्ठकं त्यक्त्वा कुम्भाग्रे उदरेऽपि च । विन्यासश्चैव कर्तव्यस्त्यङ्गुले ब्रह्ममुद्रया १७ आजिघ्रस्य च मन्त्रस्य ऋषिर्भर्ग उदाहृतः । पङ्क्तिश्छन्दश्च उद्दिष्टो देवता विष्णुरव्ययः १८ कलशस्थापने चैव सोमयागे च योजयेत् । पञ्चनद्येति मन्त्रेण क्षिपेद्वङ्गाजल ततः १९ देवता परमा त्रिष्टुब्देवता सोमभावितः । विनियोगः पल्लवे च विन्यसेत्परिकीर्तितः २० याः फलिनीति मन्त्रेण प्रदद्यात्सफलाक्षतम् । याः फलिनीति मन्त्रस्य ऋषिः कमलसंज्ञकः २१ त्रिष्टुप्छन्दो गणपतिर्देवता परिकीर्तिता । बदरं नागरं चैव धात्री च पिचुमर्दकम् २२ जीवन्त्यौ पीवर चैव फलान्येतानि वर्जयेत् । हिरण्यगर्भेति ऋचा पञ्च रत्नानि निक्षिपेत् २३ ऋषिर्हिरण्यगर्भेति छन्दस्त्रिष्टुबुदाहृतम् । सविता देवता चास्य रत्नन्यासेति योजयेत् २४ अमृतीकरण कुर्यादैवशुल्बनमेव च । वरुणस्य त्वेति ऋषिर्वरुणान्तरे योजयेत् २५ श्रीश्च ते इति मन्त्रेण दद्यात्पुष्प सचन्दनम् । गन्धद्वारेति मन्त्रेण दद्याद्दूर्वां विलोडितम् २६ काण्डादिति च मन्त्रेण दद्याद्दूर्वाशतं पुनः । व्रीहयश्चेति मन्त्रेण पञ्च व्रीहींश्च निक्षिपेत् २७ तिलाश्च माषा मुद्गाश्च श्यामाका शालयः स्मृताः । पञ्च धान्यगणः प्रोक्तः सर्वारिष्टनिषूदनः २८ [१२५४] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

सूत उवाच ॥ अथ मासाश्रयं कर्म कर्तुं मासनिरूपणम् । क्रियते तद्विधं सद्भ्यो भवेन्मासश्चतुर्विधः १ चान्द्रः सौरः सावनश्च नाक्षत्रश्च तथाऽपरः । शुक्लप्रतिपदं प्राप्य यावदर्शं च ऐन्दवः २

ह्याचा छंद अनुष्टुप् व देवता गुरु आहे. " आजिघ्रं कलश मह्या " ह्या मंत्रानें तदनंतर कलशाची स्थापना करावी १६. कनिष्ठिका व अंगुष्ठ ह्यास सोडून बाकी राहिलेल्या तीन अंगुलांनीं कलशाच्या अग्रभागीं व उदरप्रदेशींही ब्रह्ममुद्रेनें विन्यास करावा १७. " आजिघ्र " ह्या मंत्राचा ऋषि भर्ग ह्मणुन सांगितलेला आहे. त्याचा छंद पंक्ति असून देवता अव्यय विष्णु होय १८. व त्याचा विनियोग कलशस्थापनेमध्ये व सोमयागामध्यें करावा. नंतर " पंचनद्या " ह्या मंत्रानें कलशांत गंगाजल सोडावें. ह्या मंत्राचा छंद त्रिष्टुप् व देवता सोम आहे व विनियोग पल्लवविन्यासाकडे केलेला आहे १९, २०. "याः फलिनी" ह्या मंत्रानें फलासह अक्षता टाकाव्या. " याः फलिनी० " ह्या मंत्राचा ऋषि कमलनामक असून छंद त्रिष्टुप् व देवता गणपति सांगितलेली आहे. बोर, सुंठ, आवळा, निबोळी व मोठ्या हरणवेलीचें फल हीं फलें वर्ज्य करावीं. ' हिरण्यगर्भ० ' ह्या ऋचेनें पांच रत्ने कलशांत टाकावींत. ह्या मंत्राचा ऋषि हिरण्यगर्भ हाच व छंद त्रिष्टुप् सांगितलेला आहे. ह्याची देवता सविता व रत्नन्यासाकडे विनियोग करितात २१-२४. नंतर अमृतीकरण व दैवशुल्बन हीं कर्मे करावीं. ' वरुणस्य त्वा० ' ह्या मंत्राचा ऋषि वरुण व दुसऱ्या वरुणाचे ठायीं विनियोग आहे २५. " श्रीश्च ते० " ह्या मंत्रानें चंदनासह पुष्प द्यावें. " गंधद्वारा " ह्या मंत्रानें उगाळलेलें चंदन लावावे २६. " काण्डात्० " ह्या मंत्रानें पुनः दुर्वा व अक्षता घालाव्या. " व्रीहय० " ह्या मंत्रानें पांच प्रकारच्या व्रीहींचा निक्षेप करावा २७. तीळ, उडीद, मूग, सावे व साळी हे पांच व्रीहि आहेत. हा सर्व अरिष्टाचा नाश करणारा धान्यगण सांगितला २८. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या मध्यमपर्वातील द्वितीय भागाचा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

सूत ह्मणतातः— आतां महिन्याचा आश्रय करून असलेलें कर्म करण्याकरितां मासाचें निरूपण करितों. प्रथमतः तशा प्रकारच्या मासाची संख्या सांगतों. महिना चार प्रकारचा आहे १. चांद्र, सौर, सावन व तसाच चवथा नाक्षत्र मास होय. शुक्ल प्रतिपदेपासून दर्शापर्यंत चांद्र मास होतो २. जेव्हां

कृराशौ रविर्यावत्स मासः सौर उच्यते। त्रिंशता दिवसैर्मासः सावनः परिकीर्तितः ३ नाक्षत्रमासोऽश्विन्यादिरेवत्यन्तो हि विश्रुतः। उदयादुदयं यस्तु सावनो दिवसो रवेः ४ तन्त्रणैकतिथ्यंगकालो दिवस ऐन्दवः। राशेस्त्रिंशद्भागकालः कालस्त्वेकस्य भास्वतः ५ अहोरात्रं तु तज्ज्ञेयं सौरेऽपि भागमानतः। अहोरात्र साधनस्य मुख्यवृत्तस्यैव लभ्यते ६ सौरे चान्द्रे तूपगणौ त्रिंशद्भागे त्वदर्शनात्। सावना दिवसा ग्राह्या ऋषीणां समये गृहे ७ अतिभागव्यवस्थायां प्रायश्चित्तक्रियासु च। मन्त्रोपासनकार्ये च अन्नस्य प्राशने शिशोः ८ करस्य ग्रहणे राज्ञो व्यवहारेषु मासु च। यज्ञेषु दिनसंख्यायां ग्राह्यो मासस्तु सावनः ९ सौरमासे विवाहादौ यदाद्यैः सुप्रगृह्यते। यज्ञेष्वपि व्रते वापि विहिते स्नानकर्मणि १० चान्द्रस्तु पार्वणे ग्राह्यो वार्षिकेष्वष्टकासु च। श्राद्धेषु तिथिकार्येषु तिथ्युक्तेषु व्रतेषु च ११ नाक्षत्रः सोमपादीनामार्यभागविचारणे। करग्रहविधौ राज्ञां नायं सर्वजनाकृतिः १२ तद्वच्चैत्रादिमासाक्तं तिथ्युक्तं कर्म दृश्यते। तत्तु चान्द्रेण कर्तव्यं स हि चैत्रादिनोच्यते १३ राजोक्तौ सावनः प्रोक्तो तिथिसंभागकर्मणि। तत्र सौरो भवेद्वाच्यः सौरे शब्दप्रवर्तनात् १४ चित्रानक्षत्रयोगेन चैत्री सा पौर्णिमा स्मृता। तयोपलक्षितो मासश्चैत्र इत्यभिधीयते १५ स च तिथ्यात्मको मासश्चान्द्रः श्रवणभास्करः। चान्द्रश्चैव्यन्तिको मासो मुख्यश्चैत्रादिसंज्ञकः १६ गौणोऽप्यमो युगाद्यादेरनुरोधेन वर्धनात्। मुख्यः शुक्लादि-

---

कालएका राशींत रवि असतो त्या कालास सौर मास ह्मणतात. तीस दिवसांनीं सावन मास होतो, असे सांगितलेलं आहे ३. अश्विनीपासून रेवतीपर्यंत जीं सत्तावीस नक्षत्रें आहेत त्यांचा चंद्रानें भोग घेतला असता नाक्षत्र मास होतो. सूर्याच्या एका उदयापासून दुसऱ्या उदयापर्यंत सावन दिवस होतो ४. तत्रशास्त्रानें एका तिथीचा जो भागकाल तो चांद्र दिवस होतो. राशीच्या तिसाव्या भागाचा जो काल तो एक सौर दिवस होय ५. सौरप्रमाणामध्येही भागाच्या प्रमाणाने अहोरात्र जाणावी. साधनाच्या मुख्य वृत्तानेंच अहोरात्रीची प्राप्ति होते ६. सौर व चांद्र मानामध्ये तिसाव्या भागात उपगण दिसत नाहींत. ह्यास्तव, ऋषींच्या मते गृहकृत्यात सावन दिवसाचें ग्रहण करणे प्रशस्त आहे ७. अतिभागव्यवस्थेमध्ये, प्रायश्चितकर्मामध्ये, मंत्रोपासना इत्यादि कर्तव्य असतां, बालकाच्या अन्नप्राशनसंस्कारात ८, राजाच्या करग्रहणप्रसंगी, माससंबंधी व्यवहारात, यज्ञामध्ये व दिवसांची गणना करावयाची असता सावनमास ग्राह्य होय ९. विवाहादिकात जे कित्येक सौरमासच अतिशय ग्राह्य ह्मणून समजतात ते यज्ञामध्येही किंवा उपनयन व विहित अशा स्नानकर्मात तोच मास प्रशस्त मानितात १०. कोणत्याही पार्वणश्राद्धात, वार्षिक श्राद्धामध्ये अष्टकाश्राद्धात, तिथिकार्यात व तिथींचा निर्देश करून सांगितलेल्या व्रतात चान्द्र मास ग्राह्य आहे ११. सोमपादिकांच्या आर्यभागाविषयी विचार कर्तव्य असता व राजाच्या करग्रहविधानामध्ये नाक्षत्र मास ग्राह्य होय. पण हा सर्वजनास साधारण नाहीं १२. त्याचप्रमाणें चैत्रादि मासात सांगितलेलें तिथ्युक्त कर्म जे आढळतें तें चांद्र मासानेच करावें. कारण, चैत्रादि नावानीं तोच मास सांगत असतात १३. राजाच्या सामान्य व्यवहारात सावन मास व पूर्वोक्त तिथिविभागकर्मामध्ये सौरमासाचा उच्चार करावा. सौर ह्या शब्दाची अशा प्रकारेंच प्रवृत्ति झाली आहे १४. चित्रानक्षत्राच्या योगाने चैत्री पौर्णिमा होते असे झटलेले आहे व त्या पौर्णिमेने उपलक्षित असा जो मास त्यास चैत्र असें ह्मणतात १५. तो तिथ्यात्मक मास चांद्र मास होय. चैत्रादिसंज्ञक जो मुख्य चांद्रमास तो चैत्रीपौर्णिमपर्यंत असतो १६. युगादिकाच्या अनुरोधाने वृद्धि झाल्यामुळे हा गौणही आहे. शुक्ल प्रतिपदेपासून दर्शपर्यंत जो मुख्य मास तो लाक्षणिक

दर्शान्तो मासो लाक्षणिको मतः १७ चैत्राद्याश्चान्द्रमासा ये द्वादशापि तु योगतः । पौर्णमासीयुताभिस्तु न चर्क्षाद्य न रेभिरे १८ विशाखाद्येषु यो वा तथा भाद्रपदेन वा । यत्र न पूर्णिमायोगो मासः स स्याद्विनाशकः १९ योऽसौ यद्यपि चैत्रादौ नैष्ट्रिकोऽपि प्रलभ्यते । यथा सौरेऽपि यातोऽसौ योगोऽयमतिदुर्घटः २० तथा च माससामान्ये योगेनायं भवेत्क्वचित् । यदि वर्षसहस्रान्ते तदक्षेणैव पूर्णिमा २१ संयुक्ता लभ्यते यत्र भवेद्राज्यविनाशनम् । सूर्याचन्द्रमसौ नित्यं कुर्वातेऽतिथिभोजनम्२२ दण्डद्वये भुक्तशेषे न भुञ्जीत कदाचन । अतिक्रम्यापरां भोक्तुं तिथिं यत्र उभावपि २३ यत्र विंशत्तिथिस्तस्मात्रितैका भवेदिति । विंशता चान्द्रमासौ तु चन्द्रैकौ हि वर्धते २४ स चाधिको यतो मासस्ततः स्यादधिमासकः । समरात्रिन्दिवं कृत्वा वैवस्वतपुरीगतिम् २५ राशे राश्यन्तरे सूर्यो यावद्गच्छति भानुमान् । गच्छन्वर्धयति पूर्वं तिथयस्तास्तु संचिताः २६ वर्धन्ते तिथयो यावन्मूलां याति दिवाकरः । तुलादिराशिषट्के तु न वर्धन्ते कदाचन २७ स्वभावात्समगत्या तु यतः सक्रमते रविः । संचयमाना ह्येकैका प्रतिमासं विवर्धते२८ निशाम्वापि तु सौरे ता एकस्मिंस्तिस्र इत्यपि । संपूर्णत्रिंशत्तिथिभिर्मास्येकस्मिन्यदा भवेत् २९ स चान्द्रो मलिनो मास. कोणपाद्यै. समीहितः । भुक्तावशिष्टा तु तन्मासादसंस्पृष्टदिवाकरः ३० यदा सक्रमते लङ्घ्य तदा ज्ञेयो मलिम्लुचः । साधर्वषद्वये पूर्णे पतत्येवं निशाकरः३१ परित्यक्ताश्च यावन्तो व्युत्क्रमिण्यश्च याः पुनः । तिथयस्ते नियोक्तव्या नरो न स्यात्सपूरण ३२ नैर्ऋत्यां तं हितार्थाय जलकेतुर्नियच्छति । निर्मलं मलिनं मास पेतानां च हिताय च३३

ह्मणून मानलेला आहे १७. चैत्रादिक जे बारा चाद्रमास आहेत ते सर्वही नक्षत्राचा पौर्णिमेशी योग झाल्यामुळें होत असतात. ह्यास्तव, विशाखा इत्यादिकांमध्ये किंवा भाद्रपदाशी ज्या महिन्यात पौर्णिमायोग होत नाहीं तो विनाशक मास होतो १८,१९. जो हा योग तो जरी चैत्रादिकामध्ये नैष्ट्रिकही प्राप्त होतो व जसा सौरमासामध्येही एकदा गेलेला हा योग पुनरपि अति दुर्घट आहे, तसा सामान्य महिन्यामध्येंही हा योगाच्या योगानें क्वचित् होतो व पुढें सहस्र वर्षानीं जर त्याच नक्षत्रानें पौर्णिमा युक्त झाली तर त्या वेळीं राज्याचा नाश होतो. सूर्य व चद्रमा असे दोघेही नित्य तिथींचा भोग घेतात २०-२२. ज्यावेळीं ते दोघेही एक तिथि सोडून दुसऱ्या तिथीचा भोग घेण्यास जातात त्या वेळीं भोगशेष दोन घटिका राहिला असता कधींही भोजन करूं नये २३. ह्या दोघाच्या भोगाच्या वीस तिथि होईतो एक तिथि शिलक पडत असते. ह्यास्तव, तीस चाद्रमास झाले असता एक चाद्रमास वाढतो व तो ज्या अर्थी त्यास अधिकमास असतो त्या अर्थी त्यास अधिकमास ह्मणतात. रात्र व दिवस ह्यांचें मान सारखें करून सूर्य विषुवत् वृत्तामध्यें प्रवास करितो २४,२५. तेजोरूप सूर्य एका राशींतून दुसऱ्या राशींत जेवढ्या कालात जातो तेवढ्या वेळात जात असता तो पूर्वी तिथि वाढवितो व त्या शिलक पडतात २६. सूर्य तुला राशींत जाईपर्यंत तिथि वाढत असतात, पण तुलादि पुढच्या सहा राशींमध्यें त्याची वृद्धि कधींच होत नाहीं २७. ज्याअर्थी सूर्य स्वभावतःच समगतीनें जात असतो त्याअर्थी प्रतिमासीं एक एक ह्याप्रमाणे तिथि शिलक राहून वाढत असते २८. क्वचित् एका सौर मासामध्ये त्या तीनही वाढतात. तात्पर्य, संपूर्ण तीस तिथींचे एका महिन्यात जेव्हा अंतर पडतें तेव्हा तो चाद्रमास मलिन होतो असें ज्योतिष्यानीं सांगितलेले आहे. ह्मणजे भोगून राहिलेल्या राशींस त्या मासात स्पर्श न करिता जेव्हा सूर्य संक्रमण करितो तेव्हा मलमास समजावा. अडीच वर्षे पुरीं झालीं असता ह्याप्रमाणे चंद्र मागें पडतो २९–३१. जेवढ्या तिथि सोडलेल्या असतील व ज्याचा व्युत्क्रम झाला असेल त्याची योजना करावी. कारण, त्यावाचून पुरुषाचा व्यव-

अतः प्रेतक्रियाः सर्वाः कार्या मलिम्लुचेऽपि च । यत्कर्तव्यं न कर्तव्यं मलमासे द्विजोत्तमाः ३४
तदिदानीं प्रवक्ष्यामि कथितं च प्रसङ्गतः । यच्छ्राद्धं प्रेतसम्बन्धि सपिण्डीकरणावधि ३५ मल-
मासेऽपि तत्कार्यं विश्लिष्यन्ति सपिण्डनम् । यदा तु द्वादशो मासो दैवान्मलिम्लुचो भवेत् ३६
तत्रैव यत्नात्कर्तव्या क्रिया प्रेतस्य वार्षिकी । मासान्तरे तु पतिते तस्मिन्नेव मलिम्लुचे ३७
तदा त्रयोदशे मासि कर्तव्यं तत्सपिण्डनम् । वर्ज्यं मासिकया श्राद्धमेकं तस्मिन्त्रयोदशे ३८
त्रिंशता घटिकैः श्राद्धं वर्द्धतेऽद्यापि मानितम् । कुर्यात्प्रीत्यादिकं कर्म प्रयत्नेन मलिम्लुचे ३९
नैमित्तिकं च कुर्वीत नाधिकारस्तयोर्भवेत् । तीर्थस्नानमलभ्यं तत्तदाद्य देवदर्शनम् ४०
उपवासादिकं कर्म सीमन्तोन्नयनं तथा । आवर्तजं पुत्रवनं पुत्रादिमुखदर्शनम् ४१
मलमासेऽपि कुर्वीत शुक्रे चास्तमुपागते । मलमासेऽपि कुर्वीत नृपाणामभिषेचनम् ४२
व्रतारम्भं प्रतिष्ठां च चूडाकर्म च मेखलाम् । मन्त्रोपासां रहस्यं च महादानं सुमङ्गलम् ४३ विवाहं च गृहारम्भं प्रवेशं नववेश्मनः । उपग्रहं गवादीनामाश्रमान्तरसङ्क्रमम् ४४
दीर्घमाप्तानुनेज्या वै तीर्थयात्रावसेचनम् । वर्षवृद्धिवृषोत्सर्गकन्यादिनयनादि च ४५ यज्ञं च
कामिकं विद्वान्मलमासे विवर्जयेत् । एवमस्तं गते शुक्रे बृहत्यारभ्ये च संत्यजेत् ४६ पश्चादस्तं च
महास्तं च द्विविधं चास्तमस्य तु । द्विसप्ततिर्दिनान्यस्य महास्त पूर्वतो भवेत् ४७ पृथिव्यामेव
पादास्त भवेद्द्वादशवत्सरान् । ऊनपञ्चाशदधिकं दिवसानां शतद्वयम् ४८ प्रतीच्यामुदितः

हार पुरा होणार नाहीं ३२. नैऋत्यापर्यंत सर्व प्राण्याच्या हिताकरिता व प्रेताच्या हिताकरिता जलकेतु ह्या शुद्ध मलिन मासास देत असतो ३३. ह्यास्तव, सर्व प्रेतक्रिया ह्या मलमासामध्येंही कराव्या. हे उत्तम ब्राह्मणहो, मलमासामध्यें काय करावें व काय न करावें तें अन्यत्र प्रसंगतः सांगितलेलें मी आता तुह्मांस सांगतों. सपिंडीकरणापर्यंत जें प्रेतसंबंधी श्राद्ध तें (सपिंडी सोडून) मलमासामध्येंही करावें. जेव्हा दैववशात् बाराव्या महिन्याच मलमास येईल; तेव्हा तेथेंच प्रयत्नानें प्रेताची वार्षिक क्रिया करावी. दुसऱ्या महिन्यांत जर मलमास पडला ३४-३७ तर तेराव्या महिन्यात सपिंडी करावी. त्या तेराव्या महिन्यात एक मासिक श्राद्ध वर्ज्य करावें ३८. तीस घटिकांनीं श्राद्ध वाढते असें अजूनही मान्य झालेलें आहे. मलमासामध्ये प्रीतिश्राद्धादि कर्म प्रयत्नानें करावें ३९. नैमित्तिक कर्म मलमासामध्यें करावें. त्याविषयीं शुद्ध कालाची अपेक्षा करूं नये. अलभ्य तीर्थाचे स्नान व तशाच देवाचें दर्शन, उपवासादि कर्म, तसेंच सीमन्तोन्नयन, तीन महिन्यांच्या आत होणारें पुंसवन व पुत्रादिकांचें मुखावलोकन हीं कर्में मलमासामध्यें व शुक्राचा अस्त झाला असतां करावीं. राजास राज्याभिषेक मलमासामध्येंही करावा ४०-४२. व्रताचा आरंभ, प्रतिष्ठा, चूडाकर्म, मौंजीबंधन, मंत्रोपासना, उपनिषदारंभ, महादान, अतिमंगल कर्म ४३, विवाह, गृहास आरंभ, नव्या गृहात प्रवेश, गाई, बैल इत्यादिकांचा संग्रह, दुसऱ्या आश्रमाचा स्वीकार ४४, दीर्घ काल चालणारा यज्ञ, तीर्थयात्रेकरितां निघणें, वर्षवृद्धिसंबंधी वृषोत्सर्ग, कन्येस दुसऱ्यानें घरीं आणणें व काम्य यज्ञ हीं कर्में विद्वानानें मलमासात करूं नयेत. त्याचप्रमाणें शुक्राचा अस्त झाला असतां क्रिया तो बाल्य (उदयानंतर सात दिवस) व वृद्ध (अस्तापूर्वी सात दिवस) अवस्थेत असताही हीं कर्में वर्ज्य करावीं. शुक्राचा एक पादास्त व दुसरा महास्त असा दोन प्रकारचा अस्त होतो. ह्याचा जो पूर्वेकडे बहात्तर दिवस अस्त होतो त्यास महास्त ह्मणतात ४५–४७. बारा वर्षे पृथ्वीमध्येंच पादास्त होत असतो. पश्चिमेस उदय पावलेला शुक्र दोनशें एकोनपन्नास दिवस एकसारखा दिसतो. हा शुक्र गुरूसह एका नक्षत्रात

काव्यो दृश्यो भवति सर्वदा। एकस्मिं गुरुणा युक्तो यावन्निष्क्रमते भार्गवः ४९ मलमासवत्कर्माणि यावदस्त्यादि सर्वशः। ऋक्षभेदे त्वेकराशौ संपर्के यदि वाऽनयोः ५० गुरो राहोरपि तथा त्यजेद्विद्वान्न संशयः। सिंहे राशौ स्थितः सूर्ये जीवे चास्तमुपागते ५१ हेयानि यानि कर्माणि निषिद्धानि मलिम्लुचे। मिथुनस्थे यथा भानौ मलमासः पतत्यसौ ५२ द्विराषाढ इति ख्यातो गौणे शब्दविवर्तनात्। फल चाग्र मृतस्यौर्ध्वदेहिकं कर्म कुर्वता ५३ आषाढकीर्तन कार्यमेव वर्षान्तरेऽपि च। आषाढद्वयसंयुक्तपौर्णमासीद्वय तथा ५४ युग्मकर्कटयो राश्योर्द्विराषाढस्तदा भवेत्। भवेद्गौणो द्विराषाढो राशिस्तत्रैव संयुते ५५ पूर्वत्रिकेतुपतिते तदैव भगवान्हरिः। कर्कटं शयनं कुर्यादागमिष्यं परमके ५६ कर्किण्यर्के सुतहरौ शक्रपूजाश्विने भवेत्। दुर्गोत्थान तुलायां तु विष्णुर्निद्रां जहात्यसौ ५७ [१३११] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे षष्ठोऽध्यायः॥ ६॥

सूत उवाच॥ दैवं वा पैतृकं कर्म कालमाश्रित्य वर्तते। काले तान्येव कर्माणि फलं यच्छति कुर्वताम् १ मुहुर्बाल्ये कर्मफलं त्रिकालेऽपि न विद्यते। व्ययो वा मुख्यभावेन फलदः कर्मशालिनाम् २ कालस्तु गुणभावेन सर्वकालाश्रिता क्रिया। न कालेन विना किञ्चित्त्रिषु लोकेषु जायते ३ अतः काल प्रवक्ष्यामि निमित्तं कर्मणामिह। काल ह्यमूर्तिर्भगवानेक एव तु यद्यपि ४ तथाऽप्युपाधिभेदेन विद्यते कालभेदिभिः। तिथिनक्षत्रवारादौ रात्रियोगादयोऽपि ये ५ तेऽपि

जोंपर्यंत असतो ४८,४९. तोंपर्यंत मलमासाप्रमाणेच सर्व कर्म सोडावीं. व जरी ते भिन्न नक्षत्रांमध्यें असले तरी त्या दोघाचा जर एका राशीमध्यें संपर्क होत असेल तर विद्वानानें कर्मत्याग करावा, ह्यात संशय नाहीं. गुरु व राहु ह्याचा संपर्क झाल्यासही कर्मत्याग करावा सूर्य सिंहराशीमध्यें असता व गुरूचा अस्त झाला असता मलमासामध्यें ज्याचा निषेध केला आहे तीं कर्मं सोडावीं. सूर्य मिथुनराशीमध्यें असता जेव्हा हा अधिकमास पडतो तेव्हा ५०–५२ द्विराषाढ (दोन वेळ आषाढ ह्या) महिन्याची प्रसिद्धि होते. कारण, गाण महिन्यासही तोच शब्द लावितात. ह्या महिन्यांत मेलेल्या मनुष्याचें और्ध्वदेहिक कर्म करणाऱ्या पुरुषानें आषाढकीर्तन करावें; ह्मणजे अधिक फल मिळतें. अन्य वर्षीही असेंच करावें. दोन आषाढानी युक्त अशा दोन पौर्णिमा जेव्हा मिथुन व कर्क ह्या दोन राशींन्या मध्ये पडतात, तेव्हां दोन आषाढ होतात. हा दोन वेळ होणारा आषाढ गौण होय. राशीचा त्याच मासाशी संयोग होऊन तो पौर्णिमादि पूर्वत्रिकामध्यें पडला असता त्याच वेळीं भगवान् हरि कर्कराशीवर शयन करितो. सूर्य कर्कराशीमध्ये गेल्यावर हरि निद्रित झाला असता इंद्राची पूजा होते. आश्विनात दुर्गोत्थान होतें व तुलाराशींत सूर्यानें प्रवेश केला असतां हा भगवान् विष्णु निद्रेचा त्याग करितो ५३–५७. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या दुसऱ्या भागाचा सहावा अध्याय संपूर्ण झाला ॥ ६ ॥

सूत ह्मणतातः— दैवाचे व पितराचें कर्म कालाच्या आश्रयानें चालतें. कर्मं करणारांस तींच कर्मं योग्य कालीं फल देतात १. पुष्कळ वेळा बाल्यावस्थेंतच फल मिळतें व केव्हा केव्हा तर तें त्रिकालींही मिळत नाहीं. कर्मशाली पुरुषाचा व्यय मुख्यत्वानेंच फल देत असतो २. व काल गौणत्वानें फल देतो. सर्व प्रकारची क्रिया कालाच्या आश्रयानें रहाते. कालावाचून तिन्ही लोकांमध्यें काहीं एक उत्पन्न होत नाहीं ३. ह्यास्तव, कर्मांचें निमित्त असा जो काल त्याचें विवेचन आता मी करितों, भगवान् काल जरी वस्तुतः एक व अमूर्त आहे तरी भेद करणाऱ्या उपाधींनीं तो अनेक प्रकारचा झाला आहे. तिथि, नक्षत्रें, वार, रात्रि, योग इत्यादि जे काल आहेत तेही पक्ष, मास, राशि व

कालाः पक्षमासराशिवर्षान्तरेऽपि च । साधनानि भवन्त्येते स्वातन्त्र्येण न कुत्रचित् ६ धर्मस्य बाऽप्यधर्मस्य मुख्यो व्यापार एव सः । तिथ्यादिकालभावेषु निषिद्ध निहित हि तत् ७ पालयन्स्वर्गमाप्नोति हित्वा प्राप्नोत्यधोगतिम् । साधयन्त्यपि कर्माणि परस्परमपेक्षते ८ कालभागो निःसहायो येऽपि स्युः कर्मसाधना-। तिथौ पूर्वाह्णव्यापिन्यां कुर्वीत कर्म वैदिकम् ९ एकोद्दिष्टं तु मध्याह्नव्यापिन्यां हि समाचरेत् । पराह्णव्यापिनीं प्राप्य तिथिं कुर्यात्तु पार्वणम् १० न तु पूर्वाह्णमध्याह्नपराह्णेषु यथोचितम्। अप्रधाने तु कुर्वीत कर्म दैवादिक च यत् ११ एको हि कालः प्रातस्तु वृद्धिश्राद्धादिसाधने । नापेक्षते सहाय्यं तत्तिथ्यादिविषुवादिषु १२ देवेभ्यो ब्रह्मणा दत्त पूर्वाह्णस्तिथिभिः सह। पितृभ्यो ह्यपराह्णे तु पार्वणस्तु परां विना १३ पूर्वाह्णमात्रसंभासी ततो देवान्यपूजयेत् । पूर्वाह्णस्पर्शमात्रेऽपि तिथिखण्डे न चार्पयेत् १४ खर्वा दर्पा तथा हिंस्रा तिथिश्च त्रिविधा भवेत् । खर्वादि लक्षयेत्तुल्या दर्पा भवति वर्धिता १५ हिंस्रा तु क्षपजा ज्ञेया कालभेदेन गृह्यते । खर्वा दर्पा परे ग्राह्या हिंस्रा ग्राह्या तु पूर्वतः १६ शुक्लपक्षे परा ग्राह्या कृष्णे पूर्वा प्रशस्यते । स्नानदानव्रते चैव विपर्ययो निदर्शितः १७ तिथौ चोदयति सविता कालमात्रं च वा यदि । अन्याऽपि सैव विज्ञेया तिथिस्तस्मिन्नहर्निशि १८ यथा वास्ते रविर्भाति घटिका दश वापि वा । सा तिथिस्तदहोरात्र व्यपदेश्या न चेतरा १९ शुक्ले वा यदि

वर्ज्य ह्या मधील भाग इत्यादिकातील कोणतेही स्वतंत्रपणे साधन होत नाहीत ४—६. धर्म किंवा अधर्म ह्याचा तो मुख्य व्यापारच होय. तिथ्यादि भावामध्ये जे निषिद्ध आहे तें अत्यंत हितकर होय ७. त्याचें जो पालन करितो त्यास स्वर्गप्राप्ति होते व जो त्याचे पालन करीत नाही तो अधोगतीस जातो. साधन करून देणारी कर्मेही परस्पर अपेक्षा करीत असतात. पण कालभाग जो आहे तो निःसहाय होय. व त्याच्यावाचून कर्मन्या साधनरूप असेही पदार्थ व्यर्थ होत. पूर्वाह्नव्यापिनी तिथींत वैदिक कर्म करावे. पण एकोद्दिष्टश्राद्ध जे असेल ते मध्याह्नव्यापिनी तिथीत करावें. पराह्नव्यापिनी तिथीचा आश्रय करून पार्वणश्राद्ध करावे ८ १०. तात्पर्य, पूर्वाह्न, मध्याह्न व पराह्न इत्यादि कालास योग्य असेच कर्म करावें. जे दैवसंबंधी कर्म असेल ते अप्रधानकालीही करावें ११. वृद्धिश्राद्धादि कर्तव्य असतां प्रातःकाल हा एकच काल आहे. ते तिथ्यादिकामध्ये व विषुवादिकाल ह्यांची सहाय इच्छित नाही १२. ब्रह्मदेवाने देवास तिथींसह पूर्वाह्न दिला. पितरांस अपराह्न दिला पण पार्वणश्राद्ध पुढच्या तिथीवाचून असलेल्या अपराह्नी करावे १३. केवल पूर्वाह्न स्पर्श मात्र असलेली तिथि अपना देवांचे पूजन करावें. पण तिथीचा पूर्वाह्नी केवल स्पर्श मात्र असून जर ती तिथि संपल्यानंतर देवपूजन करूं नये १४. खर्वा, दर्पा व हिंस्रा अशी तिथि तीन प्रकारची आहे. जी तिथि अतीत तिथीइतकीच असते तो खर्वा, जी पूर्वतिथीहून वाढलेली असते ती दर्पा व जिचा क्षय झालेला असतो (ह्मणजे जी पूर्वतिथीहून कमी असते) ती हिंस्रा आहे असे जाणावे. कालभेदानें अशा तिथींचे ग्रहण होतें. दर्पा व खर्वा ह्या तिथि पर घ्याव्या व हिंस्रा पूर्व घ्यावी १५,१६. शुक्ल पक्षामध्ये कोणतीही तिथि परा घ्यावी व कृष्णपक्षामध्यें पूर्व घेणे प्रशस्त होय. स्नान, दान, व्रत इत्यादिकामध्यें विपर्यय सांगितलेला असतो (तो वर्ज्य करावा) १७. तिथि एक घटिकाभर असतानाही जर सूर्य उदय पावेल तर त्या अहोरात्रांत दुसरीही तिथि तीच आहे असे जाणावें १८. किंवा अस्तसमयी रवि जसा असेल किंवा तिथि जर त्या दिवशी दहा घटिका असली तर ती तिथि त्या अहोरात्रांत आहे असें ह्मणावें, दुसऱ्या तिथीचा निर्देश करूं नये १९. शुक्ल किंवा कृष्ण पक्षात खर्वा किंवा दर्पा जी

वा कृष्णे खर्वा दर्पा तिथिश्च या । ययाऽस्तं सविता याति पित्र्यकार्ये च सा तिथिः २१ दिनद्वयेऽपि कुतपे अस्तगा तिथिमाश्रयेत् । श्राद्धकालादिकं यत्र तत्र श्राद्धं विधीयते २१ व्रते च वृद्धिगामिन्यां यत्रादयो रवेर्भवेत् । अमावास्यापार्वणे च सा तिथिः पितृपूजने २२ अमावास्यामृतस्यैव पार्वणं यत्रकुत्रचित् । अस्तगामितिथिर्यत्र सा तिथिः पितृमन्दिरम् २३ एकोद्दिष्टं चरेत्तत्र नोदये च कदाचन । शुक्लपक्षे च कृष्णे च यो योगः परपूर्वया. २४ पूर्वेद्युर्वा परेद्युर्वा त्रिसन्ध्यव्यापिनी तिथिः । सा पूज्या च स्वकृत्येषु पक्षयोरुभयोरपि २५ पूजयान् व्यस्तं संत्यज्य पूर्वं चैकादशीयुगम् । द्वितीया वह्निना युक्ता चतुर्थी पञ्चमीयुता २६ एता उपोष्यास्तिथयः पुण्याः स्युर्धर्मवेदिभिः । एतद्व्यस्तास्तु पुण्यानि घ्नन्ति पूर्वकृतान्यपि २७ ह्राणेन विद्धा या षष्ठी मुनिविद्धा तथाऽष्टमी । दशम्येकादशीविद्धा त्रयोदश्या चतुर्दशी २८ अमावास्या भूतविद्धा नोपोष्या मुनिनाऽपि च । हन्ति पुत्रकलत्राणि धनानि समुपोषिता २९ विद्धाया नाभिनन्त्याः स्युर्युक्तास्ते नाभिनन्दिताः । व्यस्तस्य संभवे युग्मं विद्धं भवति सर्वशः ३० तामस्तां तु तिथिं प्राप्य युग्मान्यपूज्यतामियुः । युग्मानि च दिवायोगे ग्राह्याणि व्यस्तानि नित्यम् ३१ नक्तादिव्रतयोगे तु दिवा सर्वधर्मकरान् । रात्रियोगश्चतुर्थ्यास्तु विशिष्य परिगृह्यते ३२ रात्रियोगं विनापि स्यादेकादश्यादिकं व्रतम् । नक्तं जागरणं चैव विना योगेऽपि शस्यत ३३ एकादश्यु-

---

तिथि असेल व ज्या तिथीमध्ये सूर्यास्त होईल ती तिथि पितृकार्यामध्ये घ्यावी २०. एकादि विद्ध तिथि दोन्ही दिवस कुतपसञ्जक दिवसाच्या आठव्या मुहूर्तात जर असली तर अस्तसमयी जी तिथि असेल ती घ्यावी. तात्पर्य, श्राद्धाच्या मुख्य कालाची ज्या दिवशी प्राप्ति होत असेल त्या दिवशी श्राद्ध करावें असें विधान आहे २१. वृद्धि पावणारी तिथि असल्यास सूर्योदयसमयी जी तिथि असेल ती व्रतामध्ये घ्यावी. तीं तिथि अमावास्येच्या पार्वणातील पितराच्या पूजेविषयीं समजावी. कारण, अमावास्येस मृत झालेल्यांचें पार्वण कधींही होत. ज्या दिवशीं तिथि अस्तगामी असते ती तिथि पितरांचें मंदिर होय २२,२३. त्या दिवशींच एकोद्दिष्टही करावें. उदयकालची तिथि घेऊन ते कधींही करूं नये. शुक्लपक्षामध्ये किंवा कृष्णपक्षामध्ये पूर्वोत्तरतिथींचा जो योग २४ असतो त्याला अनुसरून पूर्वेदिवशी की उत्तरदिवशीं कर्म करावयाचें. ते ठरवावें. पण जी तिथि पूर्वाह्न, अपराह्न व मध्याह्न ह्यांस व्यापून असते ती दोन्ही पक्षामध्यें आपल्या कृत्यास पूज्य होय २५. व्यस्त तिथींस सोडून एकादशी व द्वादशी ही जोडी, तृतीयायुक्त द्वितीया व पंचमीयुक्त चतुर्थी ह्या पुण्यकारक तिथि होत. त्या धर्मवेत्त्यास उपोषण करण्यास योग्य आहेत. पण ह्या वर सांगितलेल्या जोड तिथींच्या उलट ज्या तिथि आहेत त्या व्यस्त तिथि होत. त्या पूर्वी केलेल्या पुण्याचाही नाश करितात २६,२७. ह्राणजे पंचमीविद्ध जी षष्ठी, तशीच सप्तमीविद्ध अष्टमी, एकादशीविद्ध दशमी, चतुर्दशीयुक्त त्रयोदशी व प्रतिपदाविद्ध अमावास्या ह्या तिथि मुनींसही उपोषण करण्यास योग्य नाहींत. ह्या तिथींस उपोषण केलें असता तीं तीं तिथि पुत्र, स्त्री, धन इत्यादिकाचा नाश करिते २८, २९. ज्या योगानें तिथि सतत विद्ध होतात त्यात्यानें युक्त होत्साऱ्या अभिनंदित होतात. व्यस्ताचा संभव असता सर्व प्रकारें युग्म विद्ध होतें ३०. तीं तिथि अस्त पावली असता युग्में अपूज्य होतात. दिवायोग झाला असता युग्मे ग्राह्य आहेत व व्यस्त तिथि निंद्य होत ३१. नक्तादि व्रतयोगामध्ये दिवसास होणारी वृद्धि व रात्रीस चतुर्थीचा योग हीं विशेष प्रकारें ग्राह्य होत. रात्रौ योगावाचूनही एकादश्यादिक व्रत होतें. नक्त व जागरण हीं योगावाचूनही प्रशस्त होत ३२. एकादशीचा उपवास तर, द्वादशीचा योग असेल तेव्हाच करावा. एकादशी व द्वादशी ह्याचा

पवासं तु द्वादशीयोगतश्चरेत् । दिवायोगे तु संपूर्णा त्यजेदुभयपूर्वतः ३४ रात्रियोगे तु संपूर्णा सोपास्यैकादशी सदा । सप्तमी शुक्लपक्षेऽपि पूज्या षष्ठ्या समन्विता ३५ निशि तु स्याद्यदा षष्ठी सप्तमी नवमी दिवा । उपोष्य केवलां षष्ठीं तोषयेद्भास्करं नरः ३६ एव त्रयोदशीं कृष्णां विधिप्राप्तां विना द्विजाः । उपोष्य पार्वतीनाथ तोषयेच्च केवलम् ३७ दिवा त्रयोदशीयुक्ता कृष्णोपोष्या चतुर्दशी । परेणापि चतुर्दश्यां न तु कुर्यादमातिथौ ३८ त्रिसन्ध्यव्यापिनीं प्राप्य यदि कुर्यादुपोषणम् । पारणं तु सिनीवाल्यां चतुर्दश्यामुपोषयेत् ३९ चतुर्दशीमतिक्रम्य सिनीवाल्यां तु पारणात् । व्रतानि तस्य नश्यन्ति प्राक्कृतानि चतुर्दशी ४० सप्तमी ललिता भाद्रे शक्रयुत्थान च वारुणी । पूज्याश्चैता पराः कुर्यात्त्रिसन्ध्यव्यापिनीष्वपि ४१ त्रिसन्ध्यव्याप्तिनी पूर्वे परतो वर्धते यदि । सऋक्षा ऋक्षयोगे तु ऋक्षाभावे परायुता ४२ ऋक्षाभावे परा ग्राह्या त्रिसन्ध्यव्यापिनीष्वपि । श्रवणे चाद्यपादे तु प्रशस्ता शक्रपूजने ४३ अभावे चोत्तराषाढा धनिष्ठा च विशिष्यते । दण्डार्धं दण्डमेकं वा तदर्धं पलमेव वा ४४ उदये संयुता ग्राह्या सा तिथिश्चोत्तमा भवेत् । त्रिसन्ध्यव्यापिनीं हित्वा पूज्या शुक्लाष्टमी परा ४५ रविचक्रवता ग्राह्या रथे तिथ्यादिरपि च । त्रिसन्ध्यव्यापिनी या तु वर्धमेकं परं दिने ४६ अपरेऽपि च सर्वत्र हलानां वाहनं त्यजेत् । शुक्लैकादश्यमावास्यासंक्रान्त्यां श्राद्धवासरे ४७ नराश्वगोगजादीनां

योग जर दिवसा असला तर संपूर्ण एकादशीही सोडावी. पूर्वदिवशी व उत्तरदिवशी किंवा पूर्वदिवशीच उपोष्य तिथि असून तिचा योग रात्री होत असेल तर मात्र सर्वदा संपूर्ण एकादशी ज्या दिवशी असेल त्या दिवशी उपवास करावा. शुक्लपक्षातील सप्तमीही षष्ठीयुक्त असेल तेव्हा पूजावी ३३-३५. जेव्हा षष्ठी रात्री असून सप्तमी व नवमी दिवसास असेल तेव्हा केवल षष्ठीसच उपोषण करून पुरुषानें भास्करास संतुष्ट करावे ३६. त्याचप्रमाणें हे ब्राह्मणहो, विधीने प्राप्त अशा त्रयोदशीवाचून कृष्णपक्षातील त्रयोदशीस उपवास करून केवल शंकरासच संतुष्ट करावें ३७. दिवसास त्रयोदशीयुक्त कृष्णचतुर्दशी असल्यास उपवास करावा. पहिल्या दिवशी द्वादशीयुक्त असून दुसऱ्या दिवशी जरी चतुर्दशीयुक्त त्रयोदशी असली तरी त्या दिवशी उपवास करावा; पण अमावास्येच्या दिवशी उपवास करूं नये ३८. त्रिसंध्यव्यापिनी तिथीस जर उपोषण केलें तर चतुर्दशीच्या दिवशी उपोषण व सिनीवालीस पारणे करावे ३९. चतुर्दशीचें अतिक्रमण करून सिनीवालीस पारणें सोडल्यास पूर्वी केलेलीं चतुर्दशीव्रते नष्ट होतात ४०. भाद्रपदातील ललितासप्तमी, शक्रीच्या उत्थानाचा दिवस व वारुणी ह्या तिथि पूज्य आहेत. पण त्या त्रिसंध्यव्यापिनी जरी असल्या तरी परविद्ध कराव्या ४१. पूर्वदिवशी त्रिसंध्यव्यापिनी असून जर तिथि दुसऱ्या दिवशी वाढत असली व जर ती उक्त नक्षत्रासह असली तर तीच घ्यावी. पण जर नक्षत्राचा अभाव असेल तर परयुत घ्यावी ४२. तात्पर्य, उक्त नक्षत्र नसल्यास पूर्वदिवशी असलेल्या त्रिसंध्यव्यापिनी तिथीसही सोडून पर तिथि घ्यावी. शक्रपूजनामध्ये श्रवणाचा आद्य पाद प्रशस्त होय ४३. पण हा पाद न मिळाल्यास उत्तराषाढा व धनिष्ठानक्षत्रही उक्त आहे. घटिका, अर्धी घटिका, पाव घटिका किंवा एक पलही तिथि उदयकालीं असल्यास तीच उत्तम व ग्राह्य होय. शुक्ल अष्टमी त्रिसंध्यव्यापिनी सोडून परविद्धा पूजेस योग्य आहे ४४,४५. सूर्यचक्रवानाने रथ व तिथ्यादि ह्यांमध्ये जी तिथि त्रिसंध्यव्यापिनी असेल ती घ्यावी. दुसऱ्या दिवशीही ती श्रेष्ठ होय ४६. पूर्वदिवशीही सर्वत्र नांगर चालवूं नये. शुक्ल एकादशी, अमावास्या, संक्रान्ति व श्राद्धदिन ह्या दिवशीं नरवाहन

---

१ ज्या अमावास्येच्या दिवशी प्रातःकाली चंद्रकला दिसते ती सिनीवाली होय

वाहनात्पातकी भवेत् । कर्तुर्गोमहिषादीनां गर्दभोष्ट्रखरस्य च ४८ न वाहयेद्दासदासीं वाहने नास्ति दूषणम् । बहुकालिकयज्ञे च यज्ञश्राद्धे तथैव च ४९ ग्रामान्तरे न दोषः स्यादिति नद्यन्तरेऽपि च । नित्यश्राद्धेऽप्यम्बुघटे यच्छ्राद्धं मासिकस्य च ५० तत्र गोमहिषादीनां वाहने नास्ति दूषणम् । कुर्यादम्बुघटश्राद्धं न कालनियमः क्वचित् ५१ न चात्रनियमं कुर्यादृश्मपात्रं च वर्जयेत् । तैजसैर्निर्मितं कुम्भमथवा वृक्षपत्रजम् ५२ न योजयेन्मृन्मयं च शूद्राणां मृन्मये विधिः । निवेदयेच्च मासान्ते मृन्मयं वृक्षमूलके ५३ आस्फालयेत्परेणैव न वस्त्रं तु कथञ्चन । पर्वश्राद्धे दैवलके तथा रण्डाश्रमं त्यजेत् ५४ मातापितृपरित्यागी तैलहव्यादिविक्रयी । चत्वारिंशदुत्सवानां साङ्गानां न चरेद्यदि ५५ स्त्रिया विमुच्यते कश्चित्स तु रण्डाश्रमी मतः । अष्टचत्वारिंशदब्दं वयो यावन्न पूर्यते ५६ पुत्रभार्यावियुक्तस्य नास्ति यज्ञाधिकारिता । यां तिथिं समनुप्राप्य समुदेति दिवाकरः ५७ स्नानाध्ययनदानेषु सा तिथिः सकला स्मृता । ययाऽस्तं सविता याति कृष्णपक्षे तु सा तिथिः ५८ पितॄणां सकला ज्ञेया स्नानदानादिकर्मसु । सप्तमी शुक्लपक्षे या यावदिच्छेच्च खण्डिता ५९ आद्यभागे रवेः षष्ठ्यां परादौ याऽष्टमीयुता । यद्यखण्डा भवेत्सैव सदा ज्ञेया भवात्मिका ६० माघमासे न सप्तम्येव पूर्वेण रविसोदिणी । मन्वन्तरा परेणैव स्नानदानादिकर्मसु ६१ [१३७१] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

व अश्व आणि गज ह्यांचीं वाहनें वर्ज्य करावीं. कारण, त्यात बसल्यास पुरुष पातकी होतो. बहुत काल चालणाऱ्या यज्ञामध्ये व यज्ञीय श्राद्धामध्ये कर्त्या पुरुषास बैल, रेडे, गाढव, उंट व खेंचर ह्यांच्या वाहनातून नेऊ नये. पण दास, दासी ह्यास त्यातून नेण्यात कांहीं दोष नाहीं ४७-४९. पण दुसऱ्या गावीं जावयाचे असल्यास किंवा मध्ये नदी असल्यास नित्यश्राद्ध, उदकुंभश्राद्ध व मासिकें करणारास बैल, रेडे इत्यादिकांच्या वाहनातून जाण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. उदकुंभश्राद्ध केव्हांही करावें; त्याला कालाचा नियम नाहीं. असल्या श्राद्धात अन्नाचाही कांहीं नियम करूं नये. उदकपात्र दगडाचें नसावें. एक तर धातूंचा कुंभ असावा किंवा वृक्षाच्या पर्णाचें पात्र करावे ५०-५२. उदकुंभश्राद्धात मृन्मय पात्राची योजना करूं नये. कारण, शूद्रास मृन्मय पात्रांचें विधान केलें आहे; महिना पूर्ण झाला असता मृन्मय पात्र वृक्षाच्या मूळाशीं ठेवावे व तें दुसऱ्याकडून फोडवावें. तेथें वस्त्र समर्पण करूं नये. दर्शश्राद्धामध्ये दैवलक व रंडाश्रमी ह्यांचा त्याग करावा ५३, ५४. माता व पिता ह्यांचा त्याग करणारा, तेल व हव्यादि पदार्थ ह्यांचा विक्रय करणारा, अठ्ठेचाळीस संस्कारांनीं रहित व स्त्रीकडून जो सोडिला जातो तो रंडाश्रमी ह्मणून मान्य आहे. अठ्ठेचाळीस वर्षांचें वय जोपर्यंत पुरे झालेले नसतें ५५,५६ तोपर्यंतच पुत्र व भार्या ह्यांनीं वियुक्त असा जो होता त्यास यज्ञामध्यें अधिकारता नसते. ज्या तिथीमध्यें सूर्य उदय पावतो ५७ तीच सकल तिथि स्नान, अध्ययन, दान इत्यादिकामध्ये ध्यावी. कृष्णपक्षामध्ये ज्या तिथींत सूर्य अस्त पावतो ती सकल तिथि पितराच्या स्नानदानादि कर्मामध्ये जाणावी. शुक्लपक्षामध्यें जी सप्तमी असेल ती खंडित असेपर्यंतच इच्छावी ५८,५९. सूर्याच्या आद्यभागीं षष्ठीस व दुसऱ्या, तिसऱ्या इत्यादि भागात अष्टमीयुक्त ध्यावी. पण तीच जेव्हा अखण्डा असेल तेव्हा भवरूप आहे असे जाणावें. माघमासामध्येंही जी खंड सप्तमी असते ती स्नानदानादि कर्मामध्यें पूर्वभागाच्या योगानें रवितोषिणी व परभागानें मन्वंतरा होय असें जाणावें ६०, ६१. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वापैकीं द्वितीय भागाचा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

सूत उवाच ॥ तिथीनां प्रवरा यस्माद्ब्रह्मणा समुदाहृताः । प्रतिपादितः परे पूर्वे प्रतिपाद्यनवोच्यते १ कार्तिकाश्वयुजे चैत्रे माघे चापि विशेषतः । स्नानं दानं दशगुणं शिवविष्ण्वोश्च पूजनम् २ अग्निमिष्ट्वा च कृत्वा च प्रतिपद्यामिति स्मृतम् । हविषा सर्वधान्यानि प्रामुयादीप्सितं धनम् ३ बृहस्पतौ द्वितीयायां शुक्लायां विधिपूजनम् । कृत्वा नक्तं समश्नीयाल्लभते भूमिमीप्सिताम् ४ मिथुने कर्कटे चैव गाविप्रदमनान्तरम् । द्वितीयायां तु विप्रेन्द्रास्तामुपोष्य हरिं यजेत् ५ यामुपोष्य न वैधव्यं प्रयाति स्त्री न संशयः । अमूल्यशयनं वासं दम्पती प्रतिपूजयेत् ६ वासोभिर्गन्धपुष्पैश्च नानाभक्ष्यैः पृथग्विधैः । वैशाखे शुक्लपक्षे तु तृतीयायां तथैव च ७ गङ्गातोये नरः स्नात्वा मुच्यते सर्वकिल्बिषैः । स्वातियुक्ततृतीयायां वैशाखे तु विशेषतः ८ माघे तु रोहिणीयुक्ता वृषे चाश्वयुजे तथा । तस्यां यदीयते किञ्चिन्नदक्षयमुदाहृतम् ९ विशेषतो हविष्यान्न मोदकादिसमायुतम् । तोयदानं विशेषेण प्रशस्तं मनीषिणः १० गुडकर्पूरसंयुक्त ब्रह्मलोके महीयते । बुधश्रवणसंयुक्ता तृतीया यदि लभ्यते ११ तस्यां स्नानोपवासाद्यमक्षय परिकीर्तितम् । चतुर्थीभरणीयोगे भवेच्चरदिनं यदा १२ तदाऽभ्यर्च्य यमं देवं मुच्यते सर्वकिल्बिषैः । शिवा शान्ता सुखा चैव चतुर्थी त्रिविधा स्मृता १३ साऽपि भाद्रपदे शुक्ला शिवलोके सुपूजिता । कार्तिके तु भवेच्छाया तथा माघे तु कीर्त्यते १४ तस्यां स्नानं तपो दानमुपवासो जपस्तथा । भवेत्सहस्रगुणितं श्राद्धं भवति चाक्षयम् १५ गणेशं कारयेत्पूजां मोद-

---

सूत म्हणतात—ज्याअर्थी तिथीतील मुख्य तिथि ब्रह्मदेवाने सांगितलेल्या आहेत व त्यांचें प्रतिपादन केलें आहे त्याअर्थी पर व पूर्व तिथीचे मी वर्णन करितो १. विशेषतः कार्तिक, आश्विन, चैत्र व माघ ह्या महिन्यात स्नान करणें, दान देणें व शिव आणि विष्णु ह्यांचें पूजन करणें हीं दसपट फलदायी होतात २. प्रतिपदेच्या दिवशीं हवीनें अग्नीमध्यें हवन करून उपोषण करावें असें सांगितलें आहे. त्याच्या योगाने सर्व प्रकारचे धान्य व इष्ट धन प्राप्त होतें ३. शुक्ल द्वितीयेस गुरुवारी विधीचें पूजन करावें व नक्तभोजन करावे. ह्यणजे इष्ट ऐश्वर्य प्राप्त होतें ४. मिथुन व कर्क ह्या संक्रांतींच्या दिवशीं गाई, ब्राह्मण व दमन ह्यांचें पूजन करावे व हे ब्राह्मणहो, द्वितीयेच्या दिवशीं उपोषण करून हरीचें पूजन करावें ५. ह्या तिथीस उपोषण केले असता स्त्रीस वैधव्य प्राप्त होत नाहीं ह्यात संशय नाहीं. अमूल्य शय्या वस्त्रे व महिन्याभर दांपत्यपूजन करावें ६. त्याचप्रमाणे वैशाख शुक्ल तृतीयेच्या दिवशीं वस्त्रे, गंध, पुष्पे व अनेक प्रकारचे भिन्न भिन्न भक्ष्य पदार्थ ह्यांच्या योगाने त्यांस संतुष्ट करावें. विशेषतः स्वातियुक्त वैशाखतृतीयेस गंगेच्या उदकाने स्नान केल्यास मनुष्य सर्व पापापासून मुक्त होतो ७,८. माघमहिन्यातील रोहिणीयुक्त तिथीस, वृषभसंक्रांति असेल त्या दिवशीं व त्याचप्रमाणें अश्वयुजीच्या दिवशी जें दिलें जातें तें अक्षय रहातें असें सांगितलें आहे ९. विशेषतः मोदकादियुक्त हविष्यान्न व गुडकर्पूरयुक्त उदक ह्यांच्या दानाची विद्वान् प्रशंसा करितात व दाता ब्रह्मलोकी पूज्य होतो. बुधवार व श्रवणनक्षत्र ह्यांनीं युक्त अशी तृतीया जर प्राप्त झाली तर त्या दिवशीं स्नान, उपवास इत्यादि करावे. तें अक्षय फल देते असे सांगितलेलें आहे. चतुर्थी व भरणी ह्याचा योग असून जेव्हां चर दिवस असेल तेव्हा यमदेवाची पूजा करून प्राणी सर्व पापांपासून मुक्त होतो. शिवा, शाता व सुखा अशी चतुर्थी तीन प्रकारची सांगितलेली आहे १०–१३. ती भाद्रपद शुक्लपक्षांत शिवलोकीं अतिशय पूज्य झाली आहे. कार्तिकामध्यें ती शाता ह्या संज्ञेस पात्र होते व माघशुक्ल चतुर्थीस सुखा असें ह्मटलें आहे १४. ह्या चतुर्थीच्या दिवशीं केलेलें स्नान, तप, दान, उपवास व तसाच जप सहस्रपट फलदायी होतो व श्राद्ध तर अक्षय होते १५. चतुर्थीच्या दिवशीं विघ्नांचा नाश व्हावा व सर्व

कादिभिरादरात्। चतुर्थ्यां विघ्ननाशाय सर्वकामसमृद्धये १६ श्रावणे मासि पञ्चम्यां शुक्लपक्षे विशेषतः। स्नापयेन्नवनागांश्च गन्धतोयैः सुगन्धिभिः १७ तेषां कुले भयच्छन्ति अभयं प्राणरक्षणम्। द्वादश्योभयलेखे च गोमयेन विशेषतः १८ पूजयेद्दधिदुग्धाद्यैः सिन्दूरैरपि भक्तितः। सुप्ते जनार्दने कृष्णपञ्चम्यां भवनाङ्गणे १९ पूजयेन्मनसा देवीं वामां मनुहरितिसश्रयाम्। पिचुमन्दस्य पत्राणि स्थापयेद्भवनोदरे २० पूजयित्वा नरो देवीं न सर्पभयमाप्नुयात्। येयं भाद्रपदे षष्ठी षष्ठी च द्विजसत्तमाः २१ स्नानदानादिकं सर्वं सर्वमक्षयमुच्यते। षष्ठ्यां फलाशनो विप्रो विशेषान्माधकार्तिके २२ इह चामुत्र मुख्यां च लभते ख्यातिमुत्तमाम्। शुक्लपक्षे च सप्तम्यां यदा सङ्क्रमते रविः २३ महाजया तदा स्याद्वै सप्तमी भास्करप्रिया। अपराजिता तु भाद्रस्य महापातकनाशिनी १४ ललिता केवला ज्ञेया पुत्रपौत्रविवर्द्धिनी। शुक्ला वा यदि वा कृष्णा षष्ठी वा सप्तमी तु वा २५ रविवारेण संयुक्ता तिथिः पुण्यतमा स्मृता। आश्विनस्य सिताष्टम्यामष्टादशभुजां यजेत् २६ कार्तिके शुक्लपक्षे वा महाविभवविस्तरैः। आषाढे श्रावणे मासि शुक्लाष्टम्यां च चण्डिकाम् २७ प्रातः स्नात्वाऽर्चयेद्भक्त्या रात्रौ सस्नापयेद्द्विजाः। चैत्रमासि सिताष्टम्यामशोककुसुमैर्द्विजाः २८ अर्चयेन्मृन्मयीं देवीमशोकार्थी च सर्वदा। सप्तयष्टममुहूर्ते वा सांहिणीसहिताऽष्टमी २९ श्रावणे मासि सिंहार्के क्वचित्साऽपि च शस्यते।

कामना परिपूर्ण व्हाव्या ह्मणून मोदकादिकान्या योगानें गणेशाची मोठ्या आदरानें पूजा करावी १६. श्रावण महिन्यातील पचमीस व विशेषत शुक्ल पक्षातील पंचमीस सुगंधि गंध व जल ह्यान्या योगानें नवनागास स्नान घालावें १७. ह्मणजे अशा प्रकारे पूजन करणाऱ्याच्या कुलात ते अभय व प्राणरक्षण देतात. विशेषत: गोमयानें द्वादशी व उभयलेखा ह्यास काढून दहीं, दूध इत्यादिकानीं व शेंदुराच्या योगानेंही त्याची भक्तीनें पूजा करावी. जनार्दन निद्रित झाले असता कृष्णपचमीस घराच्या अंगणामध्ये मनानें शेराचा आश्रय करून असलेल्या वामादेवीची पूजा करावी. घरामध्ये लिंबाचीं फुले ठेवावीं १८–२०. ह्याप्रमाणें देवीचे पूजन केले असता मनुष्यास सर्पापासून भय प्राप्त होत नाहीं. हे उत्तम ब्राह्मणहो, जी ही भाद्रपदातील षष्ठी व कोणतीही दुसरी षष्ठी त्या तिथीस केलेले स्नान दानादिक सर्व अक्षय होतें असें सांगितले आहे. माघ व कार्तिक महिन्यातील षष्ठीस फलाहार करणारे विप्र इहलोकीं व परलोकीं मुख्य व उत्तम कीर्तीस पात्र होतात. शुक्लपक्षातील सप्तमीचे दिवशीं जेव्हा सूर्यसंक्रान्ति होते २१–२३ तेव्हा तिला महाजया ह्मणतात. व ती सप्तमी भास्करास प्रिय आहे. भाद्रपदातील सप्तमीस अपराजिता ह्मणतात व ती महापातकाचा नाश करणारी आहे २४. जी केवळ सप्तमी असेल तिला ललिता ह्मणावे. ती पुत्रपौत्रादिकाची वृद्धि करणारी आहे. षष्ठी व सप्तमी, मग ती शुक्लपक्षातील असो की कृष्णपक्षातील असो, रविवारयुक्त असल्यास अतिशय पुण्यकारक होय, असें सांगितलेले आहे. अश्विनातील शुक्लाष्टमीस अष्टादश भुजांनीं युक्त असलेल्या देवीचे पूजन करावे २५,२६. किंवा कार्तिकातील शुक्लपक्षीं मोठ्या वैभवाच्या विस्ताराने पूजन करावे. आषाढ व श्रावणमासीं शुक्लाष्टमीस प्रातःकालीं स्नान करून भक्तीन चंडिकेचे पूजन करावे व हे द्विजहो, रात्रीं तिला स्नान घालावे. हे ब्राह्मणहो, चैत्रमहिन्यान्या शुक्लाष्टमीस सर्वदा अशोकप्राप्ति व्हावी ह्मणून मृन्मय देवीची अशोकपुष्पानी पूजा करावी. श्रावणमासी सूर्य सिंहराशींत असतां अष्टमी आठव्या मुहूर्तीं असल्यास किंवा ती रोहिणीयुक्त असल्यास क्वचित् प्रशस्त मानिलेली आहे. एकादशीच्या कोटि व्रतानीं जे फल मिळतें त्याच्या दसपट फल हें व्रत केल्यानें प्राप्त होते असें सांगितलेलें आहे. अन्य

एकादशीनां कोटीनां व्रतैश्च लभते फलम् ३० अतो दशगुणं प्रोक्तं कृत्वैतत्फलमाप्नुयात् । अशक्तोऽन्यक्रियां कर्तुमुपवासं तु केवलम् ३१ कृत्वा विमुच्यते पापात्सर्वकृत्यकृतां वरः । न कालनियमस्तत्र न वारनियम क्वचित् ३२ नापि नक्षत्रदोषोऽस्ति वारदोषो न गण्यते । त्रिकालं पूजयदेवं दिवारात्रौ विशेषतः ३३ अर्धरात्रे विशेषेण पुष्पैर्नानाविधैरपि । दिवा तिथेरलाभे तु न कुर्याद्विधिवद्व्रतम् ३४ राशिस्पर्शे यदि पर रजन्यामपि चाष्टमी । सप्तमी सार्धयामं च रोहिणी वा न सस्पृशेत् ३५ व्रती सकल्पयेत्तत्र न च रात्रौ कदाचन । प्रागारम्भ प्रकुर्वीत अधिमात्राधिके व्रती ३६ विश्वनाथादिदेवानां दर्शनं प्राग्विवर्जयेत् । यत्रतत्रोपवासी स्याद्यामाष्टकव्रत चरेत् ३७ यामार्धं तत्परं यामे पारणं विचरेद्व्रती । तत्परे चान्नजन्य वा न कुर्यात्पारण गृही ३८ नक्षत्रयोगे ग्रहणं पूजयेत्परमेश्वरम् । जपहोमादिक कुर्याद्गृही नोपवसेत्क्वचित् ३९ दिवाष्टम्यां मुहूर्ते वा प्राजापत्येन संयुतम् । तथापि च दिवाकृत्यं समाप्य च व्रतं चरेत् ४० मुहूर्तान्ते च मासान्ते अष्टम्यामपि रोहिणी । उपवासे च नो दोष पूजा होमः प्रशस्यते ४१ नवम्यां च सदा पूज्याः प्रतिमासेऽयुता द्विजाः । गृह्णीयान्नियमं चैव यथा कर्म फलप्रदम् ४२ कार्तिकस्य तु मासस्य दशमी शुक्लपक्षिका । तस्यां युक्ताशना विप्रा ब्रह्मलोकमवाप्नुयु. ४३ दशमी ज्येष्ठमासस्य सा चेद्दशहरा स्मृता । आश्विनस्य महापुण्या कार्तिके विजया स्मृता ४४ एकादशी व्रतपरा सर्वपापमणाशिनी । सर्वपापविनिर्मुक्ता यथा कुर्वन्ति मानवाः ४५ दशम्यामेकभक्तस्तु संयतः स्याज्जितेन्द्रियः । एकादश्या-

---

क्रिया करण्यास अशक्त असलेल्या पुरुषाने केवल उपवास जरी केला तरी तो पापापासून मुक्त होतो व तो सर्व कृतकृत्य पुरुषामध्ये श्रेष्ठ होय. तेथे कोणत्याही प्रकारचा कालनियम व वाराचा नियम नाही २७-३२ त्याचप्रमाणे नक्षत्रदोष नसतो व वारदोषाचीही कोणी गणना करीत नाही. देवाची त्रिकाल पूजा करावी व विशेषतः दिवसास आणि रात्रीस पूजन करावे ३३. नानाप्रकारच्या पुष्पानीं अर्धरात्री पूजन करावे. दिवसास तिथि न मिळाल्यास यथाविधि व्रत करूं नये ३४. अष्टमी-तिथीचा रात्री स्पर्श झाल्यास, ती दुसऱ्या दिवशी रात्रीही असल्यास व पूर्वदिवशी सप्तमी दीड प्रहर असून रोहिणीचा स्पर्श होत नसल्यास व्रती पुरुषाने त्या रात्री संकल्प कधीही करूं नये. पण थोडीशीही अष्टमी अधिक असल्यास व्रती पुरुषाने पूर्वी आरंभ करावा ३५, ३६. प्रथम विश्वनाथादि देवाचे पूजन वर्ज्य करावे. तात्पर्य कोणत्याही प्रकारें जरी अष्टमीचा योग असला तरी उपवास करावा व आठ प्रहर व्रताचरण करावे. त्यानंतर अर्धा प्रहर जाऊं देऊन व्रत्यानें पारणें सोडावें. पण त्याच्या पुढें गृहस्थ व्रत्यानें अन्नानें पारणें सोडूं नये ३७, ३८. नक्षत्राचा योग व ग्रहण ह्या समयीं परमेश्वराचें पूजन करावें व जपहोमादि करावें, पण गृहस्थानें उपवास कधीही करूं नये ३९. दिवसास योग्य मुहूर्ता जरी अष्टमी असली व ती नक्षत्रानें युक्त असली तरी सर्व दिनकृत्य संपवून व्रत करावें ४०. मुहूर्ताच्या अंती, मासान्या शेवटी व अष्टमीसही रोहिणी असता उपवास करण्यात काहीं दोष नाहीं व पूजा आणि होम प्रशस्त होय ४१. प्रत्येक महिन्यातील नवमीस दहा हजार ब्राह्मणाची पूजा करावी व कर्म फलप्रद होईल असा नियम धरावा ४२. कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील दशमीच्या दिवशी मितभोजन करणारे ब्राह्मण ब्रह्मलोकीं जातात ४३. ज्येष्ठ महिन्यातील दशमीस दशहरा असें म्हटलेलें आहे. आश्विनातील दशमीस महापुण्या हें नाव आहे व कार्तिकी दशमीस विजया असें म्हटलें आहे ४४. व्रतपर एकादशी सर्व पापाचा नाश करीत असते. जे पुरुष एकादशी करितात ते सर्व पापापासून मुक्त होतात ४५.

मुपोष्याथ द्वादश्यां पारण चरेत् ४६ द्वादश द्वादशीर्हन्ति तस्मात्तथाचरेद्बुधः । पूर्वेद्युरेकादशी पूर्णा परेऽहनि च वर्धते ४७ न वर्धत द्वादशी तु तदा त्वेवं व्यवस्थितिः । वनवासी परां कुर्यात्पूर्वां कुर्यादगृहाश्रमी ४८ पूर्वैरेकादशी त्याज्या वर्धते चेत्तिथिद्वयम् । एकादशी द्वादशी तु तदोपोष्या परा तिथिः ४९ यदा तु पारणायोग्या द्वादशी नोपतिष्ठते । तदा पूर्वैव सा ग्राह्या त्याज्या वृद्धा परेऽहनि ५० एकादशी कलायुक्ता सकला द्वादशी यदि । तत्र क्रतुसम पुण्यं त्रयोदश्यां तु पारणम् ५१ एकादशी द्वादशी च परेऽहनि न लभ्यते । नोपोष्या सा महादोषा पुत्रपौत्रधनक्षया ५२ एकादशी दशाविद्धा द्वादश्यां लिखिका यदा । द्वादशी पारणायोग्या वर्धते चापरेऽहनि ५३ तदा दिनद्वये त्याज्या पारण च नियोगतः । षोडशीग्रहण दृष्ट्वा द्वादशी लुप्तपारणा ५४ चण्डातिथौ व्रत चैव हन्ति पुण्य पुरा कृतम् । त्रयोदश्यां यद्विहितं पारणं न तु पुण्यदम् ५५ गृहाश्रमी न कुर्याद्वा दशमीद्वादशीक्षयात् । यदि रुद्रा दशमिश्रा परेऽह्नि रविसंक्रमः ५६ तथापि सपरित्यज्य द्वादश्यां समुपावसेत् । वज्रालोकनमात्र तु दशमी सविशेद्यदि ५७ एकादशी न भोक्तव्या परा स्यैकादशी तदा । तदा चेद्दशमीविद्धा समुपोष्या न दूषणम् ५८ द्वादश्यामुपवास तु य करोति नरोत्तम । स याति परम स्थानं यत्र विष्णुरनामयः ५९ उपोष्य दशमीमिश्रां मोहादेकादशीं नरः । निरय याति स प्रेत्य धर्म-

---

दशमीच्या दिवशीं एकभक्त व नियमानें जितेंद्रिय राहून एकादशीच्या दिवशीं उपोषण करावें व द्वादशीस पारणें सोडावें. कारण, द्वादशी ही द्वादश दोषाचा नाश करीत असते. ह्यास्तव, शहाण्यानें असें व्रत करावे. पूर्वदिवशीं एकादशी पूर्ण (साठ घटिका) असून ती दुसऱ्या दिवशींही वाढत असल्यास आणि द्वादशी वाढत नसल्यास अशी व्यवस्था करावी ह्मणजे वानप्रस्थानीं दुसऱ्या दिवशीं व गृहस्थाश्रम्यानीं पूर्वदिवशीं करावी ४६—४८. एकादशी व द्वादशी अशा दोन्ही तिथि वाढत असल्या तर वानप्रस्थानीं एकादशी सोडावी व दुसऱ्या दिवशीं उपोषण करावें ४९. आता पारण्यास योग्य अशी द्वादशी जेव्हां मिळत नाहीं तेव्हा ती पूर्वतिथीच ग्राह्य होय. अशा प्रसगीं दुसऱ्या दिवशीं वाढलेली तिथीही सोडावी ५०. एकादशी एक घटकाच असून द्वादशी जर संपूर्ण असेल तर त्या दिवशीं उपोषण करावें ह्मणजे क्रतु केल्याचे पुण्य लागतें. त्रयोदशीस पारणें सोडावें. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशीं एकादशी व द्वादशी ह्यातील एकही तिथि जर मिळत नसली तर त्या दिवशीं उपोषण करूं नये. कारण, ती महादोषदायक असून पुत्र, पौत्र व धन ह्याचा क्षय करीत असते ५१,५२. एकादशी दशमीविद्ध असून तिचा द्वादशीसही जर संपर्क होत असला तर दुसऱ्या दिवशीं वाढणारी द्वादशी पारण्यास योग्य होय ५३. ह्यास्तव, दशमीविद्ध व पूर्ण अशा दोन्ही तिथि पारण्याच्या नियोगाकडे लक्ष्य देऊन सोडाव्या. षोडशीग्रहण पाहून द्वादशी लुप्तपारणा आहे कीं काय तें ठरवावें ५४. चण्डा तिथीस केलेलें व्रत पूर्वी केलेलें पुण्य नाहींसें करून टाकीत असतें. त्रयोदशीच्या दिवशीं पारणें करावें असें जें सागितलेले आहे ते पुण्यकारक नव्हे ५५. किंवा द्वादशीचा क्षय झालेला असल्यास दशमीयुक्त एकादशी गृहस्थानें करूं नये. एकादशी दशमीविद्ध व दुसऱ्या दिवशीं सूर्यसंक्राति जरी असली ५६ तरी त्या दशमीविद्ध एकादशीस सोडून द्वादशीस उपोषण करावें. वज्रालोकनमात्र जर दशमीचा प्रवेश झाला असेल तर एकादशीस भोजन करूं नये. त्यावेळीं अपरा एकादशीच करावी. अशा प्रसंगीं एकादशी दशमीविद्ध जरी असली तरी उपोषण करावे; त्यात काहीं दूषण नाहीं५७,५८.जो उत्तम पुरुष द्वादशीच्या दिवशीं उपवास करितो तो जेथे सनातन विष्णु असतो त्या परम स्थानाप्रत जातो ५९ जो पुरुष

सन्ततिसंक्षयात् ६० रविवारे शुक्रवारे संक्रान्त्यां तु दिनक्षये । उपवासं प्रकुर्वीत पारणं तु विवर्जयेत् ६१ शुक्लां वा यदि वा कृष्णां पूर्वसंकल्पितामपि । एकादशीं सदा कुर्यान्न वै कृष्णेतरां क्वचित् ६२ नक्तेन वर्तयेत्कृष्णामिति शास्त्रविनिश्चयः । मासे चैकादशी यत्र लभ्यते शुक्लपक्षके ६३ तत्र कुर्यात्कृष्णपक्षे परा तिथिर्न गृह्यते । श्रावणीद्वादशी शुक्ला चान्द्रभद्रे यदा हरौ ६४ तत्रोपोष्य हृषीकेशं पूजयेद्विधिवन्नरः । श्रावणे चाश्विने चैव लभ्यते द्वादशीदिने ६५ श्रवणेन समायुक्ता महती सा प्रकीर्तिता । पुष्येण द्वादशी युक्ता फाल्गुने विजया स्मृता ६६ कार्तिके चेत्परित्याज्या माघे तु नरकं भवेत् । या भाद्रे विजया प्रोक्ता श्रवणन समायुता ६७ विशेषः कथ्यते तत्र यथावत्तद्व्रतमाचरेत् । एकादश्यामुपवसेत्ततो द्वादशी च दिवान्विता ६८ निशि पूर्णा द्वादशी च श्रवणेनापि संयुता । सफला द्वादशी ज्ञेया उपोष्येषा महाफला ६९ द्वादश्यां विष्णुविद्धायां वासुदेवं प्रपूजयेत् । कृष्णायां तु व्रतं कुर्याद्दहुदुःखं समाचरेत् ७० द्वादशी कामविद्धा चेन्मन्यते नाप्युपोषणम् । हन्यात्पुरा कृतं पुण्यं त्रयोदश्यामुपोषणम् ७१ प्रहरे प्रहरे स्नानं शर्वर्यां च विधीयते । पूजनं चाग्निकार्यं च षट्सु कार्यं व्रती चरेत् ७२ एकादशीं द्वादशीं च प्राप्नोति श्रवणे यदि । एकादश्यामुपोष्याथ द्वादश्यामप्युपावसेत् ७३ पारणं तु त्रयोदश्यां द्वादशी चेन्न लभ्यते । आमिषान्न न

मोहामुळें दशमीविद्ध एकादशीचे दिवशी उपवास करितो तो धर्म व सतति ह्यांचा क्षय झाल्यामुळें मेल्यावर नरकात पडतो ६०. रविवार, शुक्रवार, संक्रांति, दिनक्षय ह्या दिवशी उपोषण करावें, पण पारणें करूं नये ६१. शुक्ल किंवा पूर्वीच जिचा सकल्प केला आहे अशी कृष्ण एकादशीही सर्वदा करावी. कृष्ण एकादशीवाचून मात्र अशी दुसरी कोणतीही एकादशी करू नये ६२. कृष्ण एकादशीच्या दिवशी नक्त करावें असा शास्त्राचा स्पष्ट निश्चय आहे. ज्या महिन्यातील शुक्लपक्षातील एकादशीच उपवासयोग्य मिळते त्या महिन्यात शुक्लपक्षातच उपवास करावा. कृष्णपक्षात दुसरी तिथि घेऊ नये. श्रावणातील व भाद्रपदातील शुक्ल द्वादशीस जेव्हा हरीचा अवतार होतो तेव्हा पुरुषानें त्या दिवशी उपोषण करून यथाविधि हृषीकेशाचें पूजन करावें. श्रावण व आश्विन ह्या महिन्यातील द्वादशीच्या दिवशी जर श्रवणनक्षत्र मिळेल तर तिला महती असें ह्मटलेलें आहे. फाल्गुनात पुष्ययुक्त द्वादशी असल्यास तिला विजया ह्मटलें आहे. पण प्रस्तुत योगयुक्त अशी द्वादशी कार्तिकात असल्यास तिचा त्याग करावा व माघातील असल्यास द्वादशीचे व्रत केल्यास नरकप्राप्ति होते. आता भाद्रपदातील श्रवणयुक्त द्वादशी विजयानामक होय असें पूर्वी सांगितलें आहे. पण त्या विजयाद्वादशीविषयीं आता विशेष सांगतों. त्या दिवशीं यथाशास्त्र व्रत करावें. एकादशीच्या दिवशीच पुढे दिवसास द्वादशी असून ती रात्रभर पूर्ण असावी व श्रवणनक्षत्रानेंही ती युक्त असावी ह्मणजे तिला सफला ही संज्ञा प्राप्त होते. ह्या द्वादशीस उपोषण केलें असता मोठें फल प्राप्त होतें ६३–६९. द्वादशी विष्णुविद्धा असल्यास वासुदेवाचें पूजन करावें, पण ती कृष्णपक्षातील द्वादशी असल्यास व्रत करून पुष्कळ कष्ट सहन करावे ७०. पण द्वादशी कामविद्धा असल्यास उपोषण करावें असे शास्त्रमत नाही. कारण, ती पूर्वी केलेले पुण्य नाहींसे करीत असते. ह्यास्तव, त्रयोदशीस उपोषण करावें ७१. रात्रीं प्रत्येक प्रहरीं स्नान करण्याविषयीं विधान आहे. व्रती पुरुषानें त्या दिवशीं पूजन, अग्निकार्य इत्यादि सहा पवित्र कार्यें करावी ७२. श्रवणनक्षत्राचा एकादशी व द्वादशी ह्या दोन्ही तिथींस स्पर्श झालेला असल्यास एकादशीच्या दिवशी उपवास करून द्वादशीसही उपोषण करावें ७३. अशा प्रसगीं पारण्याकरितां द्वादशी न मिळाल्यास ते

भुञ्जीत हविष्यान्नेन पारणम् ७४ यदा तु पारणायोग्या लभ्यते द्वादशी तदा । तस्यां नातिक्रमो युक्तस्तदभावे त्रयोदशी ७५ एकादशी द्वादशी च श्रवणर्क्षेन संयुता । विष्णुशृङ्खलको नाम बुधवारे विशिष्यते ७६ दशम्यां संयतो भूत्वा प्रातरेकादशीदिने । कृत्वा तु सङ्गमे स्नानं प्रहरे प्रहरे द्विजा ७७ अनेन विधिना कृत्वा विजयायां व्रतोत्तमम् । सर्वपापक्षयं नीत्वा विष्णुलोके वसेन्नरः ७८ चतुर्युगानां दिव्यानां यावत्स्याद्विष्णुरूपधृक् । तावदेव हि सर्वत्र सार्वभौमो भवेन्नरः ७९ त्रेतायां दश जन्मानि मध्यदेशेषु भो द्विजाः । ततश्च भारते वर्षे वेदवेदान्तसारवित् ८० पुत्रपौत्रधनैर्युक्तो लक्षदो नृपसन्निभः । जायते दश जन्मानि त्रेतायां ब्राह्मणोत्तमः ८१ सपत्नीकश्च दीर्घायुर्धर्मकर्मसुपूजितः । भाद्रे मासि सिते पक्षे द्वादश्यां पृथिवीपतिम् ८२ शत्रुमुत्थापयेत्प्राह्णे शुभलग्ने शुभक्षणे । शल्यशाल्मलिवृक्षस्यापि सप्तपर्णीयकस्य च ८३ एषामन्यतमं वृक्षं चम्पकस्यार्जुनस्य वा । बृहत्कदम्बवृक्षस्य द्विचत्वारिंशदङ्गुलैः ८४ द्वात्रिंशदङ्गुलैर्वापि मानदण्डकथं च वा । त्रिंयायामं च प्रथमं द्वात्रिंशद्धस्तमेव वा ८५ हस्तषोडशवारस्य गृहस्थस्य विशिष्यते । हस्तत्रयेण विप्रस्य द्वादश क्षत्रियस्य तु ८६ अष्टहस्तं तु वैश्यस्य शूद्रस्य पञ्चहस्तकम् । अग्रतः श्वेतच्छत्रं स्यात्पताकं च पुरे पुरे ८७ गन्धसारसमायुक्तां कर्पूरमण्डिताम्बिताम् । रक्तवस्त्रपरिच्छन्नां पुष्पमालैरलङ्कृताम् ८८ मञ्चस्थां कारयेत्पूजां भक्त्या च सुदृढो नरः । सप्तरात्रं चरेत्पूजामैन्द्रमन्त्रेण मन्त्रवित् ८९ काकादीनं स्पृशे-

---

त्रयोदशीस करावे. पारण्याचे दिवशीं मांसभक्षण करूं नये. हविष्यान्नानेंच पारणे सोडावे ७४. पण ज्यावेळीं पारण्यास योग्य अशी द्वादशी मिळत असेल त्या दिवशीं द्वादशीचे उल्लघन करणें योग्य नव्हे. कारण, द्वादशी नच मिळाल्यास त्रयोदशीस पारणें करावें असें सांगितलें आहे. श्रवणयुक्त एकादशी व द्वादशी असून त्याच दिवशीं बुधवार असल्यास तो विष्णुशृंखलकनामक योग होय. हा योग विशेष आहे ७५, ७६. दशमीन्या दिवशीं उत्तम प्रकारें नियमयुक्त राहून एकादशीच्या दिवशीं प्रातःकालींच सगमावर स्नान करावे व तसेंच प्रत्येक प्रहरीं स्नान करण्याचा क्रम चालवावा. हे ब्राह्मणहो, ह्या विधीनें विजयाद्वादशीस उत्तम व्रत करून व सर्व पापाचा क्षय करून पुरुषानें विष्णुलोकीं वास्तव्य करावे ७७,७८. हें व्रत करणारा पुरुष दिव्य चतुर्युगें संपेपर्यंत विष्णूचें रूप धारण करून राहतो व तितकाच काळपर्यंत सार्वभौम राजा होऊन रहातो ७९. हे ब्राह्मणहो, त्रेतायुगात मध्यदेशामध्यें त्याचे दहा जन्म होतात. नतर तो त्रेतायुगात भारतवर्षामध्यें वेद व वेदान्त ह्यांचें सार जाणणारा, पुत्र, पौत्र व धन ह्यांनीं युक्त व राजाप्रमाणे लक्षाबधि दानें करणारा असा उत्तम ब्राह्मण दहा वेळ होतो ८०,८१. तो पत्नीसह दीर्घायुषी व धर्म आणि कर्म ह्यामध्ये अत्यंत पूज्य असा होतो. भाद्रपदातील शुक्लपक्षान्या द्वादशीस प्रातःकालीं शुभ लग्न व शुभ मुहूर्त पाहून त्यावर शत्रु भूपतीस उठवावे. शल्य (गोळा)नामक वृक्ष, सावरी व सातवण ह्यांतील एखाद्या वृक्षाचा किंवा चाफा, अर्जुन व मोठा कदंब ह्याचा चाळीस अंगुळें किंवा बत्तीस अंगुळें प्रमाणाचा दंड घ्यावा. दंडाचीं हीं दोनच प्रमाणें सांगितलेलीं आहेत. किंवा पहिले प्रमाण तीन बावा किंवा बावीस अंगुलि हात अथवा सोळा अंगुळाचा हात हें प्रमाण गृहस्थाकरिता प्रशस्त होय. ब्राह्मणाचे तीन हात, क्षत्रियाचे बारा हात, वैश्याचे आठ हात व शूद्राचे पाच हात दंडप्रमाण धरावें. त्याच्यावर टोंकास श्वेत छत्र लावावे व प्रत्येक पुरामध्यें अशाप्रकारें पताका उभाराव्या ८२–८७. नंतर अतिदृढ भक्तीनें पुरुषानें चंदनयुक्त, कर्पूरानें मंडित, लाल वस्त्रानें आच्छादित व पुष्पान्या मालांनीं अलंकृत अशी मञ्चकस्थ पूजा बाधावी व ह्याप्रमाणें मंत्रवेत्त्यानें इंद्रमंत्रानें सात दिवस सतत पूजा करावी ८८,८९. विशेषत वैरपक्षामध्यें काकळे

था तु वैरपक्षे विशेषतः । पताकाया निपाते तु राष्ट्रहानिं समादिशेत् ९० पताके निस्सृते भग्ने महिषाणां विनाशनम् । स्थूणापाते च भग्ने वा चाश्वहानिं समादिशेत् ९१ तस्करश्च कुले तस्य प्रायश्चित्तं समाचरेत् । तद्विष्णोरिति मन्त्रेण शतपद्मसमन्वितम् ९२ विष्णुमुद्दिश्य जुहुयादयुतं पिप्पलस्य च । ग्रहाणां च त्रिभागेन चायुतं जुहुयाद्बुधः ९३ आदित्यस्याद्भुतमिदं द्विजपाते तु भो द्विजाः । कपोतपाते शुक्रस्य काकादौ भौममादिशेत् ९४ भूकम्पे जायतेऽरिष्टं गुरोरद्भुतमादिशेत् । कीटविद्धे कृते विप्राश्चन्द्रस्याद्भुतमादिशेत् ९५ पताके निस्सृते भग्ने राहोरद्भुतमादिशेत् । शिवा रुवन्ति चान्द्रस्य वानरो वा स्पृशेत्क्वचित् ९६ केतोरद्भुतमुद्दिष्टं भूमिकम्पे तु ते द्विजा. । त्रयोदशीं सितां प्राप्य पुष्पैर्नानाविधैरपि ९७ कामदेवं समभ्यर्च्य गन्धाद्यैः सुमनोहरैः । चैत्रे मासि सिताष्टम्यां शनौ शतभिषा यदि ९८ गङ्गायां यदि लभ्येत सूर्यग्रहशतैः समाः । सेयं महावारुणीति ख्याता कृष्णत्रयोदशी ९९ अस्यां स्नानं च दानं च श्राद्धं वाऽक्षयमुच्यते । मधुमासे सिते पक्षे दम्भभङ्गी चतुर्दशी १०० तस्यां मदनमूले च यो नरः कामपूजयेत् । स याति परमं स्थानं मदनस्य प्रभावतः । जुगुप्सितवचोभिस्तु सम्यक्तुष्टो मनोभवः । अनन्तस्य व्रतं वक्ष्ये सर्वपापणाशनम् १ अनन्तसुखमाप्नोति यः कुर्याद्भक्तिमान्नरः । द्वादश्यां पूजिते शक्रे ध्वजके वास्तुयष्टिषु २ ततः शुक्रचतुर्दश्यामनन्तं पूजयेद्धरिम् । कृत्वा दर्भमयानन्त वारि-

---

इत्यादि प्राण्यानी जिला स्पर्श केला नाहीं अशी पताका जर आपोआप पडेल तर तें राष्ट्रहानीचें सूचक आहे असें जाणावें ९०. पताका काठीच्या टोकातून निघून पडल्यास किंवा मोडल्यास म्हशी, रेडे ह्यांचा नाश होणार असें जाणावें. स्वतः काठीच खालीं पडली किंवा मोडली तर ती अश्वांची हानि सुचविते व त्याच्या कुलात चोर होणार असें जाणावें आणि प्रायश्चित्त करावें. म्हणजे " तद्विष्णोः परमं " ह्या मंत्रानें शंभर कमलांनीं विष्णूस उद्देशून हवन करावें. पिंपळाच्या समिधांचा दहा हजार होम करावा व शहाण्यानें ग्रहांस उद्देशून त्याच्या तिसऱ्या हिश्शाने किंवा अयुत आहुति द्याव्या ९१-९३. हे ब्राह्मणहो, पक्षी बसला असता हे आदित्याचें अद्भुत करावें. कपोतपक्षी पताकेवर बसला असता शुक्राचें अद्भुत करावें व काकादिकांच्या स्पर्शासमयीं भौमाचें अद्भुत करावयास सांगावें. भूकंप झाला असता अरिष्ट प्राप्त होतें, ह्यास्तव गुरूची शांति करावी व ब्राह्मणहो, भुंग्यांसारख्या किड्यानें काठीस वेध केला असता चंद्राचें अद्भुत करावें ९४,९५. पताका काठींतून निघाल्यास किंवा तुटल्यास राहूचें अद्भुत करावें. भालु ओरडल्यास चंद्राची आणि कदाचित् वानरानें स्पर्श केल्यास व भूमिकंप झाल्यास हे ब्राह्मणहो, केतूची शांति करावी. शुक्रत्रयोदशी आली असता अत्युत्तम गंधादिक व नानाप्रकारचीं पुष्पें वगैरे ह्यांच्या योगानें कामदेवाची पूजा करावी. चैत्रमहिन्यात शुक्राष्टमीचे दिवशीं शनिवार व शततारका आल्यास व त्या दिवशीं गंगास्नानाचा लाभ झाल्यास तो योग शंभर सूर्यग्रहणासारिखाच होय. असो; अशी ही कृष्णत्रयोदशी महावारुणी म्हणून प्रसिद्ध आहे ९६–९९. ह्या तिथीस केलेले स्नान, दान व श्राद्ध अक्षय होते, असें सांगितले आहे. चैत्राच्या शुक्लपक्षातील चतुर्दशी दम्भभङ्गी होय. त्या दिवशीं मदननामक वृक्षाच्या मूळाशीं जो पुरुष कामाची पूजा करितो तो मदनाच्या प्रभावानें परमस्थानाप्रत जातो १००,१०१. निंद्य वचनाच्या योगानें काम उत्तम प्रकारें संतुष्ट होत असतो. आतां सर्व पापाचा नाश करणारें अनंताचें व्रत सांगतों २. जो भक्तिमान् पुरुष हें व्रत करितो त्यास अनंत सुख प्राप्त होते. द्वादशीस व स्तंभाल काठ्याचे ठायीं ध्वजावर इंद्राचे पूजन करून ३ नंतर शुक्रचतुर्दशीस अनन्त जो

धान्यान्वितं तथा ४ पूजयेच्चन्दनैर्गन्धैर्नैवेद्यैर्विविधैरपि। चतुर्दशफलैर्मूलैर्जलजैः कुसुमैरपि ५ यवगोधूमशालीनां चूर्णैर्नैकतमस्य च। कृत्वापूपाह्वयं तस्मै दद्यादेक श्रुतक्षितम् ६ स्वयमेक तु भुञ्जीत दद्यात्सूत्रस्य दोरकम्। चतुर्दशग्रन्थियुत कुङ्कुमेन विलेपितम् ७ चतुर्दशसूत्रमय सूत्रं कार्पासमेव च ८ अतः प्रेतचतुर्दश्यां भोजयित्वा तपोधनान्। दान दत्त्वा द्विजेभ्यश्च यमलोक न गच्छति ९ ततः प्रेतकथां श्रुत्वा शाकैर्नक्त समाचरेत्। हेमन्ते मासि वटापायः कस्य पापं पुनीमहे ।११ स्नात्वा तत्र चतुर्दश्यां समये तारकामये। सभवत्फाल्गुने मासि या च कृष्णा चतुर्दशी १२ शिवरात्रिरिति ख्याता सा जगत्सर्वकामदा। दिवा पूजामलाभे तु रात्रियोगे व्रत चरेत १३ चतुर्दशी अमाविद्धा तद्व्रत परिवर्जयेत्। तिथियोगे च सर्वस्यां सपूर्णे व्रतमाचरेत् १४ कामविद्धा सा च पूज्या रात्रियोगे चरेद्व्रती। प्रहरं प्रहरं स्नान स्वयं स्नात्वा शिवस्य च १५ कारयेद्विधिवद्भक्त्या होम कुर्याद्यथाऽर्चितः। अथ वक्ष्यामि चैत्रादिमासे तु पूर्णिमा यथा १६ चित्रानक्षत्रसयुक्तो गुरुपूर्णां विधुर्यदि। महाचैत्रीति सा ज्ञेया पूर्णिमाऽक्षयपुण्यदा १७ विशाखादिषु भेदेषु पूर्णचन्द्रो गुरुश्चरेत्। महावैशाखिकाद्यास्तु पूर्णिमा द्वादश स्मृताः १८ महाज्येष्ठीविरोधेऽस्य प्राजापत्ये यथा रवि.। गुरुपूर्णचन्द्रो ज्येष्ठायां महाज्यैष्ठीति सा स्मृता १९

हरि त्याचें पूजन करावें. दर्भाचा अनंत करून व त्याची उदक, धान्य इत्यादिकासह चंदन, सुगंधि द्रव्यें, नाना प्रकारचे नैवेद्य, चवदा प्रकारची फलें, मुळे व उदकात झालेलीं पुष्पें ह्यान्य योगानें पूजन करावें ४,९. जव, गहूं किंवा साळीचे तांदूळ ह्यांच्या पैकीं कोणत्या तरी एका धान्याच्या पीठाचे आनरसे करून त्यातील काहीं विद्वान् ब्राह्मणास द्यावे व काहीं स्वतः खावे.चवदा गाठी देऊन एक सूत्राचा दोरा करावा व त्याला कुंकू लावावें ६, ७. तो चवदा सूत्राचा असावा व सूत कापसाचें काढवावें ८. असो, नंतर प्रेतचतुर्दशीच्या दिवशी तपोधन ब्राह्मणास भोजन घालून इतर ब्राह्मणास दान दिल्यास तो दाता पुरुष यमलोकास जात नाहीं ९. तदनंतर प्रेतकथा ऐकून शाकान्या योगानें नक्तभोजन करावें. हें नक्तव्रत चवदा, बारा, सात, पांच किंवा ह्याहून कमी दिवस यथाशक्ति केल्यास पुरुष सर्व पापापासून मुक्त होतो. माघमहिन्यात वटापाय केल्यास तो कोणत्या पूजकाचें पाप आह्मीं नष्ट करावें असे ह्मणून फल देण्यास तयार होतो. फाल्गुन महिन्याची कृष्णचतुर्दशी आली असता त्या चतुर्दशीच्या दिवशीं नक्षत्रें दिसत असताना स्नान करून व्रत करावें. त्या चतुर्दशीस शिवरात्रि हे नांव आहे. ती सर्व जगाचे मनोरथ पुरविणारी आहे. दिवसास पूजेचा लाभ झाला नसल्यास रात्रियोगावर व्रताचरण करावें १०—१३. चतुर्दशी अमावास्येनें विद्ध झालेली असल्यास त्या दिवशीं व्रताचरण करूं नये. संपूर्ण रात्रभर चतुर्दशीचा योग असल्यास व्रत करावें १४. ती कामविद्धा असल्यास पूज्य होय. तिथीचा योग रात्रीं असल्यास प्रत्येक प्रहरीं व्रती पुरुषानें स्वतः स्नान करून शंकरास यथाविधि भक्तीनें स्नान घालावें व जसे पूजन केलें असेल तसाच होम करावा. आता चैत्रादि महिन्यात पूर्णिमा कशी असते तें सांगतों १५,१६. चित्रानक्षत्रयुक्त व गुरुवारासह पूर्ण चंद्र असल्यास ती महाचैत्रीनामक पूर्णिमा होय, असें समजावें. ही अक्षय पुण्य देणारी आहे १७. ह्याचप्रमाणें वैशाखादि मासातून विशाखादि नक्षत्रें, गुरुवार व पूर्ण चंद्र असा योग आल्यास त्या महावैशाखी इत्यादि नावांच्या बारा पौर्णिमा होतात १८. प्राजापत्ययोगामध्ये जसा सूर्य त्याप्रमाणे महाज्येष्ठीचा असा विशेष आहे. गुरुवार, पूर्णचंद्र व त्याच दिवशीं ज्येष्ठानक्षत्र असा योग आल्यास त्या पूर्णिमेस

विनापि गुरुणा चन्द्रः कृत्तिकापौर्णिमा तथा । तथा महाकार्तिकी सा तिथि पुण्यतमा भवेत् १२७ रोहिण्यां तु स्थितश्चन्द्रः पौर्णमास्यां तु कार्तिके । महाकार्तिकी तथापि स्यात्स्वर्गलोकऽपि दुर्लभा २१ चित्रा वा यदि वा पूर्णा यदा स्यात्पूर्णमातिथिः । महाचैत्री तथापि स्यादश्वमेधफलप्रदा २२ रविणा कृत्तिकायोगाद्रविवारे च पूर्णिमा । महाचैत्री तथापि स्याद्दत्तस्याक्षयकारिका २३ एवं गुरौ गुरोर्योगे महाचैत्री प्रकीर्तिता । तत्र स्नानं च दानं च जपो नियम एव च २४ सर्वमक्षयतां याति फलं चैवाश्वमेधिकम् । पितरस्तर्पिता यान्ति वैष्णवं लोकमक्षयम् २५ भरण्यां कार्तिके मासि यदि स्यात्पूर्णमातिथिः । गङ्गाद्वारे तु महती वैशाखी पुण्यदा स्मृता २६ शालिग्रामे महाचैत्री कृतपुण्या महातिथिः । गङ्गाद्वारे तु महती वैशाखी पुण्यदा स्मृता २७ पुरुषोत्तमे महाज्येष्ठी महाषाढी तु शृङ्खले । महाश्रावणी केदारे महापुण्यतमा मता २८ महाभाद्री बदर्यां च कुञ्जोऽपि स्यान्नरस्तथा । महाकार्तिकी पुष्करे कन्यकुब्जे तथोत्तरे २९ महती मार्गशीर्षे स्यादयोध्यायां तथोत्तरे । महापौषी पुण्यतमा महामाघी प्रयागतः १३० महाफाल्गुनी नैमिषे च निर्दिष्टा स्युर्महाफलाः । अत्र स्म विहितं कर्म शुभं वा यदि वाऽशुभम् ३१ सर्वमक्षयतां याति वर्धते चाधिकं फलम् । आश्विने पौर्णमासी तु कौमुदीति प्रकीर्तिता ३२ अस्यां चन्द्रोदये लक्ष्मीं पूजयेद्विधिवन्नरः । न निर्वपति यच्छ्राद्धं प्रमृतपितृको द्विजः ३३ इन्दुक्षये मासि मासि प्रायश्चित्तीयते तु सः । चन्द्राश्विने तु कृष्णायां पञ्चदश्यां यथाविधि ३४ कृत्वा स्नानादिकं कर्म सोपवासो दिनं नयेत् । प्रदोषसमये लक्ष्मीं पूजयित्वा

महाज्यैष्ठी असें म्हटलें आहे १९. गुरुवार जरी नसला तरी कृत्तिकायुक्त पूर्ण चंद्र असला म्हणजे त्या तिथीस महाकार्तिकी असें नाव प्राप्त होतें. ती अतिशय पुण्यकारक तिथि आहे. कार्तिकांतील पूर्णिमेच्या दिवशीं चंद्र जरी रोहिणीमध्यें असला तरी ती महाकार्तिकीच होय. ही तिथि स्वर्गलोकींही दुर्लभ आहे. पूर्णिमातिथि कदाचित पूर्णा किंवा चित्रा असली तरी ती महाचैत्री होय. ही अश्वमेधाचें फल देणारी आहे २०–२२. सूर्याचा कृत्तिकेशीं योग असून रविवारी जरी पूर्णिमा झाली तरी ती महाचैत्री होय. त्या दिवशीं दिलेलें दान अक्षय फल देणारे होतें २३. ह्याप्रमाणे गुरुवारीं गुरूचा योग असतांही महाचैत्री असें म्हणतात. त्या दिवशीं स्नान, दान, तप, नियम इत्यादि सर्व अक्षय्य होतें व अश्वमेधाचें फल मिळतें. पितर तृप्त होतात व अक्षय जो विष्णुलोक त्याप्रत जातात २४, २५. कार्तिकमासीं भरणीनक्षत्र असतांना जर पूर्णिमा झाली तर तीही पुण्यतिथि होय. गंगाद्वारीं महती वैशाखी पुण्य देणारी आहे असें सांगितलेलें आहे २६. शालिग्रामीं महाचैत्रीनामक महातिथि अतिशय पुण्यवती आहे व गंगाद्वारीं महती वैशाखी पुण्यदायी आहे असें स्मृतिवचन आहे २७. पुरुषोत्तमावर महाज्येष्ठी, शृंखलेवर महाषाढी व केदारीं महाश्रावणी अतिशय पुण्यकारक मानिलेली आहे २८. बदरिकाश्रमीं महाभाद्रपदी, पुष्करक्षेत्रीं महाकार्तिकी, कान्यकुब्जामध्यें पुढील दोन २९; व मार्गशीर्षातील महती, अयोध्येमध्यें पुढच्या दोन व महापौषी, प्रयागक्षेत्रीं महामाघी व नैमिषारण्यामध्यें महाफाल्गुनी. जरी यात्रेकरू वाईट कुलात उत्पन्न झालेला असला तरी अतिशय पुण्यकारक होतो. साराश, ह्या सर्व पौर्णिमा महाफल देणाऱ्या म्हणून सांगितलेल्या आहेत. ह्या स्थळीं केलेलें सर्व शुभ किंवा अशुभ कर्म अक्षय होतें व त्याचें फल अधिक वाढतें. आश्विनांतील पौर्णिमेस कौमुदी असें म्हटलेलें आहे ३०–३२. त्या दिवशीं चंद्रोदयसमयीं पुरुषानें लक्ष्मीचें यथाविधि पूजन करावें. जो मृतपितृक द्विज प्रतिमासीं अमावास्येस श्राद्ध देत नाहीं तो प्रायश्चित्तास योग्य होतो. आश्विन महिन्यात कृष्ण अमावास्येस यथाविधि स्नानादि कर्म करून दिवसभर उपवास करावा व प्रदोषकालीं

यथाविधि ३५ दीपवृक्षान्यथा वृक्षाँल्लक्ष्मीप्रीत्या समुत्सृजेत् । नदीतीरे गिरौ गोष्ठे श्मशाने वृक्षमूलतः ३६ चतुष्पथे निजागारे चत्वरे तान्निधापयेत् । द्विर्भोजनमथावार्स्यां न कर्तव्यं कदाचन ३७ शर्वर्यां च विशेषेण माघफाल्गुनयोर्नरैः १३८ [१५१०] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

सूत उवाच ॥ वक्ष्ये प्रवरसन्तानं यथाक्रममिति द्विजाः । यद्विना व्यत्ययो यस्मात्तस्माच्छास्त्रानुसारतः १ प्रवरत्रयं काश्यपस्य काश्यपवत्सारनैध्रुवम् । पञ्चाश्वगौतमस्याथ गौतमश्चोर्व एव च २ च्यवनो जामदग्न्यश्च आप्नुवायनमेव च । मोकुन्याङ्गिरसभास्याज्जामदग्न्याप्नुवायनम् ३ शाण्डिल्यासिता दैवलाः प्रवरत्रयमेव च । पराशरस्य च तथा स्वयं शक्तिर्वसिष्ठकम् ४ आत्रेयमार्चायणस्याबालप्रवरमेव हि । वात्स्यवात्स्यायनौ चैव उरुकण्टक एव च ५ अथर्वक्षीरमित्रावरुणपञ्चमं परिकीर्तितम् । औतथ्यस्य त्रयं विद्याद्वाल्मीकोऽवरमेव हि ६ औतथ्यस्य च वासिष्ठमैन्द्रे चक्रं चक्रौञ्चायन तथा । औतथ्येति समाख्यातं माहिष्य च्यवन तथा ७ उरुकण्टत्रयं विद्यात्कौशिकस्य त्रय तथा । उद्गलो देवरातः ख्यातः कुशिकाद्याश्च भो द्विजाः ८ विश्वामित्रो देवराटच स्वय चैव त्रय मतम् । घृतकौशिकस्य कुशिकाविश्वामित्राघमर्षणम् ९ चण्डकौशिकस्य च तथा देवराड्देवरातकम् । विश्वामित्रे तु विख्यातः सुनन्तारेव एव हि १० तरुकृशाकटायनः स्वयमेव प्रवरत्रयम् । भ्रमद्वयं जैमिनेश्च स्वय वासिष्ठमेव च ११ शङ्खमाङ्गिरसच्यवनं शङ्खभस्य त्रयं मतम् । वात्स्यस्य च्यवनो नाम आप्नुवायनकस्तथा १२ सावर्णस्य तु सावर्ण्यच्यवनजामदग्निभार्गवम् । आप्नुवायनेति पाठीने एक एव तु सत्तमाः १३ कृष्णाजि-

---

यथाविधि लक्ष्मीपूजन करावें ३३–३५. वृक्षासारखे दीपवृक्ष करून ते लक्ष्मीप्रीत्यर्थ समर्पण करावे व त्यास नदीच्या तीरीं, पर्वतावर, गोठ्यांच्या गोठ्यात व श्मशानातील झाडाखालीं ३६, चव्हाटयावर व आपल्या घरातील ओटयावर ठेवावें. अमावास्येच्या दिवशीं दोन वेळ भोजन कधीच करूं नये ३७. व त्यातूनही विशेषतः पुरुषानें माघ व फाल्गुन्या महिन्यातील अमावास्येस रात्रीं भोजन करूं नये १३८. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणांतील मध्यमपर्वांच्या दुसऱ्या भागाचा आठवा अध्याय संपूर्ण झाला ॥८॥

सूत ह्मणतात — हे ब्राह्मणहो, आता क्रमाने प्रवराची संतति सांगतों. कारण, त्यावांचून कर्मादिकामध्यें व्यत्यय येत असतो. ह्यास्तव, शास्त्रानुसार प्रवरसंतति सांगतों १. काश्यपाचे काश्यप, वत्सार व नैध्रुव असे तीन प्रवर, गौतमाचे गौतम, ऊर्व, च्यवन, जामदग्न्य व आप्नुवायन असे किंवा मोकुनी, आंगिरस, भास्य, जामदग्न्य व आप्नुवायन असे पांच प्रवर व शांडिल्य, असित, आणि दैवल असे तीन प्रवर आहेत. त्याचप्रमाणे पराशराचे वासिष्ठ, शाक्त्य व पाराशर्य असे तीन २–४, अत्रीचे आत्रेय, आर्चायण व स्यावाल असे तीन, वत्साचे वात्स्य, वात्स्यायन, उरुकटक, अथर्वक्षीर व मित्रावरुण असे पांच प्रवर सांगितलेले आहेत. औतथ्याचे औतथ्य, वाल्मीक व अवर असे तीन, औतथ्याचे वासिष्ठ, इंद्र, चक्र, चक्रौञ्चायन व औतथ्य असे पांच, तसेंच औतथ्य, माहिष व च्यवन हे तीन, उरुकंट व तसेंच उद्गाल, देवरात व कुशिकादि असे हे द्विजहो, कौशिकाचे तीन जाणावे ५–८. किंवा विश्वामित्र, देवराट् व कौशिक असे तीन; घृतकौशिकाचे विश्वामित्र, घृतकौशिक व अघमर्षण ९, चंडकौशिकाचे देवराट् व देवरात; आणि विश्वामित्रामध्यें तर एका सुनंतूचीच ख्याति झाली आहे १०. तरुकशाकटायनाचे स्वतःच तीन प्रवर आहेत. जैमिनीचें त्याच नावाचें दोन वेळ उच्चारण केलें असता प्रवर सिद्ध होतात. वसिष्ठाचे प्रवर स्वतः वसिष्ठच होय ११. शखभांचे शंख, आंगिरस व च्यवन असे तीन प्रवर आहेत. वात्स्याचे च्यवन व आप्लवायन असे दोन १२ सावर्-

नम्य कृष्णाजिनं विश्वामित्रस्य जैमिनम् । कात्यायनस्य कात्यायनगार्ग्यायणत्रयं तथा १४ वात्स्यायनेति विख्यातं कुशिकस्य च पञ्चमम् । अमुं च विश्वामित्रं च जामदग्न्याप्नुवायनम् १५ गार्ग्यस्य गार्ग्यसामुं च तथाङ्गिरस एव च । बार्हस्पत्यभरद्वाज इति पञ्च प्रकीर्तितम् १६ वासिष्ठस्य च वासिष्ठ तथाङ्गिरस एव च । मित्रावरुणमयुक्त तावत्तस्य प्रकीर्तितम् १७ जाह्नकर्णभवकर्णौ प्रवरौ परिकीर्तितौ । उपमन्युरुपमन्योस्तथेन्द्र सह एव च १८ तदुत्तमेति त्रितय मित्रावरुणस्य च त्रयम् । आत्रेयगौतमाङ्गिरसप्रवरत्रयमेव हि १९ कमण्डलौत्पलमित्रा मित्रावरुण एव च । कमण्डलुश्चेति त्रितयं प्रवरत्रयमेव च २० च्यवनस्य तथा ज्ञेयमूर्वच्यवनाप्नवायनम् । भरद्वाजस्याङ्गिरसबार्हस्पत्य एव त्रयम् २१ आगस्त्यस्य अगस्तिश्च माहश्च च्यवनेति च । विश्वामित्रे देवरात औतथ्येति तथैव च २२ ये नोक्ता येऽप्यविज्ञातास्ते प्रोक्ताः काश्यपाज्जगत् २३ [१५३३] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

सूत उवाच ॥ वास्तुयागमथो वक्ष्ये बलिमण्डलपूर्वकम् । अङ्कुरार्पणकं कृत्वा मध्ये कुर्याच्च मण्डलम् १ त्रिहस्तपिण्डिकी कार्या चतुरस्रा उदक्प्लवा । प्रादेशमात्र उत्साधो दर्पणान्तर्निभो भवेत् २ मध्ये संमार्जयेद्विद्वान्पादाङ्गुष्ठ यथाक्रमात् । कोणे चतुष्पदं ज्ञेयं दिक्षु त्रिपदकं क्रमात् ३ पञ्चकं युग्मपादेन चतुर्दिक्षु ततः परम् । कोणे चतुष्पदं स्थाप्यं चतुष्कोणे विभावयेत् ४ चतुष्कोण बहिः कुर्यात्कोणे चापि चतुष्टयम् । द्वात्रिंशच्च भवेद्बाह्ये चान्तश्चापि त्रयोदश ५ चत्वारिंशत्पञ्चयुता मिलित्वा वास्तुदेवताः । शिखी चैवाथ पर्जन्यो जयन्तः कुलि-

---

र्णाचे सावर्ण्य, च्यवन, जमदग्नि, भार्गव व आप्नवायन असे व हे उत्तम ब्राह्मणहो, पाठीनातील एकच प्रवर होय १३. कृष्णाजिनाचे कृष्णाजिन, विश्वामित्राचा जैमिन, कात्यायनाचे कात्यायन व गार्ग्यायणत्रय व वात्स्यायन असें कुशिकाचें पाचवे प्रवर प्रसिद्ध आहे. तसेच विश्वामित्र, जामदग्न्य व आप्नवायन हें त्रिप्रवर होय १४,१५. गार्ग्याचें गार्ग्य, तसेच आंगिरस, बार्हस्पत्य व भरद्वाज अशीं पाच प्रवरे सांगितलेलीं आहेत. वसिष्ठाचीं वासिष्ठ व मित्रावरुणासह आंगिरस अशीं तीनच प्रवरें सांगितलीं आहेत १६,१७. जाह्नकर्ण व भवकर्ण हे दोन प्रवरच सांगितलेले आहेत. उपमन्यूचे उपमन्यु, इंद्र व तदुत्तम असे तीन, मित्रावरुणाचे तीन प्रवर आहेत. आत्रेय, गौतम व आंगिरस असे तीन १८,१९ व कमंडलु, औत्पलमित्र व मित्रावरुण असे कमडलूचे तीन प्रवर आहेत २०. तसेंच च्यवनाचे ऊर्व, च्यवन व आप्नुवायन, भरद्वजाचे आंगिरस, बार्हस्पत्य व भरद्वाज हे तीन; अगस्त्याचे अगस्ति, माह व च्यवन आणि विश्वामित्राचे विश्वामित्र, देवरात व औतथ्य असे तीन प्रवर आहेत २१,२२. आता जे प्रवर सांगितलेले नाहींत किंवा ज्यांचे गोत्र व प्रवर माहीत नाहीं ते सर्व काश्यप गोत्रात येतात. कारण, सर्व जग कश्यपापासून झालेलें आहे २३. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या द्वितीयभागाचा नववा अध्याय संपूर्ण झाला ॥ ९ ॥

सूत ह्मणतातः— आता बलिमंडलपूर्वक वास्तुयाग सांगतों. अंकुरार्पण करून त्याच्यामध्यें मंडल करावें १. उत्तरेकडे उतरती व चौकोनी अशी तीन हात पिंडी करावी. तिची उंची टीचभर असून बाजूचा भाग आरशाच्या आतील बाजूप्रमाणें असावा २. विद्वानानें मध्यें झाडून क्रमानें नऊ पदें करावीं. कोणात चार पदे व क्रमानें दिशामध्यें तीन पदें करावीं. नंतर दोन पायानीं चारी दिशेत पदपञ्चक करावें. कोणामध्ये चतुष्पदाची स्थापना करून त्याची चारी कोणात भावना करावी ३,४. बाहेरच्या बाजूस चतुष्कोण करावें, कोणामध्येंही चार स्थानें करावीं. साराश, ह्याप्रमाणे बाहेर बत्तीस व आत तेरा मिळून एकंदर पंचे-

शायुधः ६ सूर्यः सत्यो वृषश्चैव आकाशं वायुरेव च । पूषा च वितथश्चैव गृहान्यश्च यमस्तथा ७ गन्धर्वो मृगराजस्तु मृगाः पितृगणास्तथा । दौवारिकोऽथ सुग्रीवः पुष्पदन्तो जलाधिपः ८ असुरः पशुपाशौ च रोगो हि मोक्ष एव च । भल्लाटः सोमसर्पौ च अदितिश्च दितिस्तथा ९ बहिर्दशैव इत्येता ईशानादिन्यथाक्रमम् । ईशानादिचतुष्कोणं संस्थितान्पूजयेद्बुधः १० आपश्चैवाथ सावित्रो जयो रुद्रस्तथैव च । अर्यमा सविता चैव विवस्वान्मित्रसंज्ञकः ११ मित्रोऽथ राजयक्ष्मा च सप्तमः पृथिवीधरः । अष्टमस्त्वापवत्सस्तु परिधौ ब्राह्मणः स्मृतः १२ पूर्वादिषु तथा पूज्या गन्धपुष्पैः पृथग्विधैः । पञ्चत्वारिंशदेतच्चरक्या च चतुर्थकम् १३ मिलित्वा ऊनपञ्चाशदुत्तमा वास्तुदेवताः । नान्यत्र योजयेद्विप्राः प्रासादे च विशेषतः १४ बहिःकोणे चरक्यादि चरकं च विदारिकाम् । पूतनां च ततः पश्चाद्दायव्ये पापराक्षसीम् १५ स्वैः स्वैर्मन्त्रैश्च गन्धाद्यैः पूजयेत्कुसुमादिना । यथोक्तेन बलिं दद्यात्पायसान्नेन वा पुनः १६ रेखाः सर्वत्र शुक्लेन पद्मं रक्तेन भावयेत् । रक्तवेदेव वर्णेन बहिष्पञ्चाञ्जनेन तु १७ देववर्णानथो वक्ष्ये यथावदनुवर्णिताः । रक्तो गौरस्तथा शोणः सितरक्तः सितस्तथा १८ पीतः शुक्लश्च धर्मश्च पूषा रक्तः प्रकीर्तितः । श्यामः शुक्लश्च कृष्णश्च पीतः शुक्लो यथाक्रमम् १९ पीतो भृङ्गः पुनः शुक्लः कृष्णः शुक्लस्तथैव च । रक्तः शुक्लश्च शोणश्च कृष्णरक्तस्तथैव च २० धूम्रपीतो रक्तपीतः शुक्लः कृष्णश्च श्यामकः । रक्तवर्णेन द्वात्रिंशद्दश वर्णाः प्रकीर्तिताः २१ शुक्लशोणं पुनः श्वेतं सिन्दूराभं प्रकीर्तितम् । पाण्डवं कुङ्कुमाभं च रक्तं ज्ञेयं च पीतकम् २२ शुक्लपीतं च श्वेतं च गौरं चेत्यष्टवर्णकम् । पीतं रक्तं च श्यामं च गौरं चेति चतुष्टयम् २३ धरणी मदनं वाग्वेशं भुवर्णादि-

---

चाळीस देवता होतात. अग्नि, पर्जन्य, जयंत, इंद्र, सूर्य, सत्य, वृष, आकाश, वायु, पूषा, वितथ, गृहान्य, यम ५–७, गंधर्व, मृगराज, मृग, पितृगण, दौवारिक, सुग्रीव, पुष्पदन्त, वरुण ८, असुर, पशु, पाश, रोग, मोक्ष, भल्लाट, सोम, सर्प, अदिति व दिति ९ ह्या देवता बाहेरच्या बाजूस व क्रमानें ईशानादि देवता ईशान्यादि चार कोणामध्यें स्थापून ज्ञात्यानें त्याची पूजा करावी १०. आप, सावित्र, जय, रुद्र, अर्यमा, सविता, विवस्वान्, इंद्र ११, मित्र, राजयक्ष्मा, सातवा पृथ्वीधर, आठवा आपवत्स व परिधींत ब्राह्मण सांगितलेला आहे १२. ह्यांची पूर्वादि दिशामध्ये भिन्न भिन्न गंध, पुष्पें इत्यादिकांनी पूजा करावी. ह्या पंचेचाळीस देवता व चार चरक्या १३ मिळून एकुणपन्नास उत्तम वास्तुदेवता होतात. हे ब्राह्मणहो, यांची मुख्यतः मोठ्या मंदिरांवांचून इतरत्र योजना करूं नये १४. बाहेरच्या कोणामध्यें चरक्यादि ह्मणजे चरकी, विदारिका, पूतना व शेवटीं वायव्यकोणामध्यें पापराक्षसी ह्यांची त्याच्या त्याच्या मंत्रांनीं गंधपुष्पादि उपचारांनीं पूजा करावी. नंतर जसें विधान केलें असेल त्याप्रमाणें किंवा पायसान्नानें बलि द्यावा १५,१६. सर्वत्र रेषा शुक्लवर्णानें व कमल लाल रंगानें भरावें व बाहेरच्या बाजूस पांच प्रकारच्या रंजानें युक्त अशा रंगानें रंगवावें १७. ज्याप्रमाणें इतरत्र वर्णन केलें आहे त्याप्रमाणें आता मी देवांचें वर्णन सांगतों. धर्म लाल, शुभ्र, तसाच काळसर लाल, फिक्कट लाल, पांढरा १८, पिवळा, शुक्ल व पूषा रक्त सांगितलेला आहे. पुढें क्रमाने काळा, शुक्ल, कृष्ण, पीत व शुक्ल हे वर्ण १९ पिवळा, भृंगाच्या सारखा, पुनरपि शुक्ल, कृष्ण, तसाच शुक्ल, रक्त, शुक्ल, शोण व तसाच कृष्णरक्त २० , धुरकट पिवळा, रक्तपीत, शुक्ल, कृष्ण, श्याम व रक्तवर्ण असे बत्तिस व दहा वर्ण सांगितले आहेत २१. पुनः शुक्ल, शोण, श्वेत व शेंदरी सांगितलेला आहे. पाढरा, कुंकुमासारखा, रक्त, पिवळा २२, शुक्लपीत, श्वेत व गौर असे आठ वर्ण व पिवळा, रक्त, श्याम व गौर असे चार वर्ण होत २३. धरणी, मदन, वाग्वेश ह्यास भुवर्णादिप्रक्रमानें रंगवावें.

शक्रमात्। शुक्लेन रञ्जयेद्द्वारान्पुरद्वारं च मध्यमे २४ मध्येऽन्ते ऊनपञ्चाशत्सर्वं च वास्तुकर्मणि। चत्वारिंशद्द्वारयुतं ग्रहदेवकुलेऽपि च २५ महाकूपे तथा श्वेतो अन्यत्रापि प्रशस्यते। सुलिप्ते च शुचौ देशे साधुहस्तप्रमाणतः २६ दशपूर्वायता रेखा दश वै चोत्तरायताः। एकादशपद कुर्याद्वेषाभिः पदकेन तु २७ सर्ववास्तुविभागेन विज्ञेया नवका नव। पदस्थान्पूजयेद्देवांस्त्रिंशत्पञ्चाशदेव तु २८ द्वात्रिंशद्बाह्यतः पूज्याः पूज्यागारे त्रयोदश। मध्ये नवपदे ब्रह्मा तस्याप्यष्टौ समीपगाः २९ चतुर्दिक्षु षट्पदं तु त्रिपदं तु चतुष्पदम्। पदैकं तु चतुष्कोणे एतद्वास्तुविनिर्णयम्। चरक्यादि ततो हित्वा चत्वारिंशच्च पञ्चकम् ३० अपरं मण्डलं वक्ष्ये यथावदनुपूर्वशः। नवरेखाप्रयोगेन नवकोष्ठान्पकल्पयेत् ३१ द्विचतुष्कोष्ठकैर्दिक्षु यजेतार्यमणं ततः। विवस्वन्तं ततो मित्रं महीधरमतःपरम् ३२ कोणेषु कोष्ठद्वन्द्वेषु बाह्यादि परिकीर्तितम्। सावित्रं सवितारं च शक्रमिन्द्रंजयं पुनः ३३ रुद्र रुद्रजयं चैव वायुं जम्भकमेव च। पिलपिच्छं च मेधावी विदारीं पूतनां तथा ३४ क्रमादीशानपर्यन्ता जयन्त शक्रभास्करौ। सत्यो वृषान्तरिक्षौ च दिशि प्राच्यामवस्थिताः ३५ अग्निः पूषा च वितथो यमश्च गृहरक्षकः। गन्धर्वो भृङ्गराजश्च मृगो दक्षिणमाश्रिताः ३६ नैर्ऋतिर्दौवारिकश्च सुग्रीववरुणौ ततः। पुष्पदन्तस्वरौ शोषरोगौ पश्चिमदिशि स्थिताः ३७ प्राणवायुश्च नागश्च सोमो भल्लाट एव च। मुद्गलाख्यो दितिरदितिः कुबेरस्य दिशि स्थिताः ३८ मिलित्वा च त्रिपञ्चाशत्तेभ्यः पूर्वबलिं हरेत्। पिण्याकैः परमान्नैर्वा पूर्वोक्तैर्वा

शुभ्र वर्णानें इतर द्वारें रंगवावीं. मध्यप्रदेशीं पुराचें द्वार असावें २४, व मध्याच्या अंतीं एकुणपन्नास स्थानें करावीं. साराश, वास्तुकर्मामध्यें व देव आणि ग्रह ह्याच्य कुलामध्यें सर्व चाळीस द्वारयुक्त मंडल करावें. त्याचप्रमाणें मोठ्या कूपामध्यें व इतरत्रही श्वेतवर्ण प्रशस्त आहे. असो; उत्तम प्रकारें लिंपलेल्या शुद्ध जागीं दीड हात प्रमाणानें २९ दहा पूर्वेकडे पसरलेल्या व दहा उत्तरेकडे पसरलेल्या अशा रेखा काढव्या. रेषाच्या योगानें व पदकानें एकादशीपद करावें २६, २७. व सर्व वास्तुविभागानें नऊ स्थानें करावीं व पदांमध्यें असलेल्या तीस व पन्नास देवांचें पूजन करावें २८. बाहेरच्या बाजूस बत्तीस देवतास पूजावें व गृहामध्ये तेरा देवाचें पूजन करावें. मध्यभागीं जीं नऊ स्थानें आहेत त्यात ब्रह्मदेव व समीप असलेल्या आठ अंगदेवता ह्याचें पूजन करावें २९. चारी दिशेंतील षट्पद, त्रिपद व चतुष्पद आणि चतुष्कोणातील एक पद, अशी रचना करावी. हा वास्तूचा निर्णय झाला. तदनंतर चरक्यादि सोडून चाळीस व पांच पदें असावीं ३०. आता दुसरें मडल क्रमानें यथासाग सागतो. नवखानीं रेखा काढून नऊ कोष्ठकें करावीं ३१. नतर दोनचार कोष्टकानीं दिशामध्यें अर्यमाची पूजा करावी. नतर विवस्वान्, त्यानतर मित्र व शेवटीं महीधर ह्याची पूजा करावी३२. असो; कोण व कोष्ठाचीं द्वंद्वें ह्याच्यामध्यें बाह्यादिकाची व्यवस्था सागितली. सावित्र, सविता, शक्र, इंद्रजय ३३, रुद्र, रुद्रजय. वायु, जंभक, पिलपिच्छ, विदारी, पूतना व क्रमानें ईशानापर्यंत देवता येतात. जयंत, शक्र, भास्कर, सत्य, वृष व अंतरिक्ष हे पूर्वदिशेमध्यें व्यवस्थित आहेत ३४,३५. अग्नि, पूषा, वितथ, यम, गृहरक्षक, गंधर्व, भृंगराज व मृग ह्यानीं दक्षिणेचा आश्रय केलेला आहे ३६. नैर्ऋति, दौवारिक, सुग्रीव, वरुण, त्यानंतर पुष्पदन्त, स्वर, शोष व रोग हे पश्चिमदिशेमध्यें व्यवस्थित आहेत ३७. प्राणवायु, नाग, सोम, भल्लाट, मुद्गलनामक, दिति, अदिति ह्या देवता ईशान्यादिशेमध्यें आहेत ३८. ह्या सर्व मिळून छेपन्न देवता आहेत. त्यास प्रथम तिळाची पेंड किंवा पूर्वोक्त पायस ह्यांच्या योगानें बलि समर्पण करावा. चार किंवा अनेक अनुचरानीं परिवेष्टित, ज्याचें श्वेताश्व हें वाहन आहे व जो आपल्या

यथाक्रमात् ३९ रक्तमर्यमणं ध्यायेच्चतुर्भिर्बहुभिर्वृतम् । श्वेताश्ववाहनं दिव्यं किरीटैः स्वैर्विभूषितम् ४० आकृष्णेनेति मन्त्रस्य स्वर्णऋषिर्जगतीछन्दः सावित्र्यर्यमणीतये विनियोगः ४१ विवस्वन्त पीतवर्णं पीताम्बरधरं शुभम् । मेषस्थ च महाकार्ये देवगन्धर्वसेवितम् ४२ एतावद्विषन्तीति मन्त्रस्य कर्दम ऋषिः पङ्क्तिश्छन्दः कमला देवता विवस्वतीतये विनियोगः ४३ मित्रं ध्यायेच्छुक्लवर्णं श्वेतहंसोपरि स्थितम् । त्रिनेत्र द्विभुजं चैव श्वेताम्बरधर शुभम् ४४ कयानश्चेति मन्त्रस्य जयन्त ऋषिर्गायत्री छन्दः शङ्करो देवता मित्रप्रीतये विनियोगः ४५ प्रति महीधरं ध्यायेद्वृषभोपरि सस्थितम् । द्विभुजं पद्महस्त च व्यालयज्ञोपवीतिनम् ४६ त्र्यम्बकमिति मन्त्रस्य गर्ग ऋषिस्त्रिष्टुप् छन्दो हरो देवता महीधरप्रीतये विनियोगः ४७ सावित्रीं श्वेतवर्णा च सर्वलक्षणसंयुताम् । द्विभुजां पीतवस्त्रां च श्वेतसिंहासने स्थिताम् ४८ रक्ताम्बरधरां रक्तां रक्तमालोपशोभिताम् ४९ तद्वर्ष इति मन्त्रस्य गौतम ऋषिर्विराट्छन्दः सूर्यो देवता सवितृप्रीतये विनियोगः ५० शक्र ध्यायेत्पीतवर्णं शुक्लमैरावतस्थितम् । सर्वदेवैः स्तूयमानं द्विभुज पीतवाससम् ५१ त्रातारमिति मन्त्रस्य भार्गव ऋषिस्त्रिष्टुप्छन्दो नरसिंहो देवता इन्द्रजयप्रीतये विनियोगः ५२ रुद्रं ध्यायेच्छ्वेतवर्णं वृषभारूढविग्रहम् । नागयज्ञोपवीतं च सर्वलक्षणसंयुतम् ५३ नमस्ते रुद्रेति मन्त्रस्य गायत्रीछन्दस्त्र्यम्बको देवता रुद्रप्रीतये विनियोग. ५४ रक्तं रुद्रंजयं ध्यायेद्रक्तपद्मोपरि स्थितम् । रक्तश्यामाम्बरधरं द्विभुज रक्तवाससम् ५५ त्र्यम्बकमिति मन्त्रस्य गायत्री छन्दो महेशो देवता रुद्रं-

---

किरीटांनीं अत्यंत सुशोभित आहे अशा दिव्य अर्यमाचें ध्यान करावें ३९, ४०. " आकृष्णेन " ह्या मंत्राचा स्वर्ण हा ऋषि, जगती छंद, सविता व अर्यमा ह्याच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे ४१. ज्याचा वर्ण पिंवळा आहे, ज्यानें शुभ्र पीतांबर धारण केला आहे, जो मेषा (बकऱ्या) वर बसला आहे व महाकार्यामध्यें देव आणि गंधर्व ह्यानीं ज्याची सेवा केली आहे अशा विवस्वानाचें ध्यान करावें ४२. " एतावद्विषंति " ह्या मंत्राचा कर्दम हा ऋषि, पंक्ति छंद, कमला देवता व विवस्वानाच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे ४३. शुक्लवर्ण, शुभ्र हंसावर बसलेला, त्रिनेत्र, द्विभुज [illegible] व शुभ अशा मित्राचें ध्यान करावें ४४. " कयानश्चित्र० " ह्या मंत्राचा जयंत [illegible] गायत्री छंद, शंकर देवता व मित्राच्या प्रीतीकारिता विनियोग आहे ४५. पीतवर्ण, वृषभावर बसलेला, द्विभुज, ज्याच्या हातात कमल आहे व ज्याचें यज्ञोपवीत सर्पाचें आहे अशा महीधराचें ध्यान करावें ४६. 'त्र्यंबकं य०' ह्या मंत्राचा गर्ग हा ऋषि, त्रिष्टुप् छंद, हर देवता व महीधराच्या प्रीतीकरिता विनियोग आहे ४७. श्वेतवर्णी, सर्व लक्षणांनीं संयुक्त, द्विभुज, पीतवस्त्र, शुभ्र सिंहासनावर बसलेली, रक्तवस्त्र नेसलेली, लाल व रक्तमालेनें सुशोभित अशी जी सावित्री तिचें ध्यान करावें ४८,४९. " तद्वर्ष० " ह्या मत्राचा गौतम हा ऋषि, विराट् छंद, सूर्य देवता व सविताच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे ५०. ज्याचा वर्ण पिवळा आहे, जो शुभ्र ऐरावतावर बस्ला आहे, ज्याची सर्व देवाकडून स्तुति होत आहे, व ज्यानें पिवळें वस्त्र नेसलें आहे अशा द्विभुज इंद्राचें ध्यान करावें ५१. "त्रातारम्०" ह्या मत्राचा भार्गव ऋषि, त्रिष्टुप् छंद, नरसिंह देवता व इंद्रजयाच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे ५२. ज्याचा वर्ण श्वेत आहे; जो वृषभावर आरूढ झाला आहे; ज्याच्या गळ्यात नागाचे यज्ञोपवीत आहे, व जो सर्व लक्षणांनीं युक्त आहे अशा रुद्राचें ध्यान करावें ५३. " नमस्ते रुद्र " ह्या मंत्राचा गायत्री छंद, त्र्यंबक देवता व रुद्रप्रीत्यर्थ विनियोग आहे ५४. रक्तवर्ण, रक्तकमलावर बसलेला, ज्याने काळसर लाल वस्त्र धारण केलें आहे व ज्याचें उत्तरीय लाल आहे अशा द्विभुज रुद्रंजयाचें ध्यान करावें ५५. " त्र्यंबकम " ह्या मंत्राचा गायत्री छंद, महेश देवता व रुद्रंजयाच्या प्रीत्यर्थ विनियोग

जयप्रीतये विनियोगः ५६ अपां श्वेतं ततो ध्यायेद्वराभयकरं परम् । सर्वलक्षणसंपन्नं श्वेतपद्मोपरि स्थितम् ५७ ईशान इति मन्त्रस्य मरीचिर्ऋषिः पङ्क्तिश्छन्दो वायुर्देवता अपां प्रीतये विनियोगः ५८ अथ वत्सं पीतवर्णं मेषारूढं चतुर्भुजम् । पद्मशङ्खधरं वामे वराभयकरं परम् ५९ वरुडश्चोत्तम नभस्तीति मन्त्रस्य नरोत्तम ऋषिर्विराट्छन्दो वरुणो देवता आपत्यप्रीतये विनियोगः ६० कोणसूत्रस्योभयतः श्वेतकोष्ठद्वये पुनः । शर्वं ध्यायेद्रक्तवर्णं वृषभोपरि संस्थितम् ६१ द्विभुजं च त्रिनेत्रं च जटाभारोपशोभितम् ६२ मालास्वाहेति मन्त्रस्य भार्गव ऋषिर्गायत्री छन्दो महादेवो देवता शर्वप्रीतये विनियोगः ६३ गुहं ध्यायेत्पीतवर्णं पीतपद्मासनस्थितम् । नानाभरणशोभाढ्यं कुण्डलाद्यैरलङ्कृतम् ६४ सबोध इति मन्त्रस्य अगस्तिर्ऋषिर्गायत्री छन्दो हरो देवता गुहप्रीतये विनियोगः ६५ अर्यमणं द्विभुजं रक्तं रक्तमाल्योपशोभितम् । रक्तपद्मासनस्थं च देवगन्धर्वसेवितम् ६६ वातो वारीति मन्त्रस्य काश्यप ऋषिरनुष्टुप्छन्दो वायुर्देवता अर्यमप्रीतये विनियोगः ६७ ध्यायेच्च जम्भकं श्वेतं द्विभुजं कुटिलाननम् । करालवदनं घोरं वराहोपरि संस्थितम् ६८ कुविदो गवय इति मन्त्रस्य विश्वामित्र ऋषिर्जगती छन्दः सोमो देवता जम्भकप्रीतये विनियोगः ६९ पिलपिच्छं रक्तवर्णं रक्तमाल्यैरलङ्कृतम् । रक्तपद्मासनस्थं च रक्ताभरणशोभितम् ७० देवस्य हेति मन्त्रस्य पङ्क्तिश्छन्दः शची देवता पिलपिच्छप्रीतये विनियोगः ७१ पीतां च चरकीं ध्यायेद्रक्तमाल्यैरलङ्कृताम् । सुचारुवदनां भव्यां गुञ्जाहारोपशोभिताम् ७२ तदर्ष इति मन्त्रस्य जटिल ऋषिर्बृहती छन्दो भवो देवता चरकीप्री-

---

आहे ५६. श्वेतवर्ण, वर व श्रेष्ठ अभय मुद्रा हातात धारण करणारा, सर्व लक्षणांनीं युक्त व शुभ्र कमलावर बसलेला अशा अपाचें ध्यान करावें ५७. " ईशान० " ह्या मंत्राचा मरीचि ऋषि, पंक्ति छंद, वायु देवता, अपाच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे ५८. पीतवर्ण, मेषारूढ, चतुर्भुज, पद्म व शंखधर व डाव्या हातात वर व श्रेष्ठ अभय मुद्रा धारण करणाऱ्या अपावत्साचें ध्यान करावें ५९. " वरुडश्चोत्तमं नभस्ति० " ह्या मंत्राचा नरोत्तम हा ऋषि, विराट छंद, वरुण देवता व आपत्साचें प्रीत्यर्थ विनियोग आहे ६०. कोणसूत्राच्या दोन्ही बाजूंच्या दोन शुभ्र कोष्ठांमध्ये रक्तवर्ण, द्विभुज, त्रिनेत्र, जटेच्या भारानें सुशोभित व वृषभावर बसलेल्या शर्वाचें ध्यान करावें ६१,६२. " माला स्वाहा० " ह्या मंत्राचा भार्गव ऋषि, गायत्री छंद, महादेव देवता व शर्वप्रीत्यर्थ विनियोग आहे ६३. पीतवर्ण, पिवळ्या कमलावर स्थित, अनेक आभरणांच्या शोभेनें परिपूर्ण व कुंडलादिकांनीं अलंकृत अशा गुहाचे ध्यान करावें ६४. " सबोध० " ह्या मंत्राचा अगस्ति ऋषि, गायत्री छंद, हर देवता व गुहप्रीत्यर्थ विनियोग आहे ६५. द्विभुज, रक्तवर्ण, रक्त पुष्पांच्या मालांनीं अत्यंत सुशोभित, रक्तकमलासनस्थ, देव व गंधर्व ह्यांनी सेवित अशा अर्यमाचे ध्यान करावें ६६. " वातो वार " ह्या मंत्राचा काश्यप ऋषि, अनुष्टुप् छंद, वायु देवता, व अर्यमप्रीत्यर्थ विनियोग आहे ६७. श्वेतवर्ण, वक्रतुंड, ज्याचें भयंकर मुख आहे व जो वराहावर बसला आहे अशा घोर जम्भकाचें ध्यान करावे ६८. " कुविदो गवय० " ह्या मंत्राचा विश्वामित्र ऋषि, जगती छंद, सोम देवता व जंभकप्रीत्यर्थ विनियोग आहे ६९. रक्तवर्ण, रक्तमाल्यांनीं अलंकृत, रक्त कमलावर स्थित व लाल आभरणांनी सुशोभित अशा पिलपिच्छाचें ध्यान करावें ७०. " देवस्य हा० " ह्या मंत्राचा पंक्ति छंद, शची देवता व पिलपिच्छाच्या प्रीत्यर्थ विनियोग केलेला आहे ७१. गुंजाच्या हारांनीं सुशोभित, भव्य, सुंदर मुख, रक्तमाल्यांनीं अलंकृत व पीतवर्ण अशा चरकीचें ध्यान करावें ७२. " तदर्ष० " ह्या मंत्राचा जटिल ऋषि, बृहती छंद,

तये विनियोगः ७३ श्यामां विदारिकां ध्यायेत्त्रिनेत्रां च चतुर्भुजाम् । नानागणयुतां देवीं पङ्कजद्वयधारिणीम् ७४ श्रीश्च ते इति मन्त्रस्य वरुण ऋषिर्नृसिंहो देवता विदारिकाप्रीतये विनियोगः ७५ रक्तां च पूतनां ध्यायेत्पङ्कजस्थां सुशोभनाम् । सर्वाभरणसंरक्तां सर्वालङ्कारशोभिताम् ७६ मयि गृह्णामीति मन्त्रस्य विवस्वान्ऋषिर्नारायणो देवता पूतनाप्रीतये विनियोगः ७७ पूर्वादिदिक्षु सर्वासु सार्धाद्यन्तपदेषु च । ईशानं जटिलं श्वेतं शूलहस्तं महाभुजम् ७८ त्रिनेत्रं वृषभारूढं नागहारोपशोभितम् ७९ आयुः शीर्षाण इति मन्त्रस्य वामदेव ऋषिर्बृहती छन्दो धरणीधरो देवता ईशानप्रीतये विनियोगः ८० रक्तं ध्यायेच्च पर्जन्यं द्विभुजं पीतवाससम् । दक्षिणे परशुं ध्यायेदोङ्कारं च तथाऽपरे ८१ कयानश्चेति मन्त्रस्य धर्म ऋषिर्बृहती छन्दो भवो देवता पर्जन्यप्रीतये विनियोगः ८२ जयन्तं श्वेतं श्वेतवृषभारूढं ध्यात्वा । मानस्तोकेति मन्त्रस्य शक्तिर्ऋषिस्त्रिष्टुप्छन्दः शङ्करो देवता जयन्तप्रीतये विनियोगः ८३ शुक्लं पीतं द्विभुजमैरावतस्थं वज्रधरं ध्यात्वा मूलबीजेन स्थापयेत् ८४ भास्करं रक्तं द्विभुजं रक्ताश्वस्थं ध्यात्वा मायाबीजेन पूजयेत् ८५ सत्यं च द्विभुजं श्वेतं त्रिनेत्रं पीतवाससं मन्दकुन्दबीजेन पूजयेत् । वृषं पीतं वृषभारूढमाकाशबीजेन पूजयेत् ८६ ऋक्षं नीलं चतुर्भुजं महिषारूढम् । आच्छीम इति मन्त्रस्य होता यक्ष ऋषिस्त्रिष्टुप्छन्दः शंकरो देवता ऋक्षप्रीतये विनियोग ८७ अग्निमारभ्य पूजयेत् । अग्निं रक्तं सप्तजिह्वं रक्तवाससं पिङ्गाक्षं ध्यात्वा । अग्निं दूतमिति मन्त्रस्य भरद्वाज ऋषिस्त्रिष्टुप्छन्दः

भव देवता व चरकीप्रीत्यर्थ विनियोग आहे ७३. त्रिनेत्र, चतुर्भुज, अनेकगणयुक्त व दोन कमलें धारण करणारी अशी जी विदारिकानामक देवी तिचें ध्यान करावें ७४. " श्रीश्च ते० " ह्या मंत्राचा वरुण हा ऋषि, नृसिंह देवता व विदारिकाप्रीत्यर्थ विनियोग आहे ७५. कमलावर बसलेल्या, सर्व अलंकारांनीं सुशोभित झालेल्या व सर्व आभरणांनीं युक्त असलेल्या रक्तवर्ण पूतनेचें ध्यान करावें ७६. " मयि गृह्णामि० " ह्या मंत्राचा विवस्वान् ऋषि, नारायण देवता व पूतनाप्रीत्यर्थ विनियोग आहे ७७. पूर्वादि सर्व दिशामध्यें पहिल्या व शेवटच्या दीड पदामध्यें जटायुक्त, श्वेतवर्ण, ज्याच्या हातांत पाश आहे, ज्याचे बाहु मोठे आहेत व जो नागाच्या हारानें सुशोभित झाला आहे अशा त्रिनेत्र व वृषभारूढ ईशानाचें ध्यान करावें ७८–७९. " आयुः शीर्षाण० " ह्या मंत्राचा वामदेव ऋषि, बृहती छंद, धरणीधर देवता व ईशानप्रीत्यर्थ विनियोग आहे ८०. द्विभुज, पीतवस्त्र नेसलेला, दक्षिण हातामध्यें परशु व डाव्या हातामध्यें ओंकार धारण करणारा असा जो रक्तवर्ण पर्जन्य त्याचें ध्यान करावें ८१. " कयान० " ह्या मंत्राचा धर्म ऋषि, बृहती छंद, भव देवता व पर्जन्यप्रीत्यर्थ विनियोग आहे ८२. श्वेतवर्ण व श्वेत वृषभावर आरूढ झालेल्या जयंताचें ध्यान करावें. " मानस्तोके० " ह्या मंत्राचा शक्ति ऋषि, त्रिष्टुप् छंद, शंकर देवता व जयंतप्रीत्यर्थ विनियोग करावा ८३. शुक्ल व पीतवर्ण, द्विभुज व ऐरावतस्थ अशा वज्रधराचें ध्यान करून त्याची मूलमंत्रानें स्थापना करावी ८४. रक्तवर्ण, द्विभुज व रक्ताश्वस्थ अशा भास्कराचें ध्यान करून त्याची मायाबीजाने पूजा करावी ८५. द्विभुज, त्रिनेत्र, श्वेतवर्ण व पीतवस्त्राचें परिधान केलेल्या सत्याचें ध्यान करून त्याची मंदकुंदबीजानें पूजा करावी. पिवळ्या व वृषभावर आरूढ झालेल्या वृषाची आकाशबीजानें पूजा करावी ८६. महिषा (रेडया) वर आरूढ झालेल्या, चतुर्भुज व नीलवर्ण ऋक्षाची पूजा करावी. ' आच्छीम ' ह्या मंत्राचा होता यक्ष हा ऋषि, त्रिष्टुप् छंद, शंकर देवता व ऋक्षप्रीत्यर्थ विनियोग आहे ८७. अग्नीपासून आरंभ करून पूजा करावी. रक्तवर्ण, ज्याला सात जिव्हा आहेत, ज्याचे लाल वस्त्र आहे व ज्याचे नेत्र पिंगट आहेत अशा अग्नीचें

शंकरो देवता अग्निप्रीतये विनियोगः ८८ वितथं रक्तमजवाहनं द्विभुजं ध्यात्वा गायत्र्या पूजयेत् ८९ गायत्र्या विश्वामित्र ऋषिर्गायत्री छन्दः सविता देवता वितथप्रीतये विनियोगः ९० यमं कृष्णं महिषारूढं दण्डहस्तं ध्यायेत्। अच्छिद्य इति मन्त्रस्य त्रिष्टुप्छन्दो भवानी देवता यमप्रीतये विनियोगः ९१ गृहं क्षेत्रं रक्तमूर्ध्वकेशं महाभुजं रक्तवाससं ध्यात्वा वह्निबीजेन पूजयेत ९२ गन्धर्वं श्वेतं द्विभुजं पद्मासनस्थं ध्यात्वा यमबीजेन पूजयेत् ९३ भृङ्गराजं रक्तसिंहासनारूढं दिव्ययज्ञोपवीतिनं ध्यायेत् ९४ होता यस्रुक्ति मन्त्रस्य भार्गव ऋषिर्गायत्री छन्दो यशो देवता भृङ्गराजप्रीतये विनियोगः ९५ मृगं पीतं मृगारूढं पीतवाससं ध्यात्वा । कदाचनेति मन्त्रस्य वामदेव ऋषिर्बृहती छन्दो वामदेवो देवता मृगप्रीतये विनियोगः ९६ नैर्ऋतार्द्धपदेषु च । निर्ऋतिं पीतं श्वेतपद्मासनस्थं ध्यात्वा । कदाचनेति मन्त्रस्य पङ्क्तिश्छन्दः सविता देवता निर्ऋतिप्रीतये विनियोगः ९७ नैर्ऋतार्धपदेषु च दौवारिकं श्वेतशरभारूढं त्रिनेत्रं सर्वाभरणभूषितं ध्यात्वा । होतस्त्वेति मन्त्रस्य नरसिंह ऋषिर्बृहती छन्दो गणेशो देवता दौवारिकप्रीतये विनियोगः ९८ श्यामं सुग्रीवं कृष्णमेषारूढं पीतवाससं ध्यात्वा स्वादित्येति मन्त्रस्य त्रिष्टुप्छन्दो वामनो देवता सुग्रीवप्रीतये विनियोगः ९९ सुमित्रियान इति मन्त्रस्य कन्दर्प ऋषिः पङ्क्तिश्छन्दः सूर्यो देवता वरुणप्रीतये विनियोगः १०० पुष्पदन्तं पीतं मेषारूढं पीतवाससं ध्यात्वा । या ओषधीरिति मन्त्रस्य मन्मथ ऋषिर्जगती

ध्यान करावें. " आग्नेदृतं " ह्या मंत्राचा भरद्वाज ऋषि, त्रिष्टुप् छंद, शंकर देवता व अग्निप्रीत्यर्थ विनियोग आहे ८८. अज हें ज्याचें वाहन आहे व ज्याला दोन भुजा आहेत अशा रक्तवर्ण वितथाचें ध्यान करून गायत्रीमंत्रानें पूजन करावे ८९. गायत्रीचा विश्वामित्र ऋषि, गायत्री छंद, सविता देवता व वितथप्रीत्यर्थ विनियोग आहे ९०. कृष्णवर्ण, महिषावर आरूढ झालेल्या व हातात दंड घेतलेल्या यमाचे ध्यान करावे. " अच्छिद्य० " ह्या मंत्राचा त्रिष्टुप् छंद, भवानी देवता व यमप्रीत्यर्थ विनियोग आहे ९१. रक्तवर्ण, ज्याचे केश वर बाधलेले आहेत, ज्याच्या भुजा मोठ्या आहेत व ज्याचें वस्त्र लाल आहे, अशा गृहक्षेत्राचें ध्यान करून त्याचें वह्निबीजानें पूजन करावे ९२. श्वेतवर्ण, द्विभुज व पद्मासनस्थ अशा गंधर्वाचे ध्यान करून यमबीजानें पूजन करावे ९३. रक्तसिंहासनावर बसलेल्या व दिव्य यज्ञोपवीत धारण करणाऱ्या भृङ्गराजाचें ध्यान करावें ९४. " होतायस्रुक " ह्या मंत्राचा भार्गव ऋषि, गायत्री छंद, यश ही देवता व भृंगराजप्रीत्यर्थ विनियोग करावा ९५. पीतवर्ण व पिवळे वस्त्र परिधान केलेल्या मृगारूढ मृगाचे ध्यान करावे. " कदाचन० " ह्या मंत्राचा वामदेव ऋषि, पंक्ति छंद, सविता देवता व मृगप्रीत्यर्थ विनियोग आहे ९६. नैर्ऋतार्द्रादामध्यें पीतवर्ण व शुभ्रकमलासनस्थ अशा निर्ऋतीचें ध्यान करून पूजा करावी. " कदाचन० " ह्या मंत्राचा पंक्ति छंद, सविता देवता व निर्ऋतिप्रीत्यर्थ विनियोग केला आहे ९७. नैर्ऋताच्या गाहिलेल्या अर्ध्या पदामध्ये श्वेत शरभावर बसलेल्या, त्रिनेत्र व सर्वाभरणभूषित अशा दौवारिकाचे ध्यान करावे. " होतस्त्व " ह्या मंत्राचा नरसिंह ऋषि, बृहती छंद, गणेश देवता व दौवारिकप्रीत्यर्थ विनियोग आहे ९८. काळ्या मेषावर आरूढ झालेल्या, कृष्णवर्ण व पीत वस्त्र सुग्रीवाचे ध्यान करावें. " स्वात्० " ह्या मंत्राचा त्रिष्टुप् छंद, वामन देवता व सुग्रीवप्रीत्यर्थ विनियोग केलेला आहे ९९. " सुमित्रियान० " ह्या मंत्राचा कन्दर्प ऋषि, पंक्ति छंद, सूर्य देवता व वरुणाच्या प्रीत्यर्थ विनियोग केलेला आहे १००. पीतवर्ण, मेषारूढ व पीतवस्त्र अशा पुष्पदंताचे ध्यान करावें. " या ओषधि० " ह्या मंत्राचा मन्मथ हा ऋषि, जगती

छन्दो वायुर्देवता पुष्पदन्तप्रीतये विनियोगः १ असुरं कृष्णं कृष्णमाल्यैरलंकृत्य पूजयेत्। आकृष्णेति मन्त्रस्य हिरण्यवर्ण ऋषिर्जगती छन्द सविता देवता असुरप्रीतये विनियोगः २ असुरं कृष्णं नागहारान्वित पद्मासनस्थं ध्यात्वा। आब्रह्मन्निति मन्त्रस्य नलिन ऋषिस्त्रिष्टुप्छन्दो भवानी देवता सोमप्रीतये विनियोगः ३ रोगं कृष्णं नीलेन्दीवरवरं श्वतवृषभारूढं ध्यात्वा। नमस्ते रुद्र इति मन्त्रस्य नारद ऋषिः पङ्क्तिश्छन्दः श्रीर्देवता रोगप्रीतये विनियोगः ४ वायुकोणादारभ्य पूजयेत्। वायुं धूम्रवर्णं ध्वजहस्तं मृगारूढं ध्यात्वा। देवा इति मन्त्रस्य बृहती छन्दो यमो देवता नागप्रीतये विनियोगः ५ श्वेत सोमं श्वेतवर्णासनस्थं ध्यात्वा भद्रबीजेन पूजयेत् ६ रक्त भल्लाटं पीतवाससं ध्यात्वा वह्निबीजेन पूजयेत्। पीतवाससमनवाहन हारकेयूरान्वित वायुबीजेन मन्दरादीः पूजयेत् ७ रक्तां दितिं नागहारान्वितां रक्तपद्मासनस्थां ध्यात्वा मानोत्वा इति मन्त्रेण पूजयेत् ८ मानोत्वा इति मन्त्रस्य भार्गव ऋषिः पङ्क्तिश्छन्द पृथिवी देवता दितिप्रीतये विनियोगः ९ अदितिं पीतवर्णं सिंहारूढां पीताम्बरधरां ध्यात्वा। हिरण्यवर्ण इति मन्त्रस्य जनार्दन ऋषिर्बृहती छन्दः सोमो देवता अदितिप्रीतये विनियोगः ११० एवं पूजां विधायाथ हानं कुर्याद्यथाविधि। होमान्ते दक्षिणां दद्यात्काञ्चनं हेमसंयुतम् ११ तडागयागपक्षे तु सुवर्णं वार्धमेव वा ११२ [१६४५] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे दशमोऽध्यायः ॥ १० ॥

सूत उवाच ॥ अथ पूजाक्रमं वक्ष्ये पुराणस्मृतिचोदितम्। उत्तरे पश्चिमे वाथ पूर्वे चापि

छंद, वायु देवता व पुष्पदन्तप्रीत्यर्थ विनियोग केलेला आहे १. कृष्णवर्ण असुरास काळ्या पुष्पानी अलंकृत करून पूजा करावी. " आकृष्णेन० " ह्या मंत्राचा हिरण्यवर्ण ऋषि, जगती छंद, सविता देवता व असुरप्रीत्यर्थ विनियोग आहे २. पुन. कृष्णवर्ण नागाच्या हाराने युक्त व पद्मासनस्थ अशा असुराचे ध्यान करून पूजा करावी. " आब्रह्मन्० " ह्या मंत्राचा नलिन ऋषि, त्रिष्टुप् छंद, भवानी देवता व सोमप्रीत्यर्थ विनियोग केलेला आहे ३. नीलकमल धारण करणाऱ्या व श्वेत वृषभावर आरूढ झालेल्या कृष्णवर्ण रोगाचे ध्यान करून पूजन करावें. " नमस्ते रुद्र " ह्या मत्राचा नारद ऋषि, पंक्ति छंद, श्री देवता व रोगप्रीत्यर्थ विनियोग केला आहे ४. आता वायुकोणापासून आरंभ करून पूजा करावी. धूम्रवर्ण, ध्वजहस्त व मृगारूढ अशा वायूचे ध्यान करून पूजन करावे. " देवा० " ह्या मत्राचा बृहती छंद, यम देवता व नागाच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे ५. श्वेतवर्णाच्या आसनावर बसलेल्या शुभ्रवर्ण सोमाचे ध्यान करून भद्रबीजानें पूजन करावे ६. ज्याची वस्त्रे पीतवर्ण आहेत अशा लाल भल्लाटाचें ध्यान करून वह्निबीजानें पूजन करावें. पीतवस्त्र, अजवाहन व हार आणि केयूर ह्यानीं युक्त अशा त्या देवाचें वायुबीजानें मंदारादिकाच्या पुष्पानी पूजन करावे ७. नागाच्या हारानीं युक्त व रक्तकमलाच्या आसनावर बसलेली जी रक्तवर्ण दिति तिचे ध्यान करून " मानो त्वा० " ह्या मंत्रानें पूजन करावे ८. 'मानोत्वा' मंत्राचा भार्गव ऋषि, पंक्ति छंद, पृथ्वी देवता व दितिप्रीत्यर्थ विनियोग आहे ९. पीतवर्ण, सिंहारूढ व पीतांबरधर अशा अदितीचे ध्यान करून पूजन करावे. " हिरण्यवर्ण० " ह्या मंत्राचा जनार्दन ऋषि, बृहती छंद, सोम देवता व अदितिप्रीत्यर्थ विनियोग केला आहे १०. ह्याप्रमाणें यथाविधि पूजन करून होम करावा. होमाच्या शेवटीं सोन्याचें एक सुवर्ण ही दक्षिणा द्यावी ११; पण तडागयागाचा पक्ष असल्यास एक सुवर्ण किंवा अर्धे सुवर्ण इतकी दक्षिणा द्यावी १२. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या दुसऱ्या भागाचा दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥

समाचरेत् १ नदीतीरे तेमिशान्ते दशद्वादशसंख्यया । मण्डलं रचयेद्विप्राश्चरुकद्वयसंयुतम् २ त्रिभागं विभजेत्तत्र मध्यभागद्वयेन तु । त्रिहस्तवेदिकां कुर्यात्तालोत्सेधामुदक्प्लवाम् ३ उत्तराशे दक्षिणे चारत्रिहस्तान्तरेऽपि च । त्रिमेखलां हस्तमात्रां गुणवेदसमन्विताम् ४ मूले सार्धं च शुद्धां च मेखलां तु तथैव च । चतुरङ्गुलिकां वेदिं मध्योन्नतां प्रकल्पयेत् ५ षट्समाङ्गुलिकां योनिं पश्चिमे मेखलोपरि । त्रिंशत्सेन्नाभिसंयुक्तमेवं कुण्डं प्रकल्पयेत् ६ श्राद्धं वृद्ध्यात्मकं कुर्यात्संकल्पं मानसं चरेत् । श्राद्धार्थं नैव संकल्पेत्तथा वै देवदर्शने ७ गयाश्राद्धार्थकं चाष्टतीर्थश्राद्धार्थमेव च । ऐतान्यां कलशे देवं पूजयेद्गणनायकम् ८ मध्ये कुण्डे महांश्चैव विष्णुदेव दिगीश्वरान् । ब्रह्माणं चाग्निकुण्डे तु स्वैः स्वैर्मन्त्रैः प्रपूजयेत् ९ प्राणायामं विधायाथ भूतशुद्धिं समाचरेत् । ध्यायेद्वास्तुशिपुरुषं सर्वलक्षणसंयुतम् १० श्वेतं चतुर्भुजं शान्तं कुण्डलादिभिरलंकृतम् । पुस्तकं चाक्षमालां च वराभयकरं परम् ११ पितृवैश्वानरोपेतं कुटिलभ्रूसशोभितम् । करालवदनं चैव आजानुकरलम्बितम् १२ मूर्धन्यग्निं समाविश्य मुखे वायुः समाहितः । पृथ्वीधरोऽर्यमा चैव तथा निर्ऋतिवेष्टितौ १३ वक्षस्थले चापरा सन्ध्या पूजयेच्च यथाविधि । नेत्रयोर्दितिपर्जन्यौ श्रोत्रेऽदितीज्यपुत्रकौ १४ सर्पेन्द्रावासनस्थौ च वामे दक्ष विभावयेत् । सत्यसोमाग्नयस्तत्र राहोः पञ्चकमेव च १५ रुद्रश्च राजयक्ष्मा च वामहस्ते

सूत म्हणतातः—पुराणें व स्मृतिशास्त्रें ह्यामध्ये सांगितलेला पूजाक्रम आता मी सांगतों. उत्तर, पश्चिम किंवा पूर्व ह्या दिशात पूजन करावें १. हे ब्राह्मणहो, नदीच्या तीरीं, कूपाच्या किनाऱ्यावर दहा व बारा ह्या संख्येनें मंडलरचना करावी व ती दोन चरूंनीं युक्त असावी २. क्षेत्राचे तीन विभाग करावे व मधील दोन भागांनीं तीन हात प्रमाणाची वेदि करावी. ती तालप्रमाण उंच व उत्तरेकडे सखल असावी ३. उत्तरेकडे व दक्षिणेसही एक अरत्निप्रमाण अंतरावर तीन मेखलांनीं युक्त, हस्तमात्र, तीन अंगुलें उंच, चार अगुलें रुंद व मुळाशीं दीड अंगुल अशी शुक्लवर्ण मेखला करावी. मध्ये वेदी चार अंगुलें उच करावी ४,५. मेखलेवर पश्चिमेस सहा किंवा सात अंगुलें योनि योजून तिची नाभीसह कल्पना करावी. साराश, ह्याप्रमाणें कुंडाची रचना करावी ६ वृद्ध्यात्मक श्राद्ध करावें व मानसिक संकल्प करावा. कारण, श्राद्धाकरिता, देवदर्शनसमयीं, गयाश्राद्धाकरिता व त्याचप्रमाणें आठ तीर्थश्राद्धाकरिता संकल्प करू नये. ईशान्यादिशेंत कलशाचे ठायीं गणनायक देवाचें पूजन करावें ७,८. कुंडाच्या मध्यें महेश्वर विष्णु व दिशाचे अधिपति आणि अग्निकुंडामध्यें ब्रह्मदेव ह्याचें त्याच्या त्याच्या नाममंत्रांनीं पूजन करावें ९. प्राणायाम करून भूताची शुद्धि करावी. सर्व लक्षणांनीं युक्त, श्वेतवर्ण, चतुर्भुज, शांत, कुंडलादिकांनीं अलंकृत, पुस्तक, अक्षमाला वर व श्रेष्ठ अभय मुद्रा हीं ज्याच्या हातात आहेत; जो पितर व वैश्वानर ह्यांनीं युक्त आहे, वक्र भ्रुकुटींच्या योगानें जो सुशोभित आहे, ज्याचें मुख भयंकर आहे व ज्याचे हात जानूंपर्यंत पोंचले आहेत अशा वास्तूच्या ईशपुरुषाचें ध्यान करावें १०–१२. ज्याच्या मूर्धीस्थानीं अग्नीनें प्रवेश केला असून मुखामध्यें वायु राहिलेला आहे, त्याचप्रमाणें पृथ्वीधर व अर्यमा हे ज्याच्या मुखाग्रभागीं स्थित आहेत १३ आणि ज्याच्या वक्षःस्थलीं अपरा सन्ध्या आहे अशा त्या देवाचें यथाविधि पूजन करावें. त्याच्या नेत्रांच्या ठायीं दिति व पर्जन्य, कर्णामध्यें अदिति व इज्यपुत्र १४, आसनाच्या स्थानीं सर्प व इंद्र आणि वामभागीं दक्ष आहे अशी कल्पना करावी. सत्य, सोम, अग्नि, राहूचें पंचक, रुद्र व राजयक्ष्मा हे वामहस्ताच्या ठायीं व्यवस्थित

---

१ आंगठा व मधलें बोट ह्यांची टोंच म्हणजे तीं दोन सारखीं पसरली असतां जी लाबी होते त्यास ताल म्हणतात.

व्यवस्थितौ । पार्श्वे तु दक्षिणे तद्वद्रिरथश्च महर्क्षक. १६ उभौ क्षेयौ तथा जान्वोरुभौ गन्धर्वपुष्पकौ । जङ्घयोर्भृङ्गसुग्रीवौ स्फिग्वोर्दौवारिको गण. १७ जयशक्रौ तथा मेढ्रे पदयोः पितरस्तथा । एवं ध्यात्वा न्यसेत्पुष्पं सोमेनैव विचिन्तयेत् १८ मन्दिरं दीर्घयुक्तेन षडङ्गानि समाचरेत् । तावद्वीर्यं ततः कृत्वा प्रणव ब्रह्मणेति च १९ वास्त्वीशाय विद्महेति तन्नो विष्णुः प्रचोदयात्। अनेन स्नापनं कुर्यात्पूजाद्रव्याणि प्रोक्षयेत् २० आसनं पूजयेत्पूर्वं धर्मेणापि स्वशक्तित. । आदौ तु भास्करं सूर्यं शचीनाथं गणाधिपम् २१ आधारशक्तिं पृथिवीं पूजयेत्तत्र पङ्कजम् । बन्दीशासनमित्युक्त्वा पूजयेदासनं ततः २२ सितचन्दनयुक्तेन श्वेतपुष्पं गृहीत्वा च । हरेर्ध्यानं ततो ध्यायेत्स्थापयेन्मध्यमण्डले २३ आवाह्य चासनं दद्यात्ततः पाद्यादिकं त्रयम् । मधुपर्कं ततो दद्यादास्तोष्पतिमथेश्वरम् २४ अस्य मन्त्रस्य च ऋषिश्छन्दो नारायणमीरितम् । देवता च भवेद्ब्रह्मा योजयेदश्वमेधकम् २५ मन्दिरं विजयं सोमं महादेवं च माधवम् । रुद्रं हरं जयं भं च पूर्वादिदलमूलके २६ जया च विजया चैव सत्या माया शिवाम्बिका । हासिनी कामिनी चैता दलमूलेषु भावयेत् २७ पुष्पाञ्जलित्रयं दद्यादास्तोष्पदय इत्यपि । अर्घ्यमन्त्रेण गन्धाद्यैः पूजयेद्भूतिमिच्छता २८ वास्तोष्पते भवमते इति ध्यात्वा ऋतं चेति मन्त्रेण पूजयेत् । ऋषिर्नारायणश्छन्दो गायत्री परिकीर्तितम् २९ सूर्यश्च देवता ख्यातः प्रीणितः कुलिशायुधः । सूर्यं रक्तासनारूढं द्विभुजं रक्तवाससम् ३० रक्तपद्मद्वयधरं कुण्डलाद्यैः सुशोभितम् । एवं ध्यात्वा तु मतिमान्हंसस्य मन्त्रमीश्वरम् ३१ हंसस्य इति

आहेत आणि उजव्या बाजूस रिथ व महर्क्षक १५ हे दोघे आहेत असें समजावें. दोन्ही जानूंच्या ठायीं गंधर्व व पुष्पक, जंघाच्या ठायीं भृंग व सुग्रीव आणि स्फिचाच्या ठायीं दौवारिकसमूह आहे अशी कल्पना करावी १६,१७. शिश्नाचे ठायीं जय व शक्र व पायाचे ठायीं पितर आहेत अशी कल्पना करून त्यांचें ध्यान करावें आणि पुष्पसमर्पण करावें. पण सोमयागामध्यें असें चिंतन करूं नये १८. दीर्घयुक्त असा मंदर व षडंगें करावीं. नंतर तितकेंच वीर्य करून ' ॐ ब्रह्मणे ' असें म्हणून ' वास्त्वीशाय विद्महे ' असें व ' तन्नो विष्णुः प्रचोदयात् ' ह्या मंत्रानें स्नापन करून पूजाद्रव्यें प्रोक्षण करावें १९,२०. प्रथमतः आसनाची पूजा करावी. व नंतर धर्मतः व यथाशक्ति अगोदर भास्कर, सूर्य, शचीनाथ, गणाधिप, आधारशक्ति व पृथ्वी ह्यांचें पूजन करावें. तेथें बंदीशाचें आसन म्हणून सांगितलेलें कमल ठेवून त्यांचें पूजन करावें २१,२२. नंतर शुभ्र चंदनयुक्त असें श्वेतपुष्प घेऊन हरीचे ध्यान करावें व त्याची मंडलाच्या मध्यभागीं स्थापना करावी २३. आवाहन करून आसन द्यावें व नंतर पाद्य, अर्घ्य व आचमनीय हे तीन उपचार वास्तोष्पति० ह्या मंत्रानें समर्पण करावे व मधुपर्क करावा. ह्या मंत्राचा वास्तोष्पति हाच ऋषि व छंद गायत्र म्हणून सांगितलेला आहे. ह्याची देवता ब्रह्मा व अश्वमेधाकडे विनियोग आहे२४,२५. नंतर पूर्वादि दिशातील पत्राच्या मूळामध्यें मंदर, विजय, सोम, महादेव, माधव, रुद्र, हर, जय व भ२६ आणि जया, विजया, सत्या, माया, शिवा, अंबिका, हासिनी व कामिनी ह्याचीही दलाच्या मूलप्रदेशीं भावना करावी२७. " वास्तोष्पतये नमः " असें म्हणून तीन पुष्पांजलि द्याव्या व अर्घ्यमंत्रानें गंधादिकाच्या योगानें ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें पूजा करावी २८. " वास्तोष्पते भवमते " ह्या मंत्रानें ध्यान करून ' ऋतं च ' ह्या मंत्रानें पूजन करावें. त्याचा ऋषि नारायण व छंद गायत्री सांगितलेला आहे २९. देवता सूर्य असें झटलें आहे व कुलिशायुधप्रीत्यर्थ ह्याचा विनियोग आहे. रक्तासनावर आरूढ झालेल्या, द्विभुज, रक्तवस्त्र ३०. दोन रक्त कमलें धारण करणाऱ्या व कुंडलादिकाच्या योगानें

मन्त्रस्य ऋषिरौतथ्य ईरितः । पङ्क्तिश्छन्दः स्वयं देवो विनियोगस्तु प्रीतये ३२ नीलोत्पलद्वयधर सत्य मृत्यूपरि स्थितम् । स्वच्छश्वेताम्बरधरं वरद भक्तवत्सलम् ३३ स्वं मदात्वमिति मन्त्रेण श्वेतचन्दनपुष्पकैः । पूजयेत्परया भक्त्या वस्त्रालङ्कारभूषणैः ३४ उद्वर्षण इति मन्त्रेण कृष्णपुष्पैरथार्चयेत् । सत्यव्रत ऋषिश्चास्य त्रिष्टुप्छन्दोऽस्य देवता ३५ सविता चैव विज्ञेयः प्रीतये च वृषस्य च । शुक्लवर्णं तथाकाशमृषिसङ्घैश्च संस्तुतम् ३६ घटस्थं द्विभुजं ध्यात्वेद्गदापद्मविधारिणम् । शन्नो देवीति पठनाद्गन्धपुष्पादिभिर्यजेत् ३७ ऋषिः स्यात्कर्दमो विप्राश्छन्दो जागतिका तथा । देवता च भवेद्वह्निराकाशप्रीतये न्यसेत् ३८ ध्वजहस्तं महाबाहुं मरुद्गणैश्चोपसेवितम् । द्विभुजं धूम्रवर्णं च वायुं ध्यात्वा प्रपूजयेत् ३९ राजान इति मन्त्रेण पूजयेत्तितण्डुलैः । ऋषिर्नारायणश्छन्दो गायत्री देवता द्विजाः ४० देवता च भवेद्वायुः प्रीतये तस्य योजयेत् । पूषा रक्तश्च द्विभुजो रक्तपद्मासनस्थितः ४१ राजान इति च ऋचा पूजयेद्गन्धचन्दनैः । गोभिलास्य ऋषिः पङ्क्तिश्छन्दोऽस्य जगती स्मृतम् ४२ देवताच भवेद्वायुः प्रीतये विनियोजयेत् । वितथं श्यामवर्णं च चतुर्भिर्बाहुभिर्वृतम् ४३ मृगाक्षपाशखट्वाङ्गशूलं च दधतं करैः । मेषारूढं विशालाक्षं राजानो मध्यमीरयन् ४४ गृहीत्वा तथा शुक्लं चतुर्भिर्गदैर्वृतम् । शूलं दण्डं च

अतिशय शोभित अशा सूर्याचे ध्यान करून बुद्धिमान् पुरुषानें त्या ईश्वराचे " हंस० " ह्या मंत्रानें पूजन करावें ३१. " हंसस्य० " ह्या मंत्राचा ऋषि औतथ्य ह्मणून सांगितलेला आहे; छंद पंक्ति आहे व स्वतः सूर्यच देवता आहे. त्याच्या प्रीत्यर्थ ह्या मंत्राचा विनियोग केला आहे ३२. दोन निळी कमलें धारण करणारा, स्वच्छ शुभ्र वस्त्र धारण करणारा, वरद, भक्तवत्सल व मृत्यूवर बसलेला असा जो सत्य त्याचे " स्वं मदात्व० " ह्या मंत्रानें पांढरें चंदन व पुष्पें ह्यांच्या योगानें व वस्त्रें, अलंकार व भूषणें ह्यांच्या योगानें मोठ्या भक्तीनें पूजन करावें ३३,३४. नंतर " उद्वर्षण० " ह्या मंत्रानें कृष्णपुष्पाच्या योगानें त्याचें पूजन करावें. ह्याचा सत्यव्रत ऋषि, त्रिष्टुप् छंद, सविता देवता व वृषप्रीत्यर्थ विनियोग आहे. त्याचप्रमाणें ऋषींच्या समुदायाकडून ज्याची स्तुति होत आहे अशा घटस्थ, द्विभुज, गदापद्मधारी आकाशाचें ध्यान करून व " शन्नो देवी " ह्या मंत्राचा पाठ करीत गंध, पुष्पें इत्यादिकांच्या योगानें पूजन करावें ३५–३७. हे ब्राह्मणहो, ह्या मंत्राचा ऋषि कर्दम, छंद जगती, देवता अग्नि व आकाशप्रीत्यर्थ विनियोग आहे ३८. ज्याच्या हातात ध्वज आहे; ज्याचे बाहु मोठे आहेत, मरुद्गण ज्याचे सेवन करीत आहेत, ज्यास दोन बाहु आहेत व ज्याचा वर्ण धूम्र आहे अशा वायूचें पूजन करावें ३९. " राजान० " ह्या मंत्रानें शुभ्र तादुळांनीं त्याचे पूजन विहित आहे, त्याचा ऋषि नारायण, छंद गायत्री व हे ब्राह्मणहो, देवता वायु आणि वायूच्याच प्रीत्यर्थ विनियोग आहे. पूषा हा देव, रक्तवर्ण, द्विभुज व पद्मासनावर बसलेला आहे ४०–४१ आणि " राजान० " ह्या ऋचेनें गंध, चंदन इत्यादिकांच्या योगानें पजन करावें. ह्याचा ऋषि गोभिल, छंद पंक्ति व जगतीही सांगितलेला आहे ४२. देवता वायु आहे व त्याच्याच प्रीत्यर्थ विनियोग केलेला आहे. चार बाहूंनीं आवृत, मृग, अक्षपाश, खट्वांग व शूल हे पदार्थ हातानीं धारण करणारा, मेषारूढ व विशालाक्ष अशा श्यामवर्ण वितथाचें पूजन करावें ४३,४४.

---

१ हा श्लोकार्ध बरोबर नाही. पूषाप्रीत्यर्थ विनियोग असलेला मंत्र येथें पाहिजे आहे पण भाषांतर करितांना आमच्या जवळ एकच प्रत असल्यामुळें व ती अशुद्ध पुस्तकें छापण्यांत अधिक लौकिक मिळविलेल्या वेंकटेश्वरछापखान्यांत छापलेली असल्यामुळें पुष्कळ ठिकाणी अडखळत भाषांतर करावें लागलें, त्यास आमचा नाइलाज आहे.

खट्वाङ्गधारिणं वृषवाहनम् ४५ पीतवस्त्रधरं देवं जटामुकुटसंयुतम् । आशु. शिशान इति मन्त्रेण पूजयेद्गन्धचन्दनैः ४६ पुष्पदन्त ऋषिस्त्रिष्टुप्छन्दश्च परिकीर्तितम् । ईश्वरस्य देवतायाः प्रीतये विनियोजयेत् ४७ यमं ध्यायेत्कृष्णवर्णं महिषस्थं द्विबाहुकम् । दण्डपाशधरं चैव केयूरादैर्विभूषितम् ४८ ईशानेति च मन्त्रेण पूजयेत्कुसुमादिना । वामदेव ऋषिः पङ्क्तिश्छन्दः कालोऽस्य देवता ४९ षडाननं च गन्धर्वं पीतं ध्यायेच्चतुर्भुजम् । पीताम्बरधरं चैव नानाभरणभूषितम् ५० यदेव इति मन्त्रेण पूजयेत्कुसुमादिना । हारितोऽस्य ऋषिः प्रोक्ता जगती छन्द ईरितम् ५१ हिरण्यगर्भो देवताऽस्य प्रीतये विनियोजयेत् । भृङ्गराज जटारूढ स्वच्छ पीताम्बर शुभम् ५२ चक्षुः पीतेति मन्त्रेण पूजयेद्गन्धचन्दनैः ऋषिश्चागस्तिराख्यातस्त्रिष्टुप्छन्द. प्रकीर्तितम् ५३ विश्वेदेवा देवता च भृङ्गराजस्य प्रीतये । पीतं मृगं मृगारूढं जटामुकुटमण्डितम् ५४ परो देवा इति मन्त्रेण पूजयेद्बलिपायसैः । कपिलश्च ऋषिः प्रोक्तो गायत्री छन्द ईरितम् ५५ वरुणो देवता चास्य प्रीतये विनियोजयेत् । ध्यायेत्पितृगणं शुक्लं चतुर्भिर्बाहुभिर्वृतम् ५६ पितृभ्य इति मन्त्रेण पूजयेत्कुसुमादिना । शुनःशेप ऋषिश्चास्य त्रिष्टुप्छन्दश्च देवता ५७ विश्वेदेवा. समायाताः पितृमेधेन पूजयेत् । दौवारिक चाष्टभुज कृष्णवर्णं विचिन्तयेत् ५८ रक्तवासं पिङ्गलाक्ष कृष्णव्याघ्रोपरि स्थितम् । यो नः पितेति मन्त्रेण पूजयेद्भक्तितत्परः ५९ वैश्वानर ऋषिश्चास्य गायत्री छन्द ईरितम् । देवता च भवेच्छक्तिर्वानियोगश्च पूजने ६० शङ्खाभ चैव सुग्रीव द्विभुज

त्याचप्रमाणें चार गर्दभांनीं आवृत, वृषवाहन. शूल, दंड व खट्वांग धारण करणारा, शुक्लवर्ण, पीतवस्त्र धारण करणारा, जटा व मुकुट ह्यांनीं युक्त अशा गृहक्षत देवाचें " आशु. शिशान " ह्या मंत्रानें गंध, चंदन इत्यादिकांनीं पूजन करावें ४५,४६. पुष्पदन्त हा त्याचा ऋषि, त्रिष्टुप् छंद, ईश्वर देवता व तिन्याच प्रीत्यर्थ विनियोग केला आहे ४७. कृष्णवर्ण, महिषस्थ, द्विभुज, दंडपाशधर व केयूरादिकांनीं अत्यंत भूषित अशा यमाचें ध्यान करावें व " ईशान० " ह्या मंत्रानें पुष्पादिकांच्या योगाने त्याचे पूजन करावें. ह्या मंत्राचा वामदेव ऋषि, पंक्ति छंद व काल देवता आहे ४८,४९. पीतवर्ण, चतुर्भुज, पीताम्बरधर व अनेक भूषणांनीं भूषित, अशा षटाननाचे व गंधर्वाचे ध्यान करून " यदेव० " ह्या मंत्रानें पुष्पादिकांच्या योगानें पूजन करावें. ह्याचा हारित ऋषि व जगती छंद सांगितलेला आहे. ह्याची हिरण्यगर्भ देवता व षडाननादिकाप्रीत्यर्थ विनियोग केलेला आहे.ज्याने जटा बांधलेल्या आहेत व स्वच्छ पीताम्बर परिधान केलें आहे अशा भृंगराजाचे गंध, पुष्पें ह्यांच्या योगानें " चक्षुःपीत० " ह्या मंत्रानें पूजन करावें. ह्या मंत्राचा ऋषि अगस्त्य, छंद त्रिष्टुप् , विश्वेदेव देवता व भृंगराजाच्या प्रीत्यर्थ विनियोग सांगितलेला आहे. जटारूपी मुकुटाने मंडित व मृगारूढ अशा पीतवर्ण मृगाचे " परो देवा० " ह्या मंत्रानें बलि व पायस ह्यांच्या योगाने पूजन करावें. ह्या मंत्राचा कपिल ऋषि व गायत्री छंद सांगितलेला आहे ५०–५५. ह्याची वरुण ही देवता व मृगप्रीत्यर्थ विनियोग करावा. चार बाहूनीं युक्त व शुक्लवर्ण अशा पितृगणाचे ध्यान करून ५६ " पितृभ्य० " ह्या मंत्रानें पुष्पादिकाच्या योगानें पूजन करावें. ह्याचा " शुनःशेप " हा ऋषि, त्रिष्टुप् छंद, देवता प्राप्त झालेले विश्वेदेव व त्याची पितृमधाने पूजा करावी. नंतर अष्टभुज, कृष्णवर्ण, रक्तवस्त्र, ज्याचे नेत्र पिंगळे आहेत व जो काळ्या व्याघ्रावर बसला आहे अशा दौवारिकाचें " यो नः पिता " ह्या मंत्रानें भक्तियुक्त मनानें पूजन करावें ५७-५९. ह्या मंत्राचा वैश्वानर ऋषि, गायत्री छंद, देवता शक्ति व ह्याचा पूजनाकडे विनियोग आहे ६०. द्विभुज, चक्रधारी, हंसारूढ, भिप्पाड, ज्याचा शंखासा-

चक्रधरिणम् । हंसारूढं महाकायं बलिविज्ञानकारणम् ६१ शङ्खपद्मधरं चैव महिषस्थं विचिन्तयेत् । स इषुहस्तेति मन्त्रेण पूजयेद्रक्तभूषणैः ६२ ऋषिः शङ्खस्तथा छन्दः पङ्क्तिः सोमोऽथ देवता । श्वेतं जलाधिपं ध्यायेद्गन्धर्वाद्यैश्च वेष्टितम् ६३ ऋक्ष्यासनगतं ध्यायेच्छ्वेतगन्धेन चार्चयेत् । बृहस्पते परिदीया इति मन्त्रेण भक्तितः ६४ त्र्यम्बकोऽस्य ऋषिस्त्रिष्टुप्छन्दो देवो जलाधिपः । ध्यायेच्च अरुणं रक्तं करालं नरवाहनम् ६५ दशभिर्बाहुभिर्युक्तं कृष्णवस्त्रानुलेपनम् । शन्नो देवीति मन्त्रेण कृष्णपुष्पैः समर्चयेत् ६६ ऋषिर्वैश्वानरश्छन्दो विराडित्यभिधीयते । वैश्वानरोत्तरो देवः प्रीतये तस्य योजयेत् ६७ शेष षडाननं ध्यायेत्कृष्णं च मधुपिङ्गलम् । मेखस्थं कुण्डलोपेतं नागयज्ञोपवीतिनम् ६८ उद्वर्ष इति मन्त्रेण पूजयेदृद्धिमिच्छता । पाप रक्त विनेत्रं च रक्त श्मश्रुं विचिन्तयेत ६९ रक्तस्रगम्बरधरं चैव वरहस्तं विचिन्तयेत् । सिन्धो वीरेति मन्त्रेण कृष्णपुष्पैरथार्चयेत् ७० यम च कृकराक्ष च आकुञ्चितमूर्धजं द्विजाः । कपिलोऽस्य ऋषिश्छन्दोऽनुष्टुप्चैव प्रकीर्तितम् ७१ देवता च यशः ख्यातं प्रीतये विनियोजयेत् । यम च कृकराक्ष च क्षमाकुञ्चितमूर्धजम् ७२ खरस्थं द्विभुजं ध्यायेदिमं मन्त्रमुदीरयेत् । वासुकिः स्याद्ऋषिश्चास्य पङ्क्तिश्छन्दश्च देवता ७३ हिरण्यगर्भ इत्यृक् प्रीतयेऽस्य नियोजयेत् । अर्धपीतं च द्विभुज रक्ताक्ष धूम्रवर्ण वा ७४ देवताभिश्च संपन्न वातो वा रेतिरेव च । ऋषिर्वायुश्च गायत्री छन्दो वायुश्च देवता ७५ मुखरक्त शङ्खचक्रगदापद्मधरं तथा । पीतवस्त्र पन्नगस्थहारकेयूरमण्डितम् ७६ अवसृष्टापरापत इति मन्त्रेण परिपूजयेत । अग्निश्चास्य ऋषिः पङ्क्तिश्छन्दः सोमश्च देवता ७७ पीत भल्लाटक ध्यायेत्पद्मस्थ रक्तभूषणम् । द्विभुजं पद्महस्त च देवमेव विचिन्त-

---

रक्त वर्ण आहे, जो बलीच्या विज्ञानास कारणभूत झाला, शंखपद्मधर व महिषस्थ अशा सुग्रीवाचें ध्यान करावें व " स इषुहस्त " ह्या मंत्रानें रक्तभूषणांनीं पूजन करावे ६१,६२. ह्याचा ऋषि शंख, छंद पंक्ति व देवता सोम आहे. गंधर्वादिकांच्या योगानें वेष्टित व ऋक्ष्यासनावर स्थित, शुभ्र जलाधिपाचें ध्यान करावें व श्वेतगंधानें त्याचें " बृहस्पते परिदीया " ह्या मंत्रानें भक्तिपूर्वक पूजन करावें ६३,६४. ह्या मंत्राचा ऋषि त्र्यंबक, छंद त्रिष्टुप् व देवता जलाधिप आहे. रक्तवर्ण, कराल व नरवाहन, दहा बाहूंनीं युक्त व कृष्णवस्त्र आणि अनुलेपन ह्याचें ज्यानें सेवन केलें आहे अशा अरुणाचें ध्यान करावें. " शन्नो देवी० " ह्या मंत्रानें कृष्णपुष्पाच्या योगानें पूजन करावे ६५,६६. ऋषि वैश्वानर, छंद विराट, वैश्वानरोत्तर देव व त्याच्या प्रीत्यर्थ विनियोग करावा ६७. षडानन, कृष्णवर्ण, मधुपिंगल, मेखस्थ, कुंडलांनीं युक्त व नागाचे ज्यानें यज्ञोपवीत आहे अशा शेषाचें ध्यान करावें ६८. व ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें " उद्वर्ष० " ह्या मंत्रानें पूजन करावें. नंतर प्रातप्रदेशी पापी, रक्तवर्ण, त्रिनेत्र, रक्त श्मश्रु धारण करणारा व वरहस्त अशा कृकलाक्ष यमाचें ध्यान व हे ब्राह्मणहो, " सिन्धो वीर० " ह्या मंत्रानें कृष्णपुष्पांनीं पूजन करावें. ह्या मंत्राचा ऋषि कपिल, छंद अनुष्टुप्, देवता यश व त्याच्याच प्रीत्यर्थ विनियोग केला आहे. ज्याचे केश आकुंचित झाले आहेत व जो खरावर बसला आहे अशा द्विभुज कृकराक्ष यमाचें हा मंत्र म्हणत ध्यान करावें. ह्याचा ऋषि वासुकि, छंद पंक्ति, देवता हिरण्यगर्भ व त्याच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे. ज्याचा वर्ण किंचित् पिंगट आहे, ज्यास दोन भुजा आहेत, ज्याचे नेत्र लाल आहेत व जो देवतांच्या योगानें संपन्न आहे अशा धूम्रवर्णाचे " वातोवारेतिरेव० " ह्या मंत्रानें पूजन करावें. ह्याचा ऋषि वायु, गायत्री छंद व वायु देवता आहे ६९-७५. शंखचक्रगदापद्मधर, पीतवस्त्र, पन्नगस्थ, हारकेयूरमंडित ७६ अशा मुखरक्ताचे " अवसृष्टापरापत० " ह्या

येन ७८ यन्मातुरिति मन्त्रेण पूजयेत्सिततन्दुलैः । जम्भकोऽस्य ऋषिश्छन्दो गायत्री समुदाहृता ७९ देवता च भवेत्कुम्भः प्रीतये विनियोगतः । सोमं ध्यायेच्छ्यामरूप पद्मासनगत परम् ८० नानाभरणसंपन्नं किरीटवरधारिणम् । मर्माणि तेति मन्त्रेण गन्धाद्यैरपि पूजयेत् ८१ ऋषिः स्वार्थोंवेदश्छन्दो जगतीत्यभिधीयते । देवता च भवेत्सोमः प्रीतये विनियोजयत् ८२ दर्पं ध्यायेत्कृष्णवर्णं कृष्णाम्बरधरं तथा । नागयज्ञोपवीतं च शिखिस्तम्भ द्विजोत्तमाः ८३ पञ्चदीशेति मन्त्रेण गन्धाद्यैः परिपूजयेत् । मन्त्रश्चास्य ऋषिश्चास्य पञ्चायतनमीरितम् ८४ पङ्क्तिश्छन्दस्तथा प्रोक्त देवः पञ्चाननः स्मृतः । श्यामवर्णा दितिं ध्यायेद्द्विभुजां पीतविग्रहाम् ८५ सर्वलक्षणसपन्नां सर्वालङ्कारशोभिताम् । सुपर्णोऽसीति मन्त्रेण पूजयेत्पीतचन्दनैः ८६ ऋषिर्नारायणश्छन्दो जगती परिकीर्त्यते । भवेद्देवो भार्गवश्च इष्टार्थे परिपूजयेत् ८७ रक्ताभामदितिं ध्यायेत्सर्वालङ्कारभूषिताम् । शुक्रांभारिति मन्त्रेण गन्धाद्यैरभिपूजयेत् ८८ वामदेवो ऋषिश्चास्य गन्धाद्यैरभिपूजयेत् । देवः शुक्रः समाख्यात स्तुतौ च विनियोजयेत् ८९ ईशानादिकोणगतान्पूजयेत्सुसमाहितः । आप ध्यायेच्छुक्लवर्णं कुण्डलाद्यैर्विभूषितम् ९० इदं विष्णुरिति मन्त्रेण त्रिगन्धेन समर्चयेत् । ऋषिः स्यात्कर्दमश्छन्दो विराडित्यभिधीयते ९१ देवः सोमः समाख्यातः प्रीतये विनियोजयेत् । सरितं द्विभुज रक्त रक्तश्वेताम्बरान्वितम् ९२ हरिचन्दनलिप्ताङ्गं वरदं त विचिन्तयेत् । पयसा शुक्र इति मन्त्रेण पूजयेत्कमलादिना ९३ नारायण ऋषिश्चास्य

मन्त्रानें पूजन करावें. ह्याचा ऋषि अग्नि, पंक्ति छंद व सोम देवता सांगितलेली आहे ७७. पद्मस्थ, रक्तभूषण, द्विभुज, पद्महस्त व पीतवर्ण अशा भल्लाटकाचें ध्यान करावें ७८ व "यन्मातु०" ह्या मंत्रानें शुभ्र तादुळान्या योगानें पुजन करावें. ह्याचा जभक हा ऋषि व छंद गायत्री सांगितलेला आहे ७९. ह्याची देवता कुंभ व भल्लाटाच्या प्रीत्यर्थ विनियोग आहे. श्यामवर्ण, पद्मासनगत, अनेक आभरणानीं सपन्न व श्रेष्ठ किरीट धारण करणारा अमा जो सोम त्याचें ध्यान करावें व "मर्माणि ते० " ह्या मंत्रानें गंधादि उपचारानी पूजन करावें ८०,८१. ह्याचा ऋषि स्वार्थोंवेद व छंद जगती सांगितला आहे. ह्याची देवता सोम असून सोमप्रीत्यर्थच विनियोग आहे ८२. हे ब्राह्मणहो, ज्याचा वर्ण कृष्ण आहे, तसेंच ज्यानें कृष्णवस्त्र धारण केलें आहे, नागाचें ज्याचें यज्ञोपवीत आहे व मयूर हा ज्याचा आधार आहे अशा दर्पाचें ध्यान करावें ८३. हे उत्तम द्विजहो, " पञ्चदीश० " ह्या मंत्राने गंधादिकाच्या योगानें त्याचें पूजन करावें. ह्या मत्राचा ऋषि पंचायतन ह्मणून सांगितलेला आहे ८४, त्याचप्रमाणें पंक्ति छंद व देवता व पञ्चानन सांगितलेली आहे. नतर श्यामवर्ण, द्विभुज, पीताकृति, सर्व लक्षणानीं संपन्न व सर्व अलंकारानीं सुशोभित अशा दितीचें ध्यान करावें. व "सुपर्णोऽसि" ह्या मंत्रानें पिवळ्या चंदनानें त्याचें पूजन करावें ८५, ८६. ह्या मत्राचा नारायण ऋषि व जगती छंद सांगितलेला आहे. त्याचा देव भार्गव असून इष्टप्राप्त्यर्थ पूजन करावें ८७. रक्तस्वरूप व सर्व अलंकारानीं भूषित अशा अदितीचें ध्यान करावें व " शुक्राभा०" ह्या मंत्रानें गंधादि उपचार समर्पण करून पूजन करावें ८८. ह्या मंत्राचा ऋषि वामदेव, देवता शुक्र व स्तुतिमध्यें विनियोग केला आहे. ह्यास्तव, गंधादि उपाचारानीं त्याचें उत्तम प्रकारें पूजन करावें ८९. ईशानादि कोणातील देवाचें पूजन अतिशातपणे करावें. शुक्लवर्ण व कुण्डलादिकानीं विभूषित अशा आपाचें ध्यान करावें. आणि " इदं विष्णु० " ह्या मंत्रानें त्रिगंधानें त्याची पूजा करावी. ह्या मंत्राचा ऋषि कर्दम व छंद विराट् असा सांगितला जातो ९०,९१; देव सोम सांगितलेला आहे व देवाच्या प्रीत्यर्थ ह्याचा विनियोग आहे. रक्त व श्वेत अंबरानें युक्त, हरिचंदनानें ज्याचें अंग लिप्त आहे, वरद व द्विभुज अशा सरितार्चे

पङ्क्तिश्छन्दः प्रकीर्त्यते । नारायणः स्वयं देव प्रीतये विनियोजयेत् ९४ जयं ध्यायेत्पीतवर्णं द्विभुज वरहस्तकम् । देव किरीटसम्पन्न सर्वालङ्कारभूषितम् ९५ दृष्ट्वा परिश्रुत इति मन्त्रेणानेन पूजयेत् । ऋषिर्नारायणश्छन्द पङ्क्तिः सोमोऽथ देवता ९६ रुद्र ध्यायेद्रक्तवर्णं शीतांशुकृतशेखरम् । द्विभुज शूलहस्त च डमरुं च पराभवेत् ९७ दिवो मूर्धन्निति मन्त्रेण ऋषयः समुदाहृताः । ऋषिः स्यात्काश्यपश्छन्दो विराडित्यभिधीयते ९८ स्वय देवो विनियोगः स्तुतौ च विनियोजयेत् । द्विभुज रक्तपद्मस्थं पङ्कजद्वयधारिणम् ९९ अस्य किरीट इति मन्त्रेण रक्तस्रक्चन्दनादिभि. । पूजयेत्परया भक्त्या ऋषिर्नील उदाहृतः १०० त्रिष्टुप्छन्दो देवता स्याद्भ्रदोऽपि परिकीर्तितः । सवितार तथा ध्यायेत्पद्मस्थं द्विभुजं प्रभुम् १ नानाभरणशोभाढ्य सप्ताश्वरथमण्डितम् । यद्देवा इति मन्त्रेण गन्धाद्यैः परिपूजयेत् २ ऋषिरौतथ्य आख्यात प्रीतये विनियोजयेत् । ध्यायेद्रक्त विवस्वन्त द्विभुज पद्मविग्रहम् ३ अविद्या इति मन्त्रेण पूजयेद्गन्धचन्दनैः । ऋषिर्गन्ध समाख्यातस्त्रिष्टुप्छन्दश्च ईरितम् ४ देवता च भवेत्सोमः स्तुतौ च विनियोजयेत् । विबुधाधिप ततो ध्यायेत्पीत वृषभवाहनम् ५ चतुर्भुज यष्टिहस्तमक्षमालैकहस्तकम् । त्रिनेत्र रक्तवस्त्र च मुकुटाद्यैरलङ्कृतम् ६ ऋषिर्हारित इत्युक्तो जगती छन्द ईरितम् । देवता च भवेच्छक्ति प्रीतये विनियोजयेत् ७ मित्र ध्यायेच्छुक्लवर्णं वराभयकरं परम् । मेषस्थ च त्रिनेत्र च किरीटवरमण्डितम् ८ धनाकरास्त्विति मन्त्रेण

ध्यान करावे. आणि ' पयसा शुक्र ' ह्या मंत्राने त्याचे कमलादिकांच्या योगाने पूजन करावें ९२,९३. ह्या मंत्राचा ऋषि नारायण व छंद पंक्ति सांगितला आहे, देवता स्वत. नारायण व त्याच्याच प्रीत्यर्थ विनियोग आहे ९४. द्विभुज, वरदहस्त, पीतवर्ण, किरीटयुक्त व सर्व अलंकारांनी भूषित अशा जयदेवाचे ध्यान करावे ९५ आणि " दृष्ट्वा परिश्रुत " ह्या मंत्राने त्याचे पूजन करावे. ह्या मंत्राचा ऋषि नारायण, छंद पंक्ति व सोम देवता आहे ९६. चंद्रास ज्याने आपल्या मस्तकी धारण केले आहे अशा, द्विभुज, शूलहस्त, डमरुयुक्त व रक्तवर्ण रुद्राचे ध्यान करावे व " दिवो मूर्धन् " ह्या मंत्राने पूजन करावें. हे ऋषिहो, ह्या मंत्राचा ऋषि काश्यप व छंद विराट ह्मणून सांगितला आहे ९७,९८. स्वत च रुद्र ही त्याची देवता व स्तुतीमध्ये विनियोग आहे. द्विभुज, रक्तपद्मस्थ व दोन कमळे धारण करणारा असा जो छंद देव त्याची ' अस्य किरीट ' ह्या मंत्राने व लाल माळा, चंदन इत्यादिकांनी परम भक्तीने पूजा करावी. ह्याचा ऋषि नील ह्मणून सांगितलेला आहे ९९,१००. त्रिष्टुप् छंद व देवता छंद ह्मणून सांगितलेली आहे. त्याचप्रमाणे पद्मस्थ, द्विभुज, नाना आभरणांनी शोभित व सात घोड्यांच्या रथाने मंडित अशा प्रभु सूर्याचे ध्यान करावे. व " यद्देवा० " ह्या मंत्राने गंधादिकांनी पूजा करावी १,२. ह्याचा ऋषि औतथ्य ह्मणून सांगितलेला आहे व त्या देवाच्या प्रीत्यर्थ ह्याचा विनियोग केला आहे. द्विभुज व पद्माकार अशा रक्तवर्ण विवस्वानाचे ध्यान करावे ३. " अविद्या " ह्या मंत्राने गंध व चंदन ह्यांच्या योगाने पूजन करावे. ह्या मंत्राचा ऋषि गंध व छंद त्रिष्टुप् सांगितलेला आहे ४; ह्याची देवता सोम असून स्तुतींमध्ये विनियोग केला आहे. तदनंतर पीतवर्ण, वृषभवाहन, चतुर्भुज, ज्याने एका हातात अक्षमाला व दुसऱ्या हातात यष्टि धरिली आहे, ज्याचे वस्त्र रक्त आहे व जो त्रिनेत्र आणि मुकुटादिकांच्या योगाने अलंकृत आहे अशा विबुधाधिपाचे ध्यान करून पूजन करावें ५,६. त्याच्या पूजनाच्या मंत्राचा ऋषि हारित ह्मणून सांगितलेला आहे, छंद जगती आहे; देवता शक्ति आहे व प्रीत्यर्थ विनियोग आहे. मेषस्थ, त्रिनेत्र, उत्तम किरीटाने मंडित, शुक्लवर्ण आणि वर व अभय

पूजयेद्धधिपायसैः । ऋषिरौतथ्य इत्युक्तो जगती छन्द ईरितम् ९ देवता च भवेद्यक्ष्मा प्रीतये विनियोजयेत् । पीतं स्याद्राजयक्ष्माणं करालं च विचिन्तयेत् ११० यशोरूपमिति मन्त्रेण गन्धाद्यैः परिपूजयेत् । दध्यङ्ङाथर्वण ऋषिर्गायत्री छन्द ईरितम् ११ यक्ष्मा च देवता चैव स्तुतौ च विनियोजयेत् । शुक्लाम्बरधरं ध्यायेद्द्विभुजं शिखिवाहनम् १२ यम विनेति मन्त्रेण पूजयेद्भक्तितत्परः । ऋषि स्यान्नारद प्राक्तश्छन्दोऽनुष्टुप्प्रकीर्तितम् १३ विवस्वान्देवता चैव क्रतौ च विनियोजयेत् । एवं ध्यात्वा विवस्वन्तं महाकायं महोदरम् १४ अभिन्नरूपमन्त्रेण गन्धाद्यैः परिपूजयेत् । काश्यपोऽस्य ऋषिश्छन्दस्त्रिष्टुब्देवः शचीपतिः १५ बहिरीशानकोणेषु देवादीन्परिपूजयत् । कूष्माण्डेर्वरणापुष्पैः शौरकैर्वा समर्चयेत् १६ पीतां करालिकां ध्यायेच्चरकीं वरवर्णिनीम् । स्वजस्थां द्विभुजां चैव गुञ्जाहारोपशोभिताम् १७ पीतिन्यरूपमन्त्रेण पूजयेदृतिमिच्छुकः । बलदेव ऋषिश्चास्य च्छन्दो गौरी च देवता १८ ध्यायेद्विदारिकां रक्तां नवयौवनसंयुताम् । पवित्रेण पुनीहीति मन्त्रेणानेन पूजयेत् १९ ऋषिर्गर्ग. समाख्यातस्त्रिष्टुप्छन्दोऽस्य देवता । रुद्रोऽपि च समाख्यातः स्तुतौ च विनियोजयेत् १२० पापादिराक्षसीं ध्यायेत्सौरभेयोपरि स्थिताम् । कयान इति मन्त्रेण पूजयेद्गन्धचन्दनैः २१ ऋषिः सुवर्ण आख्यातः पङ्क्तिश्छन्द. प्रकीर्तितम् । देवता च महादेव इष्टार्थे विनियोजयेत्२२ कुण्डंवद्या अन्तरे च स्थापयेद्विधिवद्बुधः । पर्वताग्रमृद चैव गजदन्तमृद तथा २३ वल्मीके सङ्गमे चैव राजद्वारचतुष्पथात् । कुशमूलमृदः चैव यज्ञियस्य वनस्पतेः २४ इन्द्रवल्ली तथा क्रान्ता अमूर्ताश्वपुष्पस्य च । मालती

ज्यांनें हातांत वेतलें आहे अशा मित्राचें ध्यान करावें ७,८ आणि "धनाकरस्तु" ह्या मंत्रानें त्याचें दधि व पायस ह्यांच्या योगानें पूजन करावें. ह्याचा ऋषि औतथ्य व छंद जगती ह्मणून सांगितलेला आहे ९. देवता यक्ष्मा असून प्रीत्यर्थ विनियोग केला आहे. पीतवर्ण व भयकर अशा राजयक्ष्म्याचें चिंतन करावें १० आणि "यशोरूप" ह्या मंत्रानें गंधादिकांच्या योगानें पूजन करावें. ह्या मंत्राचा दध्यङ्ङाथर्वण ऋषि व गायत्री छंद सांगितलेला आहे ११. ह्याची देवता यक्ष्मा व स्तुतीमध्यें विनियोग केला आहे. शुक्लांबर धारण करणाऱ्या व द्विभुज शिखिवाहनाचें ध्यान करावें १२ व " यम विना " ह्या मंत्रानें भक्तितत्पर होऊन पूजन करावें. ह्याचा ऋषि नारद सांगितलेला आहे व छंद अनुष्टुप् आहे १३. ह्याची देवता विवस्वान् आहे व क्रतूकडे विनियोग केला आहे. त्याचप्रमाणें महाकाय व महोदर अशा विवस्वानाचें ध्यान करून १४ अभिन्नरूप मंत्रानें गंधादिकांच्या योगानें परिपूजन करावें. ह्याचा ऋषि काश्यप, छंद त्रिष्टुप् व देव शचीपति आहे १५. बाहेरच्या ईशानकोणामध्यें देवादिकांचें पूजन करावें. कोल्हाळे, वायवर्ण्याची फुलें किंवा मालतीचीं पुष्पें ह्यांच्या योगानें पूजन करावें १६. पीतवर्ण, भयकर, सुस्वरूप, उत्तम कमलावर बसलेली, द्विभुज व गुंजांच्या हारानें अत्यंत सुशोभित अशा चरकीचें वर्णन करावें १७ व ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें " पीतिन्यरूप० " ह्या मंत्रानें पूजन करावें. ह्या मंत्राचा ऋषि बलदेव, देवता गौरी व छंद अनुष्टुप् आहे. नवयौवनसंपन्न व रक्तवर्ण अशा विदारिकेचें ध्यान करावें व " पवित्रेण पुनीहि० " ह्या मंत्राने पूजन करावें १८, १९. ह्याचा ऋषि गर्ग ह्मणून सांगितलेला आहे; छंद त्रिष्टुप् आहे व देवता रुद्र ह्मणून सांगितलेली असून स्तुतीकडे विनियोग आहे २०. बैलावर बसलेल्या पापादि राक्षसीचें ध्यान करावें व " कयान० " ह्या मंत्रानें गंधादिकांनीं पूजन करावें २१. ह्याचा ऋषि सुवर्ण ह्मणून सांगितलेला आहे व छंद पंक्ति आहे. ह्याची देवता महादेव असून इष्टार्थामध्यें विनियोग केला आहे २२. असो. कुंड व वेदी ह्याच्यामध्यें शहाण्याने यथाविधि पर्वताच्या अग्रावरील मृत्तिका, हस्तिदंताचा भुसा २३, वारुळावरील,

चम्पकं चैव तथा उर्वारुकस्य च २५ पारिभद्रस्य पत्रैश्च परितः परिवेष्टनम् । पञ्चतुन्नस्य परितो मुखे कुर्यात्फणान्वितम् २६ श्रीफलं बीजपूरं च नालिकेरं च दाडिमम् । धात्रीजम्बुफलं चैव अन्यथा दोषमादिशेत् २७ पञ्चरत्नसुवर्णं च निक्षिपेद्वरुणं यजेत् । पञ्चोपचारैर्विधिवद्गन्ध-पुष्पादिभिर्यजेत् २८ उद्वर्तन इति मन्त्रेण वरुणं च पुनर्यजेत् । अस्य मन्त्रस्य च ऋषिर्विष्णु-श्छन्द उदाहृतम् २९ गायत्री देवता पाशी तस्य प्रीतये विनियोजयेत् । पञ्चमन्धान्निधिप्य हस्तं दत्त्वा पठेत्ततः १३० सर्वे समुद्राः सरितः सरांसि च महाह्रदाः । आयान्तु सर्वपापघ्नाः सर्वलोकसुखावहा. ३१ गङ्गाद्या. सरितः सर्वास्तीर्थानि जलदा नदाः । आयान्तु यजमानस्य दुरितक्षयकारकाः ३२ अघोराज्यष्टकृकृता वास्तोष्पतय इत्यपि । शतं वा चाष्टसयुक्तं सहस्रं वा विशेषतः ३३ शतार्धं वा हुनेद्विप्रस्तिलैर्वा तण्डुलैः सह । पालाशैर्वा पिप्पलैर्वोदुम्बरैर्वा समाचरेत् ३४ पयोदध्यादिभिर्वापि मध्वाज्यैर्वा विशिष्यते । अन्येषां च व्रतनैव एकैकामथवाहुतिम् ३५ अष्टाविंशतिभिश्चान्नैरष्टाष्टौ पञ्च पञ्च वा ३६ चरक्यादींश्चासनैश्च पिष्टकैर्वटकान्वा । रक्तपुष्पेण पत्रेण त्रिमधुक्तेन यत्नत. ३७ वास्तोष्पतिं दृढं जप्त्वा यजेद्वास्तुपतिं यदा । पञ्चोपचारैर्विधि-वत्साङ्गपाङ्गैरनन्तरम् ३८ बलिमासादयेत्पश्चाद्द्यादेकैकशः क्रमात् । ब्राह्मणैश्चैव दद्याच्च सदा आज्यं समाक्षिकम् ३९ शाल्यन्न शिखिने दद्यात्तथा नीलोत्पलानि च । ओदनं सोत्पलं दद्यात्पर्जन्याय विचक्षणः १४० जयाय पिष्टकं कार्यमिन्द्राय घृतमोदकम् । सूर्याय पिष्टकान्न च

संगमावरील, राजद्वारातील व चव्हाट्यावरील मृत्तिका, कुशाच्या मूळातील व तशीच यज्ञिय वनस्पतींच्या मूळातील मृत्तिका ठेवून इंद्रवल्ली, क्रांत, अमृत, त्रपुष, मालती, चंपक, वाळुक व निंब ह्यांच्या पत्रांनी चारी बाजूनी परिवेष्टन करावे. पंचनुंगाच्या मुखामध्ये चोहोंकडे फणाकृति करून श्रीफल, महाळुग, नारळ, डाळिंब, आवळा व जायफल हीं ठेवावीं. नाहींपेक्षा मोठा दोष सांगितलेला आहे २४–२७. पचरत्नें व सुवर्ण कलशात टाकून वरुणाची गंधपुष्पादि पंचोपचारांनीं यथाविधि पूजा करावी २८. " उद्वर्तन० " ह्या मंत्रानें वरुणाची पुनरपि पूजा करावी. ह्या मंत्राचा ऋषि विष्णु व छंद गायत्री सांगितलेला आहे. ह्याची देवता वरुण व तत्प्रीत्यर्थच विनियोग केला आहे. पाच गंध त्यामध्यें घालून व कलशावर हात ठेवून ' सर्वे समुद्रा० ' इत्यादि मंत्र ह्मणावे. (त्याचा अर्थः–) सर्व समुद्र, नद्या, सरोवरें व मोठे जलाशय येवोत. कारण, ते सर्व पापाचा नाश करणारे व सर्वलोकसुखावह आहेत २९–३१. यजमानाच्या पापाचा नाश करणाऱ्या गंगादि नद्या, सर्व तीर्थे, मेघ, नद येवोत ३२. नतर " अघोराज्यष्टकृकृता वास्तोष्पतय० " हा मंत्रही ह्मणावा. पुढें एकशें आठ किंवा विशेषतः सहस्र अथवा शतार्ध होम ब्राह्मणानें तिल किंवा तंडुल ह्या द्रव्यानें करावा. किंवा पलाशाच्या, पिंपळाच्या, किंवा उदुंबराच्या समिधानीं होम करावा ३३,३४ किंवा दूध, दहीं अथवा मध व आज्य ह्यांनीं होम करणें अधिक उत्तम होय किंवा दुसऱ्या देवतास एक एक आहुति व्रतपूर्वक द्यावी ३५. किंवा अठ्ठावीस अथवा आठआठ किंवा पाचपाच आहुतीच द्याव्या ३६. चरक्यादिकांस आसन, उंडे, वडे व मधामध्यें बुडविलेलीं लाल पुष्पें आणि पत्रें ह्यांच्या योगानें प्रयत्नपूर्वक संतुष्ट करावें ३७. नंतर 'वास्तोष्पते' ह्या मंत्राचा दृढ जप करून वास्तुपतीचें प्रथमतः पंचोपचारांनीं व पुढें सांगोपांग यथाविधि पूजन करावें ३८. नंतर ब्राह्मणाच्या हातून एकेकाकरिता क्रमानें बलि द्यावा. सर्वदां आज्यास मध द्यावा ३९. शिखीस उद्देशून शाल्यन्न व तशीच निळीं कमलें द्यावीं. ब्राह्मण्या पुरुषानें पर्जन्यास कमलासह भात द्यावा ४०. जयास पीठ द्यावें व इंद्रास

सत्याय यवपूलिकाम् ४१ भ्रमाय मत्स्यमांसान्न शष्कुलीमथ पिष्टकम् । वायव्ये च तथा सक्तुपूष्णे अपूपमेव च ४२ वितथाय कलव्यान्नं गृहक्षाय समाक्षिकम् । पूष्णेऽथ कृसरान्न च शाल्यन्न च निवेदयेत्४३ गन्धर्वाय कस्तूरिकान्नकृसर भृङ्गराजके । मृगाय यावकान्न च पितृभ्यो मुद्गपायसम् ४४ दौवारिकाय कृशरानदुह च पूपकम् । पायस पुष्पदन्ताय वरुणाय च पिष्टकम् ४५ असुराय मोदकांश्चैव दद्यादापिक्षये सुराम् । घृतौदन च सोमाय कणान्न यक्ष्मणे ददेत् ४६ रोगाय घृतलड्डुकसपायसगुडौदनम् । अक्षाय विविधान्न च भल्लाटाय तथैव च ४७ सोमाय मधुशाल्यन्न नागाय गुडपिष्टकम् । अदितये चापि गोधूम घृतपक्व निवेदयेत् ४८ दित्यै दद्यात्तथा क्षीर सितशर्करया सह । क्षीरान्न चैव पूष्णे च आपवत्साय वै दधि ४९ सावित्र्यै लड्डुकान्न च सावित्र च गुडौदनम् । जयाय घृतमन्न च मिष्टान्न च विवस्वते १५० विरूपाय च तद्वाढरिद्रान्न तथैव च । घृतौदन च चित्राय रुद्राय घृतपायसम् ५१ मांसौदन यक्ष्मणे च कृसर वरुणाय च । अर्यम्णे शर्करापूप बाह्यर्द्याचतुष्टयम् ५२ चित्रौदनं समांस च मत्स्यान्न गुडपिष्टकम् । सवितेऽपरि क्षीर घृतक्षीरसमन्वितम् ५३ तीर्थतोयसमायुक्त सुगन्धेन समन्वितम् । पताका देववर्णेन दद्यादब्रह्मादितिक्रमात् ५४ मन्त्र जपेत्स्वसामर्थ्यात्स्वसामर्थ्यस्तुतिं पठेत् । पुरुषस्तवस्य सूर्य ऋषिर्जगती छन्द सविता देवता सोमपाके स्तुतौ विनियोग ५५ शकर उवाच ,। विष्णुर्जिष्णुर्विभुर्यज्ञो यज्ञियो यज्ञपालकः । नारायणो नरो हंसो विष्वक्सेनो हुताशनः ५६ यज्ञशः पुण्डरीकाक्ष. कृष्ण सूर्यः सुरार्चितः । आदिदेवो जगत्कर्ता मण्डलेशो महीधरः ५७ पद्मनाभो हृषीकेशो दाता दामोदरो हरिः । विश्वकर्मा त्रिलोकेशो

तूप व मोदक द्यावे. सूर्यास पिठाचे अन्न द्यावें व सयास यवाची पोळी समर्पण करावी ४१. भ्रमास मत्स्य, मास व अन्न, कानवले व पीठ द्यावें. वायव्यास सक्तु व पूषास अपूप ४२, वितथास व कलास अन्न, गृहक्षास मधासह अन्न, पूषास खिचडी व शाल्यन्न निवेदन करावे. गधर्वास कस्तूरिकान्न, मृगराजास खिचडी, मृगास यवाचा भात, पितरास मुगाची क्षीर ४३,४४, दौवारिकास कृसरान्न, अनदुहास अपूप, पुष्पदन्तास पायस, वरुणास पिष्ट ४५, असुरास मोदक, आपिक्षास सुरा, सोमास घृतौदान व यक्षास कणान्न द्यावे. रोगास घृत, लाडु, पायसासह गुडौदन, अक्षास व त्याचप्रमाणे भल्लाटास विविध अन्न ४६,४७, सोमास मध व शाल्यन्न, नागास गूळ व पीठ व अदितीस तुपात तळलेला कणिकेचा पदार्थ निवेदन करावा ४८. दितीस शुभ्र शर्करेसह क्षीर, पूषास क्षीरान्न, आपवत्सास दही, सावित्रीस लाडूचे अन्न, सवित्यास गुळभात, जयास घृतपक्व अन्न, विवस्वानास मिठान्न ४९,५० व विरूपास हरिद्रान्न द्यावे. चित्रास घृतौदन, रुद्रास घृतपायस ५१, यक्ष्मास मासौदन, वरुणास कृसरान्न, अर्यमास शर्करायुक्त अपूप (चिरोटे वगैरे) व त्यावर चार दर्म द्यावे ५२ आणि मांसासह चित्रौदन व गूळ आणि पीठ यासह अन्न द्यावे. प्रत्येक देवावर क्षीर व घृतक्षीरासह सुगंधयुक्त तीर्थोदक घालावे. देवाचा जसा वर्ण असेल त्याचप्रमाणे ब्रह्मा, अदिति ह्या क्रमाने पताका उभ्या कराव्या ५३,५४. आपल्या सामर्थ्याप्रमाणे मत्राचा जप करावा व स्वसामर्थ्यानुरूप स्तुति करावी. पुरुषस्तवाचा ऋषि सूर्य, जगती छंद, सविता देवता व सोमपाकसमर्थी स्तुतीमध्ये विनियोग करावा ५५. शकर म्हणतात—तू विष्णु (व्यापी), जिष्णु (जयशील), विभु (प्रभु), यज्ञरूप, यज्ञसंबंधी, यज्ञाचा पालक, नारायण, नर, हसरूप, विष्वक्सेन, हुताशन (अग्निरूप) ५६, यज्ञाची अधिष्ठात्री देवता, पुंडरीकाक्ष, कृष्ण, सूर्य, सुरार्चित (देवाकडून पूजित), आदिदेव, जगत्कर्ता, मंडलाचा ईश्वर, महीधर ५७, पद्मनाभ, हृषीकेश, दाता,

ब्रह्मणः प्रीतिवर्द्धनः ५८ भक्तप्रियोऽच्युत सत्यः सत्यवाक्यो ध्रुवः शुचि । सन्यासी शास्त्रतत्त्वज्ञस्त्रिपञ्चाशद्गुणात्मक ५९ विदारी विनयः शान्तस्तपस्वी विद्युतप्रभः । यज्ञस्त्व हि वषट्कारस्त्वमोङ्कारस्त्वमग्नयः १६० त्वं स्वधा त्वं हि स्वाहा त्व स्वधा च पुरुषोत्तमः । नमो देवादिदेवाय विष्णव शाश्वताय च ६१ अनन्तायाप्रमेयाय नमस्ते गरुडध्वज । ब्रह्मस्तवमिद प्रोक्त महादेवेन भाषितम् ६२ प्रयत्नाद्यः पठेन्नित्यममृतत्व स गच्छति ६३ ध्यायन्ति ये नित्यमनन्तमच्युतं हृत्पद्ममध्ये स्वयमाव्यवस्थितम् । उपासकानां प्रभुमेकमीश्वर ते यान्ति सिद्ध परम तु वैष्णवम् १६४ [१८०९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभाग एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

सूत उवाच ॥ ततो नैर्ऋतिघोषेण यजमान उदङ्मुखः । कनकतीर्थेन गन्धेन मुद्गलाग्रेण लेपयत् १ ऐशान्यां मध्यभागे वा यजेद्वा सुसमाहितः । वतुलाकारयद्यस्मान्मन इच्छति सजपन २ ऋषिः कठोऽथ गायत्री छन्द इत्यभिधीयते । देवता पृथिवी चैव स्तुतौ च विनियोजयेत् ३ विवरे पूजयेत्कर्मब्रह्माणं च धराधरम् । पृथिवी गन्धपुष्पाद्यैर्नैवेद्यैर्वविधैरपि ४ अग्रतोऽष्टदल लेख्य स्थापयेत्कलश ततः । मुखे विधाय कनक राजतेन विनिर्मितम् ५ शुक्तिराङ्गसम वापि विश्वामित्रसमुद्भवम् । पूजयेत्तीर्थतोयेन गन्धपुष्पाक्षतादिना ६ विष्णुक्रान्तावचाकुप्रचन्दनेन विलोडितम् । क्षीर च मातुलिङ्ग च माविद्ध च सदूर्वया ७ दध्यक्षत मधुयुतमवमर्घ्य च सादयेत् । सितचन्दनवस्त्राद्यै शालपैश्च विविधैरपि ८

दामोदर, हरि, त्रिविक्रम, त्रिलोकेश, ब्रह्मदेवाच्या प्रीतीची वृद्धि करणारा ५८, भक्तप्रिय, अच्युत, सत्य, सत्यवाक्य, ध्रुव, शुचि, संन्यासी, शास्त्रांचे तत्त्व जाणणारा, त्रेपन्न गुणांनी युक्त ५९, दुष्टांचें विदारण करणारा, विनयरूप, शांत, तपस्वी व विद्युतप्रभ (विजेसारख्या तेजस्वी) आहेस. तू यज्ञ, तू वषट्कार, तूं ॐकार व तूच गार्हपत्यादि अग्नि आहेस ६०. तू स्वधा, तू स्वाहा व तू पुरुषोत्तम आहेस. देवाधिदेव, व्यापनशील, शाश्वत, अनंत व अप्रमेय अशा तुजला हे गरुडध्वजा, माझा नमस्कार असो. असो, महादेवाने सांगितलेली ही ब्रह्मस्तुति मी सांगितली ६१,६२ जो यत्नाने हिचा रोज पाठ करितो तो अमृतभावास प्राप्त होतो ६३. जे नित्य, अंतरहित, स्वरूपापासून च्युत न होणारा हृदय कमलामध्यें स्वत. व्यापून रहाणारा, उपासकांचा प्रभु व एक अशा ईश्वराचें ध्यान करितात ते सिद्ध असें जे विष्णूचे परम पद त्याप्रत जातात १६४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणांतील मध्यमपर्वाच्या द्वितीय भागाचा अकरावा अध्याय संपूर्ण झाला ॥ ११ ॥

सूत ह्मणतात--नगारा, नौबद इत्यादि वाद्यांच्या गजरांत यजमान उदङ्मुख होऊन ईशान्यदिशेमध्ये किंवा मध्यभागीं सुवर्ण घातलेल्या उदकानें व गंधानें मुद्गलाच्या टोंकानें वर्तुलाकार लेपन द्यावा व शांतपणें पूजा करावी. व "यद्यस्मान्मन इच्छति" ह्याचा जप करावा १,२. ह्या मंत्राचा ऋषि कठ व छंद गायत्री सांगितला जातो. त्याची देवता पृथ्वी असून स्तुतींमध्ये विनियोग आहे ३. विवरामध्ये कर्माचा ब्रह्मा, धराधर व पृथिवी ह्यांची गंध, पुष्पें इत्यादिकांनी व नानाप्रकारचे नैवेद्यही समर्पण करून पूजा करावी ४. त्याच्या पुढें अष्टदल कमल लिहावें. व नंतर रजताच्या कलशाची स्थापना करावी. त्याच्या मुखास सोने लाविलेलें असावें ५ किंवा तो कलश सागरापासून उत्पन्न झालेल्या शिंपेसारखा किंवा शंखासारिखा असावा. त्याची पूजा तीर्थोदकानें व गंध, पुष्प, अक्षता इत्यादिकांच्या योगानें करावी ६. विष्णुक्रांत वेखड, कुष्ठ व चंदन ह्यांनी मिश्रित, क्षीर, माहाळुंगीचें व रुईचें फूल, दूर्वा, दही, अक्षता व मध ह्यांनी युक्त असें अर्घ्य घालावें.

अव्रणं कलशं कृत्वा पञ्चवर्णसमन्वितम् । आवाहयेत्तोयनिधिं मन्त्रेणानेन भक्तितः ९ आयाहि भगवन्देव तोयमूर्ते जलेश्वर । ह्यर्घोऽयं मया दत्त परितोषायते नमः १० ग्रहेभ्यश्चैव सोमाय त्वष्ट्रे चैव च शूलिने । इम मे वरुणेत्यादि प्रत्येक स्याद्वृत्तित्रयम् ११ ततोऽर्घदान विधिवत्क्षीरेण हविषा मधु । यजमानः सपत्नीक कुम्भ कुक्षौ निधाय च १२ हिरण्यगर्भेति मन्त्रस्य भरद्वाज ऋषिः स्मृतः । छन्दश्च जगती ख्याता देवता च जलाधिपः १३ वरुणस्योत्तम्भनमिति मन्त्रेण जलकुम्भ निवेदयेत् । अस्य मन्त्रस्य च ऋषिर्नारदः परिकीर्तितः १४ विराट छन्दश्च ईशानो देवता समुदाहृता । मोचयेन्मीनयुग्मं च मेषयुग्मं तथैव च १५ सभवे पक्षियुग्मं च आडीवाचक्रवाककम् । मोचयेन्नागयुग्मं च आयुर्वृद्धिश्च हतवे १६ दिक्षु जीवन्तिकां दद्याद्राक्षसेभ्यो बलिं हरेत् । निर्मितं माषभक्तेन रक्तपुष्पैरलङ्कृतम् १७ क्षात्रको लक्ष्मणश्चैव मणिभद्रो गणेश्वरः । सविन्दुकेन हन्तेन दिक्षु मध्ये यथाक्रमात् १८ ये भवा भाविनो भूता ये च तेषु मयासिनः । आहरन्तु बलिं तुष्ट्या प्रयच्छन्तु शुभ मम १९ इत्युक्त्वा च बलिं दद्यान्नमस्कुर्यादनन्तरम् । दद्यात्पयस्विनीं गां च आचार्याय विशेषतः २० अन्येषां हि हिरण्य च गां च दद्याद्द्विजन्मन । व्याहृतित्रितय चैव ततो वारुणपञ्चकम् २१ प्राजापत्य स्विष्टकृच्च जुहुयात्तदनन्तरम् । घृतैः स्विष्टकृत नास्ति तथा रसविसारकैः २२ पद्मोत्पल मातुलिङ्ग पणसं मातुलुङ्गक । मधूकं बिल्वपुष्पं च आम्रातकं च काशके २३ अभिषेक तत. कुर्यात्सुवास्त्विति च वै जपन् । दद्यात्पूर्णां च विधिवत्सूर्यायार्घ्यं निवेदयेत् २४ पञ्चदीप पुरस्कृत्य ब्राह्मणानुमतेन च । गृह प्रविश्य

शुभ्र चदन, वस्त्रादिक व नानाप्रकारच धान्य ह्याच्या योगानें सुशोभित, व्रणरहित व पाच रंगानीं युक्त असा कलश करून ह्यापर्डील मत्रानें त्याचे ठायीं सागराचें भक्तीनें आव्हान करावें ७-९. हे तोयरूप जलेश्वरा, हे भगवन्, ये. हे श्रेष्ठा, मीं हे अर्घ्य तुझ्या सतोषाकरितां दिलें आहे. तुला माझा नमस्कार असो १०. ग्रहास, सोमास, त्वष्टयास व शूली जो शंकर त्यासही अर्घ्य द्यावें. "इम मे वरुण" इत्यादि सूक्ताच्या प्रत्येक मत्राची तीन वेळ आवृत्ति होते ११. तदनतर यजमान पत्नीसह कडेवर कुभ घेऊन यथाविधि क्षीरानें, हवीनें व मधानें अर्घ्यदान करितो १२. "हिरण्यगर्भ" ह्या मंत्राचा भरद्वाज ऋषि सागितलेला आहे, छद जगती होय व देवता जलाधिप आहे. "वरुणस्योत्त भ न" ह्या मत्रानें जलकुभाचें निवेदन करावें. ह्या मत्राचा ऋषि नारद सागितलेला आहे १३, १४, छद विराट व ईशान देवता सागितलेली आहे. आयुष्याची वृद्धि व्हावी ह्याणून मत्स्याचे जोडपें, मेषाचें जोडपें १५, शक्र अस्त्यास आडिव व चक्रवाक पक्ष्याचें जोडपें व अशीच आणखी नानाप्रकारची जोडपी सोडावी १६. दिशामध्ये जीवंतिका (गुळवेल) समर्पण करावी व राक्षसास उद्देशून माषाचा लाल पुष्पानीं सुशोभित केलेला बलि समर्पण करावा १७. दिशामध्यें क्रमानें क्षात्रक, लक्ष्मण, मणिभद्र, गणेश्वर, विदुक व हत हे क्रमानें आहेत १८. जे विद्यमान असणारे, पुढें होणारे व झालेले राक्षस असतील ते ह्या बलीस आनदानें नेवोत व मला शुभ देवोत १९. असें ह्याणून बलि द्यावा व नतर नमस्कार करावा. पुढें विशेषत. आचार्यास दुभती गाय द्यावी २०. दुसऱ्या ब्राह्मणास हिरण्य व गाय द्यावी. नतर तीन व्याहृतिहोम, पाच वरुणहोम, प्राजापत्यहोम व स्विष्टकृतहोम द्यावा. पण स्विष्टकृतहोम घृतानें किंवा ज्यातून रस निघतो अशा पदार्थानें करूं नये २१,२२. पद्म, उत्पल, महालुंग, फणस, ईड, ज्येष्टमध, बिल्वपुष्प, मोहा व मोळ ह्यांतील जो पदार्थ लभ्य असेल त्यानें होम करावा २३. नंतर "सुवास्तु" ह्या मंत्राचा जप करीत अभिषेक करावा. नंतर पूर्णाहुती द्यावी व यथाविधि सूर्यास अर्घ्य निवेदन करावें २४. पाच दीप पुढें घालून ब्राह्मणाच्या

च ततो ब्राह्मणानथ भोजयेत् २५ दीनान्धकृपणे चैव दद्याद्वित्तानुसारतः । ज्ञातिभिः सह भुञ्जीत दधिक्षीरामिषं विना २६ न क्षीरं च कषायं च भर्जितं शाकमेव च । न काण्डं च न पुष्पं च करीरं च कदाचन २७ शाल्यन्नं मूलकं चैव पनसाम्रफलानि च । मस्तं मधु घृतगुडं मातुलिङ्गं ससैन्धवम् २८ बदरं धातकिफलं कुन्दपुष्पं तथा तिलम् । एतत्प्रशस्तं जानीयान्मरीचानि विशेषतः २९ त्रिरात्रमथ सप्ताहं परित्यज्य खले ततः । पञ्चाङ्गकं ततः कुर्यात्स्थापयेन्नेति युग्मकम् ३० प्रथमा चाङ्गुलैस्तत्र द्वितीया दशहस्तकम् । वितस्ते तु भवच्छुद्धं द्विगुणं तदनन्तरम् ३१ शतार्धं च ततः पश्चात्षष्टिहस्तमनन्तरम् ३२ [१८४१] इति श्रीभविष्य महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागेऽर्घ्यदा० त्रयो द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

सूत उवाच ॥ स्वगृह्याग्निविधिं वक्ष्ये योगभेदेषु सत्तमाः । न पराक्त विधानेन भयदं कीर्तिध्वंसनम् १ पुत्रमेव च कन्याश्च जनित्र्याश्चापरं सुताः । गृह्या इति समाख्याता यजमानस्य दायदाः २ तेषां संस्कार्ययागेषु शान्तिकर्माक्रियासु च । आचार्यविहितः कल्पस्तस्माच्चक्ष इति स्मृतः ३ त्रिकुशं परिगृह्णाति ततश्च कुरुते दृढम् । ऋषिर्दक्षश्च जगती छन्दो विष्णुश्च देवता ४ कश्यपस्तृप्यतामिति भूरसीति च शोधनम् । ऋषिः सुवर्णगायत्री जगती छन्द इष्यते ५ देवता च भवेत्सूर्यः पृथिवीशोधने न्यसेत् । ऐशान्यादिक्रमेणैव प्रादक्षिण्येन यत्नतः ६ यत्पवित्रेति मन्त्रेण तर्जन्यङ्गुष्ठयोरपि । कुशगर्भत्रयेणापि आमयेद्वलयाकृति ७ परिसमूहनमित्युक्त स्नपनं शृणु सत्तमाः । ईशानादींश्च संस्कार कुर्यात्परिसमूहनम् ८ प्रतिष्ठायां चरत्यादिनैऋत्यादिग्रहं

अनुमतीने गृहात प्रवेश करून त्यानंतर ब्राह्मणास भोजन घालावें २५. दीन, अंध, दरिद्री ह्यास आपल्या शक्तीप्रमाणे द्रव्य द्यावें. ज्ञातीतील लोकासह दही, क्षीर व मास हे पदार्थ सोडून भोजन करावे २६. क्षीर, तुरट पदार्थ, भाजलेली शाक, करीकांड व पुष्प हे पदार्थ कधींहि खाऊ नयेत २७. शालीचा भात, मुळा, फणस, आम्रफल, मस्त, मद, घृत, गुड, महालुंग, सैंधव २८, बोर, आवळा, कुंदपुष्प व तीळ हे पदार्थ व विशेषतः मिऱ्ये प्रशस्त आहेत २९. ह्यास्तव, हे पदार्थ तीन दिवस किंवा सात दिवस वर्ज्य करावे. नंतर खळ्यात, पंचांग करावें व तेथे नेमियुग्म काढावे ३०. त्यातील पहिली नेमि बारा हात व दुसरी दहा हात असावी. विस्तारात प्रथम शंभर व नंतर दोनशें ३१ किंवा प्रथम पन्नास व नंतर साठ हात प्रमाण धरावे ३२. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील द्वितीयभागाचा अर्घ्यदानविधीविषयी बारावा अध्याय समाप्त झाला ॥१२॥

सूत हणतात —हे उत्तम ब्राह्मणहो, विधानाने दुसऱ्याने न सांगितलेला पण न केल्यास भय देणारा व कीर्तीचा ध्वंस करणारा योगभेदातील आपल्या गृह्याग्नीचा विधि सांगतो. पुत्र, कन्या, व जननीचे दुसरे पुत्र हे यजमानाचे दायद असल्यामुळे गृह्य ह्यणून ह्यटलेले आहेत १, २. त्याच्या संस्कार्ययागामध्ये, शांतिकर्म व इतर क्रिया ह्यामध्ये आचार्याने केलेला जो कल्प त्यास चक्ष ह्यणून ह्यटलें आहे ३. प्रथमत तीन कुश घेऊन तदनंतर त्यास दृढ करावें. त्याचा ऋषि दक्ष, जगती छंद व विष्णु देवता आहे ४. " कश्यपस्तृप्यता " ह्या व " भूरसि " ह्या मंत्राने शोधन करावें. ह्या मंत्राचा ऋषि सुवर्ण, छंद गायत्री व जगती ५, देवता सूर्य व पृथिवीशोधनाकडे विनियोग केला आहे. ऐशान्यादिक्रमाने " यत्पवित्र० " ह्या मंत्रानें तर्जनी व अंगुष्ठ ह्यामध्ये तीन कुशगर्भ धरून उजवीकडे वर्तुलाकृति फिरवावे ६, ७. आता परिसमूहन असे ज्यास ह्यणतात तो हे उत्तमहो, स्नपनविधि ऐका. ईशानादि दिशाचा संस्कार करावा. हेच परिसमूहन होय ८. ' प्रतिष्ठाया चर ' इत्यादि व " नैऋत्यादि ग्रह " इत्यादि मंत्रानीं यज्ञामध्ये जिचा अविर्भाव इंद्र

मन्त्रे । परिसमूहनमैन्द्रस्य पर्वतोऽस्य ऋषिः स्मृतः ९ पङ्क्तिश्छन्दः समुद्दिष्टमिन्द्राणी चाथ देवता । गोमय च त्रिगन्ध च पञ्चमृत्तिकयाऽपि च १० कनिष्ठं गुल्फकं त्यक्त्वा देवतीर्थेन लेपयेत् । मानस्तोकेनेति ऋचा विश्वेदेवश्च पूज्यताम् ११ ऋषि स्यात्काश्यपश्छन्दो विश्वेदेवः प्रकीर्तितः । योजयेल्लेपयेद्विद्वान्घटमावद्य सत्तमाः १२ मध्यमातर्जनीभ्यां च कुशमारभ्य दक्षिणम् । चतुरस्रीकृतं क्षेत्रं हस्तमानं तथाननम् १३ यज्ञवभिरिति मन्त्रेण सूर्यः प्रीणाति सत्तमाः । दक्षे माधाङ्गुलं त्यक्त्वा पश्चिमेन परित्यजेत् १४ उत्तराग्रां लिखेद्रेखामन्यथाऽमङ्गलं भवेत् । आप्यायस्वेति मन्त्रस्य धन्वन्तरी ऋषिः स्मृतः १५ त्रिष्टुप्छन्द. समाख्यातः सविता चात्र देवता । सव्यं दक्षिणं चैक पूर्वार्द्धाद्द्वादशाङ्गुलम् १६ अन्याङ्गुलान्तर चैकं ततः समाङ्गुल भवेत् । कुशमूलेन स्वर्णेन प्रतिष्ठायां च राजते १७ अङ्गुष्ठानामिकाभ्यां च संज्योतीति च संजपन् । सस्मरेन्मित्रावरुणौ ऋषिर्गौतथ्यसञ्ज्ञकः १८ पङ्क्तिश्छन्दः शिवो देवो रेखामथ च योजयेत् । तेनैवोर्ध्वकरौ कुर्याद्दक्षवामे सकृत्सकृत् १९ भास्वराय क्षितिपदग्नौ तत ऊर्ध्वं रण स्मृतम् । सदसपतिऋषिः कर्णो विराडिति उदाहृतः २० छन्द इन्द्रो देवता च पृथिव्या देवता भवेत् । कुशपुष्पोदकेनापि देवतीर्थेन सत्तमाः २१ पञ्चगव्येन मतिमान्पञ्चरत्नोदकेन च । पञ्चपल्लवतोयेन महायोगे विशेषतः २२ अयोनस्य च मन्त्रेण वसिष्ठ परिकीर्तित । छन्दोऽथ देवी गायत्री देवता गणनायक. २३ कीशादग्निं समादाय मे गृह्णामीति सपठन् । मे गृह्णामीति मन्त्रस्य ऋषिर्गौतम ईरितः २४ छन्दोऽनुष्टुप्समाख्यातं वामदेवोऽथ देवता । क्रव्यादग्निं परित्यज्य क्रव्यादमग्निमी-

---

आहे अशा पूर्वदिशेस परिसमूहन करावें. ह्या मत्राचा ऋषि पर्वत सांगितलेला आहे ९, छंद पंक्ति ह्मणून झटलें आहे व इद्राणी देवता आहे. गोमय, त्रिगध व पंचमृत्तिका ह्यान्या योगानें करागुली व आगठा हीं बोट सोडून देवतीर्थानें (बोटान्या अग्रानीं) भूमी सारवावी. " मानस्तोके० " ह्या मत्राने विश्वेदेवाचे पूजन करावें १०, ११. ह्याचा ऋषि कश्यप, छंद त्रिष्टुप् व देवता विश्वेदेव सांगितलेली आहे. हे श्रेष्ठहो, विद्वानानें दोषरहित घटाची योजना करावी व त्याम लेप द्यावा १२. मधले बोट व आगठ्याजवळचें बोट ह्यामध्ये दर्भ धरून दक्षिणेकडून आरंभ करावा व हस्तप्रमाणाचें चौकोनी क्षेत्र करावें१३. हे उत्तम ब्राह्मणहो, " यज्ञवभिः " ह्या मंत्रानें ही क्रिया करावी. ह्मणजे सूर्य प्रसन्न होतो. दक्षिणेकडे दोंड अंगुल वर्तितकेच पश्चिमेकडे अंतर सोडून १४ उत्तरेकडे जिचें अग्र आहे अशी रेषा काढावी. असें न केल्यास अमंगल होतें. " आप्यायस्व० " ह्या मत्राचा ऋषि धन्वतरि सांगितलेला आहे, त्रिष्टुप् छंद व सविता देवता आहे. पूर्वोक्त रेषेचें एक टोक दक्षिणदिशेमध्यें संलग्न झालेलें असून तिचा पूर्वार्ध बारा अगुले असावा १५,१६. नंतर आणखी एक अगुल अंतर सोडून त्यापुढे सात अंगुल प्रमाणाची रेषा असावी. व ती कुशाचें मूल किंवा सुवर्णाची कार्डी, आगठा व अनामिका ह्यामध्ये धरून काढलेली असावी. ह्मणजे ती प्रतिष्ठाकर्मामध्यें अतिशय शोभते १७. रेषा काढताना " सज्योति० " हा मत्र ह्मणत मित्रावरुणाचें स्मरण करावे. प्रस्तुत मंत्राचा ऋषि औतथ्यनामक १८, छंद पंक्ति, शिव देव व रेषा काढण्यामध्यें विनियोग केला आहे. त्याच मंत्रान्या योगानें उजवा व डावा हात एकेकदा वर करावा १९. भास्वरास अग्नीमध्यें टाकावें. नंतर ऊर्ध्वरण सांगितलेलें आहे. " सदसपत्० " ह्या मंत्राचा ऋषि कर्ण, विराट् छंद, इंद्र व पृथ्वी देवता आहे. कुशोदक व पुष्पोदक, पंचगव्य, पंचरत्नोदक व पचपल्लवोदक यान्या योगाने देवतीर्थानें बुद्धिमानानें विशेषतः महायोगावर " अयोनस्य " ह्या मत्राने मार्जन करावें. ह्या मंत्राचा ऋषि वसिष्ठ सांगितला आहे, देवी गायत्री छंद आहे व गणनायक ही देवता आहे २०-२३. " मे गृह्णामि " ह्या मंत्राने स्थानातून

रयन् ३५ मन्त्रेणानेन मतिमान्दक्षिणस्यां विनिक्षिपेत् । अस्य मन्त्रस्य हारीत ऋषिः स्याच्छन्द इष्यते २६ देवता वामदेवोऽपि दाहेऽपि विनियोजयेत् । आवाहनं ततः कुर्यात्ससरक्षेति संजपन् २७ संसरक्षेति मन्त्रस्य ऋषिर्नील उदाहृत । विराट् छन्दोऽथ विज्ञेयो देवता च शतक्रतु २८ वैश्वानर इति ऋचा अग्निस्थापनमीरितम् । मन्त्रमाचार्ति प्रीणाति ऋषिः स्यात्काश्यप स्मृतः २९ अनुष्टुप्च भवेच्छन्दो देवता हव्यवाहन । वह्नासीति च मन्त्रेण अग्निं कुर्यात्प्रदक्षिणम् ३० ऋषिः स्वयम्भूराख्यातो विराट् छन्द उदाहृतम् । देवता परमात्मा च नमस्कारेण योजयेत् ३१ ततोऽग्नि दक्षिणे भागे प्रागग्रकुशकुञ्जके । द्विहस्ते भवतश्चैव हस्तपानासने अथ ३२ ब्रह्मान्नेहीपवेश्यतामिति ब्रह्माणं विनिवेशयेत् । ब्रह्मयज्ञानृचा दोग्ध्री धेनुरिति त्वृचः ३३ द्वाभ्यामित च मन्त्राभ्यामिति ब्रह्मप्रवेशनम् । शक्रोऽस्य त्रायतामिति शृणु ऋचां ऋषी द्विजाः ३४ प्रजापतिर्ऋषिश्छन्दस्त्रिष्टुब्देवोऽथ शक्रः । नारदश्च ऋषिश्छन्दस्त्रिष्टुब्देवः शचीपतिः ३५ अग्नेरुत्तरभागे च हस्तमात्रान्तरेऽपि च । प्रणीतास्थापन कुर्यादिन एहीति संजपन् ३६ मन्त्रस्य च ऋषिश्छन्दो वामदेवः प्रकीर्तितः । जगती च भवच्छन्दा देवता च शतक्रतुः ३७ श्रीपर्णीसहकारोत्थ वरुणस्य विशेषतः । षडङ्गुले च विस्तारं विंशत्यङ्गुलकेन च ३८ दैर्घ्येण च चतुः रुयातमङ्गुलं च प्रमाणतः । द्व्यङ्गुले चरकाकारायामासन्दवकर्मणि ३९ अभिचारे भवेत्काश्य ताम्र स्याच्छान्तिकर्माणि । प्रतिष्ठार्या मृन्मय च अष्टाङ्गुलमथापिवा ४० द्वादशाङ्गुलप्रस्तार तैजसे मानवर्जितम् । इमं मे वरुणनर्चा प्रणीतामथ पूरयेत् ४१ सागरा अथ शीयन्तामित्यमाध्यानमाचरेत् । सकृदच्छिन्नदर्भेण दिग्वि-

---

अग्नि घ्यावा. ह्या मत्राचा ऋषि गौतम सांगितलेला आहे २४, छंद अनुष्टुप् सांगितलेला आहे व वामदेव देवता आहे. क्रव्यादग्नीचा त्याग करून त्यास "क्रव्यादमग्नि० " इत्यादि मंत्रानें बुद्धिमानानें दक्षिणदिशेमध्ये टाकावे. ह्या मंत्राचा हारीत हा ऋषि व गायत्री छंद, देवता वामदेव व दहन करण्यामध्ये विनियोग आहे. नंतर 'संसरक्षन् ' हा मत्र ह्मणून अग्नीचे आवाहन करावे २५—२७. " संसरक्षन् " या मंत्राचा ऋषि नील ह्मणून ह्मटले आहे, विराट् छंद आहे व देवता इंद्र होय २८. "वैश्वानर" ह्या ऋचेनें अग्निस्थापन सांगितलेले आहे. ह्या मंत्राचा ऋषि काश्यप, छंद अनुष्टुप् व देवता हव्यवाहन (अग्नि) आहे. " वह्नासी० " ह्या मत्रानें अग्नीस प्रदक्षिणा करावी २९,३०. ह्या मत्राचा ऋषि स्वयंभू, छंद विराट्, देवता परमात्मा व नमस्कारामध्ये विनियोग आहे ३१.तदनतर अग्नीच्या दक्षिणभागी दोन हात अंतरावर पानावरील पूर्वेकडे ज्याची अग्र आहेत अशा कुशावर ' हे ब्रह्मन्, येथे बसावें ' असे ह्मणून ब्रह्मयास बसवावें. "ब्रह्मयज्ञा० दोग्ध्री धेनु०" ह्या ऋचा व " द्वाभ्या " आणि " शक्रोऽस्य त्राय० " ह्या दोन मंत्रानीं ब्रह्मप्रवेशन करावे. हे द्विजहो, आता त्याचा ऋषि ऐका ३२-३४. प्रजापति ऋषि, त्रिष्टुप् छंद, देवता शंकर, ऋषि नारद, छंद त्रिष्टुप् व देवता शचीपति होय ३५. " दिन एहि० " इत्यादि जप करीत अग्नीच्या उत्तरभागी दोन हात अतरावर प्रणीतापात्राची स्थापना करावी ३६. प्रस्तुत मंत्राचा ऋषि वामदेव, छंद जगती व देवता इंद्र आहे. हें प्रणीतापात्र विशेषत वरुणदेवतासंबंधी कर्मात शिरवणी व अतिसुगंधी आम्र यांच्या लाकडाचे असावे. तें सहा अंगुले विस्तृत, बारा अंगुलें उंच व चार अंगुल प्रमाण दीर्घ असावें असें सांगितलें आहें. देवकर्मामध्ये दोन अंगुलें लाब चरकाकृतीचें पात्र असावे. हें प्रणीतापात्र अभिचारकर्मामध्ये काशाचें, शातिकर्मामध्ये ताम्र्याचे व प्रतिष्ठाकर्मामध्ये मातीचे करावे. त्याचा विस्तार आठ अंगुले किंवा बारा अंगुलेही असावा. पण ते धातूचें असल्यास प्रमाणरहित असलें तरी चालेल. " इम

दिक्षु परिस्तरेत् ४२ नैर्ऋते दिक्षु सीतः स्याद्वैश्वदेव तथैव च । कयानश्चित्र इत्यृचा नाग. प्रीणाति सत्तमाः ४३ अस्य मन्त्रस्य च ऋषिर्भरद्वाज उदाहृतः । छन्दोऽनुष्टुब्देवता च ईशान परिकीर्तित ४४ प्रयोजनादिकं द्रव्य तत आसादयेत्क्रमात् । दक्षिणादि उत्तरान्त ध्रुवास इत्यृचापि च ४५ ऋषिः स्यान्नारदश्छन्दोऽनुष्टुप्चैवाथ देवता । शतक्रतुश्च प्रीणाति योजयेदथ सादरात् ४६ काष्ठं च पश्चिमे कुर्यात्पयश्छन्यश्चिमेन तु । पुरतोऽन्नं पञ्चधान्यतिलाश्च शरसर्षपाः ४७ दक्षिणे चैव आपूप भृङ्गराज तथैव च । फलपत्रं वामभागे पिष्टक दधि दुग्धकम् ४८ पनस नारिकेल च मोदक लड्डुकं तथा । प्रणीतां च दिग्विदिक्षु स्थापयेदविचारयन् ४९ प्रणीतानम्पृशेद्यातु होमकाले कथञ्चन । स्नानकुम्भ च भो विप्रा यावद्याग प्रवर्तते ५० उदुम्बर मातुलिङ्ग दूर्वा-धात्रीफलानि च । तुलसीमालतीजातीजलजानि विशेषत ५१ ऐशान्यां स्थापयेत्सर्व यच्च वै कङ्कतीमयम् । नैर्ऋत्येति विशेषोऽय यच्च वै कङ्कती शमी ५२ यथा योगेन तत्सर्व ग्राह्य तत्पत्रमेव च । क्षीरपाके तु क्षीरान्ते चरुस्थालीमथानयेत् ५३ पवित्रच्छेदनकुशैश्छिन्द्यात्प्रादेशिक पुनः । छित्त्वा पवित्र प्रोक्षण्यां स्थापयेद्बुलभिदाऽग्रकम् ५४ विष्णोरराटमन्त्रेण छेदयेदयमाणतः । पायसेन काठिनेन प्रमथ्नीयात्कदाचन ५५ न नखेन न कार्ष्णेन न दृढेन कदाचन । ताम्रेण भस्मना चाथ शुक्तिशङ्खेन वाग्यतः ५६ छेदयेत्पिञ्जुलीं चापि पवित्रमध्य दैशिकः । विष्णोरराटमन्त्रस्य हारीतश्च ऋषिः स्मृतः ५७ पङ्क्तिश्छन्दो भवेद्देव. सम्कारे विनियोजयेत् । प्रणीता-

---

मे वरुण०" या ऋचेनें प्रणीतापात्र पाण्यानें भरावें ३७–४१. " सागरा. प्रीयन्ताम्० " असें ह्मणून ध्यान करावें. सकुदच्छिन्न दर्भानें दिशा व विदिशा यामध्यें परिस्तरणें घालावी ४२. या कर्मांत व त्याचप्रमाणें वैश्वदेवकर्मामध्यें नैर्ऋत्यदिशेपासून आरंभ करावा हें उत्तम. ब्राह्मणहो, " कयानश्चित्र० " या मंत्रानें नाग संतुष्ट होतो ४३. या मंत्राचा ऋषि भरद्वाज सांगितलेला आहे; छन्द अनुष्टुप् व देवता ईशान हाय. याचा विनियोग द्रव्याकडे केला आहे. नंतर क्रमानें दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत " ध्रुवास " या मंत्रानें पात्रासादन करावें ४४,४५ याचा ऋषि नारद, छंद अनुष्टुप्, देवता शतक्रतु व त्याच्या प्रीत्यर्थच सादर विनियोग करावा ४६. काष्ठ पश्चिमेस ठेवावें. व पश्चिमकडूनच ठेवीत त्याच्या पुढे अन्न, पांच प्रकारचें धान्य, तिल व मोहऱ्या ४७, दक्षिणेस आपूप व भृंगराज ठेवावें. डाव्या बाजूस फलें, पुष्प, पीठ, दही, दूध ४८. फणस, नारळ, मोदक व लाडु ठेवावा. कांहीं एक विचार न करितां प्रणीतापात्र दिशा व विदिशा यामध्यें ठेवावें. होममध्यें प्रणीतापात्राला कधींही स्पर्श करूं नये. त्याचप्रमाणें, हे ब्राह्मणहो, जोपर्यंत यज्ञ चालला आहे तोपर्यंत स्नानकुंभासहि स्पर्श करूं नये ४९,५०. उंबर, महालुंग, दूर्वा, आवळे, तुळसी, मोगरीचीं व जाईचीं फुलें आणि विशेषत. उदकात झालेलीं फुलें व जेवढें ह्मणून ककतीपासून होणारे पदार्थ आहेत ते सर्व ईशान्यदिशेत ठेवावे. त्यात विशेष इतकाच की कंकती व शमी नैर्ऋत्येस असावा. या सांगितलेल्या पदार्थांतील यथासंभव त्या त्या पदार्थाची पर्णादिक घ्यावीं. क्षीरपाक करावयाचा असल्यास क्षीराच्या पुढे स्थाली ठेवावी. पवित्रच्छेदन करावयाच्या दर्भांनी टीचभर दर्भ तोडावे व ते पवित्र प्रोक्षणीमध्ये टाकून पूर्वेस नेऊन ठेवावे ५१–५४. "विष्णोरराट०" या मंत्रानें प्रमाणाक्षरून दर्भ तोडावे. पण लोखंडादि कठिण धातूंनीं कधीही तोडूं नयेत. नखानें किंवा सुरीसारख्या पोलादी शस्त्रानेंही कधीं तोडूं नयेत; तर ताम्याच्या पात्राच्या कांठानें किंवा भस्म (कोळसा), शिप अगर शख यांच्या योगाने वाणीचे नियमन करून दर्भाच्या पिजुळ्या तोडाव्या व त्याचें पवित्र आचार्यानें करावें. "विष्णोरराट" या मंत्राचा हारीत ऋषि सांगितलेला आहे ५५-५७. पांक्त छंद, शंकर देव व

भाजनं गृह्य प्रोक्षणीं पूरयेत्त्रिभिः ५८ कायतीर्थेन तत्कुर्यादेवतीर्थेन चेत्यपि । वामहस्ततले पश्चात्स्थापयेत्प्रोक्षणीयकम् ५९ मध्यमामध्यमाङ्गुष्ठ अपामार्गेण मन्त्रिभिः । उत्तानं तत्पवित्रं च पवित्रे तेति संजपन् ६० ऋषि स्याद्गौतमश्छन्दो धर्मराजोऽथ देवता । अथ स्थापितद्रव्याणि प्रोक्षयेत्स्थापयेत्क्रमात् ६१ सकृदुक्षे त्रिभिः काष्ठैस्त्रिवार मन्त्रपुष्पकैः । शिरस्थाने तु संप्राप्तप्रणीतायाश्च दक्षिणे ६२ प्रादेशान्तरतश्चैव आज्यस्थालीमथार्पयेत् । अग्रतो मण्डलं कृत्वा बह्निविप्रे तु स्थापयेत् ६३ घृत निःसारयेत्तत्तन्निरूप्याथ क्रमेण तु । ईशानेति च मन्त्रेण अधिश्रपणमीरितम् ६४ ऋषिर्नारायणश्छन्द पङ्क्तिरीशोऽथ देवता । पर्याग्निकरण कुर्यादवरादुदयमग्रथ ६५ अवेक्ष्य ईशमारभ्य दक्षिणावर्तकेन तु । कुलायनीति मन्त्रेण ऋषिश्छन्दादिकं स्मरन् ६६ परिवेष्याज्यस्थालीं च त्रिः सकृद्वा समाहितः । पितरस्तृप्यन्तामिति सस्कारे मातर स्मृता ६७ ऋषिः स्याज्जमदग्निश्च गायत्री छन्द ईरयन् । देवता च पिनाकी स्यादग्निष्टोमे च योजयत् ६८ घृतस्य च तथा त्व नो ब्रह्मा वै तृप्यतामिति । षडङ्गुलं स्रुव पश्चादगृह्णीत्वाऽग्नौ प्रतप्य च ६९ त्रिरात्र तु महायोगे सकृदन्यत्र सत्तमाः । समार्जयेत्कुशैर्मापि मूलाद्यं तु सेचयेत् ७० अग्रान्मूल पुन. कुर्यात्समपूज्य च पुनःपुन. । भिभिस्त्रिभिः प्रणीतोदक्प्राक्षयेत्तदनन्तरम् ७१ स्रुव पुन. प्रतप्याथ प्रोक्षण्युत्तरतो न्यसेत् । आज्यपात्र पुरस्कृत्य पवित्र च समाहरेत् ७२ अङ्गुष्ठ द्वे अनामे तु गृह्णीयात्तत्पवित्रकम् । अष्टाङ्गुल मध्य-

---

सस्कारामध्ये विनियोग आहे. प्रणीतापात्र घेऊन तीन वेळ पाणी घालून प्रोक्षणी भरावी ५८. हे कृत्य ब्राह्मतीर्थाने किंवा देवतीर्थाने करावे. नतर प्रोक्षणीस डाव्या तळहातावर मधले बोट, आगठ्याजवळचे बोट व आगठा यानी धरून ' अपामार्गेण " या मंत्रानी ठेवावे " पवित्रे ते " हा मंत्र म्हणत ते पवित्र उताण करावे ५९,६०. या मंत्राचा ऋषि गौतम व धर्मराज देवता आहे. नंतर स्थापित द्रव्याचे प्रोक्षण करावे व त्यास क्रमपर्वक ठेवावे ६१. द्रव्याचे प्रोक्षण एकदाच करावे. व तीन काष्ठानी व तीन वेळ मत्रपुष्पानी पुन त्यास शुद्ध करावे. नंतर पूर्वीच ठेविलेल्या प्रणीतेच्या दक्षिणेस सम जागी टीचभर अतर सोडून आज्यस्थाली ठेवावी. व अग्रभागी मडल करून वह्निविप्रावर तिची स्थापना करावी ६२,६३. पुढे लागलेच ते ते निरूपण करून घृत एकीकडे करावे. नतर " ईशान " या मत्राने अग्नीवर पाक करावा असे सागितले आहे ६४. या मत्राचा ऋषि नारायण, छंद पंक्ति व ईश देवता आहे. नतर दोन वेळ आदराने पर्याग्निकरण करावे ६५. तदनंतर ते पाहून ईशान्यकोणापासून दक्षिणावर्तक्रमाने " कुलायनी० " या मत्राने त्याचा ऋषि, छंद इत्यादिकाचे स्मरण करीत ६६ आज्यस्थालीस तीन वेळ किंवा एक वेळ शातपणे परिवेषण करीत " पितरस्तृप्यन्ताम् " असे म्हणावे. सस्कारकर्मामध्ये पितर या शब्दाच्या जागी मातरः हा शब्द योजावा ६७. याचा ऋषि जमदग्नि, छंद गायत्री, देवता पिनाकी व अग्निष्टोमामध्ये विनियोग आहे. घृतस्य०, त्व नो० व ब्रह्मा वै तृप्यताम्० हे मत्री म्हणावे. नतर सहा अगुलप्रमाणाची स्रुवा घेऊन ती अग्नीमध्ये तापवावी ६८,६९. तीन दिवस चालणारा महायाग असल्यास हा सस्कार एकदाच करावा. षण तसा प्रकार नसल्यास हे सज्जनहो, कुशाने ती स्रुवा मूलापासून अग्रापर्यंत झाडावी व तिच्यावर सेक करावा ७०; व वारंवार तिचा सत्कार करून अग्रापासून मूलापर्यंत पुन. तिला झाडावे.नंतर तीन तीन वेळ प्रणीतेतील उदकाने प्रोक्षण करावे ७१. व पुन. एकदा स्रुवेस तापवून प्रोक्षणीच्या उत्तरेस ठेवावे. आज्यपात्र आपल्या पुढे घ्यावे. त्याच्यावर पूर्वी केलेले पवित्र आणून ठेवावे ७२ व दोन्ही हाताने दोन आगठे व अनामिका यात ये ते पवित्र धरून आठ अंगुळे मध्यभागी वाकवून तीन

क्रुत्वो घृतं त्रिः पवनं चरेत् ७३ पाताले त्रिस्तथाकाशे अवेक्ष्याज्यं ततस्त्रिभिः । प्रोक्षण्यां च तथा कुर्यादधः संप्रोक्ष्य देशिकः ७४ ततः पायसमादाय उत्थाय च समन्त्रकम् । तूष्णीं दद्यात्तथा चाग्नौ सन्निवेशेन तत्ततः ७५ सपवित्रं दक्षकरे गृहीत्वा प्रोक्षणीयकम् । अष्टाङ्गुल मूलभागे तज्जलेन ईशादितः ७६ अग्निं पर्युक्ष्य तत्पश्चादक्षिणावर्तकेन च । पवित्रं च प्रणीतायां विधाय प्रोक्षणीयकम् ७७ संयावार्थं च भा विप्रा अग्नेवत्तव देशिकः । ध्यायेदग्निं रक्तवर्णं स्रुवहस्तं त्रिबाहुकम् ७८ कमण्डलुं परं हस्ते ततो दक्षकरेण तु । स्रुवं गृहीत्वा जुहुयात्तूष्णीमेव समाहितः ७९ अन्तं च देवतादेश प्राजापत्य समीरयन् । प्रणवान्तेन जुहुयात्सर्वत्र द्विजसत्तमाः ८० वायुकोणं समारभ्य वह्निकोणान्तकेन तु । अच्छिन्नायां घृतेनैव इन्द्राय तदनन्तरम् ८१ अग्नीषोमात्मकं चैव जुहुयाद्राक्षसादितः । ऐशान्यां कोणपर्यन्तं ततो नैमित्तिकं चरेत् ८२ पश्चात्स्विष्टं ततो दद्याद्घाच मतिभिस्तथा । वारुण पञ्चकं चैव क्रुत्वा पूर्णा ततो लभेत् ८३ उद्वाह इति मन्त्रस्य अथर्वण ऋषिः स्मृतः । छन्दो देवी च गायत्री देवता चापि वारुणम् ८४ प्रकृते योजयेन्मन्त्री स्तुतौ चापि नियोजयेत् । त्वन्नोऽग्न इति मन्त्रस्य ऋषिर्वासिष्ठसञ्ज्ञकः ८५ छन्दश्च बृहती ख्यातं देवताऽग्निः प्रकीर्तितः । इडा गतमिति मन्त्रस्य ऋषिः कौगुह्यसञ्ज्ञकः ८६ छन्दश्च जगती ख्याता देवो विष्णुः प्रकीर्तितः । उद्वर्तन इति मन्त्रस्य ऋषिः कानुः प्रकीर्तितः ८७ छन्दो देवी च गायत्री वरुणश्चाधिदेवता ८८ [१९-९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे चतुर्दशोऽध्यायः ॥ १३ ॥

सूत उवाच॥ सर्वत्र मखब्रह्माणमृत्विजं वरयेदथ । कुशण्डिकां स्वगृह्येन क्रुत्वाऽग्निं चार्चयेत्ततः१

वेळ घृतास पवित्र करावे७३.म्हणजे तीन वेळ घृतामध्ये ते वर उचलून घृत पहावें. स्वाली प्रोक्षण करून आचार्यानें प्रोक्षणीतील उदकही असेंच पवित्र करावे ७४.तदनंतर मंत्र म्हणत उठून पायस घ्यावे व ते मंत्र न म्हणता ठेवावे. नंतर पवित्रकासह तेथून उचलून दक्षिण हातावर प्रोक्षणी घ्यावी व अष्टांगुल मूलभागी त्यातील जलानें ईशान्यादिक्रमानें दक्षिणावर्त अग्निपर्युक्षण करावे. पवित्रक प्रणीतेमध्ये ठेवावे व संयावार्थ, अग्निप्रमाणेच हे विप्रहो, आचार्यानें प्रोक्षणीसही तिन्ही स्थानीं ठेवावे. नंतर रक्तवर्ण, ज्याच्या हातात स्रुवा आहे, ज्यास तीन बाहु आहेत ७९-७८ व ज्याच्या दुसऱ्या हातात कमडलु आहे अशा अग्नीचें ध्यान करावे. तदनंतर उजव्या हातात स्रुवा घेऊन मुकाट्यानेंच व शांतपणे हवन करावे ७९. पण मनामध्यें प्राजापत्यदेवतेचा उद्देश करून प्रणवान्त ।शेवटीं हे उत्तम द्विजहो, सर्वदा हवन करावे ८०. प्रथम वायव्यकोणापासून आरंभ करून आग्नेयकोणापर्यंत अच्छिन्न धारा पाडवीत ' इंद्राय स्वाहा ' असें म्हणून आहुति द्यावी. तदनंतर ८१ अग्नीसोमास जी आहुति द्यावयाची ती नैऋत्यदिशेपासून ईशान्यकोणापर्यंत अविच्छिन्न धार पाडवीत द्यावी व नतर नैमित्तिक होम करावा ८२. नंतर स्विष्टकृतहोम द्यावा. प्रायश्चित्तहोम व वारुणपंचकहोम करून शेवटीं पूर्णाहुति द्यावी ८३. " उद्वाह " या मंत्राचा अथर्वण ऋषि, देवी गायत्री छंद, वरुण देवता व प्रकृतकर्मामध्ये मंत्र जाणणाऱ्या पुरुषानें विनियोग करावा अथवा स्तुतीकडे या मंत्राचा विनियोग करितात. " त्वन्नोऽग्न " या मंत्राचा ऋषि वासिष्ठनामक आहे ८४,८५, छंद बृहती सांगितलेला आहे व देवता अग्नि आहे. "इडो गत " या मंत्राचा ऋषि कौगुह्यनामक असून छंद जगती व देव विष्णु सांगितलेला आहे. " उद्वर्तन० " या मंत्राचा ऋषि कोनु सांगितलेला आहे; छंद देवी गायत्री व वरुण अधिदेवता आहे ८६–८८. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या दुसऱ्या भागाचा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

आधारराज्यभागे तु महाव्याहृतयस्त्रयः । सर्वप्रायश्चित्तसंज्ञक प्राजापत्यं च स्विष्टकृत् २
एतन्नित्यं हि सर्वत्र होमे कर्मणि निर्दिशेत् । प्राजापत्ये च इन्द्राय एतावाधारसंज्ञकौ ३ अग्नय चैव
सोमाय आज्यभागौ प्रकीर्तितौ । भूर्भुव स्वस्त्रयश्चैव महाव्याहृतय स्मृता ४ अयाश्चाग्ने इति तथा
ये ते शतमनुत्तमम् । सर्वप्रायश्चित्तसंज्ञा एते वै पञ्चमन्त्रकाः ५ प्राजापत्याहुतिश्चैका स्विष्टकृ-
दाहुतिस्तथा स्मृता । चतुर्दशैताः कृतयो होतव्या नित्यसंज्ञकाः ६ कृत्वा सकृदेवतादृशं होमं पश्चात्स-
माचरेत् । सोमपाये च गोयागे नरमेधाश्वमेधके ७ अन्यत्र विपरीतेन स्वाहान्तेन हुनेद्बुध. ।
नैमित्तिक विना नित्य विफल याति नान्यथा ८ नित्य वर्ज्यं शतार्धेन वैश्वदेवे तथैव च ।
त्र्यहसाध्यादियागेषु यन्निर्दिश शृणु द्विजा ९ एकाह वाधारराज्यौ कृत्वा नैमित्तिका कृतिः ।
सम स्विष्टकृत विद्यादाकृत्याद्यान्तत. परम् १० विशेषतस्त्र्यहादौ तु आधारराज्यपूर्वकम् ।
पश्चान्नैमित्तिकं कुर्यात्समाप्तिदिवसेऽप्यथ ११ आधारराज्यपूर्वेण ततो नैमित्तिक चरेत् । स्विष्ट-
कृद्व्याहृतिश्चैव वारुणाद्यास्तथा हि षट १२ द्विजाति पतितो यत्र द्विरिक्त च चतुश्चतु ।
एकस्मिन्दिवसे कुर्यात्सोमयागे च शैरावे १३ द्विजातीनां विवाहे तु नैत्यिकं प्रथम भवेत् ।
एकस्मिन्दिवसे कुर्यादग्निकार्यं पृथक्पृथक् १४ दर्शादेक च नित्य च पृथक्नित्य न चाचरेत् ।
द्विजातिः पतितो यत्र द्विरिक्त च चतुश्चतुः १५ एकस्मिन्दिवसे कुर्यात्तत्रापि नैत्यिक त्यजेत् ।

सूत ह्मणतातः— सर्व यज्ञसंबधी ब्रह्मा व ऋत्विज याचे वरण करावे. आपल्या गृह्यप्रमाणे कुशं-
डिका करावी व नंतर अग्नीची पूजा करावी १. आधार व आज्यभाग झाल्यावर तीन व्याहृति, सर्व-
प्रायश्चित्तसंज्ञक, प्राजापत्य व स्विष्टकृत् हे होम सर्व होमकर्मामध्ये सर्वदा सारिखे आहेत. प्रजापतये
स्वाहा व इंद्राय स्वाहा यांस आधार ही सज्ञा व अग्नये स्वाहा आणि सोमाय स्वाहा
यांस आज्यभाग ह्मटलेले आहे. भूः, भुवः व स्वः या तीन महाव्याहृति सागितलेल्या आहेत २–४.
" अयाश्चाग्ने० " ' ये ते शतम्० ' इत्यादि पाच मंत्राच्या योगाने ज्या आहुति दिल्या जातात त्यास
सर्वप्रायश्चित्त ही संज्ञा आहे ५. एक प्राजापत्य आहुति व दुसरी स्विष्टकृदाहुति; या चवदा नित्यसंज्ञक
आहुति कोणत्याही होमात दिल्या पाहिजेत ६. सोमयाग, गवालंभ, नरमेध व अश्वमेध यामध्ये प्रथम
देवतोद्देश करून नंतर होम करावा ७. पण दुसऱ्या सर्व होमामध्ये विद्वानाने स्वाहा या पदाची
शेवटी योजना करून याच्या उलट होम करावा. नैमित्तिकावाचून केलेले नित्य (होमात्मक)
कर्म निष्फळ होतें, त्यावाचून नाही ८. पन्नास आहुत्याचा होम करावयाचा असल्यास व त्याचप्रमाणे
वैश्वदेवमाध्ये हा नित्यसंज्ञक वर्ज्य करावा. आता तीन दिवसात जो याग पूर्ण करावयाचा असेल त्याची
योजना सागतो, ती हे ब्राह्मणहो, ऐका ९. एका दिवसात कर्म करावयाचे असल्यास आधारहोम व
आज्यभाग करून नंतर नैमित्तिक आकृति सारखीच करावी. पुढे स्विष्टकृत, शेवटी आकृत्यादिक जाणा-
व्या १०. पण तीन दिवस (पाच दिवस) इत्यादि दिवसात होम करावयाचा असल्यास प्रथम आधार
व आज्यभाग करावा. नंतर दुसऱ्या किंवा समाप्तीच्या दिवशी नैमित्तिक होम करावा ११. तात्पर्य,
आधार व आज्यभाग पूर्वी व नंतर नैमित्तिक करावे. शेवटी स्विष्टकृत्, व्याहृति व वारुणादि सहा,
असा क्रम धरावा १२. जेव्हा द्विज पतित झाला असेल तेव्हा दोन, तीन किंवा चारचार कर्मे एकाच
दिवशी करावीं व सोमयाग आणि बाल्यावस्थेतील संस्कार यामध्येही अशीच पद्धति ठेवावी १३. द्वि-
जाच्या विवाहामध्ये तर नैत्यिक कर्म अगोदर होतें पण एकाच दिवशी अग्निकार्य भिन्न भिन्न
करावें १४. ह्मणजे एक नित्य व नैमित्तिक अशी कर्मे करावी. नित्यकर्म भिन्न करूं नये. पण
जेव्हां तो द्विज पतित असेल तेव्हा दोन, तीन किंवा चारचार कर्मेही एका दिवसात उरकून घ्यावीं,

होमे ब्रह्मा स्तुतौ विष्णुः स्रुवे चैव महेश्वर १६ अजस्यानियमे चेन्द्रोऽधिश्रयणं विवस्वतः। पर्याग्निकरणे चैव उद्वाहे मातरः स्मृताः १७ चन्द्रादित्यौ चोत्पवने वीक्षणे च दिशस्तथा। प्रोक्षण्यां स्थापने दुर्गा इमे लक्ष्मीप्रतिष्ठिताः १८ होमं कुर्याद्द्विजश्रेष्ठा विधिं कुर्यात्समाहितः। एतेषु देवताः प्रोक्ता द्विजातीनां हिताय च १९ यज्ञेषूपश्रुवेषु संस्कारे चैव पर्वणि। देवताः सर्वा ज्ञातव्या एता यज्ञे समाहितैः २० अधिदैवेन जानीयात्करवल्यां पञ्चफलं यतः। तस्मात्सर्वप्रयत्नेन देवतामथ विन्यसेत् २१ [१९५०] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

सूत उवाच ॥ अथ वक्ष्यामि सचैषां देवानां ध्यानमुत्तमम्। अस्य यज्ञे परिज्ञानाज्जिह्वा सम्यक्फलप्रदा १ हिरण्यवर्णा प्रथमां वह्निजिह्वां महाद्युतिम्। बबान्धककरं देवीं हिरण्याख्येष्टसिद्धये २ कनकां द्विभुजां शुक्लां हस्ताभ्यां दर्भसंयुताम्। कमण्डलुं च बिभ्राणां नम साधकसिद्धिदा ३ उद्यदिन्दुनिभां रक्तां चतुर्भिर्भुजपल्लवैः। शङ्खचक्राभयवरान्दधतीं प्रणमाम्यहम् ४ भिन्नाञ्जनचयप्रख्यां स्वर्णकुम्भं तु वामतः। दक्षिणेन वरारक्तां धारयन्तीं नमाम्यहम् ५ सुप्रभामण्डलाभाकराभ्यां तत्कृताञ्जलिः। पद्मासनस्था कौशेयवसना मां प्रसीदतु ६ जपाकुसुमसङ्काशा बहुरूपा सखे मम। शुभदा स्याद्भुजैः शुभ्रा सहस्रं दधती पराम् ७ नीलोत्पलनिभे देवि वह्निवर्णपराभवे। जपापुष्पधरे नित्यं सतीरूपे प्रसीद मे ८ मूलेन वीक्षयेत्स्थान

पण तशा प्रसंगी नित्यकर्म सोडावे. होमामध्ये ब्रह्मा, स्तुतीमध्ये विष्णु, स्रुवेमध्ये महेश्वर १५,१६, अनियमामध्ये अज, अग्नीवर स्थाली ठेवावयाची असता अग्नि, पर्याग्निकरणामध्ये सूर्य व विवाहात मातर सांगितलेल्या आहेत १७. उत्पवनकर्मामध्ये चंद्र व सूर्य, वीक्षणामध्ये (घृत पाहणें हा एक संस्कार आहे) दिशा, प्रोक्षणीची स्थापना करावयाची असता दुर्गा व लक्ष्मी प्रतिष्ठित आहे १८. तात्पर्य, हे श्रेष्ठ द्विजहो, होम व विधि सावधानपणे करावा. ह्यामध्ये द्विजाच्या हिताकरिता देवता सांगितल्या आहेत १९. ज्या कर्मामध्ये उत्तम प्रकारे पशुबंधन होतें त्यात संस्कारामध्ये व पर्वीवर होणाऱ्या कर्मामध्ये त्याचे पूजन करावे. यज्ञामध्ये या सर्व देवता ज्ञात पुरुषानीं अवश्य जाणाव्या २०. या सर्व देवता अधिदैवभावानें जाणाव्या. कारण, त्याचा अंगाचे ठायी विन्यास केल्यास पाचपट फल मिळते असें सांगितलेलें आहे. यास्तव, पूर्ण प्रयत्न करून देवताचा न्यास करावा २१. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या द्वितीय भागाचा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

सूत म्हणतात.— आता मी त्या देवाचे उत्तम ध्यान कसें करावें तें सांगतो. कारण, हे ज्ञान झाल्यास यज्ञामध्ये अग्नीची जिह्वा उत्तम प्रकारे फल देते १. अतितेजस्वी अशी अग्नीची हिरण्यवर्णानामक पहिली जिव्हा होय. ही हिरण्याख्या देवी इष्टसिद्ध्यर्थ सेव्य आहे २. सुवर्णरूपा, द्विभुजा, शुक्लवर्णाची, दोन्ही हातात जिनें दर्भ घेतले आहेत व जिनें हातात कमंडलु धरिला आहे अशा साधकास सिद्धि देणाऱ्या जिव्हेस नमस्कार असो ३. उदय पावणाऱ्या सूर्याप्रमाणे लाल, चार भुजलतानीं शंख, चक्र, अभय व वर धारण करणारी अशा देवीस मी प्रणाम करितों ४. जनसमूहासारखी, डाव्या हातात सुवर्णाचा कुंभ व उजव्या हातात वर धारण करणाऱ्या आरक्त भिन्ननामक जिव्हेस मी नमस्कार करितों ५. दोन्ही हातानी जिनें अंजलि जोडली आहे व जी पद्मासनावर बसलेली आणि महावस्त्र नेसलेली आहे अशी सुप्रभामंडला मजवर प्रसन्न होवो ६. हे माझे सखे, तूं जासवंदीच्या पुष्पासारख्या आहेस, तूं अनेक रूपाची आहेस; हातानीं पुरीं सहस्र कमले धारण करणारी व शुभ्र अशी तू आहेस. ह्यास्तव, तू शुभद हो ७. नील कमलासारिख्ये हे देवि,

मन्त्रेण खननं मतम् । त्रिसूत्रीकरणं कुर्याच्चतुःसूत्रं निपातयेत् ९ [१९५९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

सूत उवाच ॥ प्रतिष्ठायाः पूर्वदिने कुर्याद्धिवाधिवासनम् । धान्यप्रतिष्ठां तस्यैव यूपं चापि यथाविधि १ रात्रौ मूलाग्रे च घटं स्थापयेद्गणनायकम् । संपूज्य च विधानेन दिगीशांश्च तथा ग्रहान् २ ब्रह्माणं च तडागेषु वरुणं सन्तु याग के । सोमं च मण्डले सूर्यं पादे विष्णुं तथैव च ३ शैवे शैवं तथा प्रोक्तं प्रपायामथ वारुणम् । आरामे चैव ब्रह्माणं पाद्यायैरपि चार्चयेत् ४ द्रुपदादीति मन्त्रेण स्नापयेत्पथमं बुधः । गायत्र्या च ततः पश्चाद्गन्धद्वारेति तैलकम् ५ सुनाभेति च मन्त्रेण द्वाभ्यामेव विशिष्यते । श्रीश्च ते इति कुसुमं फलिनीति च वै फलम् ६ काण्डादिति च मन्त्रेण दद्याद्दूर्वाक्षतं ततः । सिन्दोरिवेति सिन्दूरं विश्वामिति च मार्जनम् ७ समिच्छेत्यञ्जनं दद्याद्दुस्थ सुरासुरा जपन् । चन्दन यञ्चभिर्जप्त्वा मानस्तोकेति चन्दनम् ८ यूपे चैव विशेषोऽयमुत्तराग्र भविष्यसेत् । अथैव तेन मन्त्रेण स्थापयेदथ वारिणा ९ गायत्र्या प्रथमं चैव आपो हि ष्ठेति वै जपन् । शन्नो देवीति द्रुपदां स्नापयेत्तदनन्तरम् १० अभिमन्त्र्याथ ब्रह्मेति त्रिरात्र मन्त्रमीरयन् । योगं योगदृढं जप्त्वा पवित्रं विन्यसेत्ततः ११ त्वं गन्धर्वेति मन्त्रेण तथा सुभाग इत्यपि । द्वाभ्यां तैलगन्धयुतं श्रीसूक्तेनापि पुष्पकम् १२ धूरसीति च तथा धूपमास्त्रज्योतिर्भिदीपकम् । अनुमीमहतामति दद्याद्दूर्वाक्षत ततः १३ विश्वामीति च निम्न्यन्तकाण्डा-

---

तू अग्नीच्या वर्णाचा पराभव करणारी आहेस. हे सतीरूपे, हे जासवदीच्या पुष्पास धारण करणाऱ्ये, मजवर प्रसन्न हो ८. मूलमंत्राने स्थान पहावे. मंत्रानें खणावें, तिसुती करावी व चारी बाजूस सूत्रे मारावी ९. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या दुसऱ्या भागाचा पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥१५॥

सूत ह्मणतातः— प्रतिष्ठेच्या पूर्वदिवशी देवाचे अधिवासन, धान्यप्रतिष्ठा व तत्संबंधी यथाविधि यूप (स्तंभ) करावा १. रात्री मूलप्रदेशी घटाची स्थापना करून यथाविधि गणनायक, दिशाचे अधिपति व ग्रह याचे पूजन करावे २. तडागामध्यें ब्रह्मदेवाचे, यज्ञामध्ये वरुणाचे, मंडलामध्यें सोमाचें, पादाचे ठायीं सूर्याचे व तसेच विष्णूचें ३, शिवसंबंधी कर्मात शिवाचे, प्रपे (पाणपोई) मध्ये वरुणाचे व आरामा (बागे) मध्यें ब्रह्मदेवाचे पाद्यादि उपचारानींही पूजन करावें ४. विद्वानानें " द्रुपदादि० " या मत्रानें स्नान घालावे. नतर गायत्रीमत्राने व " गंधद्वारा०" या मंत्रानें आणि " सुनाभ० " या मंत्रानें तेल लावावे. कारण, दोन्ही मंत्राच्या योगाने तेल लावणें प्रशस्त होय. " श्रीश्च ते०" या मंत्राने पुष्प व " या फलिनी० " या मंत्राने फल ५,६ आणि नतर " काडात्० " या मंत्रानें दूर्वा व अक्षता द्याव्या. " सिंदोरिव" या मंत्राने सिंदूर, 'विश्वाम०' या मंत्रानें मार्जन ७, " समिच्छ० " या मंत्रानें व " दुस्थ सुरासुरा० " हा मंत्र ह्मणत अंजन द्यावें. "चंदन यञ्चभि० " याचा जप करीत " मानस्तोके० " या मंत्राने चंदन लावावें ८. यूपामध्यें हा विशेष आहे. उत्तराग्राचा उत्तम प्रकार विन्यास करावा व पूर्वदिवशीच त्या मंत्रानें उदकानें त्याची स्थापना करावी. प्रथमत गायत्रीने व नंतर " आपोहिष्ठा " या मंत्राचा जप करीत " शन्नो देवी० " व " द्रुपदा दिवे० " या मत्रानीं स्नान घालावें ९, १०. " ब्रह्म० " इत्यादि तीन दिवस मंत्र ह्मणत अभिमत्रण करून " योगं योगदृढं० " याचा जप करून तदनंतर पवित्राचा विन्यास करावा ११ " त्वं गंधर्व० " या व त्याचप्रमाणें " सुभाग " या अशा दोन मंत्रानीं गंधयुक्त तेल लावावे. श्रीसूक्तानें पुष्प समर्पण करावे १२. " धूरसि० " या

विति तथाक्षतम् । सिन्दोरिवेति सिन्दूरं समिधेति तथाऽञ्जनम् १४ पादोऽस्येत्यथ भुक्तं स्याद्याः फलिनीति पुनः फलम् । रूपं नेति दहेद्रूपं न सोचिति च पूजनम् १५ युवासुवासेति वस्त्र नागगन्धेति चन्दनम् । ततो यमगृहाद्बाह्ये मण्डपान्तरमाश्रितः १६ सुनातेति वचो दद्याज्जतश्चावाहयेत्प्रभुम् । तत्राधिवासन कुर्याद्रक्षयेच्च सुरक्षिभिः १७ आचार्यं यजमान च ऋत्विग्भोजनमाचरेत् । अक्षारलवणान्यासीद्दधि विश्वं तिलांस्त्यजेत् १८ आधारणं चाधिवासं वक्ष्ये तत्रानुसारतः । सुनातेति वचो दद्यात्तैलं चैव शिवे त्रिभिः १९ पञ्चभिर्ब्राह्मणैः सार्धं गन्धर्वा इति स्मरन् । दद्याद्गन्धं तैलयुत गन्धद्वारेत्यृचा पुनः २० याः फलिनीति च फलं पूगतानाम्रवर्जनम् । कौशिकीरुत्तमोसीति दद्यात्खड्गं सुतीक्ष्णकम् २१ रूपेन वेति मन्त्रेण मुद्रां च निवेदयेत् । श्रीश्च ते इति कुसुमं विश्वानीति च सपदन् २२ निर्मन्थनं ततः कार्यमिति साधारणो विधिः । ततोऽधिवासकल्पे तु प्रदेशे तु समाचरेत् २३ विनाधिवासन विप्राः प्रतिष्ठा न समाचरेत् । न तत्फलमवाप्नोति विवाहे शरण दिशेत् २४ तत प्रयत्नतः कार्य पूर्वाह्णे रात्रियोगतः । नित्ये नैमित्तिके काम्ये कार्यं कुण्डमण्डपम् २५ स्थण्डिले हस्तमात्रेण वालुकानिर्मितेऽपि च । त्रयोदशाङ्गुले हस्ते द्विहस्ते चापि वर्धते २६ एकैकाङ्गुलको विप्राः पीठे नास्ति विचारणा । नवपञ्चककुण्डे च लक्षादावपि शङ्कया २७ ततो दशाङ्गुले पक्षे दशाङ्ग शृणुत द्विजा ।

मंत्रानें धूप, " आस्रज्योतिर्मि० " या मंत्रानें दीप, " अनुभीमहता० " इत्यादि मंत्राने दूर्वा व अक्षता १३, " विश्वामि० " येथपासून निम्नपर्यंत व " काडात्० " या मत्राने अक्षता, " सिंदोरिव० " या मत्रानें सिंदूर, ' समिधा० ' या मत्राने अंजन १४, " पादोऽस्य " या मंत्रानें भोजन, " याः फलिनी० " या मंत्रानें फल, " रूप न० " या मंत्राने रूपदहन, " न सोचि० " या मंत्रानें पूजन १५, " युवासुवासा० " या मंत्रानें वस्त्र व " नागगंध० " ह्या मंत्राने चंदन समर्पण करावे. तदनंतर यमगृहाच्या बाहेर दुसऱ्या मडपाचा आश्रय करून यजमानानें १६ " सुनात० " इत्यादि ह्मणावे व प्रभूचे आवाहन करावें. तेथें अधिवासन करून चागल्या रक्षकाकडून त्याचे रक्षण करवावें १७. पुढें आचार्य, ऋत्विज् व यजमान यान्या भोजनाचा समारंभ करावा. भोजनामध्ये अक्षार लवण खावे व दही आणि सर्व प्रकारचे तीळ सोडावे १८. आता तेथें अनुरूप असे अधिवासन व आधार सागतों. " सुनोति० " असें ह्मणून वचन द्यावें, शंकरास तीन किंवा पाच ब्राह्मणासह " गंधर्वा० " ह्या मंत्राचे स्मरण करीत तेल लावावें व पुनरपि गधद्वारा ह्या ऋचेनें तैलमिश्रित गंध लावावें १९,२०. " याः फलिनी० " ह्या मंत्रानें सुपारी, नारळ इत्यादि फले द्यावीं. " कौशिकीरुत्तमो० " इत्यादि मंत्राने अतितीक्ष्ण खड्ग द्यावे २१. " रूपेन वा० " ह्या मंत्रानें मुद्रर निवेदन करावा. " श्रीश्च ते० " ह्या मत्रानें पुष्प व " विश्वानि० " असें ह्मणत नंतर निर्मथन करावें. हा साधारण विधि होय. नंतर अधिवासनपक्षाचा स्वीकार करावयाचा असल्यास त्या प्रदेशीं अधिवासन करावे २२,२३. हे ब्राह्मणहो, अधिवासनावाचून प्रतिष्ठा करूं नये. कारण, तसें केल्यास त्याचे फल मिळत नाहीं. विवाहामध्यें आश्रय ध्यावा २४. तदनतर रात्रियोग पाहून प्रयत्नपूर्वक पूर्वाह्णसमयीं नित्य, नैमित्तिक व काम्य कर्मामध्ये वाळूच्या केलेल्या स्थंडिलावरही हस्तमात्रप्रमाणानें कुंडमंडप करावा. तेरा अंगुली, हस्त किंवा द्विहस्त प्रमाणाचें स्थडिल असता कुंडमंडपाचे प्रमाण वाढतें धरावे २५,२६. हे विप्रहो, एक एक अंगुल पीठ करावे यात्रिषयीं मुळींच विचार करावयास नको. नवपचककुंडामध्यें व लक्षादिहोमामध्येंही यात्रिषयी शंका ध्यावयास नको २७. तदनतर दशागुलपक्षामध्ये दशागें कोणतीं तें आता ऐका. काष्ठ, पत्र, पुष्प, मोदक, पिष्ट, अन्न, परमान्न व

काष्ठं पत्रं च पुष्पं च मोदकं पिष्टकं तथा २८ अन्नं च परमान्नं च ह्यवेक्ष्यं तिलमेव च । एतद्वै गृह्यपक्षे च विष्णुपक्षे तिलादितः २९ शैवे यवादितः कार्यो शाक्ते पुष्पादितो भवेत् । सूर्ये पक्षे पिष्टकादि गोपाले कृसरादितः ३० कृष्णे च करवीरादि श्रीफलानि च त्रैपुरे । सारस्वते च श्रीवृक्षे मोक्षकामे निगद्यते ३१ [१९९०] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

सूत उवाच ॥ अष्टौ होतारो द्वारपालास्तथाऽष्टौ अष्टौ कार्या ब्राह्मणा याजकाश्च । सर्वे शुद्धा लक्षिता लक्षणाद्यैरेकः कार्यो जापकोऽस्मिन्महात्मा १ दिव्यैर्वर्णैर्गन्धैर्गन्धमाल्यैः सुवर्णैस्तैलं कार्यं ब्राह्मणाः पञ्चविंशाः । आचाप्यास्तु द्विगुणैर्वै बलीयो दिव्यैर्वस्त्रैरर्हणा दक्षिणाभिः २ जार्हयित्वा यथोक्तेन कश्चित्पात्रं निवेशयेत् ३ अनर्हितेषु विप्रेषु न सम्यक्फलमाप्नुयात् ४ प्रतिष्ठादिषु सर्वेषु सम्यग्विधानमथार्हयेत् । कुशद्विजं तु सर्वत्र अर्घ्यविष्टरमात्रकम् ५ प्रदद्यादर्हणं सम्यक्पश्चात्पात्रं निवेदयेत् । विनार्हणं कृते तस्मिन्नरके परिपच्यते ६ प्रत्येकं ब्राह्मणान्यच्छे वेदमन्त्रेषु पारगान् । आचार्यो यदि कार्येषु वरयेद्दशगोव्रजात् ७ विशिष्टानामभावेऽपि कुर्यात्कुशमयान्द्विजान् । कुशप्रतिकृतौ चापि स्वगोत्रं स्वं द्विज विना ८ न कुर्याच्चरणोद्देशं तथा प्रवरसंहतिः । गोत्रादिकीर्तनान्तेषु स्वनामोद्देशमीरयन् ९ तुलापुरुषदाने च तथा च हाटकाचले । कन्यादाने तथोत्सर्गे कीर्तयेत्प्रवरादिकम् १० न

तिळ हे पदार्थ अवश्य पाहिले पाहिजेत. हें गृह्यपक्षामध्यें झालें. विष्णुपक्षामध्ये तिलापासून आरंभ, शिवपक्षामध्यें यवापासून व शक्तीन्या पक्षामध्यें पुष्पापासून आरंभ करावा. सूर्याच्या पक्षामध्यें पिष्टकापासून, गोपालपक्षामध्यें कृसरापासून, कृष्णपक्षामध्ये करवीरापासून, त्रिपुरपक्षामध्यें श्रीफलापासून, सारस्वतपक्षामध्ये व मोक्षकामामध्यें श्रीवृक्षापासून आरंभ करावा असें सांगितलेलें आहे २८–३१. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वान्या द्वितीय भागाचा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥१६॥

सूत ह्मणतातः—आठ होते (मंत्राने देवांस बोलाविणारे), आठ द्वारपाल व आठ याजक ब्राह्मण नेमावे. ते सर्वही शुद्ध, लक्षणादिकांनीं लक्षित असावे. या कृत्यामध्यें एक महात्मा जापक (जप करणारा)करावा १. ह्या पचवीस ब्राह्मणांची, अलौकिक गंध, पुष्पें, सुवर्ण इत्यादिकांनीं पूजा करावी. जो शक्तिमान् असेल त्यानें दिव्य वस्त्रें, पूजा व दक्षिणा दुप्पट देऊन या ब्राह्मणास प्राप्त करून घ्यावें २. वर सांगितलेल्या विधीनें पूजन केल्यावाचून कोणीही ब्राह्मणाची योजना करूं नये. कारण, ब्राह्मणाची पूजा केलेली नसल्यास उत्तम फल मिळत नाहीं ३,४. यास्तव, प्रतिष्ठादि सर्व कर्मामध्यें ब्राह्मणांची उत्तम प्रकारें पूजा करावी ५. जेथे कुशद्विज कर्तव्य असतील तेथें सर्वत्र ते अर्घ्य व आसन ह्यांनीं युक्त असेच करावे, प्रथमतः उत्तम प्रकारे पूजन करावे व नंतर पात्रनिवेदन करावें. कारण, सत्कारादिकावाचून पात्रनिवेदन केल्यास कर्ता नरकामध्यें पडून दुःख भोगितो ६. आचार्यास यज्ञांतील कार्यामध्ये जर वरणी द्यावयाची झाली तर प्रत्येक ब्राह्मण वेदमंत्रामध्यें पारंगत व आचारसंपन्न आहे असें पाहून निरनिराळ्या दहा गोत्रात उत्पन्न झालेल्यास ती द्यावी ७. आतां असे विशिष्ट ब्राह्मण जरी न मिळाले तरी कुशमय ब्राह्मण करावे. कुशप्रतिकृतीमध्येही स्वतः ब्राह्मणावांचून इतरत्र आपलेंच गोत्र उच्चारावें ८. अशा प्रसंगीं चरणोद्देश व प्रवरसंघात करूं नये. गोत्रादिकाचें उच्चारण केल्यावर आपल्या नांवाचा उद्देश करावा ९. तुलापुरुषदानप्रसंगीं, त्याचप्रमाणें सुवर्णाचलाच्या दानप्रसंगीं, कन्यादानसमयीं व तडागादिकाच्या उत्सर्गकालीं प्रवरादिकाचे उच्चारण करावें १०. कोणतेंही पात्र प्रतिकृत्यर्थ उपयोगीं पडत नाहीं. त्याचप्रमाणें सोदर

पात्रं प्रतिकृत्यर्थं न चालं सोदर्य तथा । मृतभार्यो ह्यभार्यश्च अपुत्रो मृतपुत्रकः ११ शूद्रसंस्कारकश्चैव कृपणो गणयाजकः । प्रायश्चित्तगृहीतश्च राजयाजकपैशुनः १२ शूद्रमेहनिवासी च शूद्रप्रेरक एव च । स्वल्पकण्ठो वामनश्च वृषलीपतिरेव च १३ बन्धुद्वेषी गुरुद्वेषी भार्याद्वेषी तथैव च । हीनाङ्गश्चैव वृद्धाङ्गो भग्नदन्तश्च दाम्भिकः १४ प्रतिग्राही च कुनख- पारदारिक एव च । श्वित्री कुष्ठी कुलोद्भूतो निद्रालुर्व्यसनार्थकः १५ अदीक्षितः कदर्यश्च चण्डरोगी गलव्रणः । महाव्रणी च उदरी यज्ञपात्र न कारयेत् १६ वरणान्ते तु पात्राणां पूजामन्त्राञ्छृणु द्विज । प्रतिमन्त्रेण गन्धाद्यैरर्चयेन्मन्त्रवित्तमः १७ ब्रह्ममूर्तिस्त्वमाचार्यः संसारात्त्राहि मां विभो । त्वत्प्रसादाद्गुरो यज्ञं प्राप्तोऽस्मि यन्मयेप्सितम् १८ चिरं मे शाश्वती कीर्तिर्यावल्लोकाश्चराचराः । प्रसीद त्वं महेशान प्रतिग्राकर्मसिद्धये १९ त्वमादिः सर्वभूतानां ससाराार्णवतारकः । ज्ञानामृतप्रदाचार्यो यजुर्वेद नमोऽस्तु ते २० ब्रह्मणैव समुद्भूतप्रकाशितदिगन्तर । शुद्धजाम्बूनदप्रख्य यजुर्वेद नमोऽस्तु ते २१ प्रतप्तकनकाभासभासितक्षितिभूतले । मन्त्रप्रख्यानसंस्थान यजुर्वेद नमोऽस्तु ते २२ प्रफुल्लकनकाभास भास्वरासुरभूषित । प्रकीर्णमन्त्रसभार विधिज्ञ प्रणतोऽस्मि ते २३ षडङ्गवेदवेदज्ञ ऋत्विङ्मोक्ष-

---

(सख्खें भावंड) ही योग्य पात्र नव्हें. ज्याची भार्या मेली आहे, ज्याचा विवाहच झाला नाहीं; जो निपुत्रिक आहे, ज्याचे पुत्र मेले आहेत ११, जो शूद्राचा संस्कार करितो; जो कृपण आहे; जो वैश्यादि समूहाच्या कडून पूजन करवितो; ज्यास प्रायश्चित्तानें शुद्ध करून घेतलें आहे; जो राजाचा पुरोहित आहे, जो क्षुद्र मनाचा आहे १२, जो शूद्राच्या गृहीं रहात असतो; व जो शूद्राचा सेवक आहे; ज्याचा कंठ बारिक आहे; जो ठेंगणा आहे, जो शूद्रस्त्रीचा पति आहे १३; जो बंधूचा, गुरूचा व भार्येचा द्वेष करीत असतो; ज्याचें एखादें अंगुलादि अंग कमी किंवा अधिक आहे; ज्याचे दात पडले आहेत, जो दाभिक आहे १४, जो दुष्ट सदा दुष्ट प्रतिग्रह घेत असतो; ज्याचीं नखे वाईट आहेत, जो परस्त्रीशीं गमन करितो; जो स्वतः कुष्ठरोगी आहे किंवा श्वेतकुष्ठयाच्या कुलात उत्पन्न झालेला आहे; जो फार झोंपाळु आहे; ज्यानें व्यसनाच्या योगानें द्रव्य संपादन केलें आहे १५, जो दीक्षित नाहीं; जो स्वभावानें दरिद्री आहे; ज्याला भयंकर रोग आहे, ज्याला वाहणारा व्रण झाला आहे; ज्याला महाव्रण झाला आहे; व ज्यास उदरसंज्ञक व्याधि झाली आहे अशा ब्राह्मणास यज्ञामध्यें पात्र करूं नये १६. ब्राह्मणा, पात्राचें वरण झाल्यावर त्याच्या पूजेचे मंत्र ऐका. मंत्रवेत्यामध्यें श्रेष्ठ असलेल्या पुरुषानें प्रत्येक मंत्राचा उच्चार करून गंधादि उपचारानीं पूजन करावें १७. 'हे प्रभो, तूं आचार्य ब्रह्मदेवाची मूर्ति आहेस. माझें संसारापासून रक्षण कर. हे श्रेष्ठा, तुझ्या प्रसादानेंच मी या इष्ट यज्ञाप्रत प्राप्त झालों आहे १८. जोंपर्यंत चराचर लोक आहेत तोंपर्यंत माझी शाश्वत व दीर्घकाल कीर्ति राहील. हे महा ईश्वरा, प्रतिग्राकर्मसिद्धयर्थ तूं प्रसन्न हो १९. तूं सर्व भूतांचें कारण व त्यांस संसारसागरांतून वर काढणारा आहेस. आचार्य ज्ञानामृत देणारा आहे. हे यजुर्वेदा, तुला नमस्कार असो २०. तूं ब्रह्मदेवाकडूनच उत्पन्न केला गेला आहेस. तूं सर्व दिशा प्रकाशित केल्या आहेस. हे शुद्ध सुवर्णासारिख्या तेजस्वी यजुर्वेदा, तुला माझा नमस्कार असो २१. हे यजुर्वेदा, तुझी कांति अतिशय तापलेल्या सुवर्णासारिखी आहे. भूतलीं तुझी कांति चहूंकडे चमकत आहे. मंत्रव्याख्यान हाच तुझा आकार आहे. हे यजुर्वेदा, तुला नमस्कार असो २२. सुंदर सुवर्णाप्रमाणें भास्वर, देदीप्यमान असुरांनीं ज्याचें भूषण केलें आहे व जो प्रकीर्ण

प्रदो भव । प्रविश्य मण्डलं विप्रा स्वस्थाने स्थापयेत्क्रमात् २४ वेद्याः पश्चिमभागे तु आचार्यं स्थापयेद्बुधः । कुण्डस्याग्नौ तु ब्रह्माणं मण्डलस्यैव पश्चिमे २५ होतारं स्थापयेत्तत्र विधिज्ञमथ चोत्तर । द्वौ द्वौ कृत्वा ज्ञापकौ च खड्गधारक एव च २६ द्वारि द्वारि प्रयत्नेन द्वारपालाननुक्रमात् । वक्ष्यमाणेन मन्त्रेण प्रत्येकमथ स्थापयेत् २७ पूजयेद्गन्धपुष्पाद्यैर्वासोभिर्युगलेन तु । यज्ञेषु वितते योऽसौ पूज्यते पुरुषः सदा २८ नारायणस्वरूपेण यज्ञ मे सफलं कुरु । यज्ञेषु साक्षी सर्वेषु यजुर्वेदार्थतत्त्ववित् २९ ऋग्वेदार्थस्य तत्त्वज्ञ इन्द्ररूप नमोऽस्तु ते । मखश्रेष्ठेषु सर्वेषु येन मन्त्राः सुविस्तृताः ३० यजुर्वेदार्थतत्त्वज्ञ ब्रह्मरूप नमोऽस्तु ते । मखश्रेष्ठेषु सर्वेषु एष एव विधिः स्मृतः ३१ माङ्गल्यं कर्मणां नित्य सर्वज्ञं ज्ञानरूपिणम् । सिद्धये मम यज्ञस्य नमामि शिवरूपिणम् ३२ पालय त्वं दिशः सर्वा विदिशश्च तथा इमम् । दिक्पालरूपिणं विप्रं यज्ञसिद्धौ नमाम्यहम् । ममसंकल्पं चरेद्यागं व्रतं देवार्चनं तथा ३३ संकल्पमूलः कामो वै यज्ञाः सकल्पसंभवाः । सकल्पेन विना विप्र यत्किञ्चित्कुरुते नरः ३४ फल चाल्पाल्पक तस्य धर्मस्यार्द्धक्षयो भवेत् । तस्मात्सर्वप्रयत्नेन यागं संकल्पयेत्सुधीः ३५ कामात्परो नैव भवेन्निष्कामोऽपि न शोभनः । तस्मात्काममय धर्मं विना मोक्षं न चाचरेत् ३६ संकल्पेन विना यस्तु धर्मं चरति मानवः । न तस्य फलमाप्नोति नित्यनैमित्तिकस्य च ३७ न कुर्यात्स्थापने चैव कुर्याद्वै मण्डलान्तरे । गृहीत्वौदुम्बर पात्रं वारिपूर्णं गुणान्वितम् ३८ जलाशयारामकूपसंकल्पे

मत्रांचा समाररूप आहे अशा हे विधिज्ञा, मी तुला नमस्कार करितों २३. हे षडंग वेद जाणणाऱ्या ऋत्विजा, तूं मला मोक्ष देणारा हो. ' ह्याप्रमाणें ब्राह्मणास मडलात प्रविष्ट करून क्रमानें स्वस्थानीं स्थापावें २४. वेदीच्या पश्चिमभागीं शहाण्यानें आचार्याची स्थापना करावी. कुंडाच्या आग्नेयीस ब्रह्मयाची स्थापना करावी. मडलाच्या पश्चिमभागीं २५ विधि जाणणाऱ्या होत्याची स्थापना करावी आणि नंतर दोनदोन ज्ञापक (सूचक) करून व एक खड्गधारक करून प्रत्येक द्वारामध्यें क्रमाने पुढें सांगितलेल्या मत्राने प्रत्येकास स्थापावें २६,२७ व गध, पुष्पे इत्यादिकानीं व वस्त्रानीं—निदान दोन वस्त्रानीं तरी—याचा सत्कार करावा. यज्ञ चालला असतां जो हा पुरुष सर्वदा नारायणस्वरूपानें व "माझा यज्ञ सफल कर" असे ह्मणून पूजिला जातो तो सर्व यज्ञामध्यें साक्षी होय. तो यजुर्वेदाच्या अर्थाचे तत्त्व जाणणारा असतो २८,२९. ऋग्वेदाच्या अर्थाचे तत्त्व जाणणाऱ्या हे इंद्ररूप ब्राह्मणा, तुला माझा नमस्कार असो. कारण, सर्व श्रेष्ठ मखामध्यें त्याने मंत्र उत्तम प्रकारें विस्तृत केले आहेत ३०. हे यजुर्वेदाच्या अर्थाचे तत्त्व जाणणाऱ्या ब्रह्मरूप ब्राह्मणा, तुला नमस्कार असो. कारण, सर्व श्रेष्ठ मखामध्यें हाच विधि सांगितलेला आहे ३१. कर्माचे नित्य मांगल्य, ज्ञानरूपी व सर्वज्ञ अशा शिवरूपी ब्राह्मणास माझ्या यज्ञाच्या सिद्धयर्थ मी नमस्कार करितों ३२. तूं सर्व दिशा व उपदिशा याचे आणि त्याचप्रमाणें या दिक्पालरूपी ब्राह्मणाचें यज्ञसिद्धीमध्ये पालन कर. मी तुला नमस्कार करितों. यज्ञ, व्रतें, देवपूजा इत्यादि सर्व संकल्पयुक्त करावें ३३. काम संकल्पमूलक आहे. यज्ञ संकल्पापासूनच होत असतात. हे ब्राह्मणा, पुरुष संकल्पावाचून जें जें काहीं करीत असतो ३४ त्याचे त्याला अतिशय अल्प फल मिळतें व धर्माचा अर्धा क्षय होतो. यास्तव, पूर्ण प्रयत्न करून शहाण्यानें यज्ञाचा संकल्प करावा ३५. कारण, कामावाचून याग होऊच शकत नाही व निष्काम यज्ञही बरासा नव्हे. यास्तव, एका मोक्षावाचून बाकी सर्व धर्म काममय आहे. मुमुक्षूने मात्र त्याचे आचरण करूं नये ३६. असो; जो मनुष्य संकल्पावाचून धर्माचें आचरण करितो त्याला त्या नित्य किंवा नैमित्तिक कर्माचें फल मिळत नाहीं ३७.

पूर्वदिङ्मुखः । साधारणे चोत्तरास्यो ग्रहयज्ञे तु संमुखः ३९ महाव्रते प्रतिष्ठायां पात्रं ताम्र हिरण्मयम् । राजताश्मभयं सार्द्धं यो यज्ञेषु प्रशस्यते ४० यज्ञीय पात्रपुटक हस्त स्नाने प्रकीर्तितम् । ऐशान्यां निक्षिपेत्तोयं प्रतिष्ठायां च पूर्वतः ४१ आकाशे निक्षिपेद्यागे व्रते ईशेऽपि नित्यके । पितृमेधे च गोयागे नरमेधे च दक्षिणे ४२ शुक्तिकांस्यादिहस्तैश्च ताम्ररौप्यादिभिस्तथा । सकल्पो नैव कर्तव्यो मृन्मये च कदाचन ४३ प्रणवं पूर्वमुच्चार्य यजेद्यज्ञेश्वर स्मरेत् । गङ्गां चादित्यचन्द्रौ च द्यौर्भूमिरहरात्रिके ४४ सूर्यः सोमो यमः काले महाभूतानि पञ्च च । एते शुभाशुभस्येह कर्मणो नवशाखिनः ४५ इत्युच्चार्य न्यसेद्धर्म ध्यात्वा पुष्पाञ्जलिं सृजेत् । अनृतं कृत्यपात्रे च ॐ तत्सदिति निर्दिशेत् ४६ धर्म शुभ्रवपुः सिताम्बरधरः कार्योर्ध्वदेशे वृषो हस्ताभ्यामभयं वर च सतत रूप परं योऽदधत् । सर्वप्राणिसुखावहः कृतधियां मोक्षैकहेतु. सदा सोऽय पातु जगन्ति चैव सतत भूयात्सतां भूतये ४७ यज्ञसबन्धिविप्रांश्च एकाहेनैव योजयेत् । हविर्द्रव्याणि यानि स्युरष्टयागान्तरेऽपि च ४८ पुनः पुनर्नियोज्यानि ब्राह्मणा हविरग्नयः ४९ [२०३९] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागे सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

सूत उवाच ॥ माघादिमासेष्वपि षटसु कार्या योगप्रतिष्ठा ऋषिभिः प्रणीता । देवादिसंस्था-

---

स्थापनेमध्यें सकल्प करूं नये; पण भिन्न मडल करावयाचे असल्यास तो करावा. जलाशय, आराम, कूप इत्यादिकाचा सकल्प करावयाचा असता उदुबराचे, पाण्यानें भरलेलें व गुणयुक्त ह्मणजे दिसावयास सुंदर, न फुटलेलें पात्र घेऊन पूर्वेकडे तोंड करून उभे रहावे. साधारण अशा एखाद्या संकल्प समयी उत्तराभिमुख व ग्रहयज्ञामध्यें ग्रहाच्या समुख उभे रहावें ३८,३९. महाव्रत व प्रतिष्ठा यामध्यें ताम्याचें व सोन्याचें आणि यज्ञामध्ये रुप्याचें, पाषाणाचे किंवा यज्ञीय वृक्षाचे पात्र प्रशस्त आहे ४०. स्नानसमयीं यज्ञीय पात्राने युक्त अशी अजलि करून त्यानें ईशान्यदिशेमध्यें पाणी फेकावें व प्रतिष्ठेमध्यें पूर्वस फेंकावें ४१; यज्ञामध्यें आकाशात फेंकावें; नित्यव्रतामध्यें ईशान्यदिशेस व पितृमेध, गोयाग, नरमेध यामध्यें दक्षिणेस फेंकावें ४२. शुक्ति, कास इत्यादि, त्याचप्रमाणें तांबें, रुपें इत्यादि हातात घेऊन त्यांनीं संकल्प करावा. पण तो मातीच्या पात्रात कधींही करूं नये ४३. प्रथमतः प्रणवाचा उच्चार करून मग यज्ञेश्वराचे पूजन व स्मरण करावें. गंगा, सूर्य, चंद्र, द्युलोक, भूमि, दिवस, रात्र ४४, सूर्य, सोम, यम, काल व पंचमहाभूतें हीं येथील शुभ कर्माच्या नूतन वृक्षास शुभ होत ४५. असें ह्मणून धर्माचा न्यास करावा व पुष्पांजलि कृत्यपात्रामध्यें सोडावी व ॐतत्सत् असा निर्देश करावा ४६. ज्याचें शरीर शुभ्र आहे, ज्याने शुभ्र वस्त्र धारण केलें आहे, कार्याच्या ऊर्ध्वदेशी जो प्रत्यक्ष हातामध्ये अभयमुद्रा व वर घेऊन व सतत श्रेष्ठ रूप धारण करून राहिला आहे, जो सर्व प्राण्यास सुखावह आहे, ज्याची बुद्धि शुद्ध आहे अशाच्या मोक्षास जो मुख्यत. हेतु होत असतो तो हा धर्म जगांवें सतत रक्षण करो व सज्जनाच्या उत्कर्षास कारण होवो ४७. यज्ञसंबंधी ब्राह्मणाची योजना एके दिवशींच करावी व जीं हविर्द्रव्यें असतील तीं आठ यज्ञामध्येंही पुनः पुन: योजावीं. कारण, ब्राह्मण, अग्नि व हवि याची पुनःपुनः योजना करण्याविषयीं सांगितलेलें आहे ४८, ४९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या दुसऱ्या भागाचा सतरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥

सूत ह्मणतातः—माघादि सहाही महिन्यामध्ये ऋषींनी सांगितलेली योगप्रतिष्ठा करावी. या सहा महिन्यातही जोंपर्यंत मधुसूदन निद्रित झाला नाहीं तोपर्यंत देवादिकाची स्थापना करण्याविषयीं

पत्नमाहुरत्र वस्तश्च सुतो मधुसूदनश्च १ वारे भृगोर्देवगुरोर्बुधस्य सोमस्य सर्वा शुभदा भवन्ति । लग्ने शुभस्थे शुभवीक्षिते वा कार्या प्रतिष्ठा च जलाशयानाम् २ शुद्धा द्वितीया च तथा तृतीया त्रयोदशी चापि तथैव विप्राः । तथापि सप्तम्यपि पौर्णमासी दशम्यसौ चाप्यथ पञ्चमी च ३ प्राण्यप्रतिष्ठा च जलाशयादेरेताः प्रशस्तास्तिथयो भवन्ति । अप्राप्य चैतानि शुभानि यानि कार्या प्रतिष्ठा विषुवद्वये च ४ षडशीतिलोकाप्ययनद्वये न युगादिके पुण्यदिने शुभे च । कार्या स्नडागादिजलाशयस्य प्राच्यां प्रतिष्ठा अथ चोत्तरे वा ५ सुचारु हैवत्प्रवणे च देशे सुवर्तुलः षोडशहस्तमण्डप । द्वारैश्चतुर्भिः ग्रथितैरुपेतश्चतुर्मुखश्चापि भवेत्सुरेताः ६ पूर्वादिद्वारेषु चतुष्टयेषु प्लक्षादिभिस्तोरणकैः सुरेशः । प्लक्षस्तथोदुम्बरपिप्पलौ च न्यग्रोधकं चापि यथाक्रमेण ७ ऊर्ध्वे च हस्तानमितानि यानि विचित्रमाल्याम्बरभूषितानि । भूमौ यथायोगिति च हस्तकाले भवन्ति चैतान्यपि तोरणानि ८ सर्वस्य यागेऽपि हि मण्डपस्य कार्या ध्वजा दिक्षु विदिक्षु शुभाः । दिक्पालवर्णाभपताकयुक्ता मध्ये च वै नीलपताकयुक्ताः ९ ध्वजाश्च यस्मिन्दशहस्तास्तस्मिन्पताका अपि हस्तपञ्च । अरत्निमात्रा यदि मूलभागे पञ्चाङ्गुलाग्रे विनिबद्धगूढाः १० द्वारे च तस्मिंश्च निरूपितं वा रम्भा सुपुष्पा सुखशाद्वलाश्च । वचाभिवृक्षोत्तरपञ्चहस्ताः सपञ्चशाखा अपि तोरणानि ११ मुञ्जोद्भवैर्बाल्हिः समुद्भवैर्वा सुरंजितश्चेत्रितपञ्चरूपैः । पुष्टद्वये सूत्रितवेष्टयेच्च तथेक्षुकाण्डैरथ यागमण्डपम् १२ वेदिस्तथा मण्डपमध्यभागे कार्या च कोणेऽस्थितुषादिहीना । हस्ताश्विता रेखवती सुरेखा परिष्कृता हस्तचतुष्टयेन १३

सांगितलें आहे १. भृगुवार, गुरुवार, बुधवार व सोमवार हे शुभद होत. शुभ ग्रह ज्यामध्यें आहेत व जें शुभ ग्रहांकडून पाहिलें जात आहे अशा लग्नावर जलाशयाची प्रतिष्ठा करावी २. शुद्ध द्वितीया, तशीच तृतीया, त्याचप्रमाणें त्रयोदशी, सप्तमी, पौर्णमासी, दशमी व पंचमी या तिथि जलाशयादिकांच्या प्राणप्रतिष्ठेस प्रशस्त होत. हे शुभ दिवस इत्यादि न मिळाल्यास, त्याचप्रमाणें दोन्ही विषुवत्कालीं, दोन्ही अयनसमयीं व युगादितिथीस प्रतिष्ठा करू नये, तर पुण्य व शुभ दिवशीं तडागादि जलाशयाची प्रतिष्ठा पूर्वेस किंवा उत्तरेस करावी ३-५. अतिसुंदर व किंचित् उतरती अशी जागा पाहून सर्व ऋतूंच्या लक्षणांनीं युक्त असा सोळा हात प्रमाणाचा मंडप घालावा. तो चार प्रसिद्ध द्वारांनीं युक्त व चार तोडांनीं सपन्न असावा ६. पूर्वादि चारी द्वारामध्यें पायरी इत्यादि वृक्षांनीं तोरणें करावीं. म्हणजे पूर्वादिक्रमानें पिंपरी, उदुंबर, पिंपळ व वट यांचीं तोरणें करावीं. तीं वरून खालीं एक हात वाकलेलीं असावीं. व विचित्र पुष्पें व वस्त्रें यांनी तीं भूषित करावीं. भूमीवर त्याची लांबी वाटेल तितके हात धरावी ७,८. कोणत्याही प्रकारच्या यज्ञांतील मंडपावरही दिशा व विदिशा यांमध्यें ध्वजा लावाव्या. त्या दिक्पालांच्या वर्णाप्रमाणे ज्याची कांति आहे अशा पताकांनीं युक्त असाव्या, व मध्यें त्यास नीलवर्ण पताका लाविलेल्या असाव्या ९. अशा प्रसंगीं ध्वजा दहा हात प्रमाणाच्या व पताका पाच हात प्रमाणाच्या असाव्या. पण मूळाशीं जर त्या अरत्निप्रमाण असल्या तर अग्रभागीं पाच अंगुल प्रमाणाने घट्ट गाठीनें त्यांस बाधून गूढ करून ठेवावें १०. त्या द्वारांमध्यें पूर्वी सांगितलेलें किंवा केळी, चागले फुललेले ढाळे, हिरवें गवत इत्यादिकांनीं पाच हात प्रमाणाचें सुंदर पंचशाखासह तोरण करून बांधावें ११. मुंजा गवत किंवा दर्भ यांचीं सुंदर कर्मलें व पल्लव यानीं युक्त अशी वय घालावी व दोन्ही बाजूंस सूत्र लावून आणि उंसाच्या कांड्यानीं यज्ञमंडप चोहोकडून आच्छादित करावा १२. मंडपाच्या मध्यभागीं वेदि करावी, पण तिची भूमि अस्थि, तुष इत्यादि दुष्ट पदार्थांनीं रहित असावी. ती एक हात उंच, रेखायुक्त, जिच्यावर रंगाच्या सुंदर

वेद्यां परित्यजेद्दशाङ्गुलानि ऐशान्यवस्त्रीणि तथाऽपराणि । कुण्डाय दद्याच्चतुरस्रमेकमब्-जस्थितं त्र्यङ्गुलमेखलोज्ज्वलम् १३ प्रासादे च तडागे च महारामे तथैव च । मण्डलं सर्वतो-भद्रं यत्नवत्त्वैव कारयेत् १४ कुण्डं चापि प्रकुर्वीत यथाभ्यन्तरमेखलम् । बाह्ययोनिसमं श्वेतं निश्चित्रं समसूत्रकम् १५ कुण्डानि कुर्यान्नवकुण्डपक्षे वेद्यास्तथोर्ध्वे रविदिक्षु चैव । सर्वाणि सर्वत्र च मेखलानि षडस्रपञ्चास्रसमेखलानि १६ अष्टास्रजाभ्यब्जत्रिकोणकानि तथार्धचन्द्र चतुरस्रकं च । कुण्डस्य पूर्वोत्तरदिग्विभागे स्थाप्यो घटश्चन्दनचारुलिप्तः १८ माल्याम्बराच्छादितपूर्णकुम्भः सवृत्तपत्रश्च सुवर्णगर्भः १९ [१७५८] इति श्रीभविष्ये महापुराणे मध्यमपर्वणि द्वितीयभागेऽष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

सूत उवाच॥ गतो यागगृहाद्दन्यन्मण्डलान्तरमाश्रितः । यजमानस्तथा नित्यं कर्म कृत्वा यथा-विधि १ पञ्च देवान्नमस्कृत्य तथा यज्ञेश्वर हरिम् । संकल्पं च ततः कृत्वा ब्राह्मणानामनुज्ञया २ एतस्मिन्पुण्यदेशे तु फलं गोत्रश्च वै क्रमः । वेदव्यासादिप्रणीतं यथाशास्त्रनिदर्शनम् ३ यथा यथा स्वतन्त्रोक्तं पुण्यारण्याभिधायकम् । जलाशयप्रतिष्ठायां करिष्ये विधिवद्द्विजाः ४ यथा यथा च कल्पोक्त यथा कुण्ड विधानत । साधिवास यथैवैकः पुण्यारण्यविधायकः ५ जला-शयप्रतिष्ठां च करिष्ये विधिवद्द्विजाः । संकल्पमेव कृत्वा तु वृद्धिश्राद्धं समाचरेत् ६ मातृयागं पुरस्कृत्य वृद्धिश्राद्धं समापयेत् ७ भेर्यादिघोषेण सुमङ्गलेन पद्य लिखेदत्र सषोडशाक्षरम् । इन्द्रादिदिक्पालवरायुधानि समुल्लिखेदेव दिशि स्थितानि ८ ब्रह्मेशान्वरयेत्सर्वानाचार्य तु

रेखा आहेत अशी व चार हात या प्रमाणानें उत्तम प्रकारें संस्कृत असावी १३. वेदीमध्यें दहा अंगुलें सोडून व तशींच ईशान्येकडे दुसरीं तीन अंगुलें सोडून कुंडाकरिता जागा द्यावी. ती चौकोनी असावी व अशी व्यवस्था झाली असता तीन अंगुलें प्रमाणानें उज्ज्वल मेखला करावी १४. प्रासाद, तडाग, मोठा बगीचा इत्यादिकांच्या प्रतिष्ठेमध्यें सर्वतोभद्रमंडल मोठ्या प्रयासानेंच करवावें १५. व ज्याच्या आत मेखला आहे व बाहेर योनि आहे असें श्वेतवर्ण, चित्ररहित व सारख्या सूत्राचें कुंडही करावें १६. नऊ कुंडांचा पक्ष घेतल्यास वेदीच्या चारी दिशांस नऊ उंच कुंडें करावीं. तीं सर्व मेखलेसह असावीं. षडस्र व पंचास्र हीं कुंडें मेखलेसह असलींच पाहिजेत १७. अष्टास्र, अब्जास्र, त्रिकोण, अर्धचंद्र व तसेंच चतुरस्र कुंडही करावें. कुंडाच्या पूर्व व उत्तर भागीं चंदनाचा ज्यास उत्तम लेप दिला आहे असा घट ठेवावा १८. पुष्पें व वस्त्र यानीं आच्छादित असा तो पूर्ण कुंभ वृत्तपत्रयुक्त व ज्यामध्यें सुवर्ण आहे आहे असा असावा १९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील मध्यमपर्वाच्या दुसऱ्या भागाचा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥

सूत ह्मणतातः— यागगृहांतून दुसरीकडे गेलेल्या यजमानानें दुसऱ्या मंडलाचा आश्रय करून व त्याचप्रमाणें यथाविधि नित्यकर्म करून १ पांच देवास व त्याचप्रमाणें यज्ञेश्वर हरीस नमस्कार करून नंतर ब्राह्मणाच्या आज्ञेनें संकल्प करावा २. या पुण्य देशामध्यें मी अमुक गोत्राचा अमुक फलार्थ अमुक क्रमानें वेदव्यासादिप्रणीत शास्त्राचा निर्देश करून अमुक कर्म करितों इत्यादि ह्मणावें ३. हे द्विजहो, पुण्य देणारें ह्मणून सागणारें आपल्या तंत्रामध्यें जसें जसें आहे तें ते सर्व यथाविधि मी जलाशयप्रतिष्ठेमध्यें करीन ४. ज्याज्याप्रमाणें कल्पसूत्रामध्यें सांगितलें आहे; व जसें विधियुक्त कुंड कर्तव्य असतें तसें व अधिवासासह पुण्यारण्यविधान करणारा असा विधि आणि जलाशयप्रतिष्ठा मी यथाविधि करीन. ह्याप्रमाणें संकल्प करून वृद्धिश्राद्ध करावें ५,६. प्रथम मातृयाग उरकून नंतर वृद्धिश्राद्धाची समाप्ति करावी ७. अतिमंगलरूप असा नगारा इत्यादिकांच्या घोषासह तेथें षोडशाक्षरी पद्य लिहावें. दिशांमध्यें असलेलीं

विशेषतः । स्वर्णकुण्डलयुग्मेन तथा ताम्रादिभाजनैः ९ नानारत्नैश्च वस्त्रैश्च आचार्यं वरयेद्बुधः । हेमालङ्कारयुग्मैश्च वासोभिर्विविधैरपि १० यथामानं यथाशक्ति यथाभिरुणयाद्बुधः । वाचिता यजमानेन ध्रुव स्वस्त्यस्तु ते इति ११ ततः सर्वौषधीभिश्च यजमानः सपत्निकः । आपो हि ष्ठेति मन्त्रेण स्नापयामासुरग्रजाः १२ यमगोधूमनीवारतिलश्यामाकशालयः । प्रियङ्गुव्रीहयश्चाष्टौ सर्वौषधिगणः स्मृत १३ ततः शुक्लाम्बरधरः शुक्लमाल्यानुलेपनः । सर्वौषध्युदकस्नात स्नापितो वेदपुङ्गवैः १४ ब्राह्मणैरभ्यनुज्ञातः पुरोहितपुरःसरः । नानामङ्गलघोषेण भेरीपटहनिस्वनैः १५ यजमानः सपत्नीकः पुत्रपौत्रसमन्वितः । पश्चिमं द्वारमासाद्य प्रविशेद्यागमण्डपम् १६ चरके पूजयेद्विघ्नं गङ्गां च यमुनां तथा । पार्श्वयोश्चार्धतो लक्ष्मीं प्रतिहारमनुक्रमात् १७ वेदिं प्रदक्षिणीकृत्य नमस्कुर्यात्यथाविधि । उपविश्य ततस्तस्मिन्ब्राह्मणानुमते स्थित १८ स्वस्तिवाच्य ततः कृत्वा पञ्च देवान्पूजयेत् । भूतोत्साद ततः कृत्वा विकिरान्विकिरेद्भुवि १९ अपक्रमन्तु ये भूता ये चास्मिन्विघ्नकारकाः । यस्मान्नो नाग्नि वर्तन्ते यज्ञमात्रं प्रवर्तताम् २० पूजयेदासन पश्चात्स्वकीय पुष्पचन्दनैः । नमोऽनन्तासनायेति तथा पद्मासनाय च २१ विमलासनाय च नमो नमः सारासनाय च । योगासनाय च नमः पृथिव्यै नम इत्यपि २२ ततो भूमितले वामहस्त दत्त्वा पठेन्नरः । पृथ्वि त्वया धृता लोका देवि त्वं विष्णुना धृता २३ त्वं च धारय मां नित्य पवित्रमासनं कुरु । सूर्यायार्घ्यं ततो दत्त्वा गुरु नत्वा कृता-

---

इंद्रादि लोकपालांची श्रेष्ठ आयुधें लिहावीं ७,८. ब्रह्मा, ईश इत्यादि सर्व व विशेषतः आचार्य यांचें वरण करावे. शहाण्यानें दोन सोन्याचीं कुंडलें, तशींच ताम्रादिकाचीं भांडीं ९, नाना रत्नें, वस्त्रें इत्यादिकाच्या योगानें आचार्यास वरावें. ज्ञान्यानें सोन्याच्या अलंकाराच्या जोड्या व नानाप्रकारचीं वस्त्रे यानीं योग्य सत्कारपूर्वक यथाशक्ति ब्राह्मणांस वरावें व 'तुझे सदा कल्याण असो.' असे यजमानानें त्याच्याकडून ह्मणवावे १०,११. तदनंतर पत्नीसह यजमानास "आपोहिष्ठा" ह्या मंत्रानें सर्व औषधींनीं स्नान घालावें १२. यव, गहू, सावे, तिल, बाजरी, साळीचे भात, राळे व तादुळ या आठ धान्यास सर्वौषधिगण ह्मणतात १३. तदनंतर ज्याने शुक्ल वस्त्र धारण केले आहे; शुक्ल पुष्पें व चंदन लाविलें आहे; ज्यानें सर्वौषधीच्या उदकाने स्नान केलें आहे; व ज्याच्यावर अभिषेक केला आहे असा तो यजमान, श्रेष्ठ वेदवेत्त्या ब्राह्मणाकडून आज्ञा मिळाली असता पुरोहितास पुढे घालून नगारे, ढोल, डफ इत्यादिकाच्या अनेक मंगल घोषासह पुत्र, पौत्र, पत्नी यान्यासहवर्तमान पश्चिमेकडील द्वारापर्यंत पोचल्यावर यज्ञमंडपात प्रवेश करतो १४-१६. त्याने चरकामध्यें गणपति, गंगा व यमुना याची पूजा करावी व दोन्ही बाजूंस एका अर्थात लक्ष्मी व दुसऱ्यात प्रतिहारास पूजावें १७. वेदीस प्रदक्षिणा करून यथाविधि नमस्कार करावा. तदनंतर ब्राह्मणाच्या अनुज्ञेमध्ये तत्पर असलेल्या त्या यजमानानें वेदीवर बसावें १८. नंतर स्वस्तिवाचन करून पांच देवाचे उत्तम प्रकारे पूजन करावे. कर्मभूमींतून भूतास घालवून देऊन भूमीवर विकिरान्न द्यावे १९. (भूतास घालविण्याचा मंत्र–) या कर्मामध्यें विघ्न करणारीं जीं भूतें असतील त्यानीं येथून जावें. कारण, तीं आमच्या कामाचीं नाहींत. आता केवल यज्ञच चालो २०. त्यानंतर पुष्पें व चंदन यान्या योगानें आपल्या आसनाचें पूजन करावें. (त्याचा मंत्र–) अनंतासनास नमस्कार असो; तसाच पद्मासनास नमस्कार असो २१; विमलासनास नमस्कार असो; सारासनास नमस्कार असो; योगासनास नमस्कार असो; व पृथिवीस नमस्कार असो. असेंही ह्मणून पूजन करावें २२. तदनंतर पृथ्वीच्या तलावर डावा हात ठेवून पुरुषानें ह्मणावें " हे पृथ्वि, तूं सर्व लोकांस धारण केलें आहेस. हे देवि, तुला विष्णूनें धारण केलें आहे. ह्यास्तव, तू माझें सतत धारण

अलिः २४ देव हृत्पद्मके नीत्वा प्राणायामत्रयं चरेत् । ततोऽर्चयेद्विघ्नराजमैशान्यां च घटोपरि २५ गन्धपुष्पैस्तथा वस्त्रैर्नैवेद्यैर्विविधैरपि । गणानां त्वेति मन्त्रेण ब्रह्माणं तदनन्तरम् २६ आब्रह्मन्निति ऋचा तद्विष्णोरिति सस्मरन् । वासुदेवं ततः पश्चाद्बलिभिर्गन्धचन्दनैः २७ ततो देवशरीरं तु नवमासाद्य त्रिंशतम् । वेद्याश्च परितः सर्वान्स्वे स्वे स्थाने यथाक्रमम् २८ ततो राजाधिराजेन भूतशुद्धिं समाचरेत् । ततो बुद्बुदमध्ये तु श्वेतपद्मासनस्थितम् २९ शुद्धस्फटिकसङ्काशं शङ्खकुन्देन्दुसप्रभम् । किरीटकुण्डलयुतं सितपङ्कजधारिणम् ३० शुक्लमाल्याम्बरं शुक्लं शुक्लगन्धानुलेपनम् । अहितुण्डासनस्थं च पाशहस्तं महाबलम् ३१ स्तूयमानं सुरगणैः सिद्धगन्धर्वसेवितम् । सुचारुवदनं देवं पद्ममालोपशोभितम् ३२ राजीवलोचनं नित्यं नागलोकोपशोभितम् । मकरग्राहकूर्मादैर्नानाजलचरैर्वृतम् ३३ जलाशयगतं देवं चिन्तयेज्जलशायिनम् । ततो न्यासं प्रकुर्वीत पञ्चाङ्गत्वावशोभितम् ३४ अर्घ्यपात्रं ततः कृत्वा त्रिभागजलपूरितम् । अष्टधा मूलमन्त्रं च जप्त्वा तेनोदकेन च ३५ आसनं यागवस्तूनि प्रोक्षयेत्तेन वारिणा । अरुणाय विद्महे तमोघ्नाय च धीमहि ३६ तन्नो अरुणः प्रचोदयादिति स्नानं समाचरेत् । ततो गणेशमैशान्यामाग्नेय्यां गुरुपादकान् ३७ धर्माधर्मादिकान्सर्वान्सत्त्वादीनथ चार्चयेत् । सूर्यसोमजलादीनां मण्डलानि यथाक्रमम् ३८ मध्ये शक्तिं च क्षीरोदमनन्तं पृथिवीं तथा । कूर्मं चाधारशक्तिं च सुमेरुं मन्दर

कर व आसन पवित्र कर." नंतर अंजलि करून सूर्यास अर्घ्य द्यावें व गुरूस नमस्कार करावा २३,२४ आणि देवास हृदयकमलामध्ये आणून तीन प्राणायाम करावे. तदनतर ईशान्यदिशेंत घटावर विघ्नराजाचें पूजन करावें. ह्मणजे "गणाना त्वा०" या मत्रानें गंध, पुष्पें, वस्त्रें व नानाप्रकारचे नैवेद्य यांच्या योगानें त्याची पूजा करावी. तदनंतर " आब्रह्मन्० " ह्या ऋचेनें ब्रह्मदेवाचें पूजन करावें. " तद्विष्णोः परमं० " या मंत्राचें स्मरण करीत, तदनंतर गंध, चंदन, बलि इत्यादिकानीं वासुदेवास पूजावें २५–२७. तदनंतर त्रिंशत्प्रमाण नूतन देवशरीर संपादन करून वेदीच्या चारी बाजूंस सर्व देवतांची आपापल्या स्थानीं क्रमानें पूजा करावी २८. पुढें " राजाधिराज० " या मंत्रानें भूतशुद्धि करावी. त्यानतर बुद्बुदाच्या मध्यभागीं श्वेतकमलावर बसलेल्या २९, शुभ्र स्फटिकाप्रमाणें तेजस्वी, शंख, कुंदपुष्पें व चंद्र ह्याप्रमाणें ज्याची कांति आहे; जो किरीट व कुंडलें ह्यानीं युक्त आहे; ज्यानें शुभ्र कमल धारण केलें आहे ३०, ज्यानें शुभ्र पुष्पाची माळा व शुभ्र वस्त्रें धारण केलीं आहेत, ज्यानें अंगास शुक्ल गंधाची उटी लाविली आहे, जो शेषाच्या आसनावर बसला आहे, ज्याच्या हातात पाश आहे; जो महाबलवान् आहे ३१; देवाचे समूह ज्याची स्तुति करीत आहेत, सिद्ध व गंधर्व ज्याची सेवा करीत आहेत; कमलाच्या माळानी जो सुशोभित आहे. ज्याचें मुख अतिशय सुंदर आहे, जो देदीप्यमान आहे ३२; कमलाप्रमाणें ज्याचे नेत्र आहेत, सर्वदा नागलोकानीं जो अत्यंत सुशोभित झाला आहे; व मकरादि ग्राह, कासवें इत्यादि अनेक जलचरांनीं जो परिवेष्टित झाला आहे; अशा जलाशयातील जलशायी देवाचें चिंतन करावें. तदनंतर पचागत्वानें अतिसुशोभित असा न्यास करावा ३३,३४. तदनंतर अर्घ्यपात्र घेऊन तें तीन भाग पाण्यानें भरून आठ वेळ मूलमंत्र जपून त्या उदकानें आसन व यज्ञीय वस्तु याचे प्रोक्षण करावें. आम्हीं वरुणास जाणतों व तमाच्या नाशकाचें ध्यान करितो. तो वरुण आह्मास प्रेरणा करो. अशा अर्थाचा मंत्र ह्मणून स्नान करावें. तदनंतर ईशान्यदिशेंत गणेशाचें, आग्नेयींत गुरुपादुकाचें ३५–३७, व धर्म, अधर्म आणि शेवटीं सर्व सत्त्वें याचें पूजन करावें. सूर्य, सोम, जलादिक याच्या मंडलाचें, मध्यें शक्तीचें, क्षीरोदाचें, अनंताचें, पृथ्वीचें, कूर्माचें, आधारशक्तीचे, सुमेरूचे, मंदराचें व पाच तत्त्वाचें

तथा ३९ पञ्चतत्त्वं समभ्यर्च्य साङ्गोपाङ्गमनन्तरम् । ततः श्वेत च कुसुम साक्षतं योगमायया ४० गृहीत्वा पूर्ववद्देशे स्थापयेत्कलशोपरि । आवाहनं ततः कृत्वा मन्त्रेणानेन मन्त्रवित् ४१ एह्येहि भगवन्वरुण एष यज्ञः प्रवर्तते । यज्ञभाग गृहाणेदं त्वामेवावाहयाम्यहम् ४२ एवमावाह्य लोके शमष्टौ मुद्राः प्रदर्शयेत् । गायत्र्या स्नापयित्वा तु दद्यात्पाद्यादिकं त्रयम् ४३ पुष्पाञ्जलिं ततो दत्त्वा मूलमन्त्रेण देशिकः । पूर्वादिपद्ममूलेषु धर्मादीन्पूजयेद्बुधः ४४ सत्त्वाद्याः पूजयेत्तत्र तथामेव पराङ्गनाः । ज्ञान धर्म च सोमं च रजः सत्त्वं तमस्तथा ४५ पूर्वादिपद्ममध्ये तु ग्रहानष्टौ प्रपूजयेत् । पद्माग्रे लोकपालाजामग्न्यादीनायुधांस्तथा ४६ कर्णिकादक्षिणे पूर्व वामे चापि शचीपतिम् । पूर्वपत्रे तु ब्रह्माण पूजयेत्सितपङ्कजैः ४७ नैर्ऋत्ये वरुणस्याथ मध्येऽनन्तं प्रपूजयेत् । पीठमन्त्रेषु पूर्वादिब्रह्माणं च शिवं तथा ४८ विष्णुं चापि गणेशं च पृथिवीं गन्धचन्दनैः । जपेन्मन्त्रं साष्टशतं सहस्र विजयेद्बुधः ४९ जानुभ्यामवनीं गत्वा विजयाख्यस्तवं पठेत् । ईशानादिपीठकोणेषु कमलामम्बिकां तथा ५० नैर्ऋत्यां विश्वकर्माणं वायव्ये तु सरस्वतीम् । पूर्वादिद्वारदेशे तु मरुत चावहादिकम् ५१ आवह प्रवह चैव तथैवोद्वहसंवहौ । विन्यसेत्पश्चिमे द्वारि निवह च परीवहम् ५२ विन्यसेदुत्तरद्वारि महत च पराभवम् । आग्नेयादिषु कोणेषु बहिः पीठे ततो यजेत् ५३ पिशाचान्राक्षसान्भूतान्वेतालांश्च तथा क्रमात् । क्षोभकः कामरूपश्च सौभद्रो मरुतस्तथा ५४ गोमुखो नन्दभद्रश्च द्विजिह्वो मलिनस्तथा । हस्तिकर्णो विशालाख्यः सप्तरक्षोगणः स्मृतः ५५ भूमिदो वरदश्चैव जयन्तः क्षोभकस्तथा । विभस्वन्तः सुदन्तश्च एते भूतगणाः स्मृताः ५६

योग्य क्रमाने सांगोपांग पूजन करून नंतर अक्षतांसह पादरें फूल योगमायेनें घेऊन तें कलशावर ठेवावें. तदनंतर मंत्रवेत्त्यानें या मंत्रानें आवाहन करावें. "हे भगवन् वरुणा, ये, ये; हा यज्ञ सुरू होत आहे. या यज्ञभागाचें ग्रहण कर. मी तुझेंच आवाहन करितों ३८–४२. याप्रमाणें लोकेशाचे आवाहन करून आठ मुद्रा दाखवाव्या. गायत्रीमंत्रानें पाद्यादि तीन उपचार देऊन स्नान घालावें ४३. तदनंतर आचार्यानें मूलमंत्रानें पुष्पांजलि देऊन पूर्वादि दिशेतील पद्मान्या मूलावर धर्मादिकांचें पूजन करावें ४४. त्याच्याच सत्त्वादि श्रेष्ठ स्त्रियांचेही तेथे पूजन करावें. ज्ञान, धर्म, सोम, रज, सत्त्व व तम व त्याचप्रमाणे आठ ग्रह यांचे पूर्वादि दिशेतील पद्मामध्ये पूजन करावें. पद्मान्या अग्रभागी लोकपालान्या अग्न्यादि आयुधांचे, तसेंच ४५,४६ कर्णिकेन्या पूर्वेस डावीकडे व उजवीकडेही शचीपतीचें व पूर्वपद्मामध्ये पाढऱ्या कमलानीं ब्रह्मदेवाचें पूजन करावें ४७. नैर्ऋत्य व वरुण यांच्यामध्ये अनंतांचें पूजन करावें. पीठान्या पूर्वादि पद्मामध्यें ब्रह्मदेवाचें, तसेंच शिवाचें, विष्णूचें, गणशाचें व पृथ्वीचें, गंध व चंदन यान्या योगानें पूजन करावें. मंत्राचा अष्टोत्तरशत जप करावा. शहाण्यानें तर हजार जप करावा ४८,४९. गुडघे टेकून भूमीवर बसून विजयाख्य स्तव म्हणावा. ईशानादि पीठकोणांमध्ये कमला व तशीच अंबिका यांचे ५०, नैर्ऋत्य दिशेत विश्वकर्म्याचें, वायव्य दिशेंत सरस्वतीचें व पूर्वादि द्वारप्रदेशी आवहादि वायूंचे पूजन करावें ५१. आवह, प्रवह, उद्वह व संवह यांची पश्चिमद्वारांत स्थापना करावी. निवह व परीवह यांची उत्तरद्वारीं स्थापना करावी व महत आणि पराभव यांची आग्नेयादि कोणामध्ये स्थापना करावी. तदनंतर बहिःपीठामध्ये पिशाच, राक्षस, भूत व वेताल यांची क्रमानें पूजा करावी. क्षोभक, कामरूप, सौभद्र, मरुत, गोमुख, नन्दभद्र, द्विजिव्ह, मलिन, हस्तिकर्ण व विशालसंज्ञक हा सप्तरक्षोगण सांगितलेला आहे ५२-५५. भूमिद, वरद, जयंत, क्षोभक, विभस्वंत व सुदंत, हे भूतगण सांगितलेले आहेत ५६. अगद, नीलकर्ण, वसंत व यावक, हे घोर-

अङ्गदो नीलकर्णोऽसौ वसन्तो यावकस्तथा । घोररूपा महाकाया वेतालाश्च प्रकीर्तिताः ५७ गन्धपुष्पाक्षतैर्मक्त्या सर्वे देवा ग्रहादयः । ध्यानवर्णानुरूपेण पूजनीयाः प्रयत्नतः ५८ ध्यायेदादित्यमारक्तं रक्तपद्मासनस्थितम् । रक्ताम्बरधरं रक्तं रक्तमाल्यानुलेपनम् ५९ पद्मविद्रुमसङ्काश सिन्दूरारुणसप्रभम् । आकृष्णेनेति मन्त्रेण स्थापयेत्कलशोपरि६० इहागच्छेति चावाह्य पाद्यार्घ्यैश्च पृथग्विधैः । गन्धपुष्पादिभिर्भक्त्या पूजयेत्तु यथाविधि ६१ बलिं च लोहितं दद्यात्पायसं दधिखण्डकम् । घृतलिप्तं च शाल्यन्नं पताकां रक्तवर्णिकाम् ६२ श्वेताम्बरधरं श्वेतं शुक्लगन्धानुलेपनम् । द्विभुजं वरदं देवं गदाहस्तं महाबलम् ६३ नानाभरणसंपन्नं सिद्धगन्धर्वसेवितम् । शुक्लपद्मासनस्थं च दध्यादब्जं श्वेतभूषितम् ६४ इमं देवा इति मन्त्रेण स्थापयेत्पूर्वदिग्दले । सितवस्त्रैश्च गन्धैश्च शुक्लमाल्यानुलेपनैः ६५ पायसैः श्वेतबलिभिर्दधिभक्तं निवेदयेत् । धूपै. श्वेतपताकाभि ैर्विविधैरपि ६६ रक्तमाल्याम्बरं देवं रक्ताभरणभूषितम् । सुचारुनयनं रक्तं रक्तपद्मासनस्थितम् ६७ किरीटकुण्डलधरं मेषकण्ठं चतुर्भुजम् । वरदं यज्ञनाशं च शूलशक्तिगदाधरम् ६८ सर्वकामप्रदं देवं सिद्धगन्धर्वसेवितम् । चिन्तयेत्परया भक्त्या मङ्गलं धरणीसुतम् ६९ अग्निमीळेति मन्त्रेण स्थापयेदग्निदिग्दले । पूजयेद्रक्तपुष्पैश्च रक्तमाल्यानुलेपनैः ७० धूपै रक्तपताकाभिर्गुडभक्तनिवेदनैः । अतसीपुष्पसङ्काश कर्णिकारसमप्रभम् ७१ रौहिणेयं महाकाय नीलनीरजलोचनम् । प्रशान्तवदनं देव पीतवास चतु-

---

रूप व धिप्पाड वेताल सांगितलेले आहेत ५७. सर्व देव व ग्रहादिक यांचें, गंध, पुष्पें, अक्षता इत्यादिकांच्या योगानें ध्यान व वर्ण यास अनुरूप असें प्रयत्नानें पूजन करावें ५८. किंचित् रक्तवर्ण, रक्तपद्माच्या आसनावर बसलेला, रक्तवस्त्र धारण करणारा, लाल पुष्पांच्या माळा व लाल उटी यांनीं सुशोभित, पद्म व पोवळें यांच्या वर्णाचा आणि सिंदूर व अरुण यांच्या प्रमाणें ज्याची प्रभा आहे अशा आदित्याचें ध्यान करावें व " आकृष्णेन० " या मंत्रानें त्याची कलशावर स्थापना करावी ५९,६०. " येथें ये " असें ह्मणून आव्हान करून भिन्न भिन्न पाद्य, अर्घ्य इत्यादिकांनीं व गंध, पुष्पें इत्यादिकांनीं भक्तीनें यथाविधि त्याचें पूजन करावें ६१. लाल बलि द्यावा, पायस, पुष्कळ दहीं, घृतयुक्त साळीचा भात व लाल वर्णाची पताका हे (पदार्थ बलींत असावे) ६२. श्वेतवस्त्र धारण करणाऱ्या, श्वेतवर्ण, ज्यानें श्वेतगंधाचें अनुलेपन केलें आहे; जो द्विभुज, वरद, हातात गदा घेतलेला व महाबलाढ्य आहे, जो अनेक आभरणांनीं संपन्न आहे, जो सिद्ध व गंधर्व याच्याकडून सेवित आहे आणि जो शुक्ल पद्माच्या आसनावर बसलेला आहे अशा श्वेत भूषणांनीं भूषित झालेल्या चंद्राचें ध्यान करावें ६३,६४. व " इमं देवा० " या मंत्रानें पूर्वदिशेंतील दलावर त्याची स्थापना करावी. शुभ्र वस्त्रें व पुष्पें, शुभ्र माळा व चंदन, पायस, पांढरे बलि, धूप, श्वेत पताका, नानाप्रकारचे नैवेद्य यांनीं त्यास संतुष्ट करून दहींभात समर्पण करावा ६५,६६. ज्याचें वस्त्र व माळा लाल आहेत, जो लाल अलंकारांनीं भूषित झाला आहे, ज्याचे नेत्र फार सुंदर व लाल आहेत, जो लाल कमलाच्या आसनावर बसला आहे; ज्यानें किरीट व कुंडलें धारण केलीं आहेत; ज्याच्या कंठांत मेष आहे, ज्याला चार हात आहेत, जो वरद, यज्ञाचा नाश करणारा, शूल, शक्ति व गदा यास धारण करणारा, सर्व कामना देणारा, सिद्ध व गंधर्व यांनीं सेवित आहे अशा पृथ्वीपुत्र मंगलाचें मोठ्या भक्तीनें चिंतन करावें ६७–६९ " अग्निमीळे० " या मंत्रानें त्याची आग्नेय दिशेंतील दलावर स्थापना करावी व लाल पुष्पें, लाल माळा, अनुलेपन, धूप, लाल पताका आणि गुळभाताचा नैवेद्य ह्यांचें निवेदन करून पूजन करावें. जवसाच्या पुष्पाप्रमाणे तेजस्वी, पागाऱ्याप्र-

भुंजम् ७२ खड्गचर्मधरं तद्वद्वरदापरशुधारिणम् । पद्मासनगतं देवं पीतपद्मासनस्थितम् ७३ नानाभरणसंपूर्णं मृगेन्द्रवरवाहनम् । उद्बुध्यस्वेति मन्त्रेण याम्यां तु स्थापयेद्बुधः ७४ पूजयेद्गन्धपुष्पाद्यैः पीतगन्धानुलेपनैः । वस्त्रैः पीतपताकाभिर्बलिभिः कृशरान्वितैः ७५ पीतवर्णं मुरुं ध्यायेत्पीतपद्मासनस्थितम् । पीताभरणसंपन्नं पीतवस्त्रं चतुर्भुजम् ७६ वरदं दण्डहस्तं च साक्षसूत्रकमण्डलुम् । पूज्यमानं सगन्धर्वैः सेन्द्रैर्देवगणैरपि ७७ बृहस्पतय इति मन्त्रेण नैर्ऋत्यां दिशि संस्थितम् । पीतचन्दनगन्धैश्च पीतवस्त्रादिभूषणैः ७८ धूपैः पीतपताकाभिः पीतोदकनिवेदनैः । पूजयेत्परया भक्त्या पुरन्दरपुरोहितम् ७९ ध्यायेच्छुक्रं भृगुसुत श्वेतपद्मासनस्थितम् । चतुर्भुजं महाकायं वरद दण्डधारिणम् ८० महाबाहु विशालाक्षं साक्षसूत्रकमण्डलुम् । स्तूयमानं मुनिश्रेष्ठैः सेवितं दैत्यपुङ्गवैः ८१ सिंहासनगतं देव नीलेन्दीवरलोचनम् । विलसत्पुण्डरीकस्य मालाभिरुपशोभितम् ८२ नानादैत्येन्द्रपुत्रैश्च समायान्त मुहुर्मुहुः । नानाशस्त्रास्त्रचतुरं नानाशास्त्रविशारदम् ८३ एवं ध्यात्वा भृगुश्रेष्ठं जपन्नन्नात्परिस्रुतम् । मनसा भक्तियुक्तेन स्थापयेत्पश्चिमे दले ८४ सितचन्दनवस्त्रैश्च धूपमाल्यानुलेपनैः । धूपैः श्वेतपताकाभिः सक्तुभिः क्षीरसंयुतैः ८५ पूजयेत्परया भक्त्या पुण्डरीकाक्षतैरपि । ध्यायेत्सौरिं चतुर्बाहुं शूलहस्तं वरप्रदम् ८६

मार्णे ज्याची अंगकांति आहे, ज्याचें शरीर धिप्पाड आहे, नीलकमलाप्रमार्णे ज्याचे नेत्र आहेत; ज्याचें मुख अतिशांत आहे, ज्याम चार भुजा आहेत, ज्याचे वस्त्र पिवळें आहे, ज्यानें ढाल व तरवार हातात धारण केली आहे, त्याचप्रमार्णे गदा व परशु ह्यास ज्यानें घेतलें आहे, जो देव पद्मासनावर बसला आहे, जो पिवळ्या पद्मासनावर स्थित आहे, जो अनेक आभरणांनीं संपूर्ण आहे व श्रेष्ठ सिंह हे ज्याचे वाहन आहे अशा रोहिणीपुत्र बुधाचें ध्यान करून " उद्बुध्यस्व० " ह्या मंत्रानें दक्षिण दिशेंत त्याची शहाण्यानें स्थापना करावी ७०–७४. गंध, पुष्पें इत्यादिकांनीं, पिवळ्या गंधानुलेपनानें, वस्त्रानीं, पिवळ्या पताकाच्या योगाने व कृसरयुक्त बलींनीं त्याचे पूजन करावें ७५. ज्याचा वर्ण पिवळा आहे, जो पिवळ्या पद्माच्या आसनावर बसला आहे, जो पिवळ्या आभरणांनीं संपन्न आहे, ज्याचें वस्त्र पिवळें आहे व ज्यास चार भुजा आहेत अशा गुरूचें ध्यान करावें. जो वरद हातात दंड घेतलेला आणि अक्ष, सूत्र व कमडलु यास धारण करणारा आहे व जो गंधर्व व इंद्र याच्यासह देवगणाकडून पूजिला जातो अशा नैर्ऋत्यदिशेमध्यें असलेल्या बृहस्पतीचे, "बृहस्पतये० " या मंत्राने पिंवळें चदन, गंध, पीतवस्त्रे, भूषणे, धूप, पिवळ्या पताका व पिवळें उदक यांचें निवेदन करून त्या इंद्राच्या पुरोहिताचे मोठ्या भक्तीनें पूजन करावे ७६-७९. श्वेत पद्माच्या आसनावर बसलेल्या, शुक्रसंज्ञक, चतुर्भुज, धिप्पाड, वरद व दडधारी भृगूच्या पुत्राचें ध्यान करावें. ज्याचे मोठे बाहु आहेत, विस्तृत नेत्र आहेत, हातामध्यें अक्षसूत्र व कमडलु आहे, ज्याची मुनिश्रेष्ठाकडून स्तुति होत आहे, श्रेष्ठ दैत्य सेवा करीत आहेत, जो सिंहासनावर बसला आहे, ज्याचे नीलकमलाप्रमाणे नेत्र आहेत, उमललेल्या कमलाच्या मालानी जो अत्यत शोभित आहे, ज्याच्याकडे वारंवार अनेक दैत्यपुत्र येत आहेत, जो अनेक शस्त्रे व अस्त्रे यामध्यें निपुण आहे, जो अनेक शास्त्रामध्यें चतुर आहे अशा श्रेष्ठ शुक्राचें ध्यान करून " अन्नात्परिस्रुत० " या मंत्राचा जप करीत भक्तियुक्त मनानें पश्चिमदलावर स्थापना करावी ८०–८४. शुभ्र चंदन, वस्त्रे, धूप, माला, उटया, जाळावयाचा धूप, श्वेत पताका, क्षीरयुक्त सक्तूंचा नैवेद्य आणि पाढऱ्या अक्षता याच्या योगाने मोठया भक्तीनें पूजन करावे. ज्याला चार हात आहेत व हातात शूल आहे, जो वर देणारा आहे, जो इंद्रनीलाप्रमार्णे श्यामवर्ण आहे, ज्याने दिव्य बाण व धनुष्य धारण केलें आहे, जो कमलांच्या आस-

इन्द्रनीलनिभं श्याम दिव्यबाणधनुर्धरम् । इन्दीवरासनस्थं च सरोजवरसप्रभम् ८७ नीलाम्बरधरं नीलपद्ममालोपशोभितम् । घोररूपं महाकायं छायाहृदयनन्दनम् ८८ शन्नो देवीति मन्त्रेण वायव्यां दिशि विन्यसेत् । कृष्णचन्दनवस्त्रैश्च कृष्णमाल्यानुलेपनैः ८९ धूपैर्नीलपताकाभिर्बलिभिर्माषमिश्रितैः । धूम्रवर्णं सदा केतुं गदाहस्तं वरप्रदम् ९० द्विभुजं भीमकायं च धूम्राक्षं धूम्रवाससम् । केतुं कृण्वन्निति मन्त्रेण ऐशान्यां स्थापयेद्दिवि ९१ धूम्रवर्णैश्च माल्यैश्च धूम्रगन्धानुलेपनैः । धूम्रधूम्रपताकाभिर्बलिभिर्माषमिश्रितैः ९२ पूजयेत्परया भक्त्या केतुं सर्वार्थसिद्धिदम् । लोकपालानहं वक्ष्ये सर्वसिद्धिप्रदायकान् ९३ येषु पूजितमात्रेषु नालभ्यं विद्यते क्वचित् । देवराजं ततो ध्यायेत्पुष्पप्रवालचयप्रभम् । द्विभुजं पीतसङ्काशं नीलेन्दीवरलोचनम् ९४ रक्तोत्पलधरं तद्वत्पीतवासःसमन्वितम् । चामराहस्तशतकैश्च कन्यागणैश्च शोभितम् ९५ इन्द्राणीं चिन्तयेद्वामे उत्पलद्वयधारिणीम् । एवं सपूजयेद्भक्त्या सुरराजं जगत्प्रभुम् । त्रातारमिति मन्त्रेण स्थापयेत्कर्णिकोत्तरे ९६ पूजयेत्परया भक्त्या धूपगन्धानुलेपनैः । नानाविधोपहारैश्च पताकाभिर्ध्वजैरपि ९७ बलिक्षीरान्वितं दद्यान्मोदकं सितशर्कराम् । उत्तप्तस्वर्णसङ्काशं वीतिहात्रं चतुर्भुजम् ९८ अर्धचन्द्रसमस्थं च अजवाहनमुत्तमम् । ज्वालाविस्तारसंरक्तं मूर्ध्नि सप्तशिखान्वितम् ९९ वरदं विभयं मालां दक्षे सूत्रकमण्डलुम् । त्रिनेत्रं रक्तनयनं

नावर बसला आहे, श्रेष्ठ कमलाप्रमाणे ज्याची प्रभा आहे, ज्यानें नील वस्त्र धारण केलें आहे, नील कमलाच्या मालानीं जो अतिशय शोभिवंत आहे, ज्याचें रूप घोर आहे, शरीर धिप्पाड आहे व जो छायेच्या हृदयास आनंद दायक आहे अशा सूर्यपुत्र शनीचें ध्यान करावें ८९–८८. आणि " शन्नो देवी० " या मत्रानें त्याची वायव्य दिशेमध्यें स्थापना करावी. काळें चंदन व वस्त्रें, काळ्या माळा व उटया, धूप, काळ्या पताका, उडीदयुक्त बलि याच्या योगाने त्यांचें पूजन करावें. ज्याच्या हातात गदा आहे, जो वरप्रद आहे, ज्यास दोन हात आहेत, ज्याचें शरीर भयंकर आहे, ज्याचे नेत्र धूम्रवर्ण आहेत, ज्याचे वस्त्र धूम्रवर्ण आहे व जो स्वत: धूम्रवर्ण आहे अशा केतूचें ध्यान करून " केतु कृण्वन्० " या मत्रानें ईशान्य दिशेमध्यें त्याची स्थापना करावी. व धूम्रवर्ण माला, धूम्रवर्ण गंध व उटया, धूम्रवर्ण पताका व माषमिश्रित बलि याच्या योगानें मोठ्या भक्तीनें सर्व अर्थसिद्धि देणाऱ्या केतूची पूजा करावी. आता सर्व सिद्धि देणाऱ्या लोकपालाचें मी तुला वर्णन करून सागतों ८९–९३. कारण, त्याचे केवल पूजन केलें असता अलभ्य असें काहीं रहात नाहीं. तदनतर मदनाप्रमाणे ज्याची प्रभा आहे, जो द्विभुज आहे, ज्याचे नेत्र नील कमलासारिखे आहेत, ज्याचा वर्ण पिवळा आहे, ज्यानें रक्तकमल धारण केलें आहे, जो पीतवस्त्रानें युक्त आहे व ज्याच्या हातात चवऱ्या आहेत अशा श्रेष्ठ कन्यांनीं जो सुशोभित आहे अशा देवेंद्राचे ध्यान करावें ९४, ९५. त्याच्या डाव्या बाजूस कमलाच्या जोडीस धारण करणाऱ्या इंद्राणीचें ध्यान करावें. ह्याप्रमाणें " त्रातारं० " ह्या मंत्रानें जगत्प्रभु जो इंद्र त्याची कर्णिकेच्या उत्तरभागीं स्थापना करून भक्तीनें पूजा करावी ९६. धूप, गंधाच्या उट्या, नानाप्रकारचे उपहार, पताका व ध्वज इत्यादिकही त्यास मोठ्या भक्तीने निवेदन करावें. क्षीरयुक्त बलि, मोदक व पाढरी साखर समर्पण करावी. अतिशय तापविलेल्या सुवर्णाप्रमाणें तेजस्वी, चतुर्भुज, अर्धचंद्राकृति असलेल्या, उत्तम अजवाहनावर बसलेल्या, ज्वालाच्या विस्तारानें अतिशय लाल झालेल्या, मस्तकावर सात शिखानीं युक्त असलेल्या, वर देणाऱ्या, अभय, माला, सूत्र व कमंडलु यास धारण करणाऱ्या, त्रिनेत्र, रक्तनयन, जटा व मुकुट यांनीं

जटामुकुटमण्डितम् १०० नानाभरणसंपन्नं सिद्धगन्धर्वसेवितम् । अग्निजिह्वेति मन्त्रेण स्थापयेदाग्नेयदले १ पूजयेद्रक्तपुष्पैश्च रक्तमाल्यानुलेपनै । धूपै रक्तपताकाभिर्बलिभिः पायसैरपि २ नीलाञ्जनचयप्रख्यं नीलसिंहासनस्थितम् । महामहिषमारूढं दण्डपाशधरं विभुम् ३ करालवदनं भीमं ज्वालाघूर्णितलोचनम् । घोरदंष्ट्राकरालैश्च किङ्कराणां गणैर्वृतम् । महिषं चिन्तयेद्वामे चित्रभुवं च दक्षिणे ४ अच्छीयस इति मन्त्रेण स्थापयेद्यमदिग्दले । पूजयेत्परया भक्त्या धर्मराज जगद्गुरुम् । रक्षसेन्द्र महाकाय कृष्णवर्ण द्विबाहुकम् ५ नानाभरणसंपन्न खड्गहस्त महाबलम् । वरमुक्ताविमानस्थं घोररूप जलेश्वरम् ६ एष त इति मन्त्रेण नैर्ऋत्यां स्थापयेद्दिशि । कृष्णचन्दनलेपैश्च कृष्णमाल्यानुलेपनै. ७ धूपैः कृष्णपताकाभिर्बलिभिर्माषमिश्रितैः । शुद्धस्फटिकसङ्काशं शङ्खकुन्देन्दुसप्रभम् ८ द्विभुज पाशहस्तं च सुन्दराङ्गं वरप्रदम् । वरुणस्येति मन्त्रेण स्थापयेत्पश्चिमे दले ९ सितचन्दनधूपैश्च पताकाभिर्ध्वजैरपि ११० समीरण कुञ्जरवर्णसन्निभ मृगाधिरूढ द्विभुज द्विनेत्रम् । ध्वजाम्बर चापि दधानमेक नीलाम्बर मेघगणैर्वृत च ११ नीलचन्दनलेपैश्च नीलमाल्यानुलेपनै. । पूजयेत्परया भक्त्या पताकाभिर्ध्वजैरपि १२ धूपैर्नीलपताकाभिर्बलिभि पायसैरपि १३ ध्यायेद्द्विनेत्र द्विभुज धनेशं पीताम्बर वै

मंडित, अनेक आभरणांनीं सपन्न आणि सिद्ध व गंधर्व यांच्याकडून सेवित अशा अग्नीचें ध्यान करून " अग्निजिव्ह० " ह्या मंत्राने आग्नेयींतील पत्रावर त्याची स्थापना करावी. व लाल पुष्पें, लाल माला व उट्या, धूप, लाल पताका व पायसाचा बलि यांच्या योगानें पूजन करावें९७-१०२. नीलांजनाच्या समूहाप्रमाणे ज्याची कांति आहे, नील सिंहासनावर जो बसला आहे, मोठ्या रेड्यावर जो आरूढ झाला आहे, ज्या प्रभूनें दंड व पाश धारण केले आहेत, ज्याचें विक्राळ मुख आहे, ज्याचे ज्वालाच्या योगाने गरगर फिरणारे भयकर नेत्र आहेत व भयंकर दाढाच्या योगाने विक्राळ असलेल्या दूतांच्या समूहांनीं जो आवृत आहे, अशा यमाचें चिंतन करावें. त्याच्या डाव्या बाजूस रेड्याचे व उजव्या बाजूस चित्रगुप्ताचे चिंतन करावें ३,४ व " अच्छीयस० " या मंत्राने दक्षिण दिशेतील दलावर स्थापना करून त्या जगद्गुरु धर्मराजाची मोठ्या भक्तीनें पूजा करावी. ज्याचें शरीर धिप्पाड आहे, वर्ण काळा आहे, दोन भुजा आहेत, जो महाबलवान् हातात तरवार घेतलेला व अनेक आभरणांनीं संपन्न आहे व जो श्रेष्ठ मोत्यांच्या विमानांत बसलेला घोररूप जनाचा ईश्वर आहे अशा राक्षसाधिपतीस " एष ते० " या मंत्रानें नैर्ऋत्य दिशेंत स्थापावें व काळें चंदन, काळीं वस्त्रें, काळीं पुष्पें व उट्या, धूप, काळ्या पताका, ज्यामध्ये उडीद मिळविले आहेत असे बलि यांच्या योगानें त्याची पूजा करावी. शुद्ध स्फटिकाप्रमाणें ज्याची कांति आहे, शंख, कुंद व चंद्र यांच्यासारखी ज्याची प्रभा आहे९-८, ज्यास दोन हात आहेत; हातात पाश आहे, पृथ्वी हेच ज्याचे अंग आहे, व जो वर देणारा आहे, अशा वरुणाची " वरुणस्य० " या मंत्राने पश्चिमदिशेतील पत्रावर स्थापना करावी ९ व पाढरें चंदन, धूप, पताका व ध्वज यांच्या योगाने पूजन करावे. हत्तीच्या वर्णाप्रमाणें ज्याचा वर्ण आहे, जो मृगावर आरूढ झाला आहे; ज्यास दोन हात आहेत; दोन नेत्र आहेत; ज्यानें ध्वजांचे अंबर धारण केलें आहे; ज्याचें एकच नील वस्त्र आहे; व जो मेघांच्या समूहांनीं आवृत आहे अशा वायूचें ध्यान, स्थापना इत्यादि करून निळें वस्त्र, चंदन, निळ्या माळा, उट्या, पताका व ध्वज यांच्या योगाने मोठ्या भक्तीनें पूजन करावें१०-१२. साराश, धूप, निळ्या पताका व पायसाचे बलि याच्या योगानें त्यास संतुष्ट करावें. ज्याला दोन नेत्र आहेत; दोन भुजा आहेत, पिवळें वस्त्र आहे; मनुष्यांचें वाहन आहे; ज्यानें

अस्त्राह्वानं च । गदाधरं भक्तवरप्रदं च आवाह्येदुत्तरपद्मपत्रके १४ गन्धचन्दनवस्त्रैश्च पीतमाल्यानुलेपनैः १५ धूपैः पीतपताकाभिर्बलिभिः पायसैरपि १६ स्निग्धकर्पूरसङ्काश तुषाराकिरणप्रभम् । त्रिशूलतुम्बुरधरं तथाभयवरप्रदम् १७ उत्तुङ्गवृषभारूढं त्रिनेत्र भस्मभूषितम् । कपालमालिन तद्वत्खण्डेन्दुकृतशेखरम् १८ एव ध्यात्वा महेशानं स्थापयेद्दक्षिणे दिग्दले १९ पूजयेत्परया भक्त्या भक्ष्यभोज्यैरनेकश १२० सितध्वजपताकैश्च बलिभिः पायसादिभिः । त्वमीशान इति मन्त्रेण ऋषिश्छन्दः समीरयन् २१ ब्रह्माण रक्तगौराङ्ग शोणपद्मसमप्रभम् । राजीवलोचनं तद्वत्पद्मगर्भासनं प्रभुम् २२ पद्मासनस्थित तद्वच्छ्वेतवासं चतुर्भुजम् । चतुर्मुखं सुरश्रेष्ठं मेघगम्भीरनिस्वनम् २३ राजहंससमायुक्त विमानवरसस्थितम् । स्रुचस्रुवौ दक्षिणे च वामे दण्डकमण्डलुम् २४ कुर्वाणमिव लोकांस्त्रीन्सिद्धगन्धर्वसेवितम् । आज्यस्थाली तथैवाग्रे ऋषींश्च समिध तथा २५ वामपार्श्वे तु सावित्रीं दक्षिणे तु सरस्वतीम् । आब्रह्मन्निति मन्त्रेण स्थापयेत्पूर्वदिग्दले २६ नानाभक्ष्योपचारैश्च पूजयेद्गन्धचन्दनैः । धूपैः श्वेतपताकाभिर्बलिभिश्चाज्यपायसै २७ अनन्तं शुक्लवर्णाभं पीतवास चतुर्भुजम् । शङ्खचक्रगदापद्मधारिण जगदीश्वरम् २८ आधारभूतं जगतां स्वर्णयज्ञोपवीतिनम् । नानाभरणसंपन्न फणासप्तफणान्वितम् २९ ॐ नमोऽस्त्विति मन्त्रेण स्थापयेद्दक्षणान्तरे । पूजयेद्भक्ष्यभोज्यैश्च दीपगन्धानुलेपनैः १३० धूपैः श्वत-

---

गदेचें धारण केलें आहे; व जो भक्तास वर देणारा आहे, अशा वरुणाची उत्तर दिशेतील पत्रावर ध्यान करून स्थापना करावी १३,१४ व गंध, चदन, वस्त्रे, पिवळी पुष्पे, उट्या, धूप, पिवळ्या पताका, बलि व पायस याच्या योगाने त्याची पूजा करावी १५,१६. स्निग्ध कर्पूराप्रमाणें तेजस्वी, तुषार व किरणें याच्या तेजाचा, त्रिशूल व तंबुरा यास धारण करणारा, त्याचप्रमाणे अभय वर देणारा, अति उंच, वृषावर आरूढ झालेला, त्रिनेत्र, भस्मानें अतिशय भूषित, कपालाची माळा धारण करणारा व त्याचप्रमाणें ज्यानें चद्राचा तुकडा आपल्या मस्तकीं धारण केला आहे अशा महेश्वराचें ध्यान करून त्याची ईशान्यदिशेतील पत्रावर स्थापना करावी १७—१९. " त्वमीशान० " या मंत्रानें मंत्राचा ऋषि व छद याचा उच्चार करून अनेक प्रकारचे भक्ष्य व भोज्य पदार्थ, पाढरे ध्वज, पताका, बलि व पायस याच्या योगानें मोठ्या भक्तीनें पूजन करावें २०,२१. ज्याचे अंग लाल व गोरें आहे, लाल कमलाप्रमाणें ज्याची प्रभा आहे; कमलाप्रमाणें ज्याचे नेत्र आहेत, जो प्रभु पद्मासनावर बसला आहे; ज्याचे वस्त्र शुभ्र आहे, ज्याला चार भुजा आहेत; चार मुखें आहेत, ज्याचा मेघासारखा गभीर ध्वनि आहे, जो देवामध्यें मुख्य आहे, जो राजहसानीं युक्त आहे; जो श्रेष्ठ विमानात बसला आहे; ज्याच्या उजव्या बाजूस स्रुवा व स्रुचा आणि डाव्या बाजूस दण्ड व कमंडलु आहे २२-२४, जणु काय तीन लोकाची रचना करीत असलेल्या, सिद्ध व गंधर्व याच्याकडून सेवित, त्याचप्रमाणे ज्याच्या अग्रभागी आज्यस्थाली, दर्भ व समिधा आहेत; ज्याच्या डाव्या भागी सावित्री व उजव्या बाजूस सरस्वती आहे; अशा ब्रह्मदेवाचें ध्यान करून " आब्रह्मन्० " या मंत्रानें त्याची पूर्वदिशेतील दलावर स्थापना करावी २५,२६ आणि नानाप्रकारचे भक्ष्य पदार्थ, गंध, चदन, धूप, पाढऱ्या पताका, बलि व तूप घातलेलें पायस यांच्या योगानें पूजा करावी २७. ज्याची शुभ्रवर्ण कांति आहे, पिवळे वस्त्र आहे, चार भुजा आहेत; जो शंख, चक्र, गदा व पद्म धारण करीत आहे; जो जगाचा ईश्वर आहे; जो सर्वांचा आधार आहे; ज्याचे यज्ञोपवीत सुवर्णाचे आहे, जो अनेक आभरणानीं सपन्न आहे; व जो सात फणांनीं युक्त असलेल्या नागावर शयन करीत आहे अशा अनताचें ध्यान करून २८, २९

पताकाभिर्वेलिभिश्चैव निर्मितैः । ततो मण्डलपूर्वे तु ब्रह्माणं पीतवाससम् ३१ चतुर्भुजं चतुर्वक्त्रं स्रुवहस्तं वरप्रदम् । बिभ्रतं च श्रुतं तद्वत्तथा दण्डकमण्डलू ३२ आब्रह्मन्निति मन्त्रेण पूजयेद्गन्धचन्दनैः । दक्षिणे त्र्यम्बकं ध्यायेच्छूलखट्वाङ्गधारिणम् ३३ वरदं तमुरुधरं नागयज्ञोपवीतिनम् । निबद्धजूटचन्द्रार्धं शुद्धस्फटिकसन्निभम् ३४ कपालमालिनं देवं भुजङ्गाभरणान्वितम् । त्रिनेत्रं कुन्दसङ्काश भूतप्रेतगणैर्वृतम् ३५ त्र्यम्बक चेति मन्त्रेण पूजयेन्मधुपायसैः । अतसीपुष्पसङ्काश हारकेयूरभूषितम् ३६ नानाभरणसंपन्नं पीतवासं चतुर्भुजम् । दक्षिणे च गदाचक्रं वामे शङ्खं सपद्मकम् ३७ श्रिया दक्षिणतो वामे सरस्वत्या समन्वितम् । तद्विष्णोरिति मन्त्रेण स्थापयेत्पश्चिमे ततः ३८ पूजयेद्गन्धपुष्पाद्यैः पायसेन घृतेन च । गणेशं तु चतुर्बाहुं व्यालयज्ञोपवीतिनम् ३९ गजेन्द्रवदनं देवं श्वेतवासं चतुर्भुजम् । पर्शुं लगुडं तथा वामे दक्षिणे दण्डमुत्पलम् १४० मूषकस्थं महाकाय शङ्खकुन्देन्दुसप्रभम् । युक्तं बुद्धिकुबुद्धिभ्यामेकदन्त भयापहम् ४१ नानाभरणसंपन्नं सर्वविपद्विनाशनम् । गणानान्त्विति मन्त्रेण विन्यसेदुत्तरे ध्रुवम् ४२ उत्तप्तजाम्बूनदहेमसन्निभां लक्ष्मीं सरोजासनसंस्थितां शुभाम् । वामे सरोजं दधतीं तथैव हस्ते च दक्षे धृतचामरां च ४३ श्रीश्च तेति च मन्त्रेण ऐशान्यां मण्डलाद्बहिः । स्थापयेत्पूजयेद्भक्त्या सितचन्दनपङ्कजैः ४४ मोदकं परमान्नं च यवक्षीरं निवेदयेत् ४५

" ॐ नमोस्तु० " या मंत्रानें वरुणाच्या मध्यें त्याची स्थापना करावी व भक्ष्य, भोज्य, दीप, गंध, उटया, धूप, शुभ्र पताका व तयार केलेले बालि याच्या योगानें त्याचें पूजन करावें. नंतर मंडलाच्या पूर्वभागीं पीतवस्त्र धारण करणाऱ्या, चतुर्भुज, चतुर्मुख, ज्याच्या हातात स्रुवा आहे, जो वर देणारा आहे आणि जो श्रुत (विद्या) व दंडकमंडलु यास धारण करीत असतो अशा ब्रह्मदेवाचें " आब्रह्मन्० " या मंत्रानें सुगंधी चंदनानें पूजन करावें. मंडलाच्या दक्षिणेस शूल, खट्वांग धारण करणाऱ्या, वर देणाऱ्या, तंबुऱ्यास धारण करणाऱ्या, नागाचें यज्ञोपवीत घालणाऱ्या, जटेवर अर्धचंद्र बाधणाऱ्या, शुद्ध स्फटिकाप्रमाणें शुभ्र असलेल्या, कपालाची माला धारण करणाऱ्या, नागभूषणांनीं युक्त असलेल्या, त्रिनेत्र, कुन्दासारख्या तेजस्वी, व भूत आणि प्रेत ह्यांनीं आवृत झालेल्या त्र्यंबकाचें मध व पायस ह्याच्या योगानें " त्र्यंबकं० " या मंत्रानें पूजन करावें. जवसाच्या पुष्पासारख्या, हार व केयूर ह्यांनीं भूषित असलेल्या, नाना आभरणांनीं संपन्न झालेल्या, चतुर्भुज, पीतवस्त्र, ज्याच्या उजव्या बाजूस गदा व चक्र आणि डाव्या बाजूस शंख व पद्म आहे; जो उजव्या बाजूस लक्ष्मीने व डाव्या बाजूस सरस्वतीनें युक्त आहे, अशा विष्णूची " तद्विष्णोः परमं० " ह्या मंत्राने मंडलाच्या पश्चिमेस स्थापना करावी ३०–३८ आणि गंध, पुष्पें इत्यादि उपचार, पायस व घृत ह्याच्या योगाने त्याची पूजा करावी. ज्यास चार बाहु आहेत, ज्याने सर्पाचें यज्ञोपवीत धारण केलें आहे, ज्याला श्रेष्ठ हत्तीचे मुख आहे, ज्याचे वस्त्र शुभ्र आहे, ज्यानें आपल्या चार भुजांपैकीं डावींकडील दोन हातात परशु व लाडु व उजवीकडील दोन हातात दंड व कमल धारण केलें आहे ३९,४०, जो मूषकावर बसला आहे, ज्याचें शरीर फार मोठें आहे, शंख, कुंदपुष्प व चंद्र ह्याच्याप्रमाणें ज्याची प्रभा आहे, जो बुद्धि व कुबुद्धि ह्यांनीं युक्त आहे, ज्याला एक दांत आहे; जो भक्ताच्या भयाचें निराकरण करितो ४१, जो अनेक अलंकारांनीं संपन्न आहे व भक्ताच्या सर्व विपत्तींचा नाश करीत असतो, अशा गणेशाची 'गणाना त्वा०' ह्या मंत्रानें उत्तर दिशेस दृढ स्थापना करावी ४२. जिची अंगकांति अतिशय तापविलेल्या सुवर्णाप्रमाणें आहे, जी कमलासनावर बसली आहे; जिनें आपल्या डाव्या हातांत कमल घेतलें आहे व उजव्या हातात चामर धरिलें आहे अशा शुभ लक्ष्मीची ईशान्य दिशेंत

ततो देवीमम्बिकां दिव्यरूपां ब्रह्मेन्द्राद्यैः स्तूयमानां त्रिनेत्राम् । सिंहेशस्थां तप्तजाम्बूनदाभां चन्द्रार्द्धनाबद्धमौलिं जटाभिः ४६ दिव्यैर्वस्त्रैर्बाहुभिः सामलम्बैर्दिव्यैर्वस्त्रैर्भूषणैः स्वैरुपेताम् । ब्रह्मेन्द्राद्यैर्दुर्जयं माहिषास्यं तीक्ष्णैरस्त्रैर्हनिवं मर्दयन्तीम् ४७ शूलं च तीक्ष्णबाणं च शक्तिं खड्गं तीक्ष्णं बिभ्रतीं दक्षिणेन । चापं पाशं खेटकं चाङ्कुशं च घण्टां वामे बिभ्रतीं वा कुठारम् ४८ शिरश्छेदादर्धजातं कबन्धं खड्गे तीक्ष्णे बिभ्रती दैत्यराजम् । नागैः पाशैर्वेष्टयित्वा समन्ताच्छूलेनैनं निघ्नतीं देहमध्ये ४९ सेन्द्रैर्देवैः स्तूयमानां सुवेणीं गन्धर्वाद्यैः सिद्धसङ्घैश्च सेव्याम् । नानावस्त्रैर्भूषणैर्दीप्यमानां ध्यायेद्देवीमम्बिकामुज्ज्वलन्तीम् १५० वस्त्रैर्माल्यैर्यक्षधूपैर्बलिभिर्नैवेद्यैर्भोज्यैर्मोदकैः पायसैश्च । मांसैः पिष्टैश्छागलाद्यैश्च शैषैः पूज्या देवी चण्डिकाऽभीष्टदा च ५१ श्यामां च पृथिवीं ध्यायेत्कूर्मजदृषधारिणीम् ५२ मण्डूकस्थां द्विभुजां स्योना पृथिवीति चार्चयेत् । नैर्ऋत्यां विश्वकर्माणं द्विभुजं टङ्कधारिणम् ५३ उत्पलं दक्षिणे हस्ते पद्मस्थं पीतवाससम् । एवं ध्यात्वा ततो ब्रह्मन्निति मन्त्रेण पूजयेत् ५४ स्वस्थां सरस्वतीं ध्यायेद्वरदाभयदायिनीम् । पीतवस्त्रां सुमुकुटां देवगन्धर्वसेवितां ५५ यामधा इति मन्त्रेण पूजयेत्सितचन्दनैः । बलिं श्वेतचरुं दद्यात्कृसरं यावकं तथा ५६ स्थापयेद्वामदि-

---

मंडलाच्या बाहेर ' श्रीश्च ते ' या मंत्रानें स्थापना करावी व पाढरे चंदन, कमल याच्या योगानें पूजा करून मोदक, पायस व यवाची खीर निवेदन करावी ४३-४९.तदनंतर जिचे रूप अलौकिक आहे, ब्रह्मदेव, इंद्र इत्यादिकाकडून जिची स्तुति होत आहे; जिला तीन नेत्र आहेत, जी श्रेष्ठ सिंहावर बसली आहे, तापलेल्या सुवर्णाप्रमाणें जिची शोभा आहे, मस्तकावर जटाच्या योगाने जिनें अर्धचंद्रास बांधून ठेविलें आहे, जी दिव्य वस्त्रे, आजानुबाहु व आपलीं दिव्य भूषणें यानी युक्त आहे, ब्रह्मदेव, इंद्र इत्यादिकांस दुर्जय असलेल्या महिषासुर राक्षसाचे जी मर्दन करीत आहे४६,४७, उजव्या हातानी जिनें शूल, तीक्ष्ण बाण, शक्ति व तीक्ष्ण तरवार धारण केली आहे व डाव्या हातात जिनें धनुष्य, पाश, ढाल, अंकुश, घंटा व कुऱ्हाड घेतली आहे ४८, तीक्ष्ण खड्गाच्या योगानें शिरश्छेद केल्यामुळे ज्याचें कबंध तुटलें आहे अशा दैत्यराजास जी नागाच्या पाशानें चोहोंकडून आवळून त्याच्या देहाच्या मध्यभागी शूलाने टोंचीत आहे ४९, इंद्रासहवर्तमान देवाकडून जिची स्तुति होत आहे, जिची सुंदर वेणी आहे, गंधर्वादिक व सिद्धसमूह याना जी सेव्य आहे आणि नानाप्रकारचीं वस्त्रे व भूषणे याच्या योगाने जी देदीप्यमान झाली आहे, अशा झळकणाऱ्या देवी अंबिकेचें ध्यान करावें ५०. वस्त्र, माळा, यक्षधूप, छत्रादि उपचार, भक्ष्य व भोज्य पदार्थ, मोदक, पायस, पीठ, बकऱ्यादिकांचे पुष्कळ मास इत्यादि समर्पण करून त्या मनोरथ पूर्ण करणाऱ्या देवी चंडिकेचे पूजन करावें ५१. दोन कमलें धारण करणाऱ्या, श्यामवर्ण, मंडूकस्थ, व द्विभुज पृथ्वीचे ध्यान करावें. व " स्योना पृथिवी " ह्या मंत्रानें तिची पूजा करावी. नैर्ऋत्य दिशेंत द्विभुज, डाव्या हातात टाकी धारण करणाऱ्या व उजव्या हातात कमल धारण करणाऱ्या आणि पिवळें वस्त्र नेसणाऱ्या विश्वकर्म्याचें ध्यान करावे. तात्पर्य, वेणेंप्रमाणें ध्यान करून नंतर " ब्रह्मन्०" या मंत्रानें त्याची पूजा करावी ५२–५४. वर देणाऱ्या व अभय देणाऱ्या, पीत वस्त्र परिधान केलेल्या, उत्तम मुकुटानें युक्त असलेल्या आणि देव व गंधर्व यांच्याकडून सेवित अशा स्वरूपीं स्थित असलेल्या सरस्वतीचे ध्यान करावे. "यामधा०" या मंत्रानें पाढऱ्या चंदनाच्या योगानें तिचें पूजन करावे. शुभ्र चरूचा व यवाच्या खिचडीचा बलि द्यावा. ९५,९६. डावीकडील प्रदेशीं स्थापना करून पूजन करावें. पूर्वादि द्वारप्रदेशीं

भागे कुन्दपुष्पैः समर्चयेत् । पूर्वादिद्वारदेशे तु पूजयेच्च मरुद्गणैः ५७ अग्न्यादिषु च कोणेषु बाह्यभूतान्समाचरेत् । पिशाचा राक्षसा भूता वेतालकपिजातयः ५८ निर्णासाश्चैव ते सर्वे रौद्रा विकृतरूपिणः । ततो मण्डलमध्ये तु वारुणं पूर्ववर्त्मना ५९ पूरयेत्कलशं तत्र सुवर्णादिविनिर्मितम् । कूर्मं कूर्माकृतिं कुर्याच्छुद्धस्वर्णेन सत्तमाः १६० बृहत्पर्वसमाणेन राजतस्य च दुर्लभम् । पादं पादेन मानेन अङ्गुलं परिमण्डलम् ६१ पीठीमत्स्यं तथा कुर्यात्कुलीरं ताम्रनिर्मितम् । तेनैकस्य विनिर्माणं दृग्दृगुलायामविस्तृतम् ६२ तथा मानेन मण्डूकं तां भूमिं मुनिसत्तमाः । शिशुमारं च यत्सम्यक्तोलकद्वयनिर्मितम् ६३ अङ्गुलत्रयदीर्घेण यस्य तस्याकृतिर्भवेत् । सितचन्दनवस्त्रैश्च पूजनीया समन्ततः ६४ याजकांश्च विशेषेण बहुमन्त्रविशारदान् । बहूचौ पूर्वमत्स्यार्थे दक्षिणे तु यजुर्विदौ ६५ सामगौ पश्चिमे नाथ उत्तरेऽथर्ववेदगौ स्मृतौ । जयध्वमिति तान्ब्रूयाद्धोतॄकान्पुनरेव हि ६६ स्थापयित्वा पृथक्सूत्रे मत्स्यं च मातृरुद्रीपमेव च । पञ्चाङ्गं शिवसूक्तं च यथा विष्णोर्हरस्य च ६७ जयाग्रतः पुरुषसूक्तमद्भुतं संभूतमेव च । आशुं शिशानमारभ्य वयं मांसांगरुद्रकं ६८ यज्ञाग्रतश्चाग्नेश्च विष्णोरराटमेव च । समस्ताध्यायरुद्रेण शतरुद्राख्यमीरितम् ६९ पञ्चांगरुद्रस्य पुष्पदन्त ऋषिर्गायत्री छन्दो वेदाहमेतद्बीजम् । श्रीश्च ते इति शक्तिर्नमस्ते रुद्र इति नायकः १७० परमरुद्रो देवता परमस्तुतौ विनियोगः ७१ सप्ताङ्गरुद्रस्य पुष्पदन्त ऋषि पङ्क्तिश्छन्दस्त्र्यम्बकमिति अङ्गुष्ठाभ्यां नमः ७२ त्रिपादूर्ध्वमिति तर्जनीभ्यां स्वाहा ७३ वेदाहमिति मध्यमाभ्यां वषट् । अमीषां चित्रमिति मध्य-

---

त्याची मरुद्गणासह पूजा करावी व आग्नेयादि कोणामध्ये बाहेरच्या बाजूस असलेले पिशाच, राक्षस, भूत, वेताल व वानराच्या जाति याची पूजा करावी ५७,५८. हे सर्व नाकाशून, भयंकर व विद्रूप असतात. तदनंतर मंडलाच्या मध्यभागी पूर्वमार्गाने वरुणयुक्त कलशास पुर्वार्ध व तेथे सुवर्णादिकाचे तयार केलेले प्राणी ठेवावे. म्हणजे, हे सज्जनहो, शुद्ध सुवर्णाने कूर्माच्या आकृतीचा कूर्म करावा ५९,६०. मोठ्या पर्वाच्या प्रमाणाने रुप्याचा मत्स्य तर दुर्लभच होय. चतुर्थांश प्रमाणाने त्याचे पाद व अंगुल प्रमाण मध्यमडल (मध्यभाग) करावे ६१. त्याचप्रमाणे ताम्राचा मकर करावा. त्याची लांबी व रुंदी दोन अंगुले व एक मुद्रा हे प्रमाण असावे ६२. त्याच प्रमाणाने मंडूक (बेडूक) व हे श्रेष्ठ मुनिहो, त्या भूमीस निर्माण करावे. दोन तोळे रुप्याचे उत्तम प्रकारे शिशुमार करावे ६३. त्याची आकृति तीन अंगुले लांब असावी. पांढरे चंदन व वस्त्रे याच्या योगाने सर्वत्र पूजा करावी. विशेषत या कर्ममध्ये मंत्रात अतिशय कुशल अशा याजकाची योजना करावी. पूर्वेस दोन ऋग्वेदी, दक्षिणेस दोन यजुर्वेदी, पश्चिमेस दोन सामवेदी व हे महाराज, उत्तरेस दोन अथर्ववेदी असावे. त्यास " जयध्वम् (तुम्ही विजयी व्हा) " असे म्हणावे व तसेच पुनरपि होण्यासही म्हणावे ६४–६६. पृथक् सूत्रावर सर्प व मातरुद्दीप याची स्थापना करावी. पंचांग, शिवसूक्त, तसेच विष्णु व हर याची सूक्ते. जयाच्या अग्रभागी पुरुषसूक्त, ' अद्भुत. संभूत० ' हा अनुवाक, ' आशु शिशान ' येथपासून ' वय मांसा ' येथपर्यंत, ' यज्ञाग्रतश्चाग्ने० ', ' विष्णोरराट० ' व सर्व रुद्राध्यायांत सांगितलेले शतरुद्राख्य म्हणावे ६७-६९. पंचांगरुद्राचा पुष्पदंत ऋषि, गायत्री छंद, ' वेदाहमेतत्० ' हे बीज, ' श्रीश्च ते ' ही शक्ति, ' नमस्ते रुद्र ' हा नायक ७०, परमरुद्र ही देवता व परमस्तुतीमध्ये विनियोग आहे ७१. सप्तांगरुद्राचा पुष्पदंत ऋषि व पंक्ति छंद आहे. ' त्र्यंबकं० ' हा मंत्र म्हणून ' अंगुष्ठाभ्यां नम. ' असा न्यास करावा ७२. ' त्रिपादूर्ध्व० ' ही ऋचा म्हणून ' तर्जनीभ्या स्वाहा ' असा न्यास करावा ७३. ' वेदाहम् ० ' हा मंत्र म्हणून ' मध्यमाभ्या वषट् ' असा

माभ्यां हुम् ७४ यवाग्नं सोम इति कनिष्ठिकाभ्यां वौषट् । परितो धेनुमेति करतलकरपृष्ठयोः ७५ श्रीश्च ते इति अस्त्राय फडिति । चतुर्दिक्षु छोटिकादानम् ७६ यज्जाग्रत इति हृदयाय नमः । सहस्रशीर्षेति शिरसे स्वाहा ७७ अद्भ्यः संभृत इति शिखायै वषट् । आशुः शिशान इति कवचाभ्यां हुम् । नमस्ते रुद्र इति नेत्राभ्यां वौषट् ७८ रूढ ब्रह्मन्निति अस्त्राय फट् । सर्वाङ्गेषु । होमे प्रवर्तमाने तु सूक्तानन्यांश्च वै जपेत् ७९ प्रजपद्वारुणं सूक्तं तथा च पालसूक्तकम् । रात्रिसूक्तं च रौद्रं च पावमानं समुज्ज्वलम् १८० जपेच्च पौरुषं सूक्तं सर्वता वरतं पृथक् । शाक्तं रौद्रं च सौम्यं च कूष्माण्डं जातवेदसम ८१ सौरसूक्तं च यजतो दक्षिणेन यजुर्विदः । वैराजं पौरुषं सूक्तं सौवर्णं रुद्रसंहितम् ८२ शैवं पञ्चानिरयं गायत्रं ज्येष्ठसाम च । वामदेव्यं बृहत्सामं तथा चैव रथन्तरम् ८३ गोव्रतं च विकर्णं च रक्षोघ्नं पावनं स्मृतम् । गायन्तं ब्राह्मणा ये च पूर्वादिद्वारदेशतः ८४ अन्नात्परिस्रुत इति पञ्च पूर्वं सौरसूक्तकम् । रुद्राध्यायं च पञ्चाङ्गं रौद्रं इत्यभिधीयते ८५ आप्यायस्वेति च चतुः सौम्यं सूक्तं प्रचक्षते । ईशा वास्यादि स्वांगं च कौष्माण्डं दशमं स्मृतम् ८६ अग्न आयाहि बृहदुक्थे नवसूक्तं वै जातवेदसम् । षोडशं तु विश्वे देवहतसौरं सूक्तं प्रकीर्तितम८७ सौरसूक्तं ध्रुवेसीति इषवो मङ्गलं स्मृतम । रात्रिसूक्तं हि यज्जाग्रे रक्षोघ्नं शैवसूक्तकम ८८ गणानान्त्वेति पञ्च आपोहिष्ठेति च त्रयम् । पवमानं तु तद्विद्धि पावमानं तु षोडश ८९ समस्तदेवयागेषु तद्ग्राह्यं तु तदूर्ध्वकम् । तदर्द्धार्द्धं च आरामे कूपे त्वेकं ऋचं जपेत् १९० स्वगृह्योक्तविधानेन

न्यास करून पुन ' अमीषा चित्र० ' असा मंत्र म्हणून ' मध्यमाभ्यां हुम् ' असा न्यास करावा ७४. ' यवाग्नं सोम० ' या मंत्राने 'कनिष्ठिकाभ्यां वौषट्' असा व परितो धेनुम्० या मंत्रानें करतलकरपृष्ठावर न्यास करावा ७५. ' श्रीश्च ते० ' या मंत्रानें अस्त्राय फट् असा न्यास करावा व चारी दिशास चुटक्या वाजवाव्या. (आता हृदयादिन्यास असा —) ' यज्जाग्रत० ' असे म्हणून हृदयाय नम., सहस्रशीर्षे या मंत्रानें शिरसे स्वाहा, ७६,७७, ' अद्भ्यः संभृत ' या मंत्रानें शिखायै वषट्, 'आशु शिशान० ' या मंत्रानें कवचाभ्यां हु, " नमस्ते रुद्र० " या मंत्रानें नेत्राभ्यां वौषट ७८, "रूढ ब्रह्मन्० " या मंत्रानें अस्त्राय फट् असे म्हणून सर्वांगावर न्यास करावा. होमामध्ये प्रवृत्त होत असताना दुसरीं सूक्तेंही म्हणावीं ७९. म्हणजे वारुणसूक्ताचा जप करावा. पालसूक्त, रात्रिसूक्त, रुद्रसूक्त व उज्ज्वल पवमानसूक्त याचा जप करावा. आणि सर्वांच्या शेवटी पुरुषसूक्त निराळेंच म्हणावे. शाक्त, रौद्र, सौम्य, कूष्माण्ड, जातवेदस व सौरसूक्त हीं सूक्त यज्ञकार्यांच्या दक्षिणेस बसून यजुर्वेदी यानीं म्हणावे. वैराज, पौरुषसूक्त, सुवर्णसूक्त, रुद्रसंहिता, शैव, पंचाग्निरय, गायत्र, ज्येष्ठसाम, वामदेव्य, बृहत्साम, त्याचप्रमाणे रथंतरसाम ८०-८३, गोव्रत, विकर्ण, व रक्षोघ्न सूक्त पवित्र सांगितलेले आहे. पूर्वादि द्वारप्रदेशातून ब्राह्मण याचे गायन करीतात ८४. " अन्नात्परिस्रुत " इत्यादि पांच ऋचांसह सौरसूक्त व पांच रुद्राध्याय म्हणजे रुद्रसूक्त म्हणून सांगितलेले आहे ८५. " आप्यायस्व० " या चार ऋचांस सौम्यसूक्त म्हणतात. " ईशा वा " व " स्वांग० " यास दशम कूष्माडसूक्त म्हटले आहे ८६. " अग्ने बृहन् " इत्यादि नऊ ऋचांच्या सूक्तास जातवेदसूक्त, सोळा ऋचांच्या विश्वाट् बृहत्सौरास सौरसूक्त म्हटले आहे किंवा " ध्रुवेसी० " इत्यादि सौरसूक्त इषवोमंगल म्हटलेले आहे. " यज्जाग्रे " हें रात्रिसूक्त, व रक्षोघ्न हे शैवसूक्त होय ८७, ८८. " गणानां त्वा० " या पांच व आपोहिष्ठा० या तीन ऋचा मिळून पवमानसूक्त होतें, असे समजावे. वस्तुतः पवमानाच्या सोळा ऋचा आहेत ८९. पण देवयज्ञामध्ये तें सर्व म्हणावे. रात्रीं तर ते अर्धेच म्हणावे. आरामाच्या उत्सर्गसमयी तर पांच सूक्तच म्हणावे व कूपाच्या उत्सर्गसमयी एकाच ऋचेचा जप करावा ९०. आपल्या गृह्यसूत्रात सांगितले

प्रतिकुण्डेषु होमयेत्। संस्कुर्यादीक्षणाद्यैश्च संपूज्य च परस्परम् ९१ प्रज्वाल्यार्ग्निं च विधिवद्धोमं कुर्यादनन्तरम्। वागीश्वरं समभ्यर्च्य वागीश्वर्या समन्वितम् ९२ यस्य देवस्य यो यागः प्रतिष्ठा यस्यकस्यचित्। यागेन तस्य जुहुयात्सहस्रं च शतं तथा ९३ तिलाज्यैः पायसैर्वाथ पद्मपुष्पाक्षतेन च। ग्रहेभ्यो विधिवत्सर्वं तथेन्द्रायेश्वराय च ९४ मरुद्भ्यो लोकपालेभ्यो विधिवद्विश्वकर्मणे। ऊर्जेन समिधा कुर्यादष्टाष्टौ स्वगृहेष्वपि ९५ इन्द्रेश्वरमरुतां तिलाज्येन घृतेन वा। एकैकामाहुतिं दद्यात्तैः स्वैर्मन्त्रैर्यथाक्रमात् ९६ दिगीशानां च प्रत्येकमष्टाष्टौ च विशेषतः। विश्वकर्मन्निति मन्त्रेण कृत्वा आज्याहुतित्रयम् ९७ समित्त्रयं पलाशस्य अथवाऽश्वत्थसंभवम्। एकैकामाहुतिं दद्यादाज्येन च विशेषतः ९८ शिवं प्रजापतिं विष्णुं दुर्गां च कमलामपि। सरस्वतीं च विधिवत्पृथिव्या इति पावकैः ९९ भूतेभ्योऽप्याहुतिं दद्यादेव मासद्वयं क्रमात्। अन्येषां मधुराक्तेन तिललाजैर्यथाक्रमम् १०० विष्णुं चैव तु वायव्ये दुर्गायाश्च तथोत्तरे। कमलायाश्च ऐशाने ईशानस्य सभूतकम् १ एककुण्डे तु एकस्मिन्होमं कुर्याद्यथाविधि। पञ्चे वै पञ्चकुण्डे तु पूर्वादीनां क्रमेण तु २ एककुण्डे ग्रहान्कृत्वा कृत्वा बलिभिदा सह। दक्षिणे क्रमतश्चैव लोकेशं च तथैव च ३ पश्चिमे यस्य यागस्य दुर्गायाश्चोत्तरे दिशि। ईशाने भूतयक्ष्मा च जुहुयादुत्तमोत्तमः ४ विष्ण्वादि देवतानां च अग्रकुण्डे विधीयते। प्रथमे दिवसे कुर्यादेवतानां च स्थापनम्। द्वितीये पूजनं कुर्याद्धोमं कुर्याद्यथाविधि ५ बलिदानं तृतीये तु चतुर्थीकं चतुर्थके। नीराजनं पञ्चमे तु पञ्चाहसाध्यको विधिः। त्र्यहसाध्ये तृतीये तु नवाहे

ल्या विधीनें प्रतिकुंडामध्यें होम करावा. व परस्पराचें पूजन करून पाहणें इत्यादिकाच्या योगाने संस्कार करावें ९१. ननर अग्नीस प्रज्वलित करून यथाविधि होम करावा. वागीश्वरीसह वागीश्वराचे पूजन करून ९२ ज्या देवाचा जो याग असेल किंवा ज्या कोणाची प्रतिष्ठा असेल त्यास उद्देशून प्रथमतःच तिल, घृत, पायस किंवा पत्रें, पुष्पें व अक्षता यान्या हजार व तशाच शंभर आहुत्या द्याव्या. ग्रह, इंद्र, ईश्वर यास उद्देशूनही यथाविधि हवन करावे९३,९४. मरुत्, लोकपाल, विश्वकर्मा यास यथाशास्त्र ऊर्जमंत्रानें समिधान्या आठ आठ आहुत्या आपल्या गृहातहीं द्याव्या ९५. इंद्र, ईश्वर व मरुत् यास तिल व आज्य किंवा नुस्ते घृत यांची एकएक आहुति आपापल्या मंत्राने क्रमपूर्वक द्यावी९६. विशेषतः दिक्पालातील प्रत्येकास आठ आठ आहुति द्याव्या. " विश्वकर्मन् " या मंत्रानें तीन आज्या (तुपा) च्या आहुति करून, पलाशाच्या किंवा अश्वत्थाच्या तीन समिधा करून विशेषतः आज्याने एक एक यायप्रमाणें शिव, प्रजापति, विष्णु, दुर्गा, कमला, सरस्वती यास आहुति द्याव्या. " पृथिव्या० " इत्यादि पावक मंत्रादिकानीं भूतासही आहुति द्यावी. ह्याप्रमाणें क्रमाने दोन महिने करावे. दुसऱ्या देवतास मधाने भिजलेल्या तिलानीं व लाह्यानीं क्रमानें आहुति द्याव्या १९६–२००. विष्णूस वायव्य दिशेत, दुर्गेस उत्तरेत, कमलेस ईशान्य दिशेत, व ईशान्येतच भूतासह ईशानास उद्देशून एका कुंडात एकाच कालीं यथाविधि होम करावा व दुसऱ्या पक्षी पूर्वादिक्रमाने पाच कुंडात होम करावा. इंद्रासह एका कुंडात ग्रह करून दक्षिणेस याच क्रमानें लोकपालास, पश्चिमेस यागाच्या देवतेस, उत्तर दिशेत दुर्गेस व ईशान्येस भूत व यक्ष्मा यांस उद्देशून उत्तम आचार्यानें हवन करावें १–४. विष्णु इत्यादि देवतांचें हवन अग्रकुंडात करण्याविषयीं विधान आहे. पहिल्या दिवशीं देवताची स्थापना करावी. दुसऱ्या दिवशीं पूजन करावें व यथाविधि होम करावा ५. तिसऱ्या दिवशीं बलिदान व चवथ्या दिवशीं चतुर्थीकर्म करावे आणि पाचव्या दिवशीं नीराजनविधि करावा. तात्पर्य, हा पाच दिवसांत साध्य होणाऱ्या यागाचा विधि झाला. त्र्यहसाध्य

त्वथ पञ्चमे ६ प्राङ्मुखोदङ्मुखो वापि ऐशान्यादिक्रमेण तु । प्रादक्षिण्येन यज्ञं तु मन्त्रैः परिसमूहनम् । मन्त्रपूर्वं साग्निकात् निरग्नेस्तुष्टिकेन तु ७ त्रिकुण्डेन महायागे विवाहादौ द्विपत्रकम् । वैश्वदेवे त्वेकपत्रमिति साधारणो विधिः । दिग्विदिक्षु परिस्तीर्य महायागेषु सर्वदा ८ दिक्षु मात्रं नित्यके च वैश्वदेवे तथैव च । अकृत्वा चैव नित्यं च वृथा नैमित्तिकं हि यत् ९ तस्मात्फलार्थैरपि तत्कृत्वा नैमित्तिकं चरेत् । प्रायश्चित्ते वैश्वदेवे सायप्रात कृतीषु च २,१० मारणोच्चारहोमेषु तथा संकल्पितादृतौ । प्रत्यवाय कुले क्वापि तत्र नित्याकृतिं विना ११ शतार्द्धं जुहुयाद्यत्र तत्र नित्यं विवर्जयेत् । तूष्णींहोम ततः कृत्वा तूष्णीमेव जितेन्द्रियः १२ यजपेदिन्द्रमग्निं च सोमाय च यथाक्रमम् । ततस्तु समिधाहोमं व्याहृतिस्तदनन्तरम् १३ भूर्भुवःस्वाहेति वृथा त्वन्न इत्यादि पञ्चकम् । अन्ते स्विष्टकृतं दद्याद्विधान तस्य भो शृणु १४ घृताहुतीस्विष्टकृच्च द्विजसंस्कारकर्मसु । घृतैः स्विष्टकृत दद्याद्यागादौ परिवर्जयेत् १५ सर्वौषध्युदकस्नानं करिदन्तोत्थमृण्मया । रथ्यावल्मीकगोष्ठस्य तथाऽश्वस्य सुरस्य च १६ त्रिगन्ध च त्रिशीत च कुशमूलस्य मृत्तिका । निक्षिपेत्स्नानकुम्भेषु आचार्यादींस्तु स्थापयेत् १७ यजमानः पुरः कृत्वा दन्तकाष्ठपुरःसरम् । रात्रौ च भक्ष्यभोज्यादै. परितोष्य यवाक्षतम् १८ कृत्वा यथोक्तकालेन पूजयेत्तैलधारया । ततः प्रभाते विमले स्नानं कुर्याद्यथाविधि १९ स्नानमाब्दैवतैर्मन्त्रैः सूक्तेन पुरुषेण तु । वारुणेन च सूक्तेन सुरास्त्वादि यथाक्रमम् २,० सुरास्त्वामभिषिञ्चन्तु ब्रह्मविष्णुमहेश्वराः । वासुदेवो जग-

---

होमामध्यें नीराजनविधि तिसऱ्या दिवशीं व नऊ दिवसांत साध्य होणाऱ्या होमात पाचव्याच दिवशीं ६ प्राङ्मुख किंवा उदङ्मुख होऊन ईशान्यादिक्रमानें उजवीकडे यज्ञ करावा. मंत्रांनीं परिसमूहन करावें. जे साग्निक असतील त्याचे हे कर्म मंत्रपूर्वक व अग्निरहिताचें तुष्टिक मंत्राने; महायागामध्यें त्रिकुशानें, विवाहादिकामध्यें द्विपत्रक व वैश्वदेवामध्यें एकपत्र असा हा साधारण विधि आहे. महायागामध्यें सर्वदा दिशा व विदिशा यामध्ये परिस्तरणे घालावीं ७,८. विश्वेदेव व नित्यकर्म यामध्ये केवल दिशांमध्येंच परिस्तरणें घालावी. नित्यकर्म न करिता जे नैमित्तिक कर्म केलें जातें तें व्यर्थ आहे ९. यास्तव, सर्व सफल अशीं हीं तीं नित्यकर्में करून नंतर नैमित्तिक कर्म करावें. प्रायश्चित, वैश्वदेव व त्याचप्रमाणें सायंप्रातःकृतींमध्ये १०, मारणोच्चारहोमामध्ये, त्याचप्रमाणे संकल्पित कृतीमध्यें किंवा कुलामध्यें कोठेंही प्रत्यवाय असता तेथें नित्याकृतीवाचून तें तें कर्म करावें ११. जेथें अवशत होम होतो तेथें नित्य वर्जावें. नंतर चतुर्थ होम करून जितेंद्रिय यजमानानें मुकाट्यानें इंद्र, अग्नि व सोम याचा क्रमानें जप करावा. तदनंतर समिद्धोम, तदनंतर भूर्भुवःस्वः स्वाहा असा व्याहृतिहोम, त्याचप्रमाणें " त्वन्न० " इत्यादि पचक व शेवटीं स्विष्टकृत होम द्यावा. अहो महाराज, त्याचें विधान आता ऐका १२–१४. द्विजाऱ्या संस्कारकर्मामध्यें घृताहुतीनें स्विष्टकृत होतें. साराश, स्विष्टकृत् होम घृतानें द्यावा, पण यागादिकामध्यें त्यास वर्जावें १५. नंतर सर्वौषधींनीं युक्त अशा उदकानें स्नान करावें. हस्तिदंताचा भुगा, वाट, बारुळ व गोठा यातील माती, अश्वाच्या खुरावरील माती, देवालयातील माती, कापूर, चंदन व अगुरु हे तीन गंध; वाळा इत्यादि तीन शीतल पदार्थ, व दर्भाच्या मूळातील मृत्तिका हे पदार्थ स्नानाकरिता भरलेल्या घटात टाकावे व आचार्यादिकाची स्थापना करावी १६,१७. यजमानानें प्रथमतः दंतकाष्ठानें दांत घासून, रात्रीं भक्ष्य, भोज्य इत्यादिकानीं ब्राह्मणास अतिसंतुष्ट करून, यवाक्षता तयार करून शास्त्रोक्त कालीं तेलाच्या धारेनें पूजन करावें. तदनंतर चागलें उजाडलें असता प्रातःकालीं यथाविधि स्नान करावें १८,१९. ज्याची आप् ही देवता आहे अशा मंत्रांनीं,

आथस्तथा संकर्षणः प्रभुः २१ आखण्डलोऽग्निर्भगवान्यमो वै निर्ऋतिस्तथा । वरुणः पवन श्चैव धनाध्यक्षस्तथा शिव २२ ब्रह्मणा सहितः शेषो दिक्पालाः पान्तु ते सदा कीर्तिर्लक्ष्मीर्धृतिर्मेधा पुष्टिः श्रद्धा क्रिया मतिः २३ बुद्धिर्लज्जा वपुः शान्तिस्तुष्टिः कान्तिश्च मातरः । एतास्त्वामभिषिञ्चन्तु देवपत्न्यः समाहिताः २४ आदित्यश्चन्द्रमा भौमो बुधजीवसितार्कजाः । ग्रहास्त्वामभिषिञ्चन्तु राहुः केतुश्च तर्पिता २५ देवदानवगन्धर्वा यक्षराक्षसपन्नगाः ऋषयो मनवो देवा देवमातर एव च २६ देवपत्न्यो द्रुमा नागाः दैत्याश्चाप्सरसां गणाः । अस्त्राणि सर्वशस्त्राणि राजानो वाहनानि च २७ ओषधानि च रत्नानि कालस्यावयवाश्च ये । सरितः सागराः शैलास्तीर्थानि जलदा नदाः २८ एते त्वामभिषिञ्चन्तु सर्वकामार्थसिद्धये । स्नानं समाप्य विधिवत्स्वगणेनानुलेपयेत् २९ गवामष्टोत्तरशतं तदर्धं चाथ विंशतिः । आचार्यायाभिरूपाय प्रदद्यादभिपूजयन् ३० ततः प्रभाते विमले जले समवतारयेत् । शुद्धां च कपिलां दोग्ध्रीं घण्टाचामरवर्जिताम् ३१ सामगाय ततो दद्यात्सुवर्णं दक्षिणान्वितम् । यूपमादाय संस्थाप्य स्नापयेद्वारुणं जपन् ३२ अच्छेवतेन मन्त्रेण गायत्र्या तदनन्तरम् । रोचनां च त्रिरत्नेन तथा कुम्भोदकेन च ३३ पर्वताग्रमृदा तोयनागवल्मीकमेव च । गजदन्तमृदा चैव कुशामूलमृदा तदा ३४ पुष्पोदकेन संयुक्तेन तथा रत्नोदकेन च । दध्यक्षतेन दुग्धेन घृतेन शतधारया ३५ सुगन्धेन त्रिशीतेन विलिप्य च समाहितः । दापयेत्काम्यमूलं च दद्याल्लोहमयं च वा ३६ माल्यवस्त्रैरलङ्कृत्य पूजयेद्गन्धचन्दनैः । ईशा वा इति मन्त्रेण दद्यात्पुष्पाञ्जलिं

पुरुषसूक्तानें, वरुणसूक्तानें, व सुरास्त्वा० इत्यादि मंत्रांनी क्रमानें अभिषेक करावा २० ' सुरास्त्वा० ' इत्यादि पौराणिक मंत्राचा अर्थ—देव, ब्रह्मा, विष्णु, महेश्वर, वासुदेव, जगन्नाथ, तसाच संकर्षण प्रभु २१. इंद्र, अग्नि, भगवान् यम, तसाच निर्ऋति, वरुण, पवन, कुबेर व तसाच शिव तुला अभिषेक करो २२. ब्रह्मदेवासहवर्तमान शेष व दिक्पाल तुझे सर्वदा रक्षण करोत. कीर्ति, लक्ष्मी, धृति, मेधा, पुष्टि, श्रद्धा क्रिया, मति, बुद्धि, लज्जा, वपु, शांति, तुष्टि, कांति व माता या व देवस्त्रिया शांतपणें तुजवर अभिषेक करोत २३,२४. सूर्य, चंद्रमा, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु व केतु हे तृप्त झालेले ग्रह तुजवर अभिषेक करोत २५. देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, सर्प, ऋषि, मनु, देव, देवान्य माता, देवपत्न्या, वृक्ष, सर्प, दैत्य, अप्सरांचे समुदाय, अस्त्रे, सर्व शस्त्रे, राजे, वाहनें २६,२७, औषधें, रत्ने, कालाचे अवयव, नद्या, सागर, पर्वत, तीर्थे, मेघ, नद हे सर्व कामान्या सिद्ध्यर्थ तुजवर अभिषेक करोत. ह्याप्रमाणे यथाविधि स्नान करून आपल्या समुदायाकडून अनुलेपन करवावे २८,२९. नंतर योग्य अशा आचार्यास त्याची पूजा करून एकशें आठ, चोपन्न किंवा वीस गाई द्याव्या ३०. नंतर चागला उजेड पडला असता जलामध्यें उतरावें व शुद्ध, दुभती, कपिला (थोडी लाल) व घंटा आणि चामर यांनीं रहित अशी गाय सुवर्णान्या दक्षिणेसह सामगायन करणाऱ्या ब्राह्मणास द्यावी. यूप (स्तंभ) घेऊन त्याची स्थापना करावी व वारुणसूक्त ह्मणत त्यास स्नान घालावें ३१,३२. तदनंतर " अच्छेवत० " या मंत्रानें गायत्रीनें रोचना, तीन रत्ने व त्याचप्रमाणें कुंभोदक ह्यांनीं स्नान घालावें ३३. पर्वताच्या अग्रभागावरील मृत्तिकायुक्त उदक, नागवल्लीचें उदक, हस्तिदंताची मृत्तिका, कुशाच्या मूलातील मृत्तिका, पुष्पोदक, रत्नोदक, दधियुक्त अक्षता व दुध हे सर्व पदार्थ घटांत घालून शभर धारा पाडवून, सुगंध व तीन शीतल द्रव्यें याचा लेप लावून स्नान घातल्यावर कास्यमूल किंवा लोहमय मूल द्यावें ३४-३६. पुष्पे व वस्त्रे यांच्या योगानें त्यास अलंकृत करून सुगंधी चंदनानें त्याचें पूजन करावें. ' ईशा वा० ' या

त्रयम् ३७ पुनस्त्वादिति मन्त्रेण पुनः पुष्पं समुत्सृजेत्। मादेशमात्रं विस्तार मध्ये वृत्त षड-ङ्गुल ३८ कांस्यचक्रस्य मान तु ऊर्ध्वं यद्द्वादशाङ्गुलम्। तदूर्ध्वे विलिखेच्छूल चतुरङ्गुल-मानतः ३९ अङ्गुष्ठहीन लोहस्य तत्र शूल न कारयेत्। ततो मङ्गलपूर्वं तु द्विजातीनां मतेन च २४० समुत्सृजेच्च प्रासाद तडाग च विशेषतः। चतुर्दर्भं गृहीत्वा तु ईशानाभिमुखेन तु ४१ समुत्सृजेत्ततः पश्चाद्वाक्यमेतदुदीरयेत् ४२ ओमित्यादि श्रीकृष्णद्वैपायनाभिधानवेदव्यासप्रणीत-भविष्यपुराणोक्तफलप्राप्तिकामश्चतुष्कोणाद्यवच्छिन्नमत्कारितपुष्करिणीजलमेतदूर्जित गन्ध-पुष्पाद्यर्चित वरुणदैवतं सर्वसत्त्वेभ्यः स्नानावगाहनार्थमहमुत्सृजे ४३ ततो वरुणसूक्तेन वरुण नागसयुतम्। मकर कच्छप चैव तोयेषु परिनिक्षिपत् ४४ पूजयेद्वरुण देवमर्घ्य दद्याद्वि-शेषतः। तेनोदकेन सस्नाप्य गजदन्तोत्थमृत्तिका ४५ श्वेताश्वसुरसभूत श्रीश्च तेति च सजपन्। आप्यायस्वेति मन्त्रेण मृद चतुष्पथोद्भवाम् ४६ तद्विष्णोरिति मन्त्रेण कुशमूलन स्थापयेत्। तीर्थतोयेन गन्धेन तथा पञ्चामृतेन च४७गायत्र्या स्नापयेद्देव रत्नतोयेन साधकः। आप्यायस्वेति मन्त्रेण क्षीरेण तदनन्तरम् ४८ दधिक्राव्णेति दध्ना च मधुवातेति वै मधु। सरस्वत्यांतेति जातिपुष्पतोयेन स्नापयेत् ४९ वरुणोत्तमेति मन्त्रस्य नारायण ऋषिः गायत्री छन्दो वरुणो देवता वरुणप्रीतये विनियोगः २५० श्रीश्च ते इति मन्त्रस्य कर्दम ऋषिः पङ्क्तिश्छन्दः सरिता देवता अश्वखुरमृदा स्नाने विनियोगः ५१ आप्यायस्वेति मन्त्रस्य पर्वत ऋषिः उष्णिक्छन्दः सरस्वती देवता वरुणप्रीतये चतुष्पथमृदा स्नाने विनियोगः ५२ तद्विष्णोरिति मन्त्रस्य मैनाक

मंत्राने तीन पुष्पाजलि द्याव्या ३७. ' पुनस्त्वात्० ' ह्या मंत्राने पुनरपि पुष्प समर्पण करावे. ज्याचा विस्तार टीचभर आहे; मध्ये सहा अंगुले वर्तुळ आहे, व वरच्या बाजूस बारा अंगुले प्रमाण आहे असे काशाच्या चक्राचे मान उक्त आहे. त्याच्यावर चार अंगुल प्रमाणाचा शूल लिहावा ३८,३९. लोहाचे चक्र कर्तव्य असल्यास त अंगुष्ठहीन प्रमाणाचें करावे. त्याच्यावर शूल करवूं नये. तदनतर मंगलपूर्वक ब्राह्मणाच्या मतानें प्रासाद व विशेषत: तडाग याचा उत्सर्ग करावा. चार दर्भ घेऊन व ईशान्यदिशेकडे तोंड करून त्याचा उत्सर्ग (त्याग) करावा व नंतर हे वाक्य ह्मणावें ४०–४२. ॐ असें ह्मणून श्रीकृष्णद्वैपायन असें ज्याचें नाव आहे अशा वेदव्यासानीं केलेल्या भविष्यपुराणोक्त फलाची इच्छा करणारा मी, चतुष्कोणादिकानीं युक्त अशा कर-विलेल्या या पुष्करिणीचे, उत्तम गंधपुष्पादिकानीं अर्चित व वरुण ही ज्याची देवता आहे, असें हे जल सर्व प्राण्यास स्नान, पान इत्यादिकाकरिता देतो ४३. तदनतर वरुणसूक्तानें नागयुक्त वरुण, मकर व कासव यांस त्या उदकात सोडावे ४४. वरुणदेवाचे पूजन करावे व विशेषत. त्यास अर्घ्य द्यावे. त्या उदकानें त्यास स्नान घालून गजाच्या दंतावरील मृत्तिका, श्वेत अश्व व देव यांच्या जवळील मृत्तिका, ' श्रीश्च ते० ' या मंत्राचा जप करीत द्यावी. " आप्यायस्व० " या मत्राने चव्हाट्यावरील माती द्यावी ४५,४६. ' तद्विष्णो० ' या मंत्रानें कुशमूलाची माती घेऊन ती पाण्यात घालावी. नतर तीर्थोदक, गंध व पंचामृत याच्या योगाने गायत्रीमंत्र ह्मणत साधकानें रत्नोदकानें देवास स्नान घालावे. नंतर " आप्यायस्व " या मत्राने दुग्धस्नान घालावें. " दधिक्राव्णो० " या मंत्राने दधिस्नान, " मधुवाता० " या मत्रानें मधुस्नान, व "सरस्वत्यांते०" ह्या मंत्राने जातिपुष्पाच्या उदकाने स्नान घालावे ४७–४९. "वरुणोत्तम०" या मत्राचा नारायण ऋषि, गायत्री छंद, वरुण देवता व वरुणप्रीत्यर्थ विनियोग आहे ५० "श्रीश्च ते०" या मंत्राचा कर्दम ऋषि, पंक्ति छंद, सरिता देवता व अश्वाच्या खुराजवरील मृत्तिकेच्या स्नाना-

ऋषिस्त्रिष्टुप्छन्द सरस्वती देवता वरुणप्रीतये कुशमृदा स्नाने विनियोगः ३ कयानेति मन्त्रस्य वसिष्ठ ऋषिरनुष्टुप्छन्दः सोमो देवता वरुणप्रीतये नागगन्धस्नाने विनियोगः ५४ तेजोऽसीति मन्त्रस्य गर्ग ऋषिस्त्रिष्टुप्छन्दः वासवो देवता वरुणप्रीतये विनियोगः ५५ सरस्वत्यै भैषज्येनेति मन्त्रस्य वामदेव ऋषिः पङ्क्तिश्छन्दो विष्णुर्देवता वरुणप्रीतये विनियोगः ५६ पुष्पोदकस्नाने अग्न आयाहीति मन्त्रस्य जनार्दन ऋषिः जगती छन्द ऐन्द्री देवता वरुणप्रीतये विनियोगः ५७ प्रक्षिप्येत्यश्वत्रीहींश्च इयश्रेति च संपठन्। पश्चान्नीराजनं कुर्यात्पञ्चधोषपुरःसरम् ५८ शिरीषपुष्पसंभूतं दर्पणं कांस्यसंभवम् । गोपीचन्दनसंभूतं गङ्गामृत्तिकयाऽथवा ५९ कृष्णा गौर्गोमयं वापि स्वस्तिकं शङ्खमेव च । कारवपदकं वापि यवगोधूमकस्य वा २६० उत्पन्नस्वर्णसंभूत कलशं माषसंभवम् । श्रीरसं पुष्पसंभूतं दर्पणं कांस्यसंभवम् ६१ नन्द्यावर्तं मलयजे ततो निर्मलबन्धुधीः। एकैकं प्रतिमन्त्रेण प्रत्येक तु जलोपरि ६२ ध्रुवं प्रतिकृतैर्मन्त्रैरष्टभिश्च यथाक्रमम् । पूर्वाक्षत माषभक्तबलिं दद्याद्विधानतः ६३ ततो नारायणसूक्तेन देव नारायणं व्रजेत् । अन्येषां चैव देवानां प्रदद्यात्त्रिंशतं बलिम् ६४ तत आचमनीयं च वस्त्रयुग्म निवेदयेत् । वक्ष्यमाणेन मन्त्रेण क्रमेणापि विधानतः ६५ पृथक्पृथक्ततो दद्यात्तावत्येनापि भो द्विजाः । देवसूत्रसमायुक्ते यज्ञसूत्रसमन्विते ६६ सर्ववर्णप्रभेदेन वासांसि प्रतिगृह्यताम् । शरीरं तेन जानामि चेष्टा नैव च नैव च ६७ मया निवेदितान्गन्धान्प्रगृह्य च विलिप्यताम् । अष्टोत्तरशतान्दीपान्परितः स्थापयेत्क्रमात् ६८ तदर्धं वा पञ्चविंशं मन्त्रेण प्रयजेत्सुधीः । त्वं सूर्यचन्द्रज्योतींषि विषादस्त्व तथैव च ६९ त्वमेव

कडे विनियोग आहे ५५. " आप्यायस्व० " ह्या मंत्राचा पर्वत ऋषि, उष्णिक् छंद, सरस्वती देवता, व वरुणप्रीत्यर्थ चव्हाट्यावरील मृत्तिकेच्या स्नानात विनियोग आहे ५१,५२. " तद्विष्णो० " ह्या मंत्राचा भैनाक ऋषि, त्रिष्टुप् छंद, सरस्वती देवता व वरुणप्रीत्यर्थ कुशाच्या मूळातील मृत्तिकेच्या स्नानाकडे विनियोग आहे ५३. " कयान० " ह्या मंत्राचा वसिष्ठ ऋषि, अनुष्टुप् छंद, सोम देवता, व वरुणप्रीत्यर्थ नागगंधस्नानात विनियोग आहे ५४. " तेजोसि० " ह्या मंत्राचा ऋषि गर्ग, छंद त्रिष्टुप्, इंद्र देवता व वरुणप्रीत्यर्थ विनियोग आहे ५५. " सरस्वत्यै भैषज्येन० " ह्या मंत्राचा ऋषि वामदेव, छंद पंक्ति, देवता विष्णु व वरुणप्रीत्यर्थ विनियोग आहे ५६. पुष्पोदकस्नानसमयी ह्मणावयाचा जो " अग्न आयाहि " हा मंत्र त्याचा ऋषि जनार्दन, छन्द जगती, देवता ऐन्द्री, व वरुणप्रीत्यर्थ विनियोग आहे ५७. " इय च० " हा मंत्र ह्मणत पंचवीहि टाकावे. व नंतर पाच वाद्यघोषासह नीराजन करावें. शिरीषपुष्पापासून व काशापासून उत्पन्न झालेलें दर्पण द्यावें. गोपीचंदनाने किंवा गंगेच्या मृत्तिकेनें किंवा काळ्या गाईचे गोमय घेऊन स्वस्तिक व शंख करवावा. यव व गहूं यांचें पदक करावें. उत्पन्न झालेल्या स्वर्णाचा कलश, माषापासून झालेला व पुष्पापासून झालेला श्रीरस ध्यावा. काशाचें दर्पण घेऊन तदनंतर नन्द्यावर्तसंज्ञक चंदनाच्या गृहामध्यें शहाण्याने निर्मल करावें व प्रत्येक मंत्राने एक एक याप्रमाणें ते जलावर सोडावें. ध्रुवप्रतिकृत आठ मंत्रांनीं क्रमानें त्यास सोडावें. विधिपूर्वक पूर्वाक्षत मापभक्तबलि द्यावा. नंतर नारायणसूक्तानें नारायण देवास जावें. दुसऱ्या देवासही तीस बलि द्यावे ५८-६४. तदनंतर पुढील मंत्रानें क्रमाने विधानतः आचमनीय व दोन वस्त्रे द्यावीं ६५. हे द्विजहो, तदनंतर तितकींच त्यास पृथक् पृथक् द्यावीं व देवसूत्रसमायुक्त व यज्ञ सूत्रयुक्त अशीं वस्त्रें सर्ववर्णभेदानें ग्रहण करावीं. त्यामुळें मी शरीरास जाणतों; चेष्टा तर मुळींच जाणत नाहीं ६६,६७. निवेदन केलेले गंध घेऊन त्याचा अंगास लेप करावा, असें ह्मणावें. क्रमाने चोहोंकडे एकशें आठ दिवे ठेवावे ६८. किंवा त्याच्या निम्मे ह्मणजे चौपन्न किंवा निदान पंचवीस दिवे ठेवून मंत्रपूर्वक ज्ञात्यानें

सर्वज्योतींषि दीपोऽयं प्रतिगृह्यताम् । प्रदक्षिणं ततः कुर्यात्पञ्चधा सप्तधाऽथवा २७० वक्ष्यमाणेन मन्त्रेण दद्याद्धूपं दशाङ्गकम् । वनस्पतिरसो दिव्यो गन्धाढ्यः सुरभिः शुचि. ७१ मया निवेदितो भक्त्या धूपोऽयं प्रतिगृह्यताम् । अलङ्कारं च गन्धं च पीतवस्त्रं तथैव च ७२ दूर्वाक्षते च माल्यं च युक्तं पुष्पेण पूजयेत् । दद्यात्पञ्चाञ्जलिं पश्चाद्विष्णुसूक्तं पुनर्जपेत् ७३ ततः सुशोभनं स्नानं मह्यं निर्माय देशिकः । वरुणं विन्यसेत्तत्र तथा पुष्करिणीमपि ७४ विवाहोक्तेन विधिना कुर्यान्निर्मञ्छनादिकम् । गन्धपुष्पं ततो दद्याद्गां च दद्यात्सदक्षिणाम् ७५ चामरं व्यजनं छत्रं कांस्यलोहं तथैव च । कुर्यात्पुष्करिणीं रम्यां राजतीं च त्रिपादिकाम् ७६ चतुष्कोणां च सुषमां ह्यङ्गुष्ठपरिमण्डलाम् । सुवर्णप्रतिमां कुर्याद्वालेनैकेन भो द्विजाः ७७ अथवा स्वर्णपत्रे च कुङ्कुमेन जले लिखेत् । वाणशक्तिप्रमाणेन स्वर्णपत्रं तु ह्यङ्गुलम् ७८ कारयेच्चतुरस्रं च पीठोपरि न्यसेद्बुधः । नीराजनान्ते विप्रेन्द्रा संस्मरेदमृतं तरेत् ७९ अशोकेन तथैवैका काष्ठे वा पिप्पलच्छदे । ताम्रपट्टे लिखेद्वापि अलक्तेन यथाविधि २८० प्राणप्रतिष्ठां कुर्यात्तु वरुणाय निवेदयेत् । महं तु वत्सर कुर्याद्वेदघोषपुरःसरम् ८१ अशोकं खदिरं शालमश्वत्थं बिल्वकं तथा । धात्रीकुरुवकं चैव बहुलं नागकेसरम् ८२ एषामेव काष्ठरूपं यजमानप्रमाणकम् । समादाय च संस्थाप्य वस्त्राद्यैः प्रतिगृह्य च ८३ यूपं रक्षेति मन्त्रेण खनित्वा च प्रदापयेत् । स्थिरो भवेति मन्त्रेण हस्तं दत्त्वा पठेत्ततः ८४ तडागस्य तथैशान्यां तथा प्रासादकस्य च । स्थापयेद्दक्षिणे भागे आवासस्य च मध्यके ८५ नौकां गत्वा ततः पश्चाद्यूपमादाय वाग्यतः । मध्यदेशे

पूजन करावें. तूं सूर्य, चंद्र, ज्योति व विषाद आहेस. तूंच सर्व ज्योति आहेस. ह्यास्तव, हा दीप घ्यावा. तदनंतर पांच किंवा सात प्रदक्षिणा कराव्या ६९, ७०. पुढील मंत्रानें दशागक धूप द्यावा. वनस्पतीचा दिव्य रस, सुगंधानें संपन्न, सुंदर व पवित्र असा हा गंध मीं तुला भक्तीनें अर्पण केला आहे. ह्याचा स्वीकार करावा. अलंकार, गंध, पिवळे वस्त्र ७१, ७२, दूर्वा, अक्षता, व पुष्पयुक्त माळा याच्या योगानें पूजन करावें. पुनः पांच अंजलि देऊन विष्णुसूक्त म्हणावें७३. तदनंतर अतिसुंदर स्नानसमर्थी आचार्यानें मातीचा वरुण निर्माण करून त्याची व पुष्करिणीची तेथें स्थापना करावी. विवाहोक्त विधीनें निर्मंछनादिक करावें. तदनंतर गंधपुष्प द्यावें व दक्षिणेसह गाय द्यावी ७४, ७५. चवरी, पंखा व छत्री हे पदार्थ कांसें व लोखंड याचे करावें व रुप्याची तीन पादांची रम्य पुष्करिणी करावी. ती चार कोणांनीं युक्त, शोभिवंत व दोन आंगठ्याएवढें जिचें परिमंडल आहे अशी करावी. हे द्विजहो, एका मस्तकानें युक्त अशी सुवर्णाची प्रतिमा करावी ७६, ७७. किंवा सुवर्णपत्रावर तळीं कुंकवानें पांच किंवा तीन या प्रमाणानें प्रतिमा लिहावी. स्वर्णपत्र दोन अंगुलें असावें ७८. असो. ती चौकोनी करून शहाण्यानें तिची पीठावर स्थापना करावी. नीराजनाच्या शेवटीं हे श्रेष्ठ विप्रहो, अमृताचें स्मरण करावें व पापातून पार जावें ७९. पण जो स्वर्णपत्र करण्यास असमर्थ असेल त्यानें काष्ठावर किंवा पिंपळाच्या पानावर किंवा ताम्रपटावर लाल रंगानें यथाविधि प्रतिमा लिहावी २८०. प्राणप्रतिष्ठा करावी व वरुणास तिचें निवेदन करावें. वेदघोषपूर्वक मोठा उत्साह करावा ८१. अशोक, खदिर, साल, अश्वत्थ, बिल्व, धात्री, कोरंटी व बहुतकरून नागचाफा याच्या काष्ठाचा यजमानाइतका उंच यूप करावा. तो घेऊन व त्याची स्थापना करून वस्त्रादिकानीं परिवेष्टित करून " यूपं रक्ष० " या मंत्रानें खणून " स्थिरो भव० " या मंत्रानें त्यास हात लावून पुरावा. तडागाच्या ईशान्यदिशेंत प्रासादाच्या दक्षिणभागीं व गृहाच्या मध्यभागीं यूप रोंवावा ८२-८५.

महाबलवान् व श्रीमान् प्रतीपद्र अयोध्याधिपति होता. त्यानें दहा हजार वर्षे भारतवर्ष धारण केलें ४२. त्याच्या पुत्राचें नाव मडलीक असे होतें त्यानें बापाइतकें राज्य केलें. विजयेद्र हा त्याचा पुत्र होय. त्यानेंही पित्याइतकें राज्य केलें ४३. धनुर्दीत हा त्याचा सुत असून त्यानेंही बापाइतकें राज्य केलें. नंतर इद्राच्या आज्ञेनें शक्रहोत्र घृताचीसह भूलोकीं आला व त्याने धनुर्दीतास जिकून राज्य केले. त्यास हस्तीनामक पुत्र झाला. त्यानें ऐरावतपुत्र हत्तीवर बसुन पश्चिमदेशात गगेच्या तटी दहा योजनें विस्तीर्ण व शुभ अशी हस्तिनापुरी केली ४४-४६. त्यानें दहा हजार वर्षे राज्य केलें व तेथेंच वास केला. त्याचा पुत्र अजमीढ होय. त्याने बापाइतके राज्य केलें ४७. त्याच्यापासून रक्षपाल झाला. त्यानेंही पित्याच्या बरोबरीने राज्य केलें. सुशर्मण्य हा त्याचा पुत्र होय. त्यानें पित्याइतकें राज्य केले ४८. त्याच्या पुत्राचे नाव कुरु असे होतें. त्याने बापाच्या अर्धे राज्य केलें. इद्राच्या वरप्रदानामुळें तो देहासह स्वर्गास गेला ४९. त्यावेळीं मथुरेत या सात्त्वतकुलातील वृष्णिनामक महाबलवान् राजा राज्य करीत होता. त्यानें सर्व आपल्या अधीन करून घेतलें ५०. अद्भुत कर्मे करणाऱ्या भगवान् हरीच्या वरदानाने त्यानें पाच हजार वर्षे सर्व राज्य वश केलें ५१. निरावृत्ति हे त्याच्या पुत्राचे नाव असून त्यानें पित्याइतकें राज्य केलें. त्याचा पुत्र दशार्हि होय. त्याने पित्याच्या इतकें राज्य केलें ५२. त्याच्या पुत्राचें नाव वियामुन. त्यानें पित्यासारखें राज्य केलें. त्याचा पुत्र जीमुत. त्यानेंही पित्यासारखें राज्य केलें ५३. त्याचा पुत्र विकृति. त्याने पित्याइतकें राज्य केलें. त्याच्यापासून भीमरथ झाला. त्यानें पित्यासारखें राज्य केले ५४. त्याच्यापासून नवरथ झाला. त्यानेंही पित्याच्या बरोबरीनें राज्य केलें. त्याच्यापासून दशरथ झाला. त्यानेंही पित्यासारखें राज्य केलें ५५. त्याच्यापासून शकुनि झाला. त्यानेंही पित्यासारखें राज्य केले त्याच्यापासून कुशुंभ झाला. त्यानें पित्यासारखें राज्य केलें ५६. त्याच्यापासून देवरथ झाला. त्याने पित्यासारखे राज्य केले. त्याचा पुत्र देवक्षेत्र होय. त्यानेंही

कुरुवत्सस्तस्य सुतः पितुस्तुल्य कृतं पदम् । तस्मादनरथः पुत्रः पितुस्तुल्यं कृतं पदम् ५९ पुरुहोत्रः सुतस्तस्य पितुस्तुल्य कृतं पदम् । विचित्राङ्गस्तस्य सुतः पितुस्तुल्यं कृतं पदम् ६० तस्मात्सात्वतवान्पुत्रः पितुस्तुल्य कृत पदम् । भजमानस्तस्य सुतः पितुस्तुल्यं कृत पदम् ६१ विदूरथस्तस्य सुतः पितुस्तुल्यं कृत पदम् । सुरभक्तस्तस्य सुतः पितुस्तुल्यं कृत पदम् ६२ तस्माच्च सुमना पुत्रः पितुस्तुल्य कृत पदम् । ततिक्षेत्रस्तस्य सुतः पितुस्तुल्य कृतं पदम् ६३ स्वायम्भुवस्तस्य सुत पितुस्तुल्य कृत पदम् । हरिदीपक एवासौ तस्य राज्य पितुस्समम् ६४ देवमेधास्सुतस्तस्य पितुस्तुल्य कृतं पदम् । सुरपालस्तदा जातः पितुस्तुल्यं कृतं पदम् ६५ शक्राज्ञया कुरुश्चैव द्वापरत्रितये पदे । व्यतीते च सुकेश्यास्तु स्वर्वेश्यायाः पतिः प्रभुः ६६ आगतो भारते खण्डे कुरुक्षेत्र तदा कृतम् । विंशयोजनविस्तीर्णं पुण्यक्षेत्रं स्मृतं बुधैः ६ द्वादशाब्दसहस्रं च कुरुणा राज्यमत्कृतम् । तस्माज्जन्हुस्सुतो जातः पितुस्तुल्य कृत पदम् ६८ तस्माच्च सुरथो जातः पितुस्तुल्य कृतं पदम् । विदूरथस्तस्य सुतः पितुस्तुल्यं कृत पदम् ६९ सार्वभौमस्तस्य सुतः पितुस्तुल्य कृतं पदम् । जयसेनस्तस्य सुतः पितुस्तुल्यं कृत्र पदम् ७० तस्मादर्णव एवासौ पितुस्तुल्यं कृत पदम् । चतुस्सागरगामी च पितुस्तुल्य कृतं पदम् ७१ अयुतायुस्तस्य सुतो राज्य दशसहस्रकम् । अक्रोधनस्तस्य सुतः पितुस्तुल्यं कृत पदम् ७२ तस्माद्देवक्षस्सुतो जातः पितुस्तुल्यं कृतं पदम् । भीमसेनस्तस्य सुत पितुस्तुल्य कृत पदम् ७३ दिलीपस्तस्य तनयः

पित्यासारखे राज्य केले ५७. त्याचा मधुनामक पुत्र होय. त्यानें पित्यासारखे राज्य केले. त्याचा नवरथ हा पुत्र असून त्याने पित्यासारखे राज्य केले ५८. कुरुवत्स हा त्याचा पुत्र असून त्यानें पित्यासारखें राज्य केलें. त्याच्यापासून अनुरथ झाला व त्यानें पित्यासारखे राज्य केलें. ५९. त्याचा पुत्र पुरुहोत्र असून त्यानेंही पित्यासारखे राज्य केले. विचित्राग हा त्याचा पुत्र होय. त्यानें आपल्या बापासारखेंच राज्य केले ६०. त्याच्यापासून सात्वतवान् पुत्र झाला. व त्यानें पित्यासारखें राज्य केलें. भजमान हा त्याचा पुत्र होय. त्यानेही पित्यासारखें राज्य केल ६१. विदूरथ हा त्याचा पुत्र असून त्यानें पित्याइतकें राज्य केलें. त्याचा पुत्र सुरभक्त होय. त्याने बापाइतके राज्य केलें ६२. त्याच्यापासून सुमना हा पुत्र झाला. त्याने बापाइतकेंच राज्य केले. त्याचा पुत्र ततिक्षेत्र असून त्यानें बापाइतकें राज्य केलें. स्वायंभुव हा त्याचा पुत्र होय. त्यानें बापाइतके राज्य केलें. ह्याच्यामागून हरिदीपिक राजा झाला. त्याचें राज्यही बापाप्रमाणें झालें६३,६४.ह्याच्या पुत्राचें नाव देवमेधा. ह्यानें बापासारिखें राज्य केलें. नंतर सुरपाल झाला. त्यानें पित्याइतकें राज्य केलें ६५. इंद्राच्या आज्ञेनें द्वापाराचा तिसरा पाद व्यतीत झाला असता सुकेशीनामक अप्सरेचा पति कुरु भारतखंडात आला व त्यानें कुरुक्षेत्र वीस योजनें विस्तीर्ण केलें. विद्वान् लोकांनीं त्यास पुण्यक्षेत्र असे म्हटलें आहे ६६,६७. कुरूनें बाराहजार वर्षे राज्य केलें. त्याच्यापासून जन्हुपुत्र झाला. त्याने पित्याच्या इतकें राज्य केले ६८. त्याच्यापासून सुरथ झाला. त्यानें पित्याइतकें राज्य केले. विदूरथ हा त्याचा पुत्र होय. त्याचें राज्यही पित्यासारिखें झालें ६९. त्याचा पुत्र सार्वभौम होय. त्यानें आपल्या पित्याप्रमाणेंच राज्य केलें. जयसेन हा त्याचा पुत्र असून त्याने पित्याप्रमाणे राज्य केले ७०. त्याच्यापासून अर्णव झाला. त्यानेंही पित्याप्रमाणें राज्य केलें. त्याची राज्यमर्यादा चार समुद्रापर्यंत असे. त्याने पित्याप्रमाणेंच राज्य केलें ७१. त्याचा पुत्र अयुतायु होय. त्यानें दहा हजार वर्षे राज्य केले. त्याचा पुत्र अक्रोधन होय. त्यानें वडिलासारिखें राज्य केले ७२. त्याच्यापासून ऋक्षपुत्र झाला. त्यानें पित्यासारिखेंच राज्य केले. भीमसेन हा त्याचा पुत्र होय. त्यानेंही बापासारिखे राज्य केले ७३ त्याच्या पुत्राचें नाव दिलीप.

पितुस्तुल्य कृतं पदम् । प्रतीपस्तस्य तनयो राज्यं पञ्चसहस्रकम् ७४ शन्तनुस्तस्य पुत्रश्च राज्यमेकसहस्रकम् । विचित्रवीर्यस्तत्पुत्रो राज्यं वै द्विशतं समाः ७५ पाण्डुश्च तनयो यस्मि-न्राज्यं पञ्चशतं कृतम् । युधिष्ठिरस्तस्य सुतो राज्यं पञ्चाशदब्दकम् ७६ सुयोधनेन षष्ट्यब्दं कृत राज्यं ततः परम् । युधिष्ठिरेण निधनं तस्य प्राप्त कुरुस्थले ७७ पूर्वं देवासुरे युद्धे ये दैत्याश्च सुरैर्हताः । ते सर्वे शन्तनो राज्ये जन्मवन्तः प्रतस्थिरे ७८ लक्षम[1]हौहिणी तेषां तद्भारेण वसुन्धरा । शक्रस्य शरण प्राप्ताऽवतारं च ततो हरेः ७९ सूरस्य वसुदेवस्य देवक्यां जन्मनाऽवि-शत् एवं कृष्णो महावीर्यो रोहिणीनिधन गता ८० पञ्चत्रिंशदुत्तर च शत वर्षं च भूतले । उषित्वा कृष्णचन्द्रश्च ततो गोलोकमागतः ८१ चतुर्थचरणान्ते च हरेर्जन्म स्मृत बुधै । हस्तिनापुरमध्यस्थाभिमन्योस्तनयस्तत ८२ राज्यमेकमहस्रं च ततोऽभूज्जनमेजयः । त्रिसहस्रं कृतं राज्यं शतानीकस्ततोऽभवत् ८३ पितुस्तुल्य कृतं राज्य यज्ञदत्तस्ततः सुत. । राज्यं पञ्चसहस्रं च निश्चक्रस्तज्जयोऽभवत् ८४ सहस्रमेक राज्य तदुष्ट-पालस्ततोऽभवत् । पितुस्तुल्यं कृत राज्य तस्मा चित्ररथस्सुतः ८५ पितुस्तुल्य कृत राज्यं धृतिमांस्तनयस्तत. । पितुस्तुल्य कृतं राज्य सुषेणस्तनयोऽभवत् ८६ पितु-स्तुल्य कृतं राज्यं सुनीथस्तनयोऽभवत् । पितुस्तुल्य कृत राज्य मषपालः सुतोऽभवत् ८७ पितुस्तुल्य कृतं राज्य न चक्षुस्तनयस्ततः । पितुस्तुल्य कृत राज्य सुखवन्तस्ततोऽभवत् ८८

त्यानें पित्यासारखे राज्य केलें. याचा पुत्र प्रतीप होय. त्याचे राज्य पाच हजार वर्षे चालले ७४. त्याच्या पुत्राचे नाव शंतनु. यानें एक हजार वर्षे राज्य केलें. विचित्रवीर्य हा त्याचा पुत्र होय. यानें दोनशें वर्षे राज्य केले ७५. त्याचा पुत्र पाडु त्यानें पाचशें वर्षे राज्य केले. त्याचा पुत्र युधिष्ठिर होय. त्यानें पन्नास वर्षे राज्य केलें ७६. सुयोधनानें यानंतर साठ वर्षे राज्य केलें. युधिष्ठिराने कुरुक्षे-त्रामध्ये त्यास मारविले ७७. पूर्वी देव व असुर त्याच्या युद्धामध्यें ज्या दैत्यास देवांनी मारिले होतें. ते सर्व शंतनूच्या राज्यात जन्म घेऊन राहिले ७८. त्यांची संख्या एक लक्ष अक्षौहिणी होती. त्याच्या भाराने पृथ्वी पीडीत होऊन इंद्रास शरण गेली त्यामुळें हरीचा अवतार झाला. म्हणजे तो भगवान् सूज्ञ वसुदेवाच्या द्वारा देवकीच्या उदरीं प्रविष्ट झाला. त्याप्रमाणे तो महावीर्यवान् कृष्ण रोहिणीच्या गृहीं गेला. भूतळीं एकशें पंचतीस वर्षे राहून नंतर कृष्णचंद्र गोलोकीं प्राप्त झाला ७९–८१ चवथ्या चरणाच्या शेवटीं हरीचा जन्म झाला असे विद्वानांनी सांगितलेलें आहे. असो, तदनंतर हस्तिनापुरामध्यें राहून अभिम-न्यूच्या पुत्रानें एक हजार वर्षे राज्य केलें. त्याच्यापासून जनमेजय झाला. त्याने तीन हजार वर्षे राज्य केले. तदनंतर शतानीक झाला ८२,८३. त्याने पित्याइतकें राज्य केले. त्याचा पुत्र यज्ञदत्त होय. त्यानें पाच हजार वर्षे राज्य केले. त्यास निश्चक्र म्हणून पुत्र होता ८४. त्याने एक हजार वर्षे राज्य केलें. त्याच्यापासून उष्टपाल झाला. त्याने बापाइतकें राज्य केले. त्यास चित्ररथ हा पुत्र झाला ८५. त्याने पित्याइतकें राज्य केलें. धृतिमान हा त्याचा पुत्र होय. त्यानें बापासारखें राज्य केले. त्यास सुषेण म्हणून पुत्र झाला ८६. त्याने पितृतुल्य राज्य केले. त्यास सुनीथ म्हणून पुत्र होता. त्यानें बापाइतकेंच राज्य केले. त्याच्यापासून मषपाल पुत्र झाला ८७. त्यानें बापासारखें राज्य केलें. नचक्षु हा त्याचा पुत्र होय. त्याने पित्यासारखे राज्य केले. त्याच्यामा-गून सुखवंत झाला ८८. त्यानें बापासारखें राज्य केलें. त्याच्यापासून पारिप्लव हा पुत्र झाला. त्याने

---

१ एका अक्षौहिणीत २१८७० हत्ती, २१८७० रथ, २५६१० घोडे व १०९३५०—पायदळ असतें

पितुस्तुल्यं कृतं राज्यं तस्मात्पारिप्लवस्सुतः । पितुस्तुल्यं कृतं राज्यं सुनयस्तत्सुतोऽभवत् ८९ पितुस्तुल्य कृत राज्यं मेधावी तत्सुतोऽभवत् । पितुस्तुल्य कृत राज्यं तस्माज्जातो नृपञ्जयः ९० पितुस्तुल्यं कृतं राज्यं मृदुस्तत्तनयोऽभवत् । पितुस्तुल्य कृतं राज्य तिग्मज्योतिस्तु तत्सुतः ९१ पितुस्तुल्यं कृतं राज्यं तस्माज्जातो बृहद्रथः । पितुस्तुल्यं कृतं राज्यं वसुदानस्ततोऽभवत् ९२ पितुस्तुल्यं कृतं राज्यं शतानीकस्ततोऽभवत् । पितुस्तुल्यं कृतं राज्यं तस्मादुद्यान उच्यते ९३ पितुस्तुल्य कृतं राज्यं तस्माज्जातो ह्यहीनरः । पितुस्तुल्यं कृत राज्यं निर्मित्रस्तनयोऽभवत् ९४ पितुस्तुल्य कृतं राज्य क्षेमकस्तत्सुतोऽभवत् । राज्य त्यक्त्वा स मेधावी कलापग्राममाश्रित. ९५ म्लेच्छैश्च मरण प्राप्तो यमलोकगतो गतः । नारदस्योपदेशेन प्रद्योतस्तनयस्ततः ९६ म्लेच्छयज्ञः कृतस्तेन म्लेच्छाहननमागतः ९७ [२३०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये द्वापरनृपापाख्याने तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

शौनक उवाच ॥ कथ यज्ञः कृतस्तेन प्रद्योतेन विचक्षण । सर्वं कथय मे तात त्रिकालज्ञ महामुने १ सूत उवाच ॥ एकदा हस्तिनपुरे प्रद्योतः क्षेमकात्मजः । आस्थितः स कथामध्ये नारदोऽभ्यागमत्तदा २ त दृष्ट्वा हर्षितो राजा पूजयामास धर्मवित् । सुखोपविष्टं स मुनिः प्रद्योतं नृपमब्रवीत् ३ म्लेच्छैर्हतस्तव पिता यमलोकमितो गतः । म्लेच्छयज्ञप्रभावेन स्वर्गतिर्भविता हि स. ४ तच्छ्रुत्वा क्रोधताम्राक्षो ब्राह्मणान्वेदवित्तमान् । आहूय स कुरुक्षेत्रे म्लेच्छयज्ञं समारभत् ५ यज्ञकुण्ड चतुष्कोण योजनान्येव षोडश । रचित्वा देवता ध्यात्वा म्लेच्छांश्च जुहु-

---

पितृतुल्य राज्य केले. सुनय हा त्याचा पुत्र होय ८९. त्याने पित्याइतके राज्य केले. त्यास मेधावी झणून पुत्र झाला. त्यानें बापाइतके राज्य केले. त्याच्यापासून नृपजय झाला ९०. त्यानें बापासारखें राज्य केले. मृदु हा त्याचा पुत्र होय. त्याने बापासारखे राज्य केले. त्याच्या पुत्राचे नाव तिग्मज्योति होय ९१. त्याने पितृतुल्य राज्य केले त्याच्यापासून बृहद्रथ झाला. त्यानें पित्याइतके राज्य केले. त्यास वसुदान झणून पुत्र होता ९२. त्यानें बापाइतकें राज्य केलें त्यास शतानीक झाला. त्यानें बापाच्या इतकेंच राज्य केले. त्याच्या पासून उद्यान झाला असे सांगितले आहे ९३. त्याने बापाइतके राज्य केलें. त्याच्या पासून अहीनर झाला. त्यानेही आपल्या बापाइतके राज्य केले. त्यास निर्मित्र हा पुत्र झाला ९४. त्यानें बापाइतके राज्य केलें. त्यास क्षेमक हा पुत्र झाला. राज्याचा त्याग करून त्या बुद्धिमानानें कलापग्रामाचा आश्रय केला ९५. त्याप म्लेच्छाच्या हातून मरण आल्यामुळे तो यमलोकी गेला. नतर नारदाच्या उपदेशानें त्याच्या प्रद्योत नामक पुत्राने म्लेच्छयज्ञ केला. त्यामुळें म्लेच्छ मरण पावलें९६,९७.याप्रमाणें श्रीभविष्यमहापराणातील चतुर्युगखंड हें ज्यास दुसरें नाव आहे अशा प्रतिसर्गातील द्वापारातील राजाच्या वर्णनाविषयीं तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

शौनक झणतात-- हे शहाण्या सूता, त्या प्रद्योताने यज्ञ कसा केला ? बा त्रिकालज्ञ महामुने, तें मला सर्व सांग १. सूत झणतात.- क्षेमकपुत्र प्रद्योत एकदा हस्तिनापुरामध्ये कथा ऐकत बसला असता मध्यें नारद आले २. त्यास पाहून धर्मज्ञ राजा संतुष्ट झाला व त्यानें त्याची पूजा केली नंतर सुखानें बसलेला तो मुनि प्रद्योत राजास झणाला ३ " तुझ्या पित्यास म्लेच्छानीं मारिलें. त्यामुळें तो यमलोकीं गेला. पण म्लेच्छयज्ञ केल्यास त्याच्या प्रभावानें तो स्वर्गलोकीं जाईल ४. तें ऐकून त्याचे नेत्र लाल झाले आहेत अशा त्या राजानें पूर्ण वेदज्ञ अशा ब्राह्मणास बोलावून कुरुक्षेत्रात म्लेच्छयज्ञास आरंभ केला ५. चार कोनानीं युक्त असें सोळा योजनें यज्ञकुंड करून त्यात देवतांचें ध्यान

यान्नृपः ६ हारहूणान्बर्बरांश्च गुरुण्डांश्च शकान्खसान् । यवनान्पल्लवांश्चैव रोमजान्खरसंभवान् ७ द्वीपस्थितान्कामरूश्च चीनान्सागरमध्यगान् । आहूय भस्मसात्कुर्वन्वेदमन्त्रप्रभावत ८ ब्राह्मणाभ्यदक्षिणां दत्त्वा अभिषेकमकारयत । क्षेमको नाम नृपति स्वर्गलोक ततो गतः ९ म्लेच्छहन्ता नाम तस्य बिरुदातं भुवि सर्वत्र । राज्य दशसहस्राब्द कृतं तेन महात्मना १० स्वर्गलोक गतो राजा तत्पुत्रोवेदवान्स्मृतः । द्विसहस्र कृत राज्य तदा म्लेच्छः कलिः स्वयम् ११ नारायण पूजयित्वा दिव्यां स्तुतिमथाकरोत् । कलिरुवाच ॥ नमोऽनन्ताय महते सर्वकालप्रवर्तिन १२ चतुर्युगकृते तुभ्यं वासुदेवाय साक्षिणे । दशावताराय हर नमस्तुभ्य नमो नमः १३ नम. शक्त्यावताराय रामकृष्णाय ते नमः । नमो मत्स्यावताराय महते गौरवासिने १४ नमो भक्तावताराय कल्पक्षेत्रनिवासिने । राज्ञा वेदवता नाथ मम स्थान विनाशितम् १५ ममप्रियस्य म्लेच्छस्य तत्पित्रा वंशनाशनम् । सूत उवाच ॥ इति स्तुतस्तु कलिना म्लेच्छस्य सह भार्यया १६ प्रादुरासीत्स हरिः साक्षाद्भगवान्भक्तवत्सलः । कलिं प्रोवाच स हरिर्युष्मदर्थे युगान्तरम् १७ बहुरूपमह कृत्वा तवेच्छां पूरयाम्यहम् । आदमो नाम पुरुषः पत्नी हव्यवती तथा १८ विष्णुकर्दमतो जातौ म्लेच्छवंशप्रवर्धनौ । हरिस्त्वन्तर्दधे तत्र कलिरानन्दसङ्कुलः १९ गिरिं नीलाचलं प्राप्य किञ्चित्कालमवासयत् । पुत्रो वेदवतो जात. सुनन्दो नाम भूपतिः २० पितुस्तुल्य कृत राज्यमनपत्यो मृतिं गतः । आर्यदेशाः क्षीणवन्तः म्लेच्छवंशा बलान्विताः २१ भविष्यन्ति भृगुश्रेष्ठ तस्माच्च तुहिनाचलम् । गत्वा विष्णु समाराध्य गमिष्यामो हरेः पदम् २२ इति श्रुत्वा द्विजाः

करून राजा म्लेच्छांचें हवन करिता झाला ६. हारहूण, बर्बर, गुरुड, शक, खस, यवन, पल्लव, रोमज, खरसंभव, द्वीपांतून असलेले कामरू, व सागराच्या मध्यभागी असलेले चीन, या जातींच्या म्लेच्छांचे आव्हान करून वेदमंत्राच्या प्रभावानें भस्म करून सोडिता झाला ७,८. ब्राह्मणास दक्षिणा देऊन त्यानें आपणास अभिषेक करविला. नंतर क्षेमक नामक राजा स्वर्गलोकी गेला ९. या कृत्यामुळे म्लेच्छहंता हें त्याचे नांव भूलोकीं प्रसिद्ध झालें. त्या महात्म्यानें दहाहजार वर्षे राज्य केलें. नंतर तो राजा स्वर्गलोकीं गेला. त्याच्या पुत्राचें नांव वेदवान् असें सांगितलेलें आहे. त्याने दोन हजार वर्षे राज्य कलें. तेव्हा स्वत म्लेच्छ असा जो कलि त्यानें नारायणाची पूजा करून अलौकिक स्तुति केली. कलि ह्मणाला.— सर्वकालास प्रवृत्त करणाऱ्या व चार युगें करणाऱ्या, तुज अनंतास नमस्कार असो. तूं विभु, जगास वसविणारा देव व साक्षि आहेस. हे हरे, दशावतारूपी असा जो तूं त्या तुजला वारवार प्रणाम असो १०–१३. शक्तीच्या आश्रयानें अवतार घेऊन राम व कृष्णरूप होणाऱ्या तुला नमस्कार असो. गौरवासी व महान् अशा तुज मत्स्यावतारास नमस्कार असो १४. कल्पक्षेत्रांत रहाणाऱ्या भक्तावतारास मी वंदन करितो. हे प्रभो, वेदवान् राजानें माझे स्थान नाहींसे करून टाकिले १५. त्याच्या पित्यानें माझ्या प्रिय म्लेच्छ पितृवंशास नाहींसे केलें. सूत ह्मणतात— ह्याप्रमाणें कलीनें ज्याची स्तुति केली आहे असा तो भक्तवत्सल भगवान् हरी भार्येसह त्या म्लेच्छाच्या प्रत्यक्ष पुढे आला व कलीस ह्मणाला, तुमच्याकरिता एक बहुरूप उत्तम युग करून मी तुझी इच्छा पूर्ण करीन. नंतर विष्णूच्या अंगाच्या मलापासून म्लेच्छांच्या वंशाची वृद्धि करणारा आदमनामक पुरुष व त्याचप्रमाणें हव्यवती पत्नी उत्पन्न झाली. इतक्यात हरि गुप्त झाला. तेव्हा कलि आनंदपूर्ण होऊन १६–१९ नीलपर्वतावर गेला व त्यास तेथे काहीं वेळ ठेविता झाला. इकडे वेदवानाचा सुनंदनामक पुत्र भूपति झाला २०. त्यानें पित्याइतकें राज्य केलें. व पुत्रावाचूनच मरण पावला. त्यामुळे हे भृगुश्रेष्ठा, आर्य देश क्षीण व म्लेच्छ देश बलवान् होतील.

सर्वे नैमिषारण्यवासिनः । अष्टाशीतिसहस्राणि गतास्ते हिमनाचलम् २३ विशालायां समासाद्य विष्णुगाथां प्रचक्षिरे । इति व्यासेन कथितं वाक्यं कलिविशारदम् २४ श्रोतारं स मनः कृत्वा भविष्यं स मुदीरयत् । व्यास उवाच ॥ मनः शृणु ततो गाथां भावीं सूतेन वर्णिताम् २५ कलेर्युगस्य पूर्णा तां तच्छ्रुत्वा तृप्तिमावह । सूत उवाच॥ षोडशाब्दसहस्रं च शेषे तद्द्वापरे युगे २६ बहुकीर्तिमती भूमिरार्यदेशस्य कीर्तिता। क्वचिद्विप्राः स्मृता भूपाः क्वचिद्राजन्यवंशजाः २७ क्वचिद्वैश्याः क्वचिच्छूद्राः क्वचिद्वर्णसंकुरः । द्विशतोऽब्दसहस्रेऽतः शेषे तु द्वापरे युगे २८ म्लेच्छदेशस्य या भूमिर्भविता कीर्तिमालिनी इन्द्रियाणि दमित्वा यो ह्यात्मध्यानपरायणः २९ तस्मादादमनामाऽसौ पत्नी हव्यवती स्मृता। प्रदाननगरस्यैव पूर्वभागे महावनम् ३० ईश्वरेण कृतं रम्यं चतुःक्रोशायतं स्मृतम् । पाप्वृततले गत्वा पत्नीदर्शनतत्परः ३१ कलिस्तत्रागतस्तूर्णं सर्परूप हि तत्कृतम् । वञ्चिता तेन धूर्तेन विष्णवज्ञा भङ्गतां गता ३२ खादित्वा तत्फल रम्यं लोकमार्गप्रदं पतिः । उदुम्बरस्य पत्नैश्च तार्भ्यां वायुव्रतं कृतम् ३३ सुता. पुत्रास्ततो जाताः सर्वे म्लेच्छा बभूविरे । त्रिंशान्नव शतं तस्यायुः परिकीर्तितम् ३४ फलानां हवनं कुर्वन्पत्न्या सह दिवं गतः । तस्माज्जातः सुतः श्रेष्ठः श्वेतनामेति विश्रुतः ३५ द्वादशोत्तरवर्षं च तस्यायु परिकीर्तितम्। अनुहस्तस्य तनय. शतहीनं कृत पदम् ३६ कीनाशस्तस्य तनयः पितामहसम पदम् । महत्तुलस्तस्य सुतः पञ्च हीन शत नव ३७

यास्तव हिमालयावर जाऊन विष्णूची आराधना करून आह्मी हरीच्या परमपदी जाऊ या २१,२२. हें ऐकून नैमिषारण्यात रहाणारे सर्व ह्मणजे अठ्याय्शी हजार द्विज हिमालयावर गेले २३. व विशालेमध्यें पोंचल्यावर त्यानीं विष्णुगाथा सांगितली. ह्याप्रमाणे श्रीव्यासानीं कलिविशारद वाक्य सांगितलें आहे २४. नंतर मनास श्रोता करून त्यानें भविष्य सांगितलें. व्यास ह्मणतातः— हे मना आता सूतानें सांगितलेली कलियुगाच्या अंतापर्यंत भावी गाथा ऐक. व ती ऐकून तृप्त हो. सूत ह्मणतात.— तें द्वापारयुग सोळा हजार वर्षे राहिलें असता आर्य देशाची भूमि बहुकीर्तिमति ह्मणून प्रसिद्ध होती. पण पुढे क्वचित् ब्राह्मण राजे सांगितलेले आहेत. क्वचित् क्षत्रिय राजे झाले. क्वचित् वैश्य राजे झाले, क्वचित् शूद्र झाले व कोहीं केव्हा वर्णसंकरही राजे झाले. द्वापरयुगाची आठ हजार दोनशें वर्षे राहिलीं असता २९–२८. म्लेच्छ देशाची भूमि कीर्तियुक्त होणार आह. असो, विष्णूच्या मलापासून उत्पन्न झालेला तो पुरुष इंद्रियाचे दमन करून आत्मध्यानामध्ये परायण असल्यामुळें त्यास अदम असें नाव प्राप्त झाले व त्याची पत्नी हव्यवती होय. प्रदान नगराच्या पूर्वभागीं ईश्वरानें एक रम्य महावन निर्माण केलें. तें चार कोस दीर्घ होतें असे झटलें आहे. असो. तेथे तो पापवृक्षाच्या खालीं जाऊन आदम पत्नीच्या दर्शनाविषयीं उत्सुक होऊन राहिला २९–३१. इतक्यात लागलाच तेथें कलि आला व त्याने धूर्तानें आपले सर्परूप करून त्यास फसविले. त्यामुळे विष्णूच्या आज्ञेचा भग झाला ३२. ते रम्य व लोकमार्ग देणारें फल खाऊन पति उदुंबराच्या पत्नीनीं आपला निर्वाह करिता झाला. नंतर त्या दोघानीं वायुभक्षण केले ३३. नंतर त्याच्यापासून पुत्र झाले पण ते सर्व म्लेच्छ झाले. त्यांचें आयुष्य नऊशे तीस वर्षे सांगितलेलें आहे ३४. असो; फलाचे हवन करणारा असा तो आदम पत्नीसह स्वर्गास गेला. त्याच्यापासून श्वेत नावानें प्रख्यात असा श्रेष्ठ पुत्र झाला. त्याचे आयुष्य बाराहून बारा वर्षे अधिक होतें असें सांगितलें आहे. त्याचा पुत्र अनुह होय. त्यानें बाराहून शंभर वर्षे कमी राज्य केलें ३५,३६. त्याचा पुत्र कीनाश होय. त्यानें आपल्या आजाइतकें राज्य केले. महत्तुल हा त्याचा पुत्र होता. त्यानें नऊशेस पाच कमी इतकीं वर्षे राज्य केलें. त्यानें येथें राज्य केल्यामुळेंच त्या स्थलास मानगर असें ह्मणूं लागलें.

सेन राज्यं कृतं तत्र तस्मान्मानगरं स्मृतम् । तस्माच्च विरदो जातो राज्यं षष्टयुत्तरं समाः ३८
क्षेयं नवशत तस्य स्वनाम्ना नगरं कृतम् । हनूकस्तस्य तनयो विष्णुभक्तिपरायणः ३९
फलानां हवनं कुर्वंस्तस्य ह्यसि जपन्सदा । त्रिंशतं पञ्चषष्टिश्च राज्यं वर्षाणि तत्स्मृतम् ४०
सदेहः स्वर्गमायातो म्लेच्छधर्मपरायण । आचारश्च विवेकश्च द्विजता देवपूजनम् ४१ कृतान्येतानि तेनैव तस्मान्म्लेच्छ. स्मृतो बुधैः । विष्णुभक्त्यग्निपूजा च ह्यहिंसा च तपो दमः ४२
धर्माण्येतानि मुनिभिर्म्लेच्छानां हि स्मृतानि वै । मतोच्छिलस्तस्य सुतो हनुकस्यैव भार्गव ४३
राज्यं नवशत तस्य सप्ततिश्च स्मृताः समाः । लोमकस्तस्य तनयो राज्य सप्तशत समाः ४४ सप्तसप्ततिरवास्य तत्पश्चात्स्वर्गतिं गतः । तस्माज्जातः सुतो न्यूहो निर्गतस्तूह एव सः ४५ तस्मान्यूहः स्मृतः प्राज्ञै राज्य पञ्चशतं कृतम् । सीमः शमश्च भावश्च त्रयः पुत्रा बभूविरे ४६ न्यूह स्मृतो विष्णुभक्तस्सोऽह ध्यानपरायणः । एकदा भगवान्विष्णुस्तस्वप्ने तु समागतः ४७ वत्सन्यूह शृणुष्वेदं प्रलयं सप्तमेऽहनि । भविता त्व जनैस्सार्धं नावमारुह्य सत्वरम् ४८ जीवनं कुरु भक्तेन्द्र सर्वश्रेष्ठो भविष्यसि । तथेति मत्वा स मुनिर्नावं कृत्वा सुपुष्टिताम् ४९ हस्तत्रिशतलम्बां च पञ्चाशद्धस्तविस्तृताम् । त्रिंशद्धस्तोच्छ्रितां रम्यां सर्वजीवसमन्विताम् ५० आरुह्य स्वकुलैस्सार्द्धं विष्णुध्यानपरोऽभवत् । संवर्तको मघगणो महेन्द्रेण समन्वितः ५१ चत्वारिंशद्दिनान्येव महद्वृष्टिमकारयत् । सर्वं तु भारतं वर्षं जलैः प्लाव्यतु सिन्धवः ५२ चत्वारो मिलिताः सर्वे विशालायां न चागताः । अष्टाशीतिसहस्राणि मुनयो ब्रह्मवादिनः ५३ न्यूहश्च स्वकु-

---

त्यान्यापासून विरद झाला. त्यानें नऊशें साठ वर्षे राज्य केलें. व आपल्या नावानें नगर वसाविलें. त्याचा पुत्र हनूक होय. तो विष्णूच्या भक्तीमध्ये परायण होता ३७-३९. फलाचें हवन करणारा व तें तूंच आहेस याचा सर्वदा जप करणारा असा तो हनूक तीनशेंसाठ वर्षे राज्य करिता झाला ४०. नंतर म्लेच्छधर्मामध्यें परायण असा तो राजा देहासह स्वर्गलोकीं गेला. आचार विवेक, द्विजता, व देवपूजन ४१ हीं त्यानें केलीं त्यामुळे त्यास विद्वानानीं म्लेच्छ असें ह्मटलें आहे. विष्णुभक्ति, अग्निपूजा, अहिंसा, तप, व दम, हे म्लेच्छांचे धर्म आहेत असें मुनींनीं सांगितले आहे. हे भार्गवा, त्या हनूकाचा पुत्र मतोच्छील ह्मणून होता ४२,४३. त्याचें राज्य नऊशे सत्तर वर्षे झालें असें सांगितलेलें आहे. त्याचा पुत्र लोमक ह्मणून झाला. त्यानें सातशें सत्त्याहत्तर वर्षे राज्य केलें व नंतर तो स्वर्गास गेला. त्याच्यापासून न्यूह ह्मणून पुत्र झाला. तो निघालेला (साक्षात्) तर्कच असल्यामुळें त्यास शहाण्यानीं न्यूह असें ह्मटलें आहे. त्यानें पाचशें वर्षे राज्य केलें. त्यास सीम, शाम व भाव असे तीन पुत्र झाले ४४-४६. तो विष्णुभक्त होता असें सांगितलेलें आहे. तो " तो मी आहें " या ध्यानात तल्लीन असे. एकदा भगवान् विष्णु त्याच्या स्वप्नामध्यें आला ४७ व ह्मणाला, " हे वत्सा न्यूहा, हें ऐक. तू लोकासह सातव्या दिवशीं मरशील. यास्तव सत्वर नावेंत बसून, हे श्रेष्ठ भक्ता, आपला प्राण वाचीव. ह्मणजे तूं सर्वश्रेष्ठ होशील. " असा. हें खरे आहे असें मानून तो राजमुनि दृढ नौका करिता झाला ४८, ४९. ती तीनशे हात लांब, पन्नास हात रुंद व तीस हात उंच होती. ती अति रम्य असून सर्व प्राण्यानीं युक्त होती ५०. त्या नावेंत सर्व कुलातील माणसासह बसून तो विष्णुध्यानामध्यें तल्लीन झाला. नंतर महेंद्रासह प्रलयकालीन मेघसमूह ५१ चाळीस दिवस मोठी वृष्टि करिता झाला. सर्व भारतवर्ष जलानें बुडवून चारी समुद्र एक झाले. पण ते सर्व विशालेमध्ये आले नाहींत. साराश, अठ्ठ्यायशी सहस्र ब्रह्मवादी मुनि व आपल्या कुलासह न्यूह एवढें मात्र अवशिष्ट राहिले व इतर सर्व प्राणी नाहींसे झाले.

लैस्सार्धं शेषास्तसर्वे विनाशिताः । तदा च मुनयस्तत्रं विष्णुमायां प्रतुष्टुवुः ५४ मुनय ऊचुः । नमो देव्यै महाकाल्यै देवक्यै च नमो नमः । महालक्ष्म्यै विष्णुमात्रे राधादेव्यै नमो नमः ५५ रेवत्यै पुष्पवत्यै च स्वर्णवत्यै नमो नमः । कामाक्षायै च मायायै नमो मात्रे नमो नमः ५६ महावातप्रभावेन महामेघरवेण च । जलधाराभिरुग्राभिर्भय जात हि दारुणम् ५७ तस्माद्भयाद्धैरवि त्वमस्मान्सरक्ष किङ्करान् । तदा प्रसन्ना सा देवी जलं शान्त तया कृतम् ५८ अब्दान्तरे मही सर्वा स्थलीभूत्वा प्रदृश्यते । आराच्च शिखिणा नाम हिमाद्रेस्तटभूमयः ५९ न्यूहस्तत्र स्थितो नावमारुह्य स्वकुलैस्सह । जलान्ते भूमिमागत्य तत्र वास करोति सः ६० [२९०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये द्वापरनृपोपाख्यानं नाम चतुर्थोऽध्यायः॥४॥

शौनक उवाच ॥ सांप्रत वर्तते यो वै प्रलयान्ते मुनीश्वर । दिव्यदृष्टिप्रभावेन ज्ञातं ब्रूहि ततः परम् १ सूत उवाच ॥ न्यूहो नाम स्मृतो म्लेच्छो विष्णुमोहं तदाऽकरोत् । तदा प्रसन्नो भगवांस्तस्य वंश. प्रवर्द्धितः २ म्लेच्छभाषा कृता तेन वेदवाक्यपराङ्मुखा । कलेश्च वृद्धये ब्राह्मी भाषां कृत्वाऽपशब्दगाम् ३ न्यूहाय दत्तवान्देवो बुद्धीशो बुद्धिगः स्वयम् । विलोमं च कृतं नाम न्यूहेन त्रिसुतस्य वै ४ सिमश्च हामश्च तथा याकूतो नाम विश्रुत. । याकूतः सप्त पुत्राश्च जुम्राश्च माजूज एव सः ५ मादी तथा च यूनानस्तूबलोमसकस्तथा । तीरासश्च तथा तेषां नामभिर्देश उच्यते ६ जुम्रादशकनाब्जश्च रिफतश्च तजर्मक । तन्नाम्ना च स्मृता देशा यूनाद्या ये सुताः स्मृताः ७ इलीशस्तरलीशश्च किर्त्तीहूदानिरुच्यते । चतु-

---

तेव्हा सर्व मुनि विष्णूच्या मायेची स्तुति करिते झाले ५२-५४. मुनि ह्मणतात:—देवीस नमस्कार असो, महाकाली जी देवकी तिलाही नमस्कार असो. महालक्ष्मी, विष्णूची माता व राधा देवी अशी जी माया तिला नमस्कार असो ५५. रेवतीस, पुष्पवतीस व स्वर्णवतीस नमस्कार असो. कामाक्षीस व मायेस आह्मी वंदन करितो. मातोश्रीस आमचा प्रणाम असो ५६. महावाताच्या प्रभावानें, महामेघाच्या रवाने, व उग्र जलधारानीं आह्मास दारुण भय वाटत आहे. हे भैरवि, त्याभयापासून तूं आह्मा किंकरांचें रक्षण कर. ही स्तुति ऐकून देवी प्रसन्न झाली व तिनें जल शांत केलें ५७,५८. नतर एका वर्षामध्यें सर्व पृथ्वी जलरूप होऊन दिसूं लागली. व जवळच शिखिणा-नामक हिमालय पर्वताच्या तटभूमि दिसूं लागल्या. तेव्हा तेथें आपल्या कुलासह नावेत बसून राहिलेला न्यूह जल नाहींसें होताच भूमीवर उतरला व तो तेथे राहूं लागला ५९, ६०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाचा चतुर्युगखंड हें ज्यास दुसरें नाव आहे अशा प्रतिसर्गपर्वांतल्या द्वापारांतील राजाच्या वर्णनाविषयीं चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥

शौनक ह्मणतात.—हे मुनीश्वरा, सध्या प्रलयकाळीं जो रहात होता त्यास आह्मीं दिव्यदृष्टीच्या प्रभावानें जाणलें. आता त्याच्या पुढें काय झालें तें सांग १. सूत ह्मणतातः— न्यूह हा म्लेच्छ ह्मणून सांगितलेला आहे. त्याने त्यावेळीं विष्णूस मोहित केलें व त्यामुळे प्रसन्न झालेल्या भगवानानें त्याचा वंश वाढविला २. त्याने कलीच्या वृद्धयर्थ ब्राह्मीभाषा अपशब्द करून वेदवाक्यापासून पराङ्मुख झालेली अशी म्लेच्छभाषा केली ३ व त्या बुद्धिस्थ आणि बुद्धीच्या ईश्वररूप देवाने ती न्यूहास दिली. न्यूहानें आपल्या तीन पुत्राचें नाव लोमरहित असें केलें ४ ह्मणजे सीम, हाम व त्याचप्रमाणें याकून अशीं नावें प्रसिद्ध झालीं. याकूतास सात पुत्र होत. जुम्र, माजूज, मादी, युनान, तूबल, मसक व तीरास अशा त्यांच्या नांवाचा प्रकार सांगितलेला आहे ५,६. जुम्रादशकनाब्ज, रिफत व तजर्मक असे तीन पुत्र होते व त्याच्या नावाचेच देश सांगितलेले

भिन्नामभिर्देशास्तेषां तेषां प्रचक्षिरे ८ द्वितीयतनयाद्धामात्सुताश्चत्वार एव ते । कुशो मिश्रश्च कूजश्च कनआंस्तत्र नामकः ९ देशाः प्रसिद्धा म्लेच्छानां कुशात्षट् तनयाः स्मृताः । सबा चैव वहबीलश्च सर्वतो रगमस्तथा १० तथा सवतिका नाम निमरूहो महाबलः । तेषां पुत्राश्च कलनः सिनारोरक उच्यत ११ अक्कदो बाबुनश्च वैरसना देशेकाश्च ते । श्रावयित्वा मुनीन्सूतो योगनिद्रावशं गतः १२ द्विसहस्रे शताष्टाढ्येऽन्ते बुद्ध्वा पुनरब्रवीत् । सिमवशं प्रवक्ष्यामि सिमा ज्येष्ठः स भूपतिः १३ राज्यं पञ्चशतं वर्षं तेन म्लेच्छेन सत्कृतम् । अर्कन्सदस्तस्य सुतश्चतुस्त्रिंशच्च राज्यकम् १४ चतुश्शतं पुनर्ज्ञेयं सिलहस्तनयोऽभवत् । राज्यं तस्य स्मृतं सप्तपञ्चोत्तरचतुःशतम् १५ इब्रतस्य सुतो ज्ञेयः पितुस्तुल्यं कृतं पदम् । फलजस्तस्य तनयश्चत्वारिंशद्द्वयं शतम् १६ राज्यं कृतं तु तस्माच्चरुनाम सुतः स्मृतः । सप्तत्रिंशच्च द्विशतं तस्य राज्यं प्रकीर्तितम् १७ तस्माच्च जूज उत्पन्नः पितुस्तुल्यं कृतं पदम् । नहूरस्तस्य तनयो वयः षष्ट्युत्तरं शतम् १८ ताहरस्तस्य तनयः पितुस्तुल्यं कृतं पदम् । तस्मात्पुत्रोऽविरामश्च नहूरो हारुनस्त्रयः १९ एव तेषां स्मृता वंशा नाममात्रेण कीर्तिताः । सरस्वत्याश्च शापेन म्लेच्छभाषा महाधमा २० तेषां वृद्धिः कलौ यासीत्सक्षेपेण प्रकीर्तिता । संस्कृतस्यैव वाणी तु भारतं वर्षमुद्धृतम् २१ अन्यखण्डं गता सैव म्लेच्छा ह्यानन्दिनोऽभवन् । एव ते विश्व कथित विष्णुभक्ता द्विजैस्सह २२ व्यास उवाच ॥ तच्छ्रुत्वा मुनयस्सर्वे विशालायां निवासिनः । नरं नारायणं देवं संपूज्य विनयान्विताः २३ ध्यानं चक्रुर्मुदा युक्ता

आहेत. युनानी इत्यादिकांचे जे इल्लीश, तरलीश, कित्ती व हूदा असे चार पुत्र सांगितलेले आहेत. त्यांच्या त्यांच्या नांवानें चार देश केले ७,८. दुसऱ्या हामनामक पुत्रापासून चार पुत्र झाले. कुश, मिश्र, कूज व कनआन् अशीं त्यांचीं नांवे होतीं ९. त्या म्लेच्छांचे देश प्रसिद्ध आहेत. कुशास सहा पुत्र होते. सबा, वहबील, सर्वत, रगम, सवातिका व बलाढ्य निमरूह अशीं त्यांचीं नांवें होतीं. त्यांचे पुत्र कलन, सिनारोरक, त्याचप्रमाणें अक्कद, बाबुन, वैरसना व देशेक असे होते. असो; ह्याप्रमाणे मुनींस सांगून सूत योगनिद्रेमध्यें तत्पर झाला १०-१२, व दोन हजार आठशें वर्षं झाल्यावर पुन जागा होऊन म्हणाला.--मी सीमाचा वंश सांगतों. तो ज्येष्ठ राजा होय १३. त्या म्लेच्छानें पांचशें वर्षं राज्य केलें. अर्कन्सद हा त्याचा पुत्र होय. त्यानें चारशें चवचाळीस वर्षं राज्य केलें. त्यास सिलह ह्मणून पुत्र झाला. त्याचें राज्य चारशें साठ वर्षं सांगितलेलें आहे १४,१५. इब्र हा त्याचा पुत्र होय. त्यानें पित्याच्या इतकें राज्य केलें. फलज हा त्याचा पुत्र होय. त्यानें दोनशें चाळीस वर्षं राज्य केलें. त्यास चरुज ह्मणून पुत्र झाला. त्याचें राज्य दोनशें सदतीस वर्षं झालें असें सांगितलें आहे १६,१७. त्याच्यापासून जूज उत्पन्न झाला. त्यानें आपल्या पित्याइतकें राज्य केलें. नहूर हा त्याचा पुत्र होय. त्याचें वय एकशें साठ वर्षं होतें १८. ताहर हा त्याचा पुत्र होय. त्यानें पित्याइतकें राज्य केलें. त्याच्यापासून अविराम, नहूर व हारुन असे तीन पुत्र झाले १९. ह्याप्रमाणें त्याचे वंश सांगितलेले आहेत व मीं त्यांचे केवल नांवानें कीर्तन केलें आहे. सरस्वतीच्या शापानें म्लेच्छ-भाषा अति अधम झाल्या २० व त्याची वृद्धि कलियुगात झाली हें संक्षेपतः सांगितलें. पुढें संस्कृत-वाणी तेथें राहिली. तें भारतवर्ष असें समजावें २१. कांहीं कालानें तीच वाणी अन्य खंडामध्यें गेली व त्यामुळें म्लेच्छ अतिशय आनंदित झाले. असो. हे विष्णुभक्त ब्राह्मणा, ह्याप्रमाणें सर्व द्विजा-सह मीं तुला सांगितलें २२. व्यास ह्मणतातः—तें ऐकून विशालेमध्यें रहाणारे सर्व मुनि विनययुक्त होत्साते नर व नारायण यास पूजिते झाले व ते आनंदयुक्त होत्साते दोनशें वर्षं ध्यान करिते झाले.

द्विशतं परिवत्सरान् । तपश्चाद्वोधितास्सर्वे शौनकाद्या मुनीश्वराः २४ सन्ध्यातर्पणदेवार्चाः कृत्वा ध्यात्वा जनार्दनम् । लोमहर्षणमासीनं पप्रच्छुर्विनयान्विताः २५ व्यासशिष्य महाभाग चिरं जीव महामते । सांप्रतं वर्तते यो वै राजा तन्मे वद प्रभो २६ सूत उवाच ॥ त्रिसहस्राब्दसंप्राप्ते कलौ भार्गवनन्दन । आवन्ते शङ्खनामाऽसौ सांप्रतं वर्तते नृपः २७ म्लेच्छदेशे शकपतिरथ राज्यं करोति वै । शृणु तत्कारणं सर्वं यथा यस्य विवर्धनम् २८ द्विसहस्रे कलौ प्राप्ते म्लेच्छवंशविवर्द्धिता । भूमिर्म्लेच्छमयी सर्वा नानापन्थविवर्द्धिता २९ ब्रह्मावर्तमृते तत्र सरस्वत्यास्तटं शुभम् । म्लेच्छाचार्यश्च मूशाख्यस्तन्मतैः पूरितं जगत् ३० देवार्चनं वेदभाषा नष्टा यास्ये कलौ युग । तल्लक्षणं शृणु मुने म्लेच्छभाषाश्चतुर्विधाः ३१ व्रजभाषा महाराष्ट्री यावनी च गुरुण्डिका । तासां चतुर्लक्षविधा भाषाश्चान्यास्तथैव च ३२ पानीयं च स्मृतं पानी बुभुक्षा भूख उच्यते । पानीयं पापडी भाषा भोजनं कक्कनं स्मृतम् ३३ इष्टिश्शुद्धरवः प्रोक्त इस्तिनी मसपावनी । आहुतिर्वै आजु इति ददाति च दधाति च ३४ पितृपैतरभ्राता च बादर पतिरेव च । सेति सा यावनी भाषा ह्यश्वश्चास्यस्तथा पुनः ३५ जानुस्थाने जैनुशब्दः सप्तसिन्धुस्तथैव च । हसहिन्दुर्यावनी च पुनर्ज्ञेया गुरुण्डिका ३६ रविवारं च सण्डे च फाल्गुने चैव फर्वरी । षष्ठिश्च सिक्सटी ज्ञेया तदुदाहारमीदृशम् ३७ या पवित्रा सप्तपुरी तासु हिंसा प्रवर्तते । दस्यवः शबरा भिल्ला मूर्खा आर्ये स्थिता नराः ३८ म्लेच्छदेशे बुद्धिमन्तो नरा वै म्लेच्छधर्मिणः । म्लेच्छार्याणां गुणाः सर्वेऽवगुणा आर्यदेशके ३९ म्लेच्छराज्यं

तदनंतर शौनकादिक सर्व मुनीश्वर ध्यान सोडून देहभानावर आले २३,२४ व संध्या, तर्पण, देवपूजा करून अग्रेि जनार्दनाचें ध्यान करून नम्र होत्साते, बसलेल्या लोमहर्षणास विचारिते झाले २५ वा महाबुद्धिमन्, चिरंजीव व महाउदार अशा व्यासशिष्या, हे प्रभो, साप्रतकाळीं कोण राजा आहे तें मला सांग २६. सूत म्हणतात– हे भार्गवपुत्रा, कलींतील तीन हजार वर्षे झालीं असतां आवन्तामध्यें शंखनामक हा राजा साप्रतकाळीं राज्य करीत आहे २७ व म्लेच्छदेशामध्यें शकपति राज्य करीत आहे. त्याचें कारण व त्याची अशी वृद्धि झाली ते ऐका२८. कलीस दोन हजार वर्षे झालीं असतां म्लेच्छाचा वंश जिन्यामध्यें वाढला आहे अशी ही सर्व भूमि म्लेच्छमयी झाली आहे. तिन्यामध्यें अनेक पंथ झाले २९. ब्रह्मावर्तावाचून व त्यातूनही सरस्वतीचें शुभ तीर सोडून म्लेच्छाचा आचार्य जो मूशा त्याच्या मतानी सर्व जग भरून गेलें ३०. कलियुग प्राप्त झालें असतां देवार्चन व वेदभाषा नष्ट झाली. वा मुने, त्याचें आता लक्षण ऐका. म्लेच्छभाषा चार प्रकारची आहे ३१. व्रजभाषा, महाराष्ट्री, यावनी व गुरुंडिका हीं तिचीं नावे होत. त्यान्याशिवाय आणखी चार लक्ष भाषा उत्पन्न झाल्या ३२. पानीयास पानी म्हणूं लागले व बुभुक्षेस भूख म्हणून म्हटलें. पानीयास व्रजभाषेंत पापडी व भोजनास कक्कन हें नाव दिलें ३३. इष्टि व शुद्धरव यास इस्तिनी व मसपावनी असें म्हणूं लागले. आहुतीस आजु व ददाति या शब्दास दधाति असें त्यानीं म्हटलें ३४. पितृ शब्दाच्या ऐवजीं पैतर, भ्राता या शब्दाच्या जागी बादर व त्याचप्रमाणें पति शब्दास सेति असें नाव प्राप्त झालें. आता यावनी भाषा पहा. अश्वास अस्य ३५, जानूच्या स्थानीं जैनु शब्द, सप्तसिंधूस हसहिंदु इत्यादि यावनी भाषेंत बोलूं लागले. आता गुरुंडिका ऐका. रविवाराच्या स्थानीं संडे; फाल्गुनाच्या जागीं फर्वरी व षष्ठीच्या स्थानीं सिक्सटी हीं त्या भाषेचीं उदाहरणें जाणावीं. जी पवित्र सप्तपुरी होती तेथेंच हिंसा प्रवृत्त झाली. दस्यु, शबर, भिल्ल इत्यादि मूर्ख पुरुष आर्यदेशात राहिले ३६–३८ व म्लेच्छदेशामध्यें बुद्धिमान् म्लेच्छधर्मी लोक राहिले. सर्व गुण म्लेच्छांच्या अधीन

भारते च तदद्वीपेषु स्मृतं तथा । एवं ज्ञात्वा मुनिश्रेष्ठ हरिं भज महामते ४० तच्छ्रुत्वा, मुख्यः सर्वे रोदनं चक्रिरे बहु ४१ [३३१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डा-परपर्याये कलियुगभूपवर्णनं नाम पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

शौनक उवाच ब्रह्मावर्ते कथं म्लेच्छा न यातास्तत्र कारणं वद । सूतः प्राह शृणुष्वेदं सरस्वत्याः प्रभावतः १ म्लेच्छाः यातास्तत्र न तत्स्थाने काश्यपो नाम वै द्विजः । कलौ प्राप्ते २ हस्राब्दे स्वर्गात्प्राप्तः सुराज्ञया २ आर्यावती च तत्पत्नी दश पुत्रानकल्मषान् । काश्यपात्सा लब्धवती तेषां नामानि मे शृणु ३ उपाध्यायो दीक्षितश्च पाठकः शुक्लमिश्रकौ । अग्निहोत्री द्विवेदी च त्रिवेदी पाण्ड्य एव च ४ चतुर्वेदीति कथिता नामतुल्या गुणाः स्मृता । तेषां मध्ये काश्यपश्च सर्वज्ञानसमन्वितः ५ काश्मीरे प्राप्तवान्सोऽपि जगदम्बां सरस्वतीम् । तुष्टाव पूजनं कृत्वा रक्त-पुष्पैस्तथाक्षतैः ६ धूपैर्दीपैश्च नैवेद्यैः पुष्पाञ्जलिसमन्वितः ७ काश्यप उवाच ॥ मातः शंकरवल्लभे मयि ते करुणा कुतो नास्ति । भासि त्वं जगदम्बा जगतः किं मां बहिर्नयसि ८ देवि त्वं सुरहेतौ धर्मद्रोहिणमाशु हंसि मातः । उत्तमसंस्कृतभाषां त्वं कुरु म्लेच्छांस्त्वं मोहयेः शीघ्रम् ९ अम्ब त्वं बहुरूपा हुङ्काराद्धूम्रलोचनं हंसि । भीमं दुर्गां दैत्यं हत्वा जगतां सुखं नयास १० दम्भं मोहं घोरं गर्वं हत्वा सदा सुखं शेषे । बोधय मानज-गता दुष्टान्नाद्यान्कुरु त्वं वै । तदा प्रसन्ना सा देवी भो मुनेस्तस्य मानसं ११ वास कृत्वा ददौ ज्ञानं मिश्रदेशे मुनिर्गतः । सर्वान्म्लेच्छान्मोहयित्वा कृत्वाऽथ तन्द्विजन्मनः १२

होऊन राहिले व सर्व अवगुण आर्यदेशात भरले ३९. म्लेच्छांचें राज्य भारतवर्षांत व त्याच्या आसपासच्या द्वीपात झालें. साराश, असें जाणून, हे श्रेष्ठ मुने, वा महामते, हरीची सेवा कर ४०. हे ऐकून सर्व मुनि अतिशय रोदन करू लागले ४१. याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युग-खंड ह्या व्यास दुसरें नाव आहे अशा प्रतिसर्गपर्वापैकीं कलियुगातील राजांचें वर्णन या नावाचा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

शौनक ह्मणतात:—ब्रह्मावर्तामध्ये म्लेच्छ कसे आले नाहींत त्याचें कारण सांग. सूत ह्मणाले:—हे एका; सरस्वतीच्या प्रभावाने त्या स्थानीं म्लेच्छ आले नाहींत. कलीस सहस्र वर्षे झालीं असता त्याच्या आज्ञेने तेथें काश्यपनामक ब्राह्मण स्वर्गलोकाहून आला १,२. त्याची पत्नी आर्यावती ह्मणून होती. तिला काश्यपापासून निष्पाप दहा पुत्र झाले. त्यांचीं नावें माझ्या तोंडून ऐक ३. उपाध्याय, दीक्षित, पाठक, शुक्ल, मिश्र, अग्निहोत्री, द्विवेदी, त्रिवेदी, पाण्ड्य व चतुर्वेदी हीं त्यांचीं नावे झालीं. नावाप्रमाणेंच त्याचे गुणही होते. त्यामध्य काश्यप हा सर्वज्ञानयुक्त होत्साता शोभत असे ४,५. तोही काश्मीरात प्राप्त झाला व त्या जगदंबा सरस्वतीची लाल पुष्पे, लाल अक्षता, धूप, दीप, नैवेद्य व पुष्पांजलि यासह पूजा करून स्तुति करिता झाला ६,७. काश्यप ह्मणाला —हे माते, शंकरपत्नि, मजवर तुझी दया कशी नाहीं? अगे, तूं जगदंबा असताना मला जगाच्या बाहेर कशी नेत आहेस? हे माते, हे देवि, तू देवाकरिता धर्माचा द्रोह करणारास ताबडतोब मारितेस. यास्तव, हे मातोश्रि, तूं उत्तम संस्कृतभाषा कर व म्लेच्छास तात्काल मोहित कर ८,९. हे अंबे, तूं बहुरूपी आहेस. हुंकारबरोबर तूं धूम्रलोचनास मारितेस. भयंकर दैत्यास मारून तूं दुर्गा जगास सुख देतेस १०. दंभ, मोह व घोर गर्व यास मारून तूं सर्वदा सुखानें निद्रित झाली आहेस, पण हे माते, आता ऊठ. जगातील दुष्टास नाहींसें करून टाक. अहो मुनिराज, ही स्तुति ऐकून ती देवी प्रसन्न झाली व तिनें त्याच्या मनामध्ये वास करून त्यास ज्ञान दिलें. नंतर तो मुनि मिश्र देशा-

संख्याः दशसहस्रं च नरवृन्दं द्विजन्मनाम् । द्विसहस्रं स्मृता वैश्याः शेषाः शूद्रसुताः स्मृताः १३ तैः साद्धमार्यदेशे स सरस्वत्याः प्रसादतः । अवसद्दै मुनिश्रेष्ठो मनिकार्यरतः सदा १४ तेषामार्यसमूहानां देव्याश्च वरदानतः । वृद्धिर्भवति बहुला चतुष्कं दिनजाः स्त्रियः १५ तेषां पुत्राश्च पौत्राश्च तद्भूपः काश्यपो मुनिः विंशोत्तरशतं वर्षं तस्य राज्यं प्रकीर्तितम् १६ राज्यपुत्राख्यदेशे च शूद्राश्चाष्टसहस्रकाः । तेषां भूपश्चार्यपृथुस्तस्माज्जातस्तमागधः १७ मागधं नाम तत्पुत्रमभिषिच्य ययौ मुनिः । इति श्रुत्वा भृगुश्रेष्ठः शौनको हर्षमागतः १८ सूतं पौराणिकं नत्वा विष्णुध्यानपरोऽभवत् । पुनश्चत्वारि वर्षान्ते बोधिता मुनयस्तथा १९ नित्यनैमित्तिकं कृत्वा पप्रच्छुरिदमादरात् । लोमहर्षण मे ब्रूहि के राजानश्च मागधात् २० कलौ राज्यं कृतं कैस्तु व्यासशिष्य वदस्व नः । सूत उवाच ॥ मागधो मागधे देशे प्राप्तवान्काश्यतात्मजः २१ पितृराज्यं स्मृतं तेन त्वार्यदेशः पृथक्कृतः । पाञ्चालात्पूर्वतो देशो मागधः परिकीर्तितः २२ आग्नेय्यां च कलिङ्गश्च तथा वन्तस्तु दक्षिणे । आनर्तदेशो नैर्ऋत्यां सिन्धुदेशस्तु पश्चिमे २३ वायव्यां कैकयो देशो भद्रदेशस्तथोत्तरे । ईशाने चैव कौणिन्दश्चार्यदेशश्च तत्कृतः २४ देवानाम्ना तस्य सुता नगधस्य महात्मनः । तेभ्योऽगणि प्रदत्तानि तत्पश्चात्कृतमुद्वहन् २५ बलभद्रस्तदा तुष्टो यज्ञभावन भावितः । शिशुनाग. क्रतोर्जातो बलभद्रांशसंभवः २६ राज्यं कृत राज्यं काकवर्मा सुतोऽभवत् । तद्राज्य नवतिवर्षं क्षेमधर्मा ततोऽभवत् २७ अशीतिवर्षं राज्य तत्क्षेत्रौजास्तत्सुतोऽभवत् । दशहीन कृत राज्य वेदमित्रस्ततोऽभवत २८ दशहीन शत

मध्ये गेला. सर्व श्लेष्वास मोहित करून व त्यास द्विज करून द्विजान्या पुरुषांची संख्या दहा हजार झाली. त्यातील दोन हजार वैश्य होते व इतर सर्व शूद्रपुत्र झाले असे सांगितले आहे ११–१३. त्यान्यासह तो श्रेष्ठ मुनि सरस्वतीच्या प्रसादानें आर्य देशामध्ये सर्वदा मुनींच्या कार्यामध्ये रत होत्साता राहूं लागला १४. देवीच्या वरदानामुळें त्या आर्यसमूहाची बहुत वृद्धि होते, म्हणजे स्त्रीपुरुष मिळून चार कोटि संख्या वाढते १५ व त्याचे पुत्रपौत्र होतात. तेव्हा तो काश्यपमुनि तेथील राजा झाला. त्याचें राज्य एकशें बीस वर्षे सांगितलेलें आहे १६. राज्यपुत्रसंज्ञक देशामध्ये आठ हजार शूद्र होते, त्यांचा राजा आर्य पृथु झाला. त्याच्यापासून समागध झाला. मागध नामक त्याच्या पुत्रास अभिषेक करून तो मुनि परलोकीं गेला. हे ऐकून भृगुश्रेष्ठ शौनकास आनंद झाला १७,१८. तेव्हा पौराणिक जो सूत त्यास नमस्कार करून तो विष्णूच्या ध्यानामध्ये तल्लीन झाला. पुनरपि चार वर्षांनंतर मुनि देहभानावर आले १९ व नित्यनैमित्तिक करून आदरानें हें विचारते झाले. " हे लोमहर्षणा, मागधापासून कोण राजे झालें ते मला सांग. हे व्यासाच्या शिष्या, कलियुगात ज्यांनीं राज्य केलें त्यांचे वर्णन करून मला सांग " सूत म्हणतात:— काश्यपपुत्र मागध मागधदेशामध्ये आला २०,२१. त्यानें पित्याच्या राज्याचे स्मरण केलें व आर्यदेश भिन्न केला. पाचालाच्या पूर्वेस मागध देश सांगितलेला आहे २२; आग्नेयीस कलिंग, दक्षिणेस आवंत. नैर्ऋत्य दिशेस आनर्त, पश्चिमेस सिंधुदेश, वायव्येस कैकय, उत्तरेस भद्रदेश व ईशान्य दिशेस कौणिन्द देश व तत्कृत आर्यदेश आहे २३,२४. त्या महात्म्या मगधाचे पुत्रहीं त्याच नावाने प्रसिद्ध होते. त्यांच्यापासून अंश देऊन त्यापासून क्रतु करिता झाला २५. यज्ञभावानें भावित झालेला बलभद्र त्याजवरी संतुष्ट झाला. बलभद्राच्या अंशापासून झालेला शिशुनाग त्या क्रतूपासून उत्पन्न झाला २६. त्यानें शंभर वर्षे राज्य केलें. त्यास काकवर्मा म्हणून पुत्र झाला. त्यानें नव्वद वर्षे राज्य केलें. त्याच्यापासून क्षेमधर्मा झाला २७. त्याचे राज्य ऐंशी वर्षे टिकलें. त्यास क्षेत्रौजा

राज्य ततोऽजातरिपुस्सुत' । दशहीनं कृतं राज्य दर्भकस्तनयोऽभवत् २९ दशहीनं कृतं राज्य-मुदयाश्वस्ततोऽभवत् । दशहीन कृतं राज्य नन्दवर्धन एव तत् ३० दशहीन कृतं राज्य तस्मा-न्नन्दसुतोऽभवत् । पितुस्तुल्यं कृत राज्यं शूद्रीगर्भसमुद्भवः ३१ नन्दाज्जातः प्रनन्दश्च दशवर्ष कृतं पदम्;ततस्माज्जात परानन्दः पितुस्तुल्यं कृत पदम् ३२ तस्माज्जातस्समानन्दो विंशदूर्ष कृत पदम् । तस्माज्जातः प्रियानन्दः पितुस्तुल्य कृतं पदम् ३३ देवानन्दस्तस्य सुतः पितुस्तुल्य कृत पदम् । यज्ञभङ्ग सुतस्तस्मात्पितुरर्द्ध कृत पदम् ३४ मौर्यानन्दस्तस्य सुतः पितुस्तुल्य कृत पदम्। महानन्दस्ततो जातः पितुस्तुल्य कृतं पदम् ३५ एतस्मिन्नेव काले तु कलिना सस्तुतो हरि । काश्यपादुद्भवो देवो गौतमो नाम विश्रुतः ३६ बौद्धधर्म च सस्कृत्य पट्टणे प्राप्तवान्हरि । दशवर्ष कृत राज्य तस्माच्छाक्यमुनिः स्मृतः ३७ विंश-द्वर्ष कृत राज्यं तस्माच्छुद्धोदनोऽभवत् । त्रिंशद्वर्ष कृत राज्य शाक्य-सिंहस्ततोऽभवत् ३८ शताद्वौ द्विसहस्राब्दे व्यतीते सोऽभवन्नृपः। कले प्रथमचरणे वेदमार्गो विना-शित ३९ षष्टिवर्ष कृतं राज्यं सर्वबौद्धा नराः स्मृताः। नरेषु विष्णुर्नृपतिर्यथा राजा तथा प्रजाः ४० विष्णोर्वीर्यानुसारेण जगद्धर्मः प्रवर्तते । तस्मिन्हरौ ये शरणं प्राप्ता मायापतौ नराः ४१ अपि पापसमाचारा मोक्षवन्तः प्रकीर्तिता । शाक्यसिंहाद्बुद्धसिंहः पितुरर्द्ध कृत पदम्४२ चन्द्रगुप्तस्तस्य सुतः पौरसाधिपते. सुताम् । सुतूवस्य तथोद्राक्ष यावनीं बौद्धतत्पर ४३ षष्टिवर्ष कृत राज्य

ह्मणून पुत्र होता. त्यानें आपल्या पित्यापेक्षा दहा वर्षे कमी राज्य केलें. त्याच्यापासून वेदभिद्र झाला २८.त्यानेंही दहा वर्षे कमी राज्य केलें. त्याच्यापासून अजातरिपु हा पुत्र झाला. त्यानेंही पित्यापेक्षा दहा वर्षे कमी राज्य केलें. त्यास दर्भक ह्मणून पुत्र होता २९. त्यानें दहा वर्षे कमी राज्य केलें. त्याच्यापासून उदयाश्व झाला. त्यानें दहा वर्षे न्यून राज्य केल. त्यास नंदवर्धन झाला ३०. त्यानें दहा वर्षे कमी राज्य केलें. त्याच्यापासून नदसुत झाला. त्याने पित्याच्या इतकें राज्य केलें. नंतर शूद्रस्त्रीच्या गर्भापासून झालेला नंदपुत्र प्रनद झाला. त्याने दहा वर्षेंच राज्य केलें. त्याच्यापासून परानद झाला. त्यानें पित्याइतकें राज्य केले ३१,३२. त्याच्याप सून समानद झाला. त्यानें वीस वर्षे राज्य केलें. त्याच्यापासून प्रियानंद झाला. त्याने पित्याइतकें राज्य केले ३३. देवानद हा त्याचा पुत्र होय. त्यानें पित्याच्या बरोबरीनें राज्य केलें. यज्ञदत्त हा त्याचा पुत्र होय. त्याने पित्याच्या अर्धे राज्य केलें ३४. मौर्यानद हा त्याचा पुत्र होय. त्याने पित्याइतकें राज्य केल. त्याच्यापासून महानद झाला. त्याने पित्याच्या इतकें राज्य केलें ३५. इतक्यातच कलीनें ज्याची स्तुति केली आहे असा हरि काश्यपापासून ज्याची उत्पत्ति झाली आहे अशा त्या वंशात गौतम नावान विश्रुत होत्साता ३६ बौद्धधर्माची दीक्षा घेऊन पट्टणा-मध्ये प्राप्त झाला. त्याने दहा वर्षे राज्य केलें. त्याच्यापासून शाक्यमुनि सांगितलेला आहे ३७. त्यानें वीस वर्षे राज्य केलें. त्याच्यापासून शुद्धोदन झाला. त्यानें तीस वर्षे राज्य केलें. नतर शाक्यसिंह झाला ३८. शताद्रूचे ठायीं दोन हजार वर्षे झालीं असता तो राजा झाला. साराश, कलीच्या प्रथम चरणात वेदमार्गाचा नाश झाला ३९. त्यानें साठ वर्षे राज्य केले. सर्व लोक बौद्ध झाले. कारण, लोकातील राजा विष्णु हाय. व जसा राजा तशी प्रजा ४०. विष्णूच्या वीर्यप्रमाणें जगाच्या धर्माची प्रवृत्ति होते. त्या मायापति विष्णूस जे पुरुष शरण आले ४१ ते जरी पापाचरणी होते तरी मोक्षवान् झाले ह्मणजे त्यास मोक्ष मिळाला अस सांगितलें आहे. शाक्यसिंहापासून बुद्धसिंह राजा झाला. त्यानें पित्याच्या अर्धे राज्य केले. त्याचा

बिन्दुसारस्ततोऽभवत् । पितुस्तुल्यं कृतं राज्यमशोकस्तनयोऽभवत् ४४ एतस्मिन्नेव काले तु काव्यकुब्जो द्विजोत्तमः । आर्बुदं शिखरं प्राप्य ब्रह्महोमममथाकरोत् ४५ वेदमन्त्रप्रभावाच्च जाताश्चत्वारि क्षत्रियाः । प्रमरस्सामवेदी च चपहानिर्यजुर्विदः ४६ त्रिवेदी च तथा शुक्लोऽथर्वा स-परिहारकः । ऐरावतकुल जातान्गजानारुह्यते पृथक् ४७ अशोकं स्ववशं चक्रुस्सर्वे बौद्धा विनाशिताः । चतुर्लक्षाः स्मृता बौद्धा दिव्यशस्त्रैः प्रहारिताः ४८ अवन्ते प्रमरो भूपश्चतुर्योजन-विस्तृताम् । अम्बावतीं नाम पुरीमध्यास्य सुस्थितोऽभवत् ४९ [३८०] इति श्रीभविष्ये महापु-राण प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगभूपवर्णनोपाख्याने षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

सूत उवाच ॥ चित्रकूटगिरेर्देशे परिहारो महीपतिः । कलिञ्जरपुरं रम्यमकोशायतनं स्मृतम् १ अध्यास्य बौद्धहन्ता स सुस्थितोऽभवदर्जित । राजपुत्राख्यदेशे च चपहानिर्महीपतिः २ अजमेरपुरं रम्य विविधशोभासमन्वितम् । चातुर्वर्ण्ययुतं दिव्यमध्यास्य सुस्थितोऽभवत् ३ शुक्लो नाम महीपालो गत आनर्तमण्डले । द्वारकां नाम नगरीमध्यास्य सुस्थितोऽभवत् ४ शौनक उवाच ॥ तेषामन्युद्भवानां च ये भूपा राज्यसत्कृताः । तान्मे ब्रूहि महाभाग सूतो वाक्यमथाब्रवीत् ५ गच्छध्वं ब्राह्मणाः सर्वे योगनिद्राक्षयो ह्यहम् । तच्छ्रुत्वा मुनयः सर्वे विष्णोर्ध्यानं प्रच-क्रिरे ६ पूर्णे द्वे च सहस्रान्ते सूतो वचनमब्रवीत् । सप्तविंशाधिके वर्षे दशाब्दे चाधिके कलौ ७ प्रमरो नाम भूपालः कृत राज्य च षट् समाः । महामहस्ततो जातः पितुरर्द्धं कृत्वा पदम् ८ देवो-

---

पुत्र चंद्रगुप्त होय. त्यानें पौरसाधिपति सुकृत्याच्या यावनी कन्येशी विवाह केला व तो बौद्ध धर्मात तत्पर राहिला ४२,४३. त्यानें साठ वर्षे राज्य केलें. त्याच्यामागून बिंदुसार झाला. त्यानें बापाच्या इतकें राज्य केलें. त्याम अशोक हा पुत्र झाला ४४. इतक्यातच एक उत्तम कान्यकुब्ज ब्राह्मण अर्बुद शिखरावर (अबूवर) जाऊन ब्रह्महोम करिता झाला ४५. तेव्हा वेदमंत्राच्या प्रभावानें चार क्षत्रिय उत्पन्न झाले. प्रमर हा सामवेदी, चपहानि यजुर्वेदी ४६, शुक्ल त्रिवेदी; व सपरिहारक अथर्ववेदी झाला. असो; ऐरावताच्या कुलात उत्पन्न झालेल्या भिन्न भिन्न गजावर आरूढ होऊन ४७ त्यानें अशोकास आपल्या अधीन आणिलें व सर्व बौद्धाचा नाश केला. चार लक्ष बौद्ध दिव्य शस्त्रानीं नष्ट झाले, असें सांगितलें आहे ४८. असो, प्रमरनामक राजा अवन्तीत चार योजनें विस्तृत असलेल्या अंबावतीनामक नगरात राहून सुखी झाला ४९. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंड हें ज्याम दुसरें नाव आहे अशा प्रतिसर्गपर्वापैकीं कलियुगातील राजांच्या वर्णनाविषयीं सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥

सूत ह्मणतातः—चित्रकूटपर्वताच्या प्रदेशात परिहार ह्मणून राजा झाला. तो बौद्धाचा हिंसक कलिंजरनामक रम्य व कोसभर विस्तृत नगरात राहून सुखी झाला. तो ऊर्जितावस्थेप्रत प्राप्त झाला होता. राजपुत्राख्य देशामध्यें चपहानिनामक राजा झाला १,२. तो अजमेरनामक रम्य, विविध शोभायुक्त, चारी वर्णाच्या लोकानीं युक्त व दिव्य नगरात राहून सुखी झाला ३. शुक्लनामक राजा आनर्त मंडलात गेला व द्वारकानामक नगरीत राहून सुखी झाला ४. शौनक ह्मणतातः—हो महाभागा, त्या अग्नीपासून उत्पन्न झालेल्या राजाचे जे वंशज पुढें राज्य करिते झाले त्यांची नावें, मला सांग. तेव्हा सूत ह्मणाला ५ "आतां सर्व ब्राह्मणानीं गमन करावें. मी योगनिद्रेच्या वश झालों आहें." तें ऐकून सर्व मुनि विष्णूचें ध्यान करिते झाले ६. दोन हजार वर्षें पूर्ण झालीं असता सूत ह्मणालाः—कलींतील सदतीसशें दहा वर्षें झालीं असता प्रमरनामक भूपाल सहा वर्षे राज्य करिता झाला. त्याच्यापासून महामह झाला. त्यानें पित्याच्या अर्धे राज्य केलें. त्याचा पुत्र देवोपि. त्यानें

पित्स्तनयस्तस्य पितुस्तुल्यं कृतं पदम् । देवदूतस्तस्य सुतः पितुस्तुल्यं स्मृतं पदम् ९ तस्माद्गन्धर्वसेनश्च पञ्चाशदब्दं भूपदम् । कृत्वा च स्वसुतं शङ्खमभिषिच्य वनं गतः १० शङ्खेन तत्पदं प्राप्य राज्यं त्रिंशत्समाः कृतम् । देवाङ्गना वीरमती शकेण प्रेषिता तदा ११ गन्धर्वसेन सम्प्राप्य पुत्ररत्नमजीजनत् । सुतस्य जन्मकाले तु नभसः पुष्पवृष्टय. १२ पेतुर्दुन्दुभयो नेदुर्वान्ति वाता सुखप्रदा । शिवदृष्टिर्द्विजो नाम शिष्यैस्सार्द्धं वनं गतः १३ विंशद्वर्षैः कर्मयोगं च समाराध्य शिवोऽभवत् । पूर्णे त्रिंशच्छते वर्षे कलौ प्राप्ते भयङ्करे १४ शकानां च विनाशार्थमार्यधर्मविवृद्धये । जातश्शिवाज्ञया सोऽपि कैलासाद्गुह्यकालयात् १५ विक्रमादित्यनामानं पिता कृत्वा मुनोदहृ । स बालोऽपि महाप्राज्ञ. पितृमातृप्रियङ्करः १६ पञ्चवर्षे वयप्राप्ते तपसोऽर्थे वनं गतः । द्वादशाब्दं प्रयत्नेन विक्रमेण कृतं तपः १७ पश्चादम्बावतीं दिव्यां पुरीं यात श्रियान्वितः । दिव्य सिंहासन रम्य द्वात्रिंशन्मूर्तिसंयुतम् १८ शिवेन प्रेषितं तस्मै सोऽपि तत्पदमग्रहीत् । वैतालस्तस्य रक्षार्थं पार्वत्या निर्मितो गतः १९ एकदा स नृपो वीरो महाकालेश्वरस्थलम् । गत्वा सम्पूजयामास देवदेवं पिनाकिनम् २० सभा धर्ममयी तत्र निर्मिता व्यूहविस्तरा । नानाधातुकृतस्तम्भा नानामणिविभूषिता २१ नानाद्रुमलताकीर्णा पुष्पवल्लीभिरन्विता । तत्र सिंहासन दिव्यं स्थापित तेन शौनक २२ आहूय ब्राह्मणान्मुख्यान्वेदवेदाङ्गपारगान् । पूजयित्वा विधानेन धर्मगाथामथाशृणोत् २३ एतस्मिन्नन्तरे तत्र वैतालो नाम देवता । स कृत्वा ब्राह्मण रूप जयाशीर्भिः प्रशस्य

पित्याच्या इतकें राज्य केलें. त्याचा पुत्र देवदूत होय. त्यानें पित्याच्या इतकें राज्य केले ७–९. त्याच्यापासून गंधर्वसेन झाला. त्यानें पन्नास वर्षे राज्य केले व नंतर आपल्या शंखनामक पुत्रास राज्याभिषेक करवून तो वनास गेला १०. शंखानें त्या पदाची प्राप्ति झाल्याकर तीस वर्षे राज्य केलें. इंद्रानें देवांगना वीरमतीस त्याच्याकडे पाठविले ११ अमता ती गंधर्वसेनाजवळ येऊन राहिली व तिला पुत्ररत्न झालें. या पुत्राच्या जन्मसमयीं आकाशातून पुष्पवृष्टि झाली; दुंदुभि वाजूं लागल्या व सुख देणारे वायु वाहूं लागले. इतक्यात शिवदृष्टिनामक ब्राह्मण बीस शिष्यांसह वनास गेला व कर्मयोगाचें सेवन करून शिवरूप झाला. पुढे भयंकर कलियुग प्राप्त होऊन तीनशें वर्षे पूर्ण झालीं असता १२-१४ शकांच्या नाशार्थ व आर्यधर्माच्या वृद्ध्यर्थ तोच ब्राह्मण शिवाज्ञेनें कैलासावरील गुह्यकालयातून निघाला व विक्रमादित्यनामक राजास आपला पिता करून आनंदयुक्त झाला. तो बालक असूनही महाबुद्धिमान् व मातापितरांचें प्रिय करणारा होता १५,१६. त्याचें पांच वर्षांचें वय झालें असता तो तपाकरिता वनांत गेला. व मोठ्या धैर्याने व प्रयत्नाने त्यानें बारा वर्षे तप केलें १७. नंतर संपत्तीने युक्त होत्साता तो अम्बावतीनगरीस गेला. बत्तीस मूर्तींनी युक्त असे रम्य व दिव्य सिंहासन त्याच्या करिता शंकरानें पाठविलें व त्यानेंही त्याचा स्वीकार केला. त्याच्या रक्षणाकरिता पार्वतीनें निर्माण केलेला वेतालही त्याच्या बरोबर आला होता १८,१९. एकदा तो शूर राजा महाकालेश्वरनामक स्थलीं जाऊन देवाधिदेव पिनाकीची पूजा करिता झाला. व तेथे त्यानें व्यूहाप्रमाणें विस्तृत धर्ममयी सभा निर्माण केली. तिचे स्तंभ नानाप्रकारच्या धातूंचे केलेले असून ती अनेक रत्नांनीं अत्यंत शृंगारिलेली होती २०,२१. ती नाना वृक्ष व लता यांनी व्याप्त व फुलाच्या वेलींनीं युक्त असे. असो; बा शौनका; त्यानें तेथें दिव्य सिंहासन स्थापिलें २२. वेद व वेदांगें यांत पारंगत अशा मुख्य ब्राह्मणास बोलावून; त्याची यथाविधि पूजा करून नंतर तो त्याच्या तोंडून धर्मगाथा ऐकता झाला २३. इतक्यात तेथें वेतालनामक देवता ब्राह्मणाचे रूप घेऊन व त्याची जयाशीर्वादानी स्तुति करिता

तम् २४ उपविश्यासनं द्विजो राजानमिदमब्रवीत् । यदि ते श्रवणे श्रद्धा विक्रमादित्यभूपते २५ वर्णयामि महाख्यानमितिहाससमुच्चयम् २६ [४०६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगराजवंशशिवरात्रिभूपवर्णनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

॥ इति प्रथमखण्डः संपूर्णः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ सूत उवाच ॥ इत्युक्तस्य तु वेतालो महाकालेश्वरस्थितः । शिवं मनसि संस्थाप्य राजानमिदमब्रवीत् १ विक्रमादित्यभूपाल शृणु गाथां मनोरमाम् । वाराणसी पुरी रम्या महेशो यत्र तिष्ठति २ चातुर्वर्ण्यप्रजा यत्र प्रतापमुकुटो नृपः । महादेवी च महिषी धर्मज्ञस्य महीपतेः ३ तत्पुत्रो वज्रमुकुटो मन्त्रिणः सुतवल्लभः । षोडशाब्द वयःप्राप्ते हयारूढो वनं गतः ४ अमात्यतनयश्चैव बुद्धिदक्ष इति श्रुतः । हयारूढो गतः सार्धं समानवयसा वने ५ स दृष्ट्वा विपिनं रम्यं मृगपक्षिसमन्वितम् । मुमोद वज्रमुकुटः कामाशयवशं गतः ६ तत्र दिव्यं सरो रम्यं नानापक्षिनिनादितम् । तस्य कूले शिवस्थानं मुनिवन्द्यैः प्रपूजितम् ७ दृष्ट्वा तत्र गतौ वीरौ परमानन्दमाप्तवान् । एतस्मिन्नन्तरे भूप करणाटकभूपतेः ८ दन्तवक्त्रस्य तनया नाम्ना पद्मावती मता । कामदेवं नमस्कृत्य कामिनी कामरूपिणी ९ चिक्रीड सखिभिः क्रीडां सरोमध्ये मनोहरा । तदा तु वज्रमुकुटो मन्दिरादागतो बहिः १० दृष्ट्वा पद्मावतीं बालां तुल्यरूपगुणान्विताम् । मूर्छितः पतितो भूमौ सा दृष्ट्वा तु मुमोह वै ११ प्रबुद्धो वज्रमुकुटो मां पाहि शिव शंकर । इत्युक्त्वा भूपतनयः पुनर्बालां ददर्श ह १२ शिरसः

झाली २४. आसनावर बसून तो ब्राह्मण राजास असें म्हणाला " हे विक्रमादित्य भूपाला, जर तुझी श्रवण करण्याची इच्छा असेल तर इतिहासांनीं युक्त असें महाख्यान मी तुला सांगेन " २५,२६. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणांतील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वांपैकीं " कलियुगांतील राजांचें वर्णन " या नांवाचा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

ह्याप्रमाणें प्रथम खंड संपूर्ण झालें ॥ १ ॥

सूत म्हणतात:— (नंतर " साग " असें म्हणून) राजानें ज्यास आज्ञा केली आहे असा तो महाकालेश्वरीं राहिलेला वेताल शंकराची मनामध्यें स्थापना करून राजास असें म्हणाला:— हे विक्रमादित्य राजा, ही मनोरम कथा ऐक. वाराणसी म्हणून एक रम्य नगर आहे त्यात महेश असतो १,२. तेथें चारी वर्णांची प्रजा असून प्रतापमुकुट म्हणून राजा होता. त्या धर्मज्ञ राजाची महादेवी म्हणून राणी होती ३. त्यास वज्रमुकुट म्हणून पुत्र होता व त्याचे मंत्री पुत्रावर प्रेम करणारे असत. असो. सोळावें वर्ष लागलें असता तो घोड्यावर बसून वनास गेला ४,५. तो वज्रमुकुट राजपुत्र ते पक्षी व मृग यांनीं युक्त व रम्य वन पाहून मदनाच्या अधीन झाला ६. तेथें अनेक पक्ष्यांनीं नादित केलेलें दिव्य व रम्य सरोवर होतें. त्याच्या तीरी मुनिसमूहांनीं पूजित असें एक शिवस्थान होतें ७. तें पाहताच ते दोघे वीर तेथें गेले व परमानंदयुक्त झाले. इतक्यांत, वा राजा, करनाटकाच्या दंतवक्त्रनामक राजाची पद्मावतीनामक कन्या तेथें आली. ती कामरूपिणी कामिनी कामदेवास नमस्कार करून ८,९ सख्यांसह सरोवरामध्यें मनोहर क्रीडा करूं लागली. तेव्हा तो वज्रमुकुट मंदिरांतून बाहेर आला १० व त्या समान रूप व समान गुण यांनीं युक्त अशा पद्मावतीसंज्ञक बालिकेस पाहून मूर्च्छित होऊन भूमीवर पडला. व त्यास पाहून ती बालिकाही मोहित झाली ११. नंतर सावध झालेला वज्रमुकुट " हे शिवशंकरा, माझें रक्षण कर. " असें म्हणून तो राजपुत्र पुनरपि बालि-

पद्मकुसुमं सा गृहीत्वा तु कर्णयोः। कृत्वा चखान दशनैः पादयोर्दधती पुनः १३ पुनर्गृहीत्वा तत्पुष्पं हृदये समवेशितम्। इति भावं च सा कृत्वाऽलिभिः सार्धं ययौ गृहम् १४ तीर्थार्थं च समं पित्रा सपत्नी गिरिजा वने। तस्यां गतायां स नृपो मारबाणेन पीडितः १५ महतीं मानसीं पीडां प्राप्तवान्मोहमागतः। उन्मादीव ततो भूत्वा खानपानविवर्जितः १६ ध्यात्वा पद्मावतीं बालां मौनव्रतमधीकरत्। तदा कोलाहलो जातः प्रतापमुकुटान्तिके १७ कुमारः कां दशां प्राप्त इति हा हेति सर्वतः। विदिनान्ते मन्त्रिसुतो बुद्धिदक्षो विचारदः १८ अब्रवीद्वज्रमुकुटं सत्यं कथय भूपते। स आह कारणं सर्वं यथा जातं सरोवरे १९ तच्छ्रुत्वा बुद्धिदक्षश्च विहस्याह महीपतिम्। महाकष्टेन सा देवी मित्रत्वं हि गमिष्यति २० करणाटकभूपस्य वज्रदन्तस्य सा सुता। पद्मावतीति विख्याता दधती त्वां स्वमानसे २१ पुष्पभावेन ज्ञात्वाऽहं त्वां नयामि तदन्तिकं। इत्युक्त्वा तस्य पितरं प्रतापमुकुटं प्रति २२ आहाऽऽज्ञां देहि भूपाल यास्येऽहं करणाटकं। त्वत्सुतस्य चिकित्सार्थं सवज्रमुकुटोऽचिरम् २३ आयामि नात्र संदेहो यदि जीवयसे सुतम्। तथेति मत्वा स नृपः प्रादात्पुत्रं च मन्त्रिणे २४ हयारूढौ गतौ शीघ्रं दन्तवक्त्रस्य पत्तनं। काचिद्वृद्धा स्थिता तत्र तस्या गेहं च तौ गतौ २५ बहु द्रव्यं ददौ तस्यै बुद्धिदक्षो विचारदः। ऊषतुर्मन्दिरे तस्मिन्रात्रिं घोरतमावृताम् २६ प्रातःकाले तु सा वृद्धा गच्छन्ती राजमन्दिरम्। तामाह मन्त्रितनयः शृणु मातर्वचो मम २७ पद्मावतीं च समाप्यैकान्ते

केस पहाता झाला १२. तेव्हा ती आपल्या मस्तकावरून कमलपुष्प काढून कानाजवळ नेऊन, त्यास दातांनी चावून पुनः पायावर धरती झाली १३ आणि पुनरपि तें पुष्प घेऊन तिने हृदयप्रदेशी खोंचून ठेविलें. ह्याप्रमाणें भाव करून ती सख्यांसह गृही गेली १४. इतक्यांत तीर्थाकरितां गिरिजा त्या वनांत पित्यासह आली. असो; पण ती राजकन्या गेली असता तो राजपुत्र कामाच्या बाणाने विद्ध झाला १५. त्याला अतिशय मानसपीडा होऊं लागली. तो मोहित झाला. पुढें तो जसा काहीं उन्मादयुक्त झाला. त्याने खाणेपिणें सोडिले १६. त्या पद्मावती बालेचें ध्यान करून त्याने मौनव्रत धरिलें. तेव्हा राजा प्रतापमुकुटाजवळ मोठा कोलाहल झाला १७, म्हणजे " पुत्राची काय अवस्था झाली ! हा ! हा !" असें चोहोकडून ऐकू येऊ लागले. पुढें तीन दिवस झाले असता चतुर मंत्रिपुत्र बुद्धिदक्ष वज्रमुकुटास म्हणाला " बा राजा, (तुझी अशी अवस्था होण्याचे काय कारण आहे ते) खरे सांग. " तेव्हा त्याने सरोवरात घडलेला सर्व प्रकार त्यास सांगितला १८,१९. तो ऐकून बुद्धिदक्ष हंसून राजास म्हणाला " ती देवी मोठ्या कष्टाने आपली मित्र होईल २०. कारण, ती करनाटक देशाच्या वज्रदंतनामक राजाची कन्या आहे. ती पद्मावती या नावाने प्रसिद्ध आहे. व तिने तुला आपल्या मनामध्यें धारण केले आहे २१ हे सर्व मी पुष्पाच्या भावावरून जाणले. मी तुला तिच्या जवळ नेतों ". असें बोलून तो त्याच्या प्रतापमुकुटनामक पित्यास म्हणाला " हे भूपाला, मला आज्ञा दे; म्हणजे मी करनाटकांत तुझ्या पुत्राच्या चिकित्सेकरितां वज्रमुकुटासह त्वरित जातों २२,२३. पुत्र जर जीवंत असला तर मी परत येईन यांत काहीं शंका नाहीं. ' तेव्हा " ठीक आहे " असें म्हणून राजाने पुत्रास मंत्र्याच्या स्वाधीन केले. नंतर घोड्यावर बसून ते दोघेही दंतवक्त्राच्या नगरांत गेले. तेथे कोणी एक वृद्ध स्त्री राहात होती; तिच्या गृही ते दोघे आले २४,२५. चतुर बुद्धिदक्षाने तिला पुष्कळ द्रव्य दिले व तिच्या गृही ती अंधकारानें भरलेली रात्र त्यांनी काढिली २६. प्रातःकाली ती वृद्ध स्त्री राजाच्या मंदिरी जाऊ लागली असता तिला मंत्रिपुत्र म्हणाला " हे मातोश्रि, माझे म्हणणें ऐक २७. पद्मावतीस

मद्वचनं वद । ज्येष्ठशुक्लस्य पञ्चम्यामिन्दुवारे सरोवरे १८ यो दृष्टः पुरुषो रम्यस्त्वदर्थे समुपागतः । इति श्रुत्वा ययौ वृद्धा पद्मं तस्यै न्यवेदयत् १९ रुष्टा पद्मावती प्राह चन्दनार्द्रांगुलीयुक्ता । गच्छ गच्छ महादुष्टे तलनीरस्थताडयत् ३० अङ्गुलीभिः कपोलौ च तस्याः स्पृष्ट्वा ययौ गृहम् । सा तु वृद्धा बुद्धिदक्षं सर्वं भावं न्यवेदयत् ३१ स्वमित्रं दुःखितं प्राह शृणु मित्र शुचं त्यज । तमाह भूपते. कन्या प्राणप्रियवचः शृणु ३२ त्वदर्थे ताडितं वक्षः कदा मित्र भविष्यति । श्रुत्वा त्वन्मधुरं वाक्यं रजो देहे समागतम् ३३ रजस्वलान्ते भो मित्र तवास्यं चुम्बितास्म्यहम् । इति श्रुत्वा भूपसुत. परमानन्दमाययौ ३४ त्रिदिनान्ते तु सा वृद्धा पद्मावत्यै न्यवेदयत् । त्वामुत्सुकः स भूपालस्तव दर्शनलालस ३५ तं भजस्वाद्य सुश्रोणि सफलं जीवनं कुरु । इति श्रुत्वा महाहृष्टा समस्यार्द्रांगुलीयकाम् ३६ गवाक्षद्वारि निष्कास्य तलपृष्ठे च ताडिता । तथैव वृद्धा तं प्राप्य मन्त्रिणं कथितं हि तत् ३७ प्रसन्नो बुद्धिदक्षश्च मित्रं प्राह शृणुष्व भोः । पश्चिमे दिशि भोः स्वामिन्गवाक्ष तव निर्मितम् ३८ अर्द्धरात्रे तु संप्राप्य भज मां कामविह्वलाम् । श्रुत्वा तदुज्ज्वलमुकुटः मित्रदर्शनलालसः ३९ ययौ शीघ्रं महाकामी रमणीं तामरामयत् । मासान्ते कामशिथिलो मित्रदर्शनलालसः ४० पद्मावतीं प्रियां प्राह शृणु वाक्यं वरानने । येन प्राप्तवती मह्यं त्वं सुभ्रूः सुरदुर्लभा ४१ स मित्रो बुद्धिदक्षश्च किं नु तिष्ठति सांप्रतम् ।

एकातात नेऊन तिला हे माझें म्हणणें सांग. ' ज्येष्ठ शुक्ल पंचमीस रविवारीं सरोवरात तूं ज्या रम्य पुरुषास पाहिलेंस तो तुझ्याकरिता येथें आला आहे. ' हें ऐकून ती वृद्ध स्त्री गेली व तिनें पूर्वोक्त अर्थाचें प्रधानानें सांगितलेले पद्य तिला म्हणून दाखविलें. तेव्हा रागावलेली व जिचीं बोटें चंदनानें ओली झालीं आहेत अशी पद्मावती ' हे महादुष्टे, जा जा ' असें म्हणून तळहातानें उरावर ताडन करिती झाली २८-३० व अंगुलींनीं तिच्या गालास हात लावून ती गृहीं गेली. नंतर त्या वृद्ध स्त्रीनें तो सर्व हावभाव बुद्धिदक्षास निवेदन केला ३१. तेव्हा आपल्या दुःखित मित्रास तो म्हणाला ' मित्रा, ऐक. शोकाचा त्याग कर. राजाच्या कन्येचें प्राणाहून प्रिय वचन ऐक. तो माझा मित्र केव्हा होईल या भावाने तिनें तुझ्याकरिता वक्षस्थल बडाविलें. तुझें मधुर वचन ऐकून तिच्या शरीरात रज उत्पन्न झालें आहे. ' हे मित्रा, ही रजस्वलावस्था संपल्यावर मी तुझ्या मुखाचे चुंबन घेईन. ' असा तिचा भाव होय. हें ऐकून राजपुत्र परमानंदयुक्त झाला ३२-३४. तीन दिवस झाल्यावर ती वृद्ध स्त्री पद्मावतीस म्हणाली " तो राजा तुझ्याविषयीं उत्सुक झाला आहे. तुझ्या दर्शनाची त्याला लालसा आहे ३५. यास्तव, हे सुंदरि, तूं आज त्यास भज व आपले जीवित सफल कर. " हें ऐकून ती अतिशय आनंदित झाली. व तिनें अंगुली आर्द्र करून ती खिडकींत टाकिली व पुनः येथून काढून तलपृष्ठावर टाकिली. हें पाहून ती वृद्ध स्त्री त्या मंत्र्याकडे आली व त्यास तो सर्व प्रकार सांगती झाली ३६,३७. तो ऐकून बुद्धिदक्ष प्रसन्न झाला व मित्रास म्हणाला " हे मित्रा, ऐक. हा स्वामिन्, पश्चिम दिशेत तुझ्याकरिता गवाक्ष निर्माण केलें आहे. मध्यरात्रीं त्यातून येऊन कामानें विव्हल झालेल्या माझा स्वीकार कर. " तें ऐकून प्रियेच्या दर्शनाची इच्छा करणारा व महाकामी असा तो वज्रमुकुट त्वरित त्या रमणीकडे गेला व तिच्याशीं रममाण झाला. एक महिना लोटला असता त्याचा काम शिथिल झाला. व त्यास मित्रास पाहण्याची इच्छा झाली ३८-४०. तेव्हा तो प्रिय पद्मावतीस म्हणाला " हे सुंदरि, माझे वाक्य ऐक. हे रमणीय स्त्रिये, देवानाही दुर्लभ अशी तू मला ज्याच्या योगानें प्राप्त झालीस तो माझा बुद्धिदक्ष मित्र सांप्रतकाली काय करीत असेल ? यास्तव प्रिये, मला आज्ञा दे. म्हणजे मी त्यास

आज्ञां देहि प्रिये मह्यं दृष्ट्वा यास्यामि तेऽन्तिकम्४२ इति श्रुत्वा वचस्तस्य निष्ठुरं कुलिशोपमम्। मिष्टान्नं सविषं कृत्वा मन्त्रिणे सा न्यवेदयत् ४३ तदा तु बुद्धिदक्षश्च चित्रगुप्तश्च पूजकः। ज्ञात्वा तत्कारणं सर्वं न तु भक्षितवान्स्वयम् ४४ एतस्मिन्नन्तरे प्राप्ता भूपतिस्त्वरयान्वितः। विवेकयुक्तं मित्रं तं दृष्ट्वा प्राह रुषान्वित ४५ कस्मान्न खादितं मित्र भोजनं मत्प्रियाकृतम्। विहस्य बुद्धिदक्षस्तु सारमेयं ददौ हि तत् ४६ भुक्त्वा स मरणं प्राप्तः स दृष्ट्वा विस्मितो नृपः। स्त्रीचरित्रं च विज्ञाय क्षणं त्यक्त्वाऽब्रवीत्तु तम् ४७ मित्र गच्छ गृहं शीघ्रं मया त्यक्ता च पापिनी। स आह शृणु भूपाल गच्छ शीघ्रं प्रियान्तिकम् ४८ तदलङ्कारमादाय त्रिशूलं कुरु जानुनि। सुतां त्यज भो मित्र यामि त्वं मा विचारय ४९ इति श्रुत्वा ययौ भूपस्तथा कृत्वा समागतः। स्वमित्रेण ययौ सार्धं श्मशाने रुद्रमण्डपे ५० शिष्यं कृत्वा नृपं तं स योगिरूपो हि भूषणम्। विक्रयार्थं ददौ तस्मै स्वमित्राय स बुद्धिमान् ५१ स वज्रमुकुटो मत्वा तदाज्ञां नगरं गतः। चोरोऽयमिति तं मत्वा बद्ध्वा राज्ञे हि रक्षिणः ५२ शीघ्रं निवेदयामासुर्दन्तवक्त्रस्तमब्रवीत्। क्व प्राप्तं भूषणं रम्यं सर्वं कथय पूरुष ५३ जटिलः प्राह भो राजञ्श्मशाने मद्गुरुः स्थितः। तेन दत्तं विक्रयार्थं भूषणं स्वर्णगुण्ठितम् ५४ इति श्रुत्वा स नृपतिस्तूर्णमाहूय तद्गुरुम् भूषणं पृष्टवान्राजा योगी प्राह शृणुष्व भोः ५५ श्मशाने सन्धितं मन्त्रं मया योगिस्वरूपिणा। पिशाची प्रापिता काचित्तस्याश्चक्षुर्मया कृतम् ५६ वामजानुनि शूलेन तया

पाहून परत तुझ्याजवळ येईन" ४१,४२. त्याचें हें वज्रासारिखें निष्ठुर वचन ऐकून तिनें विषयुक्त मिष्टान्न करवून तें त्यास दिलें, पण चित्रगुप्ताची पूजा करणारा बुद्धिदक्ष त्याचें सर्व कारण जाणता झाला व त्यानें तें अन्न भक्षण केलें नाहीं. इतक्यांत राजा त्वरेनें आला व विवेकयुक्त अशा त्या मित्रास पाहून क्रोधयुक्त होऊन म्हणाला "मित्रा, माझ्या प्रियेनें केलेलें भोजन तूं का खाल्लें नाहींस?" तेव्हा हसून बुद्धिदक्षानें तें कुत्र्यास घातलें ४३–४६. पण तें भक्षण करिताच तें कुत्रें मरण पावलें. हा प्रकार पाहताच राजास मोठें आश्चर्य वाटलें. व स्त्री-चरित्र जाणून आणि तिच्याविषयींचें प्रेम टाकून तो त्यास म्हणाला "मित्रा, गृहीं शिघ्र चल. मीं त्या पापिणीचा त्याग केला आहे." त्यावर तो म्हणाला "राजा, तूं त्वरित आपल्या प्रियेकडे जा ४७,४८ व तिचा अलंकार घेऊन तिच्या गुडघ्यावर त्रिशूल कर. साराश, उत्तम प्रकारें प्राप्त करून घेऊन नंतर तिचा त्याग कर व मग हे मित्रा, तूं ये. विचार करूं नको" ४९. हें ऐकून राजा गेला व त्याप्रमाणें करून आला. नतर आपल्या मित्रासह तो श्मशानातील रुद्रमंडपीं गेला. त्या राजास आपला शिष्य करून तो स्वतः योगी झाला. व त्या अतिबुद्धिमानाने तो अलंकार विकण्याकरिता त्या आपल्या मित्रास दिला ५०,५१. तेव्हा त्याची आज्ञा घेऊन तो वज्रमुकुट नगरात गेला. तेव्हा हा चोर आहे असें समजून रक्षकानीं त्यास बाधिलें व लागलेंच राजापुढें उभें केलें. तेव्हा दत-वक्त्र त्यास म्हणाला "बा पुरुषा, हें रम्य भूषण तुला कोठें मिळालें? मला सर्व वर्तमान सांग" ५२,५३. तो जटिल म्हणाला "बा राजा, माझा गुरु श्मशानामध्यें राहिला आहे. त्याने हें सुवर्णाचें भूषण मला विकण्याकरिता दिलें आहे" ५४. हे ऐकून तो राजा तात्काल त्याच्या गुरूस बोलावून आणता झाला. व त्यास राजाने भूषणाविषयीं प्रश्न केला. तेव्हा तो योगी म्हणाला "राजा, ऐक. मीं योग्यानें श्मशानात मंत्रसंधान केलें. त्यामुळें मला कोणी एक पिशाची प्राप्त झाली आहे. तिला मीं एक चिन्ह केलें आहे. म्हणजे तिच्या डाव्या गुडघ्यावर मीं शूलानें खणही केली आहे. तिनें मला हें दिलें." तें सर्व कारण जाणून राजानें आपल्या कन्येस घरातून

दत्त हि भूषणम्। ज्ञात्वा तत्कारणं राजा सुतां निष्कासिता गृहात् ५७ स वज्रमुकुटस्तां तु गृहीत्वा गृहमाययौ। विह्वस्य प्राह वैतालः शृणु विक्रमभूपते ५८ कस्मै पापं महत्प्राप्तं चतुर्णां मे वदाधुना। सूत उवाच ॥ इति श्रुत्वा वचस्तस्य विक्रमो नाम भूपतिः ५९ विह्वस्य भार्गव प्राह प्राप्तं पाप हि भूपतेः। मित्रकार्यममात्येन स्वामिकार्यं च रक्षिभिः ६० भूपपुत्रेणार्थसिद्धं कृतं तस्माच्च भूपते। महत्पाप च संप्राप्त तेनातौ नरकं गतः ६१ रजोवतीं सुतां दृष्ट्वा न विवाहेत यो नरः। स पापी नरकं याति षष्टिवर्षसहस्रकम् ६२ गान्धर्वं च विवाहं वै कामिन्या च कृतं यया। तस्या विघ्नकरो यो वै स पापी यमपीडितः ६३ अदृष्टदोषां यः कन्यां विवेकेन विना त्यजेत्। स पापी नरकं याति लक्षवर्षप्रमाणकम् ६४ इति श्रुत्वा स वैतालो धर्मगाथां नृपं परिताम्। प्रसन्नहृदयः प्राह भूपतिं धर्मतत्परम् ६५ [४५१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चयवर्णने नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

सूत उवाच ॥ प्रसन्नमनसं भूपं महासिंहासने स्थितम्। द्विजवर्यः स वैतालो वचः प्राह प्रसन्नधीः १ एकदा यमुनातीरे धर्मस्थलपुरी शुभा। धनधान्यसमायुक्ता चतुर्वर्णसमन्विता २ गुणाधिपो महीपालस्तत्र राज्यं चकार वै। हरिशर्मा पुरोधास्तु स्नानपूजनतत्परः ३ तस्य पत्नी सुशीला च पतिव्रतपरायणा। सत्यशीलः सुतो जातो विद्याध्ययनतत्परः ४ तस्यानुजा मधुमती शीलरूपगुणान्विता। द्वादशाब्दे वयःप्राप्ते विवाहार्थं पिता यदा ५ भ्राता चभ्राम तौ सर्वं चिन्तश्च सुता वरम्। कदाचिद्राजपुत्रस्य विवाहे स मतो द्विज ६ पठनार्थं काश्यां वै सत्यशीलः

घालवून दिले ५५-५७. तेव्हा तो वज्रमुकुट तिला घेऊन गृही गेला. नंतर हसून वेताळ म्हणाला " हे विक्रमराजा, ऐक ५८. त्या चौघांपैकी महत्पाप कोणास लागले ते मला आता सांग. " सूत म्हणतातः – हे शौनका, हे त्याचे वचन ऐकून विक्रमराजा ५९ हसून म्हणाला " पाप राजास लागले. कारण, अमात्याने मित्रकार्य केले, रक्षकांनी स्वामीचे कार्य केले, व राजपुत्राने अर्थसिद्धि केली यास्तव, त्या राजास मोठे पाप लागले व त्यामुळे तो नरकास गेला ६०,६१. कारण, कन्या रजस्वला झाली आहे असें पाहूनही जो पुरुष तिचा विवाह करीत नाही तो पापी साठ हजार वर्षे नरकात पडतो ६२. ज्या कामिनीने गांधर्वविवाह केला आहे तिला जो विघ्न करितो तो पापी यमाकडून पीडित होतो ६३. जिचा दोष आपण पाहिला नाही अशा कन्येचा विवेकावाचून जो त्याग करितो तो पापी लक्ष वर्षेपर्यंत नरकात पडतो " ६४. याप्रमाणे राजाने सांगितलेली धर्मगाथा ऐकून वेतालाचे चित्त प्रसन्न झाले व तो धर्ममध्ये तत्पर असणाऱ्या राजास सांगू लागला ६५. याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकी कलियुगातील इतिहाससमुच्चयवर्णननामक पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥

सूत म्हणतातः—ज्याचे मन प्रसन्न आहे अशा त्या महासिंहासनावर बसलेल्या राजास ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा तो द्विजश्रेष्ठ वेताल असें म्हणाला १. एकदा यमुनेच्या तीरी शुभ धर्मस्थलपुरी होती. ती धन व धान्य यांनी युक्त व चारी वर्णांच्या लोकांनी परिपूर्ण होती २. त्या स्थळी गुणाधिपनामक राजा राज्य करीत असे. त्याचा हरिशर्मा म्हणून स्नान व पूजन यात तत्पर असा एक पुरोहित होता ३. त्याची सुशीलानामक पत्नी पतिव्रताधर्मामध्ये तत्पर होती. असा, त्यास सत्यशील म्हणून विद्या व अध्ययन यात तत्पर असा पुत्र झाला ४. त्याच्या धाकट्या बहिणीचे नाव मधुमती असे होते. ती शील, रूप व गुण यांनी युक्त होती. तिला बारावे वर्ष लागले असता तिचा पिता व भ्राता हे विवाहाकरिता कन्येस वर शोधण्यास निघाले. पुढे एकदा

स्वयं गतः । एतस्मिन्नन्तरे राजन्द्विजः कश्चित्समागत. ७ वामनो नाम विख्यातो रूपशीलवयोन्वितः । सुता मधुमती तं च दृष्ट्वा कामातुराऽभव । ८ भोजनं छादनं पानं स्वप्नं त्यक्त्वा च विह्वला । चकोरीव विना चन्द्रं कामबाणप्रपीडिता ९ दृष्ट्वा सुशीला तां बालां वामन ब्राह्मण तथा । वरयामास ताम्बूलैः स्वर्णद्रव्यसमन्वितैः१० हरिशर्मा प्रयागे च द्विज दृष्ट्वा त्रिविक्रमम् । वेदवेदाङ्गतत्त्वज्ञं सुतार्थेऽवरयत्तदा ११ सत्यशीलस्तु काश्यां वै गुरुपुत्रं च केशवम् । वरित्वा तं भगिन्यर्थे ययौ गेहं मुदान्वितः १२ माघकृष्णत्रयोदश्यां भृगौ लग्न शुभ स्मृतम् । अथा विवाहस्तदा प्राप्तः कन्यार्थे रूपमोहितः १३ तस्मिन्काले तु सा कन्या भुजङ्गेनैव दंशिता । मृता प्रेतत्वमापन्ना पूर्वकर्मप्रभावतः १४ तदा ते ब्राह्मणा यत्न कारयामासुरुत्तमम् । न जीवनवती बाला गरलेन विमोहिता १५ हरिशर्मा तु तत्कृत्य कृत्वा वेदविधानतः । आययौ मन्दिरं राजन्सुतागुणविमोहितः १६ त्रिविक्रमस्तु बहुधा दुःख कृत्वा स्मरानुगः । कन्याधारी यती भूत्वा देशादेशान्तरं ययौ १७ केशवस्तु महादुःखी प्रियास्थीनि गृहीतवान् । तीर्थात्तीर्थान्तरं प्राप्तः कामबाणेन पीडितः १८ भस्ममाही वामनस्तु विरहाग्निप्रपीडितः । तस्थौ चितायां कामार्तः पत्नीध्यानपरायणः १९ एकदा शरयूतीरे लक्ष्मणाख्यपुरे शुभ । त्रिविक्रमस्तु भिक्षार्थं समायातो द्विजमन्दिरं २० तस्मिन्दिने रामशर्मा शिवध्यानपरायणः । यतिनं वरयामास भोजनार्थं स्वमन्दिरं २१ तस्य पत्नी विशालाक्षी रचित्वा बहुभोजनम् । आहूय यतिन राजन्पात्रमालभमाक-

तो द्विज राजपुत्राच्या विवाहार्थ गेला व सत्यशील अध्ययनाकरिता स्वत काशीस गेला. वा राजा, इतक्यात कोणी एक वामन या नावाने विख्यात व रूप, शील आणि वय यानीं युक्त असा एक ब्राह्मण त्याच्या घरीं आला. त्यास पाहून मधुमती कन्या कामातुर झाली ५-८. भोजन, वस्त्र, पान व निद्रा यास सोडून ती चंद्रावाचून जशी चकोरी विव्हल होते तशी विव्हल झाली व कामाच्या बाणानी अतिशय पीडित झाली ९. अशा प्रकारच्या त्या बालेस व त्या ब्राह्मणास पाहून सुशीला सुवर्ण,द्रव्य इत्यादिकासह ताबूल देऊन त्याचें वरण (स्वीकार) करिती झाली १०. इकडे प्रयागामध्ये त्रिविक्रम ब्राह्मण वेदवेदांगनिष्णात आहे असें पाहून हरिशर्मा त्यास आपल्या कन्येकरिता वरता झाला ११. तिकडे काशीमध्ये गुरुपुत्र जो केशव त्यास भगिनीकरिता वर पाहून स यशील आनंदयुक्त होत्साता घरी आला १२. माघकृष्ण त्रयोदशीस भृगुवारी शुभ लग्न होते. त्यावेळी कन्येच्या रूपास मोहित झालेले तीन ब्राह्मण तेथें आले १३. त्यावेळी ती कन्या पूर्वकर्माच्या प्रभावाने भुजगाने दश केल्यामुळें मृत होऊन प्रेतरूपानें भूमीवर पडली १४. तेव्हा त्या ब्राह्मणांनीं उत्तम यत्न करविला. पण ती विषाने मोहित झालेली बाला जीवंत झाली नाही १५. तेव्हा हरिशर्मा तिचे प्रेतकर्म वेदोक्त विधानानें करून आपल्या गृहीं आला. नतर कन्येच्या गुणानीं मोहित झालेला त्रिविक्रम बहुत दुःख करून स्मराचा अनुयायी झाला. तो कथा धारण करणारा यति होऊन देशोदेशीं गेला १६,१७ केशव महादुःखी होऊन त्या प्रियेचीं हाडें घेता झाला व कामाच्या बाणाने व्याकुळ होऊन अनेक तीर्थे हिंडला १८. विरहाग्नीनें दग्ध होणारा वामन तर तिचे भस्म घेऊन कामार्त व पत्नीच्या ध्यानात तल्लीन होत्साता स्मशानात राहिला १९. एकदा शरयूच्या तीरावरील लक्ष्मणनामक शुभ नगरातील एका ब्राह्मणाच्या घरीं त्रिविक्रम भिक्षेकरिता गेला २०. त्या दिवशीं शंकराच्या ध्यानामध्ये परायण असणारा रामशर्मा आपल्या घरी भोजनाकरिता त्या यतीस बोलाविता झाला २१. तेव्हा त्याची विशालाक्षी पत्नी पुष्कळ भोज्य पदार्थ करून व, हे राजा, यतीस बोलावून पात्रालभन करविती

रोत् ११ तस्मिन्काले च तद्बालो मृतः पापवशं गतः । अरोदीत्तस्य सैरन्ध्री विशालाक्ष्यपि भर्त्सिता १३ न रोदनं त्यक्तवती पुत्रशोकाग्नितापिता । रामशर्मा तदा प्राप्तो मन्त्रं संजीवनं शुभम् १४ जप्त्वा संमार्जनं कृत्वा जीवयामास बालकम् । विनयावनतो विप्रस्तं च संप्राप्तिनं तदा १५ भोजनं कारयित्वा तु मन्त्रसंजीवनं ददौ । त्रिविक्रमस्तु तन्मन्त्रं पठित्वा यमुनातटे २६ प्राप्तवान्यत्र सा नारी दाहिता हरिशर्मणा । एतस्मिन्नन्तरे तत्र राजपुत्रो मृतिं गतः २७ दाहितस्तनयः पित्रा शोककर्त्रा तदाऽमुना । जीवनं प्राप्तवान्बालस्तस्य मन्त्रप्रभावतः २८ गुणाधिपस्य तनयो राज्ञो धर्मस्थलीपतेः । त्रिविक्रमं वचः प्राह वीरबाहुर्महाबलः २९ जीवनं दत्तवान्मह्यं वरयाद्य वरं मम । स विप्रः प्राह भो राजन्केशवो नाम यो द्विज. ३० गृहीत्वाऽस्थिगतस्तीर्थे तमन्वेषय मा चिरम् । वीरबाहुस्तथा मत्वा दूतमार्गेण तं प्रति ३१ प्राप्तस्तं कथयामास यथा प्राप्तं हि जीवनम् । इति श्रुत्वा वचस्तस्य केशवोऽस्थिसमन्वितः ३२ प्रागत्यास्थीनि सर्वाणि ददौ तस्मै द्विजातये । पुनः सजीविता बाला केशवादीन्वचोऽब्रवीत् ३३ योग्या धर्मेण यस्याहं तस्मै यास्यामि धर्मिणे । इति श्रुत्वा वचस्तस्या मौनवन्तस्तथ स्थिताः ३४ अतस्त्वं विक्रमादित्य धर्मज्ञ कथयस्व मे । कस्मै योग्या च सा बाला नम्रा मधुमती शुभा ३५ सूत उवाच ॥ विहस्य विक्रमादित्यो वैतालं प्राह नम्रधीः । योग्या मधुमती नारी वामनाय द्विजन्मने ३६ प्राणदाता तु यो विप्र. पितेव गुणतत्परः । अस्थिदाता तु यो विप्रो भ्रातृतुल्यस्स वेदवित् ३७ [५०८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

झाली २२. त्याच वेळीं तिचा पाण्याच्या अधीन असलेला बालक मृत झाला. त्यावेळीं त्याची सैरंध्री व विशालाक्षीही रडूं लागली व निर्भर्त्सना करिती झाली. पण पुत्रशोकरूपी अग्नीनें तप्त झालेल्या तिनें शोक टाकिला नाहीं. तेव्हा रामशर्मा आला व शुभ सजीवनमंत्राचा जप करून आणि संमार्जन करून त्याने त्यास जीवंत केलें. नतर विनयानें नम्र असा तो ब्राह्मण त्या यतीस भोजन घालता झाला. व त्यास त्यानें संजीवनमत्र दिला. तेव्हा त्रिविक्रम तो मंत्र घेऊन यमुनातीरी जेथें हरिशर्म्याने ती स्त्री जाळिली होती तेथे आला. इतक्यात तेथील राजपुत्र मरण पावला होता. त्याम जाळून शोक करणाऱ्या त्याच्या पित्याने याच्या मंत्रप्रभावानें पुत्रास जीवंत करविलें २३-२८. तेव्हा धर्मस्थलीनगराचा स्वामी जो गुणाधिपराजा त्याचा महाबलवान् वीरबाहु पुत्र त्या त्रिविक्रमास ह्मणाला ' मला तूं आज जीवन दिले आहेस. यास्तव, मजजवळ काहीं वर माग. ' तेव्हा तो ब्राह्मण ह्मणाला ' हे राजा, केशव ह्मणून जो ब्राह्मण या कन्येची हाडें घेऊन गेला आहे त्यास तीर्थाचे ठायीं त्वरित शोध. ' हें ऐकून वीरबाहु ' ठीक आहे ' असें ह्मणाला व दूताच्या मार्गानें तो त्याच्याकडे गेला व आपणास जीवन कसे प्राप्त झालें तें त्यास सागता झाला. हें त्याचें वचन ऐकून केशव अस्थींसह आला व त्यानें त्या सर्व अस्थि ब्राह्मणास दिल्या. त्याबरोबर त्रिविक्रमानें त्या बालिकेस जीवंत केले. तेव्हा ती बालिका केशवादिकास ह्मणाली " धर्मतः मी ज्याची योग्य पत्नी असेन त्याच्याबरोबर मी जाईन. " असे तिचें वचन ऐकून ते तिघेही मुके होऊन राहिले २९-३४. यास्तव, हे धर्मज्ञ विक्रमादित्या, ती शुभ मधुमतीनामक बाला कोणास योग्य आहे तें मला साग. ३५. सूत ह्मणतात:— ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो विक्रमादित्य वैतालास हंसून ह्मणाला " मधुमती ही वामनाची योग्य पत्नी होय ३६. कारण, प्राण देणारा जो गुणतत्पर ब्राह्मण तो त्याच्या पित्यासारिखा व अस्थि

सूत उवाच ॥ विक्रमर्क महाभाग शृणु गाथां मनोरमाम् । वैतालो भूपतिश्रेष्ठं पुनर्विक्रममब्रवीत् १ वर्धमानपुरे रम्ये नानाजनसमाकुले । तत्राभवन्महीपालो रूपसेनो महाबलः २ विद्युन्माला प्रिया तस्य पतिसेवापरायणा । एकदा क्षत्रियः कश्चिन्नाम्ना वीरवरः स्मृतः ३ पुत्रकन्यासपत्नीको वृत्त्यर्थं समुपागतः । विनयावनतो भूत्वा रूपसेनं महीपतिम् ४ किञ्चिच्छ्रुत्वा ददौ स्वर्णं सहस्रं प्रत्यहं नृप । वीरसेनस्तु तल्लब्ध्वा वह्नौ तीर्थे द्विजातिषु । व्यय कृत्वा तु तच्छेषं सकुटुम्बो भुक्तवान्स्वयम् । एवं वर्षे गते राजन्राजलक्ष्मीः शिवाज्ञया ६ परीक्षार्थं श्मशाने च रोदनं बहु कुर्वती । अर्धरात्रे तदा राजा बुद्ध्वा प्राह स्वसेवकम् ७ गच्छ वीरवर त्वं वै यतोऽसौ श्रूयते रवः । ज्ञात्वा तत्कारणं सर्वं मह्यं शीघ्रं निवेदय ८ इति श्रुत्वा वीरवरः शस्त्रास्त्रकुशलो बली । स तत्र गत्वा यत्रास्ते राजलक्ष्मीः शुभाननाः ९ रुरुदुः वचश्च तामाह किमर्थं रोदसे स्थिता । महत्कष्टं च किं पापं कारणं देवि मे वद १० इति श्रुत्वा राजलक्ष्मीर्वीरसेन तमब्रवीत् । राजलक्ष्मीं च मां विद्धि रूपसेनस्य भूपतेः ११ मासान्ते प्रलयं यास्ये तस्माच्छोचामि भो बलिन् । स आह शृणु भो देवि त्वदल्पायुस्समीरितम् १२ केन पुण्येन दीर्घायुस्त्वं भवेः कारणं वद । देव्युवाच ॥ महाबाहो महाप्राज्ञ यदि ते तनयस्य वै १३ कपालमर्पय त्वं च चण्डिकायै तदाऽनघ । दीर्घायुर्भविता चाहं स्वामिकार्यं प्रसाधय १४ इति श्रुत्वा वीरवरो मन्दिरं स्वयमागतः । पत्नीं प्राह प्रसन्नात्मा सुतं देह्यै

देणारा जो वेदवेत्ता ब्राह्मण तो तिच्या भाऱ्यासारिखा होय ३७. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीयेतिहाससमुच्चयातील दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥

सूत ह्मणतात—हे महाभागा श्रेष्ठ ब्राह्मणा, आता आणखी मनोरम गाथा ऐक. वेताल पुनरपि राजश्रेष्ठ विक्रमास ह्मणाला १. ज्यामध्यें असंख्य जन राहिले आहेत अशा वर्धमानसंज्ञक रम्य नगरामध्यें एक महाबलवान् राजा रहात असे. त्याचे नांव रूपसेन असें होतें २. विद्युन्माला ह्मणून त्याची पत्नी होती. ती पतीच्या सेवेंत निमग्न असे. एकदा कोणी एक वीरवरनामक क्षत्रिय ३ पुत्र, कन्या व स्त्री यासह विनयानें नम्र होऊन रूपसेनराजाकडे वृत्त्यर्थ आला. हे राजा, त्याच्या तोंडून काहीं ऐकून तो रूपसेन त्यास रोज हजार सुवर्णमुद्रा देऊं लागला. पण वीरसेन त्या घेऊन त्याचा विनियोग अग्नि, तीर्थ व ब्राह्मण यान्या ठायीं करी व नंतर त्यातून जें काही अवशिष्ट रहात असे त्यात आपला सर्व कुलासह निर्वाह करीत असे. राजा, ह्याप्रमाणें एक वर्ष गेलें असता राजलक्ष्मी शंकराच्या आज्ञेनें परीक्षेकरिता स्मशानात अर्धरात्री बहुत रोदन करूं लागली. तेव्हा ते ऐकून राजा आपल्या सेवकास ह्मणाला ४-७ " हा वीरवरा, तूं जिकडून हा ध्वनि येत आहे तिकडे जा. व रोदनाचें सर्व कारण जाणून मला शीघ्र कळीव" ८.तें ऐकताच शस्त्र व अस्त्रें यांमध्यें कुशल व बलवान असा तो वीरवर जेथें ती सुंदर राजलक्ष्मी होती तेथें जाऊन ९ " तूं येथे शोक करीत का बसलीस ? " असें नम्र वचन तिला बोलला. " हे देवि, तुझ्यावर कोणतें मोठें संकट आलें आहे तें सांग " १०. हें ऐकून राजलक्ष्मी त्या वीरसेनास ह्मणाली " मी रूपसेनराजाची राजलक्ष्मी आहे, असें जाण ११. हे बलवाना, मी एका महिन्यानें नष्ट होणार आहें, यास्तव रडतें." हें ऐकून तो ह्मणाला " हे देवि, तुझें अल्पायुष्य सांगितलेलें आहे खरें, पण तूं कोणत्या पुण्यानें दीर्घायुषी होशील ? त्याचा उपाय सांग. " देवी ह्मणतेः— हे महाबाहो, हे महाप्राज्ञ, जर तूं आपल्या पुत्राचें कपाल चंडिका देवीस अर्पण करशील तर हे निष्पापा, मी दीर्घायु होईन. तूं स्वामीचे कार्य कर १२-१४.हे ऐकून वीरवर स्वतः

निवेदय १५ तथेत्युक्त्वा तु सा साध्वी तनयं प्राह निर्भया । राज्ञोऽर्थे तव देहं वै पुत्र पासि कुरुष्व तत् १६ तथा मत्वा तु तत्पुत्रो भगिन्या मातृसंयुतः । चण्डिकाभवन प्राप्यान्नवीत्स्वपितरं तदा १७ भगस्तात मे कृपालं च चण्डिकायै समर्पय । दीर्घायुर्येन यत्नेन राजलक्ष्मीश्च तत्कुरु १८ इति श्रुत्वा वीरसेनः शिरश्छित्त्वा समार्पयत् । तस्थानुजा मृता तत्र तथा माता तथा पिता १९ दृष्ट्वा तत्रूपसेनस्तु कारणं सर्वमादितः । सेवकं सत्यसन्धं च मत्वा तु स्वशिरोऽर्पयत् २० तदा प्रसन्ना सा देवी नृपमुज्जीव्य साऽब्रवीत् । वरं वरय भूपाल यथेष्टं शीघ्रमाप्नुयाः २१ स आह वीरसेनस्तु सकुलो जीवमाप्नुयात् । तथेत्युक्त्वा तु सा देवी तत्रैवान्तरधीयत २२ रूपसेनः प्रसन्नात्मा स्वसुतां कामरूपिणीम् । ददौ सुताय वैतालो नृपतिं प्राह विस्मितः २३ मुख्यस्नेहं कृतं केन तेषां मध्ये वदस्व मे । राजोवाच ॥ मुख्यस्नेह कृतं राज्ञा दामार्थे स्वतनुं ददौ २४ स्वर्णस्नेही वीरवरो धर्मप्रीति पतिव्रता । बन्धुप्रीतिश्च भगिनी पितृस्नेही तु पुत्रकः २५ महत्स्नेह कृतं राज्ञा रूपसेनेन धीमता २६ [५३१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

सूत उवाच ॥ इति श्रुत्वा स वैतालो राजानमिदमब्रवीत् । काचिद्भोगावती नाम्ना नगरी परमाऽद्भुता १ रूपवर्मा च नृपतिस्तत्र राज्यं करोति वै । चूडामणिरिति ख्यातः शुको बुद्धिविचा-

---

घरी आला व ज्याचे मन प्रसन्न आहे असा तो वीर पत्नीस म्हणाला " देवीस पुत्र समर्पण कर " १५. तेव्हा " ठीक आहे " असे म्हणून ती निर्भय साध्वी पुत्रास म्हणाली " बा पुत्रा, राजाच्या वित्तावर तुझा देह वाढला आहे, यास्तव तूं हें कर १६. तेव्हा त्याच्या पुत्राने ' ठीक आहे ' असे म्हणून तो भगिनी व माता यासह चंडिकेच्या मंदिरात आला व आपल्या पित्यास म्हणाला, 'हे तात, माझे कपाल चंडिकेस अर्पण करा. साराश, ज्या प्रयत्नाने राजाची लक्ष्मी दीर्घायु होईल तें करा.' हे ऐकून वीरसेनाने त्या चें शिर तोडून देवीस समर्पण केलें. तेव्हा त्याची धाकटी बहीण, माता व पिता हीं मृत झालीं १७ १९. ते मर्म पाहून राजा रूपसेनाने त्याचें सर्व कारण पहिल्यापासून समजून घेतलें व सेवक सत्यप्रतिज्ञ आहे असे जाणून त्यानेही आपलें मस्तक अर्पण केले २०. तेव्हा प्रसन्न झालेली ती देवी राजास जीवंत करून म्हणाली " हे भूपाला, काय हवा असेल तो वर तात्काल माग " २१. तेव्हा तो म्हणाला " हा वीरसेन कुलासह जीवंत होवो. " तेव्हा ' ठीक आहे ' असे म्हणून ती देवी गुप्त झाली २२. तेव्हा ज्याचे अंतःकरण प्रसन्न झाले आहे असा तो रूपसेन अतिसुस्वरूप असलेली आपली कन्या त्याच्या पुत्रास देता झाला. नंतर वेताल विस्मित होऊन राजास म्हणाला " राजा, त्याच्यामध्ये मुख्य स्नेह कोणी केला, तें मला सांग ". राजा म्हणतो-मुख्य स्नेह राजाने केला. कारण, त्याने सेवकाकरिता देहत्याग केला २३,२४. वीरवर हा सुवर्णाचा स्नेही होय. त्याची पतिव्रता स्त्री धर्माकरिता प्रीति करिती झाली. भगिनी बंधुवर प्रेम करणारी व पुत्र पितृस्नेही होय २५ बुद्धिमान् रूपसेनानें मोठे प्रेम दाखविले २६. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

सूत म्हणतात:-हे राजाचें भाषण ऐकून वेताल राजास असें म्हणाला-कोणी एकभोगावती म्हणून अतिअद्भुत नगरी होती १. त्या नगरीत रूपवर्मानामक राजा राज्य करीत असे. बुद्धिनिपुण व चूडामणि या नावानें प्रसिद्ध असा एक शुक (पोपट) त्या राजाच्या गृहात सुंदर पिंजऱ्यात असे. एकदा तीस वर्षांच्या वयाचा रूपवर्मा त्यास म्हणाला 'हे शुका, माझ्या योग्य अशी एखादी सुंदर स्त्री

रदः २ तस्य भूपस्य गेहे च वसनं शुभपञ्जरे । कदाचिद्रूपवर्मा च विरावद्ध उच्चैर्जगौ ३ पमच्छ मम योग्या वै शुक काचिद्वराङ्गना । चेदास्ते तर्हि मे ब्रूहि श्रुत्वा तं चाब्रवीच्छुकः ४ मगधेश्वरभूपस्य कन्या चन्द्रवती शुभा । तव योग्या हि भो राजन्सांप्रतं तां गृहाण वै ५ इति श्रुत्वा स नृपतिर्गणेशं द्विजसत्तमम् । प्रेषयित्वा ददौ द्रव्यं यथोद्दाह्या तथा कुरु ६ गणेशोऽपि गतस्तूर्णं देशे मागधके शुभे । महादेवं च संपूज्य चकार स्तवनं मुदा ७ नमः शिवाय शान्ताय सर्वाभीष्टप्रदायिने । भवाय शंकरायैव रुद्राय सततं नमः ८ मृडायानन्दरूपाय सर्वदुःखहराय च९ इत्युक्तवति विप्रे च नदा चन्द्रवती शुभा । कामातुराऽब्रवीच्चैनां नाम्ना मदनमञ्जरीम् १० मम योग्यश्च पुरुष कश्चिदस्ति महातले । साह्व भो रूपवर्मा च योग्यो भोगापुरीपतिः ११ इति श्रुत्वा तु सा देवी दुर्गा वाञ्छितदायिनीम् । तुष्टाव मनसा सुभूर्यया जातमिदं जगत् १२ नमो नमो जगन्मातर्मम कार्यप्रदायिनि । त्रिलिङ्गजननी त्वं वै वर्णमूर्तिः सनातनी १३ त्वं स्वाहा त्वं स्वधा सन्ध्या नमस्तस्यै नमो नमः । नृपतिं रूपवर्माणं मत्पतिं कुरु भोः शिवे १४ इति स्तुत्या प्रसन्नाऽभूज्जगदम्बा जगन्मयी । पितरं मागधेशं च मोहयित्वा च मातरम् १५ विवाहं कारयामास मासान्ते सिद्धरूपिणी । रूपवर्मा चन्द्रवती बुभुजाते परं सुखम् १६ एकस्मिन्दिवसे राजन्मेनां मदनमञ्जरीम् । नृपः प्राह विवाह त्वं सुशुकेन कुरुष्व भोः १७ मेनका प्राह भो राजन्विवाहाश्चेदृशा मताः । उत्तमाधममध्याश्च पुरुषास्त्रिविधाः स्मृता १८ तथैव त्रिविधा नारी यथायोग्यो वरो भवेत् । उत्तमा या भवेन्नारी न योग्या चाधमाय सा १९ शृणु तत्कारणं राजन्मया दृष्टं यथाऽभवत् । इलापुरे वसत्येको वैश्यो लक्षपतिर्धनी २० अन-

---

जर असेल तर मला सांग.' तें राजाचें भाषण ऐकून शुक ह्मणाला " मगधेश्वराची चद्रवती ह्मणून शुभ कन्या आहे. बा राजा, ती तुझ्या योग्य आहे. यास्तव, साप्रतकाली तू तिचे ग्रहण कर " २-५. हें ऐकून तो राजा गणेशनामक उत्तम ब्राह्मणास पाठवून त्यास पुष्कळ द्रव्य देता झाला. व तिन्याही विवाह होईल असे कर (असें त्यास त्यानें सांगितले) ६. गणेशही शुभ मागध देशात त्वरेनें गेला. व त्यानें महादेवाची पूजा करून आनदानें स्तुति केली ७. (ती अशी-) शातरूप,कल्याणरूप व सर्व इष्ट देणाऱ्या देवास नमस्कार असो. भव, शकर व रुद्र यास मी सतत वंदन करितों. मृडसज्ञक, आनंदरूप व सर्व दुःखाचे हरण करणारा असा जो महादेव त्यास माझा प्रणाम असो ८,९. असें तो विप्र ह्मणत आहे तोंच शुभ चद्रवती कामातुर होत्साती मदनमंजरीनामक मैनेस ह्मणाली १० " माझ्या योग्य असा कोणी पुरुष भूलोकीं आहे काय ? " त्यावर तिनें उत्तर दिलें कीं ' हे सुंदरि, भोगावतीनगरीचा स्वामी रूपवर्मा तुला योग्य आहे ' ११. हें ऐकून ती देवी, वाछित देणाऱ्या दुर्गा देवीची मनानें स्तुति करिती झाली. 'जिच्यापासून हे जग निर्माण झालें त्या जगन्मातेस नमस्कार असो. तू माझे इष्ट कार्य करणारी, त्रिलिंगाची जननी; व सनातनी वर्णमूर्ति आहेस. तू स्वाहा, तूच स्वधा व तूच संध्या आहेस. त्या तुला माझा नमस्कार असो. हे शिवे, रूपवर्मानामक राजास माझा पति कर ' १२-१४. या स्तुतीने ती जगन्मयी जगदंबा प्रसन्न झाली व पिता, मागधपति व माता यास मोहित करून त्या सिद्धरूपिणीनें एका महिन्याच्या आतच विवाह करविला. नंतर रूपवर्मा व चंद्रवती यानीं परम सुख भोगिलें १५,१६. एके दिवशी मदनमजरी मैनेस राजा ह्मणाला ' तू उत्तम शुकासह विवाह कर. ' त्यावर मेनका ह्मणाली ' बा राजा, विवाह अशा प्रकारचे मान्य आहेत. उत्तम, मध्यम व अधम असे तीन प्रकारचे पुरुष सांगितलेले आहेत व तशाच तीन प्रकारच्या स्त्रिया असतात व त्यास यथायोग्य असाच वर होत असतो. जी उत्तम स्त्री असते

पत्यौ देवयाजी तस्य पत्नी पतिव्रता । बहुयत्नेन तनयस्तस्य जातो महाधमः २१ द्यूतक्रीडापरो नित्यं सुरापाने रतस्सदा । वेश्यागामी महाधूर्तो नित्यमांसाशनः खलः २२ तस्य धर्मं च पितरौ समालोक्य वनं गतौ । नरं नारायणं ध्यात्वा परमं पदमापतुः २३ मदपालस्तु तनयः कृत्वा सर्वधनव्ययम् । अन्यदेशे च वृत्त्यर्थं जगाम धनवर्जितः २४ रम्यश्चन्द्रपुरे रम्ये यज्ञहेमपतिः स्थितः । कृतान्त कथयामास वैश्य हेमपतिं हि सः २५ देवयाजी सुतोऽहं वै स्वल्पं वै धनमाहृतम् । देशान्तरं विक्रयार्थं सिन्धुमार्गेण प्रापवान् २६ महावायुप्रभावेन द्रव्यं तन्मग्नमम्भसि । तल्लज्जया न यास्येऽहं पितरं प्रति भारिष २७ इति श्रुत्वा हेमपतिः स्वपत्नीं कामम-ञ्जरीम् । वचः प्राह प्रसन्नात्मा सयोगो विधिना कृतः २८ चन्द्रकान्तिं सुतां दास्ये तदुराय त्वदा-ज्ञया । संमन्त्र्य दम्पती राजन्दत्तौ कन्यां विधानतः २९ स्वगृहं वासयामास मदपालं सुतापतिम् । मासमेकमुषित्वा त श्वशुरं प्राह नम्रधीः ३० आज्ञां देहि धनाध्यक्ष स्वगेहं यामि मा चिरम् । इति श्रुत्वा हेमपतिः स्वसुतां स्वर्णभूषिताम् ३१ चन्द्रकान्तिं सदासीं च तस्मै दत्त्वा गृहं ययौ । मरान्विसृज्य दुष्टात्मा शिबिकावाहकाञ्छठः ३२ दासीं हृत्वा तदा पत्नीं विसृज्य धनवर्जिताम् । एकाकी मासमात्रेण मदपालो महाधमः ३३ वर्षान्तरे च तत्सर्वं व्ययं कृत्वा कुमार्गिण । बुभु-क्षितः पुनः शोकं चकार बहुधा हृदा ३४ पुनश्च श्वशुरस्यैव गृहे समागमान्खलः । चन्द्रकान्तिस्तु

तो अधमास योग्य नव्हे १७-१९. राजा, याचें कारण काय आहे तें मीं जसें पाहिलें आहे तसें एक. इलापुरामध्यें एक लक्ष्मीपतिनामक धनी वैश्य रहात असे २०. त्याला अपत्य नव्हतें. पण तो देवाचें पूजन करणारा असून त्याची पत्नी पतिव्रता होती. पुढें त्यास मोठ्या प्रयत्नानें पुत्र झाला. पण तो महाअधम निघाला. तो सदा जुगार खेळण्यात व सदा मद्यपान करण्यात निमग्न असे. तो दुष्ट व महाशठ, वेश्यागामी व मास खाणारा झाला २१,२२. हा त्याचा धर्म पाहून त्याचे आईबाप वनात गेले व नर आणि नारायण याचें ध्यान करून परम स्थानाप्रत प्राप्त झाले २३. इकडे त्याचा मदपालनामक पुत्र सर्व धनाचा व्यय करून निर्धन झाल्यावर दुसऱ्या देशामध्यें उदरभरणार्थ गेला २४. पुढें तो रम्य चंद्रपुरामध्यें प्राप्त झाला. तेथें हेमपति ह्मणून राजा होता. त्या हेमपतीस त्या वैश्याने आपला वृत्तांत सांगितला २५. (तो ह्मणाला) मी देवपूजकाचा पुत्र आहें. थोडेंसें धन घेऊन दुसऱ्या देशांत व्यापार करण्याकरिता मी सिंधुमार्गानें निघालों. पण मोठ्या वायूच्या प्रभावानें ते सर्व द्रव्य उदकांत बुडालें व त्या लज्जेमुळें मी पित्याकडे जात नाहीं २६,२७. हें ऐकून ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा हेमपति कामंमजरीनामक आपल्या पत्नीस असें ह्मणाला' हा योग दैवानेंच घडला २८. मी आपल्या चंद्रकांतिनामक कन्येस त्या वरास तुझ्या संमतीनें देईन. ' तात्पर्य, हे राजा, त्या उभयतां पतिप-त्नींनीं विचार करून त्यास यथाविधि कन्या दिली २९ व कन्येच्या मदपालनामक पतीस आपल्या घरीं ठेवून घेतलें. तेव्हां एक महिना राहिल्यावर तो नम्रपणें आपल्या श्वशुरास ह्मणाला " हे धनाध्यक्षा, मला आज्ञा दे ह्मणजे मी आपल्या गृहीं जाईन. आतां उशीर लावूं नको " हें ऐकताच हेमपति आपल्या चंद्रकांति कन्येस सुवर्णाच्या अलंकारांनीं भूषित करून दासीसह त्याच्या स्वाधीन करिता झाला. त्याबरोबर तो गृहीं जाण्यास निघाला. पण, हे राजा, तो दुष्टबुद्धि, शिबिकावाहक पुरुषास जावयास सांगून; त्या दासीस मारून, पत्नीसही धनरहित करून सोडता झाला आणि तो महानीच मदपाल एकटाच घरीं आला. पुढें एका वर्षांत तें सर्व द्रव्य कुमार्गांत खर्च करून बुभुक्षित होत्साता, हे राजा, पुनः तो बहुत प्रकारें शोक करूं लागला. तो दुष्ट पुनरपि श्वशुराच्या गृहीं आला. तेव्हां जिची बुद्धि नम्र आहे अशी चंद्रकांति आपल्या पतीस

तं दृष्ट्वा स्वपतिं शाह नक्राधीः ३५ मया निषेदितं पित्रे धनं चौरैश्च लुण्ठितम् । अतस्त्वं त्यज संतापं चिरं वस गृहे मम ३६ तथेत्युक्त्वा महाधूर्तः उवाच कतिचिद्दिनम् । ज्ञात्वा विमोहितां पत्नीमद्धरात्रे तमोवृते ३७ हत्वा तां स ययौ गेहं गृहीत्वा बहुभूषणम् । अयोग्योऽयमतो राज-न्विवाहः शुकमैनयोः ३८ इति श्रुत्वा शुकः प्राह भूपतिं करुणानिधिम् । विवाहं न करिष्यामि नार्या चाधमया सह ३९ अधमा मैनका नारी श्यामाङ्गा च कुरूपिणी । उत्तमोऽहं शुको राज-न्पुरुषश्च हरेत्तनुम् ४० शृणु तत्कारणं भूप मया दृष्टं महोत्तमम् । नगरे काञ्चनपुरे वणिक्छङ्ख-पतिः श्रुतः ४१ तस्य पुत्रस्तु मेधावी सिन्धुगुप्तो गुणी धनी । प्रभावती प्रिया तस्य श्रीदत्तस्त-त्सुतः स्मृतः ४२ विवाहमकरोत्तस्य जयश्रीः पत्तने शुभे । सोमदत्तस्य सुतया जयलक्ष्म्या सम-न्वितम् ४३ श्रीदत्तस्तु गतो देशं वाणिज्यार्थं कुरुस्थलम् । आयाति द्वादशाब्दे हु सधनो गेह-मागत. ४४ जयलक्ष्मीस्तु कामेन पीडिता पितृमन्दिरे । अमात्यतनयेनैव होमदत्तेन मोहिता ४५ दूतीमार्गेण तं प्राप्य व्ययं कृत्वा धनं बहु । रमयामास सा नारी तेन सार्द्धं महाधमा ४६ त्रिमासान्ते च तत्स्वामी श्रीदत्त श्वशुरालयं । संप्राप्तः सा तु तं दृष्ट्वा महद्दुःखमुपययौ ४७ अर्ध-रात्रे तु तन्माता प्रेषिता स्वपतिं प्रति । जयलक्ष्मीश्च संप्राप्ता क्रोधेन स्फुरिताधरा ४८ बहुमानेन स्वपतिस्नेहं कृत्वालयं ययौ । तदा तु कुलटा सा च गता दूतीगृहं प्रति ४९ शून्यालये होमदत्तो दशितो भुजगन वै । सुष्वाप मरणं प्राप्य तदा बाला समागता ५० वेगेन रमयामास त जारं विषमोहितम् । पिप्पलस्थः पिशाचश्च दृष्ट्वा तां जारिणीं शुभाम् ५१ शब्देह च संप्राप्य

ह्मणाली ३०–३९ " मी आपल्या पित्यास चोरांनीं धन लुटलें ह्मणून सांगितलें आहे. यास्तव, तू संताप सोड व माझ्या गृहीं सतत रहा " ३६. तेव्हा 'ठीक आहे ' असें ह्मणून तो महाधूर्त कांहीं दिवस राहिला व अंधकारानें भरलेल्या अर्धरात्रीं आपली स्त्री निद्रेमध्यें लीन झाली आहे असें जाणून तिला मारून व तिची सर्व भूषणें घेऊन घरीं आला. साराश, राजा, हा शुकमैनेचा विवाह अयोग्य आहे ३७, ३८. हें ऐकून पोपट करुणानिधि राजास ह्मणाला:– मी अधम स्त्रीबरोबर विवाह करणार नाहीं ३९. मैना ही अधम नारी आहे. कारण, तिचे अंग काळें असून ती कुरूप आहे. राजा, मी शुक उत्तम आहें. माझ्या शरीराचें हरण पुरुष करीत असतो ४०. राजा, याचें फार मोठें व उत्तम कारण मीं पाहिलें आहे तें तूं एक. काचनपुरनगरामध्यें एक शंखपतिनामक वैश्य होता ४१. त्याचा सि-धुगुप्त ह्मणून पुत्र होता. तो बुद्धिमान्, गुणवान् व धनी असे. प्रभावती ही त्याची स्त्री व श्रीदत्त हा त्याचा पुत्र होय. त्यानें त्याच्या शुभ नगरामध्यें सोमदत्ताच्या जयलक्ष्मीनामक कन्येशीं विवाह केला. नंतर श्रीदत्त वाणिज्याकरिता कुरुस्थलीं गेला व बारा वर्षें होऊन गेलीं असता तो धनयुक्त होऊन घरीं आला ४२–४४. इकडे जयलक्ष्मी पित्याच्या गृहीं राहत असून कामानें व्याकुल होत्साती अमात्यपुत्र जो होमदत्त त्यास पाहून मोहित झाली ४५ व दूतीच्या द्वारा त्यास प्राप्त करून घेऊन आणि बहुत धनाचा व्यय करून ती अधम नारी त्याच्याशी रममाण झाली ४६. पुढें तीन महिने झाल्यावर तिचा पति श्रीदत्त श्वशुराच्या गृही आला. ती त्यास पाहताच अतिशय दुःखी झाली ४७. अर्धरात्रीं तिच्या मातेनें तिला पतीकडे पाठविलें, तेव्हा जिचा अधरोष्ठ क्रोधामुळें कांपत आहे अशी ती जयलक्ष्मी त्याच्याजवळ आली ४८. तेव्हा तिचा पति बहुमानानें प्रेम करून निद्रित झाला. तेव्हा ती कुलटा दूतीगृहीं गेली ४९. पण त्या शून्य गृहामध्यें होमदत्तास सर्पदंश झाला व त्यामुळें तो मृत होऊन भूमीवर पडला. तेव्हां ती बाला वेगानें तिच्याकडे आली व त्या विषानें मोहित झालेल्या जारास जागवूं लागली. इतक्यांत त्या शुभ जारिणीस पाहून पिंपळाच्या झाडावर बसलेले पिशाच त्या शुभ देहात प्रविष्ट झाले व त्या

रमणीं तामरीरमत् । खनित्वा दशनैर्नासां पिप्पलोपरि सोऽगमत् ५२ कफल्लो नाम चौरस्तु दृष्ट्वा तत्कारणं तदा । कामिन्या अनुगो भूत्वा मन्दिरं तत्प्रविष्टवान् ५३ तदा तु जयलक्ष्मीश्च स्वपतिं प्राप्य दुर्भगा । चक्रे सा रोदनं घोरं सर्वे लोका. समस्थिरे ५४ नासाहीनां सुतां दृष्ट्वा सोमदत्तो महाधनः । बद्ध्वा जामातरं शीघ्रं राजान्तिकमुपाययौ ५५ नृपाज्ञया राजदूतास्तमुद्बन्धनमादधुः । तदा कफल्ल समाप्य सर्वं राज्ञे न्यवेदयत् ५६ मत्वा तस्य वचः सत्यं जयलक्ष्मीं महाधमाम् । रासभोपरि संस्थाप्य कृत्वा दुर्गतिरूपिणीम् ५७ नगरात्प्रेषयामास वनं शार्दूलसेवितम् । अतस्त्वं शृणु भूपाल मैनां मद्योग्यका न हि ५८ इत्युक्त्वा स तु वैतालो विक्रमं प्राह नम्रधी । नारी पापाधिका वाथ पुरुषस्तद्वदस्व मे ५९ विक्रम उवाच ॥ ब्रह्मणोऽगुणरूपस्य माया वर्णस्वरूपिणी । तमो नपुंसकं ज्ञेयं त्रिलिङ्गैकं तदव्ययम् ६० अव्ययं ब्रह्मणो धाम माया लिङ्गस्वरूपिणी । तया जातमिदं विश्वं तदव्ययं नमो नमः ६१ स्त्रीवात्स्त्री सर्वदा श्रेष्ठा स्त्रियास्तु पुरुषस्तथा । अव्याधिकश्च पुरुषो नारी कर्माधिका मता ६२ स्त्रीत्वमज्ञानमधिकं कथितं पूर्वकविदैः । कर्मैव बन्धनं पुंसां ज्ञानं निर्बन्धनं स्मृतम् ६३ अतः पापाधिका नारी पुरुषो हीनकिल्बिष ६४ [५९६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये चतुर्थोऽध्याय ॥ ४ ॥

सूत उवाच ॥ भृगुवर्य महाभाग श्रुत्वा वैताल एव सः । प्रसन्नात्मा वचः प्राह भूपतिं ज्ञानरूपदम् १ उज्जयिन्यां महाराज महाबल इति श्रुत.। चन्द्रवंशी नृप प्राज्ञो वेदशास्त्रविशारद. २

रमणीशीं रममाण झालें व तिच नाकदातान तोडून ते पुनरपि पिपळावर गेले ५०–५२. तेव्हा ते सर्व पाहून कफल्लनामक चोर तिच्या मागोमाग येऊन त्या गृहात शिरला ५३. तदनंतर ती दुर्दैवी जयलक्ष्मी आपल्या पतीजवळ येऊन मोठ्याने रडू लागली व तें ऐकून सर्व लोक तेथें जमले ५४. नासिकेवांचून आपली कन्या आहे असें पाहून तो महाधन सोमदत्त जामातास बांधून लागलेंच राजाकडे घेऊन गेला ५५. तेव्हा राजाच्या आज्ञेनें राजाच्या दूतानीं त्यास फांसावर चढविलें, पण इतक्यात कफल्ल राजाकडे आला व त्यानें सर्व प्रकार राजास सांगितला ५६. तेव्हा ते त्याचें सांगणें खरें आहे असें समजून राजानें महाअधम जयलक्ष्मीस गाढवावर बसवून व विद्रूप करून नगरातून बाहेर काढिलें व त्यामध्यें सिंहादि हिंस्र पशु आहेत अशा वनात घालवून दिलें. यास्तव, हे राजा, मैना माझ्या योग्य नाहीं. असें सांगून तो वेताल नम्र होऊन राजास ह्मणाला " नारी अधिक पापी कीं पुरुष ? तें मला सांग " ५७–५९ विक्रम ह्मणालाः–निर्गुण व निरूप अशा ब्रह्माची माया वर्णस्वरूपी आहे. तम नपुसक आहे असें जाणावें. ते अव्यय तर तिन्ही लिंगी सारखेच असते ६०. ब्रह्माचें स्वरूप अव्यय आहे व माया लिंगरूपी आहे व तिच्यामुळें हे सर्व विश्व उत्पन्न झालें आहे. त्या अव्ययास नमस्कार असो ६१. स्त्रीवाहून स्त्री सर्वदा श्रेष्ठ, स्त्रीहून पुरुष श्रेष्ठ, पुरुष अव्याधिक व स्त्री कर्माधिक ह्मणून मानलेली आहे ६२. स्त्रीत्व अज्ञान अधिक होय असें पूर्वज्ञान्यानीं सांगितलें आहे. कर्म हेच पुरुषाचें बंधन असून ज्ञान बंधनशून्य ह्मणून सांगितलेलें आहे. यास्तव, स्त्री अधिक पापी व पुरुष न्यून पापी होय ६३,६४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥

सूत ह्मणतातः—हे भृगुवर्य, हें ऐकून ज्याचें चित्त प्रसन्न झालें आहे असा तो वेताल ह्मणाला राजास ह्मणाला १. हे महाराजा, उज्जयिनींत महाबल या नांवाचा चंद्रवंशी राजा होता. तो

तस्य दूतो हरिदासः स्वामिकार्यकरः सदा । भक्तिमाला प्रिया तस्य साधुसेवापरायणा ३ तस्यां जाता रूपवती कन्या कमललोचना । महादेवीति विख्याता सर्वविद्याविशारदा ४ हरिदास च सा प्राह शृणु तात वचो मम । मत्तोऽधिको नरो यो वै तस्मै मां तु ददस्व भोः ५ तथेत्युक्त्वा पिता राजन्राज्ञाहूतो गतः सभाम् । नत्वा तं नृपतिः प्राह हरिदास शृणुष्व भो ६ तैलङ्गाधिपतिं गच्छ हरिश्चन्द्रं महीपतिम् । तस्य क्षेम तथा ज्ञात्वा मां निवेदय मा चिरम् ७ इति श्रुत्वा द्विजः प्रागाद्धरिश्चन्द्र महामतिम् । कुशलं वर्णयामास महाबलनृपस्य वै ८ श्रुत्वा प्रसन्नहृदयो हरिश्चन्द्रो महीपतिः । श्वशुरस्तस्य नृपतेः स भूयाद्धर्षमागत ९ हरिदास स पप्रच्छ कलेरागमन कदा । इत्युक्त स तु त प्राह न्यूहश्च भविताधिकम् १० यदा राज्य कृत तेन कलेरागमन तदा । ब्रह्मणोऽस्य मुखाज्जातमोङ्कार सत्यपूजितम् ११ द्वितीया स्याच्च विविधा भाषा लोकविमोहिनी । जाता कलेर्हितार्थाय यमलोकहितैषिणी १२ यदा धर्म च वदोक्त विपरीत हि दृश्यते । कलिराज्य तदा ज्ञेय म्लेच्छा यस्य प्रियाः स्मृताः १३ कलिनाऽधर्मभिन्नेन सर्वे देवा निराकृताः । पापस्यैव मृषा भार्या दुःख तत्तनय स्मृतम् १४ दुर्गतिस्तस्य चार्धाङ्गी गेहे गेहे तदा भवेत् । क्रोधवश्या नृपाः सर्वे ब्राह्मणाः कामकिङ्कराः १५ लोभवश्यास्तु धनिना महत्त्व शूद्रका गताः । नार्यो लज्जाविहीनाश्च किङ्कराः स्वामिघातकाः १६ निष्फला तु मही जाता कलौ प्राप्ते हि दृश्यते । ये हरेः शरण प्राप्तास्ते सर्वे मुदिताः कलौ १७

फार ज्ञानी व शास्त्रात निपुण असे २. त्याचा एक हरिदास ह्मणून दूत होता. तो सदा स्वामीचे कार्य करीत असे. त्याच्या स्त्रीचे नाव भक्तिमाला. ती साधूंच्या सेवेमध्ये परायण असे ३. तिच्या उदरीं जिचे नेत्र कमलाप्रमाणें आहेत अशी रूपवती कन्या झाली. ती महादेवी या नावाने प्रख्यात व सर्व विद्येमध्ये विशारद असे. ती एकदा हरिदासास ह्मणाली " बाबा, माझें ह्मणणें ऐका. माझ्यापेक्षा अधिक असा जो पुरुष असेल त्यास तुम्ही मला द्यावे " ४,५. तेव्हा " ठीक आहे " असे ह्मणून हे राजा, त्याला राजानें बोलाविलें असता तो सभेत गेला व नमस्कार करून उभा राहिला. तेव्हा राजा त्यास ह्मणतो " बा हरिदासा, ऐक ६. तैलंगाधिपति हरिश्चंद्रराजाकडे जा व त्याचें क्षेम जाणून त्याप्रमाणें मला त्वरित कळीव " ७. हे ऐकून तो द्विज हरिश्चंद्रराजाकडे गेला. व त्यानें महाबल-राजाचे कुशल त्यास निवेदन केले. ते ऐकून हरिश्चंद्रराजाचे हृदय प्रसन्न झालें. तो त्या राजाचा श्वशुर असल्यामुळे त्यास फार आनंद वाटला ८,९. त्यानें हरिदासास विचारिले कीं' कलीचें आगमन केव्हा झालें ? ' ह्याप्रमाणें राजानें प्रश्न केला असता तो त्यास ह्मणाला " न्यूह ह्मणून एक मोठा राजा होऊन गेला. ज्यावेळीं त्याने राज्य केले तेव्हा कलीचे आगमन झालें. या ब्रह्मदेवाच्या मुखापासून ॐकार उत्पन्न झाला व तो सत्यपूजित होता. ह्मणजे सर्व सत्यामध्यें तो पूज्य आहे १०,११. त्याच्या दुसऱ्या मुखापासून नाना प्रकारची लोकास मोहित करणारी भाषा झाली. ती कलीच्या हिताकरिता व यमलोकाचें हित करण्याच्या इच्छेने झाली होती १२. जेव्हा वेदोक्त धर्म अधर्म आहे असें वाटूं लागतें तेव्हा कलिराज्य आहे असें जाणावें. कलीस म्लेच्छ प्रिय आहेत असें सांगितलेल आहे १३. अधर्माचा मित्र असा जो कलि त्याने सर्व देवांचे निराकरण केले आहे. पापाची मृषा (असत्य) हीच भार्या असून दुःख हे त्याचे अपत्य होय १४. दुर्गति (दरिद्र) ही त्याची अर्धांगी असून ती त्या वेळी घरोघर असते. सर्व राजे क्रोधाच्या अधीन होतात. सर्व ब्राह्मण कामाचे चाकर होतात १५. धनी लोक लोभवश होतात व शूद्रास महत्त्व येतें. स्त्रिया लज्जाशून्य होतात. सेवक स्वामींचा घात करितात १६ व कलियुग प्राप्त झालें असता पृथ्वी निष्फळ झाल्याचे दिसते. पण कलीमध्येही जे हरीस शरण येतात ते सर्व आनंदित होतात " १७. हें ऐकून

इति श्रुत्वा हरिश्चन्द्रो दत्त्वा तस्मै सुदक्षिणाम् । स्वगेहं प्राप्तवान्राजा विप्रस्तु शिबिरं ययौ १८ एतस्मिन्नन्तरे तत्र ब्राह्मणो बुद्धिकोविदः । स्वविद्यां दर्शयामास हरिदासाय धीमते १९ विमानं शीघ्रगं नाम देव्या दत्तं महोत्तमम् । मन्त्रजापात्समुद्भूतं कामदं विस्मयप्रदम् २० तस्मिन्ददर्श कन्यार्थे तदा विप्रो विमाहितः । धरित्वा तं स्वकन्यार्थं ततः स्वपुरमागतौ २१ हरिदासस्य तनयो मुकुन्दो नाम कोविदः । पठित्वा स्वगुरु प्राह वृणीष्व गुरुदक्षिणाम् २२ गुरुराह च शिष्यं त शृणु वाच मुकुन्दमे। दापय स्वस्य भगिनीं मत्पशाय च धीमत २३ तथेत्युक्त्वा मुकुन्दस्तु स्वगेहं शीघ्रमाययौ । अस्मिन्काले महादेवी द्रौणिशिष्यं द्विजं शुभम् २४ वामन वरयामास तं विप्र शब्दवेधिनम् । दक्षिणादिभिरभ्यर्च्य ताम्बूलेन विधानत २५ वयस्ते ब्राह्मणाः प्राप्ताः सुतार्थे गुणकोविदाः । एतस्मिन्नन्तरे कामी राक्षसो दैवमोहितः २६ महादेवीं जहाराशु प्राप्तो विन्ध्याचले गिरौ । तदा ते दुःखिनो भूत्वा विलेपुः कामपीडिताः २७ धीमान्नाम द्विजो विद्वांस्तान्प्राह गणकोत्तमः । विन्ध्याचले गिरौ बाला चास्ते क्रव्यादवश्यगा २८ स्वविमाने समारोप्य तौ द्विजौ बुद्धिकोविदः । विन्ध्याचले गिरौ प्राप्तः शब्दवेधी तदा धनुः २९ समारोप्य शरेणैव जघानाशु स राक्षसम् । कन्यां गृहीत्वा ते जग्मुरुज्जयिन्यां विमानगाः ३० तिथा विवादवन्तस्ते दृष्ट्वा कन्यां स्मरानुगाः । कस्मै योग्या भवत्कन्या भूप मे कृपया वद ३१ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा वचस्तस्य विक्रमो नाम भूपतिः । प्रश्रयावनतः प्राह वैतालं रुद्रकिङ्करम् ३२ विदित्वा योऽवदत्कन्यां पितृतुल्यो द्विजा हि सः । येन प्राप्ता विमानेन स तु तदभ्रातृकः स्मृत ३३

हरिश्चंद्र त्यास उत्तम दक्षिणा देता झाला. नंतर राजा आपल्या मंदिराप्रत प्राप्त झाला व ब्राह्मण शिबिरास गेला १८. इतक्यात एक विद्वान् ब्राह्मण हरिदासास आपली विद्या दाखविता झाला. त्यास देवीनें शीघ्रगनामक फार उत्तम विमान दिलें होतें. ते मंत्राच्या जपापासून उत्पन्न झालेलें, इष्ट वस्तु देणारें व आश्चर्यप्रद होतें १९,२०. असो, त्यावेळीं तो अतिशय मोहित झालेला ब्राह्मण आपल्या कन्येकरिता त्यास पाहता झाला व तिच्याकरिता त्यास वरून नंतर तो आपल्या नगरीं गेला. इकडे हरिदासाचा मुकुंदनामक विद्वान् पुत्र पठन करून आपल्या गुरूस ह्मणाला " दक्षिणा मागा " २१,२२. त्यावर गुरु त्या शिष्यास ह्मणाला " हा मुकुंदा, माझें वचन ऐक. तू माझ्या बुद्धिमान् पुत्रास आपली बहीण देवीव " २३. त्यावर ' ठीक आहे ' असें ह्मणून मुकुंद लागलाच आपल्या गृहीं आला. इतक्यात महादेवी अश्वत्थाम्याच्या शुभ ब्राह्मण शिष्यास वरिली झाली. त्याचें नाव वामन असे होतें व तो शब्दवेधी होता. दक्षिणादिकांनीं व तांबूलाच्या योगानें यथाविधि पूजन करून तिनें त्यास वरिलें होतें २४,२५. नंतर ते तिघेही विद्वान् ब्राह्मण कन्येकरिता आले. इतक्यात एका दैवयोगानें मोहित झालेल्या कामी राक्षसाने महादेवीचे हरण केलें व तो लागलाच विंध्याचलपर्वतावर प्राप्त झाला. त्यावेळीं ते सर्व कामपीडित झालेले ब्राह्मण दुःखी होत्साते विलाप करूं लागले २६,२७. तेव्हां त्यांतील धीमान्नामक विद्वान् ज्योतिषी ब्राह्मण त्यास ह्मणाला " विंध्यपर्वतावर ती बाला राक्षसाच्या अधीन होऊन राहिली आहे. " ते ऐकताच बुद्धिकोविद ब्राह्मण आपल्या विमानात त्या दोघा ब्राह्मणास बसवून विंध्याचलपर्वतावर आला. त्यावरोबर शब्दवेधी ब्राह्मणानें आपलें धनुष्य सज्ज करून तात्काल त्या राक्षसास बाणानें मारिलें व कन्येस घेऊन ते सर्व विमानात बसले आणि उज्जयिनीस आले २८-३०. कन्येस पाहून मदनसंतप्त झालेले ते तिघे ब्राह्मण आपसात भांडूं लागले. तेव्हा हे राजा, ही कन्या कोणास योग्य आहे तें मला कृपा करून सांग ३१. सूत ह्मणतात:—असें त्याचें वचन ऐकून विक्रमनामक भूपति नम्रतापूर्वक रुद्रकिंकर जो वेताल त्यास

हत्वा यो राक्षसं वीरं कन्यायोग्यो हि सोऽभवत् ३४ [६३०]इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

सूत उवाच ॥ पुनराह स वैतालः शृणु राजन्कथामिमाम् । ग्राम धर्मपुरं रम्यं नानाजननिषेवितं १ तत्राभवन्महीपालो धर्मशीलो महोत्तम । लज्जादेवी च महिषी तस्य भूपस्य भूपते २ अन्धको नाम तन्मन्त्री न्यायशास्त्रविशारदः । कियता चैव कालेन देवीमन्दिरमुत्तमम् ३ धर्मशीलेन राज्ञा तत्र दुर्गा प्रतिष्ठिता । अपत्यार्थं भूपतिना कृतस्तत्र महोत्सवः ४ अथरात्रे महागौरी वरं ब्रूहि वृणीष्वेति । श्रुत्वाऽमृतमयं वाक्यं धर्मशीलो नृपोत्तमः ५ स्तुतिं चकार नम्रात्मा येन दुर्गा प्रसीदति । धर्मशील उवाच ॥ एका तु प्रकृतिर्नित्या सर्ववर्णस्वरूपिणी ६ सा त्वं भगवती साक्षात्त्वया सर्वमिदं ततम् । त्वदाज्ञया सुरश्रेष्ठा रचित्वा लोकमुत्तमम् ७ महालक्ष्म्या त्वया सार्धं बुभुजे निर्मले सुखम् । त्वद्बलेन भगवान्विष्णुस्त्रैलोक्यं ब्रह्मनिर्मितम् ८ पालयञ्च महालक्ष्म्या त्वया सार्धं सनातनि । त्वद्बलेन महादेवि त्रैलोक्यं विष्णुपालितम् ९ महाकाल्या त्वया सार्धं भस्म कृत्वा विराजते । सर्वे देवास्तथा दैत्याः पितरो मनुजाः खगाः १० त्वद्लीलया च ते जाता जगन्मातर्नमोऽस्तु ते । इत्युक्तवन्तं नृपतिं वागुवाचाशरीरिणी ११ महाबलो महावीर्यस्तनयस्ते भविष्यति । तव स्तुत्या प्रसन्नाऽहं दास्यामि विविधं फलम् १२ इति श्रुत्वा स नृपतिः स्वगृहं प्राप्य निर्भयः । राज्ञ्यै निवेदयामास देवीवचनमुत्त-

---

ह्मणाला ३२ " जो कन्या कोठे आहे हे जाणून सागता झाला तो ब्राह्मण तिच्या पित्यासारिखा होय. ज्याने विमानातून तिच्याकडे इतरास नेलें तो तिच्या भात्यासारिखा होय ३३. पण ज्याने वीर राक्षसास मारून कन्येस सोडविलें तो कन्येच्या योग्य होय " ३४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा पाचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

सूत ह्मणतातः—वैताल पुनरपि ह्मणतो " राजा, ही कथा ऐक. धर्मपुरसंज्ञक रम्य व नानाजनांनीं सेवित अशा ग्रामामध्यें धर्मशील ह्मणून एक मोठा उत्तम राजा, होता. वा राजा, त्या राजाची लज्जा देवी ह्मणून राणी असे १,२. न्यायशास्त्रामध्ये अतिशय निपुण असा अन्धक नावाचा त्याचा मंत्री होता. काहीं काल लोटल्यावर धर्मशीलानें देवीचे उत्तम मंदिर बाधलें व त्यात दुर्गेची प्रतिष्ठा केली. अपत्याकरिता राजाने त्या देवालयात मोठा उत्सव केला ३,४. तेव्हा अर्धरात्री "वर माग" ह्मणून महागौरी राजास ह्मणाली. हें अमृततुल्य वाक्य ऐकून ज्याचें चित्त नम्र आहे असा तो उत्तम राजा धर्मशील जिच्या योगानें दुर्गा प्रसन्न होईल अशी स्तुति करिता झाला. धर्मशील ह्मणाला " जी एक, नित्य व सर्ववर्णरूपी प्रकृति आहे तीच तूं साक्षात् भगवती आहेस. तू हे सर्व व्यापून सोडिले आहेस. तुझ्या आज्ञेनें देवश्रेष्ठ उत्तम लोकास उत्पन्न करून तुज महालक्ष्मीसह निर्मळ सुख भोगता झाला. तुझ्या भक्तीनेंच भगवान् विष्णु ब्रह्मदेवानें निर्माण केलेल्या त्रैलोक्याचे पालन करीत तुज महालक्ष्मीसह रहातो. तात्पर्य, हे सनातनि, हे महादेवि, तुझ्या बलानेंच हे त्रैलोक्य विष्णुपालित झाले आहे ५-९ व महाकाली जी तूं त्या तुजसह (शंकर) या सर्वांचें भस्म करून रहातो. हे जगन्मातें, सर्व देव, तसेच दैत्य, पितर, मनुष्य, पक्षी इत्यादि सर्व तुझ्या लीलेनेंच उत्पन्न होतात. तुला नमस्कार असो. " असे बोलणाऱ्या त्या राजास आकाशवाणी ह्मणाली १०,११ "महाबलवान् व महावीर्यवान् असा पुत्र तुला होईल. तुझ्या स्तुतीने मी प्रसन्न झालें आहें. यास्तव, मी तुला नानाप्रप्रकारचे फल देईन" १२. हे ऐकून तो राजा आपल्या घरीं निर्भय होऊन प्राप्त झाला व ते देवीचे उत्तम वचन राणीस सागता झाला १३.

मम् १३ ततःप्रभृति राजेन्द्र मर्तौ जाता स्वयं किल । एकस्मिन्दिवसे राजन्रजकः कलिभोजनः १४ काशीदासेन सहितो ग्राम धर्मपुरं गतः । तत्र दृष्ट्वा शुभां कन्यां कामाङ्गीनामविश्रुताम् १५ पित्रान्विता राजमार्गे गच्छन्तीं श्रमपीडिताम् । मुमोह कामवेगेन रजकः कलिभाजनः १६ कामान्धश्चण्डिकां प्राह जगन्मातर्सनातनि । यदि मे भावता सुभ्रस्तर्हि दास्यामि ते शिरः १७ जातियोग्या ममैवास्ति रजकस्य सुता शुभा । इति श्रुत्वा तु सा देवी वचनं रजकस्य वै १८ मोहयित्वा च पितरं तस्याः पाणिग्रहः कृतः । समुद्वां कामिनीं प्राप्य प्रसन्नात्मा गृहं ययौ १९ भुक्त्वा स विविधं भोगं तया सार्धं सुखप्रदम् । वर्षान्तरे शिरो देव्यै गत्वा शीघ्रं समर्पयत् २० स्वशिरो दत्तवान्देव्यै कामाङ्गी पतिशोकतः । काशिदासस्तु तच्छ्रुत्वा स्नेहेन त्वरितोऽगमत् २१ अर्पयित्वा शिरो देव्यै देवीरूपत्वमागतः । तदा प्रसन्ना सा चण्डी श्रीनृत्तिव्याह्वयेच तान् २२ वरं वरयतामद्य यं यं काममभीप्सितम् । काशिदासस्तु तां प्राह कामाङ्गीं मां समर्पय २३ कामाङ्गी सा तु तां प्राह स्वपतिं मां समर्पय । कलिभोजन एवासौ देवीं प्राह प्रसन्नधीः २४ मित्राङ्गं सुन्दरं मह्यं देहि मातर्नमो नमः । तेषां वाचस्तदा श्रुत्वा सा दुर्गा मौनमास्थिता २५ यथाकाम ददत्वेति वरं दारसुरूपिणीम् । सूत उवाच ॥ इत्युक्त्वा स तु वैतालो नृपं प्राह विहस्य भोः २६ किं कृतं च तया देव्या तेषामर्थं वदस्व मे । इत्युक्त स तु भूपालो वैतालमिदमब्रवीत् २७ कपालमुत्तमं देहं तया च्छिन्नं द्वयास्तदा । विपरीतं कृतं मात्रा वरं स्व रूपं समाप्नुयुः २८ [६५८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगेतिहाससमुच्चये षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

त्या दिवसापासून बा राजेंद्रा, ती देवी मूर्तीमध्ये स्वतः प्रकट झाली. हे राजा, एके दिवशी कलिभोजननामक एक रजक काशीदाससह धर्मपुरनगराम आला. तेथे कामागी या नावाने प्रसिद्ध असलेली एक कन्या त्याच्या दृष्टी पडली. ती राजमार्गातून आपल्या पित्याबरोबर जात होती व श्रमानी पीडित झाली होती. कलिभोजनसंज्ञक धोबी तिला पाहून कामाने मोहित झाला १४-१६, आणि कामाच्या योगाने अंध झालेला तो धोबी चंडिकेस म्हणाला " हे सनातनि जगन्मातें, जर ही सुंदर स्त्री मला मिळाली तर मी तुला शिर अर्पण करीन. ही, रजकाची शुभ कन्या मलाच जातीच्या द्वारा योग्य आहे. " हें रजकाचे वचन ऐकून ती देवी तिच्या पित्यास मोहित करून तिचा विवाह करविती झाली. नंतर ती कामिनी कन्या प्राप्त झाल्यामुळे ज्याचे अंतःकरण प्रसन्न झाले आहे असा तो रजक गृहीं गेला १७—१९ व तिच्यासह नानाप्रकारचे सुखदायी भोग भोगून एका वर्षाच्या आतच त्याने त्वरित जाऊन देवीस शिर अर्पण केले. कामागीने पतीच्या शोकामुळे आपले शिर देवीस अर्पण केले. काशिदासही ते ऐकताच प्रेमामुळे त्वरित तेथे आला व त्यानेही देवीस शिर अर्पण करून तो देवीरूप झाला. तेव्हा ती देवी प्रसन्न झाली व तिने त्या तिघांसही उठविले. आणि ती त्यास म्हणाली २०—२२ " तुझ्यास जे जे पाहिजे असेल तें सर्व मागून घ्या. " तेव्हा काशिदास म्हणाला ' मला ही कामागी दे ' २३. कामागी तिला म्हणाली " मला माझ्या पतीस समर्पण कर. " नंतर ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा हा कलिभोजन देवीस म्हणाला ' हे माते, तुला माझा नमस्कार असो. मला मित्राचे सुंदर अंग दे ' त्याचें ते म्हणणें ऐकून ती देवी मौनाचा आश्रय करून राहिली २४,२५ व तिने त्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें वर दिले". सूत म्हणतातः— असें म्हणून तो वेताल राजास हंसून म्हणाला" राजा, त्या देवीनें काय केले व त्याची इच्छा कशी पूर्ण झाली ते मला सांग". ह्याप्रमाणे व्यास प्रश्न केला आहे असा तो राजा वेतालास असें म्हणाला.

सूत उवाच ॥ तस्मिन्काले स वैतालो भगवंश प्रसन्नधी । राजानमुत्तमां गाथां वर्णयामास विश्रुताम् १ चम्पापुरी च विख्याता चम्पकेशो महीपति । तत्रास्ते बलवान्धन्वी महिषी तत्सुलोचना २ त्रिलोकसुन्दरी नाम कन्या तस्यामजायत । वदन चन्द्रवद्यस्या भ्रुवौ चापसमौ स्मृतौ ३ मृगाक्षी कोकिलरवा कामलाङ्गी महोत्तमा । त्रैलोक्येऽपि तुला नाला किमन्येमानवेनृप ४ तस्याः स्वयंवरो जातो नृपा बहुविधास्तदा । तस्या योगेन संप्राप्ता य भुवा भुवि विश्रुता ५ इन्द्रो यम कुबेरश्च वरुणो विश्रुतात्तम । कृत्वा नरमय रूप तदर्थे समुपागता । चम्पकेशमिद प्राह शृणु राजन्वचो मम । सर्वलक्षणेषु निपुण रूपवन्त मनोरमम ७ इन्द्रदत्त च मा विद्धि स्वसुतां मे समर्पय । द्वितीयस्तु तदा प्राह धर्मदत्त मनोरमम ८ धनुर्वेदेषु निपुण स्वकन्यां दातुमर्हसि । तृतीयश्चाह भो राजन्धनपालाय शोभिने ९ सर्वज्ञैवस्य भाषाणां ज्ञायिने गुणरूपिण । मह्य च स्वसुतां शीघ्र समर्पय सुखी भव १० चतुर्थश्चाह भो राजन्फलाभरणेषु कोविद । पञ्चरत्नसमुद्योगी प्रत्यह भक्षत ह्यहम ११ पुण्यार्थमेकरत्न च हामार्थं द्वितिय वसु । आत्मार्थं तृतिय रत्न पत्न्यर्थं तुरिय वसु १२ शेष सुभोजनार्थं च रत्न ि य मया हृतम । इंद्रत्विव मां पुरुष स्वसुता दातुमर्हसि १३ इति श्रुत्वा वचस्तेषा मोहितो नृपतिस्तदा । स्वसुता प्राह धर्मात्मा कस्मै दास्यामि कन्यक १४ मा ह्रीं तु वच. श्रुत्वा व्रीडिता दैवमोहिता । नोत्तर च ददा तस्मै स्वापत्ये धर्मशालिनी १५ इत्युक्त्वा स तु वैतालो विहस्योवाच भूपतिम् । कस्मै

स्यावेळी देवाने या दोघांच्या देहावर जे उत्तम कपाल होते त्याचे तुकडे करून त्यांची अदलाबदल केली व याप्रमाणे त्यांचा त्यांचा वर प्राप्त झाला ॥ ६ ॥ याप्रमाणे श्रीमार्कण्डेयमहापुराणांतील चतुर्युगाख्यानामक प्रतिसर्गपर्वांतील कलिचरित्रीय इतिहाससमुच्चयांतील सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥

सूत म्हणतात – नंतर तो मनुष्य, त्याची पत्नी प्रसन्न झाली आहे असा तो वेताळ राजास ऐकण्याची उत्तम कथा सांगता झाला ॥ १ ॥ चंपापुरी म्हणून एक प्रख्यात नगर आहे त्यात राजा चंपकेश्वर म्हणून एक बलवान व धनुर्धारी राजा राज्य करीत असे. त्याची सुलोचना म्हणजे राणी होती. तिच्या उदरी त्रिलोकसुंदरी म्हणजे एक कन्या झाली. तिचे मुख चंद्रासारिखे व भिवया धनुष्यासारिख्या होत्या ॥ २-३ ॥ तसा मोठा उत्तम कन्येचे नेत्र हरिणाच्या नेत्रासारिखे, त्यांचे कांति सुवर्णाच्या व अंग कोमल होते. या कन्येच्या तोलाची मनाने श्रेष्ठ मग अन्य मनुष्याची कथा काय ॥ ४ ॥ राजा, तिचा स्वयंवर झाला तेव्हा अनेक राजे तिच्या योगाने प्राप्त झाले म्हणजे त्यांचे ते मनोरथ जेणेप्रमाणे राजे होते ते सर्व येथे प्राप्त झाले ॥ ५ ॥ इंद्र, यम, कुबेर व देवश्रेष्ठ वरुण हे मनुष्यासारिखे रूप धारण करून त्या ठिकाणी आले होते व चंपकेश राजास त्यांतील एक म्हणाला "राजा, माझ्या ठिकाणी सर्व शास्त्रांचे ज्ञान पुरेपूर आहे व मनोरम असा मी रूपवान आहे असे जाण व आपली कन्या माझ्या स्वाधीन कर" ॥ ७ ॥ दुसरा म्हणाला "मनोरम व सुंदर धनुर्विद्येत निष्णात असा मज धनपालनाम आपली कन्या देण तुला योग्य आहे" ॥ ९ ॥ तिसरा म्हणाला "हे राजा, सर्व जीवांच्या भाषा जाणणारा व गुणरूप असा तो मी सुंदर धनपाल नाम मला तू आपली कन्या तत्काल अर्पण कर व सुखी हो" ॥ १० ॥ चौथा म्हणाला "हे राजा सर्व कलांमध्ये पंडित व रोज पाच रत्नांचा उत्तम करणारा असा मी आहे ॥ ११ ॥ एक रत्न पुण्याकरिता, दुसरे होमाकरिता, तिसरे स्वतःकरिता, चवथे पत्नीकरिता व पाचवे सोबतच्या रत्नांच्या भोजनाकरिता मी नित्य खर्चत असतो. अशा प्रकारच्या मज पुरुषास आपली कन्या देणे तुला योग्य आहे" ॥ १२, १३ ॥ याप्रमाणे त्याचे वचन ऐकून राजा मोहित झाला व तो धर्मात्मा आपल्या कन्येस म्हणाला "कन्ये, मी तुला कोणास देऊ?"

योग्या भवेत्कन्या रूपयौवनशालिनी १६ सूत उवाच ॥ इत्युक्तः स तु भूपालो वचनं तं समब्रवीत् । धर्मदत्ताय सा कन्या योग्या भवति रूपिणी १७ सर्वशास्त्रेषु निपुणः स द्विजो वर्णतः स्मृत । भाषावेत्ता तु वणिजो धनधान्यप्रसारकः १८ कलाज्ञः स तु शूद्रो हि धनुर्वेदी स भूपति । सवर्णाय च वैताल सदा योग्या हि कन्यका १९ अतो विवाहिता बाला धर्मदत्ताय शीलिने २० [६७८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये सप्तमोऽध्याय ॥ ७ ॥

सूत उवाच ॥ इति श्रुत्वा स वैतालो राजानमिदमब्रवीत् । विदेहदेशे भूपाल नगरी मिथिलावती १ गुणाधिपस्तत्र राजा धनधान्यसमन्वितः । चिरन्देव इति ख्यातो राजन्यः कश्चनागतः २ वृत्त्यर्थं मिथिलादेशे तत्र वासं चकार सः । वर्षान्ते भूपतिः सोऽपि चतुरङ्गबलान्वितः ३ मृगयार्थं वनं प्राप्तस्तत्र शार्दूलमुत्तमम् । दृष्ट्वा त चावधीद्राजा क्रोधताम्रेक्षणो वने ४ व्याघ्रमार्गेण भूपालो वनान्तरमुपाश्रयत् । चिरन्देवस्तु तत्पश्चाद्गतः स गहने वने । क्षुत्क्षामकण्ठो भूपतिः श्रमसन्तापपीडितः । चिरन्देवमुवाचाशु भोजनं देहि मेऽद्य भोः ६ इति श्रुत्वा स राजन्यो हत्वा हरिणमुत्तमम् । संस्कृत्य ददौ राज्ञे तन्मांस भूपतिप्रियम् ७ तुष्टो भूपस्तदा प्राह वरं वरय सत्तम । वाञ्छित ते ददाम्याशु स होवाच महीपतिम् ८ मया सहस्रमुद्राश्च खादितास्तव विग्रये । गृहमानीय भूपाल ता. समर्पय मा चिरम् ९ शतमु-

तेव्हा हें वचन ऐकून ती देवी दैवामुळे मोहित झाली व लाजली. ती धर्मशालिनी आपल्या पित्यास काहींच उत्तर देईनाशी झाली १४,१५. असें बोलून तो वेताल हंसून राजास म्हणाला " ती रूपयौवनशालिनी कन्या कोणास योग्य होय ? " १६. सूत म्हणतात:— ह्याप्रमाणे वेताल व्यास म्हणाला आहे असा तो भूपाल त्यास असें म्हणाला —ती सुंदर कन्या धर्मदत्तास योग्य होय १७. सर्व शास्त्रामध्यें निपुण असलेला असा तो वर्णतः द्विज म्हणून सांगितलेला आहे. भाषा जाणणारा तर धनधान्याचा प्रसार करणारा वाणी होय. कला जाणणारा शूद्र होय. जो धनुर्वेद जाणत होता तो क्षत्रिय असें समजावें. बा वेताला, सवर्णास कन्या देणे योग्य होय १८,१९. यास्तव, शीलसंपन्न असा जो धर्मदत्त त्याच्याशीं त्या कन्येचा विवाह झाला २०. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

सूत म्हणतात:—हें ऐकून तो वेताल राजास असें म्हणाला " हे राजा, विदेह देशात मिथिलावती नगरी आहे. तेथें गुणाधिप म्हणून राजा असे. तो धनधान्ययुक्त होता. तेथें चिरंदेव म्हणून प्रसिद्ध असलेला एक क्षत्रिय आला १,२ व उपजीविकेकरिता त्याने त्या मिथिलादेशात वास्तव्य केले. एक वर्ष झाल्यावर तो राजा चतुरंगबलाने युक्त होऊन मृगया करण्याकरिता वनात प्राप्त झाला. तेथें उत्तम व्याघ्रास पाहून ज्याचे नेत्र क्रोधाने लाल झाले आहेत असा तो राजा त्यास मारता झाला ३,४ व ज्या मार्गाने व्याघ्र आला होता त्याच मार्गाने तो राजा दुसऱ्या वनात शिरला. तेव्हा चिरदेवही त्याच्या मार्गोमाग गहन वनात शिरला ५. कांही वेळाने श्रमामुळे झालेल्या संतापाने पीडलेला व ज्याचा कंठ भुकेमुळें शुष्क झाला आहे असा तो राजा चिरंदेवास म्हणाला " अरे, मला भोजन लवकर दे ". हे ऐकताच त्या क्षत्रियाने एक उत्तम हरिण मारिले व त्यास अग्निसंस्कार करून तें राजास प्रिय असलेले मांस त्यास दिलें ६,७. तेव्हा संतुष्ट झालेला राजा त्यास म्हणाला ' हे उत्तमा, वर माग. तुला जें इष्ट असेल ते देईन '. तेव्हा तो राजा म्हणाला ' तुझ्या वेटीकरिता मीं हजार मुद्रा खाल्ल्या आहेत. त्या, हे राजा, मला गृही आणून पोंचीव. उशीर करूं

द्वास्तु मासान्ते मह्यं देहि कुटुम्बिने । तथेत्युक्त्वा स नृपतिः स्वगेहं शीघ्रमाययौ १० एकस्मिन्दिवसे राजन्स च राजा गुणाधिपः । चिरन्देव स्वभृत्यं च प्रेषयामास सागरे ११ स गत्वा सागरतीरं देवीमूर्तिं ददर्श सः । नाम्ना कुसुमदां देवीं मार्कण्डेयस्थलस्थिताम् १२ गन्धर्वतनयां सुभ्रूं पूजयित्वा प्रसन्नधीः । प्राञ्जलिः पुरतस्तस्थौ तदा देवी समागता १३ वरं वरं पतिं प्राह चिरन्देवस्तु याचत । पाणिं गृहाण मे सुभ्रु त्वद्रूपेण विमोहितः १४ इति श्रुत्वा तु सा देवी विहस्योवाच कामिनम् । स्नापयाथ चिरं देव मत्कुण्डे देवनिर्मितम् १५ तथेत्युक्त्वा गतस्तोये स्नापितो मिथिलां ययौ । स दृष्ट्वा भूपतिं प्राह कारणं विस्मयप्रदम् १६ गुणाधिपस्तु तच्छ्रुत्वा स्वभृत्येन समन्वितः । प्रासादान्मन्दिरं देव्याः सा भूयः प्राह पुष्पदा १७ गान्धर्वेण विवाहेन मां गृहाण गुणाधिप । इति श्रुत्वा नृपः प्राह यदि देवि वचो मम १८ पुण्यदे त्वं गृहाणाद्य तर्ह्यहं त्वां संभजाम्यहम् । तथेति मत्वा तं प्राह स त्वं कार्यं निवेदय १९ स होवाच शृणु त्वं भो मम भृत्य चिरसुरम् । भज त्वं चपलाक्षि देवि सत्यं वचः कुरु २० व्रीडितां तु कथां कृत्वा भूपतिं प्राह कामिनी । मां भजस्व दयासिन्धो कामिनीं शक्रचोदिताम् २१ चिरन्देवं तु संप्राप्य कामान्धा त्वां समागता । पुष्पदन्तस्य तनया गन्धर्वस्य शुभानना २२ शापिता देवदेवेन नरभोगकरी ह्यहम् । इति श्रुत्वा स भूपालो धर्मात्मा शीलविग्रहः २३ कथं भजाम्यहं सुभ्रु स्नुषामिव सुधर्मिणीम् । चिरन्देवस्तु राजन्यो ऋषुत्र इव वर्तते २४ तस्य त्वं भोगिनी नारी शोभने त्वं विचारय

नको ८,९ आणि प्रत्येक महिन्याच्या शेवटी मज कुटुंबवत्सलास शंभर मुद्रा देत जा.' तेव्हा 'ठीक आहे' असें म्हणून तो राजा लागलाच आपल्या गृहीं गेला १०. हे राजा, एके दिवशीं तो राजा गुणाधिप आपल्या चिरदेवनामक सेवकास सागराकर पाठविता झाला ११. सागराच्या तीरीं गेल्यावर त्यानें देवीची मूर्ति पाहिली. त्या देवीचें कुसुमदा हे नांव होतें. ती मार्कंडेयस्थलामध्यें रहात होती. असो. ज्याची बुद्धि प्रसन्न आहे अशा त्या क्षत्रियानें त्या सुंदर गंधर्वकन्येचें पूजन केलें व तिच्यापुढे तो हात जोडून उभा राहिला. इतक्यांत देवी आली व ' वर माग ' असें तिला म्हणाली. तेव्हा चिरदेव म्हणाला " हे सुंदरि, माझें पाणिग्रहण कर. मी तुझ्या रूपावर मोहित झालो आहें " १२–१४. हे ऐकून त्या कामी पुरुषास ती देवी हसून म्हणाली ' वा चिरदेवा, आज माझ्या या देवनिर्मित कुंडामध्यें स्नान कर ' १५. तेव्हा ' ठीक आहे " असें म्हणून तो जलामध्यें गेला व त्याने बुडी मारिली. त्याबरोबर तो मिथिलानगरास पोचला व पुढें स्थित होऊन तो राजास विस्मय उत्पन्न करणारें हे सर्व कारण सांगता झाला १६. तेव्हा गुणाधिप तें ऐकून आपल्या सेवकासह देवीच्या मंदिरात आला. तेव्हा ती पुष्पदा पुन. म्हणाली १७ " वा गुणाधिपा, गांधर्वविवाहाने माझा स्वीकार कर. " हे ऐकून राजा म्हणाला ' देवि, जर तं माझें वचन ऐकशील तर हे पुण्यदे, मी तुझें सेवन करीन '. तेव्हां ' ठीक आहे ' असें म्हणून ' तुझें काय कार्य आहे तें सांग ' असें त्यास बोलती झाली १८, १९. तेव्हा तो म्हणाला 'हे देवि, एक. चिरदेव म्हणून माझा सेवक आहे. हे चपलापांगि, देवि, तूं त्याचें सेवन करून वचन सत्य कर' २०. ते ऐकून ती कामांगी लज्जित झाली व म्हणाली ' वा दयासागरा, इंद्राने जिला प्रेरणा केली आहे अशा मज कामिनीचें तूंच सेवन कर २१. चिरदेवाची प्राप्ति करून घेऊन मी कामांध होत्साती तुजकडे आलें आहे. मी पुष्पदंत गंधर्वाची शुभानना कन्या आहें. पण मला देवाधिदेवानें शाप दिला आहे. त्यामुळें मी पुरुषास भोग्य झालें. ' हे ऐकून तो धर्मात्मा व शीलसंपन्न राजा म्हणाला ' हे सुंदरि, तूं माझ्या धार्मिक स्नुषेसारिखी आहेस. तेव्हा मी तुझें सेवन कसें करूं ? कारण, क्षत्रिय

लज्जिता सा तदा देवी स्नुषेव च ववर्त वै २५ इत्युक्त्वा भूपतिं प्राह वैतालो रुद्रकिङ्करः । सत्यं धर्मं च कस्यैव जातं तन्मे वदस्व भोः २६ सूत उवाच ॥ भूपतिस्तां विहस्याह चिरदेवस्य जायत । सत्यं धर्मं च वैताल शृणु तत्कारणं शुभम् २७ नृणां परम — —पकरणं स्मृतम् । कृतोपकार भृत्यस्य तेन तत्किं हि सत्यता २८ भृत्येन च कृतं कर्म तच्छृणुष्व वदाम्यहम् । विना वृत्तिं स्थितो गेहे भूपतेर्गुणशालिनः २९ सेवावृत्तिः कृता सर्वा यथाऽन्यैर्न नरैः कृता । पश्चाद्भूपतिना ज्ञातः सङ्कटे महदागते । चिरदेवस्तु तस्माच्च कारणादधिको मतः ३० [७०८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चयेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

सूत उवाच ॥ भोः शौनक महाबुद्धे वैतालेन महीपतिः । महाप्रवीणश्च मतस्तमाह स च भूपतिम् १ राजन्कामपुरे रम्ये वीरसिंहो महीपतिः । न्यायतो धर्मतश्चैव तत्र राज्यमचाकरत् २ हिरण्यदत्तस्तत्रैव वैश्यो धनमदान्वितः । कामालसा तस्य सुता रूपयौवनशालिनी ३ अवसत्सुखतो नित्यं वसन्ते कुसुमप्रिया । कदाचित्कुसुमार्थं वै वनं भ्रमरनादितम् ४ गच्छन्तीं तां समालोक्य धर्मदत्तात्मजो बलः । सोमदत्त इति ख्यातः पस्पर्श मदनालसाम् ५ सा तु तं निर्जने स्थाने प्रोवाच विनयान्विता । कन्यकाऽहं महावीर त्यज मां धर्मतोऽद्य भोः ६ विवाहे सति पूर्वं त्वां भजामि दशमेऽहनि । अतो दशदिनस्यैवादेश देहि दयानिधे ७ तथेति मत्वा तां त्यक्त्वा

चिरदेव माझ्या पुत्रासारखा आहे २२-२४ व त्याची तूं भोग्य स्त्री आहेस. हे सुंदरि, विचार कर'. तेव्हा ती देवी लज्जित होऊन स्नुषेसारखी राहू लागली. असें बोलून तो रुद्राचा सेवक वेताल राजास म्हणाला " राजा, खरोखर धर्म कोणाचा झाला ते मला सांग " २५, २६. सूत म्हणतात — राजा त्यास हसुन म्हणाला " चिरदेवाचा खरोखर धर्म झाला. त्याचें शुभ कारण ऐक. राजाचा मुख्य धर्म सर्वांवर उपकार करणें हा सांगितलेला आहे व त्याप्रमाणें त्याने आपल्या भृत्यावर उपकार केला त्यात सत्यता ती कोणती ? आता सेवकाने काय केलें तें सांगतो ऐक. तो गुणशाली राजाच्या गृही वेतनावाचून राहिला व दुसऱ्या कोणत्याही पुरुषाने केलेली नाही अशी त्याने त्याची सेवा केली व जेव्हा मोठे संकट आलें तेव्हा राजाने त्यास ओळखिले. त्यामुळें चिरदेव अधिक मानलेला आहे " २७-३०. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयातील आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥

सूत म्हणतात:—हे महाबुद्धिमान शौनका, वेतालाने राजास महाप्रवीण मानलें व तो पुनरपि राजास म्हणाला १, राजा रम्य कामपुरामध्ये वीरसिंह म्हणून राजा होता. त्याने तेथें न्यायाने व धर्माने राज्य केलें. त्याच नगरात धनाच्या मदाने युक्त असा एक हिरण्यदत्त म्हणून वैश्य असे, त्याची कामालसा म्हणून कन्या असून ती रूप व यौवन यांनी युक्त होती २,३. ती सदा सुखानें रहात असे. जिला पुष्प प्रिय आहेत अशी ती एकदा वसंतऋतूत भ्रमरांनी नादित केलेल्या वनात पुष्पाकरिता गेली ४ असता ती जात आहे असें पाहून धर्मदत्ताचा बलवान् पुत्र जो सोमदत्त तो त्या मदनालसेस स्पर्श करिता झाला. तेव्हा विनयानें युक्त होऊन ती त्यास निर्जन वनात म्हणाली 'अहो महावीर, मी कन्या आहे ह्यास्तव माझा धर्मतः त्याग करा ५, ६. विवाह झाला असता आजपासून दहाव्या दिवशीं मी प्रथम तुमचीच सेवा करीन. ह्यास्तव, हे दयानिधे, मला दहा दिवसांचीच सवलत द्या' ७. तेव्हा ' बरें आहे ' असें म्हणून व तिला सोडून तो आपल्या गृहीं प्राप्त झाला. पुढें कामालसेस तिच्या पित्यानें त्याच ग्रामात मणिग्रीवाच्या मदपालनामक वैश्यपुत्रास दिलें. ती श्वशुराच्या गृहीं

निजगेहं समागतः । कामालसा तु तद्ग्रामे पित्रा दत्ता वराय च ८ मदपालाय वैश्याय मणिग्रीवसुताय च । श्वशुरस्य गृहं गत्वा स्वमित्र मत्यचिन्तयत् ९ नवमेऽहनि तत्स्वामी गृहीत्वा कामिनीं बलात् । कामातुर स पत्नीं तामालिलिङ्ग मदान्वितः १० अरुदत्सा तु तत्पत्नी मित्रवाक्येन कर्षिता । तामुवाच तदा वैश्यः शान्तिपूर्वमिदं वचः ११ किं रोदिषि मदाघूर्ण सत्यं कथय शोभने। सा तु सत्यवती प्राह यथा जातं हि कानने १२ यदि नायासि पार्श्वे त्वां सोमदत्त धनोत्तम । तदा वैधव्यतां प्राप्य भजामि वृजिन हि तत् १३ इति वाक्येन बद्धाऽहं यास्यास्मि तदन्तिकं । इति श्रुत्वा च तत्स्वामी तामाज्ञाप्य मुदान्वितः १४ सुष्वाप सा तु तत्पार्श्वे ह्यगमत्कामविह्वला तदा चौरस्तु तां दृष्ट्वा सर्वाभरणभूषिताम् १५ वचश्चोवाच लोभात्मा कुत्र यासि च सुन्दरि । केनैवापेक्षिता रात्रौ सत्य कथय भामिनि १६ कामालसा तु तं चौरमुवाच मदविह्वला । रक्षिता कामबाणेन स्वमित्र प्रति यामि भोः १७ चौरस्तामाह भोः सुभ्रु भूषणं देहि मऽबले । चौराऽहं ते धनग्राही सा श्रुत्वा वाक्यमब्रवीत् १८ आलिङ्ग्योपपतिं मित्रं दास्यामि तव भूषणम् । तथेत्युक्त्वा तु तेनैव सोमदत्त समागता १९ दृष्ट्वा तामब्रवीद्वैश्यः कथ याता स्मरालसे । सत्यं कथय मे शीघ्रं तत्पश्चात्त्वां भजाम्यहम् २० कामालसा न तच्छ्रुत्वा यथा जातं तथाऽब्रवीत् । श्रुत्वा स ज्ञानहृदयो विष्णुदेवेन बोधितः २१ मत्वा पतिव्रतां नारीं परिक्रम्य व्यसर्जयत् । चौरस्तु कारण श्रुत्वा विष्णुदेवेन बोधितः २२ गेहे प्रवेशयामास तत्पतिर्यत्र तिष्ठति । सा तु कामालसा देवी स्वपातिव्रत्यधर्मिणी २३ बुभुजे विषयान्दिव्यान्देवदेवेन चोदितान् ।

गल्यावर आपल्या मित्राचे चिंतन करीत झाली ८. ९. नवव्या दिवशी तिचा स्वामी कामिनीस बलात्कारानें घेऊन कामातुर होत्साता त्या पत्नीस मदानें आलिंगन देता झाला. मित्राच्या वाक्यानें घोटाळ्यात पडलेली ती तरुणी त्यावेळीं रडूं लागली. तेव्हा तो वैश्य तिला शांतिपूर्वक म्हणाला ' हे सुंदरि, तूं का रडतेस ? प्रिये, काय असेल ते खरें सांग. ' तेव्हा त्या सत्यवतीनें काननात झालेला प्रकार त्यास सांगितला. " हे श्रीमन् सोमदत्ता, तुझ्याजवळ जर मी न आलें तर मी विधवा होऊन तुझें सेवन करीन. म्हणजे नसले पाप मला लागेल " १०–१३. या वाक्यानें मी बद्ध झालें आहें. यास्तव. मी आज त्याच्या जवळ जातें. हें ऐकून तिचा स्वामी तिला आनंदानें आज्ञा करिता झाला व स्वत निजला. नंतर ती कामाने विव्हल झालेली तरुणी त्याच्यापाशीं जावयास निघाली. तेव्हा एक लोभी चोर सर्व भूषणांनीं भूषित झालेल्या तिला पाहून म्हणतो ' हे सुंदरि, तूं कोठें जातेस ? हे भामिनि, रात्रीं तुझी कोणी अपेक्षा केली आहे ? खरें सांग '१४-१६. त्यावर मदानें विव्हल झालेली कामालसा त्या चोरास म्हणाली " कामाच्या बाणानें जिचे रक्षण केलें आहे अशी मी आपल्या मित्राकडे जात आहें " १७. तेव्हा तिला चोर म्हणाला " हे सुभ्रु, हे अबले, मला भूषणें दे. तुझें धन ग्रहण करणारा मी चोर आहें. " हें ऐकून ती म्हणाली १८ ' मित्ररूप अशा माझ्या उपपतीस आलिंगन देऊन नंतर मी तुला भूषणे देईन. ' तेव्हा त्याने " बरें आहे " असें म्हटलें. पुढें ती सोमदत्ताकडे आली १९. तिला पाहून वैश्य म्हणाला " हे कामालसे, तूं कशी आलीस ? ते मला खरें सांग. म्हणजे मग मी तुझें सेवन करीन " २०. तेव्हा तें ऐकून कामालसेनें झालेला सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकताच त्याचें हृदय ज्ञानमय झालें. त्यास जणु काय विष्णुदेवानेंच बोध केला २१. ती पतिव्रता स्त्री आहे असें समजून त्यानें तिला प्रदक्षिणा घातली व तिचे विसर्जन केलें. चोरानेंही सर्व कारण ऐकून ज्याला विष्णुदेवानें बोध केला आहे असा तो तिला जेथें तिचा पति होता तेथें पोंचविता झाला. नंतर ती कामालसा देवी आपल्या पातिव्रत्यधर्मी-

इत्युक्त्वा स तु वैतालो नृपतिं प्राह कोविदम् १४ कस्य सत्यं स्मृत श्रेष्ठ तेषां मध्ये वदस्व मे ।
सूत उवाच ॥ इत्युक्तः स तु भूपालो वैतालमिदमब्रवीत् १५ चोरस्य सत्यता श्रेष्ठा यथा जाता तथा शृणु । नृपभीत्या स वैश्यस्तु तां नारीं न तु भुक्तवान् २६ वैधव्यभीत्या सा देवी स्वामिनं प्रति चागता । धर्मभीत्या च तत्स्वामी स्वपत्नीं न तु भुक्तवान् २७ चौरस्तु सत्यभीत्या वै त्यक्त्वा तां मुदमागतः २८ [७३६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डा-परपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

सूत उवाच ॥ वैतालस्तु महाभाग राजानमिदमब्रवीत् । गौडदेशे महाराज वर्धन नाम वै पुरम् १ गुणशेखर आख्यातो भूपालस्तत्र धर्मवान् । तन्मन्त्री निर्भयानन्दः जैनधर्मपरायण २ कदाचिच्छूपतिर्यातो मन्दिरं गिरिजापतेः । पूजयामास तं देवं सर्वव्यापिनमीश्वरम् ३ वृश्चिकस्तत्र संप्राप्य दर्दश नृपतिं रुषा । तत्कष्टेन स भूपालो मूर्छितः पतितो भुवि ४ तदा तु निर्भयानन्दो विषमुत्तार्य तस्य वै । भूपतिं कर्णयामास जैनधर्मपरायणः ५ शृणु राजन्महाभाग शत्रून्षण्मानसाधमान् । कामः क्रोधस्तथा लोभो रतिर्हिंसा च तृष्णिका ६ रजोगुणाच्च ते जातास्तेषां भेदाः पृथक्पृथक् । मोहो दम्भो मदश्चैव ममताशा च गर्हणा ७ तमोगुणाच्च ते जातास्तैरिदं पूरितं जगत् । कामी विष्णुस्तथा रुद्रः क्रोधी लोभी विधिस्तथा ८ दम्भी शक्रो यमो मोही मदी यक्षपतिः स्वयम् । मायावश्याश्च ते सर्वे तर्हि तत्पूजनेन किम् ९ षट्शत्रुभिर्जितो यो वै सोऽजितो मुनिभिः स्मृतः । न जितः स जिनो ज्ञेयोऽद्वैतवादी निरञ्जनः १० तस्य ध्यानेन भावन

प्रमाणे वागून इद्रानें दिलेले दिव्य भोग भोगती झाली. असे ह्मणून तो वेताल विद्वान् राजास ह्मणाला २२-२४, त्याच्यापैकी कोणाचें सत्य श्रेष्ठ मानिलेले आहे ते मला सांग. सूत ह्मणतात.---ह्याप्रमाणें वेतालाने ज्यास विचारले आहे असा तो भूपाल ह्मणाला —चोराची सत्यता श्रेष्ठ होय, कशी ह्मणून ह्मणशील तर ऐक. राजाच्या भीतीनें वैश्याने ह्या स्त्रीचा भोग घेतला नाहीं २५,२६. वैधव्याच्या भीतीने ती देवी आपल्या मित्राकडे आली. धर्माच्या भीतीने तिच्या स्वामीने आपल्या पत्नीचा भोग घेतला नाहीं २७. पण चोर मात्र केवल सत्याच्या भीतीनेच तिला सोडून आनंदित झाला२८. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥

सूत ह्मणतात.-हे महाभागा, वेताळ राजास असे ह्मणाला:-हे महाराजा, गौडदेशात वर्धन ह्मणून एक नगर आहे १. तेथें गुणशेखर या नावाने प्रसिद्ध अमा धार्मिक राजा रहात असे. जैनधर्मामध्यें परायण असा एक निर्भयानद ह्मणून त्याचा मत्री असे २. एकदा तो राजा शंकराच्या मंदिरात गेला व त्यानें त्या सर्वव्यापी स्वयंप्रकाश ईश्वराची पूजा केली ३. इतक्यात एक विंचू मोठ्या रागाने येऊन त्या राजास दंश करिता झाला. तेव्हा त्या कष्टानें तो राजा मूर्च्छित होऊन भूमीवर पडला४. त्यावेळीं जैनधर्मामध्यें परायण असलेला निर्भयानंद त्याचें विष उतरून त्या राजास असा उपदेश करिता झाला. हे महाभाग्यवाना राजा, मानसिक व अधम असे सहा शत्रु कोणते ते ऐक. काम, क्रोध, लोभ, रति, हिंसा व तृष्णा हे सहा शत्रु होत ५,६. ते रजोगुणापासून झालेले आहेत. त्याचे पृथक् पृथक् भेद असे आहेत:-मोह, दंभ, मद, ममता, आशा व निंदा ७.हे भेद तमोगुणापासून झालेले आहेत व त्यानीं हें सर्व जग भरून सोडिले आहे. विष्णु कामी, रुद्र क्रोधी व त्याचप्रमाणें ब्रह्मदेव लोभी आहे ८. इंद्र दंभी, यम मोही व स्वत. कुबेर मदयुक्त असतो. ते जर सर्व मायेच्या अधीन आहेत तर त्याच्या पूजनाने काय होणार ? ९.

मोक्षवन्तो नराः सदा।तस्यमन्नाय यो धर्मः शृणुभे वसुधाधिप ११ गोपूजनेन ते देवास्तुष्टिं यान्ति सदैव हि यतो गोपूजन शुद्ध हिंसा सर्वत्र वर्जिता १२ मद्यपानेन सर्वात्मा जिनः क्लेश समाप्नुयात्। तस्मान्मांस च पान च वर्जितं सर्वदैव हि १३ न्यायेनोपार्जित वित्त भोजयेच्च बुभुक्षितान्। रविरात्मा जिनस्यैव तत्प्रकाशे हि भोजयत् १४ इत्यत्र वर्णयित्वैनं मन्त्री गृहमुपाययौ । तथैव मत्वा स नृपो जिनधर्म गृहीतवान् १५ कियता चैव कालेन वेदमार्गो हि लङ्घितः । तदा तु दुःखिता राज्ञी शिवस्य शरणं ययौ १६ वरदानेन रुद्रस्य पुत्रो जातो महोत्तम. । धर्मराज इति ख्यातो वेदव्रतपरायणः १७ गुणशेखर एवासौ पञ्चत्वं निरयं ययौ । धर्मराजस्तदा राज्य कृतवान्धर्मतः स्वयम् १८ तस्य धर्मप्रभावेन तर्पिता स्वर्गमाप्तवान् । त्रयः पत्न्योऽभवंस्तस्य गुणरूपा महोत्तमाः १९ वसन्तसमये राजा ताभिः सह वनान्तरं । सयातो रमयामास पुष्पभ्रमरनादिते २० श्रमितः स तु भूपालो राज्ञीभिः सह मोदितः । सरोवरं स्नापितवान्मदाघूर्णितलोचनः २१ गृहीत्वा कुसुम पद्म कर राज्ञ्यै समर्पयत् । पादहीनं त्वमायाता पतता कुसुमन वे २२ दुःखितः स तु भूपाला राज्ञीं तामचिकित्सयत् । रात्रौ प्राप्ते द्वितीया तु चन्द्रशीलेन मोहिता २३ आपतद्व्याकुलीभूत्वा शुद्धं पादमभूत्ततः । पतितायाश्च शब्देन तृतीया ज्वरिताऽभवत् २४ तस्या मूर्च्छा तदा क्षीणा द्वितीयाया अजायत । नृपस्पर्शेन सा सुभ्रूर्ज्वरतापं विहाय च २५ प्रभात सुन्दरे जाते स ताभिर्गृहमाययौ । इत्युक्त्वा स तु वैतालो भूपतिं प्राह नश्चयी. २६ आसां मध्ये

जो सदा शत्रूकडून जिंकला जातो तो अजिन होय असे मुनींनी झटलें आहे व यान्याकडून जो जिंकिला जात नाहीं तो जिन, अद्वैतवादी व निरंजन आहे असें जाणावें १०. त्याच्या ध्यानानें व भावानें मनुष्यें सदा मोक्षवान् होतात. हे पृथ्वीपते, त्याच्या प्रसन्नतेकरिता जो धर्म समर्थ होतो तो ऐक ११. गाईच्या पूजनानें ते देव सर्वदा संतुष्ट होतात. यास्तव, गाईचें पूजन फार शुद्ध आहे. हिंसा सर्वत्र वर्ज्य होय १२. मद्यपानानें सर्वात्मा जिन क्लेश भोगितो. यास्तव, मास व पान हीं सर्वदाच वर्ज्य होत १३. न्यायाने मिळाविलेलें अन्न बुभुक्षितास भोजनार्थ द्यावें. सूर्य हा जिनाचा आत्मा आहे. यास्तव, त्याच्या प्रकाशात भोजन द्यावें १४. याप्रमाणें त्या राजास सांगून मंत्री गृहीं गेला. तेव्हा तें सर्व बरोबर आहे असें मानून राजा जिनधर्माचा स्वीकार करिता झाला १५. कांहीं कालाने त्यानें वेदमार्गाचें उल्लंघन केले. त्यावेळीं कष्टी झालेली राणी शंकरास शरण गेली १६. रुद्राच्या वरदानामुळे तिला फार उत्तम पुत्र झाला. त्याचें धर्मराज असें नाव होतें. तो वेदव्रतामध्यें तत्पर असे १७. हा गुणशेखर मृत झाल्यावर नरकास गेला. तेव्हा धर्मराजानें स्वत धर्मदृष्टीनें राज्य केलें १८ व त्याच्या धर्मप्रभावानें त्याचा पिता स्वर्गास गेला. प्रत्यक्ष गुणरूप व फार उत्तम अशा त्याच्या तीन स्त्रिया होत्या. तो राजा एकदा वसंतऋतूत त्या स्त्रियांसह वनामध्यें गेला व पुष्पावरील भ्रमरांनीं नादित अशा त्या वनात तो क्रीडा करिता झाला १९.२०. पुढें तो राजा राण्यांसह दमला व आनंदित झाला. व मदामुळें ज्याचे नेत्र फिरून मेले आहेत असा तो राजा सरोवरामध्यें स्नान करिता झाला २१. त्याने हातात पद्माचे पुष्प घेऊन राणीस समर्पण केलें. पण त्या पडणाऱ्या पुष्पानें ती लगडी झाली (म्हणजे तिचा पाय मोडला) २२. तेव्हा दुःखी झालेल्या राजानें त्या राणीची वैद्याकडून चिकित्सा करविली. रात्र झाली असता दुसरी राणी चंद्राच्या किरणांनीं मोहित झाली २३ व व्याकुळ होऊन पडली. इतक्यात पहिलीचा पाय बरा झाला. पडलेल्या त्या राणीच्या शब्दाने तिसरी ज्वरयुक्त झाली २४. त्यावेळीं दुसऱ्या राणीची मूर्च्छा क्षीण झाली. राजाच्या स्पर्शाने ती सुंदरी ज्वर सोडून उठली २५. दुसऱ्या दिवशी सुंदर प्रभातसमय झाला

महाराज का श्रेष्ठा सुकुमारिका । राजोवाच ॥ तृतीया सुकुमारी च तासां मध्ये महोत्तमा २७ वायुप्रकृतिश्वासौ पद्मपुष्पेण खञ्जिता । शीतांशुना द्वितीया तु मूर्च्छिता कफभावतः २८ शब्दमात्रेण संतापो यस्यां जातो हि सोत्तमा । विहस्याह पुनर्देवो भवभक्तं महीपतिम् २९ जैनधर्मः प्रधानो हि वेदधर्मोऽथवा वद । स होवाच प्रधानोऽसौ वेदधर्मः सनातनः ३० अष्टौ श्रेण्यो हि तस्यैव ब्रह्मणोऽव्यक्तरूपिणः । शूद्रो वैश्यस्तथा क्षत्री ब्राह्मणो ब्रह्मचर्यकं ३१ गेहो वन्यो यतिश्चैव क्रमाच्छ्रेष्ठाः प्रकीर्तिताः । यः कृत्वा नारिसंसर्गं यतिवद्वर्तते गृही ३२ स पापी नरकं याति यावद्भूतसंप्लवम् । गृहेषु यतिवद्धर्मो जैनशास्त्रे प्रकीर्तितः ॥ पाखण्डः स स्मृतः प्राज्ञैर्वर्जनीयो हि सर्वदा ३३ [७५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये दशमोऽध्यायः ॥ १० ॥

सूत उवाच ॥ भोः शौनक महाभाग स वेतालो हि देवता । राजानमब्रवीद्वाक्यं धर्मप्रश्नमयीं शुभाम् १ राजन्पुण्यपुरे रम्ये नानाजननिषेविते । धर्मवल्लभभूपालस्तत्र राज्यं पुराऽकरोत् २ सत्यप्रकाशस्तन्त्री लक्ष्मीश्चामात्यकामिनी । कदाचित्स तु भूपालो मन्त्रिणं प्राह धर्मवित् ३ आनन्दः कतिधा लोके तन्मामाचक्ष्व मन्त्रम । स होवाच महाराज सुखमेव चतुर्विधः ४ ब्रह्मचर्याश्रमे यो वै ब्रह्मानन्दो महोत्तम । गार्हस्थ्ये विषयानन्दो मध्यमः कथितो बुधैः ५ वानप्रस्थे महाराज स धर्मानन्दकोऽधमः कर्मकाण्डेन चानन्दः सत्यधर्मः स वै स्मृत ६ सन्यस्ते तु

असता तो त्याच्यासह गृही परत आला. असे बोलून तो नम्रबुद्धि वेताल राजास म्हणाला २६ " राजा, या तिघीजणींपैकी श्रेष्ठ सुकुमारी कोण ? " राजा म्हणतोः-त्याच्यापैकी तिसरी राणी फार उत्तम सुकुमार होय २७. वातुळ प्रकृतीमुळें पहिली राणी लगडी झाली. कफमय प्रकृतीमुळें दुसरी चद्राच्या किरणानीं मूर्छित झाली २८. पण केवळ शब्दाच्या योगाने जिला सताप झाला ती उत्तम होय. तो वेताल पुनरपि हसून त्या शंकरभक्त राजास म्हणाला २९ " जैनधर्म मुख्य कीं वैदिक धर्म मुख्य तें मला सांग. " त्यावर तो म्हणाला ' हा सनातन वैदिक धर्मच मुख्य होय . ज्याचें रूप अव्यक्त आहे अशा त्या वेदभगवानाच्या शूद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व यति, अशा आठ पायऱ्या आहेत व त्या उत्तरोत्तर श्रेष्ठ आहेत असे सांगितलेलें आहे. जो गृहस्थ स्त्रीसंसर्ग करून यतीसारिखा रहातो तो पापी प्रलयापर्यंत नरकास जातो. जैनशास्त्रामध्यें गृहामध्ये यतीसारिखा धर्म सांगितला आहे. वास्तव, विद्वानानीं त्यास पाखंडधर्म म्हणून झटले आहे. तो सर्वदा वर्ज्य करण्यास योग्य आहे ३०-३३. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहासमुच्चयातील दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥

सूत म्हणतातः— हे महाउदार शौनका, देवतारूप असा तो वेताल धर्मसंबंधी प्रश्नरूप व शुभ अशी गाथा राजास सांगता झाला १. " राजा, नाना जनानीं सेवित व रम्य अशा पुण्यपुरामध्यें पूर्वी धर्मवल्लभनामक राजा राज्य करिता झाला २. सत्यप्रकाश हा त्याचा मंत्री व लक्ष्मी ही त्या अमात्याची स्त्री होय. कोणे एके समयी तो धर्मज्ञ राजा मंत्र्यास म्हणाला ३ " हे उत्तमा, लोकामध्यें आनंद किती प्रकारचा आहे ते मला सांग. " त्यावर तो म्हणाला " हे महाराजा, आनंद चार प्रकारचा आहे ४. ब्रह्मचारी आश्रमामध्ये अध्ययनाचा ब्रह्मानंद होतो, तो महोत्तम होय. गृहस्थाश्रमामध्यें विषयानंद होतो, तो मध्यम होय असे शाहण्यानीं सांगितलें आहे ५. हे महाराजा, वानप्रस्थाश्रमामध्ये धर्मानंद होतो, तो अधम होय व कर्मकांडाने

शिवानन्दस्य हि सर्वोत्तमोत्तमः । विषयानन्दको राजन्स्त्रीप्रधानः प्रकीर्तितः ७ स्त्रियं विना सुखं नास्ति गृहस्थाश्रमके नृप । इति श्रुत्वा स भूपालो देशान्तरमुपाययौ ८ पत्नीमन्वेषयामास स्वयोग्यां धर्मतत्पराम् । प्राप्तवाञ्छ तु वामाक्षीं मनोवृत्त्यनुसारिणीम् ९ स भूपो मन्त्रिणं प्राह नारीमन्वेषयाशु भो. । ना चेत्प्राणानहं त्यक्ष्ये सत्यं वाक्यं ब्रवीम्यहम् १० इति श्रुत्वा ययौ मन्त्री देशादेशान्तरं प्रति । सिन्धुदेशं च संप्राप्य समुद्रं प्रति सोऽगमत् ११ तुष्टाव मनसा सिन्धुं सर्वतीर्थपतिं शुभम् । बुद्धिप्रकाश उवाच ॥ सिन्धुदेव नमस्तुभ्यं सर्वरत्नालय प्रभो १२ अहं ते शरणं प्राप्तः शरणागतवत्सल । त्वां नमामि जलाधीश गङ्गादिसरितां पतिम् १३ स्त्रीरत्नं देहि राज्ञोऽर्थे नो चेत्प्राणांस्त्यजाम्यहम् । इति श्रुत्वा प्रसन्नात्मा सागरः सरितां पतिः १४ जले वृक्षं सुवर्णाङ्गं पत्रबिल्वमकं महत् । मुक्ताफलान्वितं दिव्यं मन्त्रिणं तमदर्शयत् १५ तस्योपरि स्थिता बाला सुकुमारी मनोरमा । तत्रैव सा लयं जाता वृक्षेण सह भूपत १६ इति दृष्ट्वा महाश्चर्यं नृपान्तिकमुपाययौ । वर्णयित्वा तु तत्सर्वं राज्ञा सार्धं समाययौ १७ तथाविधं नृपो दृष्ट्वा सागरान्तमुपाययौ । बालया सह पातालं प्रविवेशाथ भूपतिः स्वयम् १८ तां नारीं प्राह नम्रात्मा त्वदर्थेऽहं समागतः । गान्धर्वेण विवाहेन मां प्रापय वरानने १९ विहस्य साह तं भूपं कृष्णपक्षे चतुर्दशी । तदिनेऽहं समागत्य त्वां भजामि नृपोत्तम २० इति श्रुत्वा स नृपतिस्तद्दिनं स्मरविह्वलः । खड्गमादाय तूर्णं तत्र यत्र देवीगृहोत्तमम् २१ एतस्मिन्नन्तरे तत्र राक्षसो बकवाहनः । तां बालां स च पस्पर्श नृपः क्रोधातुरोऽभवत् २२ कामान्धो राक्षसं हत्वा

जो आनंद होतो तो सत्यधर्म ह्मणून श्रेष्ठ झाला आहे ६ सन्न्यास केल्यावर शिवानंद होतो. तो सर्व उत्तमांतील उत्तम असें समजावे. हे राजा, विषयानंदामध्ये स्त्री प्रधान होय असे सांगितले आहे ७. हे राजा, गृहस्थाश्रमामध्ये स्त्रीवाचून सुख नाही. " हे ऐकून तो राजा दुसऱ्या देशांत गेला ८ व त्याने आपणास योग्य व धर्ममध्ये तत्पर अशा स्त्रीचा शोध केला. पण त्याच्या मनोवृत्तीप्रमाणे चालणारी सुंदर स्त्री त्यास प्राप्त झाली नाही. तेव्हा तो राजा मंत्र्यास ह्मणाला ' आता तूं स्त्री पहा. नाहीतर मी प्राण देईन, हे मी तुला सत्य वचन सांगत आहे ' ९,१०. हे ऐकून मंत्री देशोदेशी गेला. सिंधुदेशामध्ये येऊन तो समुद्राजवळ गेला व सर्व तीर्थांचा शुभ स्वामी असा जो समुद्र त्याची त्याने मनाने स्तुति केली. बुद्धिप्रकाश ह्मणतो-सर्व रत्नांचे गृह अशा हे प्रभो सिंधुदेवा, तुला नमस्कार असो. हे शरणागतावर प्रेम करणाऱ्या समुद्रा, मी तुला शरण आलो आहे. गंगा,नर्मदा, सिंधु इत्यादि नद्यांच्या पतीस अर्थात् तुज जलाधीशास मी नमस्कार करितों. राजाकरितां स्त्रीरत्न दे. नाहीतर मी प्राणत्याग करीन. हे ऐकून ज्याचा आत्मा प्रसन्न झाला आहे असा तो नद्यांचा स्वामी सागर ११-१४ ज्याचे अंग सुवर्णाचे आहे, पाने पोवळ्याची आहेत व मोत्यें हींच फळे आहेत असा दिव्य वृक्ष त्या मंत्र्यास जलामध्ये दाखविता झाला १५. त्याच्यावर एक मनोरम व सुकुमार बाला बसली होती. पण हे राजा, तो त्या वृक्षासह तेथेच गुप्त झाली १६. हे मोठे आश्चर्य पाहून तो राजाजवळ आला व त्यास ते सर्व सांगून राजासह तेथे पुनः प्राप्त झाला १७. तशा प्रकारचा वृक्ष पाहून राजा समुद्रांत शिरला व त्या बालेसह तो स्वतः पातालांत गेला १८. त्याचा नम्र स्वभाव आहे असा तो राजा त्या स्त्रीला ह्मणाला " मी तुझ्याकरितां आलो आहे. हे सुंदरि, गांधर्वविवाहानें तूं माझा स्वीकार कर. " त्यावर ती स्त्री हसून ह्मणाली ' हे उत्तम राजा, कृष्णपक्षांतील चतुर्दशीच्या दिवशीं मी तुजकडे येऊन तुझे सेवन करीन ' १९,२०. हे ऐकून मदनाने विव्हल झालेला तो राजा त्या दिवशीं हातांत खड्ग घेऊन जेथल्या देवीचे उत्तम मंदिर होते तेथें आला २१. इतक्यांत

स्वपत्नीं प्राह निर्भयाम् । कोऽयं तेऽत्र समायातः कारणं वद भामिनि २३ साह भो. शृणु भूपाल विद्याधरसुता ह्यहम् । पितृप्रिया मदयुता कामार्ता वनमागता २४ नागता भोजनें काले पितृमात्रोश्च मन्दिरं । ज्ञात्वा ध्यानेन मत्पित्रा शापिता तच्छृणुष्व भो. २५ अद्य कृष्णचतुर्दश्यां त्वां भक्षिष्यति राक्षसः । कृष्णपक्षचतुर्दश्यां भुङ्क्ष्व त्वमपराधकम् २६ तदाऽहं रोदनं कृत्वा ब्रवीमि पितरं प्रति । कदा मुक्तिर्भवेद्देव तत्त्वं कथय सुव्रत २७ स होवाच कुमारि त्वं वीरभुक्ता भविष्यसि । तदा शापस्य मुक्तिः स्यात्साऽह तत्र विमोचिता २८ त्वदाज्ञयाऽहं यास्यामि भो राजन्पितृमन्दिरे । इति श्रुत्वा नृपः प्राह मम गेहं समीक्ष्य २९ त्वया सार्द्धं गमिष्यामि गृहं विद्याधरस्य तत् । तथेत्युक्त्वा तु सा देवी नृपगेहं समाययौ ३० तदा तु नगरे तस्मिन्नरैर्जातं महोत्सवम् । मन्त्री दृष्ट्वा तु तं भूपं दिव्यपत्नीसमन्वितम् ३१ पञ्चत्वमगमत्तूर्णं कुतो हेतोर्हि तद्वद । राजोवाच ॥ मन्त्री बुद्धिप्रकाशस्तु दृष्ट्वा देवीं समागताम् ३२ नृपः स हृदि संध्यात्वा राजभङ्गभयातुरः । त्यक्त्वा प्राणान्ययौ स्वर्गं शृणु यत्कारणं शुभम् ३३ विषयी यो हि भूपालस्तस्य राज्यं विनश्यति । स्त्रीमदं प्राप्य राज्यस्य सदा हानिमवाप्नुयात् ३४ [८०३] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डप्रापर्याये कलियुगीयेतिहास समुच्चय एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

सूत उवाच ॥ विहस्य स तु वेतालो राजानमिदमब्रवीत् । राजश्चूडापुरे रम्ये भूपश्चूडामणिः

तेथें बकवाहननामक राक्षस त्या बालेस स्पर्श करिता झाला. त्यामुळे हा राजा क्रोधाविष्ट झाला २२ व जो कामाच्या योगाने अंध झाला आहे असा तो भूपाल राक्षसास मारून निर्भय झालेल्या आपल्या पत्नीस ह्मणाला " हे सुंदरि, हा येथें तुजकडे कोण आला होता ? " २३. त्यावर ती ह्मणाली " वा राजा, ऐक. मी विद्याधराची कन्या मी पित्यास अत्यंत प्रिय आहें २४. मदयुक्त व कामाने व्याकुळ होऊन मी वनात गेले व भोजनाच्या वेळी आईबापाच्या गृही आले नाहीं. तेव्हा हे सर्व ध्यानाने जाणून माझ्या पित्याने मला शाप दिला. तो ऐक आज कृष्णचतुर्दशीस राक्षस तुझे भक्षन करील. व दर कृष्णपक्षातील चतुर्दशीस तू हेच अपराधाचे फल भोग २५,२६. त्यावेळी मी रोदन करून पित्यास ह्मणाले, हे सदाचरणी पित्या, माझी या शापापासून मुक्ति कधी होईल ? ते मला सांग २७. त्यावर तो ह्मणाला " हे कुमारि, ज्यावेळी तूं वीराकडून भोगिली जाशील तेव्हा तुझ्या शापाची मुक्ति होईल. " असो. अशी ही मी तुजकडून मुक्त झाले आहें २८. हे राजा, तुझ्या आज्ञेने मी पित्याच्या मंदिरी जाईन. " हे ऐकून राजा ह्मणाला " माझ्या गृहीं चल २९. मी तुझ्यासह त्या विद्याधराच्या गृहीं जाईन. " त्यावर " बरं आहे " असें ह्मणून ती देवी राजाच्या गृही गेली ३०. त्यावेळी त्या नगरात लोकांनीं मोठा उत्सव केला. पण त्या अलौकिक पत्नीनें युक्त अशा राजास पाहून मंत्री तात्काल मरण पावला. पण याचे कारण काय ते मला सांग. राजा ह्मणतो --तो बुद्धिप्रकाशनामक मंत्री देवी आली आहे असें पाहून राजाविषयी मनात विचार करिता झाला व राजाच्या नाशाच्या भयाने व्याकुळ झालेला तो प्रधान प्राणत्याग करून स्वर्गलोकीं गेला. त्याचे शुभ कारण ऐक ३१-३३. जो राजा विषयी होतो त्याचें राज्य नष्ट होतें. कारण, स्त्रीमदाप्रत प्राप्त होऊन तो राज्याची सर्वदा हानि करितो ३४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥

सूत ह्मणतात - पुढे तो वेताल हसून राजास असें ह्मणाला -- वा राजा, रम्य चूडापुरामध्ये

स्मृतः १ देवस्वामी गुरुस्तस्य वेदवेदाङ्गपारगः । तस्य पत्नी विशालाक्षी पतिधर्मपरायणा २ शिवमाराधयामास पुत्रार्थे वरवर्णिनी । रुद्रस्य वरदानेन कामदेवसम सुतः ३ हरिस्वामीति विख्यातो जातो देवांशवान्बली । सर्वसंपत्समायुक्तो देवतुल्यसुखी क्षितौ ४ रूपलावण्यता नाम्ना तत्पत्नी हि सुराङ्गना । जाता देवलयोपेन तस्य नन्दनतो नृप ५ एकदा पतिना सार्द्धं वसन्ते कुसुमाकरे । हर्म्ये सुष्वाप सभीत्या शय्यामध्यास्य सुन्दरी ६ सुकलो नाम गन्धर्वस्तस्या रूपेण मोहितः । तां जहार विमाने स्वे समारोप्य स्वपुरं ययौ ७ प्रबुद्धः स तु तां नारीं मृगयामास विह्वलः । न लब्ध्वा व्याकुलो भूत्वा देशं त्यक्त्वा वनं गतः ८ सन्यस्ता विषयान्सर्वान्हरिध्यानपरायणः । कदाचित्सोऽपि स स्नेही विप्रगेहमुपागतः ९ भिक्षामादाय स यतिर्वटवृक्षमुपाश्रितः । वृक्षोपरि निधायाशु नदीस्नानमथाकरोत् १० भोजनं च ततो राजन्सर्पेण गरलीकृतम् । ततो यतिः समायातो भुक्त्वा मदमुपायौ ११ विषेण पीडिततनुर्दृष्ट्वा ब्राह्मणमब्रवीत् । त्वया द्विजेन मूर्खेण पायस विषमिश्रितम् १२ मरणं यामि भो दुष्ट ब्रह्महत्यामवाप्स्यसि । इत्युक्त्वा मरणं प्राप्य शिवलोकमुपायौ १३ रूपतेजोयुतां देवीं गृहीत्वा सुखमाप्तवान् । इत्युक्त्वा स तु वैतालो राजानमिदमब्रवीत् १४ कस्मै पापा ब्रह्महत्या तेषां मध्ये वदस्व मे । राजोवाच ॥ स्वाभाविकविषा नागा ह्यज्ञानेन विषं कृतम् १५ अतो दोषी हि भुजगो ब्रह्महत्यां न चाप्तवान् । बुभुक्षितं ददौ भिक्षां स द्विजो दैवमोहितः १६ ब्रह्महत्यावतो नाथाःकुग्रधर्मपरा-

---

चुडामणि म्हणून एक राजा होता. त्याचा वेद व वेदांगें यामध्ये पारगत असा देवस्वामी म्हणून गुरु असे. विशालाक्षी म्हणून त्याची पत्नी होती. ती पतिधर्मामध्ये तत्पर अशी १, २. ती श्रेष्ठ स्त्री पुत्राकरिता शिवाची आराधना करिती झाली. तेव्हा रुद्राच्या वरदानामुळे कामदेवासारखा सुंदर, बलवान् व देवांच्या अंशानी युक्त असा हरिस्वामी म्हणून त्यास पुत्र झाला. साराश, सर्व संपत्तींनी युक्त असा तो राजपुत्र भूलोकी देवासारिखा सुखी झाला ३,४. हे राजा, देवकन्यासारिखी रूपलावण्यता या नावाने त्याची पत्नी झाली ५. एकदा वसन्तऋतु ती सुंदर स्त्री पुष्पयुक्त अशा मंदिराच्या माडीवर शय्या घालून आपल्या पतीसह मोठ्या प्रीतीने निजली होती ६. सुकलनामक एक गंधर्व तिच्या रूपाने मोहित होत्साता तिचे हरण करिता झाला. व तिला आपल्या विमानात बसवून त्याने आपल्या नगरात नेले ७. पुढे जागा झाल्यावर तो आपल्या स्त्रीस व्याकुल होऊन शोधू लागला, पण त्याला ती सापडली नाही. त्यामुळे व्याकुल होऊन तो देश सोडून वनात गेला ८ व सर्व विषयांचा त्याग करून तो हरीच्या ध्यानामध्ये तत्पर झाला. कोणे एके समयी तो स्नेही ब्राह्मणाच्या गृही गेला ९ व त्याच्या घरातून भिक्षा घेऊन तो एका वटवृक्षाचा आश्रय करून राहिला. भिक्षा वृक्षावर ठेवून त्याने लागलेच नदीचें स्नान केलें १०. इतक्यात, हे राजा, सर्पाने त्या भोजनात विष घालून ते विषयुक्त केले. नंतर तो यति आला व भोजन केल्यामुळे मदयुक्त झाला ११. तेव्हा ज्याचे शरीर विषाने पीडित झाले आहे असा तो ब्राह्मणास पाहून म्हणाला " तूं मूर्ख द्विजाने विषमिश्रित पायस मला दिलेस. अरे दुष्टा, मी मरण पावत आहें. तुला ब्रह्महत्या लागेल. " असें बोलून व मरण पावून तो शिवलोकी गेला १२, १३ आणि रूपतेजोयुक्त देवीस घेऊन सुख भोगता झाला. असे सांगून तो वेताल राजास म्हणाला १४ " ब्रह्महत्या त्यांच्यापैकी कोणास लागली ते मला सांग. " राजा म्हणतो.— नाग स्वभावतःच विषयुक्त असतो. त्याने अज्ञानाने अन्न विषयुक्त केलें. यास्तव, तो केवल दोषी होय. त्याला ब्रह्महत्या प्राप्त झाली नाही. दैवामुळे मोहित

पणः । आत्मना च कृतं पापं भोक्तव्यं सर्वदा जनैः १७ आत्मत्यागो ब्रह्महत्या चातिथेश्चावमानम् । ब्रह्महत्या तदा तुल्या विधिनैव सा तथा १८ आत्मत्यागः स्मृता दैवान्नमान्सोऽपि न पापवान् । यैर्नरैः कथिता वार्ता ब्रह्महत्या त्वया कृता १९ तेषां ब्राह्मणहत्या सा न्यायभ्रष्टमतां नृणाम् २० [८२३] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

सूत उवाच ॥ कृतकृत्यः प्रसन्नात्मा वेतालो नृपमब्रवीत् । नगरे चन्द्रहृदये रणधीरो नृपोऽभवत् १ तत्र वैश्योऽमलद्धर्मी नाम्ना धर्मध्वजो धनी । तस्य पुत्री समाजाता सुन्दरी सुखभाविनी २ एकदा नगरं तस्मिन्यातुभक्तो नरोऽभवत् । द्यूतविद्यापरा नित्यं मद्यमांसपरायण ३ आशरो नाम तत्रासीद्राक्षसः पुरुषादनः । तस्मै मद्यं च मांसं च प्रत्यहं स च दत्तवान् ४ प्रसन्नो राक्षसो भूत्वा यातुभक्तमथाब्रवीत् । वरं वरय यद्योग्यं मत्तः सर्वमवाप्स्यसि ५ स होवाच वरं मह्यं देयस्त्वं पुरुषादक । गुहागर्तं च भूमध्ये कुरु चौरनिरूपणम् ६ इति श्रुत्वाऽकरोद्गर्तं नरबुद्धिविमोहनम् । स्वयं तत्र स्थितो देवः स्वभक्तेन समन्वितः ७ तेन रात्रौ तु चौरेण नृपदासी वराङ्गना । हृता सम्भावितां गर्ते बहु द्रव्यं तथा हृतम् ८ सप्त पत्न्योऽभवंस्तस्य चतुर्वर्णस्य योषितः । तासां मध्ये नृपदासी तस्य चौरस्य वल्लभा ९ नृपदुर्गसमो गेहो रचितस्तेन रक्षसा । भूमेर्गुणरूपश्च नरबुद्धिविमोहनः १० चोरितं

झालेला असा तो ब्राह्मण बुभुक्षितास भिक्षा देता झाला. यास्तव, कुटधर्मामध्ये परायण असल्यामुळे त्या ब्राह्मणास ब्रह्महत्या लागली नाही. सर्वदा प्राण्यास आपले केलेले पाप भोगावयाचे असते १५-१७. आत्मत्याग, ब्राह्मणाची हिंसा व अतिथीचा अवमान यास ब्रह्महत्या असे ह्मणावे व विधि घातल्यानें ब्रह्महत्या होते. पण प्रस्तुत यतीचा आत्मत्याग दैवयोगाने घडला होता. यास्तव, तोही पापी नव्हे. पण ज्या पुरुषानीं " तू ब्रह्महत्या केलीस " असे त्यास झटले त्या न्यायापासून भ्रष्ट झालेल्या पुरुषास ती ब्रह्महत्या लागली १८-२०. ह्याप्रमाणे श्रीमविष्यमहापुराणातील चतुर्युगखण्डनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥

सूत ह्मणतात —जो कृतकृत्य झाला आहे व ज्याचा आत्मा प्रसन्न झाला आहे असा तो वेताल राजास ह्मणाला—" चन्द्रहृदयनामक नगरामध्ये रणधीर राजा रहात होता १. तेथे धर्मध्वजनामक एक धार्मिक व श्रीमान् वैश्य रहात असे. त्यास एक सुंदर कन्या झाली. तिचे नाव सुखभाविनी असें होतें २. एकदा त्या नगरामध्यें यातुभक्त ह्मणून एक द्यूतविद्येमध्ये निष्णात व सदा मद्यमांस सेवन करणारा मनुष्य निर्माण झाला. तेथे एक आशर ह्मणून मनुष्यें खाणारा राक्षस असे. त्याला हा यातुभक्त रोज मद्यमांस देत असे ३, ४. त्यामुळे तो राक्षस प्रसन्न होऊन यातुभक्तास ह्मणाला "जो योग्य वाटत असेल तो वर तूं माग. तुला सर्व काहीं मजपासून प्राप्त होईल " ५. तेव्हा तो ह्मणाला " हे पुरुषभक्षका, तूं मला हा वर दे. चोरास योग्य अशी एक भूमीमध्ये गुहा करून माझ्या स्वाधीन कर " ६. हे ऐकून मनुष्याच्या बुद्धीस मोहित करणारी अशी एक गुहा त्याने केली. व तो देव आपल्या भक्तासह तेथे राहिला ७. त्या चोरानें रात्रीं एक अतिसुंदर राजदासी हरण करून आणिली व तिला त्या गुहेंत ठेविलें. त्याने पुष्कळ द्रव्य हरण करून आणिलें ८. चारी वर्णाच्या स्त्रिया मिळून त्याच्या सात पत्नी होत्या. त्यातील राजाची दासी त्या चोरास फार प्रिय असे ९. राजाच्या किल्ल्याप्रमाणे त्या राक्षसानें तें गृह रचिले आहे. भूमीच्या तळीं गुप्त रूप व मनुष्याच्या बुद्धीस मोह पाडणारें असें ते असे १०. त्या चोरानें पुष्कळ

बहुधा द्रव्यं गतें संस्थापितं बलात् । तदा ते व्याकुला राजज्ञना राजानमब्रुवन् ११ त्यजास्मान् नगरीं भूप चौरविघ्नकरीं तव । इति श्रुत्वा स भूपालो रक्षिणः शस्त्रयुतान् १२ स्थापयित्वा तन्नगरे तस्मिंश्चौरहिंसापरायणान् । आज्ञाप्य स ययौ गेहं तैस्तु श्रुत्वा तथा कृतम् १३ राक्षस्या मायया सर्वे मोहिता रक्षिणस्तदा । चौरेण बहुधा द्रव्यं हृतं च धनिनां बलात् १४ पुनस्ते प्रपयुर्भूपं रणधीरं समीरयन् । श्रुत्वा तु विस्मितो राजा स्वयं नगरमागतः १५ अर्धरात्रे तमोभूते स चौरो नृपमागतम् । ज्ञात्वाऽब्रवीच्च राजानं कां भवानत्र चागवान् १६ नृपाऽब्रवीदहं चौरान्वेषणार्थः समागतः । यास्यामि धनिनां गेहं भवान्मे वचनं कुरु १७ मया सार्द्धं च बहुधा द्रव्यं हर सुखी भव । तथा मत्वा तु बहुधा चौरेण धनमाहृतम् १८ गर्तमध्ये गतो रात्रौ स्थापयित्वा नृपं बहिः । एतस्मिन्नेव तत्पत्नी नृपदासी वराङ्गना १९ भूपतिं प्राह भो राजन्मच्छ शीघ्रं स्वकं गृहम् । चौरोऽसौ हि त्वदर्थे च मृत्युं कुर्वन्गृहं गतः २० इत्युक्त्वा सा तु भूपाय मार्गमदर्शयत् । नृपोऽपि स्वगृहं प्राप्य प्रभाते विमले स्त्रौ २१ आययौ सेनया सार्द्धं यत्र चौरः स्वयं स्थितः । चौरोऽपि भयमासाद्य वाशरं नाम राक्षसम् २२ संपूज्य वर्णयामास यथा जातं तथाविधि । विघ्नस्याह च रक्षस्त्वया मे भोजनं कृतम् २३ अद्य भक्ष्याम्यहं सर्वान्मानुषान्देवरादिकान् । इत्युक्त्वा स ययौ घोरो राक्षसो नृपतिं प्रति २४ चखाद बहुलां सेनां तेऽपि याता दिशो दश । आक्रान्त स च भूपालो रक्षसा विकलीकृतः २५ तदा चौर स्वयं प्राप्य भूपतिं प्राह

द्रव्य बलात्काराने चोरून त्या गुहेमध्यें साठविले. तेव्हा, हे राजा, ते व्याकुळ झालेले लोक राजास ह्मणाले ११ " हे राजा, ज्याच्यामध्ये चोरापासून संकट येत असे हे तुझे नगर आह्मी सोडतों. " हें ऐकून त्या राजानें त्या नगरामध्यें चोराची हिंसा करण्यामध्यें परायण असे शस्त्रयुक्त रक्षक ठेविले व त्यास योग्य आज्ञा करून राजा आपल्या गृहीं गेला. तेव्हा त्यानें तसें केल आहे हे ऐकून १२, १३ राक्षसाच्या मायेनें सर्व रक्षक मोहित झाले. नतर श्रीमान् पुरुषाचें बहुत धन चोरानें बलात्काराने नेलें. तेव्हा पुनरपि ते रणधीर राजाकडे ओरडत आले. त्याचें ह्मणणें ऐकून राजा आश्चर्ययुक्त झाला व स्वतः नगरात आला १४,१५. अंधाऱ्या अर्धरात्रीं राजा आला आहे अस जाणून तो चोर राजास ह्मणाला " आपण येथें कोण आला आहा ?" १६, त्यावर राजा ह्मणाला " मी चोर आहे व द्रव्य चोरण्याकरिता आलों आहे. मी आता श्रीमंतान्या गृहीं जाईन. तुह्मी माझें वचन ऐका. माझ्यासह बहुत द्रव्य हरण करून तुह्मीही सुखी व्हा. " तेव्हा "घरें आहे" असें मानून चोरानें पुष्कळ धन हरण केलें १७,१८ व राजास बाहेर उभे करून तो रात्रौ गुहेमध्यें गेला. इतक्यात त्याची श्रेष्ठ स्त्री नृपदासी राजास ह्मणाली " बा राजा, तूं त्वरित आपल्या गृहीं जा. कारण, हा चोर तुजला मारण्याकरिता गृहीं गेला आहे" १९,२०. असें बोलून ती राजास गुप्त मार्ग दाखविती झाली व त्या मार्गानें राजा आपल्या गृहीं आला. पुढे दुसऱ्या दिवशी सकाळीं सूर्योदय झाला असतां जेथें स्वतः चोर राहिला होता तेथें राजा सैन्यासह आला. तेव्हा चोरासही भय वाटून त्यानें वाशरनामक राक्षसाची पूजा करून त्यास त्या वेळेपर्यंत झालेलें सर्व वर्तमान सांगितलें. तेव्हां राक्षस त्यास हंसून ह्मणाला ' तूं माझें भोजन केलेस. दैवानें ज्यास प्रेरणा केली आहे अशा त्या सर्व मनुष्यास मी आज भक्षण करीन. ' असें बोलून तो घोर राक्षस राजाकडे आला २१-२४. व त्यानें पुष्कळ सैन्यास भक्षण केलें. तेव्हा तें दाही दिशास पळून गेलें. ह्याप्रमाणे त्यानें त्या राजाचा पराभव केला असता तो व्याकुळ झाला २५. तेव्हा चोर स्वतः येऊन राजास क्रोधानें ह्मणाला ' धार्मिक राजास पलायन करणें उचित नव्हे. ' हें ऐकताच राजा

रोदतः । पलायनं न मूपस्य योग्यं धर्मजनस्य वै २६ इति श्रुत्वा नृपश्चैव तूर्णमागत्य तत्र ह । ध्यात्वा देवीं महाकालीं लब्ध्वा मन्त्रं महोत्तमम् २७ रक्षसा सह तद्गर्त भस्मसादभवत्क्षणात् । निगडैस्तं बबन्धाशु चौरं नगरलुण्ठकम् २८ तथा सर्वधनान्येव स्त्रीभिस्ताभिः समाययौ । राज्यस्थानं समासाद्य दुर्गतिस्तस्य चाभवत् २९ पटहाताडितेनैव शब्देन च गृहे गृहे । ज्ञापितं कारणं सर्वं तच्चौरस्य वधस्य तैः ३० तद्दिने नगरे तस्मिन्भ्रामितो गर्दभोपरि । धर्मध्वजगृहद्वारे स चौरो हि समागतः ३१ तस्य रूपं समालोक्य मुमोह सुखभाविनी । पितरं प्राह दुःखार्ता चौर मोचय सत्वरम् ३२ स गत्वा नृपतिं प्राह पञ्चलक्षधनं मम । गृह्यतां चौर मोक्षार्थे म्रियते न हि मे सुता ३३ विहस्याह नृपस्तं वै चौरोऽयं धनलुण्ठकः । कर्हिचिन्न मया त्याज्यो भुवि वै पुरुषाधमः ३४ इति श्रुत्वा निराशोऽभूत्स चौरो मरणं गतः । शूल्यारोपणकाले तु प्राक्पहस्य ततोऽरुदत् ३५ एतस्मिन्नेव तत्पुत्री देवमायाविमोहिता । गृहीत्वा चौरदेहं तु वह्निकुण्डे तु साऽगमत् ३६ तदा प्रसन्ना सा दुर्गा तावुज्जीव्य प्रसादतः । तस्यै दत्तं वरं दिव्यं भुक्तिमुक्तिफलप्रदम् ३७ इत्युक्त्वा स तु भूपाल पुनः प्राह विहस्य तम् ॥ किं कारणेन चौरोऽसौ प्राक्पहस्य ततोऽरुदत् ३८ राजोवाच ॥ मदर्थे सुन्दरी नारी स्वप्राणान्दातुमुद्यता । तस्यै किं च प्रदातव्यं मया तत्स्नेहरूपिणा ३९ अतो रोदितवान्पश्चाद्धसने कारणं शृणु । धन्योऽयं भगवान्कृष्णो यस्य लीलेयमीदृशी ४० अधर्मिणे च नारकस्य फलं दातुं समर्हसि । धर्मिणे स्वर्गरूपं तु फलं तस्मै नमो नमः ४१ अतः स हसितः पूर्वं मोहिता हरिलीलया । इति श्रुत्वाह

लागलाच तेथें स्थिर झाला व त्यान महाकाली देवीचें ध्यान करून उत्तम मंत्रसिद्धि केली. त्याबरोबर राक्षसासह ती गुहा एका क्षणात जळून भस्म होऊन गेली. नतर नगर लुटणाऱ्या त्या चोरास राजाने बेडी ठोकून कैदी केले २६-२८ व सर्व द्रव्य आणि त्या स्त्रिया यासह तो परत आला. राज्यस्थानीं पोचल्यावर त्या चोराची फार दुर्दशा झाली. ढोल वाजवून घरोघर दवडी पिटविली व त्या चोराच्या वधाचे कारण सर्व जनास कळविले २९,३०. त्या दिवशीं त्या नगरात त्याला गाढवावर बसवून फिरविलें. नतर तो चोर धर्मध्वजाच्या दारापुढें आला असता त्याचे स्वरूप पाहून सुखभाविनी मोहित झाली व दुःखानें आर्त होत्साती ती आपल्या पित्यास ह्मणाली " या चोरास सत्वर सोडीव"३१,३२. तो राजाजवळ जाऊन ह्मणाला " माझें पाच लक्ष धन घे व चोरास सोड; ह्मणजे त्यामुळे माझी कन्या मरणार नाहीं"३३. त्यावर राजा हंसून ह्मणाला "पुरुषांतील नीच अशा या धन लुटणाऱ्या चोरास भूमीवर सोडणे मला मुळीच उचित नाहीं" ३४. हें ऐकून तो वैश्य निराश झाला व चोर मरणस्थानीं गेला. पण शूलावर चढवितांना तो प्रथम हंसला व नंतर रडला ३५. इतक्यात त्या वैश्याची कन्या देवाच्या मायेनें मोहित होत्साती चोराचा देह घेऊन अग्निकुंडात प्रवेश करिती झाली. तेव्हा प्रसन्न झालेली दुर्गा त्या उभयतांस जीवित करून त्या कन्येस भोगमुक्तिरूप फल देणारा दिव्य वर देती झाली " ३६,३७. असें बोलून तो वेताल हंसून राजास ह्मणाला " हा चोर प्रथम हंसून मागून जो रडला त्याचें काय कारण ? " राजा ह्मणतोः—माझ्याकरिता ही सुदर स्त्री प्राण देण्यास तयार झाली आहे. तिच्या स्नेहरूपी अशा मी तिला काय द्यावे ? ३८,३९, असें मनात आल्यामुळे तो रडला. आता हसण्याचे कारण काय तें ऐक. ज्याची ही अशी लीला आहे तो भगवान् कृष्ण धन्य आहे ४०. तो अधर्मी पुरुषास नरकरूपी फल देण्यास व धार्मिकास स्वर्गरूप फल देण्यास समर्थ आहे. त्यास नमस्कार असो ४१. याप्रमाणें तो हरिलीलेनें मोहित झाल्यामुळें हंसला. हें ऐकून वैताल ह्मणाला " शूलावर

वैतालो हरेः शरणमुत्तमम् ४२ वाक्य तेन कृत शूल्य मतो जीवितवाञ्छुचिः ४३ [८६६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

सूत उवाच ॥ भृगुवर्य महाभाग वैतालो नृपमब्रवीत् । राजन्पुष्पावती रम्या नगरी तत्र भूपतिः १ सुविचार इति ख्यातः प्रजापालनतत्परः । चन्द्रप्रभा तस्य पत्नी रूपयौवनशालिनी २ तस्यां जाता सुता देवी नाम्ना चन्द्रावली मता । कदाचित्स्वालिभिः सार्द्धं विपिनं कुसुमाकरम् ३ आययौ तत्र वै विप्रं सुदेवं सा ददर्श ह । मोहिता चाभवद्देवी विप्रोऽपि पतितः क्षितौ ४ कामबाणव्यथां प्राप्य गतप्राण इवाभवत् । तस्यां गतायां सदने द्वौ विप्रौ तत्र चागतौ ५ मूलदेवः शशी नाम्ना तत्र विद्याविशारदौ । तथागतं द्विजं दृष्ट्वा रूपयौवनशालिनम् ६ पप्रच्छ कारणं सर्वं चैन मोहं त्वमागतः । स श्रुत्वा रोदनं कृत्वा सर्वं तस्मै न्यवेदयत् ७ कृपालुर्मूलदेवस्तु तं स्वगेहमवासयत् । गृहे जप्त्वा महामन्त्रं चामुण्डाबीजसंयुतम् ८ कृतवान्गुटिके चोभे सुदेवाय समार्पयत् । एकया सुन्दरी कन्या द्वादशाब्दमयी शुभा ९ द्वितीयया महावृद्धो मूलदेवस्तदाऽभवत् । द्वौ गतौ राजसदनं नृपमाशीर्भिरर्च्य तम् १० हेतुं निवेदयामासुस्तच्छ्रुत्वा महामतं । नगरे तान्त्रिके राजन्मद्गेहं सुन्दरोपमम् ११ विलापध्वजनाम्ना वै राज्ञा सलुठितं बलात् । पलायितौ सुतः पत्नी तावन्वेष्टुं समाययौ १२ इयं वधूर्महाराज मम तत्पुत्रभाविनी । यावदहं न गच्छामि स्वगेहे रक्ष धर्मतः १३ इति श्रुत्वा स नृपतिश्चाहूय स्वसुतां तथा ।

चढल्यावर त्यानें हरीच्या लीलाविषयक असे उत्तम वाक्य उच्चारिलें व त्यामुळें तो पवित्र होऊन जीवित झाला" ४२,४३. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयातील तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥

सूत ह्मणतात —हे महाभाग्यवान् भृगुवर्या, वेताल राजास ह्मणाला " राजा, पुष्पावती ह्मणून एक रमणीय नगरी होती. त्यात सुविचार या नावाने प्रसिद्ध असा एक राजा असे. तो प्रजापालनामध्ये तत्पर होता. रूप व यौवन यानीं संपन्न अशी चद्रप्रभा ह्मणून त्याची स्त्री होती. तिच्या उदरीं एक कन्या झाली. ती नावाने चद्रावली ह्मणून प्रसिद्ध होती. एकदा ती आपल्या सख्यांसह पुष्पानीं भरलेल्या वनामध्ये गेली असता तेथें सुदेवनामक ब्राह्मणास पाहती झाली. त्यास पहाताच ती देवी मोहित झाली व तो विप्रही भूमीवर पडला १-४. कामाच्या बाणानें व्यथित होऊन तो जणु काय गतप्राण झाला ! ती घरी गेली असता तेथें दोन ब्राह्मण आले. त्यातील एकाचे नाव मूलदेव व दुसऱ्याचे शशी असे होतें. ते दोघेही विद्येमध्यें विशारद होत. रूप व यौवन यानीं युक्त अशा त्या द्विजाची अशी अवस्था पाहून ५,६ ते " तुला असा मोह का झाला ? " असें त्यास कारण विचारिते झाले. तेव्हा ते ऐकून व रोदन करून त्याने सर्व त्यास निवेदन केले. तेव्हा कृपाळु मूलदेवाने त्यास आपल्या गृही नेलें व गृहामध्यें चामुंडाबीजयुक्त महामंत्राचा जप करून त्याने दोन गुटिका तयार केल्या व सुदेवास दिल्या. एका गोळीच्या योगाने तो बारा वर्षाची शुभ कन्या झाला व दुसऱ्या गोळीच्या योगानें मूलदेव अतिवृद्ध झाला. नंतर ते दोघेही राजाच्या मंदिरीं गेले व राजास आशीर्वादाच्या योगानें सन्मान देऊन ७-१० येण्याचा आपला हेतु सागते झाल; तो, हे महामते, तूं ऐक. " हे राजा, तात्रिक नगरामध्यें माझें सुंदर गृह आहे ११. पण विलापध्वजनामक राजानें ते बलात्काराने लुटिले. त्यावेळीं माझा पुत्र व पत्नी कोठें पळून गेलीं. त्यास शोधण्याकरिता आम्ही आलो आहों १२. हे महाराजा,

तस्यै समर्प्य तां पश्चात्स द्विजो गेहमाययौ १४ सुदेवस्तु निशीथे वै रमणीं प्राह निर्भयः । कुतस्ते मन उद्विग्नं सत्यं कथय मे सखि १५ साह मे हृदये नित्यं सुदेवो ब्राह्मणोत्तमः । उचितस्तद्वियोगेन व्याकुलाऽहं सदा सखे १६ सुदेवश्चाह भोः सुभ्रु यदि ते ब्राह्मणोत्तमम् । समर्पयामि तत्त्वं मे किं ददासि वदस्व भोः १७ साह तं सर्वदा दासी भवामि द्विज भामिनि । इति श्रुत्वा सुदेवस्तु मुखान्निष्कृष्य यन्त्रकम् १८ पूर्वदेहात्समापन्नस्तया सार्द्धं तदाऽरमत् । चतुर्मास्याभवद्गर्भस्तस्मिन्काले तु भो नृप १९ अमात्यतनयो विप्रं स्त्रीरूपं प्रति मोहितः । तदा मरणसंपन्नं ज्ञात्वा तं मदनालसम् २० मन्त्री स्नेहाच्च बहुधा सञ्चिन्त्य हृदि पण्डितैः । तस्मै समर्पयामास तां मारीं मन्त्रसभवाम् २१ साह भोऽमात्यतनय त्रिमासं तीर्थमण्डले । संस्नाहि तर्हि मे योग्यो भविष्यसि तथा कुरु २२ तथा मत्वा मन्त्रिसुतो नम्रात्मा मदनालसः । तीर्थान्तरं गतः सोऽपि सुदेवस्तस्य योषितम् २३ भूरुकान्तिं कामवशां चालिलिङ्ग स कामकः । सा तु गर्भं दधाराशु द्विमासस्य द्विजेन वै २४ सुदेवो मानुषो भूत्वा मूलदेवगृहं ययौ । सर्वं निवेदयामास यथा जातं नृपगृहे २५ मूलदेवः प्रसन्नात्मा शशिनं नाम मित्रकम् । विंशद्वर्षतरं कृत्वा स्वयं वृद्धरूपधान् २६ गत्वा निवेद्य तत्सर्वं वधूं मे देहि भूपते । तदा तु स नृपो भीत्या तं प्राह श्लक्ष्णया गिरा २७ मन्त्री राजकरो नाम तत्पुत्रो मदनालसः । दृष्ट्वैव तव वधूं रम्यां मुमोह मरणोन्मुखः २८ स्वपुत्रस्य वियोगेन स मन्त्री च तथेदृशः । तथाऽहं ब्राह्मणान्वृद्धान्पृष्ट्वा तस्मै च तां ददौ २९ यथा प्रसन्नो हि भवान्कुरु त्वं च तथाविधम् । मूलदेवस्तु

ही कन्या माझ्या त्या पुत्राची भाविनी स्त्री होय. यास्तव, मी गृहीं जाईपर्यंत तूं हिचे धर्मतः रक्षण कर" १३. हें ऐकून राजाने आपल्या कन्येस बोलावून तिला तिन्या स्वाधीन केल्यावर तो ब्राह्मण घरीं गेला १४. इकडे सुदेव रात्रीं निर्भयपणें त्या रमणीस ह्मणाला 'हे सखि, तुझें मन असें उद्विग्न का झालें आहे तें मला खरें सांग' १५. त्यावर ती ह्मणाली 'माझ्या हृदयामध्यें सतत उत्तम ब्राह्मण सुदेव रहात आहे. व त्याच्या वियोगानें मी सर्वदा व्याकुळ होत असतें' १६. त्यावर सुदेव ह्मणाला 'हे सुंदरि, मी जर तुला उत्तम ब्राह्मण सुदेव दिला तर तूं मला काय देशील ते सांग' १७. त्यावर ती ह्मणाली 'हे ब्राह्मणकन्ये, मी सदा तुझी दासी होऊन राहीन'. हे एकताच सुदेवाने तोंडातून यंत्र काढलें १८. त्यावरोवर त्यास पूर्वदेहाची प्राप्ति झाली व तो तिन्याशीं रममाण झाला. हे राजा, कांहीं दिवसानीं ती गरोदर झाली १९. इकडे अमात्याचा पुत्र त्या स्त्रीरूपी ब्राह्मणावर मोहित झाला. व तो मदनालस मरावया सटेकला आहे असे जाणून २०. पंडितानी मंत्र्याचेवरील प्रेमामुळे मनात अनेक प्रकारें विचार करून ती स्त्री त्या मंत्रिपुत्रास मंत्रद्वारा अर्पण केली. तेव्हा ती ह्मणाली 'वा अमात्यपुत्रा, तीन महिने तीर्थमंडलामध्यें स्नान कर ह्मणजे मग तू माझ्या योग्य होशील.' तेव्हा 'ठीक आहे' असें ह्मणून तो नम्रस्वभावाचा मदनालसनामक मंत्रिपुत्र तीर्थांतरीं गेला. तेव्हा तो कामुक सुदेवही कामवश झालेल्या त्याच्या भूपकांतिनामक स्त्रीस आलिंगन देता झाला. नंतर तीही त्या ब्राह्मणाच्या द्वारा दोन महिन्याचा गर्भ धारण करिती झाली २१-२४. तेव्हा सुदेव पुरुष होऊन मूलदेवाच्या गृहीं आला व राजाच्या गृहीं झालेला सर्व वृत्तांत त्यानें मूलदेवास सांगितला २५. तेव्हा तो ऐकून ज्याचा आत्मा प्रसन्न झाला आहे असा तो मूलदेव शशीनामक आपल्या मित्रास वीस वर्षांचा करून स्वत वृद्धरूप पुरुष झाला २६ व राजास सर्व वर्तमान सांगून 'वा राजा, माझी वधू मला दे.' असें ह्मणाला. तेव्हा तो राजा भीतीनें मधुर वाणीनें ह्मणाला 'राजकर ह्मणून माझा मंत्री आहे व त्याचा पुत्र मदनालस ह्मणून आहे. तो तुमच्या रम्य कन्येस पाहून मोहित झाला व मरणान्मुख

नृपतिं प्रोवाच विषमुद्वमन् ३० देहि भूप सुतां मह्यं तत्पुत्रस्य सुखाय वै । तथैव माता स नृप सुतां चन्द्रावलीं शुभाम् ३१ दत्त्वा च वेदविधिना बहुधा द्रव्यसंयुताम् । स्वयं चकार राज्यं वै ब्रह्मदोषविवर्जितः ३२ शशी तु भूपतः कन्यां गृहात्वा स्वगृहं ययौ । सुदेवस्तु तदा दुःखी मूलदेवमुवाच ह ३३ मदीयेयं नृपसुता भोगपत्नी महोत्तमा । तच्छ्रुत्वा मूलदेवस्तु विस्मितः स तथाऽकरोत् ३४ इत्युक्त्वा नृपतिं प्राह वैतालो रुद्रकिङ्करः । कस्मै माता नृपसुता धर्मतस्तद्वदस्व मे ३५ राजोवाच ॥ पितृमात्राज्ञया पुत्री दत्तानां संमुखे स्थिता । यस्मै निवेदिता तस्मै सा योग्या धर्मतः सदा ३६ शास्त्रेषु कथितं देव स्त्रीरत्नं सर्वदैव हि । यथा क्षेत्रं भुवि ख्यातं बीजमन्येन रोपितम् ३७ तत्क्षेत्रं कृषिकारस्य बीजदत्तस्य नैव ह । तस्माद्वै राजतनया शशिनं वरयिष्यति ३८ सुदेवस्यैव तनयो योग्यत्वं हि गमिष्यति । इति ते कथितं देव यथाशास्त्रेषु भाषितम् ३९ किं कृतं मन्त्रिपुत्रेण तथैव कथयस्व मे । इति श्रुत्वा स होवाच सपुत्रो मदनालस ४० वृन्दावनं शुभं प्राप्य राधाकुण्डं समागतः । स स्नात्वा बहुलाष्टम्यां तत्पुण्येन नृपोत्तम ४१ भस्मसादभवत्पापं येन मोहश्चमागतः । स्मृत्वा स हृदि गोविन्दं तुष्टाव श्लक्ष्णया गिरा ४२ मदनालस उवाच ॥ नमस्ते दयासिन्धव कृष्णदेव त्वयेदं तत विश्वमम्भोधिरूपम् । त्वयैकेन लीलार्थतो देव देवप्रियाराधया सार्द्धमेतद्धि गुप्तम् ४३ जगत्यन्तकाले त्वया कालमूर्त्या जगत्संहृतं वै नमस्ते नमस्ते । मदीया च बुद्धिर्हृषीकेश शुद्धा यथा स्यात्तथैवेश शीघ्रं कुरु त्वम् ४४

झाला. आपल्या पुत्राचा वियोग होणार ह्मणून ह्या मेल्याचीही तीच अवस्था झाली. तेव्हा मी वृद्ध ब्राह्मणास विचारून ती कन्या मंत्रिपुत्राम दिली २७–२९. आता आपण प्रसन्न व्हाल असें काहीं करा. तेव्हा मूलदेव, जणु काय विष ओकीत राजास ह्मणाला ३० 'हे राजा, या पुत्राच्या सुखाकरिता तूं मला आपली कन्या दे.' तेव्हा 'बरें आहे' असें ह्मणून राजानें आपली शुभ चंद्रावली कन्या अगणित द्रव्यासह वेदोक्त विधीनें त्यास दिली. व ब्राह्मणाच्या दोषांनें रहित होत्साता तो स्वतः राज्य करिता झाला ३१,३२. इकडे शशी राजाच्या कन्येस घेऊन आल्या गृहीं गेला. तेव्हा सुदेव अतिशय दुःखी झाला व मूलदेवास ह्मणाला " ही अत्युत्तम राजाची कन्या माझी भोगपत्नी आहे. " तें ऐकून विस्मययुक्त झालेला मूलदेव तसें करिता झाला. असो. असें बोलून रुद्राचा सेवक वेताल राजास ह्मणाला " राजाची कन्या धर्मतः कोणास प्राप्त झाली ते मला सांग " ३३–३५. राजा ह्मणतोः– पिता व माता यांच्या आज्ञेनें कन्या देवाच्या संमुख स्थित होते. यास्तव, त्यांनीं ज्यास अर्पण केलें त्याची ती धर्मतः योग्य पत्नी होय ३६. हे देवा, शास्त्रामध्यें सर्वदा स्त्रीरत्न क्षेत्राप्रमाणें सांगितलेलें आहे व एकाच्या शेतात दुसऱ्यानें जरी बीं पेरिले तरी तें शेत त्या धन्याचेंच असतें. बीं पेरणाराचें कधींही नसतें हें लोकात प्रसिद्ध आहे. ह्यास्तव, राजकन्या शशीस वरील ३७,३८. व तिला होणारा पुत्र सुदेवाचा होईल. ह्याप्रमाणे हे देवा, शास्त्रात जसें सांगितलें आहे तसें मीं तुला सांगितलें ३९. आता मंत्रिपुत्रानें काय केलें तें मला सांग. हें ऐकून तो ह्मणाला " तो मंत्रिपुत्र मदनालस शुभ वृंदावनास येऊन राधाकुंडावर प्राप्त झाला. व कृष्ण अष्टमीस त्यात स्नान करून, हे उत्तम राजा, त्याच्या पुण्याने, ज्याच्या योगानें त्यास मोह पडला होता ते पाप भस्म झाले व अंतःकरणात गोविंदाचें स्मरण करून त्यानें त्याची मधुर वाणीनें स्तुति केली ४०–४२. मदनालस ह्मणतो " –हे कृष्णदेवा, तुज दयासागरास नमस्कार असो. सागरासारिखें हें विश्व तू व्यापून सोडिलें आहेस. देवा, लीलेकरिता तूं एकटाच देवप्रिय राधिकेसह याचे रक्षण करीत असतोस ४३ व जगाच्या अंतकाळीं कालरूपी अशा तूं याचा संहार करितोस. तुला

इति स्तोत्रप्रभावेन देवदेवेन मोचिता । कामपाशात्तस्य बुद्धिः स क्षणी गृहमाययौ ४५ रमणीं स्वां समालिङ्ग्य नन्द मुदितो नृप । विप्रदोषविनाशाय हृदि संचिन्त्य बुद्धिमान् ४६ सुदेवं स समाहूय स्वां स्वसारं ददौ मुदा । सुदेवस्तस्य भगिनीं क्षत्रियस्य मदातुराम् ४७ धर्मेणोद्वाह्य स्वं गेहं वासवाङ्कामकिङ्करः । इति ते कथितं भूप चरित्रं तस्य धीमतः ४८ मूलदेवस्य विप्रस्य तथाऽन्यत्कथयाम्यहम् ४९ [९१५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

सूत उवाच ॥ प्रशस्य भूपतिं शुद्धं वैतालो रुद्रकिङ्करः । पुनरारुरुहे वृक्षं विप्र वर्णयामास सुन्दरम् १ कान्यकुब्जे महाराज ब्राह्मणो दानशीलकः । बभूव सत्यसन्धश्च देवीपूजनतत्परः २ प्रतिग्रहेण यद्द्रव्यं तेन दानमचीकरत् । कदाचिन्तु शरत्काले नवदुर्गाव्रतं ह्यभूत् ३ न प्राप्तं दानतो द्रव्यं तदा चिन्तातुरोऽभवत् । किं कर्तव्यं मया चाद्य येन द्रव्ययुतो ह्यहम् ४ कन्या निमन्त्रिताश्चाद्य कथं ता भोजयाम्यहम् । इति शोकसमायुक्तस्तदा देवीप्रसादतः ५ मुद्राः पञ्च तदा प्राप्तास्ताभिर्व्रतमचीकरत् । निराहारव्रतं तेन कृतं तु नवमाह्निकम् ६ तेन व्रतप्रभावेन मृतो देवत्वमागतः । जीमूतकेतुरिति च सोऽभूद्विद्याधराधिपः ७ हिमाचलगिरौ रम्ये पुरे विद्याधरे शुभे । उवास कतिचिद्वर्षाण्दिव्यभोगप्रभोगवान् ८ तत्र कल्पद्रुमं नित्यं पूजयामास भक्तितः । तेन वृक्षप्रभावेन जातः पुत्रो महोत्तमः ९ कलासर्वेषु निपुणो नाम्ना जीमूतवाहनः ।

नमस्कार असो; नमस्कार असो. हे ईश्वरा, हे हृषीकेशा, माझी बुद्धि शुद्ध होईल असेंच तूं त्वरित कर ४४. या स्तोत्राच्या प्रभावानें देवाधिदेवानें त्याच्या बुद्धीस कामपाशापासून मुक्त केले. नंतर तो क्षत्रिय घरीं आला व बुद्धि शुद्ध झाल्यामुळें अगोदरच संतुष्ट झालेला मदनालस आपल्या भार्येस आलिंगन देऊन अधिक प्रसन्न झाला. ब्राह्मणाच्या दोषाचा परिहार करण्याचे मनात आणून त्या बुद्धिमानानें सुदेवास बोलावून आणून आनंदानें आपली बहीण दिली. तेव्हा त्या क्षत्रियाच्या मदातुर भगिनीशीं धर्मतः विवाह करून तो कामाचा किंकर सुदेव आपल्या गृहीं परत आला. हे राजा,ह्याप्रमाणें मीं तुला त्या बुद्धिमान् मूलदेव ब्राह्मणाचें चरित्र सांगितलें. आता आणखीं दुसरेंही मी तुला सांगेन " ४५-४९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वाच्या कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

सूत ह्मणतातः—हे ब्राह्मणा, रुद्राचा सेवक वेताल त्या शुद्ध राजाची स्तुति करून पुनः सुंदर आख्यान सांगता झाला १. महाराजा, कान्यकुब्जदेशामध्यें दानशील, सत्यसंध व देवीच्या पूजनामध्यें तत्पर असा एक ब्राह्मण होता २. प्रतिग्रहानें जें द्रव्य मिळे त्याचें तो दान करीत असे. एकदा शरदृतूंत दुर्गेचें नवरात्रव्रत होते ३. पण त्यास दानाचें द्रव्य मिळालें नाहीं. तेव्हा तो चिंतातुर झाला. 'आता काय केलें असता मला द्रव्य मिळेल ? आज मीं कन्यास भोजनाकरितां बोलाविलें आहे. पण त्यास भोजन कसें घालूं ?' ह्याप्रमाणें तो शोकयुक्त झाला असतां देवीच्या प्रसादानें ४.५ त्यास पांच मुद्रा मिळाल्या. व त्याच्या योगानें त्याने व्रत केलें. नऊ दिवस त्यानें निराहारव्रत केलें ६. त्या व्रताच्या प्रभावानें तो मृत झाला व देवत्वाप्रत प्राप्त झाला. जीमूतकेतु या नावानें तो विद्याधराचा स्वामी झाला असतां ७ रम्य हिमालयपर्वतावर शुभ विद्याधरनगरात तो दिव्य भोगोपभोग भोगीत कांहीं वर्षें राहिला ८. तेथें तो कल्पवृक्षाचे पूजन सतत भक्तीनें करीत असे. त्या वृक्षाच्या प्रभावानें त्यास एक फार उत्तम पुत्र झाला ९. तो सर्व कलामध्यें निपुण होता. जीमूतवाहन हें त्याचें नांव होतें. हे राजा, पूर्वजन्मामध्यें तो

स वै पूर्वभवे राजन्मध्यदेशे महोत्तमे १० क्षत्रियः शूरसेनाख्यो बभूव वसुधाधिपः । एकदा मृगयाक्रीडालोलुपः स महीपतिः ११ प्राप्तवानुत्पलारण्यं यत्र वाल्मीकिसंस्थितिः । चैत्रशुक्लनवम्यां तु न कृतं जीववातनम् १२ उत्सवं रामदिवसे चकार विधिवन्नृपः । वाल्मीकेश्च कुटीमध्ये रात्रौ जागरणं कृतम् १३ श्रुता राममयी गाथा तस्य पुण्यप्रभावतः । विद्याधरत्वमापन्नो मुमुदे तत्र शक्रवत् १४ कल्पवृक्षस्य वै पूजा कृता तेन महात्मना । वर्षान्तरे द्रुमः प्राह वरं वरय सत्तम १५ स तमाह महावृक्ष मदीयं नगरं शुभम् । धनधान्यसमायुक्तं यथैव स्यात्तथा कुरु १६ इत्युक्ते सति वृक्षेण नगरं भूपतेः समम् । कृतं तदा न कोऽप्यासीद्यो मन्येतार्थिवाश्रयम् १७ सर्वे ते राजतुल्याश्च कल्पवृक्षप्रसादतः । तौ तु पितापुत्रौ तपसेऽर्थे वनं गतौ १८ मलयाद्रौ महारम्ये तपस्तुर्वहुलं तपः । एकस्मिन्दिवसे राजन्मलयध्वजभूपतेः १९ कमलाक्षीति विख्याता कन्या च शिवमन्दिरे । स्वसरुया सहिता प्राप्ता शिवपूजनतत्परा २० जीमूतवाहनश्चैव पूजार्थे मन्दिरं ययौ । बालां ददर्श दिव्याङ्गीं सर्वोपमसमन्विताम् २१ तस्या दर्शनमात्रेण कामबाणेन पीडितः । मनसा कामदेवं तं तुष्टाव श्लक्ष्णया गिरा २२ जीमूतवाहन उवाच ॥ मदनाय नमस्तुभ्यं कृष्णपुत्राय ते नमः । शम्बरप्राणहर्त्रे च चतुर्थ्यर्हाय ते नमः २३ पञ्चबाणाय कामाय प्रद्युम्नाय नमो नमः । मद्योग्यां कुरु सुश्रोणीं कामिनीं कमलाननाम् २४ तदा प्रसन्नो भगवान्मकरध्वजदेवता । मोहयित्वा च पितरं तद्विवाहमकारयत् २५

अत्युत्तम मलयदेशात शूरसेन या नावाने प्रख्यात असा क्षत्रिय राजा होता. एकदा मृगयाक्रीडेमध्ये लोलुप असा तो पृथ्वीपति १०,११ जेथें वाल्मीकिमुनींचा आश्रम होता अशा उत्पलारण्यामध्ये प्राप्त झाला. त्या दिवशीं चैत्रशुक्ल नवमी असून त्याने जीवास मारिले नाहीं १२. त्या रामजयंतीच्या दिवशीं राजानें यथाविधि मोठा उत्सव केला, वाल्मीकीच्या त्या कुटिकेमध्ये रात्रीं जागरण केलें १३ व रामचरित्ररूप गाथा ऐकिली. त्याच्या या पुण्याच्या प्रभावानें तो राजा विद्याधर झाला व इंद्राप्रमाणे आनंदित झाला १४. त्या महात्म्यानें कल्पवृक्षाची पूजा करण्याचा क्रम चालविला असता एका वर्षाच्या आतच तो वृक्ष म्हणाला " हे श्रेष्ठा, वर माग ". त्यावर तो म्हणाला "या महावृक्षा, माझें नगर शुभ व धनधान्ययुक्त जसें होईल तसें कर " १५,१६.असें त्याने म्हटलें असता कल्पवृक्षाने ते भूपतीच्या मंदिरासारिखें केलें. त्यावेळीं आम्हास राजाचा आश्रय आहे असे कोणीही मानीनासा झाला. कल्पवृक्षाच्या प्रसादानें ते सर्व राजासारिखे झाले. त्यावेळी ते दोघे पितापुत्र तपश्चर्या करण्याकरिता वनात गेले १७,१८. अतिरम्य मलयगिरीवर त्यानीं पुष्कळ तप केलें. हे राजा, एके दिवशीं मलयध्वजराजाची कमलाक्षी या नावाने प्रसिद्ध असलेली कन्या आपल्या सखीसह शिवमंदिरात आली व ती शंकराच्या पूजेमध्ये तत्पर झाली १९,२०. इतक्यात जीमूतवाहनही पूजा करण्याकरिता मंदिरांत गेला. तेथें त्यानें जिचे अंग दिव्य आहे व जी सर्व उपमानीं युक्त आहे अशा त्या कन्येस पाहिलें २१. तिच्या केवळ दर्शनानेंच तो कामबाणाच्या योगाने पीडित झाला व त्यानें मनानें मधुर वाणीने कामदेवाची स्तुति केली २२. जीमूतवाहन:—तुज मदनास नमस्कार असो; तुज कृष्णपुत्रास प्रणाम असो. शंबरासुराचे प्राण हरण करणाऱ्या तुज चतुर्थ्यर्हास मी वंदन करितों २३. पंचबाणास, कामास व प्रद्युम्नास माझा नमस्कार असो. या सुंदर, कमलमुखी कामिनीस माझ्या योग्य कर. त्यावेळीं भगवान् मकरध्वज देव प्रसन्न झाला व तिच्या पित्यास मोहित करून त्यानें त्यांचा विवाह करविला २४,२५. विश्वावसु या नावानें प्रसिद्ध असलेला त्या राजाचा पुत्र आपल्या

विश्वावसुरिति ख्यातस्तस्य भूपस्य वै सुतः । भगिनी पतिना सार्द्धं स ययौ गन्धमादनम् २६ नरं नारायणं नत्वा गरुडोत्तुङ्गमाययौ । तदा नागस्य वै माता शङ्खचूडस्य भो नृप २७ रुरोद बहुधा तत्र यत्र जीमूतवाहनः । दुःखितः स जगामाशु दयालुर्दीनवत्सलः २८ वृद्धामाश्वास्य पप्रच्छ केनेदं दुःखमागतम् । साह मे तनयो देव गरुडास्ये गमिष्यति २९ तद्वियोगेन दुःखार्ता विलपामि महाकुला । इति ज्ञात्वा स नृपते गरुडोत्तुङ्गमाययौ ३० गरुडोऽपि गृहीत्वा तं नभोमार्गमुपागमत् । तस्याङ्कोऽसृजा लिप्तो न्यधात्तत्र भामिनी ३१ कमलाक्षी तु वियति स्थितं गरुडभक्षितम् । विलोक्य चारुदृढ पतिदुःखेन दुःखिता ३२ तदा तु गरुडस्तस्तत्रागत्य त्वरान्वितः । जीमूतवाहन प्राह कस्मात्त्वमिह आगतः ३३ स होवाच प्रभो मद्य वचः शृणु महामते । शङ्खचूडस्य जननी महद्दुःखेन दुःखिता ३४ तस्याः पुत्रस्य रक्षार्थं समायोऽहं तवान्तिकम् । इत्युक्ते सति भूपाल शङ्खचूडश्च पन्नगः ३५ तदन्यालस्यैव दुःखेन दुःखितः शत्रुमासवान् । मां प्रभक्ष कृपासिन्धो त्वदाहारार्थमागतम् ३६ सोऽयोऽय मानुषं दिव्यं कुर्वाहारं महामते । तदा प्रसन्नो गरुडो ददौ तस्मै वरत्रयम् ३७ जीमूतवाहनायैव विद्याधरसुराय च । शङ्खचूडकुलं नाहं भक्ष्यामि च कदाचन ३८ त्व तु विद्याधरपुरं प्राप्य राज्यं महोत्तमम् । सुभाजयित्वा लक्षाब्दं ततो वैकुण्ठमेष्यसि ३९ इत्युक्त्वान्तर्दधौ देवः स पित्रा राज्यमातवान् । स्वपत्न्या सह राज्यार्द्धं भुक्त्वा वैकुण्ठमाययौ ४० इत्युक्त्वा स तु वैतालो नृपतिं प्राह नग्नधीः । तेषां मध्य महाराज कस्य प्राप्तं महाफलम् ४१ राजोवाच ॥ शङ्खचूडस्य संप्राप्तं जीवदानमहाफलम् ।

भगिनीपतीसह गंधमादनपर्वतावर गेला २६. नर व नारायण यास नमस्कार करून तो गरुडोत्तुंगवर आला. तेव्हा हे राजा, शंखचूड नागाची माता तेथें पुष्कळ रडू लागली. तेव्हा तो दयालु दीनवत्सल जीमूतवाहन दुःखित होऊन तिच्याजवळ गेला २७,२८ व त्या वृद्ध स्त्रीचें समाधान करून " तुला हें दुःख कोणामुळे प्राप्त झालें ? " असें विचारिता झाला. तेव्हा ती ह्मणाली ' बा देवा, माझा पुत्र गरुडाच्या मुखात जाईल २९ ह्मणून मी त्याच्या वियोगदुःखानें व्याकुल होऊन विलाप करीत आहे. ' बा राजा, हें ऐकून तो गरुडोत्तुंगावर आला २९,३०. इतक्यात गरुडही सर्पास घेऊन आकाशमार्गात आला व जेथें त्याची रागीट स्त्री बसली होती तेथें त्याचे रक्तानें भरलेलें कडें त्यानें ठाकिलें ३१. तेव्हा ती कमलाक्षी आकाशात असलेल्या व भक्षण केलेल्या त्यास पाहून पतीच्या दुःखानें दुःखित होतसाती अतिशय रडू लागली ३२. तेव्हा त्रासलेला गरुड त्वरेनें तेथें येऊन जीमूतवाहनास ह्मणाला " तूं येथें कशाकरिता आलास ? " ३३. तेव्हा तो ह्मणाला " हे महामते प्रभो, माझें वचन ऐक. शंखचूडाची माता मोठ्या दुःखानें दुःखित झाली आहे ३४. तिच्या पुत्राच्या संरक्षणाकरिता मी तुजजवळ आलों आहें. " असें तो बोलला असता, हे राजा, शंखचूड नाग ३५ त्या सर्पाच्या दुःखानें दुःखी होऊन शत्रूकडे आला व " हे कृपासागरा, माझें भक्षण कर. मी तुझ्या आहाराकरितां आलों आहें ३६. हे महामते, ह्या भक्ष्यास सोडून मानुष दिव्य आहार कर. " तेव्हा गरुड प्रसन्न झाला व त्यानें त्या विद्याधरपुत्र जीमूतवाहनास तीन वर दिले. " मी शंखचूडाचें कुल कधींही खाणार नाहीं ३७,३८. तूं विद्याधरनगरामध्ये अत्युत्तम राज्य प्राप्त करून घेऊन त्याचा लक्ष वर्षें भोग घेऊन नंतर वैकुंठास जाशील " ३९. असें बोलून तो देव गुप्त झाला. नंतर पित्यासह जीमूतवाहनास राज्य मिळालें व आपल्या पत्नीसह राज्यभोग भोगून तो वैकुंठास गेला ४०. असें सांगून ज्याची बुद्धि नग्न आहे असा तो वेताल राजास ह्मणाला ' हे महाराजा, त्यांच्यापैकी मोठें फल कोणास मिळालें ? ' राजा ह्मणतो - जीवदानरूप

नृपस्यैवोपकारं च स्वभावो विधिना कृतः ४२ पतिव्रताप्रभावेन जीवदानेन भूपतेः । संतुष्टो गरुडो जातस्तस्य किं तर्हि तत्फलम् ४३ निर्भयः शङ्खचूडस्तु स्वशत्रुं प्रति चागमत् । शरीरमर्पयित्वा तं ततः प्राप्तं महाफलम् ४४ [९५९] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये पञ्चदशोऽध्याय ॥ १५ ॥

सूत उवाच ॥ पुनः प्राह स वैतालो भूपतिं ज्ञानकोविदम् । चन्द्रशेखरभूपस्य नगरी दक्षिणे स्थिता १ रत्नदत्तोऽवसद्वैश्यो धर्मज्ञो धनधान्यवान् । कामावरूथिनी तस्य सुता जज्ञे महोत्तमा २ तद्रूपमुत्तमं दृष्ट्वा स वैश्यो भूपतिं प्रति । उवाच भो महाराज सुता मम सुरेप्सिता ३ तां गृहाण कृपासिन्धो त्वद्योग्या विधिनिर्मिता । इति श्रुत्वा तु वचनं भूपतिश्चन्द्रशेखरः ४ मन्त्रिणं विदुरं प्राह त्वं च गच्छ महामते । यथायोग्यं हि तद्रूपं मां निवेदय सत्वरम् ५ इत्युक्त्वा स ययौ गेहं भूपतिश्चन्द्रशेखरः । श्यामला नाम तत्पत्नी ज्ञात्वा राजानमागतम् ६ धूपदीपादिभिः पुष्पैर्यथायोग्यैः समार्चयत् । एतस्मिन्नन्तकाले तु गौश्च शार्दूलपीडिता ७ रम्भाशब्देन महता विललाप भयातुरा । तच्छ्रुत्वा स तु भूपालः खड्गहस्तः समभ्यगात् ८ शीघ्रं हत्वा तु शार्दूलं मुमोद नृपतिस्तदा । मुकुलो दानवो नाम तद्देहाद्रूपमास्थितः ९ भूपतिं प्राह नम्रात्मा धर्मज्ञं चन्द्रशेखरम् । त्वया विमोचितो नाथ याम्यहं वरुणालयम् १० प्रह्लादस्यैव शापेन व्याघ्रदेहत्वमागतः । परिक्रम्य ययौ दैत्य प्रह्लादं प्रति सत्वरः ११ नृपतिर्गृहमागत्य सुष्वाप परया मुदा । प्रभाते बोधितो राजा सभायां स्वयमागमत् १२ नृपोक्तः स ययौ तत्र

महाफल शंखचूडास मिळाले. राजाने जो उपकार केला तो त्याचा ब्रह्मदेवकृत स्वभावच होय ४१,४२. पतिव्रतेच्या प्रभावाने व राजाच्या जीवदानाने गरुड संतुष्ट झाला. मग त्याला आणखी फल कोणते हवे ? ४३. पण शंखचूड निर्भयपणे आपल्या शत्रुकडे गेला व त्यास त्याने आपलें शरीर समर्पण केले. त्यामुळे त्यास मोठे फल प्राप्त झाले ४४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥

सूत ह्मणतात – ज्ञानसंपन्न राजास तो वेताल पुन ह्मणाला:– दक्षिणेत चंद्रशेखर राजाची नगरी आहे तेथे रत्नदत्त ह्मणून एक धर्मज्ञ व धनधान्यसंपन्न वैश्य राहत असे. त्याला कामावरूथिनी ह्मणून अति उत्तम कन्या झाली १,२. तिचे उत्तम रूप पाहून तो वैश्य राजास ह्मणाला 'हे राजा, माझी कन्या देवांनाही इष्ट आहे ३. हे कृपासागरा, तिचे तू ग्रहण कर. ब्रह्मदेवाने तिला तुजयोग्य निर्माण केले आहे.' हे त्याचें ह्मणणे ऐकून चंद्रशेखर राजा आपल्या विदुर मंत्र्याला ह्मणाला 'हे महामते, तूं जा व तिचे यथायोग्य स्वरूप मला सांग' ४,५. असे बोलून तो चंद्रशेखर राजा गृहीं गेला. श्यामलानामक त्याची पत्नी राजा आला आहे असें जाणून ६ यथायोग्य धूप, दीप, पुष्पें इत्यादिकांनीं त्याची पूजा करिती झाली. इतक्यात पूजेच्या शेवटीं व्याघ्राने जिला पीडिले आहे अशी एक गाय "रंभा" असा मोठा शब्द उच्चारून भयाने व्याकुल होत्साती हंबरूं लागली. तें ऐकून ज्याच्या हातात खड्ग आहे असा राजा तिला सोडविण्याकरिता आला व लागलेच व्याघ्रास मारून तो राजा संतुष्ट झाला. इतक्यात त्याच्या शरीरातून मुकुलनामक राक्षस आपल्या शरीराप्रत प्राप्त झाला ७-९ व नम्र होऊन धर्मज्ञ चंद्रशेखर भूपतीस ह्मणाला "हे नाथ, तुम्च्याकडून सोडविलेला असा मी वरुणालयास जाईन १०. मी प्रल्हादाच्या शापानें व्याघ्रदेहाप्रत प्राप्त झालों होतों" असे ह्मणून व राजास प्रदक्षिणा करून तो दैत्य प्रल्हादाकडे त्वरेने गेला. इकडे राजा परत गृहीं येऊन मोठ्या

यत्र कामावरूथिनी। दिव्यमूर्तिमयीं दृष्ट्वाऽचिन्तयत्स स्वमानसे १३ अस्या मूर्तिप्रभावेन राजाऽसौ मोहमाप्स्यति। इति ज्ञात्वा नृप प्राह नैव त्वद्योग्यका न हि १४ तथा मत्वा स नृपतिर्न विवाहमथाकरोत्। रत्नदत्तस्तु भूपस्य सेनाया पतये ददौ १५ बलभद्रस्य सा पत्नी बभूव वरवर्णिनी। एकदा नृपतिस्तां वै दृष्ट्वा कामावरूथिनीम् १६ मोहितः कामबाणेन मूर्च्छितः पतितो भुवि। तदा सेनापतिस्तूर्णं नृपमुत्थाप्य सत्वरम् १७ शिबिकां चैव संस्थाप्य सभायां च समैरयत्। तदा प्रबुद्धो नृपतिः प्राह सेनापतिं मुदा १८ कस्येयं सुन्दरी भार्या कुतो जाता महोत्तमा। बलभद्रस्तु तच्छ्रुत्वा नृपतिं प्राह नम्रधीः १९ ममेयं सुन्दरी नारी रत्नदत्तस्य सा सुता। राज्यभङ्गभयान्मन्त्री न रूपं त्वयि वर्णितवान् २० मम दास्यस्य या पत्नी त्वद्योग्या भूपते सदा। तवेच्छां पूरयिष्यामि तां गृहाण कृपानिधे २१ इत्युक्तः क्रोधताम्राक्षो नृपतिस्तमुवाच ह। तवेयं धर्मतो भार्या प्राप्ता सुन्दररूपिणी २२ गृह्णामि यदि तां देवीं नरकं यमकिङ्करैः। पातयित्वा महादुःखं भजयिष्यामि तद्भिया भोः २३ इत्युक्त्वा भूपतिस्तूर्णं विरहाग्निप्रपीडितः। मरणं प्राप्तवान्राजा गतो धर्मपुरान्तिके २४ इत्युक्त्वा स तु वैतालो नृपं प्राह शृणुष्व भोः। मृते राजनि तत्पत्नी सती भूत्वा प्रदृश्यते २५ सेनापतिस्तु तत्रैव भस्मसादभवत्क्षणात्। कामावरूथिनी देवी भस्म कृत्वा कलेवरम् २६ स्वर्गं गतास्तु ते सर्वे कस्य पुण्याधिकं मतम्। स होवाच च वैतालं राजा धर्माधिको मतः २७ मरणं किङ्करस्यैव योग्यं भूपतिहेतवे। पतिव्रतायाः मरणं पतिसङ्गेन योग्यकम् २८ दत्त्वा यत्किङ्करेणैव सुन्दरी नृपहेतवे। धर्मभीत्या न नृपतिस्तामगृह्णात्स

आनंदानें निद्रित झाला व प्रभातसमयीं जागा होऊन तो स्वतः सभेमध्ये आला ११-१२. तेव्हा राजानें ज्यास आज्ञा केली होती असा तो मंत्री जेथे कामावरूथिनी होती तेथें आला व त्या दिव्य मूर्तीस पाहून त्यानें आपल्या मनात असा विचार केला कीं, या मूर्तीच्या प्रभावाने हा राजा मोहित होईल. असा विचार करून तो राजास ह्मणाला 'ती स्त्री आपल्या योग्य नाही' १३,१४. तेव्हा तें खरें आहे असे मानून राजानें विवाह केला नाहीं. नंतर रत्नदत्तानें सेनापतीस ती कन्या दिली १५. तात्पर्य, ती सुंदरी बलभद्राची पत्नी झाली. एकदा राजा त्या कामावरूथिनीस पाहून कामबाणानें मोहित होत्साता भूमीवर पडला. त्यावेळीं सेनापतीनें राजास त्वरित उठविलें व पालखींत घालून समेंत नेलें. तेव्हा सावध झालेला राजा आनंदानें सेनापतीस ह्मणाला १६-१८" ही सुंदरी कोणाची भार्या आहे व ही उत्तम स्त्री कोणापासून निर्माण झाली ? " हें ऐकून विनयसंपन्न बलभद्र राजास ह्मणाला १९ " ही सुंदरी माझी स्त्री आहे. ही रत्नदत्ताची कन्या राज्याचा भंग होईल या भीतीनें मंत्र्यानें तिच्या रूपाचे वर्णन तुझ्या समोर केले नाहीं २०. हे भूपाला, मज दासाची जी पत्नी ती सर्वदा तुझ्या योग्य होय. बा कृपासागरा, मी तुझी इच्छा पूर्ण करितो. तूं तिचे ग्रहण कर " २१. ह्याप्रमाणें तो बोलला असता ज्याचे नेत्र क्रोधानें लाल झाले आहेत असा तो राजा त्यास ह्मणाला " ही सुंदरी धर्मतः तुझी भार्या झाली आहे २२. तेव्हा मी जर त्या देवीचे ग्रहण केलें तर यमाचे किंकर मला नरकात टाकतील व मजकडून असह्य दुःख भोगवितील " २३. असें बोलून नंतर तो राजा विरहाग्निनें अतिशय पीडित होत्साता मरण पावला व यमधर्माच्या नगरात गेला २४. असे बोलून तो वेताळ राजास ह्मणाला ' राजा, ऐक; तो राजा मृत झाला असता त्याची पत्नी सती गेली २५. सेनापति तर तात्काळ तेथेंच भस्मरूप झाला. तेव्हा देवी कामावरूथिनीनें आपल्या देहाचें भस्म करून टाकिलें व तीं सर्व स्वर्गलोकीं गेलीं. पण त्याच्यापैकीं अधिक पुण्य कोणाचें ? ' त्यावर राजा वेतालास ह्मणाला " राजा अधिक धार्मिक मानलेला आहे २६,२७. कारण, राजाकरितां सेवकानें प्राण देणें उचित व होय. पतीच्या

कामुकः ९ जित्वा कामं तथा पाप्मं धर्मं तस्माक्रुपेऽर्पिकम् ३० [९८९] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

सूत उवाच ॥ पुनः प्रोवाच वैतालस्तदा ब्राह्मणरूपवान् । शृणु भूप महाभाग कथां तव मनोरमाम् १ उज्जयिन्यां महाभाग महासेनो नृपोऽभवत् । तस्य राज्येऽवसद्विप्रो देवशर्मेति विश्रुतः २ गुणाकरस्तस्य सुता मद्यमांसपरायणः । द्यूतेन सक्षयं वित्तं तस्य पापस्य चाभवत् ३ बान्धवैः स परित्यक्तो बभ्राम वसुधातलं । कदाचिद्दैवयोगेन सिद्धाश्रममुपागमत् ४ कपर्दी नाम तं योगी कपालान्नैरपूजयत् । ज्ञात्वा पैशाचमन्न स बुभुक्षुर्न गृहीतवान् ५ तदातिथ्य तदर्थं स यक्षिणीं समुपाह्वयत् । तया रात्रौ महानन्दं प्राप्तवान्स द्विजः शयी ६ प्रातःकाले तु संप्राप्ते कैलासं यक्षिणी गता । स द्विजस्तद्वियोगेन योग्यन्तिकमुपाययौ ७ कपर्दी ददौ तस्मै विद्यां यक्षिणिकर्षिणीम् । चत्वारिंशद्दिवान्यत्र निशीथे जलमध्यगः ८ स जजाप शुभं मन्त्र न प्राप्ता कामचारिणी । तदा योग्यान्तया विप्रः स्वयं तु ममतां त्यजन् ९ प्राप्तवान्पितरौ नत्वा स्वगेहे निवसन्निशि । प्रातःसंन्यासिवद्भूत्वा कुलैश्च रुदितैर्द्विजः १० प्रतिबोधिवन प्राप्तस्तच्छिष्यत्वमुपाययौ । पञ्चाग्निमध्ये स स्थित्वा तन्मन्त्रमजपच्छुचिः ११ न प्राप्ता योगिनी देवी तदा चिन्तातुरोऽभवत् । इत्युक्त्वा स तु वैतालो नृपतिं ज्ञानकोविदम् १२ पुनरह कथं देवी न प्राप्ता

बरोबर पतिव्रता स्त्रीनें मरणे हेंही योग्यच आहे २८. पण सेवकानेंच राजाकरिता सुंदरी समर्पण केली असता त्या कामुक राजानें धर्माच्या भीतीनें तिचें ग्रहण केलें नाहीं, तर त्याने कामास जिंकून धर्माचे पालन केलें. ह्यास्तव, राजामध्ये पुण्य अधिक होतें" २९,३०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वाच्या कलियुगीय इतिहाससमुच्चयातील सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥

सूत ह्मणतातः– तेव्हा ब्राह्मणरूपधरान् वेताळ ह्मणाला:- हे महाभागा राजा, तुला मनोरम वाटणारी कथा ऐक १. हे उदारा, उज्जयिनीमध्ये महासेन राजा होता. त्याच्या राज्यांत देवशर्मा या नांवानें प्रसिद्ध असा एक विप्र रहात होता २. गुणाकर हा त्याचा पुत्र असून तो मद्य व मांस यामध्ये तत्पर असे. त्या पाप्याचे द्रव्य द्यूताने क्षीण झाल ३. तेव्हा बांधवांनीं त्याचा त्याग केला व तो पृथ्वीतलावर भ्रमण करूं लागला. एकदा तो दैवयोगानें सिद्धाश्रमामध्ये प्राप्त झाला ४. तेव्हा कपर्दीनामक योगी कपालान्नानें त्याचा सत्कार करिता झाला. पण ते पिशाचाचें अन्न आहे असें जाणून त्या बुभुक्षूनें तें घेतलें नाहीं ५. तेव्हा त्याच्या आतिथ्याकरिता योग्याने यक्षिणीस बोलाविलें. तेव्हां त्या कामी ब्राह्मणाने तिच्यासह रात्री मोठा आनंद केला ६. प्रातःकाल होताच ती यक्षिणी कैलासास गेली. तेव्हा तो ब्राह्मण तिच्या वियोगाने युक्त होत्साता त्या योग्याजवळ आला ७. तेव्हा कपर्दीने यक्षिणीस बोलावण्याची विद्या त्यास दिली. चाळीस दिवस मध्यरात्रीं जलामध्यें राहून ८ तो शुभ मंत्राचा जप करिता झाला. पण त्यास ती कामचारिणी प्राप्त झाली नाहीं. तेव्हां तिच्याविषयींचें प्रेम आपणच सोडून तो ब्राह्मण योग्याच्या आज्ञेने आपल्या मातापितराकडे आला व त्यास नमस्कार करून तो रात्रीं आपल्या गृही राहिला. प्रातःकाळीं सन्याशाप्रमाणें होऊन सर्व कुल रडत असतांच तो ब्राह्मण ९,१० प्रतिबोधाच्या अरण्यात आला व त्याचें शिष्यत्व पतकरून पंचाग्नीमध्यें राहून तो शुद्ध पुरुष मंत्राचा जप करिता झाला ११. तरी त्याला ती योगिनी देवी प्राप्त झाली नाहीं. तेव्हा तो चितातुर झाला. असें सांगून तो वैताल ज्ञानसंपन्न राजास पुनः ह्मणाला " प्रिय यक्षिणी देवी त्यास कशी प्राप्त झाली नाहीं ? " हे ब्राह्मणा, हा प्रश्न ऐकून राजा रुद्राच्या किंकरास–वेता-

क्षिणी प्रिया।श्रुत्वाह नृपतिर्विप्र वैतालं रुद्रकिङ्करम् १३त्रिविधं कर्म भो विप्र सिद्ध्यर्थे साधकाय वै। मनोवाग्विहितं कर्म परलोके सुखप्रदम् १४ सुन्दराङ्गकृतं ह्येषं पुनर्वाक्कायसंभवम्। किञ्चित्सिद्धिप्रदं ह्येवमिह्जन्मनि दीक्षितम् १५ परत्र च भुवर्लोके पिण्डदेहकृतं स्मृतम्। मन कायेन संभूतं परजन्मनि राज्यदम् १६ मनोवाक्कायसंभवमिह्जन्मनि सिद्धिदम्। परत्र परमां सिद्धिं तत्कर्म प्रददाति हि १७ तस्मात्कर्तव्यमेवेह त्रिविधं कर्म साधकैः। अन्यविप्तेन स द्विज. कृतवान्कर्म पन्त्रजम् १८ अतोऽन्यजन्मनि प्राप्तो यक्षत्व तत्परो द्विज.। सूत उवाच ॥ इत्याकर्ण्य तु वैतालः प्रसन्नवदनोऽभवत् १९ साधु साध्विति तं प्राह्य सद्वाक्यैः समपूजयत्। इतिहास पुन. प्राह परीक्षार्थे नृपाय सः २० [१००१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये सप्तदशोऽध्याय ॥ १ ॥

सूत उवाच ॥ भोः शौनक महाप्राज्ञ वैतालस्त हि सोऽब्रवीत्। सुदक्षो नाम नृपतिर्वसन्कैम्बलके पुरे १ न्यायवान्धर्मवाञ्छूरो दाता शिवपरायणः। तस्य राज्येऽवसद्वैश्यो धनाध्यक्ष इति श्रुतः २ तनया सुन्दरी तस्य नाम्ना धनवती शुभा। गौरीदत्ताय वैश्याय पित्रा दत्ता वराङ्गना ३ कियता चैव कालेन मोहिनी तत्सुताऽभवत्। द्वादशाब्दवयास्तस्याः पिता तु निधन गतः ४ तदा धनवती रण्डा निर्धना पितुरन्तिकं। कन्यया सह सप्राप्ता निशि मार्गे तमोमये ५ न्यायशर्मा द्विजः कश्चिद्ब्रह्मस्वस्यापहारकः। नामसत्यत्वभावेन शूल्यां न निर्धनं गतः ६ अकस्मादैश्यजा प्राप्ता करेण तत्पद स्पृशन्। तेन दुःखेन महता रुरावोच्चैर्द्विजश्च सः ७ हा

लास ह्मणाला " १२,१३"वा ब्राह्मणा, साधकास उत्तम सिद्धीकरिता तीन प्रकारचे कर्म सांगितलेलें आहे. मन व वाणी यानीं केलेले कर्म व हे सुंदर पुरुषा, अंगकृत कर्म परलोकी सुखप्रद होत असते. पण तेच वाणी व शरीर यानीं केलेलें कर्म या जन्मी कांहींसे फल देत असते १४,१५. पिंडदेहकृत कर्म परलोकीं भुवर्लोकात फल देते. मन व शरीर यान्या योगाने घडलेले कर्म दुसऱ्या जन्मी राज्य देणारे आहे १६. मन, वाणी व देह यान्या योगाने घडलेले कर्म इहजन्मी सिद्धि देणारे आहे व तेच कर्म परलोकींही परम सिद्धि देत असते १७. यास्तव, साधकानीं इहलोकीं त्रिविध कर्म करावें. त्या ब्राह्मणानें दुसऱ्याच्या द्रव्याने मंत्रज कर्म केले. त्यामुळें तो द्विज दुसऱ्या जन्मी यक्षत्वाप्रत प्राप्त झाला." सूत ह्मणतात.- राजाचें हे भाषण ऐकून ज्याचे वदन प्रसन्न झाले आहे असा तो वेताल १८,१९ " वाहवा, वाहवा, ठीक !" असें ह्मणून उत्तम वचनानीं त्यास उत्तम प्रकारें पूजिता झाला व परीक्षेकरिता तो राजास पुनः इतिहास सांगता झाला २०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सतरावा अध्याय सामाप्त झाला ॥ १७ ॥

सूत ह्मणतात.— हे महाबुद्धिमान् शौनका, तो वेताल त्या राजास ह्मणाला " कंबलक नगरामध्यें सुदक्षनामक राजा रहात असे १. तो न्यायी, धार्मिक, शूर, दाता व शिवपरायण होता. त्या राज्यामध्यें धनाध्यक्ष या नावाचा वैश्य रहात असे २. त्याला धनवतीनामक शुभ व सुंदर कन्या होती. ती सुंदर कन्या तिच्या पित्यानें गौरीदत्तनामक वैश्यास दिली ३. कांहीं कालानें मोहिनी ह्मणून तिला कन्या झाली. पण ती बारा वर्षाच्या वयाची होताच तिचा पिता मरण पावला ४. तेव्हा विधवा व निर्धन झालेली धनवती आपल्या कन्येसह पित्याकडे जाण्याकरिता अंधाऱ्या रात्री मार्गानें जाऊ लागली ५. इतक्यांत न्यायशर्मा ह्मणून कोणी एक ब्राह्मणाच्या धनाचा अपहार करणारा ब्राह्मण शूलावर चढविलेला असून नावाच्या सत्यत्वामुळें मरण पावला नव्हता ६. इतक्यांत एकाएकीं वैश्यकन्या प्राप्त झाली. तेव्हा तिच्या पायास स्पर्श करून त्या मोठ्या

राम कृष्ण प्रद्युम्नानिरुद्धेति पुनः पुनः । श्रुत्वा धनवती दीना को भवानिति साऽब्रवीत् ८ द्विज आह च विप्रोऽहं व्यहं शल्यान्वितं मनः । यदि दास्यसि मे कन्यां कोटिस्वर्णं ददामि ते ९ श्रुत्वा धनवती तस्मै व्याहिता मोहिनी सुता । वटमूले स्थित द्रव्यं खनित्वा गृहमाययौ १० मोहिन्यपि पतिं प्राह भवान्मृत्युवशं गतः । कुतो मे तनयो जातस्तद्ब्रवीषि दयानिधे ११ द्विजः प्राह शृणु व्यङ्गे यदा ते दुश्छया भवेत् । तदा त्वं पण्डितं प्राप्य पुत्रमुत्पादयाशु वै १२ इत्युक्त्वा मरणं प्राप्य यमलोकं गतो द्विजः । नारकीं यातनां नित्यं बुभुजे निन्द्यकर्मजाम् १३ मातुर्गृहे तु सा नारी मोहिनी यौवनान्विता । समयं हृदये कृत्वा तिष्ठन्ती च पुनः पुनः १४ के भोगाश्च किमाश्चर्यं को जागर्ति शयीत कः । पापो व्याधिश्च दुःखं च कुतो जातं हृदि स्थितम् १५ इति श्लोकं द्विजानाह नोत्तरं च तदुद्विजाः । मेधावी नाम काश्मीरे स्थितो विप्रः समागतः १६ तामुवाच प्रसन्नात्मा शृणु मोहिनि सुन्दरि । सुगन्धि वनिता वस्त्रं गीतं पानं च भोजनम् १७ शय्या च भूषणं ज्ञेयं भोगमष्टविधं बुधैः । अहन्यहनि भूतानि म्रियन्ते जनयन्ति च १८ ममतां यः करात्येषां तदाश्चर्यं स्मृतं बुधैः । यो विवेक समासाद्य करुते कर्मसंग्रहम् १९ संसारे घोरतमसि स जागर्ति विवेकवान् । संसाराजगरं ज्ञात्वा वैराग्यं योऽकरोद्भृवि २० औदासीन्यं समाधिं च सुखं शेते हि मानवः । सकल्पाज्जायते कामस्ततो लोभः प्रजायते २१ लोभाज्जातश्च तृष्णायां स पापो निरयप्रदः । जलप्रकृत्यां यो जातो रसो रसविकारवान् २२ रसाज्जातश्च देहेऽस्मिन्व्याधिः

दुःखानें तो ब्राह्मण मोठ्यानें रडून " हे राम, कृष्ण, प्रद्युम्न, अनिरुद्ध, " इत्यादि पुनः पुनः म्हणूं लागला. हें ऐकून ती दीन धनवती " आपण कोण आहां ? " असें विचारती झाली ७,८. तेव्हां द्विज म्हणतो " मी ब्राह्मण आहें. आज तीन दिवस माझे मन शल्ययुक्त झालें आहे. जर मला आपली कन्या देशील तर मी तुला कोटि सुवर्ण देईन " ९. हें एकून धनवती त्यास मोहिनी कन्या देती झाली व वडाच्या मूळाशीं असलेलें द्रव्य खणून घेऊन घरीं गेली १०. नंतर मोहिनीही आपल्या पतीस म्हणाली " आपण तर मृत्यूच्या मुखांत पडला. तेव्हा, हे दयानिधे, मला पुत्र कोणापासून होईल तें सांगा " ११. त्यावर द्विज म्हणाला " हे सुंदरि, जेव्हां तुझ्या मनांत काम उद्भवेल तेव्हां तूं पंडिताकडे जाऊन त्वरित पुत्रोत्पत्ति करून घे " १२. असे बोलून तो मरण पावला व यमलोकीं गेला. निंद्य कर्मापासून प्राप्त झालेली नरकांतील यातना तो सतत भोगीत असे १३. इकडे त्याची स्त्री मोहिनी मातेच्या गृहीं यौवनसंपन्न झाली. पतीनें केलेला नियम वारंवार मनांत आणून ती राहिली होती १४. " भोग कोणते ? आश्चर्य काय ? जागतो कोण ? सुखानें निद्रा कोण घेतो ? पाप काय ? व्याधि कोणता ? व हृदयामध्यें असणारें दुःख कोठून आलें ? " अशा अर्थाचा श्लोक ती ब्राह्मणास सांगती झाली. पण तिला द्विजानीं उत्तर दिलें नाहीं. तेव्हां मेधावीनामक काश्मीरांत असणारा ब्राह्मण तेथें आला १५,१६ व तिला म्हणाला "हे सुंदरि, मोहिनि, ऐक. सुगंधि पदार्थ, स्त्री, वस्त्र, गीत, पान, भोजन १७ शय्या व भूषण असें आठ प्रकारचे भोग आहेत असें शहाण्यांनी समजावे. रोजरोज भूतें मरतात व उत्पन्न होतात १८ तरी प्राणी त्यान्यावर ममता करितो हें आश्चर्य आहे असें शहाण्यांनी म्हटलें आहे. जो विवेकाच्या आश्रयानें घोरतमोरूप संसारामध्यें कर्मसंचय करितो तोच विवेकी पुरुष जागतो. संसार अजगर आहे असें जाणून जो ऐहिक भोगाविषयीं विरक्त होतो १९,२० व औदासीन्य आणि समाधि याचा आश्रय करितो तो मनुष्य सुखानें शयन करितो. सकल्पापासून काम उत्पन्न होतो; त्यान्यापासून लोभ उद्भवतो, लोभापासून तृष्णेमध्यें झालेला जो पापी मोह तो नरक देणारा आहे. जलरूप प्रकृतीमध्यें झालेला रस व त्या रसाच्या

कर्ममयोऽशुभः । रुद्रात्कालात्समुद्भूतो मोहो हृदि च लोकहा ११ स तुष्टाव महादेवीं पत्न्यर्थे सुरपूजिता । मिथ्यादृष्टिस्ततो जाता मोहस्य दयिता भवत् १४ तस्मात्तेनास्य तत्कन्या जातस्य ममतोपरि । तया सकाशात्समजात दुःख शोकसमन्वितम् १५ इति श्रुत्वा तु सा नारी सुमोह वरवर्णिनी । मानी शूरश्च चतुरोऽधिकारी गुणवान्सखा १६ स्त्रीरक्षकश्च पुरुषो वश नर्मी सदा नयेत् तस्यां गर्भ च विप्राऽसौ दत्त्वा स्वर्ण गृहीतवान् १७ सापि नारी सुख लेभे तेन गर्भेण प्रग्रहम् । कदाचिद्दशमासान्ते मोहिनीमब्रवीच्छिव १८ स्वप्नान्तरे महाराज सापि श्रुत्वा तथाऽकरात् । दोलामध्ये सहस्र च स्वर्ण चैव स्वबालकम् १९ राजद्वारे स्थापयित्वा सुष्वाप जननी सुतम् । निर्गत्य बोधितो राजा सुतार्थी रुद्रपूजक ३० द्विजपुत्र समालोक्य मोहिन्यां जातमुत्तमम् । कारयित्वा जातकर्म विततार धन बहु ३१ हरदत्तश्चाभवन्नामा सर्वविद्याविशारद । पितुरन्ते च तद्राज्य प्राप्य धर्म प्रकाशयन् ३२ गयाश्राद्ध कृत तेन फल्गुतीरे विधानतः । यथा हस्तान्तदा जाता स राजा विस्मितोऽभवत् ३३ इत्युक्त्वा स तु वैताला नृपति प्राह भो नृप । कस्मै योग्यो हि पिण्डोऽसौ श्रुत्वा राजाऽब्रवीदिदम् ३४ द्रव्यार्थी पण्डितो ज्ञेयो गुरुस्तुल्यश्च भूपतिः । चौराय पिण्डमुचित यस्य नारी च मोहिनी ३५ श्रुत उवाच ॥ तेन पिण्डप्रभावेन स चौरो ब्रह्मद्रव्यहा । निरयाल्लि सुतो विप्र स्वर्गलोके समागत ३६ [१०३०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहासमुच्चये द्वादशोऽध्याय ॥ १८ ॥

विकाराने युक्त व रसापासून झालेला असा हा कर्ममय अशुभ व्याधि या देहामध्ये आहे रुद्रापासून कालीच्या ठायी लोकाचा संहार करणारा मोह हृदयामध्ये उत्पन्न झाला २१-२३. पत्नीकरिता तो महादेवीची स्तुति करू लागला तेव्हा देवांनी पूजिलेली मिथ्यादृष्टि उत्पन्न झाली व तो मोहाची स्त्री झाली २४ तेव्हा तिच्या ठायी मोहापासून स्नेह झाला तो ममतायुक्त होय. त्याच्यापासून शोकयुक्त दुःख झाले २५ हे ऐकून ती श्रेष्ठ नारी मोहित झाली. मानी, शूर, चतुर, अधिकारी, गुणवान, प्रियरूप व स्त्रीचे रक्षण करणारा अशा पुरुषाने स्त्रीस सदा वश करून ठेवावे असो. तिच्या ठिकाणी गर्भधारणा करून तो ब्राह्मण सुवर्णाचे ग्रहण करिता झाला. तो स्त्रीही त्या गर्भामुळे प्रग्रहही सर्व मोजू लागली. दहा महिने झाल्यावर कोणे एके समयी हे महाराजा, शिव तिला स्वप्नात काही सांगता झाला व तिनेही त्याप्रमाणे केले. म्हणजे पाळण्यात ये हजार सुवर्ण मुद्रा व आपला बालक २६-२९, याम घालून तो पुत्रासह पाळणा राजाच्या द्वारात ठेवून ती माता निजली. इकडे रुद्राची पूजा करणाऱ्या पुत्रार्थी राजास शंकराने पुत्राची वार्ता कळविली तेव्हा राजा मोहिनीच्या उदरी झालेल्या उत्तम ब्राह्मणपुत्राचा स्वीकार करिता झाला त्याचे जातकर्म करून त्याने पुष्कळ द्रव्य वाटले ३०,३१. तो हरदत्त या नावाने प्रसिद्ध झाला तो सर्व विद्यांमध्ये निपुण असे असो पित्याचा अंत झाला असता त्यास राज्याची प्राप्ति झाली त्याने पुष्कळ धर्म केला ३२ फल्गूनदीच्या तीरी त्याने यथाशास्त्र गयाश्राद्ध केले तेव्हा पिंडाकरिता तीन हात वर आले. तेव्हा राजा अतिशय आश्चर्यचकित झाला ३३ असे सांगून वेताळ राजास म्हणाला " अहो महाराज, हा पिंड कोणास मिळणे योग्य आहे?" ते ऐकून राजा असे म्हणाला - पंडित द्रव्यार्थी होता असे जाणले. राजा त्याच्या गुरुतुल्यच होय यास्तव. मोहिनी ज्याची स्त्री होती त्या चोरास पिंड उचित होय ३४,३५. सूत म्हणाले -त्या पिंडाच्या प्रभावाने तो ब्राह्मणाच्या द्रव्याचे हरण करणारा चोर, हे ब्राह्मणा, नरकातून

सूत उवाच ॥ चित्रकूटे च नृपतौ रूपदत्त इति श्रुतः । वेन मृगप्रसङ्गेन वनान्तरमुपाययौ १ मध्याह्ने सरसस्तीरे मुनिपुत्रीं ददर्श सः । चिन्वतीं पद्मकुसुमं रूपयौवनशालिनीम् २ तस्या नेत्रे स्वयं नेत्रे चैकीभूते समागते । एतस्मिन्नन्तरे विप्रस्तत्र प्राप्तो ददर्श तौ ३ तस्य दर्शनमात्रेण नृपतेर्ज्ञानमाप्ततम् । विनयावनतो राजा धर्मं पप्रच्छ चोत्तमम् ४ तमुवाच मुनिर्धीमान्दया-धर्मप्रपोषणम् । निर्भयस्य समं दानं न भूतो न भविष्यति ५ अनर्हान्दण्डमादद्या-दर्हपूजाफलं भवेत । मित्रता गोद्विजे नित्यं समता दण्डनिग्रहे ६ सत्यता सुरपूजायां दमता गुरुपूजने । मृदुता दानसमये संतुष्टिर्निन्द्यकर्मणि ७ इत्युक्त्वा स मुनिः पुत्रीं तस्मै दत्त्वा गृहं ययौ। राजापि च तया सार्द्धं वटमूले शयीतवान् ८ तदा तु राक्षसः कश्चित्तत्पत्नीभक्षणोत्सुकः । बोध-यामास नृपतिं बलिं तस्मै स भूपतिः ९ दानार्थे चैव समये सप्तवर्षात्मकं द्विजम् । समयं कृत-वान्राजा सत्येनान्यगृहं ययौ १० अमात्यैः संमतं कृत्वा स्वर्णलक्षं ददौ द्विजे । मध्यं बालं पुर-स्कृत्य राक्षसाय बलिं ददौ ११ मृत्युकाले द्विजसुतो विहस्यैवं रुरोद ह । कथं हास्यं कृतं तेन तत्पश्चाद्रोदनं कथम १२ इति श्रुत्वा नृपः प्राह शृणु वैतालिक द्विज । ज्येष्ठपुत्रे पितुर्हार्द्यं मातृहार्द्यमवार्यकम् १३ ज्ञात्वा स मध्यमं पुत्रं राजानं शरणं शयौ । निर्दयो रूपसेनश्च पत्नीकल्या-णभिक्षुकः १४ खड्गहस्तं नृपं ज्ञात्वा जहास शिवतत्परः । राक्षसाय शरीरं मे प्राप्तमस्माद्रुरोद

निघून स्वर्गलोकीं गेला ३९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखउनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥

वेताल ह्मणतो – चित्रकूटावर रूपदत्त या नावाचा राजा होता. तो एका वनांतील मृगाच्या मागें लागून दुसऱ्या वनात शिरला १. मध्यान्हसमयीं सरोवराच्या काठीं त्याने मुनिकन्येस पाहिलें. ती रूप व यौवन यांनीं युक्त असलेली कन्या कमलपुष्पें वेंचित होती २. तिचे नेत्र राजाच्या नेत्रांशीं मिळून एकरूप झालें. इतक्यात तेथें प्राप्त झालेला ब्राह्मण त्यास पाहता झाला ३. त्याच्या केवल दर्शनानेंच राजास ज्ञान प्राप्त झालें. व विनयानें नम्र झालेला तो राजा त्यास उत्तम धर्म विचारिता झाला ४. तेव्हा शहाण्या मुनीनें त्यास धर्मोपदेश केला. दया करावी, धर्माचें रक्षण करावें व निर्भयाच्या दानासारिखें दान कधीं झालेलें किंवा होणारें नव्हे. (अभयदान सर्वांत श्रेष्ठ आहे) ५. अयोग्य पुरुषास दंड करावा. योग्य पुरुषाच्या पूजेचे फल मिळतें. गाय व ब्राह्मण यांच्या ठायीं समभाव ठेवावा. दंड व निग्रह यांच्या वेळीं मनाची समता ठेवावी ६. देवपूजेमध्यें सत्यता, गुरुपूजेमध्यें दमता, दानसमयीं मृदुता व नित्य कर्मामध्यें असंतोष ठेवावा ७. असें बोलून तो मुनि राजास आपली कन्या देता झाला व गृहीं गेला. राजाही तिच्यासह वडाच्या झाडाखालीं निजला ८. तेव्हा कोणी एक राक्षस त्याच्या पत्नीस खाण्याविषयीं उत्सुक होऊन त्या बलवान राजास जागा करिता झाला. तेव्हा राजा सातव्या दिवशीं त्यास सात वर्षांचा ब्राह्मणपुत्र देण्याचें कबूल करून सत्याच्या प्रतिज्ञेनें घरीं गेला ९,१०. अमात्यासह विचार करून त्यानें ब्राह्मणास लक्ष सुवर्ण दिलें व त्याचा मध्यम बालक घेऊन त्याचा राक्षसास बलि देता झाला ११. मृत्युसमयीं तो बालक मोठ्यानें हंसून रडला. पण त्यानें हास्य काय ह्मणून केलें व तो रडला का ! १२ हें ऐकून राजा ह्मणाला " हे वेताल ब्राह्मणा, ऐक. ज्येष्ठ पुत्रावर पित्याचें प्रेम असतें व कनिष्ठावर मातेचें अनिवार्य प्रेम असतें १३ हें जाणून तो मध्यम बालक राजास शरण आला. रूपसेन निर्दयी व पत्नीच्या कल्याणाकरिता भिक्षा मागणारा होता १४. राजा हातात तरवार घेतलेला आहे असें पाहून तो शिवतत्पर पुत्र हसला व राक्षसास माझें शरीर मिळालें ह्मणून रडला " १५. ह्याप्रमाणें

ह १५ [१०५२] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयतिहाससमुच्चय एकोनत्रिंशोऽध्यायः ॥ १९ ॥

सूत उवाच ॥ इति श्रुत्वा स वैतालो नृपं प्राह पुनः कथाम् । विशालनगरे रम्ये विपुलेशो महीपतिः १ तस्य ग्रामेऽवसद्वैश्योऽर्थदत्तो विपणे रतः । अनङ्गमञ्जरी कन्या तस्य जाता मनोरमा २ सुवर्णनाम्ने वैश्याय पिता वै दत्तवान्स्वयम् । कदाचित्कमलग्रामात्सुवर्णो द्वीपमागमत् ३ द्रव्यलाभाय व्यवसच्चिर कालं स लुब्धवान् । अनङ्गमञ्जरीगेहं दैवयोगादुपागतम् ४ कमलाकरनामाऽसौ कृत्ययोगात्समागत. । होमान्ते सुन्दरी नारी मार्जनार्थे समागता ५ दृष्ट्वा तां कामकलिकां मुमोह द्विजसत्तमः । सुतोऽपि मदघूर्णाक्षी विधाय समयं ददौ ६ निशीथे तम उद्भूते त्व मां प्राप्य सुखी भव । इति श्रुत्वा द्विजो वाक्य तस्या ध्यान तदाऽकरोत् - कामाग्निना चिरं तप्तः सुष्वाप परमासने । अर्धरात्रे तु सा नारी द्विजागमनतत्परा ८ मार्गमन्वेषमाणा सा प्रियस्य स्मरपीडिता । नागतः स द्विजो दैवात्तदा सा मरणं गता ९ कमलाकर एवाशु समयान्ते समाययौ । दृष्ट्वा मृत्युवशां सुभ्रु स्वयं मरणमागतः १० प्रभाते चार्धदग्धौ वै दाहयामास तां शुचा । सुवर्णश्च तदागत्य विललाप प्रियां प्रति ११ चितायां भस्मसाद्भूत स्वर्गलोके तु ते ययुः । इत्युक्त्वा स तु वैतालो नृपतिं प्राह विक्रमम् १२ कस्य स्नेहोऽधिकस्तेषां कुतः स्वर्गपुर ययौ । राजावाच ॥ पतिस्नेहोऽधिकस्तेषां मध्यमौ नारिविक्रकौ १३ द्विजस्नेहेन सा नारी मृता स्वर्गपुरं ययौ । वैश्यवर्णैः सदा पूज्यो ब्राह्मणो ब्रह्ममूर्तिमान् १४ द्विजोऽपि

श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा एकोणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥

सूत ह्मणतातः—हें ऐकून तो वेताल राजास पुनरपि कथा सांगू लागला रम्य विशालनगरामध्यें विपुलेश ह्मणून राजा होता. त्या ग्रामामध्यें व्यापारामध्यें निमग्न असणारा अर्थदत्तसज्ञक वैश्य रहात असे. त्यास अनंगमंजरी ह्मणून मनोरम कन्या झाली १,२. तेव्हा स्वत: तिच्या पित्यानें सुवर्णनामक वैश्यास ती दिली. एकदा सुवर्ण कमलग्रामाहून द्रव्य मिळविण्याकरिता द्वीपांतरास गेला व तो लोभी तेथेंच पुष्कळ काळ राहिला. तेव्हा इकडे अनंगमंजरीच्या गृही दैवयोगानें कमलाकरनामक उत्तम ब्राह्मण काहीं कामामुळें आला. होम झाला असता ती सुंदर स्त्री मार्जनाकरिता आली ३- ५. त्या कामकलिकेस पाहून तो उत्तम ब्राह्मण मोहित झाला व मदानें जिचे नेत्र फिरून गेले आहेत अशी ती स्त्रीही त्या ब्राह्मणास वचन देती झाली ६ कीं, मध्यरात्री काळोख पडला असता तू मजकडे येऊन सुखी हो. हें वाक्य ऐकून ब्राह्मणानें तिचें ध्यान केलें. पुष्कळ काळ कामाग्नीनें तप्त झाल्यावर तो उत्तम आसनावर निजला. इकडे मध्यरात्रीं ती स्त्री ब्राह्मणाच्या आगमनामध्यें तत्पर होत्साती व त्या प्रियाची वाट पहात कामपीडित होत्साती दैवयोगानें तो ब्राह्मण न आल्यामुळें मरण पावली ७-९. पुढें ठरलेली वेळ टळून गेल्यावर तो कमलाकर ब्राह्मण आला. पण ती सुंदरी मृत झाली आहे असें पाहून स्वतः मरण पावला. प्रात:काळीं अर्थदत्तानें तिला मोठ्या दु:खानें जाळिले. नतर सुवर्ण आला व आपल्या प्रियेस उद्देशून विलाप करिता झाला १०,११. व चितेमध्यें भस्मभूत होऊन ते सर्व स्वर्गलोकीं गेले. असें बोलून तो वेताल विक्रमराजास ह्मणाला १२ " त्यामध्ये अधिक स्नेह कोणाचा? व तीं स्वर्गलोकीं कशीं गेलीं ?" राजा ह्मणतो:— त्यापैकीं पतीचा स्नेह अधिक आणि स्त्री व ब्राह्मण याचा स्नेह मध्यम होय १३. ब्राह्मणाच्या स्नेहानें ती स्त्री मेली व स्वर्गलोकीं गेली. कारण, वैश्यवर्णास ब्रह्मरूप ब्राह्मण सदा पूज्य होय १४. ब्राह्मणासही स्त्री प्राप्त झाली नाहीं ह्मणून तो हृदयामध्यें

जामवाक्षारीं तदा स्वर्गगतिं हरिम् । हृदि कृत्वा च निधनं भार्या ह्यस्मात्रिविद्युषम् १५ सुवर्णा हृदि सञ्जात्वा मतिमया ब्रह्मवत्सला । मां त्यक्त्वा तु दिवं याता वह्निदाहमभावतः १६ [१०६८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये विंशोऽध्यायः ॥ २० ॥

सूत उवाच ॥ इत्युक्त्वा स तु वैतालो राजानं प्राह नम्रधीः । जयस्थलपुरे रम्ये वर्धमानो नृपोऽभवत् १ तस्य ग्रामेऽवसद्विप्रो वेदवेदाङ्गपारगः । विष्णुस्वामीति विख्यातो राधाकृष्णपरायणः २ चत्वारश्चात्मजास्तस्य चतुर्भागपरायणाः । द्यूतकर्मा च कुलटो विषयी नास्तिकः श्रुतः ३ कदाचिद्दैवयोगेन निर्धनत्वं च ते गताः । पितरं विष्णुशर्माणं ते नम्रे विनयान्विताः ४ ऊचू रमा कथं नष्टा तद्दस्व पितः प्रिय । पितोवाच तु तच्छ्रुत्वा द्यूतकर्मान्नमाय ५ द्यूतो धनक्षयकरः पापमूलो महाखलः । व्यभिचाररतथा चौर्यं निर्दयत्वमतो भवेत् ६ द्यूतकर्मप्रभावेण त्वदीयं द्रव्यसक्षयम् । धनोपायेन भो पित्रोर्वाक्यं कुरु मतिं प्रति ७ तीर्थव्रतप्रभावेण त्वत्पापं संक्षयं भवेत् । हे पुत्र कुलटत्वं वै वैश्यासङ्गं महाशुभम् ८ त्यक्त्वा ब्रह्मपरो भूत्वा ब्रह्मचर्यं मतिं कुरु । विषयिन्मांसमदिरे नित्यपापविवर्धके ९ अतः प्राप्स्यति चौर्यत्वमतो वै निरयं तथा । तस्मात्त्वं प्रभुमीशानं विष्णुं जिष्णुं जगत्पतिम् १० निवेद्य सर्वथा द्रव्यं स्वयं भुङ्क्ष्वेति वारयतः । नास्तिकत्वं देवनिन्दां परित्यज्य मतिं कुरु ११ आत्मा सर्वाभयोनित्यमात्मशक्तिश्च चण्डिका । आत्मनोऽङ्गानि देवाश्च सर्वजीवगुहाशयाः १२ ताञ्ज्ञात्वा पूजनं तेषां कुरु त्वं पापशान्तये । इति तं वचनं श्रुत्वा गता-

---

स्वर्गगतिरूप हरीस धरून मेला व त्यामुळें स्वर्गलोकीं गेला. सुवर्णा " माझी भार्या ब्राह्मणास प्रिय होती व अग्नीच्या प्रभावानें ती स्वर्गलोकीं गेली " हे मनात जाणता झाला १५,१६. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥

सूत म्हणतात —असें बोलून ज्याची बुद्धि विनययुक्त आहे असा तो वेताळ राजास म्हणाला:— रम्य जयस्थलपुरामध्यें वर्धमाननामक राजा होता १. त्याच्या गावात वेद व वेदांग यांत पारंगत व राधाकृष्णपरायण असा विष्णुस्वामी या नांवाचा एक ब्राह्मण रहात असे २. चार भागांमध्यें परायण असे त्यास चार पुत्र होते. द्यूतकर्मा, कुलट, विषयी व नास्तिक अशी त्यांचीं नांवें होतीं. एकदा दैवयोगानें ते निर्धन झाले असता विष्णुसंज्ञक पित्यास नम्र होऊन म्हणाले ' प्रिय बाबा, लक्ष्मी कशी नष्ट झाली तें आम्हांस सांगा ' तें ऐकून पिता म्हणाला ' हे द्यूतकर्मन, ऐक ३–५. द्यूत महादुष्ट, पापाचें मूळ व द्रव्याचा क्षय करणारें आहे. द्यूताच्या योगानें व्यभिचार, चोरी व निर्दयता हे दोष घडतात ६ द्यूतकर्माच्या प्रभावानें तुझ्या द्रव्याचा क्षय झाला आहे. यास्तव, आता धनाच्या उपायानें मातापितरांचें वाक्य ऐकून सद्बुद्धि धर ७. तीर्थ, व्रतें इत्यादिकांच्या प्रभावानें तुझ्या पापाचा क्षय होईल. हे पुत्रा कुलटा, तूं वेश्येचा मोठा अमंगल संग सोड व ब्रह्मपरायण होऊन ब्रह्मचर्य पाळण्याविषयीं निश्चय कर. हे विषयिन् पुत्रा, मांस व मदिरा हे दोन पदार्थ नित्य पाप वाढविणारे आहेत ८,९. त्यांच्यामुळें चौर्यत्व हा दोष अंगात येतो व त्यांच्यापासून नरक मिळतो. यास्तव तूं प्रभु, ईश्वर, व्यापी व जयशील अशा जगत्पतीस सर्व वित्त निवेदन करून नंतर वाणीचे नियमन करून स्वतः भोग घे. बा नास्तिका, तूं देवांची निंदा सोडून चांगली बुद्धि धर १०,११. आत्मा सदा सर्वांस अभयरूप आहे. चंडिका ही आत्म्याची शक्ति आहे. सर्व जीवांच्या बुद्धिरूप गुहेमध्यें असणारे देव आत्म्याचीं अंगें आहेत १२. त्यांस जाणून, पापाची शांति व्हावी म्हणून तूं त्यांचें पूजन

स्तीर्थान्तरं प्रति १३ शिवमाराधयामासुर्विद्यार्थं सर्वरूपिणम् । वर्षान्ते च महादेवो विद्यां संजीवनीं ददौ १४ ते प्राप्य ज्ञानमागत्य परीक्षार्थं समुद्यताः । मृतव्याघ्रास्थिने श्रेष्ठो मन्त्रपूतम्बु चाक्षिपत् १५ तेन मन्त्रप्रभावेण पञ्जरत्वमुपागतम् । तस्योपर्येव कुलटो मन्त्रपूतं पयोऽक्षिपत् १६ घनमांसं च रुधिरं तेन मन्त्रेण चाभवत् । विषयी चाक्षिपच्चैव तस्योपरि जलं शुभम् १७ तेन मन्त्रप्रभावेण त्वक्प्राणत्वमुपागतम् । सुप्तं व्याघ्रं च संज्ञाता नास्तिकस्तु जलं ददौ ८ मन्त्रेण बोधितो व्याघ्रस्तांश्च विप्रानखादयत् । सूत उवाच ॥ इत्युक्त्वा स तु वैतालो राजानमिदमब्रवीत् १९ राजन्मूर्खो हि कस्तेषां श्रुत्वा राजा ह्यवीदिदम् । बोधितो येन स व्याघ्रः स मूर्खस्त्वधिको मतः २० इति श्रुत्वा द्विजश्रेष्ठो वैतालः पुनरब्रवीत् २१ [१०८९] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये एकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥

वैताल उवाच ॥ राजन्विल्ववतीग्रामे गङ्गायामुनमध्यगे । अहं पूर्वभवे चासीत्क्षत्रसिंहो महीपतिः १ तस्य ग्रामेऽवसद्विप्रो वेदवेदाङ्गपारगः । शम्भुदत्त इति ख्यातो रुद्रभक्तिपरायणः २ उभयौ तनयौ तस्य सर्वविद्याविशारदौ । विष्णुभक्तः सुतो ज्येष्ठो नाम्ना लीलाधरो बली ३ शाक्तोऽभवत्तदनुजो मोहनो नाम विश्रुतः । कदाचित्क्षत्रसिंहस्तु यज्ञार्थी यज्ञहेतवे ४ शम्भुदत्तं समाहूय ससुतं धर्मकोविदम् । स्वयं च कारयामास च्छागमेधं सुरप्रियम् ५ शम्भुदत्तस्तु वृद्धात्मा शिवभक्तिपरायणः । चतुश्चक्रांश्च संस्थाप्य कलशं कार्यसिद्धिदम् ६ हव्यैः सुसंस्कृतैः रम्यैश्चकार हवनं मुदा । छागमाहूय विधिवत्पूजयामास भूपतिः ७ लीलाध-

---

कर.' हें वचन ऐकून ते तीर्थाप्रत गेले १३. विधेकरिता त्यानीं सर्वरूपी शिवाची आराधना केली. एका वर्षान्या शेवटीं महादेवानें त्यास संजीविनी विद्या दिली १४. त्या विद्येस प्राप्त करून घेऊन ते परीक्षा पाहण्यास तयार झाले. श्रेष्ठ भ्रात्यानें मेलेल्या वाघाच्या हाडांवर मंत्रविलेलें पाणी शिंपडलें. तेव्हा त्या मंत्राच्या प्रभावानें त्या हाडाचा अस्थिपंजर बनला. त्याच्यावर कुलटानें मंत्रानें पवित्र केलेलें पाणी शिंपडलें. त्याबरोबर त्या मंत्राच्या योगानें मांस व रक्त यांनी तो पुष्ट झाला. विषयी-नामक त्यातील तिसऱ्या भ्रात्यानेंही त्याच्यावर शुभ जल फेकिलें १६-१७. त्या मंत्राच्या प्रभावानें त्यास त्वचा व प्राण आले तेव्हा तो व्याघ्र निजला आहे असें जाणून नास्तिकानें त्याच्यावर उदक सोडिलें १८. त्याबरोबर मंत्रप्रभावाने जागृत झालेल्या त्या व्याघ्रानें त्या ब्राह्मणास खाऊन टाकिलें. सूत म्हणतात.—असें बोलून तो वेताल राजास म्हणाला १९. " राजा, त्याच्यापैकीं मूर्ख कोण ? " हा प्रश्न ऐकून राजा म्हणाला " ज्यानें व्याघ्रास जागविले तो अधिक मूर्ख होय " २०. हे ऐकून द्विज-श्रेष्ठ वेताल पुनः सांगूं लागला २१. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणान्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्ग-पर्वातिल कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥

वेताल म्हणतो – राजा, गंगा व यमुना यान्या मध्यभागीं असलेल्या विल्ववती ग्रामामध्यें मी पूर्व-जन्मीं क्षत्रसिंह भूपाल होतों १. त्या राजाच्या ग्रामात रुद्राच्या भक्तींत परायण व वेदवेद गात निष्णात असा शंभुदत्त या नावाचा ब्राह्मण रहात असे २. सर्व विद्यामध्यें निपुण असे त्यास दोन पुत्र होते. त्यातील लीलाधरनामक ज्येष्ठ पुत्र महाविष्णुभक्त म्हणून व मोहननामक कनिष्ठ पुत्र शक्तीचा भक्त म्हणून प्रसिद्ध होता. कोणे एके समयीं यज्ञ करण्याची इच्छा करणारा क्षत्रसिंह, यज्ञाकरिता पुत्रासह धर्मज्ञ शंभुदत्तास बोलावून देवांस प्रिय असलेला छागयज्ञ स्वत. करविता झाला ३—५. तेव्हा वृद्ध झालेला व शिवभक्तीमध्यें परायण असणारा शंभुदत्त चार चक्राची स्थापना करून व कार्यसिद्धि देणारा कलश स्थापून ६, उत्तम प्रकारें संस्कृत व

रस्तु तं दृष्ट्वा छागं मरणोन्मुखम् । दयालुर्बुद्धिमांल्लीलाधरो विष्णुपरायणः ८ दारुणं नरकं योग्यमनया जीवहिंसया । सर्वथा भगवान्विष्णुर्हिंसायज्ञेन दुष्यति ९ इति श्रुत्वा वचस्तस्य ज्येष्ठबन्धोश्च मोहनः । मृदुपूर्वं जहासोच्चैर्वचनं प्राह नम्रधीः १० पुरा सत्ययुगे भ्रातर्ब्राह्मणा यज्ञतत्पराः । अजेनैव हि यष्टव्यमिति ज्ञात्वा परश्रुतिः ११ तिलाधिकमजं मत्वा हव्यं ते तु मनो दधुः । तदा शक्रादयो देवा वह्निमध्ये समागताः १२ ऊचुस्ते मधुरं वाक्यं त्वन्मतं निष्फलध्रुवम् । अजश्छागः स्मृतो वेदैस्तेन यष्टव्यमन्तरम् १३ श्रुतेरिति वचनं तेषां विस्मिता मुनयोऽभवन् । एतस्मिन्नन्तरे तत्र पितृयानिरमावसुः १४ विमानं परमारुह्य मुनीन्प्रोवाच निर्भयः । छागमेधेन यष्टव्यं सुरार्णां तृप्तिहेतवे १५ इति श्रुत्वा वचस्तस्य तथा कृत्वा शिवं ययुः । तस्मात्त्वं च मया सार्द्धं यज्ञं कुरु महामते १६ इति श्रुत्वा वचो घोरं लीलाधरः उदारधीः । मोहनं प्राह धर्मात्मा यज्ञस्त्रेतायुगेऽभवत् १७ रजोगुणमयो लोकस्तायां सत्ययुगे हि । हिंसा सत्ययुगे नासीच्चतुष्पादं १८ हव्यैन तर्पिता देवा न मांसै रक्तसम्भवै । इति श्रुत्वा क्षत्रसिंहस्त्यक्त्वा छागं भयातुरम् १९ फलाद्यैः कारयामास तदा पूर्णाहुतीर्नृप । एतस्मिन्नन्तरे देवी तामसी क्रोधमूर्छिता २० नगरं दाहयामास नरनारीसमन्वितम् । महामायाप्रभावेन शम्भुदत्तः शिवप्रियः २१ संभूत्वा च महोन्मादी त्यक्त्वा देहं दिवं ययौ तदा लीलाधरो विप्रो दशपुत्रैरुपजीविकः २२ बालानध्यापयामास ग्रामे पद्मपुरे शुभे । क्षत्रसिंहस्तु नृपतिर्मोहनान्ति-

---

रम्यं हव्य पदार्थांनीं आनंदानें हवन करिता झाला व छागास आणून राजा त्याचें यथाविधि पूजन करिता झाला ७. इतक्यात दयाळु, बुद्धिमान् व विष्णुभक्त लीलाधर, तो बकरा मरणोन्मुख झाला अ हे असें पाहून क्रोधानें म्हणाला " या जीवाच्या हिंसेनें दारुण नरक योग्य होय. भगवान् विष्णु हिंसामय यज्ञानें सर्वथा दूषित होतो " ८,९. हे त्या ज्येष्ठ बंधूचें भाषण ऐकून मोहन प्रथम थोडें हसला व नंतर नम्रपणे पण मोठ्यानें म्हणाला १० " हे भ्रात्या, पूर्वी सत्ययुगामध्यें यज्ञतत्पर ब्राह्मण अजाच्या योगानेंच यजन करावें हें श्रेष्ठ श्रुतिवचन जाणून ११ व तिलाचाच अज अधिक आहे असें मानून ते हव्यामध्येच मन लावीते झाले. तेव्हा इंद्रादि देव अग्नीमध्यें आले १२ व ते त्यास असें मधुर वचन बोलले. तुझें मत निष्फळ आहे. वेदानें अजच्छाग सांगितलेला आहे. ह्यास्तव, त्यानेंच अग्नीमध्ये हवन करावें १३. असे त्याचें वचन ऐकून मुनि विस्मययुक्त झाले. इतक्यात तेथे पितराच्या पूर्वज अमावसु विमानात बसून आला व निर्भयपणे मुनीस म्हणाला " देवाच्या तृप्तीकरिता छागमेधानें यजन करावें " १४,१५. हे त्याचें वचन ऐकून व त्याप्रमाणे करून तें शिवाप्रत पोंचले. ह्यास्तव, बा महामते, तू माझ्याबरोबर यज्ञ कर १६. हें घोर वचन ऐकून उदार बुद्धीचा धर्मात्मा लीलाधर मोहनास म्हणाला " यज्ञ त्रेतायुगात झाला १७. त्रेतायुगात लोक रजोगुणमय झाले. सत्ययुगामध्यें हिंसा नव्हती, त्यावेळीं धर्म चतुष्पाद (संपूर्ण) होता १८. त्यावेळी देव हव्यानें तृप्त केले जात असत. रक्तपातापासून निर्माण होणाऱ्या मासानीं त्यास कोणीही तृप्त करीत नसत ". हें ऐकून बा राजा, क्षत्रसिंह भयभीत झालेल्या छागास सोडून फलादिकाच्या योगानें पूर्णाहुति करविता झाला. इतक्यात क्रोधानें मूर्च्छित झालेली तामसी देवी तें स्त्रीपुरुषानीं भरलेलें नगर जाळती झाली. महामायेच्या प्रभावानें शिवभक्त शंभुदत्त अतिशय उन्मादी होऊन व देह सोडून स्वर्गास गेला. तेव्हा दहा पुत्रावर उपजीविका करणारा लीलाधर ब्राह्मण शुभ पद्मपुरामध्ये बालकांस शिकवूं लागला. क्षत्रसिंह राजाही मोहनाकडे आला व देवमातेच्या अनुग्रहाकरिता तिला प्रसन्न करविता झाला. मोहन म्हणतोः—बीजमंत्राच्या जपामुळें

कमायधौ २३ प्रसादं कारयामास देवमातुरनुग्रहम् । मोहन उवाच ॥ बीजमन्त्रजपाद्ब्रह्मा ब्राह्मीं शक्तिमवाप्तवान् २४ तदम्बायै नमस्तुभ्यं महावीरायै नमो नमः । जप्त्वा सप्तशतीं विष्णुर्वैष्णवीं शक्तिमाप्तवान्२५ तदम्बायै नमस्तुभ्यं महालक्ष्म्यै नमो नमः । प्रणवाम्भनया यस्यास्तुरीयपुरुषप्रियाः२६ तदम्बायै नमस्तुभ्यं प्रणवायै नमो नमः । यया दृश्यमिदं जातं यया वै पाल्यते जगत्२७ यस्या देहे स्थितं विश्वं तदम्बायै नमो नमः । शर्वी सिद्धिस्तथा मृत्युः प्रभा गीर्वाणसैनिकाः २८ स्वाहा च निर्ऋतिी रात्रिर्ऋद्धिर्भुक्तिस्त्वदुद्भवा । लोकपालप्रिया त्वं हि लोकमातर्नमो नमः२९ तृष्णा तृप्तिी रतिर्नीतिर्हिंसा क्षान्तिर्मतिर्गतिः । निन्दा स्तुतिस्तथेर्ष्या च लज्जा त्वं हि नमो नमः ३० इत्यष्टकप्रभावेण क्षत्रसिंहो महीपतिः ३१ शिवलोकं गतः साधुर्वेतालत्वमवाप्तवान् । तस्मात्त्वं विक्रमादित्य भज दुर्गां सनातनीम् ३२ शिवाज्ञया त्वहं प्राप्तस्त्वत्समीपे महीपते । प्रश्नोत्तरेण भूपाल मया त्वं समपरीक्षितः ३३ भुजयोस्ते स्थितिर्मे स्याज्जहि सर्वरिपून्भुवि । दस्युनष्ट्राः पुरीः सर्वाः क्षेत्राणि विविधानि च ३४ शास्त्रप्रमाणेन संस्थाप्य समयं कुरु भो नृप । यो नृपः सर्वतीर्थानि पुनरुद्धारयिष्यति ३५ स हि मत्स्थापितं सर्वं विपरीतं करिष्यति । विक्रमाख्यानकालोऽयं पुनर्धर्मं करोति हि ३६ द्वादशाब्दशतं वर्षं द्वापरो हि प्रवर्तते । तदन्ते भुवि कृष्णांशो भविष्यति कलावली ३७ म्लेच्छवंशविवृद्ध्यर्थं म्लेच्छवंशविवृद्धये । सूताद्या मुनयः सर्वे नैमिषारण्यवासिनः३८ विशालायां समागत्य चक्रतीर्थनिवासिनः भविष्यन्ति महाराज पुराणश्रवणे रताः ३९ इत्युक्त्वा स तु वेतालस्तत्रैवान्तरधीयत । नृपतिर्विक्रमादित्यः परमानन्दमाप्तवान् ४० तस्माद्यूयं मुनिश्रेष्ठा

ब्रह्मदेवास ब्राह्मी शक्ति प्राप्त झाली. त्या तुज अंबेस नमस्कार असो. तुज महावीरेस नमस्कार करितों. सप्तशतीचा जप करून विष्णु वैष्णवी शक्तास प्राप्त करून घेता झाला. त्या तुज अंबेस नमस्कार असो. तुज महालक्ष्मीस मी वारवार नमस्कार करितों. ॐकार हे जिचे पुत्र आहेत व जी तुरीय पुरुषास प्रिय आहे त्या तुज अंबेस नमस्कार असो. तुज प्रणवरूपिणीस नमस्कार करितों. जिच्या योगानें हें दृश्य निर्माण झालें व जिच्या योगाने ह्याचें पालन केलें जातें आणि जिच्या देहामध्यें हें विश्व स्थित आहे त्या अंबेस नमस्कार असो. शर्वी, सिद्धि, मृत्यु, प्रभा, गीर्वाणसैनिका१९-२८, स्वाहा, निर्ऋति, रात्रि, ऋद्धि व भुक्ति या तुझ्यापासून उत्पन्न झालेल्या आहेत. तूं लोकपालास प्रिय आहेस. हे लोकमाते, तुला वारवार नमस्कार असो २९. तृष्णा, तृप्ति, रति, नीति, हिंसा, क्षांति, मति, गति, निंदा, स्तुति, ईर्ष्या, व लज्जा तूच आहेस. तुला नमस्कार असो ३०. या अष्टकाच्या प्रभावानें क्षत्रसिंह राजा शिवलोकास गेला व या साधु वेतालभावास प्राप्त झाला. यास्तव, हे विक्रमादित्या तू सनातन दुर्गेचें सेवन कर ३१,३२. हे भूपाला, शक्रराज्ञेनें मी तुझ्या जवळ आलो आहे. राजा, प्रश्न व उत्तर यांच्या द्वारा मी तुझी परीक्षा पाहिली ३३. तुझ्या भुजांचे ठायीं माझी स्थिति होईल. तूं भूलोकातील सर्व शत्रूंस मार. सर्व नगरें चोरांनीं रहित करून सोड. शास्त्रप्रमाणाने अनेक क्षेत्रें निर्माण करून न्यम कर. बा राजा, जो राजा सर्व तीर्थांचा पुनरपि उद्धार करील त्याने मी स्थापिलेलें सर्व केलें असें होईल. नाहीपेक्षा त्याच्या उलट केल्यासारिखे होईल. बा विक्रमा, हा कीर्तीचा काल आहे व पुनः धर्म केल्यासारिखे होईल. आता बाराशे वर्षे द्वापर चालेल. त्याच्या शेवटीं भूलोकी महाबलवान् कृष्णांश कलीच्या उद्धाराकरिता व म्लेच्छवंशाच्या वृद्धीकरिता उत्पन्न होईल. नैमिषारण्यात रहाणारे सूतादि सर्व मुनि, बा महाराजा, विशालेमध्यें येऊन पुराणश्रवणामध्यें रत होत्साते चक्रतीर्थावर राहूं लागतील ३४-३९. असें बोलून तो वेताल तेथेच अंतर्धान पावला व राजा विक्रमादित्यासही परमानंद

ज्ञात्वा सन्ध्यां समागताम् । शिवं भजत सर्वे तं ध्याननिष्ठासमन्विताः ४१ [१११०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

व्यास उवाच ॥ इति श्रुत्वा तु मुनयो विशालां नगरीं स्थिताः । स्नात्वा केदारकुण्डे ते मनसाऽपूजयञ्छिवम् १ समाधिनिष्ठास्ते सर्वे वर्षमेकं व्यतीतयन् । एतस्मिन्नन्तरे राजा विक्रमादित्यभूपतिः २ नत्वा मुनीन्समाधिस्थांस्तुष्टाव परया गिरा । उक्त्वा ते तु मुनयः सूतं गच्छाऽब्रुवन्निदम् ३ सोऽयं राजा समायातो यस्यैव घोणिता कथा । वाजिमेधं च नृपतेः कारयामस्वदाज्ञया ४ भवान्हि चक्रतीर्थे च स्थित्वा ध्यानपरो भव । तथेत्युक्त्वा तु सूतस्तैः सार्धं च पुनरागमत् ५ विधिना कारयामासुर्मेधं महामखम् । पूर्वं तु कपिलस्थान दक्षिणे सेतुबन्धनम् ६ पश्चिमे सिन्धुनद्यन्तं चोत्तरे बदरीवनम् । हयो जगाम तरसा ततः क्षिप्रां नदीं गतः ७ त्यक्त्वा कलेवरं ह्यग्नौ स्वर्गलोकमतो ययौ । नृपयज्ञे सुराः सर्वे सपत्नीकाः समागताः ८ चन्द्रमास्तत्र नायातो भूपतिर्विमनाऽभवत् । यज्ञान्ते विविध दानं दत्त्वा वैतालसयुतः ९ चन्द्रलोकं गतो राजा चन्द्रमाः सुखितोऽभवत् । भो भो राजन्महाभाग कलौ प्राप्ते भयङ्करे १० मद्गतिर्भूतले नास्ति तस्मान्नायामि तेऽन्तिकम् । दत्त्वा सुधामयं तोयं चन्द्रश्चान्तर्दधे पुनः ११ इत्याश्वेन्द्रस्तव संप्राप्य द्विजरूपी ह्ययाचयत् । दत्तं राज्ञा तदमृतं शक्रः स्वर्गमुपागतः १२ तेन तस्य फलं जातमायुर्लक्षसमं ह्यभूत् । तस्मिन्काले द्विजः कश्चिज्जयन्तो नाम विश्रुतः १३ तत्फलं

झाला ४०. यास्तव, हे श्रेष्ठ मुनिहो, तुम्ही युगाचा सध्यासमय प्राप्त झाला आहे असे जाणून, ध्याननिष्ठायुक्त होत्साते सर्वेश्वर शंकरास भजा ४१. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२ ॥

व्यास ह्मणतातः— असें ऐकून मुनि विशालनगरीत जाऊन राहिले. ते केदारकुंडामध्यें स्नान करून मनानें शंकराचे पूजन करिते झाले १. समाधिनिष्ठ राहून त्यानीं एक वर्ष घालविलें. इतक्यात पृथ्वीचें रक्षण करणारा राजा विक्रमादित्य त्या समाधिस्थ मुनींस नमस्कार करून त्याची परावाणीनें स्तुति करिता झाला. तेव्हा ते मुनि राजास ठेवून घेऊन सूताजवळ जाऊन असे बोलूं लागले, "ज्याची तूं आह्मास कथा सांगितलीस तो हा राजा आला आहे. तुझ्या आज्ञेनें आह्मी राजाचा अश्वमेध करविणार आहोत २-४. यास्तव, तू चक्रतीर्थावर राहून ध्यानपरायण हो". तेव्हा 'ठीक आहे' असें ह्मणून सूत त्याच्याबरोबर पुनः आला ५. व अश्वमेधनामक महामख त्यानीं यथाविधि करविला. पूर्वेस कपिलस्थानापर्यंत, दक्षिणेत सेतुबंधास ६, पश्चिमेत सिंधुनदीपर्यंत व उत्तरेत बदरीवनास तो घोडा स्वरेने गेला. तेथून तो क्षिप्रानदीपर्यंत गेला ७. नंतर आपलें शरीर अग्नीमध्ये समर्पण करून त्यामुळे तो स्वर्गलोकीं गेला. राजाच्या यज्ञामध्ये सर्व देव पत्नीसह तेथें आले, पण चंद्रमा आला नाही. त्यामुळें राजाचें मन उद्विग्न झालें. यज्ञाच्या शेवटीं विविध दानें देऊन वेतालासह राजा चंद्रलोकीं गेला व त्यामुळे चंद्रमा सुखी झाला. तो ह्मणाला " बा राजा, बा महाउदारा, भयंकर कलि प्राप्त झाला असता माझी गति भूतली होत नाहीं. त्यामुळें मी तुजकडे आलों नाहीं. " नंतर त्यास अमृतमय जल देऊन चंद्रमा पुनः गुप्त झाला ८-११. पण हें वर्तमान जाणून इंद्र ब्राह्मणाचे रूप घेऊन आला व त्याच्याजवळ अमृतमय जलाची याचना करूं लागला. राजाने त्यास ते अमृत दिलें. नंतर इंद्र स्वर्गलोकीं गेला १२. त्याच्या योगानें त्याचें फल झालें व आयुष्य एक लक्ष वर्षे झालें. त्यावेळी कोणी एक जयन्तनामक प्रसिद्ध ब्राह्मण तपाच्या योगाने ते फल इंद्रापासून मिळविता झाला

द्रव्यसा प्राप्य शक्रस्य स्वगृहं ययौ । जयन्तो भर्तृहरये लक्षैस्वर्णेन वर्णयन् १४ भुक्त्वा भर्तृहरि-रिदम्य योगारूढो वनं ययौ । विक्रमादित्य एवास्य भुक्त्वा राज्यमकण्टकम् १५ शत-वर्षं मुदा युक्तो जगाम मरणं दिवम् । शौनकाद्यास्तु ऋषयो ज्ञात्वा भूपस्य स्वर्गतिम् १६ नत्वा सूतं मणन्त्योचुर्धर्मं मुख्यं वदाधुना । तेऽपः सूतः पुराणानि श्रावयामास वै पुनः १७ शतवर्षं पञ्चलक्षश्लोकमन्त्रापयन्मुदा । ते श्रुत्वा मुनयः सर्वे जग्मुर्हृष्टाः स्वमालयम् १८ [११४८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

व्यास उवाच ॥ एकदा नैमिषारण्ये ऋषयः शौनकादय । पृच्छन्ति विनयेनैव सूतं पौराणिकं खलु १ भगवन्ब्रूहि लोकानां हितार्थाय चतुर्युगे । कः पूज्यः सेवितव्यश्च वाञ्छितार्थप्रदायकः २ विनायासेन वै काम प्राप्नुयुर्मानवाः शुभम् । तस्य ब्रह्मन्वदोपायं नराणां कीर्तिकारकम् ३ सूत उवाच ॥ नवाम्भोजदलेक्षणं रमाकांक्षिपात्रं चतुर्बाहुचामीकरं चारुगात्रम् । जगत्त्राणहेतुं रिपौ धूम्रकेतुं सदा सत्यनाम्नं स्तौमि देवम् ४ श्रीरामं सहलक्ष्मणं सकरुणं सीतान्वितं सात्त्विकं वैदेहीमुखपद्मलुब्धमधुपं पौलस्त्यसंहारणम् । वन्दे वन्द्यपदाम्बुजं सुरवरं भक्तानुकम्पाकरं शत्रुघ्नेन हनूमता च भरतेनासेवितं राघवम् ५ कलिकलुषविनाशं कामसिद्धिप्रकाशं सुरवरमुखभासं भूसुरैः प्रकाशम् । विबुधबुधविलासं साधुचर्याविशेषं नृपतिवरचरित्रं भोः शृणुष्वेतिहासम् ६ एकदा नारदो योगी परानुग्रहवाञ्छया । पर्यटन्विविधाँल्लोकान्मर्त्यलोकमुपा-

---

व नंतर तो आपल्या गृही आला. पुढे जयन्तानें एक लक्ष सुवर्ण घेऊन तें फल राजास दिलें १३,१४. भर्तृहरीनें त्याचा उपभोग घेऊन नंतर योगारूढ होत्साता तो चमत्कार गेला. नंतर विक्रमादित्यानेंच ह्याचे निष्कंटक राज्य आनंदाने शंभर वर्षे भोगिलें व शेवटीं तो मरून स्वर्गलोकी गेला. तेव्हां शौनकादि मुनि राजाचे स्वर्गगमन ऐकून १५,१६ सूताकडे गेले व त्यास नमस्कार करून " आह्मास आतां मुख्य धर्म सांग " असें ह्मणाले. तेव्हा सूत त्यास पुनरपि पुराणे सांगता झाला १७. शंभर वर्षांत त्यानें त्यास पांच लक्ष श्लोक आनंदानें सांगितले. ते ऐकून सर्व मुनि आनंदित होत्साते स्वस्थानी गेले १८. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥

व्यास ह्मणतातः — एकदा नैमिषारण्यामध्यें शौनकादि ऋषि पौराणिक सूतास विनयानें विचारिते झाले १. हे भगवन्, चारी युगामध्यें इष्टार्थ देणारा असा कोणता देव सेव्य व पूज्य आहे ? हें सर्व लोकांच्या हिताकरितां सांग २. हे ब्राह्मणा, आयासावांचून मानव आपल्या शुभ कामास प्राप्त होतील असा व पुरुषांचा कीर्तिकारक उपाय आह्मास सांग ३. सूत ह्मणतातः — नूतन कमलाप्रमाणे ज्याचे नेत्र आहेत; रमेच्या क्रीडेचें जें पात्र आहे, ज्याच्या चारी भुजांमध्यें सुवर्ण आहे, ज्याचें शरीर सुंदर आहे; जो जगाच्या रक्षणाचें कारण आहे व जो शत्रूंचा धूमकेतु आहे अशा सत्यनारायण देवास मी नमस्कार करितों. जो लक्ष्मणासह आहे, जो करुणायुक्त आहे, ज्याच्या बरोबर सीता आहे, जो वैदेहीच्या मुखकमलावर लुब्ध झालेला भ्रमर आहे, ज्यानें रावणाचा संहार केला आहे; जो भक्तावर अनुग्रह करणारा आहे, शत्रुघ्न, हनुमान् व भरत यांनीं ज्याची सेवा केली आहे व ज्याचें पादकमल वंद्य आहे अशा सात्त्विक देवाधिदेव राघवास मी वंदन करितों ४,५ कलीच्या मलाचा नाश करणारा, कामसिद्धीचा प्रकाश करणारा, श्रेष्ठ देवांच्या मुखास प्रकाशित करणारा, ब्राह्मणाकडून ज्ञात होणारा, देव व ज्ञानी पुरुष यांच्या विलासरूप व उत्तम आचरणाचा विशेष असा,

नमत् ७ तत्र दृष्ट्वा जनान्सर्वांल्लोकान्क्लेशसमन्वितान् । अधिव्याधिदरिद्रार्तान्मृत्यु-मानान्स्वकर्मभिः ८ कर्मोपायेन चैतेषां दुःखनाशो भवेद्ध्रुवम् । इति सञ्चिन्त्य मनसा विष्णुलोकं गतस्तदा ९ तत्र नारायणं देवं शुक्लवर्णं चतुर्भुजम् । शङ्खचक्रगदापद्मवनमालाविभूषितम् १० प्रसन्नवदनं शान्तं सनकाद्यैरभिष्टुतम् । दृष्ट्वा तं देवदेवेशं स्तोतुं समुपचक्रमे ११ नारद उवाच ॥ नमोऽव्यक्तमनन्तातीतरूपायानन्तशक्तये । नादिमध्यान्तदेवाय निर्गुणाय महात्मने १२ सर्वेषामादिभूताय लोकानामुपकारिणे । अपारपरिमाणाय तपोधाम्ने नमो नमः १३ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा स्तुतिं विष्णुर्नारदं प्रत्यभाषत । किमर्थमागतोऽसि त्वं किं ते मनसि वर्तते १४ कथयस्व महाभाग तत्सर्वं कथयामि ते । श्रुत्वा तु नारदो विष्णुमुक्तवान्सर्वकारणम् १५ नारदस्य वचः श्रुत्वा साधु साध्विति पूजयत् । शृणु नारद वक्ष्यामि व्रतमेकं सनातनम् १६ कृते त्रेतायुगे विष्णुर्द्वापरेऽनेकरूपधृक् । कलौ प्रत्यक्षफलदः सत्यनारायणो विभुः १७ चतुष्पादो हि धर्मश्च तस्य सत्यं प्रसाधनम् । सत्येन धार्यते लोकः सत्ये ब्रह्म प्रतिष्ठितम् १८ सत्यनारायणव्रतमतः श्रेष्ठतमं स्मृतम् । इति श्रुत्वा हरेर्वाक्यं नारदः पुनरब्रवीत् १९ किं फलं किं विधानं च सत्यनारायणार्चने । तत्सर्वं कृपया ब्रूहि कथयस्व कृपानिधे २० भगवानुवाच । नारायणार्चने ब्रह्मन् फलं नालं चतुर्मुखः । शृणु सङ्क्षेपतो ह्येतत्कथयामि तवाग्रतः २१ निधनोऽपि धनाढ्यः स्यादपुत्र पुत्रवान्भवेत् । भ्रष्टराज्यो लभेद्राज्यमन्धोऽपि स्यात्सुलोचनः २२ मुच्यते

श्रेष्ठ राजाच्या चरित्ररूप इतिहास ऐका १. एकदा योगी नारद नानालोकात फिरत फिरत मृत्युलोकीं आला ७. तेथे सर्व लोक नानाप्रकारचे क्लेश सहन करीत आहेत, आधि, व्याधि व दारिद्र्य यांनी पीडित झाले आहेत व आपल्या कर्मांच्या योगानें पक्व होत आहेत असें पाहून ८ त्यांच्या दुःखाचा नाश कोणत्या उपायानें नियमाने होईल असा मनामध्यें विचार करीत तो त्यावेळीं विष्णुलोकीं गेला ९. तेथें शुक्लवर्ण, चतुर्भुज, शंख, चक्र, गदा, पद्म व वनमाला यांनीं विभूषित, प्रसन्नवदन, शांत व सनकादिकांकडून स्तुत अशा देवाधिदेव नारायणास पाहून तो स्तुति करण्यास तयार झाला. नारद ह्मणतातः— ज्याचें रूप, वाणी व मन यास गोचर होणारें नाही; ज्याची शक्ति अनंत आहे, जो उत्पत्ति, स्थिति व लय यांनीं रहित आहे, जो महात्मा निर्गुण आहे; जो सर्वांच्या कारणरूप आहे; जो लोकांवर उपकार करणारा आहे; ज्याचें परिमाण अपार आहे व जो तप:स्वरूप (ज्ञानरूप) आहे अशा देवास वारंवार नमस्कार असो १०-१३. सूत ह्मणतातः—अशी स्तुति ऐकून विष्णु नारदास ह्मणाले "तूं कशाकरिता आला आहेस ? तुझ्या मनात काय आहे ? हे महाभागा, तुला विचारावयाचें असेल तें विचार ह्मणजे मी तुला सर्व सांगेन". हें ऐकून नारद विष्णूस सर्व कारण सांगता झाला १४,१५. नारदाचें भाषण ऐकून भगवान् विष्णु, "ठीक ठीक !" असें ह्मणून त्याचा सन्मान करिता झाला: "नारदा, मी तुला एक सनातन व्रत सांगेन, तें ऐक १६. कृत, त्रेता व द्वापर यामध्यें विष्णु अनेक रूपे धारण करितो व कलीमध्यें सत्यनारायण प्रभु प्रत्यक्ष फल देतो १७. धर्म चतुष्पाद आहे. त्याचें सत्य हें साधन होय. सत्याच्या योगानें लोकांचें धारण केलें जातें. सत्यामध्यें ब्रह्म प्रतिष्ठित आहे १८. यास्तव, सत्यनारायणाचें व्रत श्रेष्ठ मानलेलें आहे." असें हरीचें वचन ऐकून नारद पुनरपि ह्मणाले १९. "सत्यनारायणाच्या पूजनामध्यें काय विधान आहे व त्याचें फल काय आहे ? तें हे कृपानिधे देवा, कृपेनें मला सांग" २०. श्रीभगवान् ह्मणतातः—नारायणाच्या पूजेमध्यें जें फल मिळतें तें सांगण्यास चतुर्मुखही समर्थ नाहीं. तथापि मी तुझ्यापुढें संक्षेपत: सांगतों तें ऐक २१. निर्धन पुरुष धनवान् होतो, अपुत्रास पुत्र होतो; राज्यापासून भ्रष्ट झालेल्यास राज्य मिळतें; अंधास चांगले नेत्र येतात २२; बद्ध

बन्धनाद्बद्धो निर्भय स्याद्भयातुरः । मनसा क्रामयेद्यं यं लभते तं विधानतः २३ इहजन्मनि भो विप्र भक्त्या च विधिनाऽर्चयेत् । लभेत्कामं हि तच्छीघ्रं नात्र कार्या विचारणा २४ प्रातःस्नायी शुचिर्भूत्वा दन्तधावनपूर्वकम् । तुलसीमञ्जरीं धृत्वा ध्यायेत्सत्यस्थितं हरिम् २५ नारायणं सान्द्रघनावदातं चतुर्भुजं पीतमहार्हवाससम् । प्रसन्नवक्त्रं नवकञ्जलोचनं सनन्दवाद्यैरुपसेवितं भजे १६ करोमि ते व्रतं देव सायंकाले त्वदर्चनम् । श्रुत्वा गाथां त्वदीयां हि प्रसादं ते भजाम्यहम् २७ इति संकल्प्य मनसा सायंकाले यजेत्सुधीः । पञ्चभिः कलशैर्युक्तं कदलीतोरणान्वितम् २८ शालग्रामं स्वर्णयुक्तं पूजयेदात्मसूक्तकैः । पञ्चामृतेन सस्नाप्य चन्दनाद्यैरभिर्चयेत् २९ ॐ नमो भगवते नित्यं सत्यदेवाय धीमहि । चतुःपदार्थदात्रे च नमस्तुभ्यं नमो नमः ३० जप्त्वैतत्पञ्चशतवारं जुहुयात्तद्दशांशकम् । तर्पणं मार्जनं कृत्वा कथां शृणुयाद्धरेरिमाम् ३१ षडध्यायीं सत्यमुख्यां तत्पश्चात्तत्प्रसादकम् । सम्यग्विभज्य तत्सर्वं दापयेच्छ्रोतृकान्नरान् ३२ आचार्यायादिभागं च द्वितीयं स्वकुलाय सः । श्रोतृभ्यश्च तृतीयं च चतुर्थं चात्महेतवे ३३ विप्रश्चो भोजनं दद्यात्स्वयं भुञ्जीत वाग्यतः । देवर्षेर्नारदस्येति विधिना सत्यनारायणार्चनम् ३४ कारयेद्यदि भक्त्या च श्रद्धया च समन्वितः । व्रती कामानवाप्नोति वाञ्छितानीहजन्मनि ३५ इहजन्मकृतं कर्म परजन्मनि पच्यते । परजन्मकृतं कर्म भोक्तव्यं सर्वदा नरैः ३६ सत्यनारायणव्रतमिह सर्वान्कामान्ददाति हि । अद्यैव जगतीमध्ये स्थापयामि त्वदाज्ञया ३७ इत्युक्त्वाऽन्तर्दधे देवो नारदः स्वर्गतिं ययौ । स्वयं नारायणो देवः काश्यां पुर्यां समा-

---

बंधापासून मुक्त होतो; भयातुर निर्भय होतो, साराश, पूजक मनाने ज्याची ज्याची इच्छा करितो तें ते त्यास विधानाने मिळतें २३. हे विप्रा, या लोकी अतिभक्तीने व विधानपूर्वक पूजन करावे. ह्मणजे मनोरथ तात्काल पूर्ण होतो. याविषयी मुळींच विचार करू नये २४. प्रातःकालीं प्रथम दतधावन व नंतर स्नान करून शुद्ध व्हावे व हातात तुलसीची मंजरी घेऊन सत्यामध्ये स्थित झालेल्या हरीचे ध्यान करावें. दाट मेघाप्रमाणे शुद्ध, चतुर्भुज, पिवळे महावस्त्र नेसलेला, प्रसन्नमुख, नूतनकमलनयन व सनकादिकाकडून सेवित अशा नारायणाचे मी सेवन करितो २५,२६. हे देवा, मी आज व्रत करितो, सायंकाली तुझे पूजन करीन. तुझी कथा ऐकून मी तुझा प्रसाद भक्षण करीन २७. असा मनांत संकल्प करून सायंकाली पूजन करावे. पांच कलश व कदलींचे तोरण यांनी युक्त अशा स्वर्णयुक्त शालग्रामाचे आत्मसूक्तांनी पूजन करावे. पंचामृतांनी स्नान घालून चंदनादिकाच्या योगाने पूजन करावे २८,२९. (भगवानास सतत नमस्कार असो. सत्यदेवाचे आह्मी ध्यान करितो, चार पुरुषार्थ देणाऱ्या तुला आमचा वारंवार नमस्कार असो. या अर्थाच्या) ॐ नमो भगवते नित्य० इत्यादि मंत्राचा अष्टोत्तर शत जप करून त्याच्या दशांशप्रमाणाने होम करावा. तर्पण व मार्जन करून हरीची ही सहा अध्यायांची सत्यप्रधान कथा ऐकून त्यानंतर प्रसादाचे चांगले विभाग करून ते श्रोत्या पुरुषास वाटावे. पहिला भाग आचार्यास द्यावा, दुसरा आपल्या कुलातील लोकास द्यावा; तिसरा श्रोत्यास द्यावा व चवथा आपल्याकरिता ठेवावा ३०-३३. विप्रास भोजन घालावे व स्वतः वाणीचे नियमन करून भोजन करावे. या देवर्षि, या विधीने जर कोणी भक्तीने व श्रद्धेने सत्यनारायणाचें पूजन करविलें तर व्रत करणाऱ्यास इष्ट मनोरथ याच जन्मी प्राप्त होतात ३४-३५. वस्तुतः या जन्मीं केलेले कर्म दुसऱ्या जन्मीं फलरूप होतें. यास्तव, अन्यजन्मार्जित कर्म सर्वदा प्राप्यास भोगावयावें असतें ३६, सत्यनारायणाचे व्रत इहलोकी सर्व कामना पूर्ण करितें. 'मी तुझ्या संमतीनें आजच याची भूलोकी स्थापना करितो' असे ह्मणून देवर्षि नारद अंतर्धान पावला व

गतः ३८ [११६८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्वाये कलियुगीयेतिहाससमुच्चय चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥

सूत उवाच ॥ कृपया ब्राह्मणद्वारा प्रकटीकृतवान्स्वकम् । इतिहासमिमं वक्ष्ये संवाद हरिविप्रयोः १ काशी पुरीति विख्याता तत्रासीद्ब्राह्मणो वरः । दीनो गृहाश्रमी नित्यं भिक्षुः पुत्रकलत्रवान् २ शतानन्द इति ख्यातो विष्णुव्रतपरायणः । एकदा पथि भिक्षार्थं गच्छतस्तस्य श्रीपतिः ३ विनीतस्यातिशान्तस्य स बभूवाक्षिगोचरः । वृद्धब्राह्मणवेषेण पप्रच्छ ब्राह्मण हरिः ४ क्व यासीति द्विजश्रेष्ठ वृत्तिः का ते हि कथ्यताम् । शतानन्द उवाच ॥ भिक्षावृत्तिरहं सौम्य कलत्रापत्यहेतवे ५ याचितु धनिनां द्वारि व्रजामि धनमत्तमम् । नारायण उवाच॥ भिक्षावृत्तिस्त्वया दीर्घकाल द्विज मया धृता ॥ तद्वारक उपायोऽय विशेषेण कलौ किल ६ ममोपदेशतो विप्र सत्यनारायण भज । दारिद्र्यशोकशमन सतापहरण हरेः ७ चरण शरणं याहि मोक्षद पद्मलोचनम् । एव सबोधितो विप्रो हरिणा करुणात्मना ८ पुन पप्रच्छ विप्रोऽसौ सत्यनारायणो हि क ८ । वृद्धब्राह्मण उवाच ॥ बहुरूप. सत्यसन्ध. सर्वव्यापी निरञ्जनः ९ इदानीं विप्ररूपेण तव प्रत्यक्षमागतः । दु खोदधिनिमग्नानां तरणिश्चरणौ हरेः १० कुशला. शरण यान्ति नेतरे विषयात्मिकाः । आहृत्य पूजासभारान्हिताय जगतां द्विज ११ अर्चयस्तमनुष्ठायस्वर्चनप्रकटीकृत । इति ब्रुवन्त विप्रोऽसौ ददर्श पुरुषोत्तमम् १२ जलदश्यामल चारुचतुर्बाहु गदादिभि । पीताम्बर

स्वर्गलोकी गेला. तेव्हा सूत नारायणदेव काशीपुरीमध्ये आला २७,२८. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥

सूत ह्मणतात — त्या ईश्वराने कृपेने ब्राह्मणाच्या द्वारा आपले हे व्रत प्रकट केले. हरि व ब्राह्मण यांच्या संवादरूप असा हा इतिहास मी सांगतों १. काशी ह्मणून प्रसिद्ध नगरी आहे. तेथे एक श्रेष्ठ ब्राह्मण असे. तो दीन, गृहस्थाश्रमी, पुत्र व स्त्री यांनी युक्त व सदा भिक्षा मागून रहाणारा होता २. शतानंद हे त्याचे नाव असून तो विष्णुव्रताम्यर्थे परायण होता. एकदा भिक्षेकरिता मार्गातून जाणाऱ्या त्या अतिशांत व नम्र ब्राह्मणाच्या डोळ्यासमोर श्रीपति आला. वृद्ध ब्राह्मणाचा वेष घेऊन तो हरि त्या ब्राह्मणास ह्मणाला ' हे श्रेष्ठ द्विजा, कोठे जातोस ? व तुझी वृत्ति काय आहे ? ते मला सांग ' शतानंद ह्मणतो.—हे सौम्य पुरुषा, मी स्त्री व पुत्र यांच्याकरिता भिक्षा मागणारा आहे. उत्तम धनी यांचेजवळ याचना करण्याकरिता मी धनिकांच्या द्वाराशी जात असतो. नारायण ह्मणतात.— हे द्विजा, तूं भिक्षावृत्ति दीर्घकाल धारण केली आहेस. पण विशेषत. कलियुगामध्ये त्याचे निवारण करणारा असा हा उपाय आहे ३-६. हे ब्राह्मणा, माझ्या उपदेशावरून तू सत्यनारायणाची सेवा कर. दारिद्र्यामुळे होणाऱ्या शोकाचे निरसन करणारे, संतापाचे हरण करणारे व मोक्ष देणारे असे जे कमलनयन हरीचे चरण आहेत त्यास तू शरण जा. ह्याप्रमाणे करुणारूपी हरीने त्यास उपदेश केला आहे असा तो ब्राह्मण पुन. त्यास विचारूं लागला की, 'सत्यनारायण कोण आहे?' वृद्ध ब्राह्मण ह्मणतो —तो ईश्वर बहुरूपी, सत्यप्रतिज्ञ, सर्वव्यापी व निरंजन आहे. ह्यावेळी ब्राह्मणरूपाने तो तुझ्यासमोर आला आहे. हरीचे चरण दुःखसागरामध्ये निमग्न झालेल्या पुरुषांची नौकाच आहे ७-१०. पण जे कुशल आहेत ते त्यास शरण जातात. इतर विषयी लोक त्याचा आश्रय करीत नाहीत. हे ब्राह्मणा, पूजेचे साहित्य आणून जगाच्या हितकरिता त्याचे अर्चन व ध्यान करून तूं ह्याचा प्रत्यक्ष

नवाम्भोजलोचनं स्मितपूर्वकम् १३ वनमालामधुव्रातचुम्बितश्रीकृताधरं कहम । निशम्य पुलकाङ्कोऽसौ प्रेमपूर्णेक्षणेक्षणः १४ स्तुवन्गद्गदया वाचा दण्डवत्पतितो भुवि । प्रणमामि जगन्नाथं जगत्कारणकारणम् १५ अनाथनाथं शिवदं शरण्यमनघं शुचिम् । अव्यक्तं व्यक्तदातं तापत्रयविमोचनम् १६ नमः सत्यनारायणायास्य कर्त्रे नमः शुद्धसत्त्वाय विश्वस्य भर्त्रे । कालाय कालाय विश्वस्य हर्त्रे नमस्ते जगन्मङ्गलायात्ममूर्ते १७ धन्योऽस्म्यद्य कृती धन्यो भवोऽद्य सफलो मम । साक्षन्नमागतश्चेतो यस्के मम प्रत्यक्षतामगत. १८ किं वर्ण्यास्यहो न जाने कस्य वा फलम् । क्रियाहीनस्य मन्दस्य देहोऽद्य फलवान्कृत १९ पूजनं क्व प्रकर्तव्यं लोकनाथ रमापते । विधिना केन कृपया तदाख्यापय मां विभो २० हरिस्तमाह मधुर सस्मित बिम्बमोहनः । पूजायां मम विप्रेन्द्र बहु नापेक्षितं धनम् २१ अनायासेन लब्धेन श्रद्धामात्रेण मां यज । ग्राहग्रस्तोऽजामिलो वा यथाऽभून्मुक्तसङ्कटः २२ विधानं शृणु विप्रेन्द्रमनसा काम्यफलम् । पूजासंभृतसंभारः पूजां कुर्याद्यथाविधि २३ गोधूमचूर्णं पादार्द्धं सटकादिप्रमाणत । दुग्धेन तावता युक्तं मिश्रितं शर्करादिभिः २४ तच्चूर्णं हरये दद्याद्घृतयुक्तं हरिप्रियम् । गोदुग्धेनैव दधिना गोघृतेन समन्वितम् २५ गङ्गाजलेन मधुना युक्तं पञ्चामृतं प्रियम् । पञ्चामृतेन सस्नाप्य शालग्रामोद्भवां शिलाम् २६ गन्धपुष्पादिनैवेद्यैर्दद्यादेवं मनोहरैः । धूपैर्दीपैश्च नैवेद्यैस्ताम्बूलादिभिरर्चयेत् २७ विप्रान्नपानसम्मानैर्भक्ष्यैर्भोज्यैः फलैस्तथा । ऋतुकालोद्भवैः पुष्पैः पूजयद्भक्तित-

---

अनुभव घे. असें बोलणाऱ्या त्या पुरुषोत्तमास तो ब्राह्मण अशा प्रकारें पाहता झाला ११,१२. मेघाप्रमाणें श्यामवर्ण, ज्यास गदादि शस्त्रांनीं युक्त अशा चार सुंदर भुजा आहेत; ज्यानें पीत वस्त्र नेसलें आहे, नूतन कमलाप्रमाणें ज्याचे नेत्र आहेत, ज्याचे मुख स्मितयुक्त आहे व ज्याच्या चरणकमलावर वनमालेंतून मधाचें थेंब पडत आहेत अशा त्या ईश्वराचें पूर्वोक्त भाषण ऐकून तो ब्राह्मण पुलकांकित झाला. व त्याचे उत्तम नेत्र प्रेमाश्रूंनीं भरून आले १३,१४. गद्गद स्वरानें स्तुति करीत तो दंडासारखा भूमीवर पडला. मी जगन्नाथास नमस्कार करितों. तो जगाचें कारण व कर्ता आहे १५. अनाथाचा नाथ, कल्याण देणारा, शरण्य, जाण्यास योग्य, निष्पाप, पवित्र, अव्यक्त असून व्यक्त झालेला व तापत्रयाचा नाश करणारा असा जो सत्यनारायण त्यास नमस्कार असो. या जगाच्या कर्त्यास, शुद्धसत्त्वरूपास, विश्वाच्या पालकास, भयंकर कालास, विश्वाच्या संहारकास व आत्ममूर्ति जगन्मंगलास नमस्कार असो १६,१७. मी आज धन्य व कृतकृत्य आहें! माझा जन्म आज धन्य व सफल झाला! वाणी व मन यास अगोचर असा जो तूं तोच आज मला प्रत्यक्ष दिसलास! १८. कायहो माझें भाग्य सांगूं! हें कशाचें फल आहे हें मी जाणत नाही. क्रियाहीन व मंद अशा माझा हा देह आज फलवान् केलास! हे लोकनाथा रमापते, तुझें पूजन कोणत्या विधीनें करावें तें मला कृपा करून सांग १९,२०. तेव्हा विश्वास मोह पाडणारा हरि त्यास हंसत मधुर वाणीनें म्हणाला " वा श्रेष्ठ ब्राह्मणा, माझ्या पूजेस पुष्कळ धनाची अपेक्षा नाहीं २१. सहज प्राप्त झालेल्या धनानेंच पण केवल श्रद्धेनें माझे पूजन कर. म्हणजे ग्राहग्रस्त गज किंवा अजामिल जसा संकटातून मुक्त झाला तसा तूं मुक्त होशील २२. वा श्रेष्ठा, विधान ऐक. मनामध्यें फलकामना करावी व पूजेचें साहित्य जमवून यथाविधि पूजन करावें. छटाकादि प्रमाणानें पादार्ध गोधूमचूर्ण (रवा) घेऊन तो तेवढयाच दुधानें व साखर इत्यादि पदार्थांनीं युक्त करावा २३,२४. व हरीस प्रिय असें तें घृतयुक्त चूर्ण हरीस समर्पण करावें. गाईचें दूध, दहीं, गाईचें घृत, गंगाजल, मध (शर्करा) यांनीं युक्त असें प्रिय पंचामृत होतें. या पंचामृतानें शालग्रामशिलेद्भव शालग्रामास स्नान घालून २५,२६ गंध, पुष्प, नैवेद्य, मनोहर वेद-

पयः २८ ब्राह्मणैः स्वजनैश्चैव वेष्टितः श्रद्धयान्वितः। त्वया सार्द्धं मम कथां शृणुयात्परमादरात् २९ इतिहासं तथा राज्ञो भिल्लस्यो वणिजाऽस्य च। कथान्ते प्रणमेद्भक्त्या प्रसादं विभजेत्ततः ३० लब्धं प्रसादं भुञ्जीत मानयेच्च विचारयेत्। द्रव्यादिभिर्न मे शान्तिर्भक्त्या केवलया यथा ३१ विधिनाऽनेन विप्रेन्द्र पूजयन्ति च ये नराः। पुत्रपौत्रधनैर्युक्ता भुक्त्वा भोगानलुत्तमान् ३२ अन्ते सान्निध्यमासाद्य मोदन्ते ते मया सह। य य कामयते कामं सुव्रती तं तमाप्नुयात् ३३ इत्युक्त्वान्तर्दधे विष्णुर्विशोऽपि सुखमाप्तवान्। प्रणम्यागाद्यथा दिष्टं मनसा कौतुकाकुलः ३४ अद्य भक्ष्यं लब्धेन पूजयो नारायणो मया। इति निश्चित्य मनसा भिक्षार्थी नगरं गतः ३५ विना देहीति वचनं लब्ध्वा च विपुलं धनम्। कौतुकावासं मनसा जगाम निजमालयम् ३६ वृत्तान्तं सर्वमाचख्यौ ब्राह्मणी साऽन्वमोदत। सादरं तत्समाहूय भर्तुराज्ञया ३७ आहूय बन्धुमित्राणि तथा सान्निध्यवर्तिनः। सत्यनारायणं देवं यजामि स्वजनैर्वृतः ३८ वदत्या तुल्यो भवान्सत्यनारायणः स्वयम्। कामभिक्षुः प्राहुरासीत्कथान्ते भक्तवत्सलः ३९ वव्रे विशोऽभिलषितमिहामुत्र सुखप्रदम्। भक्तिं परां भगवति तथा सत्सङ्गसंगतम् ४० रथं कुञ्जरं मञ्जुलं मन्दिरं च दृढं चारुचामीकरालङ्कृतं च। धनं दासदासीगणं गां महीं च लुलायीं सदुग्धां हरे देहि दास्यम् ४१ तथाऽस्त्विति हरिः प्राह तत्रान्तर्दधे प्रभुः। विशोऽपि कृतकृत्योऽभूत्सर्वे लोका

दीप, धूप, दीप, नैवेद्य व ताम्बूल इत्यादिकांनी पूजन करावें २७. मिष्टान्नपान, सन्मान, भक्ष्यभोज्य पदार्थ, फलें व ऋतुकालोद्भव पुष्पे यांच्या योगाने भक्तितत्पर होऊन पूजन करावे २८. ब्राह्मण व स्वजन यांनी परिवेष्टित व श्रद्धायुक्त होऊन माझी कथा मोठ्या आदरानें ऐकावी २९. त्याचप्रमाणें राजाचा, भिल्लाचा व वाण्याचा इतिहास ऐकावा. कथेच्या शेवटी भक्तीने प्रणाम करावा व नंतर प्रसाद वाटावा. प्राप्त झालेल्या प्रसादाचा सत्कार करून विचार न करिता तो खावा. केवल भक्तीनें जशी माझी शांति होते तशी द्रव्यादिकाच्या होत नाही ३०,३१. हे श्रेष्ठ ब्राह्मणा, या विधीनें जे नर पूजन करितात ते पुत्र, पौत्र, धन यांनी युक्त होऊन अत्युत्तम भोग भोगून शेवटी माझे सन्निध येतात व माझ्याबरोबर आनंदित होतात. उत्तम व्रत करणारा जी जी इच्छा करितो ती ती त्याची इच्छा पूर्ण होतें. असें सांगून विष्णु अंतर्धान पावला व ब्राह्मणही सुखी आला. मनामध्यें कौतुकानें व्याप्त होत्साता तो भगवानास नमस्कार करून जिकडे जावयाचे होतें तिकडे गेला ३२-३४. आज जें भक्ष्य मला मिळेल त्यानें मी नारायणाची पूजा करीन, असा मनानें विश्चय करून तो भिक्षार्थी नगरात गेला ३५. "दे" असें म्हटल्यावाचूनच त्यास त्या दिवशी पुष्कळ धन मिळालें. तेव्हा त्यास मनात मोठे कौतुक वाटलें व तो आपल्या गृहीं गेला ३६. त्यानें सर्व वृत्तांत स्त्रीस सांगितला तेव्हा त्या ब्राह्मणीसही मोठा आनंद झाला. भर्त्याच्या आज्ञेनें तिनें तो सर्व द्रव्यसंभार आदरानें उचलून ठेविला. बंधु, मित्र व शेजारी यास मी सत्यनारायण देवाचें पूजन करणार आहें असें सांगून त्यानें बोलाविले व आपल्या लोकांनी युक्त असा तो ब्राह्मण पूजन करिता झाला ३७,३८. त्याच्या भक्तीच्या योगानें भगवान् सत्यनारायण संतुष्ट होऊन स्वतः कामना पूर्ण करण्याची इच्छा करणारा तो भक्तवत्सल कथेच्या शेवटी प्रकट झाला ३९. तेव्हा तो ब्राह्मण इहलोकीं व परलोकीं सुख देणारा वर मागता झाला. म्हणजे भगवानाच्या ठायीं परम भक्ति व सत्संगी पुरुषाची संगति हे वर त्यानें मागितले ४०. 'हे हरे, रथ, हत्ती, भव्य व सुवर्णालंकृत दोन गृहें, धन, दास व दासी याचा समूह, गाय, पृथ्वी, दुभती म्हैस व हरीची सेवा इतकें मला दे.' तेव्हा 'तथास्तु' असें म्हणून प्रभु हरि गुप्त झाला व ब्राह्मणही कृतकृत्य झाला. सर्व लोकास

विस्मिस्मेरे ४२ प्रणम्य भुवि कायेन प्रसाद प्रापुरादरात् । स्व स्व धाम समाजग्मुर्धन्यधन्येति वादिनः ४३ प्रचचार ततो लोके सत्यनारायणार्चनम् । कामसिद्धिप्रदं भुक्तिमुक्तिदं कलुषापहम् ४४ [१२११] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये पञ्चविंशोऽध्यायः ॥ २५ ॥

सूत उवाच ॥ राजासीद्धार्मिक कश्चिच्चन्द्रचूड इति श्रुतः । प्रजापालनतत्परः १ शान्तो मधुरवाग्धीरो नारायणपरायणः । बभूवु शत्रवस्तस्य म्लेच्छा विन्ध्यनिवासिनः २ तस्य तैरभवद्युद्धमतिप्रबलदारुणै । भुशुण्डीयुद्धनिपुणै क्षेपणै परिघायुधै ३ चन्द्रचूडस्य महती सेना यमपुरे गता । शत रथास्तथा नागाः सहस्र तु हयास्तथा ४ पत्तय. पञ्चसाहस्रा मृता स्वर्गपुरं ययु । दस्यव पञ्चसाहस्रा मृताः कैतवयोधिन. ५ आक्रान्तः स महानागम्लेच्छैर्दस्युभयोधिभि । त्यक्त्वा राष्ट्र च नगर सैकाकी वनमाययौ ६ तीर्थत्याजेन स नृपः पुरीं काशीं समागतः । तत्र नारायण देव वन्द्य सर्वगृहे गृहे ७ ददर्श नगरीं चैव धनधान्यसमन्विताम् । यथा द्वारावती ज्ञेया तथा सा च पुरी शुभा ८ विस्मितश्चन्द्रचूडश्च दृष्ट्वाश्चर्यमनुत्तमम् । सत्येन रुद्धितां लक्ष्मीं शीलधर्मसमन्विताम् ९ दृष्ट्वा श्रुत्वा सदानन्द सत्यदेवपपूजकम् । पतित्वा तच्चरणयोः प्रणनाम मुदा युत १० द्विजराज नमस्तुभ्य सदानन्द महामते । भ्रष्टराज्यं च मां ज्ञात्वा कृपया मां समुद्धर ११ यथा प्रसन्नो भगवाँल्लक्ष्मीकान्तो जनार्दन । तथा तदद यद्योग्यं व्रत पापप्रणाशनम् १२ सदानन्द उवाच ॥ दुःखशोकादिशमन धनधान्यप्रवर्धनम् । सौभाग्यसन्त-

---

विस्मय वाटला ! ४१,४२. त्यानीं भूमीवर साष्टांग नमस्कार करून आदरानें प्रसाद घेतला, तेव्हां 'धन्यधन्य !' असें म्हणणारे ते आपल्या घरीं गेले. तेव्हापासून कामना सफल करणारें, भोग व मुक्ति देणारें आणि पापाचा नाश करणारें सत्यनारायणाचें व्रत लोकामध्यें प्रचलित झालें ४३,४४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा पंचाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २५ ॥

सूत म्हणतात.—केदारमाणपुरामध्ये चंद्रचूड या नांवाचा प्रजापालनात तत्पर असा कोणी एक धार्मिक राजा होता १. तो शांत, मधुरवाक्, धीर व नारायणपरायण असे. विंध्यपर्वतामध्ये रहाणारे म्लेच्छ त्याचे शत्रु झाले २. तेव्हा त्याचे, अतिप्रबल व दारुण अशा भुशुंडीनामक शस्त्रानें युद्ध करण्यांत निपुण असणाऱ्या लोकांशीं क्षेपण व परिघायुधे यानीं युद्ध झालें ३. चंद्रचूडाची फार मोठी सेना यमपुरी गेली. शंभर रथारूढ लोक, शंभर हत्ती, सहस्र घोडे व पाच हजार पायदळ इतके सैन्य मरून स्वर्गपुरामध्यें गेले. कपटयुद्ध करणारे दस्यु पांच हजार मेले. साराश, दंभामुळ युद्ध करणाऱ्या म्लेच्छानीं त्या उदार राजाचा पराभव केला. तेव्हा राष्ट्र व नगर सोडून तो एकटाच वनात गेला ४-९. तीर्थाच्या निमित्ताने तो राजा काशीपुरीस आला. व त्यानें घरोघर वंद्य नारायण देवास पाहिले. ती नगरीही धनधान्ययुक्त आहे असे त्यास दिसलें. साराश, जशी द्वारावती तशीच ती शुभ नगरी झाली असे जाणावे ७,८. हें अनुत्तम आश्चर्य पाहून चंद्रचूड विस्मित झाला. शील व धर्म यासह लक्ष्मीस सत्याने प्रतिबद्ध केले आहे असे पाहून व सत्यदेवाचा श्रेष्ठ पूजक जो सदानन्द त्याच्याविषयी ऐकून राजा त्याच्याजवळ गेला व आनंदाने त्याच्या चरणांवर पडला ९,१०. हे श्रेष्ठ महामते सदानंद ब्राह्मणा, तुला नमस्कार असो. मी राज्यापासून भ्रष्ट झालो आहे असे जाणून माझा उद्धार कर ११. भगवान् कमलापति जनार्दन ज्याच्या योगाने प्रसन्न होईल अशा प्रकारचे जे काही पापनाशक योग्य व्रत असेल ते मला सांग १२. सदानंद म्हणतो. — दुःख, शोक इत्यादिकांचे शमन करणारे, धन-

सिकरं सर्वत्र विजयप्रदम् १३ सत्यनारायणव्रतं श्रीपतेस्तुष्टिकारकम् । यस्मिन्कस्मिन्दिने भूप यजेच्चैव निशामुखे १४ तोरणादि प्रकर्तव्यं कदलीस्तम्भमण्डितम् । पञ्चभिः कलशैर्युक्त ध्वजपञ्चसमन्वितम् १५ तन्मध्ये वेदिकां रम्यां कारयेत्स व्रती द्विजैः । तत्र स्थाप्य शिलारूपं कृष्णं स्वर्णसमन्वितम् १६ कुर्याद्गन्धादिभिः पूजां प्रेमभक्तिसमन्वित । भूमिशायी हरिं ध्यायन्सत्यव्रतं यतीतयेत् १७ इति श्रुत्वा स नृपतिः कारयां देवमपूजयत् । रात्रौ प्रसन्नो भगवान्ददौ राज्ञेऽसिमुत्तमम् १८ शत्रुपक्षक्षयकरं प्राप्य खड्गं नृपोत्तमः । प्रणम्य च सदानन्दं केदारमणिमाययौ १९ हत्वा दस्युन्सहस्रद्वितयांस्तेषां लब्ध्वा महद्धनम् । हरिं सपूजयामास नर्मदायास्तटे शुभे १० पौर्णमास्यां विधानेन मासि मासि नृपोत्तमः । अपूजयत्सत्यदेवं प्रेमभक्तिसमन्वितः २१ तद्व्रतस्य प्रभावेन लक्षग्रामाधिपोऽभवत् । राज्यं कृत्वा स षष्ट्यब्दमन्ते विष्णुपुरं ययौ २२ [१२३४] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चय चन्द्रचूडोद्धारो नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

सूत उवाच ॥ अथेतिहास शृणुयाद्यथा भिक्षुः कृतार्थिनः । विचरन्तो वने नित्यं निषादाः काष्ठवाहिनः १ वनात्काष्ठानि विक्रेतुं पुरीं काशीं ययुः क्वचित् । एकस्तृषाकुलो यातो विष्णुदासाश्रम तदा २ ददर्श विपुलैश्वर्य सेवितं च द्विजैर्हरिम् । जल पीत्वा विस्मितोऽभूद्भिक्षुकस्य कुतो धनम् - यो दृष्टाऽकिञ्चनो विप्रो दृश्यतेऽद्य महाधनः । इति सञ्चिन्त्य हृदये स पप्रच्छ द्विजोत्तमम् ४ ऐश्वर्यं ते कुतो ब्रह्मन्दुर्गतिस्ते कुतो गता । आख्यापय महाभाग श्रोतुमिच्छामि

धान्याची वृद्धि करणारें, सौभाग्य व संतति देणारें व सर्वत्र विजय देणारें असें सत्यनारायणाचें व्रत श्रीपतीस संतोष देणारें आहे. बा राजा, कोणत्याहि दिवशीं सायंकाळीं त्याचें पूजन करावें. कदलीच्या स्तंभांनीं मंडित असे तोरणादिक पांच कलशांनीं व पांच ध्वजांनीं युक्त करावें १३–१५. स्थान्या मध्यभागीं व्रती पुरुषानें ब्राह्मणाकडून रम्य वेदिका करवावी. तिच्यावर स्वर्णयुक्त शिलारूप कृष्णाची स्थापना करावी १६. प्रेम व भक्ति यानीं युक्त होऊन गंधादिकाच्या योगानें त्याची पूजा करावी. भूमीवर शयन करावें व हरीचें ध्यान करीत रात्र घालवावी १७. हें ऐकून तो राजा काशीमध्यें देवाचें पूजन करिता झाला. तेव्हा भगवान् रात्रीं प्रसन्न होऊन त्यास उत्तम तरवार देता झाला १८. शत्रुपक्षाचा क्षय करणारें असें तें खड्ग घेऊन तो उत्तम राजा सदानंदास नमस्कार करून केदारमणिपुरामध्यें आला व सहा हजार शत्रूंस मारून त्यांचे पुष्कळ धन घेतलें. नंतर त्यानें नर्मदेच्या शुभ तीरावर हरीचें पूजन केलें १९,२०. पुढें प्रत्येक महिन्यास पौर्णिमेच्या दिवशीं तो उत्तम राजा प्रेम व भक्ति यानीं युक्त होत्साता यथाविधि सत्यदेवाचें पूजन करूं लागला २१. त्या व्रताच्या प्रभावानें तो लक्ष ग्रामाचा राजा झाला. पुढें साठ वर्षें राज्य करून शेवटीं तो विष्णुपुरीं गेला२२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सव्विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २६ ॥

सूत ह्मणतात—आता काष्ठ वाहणारे व सतत वनांत हिंडणारे निषाद व भिक्षु कसे कृतार्थ झाले तो इतिहास ऐक १. कोणी एक भिक्षु वनांतून काष्ठ विकण्याकरिता काशीपुरीत गेला. पण तो तृषाकुल झाल्यामुळे त्यावेळीं विष्णुदासाच्या आश्रमास गेला २. तेथें विपुल ऐश्वर्य आहे व ब्राह्मणांकडून हरीचे सेवन होत आहे असें त्यानें पाहिलें. जल पिऊन तो विस्मययुक्त झाला. या भिक्षुकास एवढें धन कोठून मिळालें ? ३. ज्यास मी अकिंचन पाहिले होते तोच हा ब्राह्मण आज महाधनी दिसत आहे! असा मनांत विचार करून तो त्या उत्तम ब्राह्मणास असें विचारिता झाला ४

तत्त्वतः ५ सदानन्द उवाच ॥ सत्यनारायणस्यास्य सेवया किं न लभ्यते । न किञ्चित्सुखमाप्नोति यतः ॥ तस्यानुकम्पया ६ निषाद उवाच ॥ अहो किमिति माहात्म्यं सत्यनारायणार्चने । विधानं सोपचारं च ब्रूयादेतत्त्वमर्हसि ७ साधूनां समचित्तानामुपकारवतां सताम् । न गोप्यं विद्यते किञ्चिदार्तानामार्तिनाशनम् ८ इति पृष्टो विधिर्वक्तुमितिहासमथाब्रवीत् । चन्द्रचूडो महीपालः केदारमणिपूरके ९ समाश्रम समायातः सत्यनारायणार्चने । विधानं श्रोतुकामोऽसौ मामाह सादरं वचः १० मया यत्कथितं तस्मै तन्निबोध निषादज । संकल्प्य मनसा कामं निष्कामो वा जनः क्वचित् ११ गोधूमचूर्णं पादार्धं सेटकार्धः सुचूर्णकम् । सस्कृतं मधुगन्धाढ्यैर्नैवेद्यं विभवेऽर्पयेत् १० पञ्चामृतेन संस्नाप्य चन्दनाद्यैश्च पूजयेत् । पायसापूपसंयावदधिक्षीरमथो हरेत् १३ उचावचैः फलैः पुष्पैर्धूपदीपैर्मनोरमैः । पूजयेत्परया भक्त्या विभवे सति विस्तरैः १४ न तुष्येद्द्रव्यसंभारैर्भक्त्या केवलया यथा । भगवान्परितः पूर्णो न मानं कुरुयात्क्वचित् १५ दुर्योधनकृतां त्यक्त्वा राजपूजां जनार्दनः । विदुरस्याश्रमे प्राप्तमातिथ्यं जगृहे विभुः १६ सुदाम्नस्तण्डुलकणाश्चेरुद्धा मानुष्यदुर्लभाः । सम्पदोऽदाद्धरिः प्रीत्या भक्तिमात्रमपेक्षते १७ गोपो गृध्रो वणिग्व्याधो हनुमान्स्त्र विभीषणः । येऽन्ये पापात्मका दैत्या वृत्रकायाधवादय १८ नारायणान्तिकं प्राप्य मोदन्तेऽद्यापि यद्यशाः । इति श्रुत्वा नरपतिः पूजासम्भारमादरात् १९ कृत्वान्न धनं लब्ध्वा मोदते बर्मदातटे । निषाद त्वमपि प्रीत्या सत्यनारायणं भज २० इहलोके

---

* बा ब्राह्मणा, तुला हे ऐश्वर्य कसें मिळालें ? तुझी दुर्गति कशी गेली ? बा उदारा, काय कारण झालें तें मला खरें खरें सांग. माझी ऐकण्याची इच्छा आहे ' ५. सदानंद ह्मणतोः—बाबारे, सत्यनारायणाच्या सेवेनें काय मिळणार नाहीं ? त्याच्या कृपेवाचून कोणतेंही सुख मिळत नाहीं १. निषाद ह्मणतो.—अहो, सत्यनारायणाच्या पूजनामध्यें असें कोणतें माहात्म्य आहे ? त्याचें उपचारासह विधान मला सांगण्यास तूं योग्य आहेस ७. ज्याचें चित्त सर्वत्र सम आहे, जे उपकार करणारे असतात व जे साधु असतात त्या सज्जनांस आर्ताच्या आर्तीचें नाश करणारें असें कांहींही गुप्त ठेवावयाचें नसतें ८. ह्याप्रमाणें त्या निषादानें ज्यास प्रश्न केला आहे असा तो ब्राह्मण विधि सांगण्याकरिता एक इतिहास सांगता झाला. केदारमणिपुरामध्यें चंद्रचूड राजा आहे तो सत्यनारायणाच्या पूजेचें विधान ऐकण्याच्या इच्छेनें माझ्या आश्रमाप्रत आला व मला आदरानें असेंच ह्मणाला ९,१०. बा निषादपुत्रा, त्याला मीं जें सांगितलें तेंच तं ऐक. मनानें कामनेचा संकल्प करून किंवा निष्काम पुरुषानेंही ११ छटाक इत्यादि प्रमाणानें अर्धपाद गव्हाचें उत्तम चुर्ण घेऊन तें मध, साजुक तूप इत्यादिकांनीं संस्कृत करावें व सामर्थ्य असल्यास अशा प्रकारचा नैवेद्य समर्पण करावा १२. पचामृतानें स्नान घालून चंदनादिकाच्या योगानें पूजन करावें. पायस, अपूप, कानवले, दही व दूध अर्पण करावें १३. सर्व प्रकारचीं फलें, पुष्पें, धूप व मनोरम दीप यांच्या योगानें, मोठया भक्तीनें पूजन करावें. सामर्थ्य असल्यास मोठा विस्तार करावा. तो ईश्वर केवल भक्तीनें जसा संतुष्ट होतो तसा द्रव्यसंभारानीं संतुष्ट होत नाहीं. कारण तो सर्वव्यापी व पूर्ण आहे. यास्तव, तो मानाची अपेक्षा कधींच करीत नाहीं १४,१५. प्रभु जनार्दन, दुर्योधनानें केलेली राजपूजा टाकून विदुराच्या आश्रमात जाऊन राहिला व त्याच्या आतिथ्याचा त्यानें स्वीकार केला १६. सुदामदेवाचे तंदुलकण खाऊन मनुष्यास दुर्लभ अशी संपत्ति तो हरि प्रीतीनें त्यास देता झाला. तात्पर्य, तो केवल भक्तीची अपेक्षा करितो १७. गोपाल, गृध्र, वाणी, व्याध, हनुमान्, विभीषण व असेच दुसरेही पापरूप वृत्र, प्रल्हाद इत्यादि दैत्य १८ नारायणासन्निध जाऊन अजूनही त्याच्या अधीन होत्साते आनंद भोगीत आहेत. हें ऐकून तो राजा आदरानें पूजेचें साहित्य जमवून पूजा करिता

सुखं प्राप्य चान्ते सान्निध्यमाप्नुयाः । कृतकृत्यो निषादोऽभूत्तथाऽन्यः द्विजपुङ्गवम् २१ स गत्वा स्वगणानाह माहात्म्यं हरिसेवने । ते हृष्टमनसः सर्वे समयं चक्रुरादृताः २२ सत्यनारायणे पूजां काष्ठलब्धेन यावता । वयं कुलैः करिष्यामः पुण्यकृत्यविधानतः २३ इति निश्चित्य मनसा काष्ठं विक्रीय लेभिरे । चतुर्गुणं धनं हृष्टाः स्व स्व भवनमाययुः २४ मुदा स्त्रीभ्यस्समाचख्युर्वृत्तान्तं सर्वमादितः । ताः श्रुत्वा हृष्टमनसः पूजनं चक्रुरादरात् २५ कथान्ते प्राशनञ्चक्रुः प्रसादं जगृहुस्ततः । स्वजातिभ्यः परेभ्यश्च ददुस्तच्चूर्णमुत्तमम् २६ पूजायभावतो भिल्लाः पुत्रदारादिभिर्युताः । लब्ध्वा भूमितले द्रव्यं ज्ञानचक्षुर्हि लब्धवान् २७ भुक्त्वा भोगान्यथेष्टं ते दरिद्रान्धा द्विजोत्तम । जग्मुस्ते वैष्णवं धाम योगिनामपि दुर्लभम् २८ [१२६२] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥

सूत उवाच ॥ अथ ते वर्णयिष्यामि कथां साधूपचारिताम् । नृपोपदेशतः साधुः कृतार्थोऽभूद्यथा १ मणिपूरपती राजा चन्द्रचूडो महाबलः । सह प्रजाभिरानर्च सत्यनारायणं प्रभुम् २ अथ रत्नपुरस्थायी साधुर्लक्षपतिर्वणिक् ॥ धनैरापूर्णतरणीः सह गच्छन्ददर्शतं ३ ददर्श बहुलं लोकं नानाग्रामनिवासिनम् । मणिमुक्ताविरचितैर्वितानैः समलङ्कृतम् ४ वदवादांश्च शुश्राव गीतवाद्यरवान्वितान् । रम्यं स्थानं समालोक्य कर्णधारं समादिशत् ५ विश्रामयात्र तरं-

---

झाला १९. पुढें त्यास धन प्राप्त झालें व तो आता नर्मदेच्या किनाऱ्यावर आनंद भोगीत आहे. बा निषादा, तूंही प्रीतीने सत्यनारायणाचें भजन कर व इहलोकीं सुख भोगून अंतीं ईश्वरसान्निध्य मिळवीत. तेव्हा तो निषाद कृतकृत्य झाला व त्या ब्राह्मणश्रेष्ठास नमस्कार करून तो अरण्यात गेला. त्यानें हरीच्या सेवनाम यें कोणतें माहात्म्य आहे तें आपल्या लोकांस सांगितलें. तेव्हा ते सर्व आनंदित झाले व त्यांनीं आदरानें नियम केला २०-२२ कीं, काष्ठें विकून त्यांचें जें मोल येईल त्यानें आपल्या कुलांतील लोकांसह शास्त्रविधीनें आम्ही सत्यनारायणाची पूजा करूं २३, असा मनानें निश्चय करून ते निघाले. त्या दिवशीं काष्ठें विकून त्यांस चौपट द्रव्य मिळालें. त्यामुळें ते आनंदित होऊन आपापल्या गृहीं गेले २४, व त्यांनीं आनंदानें तो सर्व वृत्तांत पहिल्यापासून आपल्या स्त्रियांस सांगितला. तो ऐकून त्या स्त्रियांचें मनही प्रसन्न झालें. सर्वांनीं आदरानें पूजन केलें २५. कथेच्या शेवटीं त्यांनीं भक्तीनें प्रणाम केला व नंतर प्रसाद घेतला. तें उत्तम चूर्ण आपल्या जातीच्या लोकास व परक्यासही दिलें २६. पूजेच्या प्रभावामुळें भिल्ल पुत्र, स्त्रिया इत्यादिकांनीं युक्त झाले. त्यांना भूमीमध्यें द्रव्य मिळालें व अत्युत्तम ज्ञानचक्षु प्राप्त झाले २७. हे उत्तम ब्राह्मणा, यथेच्छ भोग भोगून ते सर्व पूर्वी दारिद्र्यानें पीडिलेले भिल्ल योग्यांनाही दुर्लभ अशा विष्णुपदीं गेले २८. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंड-नामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सत्ताविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २७ ॥

सूत म्हणतात:—आतां मी तुम्हांस साधुविषयीं कथा सांगतों. राजाच्या उपदेशामुळें साधुवाणी कसा कृतार्थ झाला तें ऐका १. महायशस्वी मणिपुराचा अधिपति राजा चंद्रचूड प्रजेसह प्रभु सत्य-नारायणाची पूजा करूं लागला २. एकदा रत्नपुरात राहणारा साधुनामक धनाढ्य वाणी धनानें नौका भरून नदीच्या मार्गानें चालला ३. त्यानें नानाग्रामांत राहणाऱ्या पुष्कळ लोकांस पाहिलें. ते लोक मणि, मोत्यें यांनीं विरचित अशा आच्छादनांनीं उत्तम प्रकारें अलंकृत होते. तो वेदवाद व गीत, वाद्यें संगीत इत्यादि ऐकता झाला. नंतर एक रम्य स्थान पाहून तो कर्णधारास " येथें नौका उभी कर. मी येथील चमत्कार पाहतों" ४,५ अशी आज्ञा करिता झाला. धन्यानें त्यास आज्ञा केली आहे

णीति पश्यामि कौतुकम् । भर्त्रा विसृस्तथा चक्रे कर्णधारः स भृत्यकैः ६ तटसीक्षः समुत्तीर्य मल्ललीलाविलासिन । कर्णधारा नगरीरा युयुधुर्मल्ललीलया॰ स्वयमुत्तीर्य सामात्यो लोकान्पप्रच्छ सादरम् । यज्ञस्थानं समालोक्य प्रशस्त समुपो ययौ ८ किमत्र क्रियते सभ्या भवद्भिर्लोकपूजितैः । सभ्या ऊचुश्च ते सर्वे सत्यनारायणो विभुः ९ पूज्यते बन्धुभि सार्द्धं राज्ञा लोकानुकम्पिना॰ प्राप्तं निष्कण्टकं राज्यं सत्यनारायणार्चनात् १०धनार्थी लभते द्रव्य पुत्रार्थी सुतमुत्तमम्॰ ज्ञानार्थी॰ लभते चक्षुर्नैर्भयः स्याद्भयातुर ११ सर्वान्कामानवाप्नोति नरः सत्यसुरार्चनात् । विधानं तु ततः श्रुत्वा चैलं बद्ध्वा गलेऽनकृत १२ दण्डवत्प्रणिपत्याह कामं सभ्यानमोदयत् । अनपत्योऽस्मि भगवन्वैश्योऽयं बुद्धासमः १३ पुत्रं वा यदि वा कन्यां लभेय त्वत्प्रसादतः॰ पताकां काञ्चनीं कृत्वा पूजयिष्य कृपानिधिम् १४ श्रुत्वा सभ्या अब्रुवस्त कामनासिद्धिरस्तु ते । हरिं प्रणम्य सभ्यांश्च प्रसाद्य भुक्तवास्तदा १५ जगाम स्वालय साधुर्जनैश्च चिन्तयन्हरिम । स्वगृहे ह्यागते तस्मिन्नायों मङ्गलपाणयः १६ मङ्गलानि विचित्राणि यथोचितमकारयन् । विवेशान्तःपुरे साधुर्महत्कौतुकमङ्गलः १७ ऋतुस्नाता सती लीलावती पर्यचरत्पतिम् । गर्भं धृतवती साध्वी समये सुषुवे तु सा १८ कन्यां कमललोलाक्षीं सद्भवामोदकारिणीम् । साधु पर्यं मुदं लेभे वितत्तार धनं बहु १९ विवाहाहूय वेदज्ञान्कारयामास मङ्गलम् । लेखयित्वा जन्मपत्रीं नाम चक्रे कलावतीम् २० कलानिधिकलवामौ ववृ ा सा कलावती । अब्दवर्षा भवद्गौरी नव-

---

असा तो कर्णधार आपल्या सेवकासह तसें करिता झाला ६. तीरावर उतरून मल्लाच्या लीलेनें विलास करणारे कर्णधार व नगरातील मल्ल लीलेनें खेळूं लागले ७. तो अमात्यासह स्वत: उतरून लोकास आदरपूर्वक मुख्यमुख्य स्थानाविषयी प्रश्न करूं लागला. प्रशस्त यज्ञस्थान पाहून तो आनंदानें त्यात गेला व " हे सभ्यहो, लोकाकडून पूजित असे आपण येथें काय करीत आहा ?," असें ह्मणाला. तेव्हा ते सर्व सभ्य ह्मणाले ' लोकावर कृपा करणाऱ्या राजाकडून बांधवासह प्रभु नारायण पूजिला जात आहे. सत्यनारायणाच्या पूजनामुळें राजास निष्कंटक राज्य प्राप्त झालें ८–१०. जो धनार्थी असतो त्यास धन व ज्यास पुत्राची इच्छा असते त्यास उत्तम पुत्र मिळतो. ज्ञानार्थी असेल त्यास ज्ञानचक्षु व जो भयातुर असतो त्यास अभय प्राप्त होतें ११. सत्यदेवाच्या पूजनापासून पुरुषास सर्व कामाची प्राप्ति होते. ' नंतर त्याचें विधान ऐकून वस्त्र गळ्यात बांधून तो वारंवार दंडासारिखा प्रणाम करिता झाला. त्याने सभ्यास यथेच्छ संतुष्ट केलें. " महाराज, मी अपत्यावाचून आहें. त्यामुळें माझा उद्यम व ऐश्वर्य हीं व्यर्थ झालीं आहेत १२,१३. तुझ्या प्रसादानें मला जर पुत्र किंवा कन्या प्राप्त होईल तर मी तुज कृपानिधीस सुवर्णाची पताका करून पूजीन ". हा त्याचा पण ऐकून सभ्य ह्मणाले " तुझी कामना पूर्ण होवो. " त्यानंतर हरीस व सभासदास प्रणाम करून त्यानें प्रसाद खाल्ला १४,१५. नंतर तो साधु मनानें हरीचें चिंतन करीत, आपल्या गृहीं गेला. तो घरीं पोंचल्यावर ज्याच्या हातात मंगल वस्तु आहेत अशा स्त्रिया यथायोग्य अशी विचित्र मंगलें करिता झाल्या. नंतर साधु मोठ्या कौतुकानें व मंगलानें युक्त होत्साता अंत:पुरात शिरला १६,१७. तेव्हा ऋतुस्नात सती लीलावती आपल्या पतीची परिचर्या करिती झाली. नंतर ती साध्वी गरोदर झाली. व तिला योग्य समयीं बाधवास आनंद देणारी सुंदर कन्या झाली. त्यामुळें साधूस मोठा आनंद झाला. त्यानें पुष्कळ धनदान केलें १८,१९. वेदज्ञ ब्राह्मणास बोलावून मंगल करविलें. जन्मपत्रिका लिहवून कलावती असे नांव ठेविलें २०. पुढें ती कलावती चंद्राच्या कलेप्रमाणें वाढूं लागली. आठ वर्षांची गौरी, नऊ वर्षांची रोहिणी,

वर्षा च रोहिणी २१ दशवर्षा भवेत्कन्या ततः प्रौढा रजस्वला । प्रौढां कालेन तां दृष्ट्वा विवाहार्थमचिन्तयत् २२ नगरं काञ्चनपुरे वणिक्छङ्खपतिः श्रुतः । कुलीनो रूपसंपन्नशीलौदार्यगुणान्वितः २३ वयसानास तं साधुर्दुहितुः सदृशं वरम् । शुभे लग्ने बहुविधैर्मङ्गलैरग्निसन्निधौ २४ वेदवादित्रनिनदैर्ददौ कन्यां यथाविधि । मणिमुक्तापवालानि वसनं भूषणानि च २५ महानन्दमनाः साधुर्मङ्गलार्थं ददौ च ह । प्रेम्णा निवासयामास गृहे जामातरं ततः २६ तं मेने पुत्रवत्साधुः स च तं पितृवत्सुधीः । अतीते भूयसः काले सत्यनारायणार्चनम् २७ विस्मृत्य सह जामात्रा वाणिज्याय ययौ पुनः । सूत उवाच ॥ अथ साधुः समादाय रत्नानि विविधानि च २८ नौकायां सं थाप्य स ययौ देशांतरान्तरं प्रति । नगरं नर्मदातीरे तत्र वास चकार स २९ कुर्वन्क्रयं विक्रयं च चिरं तस्थौ महामनाः । कर्मणा मनसा वाचा न कृतं सत्यसेवनम् ३० ततः कर्मविपाकेन तापमापाचिराद्भृशम् । कस्मिंश्चिद्दिवसे रात्रौ राज्ञो गेहं तमोवृतं ३१ ज्ञात्वा निद्रागतान्सर्वान्हृतं चौरैर्महाधनम् । प्रभाते वाचितो राजा सूतमागधबन्दिभिः ३२ प्रातःकृत्यं नृप कृत्वा सदः संभाविशच्च सः । ततस्तत्र समायातः किङ्करो राजवल्लभः ३३ उवाच स तदा वाक्यं रणंजय त्वं धरापते । मुक्तामाणिक्यं बहुधा रत्नानि विविधानि च ३४ मुमुचुश्चौरा गतास्सर्वे न जानीमो वयं नृप । इति विज्ञापितो राजा पुण्यश्लोकशिखामणिः ३५ उवाच क्रोधताम्राक्षो यूयं संघात मा चिरम् । सचौर द्रव्यमादाय मत्पार्श्वं तमुपानय ३६ नो चद्बन्धिष्ये सगणानिति दूतान्समादिशत् । नृप-

---

दहा वर्षांची कन्या व त्यापुढें वाढलेली मुलगी रजस्वला होते असें शास्त्रवचन आहे. कालानें ती प्रौढ झाली आहे असे पाहून तो साधु तिच्या विवाहाविषयीं विचार करूं लागला २१, २२. काञ्चनपुरनगरामध्यें शंखपति ह्मणून कुलीन, रूपसंपन्न, शील, औदार्य इत्यादि गुणांनीं युक्त असा एक वैश्य होता २३. साधूनें कन्येच्या योग्य अशा त्या वैश्यास वरिलें. व शुभ लग्नावर अग्निसमक्ष अनेक मंगलें करून वेद व वाद्यें याचा घोष चालला असतां तो कन्येस यथाविधि देता झाला. ज्याचे मन अत्यानंदाने युक्त आहे असा तो साधु मणि, मोत्ये, प्रवाल, वस्त्रें, भूषणे इत्यादि मंगल पदार्थ त्यास देता झाला. नंतर प्रेमाने जामातास आपल्या घरींच ठेवून घेतले २४--२६. तो साधु त्यास पुत्राप्रमाणे व तो शहाणा वैश्यही त्यास पित्याप्रमाणें मानीत असे. पुष्कळ काल निघून गेला असतां सत्यनारायणाच्या व्रतास विसरून तो वैश्य जामातासह व्यापार करण्याकरिता पुनः देशांतरीं गेला. सूत ह्मणतोः--साधु नानाप्रकारचीं रत्ने घेऊन व नौकांतून बसून अनेक देशीं गेला. पुढें नर्मदेच्या तीरीं एक नगर होतें, तेथें त्यानें वास केला २७--२९. तो मोठ्या मनाचा साधु क्रयविक्रय करीत तेथें दीर्घकाल राहिला. पण कर्मानें, मनानें किंवा वाणीनेंही त्यान सत्यदेवाचे सेवन केलें नाहीं ३०. त्यामुळें कर्मगतीप्रमाणे त्या साधुस दीर्घकाल ताप झाला. कोणे एके दिवशीं अंधाऱ्या रात्रीं राजाच्या मंदिरातील सर्व लोक निद्रायुक्त झाले आहेत असें जाणून चोरानीं पुष्कळ धन हरण केलें. प्रभातसमयीं सूत, मागध, बंदी इत्यादि स्तुतिपाठकाकडून राजाची स्तुति झाली असता ३१, ३२ राजा उठला व प्रातःकृत्य करून तो सभेमध्यें प्रवेश करिता झाला. नंतर राजाचा प्रिय किंकर तेथें आला ३३ व त्यास ह्मणाला " हा पृथ्वीपते, ऐक. अनेक मोत्यांच्या माला व असंख्य रत्नें चोरीस गेलीं आहेत. सर्व चोर तर निघून गेले ! कोठें गेले काहीं ठाऊक नाहीं. " ह्याप्रमाणें ज्यास सांगितलें आहे असा तो पुण्यश्लोकातील श्रेष्ठ राजा क्रोधानें डोळे लाल करून ह्मणाला " तुम्ही जा. उशीर लावू नका. चोरासह द्रव्य घेऊन मजजवळ या ३४--३६. असें न घडल्यासभी गण-

वाक्यं समाकर्ण्य प्रजगमुस्ते च किङ्करा ३७ बहुयत्नैर्न संशोध्य द्रव्यं चौरसमन्वितम् । एकीभूत्वा निशि तदा महच्चिन्तातुरोऽभवत् ३८ हन्ता मां सगणं राजा किं करोमि कुतः सुखम् । वृषदण्डाच्च मे मृत्युः प्रेतत्वाय भवेदिह ३९ नर्मदायां च मरणं शिवलोकप्रदायकम् । इत्येवं संमतं कृत्वा नर्मदायास्तटं ययुः ४० विदेशिनोऽस्य वणिजो ददर्श विपुलं धनम् । मुक्ताहारं गले तस्य लुण्ठितं वणिजाऽस्य च ४१ चौरोऽयमिति निश्चित्य तौ बबन्धात्मरक्षणात् । सधनं सह जामात्रा कृपान्तिकमुपानयत् ४२ प्रतिकूले हरौ तस्मिन्नाज्ञाऽपि न विचारितम् । धनागारे धनं नीत्वा बध्नीतं तौ सुदुर्मती ४३ कारागारे लोहमयैः शृङ्खलैरङ्घ्रि पादयोः ॥ इति राजाज्ञया दूतास्तथा चक्रुर्निबन्धनम् ४४ जामात्रा सहितः साधुर्विललाप भृशं मुहुः । हा पुत्र तात तातेति जामातः क्व धनं गतम् ४५ क्व स्थिता च सुता भार्या पश्य धातुर्विपर्ययम् । निमग्नौ दुःखजलधौ कोवां त्रास्यति सङ्कटात् ४६ मया बहुतरं धातुर्वैगुण्यं हि पुरा कृतम् । तत्कर्मणः प्रभावोऽयं न जाने कस्य वा फलम् ४ समश्वशुरजामात्रौ द्वादशेषु विवासिनौ४८[११९०]

इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये अष्टाविंशोऽध्यायः ॥ २८ ॥

सूत उवाच ॥ तापत्रयहरं विष्णोश्चरितं तस्य ये शिवम् । शृण्वन्ति सुधियो नित्यं ते वसन्ति हरेः पदम् १ प्रतिकूले हरौ तस्मिन्यास्यन्ति निरयान्बहून् । तस्या कमला देवी चत्वारस्तस्य

गोतासह तुह्यास मारीन ". तात्पर्य, राजाने त्यास अशी आज्ञा केली. राजाचें वाक्य ऐकून ते सेवक गेले. बहुत प्रयत्न करूनही त्यास चोरासह द्रव्य सापडलें नाही तेव्हा त्याचा नायक सर्व समुदायासह एकत्र जमून मोठ्या विचारात पडला. ' राजा मला सर्व गणासह मारील. आतां मी काय करूं? मला सुख कसें होईल ? राजाच्या दंडामुळें मृत्यु आल्यास तो माझ्या प्रेतत्वास कारण होईल ३७–३९ व नर्मदानदीमध्यें देहत्याग केल्यास तो शिवलोकदायक होईल. ' असा विचार करून ते सर्व नर्मदानदीच्या तीरावर गेले ४०. तेव्हा तेथे या विदेशी वाण्याजवळ त्यानीं पुष्कळ धन पाहिलें. त्या वाण्याच्या गळ्यात यान्या चोरीस गेलेल्या हाराप्रमाणेंच मोत्याचा हार होता ४१. त्यावरून हाच चोर आहे असा निश्चय करून त्यानीं त्या उभयतास आपल्या प्राणरक्षणाकरितां बाधलें. तात्पर्य, धन व जामात यासह साधूस त्यानीं राजाच्या जवळ नेलें ४२. हरि प्रतिकूल असल्यामुळें राजानेंही विचार केला नाहीं. ' धनागारामध्यें धन घेऊन जा; व या दोघा मूर्खांचें अंग व पाय लोहमय शृंखलानीं बांधून त्यास कारागारात टाका ' अशी राजाची आज्ञा होतांच दूतानीं त्यास तसें बांधलें ४३, ४४. तेव्हा जामातासह साधु वारंवार अतिशय विलाप करूं लागला. " अरे पुत्रा, अरे बाबा, अरे देवा, बा जामाता, धन कोठें गेलें ? कन्या व स्त्री कोठें राहिली ? पहा दैवाची कशी विचित्र गति आहे !" असो. ते दोघेही दुःखसागरामध्यें निमग्न झाले. ' आह्मांस या संकटातून कोण तारणार ? ४५,४६ मीं पूर्वी विधात्यास अप्रिय असें कर्म केलेलें असावें. व याचाच हा प्रभाव आहे. अथवा हें कशाचें फल आहे काहीं समजत नाहीं ' ४७. असो. याप्रमाणें ते दोघेही श्वशुरजामात बारा महिने असेंच दुःख करीत राहिले ४८. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणान्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २८ ॥

सूत ह्मणतातः—जे बुद्धिमान् तापत्रयाचें हरण करणारें व कल्याणरूप विष्णूचें चरित्र सतत ऐकतात ते हरीच्या स्थानीं रहातात १; पण तोच हरि प्रतिकूल झाला असतां ते अनेक नरकात पडतात. त्या देवाची प्रिया कमला देवी असून त्याचे

सुतजाः २ धर्मो यज्ञो नृपश्चौरः सर्वे लक्ष्मीप्रियङ्कराः । विप्रेभ्यश्चातिथिभ्यश्च यद्दानं धर्म उच्यते ३ पितृभ्यो देवताभ्यश्च स्वधा स्वाहेति वै मखः । धर्मस्यैव मखस्यैव रक्षको नृपतिः स्मृतः ४ द्वयोर्हन्ता हि चोरः स ते सर्वे धर्मकिङ्कराः । यत्र सत्यं ततो धर्मस्तत्र लक्ष्मीः स्थिरा भवेत् ५ सत्यहीनस्य तत्साधोर्धनं यत्तद्गृहे स्थितम् । हृतवानवनीपाल चौरैर्भार्याऽतिदुःखिता ६ वासोऽलङ्करणादीनि विक्रीय बुभुजे किल । नास्ति तत्पण्यते किञ्चिन्दा काष्ठमवाहत ७ अथैकस्मिन्दिने कन्या भोजनाच्छादनं विना । गता विप्रगृहेऽपश्यत्सत्यनारायणार्चनम ८ प्रार्थयन्तं जगन्नाथं हृष्ट्वा सा प्रार्थयद्धरिम् । सत्यनारायण हर पिता भर्ता च मे गृहम ९ आगच्छत्वित्यर्थयिष्यामि भवन्तमिति याचये । तथाऽस्तु ब्राह्मणैरुक्ता तत सा स्वाश्रमं ययौ १० मात्रा पित्रोरितेवं तं काल कुरु स्थिता शुभे । वृत्तान्तं कथयामास सत्यनाराणार्चने ११ कलौ प्रत्यक्षफलदं सर्वदा क्रियते नरैः । कर्तुमिच्छाम्यहं मातरनुज्ञातुं त्वमर्हसि १२ देवायातु जनकः स्वामी च मम कामना । रात्रौ निश्चित्य मनसा प्रभाते सा कलावती १३ शीलपालस्य गुप्तस्य गेहे प्राप्ता धनार्थिनी । बन्धो किञ्चिद्धन देहि येन सत्यार्चन भवेत् १४ इति श्रुत्वा शीलपालः पञ्चनिष्कं धनं ददौ । त्वत्पितुश्च ऋणं शेषं मयीत्येव कृतावधि १५ इत्युक्त्वा सोऽनृणो भूत्वा गयाश्राद्धाय संययौ । सुताऽपि तेन द्रव्येण कृत्वा सत्यार्चनं शुभम १६ लीलावती सह तया भक्त्या कुर्यात्सपूजनम् । पूजनेन विशेषेण तुष्टो नारायणोऽभवत् १७ नर्मदातीरनगरे नृपः सुष्वाप मन्दिरे ।

चार पुत्र आहेत २. धर्म, यज्ञ, राजा व चोर हे चारी पुत्र लक्ष्मीस आवडणारे आहेत. ब्राह्मण व अतिथि यास जें दान देणे आहे त्यास धर्म ह्मणतात ३. पितर व देव यास स्वधा व स्वाहाकार देणे हा यज्ञ; धर्म व यज्ञ याचा रक्षक राजा आणि त्या दोघाचाही विघात करणारा चोर आहे. पण ते सर्व धर्माचे किंकर आहेत. जेथें सत्य तेथें धर्म व तेथेंच लक्ष्मी स्थिर रहाते. सत्यहीन अशा त्या साधूचें जें धन गृहामध्यें होतें तें, हे राजा, चोरानीं हरण केलें व त्यामुळे भार्या अतिशय कष्टी झाली ४-६. वस्त्रें, अलंकार इत्यादि जें कही राहिलें होतें तें विकून ती आपला निर्वाह करीत असे. जेव्हा पाक करण्यास काहीं नाहीं असें झालें तेव्हा तीं काष्ठे वाहूं लागली ७. नंतर एके दिवशीं कलावती कन्या भोजन व आच्छादन यावाचून एका ब्राह्मणाच्या गृहीं गेली. व तेथें तिनें सत्यनारायणाचे पूजन पाहिलें ८. पूजा करणारा जगन्नाथाची प्रार्थना करीत आहे असें पाहून तिनेंही हरीची प्रार्थना केली. " हे सत्यनारायणा, हरे; माझा पिता व पति घरीं येवो ह्मणजे मी तुझी पूजा करीन असा नवस करिते ". त्यावर " तथास्तु " असें जिला ब्राह्मणानीं झटलें आहे अशी ती आपल्या गृहीं गेली ९,१०. तेव्हां " हे शुभे, तूं एवढा वेळ कोठे होतीस ? " असे ह्मणून तिला माता रागें भरली असता ती सत्यनारायणाच्या पूजेविषयींचा वृत्तांत सांगती झाली ११. " कलियुगामध्ये प्रत्यक्ष फल देणारें असें हें व्रत लोक सर्वदा करितात. आई, मीही तें करण्याची इच्छा करिते; मला आज्ञा दे १२. माझा पिता व स्वामी घरीं यावेत ही माझी कामना आहे. " असा रात्रीं मनानें निश्चय करून प्रभातसमयीं ती कलावती १३ शीलपाल गुप्ताच्या घरीं धनाच्या इच्छेनें आली. " दादा, सत्यनारायणाच्या पूजेपुर्ते मला थोडेसें धन दे ". ही तिची याचना ऐकून शीलपालानें तिला पाच निष्क धन दिलें. व " हे कलावति, मीं तुझ्या पित्याचें सर्व ऋण आज फेडलें आहे " असे बोलून व अनृण होऊन तो गयाश्राद्ध करण्याकरितां गेला. इकडे ती कन्याही त्या द्रव्यानें सत्यनारायणाचे शुभ पूजन करिती झाली १४—१६. लीलावतीनें तिच्यासह मोठ्या भक्तीने पूजा केली. त्या विशेष पूजनानें नारायण संतुष्ट झाला १७. नर्मदेच्या तीरा-

रात्रिशेषे सुपर्वैकु निद्रां कुर्वति राजनि १८ उवाच विप्ररूपेण बोधयञ्छ्रुत्यर्थां गिरा । उत्तिष्ठोत्तिष्ठ राजेन्द्र तौ साधू परिमोचय १९ अपराधं विना बद्धौ नो चेच्छ न भवेत्तव । इत्येवं भूपतिश्चैव विप्ररूपेण बोधितः २० तदा ह्यन्तर्दधे विष्णुर्निद्रा दूरे तदाऽगता । विस्मितः सहसोत्थाय वव्रयौ ब्रह्म सनातनम् २१ सभायां मन्त्रिणे राजा स्वप्नहेतु न्यवेदयत् । प्रजानन्त्री च भूपालं प्राह स्वप्नेन भो द्विज २२ मयाऽपि दर्शितं स्वप्न वृद्धविप्रेण बोधितम् । अतस्तौ हि समानीय पप्रच्छ विधिवन्नृपः २३ आनीय साधू पप्रच्छ सत्यमालम्ब्य भूपतिः । कुत्रत्यौ वां कुलं किं वा वस्तिः कस्य वा पुरे २४ साधुरुवाच ॥ रम्यरत्नपुरे वासो वणिग्जातौ जनिर्मम । वाणिज्यार्थं महाराज वाणिज्यं जीविकाऽऽवयोः २५ मणिमुक्तादि विक्रेतुं क्रेतुं वा तत्र पत्तने । प्राप्तौ वृत्तैश्च बद्धावां त्वत्समीपमुपागतौ २६ प्रतिकूले विधौ कां वा दशां नाप्नोति वै पुमान् । विनापराधं श्रीकृष्णं मणिचौरानवादयत् २७ आवां न चौरौ राजेन्द्र तत्त्वतस्त्वं विचारय । श्रुत्वा तच्छिथिलं कृत्वा तयोर्बन्धनकारणम् २८ छेदयित्वा दृढं पाशं लोमशातिमकारयत् । कारयित्वा परिष्कारं भोजयामास तौ नृपः २९ नगरे पूजयामास वस्त्रभूषणवाहनैः । अब्रवीत्पूजितः साधुर्भूपतिं विनयान्वितः ३० कारागारे बहुविधं यातं दुःखमतःपरम् । आज्ञापय महाराज देशं गन्तुं कृपानिधे ३१ श्रुत्वा साधुवचो राजा प्राह काराधिकारिणम् । मुद्राभिस्तरणीः सद्यः पूरयाशु भदाज्ञया ३२ जामात्रा सहितः साधुर्गीतवादित्रमङ्गलैः । स्वदेशं चलितोऽद्यापि न

वरील नगरात राजा आपल्या मंदिरीं निजला होता. थोडीशी रात्र राहिली असता व तो राजा उत्तम पर्यंकावर गाढ निजला असता नारायण ब्राह्मणरूपानें व मधुर वाणीनें त्यास जागा करीत ह्मणाला " राजा, ऊठ ऊठ, दोघा साधूस सोड १८,१९. अपराधावाचून तूं त्यास बांधलें आहेस. नाहींपेक्षा तुझें कल्याण होणार नाहीं ". ह्याप्रमाणें विप्ररूपानें त्या राजास जागें केलें २०. व लागलाच हरि गुप्त झाला. इकडे राजाही चांगला जागा झाला. तो विस्मित होऊन एकदम उठला व त्यानें सनातन ब्रह्माचें ध्यान केलें २१. सभेमध्यें जाऊन त्याने मंत्र्यास स्वप्न सांगितलें. तेव्हा हे ब्राह्मणा, तो मंत्रीही राजास खरोखर सांगूं लागला कीं, ' मीही वृद्ध ब्राह्मणानें जाणविलेलें स्वप्न पाहिलें.' त्यामुळे त्या उभयतांस आणवून राजानें यथाविधि चौकशी केली २२-२३. साधूस आणून व सत्याचें अवलंबन करून राजा असें विचारूं लागला ' तुम्ही कोठले ? तुमचें कुल कोणचें ? तुम्ही कोणत्या नगरात वास्तव्य करिता ? " २४.साधु ह्मणतोः-रम्य रत्नपुरामध्यें माझें वास्तव्य असतें. वैश्य ज्यातीमध्यें माझा जन्म झाला. व महाराजा, वाणिज्यकरिता मी येथें आलों. आह्मा उभयतांची जीविका वाणिज्यावर होते २५. मणि, मोत्यें इत्यादि विक्रण्याकरिता व विकत घेण्याकरिता तुझ्या नगरामध्यें आह्मीं आलों व दैवानीं आह्मास धरून तुझ्याजवळ आणिलें २६. दैव प्रतिकूल झालें असता कोणत्या बरें पुरुषास दशा प्राप्त होत नाहीं? अपराधावांचून श्रीकृष्णानें मणि चोरिला असें लोक बोलूं लागले होते २७.राजा आह्मीं चोर नव्हे तूं खरोखर विचार करून ऐकून व त्याच्या बंधनाचें निश्चित कारण जाणून राजानें त्याचे दृढ पाश तोडविले व शांति करविली; श्मश्रु इत्यादि परिष्कार करवून त्यास भोजन दिलें.नगरामध्यें वस्त्र, भूषणे व वाहनें यांच्या योगानें त्याचा त्यानें सत्कार केला. ह्याप्रमाण ज्याची पूजा झाली आहे असा तो साधु नम्र होऊन राजास ह्मणाला२८-३०" कारागारामध्यें बहुत प्रकारचें दुःख भोगिले. यास्तव, हे कृपासागरा महाराजा, आह्मास स्वदेशीं जाण्यास आज्ञा दे " ३१. हें साधूचे वचन ऐकून राजा कोशाच्या अधिकाऱ्यास ह्मणाला " माझ्या आज्ञेनें मुद्रान्या योगानें नौका तात्काल भरून टाक " ३२. नंतर जामातासह साधु गीत, वाद्यें इत्यादि मंगलयुक्त होऊन आपल्या देशास निघाला. पण त्यानें अजून हरीचें सेवन

चक्रे हरिसेवनम् ३३ सत्यनारायणो देवः प्रत्यक्षफलदः कलौ । स एवं तापसो भूत्वा चक्रे साधुविडम्बनम् ३४ तापस उवाच ॥ धर्मः किं नौषु ते साधो मामनादृत्य यासि भोः । प्रत्युत्तरमदात्साधुः क्षिप्रं नौकाश्च सत्वरम् ३५ भोः स्वामिन्मे धनं नास्ति लतापत्रादि पूरितम् । नौभिर्गच्छामि स्वस्थानं विरोधेनात्र किं फलम् ३६ इत्युक्तस्तापसः प्राह तथास्त्विति वचः क्षणात् । धनमन्तर्दधे साधोर्लतापत्रावशेषितम् ३७ धन नौकासु नास्तीति साधुश्चिन्तातुरोऽभवत् । किमिदं कस्य वा हेतोर्धनं कुत्र गतं मम ३८ वज्रपातादाहत इव भृशं दुःखितमानसः । क्व यास्यामि क्व तिष्ठामि किं करोमि धनं कुतः ३९ इति मूर्छामतः साधुर्विललाप पुनःपुनः । जामात्रा बोधितः पश्चात्तापस तं जगाम ह ४० गले वसनमादाय प्रणनाम स तापसम् । को भवानिति पप्रच्छ देवो गन्धर्व ईश्वरः ४१ देवदत्तोऽथ वा कोऽपि न जाने तव विक्रमम् । आज्ञापय महाभाग तद्विडम्बनकारणम् ४२ तापस उवाच ॥ आत्मा चैवात्मनः शत्रुस्तथात्र च मियोऽप्रियः । त्यज मोहमतिं साधो प्रवादं मा वृथा कुरु ४३ इति विज्ञापितः साधुर्न बुबोध महाधनः । पुनः स तापसः प्राह कृपया पूर्वकर्मतः ४४ चन्द्रचूडो यदानर्च सत्यनारायणं नृपः । अनपत्येन सुचिरं पुत्रकन्यार्थिना त्वया ४५ प्रार्थिते न स्मृत श्चैव इदानीं तप्यसे वृथा । सत्यनारायणो देवो विश्वव्यापी फलप्रदः ४६ तमनादृत्य दुर्बुद्धे कुतः सम्यग्भवेत्तव । पुरा लब्धवर स्मृत्वा सस्मार जगदीश्वरम् ४७ सत्यनारायणं देवं तापसं तं ददर्श ह । प्रणम्य भुवि कायेन

केलें नाहीं ३३. कलियुगामध्यें सत्यनारायण देव प्रत्यक्ष फळ देणारा आहे. तोच ईश्वर तपस्व्याचा वेष घेऊन साधूची विडंबना करिता झाला ३४. तापस ह्मणतो. -- हे साधो, तुझ्या नौकेमध्यें काय आहे ? धर्म कर. माझा अनादर करून तू कोठें जातोस ? त्यावर साधूनें उत्तर दिलें ' माझी नौका त्वरित सोड ३५. हे स्वामिन्, मजजवळ धन नाहीं. लतापत्रें इत्यादि भरलीं आहेत. मी या नौकान्या योगानें आपल्या स्थानीं जात आहे. तेव्हा उगीच विरोध करून कोणत फल मिळणार आहे ? ' ३६ ह्याप्रमाणें ज्यास मागितलें आहे असा तो तपस्वी "तथास्तु" असें वचन तात्काल बोलला. त्याबरोबर साधूचे धन नाहींसें झालें व लतापत्रेंच बाकी राहिली ३७. नौकामध्यें धन नाहीं असें पाहतांच साधु चिंतातुर झाला. " हें काय व कशानें झालें ? माझें धन कोठें गेलें ? " ३८. वज्रपातानें आहत झाल्याप्रमाणें त्याचें मन अतिशय दुःखित झालें. " मी कोठें जाऊं ? कोठें राहूं ? काय करूं ? धन कोठें आहे ? " ३९. असें ह्मणून तो वैश्य मूर्छित झाला व वारंवार विलाप करूं लागला. तदनंतर जामातानें त्यास सावध केलें व तो त्या तापसाकडे गेला ४०. गळ्यामध्यें वस्त्र घालून त्यानें त्यास प्रणाम केला व 'तूं कोण आहेस ? देव कीं गंधर्व कीं ईश्वर कीं देवाधिदेव ?' असें विचारिता झाला. 'तूं कोणीही जरी असलास तरी तुझा विक्रम मी जाणत नाहीं. हे उदारा, आमची विडंबना करण्याचें कारण सांग' ४१,४२. तापस ह्मणतो:--प्राणी आपणच आपला शत्रु व आपणच आपला प्रिय किंवा अप्रिय आहे. वा साधो, मूढ बुद्धि सोड; वृथा प्रलाप करूं नकोस ४३. ह्याप्रमाणे ज्यास समजाविलें आहे असा तो महाधनी साधु उमजला नाहीं. तेव्हा पूर्वकर्मामुळें कृपायुक्त होऊन तो तपस्वी ह्मणाला ४४ " राजा चंद्रचूड जेव्हा सत्यनारायणाची पूजा करीत होता तेव्हां ज्यास दीर्घ काल अपत्य नसल्यामुळें कन्या किंवा पुत्र व्हावा अशी इच्छा होती अशा तूं प्रार्थना केलीस, पण मग तुला स्मरण झालें नाहीं ह्मणून व्यर्थ ताप भोगीत आहेस. सत्यनारायण देव विश्वव्यापक व फल देणारा असताना दुर्बुद्धे, त्याचा अनादर करून तुझें कल्याण कसें होईल ? " पूर्वी वर प्राप्त झाला होता हें आठवतांच त्यास जगदीश्वराचें स्मरण झालें ४५-४७. तो तापस नारायण देवच आहे असें तो पाहता झाला. त्याच्यापुढें

परिक्रम्य पुनः पुनः ४८ तुष्टाव तापस तत्र साधुर्गद्गदया गिरा ॥ साधुरुवाच ॥ सत्यरूप सत्यसन्ध सत्यनारायण हरिम् ४९ यत्सत्यत्वेन जगतस्त्वं सत्य त्वां नमाम्यहम् । त्वन्मायामोहितात्मानो न पश्यन्त्यात्मनः शुभम् ५० दुःखाम्भोधौ सदा मग्ना दुःखे च सुखमानिनः। मूढोऽहं धनगर्वेण मदान्धीकृतलोचनः ५१ न जाने स्वात्मनः क्षेम कथ पश्यामि मूढधीः । क्षमस्व मम दौरात्म्य तपोधाम्ने हरे नमः ५२ आज्ञापयात्मदास्य म येन ते चरणौ स्मरे। इति स्तुत्वा लक्षमुद्राः स्थापिताः स्वपुरोधसि५३ गत्वा वास पूजयित्वा सत्यनारायण प्रभुम् । तुष्टो नारायणः प्राह वाञ्छा पूर्णा भवेत्तु ते५४ पुत्रपौत्रसमायुक्तो भुक्त्वा भोगांस्त्वनुत्तमान् । अन्ते सान्निध्यमासाद्य मोदसे त्वं मया सह ५५ इत्युक्त्वाऽन्तर्दधे विष्णुः साधुश्च स्वाश्रम ययौ । सप्ताहेन गृह प्राप्तः सत्यदेवेन रक्षितः ५६ आगत्य नगराभ्याशे प्राहिणोद्दूतमाश्रमम् । गृहमागत्य दूतोऽपि प्राह लीलावतीं प्रति ५७ जामात्रा सहितः साधुः कृतकृत्यः समागतः । सत्यनारायणाचार्या स्थिता साध्वी सकन्यका ५८ पूजाभारं सुतायै सा दत्त्वा नौकान्तिक ययौ । मङ्गीगणैः परिवृता कृतकौतुकमङ्गला ५९ कलावती त्वव्रज्याय प्रसादं सत्वरा ययौ । पातुं पतिमुखाम्भोज चकोरीव दिनात्यये ६० अवज्ञानात्यसादस्य नौका शङ्खपतेरथ। निमग्ना जलमध्ये तु जामाता सह तत्क्षणात्६१ मग्न जामातर पश्यन्विललाप स मूर्छितः । लीलावती तु तच्छ्रुत्वा मूर्छिता विललाप ह ६२ तत. कलावती श्रुत्वा पपात भुवि मूर्छिता । रम्भेव वातविहता कान्त कान्तेति वादिनी ६३ हा नाथ प्रिय

भूमीवर लोटांगण घालून व त्याम वारवार प्रदक्षिणा करून त्यावेळीं साधु गद्गद वाणीनें त्या तापसाची स्तुति करिता झाला. साधु म्हणतोः—सत्यस्वरूप सत्यप्रतिज्ञ, सत्यनारायण, हरि अशा तुला नमस्कार करितो. कारण, जगाच्या भासणाऱ्या सत्यत्वामुळे तुझें मुख्य सत्यत्व सिद्ध होत आहे. तुज सत्यदेवास मी नमस्कार करितों. तुझ्या मायेच्या योगाने ज्यांचें मन मोहित झालें आहे असे लोक आपलें कल्याण जाणत नाहींत ४८-५०. ते सदा दुःखसागरामध्ये मग्न झालेले असतात व दुःखाचे ठायीं सुख पाहतात. मी धनाच्या दर्पाने मूढ झालों आहें. माझे नेत्र मदाने अंध झाले आहेत ५१ त्यामुळे माझे कल्याण मला समजत नाहीं. खरेंच आहे की मज मूर्खाला ते कसें समजावे ? माझे हे दुष्टपण तू सहन कर. तपोरूप हरीस नमस्कार असो. आपले दास्य मला माग म्हणजे त्याच्या योगाने तरी मला तुझ्या चरणाचें स्मरण होईल. अशी स्तुति करून त्यानें आपल्या पुरोहिताच्या नावानें लक्ष मुद्रा काढून ठेविल्या ५२,५३. मी आता जाण्याबरोबर प्रभु सत्यनारायणाचे पूजन करीन. हे ऐकून प्रसन्न झालेला नारायण म्हणाला ' तुझी वाञ्छा पूर्ण होईल५४. पुत्र, पौत्र यांनीं युक्त होऊन व अत्युत्तम भोग भोगून शेवटीं माझे सान्निध्य प्राप्त झाल्यामुळें तूं माझ्यासह आनंद भोगशील.' असें बोलून नारायण गुप्त झाला व साधु आश्रमाला गेला. सत्यदेवाने ज्याचे रक्षण केलें आहे असा तो वाणी सात दिवसानीं घरीं पोंचला ५५, ५६. नगराजवळ येताच त्यानें आपल्या घरीं दूत पाठविला. व तो दूतही लीलावतीस म्हणाला ५७ ' जामात्यासह कृतकृत्य झालेला साधु आला आहे. ' त्यावेळीं ती साध्वी कन्येसह सत्यनारायणाच्या पूजेमध्ये बसली होती ५८. तेव्हा पूजेचे साहित्य कन्येस देऊन लीलावती नौकेजवळ आली. नंतर चकोरीप्रमाणें कलावतीही सख्यांच्या समुदायासह कौतुकमंगल करून प्रसादाचें ग्रहण न करिता पतीच्या मुखकमलाचे पान करण्याकरिता त्वरेने आली ५९,६०. पण प्रसादाची अवज्ञा केल्यामुळे शंखपतीची नौका त्याच्यासह जलामध्ये हा हा म्हणता निमग्न झाली ६१. तेव्हा जामात जलामध्यें बुडाला आहे असे पाहून साधु अतिशय विलाप करूं लागला. ते ऐकून लीलावतीही मूर्च्छित झाली व मग विलाप करूं लागली ६२.

धर्मज्ञ करुणाकर कौशल । त्वया विरहिता पत्या निराशा विधिना कृता । पत्युर्धं गतं कस्मादर्धाङ्गं जीवन कथम् ६४ सूत उवाच ॥ कलावती चारुकलासु कौशला प्रवालरक्ताङ्घ्रितलाऽतिकामला । सरोजनेत्राम्बुकणान्विमुञ्चती मुक्तावलीभिः स्तनकुड्मलाञ्चती ६५ हा सत्यनारायण सत्यसिन्धो मग्न हि मामुद्धर तद्धियंपे । श्रुत्वार्तशब्दं भगवानुवाच वचस्तदाकाशसमुद्भवं च ६६ साधो कलावती क्षिप्रं मत्प्रसादं हि भोजयेत् । तत्पश्चादिह सम्प्राप्य पतिं प्राप्स्यति मा शुच ६७ इत्याकाशे वचः श्रुत्वा विस्मिता तत्चकार सा । नारायणस्य कृपया पतिं प्राप्ता कलावती ६८ तत्रैव साधुः साह्लादो भक्त्या परमया युतः । पूजनं लक्षमुद्राभिः सत्यदेवस्य चाकरोत् ६९ तेन व्रतप्रभावेन पुत्रपौत्रसमन्वित । भुक्त्वा भोगान्मदा युक्तो मृतः स्वर्गपुरं ययौ ७० इतिहासमिमं भक्त्या शृणुयाद्यो हि मानवः । सोऽपि विष्णुप्रियतरः कामसिद्धिमवाप्नुयात् ७१ इति ते कथितं विप्र व्रतानामुत्तमं व्रतम् । कलिकाले परं पुण्यं ब्राह्मणस्य मुखोद्गतम् ७२ [१३८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये सत्यनारायणव्रतमाहात्म्यसमासांवकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥

ऋषय ऊचुः । भगवन्गुह्यज्ञ कथितं पुरातनैः । व्रतानां चैव सर्वेषां श्रेष्ठं नारायणव्रतम् १ त्वन्मुखाच्च श्रुतं सूत तापत्रयविनाशनम् । इदानीं श्रोतुमिच्छामि लिङ्गजं कर्म चोत्तमम २ सर्वेषां ब्रह्मचर्याणां ब्रह्मचर्यं हि किं परम् । तन्मे वद महाप्राज्ञ सर्वज्ञोऽसे मतो मम ३ सूत उवाच ॥ आसीत्पुरा कलियुगे पितृशर्मा द्विजोत्तमः । वेद-

---

नंतर कलावतीही ते ऐकून भूमीवर मूर्छित होऊन पडली. ह्मणे 'हे कांत, हे कांत,' असें ह्मणणारी ती बाईनें मोडून पडलेल्या केळीप्रमाणें भूमीवर पडली ६३. 'हे नाथ, हे प्रिय, हा धर्मज्ञ, करुणाकर, कुशल, मला दैवानें तुझ्यावाचून, अपत्यशून्य व निराश केले. माझे पतिरूपी अर्धे अंग कशामुळे गेले ? आता अर्ध्या अंगानें मी जीवत कशी राहीन ' ? ६४ सूत ह्मणतात-- सुंदर, कलामध्ये कुशल, जिचे तळपाय प्रवालाप्रमाणे लाल आहेत व जी अतिकोमल आहे अशी कमलनेत्रा, उदकबिंदु ढाळणारी व मोत्याच्या मालेनें स्तनास सुशोभित करणारी अशी ती कलावती ६५ " हा सत्यनारायण, हा सत्यसागरा, पतिवियोगरूपी सागरात निमग्न झालेल्या माझा उद्धार कर. " हें आर्तवचन ऐकून भगवान् आकाशवाणीनें ह्मणाला ६६ " हे साधो, कलावतीस त्वरित माझा प्रसाद भक्षण करूं दे. व नंतर येथें आल्यावर तिला पतीचे दर्शन होईल. शोक करू नको " ६७. असे आकाशांतील वचन ऐकून आश्चर्यचकित झालेली कलावती तसें करिती झाली व नारायणाच्या कृपेनें तिला पतीची प्राप्ति झाली ६८. तेव्हा आल्हादित झालेला साधु तेथेंच मोठ्या भक्तीनें लक्ष मुद्रांच्या योगानें सत्यनारायणाचें पूजन करिता झाला ६९. त्या व्रताच्या प्रभावानें तो पुत्र व पौत्र यांनी युक्त झाला. आनंदाने त्यानें येथें भोग भोगिले व मृत होऊन तो स्वर्गलोकी गेला ७०. जो मनुष्य हा इतिहास भक्तीनें ऐकतो तोही विष्णूस अधिक प्रिय होतो व त्याला कामनांची प्राप्ति होते. हे ब्राह्मणा, याप्रमाणें मीं तुला ब्राह्मणाच्या मुखातून निघालेले व कलिकालात परम पुण्यकारक असें व्रतांतील उत्तम व्रत सांगितले ७१,७२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा एकोणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २९ ॥

ऋषि ह्मणालेः—हे भगवन् , पुरातन विद्वानांनी गुह्यज कर्मवृत्त सांगितले आहे. व सर्व व्रतांमध्ये नारायणाचें व्रत उत्तम आहे असें, हे सूता, तुझ्या तोंडून ऐकिलें. हे व्रत त्रिविध तापांचे नाशक आहे, आता लिंगज उत्तम कर्म ऐकण्याची इच्छा आहे. सर्व ब्रह्मचर्यांतील मुख्य ब्रह्मचर्य कोणत.

दाङ्गतत्त्वज्ञो यमलोकभयान्वितः ४ ज्ञात्वा घोरतमं कालं कलिकालमधर्मजम् । बन्धनं यमराजस्य तदा चिन्तातुरोऽभवत् ५ केनाश्रमेण वर्णेन मम श्रेयो भवेदिह । कलौ संन्यासमार्गो हि दम्भपाखण्डखण्डितः ६ वानप्रस्थः कलौ नास्ति ब्रह्मचर्यं क्वचित्क्वचित् । गार्हस्थ्यं कर्म सर्वेषां कर्मणां श्रेष्ठमुच्यते ७ अतः स्त्रीसंग्रहो ग्राह्यो मया घोरे कलौ युगे । यदि मे च भवेद्भार्या मनोवृत्त्यनुसारिणी ८ तर्हि मे सफलं जन्म मम श्रेयो भवेदिह । इत्येवं संमतं कृत्वा शिवां मङ्गलदायिनीम् ९ चन्दनाद्यैश्च संपूज्य तुष्टाव मनसा पराम् । विश्वेश्वरीं जगन्मूर्तिं सच्चिदानन्दरूपिणीम् १० पितृशर्मोवाच ॥ नमः प्रकृत्यै सर्वायै कैवल्यायै नमो नमः । त्रिगुणैक्यस्वरूपायै तुरीयायै नमो नमः ११ महत्तत्त्वजनन्यै च दृङ्मूकर्त्र्यै नमो नमः । ब्रह्ममातर्नमस्तुभ्यं साहंकारपितामहि १२ पृथग्गुणायै शुद्धायै नमो मातर्नमो नमः । विद्यायै शुद्धसत्त्वायै लक्ष्म्यै सत्त्वरजोमयि १३ नमो मातरविद्यायै ततः शुद्धायै नमो नमः । कालायै सत्त्वतमोभूत्यै नमो मातर्नमो नमः १४ स्त्रियै शुद्धरजोमूर्त्यै नमस्त्रैलोक्यवासिनि । नमो रजस्तमोमूर्त्यै दुर्गायै च नमो नमः १५ इति श्रुत्वा स्तवं देव्या प्रसादस्थापितस्तया । सुतायां विष्णुयशसो ब्राह्मणस्य तदा स्वयम् १६ तामुद्वाह्य द्विजो देवीं नाम्ना वै ब्रह्मचारिणीम् । न्यवसन्मथुरायां स कृत्वा धर्मं स्वयं हृदि १७ प्रियायै स रजोवत्यै ऋतुदानं करोति हि । चत्वारश्चात्मजाश्चासञ्चतुर्वेदैक्यधारिणः १८ ऋग्यजुश्च तथा साम तुर्यश्चासीदथर्वणः । ऋग्यस्य

हें, हे महाबुद्धिमाना, आह्मास सांग. कारण, तु सर्वज्ञ आहेस असें आह्मी मानतों १—३. सूत ह्मणतात— पूर्वी कलियुगामध्यें पितृशर्मा ह्मणून एक उत्तम ब्राह्मण होता. तो वेद व वेदांगें यांचें तत्त्व जाणणारा व यमलोकाच्या भयानें युक्त असा होता ४. हा अधर्मापासून झालेला कलिकाल अतिघोर काल आहे असें जाणून व यमाच्या राष्ट्राचें बंधन जाणून तो चिंतातुर झाला ५. ' कोणत्या आश्रमानें व वर्णानें माझें इहलोकीं कल्याण होईल ? कलियुगामध्यें संन्यासमार्ग तर दांभिक पाखंड्यांनी खंडित केला आहे ६. वानप्रस्थ कर्मामध्यें चर्यच आहे. ब्रह्मचर्य कोठें कोठें आढळतें. गृहस्थाचें कर्म मात्र सर्व कर्मांत श्रेष्ठ आहे असें सांगितलें आहे ७. यास्तव, या घोर कलियुगात मला स्त्रीसंग्रह करणें उचित आहे. जर मला मनाप्रमाणें वागणारी स्त्री मिळाली तर माझा जन्म सफल होणार व माझें इहलोकीं कल्याण होणार ! ' अशा प्रकारें संमत करून मंगलदायिनी जी शिवा तिचें चंदनादिकांनीं पूजन करून तो मनानें त्या सच्चिदानंदरूपी जगन्मूर्ति श्रेष्ठ विश्वेश्वरीचें स्तवन करिता झाला ८—१० पितृशर्मा ह्मणतो —प्रकृतीस नमस्कार असो; सर्वी व कैवल्यरूप अशा तुला नमस्कार असो. त्रिगुणाच्या ऐक्यरूप व तुरीयरूप अशा तुला नमस्कार असो ११. महत्तत्त्वाच्या जननीस व दृङ्मूकर्त्रीस नमस्कार असो. हे ब्रह्ममाते, हे अहंकारासह सर्वांचे पितामहि १२, तुज पृथग्गुणरूप व शुद्ध अशा मातेस वारंवार नमस्कार असो. हे सत्त्वरजोमयि माते, तुज विद्येस, शुद्धसत्त्वरूपिणीस, लक्ष्मीस, अविद्येस व नंतर शुद्धरूपिणीस नमस्कार असो. कालीस, सत्त्वतमोभूर्तीस व तुज जननीस नमस्कार असो १३,१४. हे त्रैलोक्यवासिनि, तुज स्त्रीस व शुद्धरजोमूर्तीस माझें वंदन असो. रजस्तमोरूप दुर्गेस वारंवार प्रणाम करितों १५. अशी स्तुति ऐकून त्या देवीनें विष्णुयशनामक ब्राह्मणाच्या कन्येच्या मस्तकावर स्वतः प्रसादकर ठेविला. त्या ब्रह्मचारिणीनामक देवीशीं विवाह करून तो ब्राह्मण स्वतः मनामध्यें धर्म बाळगून मथुरेमध्यें राहिला १६,१७. तो रजस्वला स्त्रीस ऋतुदान करीत असे. त्यामुळें चारी वेदांचें ऐक्य धारण करणारे चार पुत्र त्यास झाले १८. ऋक, यजुष,

तनयो व्याडिन्यांयशास्त्रविशारदः १९ यजुषस्तु सुतो जातो मीमांसो लोकविश्रुतः । पाणिनिः सामनस्यैव सुतोऽभूच्छब्दपारगः २० पुत्रो वररुचिः श्रेष्ठोऽथर्वणस्य नृपप्रिय । ते गता मागधेशस्य चन्द्रगुप्तस्य वै सभाम् २१ नृपस्तान्पूजयामास बहुमानपुरःसरं । अब्रवीत्तांस्ततो राजा ब्रह्मचर्यं हि किं परम् २२ व्याडिराह महाराज यः स्तुतौ तत्परः पुमान् । न्यायतोऽखिलवेदानां ब्रह्मचारी हि मे मतः २३ मीमांसकश्चाह भो राजन्यज्ञे यो हि पुमान्पर । कर्मणा यजते देवान्रोचनादिनिरर्चयेत् २४ हवन तर्पण कृत्वा ब्रह्मादिकसुरान्यति । तत्प्रसादं हि गृह्णीयाद्ब्रह्मचारी च स स्मृतः २५ श्रुत्वेदं पाणिनिश्चाह चन्द्रगुप्त शृणुष्व भोः । त्रिधा स्वरैः परं ब्रह्म शुद्धशब्दमयैः परैः २६ तथैव सूत्रपाठैश्च लिङ्धातुगणवृत्तिभिः । यो यजेद्ब्रह्मचारी स परं ब्रह्माधिगच्छति २७ श्रुत्वा वररुचिश्चाह शृणु मागध भूपते । गृहीत्वा यज्ञसत्रं च प्राप्तो गुरुकुलं वसन् २८ दण्डलोमनखाधारी भिक्षार्थी वेदतत्परः । आज्ञया च गुरोर्वेदं ब्रह्मचारी हि स स्मृतः २९ इति तेषां वचः श्रुत्वा पितृशर्माऽब्रवीदिदम् । यो गृहस्थे वसन्विप्र पितृदेवातिथिप्रियः ३० गामी पाणिगृहीतायामृतुकाले यतेन्द्रियः । ब्रह्मचारी हि मुख्यस्स श्रुत्वा राजाऽब्रवीदिदम ३१ स्वामिन्यज्ञव्रतो चोक्तः धर्मज्ञेन यशस्विना । कलौ भयङ्कर प्राप्त स धर्मो हि मतो मम ३२ इत्युक्त्वा तस्य शिष्योऽभूद्गुरुवाक्यपरायणः । तथाऽन्ते मरण प्राप्य स्वर्गलोक नृपो ययौ ३३ पितृशर्माऽपि मनसा ध्यात्वा दामोदर हरिं । हिमालयं गिरिं प्राप्य यागध्यानपरोऽभवत् ३४ [१४१६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥

साम व चवथा अथर्वण असे ते होते. ऋग्याचा पुत्र व्याडि ह्मणून होता. तो न्यायशास्त्रामध्ये निपुण असे १९. यजुपास मीमांस ह्मणून लोकप्रसिद्ध पुत्र झाला. सामनाम शब्दशास्त्रपारगत असा पाणिनि पुत्र होता २०. अथर्वणाचा श्रेष्ठ पुत्र वररुचि ह्मणून होता. तो राजास प्रिय होता. असो, ते मागधेश्वर चंद्रगुप्ताच्या सभेत गेले २१. राजाने बहुमानपुरःसर त्याची पूजा केली. त्यास राजा ह्मणाला 'कोणतें ब्रह्मचर्य श्रेष्ठ आहे ?' २२ व्याडि ह्मणाला 'महाराजा, न्यायाच्या आश्रयाने सर्व वेदांचे स्तुतीमध्ये तात्पर्य आहे असें जो जाणतो तो पुरुष श्रेष्ठ ब्रह्मचारी असे मला मान्य आहे' २३ मीमांसक ह्मणतो 'राजा, जो श्रेष्ठ पुरुष यज्ञामध्ये कर्मान्या योगाने देवांचे पूजन करितो, रोचना इत्यादि पदार्थांनी हवन, तर्पण करून ब्रह्मदेवादि देवास तृप्त करितो व त्याचा प्रसाद करून घेतो तो ब्रह्मचारी ह्मणून झटले आहे' २४,२५. हें ऐकून पाणिनि ह्मणाला 'हो चंद्रगुप्ता, ऐक. शुद्धशब्दमय व श्रेष्ठ अशा उदात्तादि तीन प्रकारच्या स्वरांनी व त्याचप्रमाणे लिंग, धातु, गण यासह सूत्रपाठांनी जो ब्रह्मचारी परब्रह्माचें यजन करितो त्यास परब्रह्माची प्राप्ति होते' २६,२७ हे ऐकून वररुचि ह्मणाला 'हो मागधराजा, ऐक. जो यज्ञसूत्राचें ग्रहण करून आलेला शिष्य गुरुकुली राहून दंड, केश व नखें धारण करून, भिक्षा मागून, वेदाभ्यासामध्ये तत्पर राहून गुरूच्या आज्ञेप्रमाणे वागतो तो ब्रह्मचारी होय असे म्हटलेले आहे' २८,२९. हे त्याचे वचन ऐकून पितृशर्मा असे ह्मणाला 'जो पितर, देव व अतिथि यास प्रिय असून गृहामध्ये राहणारा, विवाह करून ऋतुमती भार्येशी गमन करणारा व अन्य समयी नियतेंद्रिय रहाणारा ब्राह्मण तोच मुख्य ब्रह्मचारी होय.' हें ऐकून राजा ह्मणाला ३०,३१ 'महाराज, धर्मज्ञ व यशस्वी अशा आपण जें सांगितलेत तोच, भयंकर कलि आला असता धर्म होय असें माझें मत आहे' ३२. असे बोलून तो त्याचा शिष्य झाला व आपल्या गुरूच्या वाक्यात तत्पर होऊन राहिला. शेवटी मरण पावून तो राजा स्वर्गलोकी गेला ३३. नंतर

ऋषय ऊचुः ॥ भगवन्सर्वतीर्थानां दानानां किं परं स्मृतम् । यत्कृत्वा च कलौ घोरे परां निर्वृतिमाप्नुयात् १ सूत उवाच॥ सामनस्य सुतः श्रेष्ठः पाणिनिर्नाम विश्रुतः । काणभक्षप्रशिष्यैश्च शास्त्रज्ञैः स पराजितः २ लज्जितः पाणिनिस्तत्र गतस्तीर्थान्तरं प्रति । स्नात्वा सर्वाणि तीर्थानि संतर्प्य पितृदेवताः ३ केदारमुदकं पीत्वा शिवध्यानपरोऽभवत् । पर्णाशी सप्त दिवसाञ्जलभक्षस्ततोऽभवत् ४ ततो दशदिनान्तं स वायुभक्षो दशाहानि । अष्टाविंशदिने रुद्रो वरं ब्रूहि वचोऽब्रवीत् ५ श्रुत्वाऽमृतमयं वाक्यमस्तौद्रुद्रदया गिरा। सर्वेशं सर्वलिङ्गेश गिरिजावल्लभं हरम् ६ पाणिनिरुवाच ॥ नमो रुद्राय महते सर्वेशाय हितैषिणे । नन्दीसस्थाय देवाय विद्याभयकराय च ७ पापान्तकाय भर्गाय नमोऽनन्ताय वेधसे । नमो मायाहरेशाय नमस्ते लोकशंकर ८ यदि प्रसन्नो देवेश विद्यामूलप्रदो भव । परं तीर्थं हि मे देहि द्वैमातरपितर्नमः ९ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा महादेवः सूत्राणि प्रददौ मुदा । सर्ववर्णमयान्येव अइउणादिशुभानि वै १० ज्ञानह्रद सत्यजल रागद्वेषमलापहे । यः स्नाप्य मानसे तीर्थे सर्वतीर्थफलं लभेत् ११ मानसं हि महत्तीर्थं ब्रह्मदर्शनकारकम् । पाणिने ते ददौ विप्र कृतकृत्यो भवान्भव १२ इत्युक्त्वाऽन्तर्दधे रुद्र पाणिनिः स्वगृहं ययौ । सूत्रपाठं धातुपाठं गणपाठं तथैव च १३ लिङ्गसूत्रं तथा कृत्वा परं निर्वाणमाप्तवान् । तस्मात्त्वं भार्गवश्रेष्ठ मानसं तीर्थमाश्रय १४ यतो यातो स्वयं गङ्गा सर्वतीर्थमयी शिवा । गङ्गातीर्थात्परं

पितृशर्माही मनानें दामोदर हरीचें ध्यान करून हिमालयपर्वतावर गेला व योग्य ध्यानामध्यें तल्लीन झाला ३४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥

ऋषि ह्मणतातः— महाराज, सर्व तीर्थामध्यें व दानामध्यें श्रेष्ठ काय आहे, की ज कल्याने या घोर कलीमध्यें प्राणी श्रेष्ठ शांतीस प्राप्त होतो ? १. सूत ह्मणतात.– सामनाचा श्रेष्ठ पुत्र पाणिनि नावानें प्रसिद्ध होता. त्यास एकदा काणभक्षाच्या शास्त्रज्ञ शिष्यांनी पराजित केलें २. तेव्हा लज्जित झालेला पाणिनि तीर्थांतरीं गेला. सर्व तीर्थांचे स्नान करून त्यानें तर्पणाच्या योगानें पितर व देवता यांस तृप्त केलें ३. केदाराचें जल पिऊन तो शंकराच्या ध्यानामध्यें तत्पर होऊन राहिला. सात दिवस पानें खाऊन नंतर तो जलभक्षण करून राहू लागला ४. तदनंतर दहा दिवस झाले असता पुढें त्यानें दहा दिवस वायुभक्षण केलें. अठ्ठाविसाव्या दिवशीं रुद्र " वर माग " असें ह्मणाला. हे अमृतमय वाक्य ऐकून तो त्या सर्वेश, सर्वलिंगेश व गिरिजावल्लभ अशा हराची गद्गद वाणीनें स्तुति करिता झाला ५-६. पाणिनि ह्मणतोः— सर्वेश व सर्वांच हित इच्छिणारा असा जो महारुद्र त्यास नमस्कार असो. नंदीवर बसणाऱ्या, हातात विद्या व अभयमुद्रा यांस धारण करणाऱ्या; पापाचा नाश करणाऱ्या, विद्वान् व अनंत भर्गास नमस्कार असो. हे लोककल्याणकरा, तुज मायाहरेशास नमस्कार असो ७-८. हे देवाधिदेवा, तूं जर मजवर प्रसन्न झाला असशील तर विद्येचें मूल मला दे. हे गजाननाच्या पित्या, मला परम तीर्थ दे. तुला नमस्कार असो ९. सूत ह्मणतातः— असें ऐकून महादेवानें मोठ्या आनंदानें त्यास अइउण् इत्यादि सर्व शुभवर्णमय सूत्रें दिलीं १०. ज्याच्यामध्यें सत्य हें जल आहे; व जें रागद्वेषादि मलाचा नाश करीत असतें अशा मानसरूप ज्ञानसरोवरामध्यें सर्व तीर्थांचे फल मिळतें ११. मानस हे मोठें तीर्थ आहे. तें ब्रह्मदर्शन करविणारें आहे. हा पाणिनिनामक ब्राह्मणा, मीं हें तुला दिलेलें आहे. आता तूं कृतकृत्य हो १२. असे बोलून शंकर गुप्त झाला व पाणिनि घरीं आला. आणि सूत्रपाठ, धातुपाठ, गणपाठ व त्याचप्रमाणें लिंगसूत्रें करून तो परम सुखाप्रत प्राप्त झाला. याप्रमाणें, हे भार्गवश्रेष्ठा, तू मानसतीर्थाचा आश्रय कर १३, १४. या

तीर्थं न भूतं न भविष्यति १५ [१४३१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डाख्यपर्वाये कलियुगीयेतिहाससमुच्चय एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥

सूत उवाच ॥ तोतादर्या द्विजः कश्चिद्वेदेष्व इति श्रुतः । बभूव कृष्णभक्तश्च वेदवेदाङ्गपारगः १ गत्वा वृन्दावनं रम्यं गोपगोपीनिषेवितम् । मनसा पूजयामास देवदेवं जनार्दनम् २ वर्षान्ते च हरिः साक्षाद्दृष्टो ज्ञानमनुत्तमम् । तेन ज्ञानेन संप्राप्ता हृदि भागवती कथा ३ शुकेन वर्णिता या वै विष्णुरातायधीमते । तां कथां वर्णयामास मोक्षमूर्तिः सनातनीम् ४ कथान्ते भगवान्विष्णुः प्रादुरासीज्जनार्दनः । उवाच स्निग्धया वाचा वरं ब्रूहि महामते ५ बोधदेव उवाच ॥ नमस्ते भगवन्विष्णो लोकानुग्रहकारक । त्वया ततमिदं विश्वं देवतिर्यङ्नरादिकम् ६ त्वन्नाम्ना नरकार्ताश्च ते कृतार्थाः कलौ युगे । त्वया दत्ता भागवतं श्रीमद्व्यासेन निर्मितम् ७ माहात्म्यं तस्य मे ब्रूहि यदि तुष्टो वरस्त्वया । श्रीभगवानुवाच ॥ एकदा भगवान्रुद्रो भवान्या सह शंकरः ८ बौद्धराज्ये जगत्यासं दम्भपाखण्डनिर्मिते । दृष्ट्वा काश्यां भूमितुङ्गं प्रणनाम मुदा युतः । जय सच्चिदानन्द विभो जगदानन्दकारक ९ इति श्रुत्वा शिवा प्राह कोदेवोऽस्ति तवोत्तमः । स होवाच महादेवि यज्ञः सप्ताहमत्र वै १० तस्माद्भूमिरपवित्रत्वमिह प्राप्त वरानने । सर्वतीर्थाधिकत्वं च स्वयं ब्रह्म सनातनम् ११ इति श्रुत्वा शिवा देवी प्राप्ताऽस्य गुह्यकालये । रुद्रेण सहिता तत्र भूमिशुद्धिमकारयत् १२ चण्डीशश्च गणेशश्च नन्दिनो गुह एव च । रक्षार्थे स्थापितास्तत्र देवदेवेन भो

मानमतीर्थापासूनच सर्वतीर्थमय व कल्याणरूप अशी गंगा निर्माण झाली आहे. या गंगातीर्थाहून श्रेष्ठ तीर्थ आजपर्यंत झालें नाहीं व पुढें होणार नाहीं १९. याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा एकतिसावा अध्याय समाप्त झाला ॥३१॥

सूत ह्मणतातः—तोतादरीमध्यें कोणी एक बोधदेव ह्मणून प्रसिद्ध ब्राह्मण होता. तो कृष्णाचा भक्त व वेदवेदांगपारग असे १. गोप व गोपी यांनीं सेविलेलें असें जे रम्य वृंदावन तेथें जाऊन त्यानें मनानें देवाधिदेव जनार्दनाचें पूजन केलें २. एका वर्षानंतर हरि त्यास साक्षात् दिसला व त्याने उत्तम ज्ञान दिलें. त्या ज्ञानानें त्याच्या हृदयामध्यें बुद्धिमान् विष्णुरातास शुकानें सांगितलेली भागवतसंबंधी कथा प्राप्त झाली. तेव्हा मोक्षरूप व सनातन अशा त्या कथेचें त्यानें वर्णन केलें ३,४. कथेच्या शेवटीं भगवान् जनार्दन विष्णु त्याच्यापुढें प्रकट झाला व प्रेमळ वाणीनें ह्मणाला " वा बुद्धिमाना, वर माग " ५. बोधदेवः— हे लोकांवर अनुग्रह करणाऱ्या भगवन् विष्णो, देव, पशु, पक्षी इत्यादि तिर्यग्योनि व मनुष्ययोनि यांनी युक्त असलेलें हे जग तू व्यापिलें आहेस. कलियुगामध्यें तुझ्या नावानें नरकामध्यें पीडित होणारे प्राणी कृतार्थ होतात. श्रीमद्व्यासानीं निर्माण केलेलें हे भागवत तूं मला दिलेस; पण मला जर तू वर दिला असशील तर त्याचें माहात्म्य सांग. श्रीभगवान् ह्मणतातः— एकदा भवानीसह भगवान् शंकर रुद्र ६—८ जगामध्यें देश व पाखंड यांनीं निर्मित असें बौद्धांचे राज्य झालें असता काशीमध्यें भूमीचा उंच भाग पाहून त्यास, आनंदयुक्त होऊन हे सच्चिदानंद प्रभो, जगदानंदकारक असें ह्मणून वंदन करिता झाला ९. हें ऐकून भवानी ह्मणाली ' तुमच्याहून उत्तम देव कोण आहे ? ' त्यावर तो ह्मणतो ' हे महादेवि, येथे सप्ताहयज्ञ झाला १०. त्यामुळें हे सुंदरि, येथील भूमीस पवित्रत्व प्राप्त झालें आहे, हे स्थळ सर्व तीर्थांहून श्रेष्ठ झालें; व येथें स्वतः सनातन ब्रह्म आहे ' ११ हें ऐकून शिवा देवी गुह्यकालयामध्यें प्राप्त झाली व तेथे रुद्रासह भूमिशुद्धि करिती झाली १२. हे द्विज, चंडीश, गणेश, नंदिन व गुरु यांचीं रक्षणाक-

द्विज १३ शृणु देवि कथां रम्यां मम मानससंस्थिताम् । इत्युक्त्वा ध्यानमास्थाय समाहेन स्ववर्णयत् १४ अष्टाह्ने नेत्र उन्मील्य दृष्ट्वा निद्रागतां शिवाम् । बोधयामास भगवान्कथान्ते लोकशंकरः १५ किंचती ते श्रुता गाथा श्रुत्वाह जगदम्बिका । सुधामन्थनपर्यन्तं चरित्रं शिवयेरितम् ६ क्रोडस्थः शुकः श्रुत्वा चिरञ्जीवित्वमागतः । पार्वत्या रक्षितः सो वै शुकः परमसुन्दरः १७ स्थित्वा शिवस्य सदने मम ध्यानपरोऽभवत् । मयाज्ञया शुकः साक्षात्त्वदीयहृदयस्थितः १८ तेन प्राप्तं भागवतं माहात्म्यं चास्य दुर्लभम् । त्वं वै गन्धर्वसेनाय पित्रे विक्रमभूपतेः १९ नर्मदाकूलमासाद्य श्रावयं त्वं कथां शुभाम् । हरिमाहात्म्यदानं हि सर्वदानपरं स्मृतम् २० सत्पात्राय प्रदातव्यं विष्णुभक्ताय धीमते । बुभुक्षितान्नदानं च तद्दानस्य समं न हि २१ इत्युक्त्वाऽन्तर्दधे देवो बोधदेवः प्रसन्नधीः २२ [१४५३] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगेतिहासे रम्यदेवदुर्विज्ञानमोऽध्यायः ॥ ३२ ॥

ऋषय ऊचुः ॥ वाग्जं कर्म स्मृतं सूत वेदपाठं सनातनम् । बहुत्वात्सर्ववेदानां श्रोतुमिच्छामहे वयम् १ केन स्तोत्रेण वेदानां पाठस्य फलमाप्नुयात् । पापानि विलयं यान्ति तन्नो वद विचक्षण २ सूत उवाच ॥ विक्रमादित्यराज्ये तु द्विजः कश्चिदभूद्भुवि । व्याधकर्मेति विख्यातो ब्राह्मण्यां शूद्रतोऽभवत् ३ त्रिपाठिनो द्विजस्यैव भार्या नाम्ना हि कामिनी । मैथुनेच्छावती नित्यं मदाघूर्णितलोचना ४ द्विजस्तच्छतीपाठे वृत्त्यर्थी कर्हिचिद्गत । ग्रामं देवलकं रम्यं बहुवैश्यनिषेवितं ५

रिता त्या देवाधिदेवानें तेथें स्थापना केली १३. हे देवि, माझ्या मनामध्यें असलेली रम्य कथा मी तुला सागतों. असें बोलून ध्यान लावून सात दिवसांत त्यानें कथा सांगितली. आठव्या दिवशीं तो जो नेत्र उघडून पाहतो तो पार्वती निद्रित झाली आहे असें त्यास आढळलें. तेव्हा कथेच्या शेवटीं तो लोकशंकर भगवान् तिला जागी करिता झाला १४,१५ व ह्मणाला ' तें कथा कोठपर्यंत ऐकिलीस ? ' यावर जगदंबा ह्मणाली ' अमृतमन्थनापर्यंत मी चरित्र ऐकलें ' १६ पण ती कथा तेथेंच एका पोकात बसलेल्या पोपटानें ऐकिली व त्यामुळें तो चिरजीव झाला. तेव्हा त्या अतिसुंदर पोपटाचें पार्वतीनें रक्षण केलें १७. शिवमन्दिरामध्यें राहून तो माझ्या ध्यानामध्ये परायण झाला. माझ्या आज्ञेनें तो शुक साक्षात् तुझ्या हृदयामध्यें राहिला व त्यामुळें तुला भागवत प्राप्त झालें. याचें माहात्म्य दुर्लभ आहे. तू नर्मदानदीच्या तीरी जाऊन विक्रम भूपतीच्या गंधर्वसेननामक पित्यास ही शुभ कथा सांग. हरिमाहात्म्याचे दान सर्व दानामध्ये श्रेष्ठ सांगितलेलें आहे १८-२०. जो सत्पात्र, बुद्धिमान् व विष्णुभक्त असेल त्यास द्यावें. बुभुक्षितास अन्न देणें ह्या दानासारखें तर दानच नाहीं २१. असें बोलून देव गुप्त झाला व बोपदेव प्रसन्न झाला २२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखण्डनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा बत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३२ ॥

ऋषि ह्मणतात. वेदाचा पाठ करणें हे सनातन वाग्ज ह्मणजे वाणीनें घडणारें कर्म आहे. पण सर्व वेदाचा फार मोठा विस्तार असल्यामुळें त्यांतील कोणत्या स्तोत्रानें सर्व वेदाच्या पाठाचें फल मिळेल व पापाचा लय होईल हे ऐकण्याची आमची इच्छा आहे. तरे हे बुद्धिमाना, ते आह्मास सांग १,२. सूत ह्मणतात – विक्रमादित्याच्या राज्यांत भूलोकीं कोणी एक ब्राह्मण रहात असे. व्याधकर्मा ह्मणून तो प्रसिद्ध होता. तो ब्राह्मण असूनही आचरणामुळें शूद्र झाला होता ३. त्या त्रिपाठी ब्राह्मणाची कामिनीनामक भार्या होती. ती सर्वदा मैथुनाच्या इच्छेनें युक्त व मदानें जिचे नेत्र फिरले आहेत अशी असे ४. तो ब्राह्मण एकदा सप्तशतीच्या पाठावर वृत्ति करण्याकरिता अनेक वैश्य जेथे हात होते अशा रम्य देवलकनामक ग्रामामध्यें गेला ५. तेथें त्यास एक महिना लागला व त्यामुळें

अत्र मासगतः कालो नायथौ स स्वमन्दिरे। तदा तु कामिनी दुष्टा रूपयौवनसंयुता ६ दृष्ट्वा निषादं सबलं काष्ठभारोपजीवनम्। तस्मै दत्त्वा पञ्च मुद्रा जुभुजे कामपीडिता ७ तदा गर्भं दधौ सा च व्याधवीर्येण सञ्चितम्। पुत्रोऽभूद्दशमासान्ते जातकर्म पिताऽकरोत् ८ द्वादशाब्दे गते काले स धूर्तो वेदवर्जितः। व्याधकर्मकरो नित्यं व्याधकर्मा ह्यतोऽभवत् ९ निष्कासितौ द्विजैर्नैव मातृपुत्रौ द्विजाधमौ। त्रिपाठी ब्रह्मचर्यं तु कृतवान्धर्मतत्परः १० प्रत्यहं चण्डिकापाठं कृत्वा विन्ध्यगिरौ वसन्। जीवन्मुक्तोऽभवच्छीघ्रं जगदम्बाप्रसादतः ११ निषादस्य गृहं चाभौ धनं गत्वाऽतिमुदा। प्रत्यहं जारभावेन बहुद्रव्यमुपार्जितम् १२ व्याधकर्मा तु चौर्येण पितृमातृप्रियङ्करः। एकदा दैवयोगेन शिवमन्दिरमाययौ १३ चौरवृत्तिपरो धूर्तः स्त्रिया भूषणमाहरत्। कैश्चिदुज्ज्ञातः स नो धूर्तो बहुमायाविशारदः १४ कदाचित्पाठवांस्तत्र द्विजवक्त्रसमुद्गतम्। श्रुत्वादिचरित्रं हि तेन शब्दप्रियेण वै १५ पाठपुण्यप्रभावेण धर्मबुद्धिस्ततोऽभवत्। दत्त्वा चौर्यधनं सर्वं तस्मै विप्राय पाठिने १६ निष्पत्त्वमगमत्तत्राक्षरमैशं जजाप ह। बीजमन्त्रप्रभावेण तदङ्गात्पापमुल्बणम् १७ निःसृतं कृमिरूपेण बहुवर्णेन तापितम्। त्रिवर्षान्ते च निष्पापो बभूव द्विजसत्तमः १८ पठित्वाऽक्षरमालां च जजापादिचरित्रकम्। द्वादशाब्दमिते काले काश्यां गत्वा तु स द्विजः १९ अन्नपूर्णां महादेवीं तुष्टाव परया मुदा। रोचनाद्यैश्च सपूज्यां मुनिदेवनिषेवितम् २० नित्यानन्दकरीं पराभयकरीं सौन्दर्यरत्नाकरीं निर्धूताखिलपापपावनकरीं काशीपुरा-

तो आपल्या गृही आला नाही. तेव्हा ती दुष्ट व रूपयौवनयुक्त कामिनी काष्ठभारावर उपजीविका करणाऱ्या एका बलवान् भिल्लास पाहून कामाने पीडित झाल्यामुळे त्यास पाच मुद्रा देऊन त्याचा भोग घेती झाली. तेव्हा व्याधाच्या वीर्याने राहिलेला असा गर्भ तिने धारण केला. दहाव्या महिन्यानंतर पुत्र झाला व त्याचे जातकर्म पित्याने केले ६–८. बारा वर्षे काल लोटला असता तो ठग व वेदशून्य झाला. तो सतत व्याधाचे कर्म करीत असे व त्यामुळे व्याधकर्मा हे त्याचे नाव पडले ९. तेव्हा त्या द्विजाने त्या अधम मातापुत्रास घरातून घालवून दिले व तो त्रिपाठी ब्रह्मचर्याचे पालन करून धर्मतत्पर होऊन राहिला १०. रोज चंडिकेचा पाठ करून तो विन्ध्यपर्वतावर रहात असे. जगदंबेच्या कृपेने तो लवकरच जीवन्मुक्त झाला ११. इकडे ती दोघे निषादाच्या गृही जाऊन आनंदाने राहिली. जारकर्मावर ती रोज पुष्कळ द्रव्य मिळवीत असत १२. व्याधकर्मा तर चोरीच्या योगाने पिता व माता यांचे प्रिय करीत असे. एकदा दैवयोगाने तो चोरीमध्ये तत्पर असणारा ठग पार्वतीच्या मंदिरामध्ये आला व स्त्रियांची भूषणे त्याने लाबविली. पण तो बहुत प्रकारच्या कपटामध्ये कुशल असणारा धूर्त कोणाच्या आढळांत आला नाही. एकदा तो तेथे आला व ज्यास शब्द प्रिय आहेत अशा त्या ठगाने ब्राह्मणाच्या तोंडून निघालेले आदिचरित्र ऐकले १३–१५ व पाठाच्या पुण्यप्रभावाने तो तत्काल धर्मबुद्धि झाला. त्या पाठ करणाऱ्या ब्राह्मणास चोरीचे सर्व द्रव्य देऊन तो त्याचा शिष्य झाला व ईशसंबंधी अक्षराचा जप करूं लागला. त्या बीजमंत्राच्या प्रभावाने त्याच्या अंगातून अनेक वर्णाच्या किड्यांच्या रूपाने भयंकर पाप बाहेर पडले. व्याप्रमाणे तीव्र वर्षे तपश्चर्या केल्यावर तो उत्तम द्विज निष्पाप झाला १६–१८. अक्षरमालेचा पाठ करून तो आदिमायेच्या चरित्राचा जप करीत असे. बारा वर्षे झाल्यावर तो ब्राह्मण काशीस जाऊन मोठ्या आनंदाने अन्नपूर्णा महादेवीची स्तुति करिता झाला. मुनि व देव यांनी जिची सेवा केली आहे अशा त्या देवीचे रोचनादि पूजासंभारांनी त्याने पूजन केले १९,२०. नित्य आनंद देणारी, श्रेष्ठ अभय देणारी, सौंदर्यरूप रत्नाची खाण, सर्व पापांचे क्षालन

धीश्वरी । नानालोककरी महाभयहरी विश्वम्भरी सुन्दरी विद्यां देहि कृपावलम्बनकरी माताऽन्नपूर्णेश्वरी ११ स इत्युक्त्वोत्तरं जप्त्वा ध्यानस्तिमितलोचनः । सुष्वाप तत्र मुदितः स्वप्ने प्रादुरभूच्छिवा १२ दत्त्वा तस्मै हि ऋग्विद्यां पुनरन्तरधीयत । उत्थाय स द्विजो धीमाँल्लब्ध्वा विद्यामनुत्तमाम् २३ विक्रमादित्यभूपस्य यज्ञाचार्यो बभूव ह । यज्ञान्ते योगमास्थाय जगाम तु हिमालयम् १४ एतत्ते वर्णितं विप्र पुण्यमादिचरित्रकम् । ब्रह्म भूय यथा विप्रो लेभे सिद्धिमनुत्तमाम् २५ [१४७८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये मध्यमचरित्रवर्णनं नाम त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३३ ॥

सूत उवाच ॥ उज्जयिन्यां पुरा विप्र राजन्यः सर्वहिंसकः । बभूव मद्यमांसाशी भीमवर्मेति विश्रुतः १ मांसलोभेन स खलः सूकरान्ग्रामकुक्कुटान् । हत्वा चाभक्षयत्पापी वेश्यासङ्गपरायणः २ नरमांसं स क्रव्यादस्त्यक्त्वान्यान्भक्षकोऽभवत् । एवं बहुगते काले भीमवर्मा महाधमः ३ विषूच्यग्निवशं यातो ममार च युवाऽपि सः । कारितश्चण्डिकापाठस्तेन दुष्टेन भीरुणा ४ तस्य पुण्यप्रभावेण नागतो नरकान्प्रति । पुनः क्षत्रत्वमगमन्मागधे स महीपतिः ५ महानन्दीति विख्यातो राजनीतिपरायणः । जातिस्मरो बभूवासौ वेदधर्मपरायणः ६ कात्यायनस्य शिष्योऽभून्महाशाक्तस्य धीमतः । तस्मै नृपाय स मुनिर्दत्त्वा मध्यचरित्रकम् ७ सबीज पुनरागत्य विन्ध्ये शक्तिपरोऽभवत् । नृपोऽपि प्रत्यहं देवीं महालक्ष्मीं सनातनीम् ८ रोचनाद्यैश्च संपूज्य

करून पावन करणारी, काशीपुराची मुख्य देवी, अनेक लोकांस निर्माण करणारी, मोठ्या भयाचें हरण करणारी, विश्वाचें भरण करणारी, सुंदरी, कृपेचें अवलंबन करणारी, माता व अन्नपूर्णेश्वरी अशा हे देवि, मला विद्या दे २१. असें आठ वेळ जपून ध्यानाच्या योगानें त्याचे नेत्र स्तब्ध झाले. तेव्हां तो आनंदानें तेथें निजला असतां स्वप्नामध्यें शिवा त्याच्यापुढें प्रकट झाली २२. त्यास ऋग्विद्या देऊन ती पुनरपि गुप्त झाली. तेव्हा तो बुद्धिमान् ब्राह्मण उठून व अत्युत्तम विद्या प्राप्त करून घेऊन २३ विक्रमादित्य राजाचा यज्ञाचार्य झाला. यज्ञाच्या शेवटीं योगामध्यें प्रवृत्त होऊन तो हिमालयपर्वतावर गेला २४. हे ब्राह्मणा, हें मीं तुला आदिचरित्राचें पुण्य व त्याच्या योगानें ब्राह्मण ब्रह्मरूप होऊन अत्युत्तम सिद्धीस कसा प्राप्त झाला तें सांगितलें २५. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तेहतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३३ ॥

सूत ह्मणतातः— हे ब्राह्मणा, उज्जयिनीमध्यें पूर्वी एक सर्वांची हिंसा करणारा भीमवर्मा या नांवाचा क्षत्रिय होऊन गेला. तो मद्यपान व मासभक्षण करणारा असे १. मासाच्या लोभानें तो दुष्ट डुकरें व गावकोंबडी मारून खात असे; तो पापी वेश्येच्या संगमध्यें परायण असे. तो दुष्ट नरमास मात्र सोडून बाकी सर्वांस भक्षण करीत होता. ह्याप्रमाणें पुष्कळ काल निघून गेला असतां तो महाअधम भीमवर्मा २,३ विषूचिनामक रोगरूप अग्नीच्या वश झाला व तरुण असूनही मरण पावला. त्या भ्यालेल्या दुष्टानें चंडिकेचा पाठ करविला ४. व त्या पुण्यप्रभावानें तो नरकांत पडला नाहीं. तर तो पुनरपि क्षत्रिय झाला. तो मागधदेशामध्ये राजा झाला ५. महानंदी या नांवानें प्रसिद्ध असून तो राजनीतीमध्यें कुशल असे. त्यास पूर्वजन्माचें स्मरण असे. तो वैदिक धर्मामध्यें तत्पर असे ६. बुद्धिमान् व महाशक्तिभक्त अशा कात्यायनाचा तो शिष्य झाला. त्या राजास बीजमंत्रासह मध्यचरित्र देऊन तो मुनि पुनरपि विंध्यपर्वतावर गेला व शक्तिपरायण झाला. राजाही रोज सनातन महालक्ष्मी देवीचें रोचनादिकांनीं पूजन करून मध्यचरित्राचा जप करूं लागला. पुढें

जपन्मध्यचरित्रकम् । पुण्यक्षत्रत्वमगमन्महामायाप्रसादतः ९ शूद्रभावं परित्यज्य क्षत्रभावमुपागतः । द्वादशाब्दान्तरे प्राप्तस्तद्गुरुः शक्तितत्परः १० लक्षचण्डीं नृपादेव कारयामास धर्मतः । तदा प्रादुरभूद्देवी जगदम्बा सनातनी ११ नृपाय धर्ममर्थं च कामं मोक्षं हि चाददत् । महानन्दी महाभागो भुक्त्वा भोगं सुरप्सितम् १२ अन्ते जगाम परमं लोकं देवनमस्कृतम् । इति ते कथितं विप्र यत्पोक्तं यजुषो गतिः १३ तदै मध्यचरित्रेण प्राप्तं शूद्रनृपेण वै । इत्येव वर्णितं विप्र माहात्म्यं मुनिवर्णितम् १४ [१४९२] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥

सूत उवाच ॥ चित्रकूटे गिरौ रम्ये नानाधातुविचित्रिते । तत्रावसन्महाप्राज्ञ उपाध्यायः पतञ्जलिः १ वेदवेदाङ्गतत्त्वज्ञो गीताशास्त्रपरायणः । विष्णुभक्तः सत्यसन्धो भाष्यशास्त्रविशारदः २ कदाचित्स तु शुद्धात्मा गतस्तीर्थान्तरं प्रति । काश्यां कात्यायनेनैव तस्य वादो महानभूत् ३ वर्षान्ते च तदा विप्रो देवीभक्तेन निर्जितः । लज्जितः स तु धर्मात्मा स तुष्टाव सरस्वतीम् ४ पतञ्जलिरुवाच ॥ नमो देव्यै महाभद्रे सर्वेष्टे नमो नमः । शिवायै सर्वमाङ्गल्ये विष्णुमाये च ते नमः ५ त्वमेव श्रद्धा बुद्धिस्त्वं मेधा विद्या शिवङ्करी । शान्तिर्वाणी त्वमेवासि नारायणि नमो नमः ६ इत्युक्ते सति विप्रे तु वागुवाचाशरीरिणी । विप्रोत्तमचरित्रं मे जप चैकाग्रमानसः ७ तच्चरित्रप्रभावेण साध्यं ज्ञानमवाप्नुयात् । कात्यायनस्य विप्रस्य राजसं ज्ञानमुद्धतम् ८ मद्भक्त्या तेन सप्राप्तं पराजय पतञ्जलेः । इति श्रुत्वा वचो देव्या विन्ध्यवासिनिमन्दिरम् ९ गत्वा तां पूजयामास तुष्टाव स्तोत्र-

---

महामायेच्या प्रसादानें तो पुण्यवान् क्षत्रिय झाला ७–९. ह्मणजे शूद्रभाव सोडून तो क्षत्रभावास प्राप्त झाला. शक्तीच्या उपासनेमध्यें तत्पर असलेला त्याचा गुरु बारा वर्षांनीं आला व त्यानें राजाकडून लक्षचंडीचें अनुष्ठान धर्मत: करविले. तेव्हा सनातनी जगदंबा देवी प्रकट झाली १०,११. तिनें राजास धर्म, अर्थ, काम व मोक्ष दिला. महाभाग्यवान् महानन्दी देवास इष्ट असलेले भोग भोगून शेवटीं देवानें ज्यास वंदन केलें आहे अशा परम लोकास गेला. हे ब्राह्मणा, याप्रमाणें मीं तुला कथानक सांगितलें. जी यजुष गति सांगितलेली आहे तें फल शूद्र राजानें मध्यचरित्रानें मिळविलें. असो; हे ब्राह्मणा, मुनींनीं वर्णिलेलें माहात्म्य मीं तुला सांगितलें १२–१४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चवतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३४ ॥

सूत ह्मणतात:— अनेक धातूनीं विचित्र झालेल्या रम्य चित्रकूट पर्वतावर पतंजलिनामक एक मोठा बुद्धिमान् उपाध्याय रहात असे १. तो वेद व वेदांगें याचे तत्त्व जाणणारा, गीताशास्त्रामध्यें परायण, विष्णुभक्त, सत्यप्रतिज्ञ व भाष्यशास्त्रामध्यें निपुण होता २. एकदा तो शुद्धात्मा तीर्थांतरीं गेला. तेव्हा काशीमध्यें कात्यायनाशीं त्याचा फार मोठा वाद झाला ३. पण एका वर्षान्या शेवटीं त्या देवीभक्तानें या ब्राह्मणास जिंकिलें. तेव्हां लज्जित झालेला तो धर्मात्मा सरस्वतीचें स्तवन करिता झाला ४. पतंजलि ह्मणतो:— महामूर्ति व सर्वमूर्ति देवीस माझा वारंवार नमस्कार असो. हे विष्णुमाये, तुज शिवेस व सर्वमांगल्यरूपिणीस नमस्कार असो ५. तूंच श्रद्धा, बुद्धि, मेधा, विद्या व कल्याणकरी आहेस. शांति व वाणीही तूंच आहेस. हे नारायणि, तुला नमस्कार असो ६. त्या ब्राह्मणानें असें ह्मटलें असतां आकाशवाणी झाली. " ब्राह्मणा, तूं एकाग्र मनानें माझ्या चरित्राचा जप कर ७; ह्मणजे त्या चरित्राच्या प्रभावानें तुला सत्यज्ञान प्राप्त होईल. कात्यायन ब्राह्मणास उत्तमोत्तम ज्ञान माझ्या भक्तीमुळें व प्राप्त झालें. व त्यामुळेंच त्यानें तुझा

पाठतः । ज्ञानं प्रसादजं विप्र. प्राप्य विष्णुपरायणम् १० कात्यायनं पराजित्य परां मुदमवाप ह । ऊर्ध्वपुण्ड्रं च तिलकं तुलसीकण्ठमालिकाम् ११ कृष्णमन्त्रं च शिवदं स्थापयित्वा गृहे गृहे । जने जने तथा कृत्य महाभाष्यमुदीरयत् १२ चिरञ्जीवित्वमगमद्विष्णुमायाप्रसादतः । इति ते कथितं विप्र जाप्यानामुत्तमं जपम् १३ किमन्यच्छ्रोतुमिच्छन्ति शौनकाद्या महर्षयः । सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् १४ मङ्गलं भगवान्विष्णुर्मङ्गलं गरुडध्वजः । मङ्गलं पुण्डरीकाक्षो मङ्गलायतनो हरिः १५ शुचिर्यो हि नरो नित्यमितिहाससमुच्चयम् । शृणुयाद्धर्मकामार्थी स याति परमां गतिम् १६ [१५०८] इति श्रीभविष्य महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चय उत्तमचरितमाहात्म्य पञ्चत्रिंशोऽध्याय. ॥ ३५ ॥

॥ समाप्तोऽयं द्वितीयः खण्ड. ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ऋषय ऊचुः ॥ भगवन्विक्रमाख्यानकालोऽयं भवतोदितः । शतद्वादशमर्षाढ्यो द्वापरस्य समो भुवि १ अस्मिन्काले महाभाग लीला भगवता कृता । तामेतां कथयास्माकं त्वं सर्वज्ञोऽसि सूतवान्तदा २ सूत उवाच ॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् । देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ३ भविष्याख्ये महाकल्पे प्राप्ते वैवस्वतेऽन्तरे । अष्टाविंशद्वापरान्ते कुरुक्षेत्रे रणोऽभवत् ४ पाण्डवैर्निर्जिताः सर्वे कौरवा युद्धदुर्मदाः । अष्टादश च दिवसे पाण्डवानां जयोऽभवत् ५ दिनान्ते भगवान्कृष्णो ज्ञात्वा कालस्य दुर्गतिम् । शिव तुष्टाव मनसा

पराभव केला. " देवीचे हे वचन ऐकून तो वि यवासिनीच्या मंदिरात गेला व तिची पूजा करून स्तोत्रपाठानें स्तुति करिता झाला. तेव्हा त्या ब्राह्मणास देवीच्या प्रसादापासून निर्माण झालेलें व विष्णुपरायण ज्ञान प्राप्त झालें ८-१०. कात्यायनाचा पराजय करून त्यास परमानंद झाला. ऊर्ध्वपुंड्र, तिलक, कठात तुलसीची माला व सुख देणारा कृष्णमंत्र ह्या सर्वांचा घरोघर प्रचार करून व प्रत्येक मनुष्यास त्याचा उपदेश करून तो महाभाष्य सांगता झाला ११,१२. विष्णुमायेच्या प्रसादानें तो चिरजीवित्वाप्रत प्राप्त झाला. हे ब्राह्मणा, याप्रमाणें मीं तुला जप करण्यास योग्य असलेल्या जपांपैकीं उत्तम जप सांगितला १३. आतां शौनकादि महर्षि आणखी काय ऐकण्याची इच्छा करीत आहेत ? सर्व कल्याणाचा अनुभव घेवोत; कोणीही दुःखास पात्र न होवो १४. भगवान् विष्णु मंगलरूप आहे; गरुडध्वज मंगलरूप आहे, पुंडरीकाक्ष मंगलमय आहे व हरि मंगलाचे स्थान आहे १५. जो धर्मकामार्थी पुरुष पवित्र होऊन नित्य हा इतिहाससमुच्चय ऐकितो तो परम गतीस जातो १६. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा पसतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३५ ॥

येथें हे दुसरे खंड समाप्त झालें ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ऋषि म्हणतात.—हे भगवन्, आपण विक्रमाख्यानरूप असा हा बाराशे वर्षांचा काल भूलोकीं द्वापरासारिखा होता असें सांगितलेंत १. हे महाभाग्यवाना, या कालात भगवानानें जी लीला केली ती आह्मास सांगा. सूता, तू सर्वदा सर्वज्ञ आहेस २. सूत म्हणतातः— नारायणास, पुरुषश्रेष्ठ नरास, देवी सरस्वतीस व व्यासास नमस्कार करून नंतर जयशब्दाचा उच्चार करावा ३. भविष्याख्य महाकल्पामध्ये वैवस्वत मन्वंतर प्राप्त झालें असता त्यातील अठ्ठाविसाव्या द्वापराच्या शेवटीं कुरुक्षेत्रामध्यें रण झालें ४. युद्धाधिपयीं दुष्ट अभिमान बाळगणाऱ्या कौरवास पांडवांनी जिंकिलें. अठराव्या दिवशीं पांडवांचा

योगरूपं सनातनम् ६ कृष्ण उवाच ॥ नम शान्ताय रुद्राय भूतेशाय कपर्दिने । कालकर्त्रे जगद्भर्त्रे पापहर्त्रे नमो नमः ७ पाण्डवान्रक्ष भगवन्मद्भक्तान्भृतभीरुकान् । इति श्रुत्वा स्तव रुद्रो नन्दियानोपरि स्थित ८ रक्षार्थं शिबिराणां च प्राप्तवाञ्छूलहस्तधृक । तदा नृपाज्ञया कृष्णः स गतो गजसाह्वयम् ९ पाण्डवाः पञ्च निर्गत्य सरस्वत्यास्तटेऽवसन् । निशीथे द्रौणिभोजौ च कृपस्तत्र समाययुः १० तुष्टुवुर्मनसा रुद्र तेभ्यो मार्गं शिवोऽददत् । अश्वत्थामा तु बलवाञ्छिवदत्तमसिं तदा ११ गृहीत्वा स जघानाशु धृष्टद्युम्नपुरःसरान् । हत्वा यथेष्टमगमद्द्रौणिस्ताभ्यां समन्वितः १२ पार्षतस्यैव सूतश्च हतशेषो भयातुरः । पाण्डवान्वर्णयामास यथा जातं जनक्षयम् १३ आगस्कृत शिवं ज्ञात्वा भीमाद्याः क्रोधमूर्छिताः । स्वायुधैस्तर्पयामासुर्देवदेवं पिनाकिनम् १४ अस्त्रशस्त्राणि तेषां तु शिवदेहे समाविशन् । दृष्ट्वा ते विस्मिताः सर्वे मजघ्नुस्तलमुष्टिभिः १५ ताञ्छशाप तदा रुद्रो यूयं कृष्णप्रपूजकाः । अतोऽस्माभी रक्षणीया वधयोग्या च वै भुवि १६ पुनर्जन्मलो प्राप्य भुङ्क्ष्वमपराधकम् । इत्युक्त्वान्तर्दधे देवः पाण्डवा दुःखितास्तदा १७ हरिं शरणमाजग्मुरपराधनिवृत्तये । तदा कृष्णयुताः सर्वे पाण्डवाः शस्त्रवर्जिताः १८ तुष्टुवुर्मनसा रुद्र तदा प्रादुरभूच्छिवः । वरं वरयत प्राह कृष्णः श्रुत्वाऽब्रवीदिदम् १९ शस्त्राण्यस्त्राणि यान्येव त्वदङ्गे क्षिप्तानि वै । पाण्डवेभ्यश्च देहि त्व शापस्यानुग्रहं कुरु २० इति श्रुत्वा शिवः प्राह कृष्णदेव नमोऽस्तु ते । अपराधो न मे

पूर्ण जय झाला ५. त्या दिवशीं संध्याकाळीं कालाची दुर्गति जाणून भगवान् कृष्ण योगरूप सनातन शंकराची मनानें स्तुति करिता झाला ६. कृष्ण ह्मणतातः— शांतरूप रुद्रास, भूतांच्या ईशास, कपर्दिसंज्ञक देवास, कालाच्या कर्त्यास, जगाच्या पालकास व पापाचें हरण करणाऱ्यास वारवार नमस्कार असो ७. हे भगवन्, भूतांचे भय बाळगणाऱ्या माझ्या पांडव भक्तांचें तूं रक्षण कर. अशी स्तुति ऐकून नदिरूप वाहनावर बसलेला रुद्र आला ८. हातात शूल धारण करणारा तो देव शिबिरांचें रक्षण करण्याकरिता प्राप्त झाला. त्यावेळीं राजाच्या आज्ञेनें कृष्ण हस्तिनापुरास गेला ९ व पांच पांडव शिबिरांतून निघून सरस्वतीच्या तीरीं जाऊन राहिले. मध्यरात्रीं अश्वत्थामा, भोज व कृपाचार्य हे तेथें आले १०. त्यांनी मनानें रुद्राचें स्तवन केलें असतां शंकरानें त्यास आंत जाण्यास मार्ग दिला. तेव्हां बलवान् अश्वत्थामा शिवानें दिलेली तरवार घेऊन लागलाच धृष्टद्युम्नादिकांस मारिता झाला. साराश, त्यास यथेष्ट मारून तो द्रौणपुत्र त्या उभयतांसह गेला ११,१२. इतक्यांत मारिलेल्या लोकांतून राहिलेला पार्षताचा सूत भयानें व्याकुळ होऊन पांडवांकडे गेला. व त्यानें लोकांचा क्षय कसा झाला हें त्यास कळविलें १३. तेव्हां अपराध करणारा शिव आहे असें जाणून भीमादिक क्रोधाने विचारशून्य झाले. व त्यांनी आपल्या आयुधांनी देवाधिदेव पिनाकीस प्रहार केला. पण त्यांचीं सर्व शस्त्रास्त्रें शंकराच्या शरीरांत प्रविष्ट झालीं. हें पाहून पांडव विस्मययुक्त झाले. व त्या सर्वांनीं त्यांच्यावर मुष्टि व तलहात यांचे प्रहार केले १४,१५. तेव्हां रुद्रानें त्यांस असा शाप दिला. 'तुम्ही कृष्णपूजक आहां. ह्मणून आह्मांस वधास योग्य अशा तुमचे रक्षण केलें पाहिजे. पण भूलोकीं कलियुगांत पुनरपि जन्म घेऊन तुम्ही आपल्या अपराधाचें फल भोगाल' असें बोलून देव गुप्त झाला व शापामुळें पांडव दुःखित झाले १६,१७. नंतर ते अपराधाच्या निवृत्त्यर्थ हरीस शरण आले. त्या वेळीं कृष्णासह सर्व पांडव शस्त्ररहित होते. त्यांनी मनानें रुद्राची स्तुति केली असतां शंकर प्रकट झाला व 'वर मागा' असें ह्मणाला. ते ऐकून कृष्ण असें बोलला १८,१९. 'पांडवांनीं तुझ्या अंगावर जीं शस्त्रास्त्रें टाकिली होतीं तीं दे व शापाचा अनुग्रह कर' २०. हें ऐकून

स्वामिन्मोहितोऽहं तवाज्ञया २१ तदुशेन मया स्वामिन्दत्तः शापो भवद्भूरः । नान्यथा वचनं मे स्यादंशावतरणं भवेत् २२ वत्सराजस्य पुत्रत्वं भविष्यति युधिष्ठिरः । बलखानिरिति ख्यातः श्रेश्रियराख्यपुराधिपः २३ भीमो दुर्वचनाद्दुष्टो म्लेच्छ-योनौ भविष्यति । वीरणो नाम विख्यातः स वै वनरसाधिपः २४ अर्जुनांशश्च मद्भक्तो जनिष्यति महामतिः । पुत्रः परिमलस्यैव ब्रह्मानन्द इति स्मृतः २५ कान्यकुब्जे हि नकुलो भविष्यति महाबलः । रत्नभानुसुतः सो वै लक्ष्मणो नाम विश्रुतः २६ सहदेवस्तु बलवान्भूनि-ष्यति महामतिः । भीष्मसिंहसुतो जातो देवसिंह इति स्मृतः २७ धृतराष्ट्रांश एवासौ जनिष्यत्य-जमेरके । पृथ्वीराज इति स द्रौपदी तत्सुता स्मृता २८ वेलानाम्ना च विख्याता तारकः कर्ण एव हि । रक्तबीजस्तथा रुद्रो भविष्यति महीतले २९ कौरवाश्च भविष्यन्ति मायायुद्धविशा-रदाः । पाण्डुपक्षाश्च ते सर्वे धर्मिणो बलशालिनः ३० सूत उवाच ॥ इति श्रुत्वा हरिः प्राह विहस्य परमेश्वरम् । मया शक्त्यवतारेण रक्षणीया हि पाण्डवाः ३१ महावती पुरी रम्या मायादेवी-विनिर्मिता । देशराजसुतस्तत्र ममांशो हि जनिष्यति ३२ देवकीजठरे जन्मादयसिंह इति स्मृतः । आह्लादो मम धामांशो जनिष्यति गुरुर्मम ३३ हत्वाऽग्निवंशजान्भूपान्स्थापयिष्यामि वै कलिम् । इति श्रुत्वा शिवो देवस्तत्रैवान्तरधीयत ३४ [१-४१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये विक्रमाख्यानकाले प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

सूत उवाच ॥ प्रातःकाले च संप्राप्ते पाण्डवाः पुत्रशोकिनः । प्रेतकार्याणि ते कृत्वा भीष्मा-न्तिकमुपाययुः १ राजधर्मान्मोक्षधर्मान्दानधर्मान्विभागशः । श्रुत्वा यजञ्श्वमेधैश्चाभिरुत्तमक-

---

शिव ह्मणाला 'हे कृष्णदेवा, तुला नमस्कार असो. हे स्वामिन्, माझा काही अपराध नाहीं. मी तुझ्या मायेनें मोहित झालों आहे २१ व तिच्या वश झाल्यामुळेंच मीं याना भयंकर शाप दिला. माझें वचन खोटें होणार नाहीं. याचा अंशतः जन्म होईल २२. बा युधिष्ठिरा, तूं वत्सराजाचा बलखानि या नावाचा पुत्र होशील, तूं श्रेश्रियनामक नगराचा राजा होशील २३. दुष्ट भीम दुर्वचनामुळें म्लेच्छ योनीमध्यें निर्माण होईल. तो वीरण या नांवानें प्रसिद्ध होऊन वनरसेचा राजा होईल २४. अर्जुनाचा अंश महाबुद्धिमान् व माझा भक्त होईल. तो परिमलाचा ब्रह्मानन्द या नावाचा पुत्र होणार आहे. महाबलवान् नकुल कान्यकुब्जामध्यें रत्नभानूचा लक्षण नावाचा पुत्र होईल २५,२६. सहदेव तर महाबुद्धिमान व बलवान् असा भीष्मसिंहाचा देवसिंहनामक पुत्र होईल २७. हा धृतराष्ट्राचा अंश अजमेरामध्यें पृथ्वीराज या नावानें उत्पन्न होईल. द्रौपदी ही त्याची वेलानामक प्रख्यात कन्या होईल. कर्ण तारक होईल. भूलोकीं रुद्र रक्तबीज होईल. कौरव कपट-युद्धात प्रवीण होतील. पाडवाच्या पक्षास जे होते ते सर्व धार्मिक व बलवान होतील' २८-३०. सूत ह्मणतातः— हें ऐकून हरि परमेश्वरास हंसून ह्मणाला " शक्तीच्या अवतारानें मलाही पाडवांचें रक्षण करावयास पाहिजे ३१. मायावती ह्मणून रम्य नगर आहे, तें मायादेवीनें निर्माण केलेलें आहे. तेथें देशराजाचा पुत्र माझ्या अंशापासून उत्पन्न होईल ३२. त्याचा देवकीच्या उदरीं जन्म होऊन त्यास रत्नसिंह असें ह्मणतील. माझा गुरु आल्हाद या नावानें माझ्या नेत्राच्या अंशापासून उत्पन्न होईल. अग्निवंशामध्यें उत्पन्न झालेल्या राजास मारून मी कलीची स्थापना करीन." हें ऐकून शिवदेव तेथेंच गुप्त झाला ३३,३४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकीं कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा विक्रमाख्यानकालाविषयीं पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥

सूत ह्मणतातः— प्रातःकाल प्राप्त झाला असता पुत्राकरिता शोक करणारे पाडव प्रेतकर्में करून

भीभिः २ षट्त्रिंशदब्दराज्यं हि कृत्वा स्वर्गपुरं ययु । जनिष्यन्ति तदंशा वै कलिधर्मविवृद्धये ३ व्यास उवाच ॥ इत्युक्त्वा स मुनिः सर्वान्पुनः सूतं वदिष्यति । गच्छध्वं मुनयः सर्वे योगनिद्रावशो ह्यहम् ४ चक्रतीर्थे समाधिस्थो ध्यायंश्चैव त्रिगुणात्परम् । इति श्रुत्वा तु मुनयो नैमिषारण्यवासिनः ५ योगसिद्धिं समास्थाय गमिष्यन्त्याश्रमानंतिके । द्वादशाब्दशते कालेऽतीते ते शौनकादयः ६ उत्थाय देवखाते च स्नानध्यानादिकाः क्रियाः । कृत्वा सूतान्तिकं गत्वा वदिष्यन्ति पुनर्वचः ७ ऋषय ऊचुः॥ विक्रमाख्यानकालोऽयं द्वापरे च शिवाज्ञया । विनीतो भगवन्भूमौ तदा तान्नृपतीन्वद ८ सूत उवाच ॥ स्वर्गते विक्रमादित्ये राजानो बहवोऽभवन् । तथाऽष्टादश राज्यानि तेषां नामानि मे शृणु ९ पश्चिमे सिन्धुनद्यन्ते सेतुबन्धे हि दक्षिणे । उत्तरे बदरीस्थाने पूर्वे च कपिलान्तिके १० अष्टादशैव राष्ट्राणि तेषां मध्ये बभूविरे । इन्द्रप्रस्थं च पाञ्चालं कुरुक्षेत्रं च कापिलम् ११ अन्तर्वेदी व्रजश्चैवाजमेरु मरुधन्व च । गौर्जरं च महाराष्ट्रं द्राविडं च कलिङ्गकम् १२ आवन्त्यं चोड्रुपं वङ्गं गौडं मागधमेव च । कौशल्यं च तथा त्रैयं तेषां राजा पृथक्पृथक् १३ नानाभाषाः स्थितास्तत्र बहुधर्मप्रवर्तकाः। एवंविधशते जाते ततस्तेषु शकादयः १४ श्रुत्वा धर्मविनाशं च बहुबन्दैः समन्विताः । केचित्तीर्त्वा सिन्धुनदीमार्यदेशे समागताः १५ हिमपर्वतमार्गेण सिन्धुमार्गेण चागमन् । जित्वार्यान्हूँठयित्वा तान्स्वदेशं पुनरायययुः १६ गृहीत्वा योषितस्तेषां पर हर्षमुपाययुः । एतस्मिन्नन्तरे तत्र शालिवाहनभूपतिः १७ विक्रमादित्यपौत्रश्च पितृराज्यं गृहीतवान् । जित्वा शकान्दुराधर्षांश्चीनतैत्तिरिदेशजान् १८ बाह्ली-

---

भीष्माकडे गेले १; राजधर्म, मोक्षधर्म व दानधर्म हे विभागपूर्वक ऐकून उत्तम कर्मांनीं युक्त असे तीन अश्वमेधयज्ञ केले २; व छत्तीस वर्षे राज्य करून ते स्वर्गलोकीं गेले. असो, कलिधर्माच्या वृद्ध्यर्थ त्याचे अंश उत्पन्न होणार आहेत ३. व्यास ह्मणतातः—असे बोलून तो मुनि सूत सर्वास पुनरपि ह्मणेल कीं, हे मुनिहो, तुह्मी सर्व जा. कारण, मला योगनिद्रा येत आहे ४. चक्रतीर्थावर समाधिस्थ होऊन मी त्रिगुणाच्या पलीकडे असलेल्या तत्त्वाचें ध्यान करितों. हें ऐकून नैमिषारण्यवासी मुनि ५ योगसिद्धीचा आश्रय करून आम्ह्याजवळ जातील. बाराशें वर्षे लोटल्यावर ते शौनकादिक मुनि उठून, देवखातामध्यें स्नान करून, ध्यानादिक क्रिया करून, सूताच्या जवळ जाऊन पुनरपि असें ह्मणतील ६,७. ऋषि ह्मणतातः—हे भगवन्, जेव्हां शिवाच्या आज्ञेनें भूलोकीं हा विक्रमाख्यानकाल द्वापरयुगरूप झाला तेव्हां कोणकोण राजे झाले तें सांग ८. सूत ह्मणतातः—विक्रमादित्य स्वर्गलोकीं गेल्यावर अनेक राजे झाले. तशींच अठरा राज्यें झालीं. त्यांचीं नावें ऐका ९. पश्चिमेस सिंधुनदीपर्यंत, दक्षिणेस सेतुबंधापर्यंत, उत्तरेस बदरीस्थानात व पूर्वेस कपिलापर्यंत अठरा राष्ट्रें झालीं. तीं सर्व या पूर्वोक्त सीमेमध्यें होतीं. इंद्रप्रस्थ, पाचाल, कुरुक्षेत्र, कापिल, अन्तर्वेदी, व्रजथी, अजमेर, मरुधन्व, गुर्जर, महाराष्ट्र, द्राविड, कलिंग, आवंत्य, उडुप, वंग, गौड, मागध व कौशल्य अशीं तीं राष्ट्रें होत. त्याचे राजेही भिन्न भिन्न होते १०–१३. तेथें अनेक भाषा झाल्या. अनेक धर्मप्रवर्तक झाले. ह्याप्रमाणें शंभर वर्षे गेलीं असता कित्येक शकादिक, धर्माचा नाश झाला आहे असें ऐकून पुष्कळ समूहांसहवर्तमान सिंधुनदी उतरून आर्य देशात आले. कित्येक हिमालयपर्वत ओलांडून आले व कित्येक समुद्रमार्गानें आले. आर्यांस जिंकून व त्यांस लुटून ते पुनरपि आपल्या देशात गेले १४–१६. त्याच्या स्त्रियांस घेऊन जातांना त्यांस मोठा आनंद झाला. इतक्यांत तेथें विक्रमादित्याचा नातु शालिवाहन राजा, पितृराज्य घेऊन, चीन व तातरी देशांतील अजिंक्य शकांस १७,१८, कपटी बाल्हीकांस, रोमदेशस्थांस, शठ व खुर-

काम्बोजरूपांश्च रोमजान्खुरजाञ्छठान । तेषां कोशान्गृहीत्वा च दण्डयोग्यानकारयत् १९ स्थापिता तेन मर्यादा म्लेच्छार्याणां पृथक्पृथक् । सिन्धुस्थानमिति ज्ञेयं राष्ट्रमार्यस्य चोत्तमम् २० म्लेच्छस्थानं परं सिन्धोः कृतं तेन महात्मना । एकदा तु शकाधीशो हिमतुङ्गं समाययौ २१ हूणदेशस्य मध्ये वै गिरिस्थं पुरुषं शुभम् । ददर्श बलवान्राजा गौराङ्गं श्वेतवस्त्रकम् २२ कोऽहमित्यनयत्तं च प्रहृष्टः स ह्यवाच्य मुदान्वितः । ईशपुत्रं च मां विद्धि कुमारीगर्भसंभवम् २३ म्लेच्छधर्मस्य वक्तारं सत्यव्रतपरायणम् । इति श्रुत्वा नृपः प्राह धर्मे किं भवतो मतम् २४ श्रुत्वैवं वाच महाराज प्राप्तं सत्यस्य लक्षणम् । निर्मर्यादे म्लेच्छदेशे मसीहोऽहं समागत २५ ईहामसी च दस्यूनां प्रादुर्भूता भयङ्करी । तामहं म्लेच्छतः प्राप्य मसीहत्वमुपागतः २६ म्लेच्छेषु स्थापितो धर्मो मया तच्छृणु भूपते । मानसं निर्मलं कृत्वाऽमले देहे शुभाशुभम् २७ नैमम जापमास्थाय जपेत निर्मलं परम् । न्यायेन सत्यवचसा मनसैक्यन मानव २८ ध्यानेन पूजयेदीशं सूर्यमण्डलसंस्थितम् । अचलोऽयं प्रभुः साक्षात्तथा सूर्योऽचलः सदा २९ तत्त्वानां चलभूतानां कर्षणः स समन्ततः । इति कृत्येन भूपाल मसीहा विलय गता ३० ईशमूर्तिर्हृदि प्राप्ता नित्यशुद्धा शिवङ्करी । ईशाममीह इति च मम नाम प्रतिष्ठितम् ३१ इति श्रुत्वा स भूपालो नत्वा तं म्लेच्छपूजकम् । स्थापयामास तं तत्र म्लेच्छस्थाने हि दारुणे ३२ स्वराज्यं प्राप्तवान्राजा हयमेधमचीकरत् । राज्यं कृत्वा स षष्ट्यब्दं स्वर्गलोकमुपायथौ ३३ स्वर्गते नृपतौ तस्मिन्यथा चासीत्तथा शृणु ३४ [१५७६] इति श्रीभ-

---

जास जिंकून, त्यांचे कोश घेऊन त्यांस दंडयोग्य करिता झाला १९. त्यानें म्लेच्छ व आर्य यांच्या भिन्नभिन्न मर्यादा ठरविल्या. त्या महात्म्याने " सिंधुस्थान हे आर्यांचे उत्तम राष्ट्र असें समजावें व सिंधुनदीच्या पलीकडील श्रेष्ठ म्लेच्छस्थान आहे, असें समजावें " असा नियम केला. एकदा एक शकाचा मुख्य, हिमालयावर आला २०,२१. तो बलवान् राजा, हूणदेशाच्या मध्यें पर्वतस्थ शुभ पुरुषास पाहता झाला. त्याचें अंग गोरें व वस्त्र शुभ्र होतें २२. " आपण कोण आहा ? " असें त्याने त्यास विचारिलें असता तो आनंदयुक्त होत्साता म्हणाला " मी ईश्वराचा पुत्र असून कुमारीच्या गर्भामध्यें उत्पन्न झालों आहे. मी म्लेच्छधर्माचा उपदेशक व सत्यव्रतामध्ये परायण आहे. " हें ऐकून राजा म्हणाला " धर्माविषयी तुमचें मत काय आहे ? " हा प्रश्न ऐकून तो म्हणाला " हा महाराजा, सत्ययुगाचा क्षय झाला असतां व म्लेच्छदेश मर्यादाशून्य झाला असता मी मसीह आलो आहे २३-२५. दस्यूंची भयंकर ईहामसी प्रकट झाली. तिला मी म्लेच्छतः प्राप्त होऊन मसीहत्वाप्रत आलो आहें. राजा, मीं म्लेच्छामध्यें धर्माची कशी स्थापना केली ते ऐक. मन निर्मल करून, देहातील सर्व शुभाशुभ निर्मल करून २६,२७ व निगमांतील जपा । आश्रय करून निर्मल परमेश्वराचा जप करावा. मनुष्याने न्यायानें, सत्यवाणीनें, मनाच्या ऐक्यभावाने व ध्यानानें सूर्यमंडलामध्यें स्थित असलेल्या ईश्वराचे पूजन करावें. कारण, जसा हा प्रभु साक्षात् अचल आहे, त्याचप्रमाणे सूर्यही सर्वदा अचल आहे २८,२९. चल भूतांस व तत्त्वांस तो चोहोंकडून आकर्षण करणारा आहे. या कृत्याने हे राजा, मसीहा लीन झाला ३०. नित्यशुद्ध व कल्याण करणारी अशी ईश्वराची मूर्ति हृदयामध्यें प्राप्त झाली. त्यामुळे ईशाममी असें माझे नांव या लोकीं पडलें' ३१. हें ऐकून तो राजा त्या म्लेच्छपूजकास नमस्कार करिता झाला व त्या भयंकर म्लेच्छस्थानामध्ये त्यानें त्याची स्थापना केली ३२. राजास स्वराज्याची प्राप्ति झाली. त्यानें अश्वमेधयज्ञ केला व साठ वर्षे राज्य करून तो स्वर्गलोकीं गेला ३३. तो राजा स्वर्गलोकीं गेला असतां काय झालें ते

विष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डावरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये शालिवाहनकाले द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

श्रीसूत उवाच ॥ शालिवाहनवंशे च राजानो दश चाभवन् । राज्यं पञ्चशताब्दं च कृत्वा लोकान्तरं ययुः १ मर्यादा क्रमतो लीना जाता भूमण्डले तदा । भूपतिर्दशमो यो वै भोजराज इति स्मृतः २ दृष्ट्वा क्षीणमर्यादां बली दिग्विजयं ययौ । सेनया दशसाहस्र्या कालिदासेन संयुतः ३ तथाऽन्यैर्ब्राह्मणैः सार्द्धं सिन्धुपारमुपाययौ । जित्वा गान्धारजाम्लेच्छान्काश्मीरान्नारधाञ्छठान् ४ तेषां प्राप्य महत्कोशं दण्डयोग्यानकारयत् । एतस्मिन्नन्तरे म्लेच्छ आचार्येण समन्वितः ५ महामद इति ख्यातः शिष्यशाखासमन्वितः । नृपश्चैव महादेव मरुस्थलनिवासिनम् ६ गङ्गाजलैश्च संस्नाप्य पञ्चगव्यसमन्वितैः । चन्दनादिभिरभ्यर्च्य तुष्टाव मनसा हरम् ७ भोजराज उवाच ॥ नमस्ते गिरिजानाथ मरुस्थलनिवासिने । त्रिपुरासुरनाशाय बहुमायाप्रवर्तिने ८ म्लेच्छैर्गुप्ताय शुद्धाय सच्चिदानन्दरूपिणे । त्वं मां हि किङ्करं विद्धि शरणार्थमुपागतम् ९ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा स्तवं देवः शङ्करोऽह नृपाय तम् । गन्तव्यं भोजराजेन महाकालेश्वरस्थले १० म्लेच्छैरेतत्सुदूषिता भूमिर्वाहीका नाम विश्रुता । आर्यधर्मो हि नैवात्र वाहीके देशदारुणे ११ बभूवात्र महामायी पाशः सौ दग्धो मया पुरा । त्रिपुरो बलिदैत्येन प्रेषितः पुनरागतः १२ अयोनिः स वरं प्राप्तवान्दैत्यवर्द्धनः । महामद इति ख्यातः पैशाचकृतितत्परः १३ नागन्तव्यं त्वया भूप पैशाचे देशदूषिते । मद्यमांसादेन भूपाल तव शुद्धिः प्रजायते १४ इति श्रुत्वा नृपश्चैव स्वदेशान्पुनरागमत् । महामदश्च तैः सार्द्धं

ऐक्य ३४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहासम्मुच्चयातील शालिवाहनकालींपैकीं दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥

श्रीसूत ह्मणतात:— शालिवाहनाच्या वशात दहा राजे झाले व पांचशें वर्षं राज्य करून ते परलोकीं गेले १. त्यावेळीं भूलोकाची मर्यादा क्रमाने लीन झाली. तेव्हा त्यांतील भोजराज ह्मणून जो दहावा राजा होता तो बलवान्, मर्यादा अत्यंत क्षीण झाली आहे असे पाहून बरोबर दहा हजार सेना, कालिदास व तसेच दुसरेही ब्राह्मण यास घेऊन दिग्विजय करण्याकरिता निघाला २,३ आणि सिंधूच्या पार गेला. गांधार देशातील म्लेच्छांस व काश्मीरातील शठ नारवास जिंकून ४, त्याचा मोठा कोश घेऊन त्यास दंडास पात्र करिता झाला. इतक्यात आपला आचार्य बरोबर घेऊन महामद या नावाचा एक म्लेच्छ शिष्यशाखेसहवर्तमान त्याच्याकडे आला. पण मरुस्थलीं असणाऱ्या महादेवास भोजराजाने पंचगव्ययुक्त गंगाजलानें स्नान घालून व त्याची चंदनादिकांच्या योगाने पूजा करून त्या हराची मनानें स्तुति केली ५-७. भोजराज ह्मणतोः— हे मरुस्थलीं रहाणाऱ्या गिरिजानाथा, तुला नमस्कार असो. त्रिपुरासुराच्या नाशार्थ तूं पुष्कळ मायेस प्रवृत्त केलेस ८. पण तुझें रक्षण आतां म्लेच्छानीं केलें आहे. तूं शुद्ध व सच्चिदानंदरूप आहेस. मी तुझा चाकर आहें असें जाण. मी तुझ्या आश्रयाकरिता आलों आहें ९. सूत ह्मणतातः— असा स्तव ऐकून देव त्या राजास ह्मणाला " भोजराजानें महाकालेश्वरीं जावें. ही वाहीका या नावानें प्रसिद्ध असलेली भूमि म्लेच्छानीं दूषित केली आहे. या भयकर वाहीक देशामध्यें धर्म नाहीं १०,११. ज्या महामायावी त्रिपुरनामक दैत्यास मीं पूर्वी जाळिले होतें त्यासच बलिदैत्यानें येथें पाठविल्यामुळे तो पुनः आला आहे १२. दैत्याची वृद्धि करणारा तो जातिशून्य मद्यपासून वर प्राप्त करून घेता झाला. तो महामद या नावानें प्रसिद्ध असून पिशाचकृतींमध्यें तत्पर आहे १३. यास्तव, हा राजा, पिशाचाच्या या ठा

सिन्धुतीरमुपाययौ १५ उवाच भूपतिं म्लेच्छा मायामदविशारदः । तव देवो महाराज मम दासत्वमागतः १६ ममोच्छिष्टं स भुञ्जीयाद्यथा तत्पश्य भो नृप । इति श्रुत्वा तथा दृष्ट्वा परं विस्मयमागतः १७ म्लेच्छधर्मे मतिश्चासीत्तस्य भूपस्य दारुणे । तच्छ्रुत्वा कालिदासस्तु रुषा प्राह महामखम् १८ माया ते निर्मिता धूर्त नृपमोहनहेतवे । हनिष्येऽहं दुराचारं वाहीकं पुरुषाधमम् १९ इत्युक्त्वा स द्विजः श्रीमान्ब्रह्मजपतत्परः । जप्त्वा दशसहस्रं च तद्दशांशं जुहाव स २० भस्म भूत्वा स मायावी म्लेच्छदेवत्वमागतः । भयभीतास्तु तच्छिष्या देशं वाह्लीकमययुः २१ गृहीत्वा स्वगुरोर्भस्म मदहीनत्वमागतम् । स्थापितं तैश्च भूमध्ये तत्रोर्ध्वमदतत्पराः २२ मदहीनं पुरं जातं तेषां तीर्थं समं स्मृतम् । रात्रौ स देवरूपश्च बहुमायाविशारदः २३ पैशाचं देहमास्थाय भोजराजं हि सोऽब्रवीत् । आर्यधर्मो हि ते राजन्सर्वधर्मोत्तमः स्मृतः २४ ईशाज्ञया करिष्यामि पैशाचं धर्मदारुणम् । लिङ्गच्छेदी शिखाहीनः श्मश्रुधारी स दूषकः २५ उच्छास्त्रापी सर्वभक्षी भविष्यति जनो मम । विना कौलं च पशवस्तेषां भक्ष्या मते मम २६ मुसलेनैव संस्कारः कुशैरिव भविष्यति तस्मान्मुसलधन्तो हि जातयो धर्मदूषकाः २७ इति पैशाचधर्मश्च भविष्यति मया कृतः । इत्युक्त्वा ययौ देवः स राजा गृहमाययौ २८ त्रिवर्णे स्थापिता वाणी सांस्कृती स्वर्गदायिनी । शूद्रेषु प्राकृती भाषा स्थापिता तेन धीमता २९ पञ्चाशदब्दकालं तु राज्यं कृत्वा दिवं गतः । स्थापिता तेन मर्यादा सर्वदेवोपमानिनी ३० आर्यावर्तः पुण्यभूमिर्मध्यविन्ध्यहिमालयोः ।

देशामध्यें तूं येऊं नकोस. बा राजा, माझ्या प्रसादानें तुझी शुद्धि होईल" १४. हे ऐकून भोजराजा पुनरपि आपल्या देशात आला. त्याच्याबरोबर महामदही सिंधूच्या तीरापर्यंत आला १५ व राजास प्रेमानें म्हणाला "मायामदामध्यें निपुण असा तुझा देव, बा महाराजा, माझा दास झाला आहे १६. राजा, तो माझें उच्छिष्ट कसे खातो ते पहा." हें ऐकून व तसा खरोखर घडलेला प्रकार पाहून त्यास अतिशय विस्मय वाटला. व त्याबरोबर त्या राजाची बुद्धि म्लेच्छधर्मामध्यें गुंग झाली. पण हे ऐकून कालिदास रागानें महामदास म्हणाला १७,१८ "हे धूर्ता, राजास मोहित करण्याकरितां तूं ही माया निर्माण केली आहेस. मी दुराचरणी नीच वाहिक पुरुषास मारीन" १९. असें म्हणून तो तेजस्वी ब्राह्मण ब्रह्मार्ण जपामध्यें तत्पर झाला. दहा हजार जप करून त्याच्या दशांश त्यानें होम केला २०. त्याबरोबर तो मायावी म्लेच्छ भस्मरूप होऊन देवभावास प्राप्त झाला. त्याबरोबर भयभीत झालेले त्याचे शिष्य वाहीक देशास गेले २१. त्यानीं आपल्या गुरूचें मदहीन झालेलें भस्म घेऊन तें भूमीमध्यें पुरिलें व मदामध्यें तत्पर होऊन ते तेथेंच राहिले २२. ते नगर मदहीन झालें. व तें त्यांचें तीर्थ म्हणून मानिलेलें आहे. रात्रीं तो देवरूप व पुष्कळ कपटामध्यें कुशल असलेला म्लेच्छ पिशाचदेहाचा आश्रय करून भोजराजास म्हणाला "हे राजा, तुझा आर्यधर्म सर्व धर्मामध्ये उत्तम धर्म म्हणून संमिलेला आहे २३,२४ पण ईश्वराज्ञेनें मी पिशाचाचा दारुण धर्म करीन. माझे लोक लिंगच्छेद करणारे, शिखाहीन, दाढीवाले, दूषित २५, मोठ्यानें आलाप करणारे व सर्वभक्षक होतील. एका डुकराबाचून त्यास सर्व पशु भक्षण करण्यासारिखे आहेत असें माझें मत आहे. कुशाप्रमाणें त्याचा संस्कार मुसलानें होईल. यास्तव, अशा ज्या मुसलमान म्हणून त्याच्या जाति होतील त्या सर्व धर्मास दूषित करणाऱ्या होतील २६,२७. ह्याप्रमाणें मीं केलेला पैशाचधर्म होईल." असें बोलून तो देव गेला व राजा आपल्या गृहीं आला २८. त्यानें तीन वर्णाच्या लोकामध्यें स्वर्ग देणाऱ्या संस्कृत वाणीची स्थापना केली व त्या बुद्धिमानानें शूद्रांमध्यें प्राकृत भाषा ठेविली २९. पंचावन्न वर्षे राज्य करून तो स्वर्गलोकीं गेला. सर्व देवांचा मान वाढविणारी

आर्यवर्णाः स्थितास्तत्र विन्ध्याग्रान्ते वर्णसङ्कराः ३१ नरा मुसलवन्तश्च स्थापिताः सिन्धुपारजाः । बर्बरे तुषदेशे च द्वीपे नानाविधे तथा ३२ ईशामसीहधर्माश्च सुरे राज्ञेव संस्थिताः ३३ [१६०९]] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

सूत उवाच ॥ स्वर्गते भोजराजे तु सप्त भूपास्तदन्वये । जाताश्चाल्पायुषो मन्दाश्छिशताब्दान्तरे मृताः १ बहुभूपमती भूमिस्तेषां राज्ये बभूव ह । वीरसिंहश्च यो भूपः सप्तमः संप्रकीर्तितः २ तदन्वये त्रिभूपाश्च त्रिंशताब्दान्तरे मृताः । गङ्गासिंहश्च यो भूपो दशमः स प्रकीर्तितः ३ कल्पक्षेत्रे च राज्यं स्वं कृतवान्धर्मतो नृपः । अन्तर्वेद्यां कान्यकुब्जे जयचन्द्रो महीपतिः ४ इन्द्रप्रस्थेऽनङ्गपालस्तोमरान्ध्वयसभव । अन्ये च बहवो भूपा बभूवुर्ग्रामराट्पुराः ५ अग्निवंशस्य विस्तारो बभूव बलवत्तरः । पूर्वे तु कपिलस्थाने वाह्लीकान्ते तु पश्चिमे ६ उत्तरे चीनदेशान्ते सेतुबन्धे तु दक्षिणे । षष्टिलक्षाश्च भूपाला ग्रामपा बलवत्तराः ७ अग्निहोत्रस्य कर्तारो गोब्राह्मणहितैषिणः । बभूवुर्द्वापरसमा धर्मकृत्यविशारदाः ८ द्वापरात्सदृशः कालः सर्वत्र परिवर्तते । गेहे गेहे स्थितं द्रव्यं धर्मश्चैव जने जने ९ ग्रामे ग्रामे स्थितो देवो देशे देशे स्थितो मखः । आर्यधर्मकरा म्लेच्छा बभूवुः सर्वतोमुखाः १० इति दृष्ट्वा कलिर्घोरो म्लेच्छस्त्रया सह भीरुकः । नीलाद्रौ प्राप्य मतिमान्हरिं शरणमाययौ ११ द्वादशाब्दमिते काले ध्यानयोगपरोऽभवत् । ध्यानेन सच्चिदानन्दं दृष्ट्वा कृष्णं सनातनम् १२ तुष्टाव मनसा तत्र राधया सहितं हरिम् ।

अशी मर्यादा त्यानें स्थापिली ३०. विंध्य व हिमालय याच्या मधील भूमि पुण्यरूप व आर्यावर्त या नांवाची होय. आर्यांचे वर्ण तेथेंच स्थित आहेत. विंध्यपर्वताच्या पलीकडे (पश्चिमेस) सर्व वर्णसंकर पावलेले लोक आहेत. मुसलमान लोक जे होते त्यास त्यानें सिंधुनदाच्या पलीकडे बर्बरदेश, तुषदेश व नानाप्रकारचीं बेटें यामध्ये घालवून दिलें ३१,३२. देव व राजे यासह ईशामसीहाचे धर्म. तर त्याच्या पलीकडील देशात राहिले ३३. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

सूत ह्मणतात.—भोजराजा स्वर्गलोकी गेला असता त्याच्या वंशांत सात राजे झाले. पण ते सर्व अल्पायुषी व मंद होते. तीनशें वर्षांतच ते सर्व मेले १. त्याच्या राज्यात पृथ्वीचे राजे अनेक झाले. त्यातील वीरसिंह हा सातवा राजा सांगितलेला आहे २. त्याच्या वंशात तीन राजे झाले, पण ते दोनशें वर्षांत मेले. गंगासिंह ह्मणून त्यातील दहावा राजा होता ३ त्यानें कल्पक्षेत्रामध्यें आपलें धर्मानें राज्य केलें. कान्यकुब्जामध्यें अन्तर्वेदींत जयचंद्र राजा होता ४. इंद्रप्रस्थामध्यें तोमरवंशातील अनंगपाल राजा होता. तात्पर्य, गांव व राष्ट्रें यांचें रक्षण करणारे दुसरेही अनेक राजे होते ५. अग्निवंशाचा फार मोठा विस्तार झाला. साराश, पूर्वेस कपिलस्थानीं, पश्चिमेस वाह्लीकापर्यंत ६, उत्तरेस चीन देशापर्यंत व दक्षिणेस सेतुबंध रामेश्वरापर्यंत ग्रामपालक व बलाढ्य असे साठ लक्ष राजे झाले ७. ते अग्निहोत्रें करणारे, गोब्राह्मणांचें हित करणारे व धर्मकृत्यामध्यें विशारद असें द्वापरातील राजासारिखे झाले ८. त्यावेळीं सर्व ठिकाणीं द्वापरासारिखा काल जाऊं लागला. घरोघरीं द्रव्य राहिलें; प्रत्येक मनुष्यामध्यें धर्म राहिला ९; गांवोगांव देव राहिला; देशोदेशी यज्ञ राहिला व सर्व प्रकारें म्लेच्छ आर्यधर्म करणारे झाले १०. हें पाहून भिणारा, घोर पण बुद्धिमान् कलि म्लेच्छस्त्रीसह नीलपर्वतावर आला व हरीस शरण गेला ११. बारा वर्षें तो ध्यानयोगामध्यें तल्लीन झाला. ध्यानाच्या योगानें त्यानें सनातन सच्चिदानंद कृष्णास पाहून त्या राधेसह, पुराण, अजर, नित्य व

पुराणमजरं नित्यं वृन्दावननिवासिनम् ११ कलिरुवाच ॥ साष्टाङ्ग दण्डवत्स्वामिन्गृहाण मम केशव । पाहि मां शरणं प्राप्तं शरणे ते कृपानिधे १४ सर्वपापहरस्त्वं वै सर्वकालकरो हरिः । भवान्गौरः सत्ययुगे त्रेतायां रक्तरूपक १५ द्वापरे पीतरूपश्च कृष्णस्त्वं मम दिष्टके । मत्पुत्राश्च स्मृता म्लेच्छा आर्यधर्मत्वमागताः १६ चतुर्गेहं च मे स्वामिन्घृतं मद्यं सुवर्णकम् । स्त्रीहास्यं चाग्निवंश्यैश्च क्षत्रियैश्च विनाशितम् १७ त्यक्त्वदेहकुलत्यक्तराष्ट्रो जनार्दन । त्वत्पादाम्बुजमाधाय स्थितोऽहं शरणं त्वयि १८ इति श्रुत्वा स भगवान्कृष्णः प्राह विहस्य तम् ॥ भो कले तव रक्षार्थं जनिष्येऽहं महावतीम् १९ ममांशो भूमिपासाद्य क्षयिष्यति महाबलान् । म्लेच्छवंशस्य भूपालान्स्थापयिष्यति भूतले २० इत्युक्त्वा भगवान्साक्षात्तत्रैवान्तरधीयत । कलिस्तु म्लेच्छया सार्धं परमानन्दमाप्तवान् २१ एतस्मिन्नन्तरे विप्र यथा जातं शृणुष्व तत् । आभीरीवाक्सरे ग्रामे व्रतपा नाम विश्रुता २२ नवदुर्गाव्रतं श्रेष्ठं नववर्षं चकार ह । प्रसन्ना चण्डिका प्राह वरं वरय शोभन २३ साह तां यदि मे मातर्वरो देयस्त्वयेश्वरि । रामकृष्णसमौ बालौ भवेयातां ममान्वये २४ तथेत्युक्त्वा तु सा देवी तत्रैवान्तरधीयत । वसुमान्नाम नृपति-स्तस्या रूपेण मोहित २५ उद्वाह्य धर्मतो भूपः स्वगेहे तामवासयत् । तस्यां जातौ नृपात्पुत्रौ देशराजस्तु तद्वरः २६ आवायां वत्सराजश्च शतहस्तिसमो बली । जित्वा तौ मागधान्देशान्रा-ज्यवन्तौ बभूवतुः २७ शतयत्तः स्मृतो म्लेच्छः शूरो वानरसाधिपः । तत्पुत्रो भीमसेनांशो वीरणाऽभूच्छिवाज्ञया २८ तालवृक्षप्रमाणेन चोर्ध्ववेगो हि तस्य वै । तालनो नाम विख्यात

वृंदावननिवासी हरीची तो मनानें स्तुति करिता झाला १२,१३. कलि ह्मणतो.—हे स्वामिन्, हे ईश्वरा, माझ्या साष्टांग प्रणामाचा स्वीकार कर. हा कृपासागरा, चरणाचे ठायी शरण आलेल्या माझें रक्षण कर१४. तू सर्व पापाचें हरण करणारा व सर्व कालास करणारा हरि आहेस. तू सत्ययुगामध्ये गौर-वर्ण, त्रेतायुगात रक्तरूप १५, द्वापरात पीतरूप व माझ्या युगात कृष्ण होतोस. माझे पुत्र म्लेच्छ ह्मणून ह्मटलेले आहेत, पण ते आर्यधर्मी झाले १६. माझे घृत, मद्य, सुवर्ण व स्त्रियांचे हास्य (विलास) असे चार प्रकारचे गृह आहे; पण अग्निवंश्य क्षत्रियांनीं त्याचा नाश करून टाकिला १७. यास्तव, हे जनार्दना, मी देह सोडून, कुलाचा त्याग करून व राष्ट्रातून निघून तुझे पादकमल मस्तकी ठेवून तुझ्या आश्रयानें राहिलों आहे १८. हे ऐकून कृष्ण भगवान् त्यास हसून ह्मणाला " हे कले, तुझ्या रक्षणाकरितां मी महाबलीस निर्माण करितो १९. माझा अंश भूमीवर अवतार घेऊन महाबलाढ्य क्षत्रियांचा क्षय करील व म्लेच्छवंशाच्या राजास भूतळी स्थापील " २०. असें बोलून तो साक्षात् भगवान् तेथेंच गुप्त झाला. तेव्हां कलि त्या म्लेच्छ स्त्रीसह अत्यंत आनंदित झाला २१. हे ब्राह्मणा, इतक्यांत काय झालें तें ऐक. आभीरीवाक्सरोवरावरील एका ग्रामांत व्रतपा नावाची एक स्त्री होती २२. तिनें नवदुर्गानामक श्रेष्ठ व्रत नऊ वर्षे केलें. तेव्हा चंडिका प्रसन्न होऊन ह्मणाली " हे सुंदरि, वर माग " २३. तेव्हा ती ह्मणाली " हे माते, ईश्वरि, तुला जर वर द्यावयाचा असेल तर माझ्या वंशांत रामकृष्णासारिखे बालक व्हावेत हा वर दे " २४. तेव्हा ' ठीक आहे ' असें ह्मणून ती देवी तेथेंच गुप्त झाली. वसुमान्नामक एक राजा तिच्या रूपानें मोहित झाला २५ व तिच्याशीं विवाह करून त्यानें तिला आपल्या गृही ठेविलें. त्या राजापासून तिच्या ठायीं दोन पुत्र झाले. त्यांतील देशराज हा श्रेष्ठ होता. दुसरा धाकटा पुत्र वत्सराज ह्मणून होता. तो शंभर हत्तींसारखा बलवान् होता. त्यानीं मागध देशास जिंकून राज्य मिळविलें. वानर-सेना राजा शतयत्त ह्मणून होता. तो अति शूर असे. त्यास भीमसेनाच्या अंशापासून शिवाच्या

शतयत्तेन वै कृतः २९ ताभ्यां नृपाभ्यां तद्युद्धमभवद्दोमहर्षणम् । युद्धेन हीनतां प्राप्तस्तालनो बलवत्तरः ३० तदा भैत्री कृता ताभ्यां तालनेन समन्विता । जयचन्द्रपरीक्षार्थं त्रय शूराः समाययुः ३१ [१६४०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

सूत उवाच ॥ इन्द्रप्रस्थेऽनङ्गपालोऽनपत्यश्च महीपतिः । पुत्रार्थं कारयामास शैवं यज्ञं विधानतः १ कन्यके च तदा जाते शिवभागप्रसादतः । चन्द्रकान्तिश्च ज्यष्ठा वै द्वितीया कीर्तिमालिनी २ कान्यकुब्जाधिपायैव चन्द्रकान्तिं पिताऽददत् । देवपालाय शुद्धाय राष्ट्रपालान्वयाय च ३ सोमेश्वराय भूपाय चपहानिकुलाय तु । अजमेराधिपायैव तथा वै कीर्तिमालिनीम् ४ जयशर्मा द्विजः कश्चित्समाधिस्थो हिमालये । दृष्ट्वा भूपोत्सवं रम्यं राज्यार्थं स्वमनोऽदधत् ५ त्यक्त्वा देहं स शुद्धात्मा चन्द्रकान्त्या सुतोऽभवत् । जयचन्द्र इति ख्यातो बाहुशाली यतेन्द्रियः ६ रत्नभानुश्च सञ्जज्ञे शूरस्तस्यानुजो बली । स जित्वा गौडबङ्गादीन्मरुदेशान्मदोत्कटान् ७ दण्डयात्कृत्वा गृहं प्राप्य भ्रात्राज्ञातत्परोऽभवत् । गङ्गासिंहस्य भगिनी माल्हा वीरमती शुभा ८ रत्नभानोश्च महिषी बभूव वरवर्णिनी । नकुलांशस्तदा भूमौ तस्यां जातः शिवाज्ञया ९ लक्षणो नाम बलवान्खड्गयुद्धविशारदः । स सप्ताब्दान्तरे प्राप्ते पितुस्तुल्यो बभूव ह १० त्रयश्च कीर्तिमालिन्यां पुत्रा जाता मदोत्कटाः । धुन्धकारश्च प्रथमस्ततः कृष्णकुमारकः ११ पृथिवीराज एवासौ ततोऽनुज इति स्मृतः । द्वादशाब्दवयःप्राप्ते सिंहखेलसुतोऽभवत् १२ श्रुत्वा चानङ्गपालश्च

आज्ञेने वीरण ह्मणून पुत्र झाला २६–२८. त्याचे तालवृक्षाएवढें प्रमाण होते. त्याचा वेग ऊर्ध्व असे. तालननामक एका राजास शतयत्तानें छिन्नभिन्न करून सोडले होते २९. त्या दोघा राजामध्यें अगावर काटा उत्पन्न करणारें भयकर यद्ध झालें. पण अतिशय बलाढ्य तालन युद्धाच्या योगानें हीनोत्साह प्राप्त झाला ३०. तेव्हा त्या दोघानी तालनाशी मैत्री केली. व जयचद्राच्या परीक्षेकरिता ते तिघेही शूर आले ३१. याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥

सूत ह्मणतातः-- इद्रप्रस्थामध्ये अनंगपाल राजा अपत्यरहित होता. यास्तव, त्यानें पुत्राकरिता विधानपूर्वक शैवयज्ञ केला १. तेव्हा शिवभागप्रसादामुळे त्यास दोन कन्या झाल्या. त्यातील ज्येष्ठ कन्येचे नाव चद्रकांति व दुसरीचें कीर्तिमालिनी होते २. चद्रकांतिच्या पित्याने तिला राष्ट्रपालाच्या वशात निर्माण झालेल्या कान्यकुब्जाच्या देवपालनामक शुद्ध राजास दिलें ३. व कीर्तिमालिनीस चपहानिकुलोत्पन्न अजमेराधिपति सोमेश्वरास दिले ४. जयशर्मा ह्मणून कोणी एक ब्राह्मण हिमालयावर समाधिस्थ होता. रम्य राजोत्सव पाहून तो राज्याची इच्छा करिता झाला ५ व देहत्याग करून तो शुद्धात्मा चद्रकांतीचा पुत्र झाला. तो जयचद्र या नावानें प्रसिद्ध असलेला राजपुत्र पराक्रमी व जितेंद्रिय झाला ६. त्यास रत्नभानु ह्मणून धाकटा भाऊ झाला. तो बलवान् होता. त्यानें गौड, बग व मदोन्मत्त मरुदेश यास जिंकिले ७ व त्यास दंडास पात्र करून तो आपल्या गृहीं आला आणि भ्रात्याच्या आज्ञेमध्ये तत्पर होऊन राहिला. गंगासिंहाची वीरमतीनामक शुभ भगिनी रत्नभानूची सुंदर राणी होऊन राहिली. तेव्हा शिवाच्या आज्ञेने भूलोकीं तिच्या उदरीं नकुलाश उत्पन्न झाला ८,९. त्याचे लक्षण असें नाव असून तो बलाढ्य व खड्गयुद्धामध्ये निष्णात होता. तो सात वर्षांचा होत आहे तोच पित्याच्या बरोबरीचा झाला १०. कीर्तिमालिनीस तीन मदोन्मत्त पुत्र झाले. पहिला धुंधकार, दुसरा कृष्णकुमार व तिसऱ्यास पृथ्वीराज असें झटलें

तस्मै राज्यं स्वयं ददौ । गत्वा हिमगिरिं रम्यं योगध्यानपरोऽभवत् १३ मथुरायां धुन्धकारोऽजमेरे च ततोऽनुजः । राजा बभूव नीतिज्ञस्तौ सुतौ पितुराज्ञया १४ प्रद्योतश्चैव विद्योतः क्षत्रियौ चन्द्रवंशजौ । मन्त्रिणौ तस्य भूपस्य बलवन्तौ मदोत्कटौ १५ प्रद्योततनयो जातो नाम्ना परिमलो बली । लक्षसेनाधिपः सोऽपि तेन तुल्यो बभूव ह १६ विद्योताद्भीष्मसिंहश्च गजसेनाधिपोऽभवत् । स्वर्गतेऽनङ्गपाले तु भूमिराजो महीपतिः १७ दृष्ट्वा तान्विभवान्सर्वान्निजराज्यान्निराकरोत् । प्रद्योताद्याश्च चत्वारः स्वशूरैर्द्विशतैर्युताः १८ कान्यकुब्जपुरं प्राप्य जयचन्द्रमवर्णयन् । जयचन्द्र महीपाल त्वन्मातृष्वसृजो नृपः १९ मातामहेस्य ते राज्यं प्राप्तवान्निर्भयो बली । न्यायेन कथितोऽस्माभिरर्द्धराज्यं हि ते स्मृतम् २० सर्वराज्यं कथं भुक्ष्से श्रुत्वा तेन निराकृताः । भवन्तं शरणं प्राप्ता यथायोग्यं तथा कुरु २१ इति श्रुत्वा महीपालो जयचन्द्र उवाच तान् । अश्वसैन्ये मदीये चाधिकारी ते सुतो भवत् २२ नाम्ना परिमल शूरस्त्वं मन्मन्त्री भवाधुना । विद्योतश्च तथा मन्त्री गजसैन्ये हि भीष्मकः २३ वृत्त्यर्थे च मया वां वै पुरी दत्ता महावती । महीपतेश्च भूपस्य नगरी सा विचक्षणा २४ इति श्रुत्वा तु ते सर्वे तथा मत्वा मुमोदिरे । महीपतिस्तु बलवान्दुःखात्संत्यज्य तां पुरीम् २५ कृत्वौर्वीयां पुरीमन्यां तत्र वासमकारयत् । अगमा मलना चैव भगिन्यौ तस्य चोत्तमे २६ अगमा भूमिराजाय कान्या परिमलाय सा । दत्ता भ्रात्रा विधानेन परमानन्दमापतुः २७ विवाहान्ते च भूराजा दुर्गमन्यमकारयत् । कृत्वा च

आहे. हा बारा वर्षांच्या वयाचा झाला असता त्यास सिंहखेल पुत्र झाला ११,१२. हें सर्व ऐकून अनंगपाल त्यास आपणच राज्य देता झाला व रम्य हिमालयावर जाऊन योगध्यानामध्यें तल्लीन झाला १३. मथुरेमध्यें धुंधकार व अजमेरात त्याचा नीतिज्ञ धाकटा भाऊ राजा झाला. ते दोघेही पुत्र पित्याच्या आज्ञेनेंच राजे झाले १४. चंद्रवंशातील प्रद्योत व विद्योत नामक बलाढ्य व मदोन्मत्त क्षत्रिय त्या राजाचे मंत्री होते १५. प्रद्योताचा परिमल म्हणून बलवान् पुत्र असे, त्यास त्यो राजानेंच शिक्षण दिलें होते. तो लक्ष सैन्याचा अधिपति होता १६. विद्योतास भीष्मसिंह म्हणून पुत्र झाला. तो गजसैन्याचा मुख्य असे. पण अनंगपाल स्वर्गलोकीं गेला असतां ते चौघेही असंतुष्ट आहेत असें पाहून पृथ्वीराज राजा त्या सर्वांस आपल्या राज्यातून हांकून लाविता झाला. तेव्हां ते प्रद्योतादिक चौघे आपल्या दोनशे शूर लोकांसह कान्यकुब्जनगरास आले व जयचंद्रास म्हणाले 'हे राजा जयचंद्रा, तुझ्या मावशीचा मुलगा तुझ्या मातामहाचें राज्य प्राप्त करून घेऊन निर्भय व बलाढ्य होऊन राहिला आहे. त्यास आम्ही न्यायानें असें म्हटलें कीं, तुझें अर्धेच राज्य आहे १७–२०. मग असें असताना तूं सर्व राज्याचा उपभोग कसा घेत आहेस ? हें ऐकून त्यानें आमचें निराकरण केलें. व त्यामुळें आम्ही तुला शरण आलों आहों. आतां जसे योग्य वाटेल तसें कर.' तेव्हा जयचंद्र राजा त्यास म्हणाला 'माझ्या अश्वसैन्यामध्यें तुझा परिमलनामक बलाढ्य पुत्र अधिकारी होऊं दे. तूं आतां माझा मंत्री हो. तसाच विद्योतही माझा मंत्री होऊं दे व भीष्मक गजसैन्याचा अधिपति होईल २१–२३. तुमच्या वृत्तीकरितां मीं तुम्हांस महावती नगरी दिली आहे. पृथ्वीराजराजाची प्रिय करणारी अशी ती नगरी आहे' २४. हें ऐकून त्या सर्वांनीं तें कबुल केलें. व ते आनंदित झाले. पण इकडे बलवान् राजा दुःखानें त्या नगरास सोडून २५ और्वीय म्हणून दुसरें नगर करून तेथें वास करिता झाला. अगमा व मलना म्हणून त्याच्या दोन उत्तम भगिनी होत्या २६. त्या भ्रात्यानें अगमा पृथ्वीराजास व दुसरी भगिनी परिमलास यथाविधि दिली व त्यास परमानंद झाला २७. विवाहानंतर पृथ्वीराज दुसरा एक

नगरीं रम्यां चतुर्वर्णनिवासिनीम् २८ देहली सुमुहूर्तेन दुर्गद्वारे सुरोपिता । मता सा योजनान्ते वै वृद्धिरूपा सुकालतः २९ विस्मितः स नृपो भूत्वा देहली नाम चाकरोत् । दिहलीग्राम इति च प्रश्रितोऽभूत्तुपाज्ञया ३० त्रिवर्षान्ते च भो विप्र जयचन्द्रो महीपति । लक्ष-षोडशसैन्याढ्यस्तत्र पत्रमवोदयत् ३१ किमर्थं पृथिवीराज मदार्थं मे न दत्तवान् । मातामहस्य वै दाय चार्द्धं मे च समर्पय ३२ नो चन्मच्छस्त्रकठिनैः क्षयं यास्यन्ति सैनिकाः । इति श्रुत्वा महीराजो विंशल्लक्षाधिपो बली ३३ दूतं वै प्रेषयामास राजराजो मदोत्कट. । जयचन्द्र महीपाल सावधान शृणुष्व तत् ३४ यदा निराकृता धूर्ता मया ते चन्द्रवंशिनः । ततःप्रभृति सेनाङ्गं विंशल्लक्ष समाहृतम् ३५ त्वया षोडशलक्ष च युद्धसैन्यं समाहृतम् । सर्वे वै भारते भूपा दण्डयोग्याश्च मे सदा ३६ भवान्न दण्डयो बलवान्कर मे दातुमर्हति । नो चेन्मत्कठिनैर्बाणैः क्षयं चास्यन्ति सैनिकाः ३७ इति श्रुत्वा तयोर्घोर वैरं चासीन्महीतले भूमिराजश्च बलवान्जयचन्द्रभयार्दितः ३८ जयचन्द्रश्च बलवान्पृथिवीराजभीरुकः । जयचन्द्रश्चार्यदेशमर्द्धराष्ट्रमकल्पयत् ३९ पृथिवीराज एवासौ तथार्द्धं राष्ट्रमानयत् । एवं जातं तयोर्वैरमग्निवंशभयाशनम् ४० [१६८०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये पञ्चमोऽध्याय. ॥ ५ ॥

सूत उवाच ॥ एकदा रत्नभानुर्हि महीराजेन पालिताम् । दिशं याम्यीं स वै जित्वा तेषां कोशानुपाहरत् १ महीराजस्तु तच्छ्रुत्वा पर विस्मयमागतः । रत्नभानोश्च तिलको बभूव बहुविस्तरः २ तिलका नाम विख्याता या तु वीरमती शुभा । श्रेष्ठा द्वादशराज्ञीनां

दुर्ग करविता झाला व चारी वर्णाचे लोक जिच्यामध्ये रहात आहेत अशी नगरी वसवून २८ तो दुर्गद्वारामध्ये सुमुहूर्तावर उभारठा स्थापिता झाला. काहीं वेळाने ती नगरी वृद्धि पावता पावता योजनपर्यंत वाढली २९. तेव्हा राजा आश्चर्ययुक्त होऊन तिचें देहली असें नाव ठेविता झाला. तात्पर्य, दिहली गांव असें नाव राजाच्या आज्ञेनें पडले ३०. तीन वर्षानंतर बा द्विजा, जयचंद्रनामक राजा सोळा लक्ष सैन्यानें संपन्न होत्साता त्याच्याकडे पत्र पाठविता झाला ३१. 'हे पृथ्वीराजा, माझा भाग तूं मला का देत नाहींस ? माझ्या मातामहाचा मला अर्धा भाग दे. नाहींपेक्षा माझ्या कठिण शस्त्राच्या योगानें तुझे सैनिक नाहींसे होतील.' हे वाचून बीस लक्ष सैन्याचा स्वामी, राजाधिराज व मदोन्मत्त पृथ्वीराज दूतास पाठविता झाला. " बा जयचंद्रराजा, सावधानपणें ऐक. त्या चंद्रवंशातील ठगास जेव्हा मीं घालवून दिलें. तेव्हापासून मीं बीस लक्ष सैन्य जमविलें आहे ३२-३५. व तू काय तें सोळा लक्षच जमविलें आहेस. भारतातील सर्व राजे माझ्या दंडास सदा योग्य आहेत ३६. आता तू बलाढ्य आहेस. यास्तव, मी तुला दंड्य समजत नाहीं तरी मला कर देणें तुला उचित आहे. नाहीपेक्षा माझ्या कठिण बाणानीं तुझ्या सैन्याचा क्षय होईल " ३७. हा निरोप समजल्यावर त्या उभयतांचें भूलोकीं घोर युद्ध झालें. बलाढ्य पृथ्वीराजास जयचंद्राचे भय वाटत होतें व बलयुक्त जयचंद्रास पृथ्वीराजाचें भय वाटत असे. जयचंद्रानें आर्यदेशाचें अर्धं राष्ट्र कल्पिलें व पृथ्वीराजानें तसेंच अर्धं राज्य मानिलें. तात्पर्य, अग्निवंशाचा नाश करणारें असें त्या उभयतामध्यें वैर पडलें ३८–४०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

सूत म्हणतात:— एकदा रत्नभानु, पृथ्वीराजानें जिचें रक्षण केलें आहे अशा दक्षिण दिशेंत गेला व तेथील राजास जिंकून त्याचे कोश घेता झाला १. पण पृथ्वीराज हें ऐकून अत्यंत

जननी लक्षणस्य वै ३ जयचन्द्रस्य भूपस्य योषितः षोडशाभवन् । तासां न तनयो ह्यासीत्पूर्वकर्मविपाकतः ४ गौडभूपस्य दुहिता नाम्ना दिव्यविभावरी । जयचन्द्रस्य महिषी तद्दासी सुरभानवी ५ रूपयौवनसयुक्ता रतिकेलिविशारदा । दृष्ट्वा तां सा नृपः कामी बुभुजे स्मरपीडितः ६ तस्यां जाता सुता देवी नाम्ना संयोगिनी शुभा । द्वादशाब्दे वयःप्राप्ते सा बभूव वराङ्गना ७ तस्याः स्वयंवरे राजाहूवयद्भूपान्महाशुभान् । भूमिराजस्तु बलवान्न च्छुत्वा तद्रूपमुत्तमम् ८ विवाहार्थे मनश्चासीच्चन्द्रभट्टमचोदयत् । मन्त्रिप्रवर भो मित्र चन्द्रभट्ट मम प्रिय ९ कान्यकुब्जपुरीं प्राप्य मन्मूर्तिं स्वर्णनिर्मिताम् । स्थापय त्व सभामध्ये यद्वृत्तान्तं तु मे वद १० इति श्रुत्वा चन्द्रभट्टो भवानीभक्तितत्परः । गत्वा तत्र भृगुश्रेष्ठ यथोक्तस्तथाऽकरोत् ११ स्वयंवरे च भूपाश्च नानादेश्याः समागताः । त्यक्त्वा संयोगिनी तान्वै रूपमूर्तिर्विमोहिता १२ पितरं प्राह कामाक्षी यस्य मूर्तिरियं नृप । भविष्यति स मे भर्ता सर्वलक्षणलक्षितः १३ जयचन्द्रस्तु तच्छ्रुत्वा चन्द्रभट्टमुवाच ह । यदि ते भूपतिश्चैव सर्वसैन्यसमन्वितः १४ सेजयेद्योगिनीमेतां तर्हि मे प्रीतिर्भवेत् । चन्द्रभट्टस्तु तच्छ्रुत्वा तत्तु सर्वमवर्णयत् १५ पृथिवीराज एवासौ श्रुत्वा सैन्यमचोदयत् । एकलक्षा गजास्तस्य सप्तलक्षास्तुरङ्गमाः १६ रथाः पञ्चसहस्राश्च धनुर्बाणविशारदाः । लक्षा. पदातयो ह्येषां द्वादशैव महाबलाः १७

आश्चर्ययुक्त झाला. रत्नभानूचा तिलक फार विस्तृत झाला २. तिलका नावाने प्रसिद्ध असलेली जी शुभ वीरमती ती लक्षणाची जननी बारा राण्यांतील श्रेष्ठ झाली ३. जयचंद्र राजाच्या सोळा राण्या झाल्या. पण पूर्वकर्मपरिपाकामुळे त्यांच्या ठायी पुत्र झाला नाही ४. गौड राजाची दिव्यविभावरीनामक कन्या जयचंद्राची राणी होती. तिची सुरभानवी म्हणून दासी होती ५. ती रूप व यौवन यांनी युक्त व रतिक्रीडेमध्ये कुशल होती. तिला पाहून तो कामी पुरुष कामपीडित होत्साता तिचा भोग घेता झाला ६. तिच्या उदरी कन्या झाली. ती जणु काय देवीच हो ती. त्या शुभ कन्येचे नाव संयोगिनी असे होते. ती बारा वर्षांच्या वयाची झाली असता श्रेष्ठ स्त्री झाली ७. तिच्या स्वयंवरामध्ये राजाने पुष्कळ शुभ राजास बोलाविले. पण बलवान् पृथ्वीराजा तिच्या उत्तम रूपाविषयी ऐकता झाला. व तिच्याशी विवाह करावा असें त्याच्या मनात आले. तेव्हा त्याने चंद्रभट्टास असें सांगितले'— हो श्रेष्ठ मंत्र्या, हो मित्रा, हे मला प्रिय असलेल्या चंद्रभट्टा ८,९. कान्यकुब्जपुरीत जाऊन तू सभेमध्ये माझी सुवर्णाची मूर्ति ठेव व जो वृत्तांत होईल तो मला सांग १०. हे ऐकून भवानीच्या भक्तीमध्ये तत्पर असलेला चंद्रभट्ट तेथें जाऊन हो भृगुश्रेष्ठा, राजाने जसे सांगितले होते तसे करिता झाला ११. स्वयंवरामध्ये नानादेशांतील राजे आले. पण त्या सर्वांस सोडून संयोगिनी राजाच्या मूर्तीवर मोहित झाली १२ व ती कामाक्षी पित्यास म्हणाली 'राजा, ज्याची ही मूर्ति आहे तो सर्व लक्षणांनी युक्त असलेला पुरुष माझा पति होईल' १३ तेव्हा ते ऐकून जयचंद्र त्या चंद्रभट्टास म्हणाला 'जर तुझा राजा सर्व सैन्यानें युक्त होत्साता या संयोगिनीस जिंकील तर तो मला अतिशय प्रिय होईल. 'हे ऐकून चंद्रभट्ट राजास सर्व वृत्तांत सांगता झाला १४,१५ व ते ऐकताच पृथ्वीराजाने सैन्यास आज्ञा केली. त्याचे एक लक्ष हत्ती, सात लक्ष घोडे १६, धनुर्धर व बाण यामध्ये निपुण असणारे पाच सहस्र रथी व अतिबलाढ्य असे बारा लक्ष पायदळ होते असे जाणावे १७. तीनशे राजे पृथ्वीराजाच्या मागून पायाने जाणारे होते. असो; या सर्वांसह व दोन बंधूसह तो राजा कान्यकुब्जा-

राजानश्चिरतान्येव महीराजपदानुगाः । सार्द्धं द्वाभ्यां च बन्धुभ्यां काम्यकुब्जे नृपोऽगमत् १८ धुन्धुकारश्च तद्बन्धुर्गजानीकपतिस्सदा । हयानीकपतिः कृष्णकुमारो बलवत्तरः १९ पदातीनां नृपतयः पत्तयस्तत्र चाभवन् । महत्कोलाहलं जातं स्थलीं शून्यामकारयत् २० विंशत्कोशप्रमाणेन स्थितं तस्य महाबलम् । जयचन्द्रस्तु सङ्गाय महीराजस्य चागमम् २१ स्वसैन्यं कल्पयामास लक्षषोडशसंमितम् । एकलक्षा गजास्तस्य सप्तलक्षाः पदातयः २२ वाजिनश्चाष्टलक्षाश्च सर्वयुद्धविशारदाः । द्विशताग्येव राजानः प्राप्तास्तत्र समागमे २३ आगस्कृतं महीराजं मत्वा ते शुक्रवंशिनः । युद्धार्थिनः स्थितास्तत्र पुरमागस्कृतं हयभृत् २४ ईशनद्याः परे कूले महोला स्थापिता तदा । नानावाद्यानि रम्याणि तत्र चक्रुर्महारवम् २५ रत्नभानुर्गजानीके हयानीके हि लक्षणः । ताभ्यां सेनापतिभ्यां तौ संयुतौ बलवत्तरौ २६ द्योतश्चैव विद्योतो रत्नभानुं ररक्षतुः । भीष्मः परिमलश्चैव लक्षणं चन्द्रवंशजः २७ भूपाः पदातिसैन्यं च संस्थिता मदविह्वलाः । अथोश्वासीन्महद्युद्धं दारुणं सैन्यसंक्षयम् २८ हया हयैर्मृता जाता गजाश्चैव गजैस्तथा । पदातयः पदातैश्च मृताश्चान्ये ऋभादृणे २९ भूपैश्च रक्षिताः सर्वे निर्भया रणमाययुः । यावत्सूर्यः स्थितो व्योम्नि तावद्युद्धमवर्तत ३० एव पञ्चदिनं जातं युद्धं वीरजनक्षयम् । गजा दशसहस्राणि हया लक्षैस्तु संक्षिताः ३१ पञ्चलक्ष महीभर्तुर्हतास्तत्र पदातयः । राजानो द्वे शते तत्र रथाश्च त्रिशतं तथा ३२ काम्यकुब्जाधिपस्यैव गजा नवसहस्रकाः । सहस्रैकं रथा ज्ञेयास्त्रिलक्ष च पदातयः ३३ एकलक्ष हयास्तत्र मृताः स्वर्गपुरं ययुः । षष्ठाह्नि समनुप्राप्ते पृथिवीराज एव सः ३४

मध्यें आला १८. त्याचा धुंधुकारनामक बंधु सर्वदा गजसैन्याचा अधिपति होता व अत्यंत बलिष्ठ कृष्णकुमार अश्वसैन्याचा नायक होता १९. इतर राजे पायदळाचे नायक झाले. मोठा कोलाहल झाला व त्यानें सर्व स्थलें शून्य करविलीं २०. वीस कोसान्या प्रमाणानें त्याचें मोठें सैन्य राहिलें; पण जयचंद्रास पृथ्वीराजाचें आगमन होत आहे असें जेव्हा समजलें २१, तेव्हां त्यानेंही आपलें सोळा लक्ष सैन्य सज्ज केलें. त्याचे एक लक्ष गज, सात लक्ष पायदळ व आठ लक्ष घोडे होते, ते सर्व युद्धामध्यें निपुण होते. त्या समागमामध्यें दोनशे राजे प्राप्त झाले २२,२३. पृथ्वीराज अपराध करणारा आहे अतें जाणून ते शुक्रवंशात उत्पन्न झालेले युद्धार्थी राजे युद्धामध्यें उभे राहिले. सर्व नगर अपराधी असल्याप्रमाणें झालें २४. गंगेन्या परतीरावर त्यानीं तेव्हा आपला तळ दिला. तेथें अनेक रम्य वाद्यें मोठा शब्द करितीं झालीं २५. गजसैन्यामध्यें रत्नभानु व घोडयाच्या सैन्यामध्यें लक्षण राहिला. त्या दोन्ही सेनापतींनीं त्या दोघा बलाढय राजाचें रक्षण केलें. प्रद्योत व विद्योत यानीं रत्नभानूचे रक्षण केलें व चंद्रवंशज भीष्म आणि परिमल लक्षणाचें रक्षण करिते झाले. २६,२७. मदानें विव्हल झालेले राजे पायदळामध्यें राहिले. त्या उभयता राजाचे भयंकर व सैन्याचा क्षय करणारें मोठें युद्ध झालें २८. घोडयाच्या योगानें घोडे मरण पावले. हत्ती हत्तींशीं झुंजून मेले व याचप्रमाणें पदाति व इतरही बरोबरीच्याशीं भाडताना रणामध्ये मरण पावले ! २९. राजानीं ज्याचें रक्षण केलें होतें असे सर्व निर्भय होऊन रणामध्यें आले व जोंपर्यंत सूर्य आकाशात होता तोंपर्यंत युद्ध चाललें ३०. याप्रमाणें वीर पुरुषांचा क्षय करणारें युद्ध पाच दिवस झालें. त्या युद्धात पृथ्वीराजाचे दहा हजार हत्ती व लक्षावधि घोडे मरण पावले. पाच लक्ष पायदळ, दोनशें राजे व त्याचप्रमाणें तीनशे रथ नाहींसे झाले ३१,३२. कान्यकुब्जाच्या राजाचे नऊ हजार हत्ती, एक हजार रथ, तीन लक्ष पायदळ व एक लक्ष घोडे त्या युद्धामध्यें मरून स्वर्गलोकीं गेले. सहावा दिवस उजाडला असतां पृथ्वीराजा दुःखी होऊन भक्तिमान् होत्साता मनानें रुद्र-

दुःखितो मनसा देव रुद्र तुष्टाव भक्तिमान् । संतुष्टस्तु महादेवो मोहयामास तद्बलम् ३५ यस-स्मात्तु महीराजो गतः सयोगिनीं प्रति । दृष्ट्वा तत्सुन्दरं रूप मुमोह च सुधाधिपः ६ संयोगिनी नृपं दृष्ट्वा मूर्च्छिता चाभवत्क्षणात् । एतस्मिन्नन्तरे राजा तद्दोलामानयद्बलात् ३७ जगाम देहलीं भूपः सर्वसैन्यसमन्वितः । योजनान्ते गते तस्मिन्बोधितास्ते मदोद्भटाः ३८ दृष्ट्वा नैव तदा दोला प्रजग्मुर्वेगवत्तराः । श्रुत्वः कोलाहल तेषां महीराजो नृपोत्तमः ३९ अर्द्धसैन्य च संस्थाप्य स्वयं गेहमुपागमत् । उभौ तद्भ्रातरौ वीरौ चार्द्धसैन्यसमन्वितौ ४० सूकरक्षेत्रमाश्रित्य युद्धाय समुप-स्थितौ । एतस्मिन्नन्तरे सर्वे प्रद्योतादिमहाबलाः ४१ स्वसैन्यैः सह संप्राप्य महद्युद्धमकारयन् । हया हयैश्च संजग्मुर्गजा अथ गजै. सह ४२ सकुलश्च महानासीद्दारुणो लोमहर्षणः । दिनान्ते सक्षयं जातं तयोश्चैवं महद्बलम् ४३ भयभीता परे तत्र ज्ञात्वा रात्रिं तमोवृताम् । प्रबुद्धबुर्भयाद्वीरा हतशेषास्तु देहलीम् ४४ प्रद्योताश्वा ते वीरा देहलीं प्रति संययु । पुनस्तयोंमहद्युद्ध ह्यभवल्लोमहर्ष-णम् ४५ धुन्धुकारश्च प्रद्योतं हृदि बाणैरताडयत् । त्रिभिश्च विषनिर्दग्धैर्मूर्छितः स ममार च ४६ भ्रातरं निहत दृष्ट्वा विद्योतश्च महाबलः । आजगाम गजारूढो धुन्धुकारमताडयत् ४७ त्रिभिश्च तोमरैः सोऽपि मूर्छितो भूमिमागमत् । मूर्छितं भ्रातर दृष्ट्वा धुन्धुकार महाबलम् ४८ तदा कृष्ण-कुमारोऽसौ गजस्थस्त्वरितो ययौ । रुषाविष्टश्च तं वीर भल्लेनैवमताडयत् ४९ भल्लेन तेन संभिन्नो मृतः स्वर्गपुरं ययौ । विद्योते निहते तस्मिन्सर्वसैन्यश्रमूपतौ ५० रत्नभानुर्महावीरोऽयुध्यत्तेन समन्वितः । एतस्मिन्नन्तरं राजा सहस्रगजसयुतः ५१ लक्षण सहित ताभ्यां क्रुद्धं तं समयुध्यत ।

देवाची स्तुति करिता झाला. तेव्हा संतुष्ट झालेला महादेव त्याच्या प्रतिपक्ष्याचें सैन्य मोहित करिता झाला ३३-३५. तेव्हा प्रसन्न झालेला पृथ्वीराजा संयोगिनीप्रत गेला व तिचे ते सुंदर रूप पाहून पृथ्वीराजा मोहित झाला ३६. संयोगिनीही राजास पाहून तत्काल मूर्च्छित झाली. इतक्यात राजा, ती ज्या दोल्यावर बसली होती त्यासह तिचे बलात्काराने हरण करून सर्व सैन्यासह देहलीस गेला. तो तेथून एक योजनभर दूर गेला असता ते मदानें मत्त झालेले वीर शुद्धीवर आले व दोला नाहीं असे पाहून ते मोठ्या वेगाने त्याच्या मागोमाग निघाले. त्याचा कोलाहल ऐकून उत्तम राजा पृथ्वीराज अर्धे सैन्य तेथे ठेवून स्वतः गृही गेला. ते दोघेही शूर भ्राते अर्ध्या सैन्यासह सूकरक्षेत्राचा आश्रय करून युद्धाकरिता उभे राहिले. इतक्यात प्रद्योतादि सर्व महाबलवान् योद्धे आपल्या सैन्यासह येऊन त्याचे मोठ युद्ध झाले. घोडे घोड्यांशीं व गज गजांशीं भिडले ३७-४२. तेव्हा फार मोठे भयकर व लोमहर्षण युद्ध झाले. सायकाळीं त्या उभयतांचेही मोठे सैन्य नाहींसें झालें ४३ व जे कांहीं सैनिक राहिले होते ते अंधकारयुक्त रात्र झाली आहे असें जाणून भयभीत होत्साते देहलीस पळून गेले ४४. तेव्हा प्रद्योतादिक वीर देहलीवर-चाल करून आले. तेव्हा पुनरपि त्यांचे भयकर युद्ध झालें ४५. धुंधुकारानें प्रद्योताच्या हृदयात तीन विषारी बाणांचा प्रहार केला. त्यामुळे तो मूर्छित होऊन भूमीवर पडला व मरण पावला ४६. आपला भ्राता मृत झाला आहे असें पाहून महाबलवान् विद्योत गजावर आरूढ होऊन आला व त्याने धुधुकारास तीन तोमरानीं ताडन केलें. तेव्हां तोही मूर्छित होऊन भूमीवर पडला. आपला महाबलाढ्य धुंधुकार मूर्छित होऊन पडला आहे असें पाहून कृष्णकुमार गजावर आरूढ होऊन तात्काल त्वरेनें आला. व रागानें युक्त झालेल्या त्यानें त्या वीरास बाणानें ताडन केलें ४७-४९. तेव्हां त्या बाणाच्या योगाने छिन्नभिन्न होऊन तो मृत झाला आणि स्वर्गलोकीं गेला. सर्व सैन्याचा नायक असा तो विद्योत मृत झाला असतां

शिवदत्तवरो राजा भीष्मं परिमलं रुषा ५१ रुद्रास्त्रैर्मोहयद्भाम लक्ष्मणं बलवत्तरम् । मूर्छितांस्तान्समालोक्य रत्नभानुः शरैर्निजैः ५३ धुन्धुकारं महीराजं वैष्णवैः सममोहयत् । कृष्णको रत्नभानुश्च युयुधाते परस्परम् ५४ उभौ समबलौ वीरौ गजपृष्ठस्थितौ रणे । अन्योन्यनिहतौ नागौ खड्गहस्तौ महीतले ५५ युयुधाते बहून्मार्गान्कृतवन्तौ सुदुर्जयौ । प्रहरान्त रणं कृत्वा मरणायोपजग्मतुः ५६ हते तस्मिन्महावीर्ये काम्यकुब्जाः भयातुराः । मूर्छितांस्तान्समादाय पञ्चलक्षबलैर्युताः ५७ रणं त्यक्त्वा गृहं जग्मुर्नृपशोकपरायणाः । रत्नभानौ च निहते हतोत्साहाश्च भूमिपाः ५८ स्वं स्वं निवेशनं जग्मुर्महीराजभयातुराः । देवानाराधयामासुर्यथेष्टं ते गृहे गृहे ५९ महीराजस्तु बलवान्सप्तलक्षबलान्वितः । धुन्धुकारेण सहितो बन्धुकृत्यौर्ध्वमाचरत् ६० तथा भीष्मः परिमलो लक्ष्मणः पितरं स्वकम् । गङ्गाकूले समागम्य चौर्ध्वदैहिकमाचरत् ६१ भूमिराजस्य विजये जयचन्द्रपराजये रणे । प्रसिद्धमभवद्भूमौ गेहे गेहे जने जने ६२ जयचन्द्रः काम्यकुब्जे देहलीपृथिवीपतिः । उत्सवं कारयित्वा तु परमानन्दमाययौ ६३ [१७४३] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

सूत उवाच ॥ भीष्मः सिंहस्थिते गङ्गाकूले शक्रमपूजक । शक्रं सूर्यमयं ज्ञात्वा तपसा समतोषयत् १ मासान्ते भगवानिन्द्रो ज्ञात्वा तद्भक्तिमुत्तमाम् । वरं वरय चेत्याह श्रुत्वा शूरोऽब्रवीदिदम् २ देहि मे बडवां दिव्यां यदि तुष्टो भवान्प्रभु । इति श्रुत्वा तदा तस्मै बडवां हरिणीं

महावीर रत्नभानु त्याच्याशीं युद्ध करूं लागला. इतक्यात राजा हजार हत्तींनीं युक्त होऊन लक्ष्मणासह क्रुद्ध होऊन त्याच्याशीं दोघा भावांसह युद्ध करिता झाला. त्याला शिवानें वर दिला आहे असा तो राजा भीष्म व परिमल यास व बलाढ्य लक्ष्मणास क्रोधानें रुद्रास्त्राने मोहित करिता झाला. ते मोहित झाले आहेत असें पाहून रत्नभानु आपल्या वैष्णव बाणानीं पृथ्वीराज व धुंधुकार यास मोहित करिता झाला. तेव्हा कृष्णकुमार व रत्नभानु आपसात युद्ध करूं लागले ५०–५४. तें दोघेही सारखे बलाढ्य व वीर रणामध्ये गजपृष्ठारूढ होऊन एकमेकाच्या हत्तींस मारिते झाले व नंतर हातात खड्ग घेऊन व भूमीवर उभे राहून ते युद्ध करिते झाले. दुर्जय अशा त्या दोघानीं अनेक डावपेंच केले व प्रहरापर्यंत युद्ध करून ते मरण पावले ५५,५६. ते महावीर मृत झालें असतां काम्यकुब्ज भयातुर झाले व त्या तिघा मूर्च्छितास घेऊन पांच लक्ष सैन्यासह ५७ रण सोडून राजाच्या शोकानें युक्त होत्साते तें आपल्या गृहीं गेले. रत्नभानु मृत झाला असता सर्व राजाचा उत्साह नष्ट झाला ५८ व ते सर्व पृथ्वीराजाच्या भयाने व्याकुळ होत्साते आपापल्या गृहीं गेले. आणि घरोघर ते इष्ट देवताची आराधना करून काल घालवूं लागले ५९. इकडे बलवान् पृथ्वीराज सात लक्ष सैन्यानें युक्त होत्साता धुंधुकारासह बंधूचे और्ध्वदैहिक कर्म करिता झाला ६०. त्याचप्रमाणे भीष्म, परिमल व लक्ष्मण आपापल्या पित्याचे और्ध्वदैहिक करण्याकरिता गंगेच्या तीरीं गेले. रणामध्ये पृथ्वीराजाचा विजय व जयचंद्राचा पराजय झाला हें भूलोकीं घरोघर व प्रत्येक मनुष्यास ठाऊक झालें ६१,६२. जयचंद्र कान्यकुब्जामध्ये व पृथ्वीराज देहलीमध्यें उत्सव करून परम आनंदित झाला ६३. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणान्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥

सूत ह्मणतातः—इंद्रपूजक भीष्म सिंहराशीमध्ये सूर्य आला असतां गंगेच्या तीरीं इंद्र सूर्यमय आहे असे जाणून त्यास तपश्चर्येन्या योगानें संतुष्ट करिता झाला १. एका महिन्याच्या शेवटीं भगवान् इंद्र त्याची उत्तम भक्ति जाणून "वर माग" असें ह्मणाला. तें ऐकून तो शूर असें ह्मणाला २

शुभाम् ३ ददौ स भगवानिन्द्रस्तत्रैवान्तरधीयत । तस्मिन्काले परिमलः पितृशोकपरायणः ४ पार्थिवैः पूजयामास महादेवमुमापतिम् । परीक्षार्थे शिव. साक्षात्सर्परोगेण तं ग्रसन् ५ व्यतीते पञ्चमे मासे नृपः शक्तिविवर्जितः । न तत्याज महापूजां महाक्लेशसमन्वितः ६ मरणाय ययौ काशीं स्वपत्न्या सहितो नृपः । उवास वटमूलान्ते राज्ञो रोगपपीडितः ७ एतस्मिन्नन्तरे कश्चित्पन्नगो मूलसंस्थितः । शब्दं चकार मधुरं श्रुत्वा रुद्राहिराययौ ८ रुद्राहिं पन्नग प्राह भवान्निर्दय मन्दधीः । शिवभक्तं नृपमिमं पीडयेत्यत्यह खलः९ मूर्खोऽयं भूपतिः साक्षादारनालं पिबेन्न हि । इति श्रुत्वा स रुद्राहिराह रे पन्नगाधम१० राज्ञो देहे परं हर्षं प्रत्यहं प्राप्तवानहम् । स्वगेहे दुःखितस्याज्यः कथं त्यक्तो मया शठ ११ मूर्खोऽत्र भूपतिर्यो वै तैलोष्णं तं न दत्तवान् । इत्युक्त्वान्तर्गतो देहे श्रुत्वा सा मलना सती १२ चकार पन्नगोक्तं तद्वतरोगो नृपोऽभवत् । तैलोष्णैर्बिलमापूर्य चखान च सती स्वयम् १३ ततो जातं स्वयं लिङ्गमगुष्ठाभं सनातनम् । ज्योतीरूपं चिदानन्दं सर्वलक्षणसमन्वितम्१४निशीथे तम उद्भूते दिक्षु सूर्यत्वमागतम् । दृष्ट्वा स विस्मितो राजा पूजयामास शंकरम् १५ महिम्नस्तवपाठैश्च तुष्टाव गिरिजापतिम् । तदा प्रसन्नो भगवान्वरं ब्रूहि तमब्रवीत् १६ श्रुत्वाह नृपतिर्देवं यदि तुष्टो महेश्वर । श्रीपतिर्मे गृहं प्राप्य वसेन्मत्प्रियकारक. १७ तथेत्युक्त्वा महादेवो लिङ्गरूपत्वमागतः । प्रत्यहं भारमेकं च सुवर्णं सुषुवे ततः १८ तदा मलस्तु संतुष्ट. प्राहो

" जर प्रभु संतुष्ट झाला असेल तर त्यानें मला अलौकिक घोडी द्यावी. " हें ऐकताच तत्काल हरिणीनामक शुभ घोडी त्यानें त्यास दिली. व तो भगवान् इंद्र तेथेंच गुप्त झाला. त्यावेळीं परिमल पित्याच्या शोकानें संतप्त होत्साता पार्थिवांच्या योगानें उमापति महादेवास पूजिता झाला. तेव्हा त्याच्या परीक्षेकरितां साक्षात् शंकर त्यास सर्परोगानें ग्रासता झाला ३–५. पांचवा महिना निघून गेला असता राजा शक्तिशून्य व अत्यंत क्लेशयुक्त झाला, पण त्यानें महापूजा सोडिली नाहीं. तो राजा मरण्याकरितां आपल्या पत्नीसह काशीस गेला व रोगानें अत्यंत पीडिलेला असा तो रात्रीं एका वटवृक्षाच्या खालीं वसला ६,७. इतक्यांत त्या वृक्षाच्या तळीं असलेल्या एका सर्पानें मधुर शब्द केला व तो ऐकून रुद्ररूप सर्प राजाच्या देहातून बाहेर आला ८. तेव्हा रुद्रसर्पास तो सर्प म्हणाला ' तूं निर्दय व मतिमंद आहेस. कारण, तूं दुष्ट या शिवभक्त राजास रोज पीडा देत आहेस ९. हा राजा शतमूर्ख आहे. कारण, हा आरनाल पीत नाहीं. ' हें ऐकून रुद्रसर्प म्हणाला ' हे नीच सर्पा, अरे मी राजाच्या शरीरात रोज परमानंदास प्राप्त होत आहें. ' ' आपल्या घरीं जो दुःखित असेल त्यास सोडावें. अरे मूर्खा, मीं कसें सोडलें पहा' १०,११. पण मी म्हणतों कीं ' राजा मूर्ख आहे. कारण, त्यानें तुला उष्ण तेल दिलें नाहीं. ' असें बोलून तो सर्प राजाच्या देहात गेला व ती साध्वी मलना सर्पानें सांगितलेला उपाय करिती झाली. त्यामुळें राजा रोगरहित झाला. नंतर उष्ण तेलानें बिळ भरून ती साध्वी स्वतः तेथें खणून पाहूं लागली १२,१३. तेव्हा त्यामध्यें अंगुष्ठाएवढें स्वयंभू लिंग आढळलें. तें ज्योतीरूप, चिदानंदमय व सर्वलक्षणयुक्त होतें १४. मध्यरात्रीं अंधकार पडलेला असताना तें दिशांमध्ये तेजाच्या योगानें सूर्यासारखें पसरलें. तें पाहून राजा विस्मित झाला. व त्याने शंकराचे पूजन केलें १५; महिम्नस्तोत्राच्या पाठानें गिरिजापतीची स्तुति केली. तेव्हा प्रसन्न झालेला भगवान् " वर माग " असें त्यास म्हणाला १६. तें ऐकून राजा देवास म्हणाला " जर महेश्वर प्रसन्न झाला असेल तर श्रीपति माझ्या गृहीं येऊन माझें प्रिय करीत राहो. हे त्यानें मला द्यावें " १७. तेव्हां " तथास्तु " असें म्हणून महादेव लिंगरूप झाला व स्वशरीरातून रोज तो एक भार सोनें देऊ लागला. तेव्हा तो परिमल संतुष्ट होऊन आपल्या

गेहं महावतीम् । भीष्मसिंहेन सहितः परमानन्दमाययौ १९ ततःप्रभृति वर्षान्ते जयचन्द्रपुरीं ययौ । दृष्ट्वा परिमलं राजा कृतकृत्यत्वमागतः २० दिष्ट्या ते संस्थितो रोगः दिष्ट्या ते वर्तितं सुखम् । भवान्निजपुरीं प्राप्य सुखी भवतु मा चिरम् २१ यदा ते विघ्न मा भूयात्तदा त्वं मां समाचर । इति श्रुत्वा परिमलो गत्वा स्थानमवासयत् २२ तदा तु लक्षणो वीरो भगवन्तमुपापतिम् । जगन्नाथमुपागम्य समभ्यर्चापरोऽभवत् २३ पक्षमात्रान्तरं विष्णुर्जगन्नाथ उपापतिः । वरं ब्रूहि ववश्चेति लक्षणं प्राह हर्षतः २४ इत्युक्तः स तु तं देवं नाबोधाच्च विनम्रधीः । देहि मे वाहनं दिव्यं सर्वशत्रुविनाशनम् २५ इति श्रुत्वा जगन्नाथः शक्तिमैरावताद्भुजात् । समुत्पाद्य ददौ तस्मै दिव्यामैरावतीं मुदा २६ आरुह्यैरावतीं राजा लक्षणो गेहमाययौ । स वै परिमलो राजा जगाम च महावतीम् २७ एतस्मिन्नन्तरे वीरास्तालनाद्या मदोत्कटाः । महावतीं पुरीं प्राप्य ददृशुस्तं महीपतिम् २८ तेन सार्धं च महतीं प्रीतिं कृत्वा न्यवासयन् । मासान्ते च पुनस्ते वै राजानो विनयान्विताः २९ ऊचुस्तं शृणु भूपाल वयं गच्छामहे पुरीः । तदा राजाऽपि तान्प्राह सर्वान्क्षितिपतीनथ ॥ दत्त्वाऽधिकारं पुत्रेभ्यस्तदा यास्यामि वोऽन्तिकम् ३० तथेत्युक्त्वा तु ते राज्ञा स्वगेह पुनराययुः । सानुज्ञां देवराजन्तु द्विजभ्यः स्वपुरं ददौ ३१ पुत्रेभ्यस्तालनो वीरो ददौ वनरसं पुरम् । अलिकोऽल्लामतिः कालः पत्रः पुष्पोदरी वरी ३२ करी नरी सुललितस्तेषां नामानि वै क्रमात् । द्वौ द्वौ पुत्रौ स्मृतौ तेषां पितुस्तुल्यपराक्रमौ ३३ स वै पुत्राज्ञया शूरस्तालनो राक्षसप्रियः । यातुधानमयं देवं तुष्टाव म्लेच्छपूजनैः ३४ तथा

आपल्या महावतीतील गृहीं आला व भीष्मसिंहासह परमानंदयुक्त झाला १८,१९. तेव्हापासून एका वर्षानंतर तो जयचंद्राच्या नगरीं गेला. परिमलास पाहून राजा जयचंद्र कृतकृत्य झाला २० व ह्मणाला " मोठ्या दैवयोगानेंच तुझा रोग क्षीण झाला व मी आज तुझें मुख पाहिलें ! आतां तुझी आपल्या नगरीं राहून सुखी व्हा; उशीर लावूं नका " २१; हे ऐकून परिमल ह्मणाला " जेव्हा तुजवर एखादें संकट येईल तेव्हा तू मला बोलीव. " असें बोलून परिमल आपल्या स्थानीं जाऊन राहिला २२. त्यावेळीं लक्षण वीर जगन्नाथास जाऊन उपापति भगवानाची पूजा करिता झाला व तो तल्लीन होऊन राहिला २३. एका पंधरा दिवसातच जगन्नाथ उपापति विष्णु " वर माग; बोल काय हवें तें ! " असें हर्षानें लक्षणास मागता झाला २४. भगवानानें ज्यास असें सांगितलें आहे असा तो नम्रपणें देवास नमस्कार करून ह्मणाला " सर्व शत्रूंचा नाश करणारे असें मला दिव्य वाहन दे " २५. असें ऐकून जगन्नाथ ऐरावत गजापासून शक्ति निर्माण करून त्यास ती दिव्य एरावती आनंदाने देता झाला २६. त्या ऐरावतीवर आरूढ होऊन लक्षण आपल्या गृहीं आला. तो परिमल महावतीस गेला २७. इतक्यात मदोन्मत्त तालनादि वीर महावतीस येऊन त्या राजास पाहते झाले २८ व त्याच्यावर मोठी प्रीति करून तेथें राहिले. एका महिन्यानंतर ते राजे विनययुक्त होऊन त्यास ह्मणाले " राजा, ऐक. आह्मी आपल्या नगरीं जातों. " तेव्हा तोही त्या सर्व राजास ह्मणाला " मी पुत्रास अधिकार देऊन तुमच्याकडे येईन " २९,३०. तेव्हा ' ठीक आहे ' असें ह्मणून ते सर्व राजासह आपल्या नगरीं आले. पण ज्ञात्यासह देशराज आपलें नगर ब्राह्मणास देता झाला ३१. तालनाने आपले वनरस नगर पुत्रांस दिले. अलिक, अल्लामति, काल, पत्र, पुष्पोदरी, वरी, करी, नरी व सुललित अशीं त्यांचीं क्रमाने नावें होतीं. त्यास पित्यासारखे पराक्रमी दोन दोन पुत्र होते ३२,३३. असो; तो राक्षसास प्रिय असलेला शूर तालन पुत्राच्या आज्ञेनें म्लेच्छांच्या पूजापद्धतीने राक्षसमय देवास पूजून स्तुति करिता झाला ३४. त्याच-

वसुमतः पुत्रौ भूपती दशवत्सजौ । शक्रं सूर्यं समाराध्य कृतकृत्यौ बभूवतुः ३५ सिंहिनीं नाम वडवां यातुदत्तां भयानकाम् । आरुह्य बलवच्छूरो गमनाय मनो दधौ ३६ पञ्चशब्द महानागमिन्द्रदत्तं मनोरमम् । देशराजस्तमारुह्य गमनाय मनो दधे ३७ हयं पर्पीहकं नाम सूर्यदत्त नरस्वरम् । वत्सराजस्तमारुह्य गमनाय मनो दधे ३८ त्रयः शूराः समागम्य नगरीं ते महावतीम् ।। ऊचुस्तत्र महात्मानो बहुमानेन सत्कृताः ३९ सेनाषष्टिसहस्रं तत्रेषां स्वामी स तालनः ।। मन्त्रिणौ भ्रातरौ तौ च नृपतश्चन्द्रवंशजः ४० तैर्वीरैः रक्षितो राजा कृतकृत्यत्वमागतः ४१ [१७८४] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

सूत उवाच ॥ जम्बुको नाम भूपालो महीराजो भयातुरः । कालियेन युतः शीघ्रो नर्मदायास्तटे शुभे १ पार्थिवैः पूजयामास देवदेवं पिनाकिनम् । षण्मासान्ते महादेवो जम्बुकं प्राह भूपतिम् २ वरं वरय तेऽभीष्टं भूप आह कृताञ्जलिः । अजितत्वं नृपैः सर्वैर्हि मे करुणानिधे ३ तथेत्युक्त्वा महादेवस्तत्रैवान्तरधीयत । कालियस्तत्सुतो लब्ध्वा वीरो माहेश्वरं वरम् ४ मोहनं सर्वसैन्यानां पितुरन्तिकमाययौ । पितरं प्राह नम्रात्मा देह्यज्ञां तात मन्त्रियाम् ५ गमिष्यामि बलैः सार्धं गङ्गां शुद्धजलां शुभाम् । तथेत्युक्त्वा पिता तस्मै ययौ तु स्वं निवेशनम् ६ भगिनीं प्राह बलवान्विजयैषिणि शोभने ।। किमिच्छसि शुभं वस्तु तदाशु देहि मा चिरम् ७ साह त्रैवेयकं हारं मणिमुक्ता-

---

प्रमाणें वसुमान् राजाचे देशवत्सज दोन पुत्र इंद्र व सूर्य यांची आराधना करून कृतकृत्य झाले ३५. सूर्यानें दिलेल्या सिंहिनीनामक भयंकर घोडीवर बसून त्या बलवान् शूरानें जाण्याचें मनात आणिलें ३६. इंद्रानें दिलेल्या मनोरम पंचशब्दनामक मोठ्या हत्तीवर बसून देशराजानें जाण्याचें मनात आणिलें ३७. ज्याचा स्वर मनुष्यासारिखा आहे अशा सूर्यदत्त पर्पीहक घोडयावर आरूढ होऊन जावें असें वत्सराजानें मनात आणिले ३८. ते तिघेही महाशूर महावतीनगरीस येऊन तेथें ते महात्मे मोठ्या मानाने व सत्कारानें राहिले ३९. साठ हजार सैन्य जमलें व त्याचा नायक तालन झाला. त्या चंद्रवंशीय राजाचे ते दोघे भ्राते त्याचे मंत्री झाले ४० आणि त्या राजाचे ज्याचें रक्षण केलें आहे असा तो राजा कृतकृत्य झाला ४१. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

सूत ह्मणतात:—जंबुकनामक राजा पृथ्वीराजाच्या भयाने व्याकुळ होऊन कालियासह नर्मदेच्या शुभ तटावर आला १ व देवाधिदेव पिनाकीची त्याने पार्थिवान्या योगानें पूजा केली. सहा महिने झाले असता महादेव जबुक राजास ह्मणाला " तुला इष्ट असेल तो वर माग. " तेव्हा राजा हात जोडून ह्मणाला " बा करुणासागरा, मला सर्व राजाकडून अजिक्यपणा दे " २,३. त्यावर ' बरें आहे ' असें ह्मणून महादेव तेथेच गुप्त झाला. त्याचा पुत्र कालियही महेश्वरापासून सर्व सैन्याच्या मोहनरूप वर प्राप्त करून घेऊन पित्याजवळ आला व ज्याचें मन नम्र आहे असा तो पित्यास ह्मणाला ' बाबा, मला हवी आहे ती आज्ञा द्या. जिचे जल शुद्ध आहे अशा शुद्ध गंगेकडे मी जातों'. त्यावर ' बरें आहे ' असें त्यास सांगून तो स्वत: आपल्या गृही आला व तो बलवान् आपल्या भगिनीस ह्मणाला ' विजयाची इच्छा करणाऱ्ये हे सुंदर भगिनि, तुला कोणती उत्तम वस्तु पाहिजे आहे तें मला सांग; उशीर लावूं नको ' ४–७. तीं ह्मणाली ' रत्ने व मोत्ये यांनीं अत्यंत शोभिवंत असा

विभूषितम् । मत्प्रियं देहि मे वीर त्वयेत्युक्त्वा ययौ गृहात् ८ कालियो लक्ष रथैः संयुतस्त्वरितोऽगमत् । प्राप्य यद्वां सागरगां कृत्वा स्नानं विधानतः ९ दत्त्वा दानानि विप्रेभ्यो जयचन्द्रपुरीं ययौ । निर्धनः सप्रभद्राजा बाहुशाली महाबलः १० कान्यकुब्जे महाहारो न प्राप्तो बहुमूल्यकः । तदोर्वीयाधिपेनैव महीरोन प्रबोधितः ११ ययौ महावतीं रम्यां शिवदत्तवरो बली । रुरोध नगरीं सर्वां श्रुत्वा राजा भयातुर १२ रुद्र कपर्दिनं शंभुं शरण्यं शरणं ययौ। शिवाज्ञया नृपो धीमान्बलैः षष्टिसहस्रकैः १३ सार्द्धं पराद्रिर्यातस्त्रिभिः शूरैः सुरक्षितः । तस्य नागाः सहस्रं च देशराजश्च तत्पतिः १४ हया षोडशसाहस्रा वत्सराज-तु तत्पतिः । शेषाः पदातयस्तस्य तालनेनैव रक्षिताः १५ अभवत्तुमुलं युद्धं तेषां वीरवरक्षयम् । अहोरात्रप्रमाणेन महद्धोरमवर्तत १६ ते हत्वा शात्रवीं सेनां चक्रुर्जयरवान्मुहुः । भयार्ता नर्मदायाश्च माहिष्मतिनिवासिनः १७ दुद्रुवुः सर्वतो विप्र दृष्ट्वा तान्कालियो नृपः । आश्वास्य प्रययौ युद्धमर्धसैन्यसमन्वितः १८ हृदि कृत्वा महादेवं मोहन बाणमादधत् । सिद्धमन्त्रप्रभावेन मोहितास्ते बभूविरे १९ शेषास्ते शत्रवः सर्वे रिपुघाताय संयुतः । अलसांस्तान्कपालेषु जघ्नुस्ते भयवर्जिताः २० भीष्मसिंहस्तथा दृष्ट्वा बोधयामास सैनिकान् । सूर्यदत्तेन बाणेन संज्ञारूपानेन तत्र वै २१ भैरवाख्येन भल्लेन शत्रुदेहमताडयत् । मूर्छितः क्ष्मापतद्वीरो गजपृष्ठे शरार्दितः २२ तदा माहिष्मती सेना विययौ सा दिशो दश । मुहूर्तं कश्मलं प्राप्य पुनरुत्थाय कालियः २३ भल्लेन

गळ्यातील हार मला आवडतो. यास्तव, वा वीरा, तो मला दे. ' त्यावर ' ठीक आहे ' असें म्हणून तो गृहातून गेला ८. असो; तो कालिय एक लक्ष घोड्यासह त्वरेनें निघाला; सागरास मिळणाऱ्या गंगेजवळ आल्यावर यथाविधि स्नान करून ब्राह्मणास दाने देऊन जयचंद्राच्या नगरास गेला. बाहुशाली व बलाढ्य राजा निर्धन झाला ९,१०. कान्यकुब्जामध्यें त्यास बहुमोलाचा महाहार प्राप्त झाला नाही. तेव्हा उर्वीयाच्या राजानें बोध केला असता ज्यास शंकराने वर दिला आहे असा तो बलवान् रम्य महावतीस जाऊन त्या सर्व नगरास वेढा घालता झाला. तें ऐकून राजा भयभीत झाला ११,१२ व शरण जाण्यास योग्य असा जो कपर्दी व रुद्रसंज्ञक शंभु त्यास शरण गेला व शिवाच्या आज्ञेनें तो बुद्धिमान् राजा साठ हजार सैन्यासह तीन शूराकडून रक्षित होत्साता नगराच्या बाहेर पडला. त्याचे हजार हत्ती होते व देशराज त्याचा स्वामी होता १३,१४. त्याच्या जवळ सोळा हजार घोडे होते व वत्सराज त्याचा अधिपति होता. बाकीचे पायदळ होते व त्या सर्वांचें रक्षण तालनाने केले होते १५. त्याचे फार भयंकर युद्ध होऊन श्रेष्ठ योद्ध्यांचा क्षय झाला. अहोरात्रप्रमाणाने ते घोर युद्ध चालले होतें १६. त्यानीं शत्रूची सेना मारून वारंवार जयाचा शब्द केला. माहिष्मतीमध्यें रहाणारे नर्मदातटवासी भयानें आर्त होऊन, वा विप्रा, ते चोहोंकडे पळून गेले. पण त्यास पाहून कालिय राजा त्याना आश्वासन देऊन अर्ध्या सैन्यासह युद्धाकरिता आला १८. हृदयामध्यें महादेवाचे ध्यान करून त्यानें मोहनास्त्र उचलले व सिद्धमंत्राच्या प्रभावानें १९ जे काहीं शेष राहिले होते ते सर्व शत्रु मोहित झाले. तेव्हां त्याचा घात करण्याकरिता कालियाचे लोक पुढें सरसावले व आळसयुक्त झालेल्या त्याच्या कपालावर ते निर्भयपणें प्रहार करूं लागले २०. तेव्हा भीष्मसिंहानें हें पाहून संज्ञानामक सूर्यानें दिलेल्या अस्त्रानें सैनिकास सावध केलें २१ व भैरवनामक बाणानें शत्रूच्या शरीरावर प्रहार केला. तेव्हा शराने पीडित झालेला तो वीर मूर्छित होऊन हत्तीच्या पाठीवर पडला २२. त्यावरोवर ती माहिष्मती सेना दाही दिशांस पळून गेली. पण काहीं वेळ मूर्च्छित होऊन पडल्यावर कालिय पुनः उठला व बाणानें त्या राजानें त्याचें म-

तच्छिरः कायादपाहरत भूमिपः । हते तस्मिन्महावीर्ये तालनाख्ये महाबले २४ कालियं ते पराजित्य तं शत्रुं म यंधयन् । महत्कष्टान्वितो भूपो ध्यात्वा मनसि शंकरम् २५ मोहयित्वा रिपून्सर्वान्स ययौ स्वं निवेशनम् । अर्धसैन्येन सहिता हतशेषास्तथा ययुः २६ तदा परिमलो राजा हृष्ट्वा शत्रुपराजयम् । परिष्वज्य महावीरान्स्वगेहं पुनरायथौ २७ जयचन्द्रस्तु तच्छ्रुत्वा परं विस्मयमागतः । तालनं च समाहूय सेनाधीशमकारयत् २८ भीष्मसिंहे गते लोके पञ्चमासान्तरे नृपे । तत्पत्नी जनयामास पुत्ररत्नं शुभाननम् २९ सा तु गुर्जरभूपस्य तनयाख्या मदालसा । दिव्यं पुत्रं समालोक्य मुमुदे सगणा भृशम् ३० श्रुत्वा तज्जन्म नृपतिर्विततार धनं बहु । आहूय मन्त्रकान्मात्राभ्रातृकर्म ह्यकारयत् ३१ सहदेवांश एवासौ भुवि जातः शिवाकृपा । देवसिंहः कृता नाम गणकैः शास्त्रचिन्तकैः ३२ [१८१६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चयेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

सूत उवाच ॥ कालेयतौ पराजित्य भ्रातरौ नृपरेवकौ । गतौ गोपालके राष्ट्रे भूपतिर्दलवाहनः १ सहस्रचण्डिकाहामे नानाभूपसमागमे । गृहीतौ महिषौ ताभ्यां भूपैरन्यैश्च दुर्जयौ २ पूर्वं हि नृपकन्याभ्यां प्रत्यहं बन्धनं गतौ । तौ संपूज्य विधानेन ददौ ताभ्यां च कन्यके ३ देवकीं देशराजाय ब्राह्मीं तस्यानुजाय वै । ददौ दुर्गाज्ञया राजा रूपयौवनशालिनीम् ४ लक्षावृत्तिं तथा वश्यां गीतनृत्यविशारदाम् । कन्ययोश्च सखीं रम्यां मेघमल्लाररागिणीम् ५ शतं गजान्रथान्पञ्च हयांश्चैव सहस्रकान् । चत्वारिंशच्च शिबिकाः प्रददौ दलवाहनः ६ बहुद्रव्ययुतां

स्तक शरीरापासून तोडून भिन्न केलें. तो महावीर्यवान् मरण पावला असता महाबलाढ्य तालनादिक कालिय शत्रूचा पराजय करून त्याचा प्रतिषेध करिते झाले. तेव्हा मोठ्या कष्टानें युक्त झालेला राजा मनामध्यें शंकराचें ध्यान करून सर्व शत्रूंस मोहित करून आपल्या गृहीं गेला. व ह्याप्रमाणें मरून बाकी राहिलेले ते तिचे अर्ध्या सैन्यासह आपल्या नगरीं गेले. तेव्हा परिमल राजा शत्रूचा पराजय झाला आहे असें पाहून आपल्या महावीरास आलिंगन दिल्यावर पुनरपि आपल्या गृहीं आला २३--२७. हा सर्व वृतांत ऐकून जयचंद्रास मोठें आश्चर्य वाटलें. तालनास बोलावून त्यानें सेनापति केलें २८. राजा भीष्मसिंह परलोकवासी झाला असता पांच महिन्यानंतर त्याच्या पत्नीस सुंदर पुत्र झाला २९. तेव्हा ती गुर्जरराजाची मदालसानामक कन्या त्या दिव्य पुत्रास पाहून सर्व समुदायासह अत्यंत आनंदित झाली ३०. त्याच्या जन्माची वार्ता ऐकून राजानें पुष्कळ धन दिलें व सुज्ञ ज्योतिष्यास बोलावून जातकर्म करविलें. शिवाच्या आज्ञेनें हा सहदेवाचाच अंश भूलोकीं निर्माण झाला होता. शास्त्राचें चिंतन करणाऱ्या ज्योतिष्यानीं ह्याचें देवसिंह असें नाव ठेविले ३१,३२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणान्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥

सूत ह्मणतातः—राजाचे ते सेवक भ्राते कलियास जिंकून गोपालकराष्ट्रामध्यें गेले. तेथें दलवाहन ह्मणून राजा होता १. सहस्रचंडिकाहामांत येऊन अनेक राजे आले असता त्यांनीं व दुसऱ्याही राजानीं तेथें दोन दुर्जय रेडे धरिले २; पण प्रथमतःच राजाच्या दोन कन्यानीं त्यास रोज बांधण्याचा क्रम चालविला होता. असो. त्या उभयतांचें पूजन करून राजानें त्यास विधानपूर्वक त्या कन्या दिल्या ३. ह्मणजे देवकीनामक कन्या देशराजास व रूपवती आणि तरुण ब्राह्मी त्याच्या भ्रात्यास राजानें दुर्गेच्या आज्ञेनें दिली ४. त्याचप्रमाणें लक्षावृत्तिनामक गीत व नृत्य यामध्यें कुशल असलेली, मेघमल्लार राग गाणारी व त्या दोघींची रम्य सखी अशी एक वेश्या होती तिला त्याच्याबरोबर दिलें ५. शंभर

कन्यां दासदासीसमन्वितम् । उद्वाह्य वेदविधिना प्रापतुश्च महावतीम् ७ मलना तां वधू दृष्ट्वा तस्यै प्रैवेयकं ददौ । ब्राह्मयै षोडशशृङ्गारं तथा द्वादशभूषणम् ८ राजा च परमानन्दी दशराजाय शूरिणे । ददौ दशपुरं रम्य नानाजननिषेवितम् ९ ऊषतुस्तत्र तौ वीरौ राजमान्यौ महाबलौ । एतस्मिन्नन्तरे जातो देवसिंहो हरात्मजा १० जाते तस्मिन्कुमारे तु देवकी गर्भमादधौ । दासभूना पतेर्देवी सुषुवे पुत्रमूर्जितम् ११ गौराङ्गं कमलाक्षं च दीप्यमानं स्वतेजसा । तदानन्दमयो देवः शक्रः सुरगणैः सह १२ शङ्खशब्दं चकारोच्चैर्जयशब्दं पुनः पुनः । दिशः प्रफुल्लिताश्चासन्ग्रहाः सर्वे तथा दिवि १३ आयाता बहवो विप्रा वेदशास्त्रपरायणाः । चक्रुस्ते जातकर्मास्य नामकर्म तथाविधम् १४ रामांशं तं शिशुं ज्ञात्वा प्रसन्नवदनं शुभम् । भाद्रकृष्णतिथौ षष्ठ्यां चन्द्रवारेऽरुणोदये १५ जनितं कृत्तिकाभे च पितृवंशयशस्करम् । आह्लादनाम्ना शुभवत्यभिधश्च महीतले १६ मासान्ते च सुते जाते ब्राह्मी पुत्रमजीजनत् । धर्मजांशं तथा गौरं महाबाहुं सुवक्षसम् १७ तदा च ब्राह्मणाः सर्वे दृष्ट्वा बालं शुभाननम् । प्रसन्नवदनं चारु पद्मचिह्नपदस्थितम् १८ तैर्द्विजैश्च कृतो नाम्ना बलस्वामिमहाबलः । वर्षान्ते वत्सजे जाते मूलगण्डान्तसंभवः १९ चामुण्डो देवकिसुतो निजवंशभयङ्करः । जनितारं ततस्त्याज्य इत्यूचुर्द्विजसत्तमा । न तत्याज सुतं राजा बालत्वेऽपि दयापरः २० त्रिवर्षान्ते गते तस्मिन्बलखानौ सुते शुभे । शूद्र्यां जातः शिखण्डिन्यशो रूपणो नाम विश्रुतः २१ वत्सराजो ययौ देशे गुर्जरे च मदालसाम् । ससुतां च

हत्ती, पाच रथ, सहस्र घोडे व चाळीस शिबिका दलवाहनानें दिल्या ६. साराश, बहुद्रव्ययुक्त व दासदासींसह अशा त्या कन्याशी वैदिक विधीनें विवाह करून ते महावतीस आले ७. मलना त्या वधूस पाहून तिला आपल्या गळ्यांतील भूषण देती झाली. ब्राह्मीस सोळा शृंगार व बारा भूषणें तिनें दिलीं ८. परमानदयुक्त राजा, शूर देशराजास अनेक लोकांनीं ज्याचें सेवन केलें आहे अशीं दहा रम्य नगरें देता झाला ९. राजास मान्य असलेले व बलाढ्य असे ते वीर तेथें राहिले. इतक्यात शकराच्या आज्ञेनें देवसिंह झाला १०. तो कुमार होताच इकडे देवकीनें गर्भ धारण केला. व पतीच्या आज्ञेत राहणाऱ्या देवीस उत्तम पुत्र झाला ११. त्याचे अंग गोरें होतें. नेत्र कमलासारिखे होते व तो आपल्या तेजानें देदीप्यमान होत होता. तेव्हा आनंदमय झालेला देव इंद्र देवसमूहासह १२ मोठ्यानें शंखनाद करिता झाला. व त्यानें वारंवार जयशब्द केला. दिशा प्रफुल्लित झाल्या आणि त्याचप्रमाणें अंतरिक्षात सर्व ग्रह अधिक तेजस्वी दिसू लागले १३. वेद व शास्त्रे यामध्यें परायण असलेले पुष्कळ ब्राह्मण आले. व त्यानीं या बालकाचें जातकर्म व नामकर्म केलें १४. ज्याचें मुख प्रसन्न व शुभ आहे अशा त्या पुत्रास रामाश समजून भाद्रपद कृष्ण षष्ठी चंद्रवारीं अरुणोदयसमयीं कृत्तिकानक्षत्रावर झालेला तो पुत्र पितृवंशाचें यश करणारा आहे असें ठरविलें. तो भूलोकीं आल्हाद या नांवानें प्रसिद्ध झाला १५,१६. हा पुत्र एक महिन्याचा होत आहे तोंच ब्राह्मीस धर्माच्या अंशापासून पुत्र झाला. तो गोरा, मोठ्या बाहूचा व उत्तम वक्षःस्थलानें युक्त असा होता १७. तेव्हा त्या सुंदर, रमणीय, प्रसन्नमुख व ज्याच्या पायावर पद्मचिन्ह आहे अशा बालकास पाहून त्या सर्व ब्राह्मणानीं त्याचे नाव बलस्वामी असें ठेविलें व हा महाबलाढ्य होईल असें भविष्य केलें. वत्सपुत्र एका वर्षाचा झाला असता मूलगडातावर १८,१९ देवकीस चामुंड ऋणून पुत्र झाला. तो आपल्या वंशास व पित्यास भयंकर होता. यास्तव, त्याचा त्याग करावा असें उत्तम ब्राह्मणानीं सांगितलें; पण त्या राजानें पुत्राचा त्याग केला नाही. कारण, तो बाल असल्यामुळें त्यास त्याची दया आली २०. तो बलखानिनामक पुत्र तीन वर्षाचा झाला

समादाय दिने तस्मिन्समागत. २२ प्राप्ते तस्मिन्वत्सराजे जम्बुकः स्वबलैर्वृतः । सप्त-लक्षैश्च संप्राप्तो बाहुशाली यतेन्द्रिय· २३ रुरोध नगरीं सर्वां राज्ञ परिमलस्य वै । त्रिलक्षैश्च महावीर्यैः सार्द्धं तौ जग्मतुः पुरात् २४ माहिष्मत्यैः सप्तलक्षै सार्द्धं युद्धमभून्महत् । त्रिरात्रं दारुण घोर यमराष्ट्रविवर्द्धनम् २५ शिवस्य वरदानेन भ्रात्रोर्जातः पराजय. । अदृश्या तौ जम्बुको राजा लुण्ठयित्वा महावतीम् २६ वेश्यां लक्षारतिं तस्य त हत तं गज तथा । ग्रैवेयक तथा हारं मणिरत्नविभूषितम् २७ गृहीत्वा नगरीं सर्वां भस्मयित्वा गृहं ययौ । ये गुप्ता भूतले शूरास्ते शेषाश्च तदाऽभवन् २८ दुर्गेषु यानि रत्नानि तानि प्राप्य मुदा ययौ । लुण्ठिते नगरे तस्मिन्देवकीगर्भमुत्तमम् २९ कृष्णांशं सप्तमास्यं हि चादधद्देवताप्रिया । ज्ञात्वा कुलाधमं पुत्रं चामुण्डं देवकी सती ३० कल्पक्षेत्रं समागम्य कालिन्दीं तमरोपयत् । योजनान्ते गते तस्मिन्महीराजपुरोहितः ३१ सामन्तो नाम तं गृह्य श्वशुरालयमाययौ । जातस्तु दशमासान्ते रात्रौ बोधतमोवृते ३२ भाद्रकृष्णाष्टमीसौम्ये ब्राह्मनक्षत्रसंयुते । प्रादुरासीज्जगन्नाथो देवक्यां च महोत्तमः ३३ श्यामाङ्गः स च पद्माक्ष इन्द्रनीलमणिद्युतिः । विमानानां सहस्राणां प्रकाशः समजायत ३४ विस्मिता जननी तत्र दृष्ट्वा बालं तमद्भुतम् । नगरे च महाश्चर्यं जातं सर्वे समा-ययुः ३५ उदयः किमहो जातो देवानां सूर्यरूपकः । इत्याश्चर्ययुजां तेषां वागुवाचाशरीरिणी ३६ कृष्णांशो भूतले जातः सर्वानन्दप्रदायकः । स नाम्नोदयसिंहो हि सर्वशत्रुप्रकाशहा ३७ इत्या-

---

असता रूपण नावानें प्रसिद्ध असलेला शिखंडीचा अंश शूद्रस्त्रीच्या ठायीं उत्पन्न झाला २१. पुत्रासह मदालसेस घेऊन वत्सराज गुर्जरदेशीं गेला व तो त्याच दिवशीं तेथे पोंचला २२. पण वत्सराज आला असतां बाहुशाली व जितेंद्रिय जम्बुक आपल्या सात लक्ष सैन्यासह आला व त्यानें परिमलाच्या नगरास वेढा दिला. तेव्हा तीन लक्ष महावत्यासह ते युद्धाकरिता नगरातून बाहेर पडले व सात लक्ष माहिष्मत्यासह त्याचें मोठे युद्ध झालें. तें तीन दिवस चाललेलें युद्ध फारच घोर व यमाच्या राष्ट्राची वृद्धि करणारें होतें २३-२५. शिवाच्या वरदानामुळें त्या उभयता भ्रात्याचा पराजय झाला. तेव्हा जंबुक राजा त्या दोघास बाधून, महावतीनगरी लुटून २६, लक्षावतिनामक वेश्येस घेऊन, त्याचप्रमाणे जखमी झालेली हत्ती, गळ्यातील भूषण आणि रत्ने व मणि यानी अत्यंत भूषित असा हार घेऊन सर्व नगराच भस्म करून आपल्या गृहीं गेला. साराश, भूलोकी जे शूर त्यावेळी गुप्त राहिलेले होते तेच मात्र बाकी राहिले २७,२८. दुर्गामध्यें जीं रत्ने होती तीं प्राप्त झालीं असता तो आनदानें निघून गेला. ह्याप्रमाणें त्या नगराची लूट झाली असता देवकीचा उत्तम कृष्णाशरूप गर्भ सात महिन्याचा झाला व त्याचें त्या देवतास प्रिय असलेल्या स्त्रीने धारण केलें. पण चामुंड हा पुत्र कुलागार आहे असें जाणून ती साध्वी देवकी कल्पक्षेत्रामध्ये येऊन त्यास कालिंदींत सोडती झाली, पण तो पुत्र वहात एक योजन दूर गेला असता पृथ्वीराजाच्या सामंतनामक पुरोहिताने त्यास धरिलें व तो आपल्या श्वशुराच्या गृहीं गेला. असो; इकडे दहा महिने झाले असता अंधकारानें आवृत झालेल्या भाद्रपद कृष्णअष्टमीस रात्रीं बुधवारीं ब्राह्मनक्षत्रावर अति उत्तम जगन्नाथ देवकीच्या उदरीं उत्पन्न झाला २९–३३. त्याचें अंग श्यामवर्ण, नेत्र कमलासारखे व काति इंद्रनीलमण्यासारखी होती. हजारों विमानाचा प्रकाश पडला ३४. त्या अद्भुत बालकास पाहून त्याची माता विस्मित झाली. नगरा-मध्ये सर्वास चमत्कार वाटला व ते सर्व आले. ' कायहो हा सूर्यरूप देवाचाच उदय झाला कीं काय ! ' असें जों ते आश्चर्य करीत आहेत तोंच आकाशवाणी झाली ३५,३६. ' सर्वास आनंद देणारा कृष्णाश भूलोकीं उत्पन्न झाला आहे. सर्व शत्रूंचा प्रकाश नष्ट करणाऱ्या ह्या

काशवचः श्रुत्वा ते परं हर्षमाययुः । यस्मिन्काले सुतो जातस्तदा च मलना सती ३८ श्यामाङ्गं सुन्दरं बालं सर्वलक्षणलक्षितम् । सुषुवे परमोदारं फाल्गुनांशं शिवाज्ञया ३९ तदा तु नगरी सर्वा हर्षभूता बभूव ह । षष्ठाहनि सुते जाते ब्रह्मानन्दगुणाकरे ४० ब्राह्मी तु सुषुवे पुत्रं पार्वतांश महाबलम् । श्यामाङ्ग कमलाक्षं च दृढस्कन्ध महाभुजम् ४१ ब्राह्मणाश्च तदागत्य जातकर्म प्रकारयन् । सुखखानिर्दिजैर्नाम्ना कृतस्तु गणकोत्तमैः ४२ क्रमेण वर्द्धिता बालाः सर्वलोकशिवङ्कराः । तेषां काली महच्छ्रेष्ठा पितृमातृप्रियङ्करी ४३ तृतीयब्दे वयःप्राप्ते कृष्णांशे बलवत्तरे । शक्रस्तदर्शनाकाङ्क्षी हयारूढो जगाम ह ४४ क्रीडन्तं चन्दनारण्ये कृष्णांशो भ्रातृभिः सह । नभस्थं पुरुष दृष्ट्वा सहस्राक्षं जहास वै ४५ अश्विनी हरिणी दिव्या उच्चैःश्रवसमन्तिके । गत्वा गर्भमुपादाय स्वगेहं पुनराययौ ४६ वर्षान्तरे च सुषुवे कपोतं तनयं शुभम् । पञ्चाब्दे च समायाते विद्याध्ययनमास्थितः ४७ ब्राह्मणं शिवशर्माणं सर्वविद्याविशारदम् । स्वभक्त्या सेवनं कृत्वा ते चक्रुर्वेदपाठिकाम् ४८ अष्टाब्दे चैव कृष्णांशो नामपत्रादिकां क्रियाम् । लिखतां बालकानां च कृष्णांशः श्रेष्ठतामगात् ४९ [१८६५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये कृष्णांशावतारो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

सूत उवाच ॥ नवमाब्दे वयःप्राप्ते कृष्णांशो बलवत्तरः । पठित्वान्वीक्षिकीं विद्यां चतुःषष्टिकलास्तथा १ धर्मशास्त्रे तथैवाप सर्वश्रेष्ठो बभूव ह । तस्मिन्काले भृगुश्रेष्ठ महीराजो नृपोत्तमः २ करार्थं प्रेषयामास स्वसैन्य च महावतीम् । ते वै लक्षं महाशूराः सर्वशस्त्रास्त्रधारिणः ३

देवाचे नाव उदयसिंह असे आहे.' अशी वाणी ऐकून ते परम हर्षाप्रत प्राप्त झाले. ज्यावेळीं हा बालक झाला त्याच वेळीं साध्वी मलना ज्याचें अंग श्यामवर्ण आहे व जो सर्व लक्षणांनीं युक्त आहे अशा परम उदार फाल्गुनाशरूप सुंदर बालकास जन्म देती झाली. हा बालक शिवाज्ञेने निर्माण झाला होता ३७-३९. त्यावेळीं सर्व नगरी हर्षयुक्त झाली. हा गुणसागर ब्रह्मानन्द बालक सहा दिवसाचा झाला असता ४० ब्राह्मीस पुत्र झाला तो पार्वताचा अंश होता. ज्याचे अंग श्यामवर्ण आहे, नेत्र कमलासारखे आहेत, स्कंध दृढ आहेत व भुजा मोठ्या आहेत असा तो पुत्र महाबलवान् होता. त्यावेळीं ब्राह्मणांनीं येऊन त्याचें जातकर्म केले. उत्तम ज्योतिषी ब्राह्मणांनी त्याचें सुखखानि असे नाव ठेविलें ४१,४२. असो. सर्व लोकास सुख देणारे असे बालक क्रमाने वाढले. अतिश्रेष्ठ काली त्याच्या आईबापाचे प्रिय करणारी होती. अतिशय बलवान् कृष्णाश तीन वर्षांच्या वयाचा झाला असतां त्याच्या दर्शनाची इच्छा करणारा इंद्र घोड्यावर बसून आला ४३,४४. तेव्हा चंदनाच्या अरण्यामध्ये भ्रात्यांसह खेळणारा कृष्णाश आकाशस्थ हजार डोळ्याच्या पुरुषास पाहून हंसला ४५. तेव्हा अश्विनीनामक दिव्य हरिणी उच्चैःश्रवसाजवळ जाऊन गर्भधारणा करून घेऊन पुनरपि आपल्या गृहीं परत आली ४६. वर्षाच्या शेवटी तिला कपोतनामक शुभ पुत्र झाला. असो; या मुलास पांचवें वर्ष लागलें असतां ते विद्याभ्यास करू लागले ४७. सर्व विद्यांमध्यें प्रवीण असलेल्या शिवशर्मानामक ब्राह्मणाचे भक्तिपूर्वक सेवन करून ते वेदपाठ करूं लागले ४८. आठवें वर्ष लागले असता कृष्णाश नाम, पत्रें इत्यादिक क्रिया करण्यास शिकणाऱ्या मुलांमध्यें श्रेष्ठ झाला ४९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥

सूत ह्मणतातः— नववें वर्ष लागले असता अतिशय बलवान् कृष्णाश तर्कविद्या शिकून व त्याचप्रमाणें चवसष्ट कला अधिगत करून घेऊन १ धर्मशास्त्रामध्येही पारंगत झाला

ऊचुः परिमलं भूपं शृणु चन्द्रकुलोद्भव । सर्वे च भारते वर्षे ये राजानो महाबलाः ४ षडंशं करमादायास्मद्राजाय ददन्ति वै । भवान्करे हि तस्यैव योग्यो भवति सांप्रतम् ५ अद्यप्रभृति चेद्राज्ञे तस्मै दद्यात्करं न हि । महीराजस्य रौद्रास्त्रैः क्षय यास्यति सैनिकैः ६ ये भूपा जयचन्द्रस्य पक्षगास्ते हि तद्भयात् । ददन्ति भूमिराजाय दण्डं तन्मानसत्कृताः ७ इति श्रुत्वा स नृपस्तिस्तस्मै राज्ञे महात्मने । कर षडंशमादाय ददौ प्रीतिसमन्वितः ८ दशलक्षमितं द्रव्यं गृहीत्वा ते समाययुः । महीराजः प्रसन्नात्मा पूर्ववैरमपाहरत् ९ तदा ते लक्षशूराश्च कान्यकुब्जमुपाययुः । जयचन्द्रं तु तत्रोचुः शृणु लक्षण कोविद १० पृथ्वीराजो महाराजो दण्डं त्वत्तः समिच्छति । इत्युक्तस्तैर्वैष्णवास्त्री लक्षणस्तानुवाच ह ११ मदेशे मण्डलीकाश्च बहवः सन्ति सांप्रतम् । भूमिराजो माण्डलिको मयि जीवति मा भवेत् १२ इत्युक्त्वा वैष्णवास्त्रं तान्क्रुद्धः स च समादधत् । तदस्त्रज्वालतः सर्वे भयभीताः प्रदुद्रुवुः १३ महीराजस्तु तच्छ्रुत्वा महद्भयमुपागमत् । दशाब्दे च वयःप्राप्ते कृष्णांशो मल्लकोविदे १४ नानामल्लाः समाजग्मुस्तेन राज्ञैव सत्कृताः । तेषां मध्ये स कृष्णांशो बाहुशाली बभूव ह १५ उर्वीपाधिपतेः पुत्र षोडशाब्दवयो बली । शतमल्लैश्च सहितः कदाचित्स समागत १६ पितृष्वसृपतिं भूपं नत्वा नाम्नाऽभयो बली । उवाच शृणु भूपाल कृष्णोऽयं मदमत्तवत् १७ तेन सार्द्धं भवेन्मल्लयुद्धं मम नृपोत्तम । इति वज्रसमं वाक्य श्रुत्वा राजा भयातुर १८ उवाच शालकं प्रेम्णा भवान्युद्धविशारदः । अष्टाब्दोऽयं सुतः स्त्रिरधा मम प्राणसमो भुवि १९

व त्या सर्वांमध्यें श्रेष्ठ झाला. बा भृगुश्रेष्ठा, त्यावेळीं नृपोत्तम पृथ्वीराज २ कराकरिता आपले सैन्य महाबलीस पाठविता झाला. त्या सैन्यामध्ये सर्व शस्त्रास्त्रें धारण करणारे एक लक्ष महाशूर होते ३. ते परिमल राजास ह्मणालेः--- हे चंद्रकुलोद्भवा, ऐक. भारतवर्षामध्यें जे सर्व महाबलवान् राजे आहेत ४ ते उत्पन्नाचा सहावा भाग कर ह्मणून आमच्या राजास देत असतात. तूंही साप्रतकालीं त्यास कर देण्यास योग्य आहेस ५. आता आजपासून जर तूं त्या राजास कर दिला नाहींस तर तूं पृथ्वीराजाच्या भयंकर अस्त्रांनीं सैन्यासह क्षय पावशील. जे जयचंद्राच्या पक्षाचे राजे आहेत तेही भीतीनें पृथ्वीराजास दंड देतात. व तोही त्यांचा मानपूर्वक सत्कार करितो ६,७. हें ऐकून तो राजा त्या महान्म्या पृथ्वीराजास षडंश कर घेऊन मोठ्या प्रीतीनें देता झाला ८. ते दहा लक्ष द्रव्य घेऊन आले आहेत असे पाहून पृथ्वीराजाचें अंत करण प्रसन्न झालें. व त्यानें पूर्वीचें वैर सोडून दिलें ९. त्यानंतर ते लक्ष शूर कान्यकुब्जदेशामध्यें गेले व जयचंद्रास नमस्कार करून ह्मणाले " बा ज्ञानी लक्षणराजा, ऐक १०. महाराज पृथ्वीराज तुझ्यापासून दंडाची इच्छा करीत आहे ". ते त्यास असें बोलले असता तो लक्षण त्यास ह्मणतो ११ ' साप्रतकालीं माझ्या देशांत माडलिक राजे पुष्कळ आहेत. मी जीवत असताना पृथ्वीराजा माडलिक न होवो ' १२. असें बोलून रागावलेला तो लक्षण वैष्णवास्त्र धारण करिता झाला. तेव्हा त्या अस्त्राच्या ज्वालानीं ते सर्व भयभीत होऊन पळून गेले १३. पण पृथ्वीराज ते ऐकून भयभीत झाला. मल्लविद्येमध्ये निष्णात असलेल्या कृष्णांशास दहावे वर्ष लागलें असता १४ अनेक मल्ल आले व त्या राजानें त्यांचा सत्कार केला. त्या सर्वांमध्यें तो कृष्णांश बाहुशाली झाला. उर्वीप राजाचा सोळा वर्षाचा बलवान् पुत्र एकदा शंभर मल्लांसह आला १५,१६. तो अभयनामक बलवान् राजपुत्र आतेचा पति असा जो हा राजा त्यास नमस्कार करून ह्मणाला " राजा ऐक. हा कृष्ण मदोन्मत्त झाला आहे १७. यास्तव, बा उत्तम राजा, त्याच्यासह माझें मल्लयुद्ध व्हावें " हे वज्रासारिखें वाक्य ऐकून राजा भयभीत झाला १८ व आपल्या शालकास प्रेमानें ह्मणाला " प्रेमाने तूं युद्धामध्यें

क्व भवान्वज्रसदृशः क्व सुतोऽयं सुकोमल । अग्रेमल्लैर्मदीयैश्च सार्द्धं योग्यो भवान्रणे १० इति श्रुत्वा नृप रयालो महीपतिरिति स्मृतः । स तमाह रुषाविष्टो बालोऽयं बलवत्तरः ११ शृणु तत्कारणं भूप यथा ज्ञातो मया शिशुः । आगस्कृत महीराजं मत्वा स तिलकः सुतम् १२ पण्डितांश्च समाहूय मुहूर्तं पृष्टवान्मुदा । गणेशो नाम मतिमाञ्ज्योतिश्शास्त्रविशारदः १३ लक्षणं वचनं प्राह महीराज शृणुत्तमम् । शिवदत्तवरो राजन्कुबेर इव सांप्रतम् १४ कृष्णांशस्तस्य योग्योऽयं क्षुद्रराजसुतो वरः । नान्योऽस्ति भूतले राजन्सत्यं सत्यं ब्रवीम्यहम् १५ तच्छ्रुत्वा लक्षणो वीरः पूर्वं बर्हिष्मतीं प्रति । कल्पक्षेत्रं दक्षिणे च भूमिग्रामं तु पश्चिमे १६ उत्तरे नैमिषारण्यं स्वकीयं राष्ट्रमादधत् । अतः श्रेष्ठः कुमारोऽयं कान्यकुब्जे मया श्रुतः १७ नागोत्सवे च भूपाल पञ्चम्यां च नभस्सिते । दृश्यमात्रं कुमाराङ्गं तस्माद्योग्यो ह्ययं सुतः १८ इति श्रुत्वा स कृष्णांशो वाक्छरेण प्रपीडितः । अभय भुजयोः शीघ्रं गृहीत्वा सोऽयुधद्बली १९ क्षणमात्रं रणं कृत्वा भूमिमध्ये तमक्षिपत् । अभयस्य भुजो भग्नस्तत्र जातो बलेन वै ३० मूर्च्छितं स्वसुतं ज्ञात्वा खड्गहस्तो महीपतिः । प्रेषयामास तान्मल्लान्कृष्णांशस्य प्रहारणे ३१ रुषाविष्टांश्च तान्ज्ञात्वा कृष्णांशो बलवत्तरः । तानेकैकं समाक्षिप्य विजयी स बभूव ह ३२ पराजिते मल्लबले खड्गहस्तो महीपतिः । मरणाय मतिं चक्रे कृष्णांशस्य प्रभावतः ३३ ज्ञात्वा तमीदृशं भूपं वारयामास भूपतिः । अभय नीरुजं कृत्वा प्रेम्णा गेहमवासयत् ३४ नवाब्दाङ्गं च कृष्णांशं

निपुण आहेस व हा पुत्र आठ वर्षांचा असून इहलोकीं मला प्राणासारिखा प्रिय आहे १९. वज्रासारिखा तूं कोठें व हा अतिकोमल पुत्र कोठे ? माझ्या दुसऱ्या मल्लांशीं रणामध्यें युद्ध करण्यास तूं योग्य आहेस " २०. हें ऐकून तो महीपतिनामक रयाल त्या राजास रागानें म्हणाला ' हा बालक अतिशय बलवान् आहे. याचें कारण ऐक. राजा, मीं या बालकास कसें जाणलें तें सागतों. ' इतक्यात हा महीराज अपराधी आहे असें मानून तो तिलक पुत्रास व पंडितास बोलावून आनंदानें मुहूर्त विचारिता झाला. त्या पंडितामध्यें गणेश म्हणून एक महाबुद्धिमान् व ज्योतिषशास्त्रनिपुण पंडित होता. तो लक्षणास असें उत्तम वचन बोलला ' बा राजा, यास शिवानें वर दिलेला आहे व त्यामुळेंच हा साप्रतकाळीं कुबेरासारिखा आहे. शिवाय हा कृष्णाचा अंश आहे. यास्तव, हा क्षुद्र देशराजाचा पुत्र त्याच्या योग्य आहे. हे राजा, याच्या बरोबरीचा भूतलीं दुसरा कोणी नाहीं हे मी सत्य सत्य सागतों. ' हे ऐकून पूर्वेस बर्हिष्मती, दक्षिणेंत कल्पक्षेत्र, पश्चिमेस भूमिग्राम व उत्तरेस नैमिषारण्य या सीमेच्या अनुरोधानें आपल्या राष्ट्राचें राज्य करणारा वीर लक्षण म्हणूनच कान्यकुब्जात हा बालक श्रेष्ठ आहे असें मीं ऐकिले आहे ' असें म्हणाला २१-२७. ' राजा, श्रावणशुद्ध पंचमीस नागोत्सवाचे वेळी या कुमारांचें अंग केवळ दिसण्यापुर्तेच आहे. यास्तव, हा पुत्र त्याच्या योग्य आहे. ' हें ऐकून तो बलवान् कृष्णाश शब्दशरानें अत्यंत पीडित होत्साता बाहूंमध्यें अभयास धरून लागलाच युद्ध करिता झाला २८,२९. केवळ एक क्षण युद्ध करून त्याने त्यास भूमीवर पाडलें. त्यामुळे त्याच्या बळाने अभयाचा हात तुटला ३०. आपला पुत्र मूर्च्छित झाला आहे; असे पाहून ज्याच्या हातात खड्ग आहे असा त्याचा पिता कृष्णाशास मारण्याकरिता मल्लास प्रेरणा करिता झाला ३१. ते सर्व कोपाविष्ट झाले आहेत असे पाहून बलाढ्य कृष्णांश त्यातील एकेकास पाडून विजयी झाला ३२. मल्लसैन्याचा पराजय झाला असतां ज्याच्या हातात खड्ग आहे असा राजा कृष्णाशाच्या प्रभावाने मरण्याचें मनात आणता झाला ३३. पण त्या राजाचा अशा प्रकारचा संकेत जाणून लक्षण राजाने त्याचे निवारण केले व

चाह्लादाद्याः कुमारकाः । मृगयार्थे दधुश्चित्तं तमूचुर्भूपतिं प्रियम् ३५ नमस्ते तात भूयाच्च सर्वानन्दप्रदायक । अस्मभ्यं त्वं हयान्देहि मत्प्रियान्करुणाकर ३६ इति श्रुत्वा वचस्तेषां तथेत्युक्त्वा महीपतिः । भूतलेवासिनोऽश्वान्वै दिव्यान्राजा चतुर्थकान् ३७ ददौ तेभ्यो मुदा युक्तो हरिणीगर्भसंभवान् । ऋषय ऊचुः॥ त्वन्मुखेन श्रुतं सूत हरिणी वडवा यथा ३८ भीष्मसिंहाय संप्राप्ता शक्रादेवेशतो मुने । इदानीं श्रोतुमिच्छामः कुतो जातास्तुरङ्गमाः ३९ दिव्याङ्गा भूषणाढ्या नभस्सलिलगामिनः । सूत उवाच ॥ देशराजेन भूपेन पुरा धर्मयुतेन वै ४० सेवनं भास्करस्यैव कृतं च द्वादशाब्दिकम् । सेवान्ते भगवान्सूर्यो वरं ब्रूहि तमब्रवीत् ४१ शाह देव नमस्तुभ्यं यदि देयो वरस्त्वया । हय दिव्यमयं देहि नभस्थलजलातिगम् ४२ तथेत्युक्त्वा रविः साक्षाद्दौ तस्मै पपीहकम् । लोकान्पाति पपीहोऽस्तस्मादेतं नाम चोत्तमम् ४३ अतः पपीहको नाम लोकपालनकर्मवान् । स हयो मदमत्तश्च हरिणीं दिव्यरूपिणीम् ४४ बुभुजे स्मरवेगेन तस्यां जातास्तुरङ्गमा । मनोरथश्च पीताङ्गः करालः कृष्णरूपकः ४५ एकगर्भे समुद्भूतौ शैव्यसुग्रीवकाविकौ । यस्मिन्दिने समुद्भूतौ जिष्णुविष्णुकलांशतः ४६ तदा जातौ हरिण्याश्च मेघपुष्पबलाहकौ । बिन्दुलश्च सुवर्णाङ्गः श्वेताङ्गो हरिनागरः ४७ दिव्याङ्गास्ते हि चत्वारः पूर्वं जाता महाबलाः । पश्चादशावतारांश्च जातास्तेषां महात्मनाम् ४८ इति ते कथितं विप्र शृणु तत्र कथां शुभाम् । भूतले ते हयाः सर्वे प्राप्ताश्चोपरि भूमिगा ४९ देवसिंहाय बलिने

अभ्यास बरें करवून त्यानें प्रेमानें त्यास आपल्या गृहीं ठेविलें ३४. कृष्णाश नऊ वर्षांचा झाला असता आल्हादादिक कुमार मृगयेविषयीं संकेत करिते झाले व त्यानीं त्या प्रिय राजास झटलें ३५ " सर्वास आनंद देणाऱ्या हे राजातील श्रेष्ठ पित्या, वा करुणाकरा, आह्मास प्रिय असे घोडे दे " ३६. हें त्यांचें वचन ऐकून ' ठीक आहे ' असें झणून तो राजा भूतलीं राहणारे पण हरिणीपासून झालेले दिव्य चार घोडे त्या चौघास आनदाने देता झाला. ऋषि झणतातः— वा मुने सूता, हरिणी वडवा देवाधिपति इंद्रापासून भीष्मसिहास कशी प्राप्त झाली हे आह्मीं तुझ्या मुखातून ऐकिलें. पण आता ज्यांचें अग दिव्य आहे, जे भूषणानीं संपन्न आहेत व जे अंतरिक्ष आणि उदक यातूनही जाणारे आहेत असे ते घोडे कोणापासून झाले हें ऐकण्याची मी इच्छा करितों. सूत झणतोः—पूर्वी धार्मिक देशराज राजानें भास्कराचें बारा वर्षे सेवन केलें. सेवेच्या अंतीं भगवान् सूर्य त्यास " वर माग " असे झणाला ३७–४१. तेव्हां तो झणतो ' वा देवा, तुला नमस्कार असो. मला जर वर द्यावयाचा असेल तर अतरिक्ष, भूमि व जल यातून जाणारा दिव्य अश्व मला दे'४२. तेव्हा ' बरें आहे ' असें झणून रवीने त्यास साक्षात् पपीहक घोडा दिला. लोकांचें जो रक्षण करितो तो पपी अस समजावे. त्याचे हे उत्तम नाम होय. तस्मात्, पपीहकनामक अश्व लोकपालनरूप कर्म करणारा होता. तो मदोन्मत्त अश्व दिव्यरूपी हरिणीचा मदाच्या वेगानें उपभोग घेता झाला. तेव्हा तिच्या ठायीं मनोरथ, पीताग, कराल व कृष्णरूपक असे चार घोडे झाले ४३-४५. शैव्य व सुग्रीव याचे अश एका गर्भामध्यें उत्पन्न झाले. ज्या दिवशीं विष्णु व जिष्णु (अर्जुन) याचे अश निर्माण झाले ४६ त्याच वेळीं हरिणीपासून मेघपुष्प व बलाहकही अंशतः निर्माण झाले. तात्पर्य, बिंदुल (ठिपक्याठिपक्याचा), सुवर्णाग, श्वेताग व हरिनागर असे ते दिव्यागाचे चारी महाबलवान् घोडे प्रथम झाले व नंतर त्या महात्म्याचे अवतार झाले ४७,४८. ह्याप्रमाणें हे ब्राह्मणानों, तुह्मास जे ऐकावयाचें होतें ते मीं सागितले. आता चाललेली शुभ कथा ऐका. असो. ते सर्व घोडे भूलोकीं प्राप्त झाले ४९. बलवान् देवसिंहास त्यानें मनोरथ नावाचा घोडा दिला. आल्हादास कराल,

ददौ चाश्वं मनोरथम् । आह्लादाय करालं च कृष्णांशायैव बिन्दुलम् ५० ब्रह्मानन्दाय पुत्राय ददौ हरिनागरम् । ते चत्वारो हयारूढा मृगयार्थं वनं ययुः ५१ हरिणीं वडवां शुभ्रां बलखानिः समारुहत् । तदनु ययौ वीरो वनं सिंहनिषेवितम् ५२ आह्लादश्चैव शार्दूलं हतः प्राणिभयङ्करः । देवसिंहेन सिंहश्च सूकरो बलखानिना ५३ ब्रह्मानन्देन हरिणो हतस्तत्र महावने । मृगाः शतं हतास्तैश्च तान्गृहीत्वा गृहं ययुः ५४ एतस्मिन्नन्तरे देवी शारदा च शुभानना । मृगी स्वर्णमयी भूत्वा तेषामग्रे प्रधावती ५५ दृष्ट्वा तां मोहिताः सर्वे स्वैर्बाणैस्ताडयन् । ते शराः सञ्चयं जग्मुर्मृग्यङ्गे बलवत्तराः ५६ आह्लादाद्याश्च ते शूरा विस्मिताश्च बभूविरे । तस्मिन्काले स कृष्णाङ्गो बाणनैव ह्यताडयत् ५७ तदा च पीडिता देवी भयभीता ययौ वनम् । कृष्णांशः क्रोधताम्राक्षस्तत्पश्चात्प्रययौ बली ५८ वनान्तरं च संप्राप्य देवीं धृत्वा स्वकं वपुः । तमुवाच प्रसन्नाक्षी परीक्षा ते मया कृता ५९ यदा ते च भयं भूयात्तदा त्वं मां सदा स्मर । साधयिष्यामि ते कार्यं कृष्णांशो हि भवान्विभुः ६० इत्युक्त्वाऽन्तर्हिता देवी शारदा सर्वमङ्गला । कृष्णांशस्तु ययौ गेहं तैश्च सार्द्धं मुदा युतः ६१ तदा पराक्रमं तेषां दृष्ट्वा राजा सुखोऽभवत् । गृहे गृहे च सर्वेषां लक्ष्मीर्देवी समाविशत् ६२ [१९२७] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये दशमोऽध्यायः ॥ १० ॥

सूत उवाच ॥ दशाब्दे च वयःप्राप्ते विष्णोः शक्त्यवतारके । वसन्तसमये रम्ये ययुस्ते प्रमदावनम् १ ऊषुस्तत्र व्रताचारा माधवे कृष्णवल्लभे । स्नात्वा च सागरे प्रातः पूजयामासुरम्बि-

---

कृष्णाशास बिदुल व ब्रह्मानंदनामक पुत्रास तो हरिनागर देता झाला. नंतर ते चारी पुत्र घोड्यावर बसून मृगयेकरिता वनात गेले ९०,९१. शुभ्र हरिणी घोडीवर वीर बलखानि बसला व तोही त्याच्या मागोमाग जेथे सिंह राहत होते अशा वनास गेला ९२. आल्हादाने प्राण्यास भयकर असलेल्या एका शार्दूलास मारिले, देवसिंहानें सिंहास मारिले, बलखानीनें सूकरा (रानडुकरा) स मारिलें ९३; ब्रह्मानंदाने त्या महावनामध्यें हरिणास मारिले. त्यानी शेकडो पशु मारिले व त्यास घेऊन ते घरीं निघाले ९४. इतक्यात शुभानना शारदा देवी सुवर्णमयी हरिणी होऊन त्याच्यापुढें धावूं लागली ९५. तेव्हा तिला पाहून सर्व मोहित झाले व त्यानी तिला आपापल्या बाणानीं ताडन केले. पण ते अधिक बलवान् बाण त्या मृगीच्या अगांत गुप्त झाले ९६. तेव्हा ते आल्हादादिक शूर विस्मित झाले. नतर त्यावेळीं तो कृष्णाश तिला बाणानेंच ताडन करिता झाला ९७. तेव्हा पीडित झालेली देवी भयभीत होऊन वनात शिरली. ते पाहून ज्याचे नेत्र क्रोधाने लाल झाले आहेत असा तो बलवान् कृष्णाशही तिच्या मागून गेला ९८. वनात गेल्यावर ती देवी आपले रूप घेऊन जिचे नेत्र प्रसन्न आहेत अशी ती त्यास ह्मणाली ' मीं तुझी परीक्षा पाहिली ९९. जेव्हा तुला भय उत्पन्न होईल तेव्हा तूं माझें स्मरण कर. ह्मणजे मी तुझे कार्य सिद्ध करून देईन. कारण, कृष्णाशच महाप्रभु आहे ' १००. असे बोलून सर्वमंगला शारदा देवी गुप्त झाली. नंतर कृष्णाश त्याच्यासहवर्तमान आनंदानें गृही गेला. तेव्हा त्याचा पराक्रम पाहून राजा आनंदित झाला. व सर्वांच्या घरोघर लक्ष्मी देवी प्रविष्ट झाली १०१,१०२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥

सूत ह्मणतातः— विष्णुच्या शक्तीच्या अवतारास दहावे वर्ष लागलें असता वसंतसमयीं ते रम्य प्रमदावनात गेले. कृष्णास प्रिय असलेल्या वसंतऋतूंत ते तेथें व्रताचरण करीत राहिले. समुद्रामध्यें प्रातःकालीं स्नान करून त्यानीं अंबिकेचे पूजन, त्या ऋतूमध्यें उत्पन्न झालेली पुष्पे, धूप, दीप

काम् २ ऋतुकालोद्भवैः पुष्पैर्धूपैर्दीपैर्विधानतः ॥ जप्त्वा सप्तशतीस्तोत्रं दध्युः शर्वकरीं शिवाम् ३ कन्दमूलफलाहारा जीवहिंसाविवर्जिताः । तेषां भक्तिं समालोक्य मासान्ते जगदम्बिका ४ ददौ तेभ्यो वरं रम्यं तच्छृणुध्वं समाहिताः । आह्लादाय सुरार्त्तं च बलत्वं बलखानये ५ कालज्ञत्वं च देवाय ब्रह्मज्ञत्वं नृपाय च । कृष्णांशायैव योगत्वं दत्त्वा चान्तरधीयत ६ कृतकृत्यास्ततश्च ते वै स्वगेहं पुनराययुः । तेषां प्राप्ते वरे रम्ये मलना पुत्रमूर्जितम् ७ श्यामाङ्गं सात्यकेरंशं सुषुवे शुभलक्षणम् । स ज्ञेयो रणजिच्छूरो राजन्यप्रियकारकः ८ आषाढे मासि संप्राप्ते कृष्णांशो हयवाहनः । उर्वीयां नगरीं प्राप्त एकाकी निर्भयो बली ९ दृष्ट्वा स नगरीं रम्यां चतुर्वर्णनिषेवितां । द्विजशालां ययौ शूरो द्विजधेनुमपूजकः १० दत्त्वा स्वर्णं द्विजातिभ्यः संतर्प्य द्विजदेवताः । महीपतिगृहं रम्यं जगाम बलवत्तरः ११ नत्वा स मातुलं धीमांस्तथाऽन्यांश्च समासदः १२ तदा नृपाज्ञया शूरा बन्धनाय समुद्यताः । खड्गहस्ताः समाजग्मुर्यथा सिंहं गजाः शशाः १३ मोहितं तं नृपः कृत्वा दुष्टबुद्धिर्महीपतिः । कृत्वा लोहमयं जालं तस्योपरि समादधुः १४ एतस्मिन्नन्तरे वीरो बोधितो देवमायया । आगस्कृतान्निपून्ज्ञात्वा खड्गहस्तः समाहनत् १५ हत्वा पञ्चशतं शूरं हयारूढो महाबली । उर्वीयां नगरीं प्राप्य जलपानं मनो दधौ १६ कूपे दृष्ट्वा शुभा नार्यो घटपूर्तिकरास्तदा । उवाच मधुरं वाक्यं देहि सुन्दरि मे जलम् १७ दृष्ट्वा ताः सुन्दरं रूपं मोहनायोपचक्रिरे । भित्त्वा तासां तु वै कुम्भान्याययित्वा हयं जलम् १८ वन गत्वा रिपुं जित्वा बद्ध्वा

इत्यादिकाम्या योगानें यथाविधि केले. सप्तशतीस्तोत्राचा जप करून कल्याण करणाऱ्या शिवेचें त्यानीं ध्यान केलें १–३. ते कंद, मूलें व फलें याचा आहार करून व जीवहिंसा सोडून राहिले. एक महिन्याच्या अंतीं जगदंबिका त्याची भक्ति पाहून त्यास रम्य वर देती झाली. तो तुम्ही सावधान होऊन ऐका. आल्हादास देवत्व, बलखानीस बलत्व ४, ५, देवसिंहास कालज्ञत्व, राजास ब्रह्मज्ञत्व व कृष्णांशास योगत्व देऊन ती गुप्त झाली ६. तेव्हा ते कृतकृत्य होऊन आपल्या गृहीं पुनरपि आले. त्यास रम्य वर प्राप्त झाला असता मलना ज्याचें अंग श्यामवर्ण आहे व लक्षण शुभ आहे अशा सात्यकीच्या अंशरूप उत्तम पुत्रास प्रसविती झाली. तो रणवेत्ता, शूर व क्षत्रियांचें प्रिय करणारा होता असें जाणावें. आषाढमास प्राप्त झाला असता ज्याचें घोडा हें वाहन आहे असा बलाढ्य व निर्भय कृष्णांश उर्वीयानगरीस एकटाच आला ७–९. चारी वर्णांचे लोक जिच्यामध्यें रहात आहेत अशा त्या नगरीस पाहून तो गोब्राह्मणाची पूजा करणारा शूर ब्राह्मणशालेमध्यें गेला १०. ब्राह्मणास द्रव्य देऊन व त्या ब्राह्मणरूपी देवतास संतुष्ट करून तो अधिक बलवान् महीपतीच्या रम्य गृहीं गेला. तो बुद्धिमान् मातुलास व त्याचप्रमाणें अन्य सभासदास नमस्कार करून उभा राहिला. तेव्हा राजाच्या आज्ञेनें शूर त्यास बांधण्यास तयार झाले. म्हणजे सिंहाच्या अंगावर जसे हत्ती व ससे जावे तसे ते हातात खड्ग घेऊन त्याच्यावर चालून गेले. दुष्टबुद्धि महीपति राजानें त्यास मोहित केलें व लोहमय जाळें करून त्यात त्यास ठेविलें. पण इतक्यात देवमायेनें त्या वीरास सावध केलें व शत्रूंनीं अपराध केला आहे असें जाणून व हातांत खड्ग घेऊन अश्वारूढ झालेला तो बलवान् पाचशें शूरास मारिता झाला. नंतर उर्वीयानगरीमध्यें येऊन त्याने जलपान करण्याचें मनात आणिलें. पण विहिरीमध्यें सुंदर नारी घागरी भरीत आहेत असें पाहून तो त्यास "अहो सुंदर स्त्रियांनों, मला जल द्या" असें सुंदर वचन बोलला ११–१७. तेव्हा त्याच्या सुंदर रूपास पाहून त्या त्यास मोहित करण्यास तयार झाल्या. पण त्याच्या घागरी फोडून व घोड्यास पाणी पाजवून तो वनात

तमभय कली। चण्डिकापार्श्वमागम्य तदुधाय मनो दधे १९ श्रुत्वा सकरुणं वाक्यं त्यक्त्वा. स्वनगरं ययौ। नृपान्तिकमुपागम्य ,वर्णयामास. कारणम् २० श्रुत्वा परिमलो राजा द्विजा; तिभ्यो ददौ धनम्। समाघ्राय स कृष्णांशं कृतकृत्योऽभवत्कृपः २१ सप्राप्तैकादशाब्दे तु कृष्णांशे युद्धदुर्मदे। महीपतिर्निरुत्साह: प्रययौ देहलीं प्रति २२ बलिं यथोचित दत्त्वा भगिन्यै भयकातरः। रुरोद बहुधा दुःख देशराजात्मजपजम् २३ अगमा भगिनी तस्य दृष्ट्वा भ्रातरमातुरम्। स्वपतिं वर्णयामास श्रुत्वा राजाऽब्रवीदिदम् २४ अद्याहं स्वबलै सार्द्धं गत्वा तत्र महावतीम्। हनिष्यामि महादुष्ट देशराजसुत रिपुम् २५ इत्युक्त्वा धुन्धुकारं च समाहूय महाबलम्। सैन्यमाज्ञापयामास सप्तलक्षं तनूरुहम् २६ केचिच्छूरा हयारूढा उष्ट्रारूढा महाबला। गजारूढा रथारूढा संययुश्च पदातयः २७ देवसिंहस्तु कालज्ञः श्रुत्वा चागमनं रिपोः। नृपपार्श्वं समागम्य सर्वं राज्ञे न्यवेदयत् २८ श्रुत्वा परिमलो राजा विह्वलोऽभूद्भयातुरः। बलखानिस्तमुत्थाय हर्षयुक्त इवाह च २९ अद्याहं च महीराजं धुन्धुकारं ससैन्यकम्। जित्वा दण्डञ्च भवतश्च करिष्यामि तवाज्ञया ३० इत्युक्त्वा त नमस्कृत्य सेनापतिरभून्मुने। तदा तु निर्भया वीरा दृष्ट्वा राजानमातुरम् ३१ चतुर्लक्षबलैः सार्द्धं ते युद्धाय समाययुः। शिशपारव्यं वन घोरं छेदयित्वा रिपोस्तदा ३२ ऊचुस्तत्र रण मत्ताः सर्वशत्रुभयङ्कराः। एतस्मिन्नन्तरे तत्र धुन्धुकारादयो बलाः ३३ कृत्वा कोलाहल शब्दं युद्धाय समुपाययुः। पूर्वाह्णे तु भृगुश्रेष्ठ सन्नद्धास्ते शतघ्नीपाः ३४ शतघ्नीभिस्त्रिसाहस्रै. पञ्चसाहस्रका ययुः। द्वि.

गेला व त्या अभय शत्रूस जिंकून तो बलवान् चंडिकेजवळ आला व त्यास मारण्याचें त्यानें मनात आणिलें १८,१९. पण त्याचें करुणायुक्त वचन ऐकून तो त्यास सोडून आपल्या गृहीं गेला. राजाजवळ जाऊन त्यानें हें सर्व सांगितलें २०. तें ऐकून परिमल राजा ब्राह्मणास धन देता झाला व कृष्णाशाचें मस्तक हुंगून तो राजा कृतकृत्य झाला २१. युद्धाविषयीं अतिमदोन्मत्त अशा त्या कृष्णांशास अकरावें वर्ष लागलें असता उत्साहरहित झालेला महीपति देहलीस गेला २२ व भयभीत झालेल्या त्यानें भगिनीस यथायोग्य भेट दिली; तो बहुत प्रकारें रडला व त्यानें देशराजाच्या पुत्रापासून झालेलें दुःख तिला सांगितलें. तेव्हा अगमानामक त्याची भगिनी भ्राता आतुर झाला आहे असें पाहून तें सर्व आपल्या पतीस सांगती झाली. तें ऐकून राजा असें म्हणाला.— आज मी आपल्या सैन्यासह त्या महावतीस जाऊन महादुष्ट व शत्रु असा जो देशराजाचा पुत्र त्यास मारीन २३-२५. असें सांगून व महाबलवान् धुंधुकारास बोलावून रणांत शरीरत्याग करणाऱ्या सात लक्ष सैन्यास तो आज्ञा करिता झाला २६. कांहीं महाबलवान् शूर अश्वावर आरूढ झाले, कांहीं उंटावर आरूढ झाले, कांहीं गजारूढ व रथारूढ झाले आणि बाकीचे पायांनें चालले २७. कालाचें ज्याला ज्ञान होतें असा देवसिंह शत्रूचें आगमन ऐकून राजाजवळ येऊन त्यास सर्व सांगता झाला २८. तें ऐकून परिमल राजा विह्वल व भयातुर झाला. तेव्हा बलखानि उठून जणु काय हर्षयुक्त होऊन त्यास म्हणाला २९ 'आज मी महीराजास व सैन्यासह धुंधुकारास जिंकून तुझ्या आज्ञेनें त्यास दंडास पात्र करीन' ३०. असें बोलून व त्यास नमस्कार करून, बा मुने, तो सेनापति झाला. तेव्हा निर्भय वीर राजा आतुर झाला आहे असें पाहून चार लक्ष सैन्यासह ते युद्धास निघाले. शत्रूचें शिंशपानामक घोर वन तोडून सर्व शत्रूंस भयंकर असे ते मत्त होत्साते त्या रणामध्यें राहिले. इतक्यांत तेथें धुंधुकारादिक बलवान् वीर मोठा कोलाहलशब्द करून युद्धास आले. बा भृगुश्रेष्ठा, पूर्वाह्णसमयीं शतघ्नींचे पालन करणारे असे ते पांच हजार वीर तयार होऊन तीन

हस्रशतघ्नीभिः सहिताश्चन्द्रवंशिनः ३५ सैन्यं षष्टिसहस्रं च स्वर्गलोकमुपाययौ । सदर्द्धं च तथा सैन्यं महीराजस्य सत्तिम ३६ दुद्रुवुर्भीरुकाः शूरा बलखानेर्दिशो दश । रथा रथै रणे हन्युर्गजाश्चैव गजैस्तथा ३७ हया हयैस्तथा उष्ट्रा उष्ट्रैश्च समाहनन् । एवं तुमुले जाते दारुणे रोमहर्षणे ३८ हाहाभूतान्स्वकीयांश्च सैन्यान्दृष्ट्वा महाबलान् । अपराह्णे भृगुश्रेष्ठ पञ्च शूराः समाययुः ३९ ब्रह्मानन्दः शरैः शत्रूननयद्यमसादनम् । देवसिंहस्तथा भल्लैराह्लादस्तत्र तोमरैः ४० बलखानिः स्वखड्गेन कृष्णांशस्तु तथैव च । द्विलक्षान्क्षत्रियान्पञ्चजघ्नुः सर्वसैन्ये समन्ततः ४१ हतूवा पराजितं सैन्यं क्रुध्धकारी महाबल । आह्लादं च स्वभल्लेन गजारूढः समाहनत् ४२ आह्लादे मूर्च्छिते तत्र देवसिंहो महाबल । स्वभ्रातुर्भ्रातरं तस्य धरायामास वेगतः ४३ स तीक्ष्णव्रणभारेण गजस्थ स मुमोह वै । आगताः शतराजानो नानादेश्या महाबलाः ४४ शस्त्राण्यस्त्राणि तेषां तु छित्त्वा खड्गेन वत्सजः । स्वखड्गेन शिरांस्येषां पातयामास भूतले ४५ हते शत्रुसमूहे तु तच्छेषास्तु पदुद्रुवुः । महीराजस्तु बलवान्दृष्ट्वा भग्नं स्वसैन्यकम ४६ आजगाम गजारूढः शिवदत्तवरो बली । रौद्रेणास्त्रेण हृदये चाहनद्वत्सजं रिपुम् ४७ आह्लादं च तथा वीरं देव परिमलात्मजम् । मूर्च्छयित्वा महावीराञ्छत्रुसैन्यमुपागमत ४८ पूजयित्वा शतघ्नीश्च महाचण्डमकारयत् । रोपणस्त्वरितो गत्वा राज्ञे सर्वमवर्णयत् ४९ एतस्मिन्नन्तरे वीरः सुखखानिर्महाबलः कपोतं हयमारुह्य नभोमार्गेण चागमत् ५० मूर्च्छयित्वा महीराजं स्वबन्धूश्च सबाहनान् । कृत्वा नृपान्तमागम्य बन्धनाय समुद्यतः ५१ तदोत्थाय महीराजो महादेवेन बोधितः । पुनस्तान्स्वशरै

हजार शतघ्नी (तोफा) सह आले व चंद्रवंशी राजे दोन हजार शतघ्नींसह आले ३१-३५. याचे साठ हजार सैन्य स्वर्गलोकी गेले व महीराजाचे सैन्य त्याच्या अर्धे म्हणजे तीस हजार मरण पावले. व खानीचे शूर भयभीत होऊन दाही दिशास पळून गेले. तेव्हा रथी रथ्यास, गज गजास, घोडे घोड्यास व उंटावरील स्वार उंटावरील स्वारास मारिते झाले. ह्याप्रमाणे अगावर काटा उभा करणारे भयंकर व तुमुल युद्ध झालें असता आपल्या महाबलाढ्य सैन्यात हाहाकार झाला आहे असे पाहून, वा भृगुश्रेष्ठा, अपराण्हकाली ते पाच शूर पुढे आले ३६-३९. ब्रह्मानन्द बाणाच्या योगाने शत्रूंस यमसदनी धाडता झाला. त्याचप्रमाणे देवसिंह भल्लाच्या योगानें, आल्हाद तोमराच्या योगानें, बलखानि आपल्या खड्गाने व त्याचप्रमाणे कृष्णांश आपल्या शस्त्राने, सर्व सैन्याच्या योगानें परिवेष्टित होत्साते दोन लक्ष क्षत्रियास मारिते झाले ४०, ४१. आपल्या सैन्याचा पराजय झाला आहे असें पाहून महाबलवान् क्रुधुकार गजारूढ होऊन आपल्या भल्लाने आल्हादास ताडन करिता झाला ४२. पण आल्हाद मूर्च्छित झाला असता महाबलवान् देवसिंह आपल्या बाणानें त्याच्या भ्रात्यास वेगाने वेध करिता झाला ४३. त्यामुळें त्यास तीक्ष्ण व्रण होऊन तो गजावरच मोहित झाला. तेव्हा अनेक देशातील महाबलवान् शंभर राजे आले. पण वत्सपुत्र त्यांची शस्त्रास्त्रें तोडून आपल्या खड्गाने त्यांची शिरे भूमीवर पाडता झाला ४४, ४५. तात्पर्य, शत्रूचा बराच समुदाय मृत झाला असता राहिलेले वीर पळून गेले. तेव्हा बलवान् महीराज आपलें सैन्य भग्न झालें आहे असें पाहून ज्या बलवानास शिवानें वर दिला आहे असा तो पुढें आला व शत्रु जो वत्सपुत्र त्यास हृदयाचे ठायीं रुद्रास्त्रानें प्रहार करिता झाला ४६,४७. त्याचप्रमाणें आल्हाद व परिमलपुत्र देवसिंह यास व दुसऱ्याही महावीरास मूर्च्छित करून तो शत्रुसैन्यात शिरला ४८ व शतघ्नींची पूजा करून त्यानें अनेक वीराचा वध केला. तेव्हा रोपण त्वरेनें जाऊन राजास सर्व सांगता झाला ४९. इतक्यात महाबलाढ्य वीर सुखखानि कपोतनामक अश्वावर बसून आकाशमार्गानें आला ५० व महीराजास मूर्च्छित करून, आपल्या बांधवास

रौद्रैर्मर्मच्छिदाभालैः कोपवान् ५१ सुखखान्यादिकाञ्छूरान्सबध्य निगडैर्दृढैः । नृपं परिमलं प्राप्य पुनर्युद्धमथोऽकरत् ५२ हाहाभूतं स्वसैन्यं च दृष्ट्वा स उदयो हरिः । नभोमार्गे हयं कृत्वा ताः शतशरनाशयत् ५४ महीराजगजं प्राप्य बद्ध्वा त निगडैर्बली । आह्लादपार्श्वमागम्य भ्रात्रे भूपं समर्पयत् ५५ तदा तु पृथिवीराजो लज्जितस्तेन निर्जितः । पञ्चकोटिधनं दत्त्वा स्वगेहं पुनरायथौ ५६ देवसिंहाज्ञया शूरो वत्सजः स्वकुलैः सह । तैर्द्रव्यैर्नगरीं रम्यां कारयामास सुन्दरीम् ५७ संश्रियाख्यं पुरं नाम तेन वीरेण वै कृतम् । सर्ववर्णसमायुक्तं द्विक्रोशायाममस्मितम् ५८ तत्रैव न्यवसद्वीरो वत्सजः स्वकुलैः सह । विंशत्कोशो कृतो राष्ट्रं तत्रैव बलखानिना ५९ श्रुत्वा परिमलो राजा तत्रागत्य मुदान्वितः । आघ्राय वत्सजं शूरं देशराजसुतं तथा ६० ब्रह्मानन्देन सहितः स्वगेहं पुनरायथौ ६१ [१९८८] इति भविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

सूत उवाच ॥ द्वादशाब्दे हि कृष्णांशे यथा जातं तथा शृणु । दशम्यां शुक्लपक्षस्य राज्ञां जातं समागमः १ काम्यकुब्जे महारम्ये नानाभूपाः समाययुः । श्रुत्वा पराजयं राज्ञो महीराजस्य लक्षणः २ कृष्णांशदर्शने वाञ्छा तस्य चासीत्तदा मुने । पितरं भूपतिं प्राह द्रष्टुं यास्यामि तं शुभम् ३ जितो येन महीराजः सर्वलोकपपूजकः । इति श्रुत्वा वचस्तस्य जयचन्द्रो महीपतिः ४ भ्रातृजं प्रणतं प्राह शृणु शुक्लपशस्कर ॥ राजरा पद तं हि कथं सहर्तुमिच्छसि ५ इत्युक्त्वा

वाहनावर बसवून राजाजवळ येऊन तो त्यास बाधण्यास तयार झाला ५१, तेव्हा शौकराने ज्यास सावध केलें आहे असा महीराज उठला व पुनरपि कोपयुक्त झालेला तो राजा त्यास आपल्या भयंकर बाणांनी मूर्छित करिता झाला ५२, नंतर सुखखानि इत्यादि वीरास शृंखलांनी बाधून राजा परिमलाजवळ येऊन पुनरपि लढूं लागला. तेव्हा सैन्यामध्ये हाहाकार उडाला आहे असे पाहून तो हरीचा उदय आकाशमार्गामध्ये घोडयास नेऊन त्या शतघ्नींचा नाश करिता झाला ५३,५४. महीराजाच्या हत्तीजवळ येऊन त्यास शृंखलांनी बाधून आल्हादाजवळ येऊन त्या बलवानानें त्या भाऱ्यास राजाच्या स्वाधीन केले ५५. तेव्हा त्याच्याकडून पूर्णपणे पराभूत झालेला पृथ्वीराज लज्जित होत्साता त्यास पाच कोटि धन देऊन आपल्या गृहीं परत आला ५६. देवासिंहाच्या आज्ञेने वत्सपुत्र बलखानि त्या द्रव्याच्या योगानें रम्य व सुंदर नगरी करविता झाला ५७. त्या वीराने तिचें नाव संश्रियाख्यपुर असें ठेविले. तें नगर सर्व वर्णाच्या लोकांनी युक्त व दोन कोश विस्तीर्ण होतें ५८. वत्सपुत्र आपल्या कुलासह तेथेच राहिला. व तेथेंच बलखानीनें तीस कोशामध्ये राष्ट्र केलें ५९. तें ऐकून परिमल राजा आनंदानें युक्त होत्साता तेथें आला व त्याच्या आणि तसेच देशराजपुत्राच्या मस्तकांचे आघ्राण करून ब्रह्मानंदासह पुनरपि आपल्या गृहीं गेला ६०,६१. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥

सूत ह्मणतातः-कृष्णाश बारा वर्षाचा झाला असतां काय झालें तें ऐका. आश्विन शुक्ल दशमीस राजाचा समागम झाला १. महारम्य काम्यकुब्जदेशामध्ये अनेक राजे आले. राजा महीराजाचा पराजय झाल्याचें ऐकून लक्षणास कृष्णाशाच्या दर्शनाविषयी इच्छा झाली. तेव्हा, हा मुने, तो आपल्या पितृव्यास ह्मणजे राजास ह्मणाला " ज्या लोकास अत्यंत पूज्य असलेल्या पृथ्वीराजास ज्याने जिंकलें त्या शुभ पुरुषास पाहण्याकरिता मी जातों " हें त्याचें वचन ऐकून राजा जयचंद्र २-४ नम्र भ्रातृपुत्रास ह्मणाला " हा शुभ्र यश करणाऱ्या, ऐक. तू राजपृथिराजाचे स्थान हरण करण्याची कशी इच्छा

जयचन्द्रस्तु तदानीं नैव दत्तवान् । राजानस्ते च सहिताः स्वसैन्यैः परिवारिताः ६ कृष्णांशं द्रष्टुमिच्छन्तः सयुश्च महीपतिम् । संश्रियाख्यपुरस्थं च ज्ञात्वा कृष्णांशमुत्तमम् ७ महीपतिं पुरस्कृत्य समाजग्मुर्नृपास्तदा । दृष्ट्वा तं महात्मानं पुण्डरीकनिभाननम् ८ प्रसन्नवदनाः सर्वे प्रशशंसुः समन्ततः । तदा महीपतिः क्रुद्धो वचनं प्राह भूपतीन् ९ यस्येयं च कृता श्लाघा पुष्पाभिर्दूरवासिभिः । पितरौ तस्य बलिनौ माहिष्मत्यां मृतौ मृधे १० जम्बुको नाम भूपालो नार्मदीयैः समन्वितः । बद्ध्वा तौ प्रययौ गेहं लुण्ठयित्वा धनं बहु ११ शिलापट्टे समारोप्य तयोर्गात्रमचूर्णयत् । शिरसी च तयोश्छित्त्वा वटवृक्षे समारुहत् १२ अद्यापि तौ स्थितौ वीरौ हा पुत्रेति प्रभाषिणौ । प्रेतदेहे च पितरौ यस्य प्राप्तौ महाबलौ १३ तस्यादयो वृथा ज्ञेयो वृथा कीर्तिः प्रियङ्करी । इति श्रुत्वा स कृष्णांशो भूपतीन्प्राह नम्रधीः १४ मृतौ मत्पितरौ सार्धं गुर्जरे यत्र वै रणे । म्लेच्छैर्नराधमैः सार्धं तद्भूपेन रणोऽभवत् १५ देशराजो वत्सराजो युद्धं कृत्वा भयङ्करम् । म्लेच्छैस्तैश्च हतौ तत्र श्रुतेयं विश्रुता कथा १६ मातुलेनाथ कथितं नवीनं मरणं तयोः । चेत्सत्यं वचनं तस्य पश्यध्वं मम पौरुषम् १७ हत्वा तान्स कृष्णांशो मातरं प्राह सत्वरम् । हेतुं च वर्णयामास भाषितं च महीपतेः १८ श्रुत्वा वज्रसमं वाक्यं रुरोद जननी तदा । नोत्तरं ददौ माता पतिदुःखेन दुःखिता १९ ज्ञात्वा पितृवधं श्रुत्वा जम्बुकं शिवकिङ्करम् । मनसा स च कृष्णांशस्तुष्टाव परमेश्वरीम् २० जय जय जय जगदम्ब भवानि अखिललोकसुरपितृमुनिखानि । त्वया तत सचराचरमेव विश्व पातमिद

करीत आहेस ? " असें बोलून जयचंद्रानें त्यास आज्ञा दिली नाहीं. तेव्हा दुसरे पुष्कळ राजे आपल्या सैन्यानीं परिवारित होत्साते कृष्णाशास पाहण्याची इच्छा करून महीपतीकडे आले. उत्तम कृष्णाश संश्रियाख्य नगरामध्यें आहे असें जाणून ९-७ व राजास पुढें घालून ते राजे तात्काल तेथें आले. त्यानीं ज्याचें मुख पुंडरीककमलाप्रमाणें आहे अशा त्या महात्म्यास पाहिलें. व त्यामुळें ज्याचीं मुखें प्रसन्न झालीं आहेत असे ते सर्व चोहोकडून त्याची प्रशंसा करूं लागले. तेव्हा क्रुद्ध झालेला महीपति राजास म्हणाला " दूर रहाणाऱ्या तुम्ही ज्याची ही स्तुति करीत आहा त्याचे बलाढ्य पितर माहिष्मतीमध्यें मरण पावले ८-१०. जंबुकनामक राजा नार्मदीय लोकांसह त्या दोघास बांधून त्याचें गृह लुटून पुष्कळ धन घेऊन गेला ११ व त्यास शिलापट्टावर चढवून त्यानें त्याच्या अंगाचे चूर्ण करून सोडिलें व त्याचीं मस्तकें तोडून त्यास वटवृक्षावर टाकून ठेविलें. ' हा पुत्र ! ' असें म्हणणारे ते अद्यापि तेथें आहेत. ज्याचे महाबलवान् पितर प्रेतयोनींत पडले आहेत त्याचा उदय व्यर्थ आहे असें समजावें व प्रिय करणारी त्याची कीर्तीही व्यर्थ होय." तें ऐकून ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो कृष्णाश राजास म्हणाला."गुर्जर देशामध्यें जेथें वैरी होते तेथें माझे पितर गेले व मनुष्यभक्षक म्लेच्छासह असलेल्या त्या राजाशी त्याचे युद्ध झाले. देशराज व वत्सराज भयंकर युद्ध करिते झाले.पण शेवटीं त्यास म्लेच्छांनीं मारिले ही प्रसिद्ध कथा मीं ऐकली आहे १२-१६.पण त्याच्या मरणाची ही नवीन कथा मामानें मला आज सांगितली आहे. त्याचे सांगणें जर खरें असेल तर माझा पराक्रम पहा. " असें त्या सर्वास सांगून कृष्णाश मातेस सत्वर जाऊन विचारूं लागला. महीपतीचें म्हणणें त्यानें तिला कळविलें १७,१८. पण तें वज्रासारिखें कठोर वाक्य ऐकून ती माता रडूं लागली. पतीच्या दुःखानें दुःखी झालेल्या त्याच्या मातेने उत्तर दिलें नाहीं. तेव्हा खरा प्रकार जाणून व पित्याचा वध ऐकून आणि जंबुक शंकराचा सेवक आहे हें मनात आणून तो कृष्णाश मनानें परमेश्वरीची स्तुति करिता झाला १९,२० " हे जगदंबे, भवानि, सर्व लोक, पितर, देव व मुनि

इतमेव २१ इति ध्यात्वा स कृष्णांशः सुप्रापनिजसद्मनि । तदा भगवंसी तुष्टा तालनं बलवत्तरम् २२ मोहयित्वाशु तत्पार्श्वे प्रेषयामास सर्वगा । चतुर्लक्षबलैः सार्द्धं तालनः शीघ्रमागतः २३ स्वसैन्यं चोदयामास चैकलक्षं महाबलम् । बलखानिस्तदा प्राप्तश्चैकलक्षबलान्वितः २४ अनुजं तत्र संस्थाप्य संश्रियाख्ये महाबलः । सज्जीभूतान्समालोक्य ज्ञानुधाने ससैन्यकान् २५ भीतः परिमलो राजा कृष्णांशं प्रति चायथौ । विह्वल नृपमालोक्य कृष्णांशोऽश्वासयन्मुदा २६ लक्षसैन्यं तदीय च गृहीत्वा चाधिपोऽभवत् । शतघ्नयः पञ्चसाहस्रा नानावर्णाः सुवाहनाः २७ पताकाः पञ्चसाहस्राः साहस्रं काष्ठकारिणः । गजा दशसहस्राश्च रथाः पञ्चसहस्रकाः २८ विलक्षाश्च हयाः सर्वे उष्ट्रा दशसहस्रकाः । शेषाः पदातयो ज्ञेयास्तस्मिन्सैन्ये भयानके २९ तालनश्च समायातः सर्वसैन्याधिपोऽभवत् । देवसिंहो रथानां च सर्वेषामीश्वरोऽभवत् ३० बलखानिर्हयानां च सर्वेषामधिपोऽभवत् । आह्लादश्च गजानां च सर्वेषामधिपोऽभवत् ३१ पत्तीनां चैव सर्वेषां कृष्णांशश्चाधिपोऽभवत् । नत्वा ते मलनं भूयो दत्त्वा दानान्यनेकशः ३२ समायुक्ताश्च ते सर्वे दक्षिणाशां बलान्विताः । पक्षमात्रगतः कालो मार्गे तस्मिन्नरैर्विणाम् ३३ छित्त्वा तत्र वनं घोरं नानाकण्टकसंयुतम् । सेनां निवासयामासुर्निर्भयास्ते महाबलाः ३४ देवसिंहमतेनैव योगिनस्ते तदाऽभवन् । नर्तकश्चैव कृष्णांशश्चाह्लादो डमरुप्रियः ३५ मृदुङ्गधारी तदा देवो वीणाधारी च तालनः । वत्सजः कांस्यधारी च बलखानिर्महाबलः ३६ मातुरग्रे स्थितास्तेवै ननृतुः प्रेमविह्वलाः । मोहिता देवकी

याची तूं खाण आहेस. तुझा जयजयकार असो. तूं हें चराचर विश्व व्यापिलें आहेस; त्याचें रक्षण केलें आहेस व त्याचा संहार केला आहेस " २१. असें ध्यान करून तो कृष्णाश आपल्या मंदिरांत निजला. तेव्हा संतुष्ट झालेली सर्वव्यापी भगवती अतिबलाढ्य तालनास मोहित करून तात्काळ त्याच्याजवळ पाठविती झाली. तालन चार लक्ष सैन्यासह त्वरेनें आला. तेव्हा कृष्णाशानें आपल्या एक लक्ष सैन्यासही प्रेरणा केली. एक लक्ष सैन्यासह बलखानिही प्राप्त झाला २२--२४. सश्रियनामक नगरामध्यें तो महाबलवान् आपल्या धाकट्या बंधूची स्थापना करिता झाला. उद्यानामध्यें सैन्यासह ते सज्ज झाले आहेत असें पाहून २५ भयभीत झालेला परिमल कृष्णाशाकडे आला. राजा विव्हल झाला आहे असें पाहून कृष्णाश आनंदानें त्याचे आश्वासन करिता झाला २६. त्याचे लक्ष सैन्य घेऊन तो त्याचा मुख्य झाला. त्याच्या सैन्यात पांच हजार शतघ्नी होत्या व नानाप्रकारची उत्तम वाहनें होतीं २७. पांच हजार पताका, सहस्र काष्ठें करणारे, दहा हजार गज, पांच हजार रथ २८, सर्व मिळून तीन लक्ष घोडे, दहा हजार उंट व बाकीचे पायदळ त्या भयंकर सैन्यामध्यें होतें असें जाणावें २९. तालन आला व तो सर्व सैन्याचा अधिपति झाला. देवसिंह सर्व रथांचा अधिपति झाला ३०. बलखानि सर्व घोड्यांचा मुख्य झाला. आल्हाद सर्व हत्तींचा अधिपति झाला ३१ आणि सर्व पायदळाचा कृष्णाश मुख्य झाला. मलनेस वारंवार नमस्कार करून व अनेक प्रकारें दानें देऊन ते सर्व सैन्यासह दक्षिण दिशेस गेले. रणाची इच्छा करणाऱ्या त्यांचे मार्गामध्यें पंधरा दिवस गेले ३२,३३. अनेक काट्यांनीं भरलेलें घोर वन छेदून तेथें त्या महाबलवानांनीं निर्भयपणें आपल्या सैन्याचा तळ दिला ३४. नंतर देवसिंहाच्या संमतीने ते योगी झाले. कृष्णाश नर्तक झाला. आल्हाद डमरुप्रिय झाला. देवसिंह मृदंग धारण करणारा व तालन वीणा धरणारा झाला आणि वत्सज महाबलाढ्य व बलखानि टाळधारी झाला ३५. ते मातेच्या समोर जाऊन उभे राहिले व प्रेमानें विव्हल होऊन

चासीच्च ज्ञातं तत्र कारणम् ३७ मोहितां मातरं दृष्ट्वा पर हर्षमुपाययुः । तदा तां कथयामासुर्यं ते तनया हि भोः ३८ नत्वा तां प्रययुः सर्वे पुरीं माहिष्मतीं शुभाम् । नगरं मोहयामासुर्वाद्यगानविशारदाः ३९ कृत्वा सार्धं रिपोर्गेहं ययुस्ते कार्यतत्पराः नृत्यगानसुवाद्यैश्च राज्ञस्ते मोहने रताः ४० विसंज्ञां महिषीं कृत्वा कृष्णांशः सर्वमोहदः । प्राप्तवांस्तत्र यत्रासौ तत्सुता विजयेषिणी ४१ दृष्ट्वा सा सुन्दरं रूपं श्यामाङ्गं पुरुषोत्तमम् । मुमोह कामापन्ना मैथुनार्थं समुद्यता ४२ दृष्ट्वा तथागतां नारीं कृष्णांशः श्लक्ष्णया गिरा । शत्रोर्भेदं च पप्रच्छ कामिनीं मदविह्वलाम् ४३ साह भो देवकीपुत्र यदि पाणिं ग्रहीष्यसि । तर्हि ते कथयिष्यामि पितुर्भेदं हि दारुणम् ४४ तथेत्युक्त्वा स बलवांस्तस्याः पाणिं गृहीतवान् । ज्ञात्वा भेदं रिपोः सर्वं तामाश्वास्य ययौ मुदा ४५ एतस्मिन्नन्तरे राज्ञी बाधिता प्राह योगिनम् । देवराजप्रियाहारं नवलक्षस्य मूल्यकम् ४६ तुभ्यं दास्यामि संतुष्टा नृत्यगानविमोहितम् । इति श्रुत्वा वत्ससुतस्तां प्रशस्य गृहीतवान् ४७ ययौ बन्धुभिः सार्धं जम्बुको यत्र तिष्ठति । ननर्त तत्र कृष्णांशो बलखानिरगायत ४८ आह्लादस्तालदो देवो दध्मुर्वाद्यगतीर्मुदा । मोहिताः भूक्षपस्तत्र कालियः स्वजनैः सह ४९ कामं वरय कृष्णाङ्ग यदि ते हृदये स्थितम् । इति श्रुत्वा वचः शत्रोर्बलखानिर्महाबलः ५० तमाह भो महीपाल लक्षवर्तिर्वराङ्गना । त्वद्विद्यां दर्शयेन्मह्यं तदा तृप्तिं व्रजाम्यहम् ५१ इति श्रुत्वा तथा मत्वा

नाचू लागले. त्यास पाहून देवकी मोहित झाली, पण तिला कारण समजलें नाहीं ३६,३७. माता मोहित झाली आहे, असें पाहून त्यास परमानंद झाला. नंतर ते तिला ह्मणाले 'आह्मी तुझे पुत्र आहोत' ३८. असो. ह्याप्रमाणें सागून व तिला नमस्कार करून ते सर्व शुभ माहिष्मतीनगरात गेले. वाद्य व गान यामध्ये निष्णात असलेले ते सर्व नगरास मोहित करिते झाले ३९. पुढें कार्यामध्ये तत्पर असलेले ते दूतीसह शत्रूच्या गृहीं गेले व नृत्य, वाद्य आणि गायन यान्या योगानें ते राजास मोहित करण्यामध्यें निमग्न झाले ४०. सर्वास मोहित करणारा कृष्णांश, राणीस मूर्च्छित करून जेथें तिची विजयैषिणी ह्मणून कन्या होती तेथें प्राप्त झाला ४१. ती तें सुंदर रूप पाहून व त्या श्यामांग पुरुषोत्तमास अवलोकन करून मोहित झाली व त्याच्या वश होऊन मैथुनार्थ प्रवृत्त झाली ४२. तशा प्रकारच्या अवस्थेस पोंचलेल्या त्या स्त्रीस पाहून कृष्णांश मधुर वाणीनें बोलूं लागला. मदानें विव्हल झालेल्या त्या कामिनीस त्यानें शत्रूचा भेद विचारिला ४३ ती ह्मणाली " हा देवकीपुत्रा, तूं जर माझें पाणिग्रहण करशील तर मी पित्याचा भयंकर भेद तुला सांगेन" ४४. तेव्हा 'ठीक आहे' असें ह्मणून तो बलवान् तिचे पाणिग्रहण करिता झाला. नंतर शत्रूचा सर्व भेद जाणून व तिचें आश्वासन करून तो आनंदानें गेला ४५. इतक्यात जिला पीडा झाली आहे अशी ती राणी त्या योग्यास ह्मणाली 'ज्याचें नऊ लक्ष मोल आहे असा हा देवराजाच्या प्रियेचा हार मी तुला देईन. कारण, मी नृत्यगायनान्या योगानें अत्यंत मोहित व संतुष्ट झालें आहें.' असें ऐकून वत्सराजाचा पुत्र तिची प्रशंसा करून तो हार घेता झाला ४६,४७. नंतर तो बंधूसह जेथें जम्बुक होता तेथें गेला. तेथें कृष्णांश नाचला. बलखानि गाइला ४८. आल्हाद, ताल व देवसिंह यानीं आनंदानें वाद्यान्या गति वाजविल्या. तेव्हा राजा व कालिय आपल्या अमात्यादि लोकासह मोहित झाला व ह्मणाला " हा कृष्णांग, तुझ्या मनात जें असेल तें खुशाल मागून घे." असें शत्रूचें वचन ऐकून महाबलाढ्य बलखानि त्यास ह्मणाला " हे राजा, सुंदरी लक्षावर्ति आपली विद्या जर मला दाखवील तर मी तृप्त होईन " ४९-५१ हें ऐकून व 'बरें आहे'

लक्षावर्ते नृपोत्तमः । सभायां नर्तयामास देशराजप्रियां तदा ५२ सा वेश्या सुतमाह्लादं ज्ञात्वा योगित्वमागतम् । रुरोद तत्र दुःखार्ता नेत्रादश्रूणि मुञ्चती ५३ रुदितां तां समालोक्य रुदन्नाह्लाद एव सः । स्वभुजौ ताडयामास तस्यियार्थे महाबलः ५४ कृष्णांशस्तत्र तं हार तस्याः कण्ठे ददत्तवान् । उवाच क्रोधताम्राक्षस्तामाश्वास्य पुनःपुनः ५५ अहं चोदयसिंहोऽथ पितुर्वैरार्थमागतः । हनिष्ये स्वरिपुं भूप सात्मजं सबलं तथ ५६ इति श्रुत्वा वचस्तस्य कालियो बलवत्तरः । पितुराज्ञां पुरस्कृत्य शैन्यैर्व्यूहसमन्वितः ५७ तयां च बन्धनायैव कर्णाढ्यं समरुन्धत । ताञ्छस्त्रून्मनुजाय पाशहस्तान्सशस्त्रकान् ५८ स्व स्व खड्गे समाकृष्य क्षत्रियास्ते समाहनन् । शतशूरं हतं तैश्च कालियो भयकातरः ५९ त्यक्त्वा तातं प्रदुद्राव तं तु गहाद्विहिर्ययुः स्वसैन्यं शीघ्रमासाद्य युद्धाय समुपस्थिताः ६० शिबिराणि कृतान्येव नर्मदाकूलमास्थिता । कृत्वा तु नर्मदासेतुं नल्वलज्ञे सुपुष्टिदम् ६१ स्वसैन्यं तारयामासे चतुरङ्गसमन्वितम् । रुरोध नगरीं सर्वां बलखानिर्बलैर्युतः ६२ शतघ्नीरग्रतः कृत्वा महच्छब्दकरीस्तदा । माहिष्मत्याश्च हर्म्याणि पातयामास भूतले ६३ नराश्च स्वकुलैः सार्धं मुख्यद्रव्यसमन्विताः । विन्ध्याद्रेश्च गुहां प्राप्य तत्रोषुर्भयकातराः ६४ कालियस्तु गजानीकं पञ्चशब्दगजे स्थितः । हस्तिपा दशमाहूय युद्धाय समुपाययुः ६५ सम्पानुजः सूर्यवर्मा त्रिलक्षैस्तुरगैर्युतः । तुन्दिलश्च रथैः सार्द्धं रथस्थश्च सहस्रकैः ६६ रङ्कणो बङ्कणश्चोभौ चतुर्लक्षपदातिभिः । जग्मतुस्तौ महाम्लेच्छौ म्लेच्छभूपसहस्रकैः ६७ दाक्षिणात्य-

---

असें ह्मणून त्या उत्तम राजानें देशराजास प्रिय असलेल्या लक्षावर्तीस सभेमध्यें नाचविले ५२. ती वेश्या, आल्हादपुत्र योगित्वाप्रत प्राप्त झाला आहे असे जाणून दुःखानें आर्त होत्साती डोळ्यातून अश्रु ढाळत रहू लागली ५३. ती रडत आहे असें पाहून तो महाबलवान् आल्हाद रडतच तिच्या प्रसन्नतेकरिता आपल्या भुजाचे ताडन करिता झाला; ह्मणजे त्याने दंड ठोकला ५४. तेव्हा कृष्णांशाने तो हार तिच्या गळ्यात घातला. व ज्याचे डोळे क्रोधाने लाल आहेत असा तो तिचे वारंवार आश्वासन करून ह्मणाला " मी व हा उदयसिंह पित्याच्या वैराकरिता आलों आहो. पुत्रासह व त्याचप्रमाणे सैन्यासह मी आपल्या रिपुस मारीन " ५५,५६. हे त्याचे वचन ऐकून अतिशय बलवान् कालिय पित्याची आज्ञा घेऊन शतव्यूहयुक्त होऊन ५७ त्याच्या बंधनाकरिता द्वार बंद करिता झाला. तेव्हा ज्याच्या हातात पाश आहेत व जे सशस्त्र आहेत अशा त्यास शत्रु जाणून त्यानीं आपापले शस्त्र उपसलें व त्या क्षत्रियास मारिलें. त्यानीं शंभर शूरास मारिलें असता कालिय भयभीत झाला ५८,५९ व पित्यासि सोडून पळाला. तेव्हा तेही तेथून बाहेर पडले व लागलेच आपल्या सैन्यास येऊन मिळाले आणि युद्धाकरिता तयार होऊन राहिले ६०. त्यानीं शिबिरें केलीं व ते नर्मदेच्या तीरावर येऊन थडकले. त्यानीं एक चारशे हात प्रमाणाचा मजबूत सेतु नर्मदेवर बांधिला व त्यावरून आपलें चतुरंग सैन्य पलीकडे नेलें. सैन्याने युक्त असा बलखानि सर्व नगरीस वेढा देता झाला ६१,६२. मोठमोठे शब्द करणाऱ्या शतघ्नी (तोफा) पुढें ठेवून तो माहिष्मतीतील उच्च उंच गृहे भूमीवर पाडविता झाला ६३. तेव्हा त्यातील लोक भयभीत होत्साते आपल्या कुलासह मुख्य द्रव्य घेऊन विंध्याद्रीच्या गुहातून जाऊन राहिले. इकडे कालिय गजसैन्यातील पंचशब्दगजावर बसून दहा हजार हत्तीवरील स्वारासह युद्ध करण्याकरिता आला. ६४,६५. त्याचा धाकटा भाऊ सूर्यवर्मा तीन लक्ष घोडयासह आला. तुंदिल रथारूढ होऊन दहा हजार रथी घेऊन आला ६६. रंकण व बंकण हे दोघे महाम्लेच्छ हजारों म्लेच्छरा-

ग्रामपास्ते तौ पुरस्कृत्य संयुः । उभे सैने समासाद्य युद्धाय समुपस्थिते ६८ तयोश्च तुमुलं युद्धमभवल्लोमहर्षणम् । त्रियामे रक्तवाह्यां च वाहयंश्च नदीं तदा ६९ दृष्ट्वाऽऽलजां नदीं घोरां मांसकर्दमवाहिनीम् । बलखानिरमंयात्मा खड्गपाणिर्नरो ययौ ७० भल्लहस्तस्तदा देवो मनोरथहये स्थितः । बिन्दुलस्थश्च कृष्णांशः खड्गेनैव रिपूनहन् ७१ आह्लादश्च गदाहस्तः पोथयामास वाहिनीम् । रूपणो नाम शूद्रश्च हस्तशक्तिरहन्रिपून् ७२ तालनो हस्तनिस्त्रिंशो माहिष्मस्त्याहनत्परान् । एवं महाभये जाते रणे तस्मिन्महाबले ७३ दुद्रुवुः सर्वतो वीराञ्छाहि त्राहीत्यवादयन् । प्रभग्नं स्वबलं दृष्ट्वा कालियो बलखानिकम् ७४ गजस्थस्ताडयामास स्वबाणैस्तं महाबलः । हरिणी वडवा तस्य ज्ञात्वा स्वामिनमातुरम् ७५ गजोपरि समास्थाय स्वपादैस्तमपातयत् । पतिते कालिये वीरे पञ्चशब्दो महागजः ७६ शत्रुहैस्ताडयामास शरांस्तान्मदमत्तरान् । मूर्छिते पञ्चशब्दे तु रूपणो भयकातरः ७७ देवकीं वर्णयामास यथा जातं गजेन वै । तदा तु दुःखिता देवी दोलामारुह्य सत्वरा ७८ तं गजं च समासाद्य वर्णयामास कारणम् । गजराज नमस्तुभ्यं शक्रदत्त महाबल ७९ एते पुत्रास्तु ते वीर पालनीया यथा पितुः । इति श्रुत्वा दिव्यगजो देवमायाविचारदः ८० देवकीं शरणं प्राप्य क्षमस्वागस्कृतं मम । इत्युक्ते गजराजे तु कृष्णांशो बलवत्तरः ८१ त्यक्त्वा मूर्छां ययौ तत्र यत्राह्लादश्च मूर्छितः । समुत्थाय करस्पर्शैर्बलखानिसमन्वितः ८२ पितुर्यज्ञं महामत्तमाह्लादाय प्रदत्तवान् । करालमश्वं दिव्याङ्गं रूपणाय तदा

जासह चार लक्ष पायदळ घेऊन आले ६७. दक्षिण देशातील ग्रामांचें रक्षण करणारे त्यांच्या मागोमाग आले. दोन्ही सैन्यें मिळालीं व युद्धास आरंभ झाला ६८. त्यांचें अंगावर रोमांच उभे करणारें भयंकर युद्ध झालें. तीन प्रहरामध्यें रक्ताची नदी वाहूं लागली. मासाचा चिखल जिच्या मधून वाहत आहे अशी ती घोर नदी पाहून ज्यांचें अंतःकरण उदार आहे असा बलखानि पुढें चालला ६९,७०. मनोरथनामक घोड्यावर बसून व हातात भाला घेऊन देवकीसहही पुढें सरला. बिंदुलघोड्यावर बसलेला कृष्णांश खड्गाच्या योगानें शत्रूंस मारिता झाला ७१. ज्याच्या हातात गदा आहे असा आल्हाद सैन्याचा विध्वंस करूं लागला. रूपणनामक शूद्र हातांत शक्ति घेऊन शत्रूंचें कदन करिता झाला ७२. तालन हातांत निस्त्रिंशनामक शस्त्र घेऊन माहिष्मास मारीत सुटला. याप्रमाणें महाभयंकर व अतिशय बलयुक्त असें तें युद्ध चाललें असता ७३ वीर " त्राहि त्राहि " असें ह्मणत चहूंकडे पळत सुटले. आपलें सैन्य अत्यंत पराभूत झालें आहे असें पाहून हत्तीवर बसलेला बलाढ्य कालिय बलखानीस आपल्या बाणांनीं ताडन करिता झाला. तेव्हा त्याची हरिणी घोडी आपला स्वामी व्याकुल झाला आहे असें पाहून७४,७५हत्तीवर चढली व तिनें आपल्या पायांनीं त्यास खालीं पाडाविलें. वीर कालिय पडला असता त्याचा पंचशब्दनामक महागज मदोन्मत्त शूरास साखळ्यांनीं ताडन करूं लागला. पण त्याच्या प्रहारानें पांच शूर मूर्छित होऊन पडले असता भयभीत झालेला रूपण७६,७७गजानें जें कृत्य केलें होतें तें देवकीस सांगता झाला. तेव्हा दुःखित झालेली देवी पाळण्यामध्यें बसून त्वरेनें त्या गजाजवळ आली व त्यास सर्व वर्तमान सांगती झाली. " हा इंद्रदत्त महाबलाढ्य गजा, तुला नमस्कार असो ७८,७९.हे पुत्र तुझे आहेत. यास्तव, तूं यांचें पित्याप्रमाणें रक्षण करावेंस." हें ऐकून देवमायेमध्यें निपुण असलेला तो दिव्य गज ८० देवकीस शरण येऊन " मज अपराध्यास क्षमा कर. " असें त्या गजराजानें ह्मटलें असता अतिबलवान् कृष्णांश मूर्च्छेचा त्याग करून जेथें बलखानीसह मूर्छित झालेला आल्हाद होता तेथें गेला व त्यास

ददौ८१ मूर्च्छित कालियं शत्रुं बद्ध्वा स निगडैर्दृढैः । मेनान्तं प्रेषयामास बलखानिर्महाबलः८४
सूर्यवर्मा तदा ज्ञात्वा बद्ध बन्धुं च कालियम् । ययौ शत्रुसेनान्त क्रोधस्फुरितकन्धरः ८५
तमायान्तं समालोक्य ते वीरा युद्धदुर्मदाः । रथस्थं मण्डलीकृत्य स्वं स्वमस्त्रं समाक्षिपन् ८६
कुण्ठितेऽस्त्रे तदा तेषां विस्मितास्तेऽभवन्मुने । चिन्तां च महतीं प्राप्ताः कथं वध्यो भवेदयम् ८७
तस्यास्त्रैस्ते महावीरा व्रणार्तिभयपीडिताः । त्यक्त्वा युद्ध पुनर्गत्वा रणं चक्रुः पुनःपुनः ८८
एवं कृति दिनान्येव बभूव रण उत्तरः । आह्लादो वत्सजो देवसालनो भयसयुतः ८९ कृष्णांश शरणं जग्मस्तेन वीरेण मोहिताः । कृष्णस्तु त तथा दृष्ट्वा देवीं विश्वविमोहिनीम् ९० तुष्टाव मनसा वीरो रात्रिसूक्त पठन्हृदि । तदा तुष्टा जगद्धात्री दुर्गा दुर्गार्तिनाशिनी ९१ मोहयित्वा तु तं वीर तत्रैवान्तरधीयत । निद्रया मोहित दृष्ट्वा कृष्णांशस्तु महाबली ९२ बबन्ध निगडैस्त च देवकन्यन्त समागमत् । तुन्दिलश्च तथा ज्ञात्वा भ्रातृशोकपरिप्लुतः ९३ आजगाम हयारूढः खड्गहस्तो महाबली । रिपुसैन्यस्य मध्ये तु बहुशस्तानताडयत् ९४ माहिष्मत्याश्च ते शूरा रङ्कणन समन्विताः । भग्नयामासुस्तत्सैन्य तालनन प्रपालितम् ९५ मद्रुत स्व बलं दृष्ट्वा तालनः परिघायुधः । शिरांसि पातयामास म्लेच्छानां च पृथक्पृथक् ९६ वङ्कणं च तथा हत्वा खड्गनैव च रङ्कणम् । तुन्दिलं च तथा बद्ध्वा दिनान्ते शिबिर ययौ ९७

हस्तस्पर्शानें उठवून पित्याचा महामत्त गज त्यानें आल्हादास दिला. ज्याचें अंग दिव्य आहे असा करालनामक अश्व त्यानें त्यावेळी रूपणास दिला ८१—८३ व मूर्च्छित झालेल्या कालिय शत्रूस दृढ पाशानीं बाधून महाबलवान् बलखानि त्यास सैन्याच्या मागें पाठविता झाला ८४. तेव्हा आपल्या कालिय बंधूस बाधलें आहे असें जाणून ज्याचें मस्तक क्रोधामुळें स्फुरण पावूं लागले आहे असा तो वीर सूर्यवर्मा शत्रूच्या सैन्यांत शिरला. तो येत आहे असें पाहून युद्धामध्यें ज्यास मोठा मद चढला आहे असे ते त्या रथस्थ वीरास वेढून टाकिते झाले व त्यानीं आपापल्या अस्त्राचा प्रयोग केला ८५, पण त्याचीं अस्त्रें कुठित झालीं असता, बा मुने, ते सर्व विस्मित झाले. व " हा आह्लास वध्य कसा होईल ? " अशी त्यास मोठी चिंता पडली ८६,८७. ते महावीर त्याच्या अस्त्रानी व्रणयुक्त झाले व त्यामुळें त्याना दु ख व भीतीहि वाटली. ते वारंवार युद्ध सोडून जात व पुनरपि येऊन युद्ध करीत ८८. ह्याप्रमाणें तें भयकर रण कित्येक दिवस चालले होतें. शेवटी त्या वीरानें ज्यास मोहित करून सोडिलें आहे असे आल्हाद, वत्सपुत्र, देवसिंह व तालन भययुक्त होत्साते कृष्णाशास शरण गेले. तेव्हा त्याची ती स्थिति पाहून कृष्णाश विश्वमोहिनी देवीची मनानें स्तुति करू लागला. त्या वीरानें अंत:करणात रात्रिसूक्त म्हटलें ८९,९०. तेव्हा भयंकर पीडा नाहींशी करणारी व जगाचें पालन करणारी दुर्गा संतुष्ट झाली ९१ व त्या वीरास मोहित करून तेथेंच गुप्त झाली. तो निद्रेने मोहित झाला आहे अस पाहून महाबलवान् कृष्णाश त्यास शृंखलानीं बाधिता झाला व देवकीजवळ आला. तें सर्व वर्तमान जाणून भ्रात्याच्या शोकानें व्याप्त झालेला महाबलवान् तुंदिल घाड्यावर बसून व हातात खड्ग घेऊन शत्रूंच्या सैन्यामध्ये आला. व पुष्कळ शूरास त्यानें ताडन केलें ९२-९४. तात्पर्य, रंकणानें युक्त असे ते माहिष्मत्य शूर तालनाने ज्यांचे रक्षण केलें होतें अशा त्या सैन्याचा पराभव करिते झाले ९५. आपलें सैन्य पळत सुटलें आहे असें पाहून परिघ हें ज्याचें आयुध आहे असा तालन म्लेच्छांचीं मस्तकें भूमीवर पृथक् पृथक् फोडून टाकिता झाला ९६. याचप्रमाणें वंकण व रंकण यास खड्गाने मारून व तुंदिलास बाधून तो सायकाळीं शिबिरास परत

कालिये च रिपौ बद्धे सम्बद्धे सूर्यवर्मणि । तुन्दिले च तथा बद्धे रक्षणे वक्षणे हते ९८ महस्र म्लेच्छराजानो हतशेषा बलान्विताः । पक्षमात्रमहोरात्रं युद्धं चक्रुः समन्ततः ९९ प्रत्यहं तालनो वीरः सेनापतिरमर्षणः । षष्टिभूपाञ्जघानाशु शत्रुसैन्यभयङ्करः १०० भयभीता रिपोः शूरा हता भूपा हतौजसः । हतशेषा ययुर्गेहमर्द्धसैन्या भयातुराः १ जम्बुकस्तु तथा श्रुत्वा दुःखितो गेहमाययौ । व्रतं ह्यनशनं कृत्वा रात्रौ शोचञ्शयीतवान् २ निशीथे स्वप्नमापन्ना तत्सुता विजयेषिणी । पूर्णा तु सा कला ज्ञेया राधाया व्रजवासिनी ३ आश्वास्य पितरं तं च ययौ मायाविशारदा । रक्षकाञ्छिविराणां च मोहयित्वा समाययौ ४ भ्रातरं यत्र गत्वाऽसौ तत्र सर्वान्न्यबोधयत् । कृत्वा सा राक्षसीं मायां पञ्च वीरानमोहयत् ५ निःशस्त्रकवचान्बन्धून्पतितोलां समारुहत् । पितुरन्तिकमासाद्य तस्मै भ्रातॄन्ददौ मुदा ६ प्रणतं बोधितः सर्वे स्नानध्यानादिकाः क्रियाः । कृत्वा ययू रिपोः शालां दृष्ट्वन्तो न तां तदा ७ बभूवुर्दुःखिता सर्वे किमिदं कारणं कथम् । तानुवाच तदा देवः प्राज्ञा ह्यत्र रिपोः सुता ८ कृत्वा सा राक्षसीं मायां हृत्वा तान्गेहमाययौ । तस्माद्यूयं मया सार्द्धं गत्वा यत्रैव तद्गुरुः ९ विन्ध्योपरि महारण्ये नानासत्त्वनिषेविते । कुटीर तस्य तत्रैव नाम्नैवैलविलो हि सः ११० योगसिद्धियुतः कामी राक्षसेभ्यो हि निर्भयः । जम्बुकस्य सुता तत्र ग्रहीष्यन्ति वा जनैर्युता ११ एकाकिनी च सा रात्रौ स्वं गुरुं तमरीरमत् । कृतघ्न चैलविलिना माया मनुजमोहिनी १२

आला ९७. पण शत्रु जो कालिय त्यास बांधून टाकिले असता, सूर्यवर्म्यास बांदिवान् केलें असता, त्याचप्रमाणें तुंदिल बद्ध होऊन रक्षण व वक्षण मृत झाले असता ९८, मेलेल्या वीरांतून बाकी राहिलेले सैन्ययुक्त हजार म्लेच्छ राजे एक पक्षभर चोहोकडून अहोरात्र युद्ध करिते झाले ९९. परंतु शत्रुसैन्यास भयंकर वाटणारा तालन वीर सेनापति झाला व त्या असह्य शूराने रोज साठ राजास मारिलें. त्यामुळें शत्रूचे शूर राजे भयभीत व निर्बल झाले आणि त्यातील बरेचसे मारले गेले. तेव्हा मरून राहिलेले ते सर्व भयानें व्याकुळ होत्साते अर्ध्या सैन्यासह गृही परत आले १००,१०१. शेवटी जंबुकही ते सर्व वर्तमान ऐकून दुःखित होत्साता स्वगृहीं गेला व न खाण्याचें व्रत करून रात्रीं शोक करीत निजला. नंतर रात्र झाली असता त्याची विजयेषिणीनामक कन्या पित्याचे आश्वासन करून गेली. ती राधेची प्रमाणेंच पूर्ण कला होती असें समजावें. त्या मायेमध्यें चतुर असलेल्या कन्येनें शिबिराच्या रक्षकास मोहित केलें व ती आत गेली २-४. जेथें तिचे भ्राते होते तेथें जाऊन तिनें सर्वास आनंदानें जागें केलें. राक्षसी माया करून तिनें त्या पाचही वीरास मोहित केलें ५. अस्त्ररहित व कवचशून्य अशा त्या बंधूंस पाळण्यात बसवून पित्याकडे आणिलें व त्यास त्यांचें समर्पण आनंदाने करिती झाली ६. प्रातःकाळीं सर्व जागे झाले व स्नानध्यानादिक क्रिया करून ते सर्व, शत्रूंस जेथें ठेविलें होतें त्या शाळेत गेले. पण ते त्यास तेथें दिसले नाहींत ७. तेव्हा ते सर्व दुःखित झाले व यांचें कारण काय व हें झालें कसें या विचारात पडले. तेव्हा देव त्यास म्हणाला 'येथें शत्रूची कन्या आली होती व तिनें राक्षसी माया करून त्यांचें येथून हरण केलें व ती गृहीं गेली. यास्तव, जेथें तिचा गुरु आहे तेथें तुम्ही मजबरोबर चला. विंध्याचलावर ज्याचें अनेक प्राण्यांनीं सेवन केले आहे अशा महारण्यामध्यें त्याचें पर्णगृह आहे; तेथें तो असतो. ऐलविली असे त्याचें नांव आहे ८-१०. तो योगसिद्धियुक्त व कामी आहे. त्यास राक्षसापासून मुळींच भीति नाहीं. जंबुकाची कन्या लोकांसह किंवा एकटीच तेथें रोज रात्री जाते व आपल्या गुरूशीं रत होते.

कार्यसिद्धिं गमिष्यामो गत्वा तं पुरुषाधमम् । इति श्रुत्वा च चत्वारो विनाह्लादं ययुर्वनम् १३ गीतनृत्यप्रवाद्यैश्च मोहयित्वा च तं द्विजे । चक्रुश्च तत्रैव धूर्ते मायाविशारदम् १४ स तु पूर्वभवे दैत्यश्चित्रो नाम महासुरः । बाणकन्यामुषां नित्यं काङ्क्षी शंकरपूजक १५ जात ऐलविली नाम पक्षपूजी स वेगवान् । तयोर्मध्ये प्रमाणोऽयं विवाहो मे यदा भवेत् १६ तदाऽहं त्वां भजिष्यामि संत्यक्त्वोद्वाहितं पतिम् । इति तस्मिन्महाधूर्ते गत्वा सद्मग्राममूर्द्धनि १७ जम्बुकस्य ययुर्दुर्गं दृष्ट्वा ते तं समारुहन् । हत्वा तत्र स्थितान्वीरान्छृङ्खलैश्च दृढैः कृताः १८ तदा तु जम्बुको राजा शिवदत्तवरो बली । जित्वा पञ्च महावीरान्बद्धस्तैस्तान्निगडैर्दृढैः १९ शेव यज्ञं च कृतवांस्तेषां नाशनपर्यवसायिनम् । रूपणस्तु तथा ज्ञात्वा देवकीं प्रत्यवर्णयत् १२० तदा तु दुःखिता देवी भवानीं भयहारिणीम् । मनसा च जगामाशु शरण्यां शरणं सती २१ तदा तुष्टा जगद्धात्री स्वप्नान्ते तामवर्णयत् । अहो देवकि कल्याणि पुत्रशोकं त्यजाधुना २२ यदा तु जम्बुको राजा शिवदत्तवरो बली । होमं कर्तुं स मन्दात्मा तवां च बलिहेतवे २३ मोहयित्वा तदाऽहं तं मोचयित्वा च ते सुतान् । विजयं ते प्रदास्यामि मा च शोके मनः कृथाः २४ इति श्रुत्वा सती देवी नमस्कृत्य महेश्वरीम् । पूजयामास विधिवद्धूपदीपोपहारकैः २५ एतस्मिन्नन्तरे राजा देवमायाविमोहितः । सुष्वाप तत्र होमान्ते ते च जाता ह्यबन्धनाः २६ तैर्बद्धो जम्बुको राजा निगडैरायसैर्दृढैः । ते तं बद्ध्वा ययुः शीघ्रं देवकीं प्रति निर्भयाः २७ एतस्मिन्नन्तरे तत्र कालियाद्याश्च ये सुताः । विलक्ष सैन्यमादाय युद्धाय समुपाययुः २८ पुनर्युद्धमभूद्घोरं सेन-

त्या ऐलविलीनें ही लोकास मोह पाडणारी माया केली आहे. त्या अधम पुरुषाकडे गेल्यानें आमची कार्यसिद्धि होईल'. असें ऐकून आल्हादाबरोबर इतर चौघे वनास गेले ११-१३ व गायन, नृत्य आणि वाद्ये यान्या योगानें त्यास दिवसा मोहित करून रात्रीही ते, धूर्त व मायेमध्यें निपुण असलेल्या त्याच्या पर्णगृहातच राहिले. तो पूर्वजन्मामध्ये चित्रनामक महाभयकर दैत्य होता. तो बाणकन्या जी उषा तिची नित्य इच्छा करीत असे व त्याकरिता तो शंकराची पूजा करी १४,१५. तोच हा आता ऐलविली म्हणून झाला आहे. तो वेगवान् पक्षपूजा करीत असतो. त्या दोघामध्ये अशी प्रतिज्ञा ठरली आहे की, जेव्हा माझा विवाह होईल तेव्हा मी विवाहित पतीस सोडून तुझी सेवन करीन. असो. तो महाधूर्त मेला असता रणसमग्रामी जाऊन ते जंबुकाच्या दुर्गावर चाल करून गेले व त्या किल्ल्यास पाहून ते त्याच्यावर चढले. तेथें असलेल्या वीरास मारून त्याच्यावर तोफा पुरल्या. तेव्हा ज्यास शंकरानें वर दिला आहे असा तो बलवान् जम्बुकराजा त्या पांच महावीरास दृढ पाशानीं बांधून त्यांच्या नाशानीं युक्त असा शैवयज्ञ करिता झाला. पण हें सर्व जाणून रूपण देवकीस तें कळविता झाला १६-२०. तेव्हा दुःखित झालेली ती साध्वी देवी भय हरण करणाऱ्या व शरण जाण्यास योग्य अशा भवानीस मनानें शरण गेली २१. त्यावेळीं ती जगाची माता सतुष्ट झाली व तिला स्वप्नामध्यें म्हणाली " अगे कल्याणि देवकि, आता पुत्रशोक टाक २२. ज्यास शंकरानें वर दिला आहे असा बलवान् पण मूर्ख जम्बुकराजा जेव्हा त्याचे बलि देण्याकरिता होम करील तेव्हा मी त्यास मोहित करून व तुझ्या पुत्रास सोडवून तुला विजय देईन. दुःख करण्याकडे मनाची प्रवृत्ति होऊं देऊ नको. " हें ऐकून ती साध्वी देवी महेश्वरीस नमस्कार करून तिची धूप, दीप व उपहार यान्या योगानें यथाविधि पूजा करिती झाली २३–२५. इतक्यामध्ये राजा देवमायेनें मोहित झाला व त्या होमामध्येच निजला. त्याबरोबर ते बंधरहित झाले व त्यानीं लोखंडी दृढ शृंखलानीं त्या जम्बुकराजास बांधिलें. तात्पर्य, ते त्यास बांधून लागलेच निर्भयपणें देवकीकडे गेले २६,२७.

योरुभयोस्तदा । तालनाद्याश्च चत्वारो हत्वा तां रिपुवाहिनीम् २९ त्रीञ्छत्रून्कोष्ठुकीकृत्य स्वशस्त्रैर्जघ्नुरूर्जिताः । एवं दिनानि कतिचित्तत्र जातो महारणः १३० कालियो दुखितो भूत्वा सस्मार मनसा हरम् । मोहन मन्त्रमासाद्य मोहयामास तान्रिपून् ३१ एतस्मिन्नन्तरे देवी देवकी पतिदेवता । पातव्रत्यस्य पुण्येन सुतान्तिकमुपागता ३२ बोधयित्वा तु कृष्णांशं पञ्चशब्दगजस्थितम् । पुनस्तुष्टाव जननीं सर्वविश्वविमोहिनीम् ३३ तदा तुष्टा स्वयं देवी बोधयामास तान्मृदा । आह्लाद सूर्यवर्माणं कालियं च ततोऽनुजः ३४ जघान बलखानिस्तं तुन्दिल जम्बुकात्मजम् । ते तु पूर्वभवे विप्र जरासन्धः स कालिय ३५ द्विविदो वानरः शूरः सूर्यवर्मेह चाभवत् । त्रिशिरास्तुन्दिलो जातः शृगालः स च जम्बुकः ३६ नित्यवैरकराः सर्वे भूपाश्चासन्महीतले । हतेषु शत्रुपुत्रेषु देवकी जम्बुक रिपुम् ३७ खड्गेन तर्जयामास पतिशोकपराधणा । कृष्णांशः शिरसी पित्रोर्गृहीत्वा स्नेहकातरः ३८ जम्बुकस्येव हृदये स्थापयामास विह्वलः । विह्वस्य तौ तदा तत्र नोचतुर्वचन प्रियम् ३९ चिर जीव हि कृष्णांश गयां कुरु महामते । इति वाणी तयोर्जाता बलिनोः प्रेतदेहयोः १४० खड्गहस्ता च सा देवी शिलायन्त्रे तु त रिपुम् । संस्थाप्य चोदयामास स्वपुत्रान्हर्षसंयुता ४१ हे पुत्रा. स्वपितुः शत्रुं जम्बुकं पुरुषाधमम् । खण्डं खण्डं च तिलशः कृत्वानन्दसमन्विताः ४२ संचूर्णयत तद्वाज तत्तैलैर्मर्दनिर्मितैः। स्नास्याम्यहं ततस्त्युक्त्वा रुरोद जननी भृशम् ४३तथा कृत्वा तु ते पुत्रा महिषीं ससुतां तदा।बलखानियुतास्तत्राहूय चक्रुश्च तत्क्रियाम्४४तदा परिमलं राज्ञी दृष्ट्वा स्वामिनमातुरम् ।

इतक्यात तेथें कालियादिक तीन पुत्र तीन लक्ष सैन्य घेऊन युद्धास आले २८. तेव्हा त्या दोन्ही सैन्यामध्यें पुनरपि घोर युद्ध झाले. तालनादि चार शूर त्या शत्रुसैन्यास मारून व तीन शत्रूंस पकडून ते बलाढ्य त्यास आपल्या शस्त्रांनीं मारिते झाले. ह्याप्रमाणे तेथें कित्येक दिवस मोठें युद्ध झालें २९,३०. तेव्हा कालिय दुःखित होऊन मनाने हरीचे स्मरण करिता झाला व मोहन मत्र प्राप्त करून घेऊन त्या शत्रूंस मोहित करिता झाला ३१. इतक्यामध्यें पति हीच जिची देवता आहे अशी देवकी देवी पातिव्रत्याच्या पुण्याने पुत्राजवळ आली ३२. तिनें पचशब्दगजावर बसलेल्या कृष्णाशास सावध केलें व पुनरपि सर्व विश्वास मोहित करणाऱ्या मातेची स्तुति केली ३३. तेव्हा संतुष्ट झालेली देवी स्वतः त्यास आनंदानें सावध करिती झाली. नंतर आल्हाद सूर्यवर्म्यास, त्याचा धाकटा भाऊ कालियास व बलखानि त्या जम्बुकपुत्र तुंदिलास मारिता झाला. हे ब्राह्मणा, ते पूर्वजन्मीं कोण होते तें सागतों. तो कालिय जरासध होता. जो शूर द्विविद वानर होता तो या जन्मीं सूर्यवर्मा झाला. त्रिशिरा तुंदिल झाला व शृगाल जम्बुक झाला ३४–३६ व ते सर्व नित्य वैर करणारे भूलोकी राजे झाले. शत्रूचे पुत्र मरण पावले असता पतीच्या शोकामध्यें निमग्न झालेली देवकी जंबुक शत्रूस खड्गानें भिवविती झाली. तेव्हा प्रेमामुळे विव्हल झालेला कृष्णाश उभय पितरांचीं मस्तके घेऊन तीं जम्बुकाच्या हृदयावर ठेविता झाला. तेव्हा ते दोघ हंसून त्यास असें प्रिय वचन बोलले ३७-३९ " बा कृष्णाशा, दीर्घायुषी हो. बा बुद्धिमाना. गया कर. " ह्याप्रमाणें ह्या बलाढ्य मृत देहाची वाणी झाली ४०. नंतर जिच्या हातात खड्ग आहे अशी ती देवी त्या शत्रूस शिलायंत्रावर ठेवून हर्षयुक्त होत्साती आपल्या पुत्रास ह्मणाली ४१ " पुत्रानों, ह्या आपल्या पितृघातक पुरुषाधम जंबुक शत्रूचे तिळाएवढे तुकडे तुकडे करून आनंदाने युक्त व्हा व नंतर त्याचें शरीर वाटा. त्याच्या मदापासून निघालेल्या तेलानें मी स्नान करणार आहें. " हें ऐकून ' बरें आहे ' असें ते ह्मणाले व त्यावेळीं ती माता अतिशय रडली ४२,४३. त्याप्रमाणें करून

मरणायोन्मुख विभ पश्चात्वमगमन्मुने ४५ ततस्तु खड्गमादाय बलखानिभुजं प्रति । कृत्वा तु मूर्छयित्वा तं तत्पक्षानन्वयावत ४६ तालनं देवसिंह च रामांश च तथाविधम् । कृत्वाऽन्यांश्च तथा शत्रूनगच्छत्कुलकातरा ४७ कृष्णांश मोहयित्वाशु मायया च समाहरत् । हते तत्र शते शूरे बलखानिरमर्षितः ४८ तच्छिरश्च समादाय चितायां च समाक्षिपत् । तदा वाणी समुत्पन्ना बलखाने शृणुष्व भोः ४९ अवध्या च सदा नारी त्वया वध्या ह्यधार्मिणा । फलमस्य विवाहे त्वे भोक्तव्यं पापकर्मणः १५० इति श्रुत्वा तदा दुःखी बलखानिर्ययौ पुरम् । ततस्तु सैनिकाः सर्वे महाहर्षसमन्विताः । शत द्वयवरवाजानि लुण्ठायत्वा धनानि च ५१ महावर्ती समाजग्मुः कृतकृत्यत्वमागताः । हत्वा तैश्चार्धसैन्यैः सहिता गेहमाययुः १५२ [११४०] इति श्रीभविष्य महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये द्वादशाऽध्यायः ॥ १२ ॥

ऋषय ऊचुः ॥ कस्मिन्मास्यभवद्युद्धं तयोः कति दिनानि च । तत्पश्चात्स्वपुरीं प्राप्य तदा किमभवन्मुने ? सूत उवाच ॥ पौषमास्यभवद्युद्धं तयोः शतदिनानि च । ज्येष्ठे मासि गृहं प्राप्ता दध्नुर्वाद्यान्यनेकशः २ श्रुत्वा परिमलो राजा स्वसुताञ्जयिनो बलीन् । ददौ दानानि विप्रेभ्यः सुखं जातं गृहे गृहे ३ इति श्रुत्वा महीराजो बलखानिं महाबलम् । तत्रागत्य नमस्कृत्य वचनं प्राह नम्रधीः ४ अर्धकोटिमितं द्रव्यं मत्तः प्राप्य सुखी भव । माहिष्मत्याश्च राष्ट्रं

बलखानीसह ते पुत्र राणीस व तिच्या कन्येस तेथें बोलावून त्याची क्रिया करिते झाले ४४. तेव्हा आपला स्वामी व्याकुळ झाला आहे असें पाहून त्याची राणी मरणोन्मुख झाली व हे ब्राह्मणा, बा मुने, ती मरण पावली ४५. पण त्याची कन्या खड्ग आणून त्याचा प्रहार बलखानीच्या बाहूवर करून व त्यास मूर्च्छित करून त्याच्या पक्षातील लोकावर चाल करून गेली ४६ तालन, देवसिंह व रामाश यास, त्याचप्रमाणे दुसऱ्याही शत्रूस मूर्च्छित करून ती कुलभयकर कन्या मायेने कृष्णाशासही मोहित करून त्याचें हरण करिती झाली. त्यासमयीं शंभर वीर मृत झाले असता रागावलेला बलखानि तिचे मस्तक तोडून चितेत टाकिता झाला. त्याबरोबर अशी वाणी झाली " हे बलखाने, ऐक ४७–४९. स्त्री सर्वदा अवध्य आहे; पण तू अधर्मी पुरुषाने तिला मारिलेंस. तरी या पापकर्माचे फल आपल्या विवाहामध्यें तू भोगशील " ५०. हें ऐकून दुःखी झालेला बलखानि आपल्या नगरी गेला. तदनंतर सर्व सैनिक महाहर्षयुक्त झाले. शंभर उंटावर वाहून नेण्याइतके धन लुटून ९१ ते कृतकृत्य झालेले वीर महावतीस गेले. तात्पर्य, मरून बाकी राहिलेल्या अर्ध्या सैन्यासह ते स्वगृही गेले १९२. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥

ऋषि ह्मणतातः—बा मुने, त्याचें कोणत्या महिन्यामध्ये व किती दिवस युद्ध झालें आणि त्यानंतर आपल्या नगरीस आल्यावर काय झालें ? सूत ह्मणतातः— पौष महिन्यात युद्ध सुरूं झाले व तें शंभर दिवस चालले होतें. ते ज्येष्ठमासीं गृहीं परत आले व त्यानी अनेक प्रकारें वाद्यें वाजविलीं १,२. आपले बलवान् पुत्र विजयी झाले आहेत असें ऐकून परिमल राजा ब्राह्मणास दाने देता झाला व घरोघर सुख झाले ३. हे ऐकून ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो महीराज, महाबलाढ्य बलखानीकडे येऊन त्यास नमस्कार करून असे ह्मणाला ४ " मजकडून अर्धकोटि द्रव्य घेऊन तूं सुखी हो व हे वीरा, मला माहिष्मतीचे राष्ट्र दे. तुला नमस्कार

म देहि वीर नमोऽस्तु ते ५ वर्षे वर्षे च तद्द्रव्यं गृहाण बलवन्प्रभो ॥ इति श्रुत्वा तथा मत्वा बलखानिर्गृहं ययौ ६ वयस्त्रयोदशाब्दे च कृष्णांशो बलवत्तरः । यथा जाता हरेर्लीला भृगुश्रेष्ठ तथा शृणु ७ भाद्रे शुक्ले त्रयोदश्यां चाह्लादः सानुजो ययौ । गयार्थे धनमादाय हस्त्यश्वरथसङ्कुलम् ८ कृष्णांशो बिन्दुलारूढो वत्सजो हरिणीं स्थितः । देवः पीहकारूढः सुखखानिः करालके९ चत्वारो दिदिनान्ते च गयाक्षेत्रं समाययुः ॥ पूर्णिमान्ते पुरस्कृत्य षोडशश्राद्धकारिणः १० शताच्छतान्गजांश्चैव भूषितांश्च रथांस्तथा । ददुर्हयान्सहस्रं च हेममालाविभूषितान् ११ गावो हिरण्यरत्नानि वासांसि विविधानि च । दत्त्वा ते सफलीभूता स्वगेहाय दधुर्मनः १२ लक्षावर्तिस्तु या वेश्या ययौ बदरिकाश्रमम् । प्राणांस्तत्र परित्यज्य साऽप्सरत्वमुपागता १३ राकाचन्द्रे तु सग्रासे राहुग्रस्ते तमोमये । काश्यां समागता भूपा नानादेश्याः कुलैः सह १४ हिमालयगिरौ रम्य नानाधातुविचित्रिते । तत्र शार्दूलवंशीयो नत्रसिंहो महीपतिः १५ रत्नभानौ हते शूरे नेत्रसिंहो भयातुरः । नवतुङ्गे ममासाद्य तोषयामास वासवम् १६ द्वादशाब्दान्तरं देवो ददौ ढक्कामृतं मुदा । पार्वत्या निर्मितो ग्रस्तु वासवाय स्वसेविने १७ ददौ ढक्कामृतं राज्ञे पुनः प्राह शुभं वचः । अस्य शब्देन भूपाल त्वत्सैन्यं जीवयिष्यसि १८ क्षयं शीघ्रं गमिष्यन्ति शत्रवस्ते महाभटा । प्राप्ते ढक्कामृते तस्मिन्नत्रसिंहो महाबलः १९ नगरं कारयामास तत्र सर्वजनैर्युतम् । योजनान्ते चतुर्द्वारे दुरावर्षैः सदा २० नेत्रसिंहगढ नाम्ना विख्यात भारते भुवि । काश्मीरान्ते कृतं राज्य तेन शूरसमन्तत. २१ पालित नेत्रसिंहेन तत्पुरं

असो ९. हे बलाढ्य प्रभो, प्रतिवर्षी तेवढें द्रव्य घे. " हे ऐकून व तें त्याचें ऋणणें मान्य करून बलखानि गृहीं गेला ६. अतिशय बलाढ्य कृष्णाशाचें वय तेरा वर्षाचे झाले असता हरीची लीला कशी झाली तें, हे भृगुश्रेष्ठा, ऐक ७. भाद्रपद शुक्ल त्रयोदशीस आल्हाद आपल्या भावासह हत्ती, अश्व व रथ यानीं युक्त असें धन घेऊन गयेची यात्रा करण्याकरिता गेला ८. कृष्णाश बिंदुलावर बसून, वत्सज हरिणीवर आरूढ होऊन, देवसिंह पपीहकावर चढून व सुखखानि करालकावर बसून चालला. दोन दिवसानीं ते चौघे गयाक्षेत्रीं पोंचले. पूर्णिमेस आरंभ करून ते सोळा श्राद्धे करिते झाले ९,१०. शंभर शंभर गज, तसेच सुशोभित रथ व सुवर्णमालानीं अत्यंत अलंकृत असे हजार घोडे त्यानीं दिले ११. गाथी, सोने, रत्नें व नानाप्रकारचीं वस्त्रे देऊन ते उत्तम फलयुक्त होत्साते आपल्या घरी जाण्याचा विचार करूं लागले १२. पण लक्षावर्ति ह्मणून जी वेश्या होती ती बदरिकाश्रमास गेली व तेथें प्राणत्याग करून ती अप्सराभावास प्राप्त झाली १३. पुढें पौर्णिमेचा चंद्र उदय पावला असता व त्यास राहूनें ग्रासून टाकल्यामुळें सर्वत्र तम पसरले. तेव्हा अनेक देशातील राजे आपल्या कुलासह काशींत आले १४. अनेक धातूंनीं विचित्र झालेल्या रम्य हिमालयपर्वतावर शार्दूलवंशातील नेत्रसिंह राजा होता १५. शूर रत्नभानु मेला असता तो भयभीत झाला व त्यानें नवतुंगावर जाऊन इंद्रास संतुष्ट केलें. बारा वर्षान्या अवधींत संतुष्ट झालेला तो देव त्यास आनंदानें ढक्कामृत देता झाला. तो पार्वतीनें निर्माण करून आपली सेवा करणाऱ्या इंद्रास दिलेला होता १६,१७. असो. तो ढक्कामृत राजास देऊन इंद्र पुनरपि शुभ वचन ह्मणतो " राजा, याच्या नादानें तुझें सैन्य जिवंत होईल १८ व महाशूर असेही तुझे शत्रु लवकरच क्षय पावतील." असो. तो ढक्कामृत प्राप्त झाला असतां महाबलाढ्य नेत्रसिंह तेथे सर्व जनानीं युक्त असे नगर करविता झाला. तें योजनभर दूर होतें. त्यास चार द्वारें होतीं व शत्रूंस ते सर्वदा अजिंक्य होतं १९,२०. तें नगर नेत्रसिंहगढ या नावाने भारतभूमींत प्रसिद्ध झालें. त्याने आपलें राज्य त्या शूरान्या समोवार

पुत्रवन्मुने । नेत्रपाल इति ख्यातो ग्रामोऽसौ दुर्गमः परैः २२ सोऽपि राजा समायातो नेत्रसिंहो महाबलः । कन्या स्वर्णवती तस्य रेवतीयंथसमन्विता २३ कामाक्ष्या वरदानेन सर्वमायाविशारदा। दृष्ट्वा तां सुन्दरीं कन्यां बालेन्दुसदृशाननाम् २४ मूर्छितश्चाश्वाभवद्भूपो रूपयौवनमोहितः । दृष्ट्वा तां च यथाह्लादः सर्वरत्नविभूषिताम् २५ षोडशाब्दवयोयुक्तां कामिनीं रतिरूपिणीम् । मूर्छितश्चापतद्भूमौ सा त दृष्ट्वा मुमोह वै २६ दोलामारुह्य तत्सख्यौ नृपान्तिकमुपाययुः । आल्हादस्तु समुत्थाय मुह्यमोहत्वमागतः २७ दृष्ट्वा तथाविध बन्धु कृष्णांशः प्राह दुःखितः । किमर्थं मोहयामास भवांस्तत्त्वविशारदः २८ रजोरागात्मक विद्धि प्रमादं मोहजं तथा । ज्ञानासिना शिरस्तस्य छिन्धि त्वमजितः सदा २९ इति श्रुत्वा वचो भ्रातुस्त्यक्त्वा मोहं ययौ गृहम् । भोजयित्वा द्विजश्रेष्ठान्सहस्रं वदतत्परान् ३० दुर्गामाराधयामास जप्त्वा मध्यचरित्रकम् । आसान्ते च तदा देवी दत्त्वाऽभीष्टं हृदि स्थितम् ३१ मोहयामास तां कन्यां विवाहार्थमनिन्दिता । स्वप्ने ददर्श सा बाला रामांशं देवकीसुतम् ३२ प्रातर्बुद्ध्वा तु संचिन्त्य महामोहमुपाययौ । स्मृत्वा च कामाक्षीं सर्वाभीष्टप्रदायिनीम् ३३ पौषमासे तु सप्राप्ते शुककण्ठे सुपत्रिकाम् । बद्ध्वा च प्रेषयामास शुकं पत्रस्थितं प्रियम् ३४ स गत्वा पुष्पविपिनं महावतिपुरीस्थितम् । नरशब्देन वचनं कृष्णांशाय शुकोऽब्रवीत् ३५ वीर तेऽवरजो बन्धुर्नाम्नाल्हादो महाबलः । तस्मै हि प्रेषिता पत्री स्वर्णवत्या हितप्रदा ३६ तां ज्ञात्वा च पुनस्तस्या

काश्मीरापर्यंत वाढविले व नंतर, बा मुने, नेत्रसिंहानें त्या नगरातील जनाचे पुत्राप्रमाणें पालन केलें. हा नवीन ग्राम नेत्रपाल या नावाने प्रसिद्ध झाला व तो शत्रूंस दुर्गम असे २१,२२. असो. तो महाबलवान् नेत्रसिंह राजाही तेथे आला. रेवर्तान्या अंशापासून उत्पन्न झालेली त्याची स्वर्णवती म्हणून कन्या होती २३. कामाक्षीच्या वरदानामुळें ती सर्व मायेमध्यें निपुण असे. उदय पावलेल्या चंद्राप्रमाणें जिचे मुख आहे अशा त्या सुंदर कन्येस पाहून रूप व तारुण्य यांच्या योगानें मोहित झालेले राजे मूर्छित झाले. त्याचप्रमाणें सर्व रत्नांनीं भूषित, सोळा वर्षांच्या वयाची, रतिरूपी व कामनायुक्त अशा त्या कन्येस पाहून आल्हाद मूर्च्छित होऊन भूमीवर पडला व तीही त्यास पाहून मोहित झाली २४-२६. नंतर मेण्यामध्यें बसून तिच्या दोन सख्या राजाजवळ आल्या. इकडे आल्हादही सावध झाला व उन्मत्तासारिखें करूं लागला २७. आपल्या बंधूची अशी अवस्था झाली आहे हें पाहून कृष्णांश अतिशय दुःखी झाला व म्हणाला 'तूं कशाकरिता मोहित होतोस? तूं तर तत्त्वज्ञ आहेस २८. रजोगुण प्रेमरूप आहे व प्रमाद मोहापासून होत असतो असें जाण. ज्ञानरूप तरवारीनें त्याचे शिर छेदून टाक. कारण, तू सर्वदा अजिंक्य आहेस' २९. हे भ्रात्याचें वचन ऐकून व मोहाचा त्याग करून तो गृहीं गेला. वेदामध्यें तत्पर असलेल्या सहस्र श्रेष्ठ ब्राह्मणास भोजन घालून व मध्यचरित्राचा जप करून तो दुर्गेची आराधना करिता झाला. एका महिन्याच्या शेवटीं देवी त्याच्या मनातील अभीष्ट देऊन ३०,३१ ती अनिंद्य माता त्या कन्येस विवाहाकरिता मोहित करिती झाली. स्वप्नामध्यें त्या कन्येनें रामाचा अंश असा जो देवकीपुत्र त्यास पाहिलें ३२. प्रातःकाळीं ती जागी झाली व विचार करून मोहित झाली. तेव्हां सर्व अभीष्ट देणाऱ्या कामाक्षीचें ध्यान करून ३३ पौषमास आला असता शुकाच्या कंठात उत्तम पत्रिका बांधून त्या पत्रयुक्त प्रिय शुकास तिनें पाठविलें ३४. तो महावतिनगरात असलेल्या पुष्पाच्या उपवनात जाऊन कृष्णांशास मनुष्यवाणीनें म्हणाला ३५ 'हा वीरा, तुझा जो आल्हाद म्हणून मोठा बलवान् धाकटा भाऊ आहे त्यास हितकर अशी ही पत्रिका स्वर्णवतीनें धाडली आहे ३६. ती पाहून पुनः तिचें उत्तर मला दे. कारण, ते मला प्रिय आहे. किंवा पत्र लिहून ते तू

उत्तरं देहि मत्पितयम् । अथवा पत्रमालिख्य तत्त्वं मे कुरु कण्ठके ३७ इति श्रुत्वोदयो वीरो गृहीत्वा पत्रमुत्तमम् । ज्ञातवांस्तत्र वृत्तान्तमाह्लादाय पुनर्ददौ ३८ जम्बुकश्च नृपो वीरो रुद्रदत्तवरो बली । अजेयोऽन्यनृपैर्वीर त्वया युधि निपातित ३९ तथाविधं मत्पितरमिन्द्रदत्तवरं रिपुम् । तवेमं जहि सङ्ग्रामे मम पाणिग्रहं कुरु ४० इति ज्ञात्वा स आह्लादस्तामाश्वास्य हृदि स्थिताम् । शुककण्ठे बबन्धाशु लिखित्वा पत्रमुत्तमम् ४१ स शुकः पन्नग. पूर्वं पुण्डरीकेण शापितः । रेवत्यंशस्य कार्यं च कृत्वा मोक्षमवागत ४२ मृते तस्मिञ्छुके रम्ये देवी स्वर्णवती तदा । दाहयित्वा ददौ दानं विप्रेभ्यस्तस्य तृप्तये ४३ माघमासि च संप्राप्ते पञ्चम्यां कृष्णपक्षके । आह्लादः सप्तलक्षैश्च सैन्यैः सार्धं ययौ मुदा ४४ तालनाद्याश्च ते शूराः स्व स्व वाहनमाश्रिताः । आह्लाद रक्षयन्तस्ते ययुः पञ्चदशाहनि ४५ वङ्गदेश समुल्लङ्घ्य शीघ्रं प्राप्ता हिमालयम् । रूपणं पत्रकर्तारं बलखानिरुवाच तम ४६ गच्छ त्वं वीर कवची कराला श्वसमास्थितः । पञ्चशस्त्रसमायुक्तो राजानं शीघ्रमावह ४७ युद्धचिह्नानि कृत्वा मामागच्छ त्वरान्वितः । तथा मत्वा शिखण्ड्यंशो ययौ शीघ्र स रूपणः ४८ स ददर्श सभां राज्ञो बहुशूरसमन्विताम् । पार्वतीयैर्वृतैः सार्द्धं सहस्रैर्बलवत्तरैः ४९ स उवाच नृपश्रेष्ठ नेत्रसिंह महाबलम् । त्वत्सुतायाः विवाहाय बलखानिर्महाबलः ५० सप्तलक्षबलैर्युक्त आप्तस्तव राष्ट्रके । तस्मात्त्व स्वसुतां शीघ्रमाह्लादाय समर्पय ५१ शुल्कं मे देहि नृपते युद्धरूप सुदारुणम् । इति श्रुत्वा वचस्तस्य स राजा क्रोधमूर्च्छितः ५२ पट्टनाधिपमाज्ञाय भूप पूर्णबल रुषा । अरुधत्स कपाटं च तस्य बन्धनहे-

---

माझ्या कंठामध्यें बाध ' ३७. हें ऐकून तो उदय वीर तें उत्तम पत्र घेऊन त्यांतील मजकूर जाणता झाला. व पुनरपि त्यानें तें आल्हादास दिले ३८ 'रुद्रानें ज्यास वर दिला आहे असं' जम्बुक बलाढ्य व दुसऱ्या राजास अजिंक्य होता. पण, बा वीरा, तूं त्यास युद्धामध्यें मारिलेंस३९. त्याच प्रकारच्या व इंद्रानें ज्यास वर दिला आहे अशा या तुझ्या शत्रुरूपी माझ्या पित्यास संग्रामामध्यें मारून तूं माझें पाणिग्रहण कर ' ४०. हें वाचून व हृदयामध्यें बसलेल्या तिचें आश्वासन करून आल्हाद उत्तम पत्र लिहून लागलच त्या शुकाच्या कंठात बाधिता झाला ४१. तो शुक पूर्वी सर्प होता व त्यास पुंडरीकानें शाप दिला होता. पण रेवतीच्या अंशाचें कार्य करून तो शापापासून मुक्त झाला ४२. तो रम्य शुक मरण पावला असता देवी स्वर्णवती त्याचे दहन करून त्याच्या तृप्त्यर्थ ब्राह्मणास दाने देती झाली ४३. पुढें माघमास लागला असता कृष्णपक्षातील पंचमीच्या दिवशी आल्हाद सात लक्ष सैन्य बरोबर घेऊन आनदानें निघाला. तालनादि ते शूर आपापल्या वाहनावर आरूढ होऊन आल्हादांच रक्षण करीत पधराव्या दिवशी निघाले४४,४५. बंगदेशाच उल्लघन करून ते लागलेंच हिमालयावर पोंचले. बलखानि पत्रकर्ता जो रूपण त्यास म्हणाला " बा वीरा, तूं कवच चढवून व कराल घोड्यावर बसून पाच शस्त्रानीं युक्त होत्साता जा व राजास त्वरित बोलाव आणि युद्धीचन्ह करून लवकर मजकडे ये. " तेव्हा " बरं आहे " असे म्हणून तो शिखंडीचा अंश रूपण त्वरेने गेला४६-४८. त्यानें पर्वतावरील हजारों बलाढ्य राजासह अनेक शूरानीं युक्त अशी ती राजाची सभा पाहिली ४९. तो महाबलाढ्य व राजातील श्रेष्ठ नेत्रसिंहास म्हणाला " तुझ्या कन्येन्या विवाहाकरिता बलाढ्य व सात लक्ष सैन्यानें ज्याचें रक्षण केलें आहे असा बलखानि तुझ्या राष्ट्रात आला आहे. यास्तव, तूं आपली कन्या आल्हादास लवकर दे५०,५१ व हे राजा, मला अतिभयंकर युद्धरूप शुल्क (हुंडा) दे. " असें त्यांचें वचन ऐकून तो राजा क्रोधानें विवेकशून्य झाला ५२ व रागानें ज्याच्यामध्यें पूर्ण बल होत अशा पट्टनाधिपास आज्ञा करून त्यास बाधण्याकरिता त्यानें

तत्रे ५३ पाशहस्तान्शूरशतान्पट्टनाधिपरक्षितान् । दृष्ट्वा स रूपणो वीरः खड्गयुद्धमचीकरत् ५४ हत्वा तन्मुकुटं राज्ञो गृहीत्वाकाशगो बली । बलखानिं तु संप्राप्य चिह्नं तस्मै न्यवेदयत् ५५ इति श्रुत्वा प्रसन्नात्मा सप्तलक्षदलैर्युतः । अरुधन्नगरीं सर्वां नेत्रसिंहेन रक्षिताम् ५६ नेत्रसिंहस्तु बलवान्पार्वतीयैर्नृपैः सह । हिमनद्भतल प्राप्य युद्धार्थी तान्समाह्वयत् ५७ सहस्रं च गजास्तस्य हया लक्ष महाबलाः । सहस्रं च नृपाः शूराश्चतुर्लक्षपदातिभि ५८ योगसिंहो गजैः सार्द्धं बलखानिं समाह्वयत् । भोगसिंहो हयैः सार्द्धं कृष्णांशं च समाह्वयत् ५९ विजयो नृपपुत्रश्च सर्वभूपतिभिः सह । देवसिंहस्तथा म्लेच्छं रूपणं च समाह्वयत् ६० तयोश्चासीन्महद्युद्ध सेनयोस्तत्र दारुणम् । निर्भयाश्चैव ते शूराः पार्वतीयाः समन्तत ६१ जघ्नुस्ते शात्रवीं सेनां द्विलक्षां वीरपालिताम् । प्रभग्न स्वबल दृष्ट्वा चत्वारो मदमत्तराः ६२ दिव्यानश्वान्समारुह्य चक्रुः शत्रोर्महद्धम । पुनरुज्जीवितास्ते सर्वे ढक्कामृतरवाद्बलाः ६३ युद्धाय समुख जग्मुर्भृगुश्रेष्ठ पुनः पुनः । अहोरात्रं रणं चासीत्तेषां तत्रैव दारुणम् ६४ एव सप्ताह्नि सजाते युद्धे भीरुभयङ्करे । उपायैर्बहुभिर्वीराश्चक्रुश्चैव रणं बहु ६५ पुनस्ते जीवमापन्नाजघ्नुस्तान्रिपुसैन्यपान् । तालनाद्यास्तु ते शूरा दुःखितास्तत्र चाभवन् ६६ निराशा विजये प्राप्य कृष्णांशं शरणं ययुः । तानाश्वास्य स कृष्णांशस्तत्र दिव्यहये स्थितः६७नभोमार्गेण बलवान्स्वर्णवत्यन्तिकं ययौ। हर्म्यापरि स्थितां देवीं सर्वशोभासमन्विताम् ६८ नत्वावाच वचः श्लक्ष्णं किङ्करोऽहमिहोदयः । शरण्यां त्वामुपागम्य कामाक्षीमिव भामिनि ६९ वृत्तान्तं कथयामास यथासीच्च महारणः । श्रमेण कर्शिता वीरा निराशां प्रति चागमन् ७०

कपाट बंद करविलें ५३. पट्टनाधिपानें ज्याचें रक्षण केले आहे व ज्याच्या हातात पाश आहेत अशा शंभर वीरास पाहून तो रूपण वीर खड्गयुद्ध करिता झाला ५४. तो बलवान् त्यास मारून राजाचा मुकुट घेऊन आकाशात गेला व बलखानीकडे येऊन त्याने त्यास चिन्ह दाखविलें ५५. सर्व वर्तमान ऐकून ज्याचें मन प्रसन्न झाले आहे असा तो सात लक्ष सैन्यासह नेत्रसिंहानें रक्षिलेल्या सर्व नगरास वेढा देता झाला ५६. तेव्हा बलाढ्य नेत्रसिंह पर्वतातील राजासह युद्धाच्या इच्छेनें हिमालयाच्या उंचवट्यावर त्यास बोलविता झाला ५७. त्याचें सहस्र गज, महाबलाढ्य लक्ष घोडे, हजार शूर राजे व चार लक्ष पायदळ इतकें सैन्य होतें. गजावरोबर असलेला योगसिंह बलखानीस बोलाविता झाला. घोड्याचा नायक भोगसिंह कृष्णाशास बोलाविता झाला ५८,५९.राजाचा पुत्र विजय सर्व राजांसहवर्तमान देवसिंह व त्याचप्रमाणे म्लेच्छ रूपण यास बोलवू लागला ६०. त्या दोन्ही सैन्याचें तेथें फार मोठे व भयंकर युद्ध झालें. ते पहाडी वीर सर्व बाजूंस निर्भय होत्साते वीरानें रक्षिलेल्या शत्रूच्या दोन लक्ष सैन्यास मारिते झाले. पण आपले सैन्य पराभूत झालें आहे असे पाहून ते अतिशय मदोन्मत्त चार वीर ६१,६२ आपल्या अलौकिक घोड्यावर बसून शत्रूचे मोठें कदन करिते झाले. पण ढक्कामृताच्या शब्दानें ते सर्व बलाढ्य वीर जिवंत झाले ६३ व बा भृगुश्रेष्ठा, वारंवार ते युद्धाकरिता आले. तेथें त्याचे भयंकर युद्ध अहोरात्र झालें६४.याप्रमाणें भयंकर युद्ध सात दिवस झालें असता अनेक वीर अनेक उपायानीं बहुत युद्ध करू लागले ६५. पुनरपि ते जीवंत होऊन त्या शत्रुसैन्यास मारिते झाले. तेव्हा ते तालनादि वीर तेथें अतिशय दुःखित झाले ६६ व विजयाविषयीं निराश होऊन ते कृष्णाशास शरण गेले. तो कृष्णाश त्याचें समाधान करून दिव्य घोड्यावर बसला ६७ व आकाशमार्गाने तो बलवान् स्वर्णवतीजवळ आला. ती सर्वशोभायुक्त देवी मंदिराच्या गच्चीवर होती. तिला नमस्कार करून तो मधुर असें वचन बोलू लागला " मी हा किंकर उदय येथे आलो आहें. हे भामिनि, कामाक्षीप्रमाणे मी आश्रयास योग्य असलेल्या तुला शरण आलो आहे. " नंतर महायुद्ध

माह त्वोदयसिंह त्वं कामाख्या मन्दिरं व्रज । अहं च स्वालिभि सार्धं नवम्यां पूजने रता ७७ ढक्कामृतस्य वाद्येन पूजये सर्वकामदाम् । इति श्रुत्वा स बलवान्स्वसैन्य प्रति चागमत् ७८ अर्धशेषां रणात्तेनां पराजित्य च दुद्रुवुः । पट्टनाख्यपुरे प्राप्ता भयभीता महाबलाः ७९ पराजिते रिपौ तस्मिन्नेत्रसिंहः सुतैः सह । गृहमायत्य बलवान्विप्रेभ्यो गोधन ददौ ८० नवम्यां पितरं प्राह देवी स्वर्णवती तदा । कामाक्षीसेवनेनाशु कुरु याजोत्सव मम ८१ यत्प्रसादाच्च विजयी दुर्जयेभ्योऽभवद्बली । इति श्रुत्वा पिता प्राह स्वप्नो दृष्टस्तथा मया ८२ पूजनान्मङ्गल राज्ञां ना चेद्विघ्नो हि शोभन । पित्रेत्थं निशायां तु स्व सुता पितुराज्ञया ८३ ढक्कामृतस्य वाद्येन कामाक्षीमन्दिर ययौ । कृष्णांशो माहनकारस्य वधूर्मुग्धा समागतः ८४ ढक्कामृत च नारीभ्यो गृहीत्वा त्वरितो ययौ । एतस्मिन्नन्तरे वीराः षष्टिवाहनसंवृताः ८५ ढक्कार्थे ययुः शीघ्रं सर्वशस्त्रैः समुद्यताः । तानागतान्स बलवान्दृष्ट्वा खड्गं गृहीतवान् ८६ पञ्चषञ्चारिताञ्छूरानननयत्यमसादनम् । कृष्णांशस्त्वरितो गत्वा रूपणं यत्र तिष्ठति ८७ ढक्कामृत च संप्राप्य हयारूढो ययौ सभाम् । हृते ढक्कामृते दिव्ये नेत्रसिंहो भयातुरः ८८ ऐन्द्रं यज्ञ तथा कृत्वा हवनाय परोऽभवत् । प्रभाते समनुप्राप्ते ते वीराः स्वबलैः सह ८९ तस्मा ययुः सर्वे गजोष्ट्रहयसंस्थिताः । दिनान्ते प्राप्तवन्तश्च यत्राभूत्स महारणः ८४ कृष्णांशः पूजयित्वा तं ददौ ढक्कामृतं बली । तच्छब्देन मृता वीराः पुनरुज्जीविता स्तदा ८५ सबलस्तबलं तस्य पुनः प्राप्त मदातुरम् । रुरोध नगरीं सर्वां दृष्ट्वा वाद्यानि नेकशः ८६

कसें झालें तें त्यानें तिला सांगितलें; ' युद्धाच्या श्रमाने वीर थकले व ते विजयाविषयीं निराश झाले आहेत ' ६८–७०. तेव्हा ती म्हणाली " बा उदयसिंहा, तूं कामाक्षीच्या मंदिरीं जा व मी आपल्या सखींसह नवमीस पूजनामध्यें रत होऊन त्या सर्व काम देणाऱ्या देवीचें ढक्कामृताच्या नादाने पूजन करीन". हें ऐकून तो बलवान् आपल्या सैन्यामध्यें आला.७१,७२व राहिलेल्या अर्ध्या सैन्यास जिंकून ते रणांतून पळाले. ते महावीर भयभीत होऊन पट्टनसंज्ञक नगरामध्ये प्राप्त झाले ७३. त्या शत्रूंचा पराजय झाला असता बलवान् नेत्रसिंह पुत्रासह गृहीं आला व ब्राह्मणास गोधन देता झाला७४.तेव्हां देवी स्वर्णवती नवमीस पित्यास म्हणाली " कामाक्षीच्या सेवनानें तू माझा पूजनोत्सव कर. तिच्या प्रसादामुळेंच तूं दुर्जेय शत्रूंस जिंकिलें आहेस. " हें ऐकून तिचा पिता म्हणाला " मीं तसे एक स्वप्न पाहिले७५,७६. पूजनाच्या योगानें राजाचें कल्याण होतें. नाहींपेक्षा, हे शोभने, विघ्नच होत असते." याप्रमाणें जिला पित्याने सांगितले आहे अशी ती रात्रीं पित्याच्या आज्ञेनें ७७ ढक्कामृताच्या वाद्यासह कामाक्षीच्या मंदिरीं गेली. कृष्णाश माळ्याची मुलगी होऊन आला ७८ व स्त्रियांच्या कडून ढक्कामृत हिसकावून घेऊन त्वरेने निघून गेला. इतक्यांत वाहनयुक्त साठ वीर ढक्कामृताकरिता सर्व शस्त्रें उपसून वेगानें निघाले. पण ते आले आहेत असे पाहून त्या बलवानाने तलवार उचलली व पंचावन्न वीरास त्याने यमसदनीं पाठविलें. नंतर रूपण जेथें होता तेथें कृष्णाश जाऊन पोंचला ७९–८१. साराश, याप्रमाणें ढक्कामृत मिळवून घोड्यावर बसून तो आपल्या लोकात गेला. दिव्य ढक्कामृत नष्ट झाला असता नेत्रसिंह भयभीत झाला८२व पूर्वीप्रमाणेंच इंद्रास उद्देशून यज्ञ करून तो हवनपरायण झाला. पण प्रातःकाल झाला असता ते सर्व वीर आपल्या सैन्यासह गज, उंट व घोडे यावर बसून वेगानें निघाले व सायंकाळीं जेथे तें मोठें रण माजलें होतें तेथें आले ८३,८४. नंतर बलाढ्य कृष्णाशानें ढक्कामृतांचें पूजन करून त्यास वाजविलें. त्याबरोबर त्याच्या शब्दानें मेलेले वीर पुनरपि जीवंत झाले ८५. त्यामुळें त्यांचें सात लक्ष मदोन्मत्त सैन्य पुनः तयार झालें. तेव्हां त्यानीं त्या सर्व नगरास वेढा दिला व अनेक प्रकारचीं वाद्यें वाजविलीं. ह्याप्रमाणें

रुद्धे तु नगरे तस्मिन्नेत्रसिंहो भयातुरः । स्वात्मानमर्पयामास बह्वौ शक्राय धीमते ८७ तदा प्रसन्नो भगवानुवाच नृपतिं प्रति । रामांशोयं च कृष्णांशो भुवि जातौ कलैकया ८८ तस्मै योग्याय सा कन्या रामांशाय यशस्विने । योगिनीयं स्वर्णवती रेवत्यंशावतारिणी ८९ इत्युक्त्वा च स्वयं देवो ढक्कामृतमुपाधियम् । हुत्वा बह्वौ समाक्षिप्य दुर्गायै सन्ददयत् ९० गते तस्मिन्सुरपतौ स राजा ब्राह्मणैः सह । महीपतिं प्रति ययौ मेदनार्थं समुद्यतः ९१ तथागतं नृप दृष्ट्वा कृष्णांशश्च महीपतिः । आह्लादमातुलः प्राह मान्यः सर्वबलैः सदा ९२ त्यजन्य स बलवानाह्लाद सानुजैः सह । मत्पक्षको न स्थितो वीरः कुले हीनत्वमागतः ९३ आर्याभीरी स्मृता तेषां किं त्वया विदितं न हि । यदि देया त्वया कन्या तर्हि त्वं हीनतां व्रज ९४ अतस्त्वं वचनं चेदं कुलयोग्यं शृणुष्व भो । चतुर्थान्बालकान्नीचांस्तालनेन समन्वितान् ९५ बध्वयित्वा विवाहार्थे शिरांस्येषां समाहर । मण्डपान्ते मख कृत्वा चामुण्डायै समर्पय ९६ त्वत्कन्यया समाहूता वीरा वै रेवती हि सा । पश्चात्कन्यां स्वयं हत्वा कुलकल्याणमावह ९७ नो चेद्बान्धव यास्येत्सकुलो जम्बुको यथा । इति श्रुत्वा स शल्यांशः सुयोधनमुखेरितम् ९८ तथेत्युक्त्वा सर्व कृत्वा मण्डपान्ते विधानतः । निरस्त्रान्पञ्च यूपांश्च पूजयित्वा तदा निशि ९९ रामशाय स्वकन्यां च दास्यामि कुलरीतिवत् । इत्युक्त्वा स ययौ सार्द्धं यशाल्हादः सबान्धवः १०० तमाह दण्डवत्पादौ नत्वाल्हादं स वै नृपः । भवन्तोंऽशावताराश्च मया ज्ञाताः सुरोत्तमाः १ दुर्गोत्सवे ययौ गेहं तद्बधाय समुद्यत । सहस्र मण्डपे भूपान्संस्थाप्य स्वबलैः

नगराचा रोध झाला असता नेत्रसिंह भयानें व्याकुल झाला. व त्यानें बुद्धिमान् इंद्रास उद्देशून आपला देह अग्नींत अर्पण केला. तेव्हा प्रसन्न झालेला भगवान् राजास ह्मणाला " रामांश व हा कृष्णांश असे दोघे भूलोकी एका कलेनें उत्पन्न झाले आहेत ८६–८८. यास्तव त्या योग्य व यशस्वी रामांशास ही योगिनी व रेवतीच्या अंशापासून झालेली स्वर्णवती योग्य आहे " ८९. असें बोलून व उमेस प्रिय असलेला ढक्कामृत हरण करून स्वत देव अग्नीमध्ये फेंकिता झाला. व त्यानें तो दुर्गेस अर्पण केला ९०. नंतर सुरपति गेला असता तो राजा ब्राह्मणांसह महीपतीकडे सख्य करण्यास तयार होऊन आला ९१. तो राजा सख्याकरिता आला आहे असें पाहून सर्व सैन्यांस सदा मान्य असा तो आल्हादाचा मामा महीपति त्यास ह्मणाला ' राजा, हा बलवान् वीर आल्हाद आपल्या अनुजासह माझ्या पंक्तींत राहिलेला नाहीं. त्याची मोठीच अपकीर्ति झालेली आहे ती तूं ऐकली नाहींस काय ? तुला जर त्यास कन्या द्यावयाची असेल तर तूंही हीनत्वास प्राप्त हो ९२–९४. यास्तव, तूं हे कुलास योग्य असलेलें वचन ऐक. या नीच तालनासह चार बालकास विवाहाकरिता फसवून त्यांची मस्तकें तोड व त्या मंडपामध्ये यज्ञ करून चामुंडादेवीस तीं मस्तकें अर्पण कर ९५,९६ तुझ्या कन्येकडून त्यास बोलीव. ती रेवती वीर आहे. नंतर त्या कन्येसही मारून कुलाचें कल्याण करून घे ९७. असें न केल्यास तूं सर्व कुलासह जम्बुकाप्रमाणें नाश पावशील'. ह्मणप्रमाणे त्या शल्याशानें सुयोधनाच्या मुखानें ऐकून ' ठीक आहे ' असे ह्मणून ' मंडपामध्ये विधानपूर्वक यज्ञ करून, अस्त्रशून्य अशा पांच यूपांचें रात्रीं पूजन करून, कुलरीतियुक्त असा मी आपली कन्या रामाशास देईन असें बोलून तो जेथें बांधवांसह आल्हाद होता तेथें सर्वांसह गेला ९८–१०० व त्या आल्हादास साष्टांग नमस्कार करून तो राजा ह्मणाला " तुम्ही ईश्वराशाचे अवतार आहां हें मीं देवाधिदेवापासून ऐकिलें आहे " १. असें बोलून त्यांच्या वधाविषयीं उद्युक्त झालेला राजा दुर्गोत्सवामध्ये आपल्या गृही गेला. मंडपामध्यें आपल्या

सह १ तालनाद्यांश्च षट् शूरान्मडपान्ते समाह्वयत् । विवाहपथमावर्ते योगसिंहोऽसिमुत्तमम् २ वरमाहत्य शिरसि जगर्ज भलवान्रुषा । तमाह तालनो धीमान्न योग्यं भवता कृतम् ४ श्रुत्वाह नेत्रसिंहस्त कुलरीतिरियं बालिन् । निरायुधैर्वरैः सार्द्धं शास्त्रिणां तुमुलो हि नः ५ इति श्रुत्वा योगसिंहं कृष्णांशस्त समारुधत् । भोगसिंहं तथा कृत्य बलखानिर्गृहीतवान् ६ विजयं तृतीयावर्ते सुखखानिर्न्यरुन्धत । चतुर्थावर्तके शत्रुं नृपं पूर्णबल शठम् ७ रूपणस्त गृहीत्वाशु युयुधे तद्बलैः सह । पञ्चमे बहुराजान तालनश्च समारुधत् ८ षष्ठावर्ते नेत्रसिंह तथाल्हादो गृहीतवान् । संग्राम तुमुले युद्धे बहुशूरा क्षयं गताः ९ निरायुधाः षड्बलिनः संदृश्य व्रण-मुत्तमम् । निरायुधान्निपून्स्वान्स्वांश्चक्र शक्तिपपूजकाः ११० एतस्मिन्नन्तरं देवः कालदर्शी समागतः । नभोमार्गेण तानश्वांस्तस्य आगत्य संददौ ११ बिन्दुल चैव कृष्णांशो देवस्तत्र मनो-रथम् । रूपणश्च करालाश्व चाल्हादस्तु पर्पाहकम् १२ हरिणीं बलखानिश्च तद्भ्राता हरिना-गम् । सिंहिनीं तालनः शूरः समारुह्य रणोद्यतः १३ रात्रौ तन्नृपतेः सेनां हत्वा बद्ध्वा च तत्पतिम् । दोलां गेहाच्च निष्काश्य सप्रभ्रमरकारिताम् १४ स्वसैन्यं ते समाजग्मुर्निर्भया बलव-न्तराः । तान्सर्वान्नेत्रसिंहादीन्दृष्ट्वा त्राहीति जल्पितान् १५ निगडैरकृतः कृत्वा पञ्च भूपान्हि बन्धकान् । कारागारं महाघोरं तत्र तान्सन्यवासयन् १६ नेत्रसिंहावरो भ्राता सुन्दरारण्यभूमिप । हृतं ज्ञात्वा ययौ शीघ्रं मायावी लक्षसैन्यकः १७ तत्रागत्य हरानन्दो नाम्ना तानयुधद्बली । नेत्र-सिंहस्य सैन्यं च चतुर्लक्षं तदाऽगमत् १८ पञ्चलक्षैः रणं घोरं सप्तलक्षयुत ह्यभूत् । पञ्चाहोरात्र-

---

सैन्यासह सहस्र राजास ठेवून २ तालनादिक सहा वीरास तो मडपामध्यें बोलाविता झाला. विवाहाच्या पहिल्या फेऱ्यामध्ये बलाढ्य योगसिंह उत्तम खड्गाचा प्रहार वराच्या मस्तकावर करून रागाने गर्जना करिता झाला. तेव्हा त्यास बुद्धिमान् तालन ह्मणाला " हें तूं योग्य केलें नाहींस " ३,४. तेव्हा त्यास नेत्रसिंह ह्मणतो " हे बलवाना, ही कुलरीति आहे. आयुधरहित वीराशीं शस्त्रयुक्त अशा आमचे तुमुल युद्ध होते " ५ असे ऐकून कृष्णांश त्या योगसिंहास प्रतिबंध करिता झाला. त्याप्रमाणे बलखानि भोगसिंहाचा निग्रह करिता झाला ६. तिसऱ्या फेऱ्यामध्यें सुखखानीने विजयास अडकविले. चवथ्या फेऱ्यामध्यें रूपण त्या पर्णबलवान्, शठ राजास अडकवून त्याच्या सैन्याशीं लढूं लागला. पाचव्या फेऱ्यांत तालन अनेक राजाचा निरोध करिता झाला ७,८. सहाव्या फेऱ्यामध्ये नेत्रसिंहास आल्हाद अडकविता झाला. ह्याप्रमाणे तुमुल युद्ध सुरू झाले असता अनेक वीर क्षय पावले. शस्त्ररहित असे ते सहा बलाढ्य व शक्तिपूजक वीर उत्तम व्रण सहन करून आपापल्या शत्रूंस आयुधरहित करिते झाले ९,१०. इतक्यात कालदर्शी देव आकाशमार्गानें आला व त्यानें त्यास ते घोडे आणून दिले ११. त्याबरोबर बिंदुलावर कृष्णांश, मनोरथावर देवसिंह, करा-लाश्वावर रूपण, पर्पाहकावर आल्हाद, हरिणीवर बलखानि, हरिनागरावर त्याचा भ्राता व सिंहिनी-वर शूर तालन आरूढ झाला आणि ते सर्व युद्धास तयार झाले १२,१३. रात्रीं त्या राजाच्या सैन्यास मारून व त्याच्या नायकास बाधून सात भ्रमराकडून करविलेली दोला (विमानासारखें वाहन) घरातून काढून ते निर्भय व बलाढ्य शूर आपल्या सैन्यात गेले. ' त्राहि ' असे ह्मणणाऱ्या त्या सर्व नेत्रसिंहादिकास पाहून १४,१५ त्यातील विश्वासघातकी पाच राजास ऐके ठिकाणीं खोडयानें बाधून तेथील महाघोर कारागारामध्यें टाकिते झाले १६. नेत्रसिंहाचा कनिष्ठ भ्राता, सुंदरारण्याचा राजा होता. हरानन्द हें त्याचें नाव असून तो हें वर्तमान समजताच लक्ष सैन्य घेऊन आला व त्या बलाढ्य मायाव्यानें त्याच्याशीं युद्ध केलें. त्यावेळीं नेत्रसिंहाचें चार लक्ष सैन्य त्यास येऊन मिळालें.

मात्रं च तयोश्चासीत्स सङ्कुलः १९ अर्द्धसैन्या रिपोस्तत्र हतशेषाश्च दुद्रुवुः । विस्मितः स हरानन्दो रुद्रमायाविशारदः १२० बलाधिक्ययुताञ्ज्ञात्वा शिवध्यानपरोऽभवत् । रचित्वा शाबरीं मायां नानारूपविधारिणीम् १ पाषाणभूतान्सकलान्कृत्वा भूपान्समाक्षयौ । ससुतं भ्रातरं ज्येष्ठं नृपं पूर्णबलं तथा २२ मोचयित्वा ययौ गेहं कृतकृत्यो महाबली । आह्लाद निगडैर्बद्ध्वा मायया जडतां गतम् २३ नेत्रसिंहः स बलवान्ययौ स्व दुर्गमुद्यतः । त प्रशस्यानुज वीरो द्विजेभ्यश्च ददौ धनम् २४ तदा स्वर्णवती दीना बद्धं ज्ञात्वा पतिं निजम् । कृष्णांशाद्यान्मोहितांश्च शम्भुमायाजहत्यनान् २५ रुरोदैवैन्तदा देवीं ध्यायती कामरूपिणीम् । तदा तुष्टा जगद्धात्री मूर्छितांस्तानबोधयत् २६ ते सर्वे चेतनां प्राप्ताः प्राहुः स्वर्णवतीं मुदा । क्वास्थिता बन्धुराह्लादो देवि त्वं कारण वद २७ यथागत स्वय स्वामी कथयामास सा तथा । अहं शुकी भवाम्यद्य भवान्बिल्वकुलसंस्थितः २८ इत्युक्त्वा सा शुकी भूत्वा कृष्णांशेन समन्विता । यत्रास्ते तत्पतिर्बद्धस्तत्र सा कामिनी ययौ २९ कृष्णांशोऽपि हयारूढो नभोमार्गेण चाप्तवान् । आभीरीं मूर्तिमासाद्य स्वामिनं प्रति सा ययौ ३० आश्वास्य तं यथायोग्य कृष्णांशं पर्यवर्णयत् । कृष्णांशस्तत्र बलवान्हत्वा दुर्गनिवासिनः ३१ रक्षकाञ्छतसाहस्रान्हत्वा भ्रातरमाययौ । पौर्णिमां मधुयुक्तां च ज्ञात्वा सर्वे त्वरान्विता ३२ अयोध्यां शीघ्रमागम्य स्नात्वा च सरयूं नदीम् । होलिकादाहसमये शीघ्रं वेण्यां समागताः ३३ स्नानध्यानादिका निष्ठाः कृत्वा गेहमुपाययुः । सागरस्य तटं प्राप्य कृत्वा ते च महोत्सवम् ३४ चैत्रस्य कृष्णपञ्चम्यां स्वमेहं

त्यामुळें त्या पाच लक्ष सैन्याचें व यान्या सात लक्ष सैन्याचें पाच अहोरात्र भयंकर युद्ध झालें १७–१९. तेव्हा मरून राहिलेली शत्रूची अर्धी सेना पळाली. तेव्हा रुद्रमायेमध्यें निपुण असलेला तो हरानन्द विस्मित झाला २० व ते अधिक बलाढ्य अहित असे जाणून शंकराच्या ध्यानामध्यें तल्लीन झाला. नानारूपें धारण करणारी शाबरी माया रचून २१ तिच्या योगानें सर्व राजास पाषाणरूप करून, पुत्रासह श्रेष्ठ भ्रात्यास व त्याचप्रमाणें पूर्णबल राजास सोडवून तो कृतकृत्य व बली गृहीं गेला. मायेमुळें जड झालेल्या आल्हादास खोड्यामध्यें अडकवून २२,२३ तो बलवान् नेत्रसिंह आपल्या दुर्गाप्रत तयार होऊन गेला. व त्या धाकट्या बंधूची प्रशंसा करून त्या वीरानें ब्राह्मणास धन दिलें २४. तेव्हा दीन स्वर्णवती आपला पति बद्ध झाला आहे व शंभुमा[illegible] कृष्णांशादिक मोहित झाले आहेत असें जाणून मोठ्याने रडू लागली व कामरूपिणी देवीचे तिनें ध्यान केलें. तेव्हा संतुष्ट झालेली देवी त्यास सावध करिती झाली २५,२६. ते सर्व शुद्धीवर आलेले स्वर्णवतीस आनंदानें म्हणाले ' आल्हाद कोठें निघून गेला ? देवि, तूं आह्मास खरें कारण सांग ' २७. तेव्हा आपल्या स्वामीची जी स्थिति झाली होती ती तिनें त्यास सांगितली. ' मी आता शुकी होतें व तूं बिल्वावर आरूढ हो' २८. असें बोलून ती शुकी झाली व कृष्णांशासह जेथें तिचा पति बद्ध होऊन राहिलेला होता तेथें ती कामिनी आली २९. कृष्णांशही अश्वारूढ होऊन आकाशमार्गानें आला. आभीरी मूर्ति घेऊन ती स्वामीजवळ गेली ३०. त्यास यथायोग्यपणें धीर देऊन तिनें कृष्णांशास तसें कळविलें. तेव्हा त्या दुर्गामध्यें रहाणाऱ्या एक लक्ष रक्षकांस मारून तो बलवान् कृष्णांश भ्रात्याकडे आला व मधुयुक्त पूर्णिमा आली असें जाणून ते सर्व त्वरेनें अयोध्येस आले ३१,३२ व त्यांनी लागलेंच शरयूनदींत स्नान केलें. होळी जाळावयाच्या वेळीं ते लवकरच त्रिवेणीस आले व स्नानदानादिक क्रिया करून ते गृहीं गेले. सागराच्या तटीं जाऊन तेथें मोठा उत्साह करून ते चैत्रकृष्णपंचमीस पुनरपि आपल्या गृहीं आले. उंटावर बसलेले दूत

पुनराययु । कृता उष्ट्रसमारूढास्तस्य स्वागतकारणोत्सुका ३५ फाल्गुने शुक्लपञ्चम्यां स्वगेह पुनरायययुः । मलना भूपतिश्चैव गेहे गेहे महोत्सवम् ॥ कारयित्वा विधानेन ब्राह्मणेभ्यो ददौ धनम् १३६ [१२७६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

सूत उवाच ॥ चतुर्दशाब्दे कृष्णांशे यथा जातं तथा शृणु । जयन्तः शक्रपुत्रश्च जानक्याः शापमोहितः १ कलौ जन्मावमापन्न स्वर्णवत्युदरेऽवसत् । चैत्रशुक्लनवम्यां च मध्याह्ने गुरुवासरे स जातश्चन्द्रवदनो राजलक्षणलक्षितः । जाते तस्मिन्सुपुत्रश्रेष्ठे देवाः सर्षिगणास्तदा इन्दुलोऽयं महीं जातो जयन्तो वासवात्मजः । इत्यूचुर्वचनं तस्मादिन्दुरा नाम चाभवत् ४ आह्लादो जातकर्मादीन्कारयित्वा शिशोर्मुदा । ब्राह्मणेभ्यो ददौ स्वर्णधनवृन्द हयान्गजान् ५ इन्दुल तनये जाते द्विमासान्ते महीतले । योगसिंहस्तदागत्य स्वगेहं तये ददौ धनम् ६ नेत्रसिंहसुतं दृष्ट्वा मलना स्नेहसंयुता । पप्रच्छ कुशलं श्वः भोजयित्वा विधानतः ७ शतवृन्दाश्च नर्तक्यो नानारागेण संयुताः । तत्रागत्यैव नवतुर्यश्च भूपसुतः स्थितः ८ सप्तरात्रमुषित्वा स योगसिंहो ययौ गृहम् । षण्मासे च सुतं जातं देवेन्द्रः स्नेहकातरः ९ पुत्रस्नेहेन तं पुत्रं स जहार स्वमायया । संहृत्य बालकं श्रेष्ठमिन्द्राण्यै च समर्पयत् १० स्नेहप्लुता शची देवी स्वस्तनौ तमपाययत् । देव्या दुग्धं स वै पीत्वा षोडशाब्दसमोऽभवत् ११ इन्दुं पीयूषभवन गृह्णाति वपुषा स्वयम् । अतः स इन्दुलो नाम जयन्तश्च प्रकीर्तितः १२ स बालः स्वपितुर्विद्यां पठित्वा श्रेष्ठतामगात् ।

तर त्याचें स्वागत करण्याविषयीं उत्सुक होत्साते ३३-३५. फाल्गुनातील शुक्लपंचमीस आपल्या घरीं परत आले. तेव्हा मलनराजा घरोघर महोत्सव करवून यथाविधि ब्राह्मणास धन देता झाला १३६. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥

सूत ह्मणतातः— कृष्णाश चवदा वर्षांचा झाला असता काय झालें तें ऐक. इंद्राचा पुत्र जयन्त जानकीच्या शापानें मोहित होत्साता कलियुगात जन्मास आला व तो स्वर्णवतीच्या उदरीं राहिला. चैत्र शुद्ध नवमीस गुरुवारीं मध्याह्नसमयीं तो जन्मास आला. त्याचें चंद्रासारिखें मुख होतें व तो राजाच्या लक्षणांनीं युक्त होता. तो श्रेष्ठ पुत्र झाला असता ऋषिगणसह देव " हा इंद्रपुत्र इंदुल जयंत पृथ्वीवर निर्माण झाला आहे " असे ह्मणाले. त्यामुळें त्याचें इंदुल असें नाव पडलें १-४. आल्हाद त्यावेळीं आनंदानें त्या पुत्राचें जातकर्मादि करविता झाला व त्यानें ब्राह्मणास सुवर्ण, धेनुसमूह, घोडे व हत्ती दिले ५,६. इंदुल पुत्र भूलोकीं दोन महिन्याचा झाला असता योगसिंह आला व त्याने स्वर्णवतीस धन दिलें. नेत्रसिंहाच्या पुत्रास पाहून मलना स्नेहयुक्त झाली व त्यास यथास्थितरीत्या भोजन घालून कुशल प्रश्न विचारती झाली ७. शंभर नायकिणींचा समूह अनेक रागानीं युक्त होत्साता जेथें तो राजपुत्र होता तेथें येऊन नाचू लागला ८. सात दिवस तेथें राहून योगसिंह आपल्या गृहीं गेला. तो पुत्र सात महिन्यांचा झाला असता प्रेमानें कळवळलेला इंद्र पुत्रस्नेहामुळें आपल्या मायेनें त्या पुत्राचें हरण करिता झाला. व त्या श्रेष्ठ बालकास नेऊन त्याने इंद्राणीच्या स्वाधीन केलें ९,१०. तेव्हा स्नेहपूर्ण अशी ती शची देवी त्यास स्वस्तनीं दूध पाजविती झाली. त्या देवीचें दुग्ध प्राशन करिताच तो सोळा वर्षांच्या मुलासारिखा झाला. तो अमृताच स्थान असा जो चंद्र त्याचें स्वतः आपल्या शरीरानें ग्रहण करीत असे. यास्तव, तो इंदुल व जयंत या

नष्टे बालके तस्मिन्देवी स्वर्णवती तदा १३ रुरोदोच्चैस्तदा दीनस्तं हा पुत्र क्व गतोऽसि भोः ।
ाल्हादो तथाभूतो दशग्रामे जनाकिर्ये १४ रौद्रः कोलाहलो जातो रुदतां च नृणां मुने ।
ाह्लादः स्वकुलैः सार्द्धं निराहारो यतेन्द्रियः १५ शारदां शरणं प्राप्तस्तत्र तत्रैव चावसत् ।
दा तुष्टा स्वयं देवी वागुवाचाशरीरिणी १६ हे पुत्र स्वकुलैः सार्द्धं मा शुचस्त्वं सुतं प्रति ।
त्रपुत्रो जयन्तश्च स्वर्गलोकमुपागतः १७ दिव्यविद्यां पठित्वा स त्रिवर्षान्ते गमिष्यति ।
ावत्त्वं भूतले ऽवात्सीस्तावत्स भूतले वसेत् १८ तत्पश्चात्स्वर्गतिं प्राप्य जयन्तो हि भविष्यति ।
युक्ते वचने देव्या निश्शोकास्ते तदाऽभवन् ॥ दशग्रामं पुरं प्राप्य समपुर्ज्ञानतत्पराः १९
-१९५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेति-
ासससमुच्चये चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

सूत उवाच ॥ इन्दुले स्वर्गसंप्राप्ते ते वीराः शोककातराः । शारदां पूजयामासुः सर्वलोकनिवा-
नीम् १ जप्त्वा सप्तशतीस्तोत्रं त्रिसन्ध्यं प्रेमभक्तितः । ध्यानेनानन्दमापन्नास्तदा सप्तशते-
हनि २ सामन्तद्विजपुत्रश्च चामुण्डो नाम विश्रुतः । सोऽष्टवर्षवया भूत्वा पूजयामास
ण्डिकाम् ३ द्वादशाब्दे ततो जाते स्त्रीचरित्रस्य पाठतः । परीक्षार्थं तु भक्तानां
क्षात्मूर्तित्वमागता ४ कुण्डिकेयं च भो भक्ताः पूरयामि च तामहम् । यूयं तु
मस्कायैः कुरुध्वं पूरणं मतिम् ५ सुखखानिस्तु बलवान्मधुपुष्पैस्तथा फलैः ।
ण्डिकां पूरयामास न पूर्णत्वमुपागता ६ बलखानिस्तथा मांसैर्मूलशर्मा तु रक्तकैः ।

वार्नी प्रसिद्ध झाला ११,१२. तो बालक आपल्या पित्यापासून विद्या शिकून श्रेष्ठतेप्रत प्राप्त
ाला. इकडे पुत्र नष्ट झाला असता दीन झालेली देवी स्वर्णवती " अरे पुत्रा, तूं कोठें गेला
ाहेस ? " असें मोठ्याने म्हणून रडूं लागली. तेव्हा ते ऐकून आल्हादही दुःखी झाला व क्रमानें
सें आसपासचे दहा गांव आक्रोश करूं लागले. बा मुने, रडणाऱ्या मनुष्यांचा मोठा कोलाहल
ाला ! आल्हाद आपल्या कुलासह निराहार करून व जितेंद्रिय राहून शारदेस शरण आला व
ान दिवस तेथेंच राहिला. तेव्हा देवी संतुष्ट झाली व अशी शरीररहित (आकाश) वाणी
ाली १३-१६. ' बा पुत्रा, आपल्या कुलासह तूं पुत्राविषयी शोक करूं नको. तो इंद्राचा पुत्र
यन्त स्वर्गलोकी गेला आहे. दिव्य विद्या पढून तो तीन वर्षांनी येईल व तूं जोंपर्यंत भूतलीं
हणार तोपर्यंत तोही राहील १७,१८. तदनंतर स्वर्गगतीस प्राप्त होऊन तो जयन्त होईल.' ह्याप्रमाणें
वीनें सान्त्वितले असता ते तत्काल निःशंक झाले व दशग्रामनगरामध्यें येऊन ते ज्ञानतत्पर होऊन
ाहिले १९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय
तिहाससमुच्चयाचा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

सूत म्हणतातः—इंदुल स्वर्गास गेला असता ते वीर शोकानें व्याकुळ होऊन सर्व लोकामध्यें
हाणाऱ्या शारदेचें पूजन करिते झाले १. प्रेम व भक्ति यासह ते त्रिकाल सप्तशतीचें स्तोत्र जपूं
ागले. ते ध्यानाच्या योगानें आनंदास प्राप्त झाले असता शेवटच्या दिवशी २ सामंत ब्राह्मणाचा
ामुंडनामक प्रख्यात पुत्र आठ वर्षांच्या वयाचा होऊन चांडिकेचे पूजन करिता झाला ३. नंतर
ारा वर्षे झालीं असता स्त्रीचरित्राच्या पाठामुळें भक्तांची परीक्षा पाहण्याकरिता ती साक्षात् मूर्तिमती
ाली ४. ' अहो भक्तांनों, मी ही कुंडिका पूर्ण करणार आहे. यास्तव, तुम्ही मनसोक्त उपायानीं
ला पूर्ण करण्याचें मनात आणा ' ५. तेव्हा बलवान् सुखखानि, मधु पुष्प व त्याचप्रमाणें फलें
ान्या योगानें कुंडिका भरता झाला, पण ती पूर्ण झाली नाही ६. त्याचप्रमाणे बलखानि मासानें,

देवकी च तदा हव्यैश्चन्दनादिभिरर्चनैः ७ कुण्डिकां पूरयामास न पूर्णत्वमुपागता । आह्लादश्चैव सर्वाङ्गैरुदयः शिरसा स्वयम् ८ कुण्डिकां पूरयामास तदा पूर्णत्वमागता । उवाच वचनं देवी स्वभक्तान्भक्तवत्सला ९ सुखखानि भवान्वीरो भविष्यति सुरप्रिय । बलखानिर्महावीरो दीर्घे काले स मृत्युभाक् १० मूलशर्मा तु बलवान्रक्तबीजो भविष्यति । देवकी च भवद्वी चिरकालं स्वलोकगा ११ आह्लादश्चैव कृष्णांशस्तयोर्मध्ये द्वयं वरम् । एकस्तु देवतामोक्षो बलाधिक्यो द्वितीयक १२ निष्कामोऽयं देवसिंहो मृते मोक्षत्वमाप्नुयात् । इत्युक्त्वाऽन्तर्दधे माता ते सर्वे तृप्तिमागताः १३ [२३०८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

सूत उवाच ॥ प्राप्ते सप्तदशाब्दे च कृष्णांशे तत्र चाभवत् । शृणु त्वं मुनिशार्दूल हृष्टं यद्योगदर्शनात् १ रत्नभानौ मृते राज्ञि मरुधन्वमहीपतिः । गजसेनस्तदा विप्र पृथ्वीराजभयातुरः २ आराध्य पावकं देव यज्ञध्यानव्रतार्चनैः । द्वादशाब्दं सदाचारः प्रेमभक्त्या ह्यतोषयत् ३ तदा प्रसन्नो भगवान्पावकीयं हयं शुभम् । ददौ तस्मै सुतौ चाभौ कन्यां च गजमुक्तिकाम् ४ पावकास्ते हि चत्वारः समुद्भूता महीतले । अग्निवर्णा महावीराः सर्वलक्षणलक्षिताः ५ अष्टादशवर्षा भूता सर्वे ते मुनिपुङ्गव । जातमात्रा देवसमाः सर्वविद्याविशारदाः ६ अष्टादशाब्दवयसा सा कन्या वरवर्णिनी । दुर्गायाश्च वरं प्राप्ता धर्मांशस्त्वां वरिष्यति शार्दूलवंशी स नृपः कृतवान्वै स्वयं वरम् । नानादेश्या नृपाः प्राप्ताः सुतायाः रूपमो-

---

मूलशर्मा रक्तानें व देवकी हवन करण्यास योग्य अशा पदार्थांनीं व चंदनादिकांच्या पूजनानीं ती कुंडिका भरण्याचा प्रयत्न करिती झाली तरीही ती पूर्ण झाली नाहीं. परंतु आल्हाद सर्वांगानीं व स्वतः उदय मस्तकानें ती पूर्ण करिता झाला; तेव्हा ती भरली. तेव्हा ती भक्तवत्सल देवी आपल्या भक्तास ह्मणाली ७–९. ' बा सुखखाने ' तूं देवास प्रिय असा वीर होशील. महावीर आल्हाद दीर्घकालानंतर मृत्यूस प्राप्त होईल १०. बलवान् मूलशर्मा रक्तबीज होईल. देवकी देवी होईल व चिरकाल आपल्या लोकीं राहील ११. आल्हाद व कृष्णांश यांस दोन वर देतें. एक देवाप्रमाणे सांगितलेला व दुसरा अधिक बलवान् अहे १२. हा देवसिंह मात्र निष्काम असल्यामुळें मेल्यावर मोक्षास प्राप्त होईल. ' असे बोलून ती माता गुप्त झाली व ते सर्व तृप्त झाले १३. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वांतील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥

सूत ह्मणतातः— कृष्णांशास सतरावें वर्ष लागलें असतां काय झालें तें, हे मुनिसिंहा, तूं ऐक. मीं तें योगदर्शनामुळें पाहिलें अहे १. रत्नभानु राजा मरण पावला असतां पृथ्वीराजाच्या भयानें व्याकुल झालेला मरुधन्वराजा गजसेन यज्ञ, ध्यान, व्रत व पूजन याच्या योगानें अग्नि देवाची आराधना करिता झाला. बारा वर्षें सदाचारसंपन्न होऊन तो प्रेममक्तीनें त्यास संतुष्ट करिता झाला २,३. तेव्हा तो भगवान् प्रसन्न झाला व त्यानें त्यास पावकीय (अग्निसंबंधी) शुभ अश्व, दोन पुत्र व गजमुक्तिका कन्या दिली ४. तीं चारही अग्नीपासून निर्माण झालेलीं असल्यामुळें भूलोकीं महद्भूतरूपच होतीं. ते महावीर अग्नीच्या वर्णाचे व सर्व लक्षणानीं लक्षित असे होते. हे मुनिपुंगवा, ते सर्वही अठरा वर्षांच्या वयाचे होते. उत्पन्न होताच ते देवासारिखे व सर्व विद्यामध्यें निष्णात झाले ५,६. ती अतिसुंदर कन्याही अठरा वर्षांची होती. " धर्माचा अंश तुला वरील " असा तिला दुर्गेपासून वर मिळाला होता ७. त्या शार्दूलवंशातील राजानें स्वयंवर केला. तेव्हा कन्येच्या रूपाने मोहित होऊन अनेक देशांचे राजे

हितः ८ मार्गशीर्षे सिते पक्षे चाष्टम्यां चन्द्रवासरे । तस्याः स्वयंवरश्चासीत्सा नृपान्प्रति याययौ ९ विद्युद्वर्णं मुखं तस्याश्चञ्चलायास्तथा गतम् । दृष्ट्वा मुमोह धर्माशो बलखानिर्महीपतिः १० साऽपि दृष्ट्वा च तं वीरं मुमोह गजमुक्तिका । जुघ्वा तस्मै ददौ मालां वैजयन्तीं शुभाननां ११ तारकाद्याश्च भूपालाः सर्वशस्त्रास्त्रसंयुताः । रुरुधुः सर्वतो वीरं ते बलात्कन्यकार्थिनः १२ तथा विद्रावयन्दृष्ट्वा भूपान्पञ्चशतान्बली । स शीघ्रं खड्गमुत्सृज्य शतभूपशिरांस्यहन् १३ सर्वतो वध्यमानं तं बलखानिं स तारकः । तद्भ्रातृभ्यां ददौ खड्गं स तदङ्गे द्विधाऽभवत् १४ महीराजसुतो ज्येष्ठो दृष्ट्वा खड्गं तथा गतम् । अपोवाह रणाच्छूरस्तत्पश्चात्ते नृपा ययुः १५ पराजिते नृपबले बलखानिर्महाबलः । तां कन्यां शिबिकारूढां स्वगृहं सोऽनयद्बली १६ तां गच्छन्तीं सुतां दृष्ट्वा गजसेनो महीपतिः । महीपत्याज्ञया पापो ज्ञात्वा तं क्षत्रियाधमम् १७ जम्बुकघ्नं महावीरं मायया तममोहयत् । जाते निद्रातुरे वीरे दुर्गायाः शापमोहिते १८ निगडैस्तं बबन्धाशु दृढैर्लोहमयैः रुषा । लोहदुर्गं च संप्राप्य ग्रामरूपं महीपतिः १९ चाण्डालांश्च समाहूय कठिनांस्तत्र वासिनः । दधायाज्ञापयामास तस्य दण्डैरनैकशः २० ते रौद्रास्तं समाबध्य ताडयामासुरूर्जिताः । तत्ताडनानदा निद्रा तत्रैव विलयं गता २१ दृष्ट्वा ततस्तु चण्डालाश्चलखानिरताडयत् । तलमुष्टिप्रहारेण चाण्डाला मरणं गताः २२ मृते पञ्चशते रौद्रे तच्छेषा दुद्रुवुर्भयात् । कपाटं सुदृढं कृत्वा नृपान्तिकमुपाययौ २३ स नृपः कारणं ज्ञात्वा हस्तबद्धो महाबली । उवाच तत्र गोऽसौ वचनं कार्यते-

---

तेथें आले ८. मार्गशीर्षि शुक्लपक्षातील अष्टमी सोमवारीं तिचा स्वयंवर होता. तेव्हा ती राजाकडे आली ९. त्या चंचलेचें तें विजेसारिखें तेजस्वी मुख पाहून धर्माश बलखानि राजा मोहित झाला १० व त्या वीरास पाहून ती गजमुक्तिकाही मोहित झाली. ती शुभानना वैजयंतीमाला बाधून त्यास अर्पण करती झाली ११. तेव्हा त्या कन्येची इच्छा करणारे तारकादिक सर्व वीर राजे सर्व बाजूंनीं शस्त्रास्त्रयुक्त होत्साते त्या वीराम बलात्कारानें निरुद्ध करिते झाले १२. तेव्हा तो प्रकार जाणणारा तो बलाढ्य राजा पाचशें राजास समोर पाहून लागलेच खड्ग काढिता झाला व त्यानें शंभर राजाचीं मस्तकें तोडून भूमिवर पाडिलीं १३. चारी बाजूंनी ज्याच्यावर प्रहार होत आहे अशा त्या बलखानीच्या दोन्ही भुजामध्यें तारकाने खड्गाचा प्रहार केला. व तें त्याच्या अंगावर हापटून मोडून पडलें १४. महीराजाचा ज्येष्ठ पुत्र खड्गाची अशी अवस्था झाली आहे असें पाहून तो शूर पळूं लागला व त्याच्या मागून ते इतर राजेही गेले ह्याप्रमाणे राजाच्या समुदायाचा पराजय झाला असता तो महाबलवान् बलखानि त्या शिबिकेमध्यें बसलेल्या कन्येस आपल्या गृहीं आणिता झाला १५,१६. त्या जाणाऱ्या कन्येस पाहून गजसेनराजा महीपतीच्या आज्ञेनें तो अधम क्षत्रिय आहे असें जाणून प्राप्त झाला व त्या जंबुकास मारणाऱ्या महावीराम तो मायेनें मोहित करिता झाला. दुर्गेच्या शापामुळे मोहित झालेला तो वीर निद्रातुर झाला असता १७,१८ दृढ लोहमय खोड्याने तो त्यास रागाने बाधिता झाला व तो महीपति ग्रामरूप लोहदुर्गास येऊन १९ तेथें असणाऱ्या कठिण मनाच्या चाडाळास बोलावून, त्यास अनेक प्रकारे दंड करून मारण्यार्थ यथी सांगता झाला २०. तेव्हा भयंकर उत्साहयुक्त असे ते चाडाळ त्यास बाधून मारूं लागले. त्या ताडनाच्या योगानें त्याची निद्रा तेव्हाच नाहींशी झाली २१. नंतर त्या चाडाळास पाहून बलखानि तलहात व ठोसे यानी त्यास मारूं लागला. तेव्हा ते चाडाल मरण पावले २२. ते भयंकर पाचशे चाडाळ मेले असता बाकी राहिलेले भयाने पळून गेले व किल्ल्याचें

त्यरः १४ भवान्महाबली वीर चाण्डालैर्बन्धनं गतः । दस्युभिर्लुण्ठितस्तत्र निद्रावश्यो वने गतः २५ मत्सुता भवनं प्राप्ता दिष्ट्या त्वं जीवितं गतः । उद्वाह्य मत्सुतां शीघ्रं स्वगेहं यातुमर्हसि २६ इति श्रुत्वा प्रियं वाक्यं तस्यास्य तथाऽकरोत् । मण्डपे वेदकर्माणि विवाहार्थं चकार सः २७ जातायां मण्डपार्चायां पत्रमाह्लादहेतवे । तदाज्ञया लिखितोऽसौ गजसेनोऽग्निसेवकः २८ उष्ट्रारूढं समाहूय शीघ्रं पत्रमचोदयत् । बलखानेर्विवाहोऽत्र भवान्सैन्यसमन्वितः २९ समाप्य योग्यद्रव्याणि भुक्त्वा त्वं तृप्तिमावह । इत्युक्ते निशि जातायां बलखानिर्महाबलः ३० भोजनं कृतवांस्तत्र विषयुक्तं नृपार्पितम् । गरलं तेन संभुक्तं न ममार वराच्छुभात् ३१ ततः कालं च सम्प्राप्तं दृष्ट्वा मोहत्वमागतम् । पुनर्बबन्ध निगडैस्ताडयामास वेतसैः ३२ विषदोषमसृग्द्वारान्निस्मृतं सर्वदेहतः । तदा बुबोध बलवान्भूपतिं प्राह नम्रधीः ३३ राजन्किमीदृशं जातं त्वत्सैन्यं ताडने रतम् । स आह भो महावीर मत्कुले रीतिरीदृशी ३४ यातनां प्रथमं प्राप्य तदनूद्वाहितो भवेत् । इत्युक्ते सति भूपाले गजमुक्ता समागता ३५ पितरं प्राह वचनं कोऽयं तत्ताडनं गतः । नृपः प्राह सुते शीघ्रं याहि त्वं निजमन्दिरं ३६ कृषिकरोऽयमायातो द्रव्यार्थं ताडने गतः । इति श्रुत्वा वचो घोरं बलखानिर्महाबलः ३७ छित्त्वा तद्बन्धनं घोरं खड्गहस्तः समाययौ । शूराः पञ्चशतं तं च रुदध्वा शस्त्रैः समन्ततः ३८ गजसैन्यं तु तान्सर्वान्बलखानिर्व्यनाशयत् । गजसेन-

---

द्वार घट्ट बद करून ते राजाजवळ आले २३. तो बलाढ्य राजा सर्व कारण ऐकून घेऊन हात बाधून तेथ आला व कार्यामध्ये तत्पर होऊन तो असे म्हणाला २४ " हे वीरा, तूं महाबलवान् आहेस. चाडालानीं तुला बाधले व चोरानीं लुटले. तूं वनामध्ये निद्रावश झालास २५, पण दैवयोगानें माझी कन्या माझ्या गृही आली व तूं जीवत राहिलास. आता माझ्या कन्येचें पाणिग्रहण करून तूं आपल्या गृही जा " २६. असें प्रिय वाक्य ऐकून व त्याची प्रशंसा करून तो तसें करिता झाला. मंडपामध्ये विवाहाकरिता तो वैदिक कर्मे करिता झाला २७. मंडपाची पूजा झाली असता आल्हादास त्यानें पत्र पाठविलें. म्हणजे त्याच्या आज्ञेनें लिहून हा अग्निसेवक गजसेन २८ सांडणी स्वारास बोलावून लागलेच पत्र पाठविता झाला. ' बलखानीचा येथें विवाह होत आहे. यास्तव, तुम्ही सैन्यासहवर्तमान या व योग्य द्रव्याचा उपभोग घेऊन तृप्त व्हा. ' असें झालें असता व रात्र पडली असता महाबलवान् बलखानि तेथें राजानें दिलेले विषयुक्त अन्न खाता झाला. त्यानें विष भक्षण केलें होतें, पण तो शुभ वरामुळे मरण पावला नाहीं २९–३१. नंतर योग्य काल प्राप्त झाला असता तो निद्रावश झाल्या आहे असें पाहून पुनरपि त्यास त्यानें शृंखलानीं बाधिलें व वेताच्या काठ्यानीं मारविले ३२. त्यामुळे विषदोष रक्ताच्या द्वारा सर्व देहातून बाहेर पडला असता तो बलवान् सावध झाला व राजास नम्रपणे म्हणाला ३३ " राजा, तुझें सैन्य हे अशा प्रकारें ताडनामध्यें का रत झाले आहे ? " तेव्हा तो म्हणाला " वा महावीरा, माझ्या कुलामध्ये अशीच रीति आहे ३४. प्रथम यातना देऊन नंतर विवाह केला जातो. " ह्याप्रमाणे राजाने सांगितलें असता गजमुक्ता तेथ आली ३५ व पित्यास म्हणाली " यास ताडन करण्याकरिता कोण आला होता ? " त्यावर राजा म्हणाला " कन्ये, तूं त्वरित आपल्या मंदिरी जा ३६. येथें कोणी एक शेतकरी आला होता व तो द्रव्याकरिता ताडन करण्यास तयार झाला. " हे घोर वचन ऐकून महाबलवान् बलखानि नें घोर बंधन तोडून हातात खड्ग घेऊन निघाला. तेव्हा पाचशें शूर शस्त्रान्या योगानें त्यास चोहोकडून अडवूं लागले असता त्या प्रहार करणाऱ्या सर्वास बलखानीने मारून टाकिले. तेव्हा गजसेनाचा ज्येष्ठ पुत्र सूर्यद्युति आला व त्यानें त्या बलवानास

सुतो ज्येष्ठ सूर्यद्युतिरुपागतः ३९ बद्ध्वा पुनस्तं बलिन गर्तमध्ये समाक्षिपत् । तथा गतं पतिं दृष्ट्वा गजमुक्ता सुदुःखिता ४० निशि तत्र गता देवी दत्त्वा द्रव्य तु रक्षकान् । पतिं निष्काश्य रुदती व्यजन पतये ददौ ४१ रात्रौ रात्रौ तथा प्राप्ता व्यतीतं पक्षमात्रकम् । एतस्मिन्नन्तरे वीरश्चाह्लादः सप्तलक्षकैः ४२ सै यैः सहायथौ शीघ्रं श्रुत्वा तत्रैव कारणम् । बलखानिर्गतो गर्ते दरांध नगरीं तदा ४३ गजै षोडशसाहस्रैर्गजसेना रण ययौ । त्रिलक्षैश्च हयै सार्धं सूर्यद्युति रुपाययौ ४४ कान्तामलस्तदा प्राप्तस्त्रिलक्षैश्च पदातिभिः । तयोश्चासीन्महद्युद्धमहोरात्र हि सैन्ययोः ४५ रक्षिते तालनाद्यै च गजसेनायके तदा । द्वितीयेऽह्नि समायात गजसेना महाबलः ४६ प्रभग्नं स्वबल दृष्ट्वा पावकीय समारुहत् । दाहयामास तत्सैन्य तालनाद्यैश्च पालितम् ४७ भस्मीभूत बल दृष्ट्वा तालनः शत्रुसमुखे । गत्वा भक्षेन भूपाल ताडयामास वेगतः ४८ मूर्छितं नृपमाज्ञाय सूर्यद्युतिरुपाययौ । पावकीय समारुह्य दाहयामास तालनम् ४९ एतस्मिन्नन्तरे शूरौ देवौ चाह्लादकृष्णकौ । बबन्धतू रुपाविद्धौ सूर्यद्युतिमिन्द्रमम् ५० सुबद्ध भ्रातरं ज्ञात्वा हय कान्तामलोऽरुहत् । देवसिंह च समाद्य कृष्णांशं प्रति साऽगमत् ५१ गृहीत्वा त स कृष्णांशस्तस्य तेजः समाहरत् । सप्तलक्षाणि सर्व वह्निभूतमभूत्तदा ५२ अमरत्वात्स आह्लादस्तदा तु समजीवयत् । गजसेनस्यार्धसैन्य तैश्च सर्वैर्वनागितम् ५३ विजय नृपति. प्राप्य हर्षितो गेहमाययौ । वह्निभूतं च कृष्णांशं दृष्ट्वाह्लाद. सुदुःखितः ५४ दुर्गा देवीं स तुष्टाव मनसा रणमूर्धनि । तदा देवी वचः प्राह वत्स ते पुत्र एव च ५५ स्वर्गा-

---

पुनरपि बांधून गर्तमध्ये फेकून दिल. पतीची अशी अवस्था झाली आहे हे पाहून गजमुक्ता अतिशय दुःखित झाली ३७–४०. रात्री ती देवी त्या स्थळीं आली व रक्षकांस द्रव्य देऊन पतीस बाहेर काढून रडणाऱ्या तिने पतीस वारा घातला ४१. प्रतिरात्रीं ती तेथे येत असे. याप्रमाणे एक पंधरवडा लोटला असता वीर आल्हाद सात लक्ष सैन्यासह आला व तेथील वर्तमान ऐकून बलखानि गर्तेमध्ये पडला आहे असे समजताच त्याने नगरास वेढा दिला ४२,४३. तेव्हा सोळा हजार गज सह गजसेन रणमध्ये आला. तीन लक्ष घोड्यासह सूर्यद्युति आला ४४ व तीन लक्ष पायदळ घेऊन कातामल आला. त्या उभय सैन्यांचे अहोरात्र मोठे भयंकर युद्ध झाले. एका सैन्याचे तालनादिकांनी रक्षण केले व दुसऱ्या सैन्याचे गजसेनादिकांनी रक्षण केले. दुसरा दिवस उजाडला असता महाबलवान् गजसेन आपले सैन्य पराजित झाले आहे असे पाहून पावकीय हत्तीवर चढला व तालनादिकांनी ज्याचे रक्षण केले होते त्या सैन्यास त्याने जाळून टाकिले ४५–४७. आपले सैन्य भस्मीभूत झाले आहे असे पाहून तालन शत्रूच्या समोर वेगाने गेला व त्याने भाल्याने राजास ताडन केले ४८. त्याबरोबर राजा मूर्च्छित झाला आहे असे पाहून सूर्यद्युति पुढें आला व पावकीयावर बसून त्याने तालनास जाळिलें ४९. इतक्यामध्ये शूर देव आल्हाद व कृष्णांश रागाने त्या शत्रुघातक सूर्यद्युतीस बांधून टाकिते झाले ५०. आपला भ्राता उत्तम प्रकारे बद्ध झाला आहे असें पाहून कातामल घोड्यावर चढला व देवसिंहास मोहित करून तो कृष्णांशकडे चालला ५१. तेव्हा तो कृष्णांश त्यास वरून त्याचें तेज हरण करिता झाला. तेव्हा सर्व सात लक्ष सैन्य भस्मरूप झाले हें, पण अल्हाद अमर असल्यामुळें त्याने त्या सर्वांस सजीव केले. तेव्हा त्या सैन्यानें गजसेनाचे अर्धे सैन्य मारिलें. तात्पर्य, याप्रमाणें विजय संपादन करून आनंदित झालेला तो राजा गृहीं आला. पण कृष्णांश अग्निरूप झाला आहे असे पाहून तो आल्हाद अतिशय दुःखी झाला व त्यानें रणामध्यें दुर्गादेवीची मनानें स्तुति केली. तेव्हा देवी म्हणाली " बा वत्सा, तुझा पुत्रच आता स्वर्गा-

दागत्य सर्वाणि पुनरुज्जीवयिष्यति । इत्युक्ते वचने देव्या इन्दुलो वासवाज्ञया ५६ द्वादशाब्दसमं रूपं धृत्वा विद्याविशारदः । वडवामृतमारुह्य हय तत्र समागतः ५७ तदङ्गादुद्गता वाह्या मेघा इव समन्ततः । पावक शमयामासुस्ते देवतोपमाः ५८ शमीभूते तदा वह्नौ स्वमुखात्सह यो मुदा । लालामुद्वाहयामास तया ते जीवितास्ततः ५९ जीविते सप्तलक्षे तु शमीभूते हि पावके । गजसेनः सुताभ्यां च प्रयातः सर्वतो दिशम् ६० लक्षसैन्यं तदा शेषं ते सर्वेऽपि भयातुराः । दुद्रुवुर्भार्गवश्रेष्ठ दिव्यरूपत्वधारिणः ६१ केचित्संन्यासिनो भूत्वा केचिद्वै ब्रह्मचारिणः । जीवत्व प्राप्तवन्तस्ते तथाऽन्ये सत्यं गताः ६२ वदध्वा तान्गजसेनादींस्त्रीन्शूरान्स च तालनः । कृष्णांशेन समायुक्त इन्द्रदुर्ग समाययौ ६३ बलखानिं च निष्कास्य तालनस्तदनन्तरम् । पृष्टवान्कारण सर्व श्रुत्वा तन्मुखतो वचः ६४ तान्वीरांस्ताडयामास वेतसैः स्तम्भबन्धनात् । गजमुक्ताह्वया विप्र सेनापतिरुदारधीः ६५ तालनस्तान्समुत्सृज्य विवाहार्थं समाययौ । बलखानिर्हयारूढो गजमुक्ता च मण्डपे ६६ गजसेनस्तदा दिव्यैर्भोजनैस्तानभोजयः । निवास्य लोहदुर्गे तान्कपाटः सुदृढीकृतः ६७ लक्षशूरान्स संस्थाप्य स्वयं रुद्रपुरं ययौ । ते रात्रौ लोहदुर्गेषु वसित्वा यत्नतो बलाः ६८ प्रभाते च कपाटं त द्वार दृष्ट्वा तदाऽब्रवीत् । द्वारमुद्घाटयाशु त्व मा चेत्प्राणांस्त्यजिष्यसि ६९ इति सेनापति श्रुत्वा लक्षशूरान्समादिशत् । नानायत्नैश्च हन्तव्याः शत्रवो भयकारिणः ७० इति श्रुत्वा तु ते शूराः शतघ्न्यस्तैः सुरोपिता । एकैक क्रमशो जघ्नु र्वैरं ते वैरतत्पराः ७१ हते दशसहस्रे तु कृष्णांशो बिन्दुलं हयम् । समारुह्य जघानाशु स्वख-

---

हून येऊन सर्वांस पुनरपि उठवील. " असे ती देवी बोलली असता इंद्राच्या आज्ञेने इंदुल बारा वर्षांच्या मुलासारखें स्वरूप घेऊन, सर्व विद्यामध्यें निष्णात होऊन, तेथें वडवामृतनामक घोड्यावर बसून आला ५२-५७. त्याच्या अंगातून मेघासारिखे जलप्रवाह चोहोंकडून निघाले व त्या देवासारिख्या तिघांनीं अग्नीस शांत केलें ५८. त्या वेळीं अग्नि शांत झाला असता तो घोडा आपल्या मुखांतून आनदानें लाळ ओकूं लागला. त्यामुळे ते सर्व जीवन्त झाले. साराश, सात लक्ष सैन्य जिवंत झालें असतां व अग्नि शांत झाला असता गजसेन दोन्ही पुत्रासह सर्व दिशाकडे पळून गेला ५९,६०. शेवटीं एक लक्ष सैन्य जीवंत राहिलें पण तें सर्वही भयानें व्याकुल झालें व वा भृगुश्रेष्ठा, त्यांतील लोक अपूर्व वेष घेऊन वाट फुटेल तिकडे पळून जाऊं लागले ६१. कोणी संन्यासी होऊन व कोणी ब्रह्मचारी होऊन आपलें जीवित राखिते झाले व दुसरे कित्येक क्षय पावले ६२. त्या गजसेनादि तीन शूरास बाधून तो तालन कृष्णाशासह इंद्रदुर्गास आला व बलखानीस बाहेर काढून तदनंतर तालन त्यास या सर्वांचें कारण विचारिता झाला. त्याच्या मुखाने सर्व वृत्तात ऐकून ६३,६४ त्या सर्व वीरास खाद्यास बाधून त्यानें वेताच्या काठींनीं मारिले. पण हे ब्राह्मणा, गजमुक्तेच्या आज्ञेने उदार बुद्धीच्या तालन सेनापतीनें त्या सर्वांस सोडले व तो विवाहाकरिता चालला. बलखानि व गजमुक्ता घोडयावर बसून मंडपांत आली. तेव्हा गजसेनानें त्यास अलौकिक भोजनाने तृप्त केलें व त्यास लोहदुर्गामध्यें रहावयास सागून त्याचें द्वार घट्ट लाविले ६५-६७. तेथें एक लक्ष शूर लोक ठेवून तो स्वतः रुद्रपुरास गेला. तेव्हा ते बलवान् तेथें रात्रीं मोठया प्रयत्नानें राहून ६८, प्रातःकालीं द्वार बद आहे असें पाहून बाहेरच्या लोकास ह्मणाले " लवकर द्वार उघडा; नाहींपेक्षा प्राणत्याग कराल " हे ऐकून सेनापति लक्ष शूरास " भय देणाऱ्या या शत्रूंस नानाप्रकारच्या उपायानीं मारा " अशी आज्ञा देता झाला ६९,७०. हें ऐकून त्या शूरानीं तोफा रोखल्या. नतर वेरामध्ये तत्पर असलेले ते क्रमानें एकेक समुदायास मारिते झाले ७१. याप्रमाणे दहाहजार लोक मेले असता कृष्णाश बिंदुल अश्वावर बसून आपल्या खड्गाने मारी सैन्य मारिता झाला ७२.

क्षीनं महद्बलम् ७१ हतशेषा भयार्ताश्च सहस्राशीतिसम्मिताः । इन्द्रदुर्गं प्रति प्राद्रुण्वा जातं बलक्षयम् ७२ श्रुत्वा भयातुरो राजा स्वसुताभ्यां समन्वितः । गजमुक्तां पुरस्कृत्य बहुद्रव्यसमन्विताम् ७४ स्वपापं क्षालयामास चोर्वीयापतिना कृतम् । षोडशांढ्राणि स्वर्णानि गृहीत्वाह्लाद एव सः ७५ ययौ स्वगेहं सहितः पुत्रभ्रातृसमन्वितः । संप्राप्ते गेहमाह्लादे देवी स्वर्णवती स्वयम् ७६ इन्दुलं स्वाङ्कमारोप्य ललाप करुणं बहु । मृताहं च त्वया पुत्र पुनरुज्जीवितं सुत ७७ धन्याऽहं कृतकृत्याऽहं ..यन्तं तव दर्शने । इति श्रुत्वेन्दुलो वीरो नत्वाह जननीं मुदा ७८ अनृणं नाधिगच्छामि त्वत्तो मातः कदाचन । समाप्ते गेहमाह्लादे राजा परिमलः सुधीः ॥ वाद्यानि वादयामास विप्रभ्यश्च ददौ धनम् ७९ [२३८५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

सूत उवाच ॥ कृष्णांशेऽष्टादशाब्दे तु यथा जातं तथा शृणु । सूत कृष्णकुमारे तु भूपतौ रत्नभानुना १ महीराजः सुदुःखार्तो लक्षचण्डीमकारयत् । होमान्ते तु तदा देवी वागुवाच नृपं प्रति २ वर्षे वर्षे तु ते सप्त भविष्यन्त्यगमा इवाः । कुमाराः कौरवांशाश्च द्रौपद्या सुता नृप ३ इत्युक्ते वचने तस्मिन्राज्ञी गर्भमथो दधौ । कर्णांशश्च सुतो जातस्तारको बलवत्तरः ४ द्वितीयाब्दे तथा जातो दुःशासनशुभांशतः । नृहरिरिति विख्यातस्तृतीयाब्दे तु चाभवत् ५ उद्धर्षांशः स रदनो दुर्मुखांस्तु मर्दनः । विकर्णांशः सूर्यवर्मा भीमश्चांशो विविंशतेः ६ वर्धनश्चित्रबाणांशो वेला तदनु चाभवत् । यथा कृष्णा तथा सैव रूपचेष्टागुणैर्मुने ७ भुवि तस्यां च जातायां मूकरूपो दारु-

---

पुढें मरून राहिलेले व म्यालेले ऐशीं हजार लोक इंद्रदुर्गास जाऊन सैन्यक्षय कसा झाला तें सांगते झाले ७३. तें ऐकून भयानें व्याकुळ झालेला राजा आपल्या दोन पुत्रांसह गजमुक्तेस पुढें करून पुष्कळ द्रव्यासह त्याच्याकडे आला व त्या उर्वीयापतीनें आपलें पाप नाहींसें केलें. सोळा उंटावर भरलेलें सुवर्ण घेऊन तो आल्हाद पुत्र व बंधु यासह आपल्या गृहीं गेला. तो गृहीं पोंचला असतां स्वत. स्वर्णवती देवी ७४,७६ इंदुलास आपल्या मांडीवर बसवून पुष्कळ करुणायुक्त शब्दानीं रडूं लागली. " बाळका, तुझ्याविनाच मी मेलेंच होतें, पण तूं आज मला पुनः जीवंत केलेंस ७७. बा जयन्ता, तुझ्या दर्शनानें मी आज धन्य व कृतकृत्य झालें. " हें ऐकून वीर इंदुल नमस्कार करून मातोश्रीस म्हणाला ७८ " माते, तुझ्या ऋणातून मी कधींही मुक्त होणार नाहीं. " असो; आल्हाद गृहीं आला असतां बुद्धिमान् परिमल वाद्यें वाजविता झाला. व त्याने ब्राह्मणास धन दिलें ७९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥

सूत म्हणतातः— कृष्णांश अठरा वर्षांचा झाला असतां काय झालें तें ऐक. कृष्णकुमार राजा रत्नभानूच्या हातून मरण पावला असता महीराज अतिशय दुःखयुक्त होऊन लक्षचंडी करविता झाला. होमाच्या शेवटीं देवी राजास म्हणाली " राजा, प्रतिवर्षी एक याप्रमाणें तुला चमत्कारानें सात पुत्र होतील. ते सर्व कौरवांच्या अंशभूत असे असून द्रौपदीच्या अंशाची एक कन्याही होईल" १-३. असें तिने म्हटलें असतां पुढें राणी गर्भवती झाली व तिला कर्णाच्या अंशापासून बलवान् तारक म्हणून पुत्र झाला. दुसऱ्या वर्षी दुःशासनाच्या शुभ अंशापासून नृहरि नांवाचा प्रसिद्ध पुत्र झाला. तिसऱ्या वर्षी उद्धर्षाचा अंश रदन, चवथ्या वर्षी दुर्मुखाचा अंश मर्दन व पुढें क्रमानें विकर्णाचा अंश सूर्यवर्मा, विविंशतीचा अंश भीम, चित्रबाणाचा अंश वर्धन व शेवटी वेला झाली. ह्या मुने, जशी द्रौपदी होती तशीच रूप, चेष्टा व गुण यांनी संपन्न अशी ती कन्या होती ४-७. ती निर्माण

णोऽभवत् । अट्टाट्टहासमशिवं चामुण्डा खे चकार ह ८ रक्तवृष्टिः पुरे चासीदस्थिशर्करया युता । ब्राह्मणाश्च समागत्य जातकर्मादिकां क्रियाम् ९ कृत्वा नाम तथा चक्रुः शृणु भूमिप साक्षरम् । इला च शशिनां माता विकल्पेनाभवद्भुवि १० तस्मादिलेति विख्याता कन्येयं रूपशालिनी । जातायां च सुतायां स पिता विस्मयमुत्तमम् ११ ददौ दानं मुदा युक्तो वासांसि विविधानि च । द्वादशाब्दवयःप्राप्तां सुतां वीक्ष्य पितुः सुता ११ उवाच पितरं नम्रा शृणु त्वं पृथिवीपते । मण्डपे रक्तधाराभिर्यो मां संस्नापयिष्यति १३ द्रौपद्या भूषणं दाता स मे भर्ता भविष्यति । स्वर्णपत्रं तदा राजा पद्मं बलमुखोद्भवम् १४ लिखित्वा तारकं प्राह त्वमन्वेषय तत्पतिम् । लक्षसार्द्धत्रयं द्रव्यं गृहीत्वा लक्षसैन्यकः १५ नृपान्तरं ययौ शीघ्रं तारकः पितुराज्ञया । सिन्धुस्थाने चार्यदेशे भूप भूप ययौ बली १६ न गृहीतं नृपैः कैश्चिद्वाक्यं घोरमुल्बणम् । महीपतिं स संप्राप्य मातुलं तद्वचोऽब्रवीत् १७ श्रुत्वा स आह भो वीर ब्रह्मानन्दो महाबलः । स च वाक्यं प्रगृह्णीयादाह्लादाद्यैः सुरक्षितः १८ किं त्वया विदितं नैव चरित्रं तस्य विश्रुतम् । भवान्धबन्धुसहितः कृष्णांशाद्यैर्विवाहितः १९ ते सर्वे वश्यगास्तस्य ब्रह्मानन्दस्य धीमतः । नास्ति भूमण्डले कश्चित्तद्बलेन समो नृपः २० इति श्रुत्वा ययौ तूर्णं तारकः स्वबलैः सह । तत्पद्मं च कथित्वाऽग्रे हस्तबद्धस्तदाऽभवत् २१ कृष्णांशस्तु गृहीत्वाशु पद्मवाक्यमुवाच ह । अहं विवाहयिष्यामि ब्रह्मानन्दं नृपोत्तमम् २२ तूष्णींभूतास्तदा सर्वे तारकः स द्विजैः सह । अभिषेकं तदा कृत्वा स्वगेहं पुनरायययौ २३ माघमासे सिते पक्षे त्रयोदश्यां सुवासरे । विवाहलग्नं शुभदं वरकन्यार्थयोस्तदा २४ सप्तलक्षबलैः सार्धं लक्षसैन्यश्च सत्वरः । महावतीं पुरीं

झाली असता भूलोकी भयंकर भूकंप झाला. अंतरिक्षात चामुंडेनें अमंगल अट्टाट्टहास केला ८. अस्थि व रेती यांनीं युक्त अशी नगरामध्ये रक्तवृष्टि झाली. नंतर ब्राह्मणांनीं येऊन जातकर्मादिक क्रिया करून तिचें नामकरण केलें. हा भूमिपालका, ते साक्षर ऐक. चंद्राची माता इला. ती विकल्पानें भूलोकी झाली. यास्तव, ही रूपशालिनी कन्या इला या नावानें प्रसिद्ध झाली. ती कन्या झाली असता पित्यानें ब्राह्मणास आनंदानें उत्तम दान दिलें व विविध वस्त्रें दिलीं. त्या अतिसुंदर कन्येस बारावें वर्ष लागलें असता ९-१२ ती पित्यास नम्र होऊन म्हणाली " हे पृथ्वीपते, ऐक. मंडपामध्यें जो मला रक्तान्या धारानीं स्नान घालील व द्रौपदीचें भूषण देईल तो माझा पति होईल ". त्याबरोबर ते बलेन्या मुखातून निघालेलें पद्म पत्रामध्ये लिहून तो तारकास म्हणाला " तूं जिंकला वर पहा. "तेव्हा लक्ष सैन्य व साडे तीन लक्ष द्रव्य बरोबर घेऊन १३-१५ तो तारक पित्याच्या आज्ञेनें दुसऱ्या राजाकडे गेला. सिंधुस्थानात व आर्यदेशात प्रत्येक राजाकडे तो बलवान् गेला १६. पण तें घोर व भयंकर वाक्य कोणीही ऐकिलें नाहीं. तेव्हा त्याचा मामा जो महीपति त्याच्याकडे येऊन त्यानें त्यास ते वचन सांगितलें १७. तेव्हा तो म्हणाला " अरे वीरा, महाबलवान् ब्रह्मानंद, आल्हादादिकांकडून अत्यंत रक्षित होत्साता हें म्हणणें कबूल करील. तूं त्याचे चरित्र ऐकलें नाहींस काय ? तो कृष्णांशादिक सहा बंधूंकडून उत्तम प्रकारें विवाहित होईल. ते सर्व त्या बुद्धिमान् ब्रह्मानंदाच्या अधीन आहेत. त्याच्या सामर्थ्याची बरोबरी करणारा असा राजा भूमंडलीं नाहीं " १८-२०. हें ऐकून तारक आपल्या सैन्यासह त्वरेनें तेथें गेला व ते पद्म वाचून दाखवून हात जोडून त्याच्यापुढें उभा राहिला २१. त्याबरोबर कृष्णांश लागलाच ते पद्म घेऊन म्हणाला " मी ब्रह्मानंदनामक उत्तम राजाचा विवाह करवीन " २२. त्यावेळीं सर्व मुकाट्याने बसले व तारक ब्राह्मणांसह अभिषेक करून आपल्या गृहीं परत आला २३. माघमासांतील शुक्ल पक्षात त्रयोदशीस उत्तम वारीं वर व कन्या या दोघांसही शुभ देणारे विवाहलग्न होते २४. तेव्हा सात

-र्णो बली परिमलादिभिः २५ आह्लादो लक्षसैन्याढ्यः कृष्णांशेन समन्वितः । बलखानिर्लक्ष-सैन्यः संयुतः सुखखानिना २६ नेत्रसिंहो लक्षसैन्यो योगभोगसमन्वितः । रणजिच्च बली बालो लक्षबलसयुत. २७ एव द्वादशलक्षाणां सैन्यानामधिपो बली । तालनः सिंहिनीसंस्थो बडवां ययौ सह २८ सैन्यैर्द्वादशलक्षैश्च सहितस्तालनो बली । आययौ देहलीग्रामे महीराजानुपालिते २९ देवो मनोरथारूढा बिन्दुलस्थः स कृष्णक. । बडवामृतमाताद्य स्वर्णवत्या सुतो गतः ३० रूपणश्च करालस्थ आह्लादश्च पपीहके । बलखानिः कपोतस्थो हरिणस्थोऽमुजस्तत ३१ रणजिन्मलनापुत्रः संस्थितो हरिनागरे । पञ्चशब्दगजारूढो महावत्यधिपो गतः ३२ विमानवरमारुह्य धीनरैः शोभवाहिभिः । मणिमुक्ताल्वर्णमयं सर्वसंपत्तिकैर्यंतम् ३३ अयुतैश्च पताकैश्च वज्रपाणिसहस्रकैः । सहस्रैः शिबिकाभिश्च पञ्चसाहस्रकै रथैः ३४ शकटैर्महिषैर्हैस्तु तथा पञ्चसहस्रकैः । सर्वतोपस्कृतं रम्यं ब्रह्मानन्द समागतः ३५ श्रुत्वा कोलाहलं तेषां महीराजो नृपोत्तमः । विस्मितः स बभूवाथ शिबिराणि मुदा ददौ ३६ दुर्गद्वारि क्रियां रम्यां कृत्वा विधिविधानत । द्रौपद्या भूषणं देहि बलायेत्यब्रवीत् स तम् ३७ इन्दुलस्तु ययौ स्वर्गं वासवं प्रति चाब्रवीत् । द्रौपद्या भूषणं सर्वं देहि मह्यं सुरोत्तम ३८ कुबेरात्स समानीय दिव्यमाभूषणं ददौ । इन्दुलः प्रहरान्ते च प्राप्ते पित्रे न्यवेदयत् ३९ आह्लादस्तु स्वयं गत्वा बलायै भूषणं ददौ । प्राप्ते ब्राह्ममुहूर्ते विवाहस्तत्र नाभवत् ४० सप्तमे प्रथमावर्ते तारकः खड्गमाददौ आह्लादस्तं समासाद्य युयुधे बहुलीलया ४१ नृहरिस्तु द्वितीये च कृष्णांशं प्रति चारुधत् ।

लक्ष सैन्य घेऊन बलवान् लक्षण व तालन परिमलादिकांसह महावतीनगरीस प्राप्त झाला २५. आल्हाद लक्ष सैन्यानें युक्त होत्साता कृष्णांशासह, बलखानि लक्ष सैन्य घेऊन सुखखानीसह २६, नेत्रसिंह लक्ष सैन्य व योगसिंह आणि भोगसिंह यांसह व बलवान् रणजित् बालक असूनही दोन लक्ष सैन्यासह आला. याप्रमाणें बारा लक्ष सैन्याचा मुख्य बलवान् तालन सिंहिनीवर बसला व बडंबस आपल्याबरोबर घेऊन तो बलाढ्य तालन त्या बारा लक्ष सैन्यासह महीराजानें जिचें रक्षण केलें होतें अशा त्या देहलीग्रामामध्यें आला २७–२९. त्या वेळीं देवसिंह मनोरथावर आरूढ झाला. कृष्णांश बिंदुलावर बसला व बडवामृतावर बसून तो स्वर्णवतीचा पुत्र निघून आला ३०. रूपण करालावर बसला, आल्हाद पपीहकावर आरूढ झाला; बलखानि कपोतावर चढला व त्याचा धाकटा भाऊ हरिणावर बसला ३१. मथनेचा पुत्र रणजित् हरिनागरावर बसला. महावतीचा राजा पंचशब्द गजावर आरूढ होऊन चालला ३२. शोभर भोयानीं वाहिलेल्या व माणि, मोत्यें, सुवर्ण यानीं जडविलेल्या श्रेष्ठ विमानात बसून सर्व प्रकारच्या उपस्करानीं युक्त व त्यामुळे रम्य असा ब्रह्मानन्द आला. त्याचे ते विमान सहस्र वाद्यानीं युक्त होतें, त्याच्यावर दहा हजार पताका, पुढे हजार भालदार, सहस्र शिबिका, पाच हजार रथ व त्याचप्रमाणें पाच हजार रेड्याचे गाडे होते ३३–३५. त्याचा कोलाहल ऐकून उत्तम राजा पृथ्वीराज आश्चर्यचकित झाला व त्याने त्यास आनंदानें शिबिरें दिलीं. दुर्गद्वारामध्यें यथाविधि रम्य क्रिया करून 'बलेस द्रौपदीचें भूषण दे' असे तो त्यास ह्मणाला ३६,३७. त्याबरोबर इंदुल स्वर्गास गेला व इंद्रास ह्मणाला " वा देवाधिदेवा, मला द्रौपदीचे सर्व अलंकार दे " ३८. त्याबरोबर कुबेराकडून आणवून त्यानें त्यास दिव्य भूषणे दिलीं. इंदुल एका प्रहरामध्यें परत झाला व तीं पित्यास देता झाला ३९. तेव्हा आल्हाद स्वतः जाऊन बलेस भूषणे देता झाला. ब्राह्ममुहूर्त प्राप्त झाला असता तेथे विवाह झाला ४०. प्रथम फेरा प्रवृत्त झाला असता तारक खड्ग

तथा स रदनं वीरं बलखानिरुपाययौ ४१ मर्दनं सुखखानिस्तु चतुर्थावर्तकेऽरुधत् । रणाजितस्तु सूर्यवर्माणं स भीमं रूपणो बली ४३ देवसिंहस्तु वर्धनं वीर सप्तावर्ते ऽग्रहायत । शत्रभूपाश्चतुरंगबलसन्नद्धसेनादिकांस्तदा ४४ लक्षणायाः समाजग्मुर्मण्डपे बहुविस्तृते । भग्नभूतं नृपबलं दृष्ट्वा राजा रुषान्वितः ४५ महीराजो ययौ रुष्टो गजं चारिभयङ्करम् । जित्वा तान्नेत्रसिंहादीञ्छब्दवेधी नृपोत्तमः ४६ लक्षणं ययौ शीघ्रं बौद्धिनीं हस्तिनीं स्थितम् । शिवं मनसि संस्थाप्य जित्वा बद्ध्वा रुषान्वित ४७ अगस्तमुपपृच्छ दशयामास तं नृपम् । श्रुत्वा परिमलो राजा कृष्णांशं भीरुको ययौ ४८ वृत्तान्त कथयामास चाह्लादादिपराजयम् । अजितः स च कृष्णांशो नभोमार्गेण मन्दिरम् ४९ गत्वा जगर्ज बलवान्योगिन्यानन्ददायकः । तदा स लक्षणो वीरस्त्यक्त्वा बन्धनमुत्तमम् ५० विष्णुं मनसि संस्थाप्य महीराजं समाययौ । गृहीत्वा चाममां दोलां स्वयं शिबिरमाप्तवान् ५१ एतस्मिन्नन्तरे सर्वे त्यक्त्वा मूर्च्छां समन्ततः । खड्गमुद्गेव तान्हित्वा बद्ध्वा तान्हिगडैर्दृढैः ५२ साम्वयाञ्छतभूपांश्च हत्वा तद्रुधिरावहैः । द्रौपदीं स्नापयामासुर्वेऽारूपां कलोत्तमाम् ५३ विवाहान्ते च ते सर्वे शिबिरागि समाययुः । समुत्सृज्य सुतान्सप्त सुभोज्यैस्ते ह्यभोजयन् ५४ भुक्तवत्सु सुवीरेषु साहङ्कारैः सुतैः सह । रुरुधुः सर्वतो जघ्नुरस्त्रशस्त्रैः समन्ततः ५५ सहस्रशूरांस्तान्हत्वा पुनर्बद्ध्वा महाबलान् । शिबिराणि समाजग्मुस्तेषां हास्यविरासदाः ५६ दशलक्षसुवर्णानि गृहीत्वा नृपतिर्बली । वेलां

घेता झाला, तेव्हा आल्हाद त्याच्या जवळ पुष्कळ लीलेनें युद्ध करूं लागला ४१. नृहरि दुसऱ्या फेऱ्यामध्यें कृष्णाशास निरोध करिता झाला. त्याचप्रमाणें रदन वीराच्या अंगावर बलखानि गेला. चवथ्या फेऱ्यामध्यें मर्दनास सुखखानि अडवून धरिता झाला. रणाजितानें सूर्यवर्म्यास, बलवान् रूपणानें भीमास ४२,४३ व देवसिंहानें शूर वर्धनास क्रमानें सात आवर्तामध्यें अडवून धरिलें व हातात खड्गादिक धारण करणाऱ्या गजसेनादिक शंभर राजाशीं त्यावेळीं लक्षणादिक अतिविस्तृत मंडपामध्यें भिडले. राजाचें सैन्य भग्नभूत झालें आहे असें पाहून राजा क्रोधयुक्त झाला ४४, ४५ व तो पृथ्वीराज शत्रूंस भयंकर अशा गजावर आरूढ होऊन युद्धात शिरला. त्या शब्दवेधी उत्तम राजानें नेत्रसिंहादिकास जिंकिलें ४६ व तो लागलाच बौद्धिनीनामक हस्तिनीवर बसून लक्षणावर चाल करून गेला. शंकरास मनामध्यें धारण करून तो त्यास जिंकून, रागानें युक्त होत्साता त्यास बांधून व बरोबर घेऊन गेला व परिमल राजास दाखविता झाला. त्याबरोबर तो राजा भिऊन कृष्णाशाकडे गेला ४७,४८. व आल्हादादिकांच्या पराभवाचा वृत्तांत त्यास त्यानें सांगितला. तेव्हा तो अजित कृष्णाश आकाशमार्गानें मंदिरात गेला व तेथें पोंचताच योगिनीस आनंद देणारा तो बलवान् गर्जना करूं लागला. त्याबरोबर तो लक्षण वीर उत्तम बंधनाचा त्याग करून ४९,५० व विष्णूचें मनामध्यें ध्यान करून महाराजाकडे गेला व आगमेचा दोला घेऊन तो स्वतः शिबिराकडे चालता झाला. इतक्यात सर्वही मूर्च्छेचा त्याग करून चोहोंकडून उठले व त्यास खड्गयुद्धानें जिंकून व दृढ पाशांनीं बांधून, वंशासह शंभर राजास मारून त्याच्या रुधिरप्रवाहानीं वेलारूपी द्रौपदीस स्नान घालते झाले. ती उत्तम कलाच होती. असो. विवाहानंतर ते सर्व आपल्या शिबिरांस प्राप्त झाले व त्या सात पुत्रास बंधमुक्त करून नंतर ते सर्व उत्तम पदार्थांच्या योगानें भोजन करिते झाले. पण ते उत्तम वीर भोजन करीत असतांनाच त्या पुत्रासह हजारों वीर त्यास वेढा घालून चोहोंकडून शस्त्रास्त्रांचा प्रहार करिते झाले ५१–५५. तेव्हा त्या हजार वीरास मारून पुनरपि त्या महाबलवानास बांधून ते आपल्या शिबिरास गेले व राजपुत्राच्या मूर्खेपणाविषयीं हंसूं लागले ५६.

लक्षेढामादाय गत्वा नत्वा तमब्रवीत् ५७ प्रद्योतसुत हे राजँल्लक्षणोऽसौ महाबलः । मम पत्नीं समादाय दासीं कर्तुं समिच्छति ५८ इति श्रुत्वा परिमलः सर्वभूपसमन्वितः । बहुधा बोधितश्चैव न बुबोध तदा नृपः ५९ तदा महासती वेला विललाप भृशं मुहुः । तच्छ्रुत्वा स च कृष्णांशः सहितो बलखानिना ६० तामाश्वास्य तदा वेलां नभोमार्गेण चाययौ । लक्षणं तर्जयित्वऽसौ गृहीत्वा चागमन्मुदा ६१ नभोमार्गेण गेहे तां कृष्णांशः समवेषयत् । पुनस्त्यक्त्वा सप्त सुतान्सहिताक्षपतेस्तु ते ६२ शपथं कारयामासुर्दम्भं प्रति महाबलाः । उषित्वा दशरात्रान्ते दध्वुर्गन्तुं मनो मुने ६३ महीराजस्तु बलवान्गृहीत्वा भूपते पदौ । ग उवाच च पुण्याक्षस्तदा परिमलं नृपम् ६४ महाराज वधूस्ते च वेलेयं द्वादशाब्दिका । पितृमातृवियोगं च न क्षमन्ती तु बालिका ६ तस्मात्तां त्वं परित्यज्य गच्छ गेहं सुखी भव । पतियोग्या यदा भूयात्तदा त्वां पुनरेष्यति ६६ इत्युक्त्वा च ययौ राजा स ब्रह्मादङ्गमस्पृशत् । चूर्णीभूते परिमले चाह्लाद-स्तत्र दुःखितः ६७ महीराजं स पस्पर्श स राजा चूर्णतां गतः । मग्नास्थी भूपती चोभौ पाव-कीयैश्चिकित्सकैः ६८ सुखवन्तौ गृहं प्राप्य कृतकृत्यवमागतौ । मलना स्वसुतं दृष्ट्वा प्राप्त-मुद्वाहितं गृहे ६९ कृत्वोत्सवं बहुविधं विप्रेभ्यश्च ददौ धनम् । होमं वै कारयामास चण्डिकायाः प्रसन्नतः ७० सभायां लक्षणो वीरो यात्राकाले तमब्रवीत् ' अगमां जयचन्द्राय मत्वा जित्वा हृतां तु ताम् ७१ नभोमार्गेण सप्तापौ योगिनौ च शिवाज्ञया । जहतुस्तौ च मां जित्वा तत्तीक्ष्णभयमोहितम् ७२ अद्याहं धाम गच्छामि चिरं जीव नृपोत्तम । इत्युक्तवन्तं तं नत्वा

नंतर बलवान् राजा दहा लक्ष सुवर्ण घेऊन व नुकताच विवाह झालेल्या वेलेस घेऊन त्याच्याकडे आला आणि त्यास नमस्कार करून म्हणाला ' वा प्रद्योतपुत्रा, हे राजा, हा महाबलवान् लक्षण माझ्या पत्नीस घेऊन तिला दासी करण्याची इच्छा करीत आहे ' ५७,५८. हे ऐकून सर्व राजासह परिमल अनेक प्रकारें त्याच्याकडून बोधित झाला, पण राजास बोध झाला नाहीं ५९. तेव्हां महा-सती वेला वारंवार अतिशय रडू लागली. तें ऐकून तो कृष्णांश बलखानीसह तिचें आश्वासन करून आकाशमार्गानें निघाला. लक्षणाची निर्भर्त्सना करून व त्यास घेऊन तो आनंदानें परत आला ६०,६१. नंतर आकाशमार्गानेंच तिला गृहीं पाठविलें. व तो त्या राजाच्या सात पुत्रास त्या बलवानाकडून दंभ न करण्याविषयीं शपथ करवून सोडून देता झाला. पुढें तेथें दहा रात्रि राहून ते जाण्याचा संकल्प करिते झाले ६२,६३. तेव्हा बलवान् महीराज परिमलराजाचे पाय धरून व डोळ्यात पाणी आणून म्हणाला ६४ 'हे महाराजा, ही तुझी स्नुषा बारा वर्षांची आहे. म्हणून, पित्याचा व मातेचा वियोग त्या बालिकेस सहन होत नाहीं ६५. यास्तव, तिला येथें सोडून तू गृहीं जा व सुखी हो. ज्यावेळीं ही पतीच्या योग्य होईल तेव्हा तुझ्या येथें पुनरपि येईल' ६६. असे बोलून तो राजा प्रेमामुळें त्याच्या अंगास स्पर्श करिता झाला. व त्याबरोबर परिमलराजाचें चूर्ण झालें. तें पाहून आल्हाद अतिशय दुःखी झाला. व त्यानें महीराजास स्पर्श केला. त्याबरोबर त्याच्या शरीराचें चूर्ण झालें. नंतर ज्याचीं हाडें तुटून गेलीं आहेत अशा त्या दोन्ही राजाची चिकित्सा पावकीयांच्या वैद्यानीं केली व पुढें ते सुखरूप होत्साते कृतकृत्य झाले. इकडे मलना आपल्या पुत्राचा विवाह झाला आहे असें पाहून गृहामध्यें बहुत प्रकारें उत्सव करिती झाली. तिनें ब्राह्मणांस धन दिलें व आनंदानें चंडिकेचा होम करविला ६७-७०. असो. यात्रासमयीं सभेमध्यें लक्षण वीर त्यास म्हणाला " अगमा जयचंद्रास मिळाली असें मानून व त्या हरण केलेल्या तिला जिंकून ७१ योगी शंकराच्या आज्ञेनें आकाशमार्गानें आले व त्यानीं मला जिंकून ताडन केलें. त्या त्याच्या तीक्ष्ण भयानें मोहित झालेला

ययुर्मुदाः स्वमालयम् ७३ [१४६०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डाप-रपर्वणि कलियुगीयेतिहाससमुच्चये सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

सूत उवाच ॥ विंशाब्दे चैव कृष्णांशे यथा जातं तथा शृणु । सागराख्यसरस्तीरे कदाचि-दिन्दुलो बली १ जप्त्वा सप्तशतीस्तोत्रं तत्र ध्यानान्वितोऽभवत् । एतस्मिन्नन्तरे हंसा आका-शाद्भूमिमागताः २ तेषां च रुतशब्दैश्च स ध्यानाद्व्युत्थितोऽभवत् । वक्ष्यमाणं वचः प्राहुर्धन्योऽयं दिव्यविग्रहः ३ पर्वतानां हिमगिरिर्वनं वृन्दावनं तथा । महावती पुरीणां च सागरः सरसामपि ४ नारीणां पद्मिनी नारी नृणां श्रेष्ठः स इन्दुलः । भो इन्दुल महाप्राज्ञ मानसे सरसि स्थिताः ५ वयं श्रुत्वा स्त्रियो वाक्यं नलिनीसागरं ययुः । दृष्ट्वा तत्र शुभां नारीं सर्वाभरण-भूषिताम् ६ सप्तालिभिर्युतां रम्यां गीतनाट्यविशारदाम् । दृष्ट्वा मोहवशमापन्ना वयं देशान्तरे गताः ७ विलोकिता नरा सर्वैस्त्वास्माभिर्जगतीतले । त्वत्समो न हि कोऽप्यत्र पद्मि-नीसदृशा भुवि ८ तस्मात्त्वं न समारुह्य तां देवीं द्रष्टुमर्हसि । तथेत्युक्त्वा शक्रसुतो हंसराज समारुहत् ९ सिंहलद्वीपके रम्ये ह्यार्यसिंहो नृपः स्थितः । तत्सुता पद्मिनीनाम्ना रूपयौवनगा-लिनी १० राजिण्यः सप्त विख्यातास्तत्सख्यः प्रमदोत्तमाः । नलिनीसागरे रम्ये गिरिजामन्दिरं शुभम् ११ तत्र स्थितां च तां देवामिन्दुलः स ददर्श ह । साऽपि तं सुन्दरं दृष्ट्वा हंसदेहं समा-स्थितम् १२ समाह्वाहूय तं देवं तत्र साद्धमरंस्त ह । वर्षमेकं ययौ तत्र नानालीलासु मोहितः १३ भक्तिगर्ववतापन्ने चाह्लादे जगदम्बिका । दृष्ट्वा चान्तर्दधे देवी गर्वाचरणकुण्ठिना १४ तस्य

मी आज, स्वधामीं जाण्याची इच्छा करितो. वा राजा, तू चिरकाल जीवित रहा. " असे बोलणाऱ्या त्या राजास नमस्कार करून राजे आपल्या गृही आले ७२,७३. याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखण्डनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सतरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥

सूत म्हणतात —कृष्णाचे वीस वर्षांचा झाला असता काय झाले तें ऐक. सागरनामक सरोव-राच्या तीरी एकदा बलवान् इंदुल १ सप्तशतीस्तोत्राचा जप करून तेथे ध्यान लावून बसला. इत-क्यात हंस अंतरिक्षातून भूमीवर आले २. त्यांच्या रुतशब्दाने तो ध्यान सोडून उठला. तेव्हा ते हंस हें वचन म्हणाले ' ज्याचे शरीर दिव्य आहे असा हा पुरुष धन्य होय ३. पर्वतामध्ये जसा हिमा-लय, वनामध्ये जसे वृंदावन वन, नगरातील जशी महावती, जलाशयातील जसा सागर ४, स्त्रिया-तील जशी पद्मिनी स्त्री त्याप्रमाणें हा इंदुल पुरुषामध्ये श्रेष्ठ आहे. अरे महाज्ञानी इंदुला, मानस-सरोवरीं असलेल्या आम्ही स्त्रीचे वचन ऐकून नलिनीसागराप्रत प्राप्त झालो. तेथे सर्व आभरणांनीं भूषित, सात सख्यांनी युक्त, रम्य व गीतवाद्यामध्ये निपुण अशा तुझ्या स्त्रीस पाहून आम्ही मोहित झालो व दुसऱ्या देशीं गेलो ५-७. या भूलोकी जेवढे म्हणून पुरुष होते त्या सर्वांस आम्ही पाहिले, पण भूलोकी पद्मिनीतुल्य वर तुझ्यावाचून दुसरा कोणी दिसला नाहीं ८. यास्तव, तूं आमच्यावर आरोहण करून त्या देवीस पहा. ' तेव्हा " ठीक आहे " असे म्हणून इंद्रपुत्र हंसराजावर आरूढ झाला ९. रम्य सिंहलद्वीपामध्ये आर्यसिंह म्हणून राजा होता त्याची पद्मिनी-नामक कन्या रूपयौवनसंपन्न असे १०. सात प्रख्यात राजिण्या तिच्या सख्या असत. त्या उत्तम स्त्रिया होत्या. नलिनीसागरामध्ये गिरिजेचे उत्तम मंदिर होते ११. तेथे असलेल्या त्या देवीस इंदुल पाहता झाला. तीही त्या हंसावर बसलेल्या सुंदर पुरुषास पाहून मोहित झाली व त्या देवास बोलावून ती त्याच्याशीं रममाण झाली. अनेक लीलांनीं मोहित झालेला तो इंदुल तेथें एक वर्ष राहिला १२,१३. असो. इकडे आल्हाद भक्तीमुळें गर्विष्ठ झाला असता जगदंबिका ते जाणून व गर्वाचर-

शासं महद्दुःखमाह्लादस्य जयैषिणः । स कैश्चित्पुरुषैर्वीरः कथितोऽभूत्स्वमन्दिरे १५ इन्दुलं रूपसम्पन्नं लङ्कापुरनिवासिनः । राक्षसास्त समाहृत्य स्वगेहं शीघ्रमाययुः १६ इति श्रुत्वा वचो घोरं सकुलो विललाप ह । हाहाशब्दो महांश्चासीत्तेषां तु रुदतां मुने १७ कृष्णांशो रुदितं प्राहाह्लाद ज्येष्ठ शृणुष्व भोः । जित्वाऽहं राक्षसान्सर्वांस्तालनाद्यैः समन्वितः १८ इन्दुलं त्वां समेष्यामि भवान्धैर्यपरो भवेत् । बलखानिश्च कृष्णांशो देवसिंहश्च तालनः १९ सप्तसप्तबलैः सार्द्धं लङ्कां प्रति ययुर्मुदा । मार्गपाशाश्च ये भूपा ग्रामपा राष्ट्रपास्तथा २० यथायोग्य बलिं रम्य प्राप्य तस्मै न्यवदयन् । ये भूपा मदमत्ताश्च जित्वा तांस्तालनो बली २१ बद्ध्वा तैश्च समाजग्मु. सेतुबन्ध शिवस्थलम् । पूजयित्वा च रामेशं रामेण स्थापितं शिवम् २२ सिंहलद्वीपमगमन्क्षणनासाभवन्नर तदा । नलिनीसागरं प्राप्य तत्र वासमकारयन् २३ पत्र समेषयामास बलखानिर्नृपाय च । आर्यसिंह महाभाग स्वपोतान्देहि तीर्णकान् २४ भवांश्च स्वबलैः सार्द्धं लङ्कां प्रति व्रजाधुना । नो चेत्त्वां सबल जित्वा राष्ट्रभङ्गं करोम्यहम् २५ इति श्रुत्वा पत्रवचो भूपतिर्बलवत्तरः । रक्षितः शक्रपुत्रेण युद्धाय समुपाययौ २६ इन्दुलः स्तम्भन मन्त्र सस्थाप्य शर उत्तमे । स्तम्भयःमास तत्सैन्य तालनाद्यैः सुरक्षितम् २७ दिवसे सुखशर्मा च त्रिलक्षै स्वदलै. सह । आर्यसिंहस्य तनयो महद्युद्धमचीकरत् २८ निशामुखे च समाप्ते शक्रपुत्रो महाबलः । शतपुत्रै. क्षत्रियाणां सार्द्धं युद्धाय चाययौ २९ तेषां हया हरिद्वर्णा योगिवेषधरा बलाः। महतीं ते सहस्रं च रिपोः सेनां व्यनाशयन् ३० तत्पश्चाद्दृहमासाद्य तदा ते सुखितोऽवसत् ।

णानें कुंठित होऊन गुप्त झाली. त्यामुळे जयाची इच्छा करणाऱ्या आल्हादास मोठे दुःख झाले. त्या वीराने त्याच्या मंदिरामध्ये येऊन कोणी पुरुषानी सांगितले की, लंकानगरामध्ये राहणाऱ्या राक्षसानीं रूपसंपन्न इंदुलास हरण करून आपल्या गृहीं नेले १४-१६. हे घोर वचन ऐकताच तो सर्व कुलासह विलाप करूं लागला. वा मुने, ते सर्व रडत असताना मोठा हाहाकार झाला. तेव्हा रडणाऱ्या ज्येष्ठ आल्हादास कृष्णांश म्हणाला " बा आल्हादा, ऐक. तालनादिकांसह जाऊन मी सर्व राक्षसांस जिंकून १७,१८ इंदुलास तुझ्याकडे आणून पोंचवीन. तूं धैर्य धर. नंतर बलखानि, कृष्णांश, देवसिंह व तालन हे सात लक्ष सैन्यासह लंकेस उत्साहानें गेले, व मार्गामध्ये जे राजे, ग्रामाधिप व राष्ट्राधिप भेटले त्यास यथायोग्य रम्य बलि समर्पण करिते झाले. पण जे राजे मदोन्मत्त होते त्यास जिंकून व बांधून बलाढ्य तालन आपल्याबरोबर सेतुबंध शिवस्थानास घेऊन गेला. रामाने स्थापिलेल्या रामेश्वर शंकराचे पूजन करून १९–२२ सहा महिन्यांमध्ये ते सिंहलद्वीपास गेले व नलिनीसागरास पोंचल्यावर ते तेथे वास करिते झाले २३. तेथून बलखानि, राजास पत्र पाठविता झाला. 'हे महाभागा आर्यसिंहा, समुद्रातून पार नेणाऱ्या आपल्या नावा तू आह्मास दे २४ व तूं आपल्या सैन्यासह आज लंकेस चल. नाहींपेक्षा तुला सैन्यासह जिंकून मी तुझ्या राष्ट्राचा नाश करीन ' २५. हा पत्रातील मजकूर ऐकून इंद्रपुत्राने ज्याचे रक्षण केले आहे असा तो अधिक बलवान् राजा युद्धास निघाला २६. इंदुल उत्तम बाणावर स्तंभन-मंत्राची स्थापना करून तालनादिकांनी ज्याचे रक्षण केले आहे अशा त्या सैन्यास निश्चेष्ट करिता झाला २७. दिवसा आर्यसिंहाचा पुत्र सुखशर्मा आपल्या तीन लक्ष सैन्यासह मोठे युद्ध करिता झाला २८ व रात्र पडली असता महाबलवान् इंद्रपुत्र क्षत्रियांच्या शंभर पुत्रांसह युद्धास आला २९. त्याचे घोडे हिरव्या रंगाचे होते व ते वीर बलाढ्य व योग्यांचा वेष धारण केलेले होते. ते शत्रूंची मोठी सेना नाहींशी करून टाकीत असत ३०. नंतर गृहीं येऊन ते सुखानें रहात असत.

एवं जातं च षण्मासं तयोर्युद्धं हि सेनयोः ॥ क्रमेण संक्षयं प्राप्तं बलखानेर्महद्बलम् ३१[१४९१]
इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये-ऽष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

सूत उवाच ॥ दृष्ट्वा सैन्यनिपातं च बलखानिर्महाबल. । संप्राप्य मानसीं पीडां युद्धार्थं विमुखोऽभवत् १ देवसिंह समाहूय त्रिकालज्ञं महामतिम् । तन्मन्त्रं मन्त्रयामास कार्यसिद्धिर्यथा भवेत् २ श्रुत्वोवाच महायोगी देवसिंहो महाबलः । महेन्द्रतनय कश्चित्सर्वशस्त्रास्त्रकोविदः ३ त्वत्सैन्य रोधयित्वा वै दिव्यास्त्रेण दिवामुखे । रात्रौ स्वय समागम्य करोति बलसंक्षयम् ४ अतस्त्वं मत्सहायेन तालनेन समन्वित । कृष्णांशेन समागम्य शक्रपुत्रं शुभाननम् ५ विजयी भव शीघ्रं हि नो चेद्यास्यसि यमक्षयम् । इति श्रुत्वा वचस्तस्य देवसिंहस्य भाषितम् ६ यत्नं चकार बलवान्भ्रातृमित्रसमन्वित. । एकविंशाब्दकृष्णांशो संप्राप्ते युद्धकोविदे ७ सेनां निवेशयामास पोतेषु हयवाहनः । अर्धं सैन्य च तत्रैव स्थापयित्वा महाबली ८ अर्धसैन्येन कृष्णांशो दक्षिणां दिशमाश्रितः । हयारूढाश्च ते शूराः सर्वे युद्धसमन्विताः ९ कपाट दृढमुद्घाट्य नगरान्तमुपाययुः । हत्वा ते रक्षिणः सर्वान्हुण्ठयित्वा पुर शुभम् १० रिपोर्दुर्गं समासाद्य चक्रु. शत्रोर्महत्क्षयम् । राज्ञोऽन्तःपुरमागत्य कृष्णांशो बलवत्तरः ११ ददर्श सुन्दरीं बालां पद्मिनीं पद्मलोचनाम् । सप्तालिभिर्युतां रम्यां गीतनृत्यविशारदाम् १२ बलाद्दोलां समारोप्य लुण्ठयित्वा रिपोर्गृहम् । जगाम शिबिरे तस्मिन्यत्र जातो महारणः १३ बलखानिस्तु बलवान्देवतालनसंयुतः । जघान शात्रवीं सेनामिन्दुलास्त्रेण पालिताम् १४ सुखवर्माणमागत्य सेनाध्यक्षं रिपोः सुतम् । सर्वतस्तं स्वकी-

ह्याप्रमाणें त्या उभय सैन्यांचें मोठें युद्ध सहा महिने झालें व क्रमानें बलखानीचें मोठें सैन्य क्षय पावलें ३१. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १ ८ ॥

सूत ह्मणतात:— सैन्याचा निःपात झाला आहे असे पाहून महाबलवान् बलखानि, मानसी व्यथेनें पीडित होत्साता युद्धातून परत फिरला १ व त्रिकालज्ञ आणि महाबुद्धिमान् देवसिंहास बोलावून कार्यसिद्धि कशी होईल असा त्याचा विचार घेता झाला २. तें ऐकून महायोगी व बलवान् देवसिंह ह्मणाला " कोणी सर्व शस्त्रास्त्रामध्ये निष्णात असलेला इंद्रपुत्र दिवसा दिव्य अस्त्राच्या योगानें तुझ्या सैन्याचा निरोध करून व रात्रीं स्वतः येऊन सैन्याचा क्षय करितो ३,४. यास्तव, तू माझ्या सहायानें, तालनासह, कृष्णाशासही बरोबर घेऊन सुंदर शक्रपुत्रास जिंक; नाहींपेक्षा यममंदनीं जाशील. " ह्याप्रमाणें त्या देवसिंहाचें भाषण ऐकून ५,६ तो बलवान् भ्राते व मित्र यासहवर्तमान यत्न करिता झाला. रणपंडित कृष्णाशास एकविसांवे वर्ष लागलें असता ज्याचें घोडा हें वाहन आहे असा तो देव सैन्यास नौकामध्य बसविता झाला. अर्धं सैन्य तेथेंच ठेवून तो महाबलवान् कृष्णाश दक्षिण दिशेस आला. ते घोड्यावर बसलेले सर्व शूर युद्ध करीत करीत ७–९ दृढ कपाट उघडून नगरामध्यें शिरले. तेथील रक्षकास मारून व तें शुभ नगर लुटून शत्रूच्या किल्ल्यामध्यें घुसून शत्रूचा विध्वंस करिते झाले. पुढें अतिबलाढ्य कृष्णाश राजाच्या अंतःपुरांत येऊन जिचे कमलाप्रमाणें नेत्र आहेत अशा त्या पद्मिनीनामक सुंदरीस पाहता झाला. गायन व नृत्य यांमध्यें कुशल असलेली ती रम्य कन्या सात सख्यानीं युक्त होती १०–१२. तिला बलात्कारानें पाळण्यात बसवून व शत्रूचें गृह लुटून जेथें मोठें युद्ध जुंपले होतें तेथें तो शिबिरात गेला १३. इकडे देवसिंह व तालन यासहवर्तमान बलाढ्य बलखानि इंदुलाच्या अस्त्रानें जिवें

चाक्षैर्जघ्नुस्ते मदविह्वलाः १५ हते तस्मिन्महावीर्ये जयन्तः क्रोधमूर्च्छितः । सेनामुज्जीवयाञ्चक्रे शक्रपुत्रः प्रतापवान् १६ श्यालं च सुखवर्माणं संजीव्य स्वगृहं ययौ । तत्र दृष्ट्वा जनान्सर्वान्बहुरोदनतत्परान् १७ विस्मितः स ययौ गेहं यथापूर्वं तथाविधः । न ददर्श प्रियां तत्र सख्यीभिः सहितां मुने १८ आर्यसिंहगृहं गत्वा पृष्ट्वाप्सर्वकारणम् । ज्ञात्वा सलुठितं गेहं शत्रुभिः शस्त्रकोविदैः १९ रुरोद सुभृशं वीरो हा प्रिये मदविह्वले । दर्शयाद्य मुखं रम्यं त्वत्पतिस्त्वां समुत्सुकः २० इत्येवं रोदनं कृत्वा वडवोपरि संस्थितः । धनुस्तूणीरमादाय खड्गं शत्रुविमोहनम् २१ एकाकी स ययौ क्रुद्धो निशि यत्र स्थितो रिपुः । एतस्मिन्समये वीरो बलखानिर्महाबलः २२ दृष्ट्वा तां सुन्दरीं बालां विललाप भृशं मुहुः । हा इन्दुल महावीर हा मद्बन्धो प्रियङ्कर २३ त्वद्योग्येयं शुभा नारी रूपयौवनशालिनी । दर्शनं देहि मे शीघ्रं गृहाणाद्य शुभाननम् २४ इत्युक्त्वा मूर्च्छितो भूत्वा मानसंऽपूजयच्छिवाम् । तस्मिन्काले च समायः शक्रपुत्रो महाबलः २५ जघान शात्रवीं सेनां कृष्णांशेनैव पालिताम् । दृष्ट्वा सैन्यनिपातं च तालनो वाहिनीपतिः २६ सिंहनादं ननादोच्चैः सिंहिन्युपरि संस्थितः । न जयः सैन्यनाशेन तव वीर भविष्यति २७ मां हत्वा जहि मत्सैन्यं योगिन्बालस्वरूपक । इति श्रुत्वा वचस्तस्य शक्रपुत्रो भयङ्करः २८ जघान हृदये बाणान्स तु खड्गेन चाच्छिनत् । स्वभर्त्रा पुनर्वीरो दंशयामास वक्षसम् २९

रक्षण झालें होतें अशा त्या सेनेस मारिता झाला १४. पुढे सुखवर्मानामक जो शत्रूचा पुत्र त्याच्या जवळ येऊन ते मदानें विव्हल झालेले वीर आपल्या अस्त्रांनीं त्यास चोहोंकडून मारूं लागले १५. त्या महावीरास मारिलें असता जयंत क्रोधानें मूर्च्छित झाला व त्या प्रतापी इंद्रपुत्रानें सैन्यास जीवत केलें १६. आपला श्यालक जो सुखवर्मा त्यासही जीवत करून तो आपल्या गृहीं आला, पण तेथें अनेक लोक बहुत रोदन करीत बसले आहेत असें पाहून १७ तो विस्मित होत्साता तशाच वेषानें नेहमीप्रमाणें गृहीं गेला. पण वा मुने, त्यास सख्यांसह त्याची प्रिया तेथें दिसली नाहीं १८. तेव्हा आर्यसिंहाच्या गृहीं जाऊन तो सर्व वर्तमान विचारिता झाला. शस्त्रामध्यें निपुण असलेल्या शत्रूंनीं घर लुटिले, असें जाणून १९ तो वीर अतिशय रडूं लागला. " हाय हाय ! अग हे मदानें विव्हल झालेले प्रिये, मला तूं आपलें रम्य मुख आतां दाखीव. तुझा पति तुजविषयीं अतिशय उत्सुक झाला आहे " २०. अशा प्रकारें विलाप करून व धनुष्य, बाणाचा भाता व शत्रूंस मोहित करणारी तरवार घेऊन तो वडवानामक घोडीवर बसला २१ आणि तो एकटाच त्या रात्रीं जेथें शत्रु होता तेथें गेला. इतक्यात इकडे महाबलवान् वीर बलखानि २२ त्या सुंदर बालेस पाहून अतिशय रडूं लागला. " हाय हाय ! हे महावीर इंदुला, माझ्या बंधो, हे प्रियकरा २३, रूप व यौवन यानीं युक्त अशी ही शुभ स्त्री तुझ्या योग्य आहे. यास्तव, मला आता शीघ्र दर्शन दे व या सुंदरीचा स्वीकार कर " २४. असें बोलून तो मूर्च्छित झाला व मनामध्यें त्यानें शिवेचें पूजन केलें. इतक्यात महाबलवान् इंद्रपुत्र प्राप्त झाला २५. व त्यानें, कृष्णाशानें जिचें रक्षण केले आहे अशा शत्रुसेनेस मारिलें. तेव्हा सैन्याचा नाश झालेला पाहून सेनापति तालन मोठ्यानें सिंहनाद करून व सिंहिनीवर बसून त्यास झणाला " अरे वीरा, सैन्याच्या नाशानें तुझा जय होणार नाहीं २६,२७. यास्तव, अगोदर मला मारून नंतर हे बालस्वरूपी योगी पुरुषा, माझ्या सैन्यास मार ". असें त्याचें वचन ऐकून भयंकर इंद्रपुत्र त्याच्या हृदयावर बाणाचा वर्षाव करिता झाला; पण तालनानें खड्गानें त्याचें तुकडे केले. व पुनः आपल्या बाणानें इन्दुलाच्या वक्षःस्थलीं प्रहार केला २८,२९. पण

इन्दुले मूर्छिते तस्मिन्वडवा दिव्यरूपिणी । आकाशोपरि संप्राप्य जयन्तं समबोधयत् ३० तदा स बालस्त्वरितः कालास्त्रं चापमादधे । तेन जातो महाञ्छब्दस्तालनः स ममार ह ३१ मृते सेनापतौ तस्मिन्कृष्णांशो मदविह्वलः । नभोमार्गेण संप्राप्य जगर्ज च मुहुर्मुहुः ३२ इन्दुलः क्रोधताम्राक्षस्तमाग्नेयं शरमादद । वह्निभूतं नभस्तच्च स्वयोगेन महाबली ३३ कृत्वा शीघ्रं ययौ शत्रुं स तु वायव्यमादधे । स्वयोगेनैव कृष्णांशः पीत्वा वायव्यमुत्तमम् ३४ पुनर्जगाम तत्पार्श्वं कलैकः स हरेः स्वयम् । तथाविध रिपुं दृष्ट्वा शक्रपुत्रो महाबली ३५ गन्धर्वास्त्रं समादाय मोहनायोपचक्रमे । पुनर्योगबलेनैव तदस्त्रं संक्षयं गतम् ३६ वारुणं शरमादाय तस्योपरि समक्षिपत् । स्वयोगेनैव कृष्णांशो जलं सर्वं मुखंकरात् ३७ एव सर्वाणि चास्त्राणि पीत्वा पीत्वा पुनः पुनः । ययौ शीघ्रं समभ्यात्मा बाहुशाली पतेन्द्रियः ३८ इन्दुलस्तु तदा कृष्णांश्विनीं त्यक्त्वा भुवि स्थितः । चर्मखड्गं गृहीत्वाशु खड्गयुद्धमचीकरत् ३९ एतस्मिन्नन्तरे प्राप्ता देवाद्या सर्वभूमिपाः । ददृशुस्तन्महद्युद्धं सर्वविस्मयकारणम् ४० प्रातःकाले च संप्राप्ते बलखानिर्महाबलः । ददर्श बालकं रम्यं जटाजिनसमन्वितम् ४१ श्रमेण कर्शितं वीरः शक्रपुत्रं प्रतापवान् । बलखानिः पितुर्बन्धोः शपथं कृतवान्स्वयम् ४२ स्वखड्गेनैव कृष्णांशं शिरस्तव हराम्यहम् । नो चेन्मे दूषिता माता साध्वी स्वर्णवती सती ४३ इत्युक्त्वा खड्गमादाय ययौ शीघ्रं रुषान्वितः ॥ बलखानिस्तु तं ज्ञात्वा त्यक्त्वास्त्रं प्रेमकातरः ४४ पुत्रान्तिकमुपागम्य वचनं चेदमब्रवीत् ।

त्यामुळे इन्दुल मूर्छित होऊन पडला असता दिव्यरूपी वडवा अंतरिक्षामध्ये जाऊन जयतास सावध करिती झाली ३०. तेव्हा तो बालक त्वरेने कालास्त्र धनुष्य धारण करिता झाला. त्यामुळें मोठा शब्द होऊन तालन मरून पडला ३१. तो सेनापति मृत झाला असता मदाने विह्वल झालेला कृष्णांश आकाशमार्गाने येऊन वारवार गर्जना करू लागला ३२. तेव्हा क्रोधाने ज्याचे नेत्र लाल झाले आहेत असा इंद्र आग्नेयास्त्राचा प्रयोग करिता झाला. व त्या महाबलवान् इंद्रपुत्राने आपल्या योगसामर्थ्याने अंतरिक्षास अग्निमय करून शत्रूवर चाल केली. त्याने त्यावेळीं वायव्यास्त्राचाही प्रयोग केला. पण आपल्या योगसामर्थ्याने उत्तम वायव्यास्त्रास गिळून टाकून पुनरपि तो हरीचा साक्षात् एक अंश असा कृष्णांश शत्रूच्या जवळ गेला. शत्रु जवळ आला आहे असे पाहून महाबलवान् इंद्रपुत्र ३३-३५ गंधर्वास्त्र घेऊन त्यास मोहित करण्यास तयार झाला; पण पुनरपि त्याच्या योगसामर्थ्यानेंच त्या अस्त्राचा क्षय झाला ३६. तेव्हा वारुणास्त्र घेऊन ते इंदुलाने कृष्णांशावर सोडिले. पण आपल्या योगसामर्थ्याने कृष्णांशाने तें सर्व जल आपल्या मुखात साठविलें ३७. याप्रमाणे पुन पुन. सर्व शस्त्रे गिळून ज्याचें अंतःकरण प्रसन्न झाले आहे असा तो बाहुशाली व जितेंद्रिय कृष्णांश त्वरेने त्याच्या पुढे आला. तेव्हा रागावलेला इन्दल घोडीस सोडून हातामध्ये ढाल व तरवार घेऊन भूमीवर उभा राहिला व त्याने खड्गयुद्ध केलें.इतक्यात तेथे देवादि सर्व भूमिपाल आले, व सर्वास आश्चर्यकारक वाटणारे असें तें मोठे युद्ध त्यानीं पाहिलें ३८--४०. प्रातःकाल झाला असता महाबलवान् बलखानि जटा व अजिन यानीं युक्त अशा त्या बालकास पाहता झाला. त्यावेळीं तो वीर प्रतापवान् शक्रपुत्र श्रमानें थकून गेला होता. त्यानें स्वत. पित्याचा बंधु जो बलखानि त्याची शपथ घेतली व म्हटले " हे कृष्णांशा, आपल्या तरवारीने मी तुझें मस्तक तोडीन; व असे न झाल्यास माझी साध्वी स्वर्णवतीनामक माता दूषित होईल"४१-४३.असें बोलून व खड्ग घेऊन रागावलेला तो वीर त्वरित पुढे चालला. तेव्हा प्रेमाने विह्वल झालेला बलखानि त्यास आलिंगून व शस्त्र टाकून पुत्राजवळ आला व असें म्हणाला " वा इन्दुला,

हे इन्दुल महाभाग पितृमातृयशस्कर ४५ आह्लादप्राणसदृश स्वर्णवर्त्मयकृन्मानस । पूर्वं हत्वा च मां वीर स्वपितृघ्न ततः पुनः ४६ तथैवादर्यसिंहं च देवसिंह तथा कुलम् । सुखी भव महावीर गेहे वै सुखवर्धनः ४७ इति श्रुत्वा वचस्तस्य ज्ञात्वा च स्वकुलं शिशुः । त्यक्त्वा खड्गं पतित्वा च स्वपितृघ्नस्य पादयोः ४८ कृतवान्रोदनं गाढमपराधनिवृत्तये । उवाच मधुरं वाक्यं शृणु तात मम प्रिय ४९ नार्यियं दूषिता वेदैर्नृणां मोहप्रदायिनी । देवो वा मानुषो वापि पन्नगो वापि दानवः ५० आर्यनार्यामयं जालं बन्धनाय समुद्यतः । सोऽहमाजन्मशुद्धस्य पितुराह्लादकस्य च ५१ गेहे जातो जयन्तश्च शक्रपुत्रः स्वयं विभो । पद्मिन्या जनितं मोहं गृहीत्वा ज्ञातवान्न हि ५२ क्षमस्व मम मन्दस्य दोषमज्ञानजं पितः । इत्युक्त्वा स पुनर्बालो रुरोद स्नेहकातरः ५३ सेनामुज्जीवयामास तालनं च महाबलम् । इति श्रुत्वा वचस्तस्य कृष्णांशो वचनं शिशोः ५४ परमानन्दमागम्य हृदयं स्वपरोपयत् । उत्सवं कारयामास तत्र देशे जने जने ५५ आर्यसिंहस्तु तच्छ्रुत्वा नानाद्रव्यसमन्वितः । ददौ कन्यां विधानेन पद्मिनीमिन्दुलाय वै ५६ शतं हयास्तथा नागा मुक्तामणिविभूषिता । कन्यार्थे तान्ददौ राजा जामात्रे बहुभूषणम् ५७ प्रस्थानमकरोत्तेषां सप्तमेऽह्नि वाक्यगद्गदः । ते तु सर्वे मुदा युक्ताः स्वगेहं शीघ्रमाययुः ५८ उषित्वा मासमेकं तु तस्मिन्नगे भयानके । कीर्तिसागरमामात्यं चक्रुस्ते बहुधोत्सवम् ५९ आह्लादस्तु प्रसन्नात्मा स्वसुतं पत्नीसंयुतम् । दृष्ट्वा विप्रान्समाहूय ददौ दानान्यनेकशः ६० दयाहाराख्यनगरे संप्राप्तः स्वकुलैस्सह । कृष्णांशस्य महाकीर्तिर्जाता लोके जने

तू मोठा उदार व आईबापांचे यश करणारा आहेस. तू आल्हादास प्राणासारखा व स्वर्णवर्त्मास शरीर व मन यासारिखा प्रिय आहेस. यास्तव, हे वीरा, प्रथमतः मला ठार मारून तुझ्या पितृघ्याला अगोदर मारून, नंतर त्याचप्रमाणे उदयसिंह, देवसिंह, तसेच सर्व कुल यांचा नाश करून, हे महावीरा, तू सुखवर्धनीच्या घरी सुखाने रहा" ४६ ४७ असे त्याचे वचन ऐकून व हे सर्व आपलेच कुल आहे असे जाणून, खड्गाचा त्याग करून व आपल्या पितृघ्न्याच्या पायांवर पडून तो अपराधाच्या निवृत्त्यर्थ अतिशय रोदन करिता झाला आणि असे मधुर वचन बोलला. "अहो प्रिय तात, स्त्रीस वेदांनी दूषण दिले आहे. कारण, ती पुरुषास मोह पाडणारी आहे. देव असो, मनुष्य असो, सर्प असो की दानव असो ४८–५०, हे श्रेष्ठ नारीरूप जाळे त्याग करणेच असते. मी जन्मापासून शुद्ध असलेल्या पित्या आल्हादकाच्या घरामध्ये उत्पन्न झालो. हे प्रभो, मी साक्षात् इंद्रपुत्र जयन्त आहे. पण पद्मिनीने घातलेल्या मोहामध्ये बद्ध झाल्यामुळे मला काही व समजले नाही ५१,५२. हे तात, अज्ञानामुळे घडलेल्या मज मंदाच्या या दोषाची मला क्षमा करा". असे बोलून प्रेमाने विह्वल झालेला तो बालक पुनः रडू लागला ५३. त्याने सर्व सैन्यास व महाबलवान् तालनास जीवंत केले व पुत्राचे हे वचन ऐकून कृष्णाश परमानंदयुक्त झाला. त्याने त्यास आपल्या हृदयाशी धरिले व त्या देशामध्ये त्याने ठिकठिकाणी उत्साह करविले ५४,५५. आर्यसिंह हे ऐकून नानाद्रव्ययुक्त होत्साता आपली पद्मिनी कन्या इन्दुलास विधानाने देता झाला. मोत्ये व मणि यांनी विभूषित केलेले शंभर घोडे व शंभर हत्ती त्या राजाने कन्येकरिता त्यास दिले; जामातास पुष्कळ भूषणे दिली व प्रेमामुळे ज्याचा कंठ दाटून आला आहे असा तो राजा त्यास आपल्या देशी जाण्याविषयी अनुमोदन देता झाला. नंतर ते सर्व वीर आनंदयुक्त होत्साते शीघ्र आपल्या घरी आले ५८. त्या भयंकर मार्गामध्ये एक महिना राहून कीर्तिसागराम येऊन पोचल्यावर त्यांनी नानाप्रकारें उत्सव केला ५९. हें ऐकून ज्याचे अंतःकरण प्रसन्न झाले आहे असा आल्हाद पत्नीयुक्त आपल्या पुत्रास पाठून ब्राह्मणास

जने ६१ पृथ्वीराजस्तु तच्छ्रुत्वा विस्मयं परमं ययौ । सा तु वै पद्मिनी नारी दुर्वासाशापमोहिता ६२ अप्सरस्त्वं स्वयं त्यक्त्वा भूमिनारीत्वमागता । द्वादशाब्दप्रमाणेन सोहित्वा जगतीतले ६३ यक्ष्मणा मरणं प्राप्य स्वर्गलोकमुपाययौ । नवमास कृतो वासस्तया चाह्लादमन्दिरे ६४ [१५५५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

सूत उवाच ॥ मुने पाञ्चालदेशे तु राजासीद्बलवर्द्धनः । तस्य पत्नी विशालाक्षी जलदेवीति विश्रुता १ बिसेनवंशभूपालो वेदतत्त्वविचारदः । दम्पती पूजयामास वरुणं यादसां पतिम् २ तस्य पुत्रावुभौ जातौ क्षत्रधर्मपरायणौ । लहरो ज्येष्ठतनयो मयूरध्वज एव हि ३ द्वादशाब्दवयो भूत्वा मयूरध्वज एव स । आज्ञया ज्येष्ठबन्धोश्च स्कन्ददेवमतोषयत् ४ यतेन्द्रियस्तथा मौनी वानप्रस्थपरायणः । पञ्चाब्दं तद्व्रती भूत्वा जपध्यानपरोऽभवत् ५ तदा प्रसन्नो भगवान्सेनानीरग्निभूः स्वयम् । स्वरूपं दर्शयामास सर्वाश्चर्यसमन्वितम् ६ मयूरध्वज एवापि दृष्ट्वा सर्वमयं शिशुम् । देवसेनासहायं च तुष्टाव श्लक्ष्णया गिरा ७ मयूरध्वज उवाच ॥ जयति ते वपुर्दिव्यविग्रहं नयति सर्वदा देवतागणान् । पिबति मात्रियं दुग्धमुत्तमं वधति सर्वदा दैत्यदानवान् ८ नमस्ते देवसेनेश महिषासुरमर्दन । षडानन महाबाहो तारकप्राणनाशक ९ प्रसन्नो भव सर्वात्मन्गुह शक्तिधराय च । किङ्करं पाहि मां नित्य शरणागतवत्सल १० इति श्रुत्वा स्तुतिं तस्य सेनानी-

---

बोलावून अनेक प्रकारचीं दानें देता झाला. नतर आपल्या कुलासह दशहाराख्य नगरास तो येऊन पोहोंचला. कृष्णाशाची लोकांमध्यें सर्वत्र मोठी कीर्ति झाली ६०, ६१. पण महीपतीस तें ऐकून मोठा चमत्कार वाटला. असो. पद्मिनी स्त्री दुर्वासाच्या शापानें मोहित होत्साती आपलें अप्सरस्त्व सोडून भूलोकची स्त्री झाली होती. यास्तव, बारा वर्षपर्यंत भूलोकीं राहून ती क्षयरोगानें मरण पावली व पुनरपि स्वर्गलोकीं गेली. आल्हादाच्या मदिरीं तिनें नऊ महिनेच वास केला ६२–६४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा एकोणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥

सूत ह्मणतात— हा मुने, पाचाल देशामध्यें बलवर्धन ह्मणून एक राजा होता. जिचे नेत्र विशाल आहेत अशी जलदेवीनामक त्याची पत्नी असे १. बिसेनवंशांतील राजा वेदतत्त्वामध्यें निपुण असून त्यानें दांपत्याचें व जलजंतूचा स्वामी जो वरुण त्याचे पूजन केलें २. त्याला क्षत्रधर्मामध्यें निपुण असलेले दोन पुत्र झाले. त्यातील लहर हा ज्येष्ठ पुत्र असून मयूरध्वज ह्मणून कनिष्ठ होता ३. पुढें तो मयूरध्वज बारा वर्षांच्या वयाचा झाला असता ज्येष्ठ बंधूच्या आज्ञेनें स्कंद देवास प्रसन्न करिता झाला ४. इंद्रियांचें नियमन करून व मौनव्रत धरून वानप्रस्थधर्मामध्यें परायण असलेल्या त्या राजपुत्रानें पांच वर्षें ब्रह्मचर्य पाळून एकनिष्ठेनें जप व ध्यान केलें ५. तेव्हां भगवान् अग्निपुत्र सेनानी स्वतः प्रसन्न झाला व सर्व आश्चर्यानें युक्त असें आपलें स्वरूप त्यानें दाखविलें ६. तेव्हा मयूरध्वजही त्या सर्वमय बालकास व देवसैन्यास साहाय्य करणाऱ्या वीरास पाहून मधुर वाणीनें त्याची स्तुति करिता झाला. मयूरध्वज ह्मणतो:— अलौकिक आकाराच्या या तुझ्या शरीराचा जयजयकार असो. हें तुझें शरीर सर्वदा देवतागणास प्रेरणा करीत असतें. तूं कृत्तिकानामक सहा माताचे दुग्ध पितोस व सर्वदा दैत्य व दानव यास मारितोस ७,८. हे देवसेनेच्या ईश्वरा, तुला नमस्कार असो. तूं महिषासुराचें मर्दन केलें आहेस. हे महापराक्रमी षडानना, तूं तारकासुराच्या प्राणांचा नाश करणारा आहेस ९. हे सर्वात्मन्, प्रसन्न हो. हे गुह, शक्ति धारण करणाऱ्या तुला

स्तमुवाच वै । किं तेऽभीष्टं नृपश्रेष्ठ मत्तः सर्वमवाप्स्यसि ११ इत्युक्तस्तेन देवेन भूपतिः प्राह नम्रधीः । बलं मे देहि भगवन्सहायं कुरु सर्वदा १२ तथेत्युक्त्वा तु तं स्कन्दस्तत्रैवान्तरधीयत । स नृपस्तु प्रसन्नात्मा कारयामास वै पुरम् १३ नाम्ना मयूरनगरं नरवृन्दसमन्वितम् । द्वियोजनायामयुतं स्कन्ददेवेन रक्षितम् १४ लहरो नाम तद्बन्धुर्द्विदशाब्दमयत्नतः । वरुणं पूजयामास नदीनदसमन्वितम् १५ तदा प्रसन्नो भगवान्वरुणो यादसां पतिः । वरं ब्रूहीति वचन प्रेम्णोवाच महीपतिम् १६ इति श्रुत्वाऽमृतमय वचन लहरो नृपः । तुष्टाव श्लक्ष्णया वाचा पाशिनं पयसां पतिम् १७ लहर उवाच ॥ यस्य चित्त महज्ज्ञेय तपोबलसमन्वितम् । अतः प्रचेतास्ते नाम नमस्तुभ्यं प्रचेतसे १८ रुणद्धि पयसा वेगं न कुनाप्यवरुन्धितः । अतस्ते वरुणो नाम नमस्ते वरुणाय वै १९ दैत्यानां बन्धनार्थाय देवानां जयहेतवे । दिव्य पाश त्वया नीत पाशिने ते नमो नम २० इति स्तुतस्तदा देवो राज्ञा तेनैव धीमता । नगरं कारयामास लहरीमथमुत्तमम् २१ त्रियोजनायामयुतं चतुर्वर्णसमन्वितम् । स्वयं च ग्रामरक्षार्थे तत्रोवास जलाधिपः २२ भूपस्तु तत्प्रसादेन प्राप राज्ञीं शुभाननाम् । रावी नाम महाश्रेष्ठा स्त्रिया देवाङ्गनोपमा २३ तस्यां स जनयामास सुतान्षोडशमितान् । धार्तराष्ट्रांशजान्मुख्यान्गजतुल्यबलान्वितान् २४ तत्पश्चात्कन्यका जाता नाम्ना मदनमञ्जरी । द्वादशाब्दवयःप्राप्त सुताया स तु भूपतिः २५ देव-

---

मी नमस्कार करितों. शरण आलेल्यावर नित्य प्रेम करणाऱ्या देवा, मज किंकराचें रक्षण कर १०. अशी त्याची स्तुति ऐकून सेनानी त्यास म्हणाला.— हे श्रेष्ठ राजा, तुझ्या मनात अति इष्ट असें जे काय आहे तें सर्वही तुला मजपासून प्राप्त होईल ११. त्या देवानें असें म्हटलें असता ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो राजा म्हणाला —हे भगवन्, मला बल दे व माझें सर्वदा सहाय कर १२. तेव्हा 'ठीक आहे' असे म्हणून स्कंद तेथेंच गुप्त झाला. परतु ज्याचे मन प्रसन्न झालें आहे असा तो राजा मयूरनगर या नावाचे नगर वसविता झाला. तें मनुष्याच्या समुदायानीं युक्त असलेलें नगर दोन योजने विस्तीर्ण असून त्याचें स्कंद देवाने रक्षण केलें होतें १३,१४. इकडे लहरनामक त्याच्या दुसऱ्या बंधूनें प्रयत्नानें बारा वर्षे नदी व नद यांनी युक्त अशा वरुणाचे पूजन केलें १५. त्यावेळीं जलचर प्राण्याचा स्वामी जो भगवान् वरुण तो प्रसन्न झाला व प्रेमानें ' वर माग ' असें राजास म्हणाला १६. हें अमृतमय वचन ऐकून लहरनामक राजा मधुर वाणीनें त्या पाशयुक्त वरुणाची स्तुति करूं लागला १७. लहर म्हणतोः— तुझे चित्त मोठें उदार व तपोबलाने युक्त असल्यामुळें तुला प्रचेता हे नाव पडलें आहे. हे वरुणा, तुला नमस्कार असो. तूं जलाच्या वेगास प्रतिबंध करीत असतोस, पण तुला कोणीही अवरोध करीत नाहीं. यास्तव, तुला वरुण हे नाव प्राप्त झालें आहे. तुज वरुणास नमस्कार असो. दैत्याना बांधण्याकरिता व देवाना जय मिळावा म्हणून तूं दिव्य पाश आणिला आहेस. तुज पाशयुक्त देवास मी वारंवार नमस्कार करितों १८—२०. याप्रमाणें त्या बुद्धिमान् राजानें ज्याची स्तुति केली आहे असा तो देव लहरीमथ या नावाचें उत्तम नगर तेथें करिता झाला २१. तें तीन योजनें विस्तीर्ण असून चारी वर्णाच्या लोकानीं युक्त होतें. ग्रामरक्षणाकरिता स्वतः वरुण तेथें राहिला २२. पुढें त्याच्या कृपेनें राजास रावी या नावाची अतिश्रेष्ठ व देवस्त्रीसारखी सुंदर स्त्री प्राप्त झाली. तिच्या उदरीं त्या राजास सोळा पुत्र झाले. ते धृतराष्ट्रपुत्राच्या अंशापासून झालेले पुत्र गजतुल्य सामर्थ्यानें युक्त व मुख्य होते २३,२४. त्याच्या मागून त्यास मदनमंजरी म्हणून एक कन्या झाली. त्या कन्येस बारावें वर्ष लागलें असता तो राजा चंद्रवंशामध्यें उत्पन्न झालेल्या उत्तम दे-

सिंहं वरं मत्वा चन्द्रवंशिनमुत्तमम् । आहूय ज्येष्ठतनयं प्रेषयामास भूपतिः २६ रणधीरस्तु तनयो लक्षमुद्राभिवो बली । सहस्रशूरसहितः प्रासवान्स महाव्रतीम् २७ मत्वा परिमलं भूपं तद्दीयाकुलशालिनः । स्वहेतुं वर्णयामास विवाहार्थे स्वतुः स्वयम् २८ श्रुत्वा परिमलो भूपो देवसिंहं महामतिम् । आहूय वचनं प्राह विवाहार्थे मनः कुरु २९ देवसिंहस्तु बलवान्निनृत्यं प्राह नम्रधीः । विवाहं न करिष्यामि ब्रह्मचर्यं व्रतं मम ३० बहुधा प्रार्थितस्सर्वैर्द्विजवृन्दसमन्वितैः । न तत्याज व्रतं श्रेष्ठं देवसिंहो महामतिः ३१ तदा परिमलो भूपो रणधीरं वचोऽब्रवीत् । सुखखानिरयं बालो विवाहार्थे वदाम्यहम् ३२ तथेति मत्वा स नृपो रणधीरो गृहं ययौ । पितरं कथयामास सुखखानिमहाव्रतः ३३ एतस्मिन्नन्तरे धूर्तो महीपतिरुवाच तम् । अयोग्योऽयं विवाहोऽत्र पावकीये कुलोत्तमे २४ शूद्रीयोऽत्र वरो राजन्वर्णसंकरकारकः । तस्मात्त्वं सैन्यसहितो जेतुं तान्गन्तुमर्हसि ३५ कारागारे लोहमये बन्धनं कुरु भूपते । त्वत्कीर्तिः स्वर्गगा नित्यं जगत्यन्ते भविष्यति ३६ जितस्तैर्जम्बुको राजा नेत्रसिंहस्तु यो नृपः । तथा गजपतिर्भूपः पृथ्वीराजो महाबलः ३७ आर्यसिंहस्तथाऽन्ये च जितास्ते बलवत्तराः। इति श्रुत्वा वचो रम्यं लहरो नृपसत्तमः ३८ सेनां सस्थापयामास चतुरङ्गबलान्विताम् । चतुर्लक्षमितां श्रेष्ठां पालितां षोडशात्मजैः ३९ माघशुक्लदशम्यां च बलखानिं महाबलः । संप्राप्तः स्वकुलैस्सार्धं चतुर्लक्षबलान्वितम् ४० देशे पाञ्चालके रम्ये लहरीनगरे स्थितः । द्वादशाब्दे च कृष्णांशे तत्र वासमकारयत् ४१ नृपतेराज्ञया शूरा युद्धाय समुपाययुः । बल-

---

सिंहास वर योजून मोठ्या पुत्रास बोलावून त्याच्याकडे पाठविता झाला. तेव्हा तो त्याचा रणधीरनामक बलाढ्य पुत्र बरोबर एक लक्ष मुद्रा घेऊन सहस्र शूरासहवर्तमान महाव्रतीस आला२५-२७.तो परिमलराजास व त्याच्या कुलांतील इतर पुरुषास नमस्कार करून भगिनींच्या विवाहाविषयीचा आपला हेतु स्वतः सागता झाला २८. तो ऐकून परिमलराजा महाबुद्धिमान् देवासिहास बोलावून "तूं विवाह करण्यास तयार हो" असें ह्मणाला. तेव्हा ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो बलवान् देवसिंह चुलत्यास ह्मणाला "मी विवाह करणार नाहीं; माझें ब्रह्मचर्यव्रत आहे" २९,३०. तें ऐकून द्विजसमुदायासहवर्तमान सर्वांनीं त्याची पुष्कळ प्रार्थना केली. पण त्या शहाण्या देवासिहानें आपलें श्रेष्ठ व्रत सोडिलें नाहीं ३१. तेव्हा परिमलराजा रणधीरास ह्मणाला "हा सुखखानि अविवाहित आहे. यास मी विवाह करण्यास सांगतों" ३२. तेव्हा "ठीक आहे" असें ह्मणून तो वीर रणधीर राजा आपल्या घरीं गेला व मोठा व्रत पाळणारा असा तो वीर सुखखानीविषयीं आपल्या पित्यास सागता झाला ३३. इतक्यात धूर्त महीपति त्यास ह्मणाला "या उत्तम पावकीय कुलामध्ये हा विवाह अयोग्य होय ३४. कारण, हे राजा, या विवाहातील वर शूद्र जातीचा आहे. त्यामुळें वर्णसंकर होईल. यास्तव, सैन्यासहवर्तमान जाऊन त्यास जिकणेच तुला योग्य आहे. बा राजा, तूं लोहमय कारागारामध्यें त्यास बद्ध करून सोड. त्यामुळ तुझी कीर्ति स्वर्गलोकापर्यंत जाईल व भूलोकीं जगाच्या अंतापर्यंत राहील ३५,३६. त्यानीं जंबुक राजास जिकिलें. नेत्रसिंह ह्मणून जो राजा होता त्याचा, तसाच गजपतिराजाचा, महाबलवान् पृथ्वीराजाचा व आर्यसिंहाचा पराजय केला. आणि त्यामुळें ते अतिशय बलाढ्य होऊन राहिले आहेत." हें त्याचें रम्य वचन ऐकून नृपोत्तम लहर चतुरंगबलानें युक्त असलेली आपली सेना तयार करिता झाला. तें श्रेष्ठ सैन्य चार लक्ष असून त्याचें सोळा पुत्रानीं रक्षण केलें होतें ३७-३९. तो बलवान् राजा माघशुक्ल दशमीस चार लक्ष सैन्यासहवर्तमान आपल्या सर्व कुलास बरोबर घेऊन बलखानीकडे आला ४०. व पांचाल देशातील

खानिस्तु धर्मात्मा दृष्ट्वा शूरांस्तथागतान् ४२ वीरानाह्वापयामास स्वकीयान्सहरे पुनः । तयोर्युद्धमभूद्घोरं सेनयोर्लोमहर्षणम् ४३ पञ्चमेऽह्नि दिवा याते बलखानिर्महाबलः । कृष्णांशेनैव सहितो रिपोर्बधमकारयत् ४४ पराजिताश्च ते शूरा हतशेषा भयातुराः । तान्दृष्ट्वा षोडश सुता रथं रथं स्व समास्थिताः ४५ युद्धायाभिमुखं जग्मुर्धनुर्बाणविशारदाः । कृष्णांशस्तांस्तथा दृष्ट्वा शरवर्षसमन्वितान् ४६ एकाकी प्रययौ शीघ्रं खड्गचर्मधरो बली । तेषां धनूंषि सञ्छित्त्वा बद्ध्वा तान्युद्धदुर्मदान् ४७ आह्लादाय ददौ वीरः कृष्णांशो रणकोविदः । पुत्राणां बन्धनं श्रुत्वा लहरो नृपसत्तमः ४८ ह्लावयामास ततसैन्यं बलखानेर्महात्मनः । जलीभूते तथा सैन्ये जयन्तो बलवत्तरः ४९ वायव्यास्त्रेण समं शुशोष सकलं जलम् । लहरस्य ततः सेनामुवाह बहुयोजनम् ५० तदा तु भगवान्देवो वरुणो यादसां पतिः । सुतामुद्वाहयामास लहरस्य महीपतेः ५१ लहरोऽपि प्रसन्नात्मा ज्ञात्वा स जगतीतले । भक्तिं चकार शुद्धानामंशानां परया मुदा ५२ दत्त्वा च बहुधा द्रव्यं परिक्रम्य पुनः पुनः । स्वान्ते निवेशयामास मासमात्रं प्रसन्नधीः ५३ अंशास्तेऽपि महत्पूजां गृहीत्वा लहरप्रदाम् । दोलामारोप्य तां देवीं स्वगेहाय ययुर्मुदा ५४ इति ते कथितं विप्र कृष्णांशचरितं शुभम् । सुखखानेर्विवाहं च श्रुत्वानन्दमवाप्नुयात् ५५ [१६१०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये विंशोऽध्यायः ॥ २० ॥

लहरीनामक रम्य देशामध्यें तो राहिला. कृष्णाश जेव्हा बारा वर्षांचा झाला तेव्हा त्यानें तेथें वास केला. राजाच्या आज्ञेनें शूर युद्धाकरिता येऊं लागले, पण धर्मात्मा बलखानि शूर येत आहेत असें पाहून आपल्या वीरास पुनरपि युद्ध करण्याविषयीं आज्ञा करिता झाला. त्या दोन्हीं सैन्याचें अंगावर रोमाच उभे करणारें घोर युद्ध झालें ४१-४३. पांचव्या दिवशीं सूर्योदय झाला असता कृष्णांशासहवर्तमान महाबलवान् बलखानि शत्रूंचा वध करिता झाला. तेव्हा त्या शूराचा पराजय झाला; व जे वीर मरून राहिले होते ते भयभीत झाले. तेव्हा अशी त्याची अवस्था पाहून सोळा पुत्र आपापल्या रथावर चढले व धनुष्य व बाण यान्या योगानें युद्ध करण्यात निपुण असलेले ते सर्व युद्धाकरिता समोर गेले. तेव्हा बाणांचा वर्षाव करणारे ते वीर समोर आले आहेत असें पाहून ढाल व तरवार धारण करणारा बलाढ्य कृष्णाश एकटाच त्वरेनें त्यान्यापुढे गेला व त्याचें धनुष्य तोडून युद्धाविषयीं मदोन्मत्त झालेल्या त्यास बांधून रणपंडित व वीर कृष्णाश त्यास आल्हादान्या स्वाधीन करिता झाला. नंतर आपल्या पुत्रास बाधलें आहे असें ऐकून उत्तम राजा लहर त्या महात्म्या बलखानीन्या सैन्यास जलात बुडविता झाला. पण तें सर्व सैन्य जलामध्यें बुडून गेलें आहे असें पाहून अतिबलाढ्य जयंत वायव्यास्त्रानें रणागणातील ते संपूर्ण जल सुकविता झाला व नंतर त्यानें लहराच्या सैन्यास अनेक योजनें दूर उडविलें. तेव्हा जलचराचा स्वामी भगवान् वरुण देव लहर राजाच्या कन्येचा विवाह करविता झाला ४४-५१. ज्याचा अंतरात्मा प्रसन्न झाला आहे असा लहरही मोठ्या आनंदानें, शुद्ध अंशानीं युक्त असलेल्या त्या राजावर भक्ति करिता झाला व भूलोकीं शुद्ध असलेल्या त्यास पुष्कळ द्रव्य देऊन वारंवार प्रदक्षिणा करून त्या उदार राजानें एक महिनाभर त्यास आपल्याजवळ ठेवून घेतलें ५२,५३. तेव्हा ते अंशरूप वीरही लहराने समर्पण केलेल्या त्या मोठ्या पूजेचा स्वीकार करून व त्या देवीस शिबिकेमध्ये घालून मोठ्या आनंदानें आपल्या घराकडे गेले ५४. हे ब्राह्मणा, याप्रमाणे मीं तुला कृष्णाशाचें शुभ चरित्र व सुखखानीचा विवाह सांगितला.

ऋषिरुवाच ॥ गृह गत्वा च ते वीराः किं चक्रुश्चरितं शुभम् । तं च कथय विप्रेन्द्र सर्वज्ञोऽसि मतो हि नः १ सूत उवाच ॥ गृहमागत्य ते सर्वे परितो भूपते सभाम् । गत्वा वार्तां तथा चक्रुर्यथा जातो महारणः २ श्रुत्वा परिमलो भूपो वाजिवृन्दान्क्षयं गतान् । आहूय स च कृष्णांशं वचन प्राह नम्रधीः ३ सिन्धुदेशे च गन्तव्य त्वया च बलशक्तिना । पञ्चलक्षान्हयान्कृत्वा पुनरागच्छ वै गृहम् ४ इति श्रुत्वा तु कृष्णांशो देवसिंहेन संयुतः । स्वर्णभारसहस्रोष्ट्रान्गृहीत्वा तरसा ययौ ५ शूरैश्च दशसाहस्रैस्सार्द्धं तत्र समागत. । मयूरनगरी यत्र चतुर्वर्णसमन्विता ६ प्रातःकाले तु सम्प्राप्ते मालाकारस्य वै सुता । पुष्पा नाम समासन्ना चारम्भे कुसुमार्थिनी ७ कृष्णांशस्तु तदा पूजां कृत्वा देवमयो मुदा । जगाम विपिनं रम्यं वसन्ते पुष्पनालिके ८ बह्वाश्चर्ययुत पुष्प मत्तभ्रमरनादितम् । दृष्ट्वा मुमोह कृष्णांशस्तदर्थे स्वयमुद्यतः ९ एतस्मिन्नन्तरे पुष्पा पुष्पार्थे समुपागता । ददर्श देवसदृश षोडशाब्दमय नरम् १० प्रसन्नवदन शान्तमिन्द्रनीलमणिद्युतिम् । कृष्णांशस्तु शुभां नारीं दृष्ट्वाश्चर्यमुपागतः ११ पप्रच्छ वचसा तां वै कस्येयं सुरसुन्दरी । स्वर्गलोकादिहायाता यदि वा पन्नगी स्वयम् १२ इति श्रुत्वा च सा प्राह मालाकारस्य वै सुता । अहं शूद्री महाबाहो पुष्पार्थे समुपागता १३ पुष्पणानेन भूपाल तुलिता भूपतेः सुता । नाम्ना पुष्पवती देवी राधेव सगुणावली १४ देवैश्च प्रार्थिता

हें सर्व चरित्र ऐकून कोणाही पुरुषाला आनंद प्राप्त होतो ९९. व्यासप्रणीत श्रीभविष्यमहापुराणान्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥

ऋषि म्हणतात.—हे विप्रेन्द्रा, गृहीं गेल्यावर त्या वीरांनीं कोणतें शुभ कृत्य केलें तें सांग, कारण, तूं सर्वज्ञ म्हणून आम्हांस मान्य आहेस १. सूत म्हणतात.—गृहीं आल्यावर ते सर्व वीर सभेमध्यें जाऊन राजाच्या समोंवार बसले व तें मोठें युद्ध कसें झालें ते सर्व वर्तमान त्यांनीं त्यास सांगितलें २. परिमलराजा घोड्यांचा समूह नष्ट झाला आहे असें ऐकून कृष्णांशास बोलावून नम्रपणें म्हणाला ३ " तूं व बलशक्ति असे दोघे मिळून सिंध देशांत जा आणि पांच लक्ष घोडे घेऊन पुनर्राप गृहीं परत या "हे ऐकून कृष्णांश देवसिंहासह हजार उंटावर सोनें लादून त्यासह वेगानें निघाला आणि चारी वर्णांच्या लोकांनीं युक्त असलेली मयूरनगरी जेथें होती तेथें अयुत शूरांसह जाऊन पोंचला ४,९. नंतर प्रातःकाल झाला असतां माळ्याची पुष्पानामक एक कन्या आली व ती पुष्पें तोडूं लागली. इतक्यांत देवमय कृष्णांश आनंदानें पूजा करून पुष्पांनीं भरलेल्या वसंतऋतूतील रम्य उपवनामध्यें गेला. तें वन एका आश्चर्यमय पुष्पांनीं युक्त असून मत्त भ्रमरांनीं नादित झालें होतें. त्यास पाहून कृष्णांश मोहित झाला व तो स्वतः सुंदर पुष्प घेण्याकरिता उद्यम करूं लागला. इतक्यांत त्या पुष्पाकरिता पुष्पाही तेथें आली. तिनें ह्या सोळा वर्षांच्या वयाच्या देवतुल्य पुरुषास पाहिलें. त्याचें मुख प्रसन्न, स्वभाव शांत व कांति इंद्रनीलमण्याप्रमाणें होती. इकडे कृष्णांशही त्या शुभ स्त्रीस पाहून विस्मित झाला व तिला आपल्या वचनानें " ही देवसुंदरी कोणाची आहे, ही स्वर्गलोकाहून येथें आली आहे कीं स्वतः नागीण आहे ? " असें म्हणाला ६-१२. हें त्याचें वचन ऐकून ती माळ्याची कन्या म्हणाली.—हे वीरा, मी शूद्रा आहें व पुष्पाकरिता येथें आलें आहें. हे भूपाला, या पुष्पावरोबर राजाच्या पुष्पवतीनामक कन्येची तुलना केलेली आहे. ती राधेप्रमाणें गुणाची जणु खाण असून त्या रूपयौवनशाली बालिकेची देवांनीं प्रार्थना केली आहे, पण मकरंदाच्या रीतीनें देव व बलात्कारानें तिच्या योग्य झाले नाहींत हे राजा, मकरंद कसा

बाला रूपयौवनशालिनी । मकरन्दभयादेवास्तस्या योग्या न वै बलात् १५ शृणु तत्कारणं भूप मकरन्दो यथा भवेत् । मयूरध्वजभूपेन समाप्त गृह्यतां वरम् १६ अजेयोऽन्यैश्च कृष्णांशाद्ऋते त्व जगतीतले । तस्मिन्न पृथिवीराजो राजराजः शिवप्रियः १७ स राजा कारयामास धर्ममेध हरिप्रियम् । तदा प्रसन्नो भगवान्यज्ञेशो यज्ञमूर्तिमान् १८ मिथुन जनयामास पावकात्सुन्दराननम् । मकरन्दः सुतो ज्ञेयः कन्या पुष्पवती मता १९ पञ्चमाब्दे वयो भूत्वा मकरन्दो महाबलः । तुष्टाव तपसा धर्म वेदधर्मपरायण. २० द्वादशाब्दे वयःप्राप्ते मकरन्दे नृपप्रिये । प्रसन्नो भगवान्धर्मो ददौ तस्मै महाहयम् २१ शिलामय महावेग शत्रुसैन्यक्षयङ्करम् । तमश्व स्वयमारुह्य सर्वपूज्यो ह्यभूत्सुखी २२ तस्येदं सुन्दरं दिव्य विपिन सुरपूजितम् । भवानर्हति वै श्रेष्ठ पुष्पवत्या कलेवरम् २३ इति श्रुत्वा तु वचन कृष्णांशः स्मरपीडित. । ददौ बहुधन तस्यै मानिन्या गेहमागत २४ देवसिंहस्तु कालज्ञो ज्ञात्वा मोहत्वमागतम् । कृष्णांश बोधयामास पद्यैः साङ्ख्यसमद्भवै २५ कृष्णांशस्तु ततस्सार्धं देवसिंहेन तन्मय. । सिन्धुदेशं समागत्य क्रीत्वा सुहयांस्तदा २६ मासान्ते गृहमागत्य राज्ञे सर्वं न्यवेदयत् । पुष्पवत्या शुभ रूप ध्यात्वा पुष्पस्थित बली २७ कृष्णांशो मोहमागत्य तुष्टाव जगदम्बिकाम् । कृष्णांश उवाच ॥ देवमाये महामाये नित्यशुद्धस्वरूपिणि । त्राहि मां कामदेवार्त पुष्पवत्यै प्रबोधय २८ मधुकैटभसंमोहे महिषासुरघातिनि । त्राहि मां कामदेवार्त पुष्पवत्यै प्रबोधय २९ धूम्रलोचनसंदोहे चण्डमुण्डविनाशिनि । त्राहि० ३०

झाला, ते सर्व तू ऐक. मयूरध्वजराजानें गुहापासून ' कृष्णांशावाचून इतर राजास भूलोकीं अजिंक्य होशील ' असा वर मिळविला. त्याचा शिवप्रिय राजाधिराज पृथ्वीराज मित्र आहे. तो राजा हरीस प्रिय असलेला धर्मयज्ञ करीतता झाला. तेव्हा यज्ञस्वरूपी भगवान् यज्ञेश प्रसन्न झाला १३-१८ व त्याचे मुख सुंदर आहे असे जुळे त्याने अग्नीतून निर्माण केलें. त्यातील मकरंद हा पुत्र व पुष्पवती कन्या जाणावी १९. महाबलवान् व वैदिकधर्मामध्यें तत्पर असलेला मकरंद पाच वर्षांच्या वयाचा झाला असता तो तपाच्या योगाने धर्मास संतुष्ट करिता झाला २०. राजास प्रिय असलेल्या मकरदास बारावें वर्ष लागलें असता भगवान् धर्म प्रसन्न झाला व त्यानें त्यास एक मोठा घोडा दिला २१. तो पाषाणमय, महावेगवान् व शत्रूंच्या सैन्याचा क्षय करणारा होता. असो. त्या अश्वावर तो स्वत आरूढ होऊन सर्वांस पूज्य व सुखी झाला २२. त्याचें हें सुंदर, देवांनी पूजिलेले व दिव्य उपवन आहे. आपण श्रेष्ठ आहा व पुष्पवतीच्या कलेवरास योग्य आहा २३. असें तिचें वचन ऐकून कृष्णांश कामपीडित झाला. त्यानें तिला पुष्कळ द्रव्य दिलें व तो त्या मालिनीच्या गृहीं आला २४. तेव्हा कालज्ञ देवसिंह, कृष्णांश मोहित झाला आहे असे जाणून त्यास सांख्यशास्त्रोक्त पद्यांनीं बोध करिता झाला. तेव्हा तन्मय झालेला कृष्णांश, देवसिंहासहवर्तमान मुख्य सिंधुदेशात जाऊन, सर्व घोडयास विकत घेऊन, एक महिन्याच्या शेवटी घरीं येऊन सर्व वर्तमान राजास सांगता झाला. नंतर तो बलवान् कृष्णांश पुष्पेनें सांगितलेल्या पुष्पवतीच्या सुंदर रूपाचें ध्यान करून मोहित झाला व जगदंबेची स्तुति करूं लागला. कृष्णांश म्हणतो -- हे देवमाये, हे महामाये, हे नित्यशुद्धस्वरूपिणि, कामदेवाने पीडिलेल्या माझें रक्षण कर व पुष्पवतीस चांगला उपदेश कर २५-२८. मधुकैटभ दैत्यास मोहित करणाऱ्ये व महिषासुराचा घात करणाऱ्ये देवि, कामदेवाने पीडिलेल्या माझें रक्षण कर व पुष्पवतीस बोध गोष्टी सांग २९. जिने धूम्रलोचनास जाळिलें आहे, चंड व मुंड दैत्यांचा नाश

रक्तबीजासृजं पीते सर्वदैत्यभयङ्करे । त्राहि मां० ३१ निशुम्भदैत्यसंघाते शुम्भदैत्यविनाशिनि । त्राहि मां० ३२ इति स्तुत्वा च सुष्वाप स वीरः परमासने । तदा तु शारदा देवी तयोः स्वप्नप्रदर्शनम् ३३ चकार प्रत्यहं देवी वरदाऽभयकारिणी । एवं गते चतुर्मासे जलवृष्टिकरे मुने ३४ त्रिविंशाब्दवयश्चासीत्कृष्णांशस्य यशस्करम् । कार्तिके कृष्णपक्षे तु गतोऽसौ देवसंयुतः ३५ मयूरनगरं रम्यं मकरन्देन रक्षितं । पुष्पागृहमुपागम्य तत्र वासमचीकरत् ३६ एकदा सुन्दरं हारं कृष्णांशेनैव गुण्ठितम् । मणिमुक्तायुतं रम्यं नानापुष्पसमन्वितम् ३७ गृहीत्वा प्रययौ पुष्पा पुष्पवत्याश्च मन्दिरं । सा तु वैवेयकं बद्ध्वा त्वष्ट्रैव रचितां प्रियम् ३८ हृदि कृत्वा मुमोहाशु कामिनी रतिरूपिणी । अये सखि महाभाये सत्यं कथय मेऽग्रतः ३९ वैवेयकमिदं रम्यं कुतः प्राप्तं मम प्रियम् । इति श्रुत्वा वचस्तस्या मकरन्दभयातुरा४० पुष्पा पुष्पाञ्जलिं कृत्वा वचनं प्राह तां प्रति । जीवदानं च मे देहि तर्हि ते कथयाम्यहम् ४१ तथेत्युक्तवती कन्यां प्राह मे भगिनी शुभे । कृष्णा नाम महारम्या सर्वलोकविमोहिनी ४२ महाव्रत्यां गृहं तस्या मद्गृहे सा समागता । तया विरचितं सुभ्रु वैवेयकमनुत्तमम् ४३ इति श्रुत्वा तु वचनं देवी पुष्पवती स्वयम् । उवाच मालिनीं वाक्यं शीघ्रं दर्शय तां मम ४४ मकरन्दभयाद्देवास्तथाऽन्ये पुरुषा भुवि । मत्समीपे गतिर्नास्ति तेषां सत्यं ब्रवीम्यहम् ४५ इति श्रुत्वा वचो घोरं पुष्पा तु भयकातरा । नोवाच वचनं किञ्चित्पृष्टमाना पुनः पुनः ४६ तदा पुष्पवती प्राह किं ते भयमुपागतम् । साह मे भगिनी रम्या यदि त्वद्गृहमागता ४७ मोहितः

केला आहे व रक्तबीजाचें रक्त पिऊन टाकलें आहे अशा त्या सर्व दैत्यास भयंकर असलेल्या देवीनें कामाने पीडित झालेल्या माझें रक्षण करावें व पुष्पवतीस अनुकूल उपदेश करावा ३०,३१. निशुंभ दैत्यास नाहींसा करणाऱ्ये व शुंभ दैत्याचा नाश करणाऱ्ये देवि, कामानें पीडित झालेल्या माझे रक्षण कर आणि पुष्पवतीस काहीं सांग ३२. अशी स्तुति करून तो वीर उत्तम आसनावर निजला. तेव्हा हे मुने, वर देणारी व अभय देणारी ती शारदा देवी त्या उभयतास रोज स्वप्न दाखवूं लागली. याप्रमाणें पावसाळ्याचे चार महिने गेले असतां व कृष्णाशाचें यशस्वी वय तेवीस वर्षांचें झाले असतां कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षांत तो देवसहितहसहवर्तमान मकरंदाने रक्षिलेल्या रम्य मयूरनगरामध्ये गेला व पुष्पाच्या गृहीं जाऊन त्यानें तेथें वास केला. एकदा कृष्णाशानेंच गुंफिलेला मणि, मोत्यें व अनेक प्रकारचीं पुष्पें यांनीं युक्त, रम्य व सुंदर हार घेऊन पुष्पा पुष्पवतीच्या मंदिरी गेली. तेव्हा ती रतीसारखी सुंदर कामिनी, तो त्वष्ट्यानें रचिलेल्या प्रिय हाराप्रमाणें हार पाहून व तो गळ्यांत घालून मोहित झाली. 'अगे महाभाये सखि, माझ्याजवळ खरें सांग. हें मला प्रिय असलेलें रम्य कंठभूषण तुला कोठून मिळालें ?' हें तिचें वचन ऐकून मकरंदाच्या भयाने व्याकुळ झालेली ती पुष्पा हात जोडून तिला म्हणाली " मला जर तूं जीवदान देशील तर मी तुला सांगेन " ३३–४१. तेव्हा " ठीक आहे " असें म्हणणाऱ्या त्या कन्येस ती म्हणाली " हे शुभे, माझी सर्व लोकांस मोह पाडणारी व अतिरमणीय अशी कृष्णानामक भगिनी आहे. तिचें महाव्रतीमध्यें गृह असून ती माझ्या गृहीं आली आहे. हे सुंदरि, हा अत्युत्तम हार तिनें गुंफिला" ४२. असें तिचें वचन ऐकून देवी पुष्पवती आपणच तिला म्हणाली " तर मग मला ती त्वरित दाखीव ४३,४४. मकरंदाच्या भयानें देव व तसेच भूलोकचे अन्य पुरुष यांची माझ्या समीप गति होत नाहीं, हें मी तुला सत्य सांगून ठेवितें " ४५. असें घोर वचन ऐकून पुष्पा भयभीत झाली व जरी ती वारंवार प्रश्न करीत होती तरी कांहीं एक बोलली नाहीं ४६. तेव्हा पुष्पवती म्हणाली, ' तुला

पुरुष कश्चिद्बलात्तां हि भजिष्यति । तर्हि मे मरण ज्ञेय कुलधर्मपरायणे ५८ इति श्रुत्वा पुण्यवती पुनः प्रोवाच धर्मिणी । मयूरध्वज एवापि पितेता नीतितत्परः ४९ अयोग्य ये करिष्यन्ति ते यास्यन्ति यमालयम् । अतस्त्व शीघ्रमादाय तद्दोलां च मदन्तिके ५० दर्शयित्वा च तां रम्यां पुनर्गच्छ गृह स्वकम् । तथेति मत्वा सा शूद्री गृहमागत्य भामिनी ५१ कृष्णांश वर्णयामास यथा प्रोक्त तया मुने । इति श्रुत्वा वचो रम्य कृष्णांशो बलवत्तरः५२ नासावेध स्वयं कृत्वा पुनर्नारीमय वपुः । जगाम पुण्यया सार्द्ध दोलामारुह्य वीर्यवान् ५३ तदा पुण्यवती देवी दृष्ट्वा कृष्णां मनोरमाम् । उवाच वचनं पुण्यां वचः शृणु सखे मम ५४ यादृशीयं शुभा नारी तादृशः पुरुषो मया । स्वप्नान्ते प्रत्यहं दृष्टो रममाणो मया सह ५५ कृष्णांशश्च तु तामाह देशराजसुतो वरः । उदयो नाम विख्यातस्तस्याहं ललिता सखी ५६ प्रत्यहं रचितं हारमथ पूजनहेतवे । स वीरस्तु गृहीत्वा तद्देवीं पूजय न्यवेदयत् ५७ एकदा प्रस्थित वीर पुष्पमध्ये शनैः शनैः । औदासीन्य च त दृष्ट्वा प्रोवाचाह समागता ५८ मोहोऽयं ते कुत प्राप्तः सत्य कथय मा चिरम् । इत्युक्तः स तु मामाह स्वप्नान्ते प्रत्यहं सखि ५९ मया दृष्टा शुभा नारी रूपयौवनशालिनी । तद्वियोगेन दुःखार्त मुख म्लानत्वमागतम् ६० इति श्रुत्वा पुष्पवती तामाह रुचिराननाम् । विवाहो मे यदा तेन सार्द्ध रम्यो भविष्यति ६१ तदा त्वां तर्पयिष्यामि बहुद्रव्यैः शुभानने । अतस्त्व गच्छ तत्पार्श्वं शीघ्र तस्मै निवेदय६२इति श्रुत्वा तु तद्वाच पुष्पा प्रेमसमन्विता । दोलामारोप्य तां कृष्णां स्वगेहं गन्तुमुद्यता६३

कशाचें भय वाटत आहे ?' त्यावर ती माळीण म्हणाली "माझी ही बहीण रम्य आहे. तेव्हा जी जर तुझ्या गृहीं आली व एखाद्या मोहित झालेल्या पुरुषानें बलात्काराने तिचें सेवन केलें तर हे कुलधर्मामध्यें परायण असणाऱ्या देवि, मी मेलेंच असें समज" ४७,४८. असें तिचें वचन ऐकून धार्मिक पुष्पवती पुनः म्हणाली "माझा मयूरध्वज पिताही नीतितत्पर आहे. तेव्हा जे कोणी अयोग्य कर्म करतील ते यमलोकी जातील. यास्तव, तिचा मेणा घेऊन तूं शीघ्र मजकडे ये व त्या स्त्रीस मला दाखवून पुनरपि आपल्या गृहास जा." तेव्हां "बरे आहे" असें म्हणून ती सुंदर शूद्री गृहीं परत आली ४९-५१. व हे मुने, राजकन्येने जसे सांगितलें होतें तसे तिनें कृष्णाशास कळविलें. तें रम्य वचन ऐकून बलाढ्य कृष्णाश आपल्या हातानें नाक टोंचून घेऊन व स्त्रीवेष घेऊन तो वीर्यवान् मेण्यात बसून पुष्पेसह गेला ५२,५३. तेव्हा पुष्पवती देवी मनोरम कृष्णेस पाहून पुष्पेस म्हणाली, "सखे, माझें म्हणणे ऐक ५४. ही जशी शुभ स्त्री आहे तसाच एक सुंदर पुरुष माझ्याशीं रममाण होत असल्याचें मी स्वप्नात रोज पाहतें" ५५. ते ऐकून कृष्णाश तिला म्हणाला "देशराजाचा उदय या नावानें प्रसिद्ध असलेला जो वडील पुत्र आहे त्याची मी प्रिय सखी आहें ५६. त्याच्या पूजेकरिता मी रोज हार गुफीत असतें व तो घेऊन तो वीर देवीची पूजा करून तिला समर्पण करितो ५७. हे पुष्पवति, एकदा तो वीर हळू हळू चालला आहे हें पाहून मी त्याच्याजवळ जाऊन म्हणाले "हा मोह व हें औदासीन्य तुला कशामुळें प्राप्त झाले तें मला सत्य सांग; उशीर लावूं नको." याप्रमाणें मीं झटलें असता तो मला म्हणाला :-हे सखि, मी स्वप्नामध्ये रोज रूपयौवनसंपन्न व शुभ स्त्री पाहतो व तिच्या वियोगानें दुःखयुक्त झाल्यामुळें माझे मुख म्लान झालें आहे". हे ऐकून पुष्पवती त्या सुंदरीस म्हणाली "हे समुखि, त्याच्याशीं माझा जेव्हां रम्य विवाह होईल तेव्हां मी तुला पुष्कळ द्रव्य देऊन तृप्त करीन. यास्तव, तूं त्याच्याजवळ जाऊन त्याला हें त्वरित निवेदन कर." असें तिचें वचन ऐकून प्रेमयुक्त झालेली पुष्पा कृष्णेस मेण्यामध्यें घालून आपल्या गृहीं जाण्यास तयार झाली ५८-६३. इतक्यात, हे भार्गवा, तो

दुर्गद्वारे तु संप्राप्ते तद्दोलायां च भार्गव । मकरन्दो महावीर्यो द्वादशाब्दवया बली ६४ दोलासमीपमागत्य ददर्श रुचिराननाम् । कृष्णामिन्दीवरश्यामां चारुनेत्रां मनोहराम् ६५ मुमोह बलवान्वीरो गोवर्धनकलांशकः । प्रेम्णोवाच स चार्वङ्गि शृणु मे वचनं प्रिये ६६ मद्गृह शीघ्रमागच्छ पत्नी मम भवाधुना । इति श्रुत्वा तु सा कृष्णा विहस्योवाच भूपतिम् ६७ कुलीनस्त्वं महावीर वह्निकुण्डात्समुद्भवः । षोडशाब्दवयास्तूणाशनिभद्रसमन्वितः ६८ त्वद्योग्या भूपतेः कन्या चन्द्रसूर्यान्वयस्य वै । अहं शूद्री हीनतमा कथं योग्या तवेह वै ६९ कन्याऽहं शूद्रजातेश्च ब्रह्मचर्यव्रते स्थिता । इति श्रुत्वा तु वचनं मकरन्दो नृपात्मज ७० बलाद्गृहीत्वा तां नारीं पस्पर्श हृदये स्वयम् । कृष्णांशस्तु तदा तस्य दत्त्वा तद्धृदयव्यथाम् ७१ मोहयित्वा नृपसुतं स देवः स्वगृह ययौ । मकरन्दस्तु सम्बुद्धो मदनाग्निपरीडितः ७२ गेहमागत्य पुष्पायाः सर्वं तस्यै न्यवेदयत् । तल्लेहकातर भूप मकरन्दं महाबलम् ७३ पुष्पाह श्लक्ष्णया वाचा शृणु पार्थिवसत्तम । महावती पुरी रम्या तत्र कृष्णागृह शुभम् ७४ त्वद्भयाच्च गता गेह कृष्णांशस्य च सा सखी । रोदनं कुर्वती गाढं तव निन्दनतत्परा ७५ आगमिष्यति वै वीरो बलैस्सार्द्धं महाबली । अतस्त्व सर्वसैन्यानि सज्जीभूतानि वै कुरु ७६ जितो येन महावीरः पितृव्यो लहरस्तव । विवाह कारयामास तद्बन्धोः सुतया सह ७७ इति श्रुत्वा वचो घोर मकरन्दो महीपतिः । शतघ्नीः स्थापयामास दुर्गकूटेषु दारुणा ७८ स्वसैन्य च समाहूय त्रिलक्ष खड्गसयुतम् । तत्रैव स्थापयामास राष्ट्ररक्षा-

---

मेणा किल्ल्याच्या द्वाराशी आला असता महावीर्यवान्, बलवान् व बारा वर्षांच्या वयाचा मकरंद त्याच्याजवळ येऊन त्या सुमुखी कृष्णास पाहता झाला. ती नीलकमलाप्रमाणें श्यामवर्ण, सुंदर नेत्रांने युक्त व मनोहर होती. तेव्हा गोवर्धनाच्या कलेपासून निर्माण झालेला तो बलवान् वीर मोहित झाला व प्रेमाने म्हणाला "हे सुंदरि, माझे वचन ऐक. हे प्रिये, माझ्या गृही शीघ्र ये व आज माझी पत्नी हो." हें ऐकून ती कृष्णा राजास हंसून म्हणाली "हे महावीरा, तू कुलीन आहेस. तुझा अग्निकुंडातून जन्म झाला आहे. तूं सोळा वर्षांच्या वयाचा आहेस व वज्रतुल्य बाणांनीं युक्त आहेस ६४-६८. चंद्र व सूर्य वंशामध्ये उत्पन्न झालेल्या राजाची कन्या तुला योग्य आहे. मी शूद्री व त्यामुळेंच अतिहीन, तेव्हा तुझ्या योग्यतेची कशी होईन? मी शूद्री व त्यातूनही ब्रह्मचर्यव्रतामध्ये स्थित आहे." असें तिचें वचन ऐकून राजपुत्र मकरंद त्या स्त्रीस बलात्काराने वरून स्वतः आलिंगन देता झाला. तेव्हा कृष्णांशाने त्या राजपुत्रास असह्य हृदयपीडा देऊन ६९-७१ व मोहित करून तो देव आपल्या घरीं गेला. नंतर सावध होऊन मदनाग्निने अतिव्याकुळ झालेला तो मकरंद पुष्पेन्या गृहीं येऊन तिला सर्व वर्तमान सांगता झाला. तेव्हा तिच्या स्नेहानें व्याकुळ झालेल्या महाबलाढ्य मकरंदास पुष्पा मधुर वाणीनें म्हणाली "हे उत्तम राजा, ऐक. महावती म्हणून एक रम्य नगरी आहे. तेथे कृष्णाचें शुभ घर आहे ७२-७४. तुझ्या भयामुळे ती आपल्या गृहीं गेली. ती कृष्णांशाची सखी असून ती येथून जाताना तुझी अतिशय निंदा करून रोदन करीत चालली झाली ७५. आता तो महाबलाढ्य वीर आपल्या सैन्यासहवर्तमान येथे येईल. यास्तव, तूं आपलीं सर्व सैन्यें सज्ज कर ७६. त्या महावीरानें तुझ्या लहरनामक पितृव्यास जिंकिलें व आपल्या बंधूचा त्याच्या कन्येशीं विवाह करविला" ७७. असे तिचें घोर वचन ऐकून राजा मकरंद किल्ल्यावरील माऱ्याच्या जागांवर भयंकर तोफा चढवून तीन लक्ष सशस्त्र सैन्यास बोलावून त्यांची तेथें स्थापना करून राष्ट्राचें रक्षण करण्यास तयार झाला ७८, ७९. इकडे

धर्मसुतः ७९ कृष्णांशस्तु गृह प्राप्य बलखानिमुवाच तत् । श्रुत्वा स च महावीरो भ्रातृमित्र-समन्वितः ८० पञ्चलक्षाश्वलैस्सार्द्धं मयूरनगरं ययौ । शतघ्नीः पञ्चमाहृत्य गजा दशसह-स्रकाः ८१ एकलक्षा हयाः सर्वे शेषा ज्ञेयाः पदातयः । उषित्वा पञ्चमात्रं तु मार्गे पञ्चालके तदा ८२ मकरन्दस्तु तच्छ्रुत्वा शनिभल्लकरस्थितः । सेनामाज्ञापयामास जहि शत्रून्महाबलान् ८३ श्रुत्वा पदातयो लक्षा शतघ्नीविद्विषादन् । तास्तु वै समाहृत्याश्वकु शत्रुबलक्षयम् ८४ ग्रामस्य दक्षिणद्वारि हयारूढास्तदा ययुः । भुशुण्डीशरणीशक्तिखड्गयुद्धविशारदाः ८५ एकल-क्षहयास्सर्वे मकरन्दस्य भूपतेः । तयोश्चासीन्महद्युद्ध तुमुलं हयसैन्ययोः ८६ तदा तु पश्चिमद्वारे गजा विंशतिसंख्यकाः । तथा दशसहस्रैश्च शत्रुभि सह संयुग. ८७ उद्धारक्षा महावीराश्चत्वा-रिंशत्सहस्रकाः । बलखान्यादिभिः सार्द्धं ययुर्यादवि चोत्तरे ८८ अहोरात्रमभूद्युद्ध तुमुलं लोमहर्षणम् । तत पराजितास्सर्वे बलखानिमहाबला ८९ त्यक्त्वा युद्ध तु ते सर्वे दुद्रुवुश्च दिशो दश । कृष्णांशो विन्दुलारूढो बलखानि कपोतग ९० मनोरथस्थितो देवश्चाह्लादस्तु गज-स्थितः । पूर्वादिद्वारगा द्वारि गतास्ते रणदुर्मदाः ९१ सत्सरु खड्गमुत्सृज्य चक्रु शत्रुमहद्वधम् । पराजिताश्च ते शूरा मकरन्दमुपययुः ९२ वह्निपुत्रस्तु बलवान्वाजिन च शिलामयम् । शनि-हस्तग्रहीतमादाय रण ययौ ९३ कृष्णांशाद्याश्च ते शूरा रुरुधुस्सर्वतो दिशम् । तं च कोपे ददौ खड्ग बलखानिर्महाबलः ९४ स्वभल्ल देवसिंहश्च तमङ्के च समाहनत् । आह्लादो वक्षसि शरं कृष्णांशः खड्गमुत्तमम् ९५ शिलावाजिप्रभावेन कश्मलं न जगाम ह । स दृष्ट्वा निष्फला-

---

कृष्णाश घरी येऊन ते सर्व वर्तमान बलखानीस सांगता झाला. तें ऐकून तो महावीर आपले भ्राते व मित्र यांसहवर्तमान पाच लक्ष सैन्य बरोबर घेऊन मयूरनगरास आला. त्याचे जवळ पाच हजार तोफा, दहा हजार हत्ती, एक लक्ष घोडे व बाकी सर्व पायदळ होतें. त्यांना पाचाल देशातून तो मार्ग क्रमण्यास केवळ पांचरा दिवसच लागले ८०-८२. ज्याच्या हातामध्ये शनिभल्ल आहे असा मकरंद तें ऐकून आपल्या सैन्यास " ह्या बलाढ्य शत्रूस मारा " अशी आज्ञा करिता झाला ८३. तें ऐकून पायदळातील लाखो लोक अग्नीचा वर्षाव करणाऱ्या सात लक्ष तोफा घेऊन शत्रूच्या सैन्याचा क्षय करिते झाले. नंतर ग्रामाच्या दक्षिणद्वारी घोड्यावर बसलेले व शक्ति, खड्ग, भाले व भुशुण्डीनामक शस्त्रांनी युक्त करण्यात निपुण असलेले लोक गेले ८४,८५ मकरंद राजाचे सर्व मिळून एक लक्ष घोडे होते. त्या दोन्ही अश्वसैन्यांतील लोकांचे मोठें भयंकर युद्ध झाले ८६. इतक्यांत पश्चिमद्वारी वीस हजार गजारूढ झालेले वीर दहा हजार शत्रूंशी भिडले. उंटावर बसून रक्षण करणारे चाळीस हजार महावीर बलखान्यादिक वीरांसह उत्तर दिशेमध्ये लढूं लागले ८७,८८ त्यांचें अगावर रोमांच उभे करणारें भयंकर युद्ध अहोरात्र चालले होतें. इतक्यांत बलखानीचे सर्व महावीर पराजित झाले ८९. तेव्हा ते सर्व युद्ध सोडून दश दिशांस पळत सुटले. हे पाहून कृष्णाश विन्दुलावर आरूढ होऊन, बलखानि कपोतावर बसून, देवसिंह मनोरथावर चढून व आल्हाद गजावर स्थित होऊन रणाविषयीं मदोन्मत्त झालेले ते चौघेही क्रमानें पूर्वादि चारी दिशांच्या द्वारामध्ये गेले ९०,९१. आणि ज्यांच्या उत्तम मुठी आहेत अशीं खड्गे उचलून त्यानीं शत्रूंचा भयंकर संहार केला. तेव्हा ते शूर पराजित होत्साते मकरंदाकडे आले ९२. ते पाहून तो बलवान् अग्निपुत्र शिलामय घोड्यावर बसून शनिभल्ल हातामध्ये घेऊन रणामध्यें आला. तेव्हा कृष्णाशादिक सर्व वीरांनीं त्यास चोहोकडून घेरलें. महा-बलाढ्य बलखानीनें त्यांच्या कंठावर खड्गप्रहार केला. देवसिंहानें आपला भाला त्याच्या मांडींत खुप-सला. आल्हादाने त्याच्या वक्षःस्थळीं बाण मारिला व कृष्णाशानें उत्तम खड्गप्रहार केला ९३-९५.

न्वीराश्चनर्ज ध्वनिभैरवम् ९६ शनिभल्लेन ते सर्वे मूर्छिताः संबभूविरे । तेऽश्वाः शिलाश्ववेगेन मूर्छिताश्चाभवन्क्षणात् ९७ मकरन्दस्तु बलवान्बद्ध्वा तान्युद्धदुर्मदान् । प्रसन्नात्मा ययौ गेहं स्वपित्रे तान्यवेदयत् ९८ दृष्ट्वा पराजितान्वीरान्रुक्मिणो भयकातरः । महावतीं पुरीं प्राप्य भूपतिं समवर्णयत् ९९ ब्रह्मानन्दस्तु तच्छ्रुत्वा लक्षसैन्यसमन्वितः । इन्दुलेन महायेन मयूरनगरं ययौ १०० लिखित्वा निर्मलं पत्रं तद्राज्ञे त्वरितो ददौ । भूमिराजसुताकान्त विद्धि मां मनुजर्षभ १ कृष्णांशाय सुतां देहि नाम्ना पुष्पवतीं शुभाम् । नो चेन्मत्कठिनैर्बाणैः क्षयं यास्यन्ति सैनिकाः २ निशम्येति नृपश्रेष्ठो मयूरध्वज एव सः । मकरन्देन सहितो द्विलक्षबलसंयुतः ३ अहोरात्रं कृतं युद्धं तेन सार्धं भयप्रदम् । ब्रह्मानन्दस्तु बलवान्बाणयुद्धमचीकरत् ४ मकरन्दस्य भल्लेन मूर्छितः सोऽपतद्भुवि । तदा स्वर्णवतीपुत्रो जयन्तः शक्रसंभवः ५ स्वविद्यां दर्शयामास मकरन्दाय धीमते । वैष्णवास्त्रप्रभावेन शिलाश्वो भस्म चाभवत् ६ ब्रह्मास्त्रेण भृगुश्रेष्ठ शनिभल्लोऽपतद्भुवि ७ नागपाशेन तं बद्ध्वा मकरन्दं महाबलम् ८ विवाहं कारयामास कृष्णांशस्य महात्मनः । सेनामुज्जीवयामास स्वकीयामिन्दुलो बली ९ मङ्गलं कारयामास मकरन्दो गृहे गृहे । ददौ कन्यां विधानेन बहुद्रव्यसमन्विताम् १० मयूरध्वजभूपालो महास्नेहमचीकरत् । नृपाज्ञां ते पुरस्कृत्य ययुस्सार्धं महावतीम् ११० [२८२०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये कृष्णांशविवाहो नामैकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥

पण पाषाणमय घोड्याच्या प्रभावाने तो मूर्च्छित झाला नाही. दैवयोगाने त्या वीराचा सर्व प्रयत्न व्यर्थ झाला असता तो भयकर गर्जना करिता झाला व त्याच्या शनिभल्ल्याच्या योगाने ते सर्व वीर मूर्च्छित होऊन पडले. शिलाश्वाच्या वेगाने त्याचे घोडेही ताबडतोब मूर्छित झाले. तेव्हा बलवान् मकरद युद्धामुळे मदोन्मत्त झाल्या वीरास बाधून ज्याचे अंत करण प्रसन्न झाले आहे असा तो आपल्या घरी जाऊन पित्यास त्यास दाखविता झाला ९६-९८. आपले वीर पराजित झाले आहेत असे पाहून भयाने व्याकुल झालेला रुक्मिण महावतीनगरीस येऊन राजास सर्व वृत्तांत सागता झाला ९९. तो ऐकून ब्रह्मानंद एक लक्ष सैन्यासहवर्तमान इन्दुलाच्या साहाय्याने मयूरनगरीस आला १०० व सुंदर पत्र लिहून त्याने लागलेच राजाकडे पाठविले. " हे पुरुषश्रेष्ठा, भूमिराजाच्या कन्येचा मी पति आहे असे जाण १. आपली पुष्पवतीनामक सुंदर कन्या कृष्णाशास दे, नाहींपेक्षा माझ्या कठिण बाणाच्या योगाने तुझे सेनापति नष्ट होतील " २. हे ऐकून तो श्रेष्ठ राजा मयूरध्वज मकरंदासहवर्तमान दोन लक्ष सैन्य घेऊन निघाला ३. व त्याने त्याच्याशी अहोरात्र भयकर युद्ध केले. बलाढ्य ब्रह्मानंद बाणयुद्ध करिता झाला ४. पण मकरदाच्या भाल्याने मूर्छित होऊन तो भूमीवर पडला. तेव्हा इन्द्रापासून उत्पन्न झालेला स्वर्णवतीचा पुत्र जयत बुद्धिमान् मकरंदास आपली विद्या दाखविता झाला. वैष्णव अस्त्राच्या प्रभावाने पाषाणाश्वाचे भस्म झाले ५,६. वा भृगुश्रेष्ठा, त्याच्या ब्रह्मास्त्राने मकरदाचा शनिभल्ल भूमीवर पडला व त्या बलवान् मकरदास त्याने नागपाशाने बाधिले ७. नतर त्याने महात्म्या कृष्णाशाचा विवाह करविला. बलाढ्य इन्दुलाने आपल्या सैनेस जिवत केले ८. पुढे मकरदाने लोकाकडून घरोघर मंगल करवून पुष्कळ द्रव्यासहवर्तमान आपली भगिनीस यथाविधि अर्पण केले ९. मयूरध्वज राजाही त्याच्यावर फार प्रीति करू लागला. असो. शेवटी राजाची आज्ञा घेऊन ते सर्वही एकदम महावतीस गेले ११०. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक

सूत उवाच ॥ महावत्यां तु संप्राप्तं कृष्णांशे बलवत्तरे । मङ्गल कृतवान्राजा तदा परिमलो बली १ पुष्पवत्या तया सार्द्धं गातनृत्यविशारदः । कृष्णांशः प्रत्यहं गेहे मुमोह सखिभिः सह २ हेमन्तशिशिरे वीरो रह. क्रीडां करोति वै । यथा शक्रोऽप्सरोभिश्च तथैव ह्युदयो बली ३ ग्राम-धर्मं न कृतवान्सर्वस्पर्शविशारदः । एकदा नृत्यक्रीडायां देवी पुष्पवती स्वयम् ४ कृष्णांश वचन प्राह पूर्वजन्मनि को भवान् । इति श्रुत्वोदयो वीरो विहस्योवाच वै वचः ५ नृपाऽहं चन्द्रहासश्च पूर्वजन्मनि हे प्रिये । बाल्यात्प्रभृति मे दुःख प्राप्तं दैवविनिर्मितम् ६ शालग्रामशिलापूजा प्रत्यहं वै मया कृता । तेन पुण्यप्रभावेन सार्वभौमो ऽभवं ह ७ मृतेऽहनि तु संप्राप्ते शालग्रामे मनो दधौ । सायुज्यं मे हरेश्चासीत्स्वयं ब्रह्मप्रसादत. ८ कलिना प्रार्थितो विष्णु. कालात्मा परमेश्वरः । स्वदेहान्मां तु निष्कृष्य भूमौ जन्मनिकृत् ९ यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति वै प्रिये । युगधर्मस्य मर्यादास्थापनाय भवाम्यहम् १० सत्ये तु मानसी पूजा देवानां तृप्तिहेतवे । त्रेतायां वह्निपूजा च यज्ञदानादिका क्रिया ११ द्वापरे मूर्तिपूजा च देवानां वै प्रियंकरी । कलौ तु दारुणे प्राप्ते ब्रह्मपूजनमुत्तमम् १२ अहं हंस सत्ययुगे त्रेतायां यज्ञपूरुष. । हिरण्यगर्भश्च प्रिये द्वापरेऽहं सुखप्रद. १३ शालग्रामः कलौ प्राप्ते देवानां तुरयं ह्यहम् । मुनयो देवताश्चैव तथा पितृगणाः प्रिये १४ सर्वे ते तृप्तिमायान्ति शालग्रामस्य पूजनात् । द्विजातिभिस्त्रिवर्णैश्च पूजनं चन्दनादिकैः १५ शूद्रैश्च स्नानमात्रेण भक्तिभावेन पूजनम् । स्पृष्टेश्चैव दर्शनं पुण्यं विनयाद्भक्तिभावत १६ शालग्रामः स्वयं ब्रह्म सच्चिदानन्दविग्रहम् । तस्य दर्शनमा-

प्रतिसर्गपर्वापैकी कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा कृष्णाशाच्या विवाहाविषयी एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥

सूत म्हणतात: --अतिबलाढ्य कृष्णांश महावतीस पोचला असता बलाढ्य परिमलराजा मंगल करिता झाला १. गीत व नृत्य ह्यामध्ये निपुण असलेला कृष्णांश आपल्या मंदिरी प्रतिदिनी सख्या व पुष्पवती ह्याच्याशी क्रीडा करू लागला २. हेमंत व शिशिर या ऋतमध्ये तो वीर, ज्याप्रमाणें इंद्र अप्सरासह क्रीडा करीत असतो त्याप्रमाणे एकांतातील क्रीडा करीत असे ३. पण सर्व स्पर्शीमध्ये निपुण असलेला तो वीर ग्राम्यधर्म कधी करीत नसे. एकदा नृत्यक्रीडा चालली असता देवी पुष्पवती स्वत कृष्णांशास म्हणाली " पूर्वजन्मी आपण कोण होता ? " हे ऐकून उदयवीर हंसून म्हणाला "हे प्रिये, मी पूर्वजन्मी चंद्रहास राजा होतो दैवामुळे मला बालपणापासून दुःख झाले ४–६. पण मी प्रत्यही शालग्रामशिलेची पूजा करीत असे. त्या पुण्यप्रभावानें मी सार्वभौम राजा झालो. पुढें मरणदिवस आला असता मी शालग्रामाच्या ठिकाणी आपले मन स्थिर केल तेव्हा ब्रह्मप्रसादामुळे मला हरीचे सायुज्य मिळालें. पुढे कलीने प्रार्थना केली असता कालरूप परमेश्वर विष्णु आपल्या शरीरातून काढून भूलोकी जन्म देता झाला. ज्या ज्या वेळी धर्माची हानि होते या त्या वेळी, हे प्रिये, युगधर्माची मर्यादा स्थापण्याकरिता मी उत्पन्न होतो ७–१०. सत्ययुगामध्ये मानसिक पूजा देवाच्या तृप्तीचे कारण होते. त्रेतायुगामध्ये अग्निपूजा व यज्ञदानादि क्रिया, द्वापरामध्ये मूर्तिपूजा देवास प्रियकर होते व भयंकर कलि प्राप्त झाला असता उत्तम ब्रह्मपूजन विहित होय ११,१२. सत्ययुगामध्ये मी हंसरूप, त्रेतायुगामध्ये यज्ञपुरुष व हे प्रिये, द्वापरामध्ये हिरण्यगर्भ होऊन मी सुख देणारा होतों १३. कलियुग प्राप्त झाले असता मी शालग्राम होऊन देवाच्या तृप्तीचे कारण होत असतो. सर्व मुनि, देवता, सर्व पितर इत्यादि, सर्व ब्राह्मणादि तीन वर्णाच्या लोकांनी चंदनादिकांनी शालग्रामाचें पूजन केलें असता तृप्त होतात. शूद्रांनी केवल स्नान घालून भक्तियुक्त अंत करणाने

त्रेण क्षयं यास्यन्ति वै मला १७ इति ते कथितं देवि युगनर्यादमुत्तमम् । पुरावृत्तं कस्य तनया सत्यं कथय मेऽधिरम् १८ पुष्पवत्युवाच ॥ पूर्वजन्मनि वैरयाऽहं चन्द्रकान्तिरिति श्रुता । गानन्रत्यादिकं वाद्यं देवस्याग्रे मया कृतम् १९ तेन पुण्यप्रभावेन स्वर्गलोकमुपागता । देवैश्च प्रार्थिता तत्र रूपयौवनशालिनी २० ब्रह्मचर्यं न तत्याज स्वर्गलोकेऽपि वै ह्यहम् । तस्य पुण्यप्रभावेन उषा बाणसुताऽभवम् २१ अनिरुद्धः स्वयं ब्रह्म मम पाणिं गृहीतवान् । कलिना प्रार्थितो देवो मम स्वामी स्वहेतवे २२ अर्चावतारमासाद्य मार्कण्डेयस्थलं गतः । स्वगतादस्य महिमा दर्शितस्तेन तत्र वै २३ अत्रैव स्थितिमर्यादा दारुरूपस्य मे पतेः । अहं तस्याज्ञया स्वामिन्नम्बुरूपस्य सुताऽभवम् २४ रूपादिद्रव्यसंयुक्ता नाम्नाऽहं विजयैषिणी । तव ममैव मरणं त्वद्भ्रात्रा बलखानिना २५ मकरध्वज्य भगिनी भूत्वा त्वां पतिमागता । तेन दोषेण त्वद्भ्राता यातनां तीव्रमागतः २६ राज्ञा इन्द्रगठनेव गेहे गजपतेः स्वयम् । इत्युक्त्वा मौनमास्थाय मनैव पतिना सह २७ होलिकायां समे प्राप्ते मलिना खेददुःखिता । सुतां चन्द्रावलीं रम्यां स्वप्नान्ते सा ददर्श ह २८ रुरोद निशि दुःखानि स्वसुता खेदकातरः । तदोदया महावीरो ज्ञात्वा रोदनकारणम् २९ शरैश्च दशसाहस्रैः सार्द्धं बहुधनैर्युतः । एकाकी प्रययौ वीरो यत्र चन्द्रावलीगृहम् ३० महीपतिस्तु तच्छत्रुज्ञात्वा कारणमुत्तमम् । पश्चाज्जगाम कार्यार्थी स तु दुर्योधनांशकः ३१ बली ठाठमिति ख्यातं ग्राम यादवपालितम् । वीरसेनो नृपस्तत्र त्रिलक्षबलसंयुतः ३२

पूजन करोत. म्लेच्छांनीं तर विनयानें व भक्तिभावानें त्यांचें दर्शन घेतल्यानेंच पुण्य लागतें १४-१६. शालग्राम स्वतः सच्चिदानंद ब्रह्मरूप आहे. त्याच्या केवल दर्शनानें सर्व मल नाहींसे होतात १७. याप्रमाणें, हे देवि, मीं तुला उत्तम युगमर्यादा सांगितली. आतां पूर्वी तूं कोणाची कन्या होतीस तें मला त्वरित खरें सांग" १८. पुष्पवती ह्मणतेः—मी पूर्वजन्मीं चन्द्रकांत या नावाची वेश्या होतें. मी गान, नृत्य, वाद्य इत्यादि देवाच्या पुढें करीत असे. त्या पुण्यप्रभावामुळें मी स्वर्गलोकास गेलें. तेथें रूप व यौवन यांनी युक्त असल्यामुळें देवांनीं माझी प्रार्थना केली. पण स्वर्गलोकामध्येंही मीं आपल्या ब्रह्मचर्याचा त्याग केला नाहीं. त्या पुण्यप्रभावामुळें मी बाणकन्या उषा झालें १९-२१. तेव्हां स्वतः ब्रह्मरूप असा जो अनिरुद्ध त्यानें माझें पाणिग्रहण केलें. पुढें कलीनें ज्याची प्रार्थना केली आहे असा तो माझा स्वामी देव आपल्याकरितां अर्चावतार घेऊन मार्कंडेयस्थलीं गेला. त्यानें तेथें आपल्या प्रसादाचा महिमा दाखविला २२,२३. व काष्ठरूप माझ्या पतीची राहण्याची मर्यादा तेथेंच ठरली. पुढें, हे स्वामिन्, मी त्याच्या आज्ञेनें जम्बुकाची कन्या झालें २४. मी दिव्यरूपानें युक्त असून विजयैषिणी या नावानें प्रसिद्ध होतें. पण तुझ्या बलखानिनामक भ्रात्यानें मला मारिलें २५. व आतां मकरध्वजाची भगिनी होऊन तुला पति समजून मी येथें आलें. तुझ्या बलखानि भ्रात्यानें स्त्रीहत्या केल्यामुळें तो इन्द्रगठनामक गजपति राजाच्या गृहीं स्वतः तीव्र यातना भोगिता झाला. असें बोलून तिनें मौन धरिलें. व पतीबरोबरही ती बोलेनाशी झाली २६,२७. एकदा होळीचे दिवस आले असतां प्रेमामुळें दुःखित झालेली मलना त्या रम्य चंद्रावली कन्येस स्वप्नामध्यें पाहती झाली. तेव्हां रात्रिसमयींच आपल्या कन्येवरील प्रेमामुळें व्याकुळ झालेली मलना अतिशय रडूं लागली. तेव्हां महावीर उदयसिंह रडण्याचें कारण जाणून पुष्कळ धन व दहा हजार शूर यांसह जेथें चंद्रावलीचें घर होतें तेथें एकटाच गेला२८-३०. तेव्हां कार्य साधण्याची इच्छा करणारा व दुर्योधनाचा अंश असा जो त्याचा शत्रु महीपति तो उत्तम कारण जाणून त्याच्या मागून चालला ३१. असो,यादवांनीं ज्याचें रक्षण केलें आहे असें ठाठ या नावाचें गांव होतें. तेथें वठाढय वीरसेननामक

अष्टौ सुताश्च तस्यासन्रूपयौवनशालिनः । कामसेनः प्रसेनश्च महासेनस्तथैव च ३३ सुखसेनो रूपसेनो विध्वंसनो मधुव्रतः। मधुपश्च क्रमाज्जाता यादवाशाश्च यादवाः ३४ तत्र गत्वा च कृष्णांशस्तभायां नरकेसरी । दण्डवत्प्रणतो भूत्वा वीरसेन महीपतिम् ३५ मलनालिखितं पत्रं दत्त्वा राज्ञे महामना । दशभार सुवर्णस्य पुनर्वासमचीकरत् ३६ व्यञ्जनानि विचित्राणि भक्षयित्वा यादवसंयुतः । चन्द्रावलीं समागत्य कुशलं च न्यवेदयत् ३७ प्रेमासक्ता च भगिनी कृष्णांशं प्राह दुःखिता । भवान्ह्यऽहत्वया वीर तदाऽहं च विवाहिता ३८ विंशदब्दं ततो जातं विस्मृता पितृमातृभिः । समर्थं त्वां वीर स्मृत्वा भगिनी स्वयम् ३९ अद्य मे सफलं जन्म जीवितं सफलं च मे । बन्धुदर्शनसंवेगं सर्वं च सफलं मम ४० प्रसन्नात्मोदयस्तत्र भगिनीं प्राह नम्रधीः । जम्बुकेन गृहं सर्वं लुण्डितं बलशालिना ४१ तस्य दुःखेन भूपालो भयभीतो दिने दिने । महत्कष्टेन विजयो जम्बुकाद्भयभोऽभवत् ४२ महीराजन्तु बलवान्रुरोध नगरीं मम । मया विवाहितो भ्राता ब्रह्मा तत्सुत आत्मज ४३ पुत्रश्च सिंहलद्वीपे जयन्तार्थे वयं गताः । एवंविधानि दुःखानि बहूनि ह्यभवन्पितुः ४४ अतस्त्वां प्रति सुप्रीता वयं भगिनि किङ्कराः । मृदु वाक्यमाकर्ण्य श्रुत्वा तदा चन्द्रावली मुदा ४५ गृहं निवासयामास स्वकीयं प्रमविह्वला । एतस्मिन्नन्तरे धूर्तो महीपतिरुपायनं ४६ सभार्यो वीरसेनस्य राज्ञे तत्रैव सत्कृतः । वार्तान्तरं समाकाङ्क्ष्य समुवाच महीपतिं ४७ निष्कासिताश्च ते सर्वे राज्ञाऽहङ्कारदूषिताः स्वतः । चोरिता नृपतेः काशो ह्यजातशत्रोर्महाबलैः ४८ तदा तु लुण्डिताः सर्वे सश्रियाऽलंकृतपुरुषाः बभूवुः । छिद्रदर्शी तु कृष्णांशो

राजा तीन लक्ष सैन्यांनें युक्त होऊन आला. त्याला सुंदर व तरुण आठ पुत्र होते. त्यांजे कामसेन, प्रसेन, महासेन, सुखसेन, रूपसेन, विध्वंसेन, मधुव्रत व मधुप हे यादवाच्या अशापासून क्रमानें झालेले आठही यादव व होते ३२-३४. तेथें पोंचल्यावर नरसिंह कृष्णांश समोर येऊन वीरसेनराजापुढें दंडाप्रमाणें नम्र होऊन नमस्कार करिता झाला. मलनें लिहिलेलें पत्र त्याला देऊन तो महाउदार वीर दहा भार सुवर्ण दिल्यानंतर तेथें वास करिता झाला ३५,३६. यादवांसहवर्तमान त्यानें तेथें विचित्र पदार्थ भक्षण केले व चंद्रावलीकडे येऊन कुशल निवेदन केलें ३७. तेव्हा प्रेमामुळें उत्सुक झालेली त्याची भगिनी दुःखित होऊन कृष्णांशास ह्मणाली "हे वीरा, तूं जेव्हां दोन वर्षांचा होतास तेव्हां माता विवाह झाला. आज त्याला वीस वर्षें झालीं. माझे आईबाप मला विसरले. पण तूं समर्थ असूनही आज आपण होऊनच या भगिनीची आठवण केलीस ३८,३९. आज माझा जन्म सफल झाला. जीवितही सफल झालें. बंधूचें दर्शन होतांच माझें सर्व काही सफल झाल!" ४०. हे ऐकून ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा तो उदार मनाचा उदय भगिनीस ह्मणाला "बलशाली जंबुकानें सर्व घर लुटलें. त्याच्या दुःखानें विजयी भूपाल विजयराजा रोजरोज भयभीत होत होता. पण तो मोठ्या कष्टानें जंबुकाच्या भयातून सुटला ४१, ४२. पुढें बलवान् महीराजानें आमच्या नगरास वेढा दिला. मी त्याच्या कन्येशीं ब्रह्मानंदनामक माझ्या भाच्याचा विवाह करविला ४३. पुनरपि जयंताकरितां आम्ही सिंहलद्वीपा गेलों. याप्रमाणें पित्यास नानाप्रकारचीं दुःखें झालीं ४४. तरी, हे भगिनि, आम्ही तुझे किंकर तुजवर अतिप्रीति करीत आहोंत असें समज." हें मृदु वाक्य ऐकून प्रेमामुळें विह्वल झालेली चंद्रावली त्यास आपल्या गृहीं राहविती झाली. इतक्यांत वीरसेनाच्या समेमध्यें धूर्त महीपति आला. तेव्हा राजानें त्याचा सत्कार केला व वार्ता सांगण्यास अवसर सांपडला असतां महीपति त्यास ह्मणाला ४५-४७ "अहंकारादिक जे दुष्ट होते त्या सर्वांस राजानें बाहेर घालविलें. कारण, हीन

त्रेण क्षयं यास्यन्ति वै मला. १७ इति ते कथितं देवि युगमर्यादमुत्तमम् । पुरावृत्तं कस्य तनया सत्यं कथय मेऽधिरम् १८ पुष्पवत्युवाच ॥ पूर्वजन्मनि वैरयाऽहं चन्द्रकान्तिरिति श्रुता । गानन्रत्यादिकं वाद्यं देवस्याग्रे मया कृतम् १९ तेन पुण्यप्रभावेन स्वर्गलोकमुपागता । देवैश्च प्रार्थिता तत्र रूपयौवनशालिनी २० ब्रह्मचर्यं न तत्याज स्वर्गलोकेऽपि वै ह्यहम् । तस्य पुण्यप्रभावेन उषा बाणसुताऽभवम् २१ अनिरुद्धः स्वयं ब्रह्म मम पाणिं गृहीतवान् । कलिना प्रार्थितो देवो मम स्वामी स्वहेतवे २२ अर्चावतारमासाद्य मार्कण्डेयस्थलं गतः । स्वप्रसादस्य महिमा दर्शितस्तेन तत्र वै २३ अत्रैव स्थितिमर्यादो दारुरूपस्य मे पते. । अहं तस्याज्ञया स्वामिन्नम्बुकस्य सुताऽभवम् २४ रूपदिव्यमनायुक्ता नाम्नाऽहं विजयैषिणी । कृतं मयैव मरणं त्वद्भ्राता बलखानिना २५ मकरन्दस्य भगिनी भूत्वा त्वां पतिमागता । तेन दोषेण त्वद्भ्राता यातनां तीव्रमागतः २६ राज्ञ इन्नगठस्यैव गेहे गजपतेः स्वयम् । हत्युक्त्वा मौनमास्थाय मनैव पतिना सह २७ होलिकायां पुरा प्राप्ते मलिना स्वहृदुःखिता । सुतां चन्द्रावलीं रम्यां स्वप्नान्ते सा ददर्श ह २८ रुरोद निशि दुःखार्ता स्वसुता स्वहकातरः । तदोदया महावीरो ज्ञात्वा रोदनकारणम् २९ सार्धैश्च दशसाहस्रैः सार्द्धं बहुधनैर्युतः । एकाकी प्रययौ वीरो यत्र चन्द्रावलीगृहम् ३० महीपतिस्तु तच्छत्रुज्ञात्वा कारणमुत्तमम् । पश्चाज्जगाम कार्यार्थी स तु दुर्योधनांशकः ३१ बली ठाठमिति ख्यातं ग्राम यादवपालितम् । वीरसेनो नृपस्तत्र त्रिलक्षबलसंयुत ३२

पूजन करोंव. म्लेच्छांनीं तर विनयानें व भक्तिभावानें त्याचें दर्शन घेतल्यानेंच पुण्य लागतें १४-१६. शालग्राम स्वतः सच्चिदानंद ब्रह्मरूप आहे. त्याच्या केवल दर्शनानें सर्व मल नाहींसे होतात १७. याप्रमाणें, हे देवि, मी तुला उत्तम युगमर्यादा सांगितली. आतां पूर्वी तू कोणाची कन्या होतीस तें मला त्वरित स्वरें सांग " १८. पुष्पवती ह्मणते —मी पूर्वजन्मीं चन्द्रकांत या नावाची वेश्या होतें. मी गान, नृत्य, वाद्य इत्यादि देवाच्या पुढें करीत असे. त्या पुण्यप्रभावामुळें मी स्वर्गलोकास गेलें. तेथें रूप व यौवन यांनीं युक्त असल्यामुळें देवांनीं माझी प्रार्थना केली. पण स्वर्गलोकामध्येंही मीं आपल्या ब्रह्मचर्याचा त्याग केला नाहीं. त्या पुण्यप्रभावामुळें मी बाणकन्या उषा झालें १९-२१. तेव्हा स्वतः ब्रह्मरूप असा जो अनिरुद्ध त्यानें माझें पाणिग्रहण केलें. पुढें कलीनें ज्याची प्रार्थना केली आहे असा तो माझा स्वामी देव आपल्याकरितां अर्चावतार घेऊन मार्कंडेयस्थलीं गेला. त्यानें तेथें आपल्या प्रसादाचा महिमा दाखविला २२,२३. व काष्ठरूप माझ्या पतीची राहण्याची मर्यादा तेथेंच ठरली. पुढें, हे स्वामिन्, मी त्याच्या आज्ञेनें जम्बुकाची कन्या झालें २४. मी दिव्यरूपानें युक्त असून विजयैषिणी या नावानें प्रसिद्ध होतें. पण तुझ्या बलखानिनामक भ्रात्यानें मला मारिलें २५. व आतां मकरंदाची भगिनी होऊन तुला पति समजून मी येथें आलें. तुझ्या बलखानि भ्रात्यानें स्त्रीहत्या केल्यामुळें तो इन्नगठनामक गजपति राजाच्या गृहीं स्वतः तीव्र यातना भोगिता झाला. असें बोलून तिनें मौन धरिलें. व पतीबरोबरही ती बोलेनाशी झाली २६,२७. एकदा होळीचे दिवस आले असतां प्रेमामुळें दुःखित झालेली मलना त्या रम्य चंद्रावली कन्येस स्वप्नामध्यें पाहती झाली. तेव्हा रात्रिसमयींच आपल्या कन्येवरील प्रेमामुळें व्याकुळ झालेली मलना अतिशय रडूं लागली. तेव्हा महावीर उदयसिंह रडण्याचें कारण जाणून पुष्कळ धन व दहा हजार शूर यांसह जेथें चंद्रावलीचें घर होतें तेथें एकटाच गेला२८-३०. तेव्हा कार्य साधण्याची इच्छा करणारा व दुर्योधनाचा अंश असा जो त्याचा शत्रु महीपति तो उत्तम कारण जाणून त्याच्या मागून चालला ३१. असो,यादवांनीं ज्याचें रक्षण केलें आहे असें ठाठ या नावाचें गांव होतें. तेथें बलाढ्य वीरसेननामक

अष्टौ सुताश्च तस्यासन्रूपयौवनशालिनः । कामसेनः प्रसेनश्च महासेनस्तथैव च ३३ सुखसेनो रूपसेनो विध्वंसनो मधुव्रतः । मधुपश्च क्रमाज्जाता यादवाशाश्च यादवाः ३४ तत्र गत्वा च कृष्णांशस्तभायां नरकेसरी । दण्डवत्प्रणतो भूत्वा वीरसेन महीपतिम् ३५ मलनालिखितं पत्रं दत्त्वा राज्ञे महामनाः । दशभार सुवर्णस्य पुनर्वासमचीकरत् ३६ व्यञ्जनानि विचित्राणि भुक्त्वा यादवसंयुतः । चन्द्रावलीं समागत्य कुशलं च न्यवेदयत् ३७ प्रेमात्सुका च भगिनी कृष्णांशं प्राह दुःखिता । भवान्ह्यदत्त्वा वीर तदाऽहं च विवाहिता ३८ विंशदब्दं ततो जात विस्मृता पितृमातृभिः । समर्थेन त्वया वीर स्मृता भगिनी स्वयम् ३९ अद्य मे सफलं जन्म जीवितं सफलं च मे । बन्धुदर्शनमात्रेण सर्वं च सफलं मम ४० प्रसन्नात्मोदयस्तत्र भगिनीं प्राह नम्रधीः । जम्बुकेन गृहं सर्वं लुण्ठितं बलशालिना ४१ तस्य दुःखेन भूपालो भयभीतो दिने दिने । महत्कष्टेन विजयो जम्बुकाद्भाभरोऽभवत् ४२ महीराजस्तु बलवान्रुरोध नगरीं मम । मया विवाहितो भ्राता ब्रह्मा तत्सुतया सह ४३ पुत्राश्च सिंहद्वीपे जयन्तार्थे वयं गताः । एवंविधानि दुःखानि बहूनि ह्यभवन्नितः ४४ अतस्त्वां प्रति सुप्रीता वयं भगिनि किङ्कराः । मृदु वाक्यमात्मं श्रुत्वा तदा चन्द्रावली मुदा ४५ गृहं निवासयामास स्वकीयं प्रेमविह्वला । एतस्मिन्नन्तरे धूर्तो महीपतिरुपाययौ ४६ सभायां वीरसेनस्य राज्ञा तत्रैव सत्कृतः । वार्तान्तरं समासाद्य समुवाच महीपतिं ४७ निष्कासितांश्च ते सर्वे राज्ञाहूयाय खेदतः । चौरितो नृपतेः कांशो ह्यानायैवमहाबले ४८ तदा तु कुपिता सर्वे मन्त्रिपाळवपुरवसन् । छिद्रदर्शी तु कृष्णांशो

राजा तीन लक्ष सैन्यांनें युक्त होऊन सात अस. त्यास सुंदर व तरुण आठ पुत्र होते. ह्मणजे कामसेन, प्रसेन, महासेन, सुखसेन, रूपसेन, विध्वंसेन, मधुव्रत व मधुप हे यादवाच्या अंशापासून क्रमानें झालेले आठही यादव व होत३२-३४.तेथें पोंचल्यावर नरसिंह कृष्णांश समेमध्यें जाऊन वीरसेनराजापुढें दंडाप्रमाणें नम्र होऊन नमस्कार करिता झाला. मलनेनें लिहिलेलें पत्र त्यास देऊन तो महाउदार वीर दहा भार सुवर्ण दिल्यावर तेथें वास करिता झाला ३५,३६. यादवासहवर्तमान त्यानें तेथें विचित्र पदार्थ भक्षण केले व चंद्रावलीकडे येऊन कुशल निवेदन केलें ३७. तेव्हा प्रेमामुळें उत्सुक झालेली त्याची भगिनी दुःखित होऊन कृष्णांशास ह्मणाली 'हे वीरा, तू जेव्हा दोन वर्षांचा होतास तेव्हा माझा विवाह झाला. आज त्याला वीस वर्षे झालीं. माझे आईबाप मला विसरले. पण तू समर्थ असूनही आज आपण होऊनच या भगिनीची आठवण केलीस ३८,३९.आज माझा जन्म सफल झाला, जीवितही सफल झालें. बंधूचें दर्शन होतांच माझें सर्व काहीं सफल झाल !' ४०. हे ऐकून ज्याचे मन प्रसन्न झाले आहे असा तो उदार मनाचा उदय भगिनीस ह्मणाला " बलशाली जंबुकानें सर्व घर लुटलें. त्याच्या दुःखानें विजयी भूपाल विजयराजा नेहमीच भयभीत होत होता. पण तो मोठ्या कष्टानें जंबुकाच्या भयातून सुटला ४१, ४२. पुढें बलवान् महीराजानें आमच्या नगरास वेढा दिला. मी त्याच्या कन्येशीं ब्रह्मानंदनामक माझ्या भाऱ्याचा विवाह करविला ४३. पुनरपि जयंताकरिता आम्ही सिंहद्वीपा गेलों. याप्रमाणें पित्यास नानाप्रकारचीं दुःखें झालीं ४४. तरी, हे भगिनि, आम्ही तुझे किंकर तुजवर अतिप्रीति करीत आहोंत असें समज. " हें मृदु वाक्य ऐकून प्रेमामुळें विह्वल झालेली चंद्रावली त्यास आपल्या गृहीं राहविती झाली. इतक्यांत वीरसेनाच्या सभेमध्यें धूर्त महीपति आला. तेव्हा राजानें त्याचा सत्कार केला व वार्ता सांगण्यास अवसर सांपडला असता महीपति त्यास ह्मणाला ४५-४७ " आल्हादादिक जे दुष्ट होते त्या सर्वांस राजानें बाहेर घालविलें. कारण, हीन

गेहं तव समागतः ४९ चन्द्रावल्याश्च वै दोलां गृहीत्वा स गमिष्यति । सत्यं ब्रवीमि भूपाल नान्यथा वचनं मम ५० इति श्रुत्वा वीरसेनो ज्ञात्वा तत्सत्यकारणम् । कामसेन समाहूय चन्द्रावलिपतिं सुतम् ५१ वचनं प्राह भोः पुत्र बन्धनं कुरु तस्य वै । इति श्रुत्वा कामसेनो विषमादाय दारुणम् ५२ भोजनाय ददौ तस्य ज्ञात्वा चन्द्रावली तदा । आतुरन्तिकमासाद्य पात्रमादाय सा ययौ ५३ कामसेनश्च कुपितो गृहीत्वा दण्डवेतसम् । स्वप्रियां ताडयामास स दृष्ट्वा त तदाऽकुपत् ५४ गृहीत्वा भुजयोस्तां वै बन्धनाय समुद्यतः । बन्धनवं गते पुत्र वीरसेनो महाबलः ५५ पुत्रानाज्ञापयामास तस्य बन्धग्रहेतवे । एतस्मिन्नन्तरे वीरो दोलामादाय सत्वरम् ५६ सेनामध्ये समागम्य महद्युद्धमचीकरत् । एकतो दशसाहस्रास्त्रिलक्षास्तु तथैव ते ७ अहोरात्रमभूद्युद्धं दारुणं रोमहर्षणम् । हता लक्षा महाशूरा उदयस्य सहस्रकाः ५८ शेषाः प्रदुद्रुवुस्सर्वे यादवा भयकातराः । दृष्ट्वा पराजितान्सैन्यान्स पुत्रो महाबलो. ५९ स्वान्गजांश्च समारुह्य कृष्णांश्च रुरुधू रुषा । स वीरो बिन्दुरारूढो भूमौ कृत्वा गजासनान् ६० तेषामस्त्राणि स च्छित्त्वा शक्रातिबलदर्पितः । इति श्रुत्वा वीरसेनः सूर्यभक्तिरायणः ६१ सौरमस्त्रं समादाय तस्य सैन्यमदाहयत् । तेनास्त्रेणैव कृष्णांशः सह यो मर्दितो भुवि ६२ वीरसेनस्तु त दृष्ट्वा मोचयित्वा सुतान्वधूम् । स्वगेहमागतस्तूर्णं नानावाद्यान्यवादयत् ६३ हतशेषास्तदा वीराः कृष्णांशस्य ययुर्दश । हेतुं परिमलस्याग्रे सर्वमूचुस्तदादितः ६४ महीपतिं महाधूर्तं मत्वा राजाऽब्रवीदिदम् । गच्छ

जाणीन्या त्या अतिबलाढ्यांनीं राजाचा कोश लुटविला होता. तेव्हा ते सर्वही संश्रियनामक नगरामध्यें कुंठित होऊन राहिले. छिद्र पाहणारा कृष्णाश तुझ्या घरीं आला आहे ४८,४९. तो चंद्रावलीचा दोला घेऊन येथून जाईल. राजा, मी तुला हें सत्य सागत आहे; माझें वचन अन्यथा नव्हे " ५०. हें ऐकून ते खरें आहे असें समजून वीरसेन चंद्रावलीचा पति व आपला पुत्र जो कामसेन त्यास बोलाविता झाला ५१ व असें ह्मणाला " हे पुत्रा, त्यास बांध. " हें ऐकून कामसेन भयंकर विष घेऊन तें त्यास प्यावयास देता झाला. पण चद्रावलीने ते जाणून व भोजनळ येऊन तें पात्र घेऊन गमन केलें. तेव्हा कामसेनास राग आला व तो हातामध्ये वेताची काठी घेऊन आपल्या प्रियेस ताडन करिता झाला. हें पाहून कृष्णाशास क्रोध आला आणि तो त्याच्या हातातून तिला सोडवून त्यास बाधू लागला. याप्रमाणें पुत्रास त्यांनी बाधिले असता महाबलाढ्य वीरसेन आपल्या पुत्रास त्यास बाधण्याविषयीं आज्ञा करिता झाला. इतक्यात तो वीर भगिनीचा मेणा घेऊन सत्वर सैन्यामध्ये येऊन पोंचला व त्याने मोठे युद्ध केलें. एकीकडे दहा हजार वीर व दुसरीकडे तीन लक्ष योद्धे होते ५२-५७. तें अंगावर रोमाच उभे करणारें भयंकर युद्ध अहोरात्र झालें. शत्रूचे एक लक्ष महाशूर व उदयाचे हजार वीर मेले ५८. तेव्हा बाकी राहिलेले सर्व यादव भयभीत होऊन पळाले. आपले सैन्य पराजित झालें आहे असे पाहून महाबलाढ्य सात पुत्र रागाने आपल्या गजावर चढून कृष्णाशास प्रतिबध करिते झाले. तेव्हां तो वीर बिदुलावर आरूढ होऊन भूमीवर गजासनें करिता झाला. सामर्थ्यामुळें दर्पयुक्त झालेला तो वीर त्यांची अस्त्रें तोडून त्यास बाधून ठेविता झाला. पण हें वर्तमान ऐकून सूर्याच्या भक्तीमध्यें तत्पर असणारा वीरसेन सौर अस्त्र घेऊन त्याच्या सैन्यास जाळिता झाला. तेव्हां त्या अस्त्राच्या योगानें कृष्णाशही घोड्यासह मूर्छित होऊन भूमीवर पडला. इतक्यात वीरसेनानें त्यास बाधून आपल्या पुत्रास व वधूस सोडवून त्वरेनें स्वगृहीं गमन केलें व त्यानें अनेक प्रकारचीं वाद्यें वाजविलीं ५९-६३. तेव्हा मरून राहिलेले कृष्णाशाचे दहा वीर परत गेले व त्यानीं

एवं मलनापुत्र लक्षसैन्यसमन्वित ६५ बद्ध्वा स्वभगिनीकान्त स्वबन्धुं मोचयाशु वै । इति श्रुत्वा च ससुतो लक्षसेनासमन्वितः ६६ शीघ्रं गत्वा च नगरीं रुरोध बलवान्रुषा । युद्धीभूते बले तस्मिन्वीरसेनो नृपोत्तमः ६७ सौरमस्त्रमुपादाय दाहनार्थं समुद्यतः । सज्जीभूतं तदस्त्रं तु ब्रह्मानन्दो महाबली ६८ ब्रह्मास्त्रेणैव स शरं चाभ्यघातं वै रुषा । दृष्ट्वा भयान्वितो भूपस्तमेव शरणं ययौ ६९ ब्रह्मानन्दस्तु तं भूपं वचनं प्राह निर्भयः । धूर्तवाक्येन हे भूप मद्बन्धुर्बाधितस्त्वया ७० अवध्या च सदा नारी त्वत्सुतस्तामताडयत् । अतस्त्वं भगिनीयुक्तं स्वसुतं देहि मे नृप ७१ इति श्रुत्वा च नृपतिर्वचनं प्राह नम्रधीः । मत्सुता च गृहे नास्ति कामसेन गृहाण भोः ७२ इत्युक्त्वा वीरसेनश्च सुतं चन्द्रावलीं तदा । दत्त्वा तस्मै प्रसन्नात्मा तत्स्थानमकारयत् ७३ ब्रह्मानन्दोऽपि बलवान्कृष्णांशेन समन्वितः । सेनयाऽगीतिसाहस्र्या ययौ सार्धं महाव्रतीम् ७४ मलना स्वसुतं दृष्ट्वा प्रसन्नेह्वरुक्मिरा । स्नात्वा दत्त्वाऽश्रुधाराभिर्द्विजानिभ्यो ददौ धनम् ७५ इति ते कथितं विप्र कृष्णांशचरितं शुभम् । शृण्वतां कलिपापघ्नं कथयिष्यामि वै पुनः ७६ [२७९६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

सूत उवाच ॥ चतुर्विंशाब्दके प्राप्ते कृष्णांशे बलशालिनि । हयशुक्लदशम्यां च कृतो राज्ञा महोत्सवः १ भोजयित्वा द्विजश्रेष्ठान्दत्त्वा तेभ्यो हि दक्षिणाः । स्वभृत्यभ्यस्तथा वित्तं यथायोग्यं क्रमाद्दधौ २ कार्तिक्यां शुभसंयोगे कृष्णांशो बलसंयुतः । इन्द्रुम्नेन च संयुक्तो देवर्षिणा

परिमलास आरंभापासून सर्व वृत्तांत सांगितला ६४. तेव्हा महीपति मोठा धूर्त आहे असे मानून तो राजा असे बोलला " वा मलनापुत्रा, तू लक्ष सैन्यासह जा व आपल्या भगिनीच्या पतीस बांधून आपल्या बंधूस त्वरित सोडीव. " हे ऐकून लक्ष सैन्यासह तो पुत्र रागानें त्वरित जाऊन त्या नगरीस वेढिता झाला. ते सैन्य लढ़ लागलें असता नृपोत्तम वीरसेन सौर अस्त्र घेऊन सर्वांस जाळण्याकरिता तयार झाला. पण ते अस्त्र तयार झाले असता महाबलाढ्य ब्रह्मानंद रागाने ब्रह्मास्त्राने त्याचे निवारण करिता झाला. हे पाहून भयभीत झालेला राजा त्यालाच शरण आला ६५-६९. तेव्हा ब्रह्मानंद त्या राजास निर्भयपणें असे ह्मणाला " हे राजा, धूर्तांच्या वाक्यावर विश्वास ठेवून तूं माझ्या बंधूचा अपमान केलास. स्त्री सर्वदा अवध्य आहे, पण तुझ्या पुत्राने तिला ताडन केले. ह्यास्तव, तूं भगिनीसह आपली कन्या मला दे " ७०,७१. हे ऐकून ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो राजा ह्मणाला " माझ्या गृहीं कन्या नाही, ह्यास्तव, तूं कामसेनास घे " ७२. असे बोलून ज्याचे मन प्रसन्न झाले आहे असा तो वीरसेन आपला पुत्र व चंद्रावली ह्यास त्याच्या स्वाधीन करून त्याची रवानगी करिता झाला. तेव्हा ब्रह्मानंद कृष्णांश व अठ्ठ्यायंशी सहस्र सेना ह्यासह महाव्रतीस गेला ७३,७४. नंतर प्रेमान व्याकुळ होऊन कांपू लागलेली मलना आपल्या कन्येस पाहून व तिला अश्रुधारांनीं स्नान घालून ब्राह्मणास धन देती झाली ७५. याप्रमाणें हे ब्राह्मणा, ऐकणाऱ्यांच्या कलियुगजन्य पापांचा नाश करणारें कृष्णांशाचे शुभ चरित्र मीं तुला सांगितले. आता पुनरपि आणखीही सांगेन ७६. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंड-नामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२ ॥

सूत ह्मणतातः—बलशाली कृष्णांशास चोविसावे वर्ष लागले असता आश्विन शुक्ल दशमीस राजाने महोत्सव केला १. उत्तम ब्राह्मणास भोजन घालून व त्यास दक्षिणा देऊन नंतर क्रमानें व योग्यतेप्रमाणें त्याने आपल्या सेवकास द्रव्य दिले २. पुढें कार्तिकी पौर्णिमेस शुभ

संयुतः ३ अयुतैः स्वर्णद्रव्यैश्च शूरैर्दशसहस्रकैः । ययौ बर्हिष्मतीस्थाने नानाभूपसमन्विते ४ एतस्मिन्नन्तरे तत्र चित्ररेखा समागता । वृता मत्तालिभिर्देवी चित्रगुप्तप्रपूजिनी ५ गगनमध्ये महारम्यं यानं मायामय तया । कृत कौतूहलयुत बहुरत्नसमन्वितम् ६ आगतास्तत्र राजानो नाना तद्दर्शनोत्सुकाः । तदोदयो देवयुतो जयन्तेन समन्वितः ७ शतशूरैश्च सहितो दर्शनार्थमुपाययौ । चित्ररेखा महारम्या बाल्मीकनृपतेः सुता ८ ददर्श सुन्दरं कान्तमिन्दुल शशिवन्मुखम् । येन स्वग्रामान्तरे रम्य सार्द्धं भुक्त तया सुखम् ९ तमाह्लादसुत ज्ञात्वा साभिनन्दनदेहजा । कृत्वा मोहम- जालं शुकभूत इवेन्दुलम् १० हृत्वा स्वयवा रम्य परमानन्दमाययौ । पुनराहूय तां मायां स्वगेहाय ययौ मुदा ११ कृष्णांशस्तु तदा बुद्ध्वा न ददर्श स्वक शिशुम् । देवसिंह बांधयित्वा पप्रच्छ क्व गतः शिशु १२ कालज्ञो देवसिंहोऽपि मोहितश्चिन्तमाययौ । न ज्ञातस्तेन वै बालः क्व गतः केन वा हृतः १३ विस्मित देवसिंह च दृष्ट्वा कृष्णांशको बली । रुरोदोच्चैस्तदा गाढं चित्रमायाविमोहित' १४ श्रुत्वा तु रोदनं तस्य खलस्तत्र महीपतिः । ययौ शीघ्रं प्रसन्नात्मा यत्राह्लाद स्वय स्थितः १५ रुदित्वा तत्र वै गाढं वचनं प्राह नष्टधीः । उदयो नाम ते भ्राता मोहयित्वा मदेन तौ १६ देवसिन्दुलमेवासौ हत्वा धारासु पातितम् । प्रत्यक्ष च मया दृष्ट तेन वीरेण वै कृतम् १७ शतस्वर्ण चमे दत्त्वा विनयेनावरोधितः । देवसिंहस्ततो बुद्ध्वा न ज्ञातं येन यत्कृतम् १८ इति श्रुत्वा तु वचन निश्चयं नाधिगच्छति ' एतस्मिन्नन्तर प्राप्तौ

संयोगावर कृष्णाश सैन्यासह इदुल व देवसिंह यास बरोबर घेऊन निघाला ३. दहा सहस्र सुवर्णमुद्रा व दहासहस्र शूर यान्यासहवर्तमान अनेक राजांनीं भरलेल्या बर्हिष्मतीस्थानामध्यें तो आला. इतक्यात तेथें चित्रलेखा आली. तिच्याबरोबर सात सख्या होत्या. व ती देवी चित्रगुप्ताची पूजा करीत असे ४,५. तिनें गगनमध्यें मायामय व अतिरम्य यान निर्माण केलें. तें चमत्कारिक वाहन वाहणाऱ्या स्वतानें युक्त होतें. त्याच्या दर्शनाधिपयी उत्सुक असलेले अनेक राजे तेथें आले. उदयही देवसिंह व जयत ह्यासह शभर शूर बरोबर घेऊन तें पाहण्याकरितां आला होता. तेव्हा वाल्मीकराजाची अतिरम्य कन्या चित्रलेखा त्या सुदर इंदुलास पाहती झाली. त्या रमणीय राजपुत्राचें मुख चंद्रासारिखें होतें. ज्याने स्वग्रामध्यें आपल्याबरोबर सुखाने भोगविलास केला तो हाच आल्हादपुत्र आहे असें जाणून ती अभिनंदनकन्या मोहमय जाळें करिती झाली व त्यात पोपट झालेल्या इंदुलास रम्य स्वयवरामध्यें हरण करून तीअति आनंदित झाली व त्या मायेचें निरसन करून आनंदानें आपल्या गृही गेली ६-११. इतक्यात कृष्णाश सावध झाला व त्यानें जेव्हा आपल्या बालकास पाहिलें नाहीं तेव्हा देवसिंहास सावध करून विचारू लागला कीं 'पुत्र कोठें गेला ?' १२. तेव्हा कालज्ञ देवसिंहही चित्रलेखेच्या मायेमुळ मोहित झाला असल्यामुळें बालक कोठें गेला हे त्यासही समजलें नाहीं १३. नंतर देवसिंह विस्मित झाला आहे असें पाहून चित्रलेखेच्या मायेनें मोहित झालेला अत्यंत बलाढय कृष्णाश मोठमोठ्यानें व अतिशय रडूं लागला १४. तेव्हा त्याचें रडणे ऐकून दुष्ट महीपति जेथें स्वतः आल्हाद होता तेथें मोठ्या आनदानें त्वरित आला व अतिशय रडून नम्रपणें असें ह्मणाला " उदयनामक तुझा भ्राता देवसिंह व इंदुल या दोघासही मदानें मोहित करून व त्यास मारून तरवारीच्या धारेवर ठेवण्यास तयार झाला. त्या वीरानें केलेली ही गोष्ट मीं प्रत्यक्ष पाहिली १५-१७. व शंभर सुवर्णमुद्रा देऊन नम्रपणानें त्यास प्रतिबंध केला. नंतर देवसिंह सावध झाला. पण कृष्णाशानें काय केलें हें त्याला समजलें नाहीं " १८. हे वचन ऐकून आल्हादास काहींच निश्चय करितां येईना. इतक्यात रडत असलेले ते

तौ वीरौ रोदने रतौ १९ तद्वियोगेन कृष्णांशः स्वदेहं त्यक्तुमुद्यतः । आह्लादो निश्चयं ज्ञात्वा भाविनं च महीपतेः २० कृष्णांशं ताडयामास वेतसैश्चर्मकृन्तनैः । तस्य माता तथा पत्नी भगिनी प्रेमदुःखिताः २१ आह्लाद बोधयामासुर्धूर्तमायाविमोहितम् । न बोधितस्तदा वीरश्चित्रमायाविमोहितः २२ तदा पुष्पवती देवी स्वपतिं भ्रातृपीडितम् । दृष्ट्वा तत्र गता शीघ्रं पतिदुःखेन दुःखिता २३ विनाऽपराधं कृष्णांशो महानिन्दामवाप्तवान् । तदा वेदविदो विप्रा आह्लाद प्राहुरूर्जितम् २४ वधत्यागः समो ज्ञेयो योग्यं बुद्ध्या विचारय । इत्युक्तः स तुरीयात्मा पुत्रशोकेन दुःखितः २५ चाण्डालांश्च समाहूय बद्ध्वा त पुत्रघातिनम् । दत्त्वा तेभ्यः सपत्नीक वधं कुरुत मा चिरम् २६ अस्य नेत्रे समुत्पाट्य मां दर्शयत सत्वरात् । इति श्रुत्वा गतास्ते वै गहन व्याघ्रसंवितम् २७ देवसिंहस्ततो गत्वा दत्त्वा तेभ्यो महद्धनम् । सभाज्य दम्पती वीरश्चाण्डालेभ्यो वनं ययौ २८ बलखानेस्तु या पत्नी गजमुक्ता पातव्रता । दम्पती पालयामास गुप्तगेहे मुदा युता १९ चाण्डालास्ते तु संगत्य मृगनेत्रे च ते ददुः । देवसिंहस्तदागत्य क्रोधात्मा च तमब्रवीत् ३० धिक्त्वां पापं दुराचारं त्वया मे हिंसितः सखा । जीवितस्वसुतो भूमौ तदन्वेषणहेतवे ३१ यास्यामि विविधान्राष्ट्रान्सत्यं सत्य ब्रवीम्यहम् । इत्युक्त्वा प्रययौ वीरः साश्रयाख्यपुरं शुभम् ३२ गजमुक्तामनुज्ञाप्य दम्पती प्राप्य निर्भयं । मयूरनगरं रम्यं निशि यां समाययौ ३३ मकरन्दस्तु बलवान्ज्ञात्वा तत्सर्वकारणम् । स्वसुः पतिं च भगिनीं स्वान्ते प्रेम्णा न्यवासयत् ३४ धर्ममारोपयामास यज्ञैर्नानाविधैः स्तवैः ।

वीर तेथें आले १९. इंदुलाच्या वियोगामुळें कृष्णांश आपला देहत्याग करण्यास तयार झाला होता. तेव्हा महीपतीच्या भाषणाचा विचार करून आल्हादानें निश्चय केला २० व चामडें काढणाऱ्या वेताच्या काठ्यानीं त्यानें कृष्णाशास मारविलें. त्याची माता, पत्नी व भगिनी प्रेमामुळें कष्टी होऊन धूर्ताच्या मायेनें मोहित झालेल्या आल्हादास पुष्कळ बोध करित्या झाल्या. पण चित्रमायेनें मोहित झालेला तो वीर त्यावेळीं उमजला नाहीं. तेव्हा देवी पुष्पवती भ्रात्यानें पीडिलेल्या आपल्या पतीस पाहून पतीच्या दुःखानें दुःखित होत्साती शीघ्र तेथें आली २१-२३. तात्पर्य, कृष्णाश अपराधावाचूनच मोठ्या निदेस पात्र झाला. तेव्हा वेदवेत्ते ब्राह्मण खवळलेल्या आल्हादास ह्मणाले २४ " वध व त्याग हीं दोन्हीं सारखींच आहेत, असें जाणावें. यातील काय योग्य आहे याचा तू विचार कर ". असें त्यानीं सांगितलें असता पुत्रशोकानें कष्टी झालेला आल्हाद चाडालास बोलावून त्या पुत्रघातकी कृष्णाशास बाधून पत्नीसह त्याच्या स्वाधीन करिता झाला व ह्मणाला " याचा वध करा; उशीर लावूं नका. याचे नेत्र उपटून ते मला आणून दाखवा." हें ऐकून ते चाडाल व्याघ्रानी भरलेल्या वनात गेले. इतक्यात देवसिंह तेथें जाऊन व त्यास पुष्कळ धन देऊन त्या चाडलापासून त्या उभयतांची सुटका करविता झाला. नंतर तीं दोघें वनातून चाललीं. पुढें बलखानीची गजमुक्ता ह्मणून जी पतिव्रता स्त्री होती तिनें मोठ्या आनंदानें एका गुप्त गृहामध्यें त्या दांपत्यास पोशिल २५-२९. इकडे ते चाडाळ सर्व मिळून आल्हादास हरणाचे दोन नेत्र दाखविते झाले. इतक्यात रागावलेला देवसिंह आला व त्यास ह्मणाला ३० " अरे पाप्या, तुज दुराचाऱ्यास धिक्कार असो ! तूं माझ्या मित्रास मारिलेंस. तुझा पुत्र भूलोकीं जिवंत आहे. त्याला हुडकण्याकरिता मी अनेक राष्ट्रामध्ये फिरतों. मी तुला हें खरें खरें सागत आहें ". असे बोलून तो वीर शुभ संश्रियाख्य नगरास गेला व गजमुखेची आज्ञा घेऊन दांपत्यांसह तो निर्भयपणें रम्य मयूरनगरास रात्रीच आला ३१–३३. ते हा बलवान् मकरंद तो सर्व वृत्तात जाणून भगिनीच्या पतीस व भगिनीस प्रेमानें आपल्या जवळ ठेवून

मतस्तो धर्मराजश्च मकरन्दमुवाच ह ३५ अभिनन्दनभूपस्य सुता चित्रगुप्तिनी । नाट्यात्मजा केशरिणी तत्सखी दम्भकोविदा ३६ केशरिण्या गुरुर्ज्ञेयः कुतुको योगरूपधृक् । तेन प्रसारिता माया शतयोजनमन्तरा ३७ शम्बुभिर्दुर्गमा भूमिः शत्रुपाषाणकारिणी । चित्रगुप्तप्रभावेन निर्भयो भूपतिः स्वयम् ३८ चित्रलेखा भूपसुता जयन्तस्तु तया हृतः । नररूपधरो रात्रौ शुकरूपधरो दिने ३९ इन्दुलश्च स्थितो दुःखी चित्रमायाविमोहितः । कृष्णांशश्च भवान्देवः सहितः सूर्यवर्मणा ४० मया दत्तानि यन्त्राणि गृहीत्वा ते मुदा युताः । चित्रलेखां समासाद्य नृत्यादीस्तैः समं कुरु ४१ मोहयित्वा च तां देवीं पठित्वा तन्मतं शुभम् । पुनरागच्छ वै शीघ्रं सैन्ययोगं पुनः कुरु ४२ इत्युक्त्वाऽन्तर्दधे देवस्तं राजा विस्मयान्वितः । कृष्णांशं वर्णयामास यथा धर्मेण भाषितम् ४३ फाल्गुने मासि संप्राप्ते त्रयस्ते योगिरूपिणः । त्रयस्त्रिंशद्गठं रम्यं नृत्यगीतविशारदाः ४४ मृदङ्गाङ्कुस्तदा देवो मकरन्दो विपाञ्चिवान् । नृत्यगानकरो वीरः कृष्णांशः सर्वमोहनः ४५ मोहयित्वा च नगरं तथा गजपतिं नृपम् । सकुलं च ससैन्यं च तुष्टो राजाऽब्रवीदिदम् ४६ वाञ्छितं ब्रूहि मे योगिंस्तं श्रुत्वा प्राह नम्रधीः । देहि मे सूर्यवर्माणं स्वसुतं कार्यहेतव ४७ कृत्वा कार्यमहं शीघ्रं पुनर्दास्यामि ते सुतम् । विधिना निर्मितो धर्मो राजभिर्विश्वरक्षणम् ४८ इति श्रुत्वा गजपतिर्दत्त्वा तेभ्यः स्वकं सुतम् । स्वराज्ञीमाययौ राजा गतास्ते कार्यतत्पराः ४९ पक्षमात्रेण बाह्लीकं नगरं प्रययुर्मुदा । धर्मदत्तानि यन्त्राणि गृहीत्वा शत्रुमन्दिरम् ५० आययुर्लास्य-

---

घेतला झाला ३४. पुढें नानाप्रकारच्या यज्ञांनीं व स्तुतींनीं त्यानें धर्माची प्रार्थना केली असतां प्रसन्न झालेल्या धर्मानें मकंदरास झटलें " अभिनंदनराजाची कन्या चित्रगुप्ताची पूजा करणारी आहे. दंभ जाणणारी नाट्यात्मजा केशरिणी तिची सखी होय. योगरूप धारण करणारा कुतुक केशरिणीचा गुरु आहे. त्यानें शंभर योजनामध्यें माया पसरलेली आहे. ती भूमि शत्रूंस पाषाण करणारी असल्यामुळें दुर्गम झालेली आहे. चित्रगुप्ताच्या प्रभावानें स्वतः तेथील राजा निर्भय होऊन राहिला आहे ३९–३८. चित्रलेखा हीच राजाची कन्या होय. तिनें जयंताचें हरण केलें आहे. तो रात्रीं मनुष्याचें रूप धारण करितो व दिवसां शुक होतो. तेथें चित्रगुप्ताच्या मायेनें मोहित झालेला इंदुल दुःख भोगीत आहे. यास्तव, कृष्णांश, तूं व सूर्यवर्म्यासह देवसिंह असे सर्व मिळून आनंदयुक्त होत्साते मी दिलेलीं सर्व यंत्रें घेऊन चित्रलेखेकडे जा व त्याच्यासह नृत्यादिक करून त्या देवीस मोह पाडून तिचें शुभ मत शिकून तुम्ही पुनरपि येथें या व पुनः सैन्य जमवून स्वारी करा. " असें बोलून तो देव गुप्त झाला. इकडे तो राजा आश्चर्यचकित होऊन धर्मानें जसें सांगितलें होतें तसेंच कृष्णांशास कळविता झाला. पुढें फाल्गुन मास आला असता ते तिघेही योगी होऊन रम्य इन्नगठास गेले. ते नृत्य व गायन यामध्यें निपुण होते. त्यावेळीं देवसिंह मृदंग वाजविणारा, मकरंद वीणा धरणारा व सर्वांस मोहित करणारा वीर कृष्णांश नृत्य व गान करणारा झाला ३९-४५. सर्व नगरास मोहित करून शेवटीं कुल व सैन्य यासह त्या गजपति राजासही त्यानीं मोहित केलें. नंतर प्रसन्न झालेला राजा झणाला ४६ " जा योग्या, तुला काय पाहिजे तें बोल. " हें ऐकून ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो झणालाः— कांहीं कार्याकरितां तूं आपला सूर्यवर्मा पुत्र मला दे ४७. माझें कार्य झाल्यावर मी लागलेंच तुझ्या पुत्रास परत करीन. कारण, राजांनीं विश्वाचें रक्षण करावें हा विधिनिर्मित धर्म आहे ४८. हें ऐकून गजपति त्यास आपला पुत्र देता झाला व नंतर तो आपल्या राणीकडे आला. इतक्यांत कार्यामध्यें तत्पर असलेले ते सर्व निघून गेले ४९. केवळ पंधरा दिवसांमध्येच ते आनंदानें बाल्हीकनगरास जाऊन पोंचले. धर्मानें दिलेलीं यंत्रें घेऊन ते शत्रूच्या गृहीं गेले व ते तत्त्वज्ञानी राजास मोहित

तत्त्वज्ञा कृष्णमोहनतत्पराः । सर्वे च नागराः प्राप्तास्तत्र क्षत्रगणा मुदा ५१ मोहितास्तैश्च ते सर्वे गीतवृत्यविचारदैः । महद्धनं ददौ तेभ्यस्तोषगान्धवसंभवः ५२ तानादाय पुनर्भूपः स्वगेहमभिनन्दनः । आययौ गेहनृत्यार्थी कारयामास वै पुनः ५३ मकरन्दस्तदा वीणां मुदङ्गं भीष्मजो बली । मञ्जीरं सूर्यवर्मा च कृष्णांशो गानवृद्धयकम् ५४ गृहीत्वा मोदयामासुर्नारीवृन्दमहोत्तमान् । चित्ररेखा स्वयं दृष्ट्वा तेषां मोहनहेतवे ५५ मायां निर्वापयामास निष्फला साऽभवत्क्षणात् । मोहिता तैश्च सा देवं तानुवाच मुदान्विता ५६ वाञ्छितं ब्रूहि मे वीर कृष्णांशश्चाह तां वधूम् । शुकं देहि च मे देव नो चेच्छाप ददाम्यहम् ५७ इति श्रुत्वा चित्ररेखा शोकव्याकुलचेतना । कृष्णांशं योगिनं प्राह सत्यं कथय को भवान् ५८ इन्द्राद्या देवतास्सर्वे मया निर्मितमायया । मोहिताः क्षणमात्रेण न भवन्मोहिता मया ५९ देवो नारायणो वापि धर्मो वापि शिवः स्वयम् । इत्युक्तस्य तु कृष्णांशो वचनं प्राह निर्भयः ६० उदयो नाम मे राज्ञि देवसिंहोऽयमुत्तमः । मच्छ्यालो मकरन्दोऽयं सूर्यवर्मा तथाविधः ६१ इन्दुलस्य वियोगेन वयं योगित्वमागताः । मद्भ्रातुश्च तथोन्मादी सद्यःकुलस्तद्वियोगतः ६२ शुकं देहि महामाये इन्दुलं देहि वा यदि । इत्युक्त्वा शशु रुरोदाशैर्हा इन्दुल महाबल ६३ दर्शनं देहि मे शीघ्रं नो चेत्प्राणांस्त्यजाम्यहम् । इत्येव वादिनं वीरं चित्ररेखा महत्तमा ६४ कृत्वा लज्जां पुनः प्राह मां च पुत्रं गृहाण भो । कृत्वा नरमयं रूपं स्वकान्तं सर्वसुन्दरम् ६५ पतित्वा तच्चरणयो रुरोदाशैश्च.

करण्याच्या इच्छेनें संगीत करूं लागले. त्यावेळीं तेथें सर्व नगरवासी जन व सर्व क्षत्रियसमुदाय आनंदानें प्राप्त झाला ९०,९१. गायन व नृत्य यामध्ये कुशल असलेल्या त्यानीं सर्वांस मोहित करून सोडलें. तोमरवंशामध्यें निर्माण झालेल्या क्षत्रियानीं त्यास पुष्कळ धन दिलें. पुढें अभिनंदनराजा त्यास आपल्या गृहीं घेऊन गेला. घरामध्यें याचा नाच करावा असें इच्छिणारा तो राजा नाच करविता झाला ९२,९३. त्यावेळीं मकरंद वीणा वाजवूं लागला, बलाढ्य भीष्मपुत्र मृदंग वाजवूं लागला, सूर्यवर्मा मंजिरी वाजवूं लागला व कृष्णांश नृत्यगायन करूं लागला ९४. याप्रमाणें त्यानीं उत्तम स्त्रियाच्या समूहास संतुष्ट केलें. तेव्हा स्वतः चित्ररेखा तें पाहून त्यास मोहित करण्याकरितां मायेचा प्रयोग करिती झाली, पण त्यावेळीं तिचा काहीं उपयोग झाला नाहीं. उलट त्यानींच तिला मोहित केलें. तेव्हा ती आनंदानें ह्मणाली 'बा वीरा, तुला काय हवें ते बोल.' तेव्हा कृष्णांश तिला ह्मणाला 'हे देवि, मला हा शुक दे; नाहींपेक्षां तुला मी शाप देईन' ९५–९७. हें ऐकून चित्ररेखेचें अंत:करण शोकानें व्याकुळ झालें व ती त्या योगिराज कृष्णांशास ह्मणाली 'तूं कोण आहेस? मला खरें सांग९८. इंद्रादि सर्व देवतांसुद्धां निर्माण केलेल्या मायेनें एका क्षणात मोहित होतात. पण तुला मी मोहित करण्यास समर्थ झालें नाहीं. तूं नारायण आहेस, धर्म आहेस किंवा स्वतः शिव आहेस?' असें तिनें विचारिलें असतां कृष्णांश निर्भयपणानें ह्मणाला ९९,१०० 'हे राज्ञि, माझें नांव उदय आहे; हा श्रेष्ठ देवसिंह होय; हा माझा श्याल मकरंद आहे व तशाच प्रकारचा हा सूर्यवर्मा होय. इंदुलाच्या वियोगामुळें आम्ही योगी झालों आहों. माझा ज्येष्ठ भ्राता त्याच्या वियोगामुळें उन्मादयुक्त व व्याकुळ झालेला आहे ९१,९२. हे महामाये, शुकास परत दे अथवा इंदुलास दे' असें बोलून 'हे महाबलाढ्य इंदुला, मला शीघ्र दर्शन दे; नाहींतर मी प्राणत्याग करितों' असें ह्मणून तो मोठ्यानें रडूं लागला. याप्रमाणें बोलणाऱ्या त्या वीरास अति उत्तम चित्रलेखा लाजून पुनः ह्मणाली 'मलाच पुत्र ह्मणून तूंघे;' असें ह्मणून तिनेंआपल्या कातास अतिसुंदर पुरुष केलें. नंतर तीं दोघेंही त्याच्या चरणावर पडून लोळूं लागलीं. ही त्याची स्थिति पाहून कृष्णांश आनं-

दम्पती । तथाविधौ च तौ दृष्ट्वा कृष्णांगो हर्षसंयुतः ६६ इन्दुलेनैव लिखितं गृहीत्वा पत्रमुत्तमम् । धर्मयन्त्रप्रभावेन मयूरनगरं ययौ ६७ सूर्यवर्मा गतो गेहं मकरन्देन मानितः । देवसिंहस्तु बलवान्गृहीत्वा पत्रमुत्तमम् ६८ ययौ मनोरथारूढो यत्राह्लाद शुचान्वितः । को भवानिति तं प्राह महोन्मादीव दृश्यते ६९ देवसिंहं च मां विद्धि त्वत्पुत्रान्वेषणे रतम् । पत्रं गृहाण भो वीर लिखितं त्वत्सुतेन वै ७० इति श्रुत्वा स आह्लादश्चाह्लादं परमात्मकान् । ज्ञात्वा तत्कारणं सर्वं यथाविधि सुतो हृतः ७१ महीपतिं समाहूय वचनं प्राह नम्रधीः । सत्यं कथय मे भूप कृष्णांगेन हतस्सुतः ७२ स होवाच श्रुतं वीर कृष्णांगेन यथा हृतम् । इत्युक्त्वा तु विहस्याशु कार्यसिद्धिमुपागत ७३ आह्लादः । क्रोधताम्राक्षः केशानाकृष्य तं मुदा । धृतसैस्ताडयामास स्वहस्तेन पुनःपुनः ७४ श्रुत्वा परिमलो राजा सपत्नीकमुमागत. । बहुधा मोदयामास रामांशं बहुरूपिणम् ७५ अरे धूर्त महापापिन्मद्बन्धुर्घातितस्वया । गतो यत्र मम प्राणस्तत्कुलं त्वां नयाम्यहम् ७६ तदा महीपतिर्दुःखी निःश्वासो मौनमास्थितः । तदघं हृदि संस्थाप्य महाशोकमवाप्तवान् ७७ एतस्मिन्नन्तरे वीरो बलखानिः समागत. । विमुच्य मातुलं धूर्तं ज्येष्ठघाताच्च दुःखितम् ७८ स चकार विवाहार्थमुद्योगं भ्रातृपुत्रस्य वै । नेत्रसिंहो नृपः प्राप्तो लक्षसैन्यसमन्वितः ७९ तारकश्च समायातस्सार्द्धं शूरसहस्रकैः । वीरसेनः स्वयं प्राप्तः शूरैः सार्द्धं नवायुतैः ८० तालनश्च तत प्राप्तो लक्षसैन्यसमन्वितः । सूर्यवर्मा तथा प्राप्तो लक्षसैन्यसमन्वितः ८१ ब्रह्मानन्द स्वयं प्राप्तस्त्रिलक्षबलसंयुतः । आह्लादश्च शुचाविष्टो लक्षसैन्यसमन्वितः ८२ हा बन्धो क्व गतस्त्वं वै मां त्यक्त्वा पुरुषाध-

---

दयुक्त होत्साता इंदुलानेंच लिहिलेलें उत्तम पत्र घेऊन धर्माच्या यंत्रप्रभावानें मयूरनगरास गेला ६३-६७ व मकरंदाने ज्याचा सत्कार केला आहे असा सूर्यवर्मा आपल्या घरीं गेला; पण बलाढ्य देवसिंह तें उत्तम पत्र घेऊन शोकयुक्त आल्हाद जेथें होता तेथें मनोरथावर बसून गेला. तेव्हा उन्मादवायु झालेल्या पुरुषाप्रमाणें दिसणारा आल्हाद " तू कोण ? " असें त्यास ह्मणाला. त्यावर " तुझ्या पुत्रास धुंडण्यात निमग्न असलेला मी देवसिंह आहें असें जाण. हे वीरा, तुझ्या पुत्रानें लिहिलेलें हें पत्र घे " असें तो ह्मणाला ६८-७०. तें ऐकून आल्हाद अति आनंदित झाला व पुत्रास कसें हरण केलें इत्यादि सर्व वृत्तांत जाणून महीपतीस बोलावून तो नम्रबुद्धि आल्हाद त्यास ह्मणाला " राजा, मला खरें सांग; कृष्णांशानें माझ्या मुलास मारिलें काय ? " ७१,७२. तेव्हा तो ह्मणाला " कृष्णांशानें मारिलें असें मीं ऐकिलें आहे. " असें बोलून व हंसून त्याने आपला कार्यभाग उरकून घेतला ७३. पण इकडे आल्हादाचे नेत्र क्रोधानें लाल झाले व त्यानें त्याचे केश धरून ओढिले आणि आपल्या हातानें वारंवार वेताच्या काठ्यानीं मार दिला. तें ऐकून परिमलराजा पत्नीसह आला व त्यानें बहुरूपी रामांशास अनेक प्रकारें आनंद दिला. आल्हाद ह्मणतो.— अरे महापापी धूर्ता, तूं माझ्या बंधूचा घात केलास, पण तो माझा प्राण जेथें गेला आहे तेथें हालहाल करून मी तुला नेईन. तेव्हा दुःखयुक्त झालेला महीपति श्वासही न सोडिता स्तब्धी होऊन राहिला. तें पाप हृदयामध्यें धारण करून त्याला मोठी पीडा झाली. इतक्यात वीर बलखानि तेथे आला व ज्येष्ठाच्या घातामुळें दुःखित झालेल्या त्या मातुलास सोडवून तो भ्रातृपुत्राच्या विवाहाविषयीं उद्योग करूं लागला. तेव्हा नेत्रसिंहराजा एक लक्ष सैन्यासह तेथें आला; तारक हजारों शूरासह येऊन पोंचला. नव्वद हजार शूरासह स्वतः वीरसेन आला ७४-८०. इतक्यात लक्षसैन्ययुक्त तालन आला. एक लक्ष सैन्य घेऊन सूर्यवर्मा येऊन थडकला ८१. तीन लक्ष सैन्याचा अधिपति स्वतः

मम । इत्युक्त्वा ययौ वीरः शोकव्याकुलचेतनः ८३ बलखानिस्तु बलवाँल्लक्षसैन्यसमन्वितः । देवसिंहेन सहितो बाह्लीकं प्रत्यगौगमत् ८४ अहोरात्रप्रमाणेन मासैकः पथि वै गतः । ज्येष्ठकृष्णस्य पञ्चम्यां बाह्लीकग्रामवासवान् ८५ व्यूहः स्वकीयसैन्यानां रचितो बलखानिना । एको रथः स्थितो युद्धे तत्पश्चात्संस्थिता गजाः ८६ पञ्चाशतः क्रमात्तेषां वाजिनश्च शतं शतम् । तेषां पश्चात्क्रमाज्ज्ञेयाः पत्तयो दश संस्थिताः ८७ एका सेना च ज्ञेया सा तत्प्रमाण ह्यवीम्यहम् । एको रथो गजास्तत्र्वे शतार्धं तु हयास्तु ये ८८ सेनायां पञ्चसाहस्राः शतद्वयस्तु तथा स्मृता । पञ्चायतानि सेनायां सर्वे पदचराः स्मृताः ८९ एवविधाश्च ताः सेना बलखानेश्च षोडश । गजास्तु दशसाहस्रा मदमत्ताः पृथग्ययुः ९० युद्धेऽस्मिन्गणितं ह्येव शूराः शस्त्रप्रहारणाः । अभिनन्दनभूपस्य म्लेच्छाः पैशाचधर्मिणः ९१ त्रिलक्षाश्च हयारूढा एकलक्षा शतघ्निपाः । एकलक्षाः पदचरा भुशुण्डीपरिघायुधाः ९२ तोमरान्ववसंयुक्ताः क्षत्रिया. प्रभृतानि वै । गजस्था तत्र संजाता यत्राह्लादमहाचमूः ९३ तयोश्चागन्महद्युद्ध तुमुलं रोमहर्षणम् । मदमत्ताश्च ते सर्वे निर्भया रणमाययुः ९४ सप्ताहोरात्रमभवद्युद्ध समरशालिनाम् । बाह्लीकस्यार्धसेना च क्षय नीता च तैर्नृपैः ९५ एकलक्षा हताः सर्वे बलखानेश्च सैन्यपाः । हाहाभूते शत्रुसैन्ये भयभीते दिशो गते ९६ हर्षिता बलखान्याद्या जयदुर्गे वचोऽब्रुवन् । दृष्ट्वा सैन्यविनाशं च राज्ञः सप्त कुमारकाः ९७ कौरवांशाश्च ते जग्मुर्यत्र जातो महारणः । महानन्दश्च नन्दश्च परा-

---

ब्रह्मानंद सैन्यासह प्राप्त झाला, व शोकानें व्याप्त झालेला आल्हादही एक लक्ष सैन्यासह ८२ " हे बंधो, तूं मज पुरुषाधमास सोडून कोठें गेलास ? " असे म्हणून निघाला. त्यावेळीं त्या वीराचें अंतःकरण शोकानें व्याकुळ झालें होतें ८३. असो. बलाढ्य बलखानिही लक्षसैन्ययुक्त देवसिंहासह बाल्हीकदेशास गेला ८४. अहोरात्र चालत असता मार्गात त्याचा एक महिना गेला. ज्येष्ठ कृष्ण पंचमीस ते सर्व बाल्हीकनगरास जाऊन पोचले ८५. बलखानीनें आपल्या सैन्याचा व्यूह रचिला. युद्धामध्ये पुढें एक रथ, त्याच्यामागें क्रमानें एकामागें एक पन्नास गज, त्याच्या पलीकडे क्रमानें शंभर शंभर घोडे व त्याच्याही पलीकडे दहा पत्ति (पायदळें) ठेविल्या होत्या ८६,८७. ही एक सेना जाणावी. अशा त्यांचें मी प्रमाण सांगतो. सेनेमध्ये एक रथ, पन्नास हत्ती, शंभर घोडे व पांच हजार तोफा असतात असें सांगितलें आहे. पायाने चालणारे वीर सर्व मिळून सेनेमध्यें पन्नास हजार असतात ८८,८९. या प्रमाणाच्या बलखानीजवळ सोळा सेना होत्या. शिवाय मदोन्मत्त दहा हजार हत्ती निराळेच चालले होते ९०. या युद्धामध्यें शत्रूंस मारणाऱ्या शूरांचें असें गणित होतें. अभिनंदनराजाचे पैशाचधर्मी तीन लक्ष म्लेच्छ अश्वारूढ झाले होते. एक लक्ष बंदुका व तोफा धारण करणारे होते. एक लक्ष पादचर भुशुंडी व परिघ या शस्त्रांनी युक्त होते ९१,९२ व तोमरवंशामध्यें उत्पन्न झालेले क्षत्रिय एक कोटि होते. तात्पर्य, जेथे आल्हादाची मोठी सेना होती तेथे ते सर्व गजारूढ होऊन आले ९३ व त्या दोन्ही सैन्याचे अंगावर रोमांच उभें करणारें भयंकर युद्ध सुरू झाले. ते सर्वही मदोन्मत्त वीर निर्भयपणें युद्धाकरिता आले ९४ असता त्या युद्धपटूंचे सात अहोरात्र एकसारिखें युद्ध चाललें होतें. त्या राजांनी बाल्हीकाची अर्धी सेना नाहींशी करून टाकिली ९५. इकडे बलखानीच्या सैन्यातील एक लक्षच लोक काय ते मेले होते. असो; शत्रुसैन्यामध्यें हाहाकार उडाला असता व ते भयभीत होऊन पळून गेले असता बलखान्यादि हर्षयुक्त झाले व ' जय दुर्गे ' असें म्हणून त्यानीं गर्जना केली. पण आपल्या सैन्याचा विनाश झाला आहे असें पाहून राजाचे सात पुत्र जेथें भयंकर युद्ध चाललें होतें तेथें गेले, ते सर्वही कौरवांचे अंश होते. महानंद, नंद, परानंद, उपनंद, सुनंद,

नन्दोपनन्दकौ ९८ सुनन्दश्च सुरानन्दः प्रनन्दः प्रमतो भवाः । गजस्थास्ते महावीरास्तोमरान्वयसंभवाः ९९ सेनां जघ्नुः शरैस्तीक्ष्णैर्बलखानिमहात्मनः । भयभीताश्च ते सर्वे बलखानिमुपाययुः १०० दृष्ट्वा सैन्यं पराभूतं बलखानिस्तदा रुषा । अभ्यधावद्वेगेन कपोतस्था महाबली १ नन्दं प्रति तथा देवः परानन्दं च तालनः । उपनन्दं सूर्यवर्मा सुनन्दं प्रति तारकः २ नरसिंहः सुरानन्दं प्रनन्दं प्रति यादवः । युध्यमानास्तु ते सर्वे परस्परवधैषिणः ३ दिनार्द्धमभवद्युद्धं बहुवीरविनाशनम् । पराजितास्तु ते पुत्रा बाल्हीकस्य महाबलाः ४ त्यक्त्वा युद्धं ययुर्गेहं भीरुका बलखानिना । दृष्ट्वा तेषां बलं घोरमभिनन्दनभूमिपः ५ कुतुकं च समाहूय नाट्यां केशरिणीं तथा । कथितं कारणं राज्ञा यथा जातः पराजयः ६ इति श्रुत्वा तु कुतुकस्तामाश्वास्य महीपतिम् । स ध्यात्वा शाम्बरीं मायां महादेवेन निर्मिताम् ७ तत्सैन्यं मोहयामास शिलाभूतमचेतनम् । तदा केशरिणी नाट्या अष्टौ बद्ध्वा महाबलान् ८ राज्ञः पार्श्वमुपागम्य दत्त्वा तान्गेहमाययौ । बाल्हीकश्च प्रज्ञात्मा बद्ध्वा तान्निगडैर्दृढैः ९ लुण्ठितं द्रविणं तेषां कोशमध्ये समाक्षिपत् । देव्याश्च वरदानेन देवसिंहो भयातुरः ११० महावतीं समागम्य स्वर्णवत्यै न्यवेदयत् । ज्ञात्वा स्वर्णवती देवी सर्वविद्याविशारदा ११ श्येनीं मूर्तिं समास्थाय ययौ पुष्पवतीं प्रति । दृष्ट्वा तु दम्पती तत्र मकरन्दगृहे स्थितौ १२ रुदित्वा कथयामास यथा प्राप्तः पराजयः । कृष्णाशस्तु तदा दुःखी मकरन्दं वचोऽब्रवीत् १३ गच्छ वीर मया सार्धं मद्बन्धुर्बन्धन गतः । कुलक्षये महत्पापं सुपोक्तं पूर्वसूरिभिः १४ निमग्नान्दुःख-

---

सुरानंद व प्रनंद अशी त्यांची नावें होतीं. ते तोमरवंशामध्ये उत्पन्न झालेले महावीर हत्तीवर बसून महात्म्या बलखानीच्या सैन्यास तीक्ष्ण बाणांनीं मारिते झाले. तेव्हा भयभीत झालेले सर्व सैनिक बलखानीकडे आले. आपल्या सैन्याचा पराभव झाला आहे असें पाहून त्यावेळीं बलखानि रागावला व तो महाबली कपोतावर बसून मोठ्या वेगानें धावला ९६-१०१. नंदावर देव, परानंदावर तालन, उपनंदावर सूर्यवर्मा, सुनंदावर तारक, सुरानंदावर नरसिंह व प्रनंदावर यादव वीरसेन चाल करून गेला. एकमेकास मारण्याची इच्छा करणारे ते सर्वही युद्ध करीत असता अर्धा दिवस लोटला. त्या युद्धात अनेक वीराचा नाश झाला. शेवटीं बाल्हीकाच्या महाबलाढ्य पुत्राचा पराजय झाला असतां ते बलखानीस भिऊन युद्ध सोडून घरीं गेले. तेव्हा त्यांचें तें घोर सामर्थ्य पाहून अभिनंदनराजा २-५ केशरिणी नाटयेस व कुतुकास बोलाविता झाला व त्यानें आपला पराजय कसा झाला तें सांगितलें. तें ऐकून कुतुकानें राजास धीर दिला व महादेवानें निर्माण केलेल्या शांबरीनामक मायेचें ध्यान केलें. त्यानें बलखानीच्या सैन्यास मोहित केलें ६,७. तें सर्वही सैन्य पाषाणासारखें अचेतन झालें. तेव्हा नाटया केशरिणी त्या आठ महाबलाढ्य वीरास बांधून त्यास राजाच्या स्वाधीन केल्यावर आपल्या घरीं गेली. तेव्हा ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा बाल्हीक त्यास दृढ शृंखलानीं बांधिता झाला व त्यानें त्याचें द्रव्य लुटलें व तें आपल्या कोशात आणून भरलें. तेव्हा देवीच्या वरदानानुळें त्यातून सुटलेला पण भयानें व्याकुळ झालेला देवसिंह महावतीस येऊन स्वर्णवतीस तें सर्व सांगता झाला. तें समजल्यावर सर्व विद्येमध्यें चतुर असलेली स्वर्णवती देवी श्येनपक्ष्याचें रूप घेऊन पुष्पवतीकडे गेली. तेथें मकरंदाच्या गृहात असलेल्या त्या स्त्रीपुरुषास पाहून पराजय कसा झाला हें ती त्यास रडून सांगूं लागली. तें ऐकून कृष्णाशास फार दुःख झालें व तो मकरंदास म्हणाला " हे वीरा, मजबरोबर चल. माझा वडील बंधु बद्ध झाला आहे. पूर्वीच्या विद्वानानीं कुलक्षयाचें मोठें पाप सांगितलें आहे. यास्तव, हे माझ्या प्रिय शालका, दुःख-

जलधौ समुद्धर मम प्रिय । इति श्रुत्वा तु तच्छालः शूरायुतसमन्वितः १५ संन्यस्तवे-षमास्थाय खड्गचर्मसमन्वितः । कृष्णाश्वेन हयारूढो बाह्लीकं त्वरितो ययौ १६ तदा स्वर्णवती देवी पुष्पवत्या समन्विता । श्येनीरूपमुपास्थाय ययौ यत्र महा-रणः १७ स च्छित्त्वा शाम्बरीं मायां बोधयित्वा स्वसैनिकान् । रुरोध नगरीं तस्य बाह्ली-कस्य महात्मनः १८ दृष्ट्वा तान्छत्रु युक्तान्कुतुकस्तु तया सह । पुनश्च शाम्बरीं मायां प्रेषया-मास दान्भ्रांति १९ छित्त्वा सा सकलां मायां बद्ध्वा तौ दैत्यसत्तिभौ । नगरं दाहयामास तस्य भूपस्य मायया १२० न दाहो दाहमापन्नो न भस्मी भस्मतामगात् । मायया च कृतं चित्रं देवी स्वर्णवती स्वयम् २१ तदा पुष्पवती देवी हत्वा केशरिणीं रुषा । तन्मांसैस्तर्पयामास गृध्र-गोमायुवायसान् २२ कुतुकं च तथाभूतं हत्वा स्वर्णवती स्वयम् । कारागार लोहमये स्थिता-म्वीरबन्धोऽचयत् २३ पुनरायम्य सा देवी तया सार्धं शुभानना । मकरन्दः स्थितो यत्र कृष्णांशेन समन्वितः २४ ते सर्वे विस्मिताश्चाप्यज्ञात्वा देव्या विमोहिता । क्रोधवन्तो महावीरा युद्धाय समुपाययु २५ पुनश्चासीन्नयोर्युद्धं सेन रोरुभयंकरम् । बलखानिं महानन्दो नन्दश्चाह्लादमाययौ २६ परानन्दस्तथा देवं तारकं चोपनन्दनः । सुनन्दो नेत्रसिंहं च सुरानन्दश्च तालनम् २७ प्रनन्दो वीरसेनं च ब्रह्मानन्दं स भूपतिं । गजस्थिताश्च ते सर्वे धनुर्युद्धपरायणाः २८ अहो-रात्रमभूद्युद्धं तेषां च तुमुलं क्रमात् । एतस्मिन्नन्तरे रात्रौ चित्ररेखा समागता २९ स्वकीया-न्व्याकुलीभूतांस्तादृशांश्च विलोक्य वै चित्रगुप्तं तदा ध्यात्वा चित्रमायामचीकरत् १३० नाना

सागरामध्ये निमग्न झालेल्या याचा उद्धार कर. " हें ऐकून त्याचा शालक दहा हजार शूरांसहवर्तमान संन्याश्याचा वेष घेऊन कृष्णाश्वसह घोड्यावर बसून व सशस्त्र होऊन बाल्हीकनगरास जाण्याकरिता त्वरेनें निघाला. त्यावेळीं स्वर्णवती देवी पुष्पवतीसह श्येनपक्ष्याचेंच रूप घेऊन जेथें युद्ध चालले होतें तेथें आली १५-१७ व तिनें शाबरी मायेचा उच्छेद करून आपल्या सैनिकास सावध केलें व त्या महात्म्या बाल्हीकाच्या नगरास वेढा दिला १८. तेव्हां सर्व नगर शत्रूनीं वेढिलें आहे असें पाहून कुतुक नाटयेसह पुनरपि त्यांच्यावर शाबरी मायेचा उपयोग करिता झाला. पण त्या संपूर्ण मायेचा उच्छेद करून व त्या राक्षसतुल्य दोघा मायिकास बांधून त्या राजाचें नगर तिनें मायेच्या योगानें जाळ-विलें १९,२०. खरोखर, कोणी जळाला नसून जळल्यासारखा भास झाला व कशाचेंच भस्म झालेलें नसताना सगळ्याचेंच भस्म झालें आहे असें वाटूं लागलें. देवी स्वर्णवतीनें हा चमत्कार स्वतः मायेनें केला २१. तेव्हा देवी पुष्पवती त्या केशरिणीस रागानें मारून तिच्या मांसानें गिधाडें, कोल्हीं व पक्षी यांस तृप्त करिती झाली २२. तात्पर्य, तसल्या भयंकर कुतुकाचा नाश करून स्वर्णवतीनें लोहमय कारागारात असलेल्या वीरास सोडविलें २३. नंतर ती सुंदर देवी पुष्पवतीसह कृष्णांश व मकरंद जेथें होते तेथें आली २४. असो. देवीनें आह्मांस मोहित केलें होतें असे समजलें असता ते सर्व विस्मित झाले. पुढें ते रागावलेले वीर युद्धास उठले २५. रणांगणामध्यें त्या दोन्ही सैन्याचें पुनः मोठें युद्ध झालें. महानंद बल-खानीवर, नंद आल्हादावर, परानंद देवसिंहावर, उपनंदन तारकावर, सुनंद नेत्रसिंहावर, सुरानंद तालनावर, प्रनंद वीरसिंहावर व स्वतः भूपति ब्रह्मानंदावर चालून आला. हत्ती-वर बसलेले ते सर्व धनुर्युद्धामध्यें तत्पर झाले २६-२८. त्याचें अहोरात्र भयंकर युद्ध झाले. इतक्यात रात्रीं चित्ररेखा आली २९ व आपले सैनिक फार व्याकुळ झाले आहेत असे पाहून तिनें चित्रगुप्ताचें ध्यान केलें व चित्रमाया रचिली ३०. तेव्हा तिचे अनेक बंधु झाले व अनेक

तद्वान्धवाश्चासन्बहुधा चाभिनन्दनाः । तां दृष्ट्वा विस्मिताः सर्वे भयभीताश्च दुद्रुवुः ३१ त्यक्त्वा युद्धमयीं भूमिं शोकव्याकुलचेतनाः। पञ्चयोजनमागत्य ततो वासमकारयत् ३२ सन्ध्याकाले तमोभूते निरुत्साहा महाबलाः। हा कृष्णांश महाबाहो शरणागतवत्सल ३३ इन्दुलस्ते कुमारोऽयं संहृतश्चि बरेखया। तथा विमोहिता वीरा वयं ते शरण गताः ३४ इत्युक्त्वा रोदन चक्रु. क्व गतोऽसि महामते। तदा कोलाहलश्चासीद्रुदतां बलशालिनाम् ३५ आह्लादं गर्हयित्वा ते मूर्छिता भुवि विह्वलाः। आह्लाद तु तथा श्रुत्वा वज्रपातादृतः स्वयम् ३६ उन्मादिवत्तदा भूत्वा ताडयामास वक्षसम्। एतस्मिन्नन्तरे योगी कृष्णांशो भगवत्कल ३७ चन्द्रोदये स्वयं प्राप्तश्चाष्टम्यां भृगुवासरे। शरश्च दशसाहस्रैर्मकरन्देन संयुतः ३८ तत्सेनां लुण्ठयामास पालितां बलखानिना। जित्वा तान्सर्वभूपालान्गृहीत्वा विपुलं धनम् ३९ पञ्चशब्दस्थित बन्धु प्रत्यागत्य जगर्ज वै। तस्य शब्देन शेषांशो बोधितो बलशालिना १४० शकुन शुभमालोक्य भुजावुत्थाय वीर्यवान्। स्वाङ्के निवेशयामास कृष्णांशं योगरूपिणम् ४१ स्नापयित्वाऽश्रुधाराभिः कृष्णांशं प्रेमविह्वलः। दत्त्वा द्विजातिमुख्येभ्यो वर्णयामास कारणम् ४२ कृष्णांशोऽपि प्रसन्नात्मा स्वकीयां सकलां कथाम्। वर्णयित्वा यथा भूतां पुनर्बाह्लीकमाययौ ४३ चित्ररेखां स्वय कृत्वा पाठितां चित्ररेखया। बद्धुवाऽभिनन्दन भूप ससुत च समन्त्रिणम् ४४ विवाह कारयामास जयन्तस्य तया सह। बाह्लीकस्तु प्रसन्नात्मा दत्त्वा च विपुल धनम् ४५ स्वसुतां चित्ररेखां च जयन्ताय मुदा ददौ। शत गजान्हयांस्तत्र सहस्रांश्च धनैर्युतान् ४६ शत दासीस्तथा दासीर्जयन्ताय स्वय ददौ ।

अभिनंदन झाले. हें पाहून सर्व विस्मित झाले व भयभीत होऊन पळाले ३१. युद्धभूमि सोडून शोकानें व्याकुळ झालेले ते सर्व पाच योजनें मार्गे येऊन तेथे राहते झाले. गर्द अंधकारानें व्याप्त झालेली रात्र पडली असता ते महाबलाढ्य वीर उत्साहशून्य झाले व हे महापराक्रमी व शरणागतावर प्रेम करणाऱ्या कृष्णांशा, या तुझ्या इंदुल पुत्रास चित्रलेखेनें पळवून नेलें आहे व तिनें ज्यास मोह पाडला आहे असे आम्ही वीर तुला शरण आलों आहों " ३२-३४. असें बोलून व " हे महाबुद्धिमाना, तूं कोठें गेलास ? " असें म्हणून ते रडूं लागले. तेव्हा लढणाऱ्या बलाढ्य पुरुषामध्यें मोठा कोलाहल झाला. आल्हादाची निंदा करून ते विह्वल झालेले वीर भूमीवर मूर्छित होऊन पडले. ती निंदा ऐकून आल्हादची वज्रपात झाल्याप्रमाणें व्यथित झाला व वेडा होऊन वक्षःस्थल बडवूं लागला. पण इतक्यांत भगवानाच्या अंशरूप जो योगी कृष्णाश तो दहा हजार शूर व मकरंद यासह अष्टमी गुरुवारीं चन्द्रोदयसमयीं स्वतः तेथे येऊन पोंचला ३५-३८. व बलखानीच्या शत्रूनें जिचे रक्षण केलें होतें अशा सर्व सेनेस त्यानें लुटलें. त्या सर्व राजांस जिंकून व विपुल धन घेऊन पंचशब्दावर बसलेल्या आपल्या बंधूकडे येऊन तो गर्जना करूं लागला. त्या बलशाली वीरानें आपल्या शब्दाने शेषाशास सावध केलें ३९,४०. तेव्हा तो उत्तम शकुन आहे असें पाहून हात उचलून त्या वीराने योगरूपी कृष्णाशास आपल्या मांडीवर बसाविलें, व प्रेमामुळें विह्वल झालेल्या त्यानें कृष्णाशास अश्रुधारांनीं स्नान घातलें व मुख्य ब्राह्मणास दानें देऊन त्यास सर्व वर्तमान कळविलें ४१,४२. ज्याचा अंतरात्मा प्रसन्न झाला आहे असा कृष्णाशही त्यास तो आपली सर्व कथा सांगता झाला व पुनरपि तो बाल्हीकाकडे आला.चित्ररेखेनें शिकविलेली विद्या स्वतः करून त्यानें पुत्र व मंत्री यासह अभिनंदनराजास बांधिलें ४३,४४. व चित्ररेखेशीं जयंताचा विवाह करविला. तेव्हा बाल्हीकही प्रसन्न झाला व विपुल धन देऊन जयंतास मोठ्या आनंदाने चित्ररेखानामक आपली कन्या त्यानें दिली. शंभर हत्ती, हजार घोडे, शंभर दास व दासी व असंख्य धन त्यानें

मस्थान कारयामास बलखानेमहात्मनः ४७ श्रावणे मासि संप्राप्ते सर्वे च महावतीम् । स्वं स्वं गेहं ययुस्सर्वे भूपाश्चाह्लादमानिताः ४८ इति ते कथितं विप्र चरित्रं कलिनाशनम् । शृण्वतां सर्वपापानं कथयिष्यामि वै पुनः ४९ [१९४५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

सूत उवाच ॥ कृष्णांशे च गृहं प्राप्ते चेन्दुले च विवाहिते । महीपतिस्सदा दुःखी देहलीं प्रति चागमत् १ वृत्तान्तं च नृपस्याग्रे कथयित्वा स तारकः । परं विस्मयमापन्नः कृष्णांशचरितं प्रति २ एतस्मिन्नन्तरे मन्त्री चन्दूभट्ट उदारधीः । भूमिराजं वचः प्राह शृणु पार्थिवसत्तम ३ मया चाराधिता देवी वैष्णवी विघ्नकारिणी । त्रिवर्षान्ते च तुष्टाभूदरदा भयहारिणी ४ तया दत्तं शुभं ज्ञानं कुपतिध्वंसकारणम् । ततोऽहं ज्ञानवान्भूत्वा कृष्णांशं प्रति भूपते ५ चरित्रं वर्णयामास तस्य कल्मषनाशनम् । इत्युक्त्वा स च शुद्धात्मा ग्रन्थं भाषामयं शुभम् ६ माहात्म्यं देवीभक्तानां श्रावयामास वै सभाम् । तच्छ्रुत्वा भूमिराजस्तु विस्मितश्चाभवत्क्षणात् ७ महीपतिस्तदा प्राह दिव्याश्वबलदर्पितः । उदयो नाम बलवान्यस्यैव वर्णिता कथा ८ चत्वारो वाजिनो दिव्या जलस्थलखगाश्च ते । शीघ्रं तांश्च समाहृत्य स्वयं भूप बली भव ९ इति श्रुत्वा स नृपतिः शुकस्वाक्यविशारदम् । आहूय कुन्दनमलं प्रेषयामास सत्वरम् १० महावतीं समागत्य स वृतो भूपतिं प्रति । उवाच वचनं प्रेम्णा महीराजस्य भूपतेः ११ वाजिनस्ते हि चत्वारो दिव्यरूपाः शुभप्रभाः । दर्शनार्थे तव वधूर्वेला नाम ममात्मजा १२ तयाहृतान्हयान्भूप देहि मे विस्मयं त्यज ।

जयंतास स्वतः दिलें व महाम्या बलखानीची तेथून रवानगी केली ४५–४७. श्रावण महिना लागला असता ते सर्व महावतीस परत आले व आल्हादानें ज्यांचा सत्कार केला आहे असे ते सर्व राजे आपापल्या घरीं गेले ४८. हे ब्राह्मणा, मीं हें तुला कृष्णाशाचें चरित्र सांगितलें. हें कलीचा नाश करणारें व श्रोत्यान्या सर्व पापाचें क्षालन करणारें आहे. आता आणखी पुन. सांगेन १४९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणान्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥

सूत ह्मणतातः—कृष्णाश घरीं आला असतां व इदुलाचा विवाह झाला असतां महीपति सतत दुःख करीत देहलीनगरीस गेला व त्यानें राजास सर्व वृत्तात कळविला. कृष्णाशाचें हें चरित्र ऐकून तारक अतिशय विस्मित झाला १,२. इतक्यात ज्याची बुद्धि चतुर आहे असा चंदूभट्ट नावाचा मंत्री भूमिराजास ह्मणाला 'हे नृपोत्तमा, माझें वचन ऐक ३. विश्वास निर्माण करणान्या वैष्णवी देवीची मीं आराधना केली. भयहरण करणारी व वर देणारी ती देवी तीन वर्षांनीं संतुष्ट झाली४ व दुष्ट बुद्धीचा ध्वंस करणारें शुभ ज्ञान तिनें मला दिलें. नंतर मीं ज्ञानी होऊन, हे राजा, कृष्णाशास त्याचें पापनाशक चरित्र सांगितलें'. असें बोलून ज्याचा अंतरात्मा शुद्ध आहे असा तो भाषामय शुभ ग्रंथ व देवभक्तांचें माहात्म्य सभेमध्यें लोकास सांगता झाला. तें ऐकून भूमिराज तत्काल विस्मित झाला. तेव्हा महीपति ह्मणतो.– ज्याची ही कथा सांगितलीस तो दिव्य अश्वान्या सामर्थ्यानें गर्विष्ठ झालेला उदयनामक बलाढ्य वीर आहे ९-८. जल, स्थल व अंतरिक्ष यामध्यें जाणारे चार दिव्य अश्व त्याच्याजवळ आहेत. यास्तव, हे राजा, त्या घोड्याचें शीघ्र हरण करून तू स्वतः बलाढ्य हो ९. हें ऐकून तो राजा विद्या व वाक्यरचना यामध्यें निपुण असलेल्या कुंदनमलास बोलावून त्यास त्वरित पाठविता झाला १०. तेव्हां तो दूत महावतीस येऊन महीराज भूपालाचें वचन प्रेमानें सांगूं लागला ११. " ज्याचें रूप दिव्य आहे व प्रभा शुभ आहे असे ते चार घोडे वेलानामक माझी कन्या व तुझी वधू पाहण्या-

अने चेद्वेलाग्निना सर्वं क्षयं यास्यन्ति सैन्यपाः १३ इति श्रुत्वा वचो घोरं स भूपो भयकातरः। आह्लादादीन्समाहूय वचनं प्राह नम्रधीः १४ हयास्त्वान्त्वान्भुवा देहि मदीयं वचनं कुरु। इति श्रुत्वा स आह्लादो ध्यात्वा सर्वमयी शिवाम् १५ उवाच मधुरं वाक्यं शृणु भूप शिवप्रिय। यत्र नः संस्थिता प्राणास्तत्र ते वाजिनः स्थिताः १६ न दास्यामो वयं राजन्सत्यं सत्यं न चान्यथा। इति श्रुत्वा वचस्तस्य राजा परिमलो बली १७ शपथं कृतवान्घोरं क्षत्रियाणां बलशालिनाम्। भोजनं ब्रह्ममांसस्य पानीयं गोऽसृजोपमम् १८ शय्या स्वमातृसदृशी ब्रह्महत्योपमा सभा। मम राष्ट्रे च युष्माभिर्वासः पापमयो महान् १९ इति श्रुत्वा तु शपथं देवकी शोकतत्परा। चक्कार रोदनं गाढं सगेहजनविग्रहा २० पञ्चविंशाब्दके प्राप्ते कृष्णांशे योगतत्परे। भाद्रशुक्लचतुर्दश्यां तद्देहाद्धर्मतत्पराः २१ निर्ययुः कान्यकुब्जं ते जयचन्द्रेण पालितम्। स्वर्णवत्या पुष्पवत्या सहितास्त्रिंशरक्षया २२ इन्दुलः प्रययौ शीघ्रमयुताश्ववलैस्सह। करालं हयमारुह्य पञ्चशब्दं च तत्पिता २३ कृष्णांशो बिन्दुलारूढो देवकीमनुसययौ। त्यक्त्वा ते भूपतेर्ग्राम सर्वसम्पत्समन्वितम् २४ पथि त्र्यहमुषित्वा ते जयचन्द्रमुपायय्युः। नत्वा तं भूपतिं प्रेम्णा कथित्वा सर्वकारणम् २५ उषित्वा शीतलास्थाने पूजयामास चण्डिकाम्। जयचन्द्रस्तु भूपाला देवसिंहेन वर्णितः २६ तस्मै च न ददौ वृत्तिं नृपः परिमलाज्ञया। कुण्ठितो देवसिंहस्तु गत्वा कृष्णांशमुत्तमम् २७ कथित्वा कारणं सर्वं स श्रुत्वा रोषमादधौ। त्वरितं बिन्दुलारूढो हयपञ्चशतावृतः २८ लुण्ठयामास नगरं पालितं लक्षणेन तत्। दृष्ट्वा तं लक्षणो वीरो

करिता मागत आहे १२. यास्तव बा राजा, तिनें मागितलेले हे घोडे दे व विस्मय सोड; नाहींपेक्षा सर्वही सैन्यरक्षक वेलारूपी अग्नीच्या योगानें क्षय पावतील " १३. हें घोर वचन ऐकून तो राजा परिमल भयभीत झाला व आल्हादादिकांस बोलावून तो नम्रबुद्धि त्यांस ह्मणतो १४ " तुह्मी आपापल्या घोड्यांस आनंदानें द्या व माझें ह्मणणें ऐका. " हें ऐकून आल्हादानें सर्वमय शिवेचें ध्यान केलें व तो मधुर वाणीनें ह्मणाला " हे शिवप्रिय राजा, ऐक. जेथे आमचे प्राण असतात तेथें ते घोडे असतात. राजा, आह्मी त्यांस कधींही देणार नाहीं. मी हें सत्य सत्य सागत आहें, खोटें नव्हे. " असें त्याचें वचन ऐकून बलाढ्य परिमलराजा ते बलशाली वीर ऐकत असतां घोर शपथ घेता झाला. ' तुह्मास येथील भोजन ब्राह्मणाच्या मासाचे भोजन होय. येथील जल गाईंच्या रक्तासारखें होय; येथील शय्या मातेसारखी व सभा ब्रह्महत्येसारखी आहे. माझ्या राष्ट्रामध्यें तुह्मीं निवास केल्यास तो अतिपापमय होईल. ' ही शपथ ऐकून शोकामध्यें तत्पर झालेली देवकी सर्व लोकासह अतिशय रडूं लागली १९-२०. योगामध्यें तत्पर असलेल्या कृष्णांशास पंचविसावें वर्ष लागलें असता भाद्रपदशुद्ध चतुर्दशीस धर्ममध्ये तत्पर असलेले ते सर्व स्वर्णवती, पुष्पवती व चित्ररेखा यासह त्याच्या घरातून निघाले व जयचंद्रानें राखिलेल्या कान्यकुब्जाकडे चालले २१,२२. दहा हजार सैन्य बरोबर घेऊन इंदुल कराल घोड्यावर बसून गेला. त्याचा पिता आल्हाद पचशब्द हत्तीवर व कृष्णांश बिंदुलावर आरूढ होऊन देवकीच्या मागून चालला. सर्व संपत्तीनें परिपूर्ण असलेलें तें परिमलाचें नगर सोडून ते तीन रात्री मार्गामध्यें राहून जयचंद्राकडे गेले. तेथें पोचल्यावर देवसिंहानें राजास नमस्कार करून प्रेमानें सर्व वर्तमान सांगितलें २३-२९. व इतरांनीं शीतलास्थानी राहून चंडिकेची आराधना केली. देवसिंहानें जरी सर्व वृत्तांत जयचंद्रराजास सांगितला होता तरी परिमलाच्या आज्ञेनें राजानें त्यास कोणतीही वृत्ति दिली नाहीं. तेव्हा देवसिंह कुंठित झाला व उत्तम कृष्णांशाकडे येऊन त्यानें तें सर्व वर्तमान त्यास कळविलें. तें ऐकून कृष्णांशास राग आला. तो लागलाच बिंदुलावर आरूढ झाला व पन्नास

हस्तिनः पृष्ठमास्थितः २९ शरेण ताडयामास कृष्णांशहृदयं दृढम् । निष्फलत्वं गतो बाणो विष्णुमन्त्रेण प्रेरितः ३० विस्मितः स तु भूपालो वाहनाद्भूमिमागतः । नत्वा तच्चरणौ दिव्यौ कुलिशादिभिरन्वितौ ३१ तुष्टाव दण्डवद्भूत्वा लक्ष्मणो गद्गद गिरा । लक्ष्मण उवाच ॥ वैष्णवं विद्धि मां स्वामिन्विष्णुपूजनतत्परम् ३२ जानेऽहं त्वां महाबाहो कृष्णशक्त्यवतारकम् । त्वद्धते को हि मे बाणं निष्फलः कुरुते भुवि ३३ क्षमस्व मम दौरात्म्यं नाथ ते मायया कृतम् । इत्युक्त्वा तेन सहितो जयचन्द्रमहीपतिम् ३४ गत्वा तत्कथयामास यथा मासं पराजयम् । नृपस्तयोः परीक्षार्थे यौ तु च्छायाविमाहितौ ३५ गजौ कुवलयापीडौ त्यक्तबाल्छीतलास्थले । तदाह्लादोदयौ वीरौ गृहीत्वा तौ स्वलीलया ३६ चकर्षतुर्बलात्पुच्छे क्रोशमात्रं पुनःपुनः । मृतौ कुवलयापीडौ दृष्ट्वा राजा भयातुरः ३७ ददौ राजगृहं ग्राम तयोरर्थे प्रसन्नधीः । इषशुक्ल तु सप्तम्यां लक्ष्मणो नाम वै बली ३८ नृपाज्ञया ययौ शीघ्रं तैश्च दिग्विजयं प्रति । सप्तलक्षबलैस्सार्द्धं तालनाद्यैश्च संयुतः ३९ वाराणसीं पुरीं प्राप्य रुरोध समरे तदा । रुद्रवर्मा च भूपालो गौडवंशयशस्करः ४० पञ्चायुतैः स्वसैन्यैश्च सार्द्धं युद्ध्यर्थमाययौ । याममात्रेण तं जित्वा गौडराजस्य वै करम् ४१ कोटिमुद्रामथ प्राप्य जयचन्द्राय चार्पयत् । मागधेशं पुनर्जित्वा नम्रा विजयकारिणम् ४२ विंशदब्दकरं प्राप्य स्वभूपाय समार्पयत् । पञ्चकोट्यश्च वै मुद्रा राजतस्य पुनर्ययौ ४३ अङ्गदेशपतिं भूपं मायावर्माणमुत्तमम् । सैन्यायुतयुतं

स्वारासह लक्ष्मणाने रक्षिलेल्या नगरात शिरला. त्यानें तेथें लूट केली. त्यास पाहून लक्ष्मण वीर हत्तीच्या पाठीवर बसला व एका बाणानें त्यानें कृष्णाशाच्या हृदयावर जोरान वेध केला. पण विष्णुमत्रानें मंत्रवून सोडिलेला तो बाण निष्फळ झाला २९–३०. तेव्हा आश्चर्यचकित झालेला तो राजा वाहनावरून भूमीवर उतरला व त्याच्या दिव्य चरणीं वंदन करून तो लक्ष्मण भूमीवर दंडासारखा पडून गद्गद वाणीनें त्याची स्तुति करूं लागला. कृष्णाशाचे चरण कुलिशादि चिन्हांनीं युक्त होते. लक्ष्मण म्हणतोः– हे स्वामिन्, विष्णूच्या पूजेमध्यें तत्पर असलेला मी विष्णुभक्त आहें असें जाण. हे महाबाहो, मी तुला सागतों. तू कृष्णशक्तीचा अवतार आहेस. तुझ्यावाचून या लोकीं माझ्या बाणास निष्फल करणारा दुसरा कोण वेर आहे ? हे नाथ, तुझ्या मायेमुळें माझ्या ठायीं उत्पन्न झालेलें दौरात्म्य तूं सहन कर. असे बोलून त्यासहवर्तमान लक्ष्मण जयचंद्रराजाकडे गेला व पराजय कसा झाला हें त्यानें त्यास सागितलें. नंतर त्याच्या परीक्षेकरिता राजानें कुवलय व आपीड या नावाचे छायारूपी मत्त हत्ती शीतलास्थलीं सोडिले. त्या वेळीं आल्हाद व उदय या दोघा वीरानीं त्या दोन हत्तींच्या पुच्छास धरून सहज लीलेने पुनःपुन एक कोसभर मार्गे ओढिले. त्यामुळें कुवलय व आपीड मरण पावले व हें पाहून राजा भयभीत झाला ३१–३७. त्यानें प्रसन्न मनानें त्याच्याकरिता ग्राम व राजगृह दिलें. आश्विन शुक्लपक्ष लागला असतां बलाढ्य लक्ष्मण राजाच्या आज्ञेनें त्याच्यासह दिग्विजय करण्याकरिता गेला. त्यावेळीं तालनादिकानीं युक्त असलेल्या त्या वीराजवळ सात लक्ष्य सैन्य होतें ३८,३९. त्यानें वाराणसीस येऊन त्या नगरास वेढा दिला. गौडवंशाची कीर्ति करणारा रुद्रवर्मा म्हणून तेथें राजा असें ४०. तो पन्नास हजार सैन्यासह त्याच्याशीं युद्ध करण्याकरिता आला. पण एका प्रहरामध्येंच त्यास जिंकून लक्ष्मणानें सोळा वर्षाचा कर एक कोटि मुद्रा घेऊन जयचंद्राकडे पोचविला. पुढें विजयकारीनामक मगधदेशाच्या राजास जिंकून त्याच्यापासून वीस वर्षाचा कर एक रुप्याच्या पाच कोटि मुद्रा घेऊन त्या आपल्या राजास समर्पण केल्या. नंतर तो मायावर्मा या नावाचा अंगदेशाधिपति म्हणून जो अंगदेशाचा राजा होता त्यास

जित्वा विंशदब्दस्य वै करम् ४४ कोटिमुद्राश्च संप्राप्य स्वभूपाय समार्पयत् । वङ्गदेशपतिं वीरो लक्षणो वै युतश्च तैः ४५ लक्षसैन्ययुतं भूपं कालीवर्माणमुत्तमम् । अहोरात्रेण तं जित्वा महायुद्धेन लक्षण ४६ विंशदब्दकरं प्राप्य कोटिवर्गमयं तदा । प्रेषयामास भूपाय जयचन्द्राय वै मुदा ४७ उड्रदेशं ययौ वीरः पालितं तैर्महाबलैः । धोयीकविस्तत्र नृपो लक्षसैन्यसमन्वितः ४८ जगन्नाथाज्ञया प्राप्तस्तैश्च सार्द्धं रणोन्मुखे । तयोश्चासीन्महद्युद्धं तुमुलं लोमहर्षणम् ४९ अहोरात्रप्रमाणेन कृष्णांशेन जितो नृपः । विंशदब्दकरं सर्वं कोटिस्वर्णसमन्वितम् ५० समाप्य प्रेषयामास कान्यकुब्जाधिपाय वै । पुण्ड्रदेशं ययौ वीरो लक्षणो बलवत्तरः ५१ नृपं नागपतिं नाम पञ्चायुतबलैर्युतम् । दिनमात्रेण तं जित्वा कोटिमुद्रा गृहीतवान् ५२ महेन्द्रगिरिमागत्य नत्वा तं भार्गवं मुनिम् । ततो निवृत्य ते सर्वे नेत्रपालपुरं ययुः ५३ योगसिंहस्तदागत्य कृष्णांशं प्रति भार्गव । कोटिमुद्रा ददौ तस्मै सप्तरात्रमवासयत् ५४ वारसिंहपुरं जग्मुस्ते वीरा मदवत्तराः । रुरुधुर्नगरीं सर्वां हिमतुङ्गोपरि स्थिताम् ५५ पालितां गोरखाख्येन योगिना भक्तकारणात् । भूपानुजः प्रवीरश्च सैन्यायुतसमन्वितः ५६ कृतवान्मारुणं युद्धं लक्षणस्यैव सेनया । प्रत्यहं बलवाञ्छूरो हत्वा शूरसहस्रकम् ५७ सायंकाले गृहं प्राप्य योगिन तमपूजयत् । पूजनात्स प्रसन्नात्मा सैन्यमुज्जीव्य भूपतेः ५८ दत्त्वा गजबलं तेभ्यः पुनर्योगं करोति वै । सार्द्धमासो गतस्तत्र युध्यतां बलशालिनाम् ५९ तदा ते तु निरुत्साहा देवसिंहं तमब्रुवन् ।

दहा हजार सैन्यासह जिंकून त्यापासून वीस वर्षाचा एक कोटि मुद्रा कर घेऊन आपल्या राजास समर्पण करिता झाला. पुढें तो वीर लक्षण कृष्णांशासह वंग देशाच्या राजाकडे गेला. तो राजा लक्ष सैन्यानें युक्त असून कालीवर्मा असें त्याचें नाव होतें. लक्षणानें अहोरात्र त्याच्याशीं भयंकर युद्ध करून त्यास जिंकिलें; व सुवर्णाच्या एक कोटि मुद्रा वीस वर्षाचा कर ह्मणून घेतल्या; व आनंदानें त्या जयचंद्राकडे पाठविल्या ४१–४७. त्यानंतर महाबलाढ्य वीरांनीं ज्याचें रक्षण केलें आहे अशा उड्र देशास तो वीर आला. तेथें धोयीकवि ह्मणून राजा होता. त्याच्याजवळ एक लक्ष सैन्य असे ४८. जगन्नाथाच्या आज्ञेनें तो याच्याशीं युद्ध करण्याकरिता समारंगणामध्यें आला. त्या उभयतांचें अतिभयकर युद्ध अहोरात्र झालें. पण कृष्णांशानें त्यास जिंकिलें. त्याच्यापासून सुवर्णाच्या एक कोटि मुद्रा वीस वर्षाचा कर ह्मणून घेऊन त्या सर्व कान्यकुब्जदेशाच्या राजाकडे पाठविल्या. पुढें अतिबलाढ्य लक्षण वीर पौंड्र देशास गेला; व पन्नास हजार सैन्यानीं युक्त असलेल्या नागपतिनामक राजास केवल एका दिवसात जिंकून त्यापासून एक कोटि मुद्रा घेतल्या. पुढें महेंद्रपर्वतावर येऊन भार्गवमुनीस नमस्कार केल्यावर ते सर्व तेथून परतले व नेत्रपालनगरास आले. तेव्हा हे भार्गवा, योगसिंह कृष्णांशाकडे येऊन त्यास एक कोटि मुद्रा देता झाला व त्या सर्वांस त्यानें सात दिवस ठेवून घेतलें. पुढें ते मदोन्मत्त वीर वीरसिंहनगरास आले. त्यानीं हिमालयाच्या शिखरावर असलेल्या त्या सर्व नगरास वेढा दिला ४९-५९ पण भक्तावरील प्रेमामुळें गोरखसंज्ञक योग्यानें त्या नगराचें रक्षण केलें होतें. राजाचा प्रवीर नांवाचा कनिष्ठ बंधु दहा हजार सैन्यासह लक्षणाच्या सैन्याशीं भयंकर युद्ध करिता झाला. तो बलवान् शूर प्रतिदिनीं सहस्र शूरास मारून संध्याकाळीं घरीं येई व त्या योग्याची पूजा करी. पूजनाच्या योगानें ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा तो गोरख राजाच्या सैन्यास जीवंत करीत असे ५६–५८ व त्यास हत्तीचें सामर्थ्य देऊन तो योगी पुनरपि युद्धाकरिता नियुक्त करी. याप्रमाणें ते बलशाली युद्ध करीत असता दीड महिना लोटला. तेव्हां ते उत्साहशून्य

विजयो नः कथं भूयात्तत्त्वं ब्रूहि न अग्रतः ६० इति श्रुत्वा स होवाच शृणु कृष्णांश मे वचः। योगिनं गोरखं नाम पराजित्य स्वनृत्यतः ६१ पुनर्युद्धं कुरु त्वं वै ततो जयमवाप्स्यसि। इत्युक्तास्ते हि कृष्णाद्याः कृत्वा योगमयं वपुः ६२ स्थापयित्वा रणे सेनां पालितां लक्षणेन वै। प्रातःकाले ययुस्ते वै मन्दिरं तस्य योगिनः ६३ कृष्णांशो नर्तकश्चासीद्देणुवाद्यविशारदः। देवसिंहो मृदङ्गाढ्यो वीणाधारी च तालनः ६४ कांस्यधारी तदाह्लादो जगौ गीतां सनातनीम्। तदर्थं हृदये कृत्वा गोरखस्तत्रयोगवान् ६५ वरं वरय तान्नाह ते तच्छ्रुत्वाऽब्रुवन्वचः। नमस्यामो वयं तुभ्यं यदि देयो वरस्त्वया ६६ देहि सञ्जीविनीविद्यामाह्लादाय महात्मने। इति श्रुत्वा हृदि ध्यात्वा तानुवाच प्रसन्नधीः ६७ विद्या सञ्जीविनी तुभ्यं वर्षमात्रं भविष्यति। तत्पश्चान्निष्फलीभूवागमिष्यति मदन्तिकम् ६८ अद्यप्रभृति भो वीर मया त्यक्तमिदं जगत्। यत्र भर्तृहरः शिष्यस्तत्र गत्वा शये ह्यहम् ६९ इत्युक्त्वाऽन्तर्हितो योगी जग्मुस्ते रणमूर्धनि। जित्वा प्रवीरसिंहं च वीरसिंहं तथैव च ७० हत्वा तस्यायुतं सैन्यं लुण्ठयित्वा च तद्गृहम्। कृत्वा दासमयं भूपं लक्षणः प्रययौ मुदा ७१ कौशलं देशमागत्य जित्वा तस्य महीपतिम्। सैन्यायुतं सूर्यधरं करयोग्यमचीकरत् ७२ षोडशाब्दकरं प्राप्य मुद्राकोट्ययुतं मुदा। नैमिषारण्यमागम्य तत्रोषु स्नानतत्पराः ७३ होलिकाया दिने रम्ये लक्ष्मणो बलवत्तरः। दत्त्वा दानानि विप्रेभ्यो महोत्सवमकारयत् ७४ तदा वयं च मुनयः समाधिस्थाश्च भूपतिः। यदा स लक्षणः प्राप्तो नैमिषारण्यमुत्तमम् ७५ स्नात्वा सर्वाणि तीर्थानि सतर्प्य द्विजदेवताः। कान्यकुब्जपुरं जग्मुश्चैत्रकृष्णाष्टमीदिने ७६ इति ते कथित विप्र यथा

होऊन देवसिंहास ह्मणाले " आमचा विजय कसा होईल तें आह्मास खरें सांग ". हें एकून तो कृष्णाशास ह्मणाला " गोरखनामक योग्यास आपल्या नृत्यानें पराजित करून नंतर तूं युद्ध कर ह्मणजे तुला जय मिळेल ". याप्रमाणे त्यानें सांगितलें असता ते कृष्णाशादिक वीर योगमय शरीर धारण करिते झाले. लक्षणानें रक्षिलेल्या आपल्या सैन्यास समरागणामध्येंच ठेवून प्रातःकाळीं ते त्या योग्याच्या मंदिरीं गेले. व मुरली वाजाविण्यामध्यें तत्पर असलेला कृष्णाश नृत्य करिता झाला. देवसिंहानें मृदंग उचलला, तालन वीणा धारण करिता झाला व आल्हादानें टाळ घेतला. आणि ते सनातन गीतेचें गायन करूं लागले. त्याचा अर्थ मनामध्यें आणून तो सर्वयोगसपन्न त्यास ह्मणाला " वर मागा ". हे त्याचे शब्द ऐकतांच ते ह्मणाले " आह्मी तुला नमस्कार करितों. आह्मास जर वर द्यावयाचाच असेल तर या महात्म्या आल्हादास आपली सजीविनी विद्या दे. " हें ऐकून व मनामध्यें विचार करून ज्याचें अंतःकरण प्रसन्न झालें आहे असा तो पुनः ह्मणतो " ही संजीविनी विद्या तुला एक वर्षभर मिळेल व त्यानंतर ती निष्फल होऊन मजजवळ येईल. हे वीरा, आजपासून मीं हें जगत् सोडिले आहे. ज्याठिकाणीं माझा भर्तृहर ह्मणून शिष्य आहे तेथें जाऊन मी शयन करितों " ९९-६९. असें बोलून तो योगी गुप्त झाला व ते समरांगणामध्यें आले. नंतर प्रवीरसिंहास व वीरसिंहास जिंकून, त्यांचें दहा हजार सैन्य नाहींसें करून, त्यांचें गृह लुटून व त्या राजास बंदिवान् करून लक्षण आनंदानें पुढें चालला ७०,७१. पुढें कौशल देशास येऊन तेथील राजास जिंकून त्यास कर देण्यास भाग पाडिलें. त्याचे दहा हजार सैन्य होतें व सूर्यधर असें नाव होतें ७२. त्याच्यापासून लक्षणानें कोट्यावधि मुद्रा सोळा वर्षाचा कर ह्मणून घेतल्या. पुढें नैमिषारण्यामध्यें येऊन ते तेथें स्नानामध्यें तत्पर झाले ७३. रम्य होळीच्या दिवशीं बलाढ्य लक्षण ब्राह्मणास दानें देऊन मोठा उत्साह करिता झाला ७४. ज्यावेळीं तो लक्षणराजा उत्तम नैमिषारण्यामध्यें आला त्या वेळीं आह्मी सर्व मुनि समाधिस्थ होतों ७५. असो; तेथें आल्या-

दिग्विजयोऽभवत् । शृणु विप्र कथां रम्यां बलखानिर्यथा कृतः ७७ मार्गकृष्णस्य सप्तम्यां भूमिराजो महाबलः । महीपतेश्च वाक्येन सामन्तं प्राह निर्भय ७८ मया श्रुतस्ते तनयः शारदावरदर्पितः । रक्तबीजत्वमापन्नस्तं मे देहि कृपां कुरु ७९ इत्युक्तस्य तु सामन्तस्तेन राज्ञैव सत्कृतः । चामुण्डं नाम तनयं समाहूयाब्रवीदिदम् ८० पुत्र त्वं नृपतेः कार्यं सदा कुरु रणप्रिय । इति श्रुत्वा पितुर्वाक्य स वै राजानमब्रवीत् ८१ देह्याज्ञां भूपते मह्यं शीघ्रं जयमवाप्स्यसि । इति श्रुत्वा स होवाच बलखानिर्महाबलः ८२ छित्त्वा मत्संश्रियवनं गृहीत्वा राष्ट्रमुत्तमम् । सुस्थितो निर्भयो गेहे बाहुशाली यतेन्द्रियः ८३ यदि त्वं बलखानिं च जित्वा मे ह्यर्पयिष्यसि । हत्वा वा तस्य सकलं राष्ट्रं त्वयि भविष्यति ८४ इत्युक्त्वा रक्तबीजं तं समाहूय स्वकं बलम् । सप्तलक्षं ददौ तस्मै स तत्प्राप्य मुदा ययौ ८५ उक्त्वा त्रिदिनं मार्गे संश्रियाख्यपुरागतः । रुरोध नगरीं सर्वां बलखानिर्महात्मनः ८६ चामुण्डागमनं श्रुत्वा बलखानिर्महाबलः । पूजयित्वा महामायां दत्त्वा दानान्यनेकशः ८७ लक्षसैन्येन सहितः प्रययौ नगराद्बहिः । तस्यानुजो महावीरस्तुखखानिर्बली सह ८८ हरिणीं तां समारुह्य शत्रुसैन्यं क्षयंतवान् । बलखानिः कपोतस्थो नाशयित्वा रिपोर्बलम् ८९ लक्षसैन्यं मुदा युक्तश्चामुण्ड प्रति चागमत् । तयोश्चासीन्महद्युद्ध स्वस्वसैन्यक्षयङ्करम् ९० अहोरात्रप्रमाणेन संहृताः क्षत्रिया रणे । प्रातःकाले तु संप्राप्ते कृत्वा स्नानादिका क्रियाः ९१ जग्मतुस्तौ रणे वीरौ धनुर्बाणविशारदौ । रथस्थो बलखा-

---

वर सर्व तीर्थामध्यें स्नान करून व ब्राह्मण व देवता यांस तृप्त करून ते सर्व चैत्र शुद्ध अष्टमीस कान्यकुब्जनगरीं गेले. हे ब्राह्मणा, याप्रमाणें दिग्विजय कसा झाला हें मीं तुला सांगितलें. आतां हे विप्रा, बलखानि कसा मेला ती रम्य कथा तूं ऐक ७६,७७. मार्गशीर्ष महिन्याच्या कृष्णपक्षातील सप्तमीस महाबलाढ्य भूमिराज महीपतीच्या सांगण्यावरून सामतास निर्भयपणानें ह्मणाला ७८ ' मीं असें ऐकिलें आहे कीं शारदेच्या वरामुळें दर्पयुक्त झालेला तुझा पुत्र रक्तबीजत्वास प्राप्त झालेला आहे तो मला दे व तूं कृपा कर ' ७९. याप्रमाणें सांगितलें असता राजानें ज्याचा पुष्कळ सत्कार केला आहे असा तो सामंत चामुंडनामक पुत्रास बोलावून असें ह्मणाला ८० ' हे पुत्रा, तूं युद्धप्रिय आहेस. यास्तव, तूं सर्वदा राजाचे कार्य कर. ' हें पित्याचें वचन ऐकून तो राजास ह्मणाला ८१ ' भूपते, मला आज्ञा दे ह्मणजे तुला शीघ्र जय मिळेल. ' हें ऐकून तो ह्मणाला " महाबलाढ्य बलखानि माझें संश्रयवन तोडून व तेथें उत्तम राष्ट्र करून राहिला आहे. तो बाहुशाली व यतेंद्रिय आपल्या गृहामध्यें निर्भयपणें राहत असतो. यास्तव, तूं त्या बलखानीस जिंकून मजकडे आणशील किंवा त्याला मारशील तर त्याचें सर्व राष्ट्र मी तुला देईन " ८२-८४. असें त्या रक्तबीजास सांगून त्यानें आपल्या सात लक्ष सैन्यास बोलाविलें व तें सर्व त्याच्या हवालीं केलें. इतकें सैन्य मिळाल्यामुळें त्याला मोठा आनंद झाला ८५. मार्गामध्यें तीन दिवस राहून तो संश्रियाख्य नगरीस आला व महात्म्या बलखानीच्या त्या सर्व नगरीस त्यानें वेढा दिला ८६. चामुंड आला आहे असें ऐकून महाबलाढ्य बलखानि महामायेचें पूजन करून अनेक दानें देता झाला ८७. एक लक्ष सैन्यासह तो नगराच्या बाहेर पडला असता त्याचा सुखखानि-नामक महावीर बंधु हरिणीवर बसून आपल्या सैन्यासह शत्रुसैन्याचा घात करिता झाला. कपोतावर बसलेल्या बलखानीनेंही शत्रूच्या सैन्याचा नाश केला ८८,८९. नंतर मोठ्या आनंदानें तो चामुंडाशीं भिडला. त्या उभयतांचें मोठें युद्ध झालें. त्या अहोरात्रीमध्यें असंख्य क्षत्रिय मरण पावले दोन्ही सैन्यांचा क्षय झाला. पुढें प्रातःकाल झाला असता स्नानादि नित्य क्रिया करून ते धनुर्धर वीर पुनः

निश्च चामुण्डो गजपृष्ठगः ९१ चक्रतुस्तुमुलं घोरं नरविस्मयकारकम् । बाणैर्बाणांश्च संछिद्य देवीभक्तौ च तौ मुदा ९२ अन्योन्यवाहनं हत्वा भूतलत्वमुपागतौ । खड्गचर्मधरौ वीरौ युयुधातां परस्परम् ९४ यावन्तो रक्तबीजाद्भूत्संजाता रक्तबिन्दवः । तावन्तः पुरुषा जाता रक्तबीजपराक्रमाः ९५ तैश्च वीरैर्मदोन्मत्तैर्बलखानिस्तमन्ततः । रोधितोऽभूद्भृगुश्रेष्ठ शरदां शरणं ययौ ९६ एतस्मिन्नन्तरे वीरः सुखखानिस्ततोऽनुजः । आग्नेयं शरमादाय रक्तबीजाबदाहयत् ९७ पुरा तु सुखखानिश्च हव्यैर्देवं च पावकम् । पञ्चाब्दं पूजयामास तदा तुष्टस्त्वयं प्रभुः ९८ पावकीयं शरं रम्यं शत्रुसंहारकारकम् । ददौ तस्मै प्रसन्नात्मा तेनासौ विजयोऽभवत् ९९ बलखानिस्तु बलवान्दृष्ट्वा शत्रुविनाशनम् । पराजितं च चामुण्डं बद्ध्वा गेहमुपागमत् १०० कृत्वा नारीमयं वेषं स भीतो ब्रह्महत्यया । दोलामारोप्य बलवान्प्रेषयामास शत्रवे १ हतशेषं पञ्चलक्षं सैन्यं मत्वा च देहलीम् । वृत्तान्तं कथयामास यथा जातो महारणः २ नारीवेषं च चामुण्डं स दृष्ट्वा पृथिवीपतिः । क्रोधाविष्टश्च बलवान्महीपतिमुवाच ह ३ कथं जयो मे भविता सुखखानौ च जीविते । श्रुत्वा महीपतिः प्राह च्छद्मना कार्यमाकुरु ४ ब्राह्मी माता तयोर्ज्ञेया शुद्धा सैव पतिव्रता । दूतीभिः कारणं ज्ञात्वा पुनर्युद्धं कुरुष्व भोः ५ इति श्रुत्वा महीराजो दूतीस्ताश्छलकोविदाः । आहूय प्रेषयामास बलखानिगृहं प्रति ६ तास्तु वै ब्राह्मणीभूत्वा बलखानिगृहं ययुः । ससुतां तां यशस्वाशु यशश्चूर्विनयान्विताः ७ तत्र पुत्रो

समरांगणामध्यें आले. बलखानि रथामध्यें बसला होता व चामुंड हत्तीच्या पाठीवर बसला होता९०-९२. मनुष्यास आश्चर्य उत्पन्न करणारें असें घोर युद्ध त्यानीं केलें. बाणाच्या योगानें त्या दोन्ही देवीभक्तानीं बाणाचा छेद केला व एकमेकाच्या वाहनास मारून ते भूतलीं उभे राहिले. हातामध्यें ढालतरवार धारण करून ते वीर एकमेकाशीं लढूं लागले ९३,९४. रक्तबीजाच्या अंगातून जितके बिंदु खालीं पडले तितके त्याच्यासारखे पराक्रमी पुरुष निर्माण झाले व त्या मदोन्मत्त वीरानीं बलखानीस चोहोंकडून वेढिलें. हे भृगुश्रेष्ठा, याप्रमाणें शत्रूकडून वेष्टित झालेला तो बलखानि शारदेस शरण गेला. इतक्यात त्याचा कनिष्ठ बंधु वीर सुखखानि आग्नेय शर घेऊन रक्तबीजास जाळिता झाला. पूर्वी सुखखानीनें पावक देवास हवनीय द्रव्याच्या योगानें पांच वर्षें सारखें पूजिलें. तेव्हा तो स्वयंभू ईश्वर प्रसन्न झाला ९५-९८ व त्यानें प्रसन्न मनानें शत्रूंचा संहार करणारा पावकीयनामक रम्य शर दिला. त्यामुळें हा त्याचा जय झाला ९९. तेव्हा बलवान् बलखानि शत्रूंचा नाश झाला आहे व चामुंडाचा पराजय झाला आहे असें पाहून त्यास बांधून घरीं घेऊन चालला १००. पण ब्रह्महत्येस भिणाऱ्या त्या वीरानें चामुंडास स्त्रीवेष देऊन व मेण्यामध्यें घालून शत्रूकडे पाठविलें १. पण त्यापूर्वीच मरून राहिलेले पांच लक्ष सैन्य देहलीस जाऊन भयंकर युद्ध कसें झालें इत्यादि सर्व वर्तमान राजास सांगतें झालें २. चामुंड स्त्रीवेषधारी झाला आहे असें पाहून बलवान् पृथ्वीपति रागावला व महीपतीस म्हणाला ' सुखखानि जिवंत असताना माझा जय कसा होणार ?' तेव्हा हें ऐकून महीपति म्हणतो 'राजा, मी सांगतों त्याप्रमाणें कपट कर ३,४. त्याची ब्राह्मी म्हणून माता आहे. ती अतिशुद्ध व पतिव्रता आहे. तेव्हा तिच्याकडे दूती पाठवून व त्याच्या मरणाचे कारण समजून घेऊन नंतर युद्ध कर' ५. हें ऐकून महीराज कपटामध्यें निपुण असलेल्या दूतींस बोलावून त्यास बलखानीच्या गृहीं पाठविता झाला. तेव्हा त्या ब्राह्मणी होऊन बलखानीच्या गृहीं गेल्या व पुत्रासह तिची स्तुति करून त्या अतिनम्रपणें लागलेच असें म्हणू लागल्या " खरोखर तुझे पुत्र महावीर आहेत. दैवयोगानेंच ते शत्रूंचा

महावीरौ दिश्या शत्रुक्षयङ्करौ । तयोर्मृत्युः कथं भूयाज्जीवितां शरदां शतम् ८ तदा ब्राह्मी वचः प्राह पावकीयं शरं शुभम् । सुखखानेर्जीविकरं बलखानेः पदाह्वकम् ९ इति श्रुत्वा तु ता कृत्यः प्रययुर्देहलीं प्रति । कथयित्वा नृपस्याग्रे धनं प्राप्य गृहं ययुः ११० महीराजस्तु तच्छ्रुत्वा महादेवमुमापतिम् । पार्थिवैः पूजनं चक्रे सहस्रादिवसं मुदा १११ [३०५६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये चतुर्विंशोऽध्यायः २४

सूत उवाच ॥ षड्विंशाब्दे च कृष्णांशे यथा जातं तथा शृणु । मुने बिन्दुसरो नाम दक्षिणस्यां दिशि स्थितम् १ तस्य तीरेऽवसद्ग्रामो योजनायामसंयुतः । नाम्ना बिन्दुगढो दुर्गो वर्णधर्मप्रवर्तकः २ तस्मिन्ग्रामेऽवसद्भूपो विष्वक्सेनान्ववोद्भवः । शारदानन्दनो नाम ब्रह्मध्यानपरायणः ३ ब्रह्मचर्यप्रभावेन तद्वीर्यं शिरसि स्थितम् अतस्स कामपालाख्य पथितोऽभून्महीतले ४ यज्ञैः संपूजयामास सुरज्येष्ठं प्रजापतिम् । यज्ञांशभुक्तमात्रेण राज्ञी गर्भमुपादधौ ५ दशमासान्तरे जाता कन्या सर्वगुणालया । पद्मिनी नाम विख्याता सर्वशोभासमन्विता ६ द्वादशाब्दवयःप्राप्तौ बभूव वरवर्णिनी । पद्माकरो भूपसुतो महीराजपदानुगः ७ पितुराज्ञानुसारेण भूपानाहूय सत्वरम् । स्वयंवरं भगिन्याश्च कारयामास वै मुदा ८ नानादेश्या ययुर्भूपा मुख्यशूरसमन्विताः । सह्याद्रादैश्चतुर्वीरैर्लक्षणः पितुराज्ञया ९ ययौ बिन्दुगढं ग्राम स्थितो यत्र महोत्सवः । महीराजस्तु बलवान्दृष्ट्वा लक्षणमागतम् १० स्वसेनां स्थापयामास रक्षार्थे सर्वभूभुजाम् । एतस्मिन्नन्तरे देवी पद्मिनी सखिभिः

क्षय करीत असतात. त्याचा मृत्यु कसा होणार ? ते भाग्यवान् शंभर वर्षे जीवंत राहोत" ६-८. त्यावेळीं ब्राह्मी ह्मणाली " सुखखानीस जीवन देणारा व बलखानीचें स्थान राखणारा पावकीय या नावाचा शुभ शर आहे " ९. हे ऐकून त्या दूती देहलीस गेल्या व तो वृत्तांत राजास सांगून पुष्कळ धन घेऊन घरीं आल्या १०. नंतर तो वृत्तांत ऐकून महीराज सहस्र दिवसपर्यंत आनंदानें पार्थिव करून उमापति महादेवाचें पूजन करिता झाला १११. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥

सूत ह्मणतातः—ह्या मुने, कृष्णांशास साव्विसावें वर्ष लागलें असता काय झालें तें ऐक. दक्षिण दिशेमध्यें बिंदुसर ह्मणून एक तीर्थ आहे. त्याच्या तीरीं एक ग्राम होता. तो एक योजन विस्तीर्ण असून बिंदुगढ या नावाचा तेथें एक मोठा दुर्ग होता. त्या ग्रामामध्यें वर्णधर्माची चागली प्रवृत्ति असे. तेथें विष्वक्सेनाच्या वंशामध्यें उत्पन्न झालेला शारदानंदननामक राजा राहत असे. तो ब्रह्मध्यानामध्यें परायण असून ब्रह्मचर्याच्या प्रभावानें त्याचें वीर्य मस्तकामध्यें राहिलेलें होतें. त्यामुळें भूलोकीं तो कामपाल या नावानें प्रसिद्ध झाला १-४. त्यानें यज्ञाच्या योगानें देवाधिदेव प्रजापतीस संतुष्ट केलें व त्या यज्ञाचा अंश खाल्ल्यामुळेंच त्याची राणी गर्भवती झाली ५. दहाव्या महिन्यात तिला एक कन्या झाली. ती सर्व गुणांचें वसतिस्थान असून पद्मिनी या नावानें प्रसिद्ध असे. ती सर्व सौंदर्यानें युक्त होती ६. तिला बारावें वर्ष लागलें असता ती उपवर झाली आहे असें समजून पद्माकरनामक राजपुत्र पित्याच्या आज्ञेप्रमाणें सत्वर सर्व राजांस बोलावून भगिनीचा विवाह आनंदानें करिता झाला ७,८. मुख्य शूरासहवर्तमान नानादेशातील राजेही तेथें आले. पित्याच्या आज्ञेनें आल्हादादि चार वीरासह लक्षण, जेथें हा महोत्सव चालला होता, त्या बिंदुगढनामक गावास आला. तेव्हां बलवान् महीराज, लक्षण आला आहे असें पाहून सर्व राजांच्या रक्षणाकरितां आपली सेना तयार करून ठेविता झाला. इतक्यांत देवी पद्मिनी सख्यांसह सर्व भूपालांस पाहून लक्षणाजवळ

सह ११ सर्वभूपान्विलोक्याशु लक्षणान्तमुपाययौ । श्यामाङ्गं च युवानं च सर्वलक्षणलक्षितम् १२ चत्वारिंशत्तथा पञ्चाशन्नानाब्दवयोवृतम् । व्यूढोरस्कं दृढस्कन्धं निर्जरं रोगवर्जितम् १३ दृष्ट्वा समानसदृशमाल्हादाद्यैश्च रक्षितम् । जयमालां ददौ तस्मै पद्मिनी लक्षणाय च १४ तदा स लक्षणो वीरो गृहीत्वा पाणिमुत्तमम् । स्वरथं च समारुह्य राज्ञां मध्ये ययौ मुदा १५ पृथ्वीराजस्तथा सर्वे भूमिपा बलसंयुताः । रुरुधुः सर्वतो वीरं लक्षणं बलवत्तरम् १६ तालन सिंहिनीसंस्थो गृहीत्वा परिघं मुदा । सैन्यांश्च योधयामास भीमसेनांशसंभवः १७ पञ्चशब्दगजारूढश्चाल्हादस्तोमरायुधः । रिपून्विदारयामास बलभद्रांशसंभव १८ कृष्णांशो बिन्दुलारूढो गृहीत्वा खड्गमुत्तमम् । भूपतींश्चबहुधा च्छित्त्वा महद्धमकारयत् १९ देवो मनोरथारूढो भैरवं भल्लमादधौ । हत्वा च बहुधा सैन्यं ननर्द च पुनःपुनः २० लक्षणो धनुरादाय वैष्णवास्त्राणि वै पुनः । संधाय च जघानाशु महीराजस्य सैन्यपान् २१ यामसात्रमभूद्युद्धं तेषां तैश्च समन्वितम् । त्यक्त्वा युद्धं महीराज सबभूपसमन्वितः २२ ययौ स देहलीग्राम शारदानन्दनस्तदा । मण्डपं च शुभं स्थाप्य कृत्वा वैवाहिकीः क्रियाः २३ ददौ कन्यां विधानेन धनधान्यादिसंवृताम् । ततस्मिन्नन्तरे प्राप्तो महीपतिरुवाच तम् २४ पद्माकरं भूपसुतं लक्षसैन्यसमन्वितम् । अहो मित्र महावीर कीदृशा ते मतिः स्थिता २५ विष्वक्सेनान्वये त्व वै संजातः क्षत्रियोत्तमः । लक्षणो धर्मरहितो वर्णसङ्करसंयुतः २६ आल्हाद्याश्च ते शूरा आभीरीमातृसंभवाः । तैर्युतश्च निवासो वै संत्यज्यो धर्मकोविदैः २७ इति पद्माकरः श्रुत्वा सर्वमायाविशारदः । स कृत्वा शाम्बरीं मायां बद्ध्वा तानेव दुर्जयान् २८ स्वगेहे स्थापयामास कारागारे शिलामये ।

आली व श्यामसुंदर, तरुण, सर्व लक्षणांनी युक्त, चाळीस व पन्नास यांच्या आतील वयाचा, विस्तीर्ण वक्षःस्थल व दृढ स्कंध यांनी युक्त, जरारहित व रोगशून्य अशा त्या स्वसदृश लक्षणास पाहून व आल्हादादि चार वीरांनी त्याचे रक्षण केलें आहे असें जाणून ती पद्मिनी त्यास जयमाला देती झाली ९-१४. तेव्हां वीर लक्षण तिचा उत्तम हात आपल्या हातात घेऊन त्या राजांच्या समक्ष आनंदानें रथावर चढला १५. तेव्हां पृथ्वीराज व इतर बलाढ्य राजे त्या वीर लक्षणास चोहोंकडून प्रतिबंध करिते झाले. पण सिंहिनीवर बसलेला तालन हातामध्यें परिघ घेऊन त्या सैन्यांशी आनंदानें लढूं लागला. तो भीमाचा अंश होता. बलभद्राच्या अंशापासून निर्माण झालेला आल्हाद हातामध्ये तोमर घेऊन व पंचशब्द गजावर बसून शत्रूचें विदारण करूं लागला १६-१८. बिंदुलावर आरूढ झालेला कृष्णांश उत्तम खड्ग घेऊन भूपतींस अनेक प्रकारें तोडून असंख्य लोकांस मारिता झाला १९. देवसिंह मनोरथावर आरूढ होऊन व हातामध्ये भैरवसंज्ञक भाला घेऊन असंख्य सैन्याचा घात करून वारंवार गर्जना करूं लागला २० व लक्षण हातामध्यें धनुष्य येऊन वारवार वैष्णवास्त्राचा प्रयोग करूं लागला. त्याने महीराजाच्या सेनापतीस तत्काल मारून टाकिले २१. याप्रमाणे त्या वीराचे इतर राजाशीं एक प्रहरभरच युद्ध झाले. पुढें महीराज सर्व राजासह युद्ध सोडून देहलीग्रामी गेला. तेव्हां शारदानंदानें शुभ मंडप घातला व विवाहसंबंधी सर्व तयारी करून धनधान्यादिकासहवर्तमान यथाविधि कन्यादान केलें. इतक्यात महीपति आला व लक्ष सैन्यासह युक्त असलेल्या पद्माकरसंज्ञक राजपुत्रास म्हणाला ' हे वीरा, बा मित्रा, तुला ही अशी बुद्धि कशी आठवली ? तूं विष्वक्सेनाच्या वंशामध्यें उत्पन्न झालेला श्रेष्ठ क्षत्रिय व हा लक्षण धर्मरहित व वर्णसंकर पावलेला आहे. ते चार वीर आहिरी जातीच्या स्त्रीपासून झाले. यास्तव, त्यांच्याशीं धर्मज्ञानीं सहवास सोडिला पाहिजे ' २२-२७. हे ऐकून सर्व मायेमध्यें निपुण असलेला

देव्याश्च वरदानेन देवसिंहस्तदा निशि २९ त्यक्त्वा मायां मोहमयीं कान्यकुब्जमुपाययौ ।
इन्दुलाग्रे च तत्सर्वं कथित्वा तेन संयुतः ३० प्राप्तो बिन्दुगढं शीघ्रं दिव्यमायाविशारदः । पद्मा-
करस्तु तच्छ्रुत्वा कृत्वा मायां च शाम्बरीम् ३१ मोहनायोद्यतस्तत्र यथा मेघो रविं दिवि ।
इन्दुलश्च तदा चापे संधाय शरमुत्तमम् ३२ कामास्त्रेण तु तन्माया भस्मीभूताऽभवत्क्षणात् ।
तदा ते बोधिताः सर्वे काम्र क्षण महाबलाः ३३ भित्त्वा लोहमयं जालं कपाटं च तथा दृढम् ।
बहिर्भूताः समाजग्मुः शत्रुसैन्याननाशयन् ३४ क्षत्रियाः पञ्चसाहस्रा मृता यमपुरं ययुः ।
शारदानन्दनो भूपस्तत्रागत्य विनम्य तान् ३५ स्वसुतां च ददौ तस्मै लक्षणाय महात्मने ।
नानाविधानि भोज्यानि पशस्याभरणानि च ३६ सर्वेभ्यश्च ददौ राजा सहस्रेभ्यस्तदा मुदा ।
कुमारिकां स्वकीयां च बहुरोदनतत्पराम् ३७ स मत्वा कामपालो वै स्वगेहात्त न्यवासयत् ।
आगतो लक्षणो गेहं माघकृष्णाष्टमीदिने ८ जयचन्द्रस्तु तं दृष्ट्वा लक्षणं प्रेमविह्वलः ।
शतग्रामाणि तेभ्यश्च तालनादिभ्य एव च ३९ दत्त्वा ततोऽन्यदानानि गोवस्त्राभरणानि च । ददौ
ब्राह्मणेभ्यश्च चकार च महोत्सवम् ४० सूत उवाच ॥ महीराजो वरं प्राप्तः शंकरात्पार्थिवार्चनात् ।
सयोज्य फाल्गुने मासि सेनां शत्रुभयङ्करीम् ४१ सप्तलक्षैश्च सहितः सश्रियाख्यपुरं ययौ ।
नृपाज्ञया च चामुण्डो रुरोध नगरं पुनः ४२ सुखखानिस्तदा क्रुद्धो लक्षसैन्यसमन्वितः ।
नगराद्बहिरागत्य महद्युधमकारयत् ४३ पावकास्त्रेण बलवान्हत्वा दशसहस्रकम् ।
महीराजमुपागम्य वचनं प्राह निर्भयं ४४ अद्य त्वां च हनिष्यामि त्वं वा हन्ता रणे मम ।

पद्माकर शाबरी माया करून त्या दुर्जय शत्रूस बाधून आपल्या शिलामय कारागृहात ठेविता झाला. पण देवीच्या वरदानामुळें देवसिंह रात्रीं ही मोहमयी माया टाकून कान्यकुब्जात आला व तें सर्व वर्तमान इंदुलास सागून त्याच्यासह तो लागलाच बिदुगढास आला. तेव्हा दिव्य मायेमध्यें निपुण असलेला पद्माकर तें ऐकून व शाबरी माया करून ज्याप्रमाणें अंतरिक्षात मेघ सूर्यास आच्छादित करण्यास तयार होतो त्याप्रमाणें तो त्यास मोहित करण्यास तयार झाला. तेव्हा इंदुल धनुष्याला उत्तम बाण जोडून कामास्त्राच्या योगानें त्याच्या मायेचे एका क्षणात भस्म करिता झाला. त्यावेळीं ते सर्वही महाबलवान् वीर कामास्त्राच्या योगानें शुद्धीवर आले २८-३३ व लोहमय जाळें व दृढ कपाट फोडून बाहेर आले व त्यानीं शत्रुसैन्याचा क्षय केला ३४. त्यावेळी पाच हजार क्षत्रिय मरून यमपुरीस गेले असता शारदानंदन राजा त्याच्याकडे आला व त्यास नमस्कार करून महात्म्या लक्षणास आपली कन्या देता झाला. त्यानें नानाप्रकारचे भोज्य पदार्थ व अमूल्य आभरणें त्या सर्वास दिलीं; व पुष्कळ रडत असलेल्या आपल्या कुमारिकेसही त्यानें त्याच्या स्वाधीन केले. व शेवटीं कामपालाचीही समजूत करून लक्ष्मणादि वीराची तो आपल्या घरातून रवानगी करिता झाला. माघ कृष्ण अष्टमीच्या दिवशीं लक्षण घरीं येऊन पोचला ३९-३८ असता त्यास पाहून जयचंद्र प्रेमानें व्याकुळ झाला व त्याने तालनादिकास शंभर ग्राम दिले. त्याशिवाय ब्राह्मणास दुसरीं पुष्कळ दानें, गाई, वस्त्रें व अलंकार देऊन त्यानें मोठा उत्सव केला ३९,४०. सूत म्हणतातः-- पार्थिवाची पूजा केल्यामुळें महीराजास शंकरापासून वर प्राप्त झाला व त्याबरोबर त्यानें फाल्गुन महिन्यात शत्रूंस भय उत्पन्न करणारी सेना जमविली ४१ व तो निघाला. त्या राजाच्या आज्ञेनें चामुंड त्या सर्व सैन्यासह संश्रियाख्य नगरास गेला व त्यानें त्या नगरास वेढा घातला. तेव्हा सुखखानि रागावून एक लक्ष सैन्यासह नगराच्या बाहेर येऊन भयंकर कदन करिता झाला ४२,४३. त्या बलवानानें पावकास्त्रानें दहा हजार शत्रूंस मारिलें व महीराजाज-

स्वविद्यां कुरु भूप त्वं नो चेद्यास्यसि वैशसम् ४५ इति श्रुत्वा महीराजो रौद्रास्त्रं चापमादधे ।
तदस्त्राच्च महावह्निः प्रादुर्भूतो भयङ्करः ४६ सुखखानिस्तदाग्नेयं संदधौ तस्य शान्तये ।
रौद्राग्निना च सशरं सुखखानिर्लयं गतः ४७ तदस्त्रं शिवतूणीरे गतं कार्यं विधाय तत् ।
बलखानिस्तु तच्छ्रुत्वा भयभीतः समागतः ४८ भ्रातुर्वैरमुपादाय जघान च रिपोर्बलम् ।
ध्यात्वा च शारदां देवीं भूमिराजमुपागमत् ४९ भूमिराजस्तु तं दृष्ट्वा तद्बलाधिक्यमोहितः ।
उवाच वचनं प्रेम्णा बलखानं शृणुष्व भोः ५० क्रोशमात्रान्तरे गर्ता द्वादशैव मया कृताः ।
रक्षिता द्वादशशतैः शूरैर्युद्धविशारदैः ५१ शूरास्त्रित्वा समुल्लङ्घ्य गर्तान्द्वादशसम्मितान् ।
मदार्द्धं सकलं राष्ट्रं गृहाण बलिसत्तम ५२ इति श्रुत्वा प्रियं वाक्यं तद्राज्ञा सत्यभाषितम् ।
कपोतं हयमारुह्य खड्गहस्तो वनं ययौ ५३ दृष्ट्वा गर्तान्महावीरो हत्वा शूरान्छताञ्छतान् ।
ययौ स द्वादशं गर्तं बाहुशाली जितेन्द्रियः ५४ चामुण्डस्तु तदागत्य शूरायुतसमन्वितः ।
रुरोध सर्वतो वीरं छद्मकारी द्विजाधमः ५५ बलखानिश्च महतीं सेनां तस्य जघान ह ।
चामुण्ड तमुपागम्य ननर्द च पुनःपुनः ५६ त्रयोदशं गतं गर्तं तृणैराच्छादितं मृदा ।
विषधौतैर्महाभल्लै राधितं विवरमभम् ५७ पतितं सकपोतश्च स वीरो दैवमोहितः ।
अन्धकारे महाघोरे गम्भीरे क्रोशमात्रकम् ५८ विदीर्णस्तत्र चरणस्स पद्मो वत्सजस्य वै ।
महाकष्टेन तद्वाजी गर्तादागत्य वै बहिः ५९ स्वपदेस्ताडयामास महीराजस्य तद्बलम् ।

वळ जाऊन तो निर्भयपणें ह्मणाला ४४ 'आज तू मला मार किंवा मी तुला मारीन. हे राजा, तुझी जी विद्या असेल तो यावेळीं प्रकट कर; नाहींपेक्षा तू मृत्यु पावशील '४५. हें ऐकून महीराजानें रौद्रास्त्र धनुष्यास जोडिलें. त्या अस्त्रापासून भयकर व प्रचड अग्नि उत्पन्न झाला४६.तेव्हा त्या अस्त्राच्या शांतीकरितां सुखखानीनें आग्नेयास्त्र धारण केलें. पण रौद्राग्नीच्या योगानें सुखखानि बाणासहवर्तमान जळून गेला ४७. व तें कार्य करून रौद्रास्त्र शंकराच्या भात्यामध्यें गेलें. तेव्हा हें वर्तमान ऐकून बलखानि भयभीत झाला, पण भ्राताचें वैर पत्करून रणांगणामध्यें आला व त्यानें सैन्याचा नाश केला. पुढें तो शारदादेवीचें ध्यान करून महीराजाकडे आला. तेव्हा त्यास पाहून महीराज त्याच्या बलाधिक्यामुळें मोहित झाला व प्रेमानें बलखानीस ह्मणाला ' बा वीरा, ऐक ४८-५०. मीं एक कोशाच्या अतरावर बारा खळगे केले आहेत व त्याचें युद्धामध्यें निपुण असलेल्या बाराशें शूरांनीं रक्षण केलें आहे ५१. तरी, हे बलवाना, त्या शूरांस जिंकून व बाराही खंदकांचें उल्लंघन करून तू माझें अर्धं राष्ट्र घे ' ५२. हे त्याचें प्रिय वचन ऐकून व राजानें हे खरेंच सांगितलें आहे असें समजून तो कपोत घोड्यावर बसला व हातात खड्ग घेऊन वनांत शिरला ५३. त्या महावीराने त्या खदकास पाहिले व तेथील शभर शभर वीरास मारीत तो जितेंद्रिय व पराक्रमी वीर बाराव्या खंदकाचेंही उल्लंघन करून गेला ५४. इतक्यांत दहा हजार शूरासह चामुड आला व त्या कपटी ब्राह्मणाधमानें त्यास चोहोकडून वेढिलें ५५. बलखानीनें त्याच्या त्या मोठ्या सैनेचा सहार केला व चामुडाजवळ येऊन तो वारंवार गर्जना करूं लागला ५६. पण तेथे आणखी एक तेरावा खंदक गवत व मृत्तिका यानीं आच्छादित केलेला होता व विवरामध्यें विषानें माखलेल्या मोठ्या भाल्यानीं तो चोहोंकडून भरून सोडिला होता ५७. तेव्हा दैवानें मोहित झालेला तो वीर कपोतासह अंधकाराने एक कोशभर व्यापलेल्या त्या भयंकर विवरात पडला ५८. तेव्हां त्या बलखानीचा पाय तुटला. पण त्याचा घोडा मोठ्या कष्टानें त्या खदकातून बाहेर आला व आपल्या पायानीं महीराजाच्या सैन्यास मारूं लागला. इतक्यात चामुड आला व त्यानें बलखानीचें

चामुण्डस्तु तदागत्य बलखानेश्च वै शिरः ६० छित्त्वा जघान तत्सैन्यं हाहाभूतं विनेश्वरम् । गजमुक्ता च तच्छ्रुत्वा चितामारोप्य वै पतिम् ६१ दाहयामास चाङ्गानि पतिना सह सा सती । तदा ब्रह्मा स्वबध्वा च सार्द्धमागत्य तत्र वै ६२ सुखखानिं च सहूय ददाह स्व कलेवरम् । शून्यभूतं च नगरं भस्मकृत्वा स वै नृपः ६३ जगाम देहलीं शीघ्र महात्साहसमन्वितः ६४[३१२०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये विक्रमाख्यानकाले पञ्चविंशोऽध्यायः ॥ २५ ॥

सूत उवाच ॥ श्रावणे मासि समाप्ते देहलीं च महीपतिः । नागोत्सवाय ययौ सदैव कलहप्रियः १ दृष्ट्वा नागोत्सवं तत्र गीतनृत्यसमन्वितम् । महीराज नमस्कृत्य वचनं प्राह नम्रधीः २ राजन्महावतीग्रामे कीर्तिसागरमध्यगे । वामनोत्सवमत्यन्तं यवव्रीहिसमन्वितम् ३ पश्य त्वं तत्र गत्वा च ममैव वचनं कुरु । इति श्रुत्वा महीराजो धुन्धुकारेण संयुतः ४ सप्तलक्षबलैर्युक्तश्चामुण्डेन समन्वितः । संप्राप्तः सश्रियवने तत्र वासमकारयत् ५ महीपतिन्तु नृपतिं नत्वा वै चन्द्रवंशिनम् । उवाच वचनं दुःखी धूर्तमायाविशारदः ६ राजन्प्राप्तो महीराजो युद्धार्थी त्वामुपस्थितः । चन्द्रावलीं च तनयां ब्रह्मानन्द तवात्मजाम् ७ दिव्यलिङ्गे स संपूज्य बलात्काराद्ग्रहीष्यति । तस्मात्त्वं स्वबलैः सार्द्धं मया सह महामते ८ छद्मना तं पराजित्य नगरेऽस्मिन्सुखी भव । इति श्रुत्वा दैववशो राजा परिमलो बली ९ चतुर्लक्षबलैस्सार्द्धं निशीथे च समागतः । शायितान्क्षत्रियाञ्छूरान्हत्वा पञ्चसहस्रकान् १० शतघ्नीरोपणीं चक्रे बहुशूरविनाशिनीम् । तदोत्थाय महीराजः कटिमाबध्य सभ्रमात् ११ वैरिणं परमं मत्वा महद्युद्धमचीकरत् । युध्यतोः सेनयोस्तत्र

मस्तक तोडिले आणि नतर प्रभुरहित झालेल्या व त्यामुळें हाहाकार करीत असलेल्या सैन्यास त्यानें मारिलें. गजमुक्तेनें जेव्हा हें ऐकलें तेव्हा पतीच्या चितेवर आपले शरीर जाळून घेऊन ती पतीसह सती गेली. पुढें ब्रह्मा आपल्या स्त्रीसह तेथें येऊन सुखखानीस अग्नि देऊन आपलेंही शरीर जाळून टाकिती झाली. तेव्हां शून्य झालेल्या त्या नगराचें भस्म करून महीराज मोठ्या आनदानें युक्त होत्साता लागलाच देहलीस गेला९९-६४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा पंचविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २५ ॥

सूत ह्मणतातः— श्रावण महिना लागला असता सर्वदा कलहप्रिय असलेला महीपति नागोत्सवाकरिता देहलीस आला १. तेथें नृत्य, गीत इत्यादिकासहवर्तमान चाललेला नागोत्सव पाहून व महीराजास नमस्कार करून तो नम्रपणें ह्मणतो २ " हे राजा, कीर्तिसागरामध्यें महावतीग्रामीं यव, व्रीहि इत्यादिकासहवर्तमान फार उत्तम वामनोत्सव होत असतो. यास्तव, तेथें जाऊन तो तूं पहा, माझे ह्मणणें ऐक. " हें ऐकून महीराज धुधुकारासह सात लक्ष सैन्य व चामुंड ह्यासहवर्तमान सश्रियवनामध्यें आला व तेथे राहिला ३-९. तेव्हा धूर्त व कपटी महीपति चंद्रवंशराजाकडे येऊन मोठ्या दुःखानें असें ह्मणाला कीं, हे राजा, महीराज तुझ्याशीं युद्ध करण्याकरिता आला आहे. बा ब्रह्मानंदा, तो दिव्य लिंगाची पूजा करीत असतो. तुझ्या चद्रावलीनामक कन्येस तो बलात्कारानें नेणार नाहे. यास्तव, हे महामते, तू मला आपल्या सैन्यास बरोबर घेऊन त्यास कपटानें जिंकून या नगरात सुखी हो. हें ऐकून दैवाच्या वश झालेला बलाढ्य राजा परिमल चार लक्ष सैन्यासहवर्तमान एकाएकीं मध्यरात्रीं आला व निजलेल्या पाच सहस्र शूर क्षत्रियांस मारून ७-१० अनेक वीराचा नाश करणाऱ्या शतघ्नीचा उपयोग करिता झाला. तेव्हा मोठ्या गडबडीनें महीराज उठला व त्याने कमर बाधिली. तो आपला

मलना पुत्रगृद्धिनी १२ शारदामादरादृत्वा पूजयामास भक्तितः । देवि देवि महादेवि सर्वदुःखविनाशिनि १३ हर मे सकलां बाधां कृष्णांश बोधयाशु च । जप्त्वायुतमिदं मन्त्रं हुत्वा तर्पणमार्जने १४ कृत्वा सुष्वाप तद्वेश्म तदा तुष्टा स्वयं शिवा । मलने महती बाधा क्षय यास्यति मा शुच. १५ इत्युक्त्वा शारदा देवी कृष्णांश प्रति चागमत् । पुत्र ते जननी भूमिर्महीजेन पीडिता १६ क्षय यास्यति शीघ्रं च तस्मात्त्वं तां समुद्धर । इति श्रुत्वा वचो देव्यास्स वीरो विस्मयान्वितः १७ देवकीं प्रति सप्रास. कथयामास कारणम् । सा तु श्रुत्वा तपो घोर स्वर्गवत्या समन्विता १८ रुरोद भृशमुद्विग्ना विलप्य बहुधा सती । कृष्णांशस्तु तदा दुःखी देवसिंहमुवाच ह १९ किं कर्तव्यं मया वीर देह्याज्ञां दारुणं भव । तच्छ्रुत्वा तेन सहितो लक्षणेन समन्वित २० ययौ दिग्विजयार्थेन व्याजेन च महावतीम् । तालनो भीमसेनांशः सेनापतिरुदारधीः २१ सप्तलक्षबलैस्सार्द्धं विनाह्लादेन संययौ । कल्पक्षेत्रमुपागम्य योगिनस्ते तदाऽभवन् २२ सेनां निवेशयामास विपिने तत्र दारुणे । कृष्णांशस्तालनो देवो लक्षणो बलवत्तरः २३ गृहीत्वा लास्यवस्तूनि युद्धभूमिमुपागमन् । सप्ताह्नं च तयोर्युद्धं जात मृत्युविवर्द्धनम् २४ सप्तमेऽहनि ते वीरास्सप्तशा रणमूर्द्धनि । तस्मिन्दिने महाभाग महायुद्धमवर्तत २५ दृष्ट्वा पराजितं सैन्यं राजा परिमलो बली । रथस्थश्चापदामाप महीराजमुपाययौ २६ यादवश्च गजारूढस्तदा चन्द्रावलीपतिः । धुन्धुकार समाहूय धनुर्युद्धमचीकरत् २७ हरिनागरमारुह्य ब्रह्मानन्दो महाबल । तारकं शत्रुमाहूय धनुर्युद्धं चकार ह २८ मर्दनं राजपुत्रं च रणजिद्गजसंस्थितः । स्वशरैस्ताडयामास तत्सुतं

मोठा शत्रु आहे असे समजून त्यानें भयकर युद्ध केले. याप्रमाणे तीं दोन्हीं सैन्यें आपसामध्यें युद्ध करूं लागलीं असता पुत्राचें कल्याण इच्छिणारी मलना मोठ्या आदरानें शारदेकडे जाऊन तिची भक्तीनें पूजा करिती झाली. "हे देवि, हे महादेवि, तूं सर्व दुःखाचा विनाश करणारी आहेस ११-१३. यास्तव तू माझ्या सर्व पीडेचे हरण कर व कृष्णाशास काहीं उपदेश कर." अशी प्रार्थना करून तिने या मत्राचा दहा हजार जप केला व हवन करून यथाविधि तर्पण केलें आणि ती त्या मदिरामध्येच निजली. तेव्हा स्वतः शिवा संतुष्ट झाली. "हे मलने, तुझी ही पीडा नाहीशी होईल; तू दुःख करू नकोस" १४,१५. असें बोलून शारदा देवी कृष्णाशाकडे आली व ह्मणाली "अरे पुत्रा, तुझ्या जन्मभूमीस महीराजान असह्य पीडा दिली आहे; तिचा लवकरच क्षय होईल. ह्यास्तव, तूं तिचा उद्धार कर". हें त्या देवीचे वचन ऐकून तो वीर आश्चर्यचकित झाला १६,१७ व देवकीकडे येऊन तिला तें सर्व सागता झाला. तेव्हा तें ऐकून स्वर्णवतीसह ती मोठी चिंता करू लागली व मोठ्यानें रडून ती साध्वी बहुत प्रकारे विलाप करीत अस्वस्थ झाली. तेव्हा कृष्णाश दुःखी होऊन देवसिंहास ह्मणाला "हे वीरा, काय करावें? या दारुण प्रसंगीं तूंच मला आज्ञा कर." ते ऐकून लक्षणासहवर्तमान दिग्विजयाच्या निमित्तानें तो महावतीस आला. भीमसेनाचा अंश तालन त्याचा सेनापति झाला. तो उदारबुद्धि सात लक्ष सैन्यासह आल्हादावाचून निघाला. कल्पक्षेत्रामध्ये आल्यावर ते सर्व योगी झाले १८-२२. त्या भयकर वनामध्ये आपल्या सैन्यास ठेवून कृष्णाश, तालन, देवसिंह व बलाढ्य लक्षण २३. संगीताचे साहित्य घेऊन, जेथें युद्ध चाललें होतें तेथें आले. त्यांचे तें मृत्यूची वृद्धि करणारे युद्ध सात दिवस झालें २४. सातव्या दिवशीं ते वीर रणागणीं आले असता, हे उदार ब्राह्मणा, त्यांचे भयंकर युद्ध चालले २५. आपले सैन्य भग्न झाले आहे असें पाहून बलाढ्य परिमलराजा रथावर बसून मोठ्या संकटाने महीराजावर गेला २६. गजावर बसलेला चद्रावलीचा पति धुधुकारास बोलावून मोठें धनुर्युद्ध करिता झाला २७. हरिनागरावर चढून पराक्रमी ब्रह्मानंद तारकनामक

च जघान ह २९ रूपणो वै स रदनं हयारूढो जगाम ह । आभीरीतनयो जातो मदनो नाम वै बली ३० नृहरं राजपुत्रं च शङ्खांशश्च जगाम ह । तेषु सङ्ग्राममेतेषु चामुण्डोऽयुतसैन्यप. ३१ महीपतेश्च वचनं मत्वा नगरमाययौ । ददर्श नगरीं रम्यां चतुर्वर्णसमन्विताम् ३२ धनधान्ययुतां वीरो देवीभक्तिपरायण. । महापातेस्तु वै धूर्तो दुर्गद्वारि समागतः ३३ चामुण्डेन युतः पापी राजगेहमुपाययौ । मलना भ्रातर दृष्ट्वा वचन प्राह दुःखिता ३४ भाद्रकृष्णाष्टमी चाद्य यवव्रीहिगृह स्थिता । न प्राप्ता जलनस्थान सुपुण्ये कीर्तिसागरे ३५ महीराजो महा-पापी वामनोत्सवमागतः । विनाह्लाद च कृष्णांश महद्दुःखमुपागतम् ३६ इत्युक्त्वा बिहस्याह ब्राह्मणोऽयं महाबली । कान्यकुब्जात्समायात. कृष्णांशेन प्रपोषित ३७ देवि दत्तश्च नाम्नाऽयं स ते कार्यं करिष्यति । श्रुत्वा चन्द्रावली देवी सर्वभूषणसंयुता ३८ कामाग्नि-पीडित विप्रं चामुण्ड च ददर्श ह । मातर प्रति चागम्य वचन प्राह निर्भया ३९ धूर्तोऽय ब्राह्मणो मातर्निश्चय मां हरिष्यति । कोऽय वीरो न जानामि कथ याम पतिव्रता ४० इति श्रुत्वा वचस्तस्या लज्जितस्स महीपतिः । चामुण्डेन युतः प्राप्तो यत्रा-भूत्स महारणः ४१ एतस्मिन्नन्तर ते वै ब्रह्माद्यास्तैः पराजिताः । त्यक्त्वा युद्ध गृह प्राप्ताश्चलक्ष-बलसंयुताः ४२ कपाट सुदृढ कृत्वा महाचिन्तामुपाययुः । महीराजस्तु बलवान्महीपत्यनु-मोदित ४३ प्रमदावनमागत्य षष्टिलक्षबलान्वितः । जुगोप तत्र बलवान्वामनोत्सव-हेतवे ४४ तालनाद्याश्च चत्वारः सश्रियारूयपुरं ययुः । स्थलीभूत च त ग्राम दृष्ट्वा ते

शत्रूस आह्वान करून धनुर्युद्ध करू लागला २८. हत्तीवर बसलेला रणजित् मर्दन राजपुत्रास आपल्या बाणांनी ताडन करिता झाला व त्यानें त्याच्या पुत्रास मारिलें. रूपण घोडयावर बसून रदनावर चाल करून गेला. आभीरीचा मदन ह्मणून एक महाबलाढय पुत्र होता, तो नृहरनामक राजपुत्रावर तुटून पडला. तो शंखाचा अंश होता. याप्रमाणे त्यांचें युद्ध चाललें असता दहा हजार सन्याचा अधिपति चामुंड महीपतीचे वचन ऐकून नगराम आला. त्याने चारी वर्णांच्या लोकांनीं युक्त व धनधान्यसंपन्न अशी ती रम्य नगरी पाहिली. इतक्यात देवीच्या भक्तीमध्ये परायण असलेला धूर्त महीपति किल्ल्याच्या द्वारापाशीं आला २९-३३ व तो पापी चामुंडासहवर्तमान राजमंदिरांत गेला. तेव्हा त्या आपल्या भावास पाहून अतिदुःखित झालेली मलना ह्मणाली ३४ ' आज भाद्रपद कृष्ण अष्टमी आहे. पण मी यवव्रीहिस्थानीं बसलें आहे. अतिपुण्यकारक कीर्तिसागरनामक तीर्थास गेलें नाहीं. कारण, महापापी महीराज या वामनोत्सवाचे वेळीच येथें आला; व आल्हाद आणि कृष्णाश येथें नसल्यामुळें आमच्यावर मोठें दुःख येऊन पडलें आहे. ' हें ऐकून तो हसून ह्मणतो " हा महाबलाढय ब्राह्मण कान्यकुब्जातून येथें आला आहे. यास कृष्णाशानें पोशिलेलें असून, हे देवि, दत्त असे त्याचे नांव आहे. हा तुझें काम करील". हें ऐकून सर्व आभरणांनीं युक्त असलेली चंद्रावली देवी हा चामुंड ब्राह्मण कामाग्नीने संतप्त झाला आहे असें पाहून मातेजवळ आली व निर्भयपणें तिला ह्मणाली ३५-३९ " माते, हा ब्राह्मण धूर्त दिसतो. खचित हा माझें हरण करील. हा वीर कोण आहे मला समजत नाहीं. तेव्हा मी पतिव्रता स्त्री याच्याबरोबर कशी जाऊं ? " ४०. हें तिचें वचन ऐकून तो महीपति लज्जित झाला व चामुंडासहवर्तमान जेथें भयंकर संग्राम चालला होता तेथें आला ४१. इतक्यात पराजित झालेले ब्रह्मानंदादि युद्ध सोडून तीन लक्ष सैन्यासह घरीं आले४२,४३ व किल्ल्याचे द्वार घट्ट बंद करून मोठ्या चिंतेत पडले. इकडे महीपतीने व्यास अनुमोदन दिले आहे असा

विस्मयान्विताः ४५ ययुस्ते सुखब्रह्मा दृष्ट्वुर्हिमदं मुनिम्। प्रणम्योचुः शुश्राविष्ठा बलखानिर्मुने बली४६ कुमतः समरश्लाघी स च कृष्णागमैर्युतः। श्रुत्वाह हिमदो योगी महीराजेन नाशितः४७ छद्मना बलखानिश्च तस्येयं सुन्दरी चिता। इति श्रुत्वा वचो घोरं कृष्णांशः शोकतत्परः ४८ विललाप भृशं तत्र हा बन्धो धर्मजांशक। त्वद्वत्से भूतलं वासो ममातीव भयङ्करं. ४९ दर्शनं देहि मे क्षिप्रं नो चेत्प्राणां स्त्यजाम्यहम्। इत्युक्त स तु तद्भ्राता बलखानिः पिशाचगः५० सपत्नीकस्समायातो रोदनं कृतवान्बहु। कथितवा सर्ववृत्तान्त यथा जात स्ववैशसम् ५१ दिव्य विमानमारुह्य गतो नाक मनोरमम्। युधिष्ठिरे तस्य कला बलखानेर्लय गता ५२ तदा दुःखी स कृष्णांशः कृत्वा भ्रातुस्तिलाञ्जलिम्। महावतीं समागत्य राजगेहमुपाययौ ५३ वेणुशब्देन कृष्णांशो ननर्त जनमोहन। वीणाप्रवाद्य च जगौ तालनो योगिरूपधृक् ५४ मृदङ्गध्वनिना देवो लक्षण. कांस्यवाद्यकः। सुस्वरं च जगौ तत्र श्रुत्वा राजा विमोहितः ५ तदा तु मलना राज्ञी दृष्ट्वा तद्रामनोत्सवम्। रुदित्वा वचनं प्राह कृ गतो मे प्रियङ्करः५६ कृष्णांशो बन्धुसहितस्तत्का मां मन्दभागिनीम्। त्वया विरहितो देशो महीराजेन लुण्ठितः ५७ इत्युक्ता मलनां दृष्ट्वा कृष्णांशः स्नेहकातरः। वचनं प्राह नम्रात्मा देवि त्व वचनं कुरु ५८ योगिनश्च वय राज्ञि सर्वयुद्धविशारदाः। तवेदं सकलं कार्यं कृत्वा यामो हि नैमिषम् ५९ ये यवव्रीहयश्चैव तव सद्मनि संस्थिताः। गृहीत्वा योषितस्सर्वा गच्छध्व सागरान्तिकम् ६० वय तु योगसैन्येन तव रक्षां च कुर्महे।

महीराज साठ लक्ष सैन्यासह प्रमदावनास आला व तो वामनोत्सवाकरिता तेथे राहिला ४४. तालनादिक चौघे संश्रियनगराम आले; पण तें नगर ओसाड होऊन पडले आहे हें पाहून ते आश्चर्यचकित झाले व अतिदुःखित होऊन पुढें गेले व त्यानीं हिमदमुनीचे दर्शन घेतले. ज्याचे मन शोकानें भरलें आहे असे ते नमस्कार करून त्यास ह्मणाले 'हे मुने, बलाढ्य बलखानि कोठें गेला? तो सर्वदा युद्धाची इच्छा करीत असतो. पण सर्व नगरवासी जनासह तो कोठें आहे?' हे ऐकून हिमदयोगी ह्मणाला 'महीराजानें कपटानें त्याचा नाश केला. बलखानीची ही सुंदर चिता आहे'. हे घोर वचन ऐकून कृष्णांश शोक करूं लागला. त्यानें फारच विलाप केला. 'अरे, युधिष्ठिराच्या अंशापासून झालेल्या माझ्या बंधुराजा, तुजवाचून या भूतलीं माझा वास होणें फारच कठिण आहे. मला त्वरित दर्शन दे; नाहींपेक्षा मी प्राणत्याग करीन.' कृष्णांशाने असें ह्मटले असता त्याचा भ्राता बलखानि पिशाचरूपानें पत्नीसह आला व पुष्कळ रोदन करून आपला नाश कसा झाला इत्यादि सर्व त्यास सांगून दिव्य विमानामध्ये बसून तो मनोरम स्वर्गलोकास गेला. तेव्हा त्या बलखानीची कला युधिष्ठिरामध्ये लीन झाली ४५-५२. नंतर अतिदुःखित झालेला तो कृष्णांश भ्रात्याला तिलांजलि देऊन महावतीस येऊन राजमंदिरात गेला. जनास मोह उत्पन्न करणारा कृष्णांश तेथे वेणु वाजवून नाचूं लागला. योग्याचे रूप धारण करणारा तालन वीणा वाजवून गाऊ लागला. देवसिंह मृदंगध्वनीने व लक्षण टाळ वाजवून सुस्वर गाऊ लागला. तें ऐकून राजा अतिशय मोहित झाला ५३–५५. तेव्हा मलना रामनोत्सव आला आहे असें पाहून रडून ह्मणाली "माझा प्रियकर कृष्णांश बंधुसह कोठें गेला? त्याच्यावाचून मज मंदभागिनीस कोण विचारितो? बा कृष्णांशा, तू येथे नसल्यामुळें महीराजाने या देशास लुटले". ती असें बोलत आहे हें पाहून कृष्णांश नम्रपणें ह्मणाला "हे देवि, तूं माझे ऐक, हे देवि, आम्ही योगी सर्व युद्धामध्यें निपुण आहोंत. तुझे हे सर्व कार्य करून नंतर आम्ही नैमिषारण्यास जाऊ. या तुझ्या गृहामध्ये जे यव व व्रीहि आहेत ते घेऊन सर्व स्त्रिया सागराजवळ जावोत, आम्ही योगसैन्याने तुमचे रक्षण करूं." हें

इति श्रुत्वा वचस्तस्य सत्सुता च पतिव्रता ६१ मातरं वचनं प्राह कृष्णांशोऽयं च नर्तकः ।
पुण्डरीकनिभे नेत्रे श्यामाङ्गं वस्य सुन्दरम् ६२ कृष्णांशेन विना मातः को रक्षार्थं क्षमो भुवि ।
दुर्जयश्च महीराज. कृष्णांशेन विनिर्जित. ६३ इति तद्वचनं श्रुत्वा मलना प्रेमविह्वला । यवव्रीहींश्च निष्कास्य योषिद्भिः स्थापिता करे ६४ जगुस्ता योषितस्सर्वाः कृष्णांशचरितं शुभम् ।
लक्षण. शीघ्रमागम्य योगिवेषान्स्वसैनिकान् ६५ सज्जीकृत्य स्थितस्तत्र तालनाद्यैः सुरक्षितः ।
कीर्तिसागरमागम्य ते वीरा बलदर्पिताः ६६ रुरुधुः सर्वतो नारीर्दोलायुतमितस्थिताः । महीपतिस्तु कलहो ज्ञात्वा कृष्णांशमागतम् ६७ चन्द्रवंशिनमागम्य सपुत्रश्च रुरोद ह। योगिभिस्तैर्महाराज लुण्ठिताः सर्वयोषितः ६८ मलना संहृता तत्र तथा चन्द्रावली सुता । महीराजस्य ते सैन्या योगिवेषास्समागताः ६९ तारकाय सुतां प्रादान्महीराजाय मत्स्वसाम् । इति श्रुत्वा वचो घोरं ब्रह्मानन्दो महाबली ७० लक्षसैन्यान्वितस्तत्र ययौ रोषसमन्वितः । महीराजस्तु कलहं सैन्यायुतमहाबलः ७१ रक्षितः कामसेनेन तथा रणजिता ययौ । तयोश्चासीन्महद्युद्धं सेनयोरुभयोर्भुवि ७२ तालनो योगिवेषश्च ब्रह्मानन्दमुपाययौ । लक्षणश्चाभयं शूरं देवसिंहो महीपतिम् ७३ जित्वा बद्ध्वा च मुदितौ कामसेनसमागतः । लक्षण कामसेन च देवो रणजितं तद्वा ७४ बद्ध्वा तत्र स्थितौ वीरौ शत्रुसैन्यक्षयङ्करौ । एतस्मिन्नन्तरे ब्रह्मा बद्ध्वा वै तालनं बली ७५ लक्षणान्तमुपागम्य धनुर्युद्धमचीकरत् । लक्षण छिन्नधनुष पुनर्बद्ध्वा महाबली ७६ देवसिंहमुपागम्य मूर्छितं तं चकार ह । हाहाभूते योगिसैन्ये प्रद्रुत

त्याचे वचन ऐकून मलनेची पतिव्रता कन्या मातेस म्हणाली " हा नर्तक कृष्णाश आहे, याचे नेत्र कमलासारखे असून त्याचें अंग श्यामसुंदर आहे ९६-६२. अई, कृष्णाशावाचून या भूलोकी आमचें रक्षण करण्यास दुसरा कोण समर्थ आहे ? कारण, महीराज दुर्जय असून त्याचा पराजय केवळ कृष्णाशच करू शकल. " हे तिचे वचन ऐकून मलना प्रेमाने विह्वल झाली व स्त्रियांनी यव आणि व्रीहि काढून आपल्या हातात घेतले. त्या सर्व स्त्रिया कृष्णाशाचें शुभ चरित्र गाऊं लागल्या. इतक्यात लक्षण शीघ्र योगिवेषानें राहिलेल्या आपल्या सैन्यामध्ये आला व तालनादिकांनी ज्याचें उत्तम प्रकारें रक्षण केलें आहे असा तो सज्ज होऊन राहिला. सामर्थ्यामुळे दर्पयुक्त झालेले ते वीर कीर्तिसागरास येऊन मंण्यामध्यें बसलेल्या दहा हजार स्त्रियांस चोहोकडून वेष्टित केलें. इकडे कलहरूप महीपति, कृष्णाश आला आहे असें जाणून चंद्रवंशी राजाकडे पुत्रासह आला व रडू लागला आणि म्हणाला " हे महाराजा, त्या योग्यानीं सर्व स्त्रियांस लुटलें आहे. त्यानीं मलनेचे व त्याचप्रमाणें चंद्रावलीचे हरण केले आहे. " महीराजाचे ते सैनिकच योगिवेषाने आले आहेत ६३-६९. त्यानीं कन्येस तारकास अर्पण केलें व महीराजास माझी भगिनी दिली." हें घोर वचन ऐकून महाबलाढ्य ब्रह्मानंद ७० मोठ्या रागानें लक्ष सैन्य बरोबर घेऊन तेथें आला. महात्मा महीराज दहा हजार सैन्यासह, कामसेन व रणजित् याच्याकडून रक्षित होत्साता युद्धास आला. त्या दोन्ही सैन्याचें भूलोकी भयकर युद्ध झाले ७१,७२. योगिवेष धारण करणारा तालन ब्रह्मानदावर चाल करून गेला. लक्षण अभयसिंहावर व देवसिंह महीपतीवर तुटून पडला ७३. त्या दोघानींही आपापल्या शत्रूंस बाधून कामसेन पुढे आला असता लक्षण कामसेनावर व देवसिंह रणजितावर चाल करून गेला ७४. त्या दोघासही बाधून शत्रुसैन्याचा क्षय करणारे ते वीर संग्रामामध्यें उभे राहिले. इतक्यात बलाढ्य ब्रह्मानंद तालनास बाधून लक्षणाजवळ आला व धनुर्युद्ध करूं लागला. पुढे ज्याचे धनुष्य तुटलें आहे अशा त्या लक्षणासही बाधून तो महाबलवान् देवसिंहावर चाल करून गेला व त्यासही मूर्च्छित करिता झाला. याप्रमाणे योग्याच्या सैन्यांत हाहाकार उडाला असता

सर्वतो दिशि ७७ कृष्णांशो योषितस्सर्वा वचन प्राह नम्रधीः ।
ब्रह्मानन्दोऽयमायातो मम सैन्यक्षयङ्करः ७८ तस्मादूय मया सार्द्धं गच्छताशु च त प्रति ।
इत्युक्त्वा तास्तमादाय ब्रह्मानन्दमुपाययौ ७९ तयोश्चासीन्महद्युद्ध नरनारायणांशयोः । कृष्णांशस्तत्र बलवान्व्योममार्गेण त प्रति ८० रथस्थ च समागम्य मोहयामास सोऽसिना । तदा तु मूर्च्छित तस्मिन्मोचयित्वा च तान्मुदा ८१ योगी सैन्यान्वितो युद्धात्पलायनपरोऽभवत् । पराजिते योगिसैन्ये ब्रह्मानन्दो महाबली ८२ योषितस्ताः समादाय स्वगेहाय दधौ मनः । महीराजस्तु समागो महीपत्यनुतोदितः ८३ रुरोध सर्वतो नारीः शिवदत्तवरो बली । नृहरश्चाभयश्चर मर्दनश्चैव रूपणम् ८४ मदनं वै स रदना ब्रह्मानन्द च तारक । चामुण्ड कामसेन च धनुर्युद्धमचीकरत् ८५ तदाऽभयो महावीरो धुन्वन्त नृहर रिपुम् । छित्त्वा धनुस्तमागत्य खड्गयुद्धमचीकरत् ८६ नृहर खड्गरहितस्तस्माद्युद्धरराड्मुखः । तमाह वचन कृद्धोऽभयो युद्धार्थमुद्यतः ८७ भवान्वै मातृष्वस्रीयो महीराजस्य चात्मज । क्षत्रियाणां पर धर्म कथ सहर्तुमिच्छसि ८८ इति श्रुत्वा तु नृहरो गृहीत्वा परिघं रुषा । जघान त च शिरसि स हतः स्वर्गमाययौ ८९ स च वै कृतवर्माशो विलीनः कृतवर्मणि । मदनं गोपजात च हत्वा स रदनो बली ९० जयशब्द चकारोच्चैः पुनर्हत्वा रिपोर्बलम् । उत्तरांशश्च स ज्ञेयो मदनश्चोत्तर लयः ९१ रूपणश्च समागत्य मूर्छयित्वा च मर्दनम् । पुनरस रदन प्राप्य खड्गयुद्ध चकार ह ९२ ब्रह्मानन्दश्च बलवान्स बदध्वा तारक रुषा । महीराजान्तमागम्य धनुर्युद्ध चकार ह ९३ नृहर रणजित्प्राप्य रवभङ्गेन तदा रुषा । जघान समर-

---

व सर्व सैन्य दशादिशेस पळून गेले असता ७५-७७ नम्र कृष्णांश सर्व स्त्रियास ह्मणाला ' माझ्या सैन्याचा क्षय करणारा हा ब्रह्मानद आला आहे. यास्तव, माझ्याबरोबर तुह्मी त्वरित त्याच्याकडे चला.' असे बोलून व त्यास घेऊन तो ब्रह्मानदाकडे आला व त्या दोघा नरनारायणान्या अशाचे मोठे युद्ध झाले. पण त्यापेक्षी बलवान् कृष्णाश रथावर बसलेल्या आल्हादाकडे आकाशमार्गाने जाऊन त्यास खड्गानें मोहित करिता झाला व तो मूर्च्छित झाला आहे असें पाहून आपल्या सर्व वीरास सो॰ून तो योगी सैन्यासहवर्तमान युद्धातून पळून जाऊ लागला. याप्रमाणे योगिसैन्याचा पराजय झाला असता महाबलवान् ब्रह्मानद सावध झाला व त्या स्त्रियास घेऊन आपल्या घरी जाऊ लागला. पण इतक्यात महीपतीने त्यास अनुमेदन दिले आहे असा महीराज आला व शंकरानें ज्यास वर दिला आहे अशा त्या बलवानाने स्त्रियास चोहोकडून वेढिले. तेव्हा नृहर अभयशूरावर, मर्दन रूपणावर, रदन मदनावर, तारक ब्रह्मानदावर व चामुंड कामसेनावर चाल करून गेला. व त्या सर्वांनी धनुर्युद्ध केले ७८--८५. तेव्हा महावीर अभय धनुष्यास वारवार हालविणाऱ्या शत्रु नृहराचे धनुष्य तोडून व त्याच्या जवळ येऊन खड्गयुद्ध करू लागला ८६. पण नृहर खड्गरहित होता त्यामुळे तो युद्धातून परतला. ते पाहून रागावलेला व युद्धास तयार झालेला अभय त्यास ह्मणाला " हे वीरा, तू माझ्या मावशीचा पुत्र व महाराजाचा तनय आहेस. तेव्हा क्षत्रियाच्या श्रेष्ठ धर्माचा त्याग करण्याची तू कशी इच्छा करीत आहेस ? ". हे ऐकून नृहर रागानें परिघ घेऊन त्याच्या मस्तकावर मारिता झाला. तेव्हा तो मरून स्वर्गलोकी गेला. तो कृतवर्म्याचा अश असल्यामुळे कृतवर्म्यामध्ये लीन झाला. बलाढ्य रदन गोपजात मदनास मारून व पुनरपि शत्रूचे सैन्य मारून मोठ्याने जयशब्द करू लागला. मदन उत्तराचा अश असल्यामुळे तो उत्तरामध्ये लय पावला ८७-९१. नंतर रूपण आला व त्याने मर्दनास मूर्च्छित करून पुन. रदनाजवळ येऊन त्याच्याशी खड्गयुद्ध केले ९२. बलवान् ब्रह्मानंद रागानें

श्लाघी महीराजसुतं शुभम् ९४ सर्वे दुःशासनांशश्च मृतस्तस्मिन्समागतः। संहते नृहरे बन्धौ मर्दनः क्रोधतत्परः ९५ स्वशरैस्ताडयामास सात्यकेरंशमुत्तमम् । छित्त्वा तान्रणजिच्छूरस्स वै परिमलोद्भव ९६ स्वभल्लेन शिरः कायं मर्दनस्य स चाहरत् । मृतेऽस्मिन्मर्दने वीरे तदा स रदनो बली ९७ ताडयामास तं वीरं स्वभल्लेनैव वक्षसि । महत्कष्टमुपागम्य रणजिन्मलनोद्भवः ९८ स्वखड्गेन शिरः कायादपाहरत वैरिणः । त्रिबन्धौ निहते युद्धे तारकः क्रोधमूर्छितः ९९ रथस्थश्च रथस्थं च ताडयामास वै शरम् । छित्त्वा बाणं च रणजित्तथैव च रिपोर्धनुः १०० त्रिशरैस्ताडयामास कर्णांशे तारकं हृदि । अमर्षवशमापन्नो यथा दण्डैर्भुजङ्गमः १ ध्यात्वा च शंकरं देवं विषधौतं शरं पुनः । संधाय तर्जयित्वा च शत्रुकण्ठमताडयत् २ तेन बाणेन रणजित्त्यक्त्वा देहं दिवं गतः । हते तस्मिन्महावीर्ये ब्रह्मानन्दश्च दुःखितः ३ महीराजभयाद्ब्रह्मा पुरस्कृत्य च योषितः । सन्ध्याकाले तु संप्राप्ते भाद्रकृष्णाष्टमीदिने ४ कपाटं सुदृढं कृत्वा सैन्यैः षष्टिसहस्रकैः । सार्द्धं गेहमुपागम्य शारदां शरणं ययौ ५ महीराजस्तु बलवान्पुत्रशोकेन दुःखितः । सकल्पं कृतवान्घोरं शृण्वतां सर्वभूभृताम् ६ संश्रियाख्यपुरं रम्य यथा शून्यं मया कृतम् । तथा महावती सर्वा ब्रह्मानन्दादिभिस्सह ७ क्षय यास्यन्ति मद्बाणै. सर्वे ते चन्द्रवंशिनः । इत्युक्त्वा धन्धुकार वै चाह्वयामास भूपतिः ८ पञ्चलक्षबलैस्सार्द्धं शीघ्रमागम्यतां प्रिय । इति श्रुत्वा धुन्धुकारो गत्वा

तारकास बाधून महीराजाजवळ आला व त्याच्याशी धनुर्युद्ध करूं लागला ९३. त्यावेळीं रणजित् नृहराकडे आला व त्या रणाची इच्छा करणाऱ्या वीरानें आपल्या बाणाच्या योगाने महीराजाच्या शुभ पुत्रास मारिले ९४. तो दुःशासनाचा अंश होता. यास्तव, तो मेल्यावर त्याच्यामध्ये लीन झाला. आपला बधु नृहर मेला आहे असें पाहून मर्दन रागावला ९५. त्याने आपल्या बाणाच्या योगाने त्या सात्यकीच्या उत्तम अंशास ताडन केलें. पण त्या रणजित् नामक शूरानें त्याचे ते सर्व बाण तोडून आपल्या भल्याच्या योगाने मर्दनाचें शिर धडापासून वेगळे केलें. तो परिमलाचा पुत्र होता. असो. मर्दन वीर मेला असता बलवान् रदन त्या वीरास आपल्या बाणाच्या योगाने वक्षःस्थलीं मारिता झाला. त्यामुळें मलनापुत्र रणजितास मोठी पीडा झाली. पण आपल्या खड्गानें त्यानें वैऱ्याचें शिर शरीरापासून वेगळें केले. याप्रमाणें तीन बधु मृत झाले असता क्रोधामुळे विवेकहीन झालेला रथस्थ तारक रथावर बसलेल्या त्या रणजितास बाणाने ताडन करू लागला. पण त्याच्या बाणास मध्येंच तोडून त्यानें शत्रूचे धनुष्यही तोडिले व कर्णाच्या अंशापासून झालेला जो तारक त्यास तीन बाणानीं हृदयप्रदेशीं वेध केला. त्यामुळे काठीनें मारिलेल्या भुजंगाप्रमाणें तो क्रोधाविष्ट झाला ९६–१०१. त्यानें शंकर देवाचे ध्यान करून पुनः विषाने माखलेला शर धनुष्यास जोडून त्याचा शत्रूच्या कंठप्रदेशीं प्रहार केला २. तेव्हा त्या बाणाच्या योगाने रणजित् देहत्याग करून स्वर्गलोकी गेला. तो महावीर्यवान् मृत झाला असता ब्रह्मानंदास फार दुःख झाले; व तो महीराजाच्या भीतीनें स्त्रियास पुढें घालून भाद्रपद कृष्ण अष्टमीच्या दिवशी संध्याकाळ झाला असता नगराचें द्वार घट्ट बंद करून साठ हजार सैन्यासह घरीं आला व शारदेस शरण गेला ३-५. इकडे बलवान् महीराज पुत्रशोकानें कष्टी होऊन सर्व राजे ऐकत असता असा घोर संकल्प करिता झाला कीं " ज्याप्रमाणें मीं रम्य सश्रियाख्य नगर ओसाड करून सोडिले त्याप्रमाणे ही सर्व महावतीनगरीही ओसाड करीन. ब्रह्मानंदादिकासह सर्व चद्रवंशी लोक माझ्या बाणाच्या योगानें नष्ट होतील. " असें बोलून त्या राजानें धुंधुकारास बोलाविलें व " हे प्रियकरा, पांच लक्ष सैन्यासह त्वरित ये; " असे त्यास झटले. अशी राजाची आज्ञा

शीघ्रं च देहलीम् ९ उपेत्वा सप्तदिवसं युद्धभूमिमुपागमत् । तदाऽष्टलक्षसहितो महीराजो महाबलः । तारकेण च संयुक्तो युद्धाय समुपाययौ ११० [३२३०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

सूत उवाच ॥ सप्तविंशाब्दके प्राप्ते कृष्णांशे सर्वमङ्गले । भाद्रकृष्णदशम्यां च मलना शोककातरा १ जगनायकमाहूय वचनं प्राह दुःखिता । अयं कच्छपदेशीय गौतमान्वयसम्भव २ हरिनागरमारुह्य कान्यकुब्जं व्रजाधुना । पुत्रमाह्लादमाहूय सानुजं मत्प्रियङ्करम् ३ इति श्रुत्वा तु वचनं हृदि संचिन्त्य वै पुनः । मलनां दुःखितां प्राह नत्वा यास्यति स प्रभुः ४ राज्ञः परिमलस्यैव वाक्यं मत्वा सुदुःखदम् । इति श्रुत्वा तु वचनं रुरोद मलना सती ५ पुनर्मूर्च्छां गता भूमौ जीवनं त्यक्तुमुद्यता । हा रामांश महाबाहो वत्स कृष्णांश सुन्दर ६ क्व गतो सह देवक्या त्यक्त्वा मां मन्दभागिनीम् ७ तदा परिमलापुत्रो दृष्ट्वा राज्ञीं तथागताम् । बहुधाश्वास्य बलवान्कान्यकुब्जपुरं ययौ ८ ऋषय ऊचुः ॥ त्वया परिमलापुत्रस्समोक्तो जगनायकः । रोमहर्षण नो ब्रूहि सोऽयं कस्तेन किं कृतम् ९ सूत उवाच ॥ इन्द्रप्रस्थपुरेऽवात्सीत्प्रद्योतः कथितो मया । पिता परिमलस्यैवामात्योऽनङ्गमहीपतेः ॥ तस्य कन्या समायाता नाम्ना परिमला मुने १० दुःशिलांशसमुद्भूता रम्भव सुकुमारिका । तद्विवाहार्थमुद्योगं कृतं पित्रा स्वयंवरम् ११ पुत्रः कच्छपभूपस्य स नाम्ना कमलापतिः । तामुद्वाह्य विधानेन स्वगेहाय ययौ मुदा १२

ऐकून धुंधुकार लागलाच देहलीस गेला व सात दिवसांमध्येंच पुन. युद्धभूमीमध्यें आला. त्यावेळीं महाबलवान् महीराज आठ लक्ष सैन्यानीं युक्त झाला व तो तारकासहवर्तमान युद्धास सिद्ध झाला ९-१०. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकी कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सव्विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २६ ॥

सूत ह्मणतात — सर्व मंगलरूप कृष्णांशास सत्तावीसावे वर्ष लागलें असतां भाद्रपद कृष्ण दशमीच्या दिवशीं शोकानें व्याकुळ झालेली मलना, जगनायकास बोलावून दुःखित होत्सानी असे वचन बोलली " अरे कच्छप देशातील गौतमवंशामध्यें उत्पन्न झालेल्या वीरा, हरिनागरावर बसून तू आज कान्यकुब्जास जा व माझा प्रियकर आह्लादास त्याच्या धाकट्या भावासह बोलावून आण. " हे वचन ऐकून व मनामध्यें विचार करून दुःखित झालेल्या मलनेस तो पुनः नमस्कार करून ह्मणतो " राजा परिमलाचे अतें दुःखयुक्त वाक्य ऐकून मग मी जाण्यास समर्थ होईन " असें त्याचें ह्मणणे ऐकून साध्वी मलना रडू लागली. ती पुनरपि मूर्च्छित होऊन भूमीवर पडली व जीव देण्यास तयार झाली. ' हे महाबाहो रामांशा व हे सुंदर कृष्णांशा, तुह्मी देवकीसह मज मंदभागिनीस सोडून कोठ गेलात ? ' तेव्हा परिमलपुत्र राणीची तशी अवस्था पाहून व तिला बहुत प्रकारें धीर देऊन तो बलवान् कान्यकुब्जनगरास गेला. १–८. ऋषि ह्मणतात.– बा सूता, तूं जगनायक परिमलेचा पुत्र ह्मणून सांगितलेस. पण हा कोण व त्यानें काय केलें हें आह्मांस सांग ९. सूत ह्मणतात.— इंद्रप्रस्थपुरामध्यें प्रद्योत ह्मणून राजा होता हें मीं तुह्माला पूर्वी सांगितलेच आहे. तो परिमलाचा पिता व अनङ्ग राजाचा अमात्य होता. बा मुने, त्याची परिमला नांवाची कन्या दुःशिलेच्या अंशापासून उत्पन्न झालेली होती. ती रंभेप्रमाणें सुकुमार असून तिच्या विवाहाकरिता तिच्या पित्यानें स्वयंवर आरंभिला १०,११. तेव्हा कच्छप राजाचा कमलापतिनामक पुत्र होता. तो तिच्यापाशीं यथाविधि विवाह करून आपल्या गृही आनंदानें गेला. याच्यापासून हा जगनायक पुत्र

तयोस्समागमो जात पुत्रोऽयं जगनायकः । क्षत्रविद्यापरः शूर खड्गयुद्धविशारदः १३ जित्वा भूपान्बलाद्वीरः सिन्धुतीरनिवासिनः । षड्रा करमादाय पितुराज्यमुपस्थितः १४ एकदा तु महीराजः स्वसैन्यपरिवारित । कच्छदेशमुपागम्य करार्थं समुपस्थितः १५ तयोश्चासीन्महद्युद्ध जगनायकभूपयोः । मासान्ते सूर्यवंशीयो महीराजेन निर्जितः १६ त्यक्त्वा राष्ट्र च सकुलः सभामश्च महावतीम् परिमलस्तु तदा राजा तस्मै ग्रामशुभं ददौ १७ निवास कृतवांस्तत्र स्वनाम्ना प्रथितो भुवि । स वै कच्छपदेशीया ययौ परिमलाह्वया १८ तदाऽसौ च महीराजो महीपत्यनुमोदितः । चामुण्ड शीघ्रमाहूय लक्षसैन्यसमन्वितम् १९ आदेश कृतवान्राजा तस्य बन्धनहेतवे । स च वेत्रवतीकूले समाते लक्षसैन्यप. २० रुरोध सूर्यवंशीय जगनायकमुत्तमम् । स तदा खड्गमादाय बाहुशाली यतेन्द्रिय. २१ तत्र शूरशत हत्वा नभोमार्गमुपाययौ । सेनापतेश्च मुकुटं गजस्थस्य गृहीतवान् २२ लज्जितस्स तु चामुण्डो वचन प्राह नम्रधीः । भवान्वृत्तिकरो मह्य क्षत्रियो ब्राह्मणस्य वै १३ देहि मे मकुट वीर चिरं जीव सुखी भव । इति श्रुत्वा सविनय दत्त्वा तस्मै शुभ वसु १४ कुठारनगरं प्राप्तो वामनेन सुरक्षितः । दृष्ट्वा तत्र वटच्छायां श्रमेणातीव कर्शित. २५ सुष्वाप निर्भयो वीरस्तत्र स्थाने सुखप्रदे । तदा तु वामनो ज्ञात्वा स्वदूतैस्तत्र कारणम् २६ वस्त्राण्याच्छाद्य चागम्य चाहरद्धरिनागरम्। हृते तस्मिंश्च दिव्याश्वे प्रबुद्धो जगनायकः चिन्तामवाप्य महतीं रोदनं कृतवान्बहु। अश्वाकुब्जिचिह्नमालोक्य वामन प्राप्त निर्भयः २८ वचन प्राह नम्रात्मा नृप गौरान्वयोद्भवम्। क्षत्रियाणां हि सरक्षो भयदा भुवि सर्वदा २९

झाला. हा क्षत्रियविद्येमध्ये परायण, शूर व खड्गयुद्धामध्ये निपुण असून या वीरानें सिंधुनदीच्या तीरीं राहणाऱ्या राजास स्वसामर्थ्यानें जिंकून त्याच्यापासून षष्टांश कर घेतला व नंतर तो पित्याच्या राज्यामध्ये प्राप्त झाला १२-१४. एकदा महीराज आपल्या सैन्यासह कच्छ देशास येऊन कर मागूं लागला. तेव्हा जगनायक व तो राजा या दोघांचे मोठें युद्ध झालें. पण एक महिन्यानंतर या सूर्यवंशीय वीरास महीराजानें जिंकले, तेव्हा तो आपलें राज्य सोडून कुलासह महावतीस आला. तेव्हा, परिमल राजानें त्यास शुभ ग्राम दिला १५-१७ व तो वीर तेथें निवास करिता झाला. तो आपल्या नावानें भूलोकी प्रसिद्ध असे. तात्पर्य, तो हा कच्छपदेशीय वीर परिमलाच्या आज्ञेनें कान्यकुब्जास गेला १८. त्यावेळी महीपतीच्या अनुमोदनानें महीराज चामुंडास एक लक्ष सैन्यासह त्वरित बोलावून जगनायकास बांधून ठेवण्याविषयीं आज्ञा करिता झाला. तो वेत्रवतीच्या किनाऱ्यावर प्राप्त झाला असता लक्ष सैन्याचा अधिपति चामुंड त्या सूर्यवंशात उत्पन्न झालेल्या उत्तम जगनायकास प्रतिबंध करिता झाला. त्यावेळी तो बाहुशाली व यतेंद्रिय वीर हातात खड्ग घेऊन शंभर शूरास मारून अंतरिक्षात गेला. जाताना त्याने हत्तीवर बसलेल्या सेनापतीचा मुकुटही हरण केला होता १९-२२. त्यामुळें चामुंड लज्जित झाला व नम्र बुद्धीनें त्यास ह्मणाला " आपण ब्राह्मणाची वृत्ति चालविणारे क्षत्रिय आहात. यास्तव, अहो वीरवर्य, मला माझा मुकुट देऊन आपण चिरजीव व सुखी व्हा. " याप्रमाणे त्याचे नम्र वचन ऐकून त्याने त्यास तें शुभ द्रव्य दिलें २३,२४. पुढें तो वीर वामनानें ज्याचे रक्षण केलें आहे अशा कुठारनगरास पोचला असता तेथें वटच्छाया पाहून तिच्यामध्ये श्रमाने अतिशय थकलेला तो निर्भय वीर जरा निजला. तें स्थान फार सुख देणारे होतें. तेव्हा हा सर्व वृत्तांत आपल्या दूतांच्या मुखानीं जाणून वामन वस्त्रानीं आपणास झाकून घेऊन तेथें आला व त्यानें हरिनागराचें हरण केलें. पण त्या दिव्य अश्वाचे हरण केलें असता जगनायक जागा झाला व त्याला मोठी चिंता पडली. तो पुष्कळ रडू लागला. पुढें

स भवान्राजनीतिज्ञो देहि मेऽश्वं सुखी भव । नो चेत्त्वां वै सनगरं कृष्णांशः संक्षयिष्यति ३० इति श्रुत्वा तु वचनं वामनो गौरवंशजः । भयभीतो विनिश्चित्य प्रदद्यौ हरिनागरम् ३१ प्रतोदं स्वर्णरचितं नानारत्नसमन्वितम् । लोभाच्च न ददौ राजा मृषा शपथकारकः ३२ तदा परिमलापुत्रः कुण्ठितः प्राह भूपतिम् । प्रतोदलोभतो राजन्क्षय दुर्गो गमिष्यति ३३ इत्युक्त्वा प्रययौ वीरः कान्यकुब्जं महोत्तमम् । लक्षणो हस्तिनीसंस्था वचन प्राह गर्वित ३४ कस्त्वं प्राप्तो हयारूढो निर्भयः क्षत्रियोत्तम । स होवाच महाराज प्रेषितश्चन्द्रवंशिना ३५ तवान्तिक समायातः शरणागतवत्सल । महीराजश्च बलवान्सकुलं चन्द्रवंशिनम् ३६ हनिष्यति च रौद्रास्त्रैर्महीपत्यनुमोदितः । अतस्त्व स्वबलैस्सार्धं सहाह्लादादिभिर्युतः ३७ गच्छ गच्छ महाराज मृतानुज्जीवयाधुना । इत्युक्तो लक्षणस्तेन जयचन्द्रं प्रणम्य सः ३८ सर्वं वै कथयामास महीराजो यथागतः । जयचन्द्रस्तु तच्छ्रुत्वा चाहूय जगनायकम् ३९ वचन प्राह कुद्धात्मा शृणु गौतमवंशज । राजा परिमलः क्रूरस्त्यक्त्वा मां निजभूपतिम् ४० प्रीतिश्च कृतवांस्तेन मच्छत्रोर्देहलीपतेः प्रिय संबन्धिन मत्वा सत्यरक्षातेन रक्षका ४१ यथा कृत फल तेन भोक्तव्यं च तथा भुवि । इति श्रुत्वा तु वचन कृष्णांशः प्राह नम्रधीः ४२ राजञ्छुद्ध. परिमलो महीपत्यनुवाचक.। अतो वै त्वां समुत्सृज्य भूमिराजवशं गत. ४३ भवान्वै सर्वधर्मज्ञस्तत्क्षमस्वापराधकम् । आज्ञां देहि महाराज वसिष्याम-

---

घोड्याच्या पायाचे चिन्ह पाहत पाहत तो निर्भय वीर वामनाकडे आला व ज्याचें अंतःकरण नम्र आहे असा तो गौरवशामध्ये उत्पन्न झालेल्या त्या राजास ह्मणाला " क्षत्रियाचा सरक्षक व शत्रूस सर्वदा भूलोकीं भय देणारा असा तू राजनीति जाणणारा आहेस. यास्तव, माझा अश्व दे व सुखी हो, नाहींपेक्षा कृष्णांश सर्व नगरासह तुझा क्षय करील." हें त्याचे वचन ऐकून गौरवशामध्यें उत्पन्न झालेला वामन भयभीत झाला व पूर्ण निश्चय करून त्यानें हरिनागरास परत दिले. पण अनेक रत्नानीं युक्त असलेल्या सुवर्णाच्या चाबकाचा त्यास लोभ सुटल्यामुळे त्या मिथ्या शपथ घेणाऱ्या राजानें तो त्यास दिला नाहीं. तेव्हा कुंठित झालेला परिमलापुत्र राजास ह्मणतो ' हे राजा, ह्या प्रतोदाच्या लोभामुळें तुझ्या सर्व दुर्गाचा क्षय होईल. ' असें बोलून तो वीर अत्युत्तम कान्यकुब्ज देशामध्ये प्राप्त झाला. तेव्हा हस्तिनीवर बसलेला गर्विष्ठ लक्षण त्यास ह्मणाला ' हे उत्तम क्षत्रिया, घोड्यावर बसून निर्भयपणें प्राप्त होणारा असा तूं कोण आहेस ? ' तेव्हा तो ह्मणाला ' हे महाराज, हे शरणागतवत्सल, चंद्रवंशीय राजानें मला पाठविल्यामुळें मी तुजकडे आलों आहे. बलाढ्य महीराज संपूर्ण कुलासह चंद्रवंशीय राजास रौद्रास्त्रानें मारील. कारण, तो महीपतीच्या सागण्याप्रमाणें वागत असतो. यास्तव, तूं आपल्या सैन्यासहवर्तमान आल्हादादिकास बरोबर घेऊन त्वरित चल. हे महाराज, त्या मेलेल्याचे आज पुनरुज्जीवन कर. ' याप्रमाणे त्याने सांगितले असता लक्षण जयचंद्रास नमस्कार करून महीराज तेथें कसा प्राप्त झाला इत्यादि सर्व सागता झाला. ते ऐकून जयचंद्र जगनायकास बोलावून २९–३९ क्रोधानें ह्मणाला " हे गौतमवंशामध्यें उत्पन्न झालेल्या वीरा, ऐक. क्रूर राजा परिमल मला ह्मणजे आपल्या आप्त राजास सोडून माझा शत्रु जो देहलीपति त्याच्यावर प्रीति करिता झाला. आपला संबंधी जो दुष्ट महीपति त्याच्या सागण्यावरून या रक्षकास त्यानें सोडिलें. यास्तव, ज्याप्रमाणें त्यानें केलें आहे तसेच त्याला भूलोकीं फल भोगिलें पाहिजे ". हें ऐकून ज्याची बुद्धि नम्र आहे असा कृष्णांश ह्मणाला ४०–४२ " स्वतः राजा परिमल शुद्ध आहे, पण तो महीपतीच्या ह्मणण्याप्रमाणें चालत असतो. यास्तव, तो तुझा त्याग करून महीराजाच्या अधीन झाला ४३ तू सर्व धर्म जाणणारा आहेस. यास्तव, त्याच्या अपराधाची

स्तदन्तिकम् ४४ इति श्रुत्वा तु वचन जयचन्द्रो महीपतिः । कृष्णांश प्राह भो वीर देहि मे भुक्तिमौल्यकम् ४५ शीघ्र व्रजाद्य सकुलो नो चेन्न गन्तुमर्हसि । इति श्रुत्वा विहस्याह कृष्णांशस्तं महाहनः ४६ मया दिग्विजय सर्व कृत भीरुनयङ्करम् । तद्देय देहि मे राज-गृह्णाण भुक्तिमौल्यकम् ४७ इत्युक्तस्य तु भूपालः कृष्णांशेन विलज्जितः । सैन्यमाज्ञापयामास सप्तलक्षं महाबलम् ४८ तदा स सकुलो वीरश्चाल्हादो लक्षणान्वितः । नृपस्याग्रे समास्थाय नमस्कृत्य ययौ मुदा ४९ कुठारनगर प्राप्य नृपदुर्ग रुरोध ह । ज्ञात्वा स वामनो भूपः प्रतोद च ददौ मुदा ५० सैन्ययुतयुत भूप वामन लक्षणो बली । पश्चात्कृत्य ययौ शीघ्र यमुनातटमुत्तमम् ५१ यमुनाजलमुत्तीर्य कल्पक्षेत्रमवाप्तवान् । गङ्गासिंह च नृपतिं षष्टिसाहस्रसयुतम् ५२ पुरस्कृत्य ययौ वीरो लक्षणो बलवत्तरः । नर्दी वेत्रवतीं रम्यां समागम्य बलैस्सह ५३ तत्रोषुः क्षत्रियाः शूरास्सर्वशस्त्रास्त्रसयुताः । एतस्मिन्नन्तरे वीरश्चामुण्डो लक्षसैन्यपः ५४ शतघ्नीः व्यापयामास भैरवीः शत्रुनाशिनीः । तयोश्चासीन्महद्युद्धं शतघ्नीरणसंस्थयोः ५५ प्रहरान्ते च तत्सैन्यं दृष्ट्वा शूरपराजितम् । रक्तबीजः समागम्य गजस्थस्त्वरितो बली ५६ स्वबाणैस्ताडयामास सैन्य तालनपालितम् । केचिच्छूरा हता युद्धे केचित्तत्र पराजिता ५७ दुद्रुवुर्भयभीताश्च चामुण्डेन च पीडिताः । प्रभग्नं स्वबल दृष्ट्वा तालनः परिघायुधः ५८ जघान तेन स गज चामुण्डां भूमिमागत । खड्गयुद्धपरो वीरस्तालन परिघायुधम् ५९ पराजित्य ययौ पश्चाच्छत्रुसैन्यक्षयङ्करः । लक्षणस्त्वरितो गत्वा स्वभल्लेन च त रिपुम् ६० भुजयोस्ताडयामास तदा ते

क्षमा कर. हे महाराजा, आज्ञा दे. आह्मी त्याच्याजवळ जाऊन राहू ". हें त्याचें वचन ऐकून जयचंद्र राजा कृष्णाशास ह्मणाला " वा वीरा, आजपर्यंत माझ्या येथें जे भोग तुह्मीं भोगिले त्याचे मूल्य तूं दे व नंतर त्वरित जा. नाहींपेक्षा सर्व कुलासहवर्तमान आता येथच रहा. " असें ऐकून सर्वांस मोह उत्पन्न करणारा कृष्णाश हसून ह्मणाला " भित्र्यास भय उत्पन्न करणारा सर्व दिग्विजय मीं केला आहे. यास्तव, त्यातील जे कांहीं मला देण्यासारिखें आहे ते दे व हे राजा, आपल्या भोगाचे मूल्य घे. " याप्रमाणे कृष्णाशानें ह्मटलें असतां तो राजा अतिशय लाजला. त्यानें लागलीच सात लक्ष महासैन्यास आज्ञा केली. तेव्हा लक्षणासह व सर्व कुलासह वीर आल्हाद राजाच्या पुढे येऊन व त्यास नमस्कार करून आनंदाने चाललां. कुठारनगरास पोंचल्यावर त्यानें राजाच्या दुर्गास वेढा दिला. पण तें जाणून वामन राजाने आनंदाने तो प्रतोद परत केला ४४ —९०. तेव्हा दहा हजार सैन्यानीं युक्त असलेल्या वामन राजास बलाढ्य लक्षणाने आपल्या पाठीशीं घातलें व तो लागलाच यमुनेच्या उत्तम तटावर येऊन पोंचला. यमुनेच्या प्रवाहातून पार जाऊन तो कल्पक्षेत्रात आला. राजा गंगासिंहास साठ सहस्र सैन्यासह बरोबर घेऊन तो अतिबलाढ्य लक्षण वीर पुढे चालता झाला. त्या सर्व सैन्यासह रम्य वेत्रवतीनदीपर्यंत आल्यावर शूर क्षत्रिय सर्व शस्त्रे व अस्त्रें यांनीं युक्त होत्साते तेथ राहिले. इतक्यात लक्ष सैन्याचा अधिपति वीर चामुड शत्रूचा नाश करणाऱ्या भयंकर तोफा त्याच्या समोर ठेविता झाला. त्या उभयतांचें शतघ्नींच्या योगानें मोठें युद्ध झालें. एका प्रहारामध्ये त्या शूरानीं आपल्या सैन्याचा पराजय केला आहे असें पाहून बलाढ्य रक्तबीज हत्तीवर बसून पुढें आला व त्यानें आपल्या बाणाने तालनानें राखिलेल्या सैन्यास ताडन केलें. तेव्हा कांहीं शूर युद्धामध्यें मेले; कित्येकांचा तेथें पराजय झाला; व चामुंडाने फार पीडा दिल्यामुळें सर्व भयभीत होऊन पळाले. आपलें सैन्य पळत सुटलें आहे असें पाहून ज्याच्या हातात परिघ हें आयुध आहे असा तालन त्याच्या गजास त्या आयुधाच्या योगानें मारिता झाला. तेव्हा

बहुधाऽभवन् । सहस्रं रक्तबीजाश्च खड्गशक्त्यृष्टिपाणयः ६१ तिष्ठ तिष्ठेति भाषन्तः क्षत्रियान्युद्धदुर्मदान् । आल्हादाद्याश्च ते शूरा रक्तबीजभयातुराः ६२ त्यक्त्वा युद्धं ययुस्सर्वे ब्रह्मानन्दं महाबलम् । ब्रह्मानन्दस्तु तान्दृष्ट्वा गत्वा स्वपितरं प्रति ६३ वृत्तान्त कथयामास लक्ष्मणागमनं मुदे । श्रुत्वा परिमलो राजा प्रेमविह्वलगद्गद. ६४ आल्हादपार्श्वमागम्य रुरोद भृशमातुरः । तदा तु देवकी देवी नृपतिं प्रेमतत्परम् ६५ उवाच सुमुखी दीना वयं ते भक्तितत्पराः । भवता संपरित्यक्ता विचरामोऽन्यभूपतिम् ६६ क्षमस्व मम दौरात्म्यं पूर्वजन्मविपाकजम् । इति श्रुत्वा च नृपतिः परमानन्दनिर्भरः ६७ मन्त्रिणश्चाधिकारं च रामांशाय ददौ मुदा । स्वकीयं लक्षसैन्यं च तत्पतिश्चोदयः कृतः ६८ ततः पञ्चदिनान्ते तु महीराजस्समागतः । रुरोध नगरीं सर्वां चामुण्डबलदर्पितः ६९ तयोश्चामीन्महद्युद्धं मासमात्रं भयानकम् । प्रभाते विमले जाते कृष्णांशो लक्षसैन्यपः ७० चामुण्डान्तमुपागम्य सहस्रं स्वाङ्गसंयुतम् । चिच्छेद च शिरस्तेषां चामुण्डानां पृथक्पृथक् ७१ छिन्ने शिरसि ते सर्वे लक्षवीरा बभूविरे । तदा ते व्याकुलाः सैन्याश्चामुण्डैस्तैः प्रपीडिता ७२ विस्मितश्चैव कृष्णांशो भयभीतस्तदा मुने । तुष्टाव शारदां देवीं सर्वमङ्गलकारिणीम् ७३ कृष्णांश उवाच ॥ नमस्ते शारदे मातर्ब्रह्मलोकनिवासिनि । त्वया ततमिदं विश्वं शब्दमात्रनिरन्तरम् ७४ रक्तबीजविनाशाय चामुण्डारूपधारिणी । नमस्ते दिव्य-

---

चामुंड भूमीवर उभा राहिला व परिघानें युद्ध करणाऱ्या तालनाशीं खड्गयुद्ध करूं लागला. पुढें त्याचा पराजय करून तो शत्रूंच्या सैन्याचा क्षय करूं लागला. पण हें पाहताच लक्षण त्वरेनें पुढे झाला व त्यानें आपल्या भाल्याने शत्रुस दोन्ही भुजान्या ठिकाणीं ताडन केलें. त्यावेळीं ज्यान्या हातांत खड्गे, शक्ति, ऋष्टि इत्यादि शस्त्रें आहेत असे सहस्र रक्तबीज युद्धामुळें मदोन्मत्त झालेल्या क्षत्रियास " थाब, थाब " असे ह्मणत एकाएकी निर्माण झाले. तेव्हा आल्हादादि ते सर्व शूर रक्तबीजान्या भयानें व्याकुळ होत्साते युद्ध सोडून महाबलाढ्य ब्रह्मानंदाकडे गेले. तेव्हा ब्रह्मानंद त्यास पाहून आपल्या पित्याकडे गेला; व हे मुने, " लक्षण आला आहे " असा वृत्तांत त्यानें त्यास सांगितला. पण तें ऐकताच राजा परिमल प्रेमानें व्याकुळ झाला व तो आल्हादाकडे येऊन मोठ्यानें अतिशय रडूं लागला. तेव्हा दीन व सुंदर देवकी देवी प्रेमामध्यें तत्पर असलेल्या राजास ह्मणाली " आह्मी तुझ्या भक्तीमध्ये तत्पर आहों. तू आह्मास सोडिल्यामुळें आह्मी दुसऱ्या राजाकडे गेलों. माझ्या पूर्वजन्मातील पापकर्मामुळें प्राप्त झालेल्या या दुष्ट कृत्याची तूं मला क्षमा कर. " हें तिचें वचन ऐकून राजा अति आनंदित झाला व त्यानें मोठ्या संतोषानें रामाशास मल्याचा अधिकार दिला. त्यानें कृष्णाशास आपल्या लक्ष सैन्याचा नायक केले. नंतर पाच दिवसामध्येंच महीराज आला व चामुंडाच्या सामर्थ्यामुळें गर्विष्ठ झालेल्या त्या राजाने सर्व नगरीस वेढा दिला. एक महिनाभर त्याचे भयंकर युद्ध झालें. पुढे एके दिवशीं प्रातःकाल झाला असता लक्ष सैन्याचा अधिपति कृष्णाश चामुंडाजवळ आला व त्याच्या अंगापासून उत्पन्न झालेल्या त्या सहस्र चामुंडाचीं मस्तकें त्यानें पृथक् पृथक् तोडिलीं. पण त्याचीं मस्तके तोडिलीं असता ते एक लक्ष वीर झाले. तेव्हा ते सर्व सेनानायक त्या चामुंडाकडून अतिपीडित होत्साते व्याकुळ झाले ९१–७२. वा मुने, त्यावेळीं कृष्णाशासही आश्चर्य वाटले व तो भयभीत झाला. सर्व मंगल करणाऱ्या शारदा देवीचें त्यानें स्तवन केलें ७३. कृष्णाश ह्मणतो — हे शारदे माते, तुला नमस्कार असो. तूं ब्रह्मलोकामध्यें राहणारी आहेस. तूं या संपूर्ण विश्वास व्यापून सोडिले आहेस. तुझ्याविषयीं निरंतर एवढेंच बोलता येतें. रक्तबीजाचा नाश करण्याकरिता तूं चामुंडेचें रूप धारण करणारी आहेस. हे दिव्य चामुंडे,

चामुण्डे पाहि मां शरणागतम् ७५ इति श्रुत्वा स्तव देवी वरदा सर्वकारिणी । तस्य खड्गमुपाश्रम्य रक्तबीज ददाह वै ७६ भस्मीभूते लक्षरिपौ चामुण्डो भूमिमागतः । बबन्ध तं स कृष्णांशो ब्रह्मानन्दान्तिक ययौ ७७ भूमिराजस्तु तच्छ्रुत्वा भयभीतः समागतः । तदा परिमलं भूप दयालुं प्रेमविह्वलम् ७८ उवाच वचनं राजा क्षमस्व मम दुष्कृतम् । महीपतेश्च वचनान्महद्भयमुपागतः७९ अद्यप्रभृति भो वीर सत्यक्तः कलह प्रियः । भवांश्च मम संबन्धी वयं वै तव किङ्कराः ८० इति श्रुत्वा परिमलो राजानमिदमब्रवीत् रत्नभानोश्च तनय लक्षण नाम विश्रुतम्८१शरण्य शरणं पाहि विष्णुभक्त दयापरम् । इति श्रुत्वा भूमिराजो द्विजरूपधरो बली ८२ साष्टाङ्गं दण्डवद्भूमौ लक्षणस्य चकार ह । तदा तु लक्षणो वीरः कृत्वा स्नेह नृपोपरि ८३ सप्तलक्षबलैः सार्द्धं कान्यकुब्जमुपाययौ । फाल्गुने मासि सम्प्राप्ते सर्वे स्व स्व गृह ययुः ८४ बलखानिर्गयाश्राद्धमचीकरदविप्लुतः । चैत्रमासि सिते पक्षे संप्राप्य निजमन्दिरं ८५ ब्राह्मणान्भोजयामास सहस्रान्वदतस्परान् ८६ [३३१६] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥

सूत उवाच ॥ अष्टाविंशाब्दके प्राप्ते कृष्णांशे बलवत्तरे । कार्तिक्यामिन्दुवारे च कृत्तिकाव्यतिपातभे१ कृष्णांशोऽयुतसेनाढ्यः स्वर्णवत्या समन्वितः। विवाहमुकुटस्यैव सत्यागाय ययौ मुदा२ पवित्रमुत्पलारण्य वाल्मीकिमुनिसेवितम् । गङ्गाकूले ब्रह्ममय लोहकीलकमुत्तमम् ३ तत्र गत्वा स शुद्धात्मा पुष्पवत्या समन्वितः । गोसहस्र च विप्रेभ्यो ददौ स्नाने प्रसन्नधीः ४ एतस्मिन्नन्तर

तुला नमस्कार असो. शरण आलेल्या माझें रक्षण कर ७४–७६. हे स्तोत्र ऐकून सर्व काहीं करणारी व वर देणारी देवी त्याच्या खड्गाचा आश्रय करून राहिली व तिनें रक्तबीजास जाळून टाकिलें. ह्याप्रमाणें एक लक्ष वीराचें भस्म झालें असता चामुड भूमीवर उतरला. तेव्हा कृष्णाशानें त्यास बाधून ब्रह्मानंदाकडे नेलें. इकडे भूमिराजाने जेव्हा हें वर्तमान ऐकिलें तेव्हा तो भयभीत होऊन दयाळु व प्रेमविह्वल असा जो परिमलराजा त्याच्याकडे आला व ह्मणाला ' माझ्या दुष्कृत्याची मला क्षमा कर. महीपतीच्या सागण्यामुळे मी या मोठ्या सकटात पडलो आहें ७७–७९. आजपासून हे वीरा, मला प्रिय वाटणारा हा कलह मीं सोडिला आहे. तूं आमचा सबधी आहेस व आम्ही तुझे किकर आहों. ' हें ऐकून परिमल त्या राजास ह्मणाला ' लक्षण या नावानें प्रसिद्ध असलेला रत्नभानूचा पुत्र आश्रय देण्यास योग्य आहे. तो विष्णुभक्त असून दयाळु आहे. यास्तव, या शरणागताचें रक्षण कर. ' हें ऐकून बलाढ्य भूमिराज ब्राह्मणरूप धारण करून लक्षणाला भूमीवर साष्टाग नमस्कार घालिता झाला. तेव्हा लक्षण वीर त्या राजावर प्रेम करून ८०–८३ सात लक्ष सैन्यासहवर्तमान कान्यकुब्जास परत गेला. तात्पर्य, फाल्गुन महिना लागला असता ते सर्वही आपापल्या घरीं गेले. परिमलानें बलखानीचें शात मनानें गयाश्राद्ध केलें व चैत्र महिन्याच्या शुद्धपक्षात आपल्या घरीं येऊन वेदपाठी सहस्र ब्राह्मणास त्याने भोजन घातलें ८४–८६. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकी कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सत्ताविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २७ ॥

सूत ह्मणतात.—बलाढ्य कृष्णाशास अठ्ठाविसावें वर्ष लागलें असता कार्तिकामध्ये कृत्तिकानक्षत्र, व्यतिपातयोग व सोमवार आला असता त्या दिवशीं कृष्णाश दहा हजार सन्यासह स्वर्णवतीस बरोबर घेऊन विवाहमुकुटाच्या त्यागाकरिता आनंदानें निघाला १,२. वाल्मीकिमुनीनें ज्याचें सेवन केले होते अशा पवित्र उत्पलारण्यातील गंगेच्या तीरावर जें ब्रह्ममय उत्तम लोहकीलक होते तेथें पुष्पवतीसह

प्राप्ता म्लेच्छजातिसमुद्भवा । शोभा नाम महारम्या वेश्या परमसुन्दरी ५ सा ददर्श परं रम्यं कृष्णांशं पुरुषोत्तमम् । तद्दृष्टिमोहमापन्ना व्याकुला कामवत्क्षणात् ६ मूर्छितां तां समालोक्य कृष्णांशः सर्वमोहनः । स्वनिवासमुपागम्य विप्रानाहूय पृष्टवान् ७ अष्टादशपुराणानि केन प्रोक्तानि किं फलम् । ब्रूत मे विदुषां श्रेष्ठा वेदशास्त्रपरायणाः ८ इति श्रुत्वा वचो रम्यं विद्वांसः शास्त्रकोविदाः । अब्रुवन्वचनं रम्यं कृष्णांशं सर्वधर्मगम् ९ पराशरेण रचितं पुराणं विष्णुदैवतम् । शिवेन रचितं स्कान्दं पाद्मं ब्रह्मसुधोद्भवम् १० शुकप्रोक्तं भागवतं ब्राह्मं वै ब्रह्मणा कृतम् । गारुडं हरिणा प्रोक्तं षड् वै सात्त्विकसंभवाः ११ मत्स्यः कूर्मो नृसिंहश्च वामनः शिव एव च । वायुरेषां पुराणानि व्यासेन रचितानि वै १२ राजसाः षट् स्मृता विप्र कर्मकाण्डमया भुवि । मार्कण्डेयं च वाराह मार्कण्डेयेन निर्मितम् १३ आग्नेयमङ्गिराश्चैव जनयामास चोत्तमम् । लिङ्गब्रह्माण्डके वापि तण्डिना रचिते शुभे १४ महादेवेन लोकार्थे भविष्यं रचितं शुभम् । तामसाः षट् स्मृताः प्राज्ञैः शक्तिधर्मपरायणाः १५ सर्वेषां च पुराणानां श्रेष्ठं भागवतं स्मृतम् । घोरे भुवि कलौ प्राप्ते विक्रमो नाम भूपतिः १६ कैलासाद्भुवमागत्य मुनीन्सर्वान्समाह्वयत् । तदा ते मुनयस्सर्वे नैमिषारण्यवासिन १७ प्रोक्तान्युपपुराणानि सूतेनाष्टादशैव च । इति श्रुत्वा तु वचनं कृष्णांशो धर्मतत्परः १८ श्रुत्वा भागवतं शास्त्रं सप्तमेऽह्नि महोत्तमम् । ददौ दानानि विप्रेभ्यो गोसुवर्णमयानि च १९ ब्राह्मणान्भोजयामास

तो पवित्र पुरुष गेला व तेथे स्नान करून ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा कृष्णाश ब्राह्मणांस सहस्र गाई देता झाला. इतक्यात म्लेच्छ जातीमध्ये उत्पन्न झालेली शोभानामक अतिसुंदर व अतिशय रम्य वेश्या तेथे आली ३-५. तिनें या श्रेष्ठ, रम्य व पुरुषोत्तम कृष्णाशास पाहिलें. तिच्या दृष्टीस मोह पडला व ती तात्काल व्याकुळ झाली ६. ती मूर्च्छित झाली आहे असें पाहून सर्वांस मोह उत्पन्न करणारा कृष्णाश आपल्या निवासस्थानीं आला व ब्राह्मणास बोलावून असे विचारूं लागला की, 'अठरा पुराणें कोणीं सांगितलीं व त्यांचें फल काय ? हे वेद व शास्त्रें यामध्यें तत्पर असणाऱ्या विद्वानांनीं सांगावें' ७,८. हे त्याचें रम्य वचन ऐकून शास्त्रज्ञ विद्वान् सर्व धर्मामध्यें ओतप्रोत भरून असलेल्या कृष्णाशास हें वचन बोलले 'विष्णु ही ज्याची देवता आहे असें विष्णुपुराण पराशरानीं रचिलें, स्कंदपुराण शंकरानीं रचिलें, पद्मपुराण ब्रह्मदेवाच्या मुखांतून निघालें, भागवत शुकानें सांगितलें; ब्राह्मपुराण ब्रह्मदेवानें केलें व गरुडपुराण हरीनें सांगितलें. ही सहा पुराणें सात्त्विक देवापासून निर्माण झालेलीं आहेत ९—११. मत्स्यपुराण, कूर्मपुराण, नृसिंहपुराण, वामनपुराण, शिवपुराण व वायुपुराण यांचा कर्ता श्रीव्यास होय. ही सहा कर्मकांडमय पुराणें भूलोकीं राजस पुराणें ह्मणून प्रसिद्ध आहेत. मार्कंडेय व वाराह हीं दोन पुराणें मार्कंडेयानीं रचिली, उत्तम अग्निपुराण अंगिराऋषीनें उत्पन्न केलें; शुभ लिंगपुराण व ब्रह्मांडपुराण तंडीनें रचिलें व लोकाकरितां शुभ भविष्यपुराण महादेवानें निर्माण केलें. ही सहा पुराणें तामस आहेत असें शहाण्यानीं ह्मटलें आहे. कारण, ही सहाही शक्तिधर्मपरायण आहेत. सर्व पुराणामध्यें भागवत श्रेष्ठ ह्मणून सांगितलें आहे. भूलोकीं घोर कलि प्राप्त झाला असतां विक्रमनामक राजा कैलासाहून भूलोकीं आला व त्यानें सर्व मुनींस बोलाविलें. तेव्हां नैमिषारण्यामध्ये राहणाऱ्या त्या सर्व मुनींस सूतानें अठराही उपपुराणें सांगितलीं.' हें त्याचें वचन ऐकून धर्मामध्यें तत्पर असलेला कृष्णाश १२—१८ अत्युत्तम भागवतशास्त्र ऐकून सातव्या दिवशीं गाई व सुवर्ण यांचीं दानें अनेक ब्राह्मणांस देता झाला. दानामध्ये तत्पर असलेल्या सहस्र ब्राह्मणांस त्यानें भोजन घातलें. पण

महस्वान्वेक्षतत्परान् । तदा तु भिक्षुकी भूत्वा शोभा नाम मदातुरा २० मायां कृतवती प्राप्ता कृष्णांशो यत्र वै स्थितः । ध्यात्वा महामदं वीर पैशाचं रुद्रकिङ्करम् २१ मायां सा जनयामास सर्वपाषाणकारिणीम् । दृष्ट्वा स्वर्णवती देवी तां मायां शोभयाद्भवाम् २२ छित्त्वा चाह्वाय वामाङ्गी स्वगेह गन्तुमुद्यता । सा वेश्या तु शुचाविष्टा तस्या शृङ्गारमुत्तमम् २३ स्वर्णयन्त्रस्थितं रम्य लक्षद्रव्योपमूल्यकम् । संहृत्य मायया धूर्ता दश वाहीकमायथौ २४ कल्पक्षेत्रमुपागम्य नव-सिंहसमुद्भवा । वेश्यया मम शृङ्गार हृत ज्ञा वा सुदुःखिता २५ कृष्णांश वचन प्राह गच्छ गच्छ महा-बल । गृहीत्वा मम शृङ्गार शीघ्रमागच्छ मां प्रति २६ गुटिकेय मया वीर रचिता तां मुखेन च । धर्तमायाविनाशाय तव मङ्गलहेतवे २७ इति श्रुत्वा तथा कृत्वा कृष्णांशस्सर्वमोहनः । शूकरक्षे-त्रमागम्य तत्र वेश्यां ददर्श ह २८ सा तु वेश्या च त वीरं दृष्ट्वा कन्दर्पकारिणम् । रचित्वा च पुनर्मायां तदन्तिकमुपागता २९ तदा सा निष्फलीभूत्वा रुरोद करुण बहु । रुदन्तीं तां समालोक्य दयालुस्स-प्रसन्नधीः ३० गृहीत्वा सर्वशृङ्गार वचन प्राह निर्भयः । किं रोदिषि महाभागे सत्यं कथय मा चिरम् ३१ साह मे सहुरो नाम भ्राता प्राणसमप्रियः । नाटचैश्च पञ्चसाहस्रैः सहितो मरण गतः ३२ अतो रौमि महाभाग सभ्राता शरण त्वयि । इत्युक्त्वा मायया धूर्ता कृत्वा शव-मयाह्वि तान् ३३ तस्मै प्रदर्शयामास निजकार्यपरायणा । रुदित्वा च पुनस्तत्र प्राणांस्त्यक्तु समु-द्यता ३४ दयालुस्स च कृष्णांशस्तामाह करुण वच. । कथ ते जीविष्यन्ति शोभने कथयाशु मे ३५

इतक्यात मदांत आतुर झालेली शोभानामक वेश्या कपट करून भिक्षुकीचा वेष घेऊन कृष्णाश जेथे होता तेथे आली. रुद्राचा किंकर असा जो पैशाच महावीर महामद त्याचे ध्यान करून सर्वांस पाषाण करून सोडणारी माया तिने निर्माण केली. पण शोभेने निर्मि-लेल्या त्या मायेस पाहून स्वर्णवती देवीने तिचा उच्छेद केला, व आनंदित होऊन ती सुंदरी आपल्या गृही जाण्यास तयार झाली. पण इतक्यात शोकाविष्ट झालेली ती धूर्त वेश्या, ज्याची किंमत एक लक्ष मुद्रा आहे असा स्वर्णयंत्रामध्ये असलेला तिचा उत्तम शृंगार मायेने हरण करून वाहीकदेशास आली १९–२४. कल्पक्षेत्रास आल्यावर वेश्येने माझा शृंगार हरण केला आहे असे समजून ती नवसिंहाची कन्या अतिशय दुःखित झाली २५ व कृष्णांशास म्हणाली " हे बलवान् महावीरा, जा जा, व माझा शृंगार घेऊन त्वरित माझ्याकडे ये २६. हे वीरा, तुझ्या कल्याणा-करिता व त्या धूर्त वेश्येच्या मायेचा विनाश व्हावा म्हणून मी ही गुटिका तयार केली आहे. तूं तिला आपल्या मुखात ठेव " २७. हे ऐकून व त्याप्रमाणे आचरण करून सर्वांस मोह पाडणारा कृष्णाश शूकरक्षेत्रास आला व तेथे त्याने वेश्येस पाहिले २८. तेव्हा ती वेश्या कामोत्पादक अशा त्या वीरास पाहून पुन. माया रचून त्याच्याजवळ गेली. पण ती माया निष्फल होऊन ती करुणेने पुष्कळ रडूं लागली. तेव्हा ती रडत आहे असे पाहून ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा तो दयाळु सर्व शृंगार घेऊन निर्भयपणे तिला म्हणाला " हे महाभागे, का रडतेस ? मला खरें सांग, उशीर लावू नको " २९-३१. तेव्हा ती म्हणाली ' माझा सहुरनामक प्राणासारखा प्रिय भ्राता होता. तो पांच हजार नाट्यांसह मरण पावला आहे. हे महाभागा, त्याकरितां मी रडते आणि म्हणूनच मी तुला शरण आले आहे '. असे कपटाने बोलून व त्यास शवरूप करून आपल्या कर्मामध्ये परायण असलेली ती वेश्या त्यास दाखविती झाली व पुन. रडून तेथे ती प्राण देण्यास तयार झाली ३२-३४. तेव्हा दयाळु कृष्णाश तिला असे करुणायुक्त वचन म्हणाला ' हे शोभने, हे कसे जिवंत होतील ते मला त्वरित सांग ' ३५. ती म्हणाली ' हे वीरा, तुझ्या मुखामध्ये

साह वीर तवास्ये तु संस्थिता गुटिका शुभा। देहि मे कृपया वीर जीवयिष्यन्ति ते तया ३६
इत्युक्तस्तु तया वीरो ददौ तस्यै च तद्वसु। तदा प्रसन्ना सा धृतां कृत्वा शुकमयं वपुः ३७ पञ्च-
रम्भमुपादाय कृष्णांशं कामविह्वला। वाहीकदेशमागम्य सारट्टनगरं शुभम् ३८ उवाच च
स्वयं गेहे कृत्वा दिव्यमयं वपुः। निशीथे समनुप्राप्ते कृत्वा तं नग्नरूपिणम् ३९ आलिलिङ्ग हि
कामार्ता कृष्णांशं धर्मज्ञाविदम्। दृष्ट्वा तां स तथाभूतां कृष्णांशो जगदम्बिकाम् ४० तुष्टाव
मनसा धीरो रात्रिसूक्तेन नम्रधीः। तदा सा स्वेडिनी भूत्वा त्यक्त्वा कृष्णांशमुत्तमम् ४१ पुनः
शुकमयं कृत्वा चिञ्चिणीवृक्षमारुहत्। तदा स्वर्णवती देवी बोधिता विष्णुमायया ४२ कृत्वा
श्येनीमयं रूपं तत्र गत्वा मुदान्विता। ददर्श शुकभूतं च कृष्णांशं योगतत्परम् ४३ एतस्मिन्नन्तरे
वेश्या पुनः कृत्वा शुभं वपुः। नरभूतं च कृष्णांशं वचनं प्राह नम्रधीः ४४ अये प्राणप्रिय
स्वामिन्भज मां कामविह्वलाम्। त्राहि मां रतिदानेन धर्मज्ञोऽसि भवान्सदा ४५ इत्युक्तस्तु
तामाह वचनं शृणु शोभने। आर्यवर्त्मस्थितोऽहं वै वेदमार्गपरायणः ४६ विवाहितां शुभां नारीं
यो भजेत ऋतौ न हि। स पापी नरकं याति तिर्यग्योनिमयं स्मृतम् ४७ अतः परस्त्रिया भोग
ज्ञेयं वै निरयप्रदम्। इति श्रुत्वा तु सा प्राह विश्वामित्रेण धीमता ४८ शृङ्गिणा च महाप्राज्ञ
वेश्यासङ्गः कृतः पुरा। न कोऽपि नरकं प्राप्तस्तस्मान्मां भज कामिनीम् ४९ पुनश्चाह स
कृष्णांशः कृत्वा पापं तपोबलात्। ताभ्यां च मुनियुग्माभ्यामसमर्थो हि साम्प्रतम् ५० अर्द्धाङ्गं
पुरुषस्य स्त्री मैथुनं च विशेषतः। अहमार्यश्च भवती वेश्या च बहुभोगिनी ५१ ऋचिशब्दश्च

जी शुभ गुटिका आहे ती मला कृपा करून दे. हे वीरा, तिच्या योगाने ते जीवित होतील' ३६. तिने असे सांगितले असता तो वीर तिला ती पदार्थ देता झाला. तेव्हा ती कपर्दी स्त्री प्रसन्न झाली व लागलीच तिने कृष्णांशास पोपटाचे स्वरूप दिले व कामाने विह्वल झालेली ती वेश्या त्यास पिंजऱ्यामध्ये घालून वाहीकदेशातील शुभ सारट्टनगरास आली व आपल्या गृहामध्ये ती स्वतः दिव्यशरीरी होऊन रात्र पडली असता त्या कृष्णांशासही मनुष्यरूपी करून कामाने व्याकुल झालेली ती वेश्या धर्मज्ञ कृष्णांशास आलिंगन देती झाली. पण तिची ही अवस्था पाहून धीर व नम्र कृष्णांशाने जगदंबेचे रात्रिसूक्तानें मानसिक स्तवन केले. त्या वेळीं ती पक्षीण होऊन उत्तम कृष्णांशास सोडून व त्याला पुन: पोपट करून चिंचिणीवृक्षावर चढली. तेव्हा देवी स्वर्णवतीस विष्णुमायेच्या योगाने हे वर्तमान समजले. त्यावरोवर ती स्वतः श्येनपक्ष्याचे स्वरूप घेऊन व आनंदाने तेथे जाऊन योगामध्ये तत्पर झालेला कृष्णांश शुकरूप आहे असे पाहती झाली. इतक्यांत ती वेश्या पुन: आपले शुभ रूप करून व कृष्णांशास मनुष्यरूपी करून नम्रपणे ह्मणाली "अरे माझ्या प्राणप्रिया, हे स्वामिन्, कामाने विह्वल झालेल्या माझे सेवन कर. रतिदानाने माझे रक्षण कर. तूं सर्वदा धर्मज्ञ आहेस" ३७–४५. ह्याप्रमाणें ती बोलली असता तो तिला ह्मणाला "हे शोभने, माझे वचन ऐक. मी आर्यमार्गामध्ये स्थित आहे. मी वेदमार्गामध्ये परायण असतो ४६. विवाहित शुभ नारीचे ऋतुकाली जो सेवन करीत नाही तो पापी तिर्यग्योनिमय नरकास जातो असे सांगितले आहे. यास्तव, परस्त्रीचा भोग नरकप्रद आहे असे समजावे". हे ऐकून ती ह्मणाली "बुद्धिमान् विश्वामित्राने व शृंगऋषीने पूर्वी वेश्येचा संग केला आहे. पण हे महाबुद्धिमाना, त्यापैकी नरकास कोणीही गेला नाही. यास्तव, तू मज कामिनीचे सेवन कर." त्यावर कृष्णांश पुनः ह्मणाला "त्या उभय मुनींनी आपल्या तपाच्या सामर्थ्याने पापाचा उच्छेद केला, पण मी तसे करण्यास असमर्थ आहे ४७-५०. विशेषतः मैथुनसमयी स्त्री पुरुषाचें अर्धे अंग आहे. पण मी आर्य व तू अनेकांचा भोग घेणारी

पूर्वास्यजातो ऋग्जस्सनातनः । योगजश्चैव यः शब्दो दक्षिणास्याद्यजुर्भवः ५२ तद्धितान्तश्च यश्शब्दः पश्चिमास्याच्च सामजः । छन्दोभूताश्च ये शब्दास्ते सर्वे ब्राह्मणप्रियाः ५३ केवलो वर्णमात्रश्च स शब्दोऽथर्वजः स्मृतः । पञ्चमास्याच्च ये जाता शब्दाः संसारकारिणः ५४ ते सर्वे प्राकृता ज्ञेयाश्चतुर्लक्षविभेदिनः । हित्वा तान्यो हि शुद्धात्मा चतुर्वेदपरायणः ५५ स वै भवाटवीं त्यक्त्वा पदं गच्छत्यनामयम् । न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कण्ठगतैरपि ५६ गजैरापीड्यमानोऽपि न गच्छेज्जैनमन्दिरम् । इत्येव स्मृतिवाक्यानि मुनिना पठितानि वै ५७ कथं त्याज्यो मया धर्मस्सर्वलोकसुखप्रदः । इति श्रुत्वा तु सा वेश्या म्लेच्छायाश्चांशसम्भवा ५८ शोभना नाम रम्भोरूर्महाक्रोधमुपाययौ । वेतसैस्ताडयित्वा त पुनः कृत्वा शुकं स्वयम् ५९ न ददौ भोजनं तस्मै फलाहारं शुकाय वै । तदा स्वर्णवती देवी कृत्वा नारीमयं वपुः ६० मशकीकृत्य त वीरं तत्रैवान्तरधीयत । पुनः श्येनविधुं कृत्वा स्वंदेशाद्यातुमुद्यता ६१ पञ्जरादाप्य मशकं मयूरनगरं ययौ । मकरन्दस्तु तां दृष्ट्वा कृष्णांशेन समन्विताम् ६२ नेत्रपालस्य तनयां नाम्ना स्वर्णवतीं बलीं । चरणावुरसगृह्य स्वगेहे तामवासयत् ६३ शोभनाऽपि च सञ्जुष्य पञ्जरान्तमुपस्थिता । न ददर्श शुकं रम्यं मूर्छिता चापतद्भुवि ६४ किं करोमि क्व गच्छामि विधा तं श्रमणं परम् । इत्येव बहुधालप्य मदहीनपुरं ययौ ६५ तत्र स्थितं च पैशाचं मायामदविशारदम् । महामदं च संपूज्य स्वदेहं त्यक्तुमुद्यता ६६ महामदस्तु संतुष्टो गत्वा वै शिवम-

---

वेश्या (तेव्हा आपला योग कसा होईल ?) ५१. ब्रह्मदेवाच्या पूर्वमुखापासून ऋची शब्द उत्पन्न झाला. तो सनातन ऋग्वेदापासून झालेला आहे. योगज म्हणून जो शब्द आहे तो त्याच्या दक्षिणमुखातून यजुर्वेदापासून झाला ५२. तद्धितप्रत्ययान्त जो शब्द तो पश्चिममुखातून सामवेदापासून झाला. साराश, छंदोरूप असे जे शब्द आहेत ते सर्व ब्राह्मणास प्रिय होत ५३. केवल वर्णमय जे शब्द ते अथर्ववेदापासून झाले आहेत असे झटले आहे. पाचव्या मुखापासून जे शब्द उत्पन्न झाले आहेत ते सर्व संसार उत्पन्न करणारे आहेत ५४. ते सर्व प्राकृत आहेत असें समजावें. त्याचे चार लक्ष भेद आहेत. त्यास सोडून जो शुद्ध पुरुष चार वेदामध्यें परायण असतो तो या संसाररूपी अरण्यास सोडून निरुपद्रव स्थानास जातो. " प्राण कंठामध्यें आले तरी यवनाची भाषा बोलू नये व हत्ती तुडवून प्राण घेत असले तरी देखील प्राणरक्षणाकरिता जैनाच्या मंदिरात जाऊ नये " अशा प्रकारची स्मृतिवाक्ये मुनिपठित आहेत. तेव्हा सर्वास सुख देणारा धर्म मी कसा टाकावा ? " हे ऐकून म्लेच्छाच्या अशापासून उत्पन्न झालेली ती सुंदरी शोभना कोधाविष्ट झाली. तिने त्यास वेताने ताडन केले व पुनः त्यास पोपट करून स्वतः तिने त्या शुकास फलाहाराचें भोजन दिलें नाही. तेव्हा स्वर्णवती देवी स्त्रीमय शरीर करून व त्या वीरास मशक करून तेथेच गुप्त झाली व पुनरपि श्येनपक्ष्याचे रूप घेऊन आपल्या देशास जाऊं लागली. त्या मशकास आपल्या पाठीवर घेऊन ती मयूरनगराम गेली. तेव्हा कृष्णाशासहवर्तमान त्या स्वर्णवतीनामक नेत्रपालाच्या कन्येस बलाढ्य मकरदाने पाहिले. व त्याच्या चरणास स्पर्श करून तिला तो आपल्या गृही ठेवून घेता झाला ५९-६३. इकडे ती शोभनाही सावध होऊन पिंजऱ्याजवळ आली. पण तिने त्या रम्य शुकास पिंजऱ्यात पाहिलें नाहीं. तेव्हा ती मूर्च्छित होऊन भूमीवर पडली ६४. " त्या श्रेष्ठ रमणावाचून मी काय करूं व कोठे जाऊं ? " अशा प्रकार पुष्कळ विलाप करून ती मदहीन नगरास गेली ६५. मायामदामध्ये निपुण असलेल्या तेथील पैशाचधर्मी महाबलाचें पूजन करून ती आपला देहयाग करण्यास तयार झाली ६६. तेव्हा महामद संतुष्ट

न्दिरम् । मरुस्थलेश्वरं लिङ्गं तुष्टावार्षभभाषया ६७ तदा प्रसन्नो भगवान्वचनं प्राह सेवकम् । स्वर्णवत्या हृतो वीरः कृष्णांशश्चार्यधर्मगः ६८ मया सह समागच्छ मयूरनगरं प्रति । इत्युक्तस्तेन पैशाचो नटैः पञ्चसहस्रकैः ६९ तथा सह ययौ तूर्णं सहुरेण समन्वितः । इन्दुलश्च तथाह्लादो बाधितौ विष्णुमायया ७० त्रिलक्षबलसंयुक्तौ देवसिंहेन संयुतः । मयूरनगरं प्राप्य मकरन्दमुपाययौ ७१ तदा तु शोभना वेश्या सहुरेण बलैस्सह । चकार भैरवीं मायां सर्वशत्रुभयङ्करीम् ७२ सर्वतश्चोत्थितो वातो महामेघसमन्वितः । पतन्ति बहुधा चोल्काः शर्करा वर्षणे रताः ७३ दृष्ट्वा तां भैरवीं मायां तमाभूतां समन्तत । मकरन्दश्च बलवान्रथस्थः स्वयमाययौ ७४ शनिभल्लेन तां मायां भस्म कृत्वा महाबली । गृहीत्वा सहुरं धूर्तं सबलं गेहमाप्तवान् ७५ तदा तु शोभना नारी काममायां चकार ह । बहुलास्मस्थिता वेश्या गीतनृत्यविशारदाः ७६ मोहिता क्षत्रियाः सर्वे मुमुहुर्लास्यदर्शनात् । देवसिंहाच्च कृष्णांशाद्गते ते जडतां गताः ७७ तदा स्वर्णवती देवी कामाक्षीध्यानतत्परा । पुनरुत्थाय तान्सर्वान्गृहीत्वा शोभनां पुनः ७८ मयूरध्वजनागस्य निगडैस्तान्बबन्ध ह । महामदस्तु तज्ज्ञात्वा रुद्रध्यानपरायणः ७९ चकार शाम्बरीं मायां नानासत्त्वविधायिनीम् । व्याघ्राः सिंहा वराहाश्च वानरा दंशका नराः ८० सर्पा गृध्रास्तथा काका भक्षयन्ति समन्ततः । हाहाभूते च तत्सैन्ये दिक्षु विद्राविते सति ८१ शोभना चाभवद्दासी स्वर्णवत्याश्च मायिनी । सहुरस्तैर्नटैस्सार्द्धं चाह्लादेनैव चूर्णितः ८२ तेषां रुधिरकुम्भानि भूमिमध्ये सपारुहन् । एवं च मुनिशार्दूल चतुर्मास्यभवद्रणः ८३ वैशाखे मासि संप्राप्ते ते वीरा गेहमाययुः । इति ते कथितं

झाला व शिवमंदिरात जाऊन मरुस्थलेश्वर लिंगाची आर्षभ भाषेनें त्यांनी स्तुति केली. तेव्हा तो भगवान् प्रसन्न झाला व सेवकास म्हणाला ' आर्यधर्मामध्ये तत्पर असलेल्या कृष्णांशास स्वर्णवतीनें हरण केले आहे. यास्तव, तू माझ्यासह त्या मयूरनगरास चल. ' याप्रमाणे त्यांनी सांगितले असता तो पैशाचधर्मी पाच हजार नटांसह तिला व सहुरास बरोबर घेऊन लागलाच तेथे आला. पण इतक्यात विष्णुमायेने इंदुल व आल्हाद यांस ते वर्तमान कळविले ६७-७०. तेव्हा ते दोघेही तीन लक्ष सैन्ययुक्त देवसिंहासहवर्तमान मयूरनगरास मकरदाजवळ आले ७१. तेव्हां ती शोभना वेश्या सहुर व सैन्य यासह सर्व शत्रूस भय उत्पन्न करणारी प्रचंड माया रचिती झाली. मोठ्या मेघासहवर्तमान चोहोकडून वारा सुटला; अनेक उल्कापात होऊ लागले, गारा पडू लागल्या ७२,७३ व जिकडे तिकडे अंधार पसरला. साराश, अशी ती भयंकर माया पाहून बलाढ्य मकरद स्थापर बसून स्वत आला व त्या पराक्रमी वीराने शनिभल्लाने त्या मायेचें भस्म करून सैन्यासह त्या धूर्त सहुरास धरून गृहीं नेले ७४,७५. तेव्हा शोभना स्त्री काममाया करिती झाली. त्यामुळे गायन व नृत्य यामध्ये कुशल असलेल्या अनेक वेश्या तेथे प्राप्त झाल्या. ते संगीत पाहून सर्व क्षत्रिय मोहित झाले व देवसिंह व कृष्णांश यावाचून ते सर्व जड होऊन राहिले ७६,७७. तेव्हां कामाक्षीच्या ध्यानामध्ये तत्पर असलेली स्वर्णवती त्यासर्वास पुनः उठवून व शोभेस धरून मयूरध्वजाकडे आणती झाली. ते हा राजाने तिला शृंखलाच्या योगानें बांधून ठेविले. शंकराच्या ध्यानामध्ये परायण असलेल्या महामदाने हे जाणून अनेक प्राण्यास निर्माण करणारी शाबरी माया रचिली. तेव्हा व्याघ्र, सिंह, वराह, वानर, दंश करणारे मनुष्य, सर्प, गृध्र व काक तेथील प्राण्यास चोहोकडून बोचून खाऊं लागले. तेव्हा त्या सर्व सैन्यामध्ये हाहाकार उडाला. पण कपटी शोभना स्वर्णवतीची दासी झाली. आल्हादाने त्या सर्व नटांसह सहुराचे चूर्ण करून सोडिले व त्यांच्या रक्ताचे घडे भूमीमध्ये पुरून सोडिले. हे मुनिश्रेष्ठा, याप्रमाणे चार महिने युद्ध

विप्र चान्यत्किं श्रोतुमिच्छसि ८४ [३४००] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगेतिहाससमुच्चयेऽष्टाविंशोऽध्यायः ॥ २८ ॥

ऋषय ऊचुः ॥ किन्नरी नाम या कन्या त्वया प्रोक्ता महामुने । कुत्र स्थाने कथं जाता तत्सर्वं कृपया वद १ सूत उवाच ॥ पुरा चैत्ररथे देशे नानाजननिषेविते । वसन्तसमये प्राप्ते क्रीडन्त्यत्र दिवौकसः २ मञ्जुघोषा च स्वर्वेश्या शुकस्थाने समागता । दृष्ट्वा तं सुन्दरं बालं मोहनाय समुद्यता ३ गीतनृत्यादिरागांश्च कृत्वा सा कामविह्वला । प्राञ्जलिं प्रणता बद्धा पुनस्तुष्टाव तं मुनिम् ४ तदा शुकस्तु भगवान्पद्य स्तुतिमयं शुभम् । श्रुत्वा प्रसन्नहृदयो वरं ब्रूहीति सोऽब्रवीत् ५ सा तु श्रुत्वा शुभं वाक्यं प्रोवाच श्लक्ष्णया गिरा । पतिर्मे भव हे नाथ शरणागतवत्सल ६ इति श्रुत्वा तु वचनं तथा कृत्वा तया सह । स रेमे मुनिशार्दूलः शुको विज्ञानकोविदः ७ तयोस्सकाशात्सञ्जज्ञे मुनिनाम सुतोऽनयोः । तपश्चकार बलवान्द्वादशाब्दं प्रयत्नतः ८ तस्मै ददौ तदा पत्नीं स्वर्णदस्य वै सुताम् । कुबेरः रुद्रसहितः स मुनिस्तु मुदान्वितः ९ तया रेमे प्रसन्नात्मा तयाजातो सुतोत्तमा । किन्नरी नाम विख्याता हिमतुङ्गसमुद्भवा १० तपश्चचार सा देवी रूपयौवनशालिनी । तदा प्रसन्नो भगवाञ्छङ्करो लोकशङ्करः ११ मकरन्दाय धीराय ददौ तां रुचिराननाम् । मुनिस्तु शङ्करं प्राह देवदेव नमोऽस्तु ते १२ मत्सुतायै वरं देहि राष्ट्रं वर्धनमुत्तमम् । इति श्रुत्वा शिवः प्राह गृणुष्वान्तं च भूतले १३ मध्यदेशे च ते राष्ट्रं

झाले ७८-८३. पुढे वैशाख महिना लागला असता ते सर्व वीर आपल्या गृही परत आले. हे ब्राह्मणा, ह्याप्रमाणे तुला मी सर्व वृत्तांत सांगितला. आता आणखी काय एकण्याची इच्छा आहे ? ८४. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकी कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २८ ॥

ऋषि ह्मणतात.—हे महामुने, किन्नरी ह्मणून जी कन्या तू सांगितलीस ती कोणत्या स्थानी व कशी झाली ते सर्व कृपा करून सांग १. सूत ह्मणतात — पूर्वी अनेक जनांनीं ज्याचे सेवन केले आहे अशा चैत्ररथप्रदेशीं वसंत ऋतु प्राप्त झाला असता देव क्रीडा करीत होते २. इतक्यांत मंजुघोषानामक स्वर्गलोकांतील वेश्या जेथे शुक होता तेथे आली व त्या सुंदर बालकास पाहून त्यास मोहित करण्याकरिता तयार झाली. गायन, नृत्य नानाप्रकारचे राग इत्यादि करून कामाने विह्वल झालेली ती अप्सरा हात जोडून व नम्र होऊन पुन त्या मुनीची स्तुति करूं लागली ३ ४. तेव्हा ते शुभ स्तुतिमय पद्य एकून ज्याचे हृदय प्रसन्न झाले आहे असा तो भगवान् शुक 'वर माग' असे तिला ह्मणाला. तेव्हा ती हे शुभ वाक्य ऐकून मधुर वाणीनें ह्मणाली. " हे नाथ, हे शरणागतवत्सल, माझा पति हो." हे वचन ऐकून व तिच्यासह विवाह करून तो पूर्ण पंडित मुनिशार्दूल शुक तिच्यासह रममाण झाला ५–७. त्या उभयतापासून मुनिनामक पुत्र झाला. त्या बलवानाने प्रयत्नानें बारा वर्षे तप केले ८. तेव्हा रुद्रासहवर्तमान कुबेर त्यास स्वर्णदाची कन्या देऊन त्याचा विवाह करविता झाला. त्यामुळे तो मुनि संतुष्ट झाला. ज्याचे अंत:करण प्रसन्न आहे असा तो तिच्यासीं रममाण झाला असता त्यास उत्तम कन्या झाली. ती किन्नरी या नावाने प्रसिद्ध असून हिमालयाच्या शिखरावर तिचा जन्म झाला होता ९,१०. रूप व तारुण्य यांनीं युक्त असलेल्या त्या देवीनें तप केले. तेव्हा लोकांचें कल्याण करणारा भगवान् शंकर प्रसन्न झाला ११ व जिचे मुख सुंदर आहे अशा त्या किन्नरीस त्यानें बुद्धिमान् मकरंदाच्या स्वाधीन केले. तेव्हा तो मुनि शंकरास ह्मणाला " हे देवाधिदेवा, तुला नमस्कार असो १२. वृद्धि पावणारें उत्तम राष्ट्र माझ्या कन्येस वर ह्मणून दे ". हें ऐकून शंकर ह्मणतो

भविष्यति सुखपदम् । त्रिंशताब्दप्रमाणेन तत्पश्चाल्लयमेष्यति १४ इति श्रुत्वा तु स मुनीन्द्रमुक्तनिवासक । मकरन्देन सहितस्तत्र वासमकारयत् १५ इति ते कथितं विप्र पुनः शृण कथां शुभाम् । ऊनत्रिंशाब्दके प्राप्ते कृष्णांशे रणङ्गणम् १६ नेवपालस्य नगरं नानाधातुविचित्रितम् । मत्वा न्यूनपतिर्बौद्धो युद्धाय नगरं गुभम् १७ समलङ्कृतयुतो राजा बौद्धसिंहो महाबलः । त्रिलक्षबलमेकेनसार्द्धं युद्धमचीकरत् १८ समाहोरात्रमभवत्सेनायुद्धं भयानकम् । योगसिंहो भोगसिंहो विजयश्च महाबली १९ जघान शात्रवीं सेनां बौद्धसिंहेन पालिताम् । एतस्मिन्नन्तरे प्राप्ता श्यामजापकदेशगाः २० बौद्धा मायाविनस्सर्वे लोकमान्यप्रपूजकाः । पुनर्जाते महायुद्धे मामेकं तयोस्तदा २१ नेवपालाज्ञया सर्वे कृष्णांशाद्या समागताः । कृष्णांशो बिन्दुलारूढो देवः स्वहयसंस्थितः २२ इन्दुलश्च करालश्च मण्डलीको गजे स्थितः । गौतमश्च समायातो हरिनागरसंस्थितः २३ तालनश्च समायातः सिंहिन्युपरि संस्थितः । धान्यपालस्तत्यकारो युद्धसंभारसंभवः २४ लङ्कासिंहश्च...चलबाल्कुलिभोजांशनभवः । ताम्बूलीयकजातीयो लक्षणानुज्ञया ययौ २५ तदा तु नेवसिंहश्च समलङ्कृतदेववत् । पालितश्चाष्टभिर्वीरैस्तेषां नाशाय चायया २६ अवशिष्टाश्च ते बौद्धास्त्यक्त्वा देशं समन्ततः । चीनदेशमुपागम्य युद्धसंभारमकारयन् २७ तदनुप्रयुयुत्सन्ते वै हूहानदमुपस्थिताः । माघमासे तु संप्राप्ते पुनर्युद्धमवर्तत २८ श्यामदेशाद्बलं दृष्ट्वा लक्षमात्रं तथा लक्षाश्च जापकाः । दशलक्षाश्चानदेश्या युद्धाय समुपस्थिताः २९ कृष्णांशो लक्षसमनाढ्यो देवो लक्षसमन्वितः । नेवपालश्च लक्षाढ्यो

* असली युद्ध राजवंश म पडेशाम ये तेव्हा एकाएकी राग होऊन ते तीस वर्षे चोरून व पुढे त्याचा क्षय होईल " १३, १४ हे ऐकून हिमाच्याच्या शिखरावर राहणारा तो मुनि मकरंदासह तेथे येऊन राहू लागला १५ हे ब्राह्मणा याप्रमाणे हा वृत्तान्त मी तुला सांगितला आता पुन्हा आता शुभ कथा ऐक. कृष्णांशाच्या एकोणतिसाव्या वर्षी लागल्या असता ह्या कारणा झाली नेवपाल नावाचे नगर अनेक धातूंनी चित्रविचित्र झाले आहे असे समजून बौद्धसिंह नृपति हा शुभ नगराला घेरा घालिता झाला तो महाबलाढ्य बौद्धसिंह राजा सात लक्ष सैन्यानिशी युक्त असून तीन लक्ष सैन्याने युक्त असलेल्या राजाशी युद्ध करू लागला त्या वेळी सैन्याचे सात अहोरात्र भयंकर युद्ध झाले. योगसिंह भोगसिंह व बलाढ्य विजय यांनी मिळून शत्रूंच्या सैन्यास मारिते झाले इतक्यात श्याम व जापक देशांतील वीर आले. ते सर्व मायावी असून लोकमान्य पुरुषांचे पूजन करणारे होते. ते तेव्हा पाचच पुन्हा एक महिना युद्ध झाले २१, २२ नेवपालाच्या आज्ञेने कृष्णांशादिक सर्व तेथे आले. बिंदुलावर आरूढ झालेला कृष्णांश, अश्वावर बसलेला देवसिंह, करल अश्वावर बसलेला इंदुल, हत्तीवर बसलेला मंडलीक व हरिनागावर बसलेला गौतम तेथे येऊन पोचला. सिंहीवर स्वार झालेला तालन तेथे आला. युयुत्सूंच्या अन्नापासून उत्पन्न झालेला, तेजःपाल व कुलिंगोत्पन्न अन्नापासून उत्पन्न झालेला लङ्कासिंह लक्षणाच्या आज्ञेने तेथे आला. ताम्बूलीयक जातीचा योद्धा व उत्पन्न झाला होता २३, २४ तेव्हा सात लक्ष वीर युक्त असलेला नेवपाल या आठ वीरांकडून रक्षित होत असता त्यांच्या नाशाकरिता चालून गेला २५ तेव्हा ते सर्व बौद्ध भयभीत होऊन देश सोडून चोहोकडे निघून गेले, व चीन देशात ते सर्वांनी आपली युद्धभूमि करविली. २६ पण हे सर्वही त्यांच्यामागे लागले. ते सर्व हूहानदीपर्यंत येऊन पोहोचले. माघमास लागला असता पुनरपि युद्ध सुरू झाले २८. श्यामदेशातील एक लक्ष वीर, जापक देशातील एक लक्ष व चीनदेशातील दहा लक्ष असे सर्व मिळून युद्धास उभे राहिले २९. याप्रमाणे कृष्णांश एक लक्ष सैन्याने युक्त, देवसिंह एक लक्ष सैन्याने युक्त व

योगभोगसमन्वितः ३० मण्डलीकश्चेन्दुलेन लक्षसैन्यसमन्वितः । धान्यपालो लल्लसिंहो लक्षसैन्यान्वितः स्थितः ३१ जगनायक एवापि लक्षसैन्ययुतः स्थितः । तालनो लक्षसेनाढ्यो युद्धाय समुपागतः ३२ तत्र युद्धमभूद्घोरं बौद्धानामार्यकैस्सह । पक्षमात्रं मुनिश्रेष्ठ यमलोकाविवर्द्धनम् ३३सप्तलक्षा हता बौद्धा द्विलक्षाश्चार्यदेशजाः । ततस्ते भयभीताश्च त्यक्त्वा युद्धं गृहं ययुः ३४ कृत्वा दारुमयीं सेनां कलयन्त्रप्रभावत । गजाश्च दशसाहस्रा. सप्तशताः काष्ठनिर्मिताः ३५ एकलक्षा हयारूढा दारुपाश्च रणोन्मुखा.। सहस्र महिषारूढास्सहस्राः कालपृष्ठगाः ३६ सिंहारूढास्सहस्राश्च सहस्रा हंसवाहना । कङ्कगामायुताधाणां श्यामारूढाः पृथक्तथा ३७ उष्ट्राः सप्तसहस्राश्च सप्तशताश्च रणोन्मुखाः एव सपादलक्षैश्च काष्ठसैन्यैश्च मानुषाः३८द्विलक्षाश्च क्षयं जग्मुः कृष्णाशाद्यैः सुरक्षिताः । ततो हाहाकृतं सैन्य चार्याणां च ननाश तत् ३९ दृष्ट्वा तत्कौतुकं रम्यं जयन्तो युद्धकोविदः । आग्नेयं शरमादाय काष्ठसैन्येषु चाक्षिपत् ४० भस्मीभूताश्च ते सर्वे तत्रैव विलयं गताः । विलक्षाः क्षत्रियाः शेषा जयन्तं रणकोविदम् ४१ चक्रुर्जयरवं तत्र तुष्टुवुश्च पुनः पुनः । तदा तु चीनजा बौद्धाः कृत्वा विंशतिसहस्रकान् ४२ हयारूढांल्लोहमयान्प्रेषयामासुरूर्जितान् । योगसिंहं गजारूढा धनुर्बाणधरो बली ४३ कण्ठेषु लोहजाश्चीरांस्ताडयामास वै बली । मृतास्ते पञ्चसाहस्रा योगसिंहशरार्दिताः ४४ बौद्धसिंहस्तदा शूरो दृष्ट्वा तस्यप राक्रमम् । कृत्वा लोहमयं सिंहं योगसिंहमथोषयत् ४५ पतेन तस्य सिंहस्य स वीरो मरण गत । तदा तु भोगसिंहश्च

नेत्रपाल एक लक्ष सैन्य व योग आणि भोग यासह तेथें होता. मंडलीकापाशीं इंदुलासह एक लक्ष सैन्य होतें. धान्यपाल व लल्लसिंह यान्यापाशीही एक लक्ष सेना होती. जगनायकाजवळ एक लक्ष वीर होते व तालनही एक लक्ष सैन्य घेऊन युद्धास आला होता. तेथें त्या बौद्धाच आर्यांशी घोर युद्ध झाले. हे मुनिश्रेष्ठा, ते युद्ध पंधरा दिवस चाललें व यमलोकाची वृद्धि झाली. बौद्ध सात लक्ष मेले व आर्यदेशांत उत्पन्न झालेले दोन लक्ष वीर धारातीर्थी पडले. नंतर ते भयभीत होऊन युद्ध सोडून घरीं गेले ३०- ३४. काष्ठाची सेना करून कळसूत्री यंत्राच्या प्रभावानें ते तिला चालवूं लागले. शूर पुरुषासहवर्तमान दहा हजार काष्ठाचे गज त्यानीं निर्माण केले ३५. घोड्यावर बसलेले एक लक्ष लाकडी स्वार रणागणाकडे वळले. एक हजार वीर महिषारूढ झाले. हजार कुरकाच्या पाठीवर बसले ३६.. हजार सिंहारूढ झाले, हजार वीरा वी हंसरूपी वाहने होतीं व कित्येक ककपक्षी गोमायु, गृध्र व श्याम यान्यावर आरूढ झाले होते. सात हजार लाकडी उट लाकडी शूरासह समरागणाकडे वळले. याप्रमाणें सव्वा लक्ष काष्ठसैन्यासह मनुष्य युद्धाकरिता आली ३७,३८. त्यानीं कृष्णाशादिकांनीं ज्याचें रक्षण केले आहे अशा दोन लक्ष वीराचा नाश केला. जिकडे तिकडे हाहाकार उडाला. आर्याचे सैन्य नाश पावले. पण हे पाहून रणपंडित जयंत आग्नेय शर घेऊन त्याचा, त्या काष्ठसैन्यावर प्रयोग करिता झाला. त्याबरोबर ते सर्व भस्म होऊन तेथेंच नाहीसे झाले. तेव्हा अवशिष्ट राहिलेले तीन लक्ष क्षत्रिय रणपंडित जयंताचा जयजयकार करिते झाले व त्यानीं त्याची पुन पुनः स्तुति केली. तेव्हा चीन देशामध्यें उत्पन्न झालेल्या बौद्धानीं घोडयावर बसलेले बीस हजार लोहमय वीर करून त्यास पाठविलें. तेव्हा धनुष्यबाण धारण करणारा बलाढय योगसिंह हत्तीवर बसून त्या लोखंडाच्या वीरास कंठप्रदेशीं ताडन करिता झाला. त्याबरोबर योगसिंहान्या शराने पीडित झालेले पाच हजार वीर नष्ट झाले. तेव्हा शूर बौद्धसिंह त्याचा पराक्रम पाहून लोहमय सिंहास निर्माण करिता झाला व त्याने त्यास योगसिंहावर पाठविले ३९–४५. त्या सिंहान्या योगाने तो वीर मरण पावला. तेव्हा योगसिंह अश्वावर आरूढ होऊन पुढें झाला व

हयारूढो जगाम ह ४६ स्वभल्लेन च तं सिंहं हत्वा तत्र जगर्ज वै । तदा तु बौद्धसिंहेन शार्दूलस्तत्र चोदितः ४७ सहयो भोगसिंहश्च तत्रैव मरणं गतः । मातुलौ मृत्युवशगौ दृष्ट्वा स्वर्णवतीसुतः ४८ कराल हयमारुह्य बौद्धसिंहमुपाययौ । शरमादाय वै शीघ्रं नाम्ना संमोहनं शुभम् ४९ मोहयित्वा रिपुबलं बौद्धसिंहसमन्वितम् । बद्ध्वा तान्बौद्धसिंहादीन्भूपान्दशसहस्रकान् ५० कलयन्त्रं च संचूर्ण्य कृष्णां शान्तिकमाययौ । तदा ते हर्षितास्सर्वे प्रपेष्य नगरं ययुः ५१ तद्देशं सुजनायासं सर्वसत्त्वसमन्वितम् । लुण्ठयित्वा बलात्सर्वे नृपदुर्गमुपाययुः ५२ बौद्धसिंहस्तदागत्य जयन्तेन विमोचितः । सुतां स्वां पद्मजां नाम्ना जयन्ताय ददौ मुदा ५३ दशकोटीः सुवर्णस्य चाह्लादाय तदा धनम् । सर्वैश्च बौद्धवृन्दैश्च तत्रैव शपथः कृतम् ५४ आर्यदेशं न यास्यामः कदाचिद्राष्ट्रहेतवः । इत्युक्त्वा तान्प्रणम्याशु समस्थानमकारयन् ५५ त्रिलक्षैश्च युतास्ते वै नेत्रपालगृहं गताः । ऋषय ऊचुः ॥ इन्दुलेन कथं सूत तत्र प्राणिकृता न हि ५६ सुप्रिया योगसिंहाद्यास्तन्नो वद विचक्षण । सूत उवाच ॥ आगता यमलोकाद्वै कतिचित्प्राणिनो भुवि ५७ तदा तु दुःखितो देवो महेन्द्रान्तमुपाययौ । देवराज नमस्तुभ्यं सर्वदेवप्रियङ्कर ५८ जयन्तो जगतीं प्राप्य मृताश्चीवयतीत्ययम् । अतो वै लोकमर्यादा विरुद्धा दृश्यते भुवि ५९ इति श्रुत्वा तु वचनं महेन्द्रो देवमाययौ । वडवामृतमाहात्म्यं तथा वै स्वर्गगां गतिम् ६० जयन्तस्य स्वपुत्रस्य मुमोद स सुरैः सह । इन्दुलश्च तदा दुःखी शारदां सर्वमङ्गलाम् ६१ पूजयित्वा विधानेन योगध्यानपरोऽभवत् । इति ते कथितं विप्र पुनः शृणु कथां शुभाम् ६२ नेत्रपालश्च बलवान्बहुपुत्रः

आपल्या भाल्यानें त्या सिंहास मारून तेथें गर्जना करूं लागला. तेव्हा बौद्धसिंहानें दुसरा व्याघ्र त्याच्यावर पाठविला. त्यामुळे घोड्यासहवर्तमान भोगसिंह मरण पावला. आपले दोन मातुल मृत्यु पावले आहेत असें पाहून स्वर्णवतीचा पुत्र कराल घोड्यावर बसून बौद्धसिंहापुढें आला व संमोहननामक शुभ बाण घेऊन त्याच्या योगानें त्यानें बौद्धसिंहासहवर्तमान शत्रूच्या सर्व सैन्यास मोहित केलें व त्या बौद्धसिंहादि दहा सहस्र राजास बांधून व कळयंत्राचा चूर करून तो कृष्णाशाजवळ आला. तेव्हा ते सर्वही आनंदित झाले व नगराचा विध्वंस करून त्यात शिरले. त्या नगराचें द्वार फार मोठें होतें. असो. तें सर्व सपत्तीने युक्त असलेलें नगर लुटून बलात्कारानें ते सर्व राजाच्या दुर्गामध्ये शिरले ४६-५२. इतक्यात जयतानें ज्यास सोडविलें आहे असा बौद्धसिंह तेथें आला व त्यानें पद्मजानामक आपली कन्या जयंताम आनंदाने दिली ५३. त्या प्रसंगी त्यानें आल्हादास दहा कोटि सुवर्ण दिलें व तेथेच सर्व बौद्ध समुदायानीं शपथ घेतली ५४. " आम्ही कोणत्याही राष्ट्रीय हेतूनें आर्यदेशांमध्ये कधींही येणार नाहीं" असें म्हणून व त्यास प्रणाम करून त्यानें त्याची लागलींच तेथून रवानगी केली ५५. तेव्हा तीन लक्ष सैन्यासह ते सर्व नेत्रपालाच्या गृहीं आले. ऋषि म्हणतातः-हे सूता, इंदुलानें युद्धामध्यें मेलेल्या या अतिप्रिय योगासिंहादिकास कसें जीवंत केलें नाहीं, तें आम्हास सांग. सूत म्हणतातः— अनेक प्राणी यमलोकातून भूलोकीं आले ५६,५७. तेव्हा अतिदुःखी झालेला यम महेंद्राजवळ जाऊन म्हणाला " हे देवराज, तुला नमस्कार असो. तूं सर्व देवांचें प्रिय करणारा आहेस ५८. जयत भूलोकीं जाऊन मेलेल्यास स्वतः जीवत करीत असतो; त्यामुळें भूलोकची मर्यादा विरुद्ध दिसूं लागली आहे " ५९. हें ऐकून महेंद्र आपला पुत्र जो जयंत त्याच्या वडवेचें अमृत व त्याचप्रमाणें अंतरिक्षादिल गति हरण करून देवासहवर्तमान आनंदित झाला. तेव्हा दुःखी झालेला इंदुल सर्वमंगलरूप शारदेचें विधानानें पूजन करून योगध्यानामध्यें परायण झाला. हे ब्राह्मणा, याप्रमाणें हा इतिहास मीं तुला सांगितला आहे. आता पुन. शुभ कथा ऐक. बलवान् नेत्रपाल

पुत्रान्वितः। दशकोटिमितं स्वर्णं तेभ्यो दत्त्वा समं समम् ६३ प्रस्थानं कारयामास चाढ्यानां बलशालिनाम्। ते वै द्विलक्षसैन्याढ्या स्वगेहाय ययुर्मुदा ६४ [३४६४] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगेतिहाससमुच्चय एकानत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥

सूत उवाच ॥ यदा ते चीनदेशस्थास्तदाहूतो नृपेण वै। कामपालेन भो विप्र लक्षणो नकुलांशकः १ जयचन्द्र महाभाग सावधान वचः शृणु। वैशाखशुक्लसप्तम्या मुहूर्तोऽयं दिनागमे २ अतो वै लक्षणो वारश्चैकाकी मां समाप्नुयात्। गृहीत्वा मत्सुतादोलीं गमिष्यति तवान्तिकम् ३ सैन्यान्वित च तं ज्ञात्वा महीराजो महाबलः। गृहीष्यति पराजित्य तस्माद्योग्यं वचो मम ४ इति तत्रत्यवचनं मत्वा राजा प्रसन्नधीः। लक्षण हस्तिनीसंस्थ शतशूरसमन्वितम् ५ आहूय प्रेषयामास कामपालाय धीमते। मार्गे पञ्चदिन वीरो वसित्वा तद्गृहं ययौ ६ तदा पद्माकरः श्यालो ज्ञात्वा लक्षणागतम्। भूमिराज समाहूय तेन युद्धमचीकरत् ७ लक्षणो नकुलांशश्च दृष्ट्वा शत्रुमुपस्थितम्। स्वशरैस्तर्पयामास राजराज महाबलम् ८ मूर्छयित्वा महीराज हत्वा पञ्चशतान्बली। कामपाल समागम्य नत्वा वासमकारयत् ९ उत्थितश्च महीराजो गत्वा पद्माकरं प्रति। वचन प्राह कार्यार्थी शृणु मित्र वचो मम १० लक्षणो मे महाञ्छत्रुस्स च त्वद्गेहमागतः। यदि दास्यसि तं बद्ध्वा त्वां मदङ्गं करोम्यहम् ११ इति श्रुत्वा स लोभात्मा दत्त्वा हालाहलं विषम्। बद्ध्वा त लक्षणं वीर महीराजाय चार्पयत् १२ हत्वा तान्छतशूरांश्च गुप्तवार्तामकारयन्।

जरी अनेक पुत्रांनीं युक्त होता तरी शोकयुक्त होऊन त्या सर्वांस दहा कोटि सुवर्ण सारखे वाटून देऊन त्या आठही बलाढ्य वीरांचें प्रस्थान करविता झाला. तेव्हां दोन लक्ष सैन्यांनीं युक्त होत्साते ते आनदानें आपल्या गृहीं आले ६०-६४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकीं कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा एकोणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २९ ॥

सूत ह्मणतात.— जेव्हां ते सर्व वीर चीन देशामध्ये होते तेव्हां, हे ब्राह्मणा, कामपालराजानें नकुलाचा अंश जो लक्षण त्यास बोलाविले. ' हे महाभाग्यशाली जयचद्रा, शांतपणें माझें वचन ऐक. वैशाख शुक्ल सप्तमीस सूर्योदयसमयीं मुहूर्त पाहिला आहे. यास्तव, लक्षण वीर एकटाच मजकडे येऊं दे व माझ्या कन्येची डोली घेऊन तुजजवळ परत येईल १-३. कारण, तो सैन्यासह आहे असें जाणून महाबलाढ्य महीराज त्याचा पराजय करून कन्येचें हरण करील. यास्तव, माझें हें वचन उचित आहे ' ४. याप्रमाणें त्याचें वचन योग्य समजून ज्याचें अंतःकरण प्रसन्न झाल आहे असा राजा हस्तिनीवर बसलेल्या लक्षणास शभर शूरासह परत बोलावून बुद्धिमान् कामपालाकडे पाठविता झाला. मार्गामध्ये पाच दिवस राहून तो त्याच्या घरीं गेला ५,६. तेव्हां त्याचा पद्माकरनामक शालक, लक्षण आला आहे असें जाणून महीराजास बोलावून त्याच्याशीं युद्ध करिता झाला ७. पण नकुलाश लक्षण, शत्रु येऊन थडकला आहे असें पाहून त्या महाबलाढ्य राजाधिराजास आपल्या बाणानी तृप्त करिता झाला. पाचशें बलाढ्य वीरास मारून व महीराजास मोहित करून तो कामपालाकडे आला व त्यास नमस्कार करून तेथे राहिला ८,९. इकडे महीराज उठला व पद्माकराकडे जाऊन तो कार्यसाधु त्यास ह्मणाला " हे मित्रा, मी काय ह्मणतो ते ऐक १०. लक्षण माझा मोठा शत्रु आहे व तो तुझ्या गृहीं आला आहे. यास्तव, त्यास बाधून जर तूं मला देशील तर मी तुला आपलें अग करीन " ११. हें ऐकून त्या लोभ्याने लक्षण वीरास हालाहल विष देऊन व त्यास बाधून महीराजाच्या स्वाधीन केलें. त्याने लक्षणाच्या शभर शूरासही मारिले व ही सर्व वार्ता गुप्त

ज्ञात्वा तत्पद्मिनीं नारीं दुःखितालप्य वै भृशम् १३ चण्डिकां पूजयामास पतिमङ्गलहेतवे ।
तदा प्रसन्ना सा देवी वरदा सर्वमङ्गला १४ आश्वास्य पद्मिनीं नारीं लक्षणान्तमुपाययौ ।
स्वप्ने तामाह सा देवी ह्रीं फट् घेघे जप कुरु १५ अस्य मन्त्रप्रभावाच्च सर्वविघ्नः प्रणश्यति ।
स बुद्ध्वा लक्षणो वीरस्तं मन्त्रं च जजाप ह १६ आषाढे मासि संप्राप्ते कृष्णांशाद्या गृहं ययुः ।
तालनश्च युतस्ताभ्यां कान्यकुब्जमुपाययौ १७ न दृष्टो लक्षणो वीरो जयचन्द्रप्रियङ्करः ।
ज्ञात्वा तत्कारणं तेभ्यः कृतं योगमयं वपुः १८ धान्यपालः काम्यधारी वीणाधारी च तालनः ।
लल्लसिंहो मृदङ्गाङ्को ययुस्ते वै महावतीम् १९ सभां परिमलस्यैव गत्वा ते योगरूपिणः ।
चक्रुर्गानं मुदा युक्ताः सर्वे ते मोहमागताः २० प्रसन्नश्च तदा राजा मुक्तामालां स्वकण्ठगाम् ।
तालनाय ददौ प्रीत्या ताभ्यां स्वर्णाङ्गुलीयकम् २१ तदा ते हर्षिता. सर्वे कृष्णांशं प्रति चाययुः ।
ज्ञात्वा कृष्णांश एवापि धृत्वा योगमयं वपुः २२ ययौ बिन्दुगढं वीरस्तालनाद्यैस्समन्वितः ।
हाटमध्ये समागम्य कृत्वा रासोत्सवं शुभम् २३ गेहं पद्माकारस्यैव गत्वा ते ननृतुर्मुदा ।
एतस्मिन्नन्तरे सर्वा योषितस्तत्र चागताः २४ वेणुवाद्ययुतं वीरं कृष्णांशं ददृशुर्मुहुः ।
मोहितास्तस्य गानेन जडीभूताः प्रयेछते २५ तदा तु पद्मिनी नारी सर्वलक्षणसंयुता ।
ज्ञात्वा कृष्णांशमेवापि रुरोद चिरमातुरा २६ उवाच च विलप्याशु मत्पतिर्लक्षणो बली ।
महीराजेन शूरेण कारागारे बलात्कृतः २७ अहं योषा भवान्योगी कथं कार्यं भविष्यति ।
इति श्रुत्वा तु स नृपो भुजमुत्थाय सत्वरम् २८ आश्वास्य पद्मिनीं नारीं ययुस्ते देहलीं प्रति ।

ठेविली. पण हें जाणून पद्मिनी स्त्री दुःखित झाली व अतिशय विलाप करून पतीच्या कल्याणाकरिता चंडिकेचें पूजन करिती झाली. तेव्हा ती वरदा व सर्वमंगला देवी प्रसन्न झाली १२-१४ व पद्मिनीस धीर देऊन लक्षणाकडे आली. स्वप्नामध्यें ती त्यास म्हणाली " ह्रीं फट् घेघे " या मंत्राचा जप कर. या मंत्राच्या जपाने सर्व विघ्नाचा नाश होईल. " तेव्हा तो लक्षण जागा झाला व त्या मंत्राचा जप करू लागला. इतक्यात आषाढ महिना जो लागत आहे तों कृष्णाशादिक गृहीं परत आले. पुढें तेली व तांबोळी यांच्यासह तालन कान्यकुब्जास गेला १५-१७. पण त्याना जयचंद्राचे प्रिय करणारा लक्षण वीर तेथें दिसला नाहीं. तेव्हा त्याचे कारण समजून घेऊन त्यानीं योगमय शरीर केले. धान्यपाल झांज धरणारा झाला. तालनानें वीणा उचलला. लल्लसिंहाने मृदंग पाठीवर बांधला व ते महावतीस गेले. ते योगरूपी वीर परिमलाच्या सभेस जाऊन आनंदानें गायन करिते झाले. त्यामुळे ते सर्व मोहित झाले. इतक्यात प्रसन्न झालेल्या राजानें आपल्या कंठांतील मोत्याची माला तालनास दिली व त्या दुसऱ्या दोघांस प्रेमानें सुवर्णाच्या अंगठ्या दिल्या. तेव्हा ते सर्वही आनंदित होऊन कृष्णाशाकडे आले. तेव्हा त्याचा हेतु जाणून वीर कृष्णाशही योगमय शरीर धारण करून तालनादिकासह बिदुगढाकडे गेला. बाजारामध्यें उभें राहून ते सुंदर रासोत्सव करू लागले. पुढे ते पद्माकाराच्या गृहीं जाऊन आनंदानें नाच करूं लागले. इतक्यात स्त्रियाही तेथें आल्या १८-२४ व वेणुयुक्त वीर कृष्णाशास वारंवार पाहून त्या मोहित झाल्या. त्याच्या गायनाने त्या जड झाल्या. त्यावेळीं सर्व लक्षणांनीं युक्त असलेली पद्मिनी कृष्णाशास ओळखून फार व्याकुळ होऊन रडू लागली व रडत असताना ती लागलेंच म्हणाली, ' माझ्या बलाढ्य पति लक्षणास शूर महीराजाने बलात्कारानें कारागृहात टाकिले आहे २५-२७. मी स्त्री व तुम्ही योगी. तेव्हा कार्य कसें होणार ? ' हें ऐकून तो राजा लागलाच आपला हात वर करून पद्मिनी स्त्रीस धीर देता झाला व ते सर्व लागलेंच देहलीस

राजद्वारमुपागम्य कृष्णांशस्य ननर्त ह २९ महीराजस्तु बलवान्प्रसन्नस्तस्य लीलया । वाञ्छितं ब्रूहि कृष्णाङ्ग सर्वं योगिन्ददाम्यहम् ३० इति श्रुत्वा भूपवचो विहस्यावाच्च तं प्रति । कारागारं लोहमयं नृपयोग्य च मे नृप ३१ दर्शयाशु स्वकीयं वै भवान्भूपशिरोमणिः । इति श्रुत्वा स नृपतिर्मोहितः कृष्णलीलया ३२ दर्शयित्वा च वै शीघ्र पुनस्तेभ्यो ददौ धनम् । ततस्ते योगिनस्सर्वे संप्राप्य च महावतीम् ३३ नत्वा परिमलं भूप कथित्वा सर्वकारणम् । स्वसेनां संजयामास चाह्लादश्च नृपाज्ञया २४ पञ्चलक्षा महावत्या हयारूढास्समास्थिताः । तालनस्सप्तलक्षाश्च सैन्यानाहूय चागतः ३५ एवं द्वादशलक्षाश्च क्षत्रिया रणदुर्मदाः । देहलीं च ममाजग्मुस्सर्वशस्त्रसमन्विताः ३६ एतस्मिन्नन्तरे मन्त्री चन्द्रभट्टो विशारदः । सर्वशास्त्रार्थकुशलो वैष्णवीशक्तिपूजकः ३७ महीराजं समागम्य वचः प्राह शृणुष्व भोः । मया वै च रहःक्रीडा दृष्टा देवीप्रसादतः ३८ तत्रोदयश्च कृष्णांश पूर्णब्रह्माणमागमत् । वचः प्राह प्रसन्नात्मा शृणु त्व सत्त्वविग्रह ३९ अग्निवंशविनाशाय चाद्य यास्यामि देहलीम् । हत्वाऽह कौरवांशांश्च स्थापयित्वा कलिं भुवि ४० पुनस्तवान्तिकं प्राप्य रहःक्रीडां करोम्यहम् । इत्युक्त्वा बिन्दुलारूढः स वीरस्त्वामुपस्थितः४१ इत्यहं श्रुतवान्भूप कृष्णांश योगनिद्रया । इति तस्य वचः श्रुत्वा स भूपो विस्मयान्वितः ४१ भयभीतः सहस्रांश्च शूरानाहूय सत्वरम् । तेभ्यश्च लक्षण दत्त्वा वचनं प्राह तान्प्रति ४३ पद्माकराय भूपाय गत्वा दत्ताशु लक्षणम् । ममान्तिकमुपागम्य कारण वदताशु तत् ४४ इति श्रुत्वा तु ते सर्वे बह्निवश्या महाबला । गत्वा तत्र तथा कृत्वा महीराजमुपागमत् ४५ भगदन्तश्च तेषां तु सहस्राणां च नायकः । महीराजं वचः प्राह शृणु तत्कृपभाषितम् ४६ पद्मिनी मे स्वसा राजन्गुप्तविद्यावि-

---

आले. राजद्वारीं येऊन कृष्णाश नाचूं लागला व त्याच्या लीलेनें प्रसन्न झालेला बलवान् महीराज "हे कृष्णवर्ण योगिन्, तुला काय हवें ? सांग. ह्मणजे मीं तें तुला देईन" २८–३०. असें राजाचें वचन ऐकून तो त्यास हंसून ह्मणाला "हे राजा, राजांच्या योग्य असा लोहमय कारागार तूं मला त्वरित दाखव. आपण राजाचे शिरोमणि आहांत." हें ऐकून कृष्णाशाच्या लीलेच्या योगानें मोहित झालेला राजा त्यास आपला कारागार दाखवून पुष्कळ धन देता झाला. नंतर ते सर्व योगी महावतीस आले. त्यानीं परिमलराजास नमस्कार करून सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हां राजाच्या आज्ञेनें आल्हाद सर्व सेना तयार करिता झाला. महावतींतील पांच लक्ष वीर घोड्यावर बसून तयार झाले. तालन सात लक्ष सैन्यास घेऊन आला. याप्रमाणें रणाविषयीं मदोन्मत्त असलेले बारा लक्ष क्षत्रिय सर्व शस्त्रासहवर्तमान देहलीस आले ३१-३६. इतक्यांत सर्व शास्त्रार्थामध्यें निपुण असलेला व वैष्णवी शक्तीची पूजा करणारा चतुर मंत्री चंद्रभट्ट महीराजाजवळ येऊन ह्मणाला "राजा, ऐक. मी देवीच्या प्रसादानें एकांतक्रीडा पाहिली ३७,३८. त्यांत कृष्णाश उदय पूर्ण ब्रह्माकडे गेला व प्रसन्न मनानें ह्मणाला "हे सत्त्वरूप ईश्वरा, ऐक. अग्निवंशाचा नाश करण्याकरिता मी आज देहलीस जात आहें. मी कौरवाच्या अंशापासून झालेल्या राजास मारून, भूलोकीं कलीची स्थापना करून, पुनः तुझ्याजवळ येऊन एकांतक्रीडा करीन". असे बोलून बिंदुलावर आरूढ झालेला तो वीर तुझ्याकडे येण्याकरितां निघाला आहे ३९-४१. हे राजा, योगनिद्रेनें कृष्णाशाचें हें वचन मीं ऐकिलें आहे." हें त्याचे वचन ऐकून तो राजा आश्चर्यचकित झाला व भयभीत होऊन त्यानें लागलेंच सहस्र शूरास बोलाविलें व लक्षणास त्याच्या स्वाधीन करून तो त्यास असें ह्मणाला:—तुम्ही जाऊन ह्या लक्षणास पद्माकर राजाच्या स्वाधीन करा व त्वरित माझ्याकडे येऊन मला कळवा'. हें ऐकून अग्निवंशात उत्पन्न झालेले ते सर्व वीर तेथें

शारदा । तया यज्ञपतिर्देवः सम्यगाराधितः पुरा ४७ दत्तं तेन वर रम्यमन्तर्धानमयं परम् ।
सा तु तं लक्षणं कान्तमन्तर्धानं करिष्यति ४८ इति श्रुत्वा स नृपतिः परमानन्दमाप्तवान् । एत-
स्मिन्नन्तरे प्राप्ता कृष्णांशाद्या महाबलाः ४९ रुरुधुर्देहलीं सर्वा महीराजेन पालिताम् । स
तदा पृथिवीराजो गृहीत्वा बहुभूषणाम् ५० सर्वेभ्यश्च ददौ प्रेम्णा वचनं प्राह नम्रधीः ।
लक्षणो नाम ते राजा कारागारे न वै मम ५१ यदि मन्नगरे चास्ति तर्हि ते रोष ईदृशः ।
इत्युक्त्वा तं च कृष्णांशं दर्शयामास वै गृहम् ५२ महादेवस्य शपथं कृतवान्भूपतिर्भयात् ।
तदोदयो भूपवचः सत्यं मत्वा सदुःखित ५३ स्वकीयै सह संप्राप्तो ग्राम बिन्दुगढं शुभम् ।
कामपालस्तु तच्छ्रुत्वा कृष्णांशागमनं बली ५४ बलिं बहु गृहीत्वाशु कृष्णांशं शरणं ययौ ।
प्राञ्जलिः प्रणतो भूत्वा वचनं प्राह भीरुकः ५५ सुता मे पद्मिनी नारी लक्षणेन समन्विता । न
ज्ञाता क्व गताऽस्माभिस्सत्यं सत्यं ब्रवीम्यहम् ५६ इति तद्वचनं श्रुत्वा कृष्णांशः स्वबलैस्सह ।
कान्यकुब्जं समागत्य जयचन्द्रमुवाच ह ५७ भ्रातृजस्तव भूपाल पद्मिन्या लक्षणोऽन्वितः ।
कामपालगृहे नास्ति निश्चितो बहुधा मया ५८ न जाने क्व गतो राजा मम प्राणसमो भुवि ।
यदि भूप न पश्यामि सत्यं प्राणांस्त्यजाम्यहम् ५९ हा रत्नभानुतनय विष्णुभक्त शुभङ्कर ।
स्वमित्रं मां परित्यज्य कां दिशं गतवान्भवान् ६० इत्युक्त्वा मूर्छितश्चासीत्कृष्णांशो वैष्णवप्रिय ।
तदा स्वर्णवती देवी स्वदास्या शोभया सह ६१ धृत्वा शुकमयं रूपं तत्रागत्य स्वमूर्तिगा ।

जाऊन व तसे करून महीराजाकडे परत आले. त्या सहस्र वीराचा नायक भगदत्त ह्मणून होता. तो महीराजास ह्मणाला, " त्या राजाने काय सांगितलें तें ऐक. हे राजा, माझी भगिनी पद्मिनी गुण विद्येमध्यें निपुण आहे. तिनें पूर्वी यज्ञपति देवाची उत्तम प्रकारें आराधना केली होती ४२-४७. तेव्हा त्यानें तिला गुप्त होण्याचा उत्तम वर दिला आहे. तो या आपल्या लक्षण पतीस गुप्त करील " ४८. हें ऐकून त्या राजास मोठा आनंद झाला. इतक्यात महाबलाढ्य कृष्णाशादिक आले ४९. त्यानीं महीराजानें रक्षिलेल्या सर्व देहलीस वेढा घातला. तेव्हा तो पृथ्वीराज पुष्कळ भूषणें घेऊन त्या सर्वांस देता झाला व नम्रपणें आणि प्रेमानें त्यास ह्मणतो " लक्षणनामक राजा माझ्या कारागारात नाहीं ५०-५१. तो जर माझ्या नगरामध्ये असता तर तुमचा राग योग्य होता. " असे ह्मणून त्याने कृष्णाशास आपलें गृह दाखविलें व भीतीमुळे त्या राजानें महादेवाचीही शपथ घेतली. तेव्हा तें राजाचें वचन सत्य मानून अतिशय दुःखित झालेला उदय आपल्या लोकांसह शुभ बिंदुगढग्रामीं आला. तेव्हा बलाढ्य कामपाल कृष्णाशाचें आगमन झालें आहे असें ऐकून पुष्कळ नजराणा घेऊन लागलाच कृष्णाशास शरण गेला; व हात जोडून व नम्र होऊन तो म्याड राजा त्यास ह्मणाला ५२-५९ " माझी पद्मिनी नारी या नात्याची कन्या लक्षणासह कोठें गेली हे आह्मास ठाऊक नाहीं. मी हें तुला सत्य सत्य सांगत आहे " ५९. हें त्याचें वचन ऐकून कृष्णाश आपल्या सैन्यासह कान्यकुब्जेशास आला व जयचंद्रास ह्मणाला.— " राजा, पद्मिनीसह तुझा भातृपुत्र लक्षण कामपालाच्या गृहीं नाहीं. मी पुष्कळ प्रकारें आपली खात्री करून घेतली आहे. भूलोकीं माझ्या प्राणासारखा असलेला तो राजा कोठें गेला तें समजत नाहीं. हे राजा, तो जर मला न दिसला तर मी खचित प्राणत्याग करीन ५७-५९. ' हे रत्नभानुपुत्रा, हे विष्णुभक्ता, हे शुभ कृत्य करणाऱ्या, मज आपल्या मित्रास सोडून तू कोणत्या दिशेस गेला आहेस ? ' असे ह्मणून विष्णुभक्तास प्रिय असणारा कृष्णाश मूर्च्छित झाला. तेव्हा देवी स्वर्णवती आपली दासी जी शोभा तिच्यासह पोपटाचें रूप धरून तेथें आली. व तिनें म्लेच्छभाषेमध्ये निपुण असलेल्या त्या शोभेस

तया संप्रेषिता शोभा म्लेच्छमाया विशारदा ६२ जयचन्द्रमुपागम्य धृत्वा दिव्यमयं वपुः । उवाच वचनं तत्र शृणु भूपशिरोमणे ६३ मायाविनीं च मां विद्धि शोभनानामविश्रुताम् । दम्पती तव भूपाल संहृतौ येन यत्र वै ६४ तत्राहं च गमिष्यामि महामदसमन्विता । आह्लादश्चेन्दुलो वीरो देवा वै तालनो बली ६५ कृष्णांशपालितास्सर्वे यास्यामो भूपतीन्वयम् । इत्यक्त्वा शोभना वेश्या कृत्वा योगमयं वपु ६६ महामदं समारुह्य पैशाचं रुद्रकिङ्करम् । प्रययौ तान्पुरस्कृत्य योगबलान्महाबलान् ६७ आह्लादो गजसंस्थो वै करालारूढ इन्दुलः । तालनः सिंहिनीसंस्थो देवसिंहो मनोरथे ६८ कृष्णांशं बिन्दुलारूढो नर्तयामास तं हयम् । कामरूपमयं देशं शतयोजनगामिनः ६९ बलवन्तश्च संप्राप्ता गेहं गेहं जनं जनं । लक्षणं शोधयामासुर्न प्राप्तस्तत्र तं नृपम् ७० पुनर्मयूरनगरं शोभना तै समन्विता । चिन्वती तं मनुष्येषु न प्राप्तस्तत्र वै नृपः ७१ पुनरिन्नगढग्रामं शोभना च जनं जनं । लक्षणं मृगयामास न प्राप्तस्तत्र लक्षणः ७२ गत्वा बाह्लीकनगरं शोभना तैस्समन्विता । लक्षणं च नृपश्रेष्ठं नापश्यत्तत्र दुःखिता ७३ पुनः स्वदेशमागम्य बाह्लीक म्लेच्छवासिनम् । मर्कटेश्वरमीशानं तत्राहवनिवासिनः ७४ पूजयित्वा च सा वेश्या गाननृत्यपराऽभवत् । स देवो भूमिमध्यात्तु समागम्य मुदान्वितः ७५ कृष्णांशं प्रणतो भूत्वाऽब्रवीन्म्लेच्छपपूजकः । अहं कालाग्निरुद्रेण भूमिगर्ते सुरोपितः ७६ असमर्थं च मां विद्धि गच्छ वीर यथासुखम् । इति श्रुत्वा च सा शोभा निराशाऽभूत्तदा

तिचे रूप देऊन राजाकडे पाठविलें. तेव्हा ती दिव्य शरीर धारण करून जयचंद्राजवळ येऊन म्हणाली 'हे भूपशिरोमणे, ऐक. शोभना या नावानें प्रसिद्ध असलेली मी मायाविनी आहे, असे जाण. हे राजा, तुझ्या पुत्रास व स्नुषेस ज्यानें जेथें नेलें आहे ६०-६४. तेथें मी महामदासह जाईन. आल्हाद, वीर इंदुल, देवसिंह व बलाढ्य तालन असे आह्मी सर्व मिळून कृष्णांशाकडून रक्षित होत्साते राजकुलामध्यें जाऊं '. असें बोलून शोभना वेश्येनें आपलें योगमय शरीर केलें ६५, ६६ व ती रुद्रकिंकर पैशाच महामदावर आरूढ होऊन योग्याचा वेष धारण करणाऱ्या त्या महाबलवानास पुढें करून निघाली ६७. त्यावेळीं आल्हाद हत्तीवर, इंदुल करालावर, तालन सिंहिनीवर, देवसिंह मनोरथावर व कृष्णांश बिंदुलावर आरूढ होऊन त्या घोड्यास नाचविता झाला. शंभर योजने गमन करणारे ते बलवान् कामरूपमय देशांत प्राप्त झाले. त्यानीं घरोघर व प्रत्येक मनुष्यापाशीं लक्षणाचा शोध केला, पण त्या राजास त्यानी पाहिलें नाहीं ६८-७०. तेव्हा शोभना त्याच्यासहवर्तमान मयूरनगरास आली व तिने तेथील मनुष्यामध्यें त्याला शोधिलें, पण तो सापडला नाहीं. पुनः शोभना इन्नगढग्रामीं आली व प्रत्येक मनुष्याजवळ जाऊन तिनें लक्षणाचा शोध केला; पण तो तिला सापडला नाहीं ७१,७२. तेव्हा शोभना त्या वीरासहवर्तमान बाल्हीकनगरास गेली. पण तेथेंही नृपश्रेष्ठ लक्षण सापडला नाहीं. तेव्हा ती दुःखी झाली ७३. व पुनरपि जेथें म्लेच्छ राहत होते अशा बाहीकदेशास येऊन ईश्वर जो मर्कटेश्वर त्याची ती सेवा करू लागली. ती वेश्या त्या देवाचे पूजन करून गायन व नृत्य यामध्यें तत्पर झाली असता तो देव आनंदानें भूमीतून वर आला व कृष्णांशास नमस्कार करून तो म्लेच्छपूजक त्यास म्हणाला " कालाग्निरुद्रानें मला भूमीमध्यें गाडून टाकिलें आहे त्यामुळें मी असमर्थ आहे असें जाण व हे वीरा, तुला जेथें जावयाचें असेल तेथें जा. " हें ऐकून ती शोभा स्वतः निराश झाली व पुन. स्वर्णावतीजवळ आली व तिनें सर्व वृत्तांत तिला सांगितला. तेव्हा चैत्राचा शुक्लपक्ष लागला असता व कृष्णांशास तिसावे वर्ष लागलें असता त्यास धीर देऊन स्वर्णावती चंडिकेचें पूजन करिती झाली. भोजन व आच्छादन यावाचून तिचें नवरात्र गेलें. तेव्हा

स्वयम् ७९ पुनः स्वर्णवतीं प्राप्य सर्वमेवादिनोऽब्रवीत् । त्रिंशदब्दे च कृष्णांशो चैत्रशुक्ले समागते ८८ तानाश्वास्य सुवर्णाङ्गी पूजयामास चण्डिकाम् । नवरात्रं गत तस्या भोजनाच्छादन विना ८९ निशीथेऽन्ते क्षमःमाप्ते गत्वाह जगदम्बिका । पद्मिनी नाम या नारी मणिदेवस्य वै प्रिया ८० जाता सा कामपालस्य गृहे यज्ञावमानिता । सेनापति कुबेरस्य मणिदेवो हि संस्मृतः ८१ पूर्वं हि भीमसेनेन यक्षयुद्धेषु घातितः । तदा तत्पद्मिनी नारी देवदेवमुमापतिम् ८२ तुष्टाव च निराहारा मत्पति देहि शङ्कर । शतवर्षान्तरं देवो महादेव उवाच ताम् ८३ कलौ विक्रमकाले हि शतद्वादशकेऽन्तिके । नकुलांशं च सम्प्राप्य भुक्त्वा तेन महत्सुखम् ८४ तद्वियोगेन सत्यक्त्वा देहं पद्मानुवासितम् । स्वपतिं च तदा प्राप्य कैलास पुनरेष्यसि ८५ महावतीं पुरीं रम्यां राष्ट्रपालाय शारदा । करिष्यति तदा देवी मणिदेवस्तु त्वत्पतिः ८६ तया विरचितां भूमौ ग्रामरक्षार्थमुद्यतः । प्राप्तस्त्वां पद्मिनीं नारीं कैलास पुनरेष्यति ८७ अतः स्वर्णवति त्व वै कैलास गुह्यकालयम् । गत्वाशु पद्मिनीं तत्र बोधयाशु वचः कुरु ८८ इति श्रुत्वा स्वर्णवती पद्मिनीं प्रति चागमत् । वृत्तान्त च कथित्वाऽग्रे पद्मिनी तु दयातुरा ८९ कामपालगृहं प्राप्य तत्र वासमकारयत् । स्वर्णवत्यपि सम्प्राप्ता तदा शीघ्र महावतीम् ९० तस्यां गतायां गेहे वै पद्मिन्या लिखितं शुभम् । पत्रं परिमलो राजा वर्तयामास हर्षितः ९१ आगच्छ सेनया सार्धं कृष्णांशं बलवत्तरम् । जित्वा पद्माकर बन्धु मत्पतिं मोचयाशु वै ९२ भूतले लक्षणो राजा स्थितः पद्माकरार्तिगः । इति ज्ञात्वा च कृष्णांशो लक्षद्वादशसैन्यया ९३ रुरोध नगरीं

शेवटच्या दिवशी मध्यरात्री चोहोंकडे अंधार पडला असता जगदाम्बिका तिच्याजवळ येऊन म्हणाली. 'पद्मिनीनामक जी नारी ती मणिदेवाची प्रिया होय. पण यज्ञाचा जिनें अवमान केला आहे अशी ती कामपालाच्या गृहामध्यें उत्पन्न झाली. मणिदेव हा कुबेराचा सेनापति म्हणून म्हटलें आहे. पूर्वी यक्षयुद्धामध्ये भीमसेनानें त्यास मारिले. त्यावेळीं ती पद्मिनी नारी देवाधिदेव उमापतीची उपासना करून स्तुति करिती झाली व म्हणाली " हे शंकरा, माझा पति दे. " तेव्हा शभर वर्षानीं महादेव तिला म्हणाला ७४-८३ " कलीमध्ये विक्रमकाल लागून बाराशे वर्षे झालीं असता नकुलाशाची प्राप्ति होईल व त्याच्यासह महत्सुखाचा भोग घेऊन, त्याच्या वियोगानें पद्मा या नावानें युक्त असलेल्या शरीरास सोडून नंतर तुला आपल्या पतीची प्राप्ति होईल व तू पुनः कैलासास येशील. शारदा जेव्हा रम्य महावतीनगरी राष्ट्रपालाच्या अधीन करील, तेव्हाच ती देवी ग्रामाच्या रक्षणाकरिता तयार असलेल्या मणिदेवास भूलोकीं निर्माण करील व तो तुझा पति होईल. त्यास तुज पद्मिनीची प्राप्ति झाली असता तो पुनः कैलासास येईल. यास्तव, गुह्यकाचें स्थान जे कैलास तेथें जाऊन तू पद्मिनीस याचे स्मरण कर हें माझें वचन तू त्वरित कर. " हे ऐकून स्वर्णवती पद्मिनीकडे आली व तिनें तिला हा वृत्तात सांगितला असता पद्मिनी दयेने व्याकुल झाली व कामपालाच्या गृहीं येऊन राहिली. तेव्हा स्वर्णवतीही लागलीच महावतीस आली ८४-९०. ती गेली असता पद्मिनीने लिहिलेले शुभ पत्र राजा परिमल याने उघडलें व तो आनंदित झाला. ' बलाढ्य कृष्णांशास घेऊन तूं सैन्यासह येथें ये व माझ्या पद्माकर बंधूस जिंकून माझ्या पतीला त्वरित सोडीव. लक्षणराजा पद्माकराच्या जाचामध्ये पडला आहे, हें जाणून कृष्णांश बारा लक्ष सैन्यासह कामपालाने जिचे रक्षण केलें होते अशा त्या सर्व नगरीस वेढा देता झाला. कन्येच्या आज्ञेने पद्माकरासह तीन लक्ष सैन्यानीं युक्त होत्साता बलाढ्य

सर्वा कामपालेन रक्षिताम् । कामपालस्तु बलवांस्त्रिलक्षबलसंयुतः ९४ सुताङ्गया ययौ युद्धं सार्द्धं पद्माकरेण वै । तयोश्चासीन्महद्युद्धं सनयोरुभयोस्तदा ९५ अहोरात्रप्रमाणेन भूपसेना पराजिता । पद्मिनीं शरणं प्राप्य तदा भ्राता पिता स्थितः ९६ तयोर्विजयमेवाशु यथा प्राप्तं चकार सा । अन्तर्द्धानमयं मन्त्रं तयोरर्थे च सा ददौ ९७ तौ तत्रान्तर्हितौ भूत्वा स्वखड्गेन रिपोर्बलम् । अयुतं जघ्नतुर्मन्त्रौ तदा ते विस्मयं गताः ९८ तालनाद्या रणं त्यक्त्वा कृष्णांशं शरणं ययुः । कृष्णांशोऽपि तदा दुःखी ध्यात्वा सर्वमयीं शिवाम् ९९ दिव्यदृष्टिस्ततो जातः समाप्य तमयुध्यत । नभोगत कामपालं तथा पद्माकरं नृपम् १०० बद्ध्वा तत्र मुदाविष्टो लक्षणं प्राप्य निर्भयः । दोलामारोप्य तां देवीं स्वगेहाय मुदा ययौ १ जयचन्द्राय भूपाय दत्त्वा वै तौ च भूपती । लक्षण पद्मिनीं चैव कृतकृत्यस्तदाऽभवत् २ जयचन्द्रोऽपि बलवान्दृष्ट्वा गेहं स्वदम्पती । ददौ दानं द्विजातिभ्यो भूपतिं समपोजयत् ३ ज्येष्ठे मासि सिते पक्षे कृष्णांशो गृहमागतः । इति ते कथितं विप्र कृष्णांशचरितं शुभम् ॥ पुनस्ते कथयिष्यामि दृष्ट्वा योगबलेन वै १०४ [२५६८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि च युगखण्डापरपर्याये कलियुगीतिहाससमुच्चये त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥

सूत उवाच ॥ शृणु विप्र महाभाग चन्द्रभट्टस्तदा स्वयम् । महीराजं सदःस्थं तं चन्द्रभट्टस्समागतः १ तमागतं समालोक्य स राजा शोकतत्परः । उवाच वचनं रम्यं शृणु मन्त्रिवर प्रभो २ कृष्णांशाद्यैर्महाशूरैर्मद्ग्रामे भयमागतम् । कदा ते च मरिष्यन्ति कण्टका मम दारुणा ३ इत्युक्तस्स तु शुद्धात्मा ध्यात्वा सर्वमयीं शिवाम् । वचनं प्राह राजानं शृणु भूप-

---

कामपाल युद्धास आला. त्यावेळीं त्या दोन्ही सैन्याचे मोठें युद्ध झालें. ते अहोरात्र चालले होते. शेवटीं राजाच्या सैन्याचा पराभव झाला. तेव्हा ते भ्राता व पिता पद्मिनीस शरण येऊन उभे राहिले ९१-९६. तेव्हा त्याना विजय प्राप्त होईल अशी तिने युक्ति केली. त्या दोघास तिनें गुप्त होण्याचा मंत्र दिला; तेव्हा ते दोघेही गुप्त राहून आपल्या खड्गानें रिपूचे दहा सहस्र सैन्य मारिते झाले. हें पाहून तालनादिक सर्व आश्चर्यचकित होऊन व युद्ध सोडून कृष्णाशास शरण आले. तेव्हा कृष्णाशही दुःखी होऊन सर्वव्यापी शिवेचे ध्यान करिता झाला ९७-९९. त्याबरोबर त्याला दिव्य दृष्टि प्राप्त झाली व त्यामुळें आकाशामध्यें असलेल्या राजा कामपालाशीं व पद्माकराशीं तो युद्ध करूं लागला १०० व त्यास बांधून मोठ्या आनंदाने तो निर्भय वीर लक्षणाजवळ आला. नंतर त्या देवीस मेण्यामध्यें बसवून ते सर्व आपल्या गृहाकडे जाऊं लागले. कृष्णाशाने लक्षण व पद्मिनी या दोघास जयचंद्रराजाच्या स्वाधीन केले व तो कृतकृत्य झाला १,२. बलवान् जयचद्रही तें दांपत्य घरीं आलें आहे असें पाहून ब्राह्मणास दाने देता झाला व त्याने राजास निरोप दिला ३. ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षीं कृष्णाश घरीं येऊन पोचला. याप्रमाणे, हे ब्राह्मणा, तुला हे कृष्णाशाचे शुभ चरित्र सांगितलें. आता मी योगसामर्थ्यानें जें पाहिले आहे तें तुला सांगेन १०४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥

सूत ह्मणतात.— हे महाभाग्यवान् ब्राह्मणा, ऐक. महीराज आपल्या गृहामध्ये बसला असतां स्वत. चद्रभट्ट त्याच्याकडे आला. तेव्हा तो आला आहे असे पाहून शोकामध्यें परायण असलेला राजा त्यास असे रम्य वचन ह्मणाला " हे प्रभो, हे मंत्रिश्रेष्ठा, ऐक १,२. महाशूर कृष्णाशादिकामुळें माझ्या नगरामध्यें मोठें भय आलें आहे. ते केव्हा मरतील ? ते माझे भयंकर शत्रु

शिरोमणे ४ जिष्णोरंशात्समुद्भूतो ब्रह्मानन्दो महावतीम् । स कृष्णांशसखा श्रेष्ठः सर्वदा प्रियकृत्परः ५ यदा च मलनापुत्रो देहं त्यक्त्वा गमिष्यति । तदा ते सर्वदेवांशा गमिष्यन्ति यतो-गताः ६ इत्येवं वादिनं धीरममात्यं च महीपतिः । वचनं प्राह नम्रात्मा कोऽप्यर्थश्चिन्तितो मया ७ एकाकिनं महाशूरं ब्रह्मानन्दं नृपोत्तमम् । समाहूय महीराजो द्विरागमनहेतवे ८ छद्मना घातयित्वा तं कृतकृत्यो भविष्यति । इत्युक्तं नृपतिं प्राह महीराजः प्रसन्नधीः ९ वचनं शृणु भो मित्र गच्छ शीघ्रं महावतीम् । मलनां च समागत्य बोधयित्वा तु तां स्वयम् १० समान्तिकमुपागम्य चिरंजीव सुखी भव । इति श्रुत्वा तु वचनं नत्वा तं च महीपतिः ११ रात्रौ घोर मुनिश्रेष्ठ मलनां प्राह निर्भयः । वधूस्तव महाराज्ञी वेला नाम सुरूपिणी १२ संप्राप्ता यौवनवती पतियोग्या शुभानना । कुजातिश्चैव कृष्णांशः श्रुतो राज्ञा महात्मना १३ अतो न प्रेषिता पुत्री तव पुत्राय धीमते । अतो मद्वचनं त्यक्त्वा कुरु कार्यं तव प्रियम् १४ मया सार्द्धं तव सुतो ब्रह्मानन्दो महाबलः । उर्वीयां नगरीं प्राप्य तदा मत्सैन्यसंयुतः १५ महीराजमुपागम्य पत्नीं शीघ्रमवाप्स्यति । नो चेन्ममाज्ञया वेला त्यक्त्वा कान्तं मरिष्यति १६ इति श्रुत्वा तु सा राज्ञी मोहिता दैवमायया । राजानं समुपागम्य भ्रातुर्वचनमुत्तमम् १७ कथयामास वै सर्वं श्रुत्वा भूपोऽब्रवीदिदम् । मही-पतिर्महाधूर्तो मद्विनाशाय चोद्यतः १८ तस्य वार्ता न मे रम्या कपटं तेन निर्मितम् । इति श्रुत्वा च मलना राजानं कोपसंयुतम् १९ वचनं प्राह भो राजन्यथा बन्धुस्तथा ह्यहम् । वचनं कुरु मे राजन्नो चेत्प्राणांस्त्यजाम्यहम् २० इत्युक्तवादिनीं रात्रौ तदा परिमलो नृपः । ब्रह्मानन्दं ददौ

आहेत ". तो असें ह्मणाला असता तो पवित्र मंत्री सर्वमयी शिवेचें ध्यान करून राजास ह्मणाला ' हे राजश्रेष्ठा, ऐक ४. अर्जुनाच्या अंशापासून ब्रह्मानद महावतींत निर्माण झाला आहे. तो कृष्णाशाचा सर्वोत्तम सखा असुन सर्वदा त्याचें प्रिय करण्यास तत्पर असतो. ज्यावेळीं तो मलनापुत्र देह सोडून जाईल तेव्हा ते सर्व देवाश आल्या ठिकाणीं परत जातील." याप्रमाणें बोलणाऱ्या त्या धीर अमात्यास नम्र स्वभावाचा महीपति ह्मणतो " मीं एक काहीं युक्ति योजिली आहे. नृपश्रेष्ठ व महाशूर ब्रह्मानंदास दुसऱ्या सणाकरिता एकाएकीं बोलावून महीराजानें त्यास कपटानें मारून कृतकृत्य व्हावें. " असें बोल-णाऱ्या त्या राजास ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा भूमिराज ह्मणतो " हे मित्रा, मी सागतां तसें कर. तूं त्वरित महावतीस जा व मलनेजवळ जाऊन तिला दोन उपदशाच्या गोष्टी सागून तूं पुनः मजकडे ये, व हे चिरंजीवा, तूं सुखी हो. " हें त्याचें ह्मणणें ऐकून व त्यास नमस्कार करून निर्भय महीपति रात्रीं मलनेजवळ जाऊन तिला घोर वचन सागता झाला. ' हे महाराज्ञि, वेला नामक तुझी अतिसुंदर स्वरूपा यौवनसंपन्न व पतियोग्य झाली आहे. पण त्या महात्मा राजानें कृष्णाश हलक्या जातीचा आहे असें ऐकिलें ९–१३ व त्यामुळे त्यानें आपली कन्या तुझ्या बुद्धिमान् पुत्राकडे पाठविली नाहीं. यास्तव, माझें ह्मणणें ऐकून तुला प्रिय असलेलें कार्य कर. तुझा महाबलाढ्य ब्रह्मानद पुत्र उर्वीयानगरीस येवो व तेथून माझ्या सैन्यासह महीराजाकडे गेल्यावर त्यास लागलींच पत्नी प्राप्त होईल. नाहीपेक्षा माझ्या सागण्यावरून वेला पतीस सोडून मरण पावेल' १४-१९. हें ऐकून ती राणी दैवयोगानें मोहित झाली. व राजाजवळ येऊन तिनें आपल्या भ्रात्याचें वचन त्यास सागितलें. तें ऐकून तो राजा असें ह्मणाला " महीपति मोठा धूर्त आहे. तो माझ्या नाशाकरिता सर्वदा टपलेला असतो. त्याची वार्ता मला मुळींच रम्य वाटत नाहीं. त्यानें हें काहीं तरी कपट रचिलें आहे. " हें ऐकून कोपाविष्ट झालेली मलना राजास ह्मणाली ' हे राजा, जसा बंधु तशीच मी. एक तर माझें वचन मान्य कर; नाहींपेक्षा मी प्राणत्याग करीन ' रात्रीं असे ह्मणणाऱ्या त्या मलनेस परिमलराजा ब्रह्मानंदास देता झाला. तेव्हां

तस्मै स सुतो मातृवत्सलः २१ मातुराज्ञां पुरस्कृत्य मातुलेन समन्वितः । रात्रौ च मातुलग्रामं संप्राप्य मुदितोऽभवत् २२ प्रातःकाले च संप्राप्ते हरिनागरमास्थितः । एकाकी देहलीं रम्यां प्रययौ दैवमोहितः २३ सायंकाले तु संप्राप्ते महीराजस्य मन्दिरे । अगमां दर्शनमास सुरूपां दिव्यविग्रहाम् २४ अगमा च समालोक्य परं हर्षमवापयौ । माघशुक्लस्य चाष्टम्यां ब्रह्मानन्दश्च निर्भयः २५ शालामां यांवितः सप्त ददर्श रुचिराननाः । विधवाश्च त्रयो नार्यश्चतस्रो धवसंयुताः २६ ब्रह्मानन्दं शरण्यं वाक्यमूचुर्मुदान्विताः । ब्रह्मानन्द महाभाग सावधानं वचः शृणु २७ एव पत्नी स्वयं काली वेला कलहरूपिणी । सजहार धवान्यौवनं वयं तु सुदुःखिनाः२८ तत्पत्यस्तु तत्तस्या गृहाणास्मान्मनोहर। धवान्वा देहि नो वीर पतिभंव मदान्वितः २९ इति श्रुत्वा वचस्तासां ब्रह्मानन्दो महाबलः । उवाच मधुरं वाक्य श्रुतिस्मृतिसमन्वितम् ३० पुरा सत्ययुगे नारी चोत्तमा च पतिव्रता । त्रेतायां मध्यमा जाता निकृष्टा द्वापरे पुनः ३१ अधमा हि कलौ नारी परपुंसोपभोगिनी । अतस्तु कलिकाले वै विवाहो विधवास्त्रियाः ३२ देवलेन शुभः प्रोक्तश्चासिलेन स्वयं स्मृतौ । सती सत्ये तु सा प्रोक्ता त्रेतायां पतिभस्मगा ३३ सती सा मध्यमा प्रोक्ता द्वापरे विधवा सती । ब्रह्मचर्यपरा ज्ञेया कलौ नास्ति सतीव्रतम् ३४ अतो यूयं मया सार्द्धं भुङ्क्ष्वध्वममलं सुखम् । इति श्रुत्वा प्रिय वाक्य विधवास्ताश्चपः स्त्रियः ३५ कृत्वा शृङ्गाररूपाणि भूषणानि च सर्वशः । ब्रह्मानन्दमुपागम्य समाश्लिङ्गनतत्पराः ३६ ता दृष्ट्वा मलनापुत्रो वचनं प्राह

तो मातृवत्सल पुत्र मातेची आज्ञा घेऊन आपल्या मातुलासहवर्तमान रातोरात मातुलग्रामीं गेला व तेथें पोंचल्यावर तो आनंदित झाला १७–२२. पुढें प्रातःकाल झाला असता हरिनागरावर बसलेला व दैवानें मोहित झालेला तो वीर एकटाच रम्य देहलीनगरीस गेला व सायंकाल झाला असता महीराजाच्या मंदिरात अलौकिक स्वरूप धारण करणाऱ्या आगमेच्या तो दृष्टीं पडला २३,२४. त्यास पाहून आगमेला मोठा आनंद झाला. माघशुक्ल अष्टमीस निर्भय ब्रह्मानंदानें ज्याची मुखें रमणीय आहेत अशा सात शालकाऱ्या स्त्रियास पाहिलें. त्यांपैकीं तीन स्त्रिया विधवा व चार सधवा होत्या २५,२६. त्यांतील विधवा आनंदयुक्त होत्साल्या ब्रह्मानंदास असें अतितीक्ष्ण वाक्य बोलल्या. " हे महाभाग्यवाना ब्रह्मानंदा, आमचें म्हणणें शांतपणें ऐकून घे. तुझी वेलानामक पत्नी स्वतः काली व कलहरूपिणी आहे. तिनें आमच्या पतीस मारिलें. व त्यामुळें आम्ही तारुण्यावस्थेंत अतिशय दुःख भोगीत आहों. यास्तव, हे सुंदरा, त्या आम्हा वीरपत्नींस, तू दे. तात्पर्य, हे मदयुक्त वीरा, एक तर आमचे पति तरी आम्हाला दे अगर तूं आमचा पति हो " २७–२९. हें त्याचे वचन ऐकून बलवान् ब्रह्मानंद श्रुति व स्मृति यास संमत असलेलें असें वाक्य बोलला ३० " पूर्वी सत्ययुगामध्यें स्त्री उत्तम व पतिव्रता होती. त्रेतायुगामध्यें मध्यम झाली; द्वापरामध्यें निकृष्ट झाली व कलियुगामध्यें स्त्री अधम व परपुरुषाचा उपभोग घेणारी झाली. यास्तव, कलिकालामध्यें विधवा स्त्रीचा विवाह देवलाने व स्वतः असितानें आपल्या स्मृतींत शुभ सांगितला आहे. सत्ययुगामध्यें स्त्री सती झटलेली आहे, त्रेतायुगात पतीसह भस्म होणारी स्त्री सती होय व ती मध्यमा म्हणून झटलेली आहे. द्वापरामध्यें ब्रह्मचर्यव्रतानें राहणारी विधवा स्त्री सती होय व कलियुगामध्यें सतीव्रत नाहींच म्हणून समजावें ३१–३४. यास्तव, तुम्ही माझ्यासह निर्मल सुखाचा उपभोग घ्या. "हें त्याचें प्रिय वाक्य ऐकून त्या तिघी विधवा स्त्रिया शृंगारमय रूप करून, सर्व प्रकारचीं भूषणें घालून ब्रह्मानंदाजवळ आल्या व त्यास आलिंगन देण्यास उत्सुक होऊन राहिल्या. तेव्हा निर्भय मलनापुत्र त्यास म्हणाला " माझ्या बंधूनें ज्यांस मारिलें आहे अशा पतींचा तुम्हीं उपभोग घेतला

निर्भयः। युष्माभिः पतयो भुक्ता ये च मद्वन्धुना हताः ३७ युष्मानतो न गृह्णीयां सत्यं सत्यं ब्रवीम्यहम्। इति श्रुत्वा वचो घोरं हास्ययुक्तं च योषितः ३८ महीराजान्तमागम्य रुरुदुर्भृश-दुःखिताः। राजन्बेलापतिर्धूर्तो मम धर्मं जहाति वै ३९ दण्डं देहि च धूर्ताय नो चेत्प्राणांस्त्यजाम्यहम्। इति श्रुत्वा महीराजो ब्रह्मानन्दं महाबलम् ४० समाहूय वचः प्राह भवान्भूपकुलाधमः। परस्त्रियं च यो भुङ्क्ते स याति यममन्दिरम् ४१ अद्यैव त्वं सुताकान्त कारागृहमवाप्नुयाः। इति श्रुत्वा वचो घोरं ब्रह्मानन्दो महाबलः ४२ मत्सरोः खड्गमुत्सृज्य महीराजमधावत। दृष्ट्वा भयातुरो राजा चामुण्डान्तमुपाययौ ४३ कपाटं दृढमाच्छाद्य तत्र वासमकारयत्। ऋषय ऊचुः॥ तासां कथ विवाहाः स्युस्तत्त्व नो ब्रूहि विस्तरात् ४४ कुत्रत्यास्ताः किमंशाश्च दृष्ट्वा योगेन वै त्वया। सूत उवाच॥ अङ्गदेशे मुनिश्रेष्ठ मायावर्मनृपोऽभवत् ४५ तामसीं पूजयित्वा वै शक्तिं सर्वविमोहिनीम्। वर्मोत्तमं तया दत्तं सर्वसत्त्वभयङ्करम् ४६ गृहीत्वा स तु भूपालः प्रस्थितोऽभून्महीतले। प्रमदा नाम तत्पत्नी दश पुत्रानसूयुवत् ४७ कौरवांशान्महाभाग वर्णान्ते नाम मे शृणु। मत्तः प्रमत्त उन्मत्तः सुमतो दुर्मदस्तथा ४८ दुर्मुखो दुर्धरो बाहुः सुरथो विरथः क्रमात्। तेषां स्वसाऽनुजा चासीत्सुनाम्ना मदिरेक्षणा ४९ तस्या वै सुन्दरं रूपं मदाघूर्णितलोचनम्। कितवो नाम वै दैत्यो दृष्ट्वा मोहमुपागतः ५० मायावर्मणमागत्य वचनं प्राह नम्रधीः। यदि त्वं मे स्वतनयां देहि कामातुराय च ५१ तर्हि ते सकलं कार्यं करिष्यामि न संशयः। इति श्रुत्वा तदा भूपो ददौ तस्मै स्वकन्यकाम् ५२ कितवो गह्वरावासी रात्रौ घोरे तमो-

---

आहे. यास्तव, मी तुमचा स्वीकार करणार नाहीं, हें खरें खरें सागत आहें. " हें त्याचें घोर व हास्ययुक्त वचन ऐकून त्या स्त्रिया महीराजाजवळ आल्या व अतिदुःखित होऊन रडू लागल्या. राजा, धूर्त वेलापति आमचा धर्म बुडवीत आहे. त्या धूर्तास दंड कर; नाहींपेक्षा आम्ही प्राण देऊ. हें ऐकून महीराज महाबलाढ्य ब्रह्मानंदास बोलावून म्हणाला " तूं राजकुलांतील अधमं पुरुष आहेस. जो परस्त्रीचा उपभोग घेतो तो यममंदनीं जातो ३९-४१. तूं माझ्या कन्येचा पति आहेस. यास्तव, तूं माझ्या कारागृहामध्यें पड. " हें घोर वचन ऐकून महाबलाढ्य ब्रह्मानंद म्यानातून तरवार ओढून महीराजावर धावला. तें पाहतांच भयभीत झालेला राजा चामुंडाजवळ गेला व द्वार घट्ट बंद करून तेथें राहू लागला. ऋषि म्हणतात·—त्यांचा विवाह कसा होईल ? यांतील तत्त्व विस्तारपूर्वक सांग. त्या कोठल्या व कोणाच्या अंशरूप हेंही योगदृष्टीनें पाहून तू आम्हास सांग. सूत म्हणतात·—हे मुनिश्रेष्ठ, अंगदेशामध्यें मायावर्म म्हणून राजा झाला. त्यानें तामसी देवीचें पूजन केलें. ती शक्ति सर्वांस मोह पाडणारी होती. तिनें सर्व प्राण्यास भय उत्पन्न करणारें एक उत्तम वर्म त्यास दिलें ४२-४६. तेव्हा तें घेऊन तो राजा भूलोकीं निघाला. प्रमदा म्हणून त्याची पत्नी होती. तिला कौरवान्या अंशापासून एका वर्षामध्यें दहा पुत्र झाले. हे महाभाग्यवाना, त्यांचीं नावें तूं ऐक. मत्त, प्रमत्त, उन्मत्त, सुमत्त, दुर्मद, दुर्मुख, दुर्धर, बाहु, सुरथ व विरथ अशीं त्यांचीं क्रमानें नावें होतीं. त्याची एक धाकटी बहीण होती. तिचें मदिरेक्षणा असें उत्तम नाव असून मदानें जिचे नेत्र फिरून गेले आहेत अशा त्या सुंदरीचें रूप पाहून कितवनामक दैत्य मोहित झाला ४७-५० व मायावर्माकडे येऊन ज्याचें मन प्रसन्न आहे असा तो म्हणाला " तूं जर कामानें व्याकुळ झालेल्या मला आपली कन्या दिलीस तर मी तुझें सर्व कार्य करीन " हें ऐकून त्याबेळीं तो राजा त्यास आपली कन्या देता झाला ५१,५२. गुहेमध्यें राहणारा कितव अंधारानें भरलेल्या घोर रात्रीं राजाच्या घरीं येऊन काम-

बृते । नृपगेहमुपागम्य बुभुजे स्मरविह्वलः ५३ प्रातःकाले तु तां त्यक्त्वा कन्दरान्तमुपायथौ । वर्मदेवमते जाते ततो राजा मदातुरः ५४ पुरोहितं समाहूय लक्षद्रव्यसमन्वितम् । महीराजाय संप्रेष्य तारकं स समावरत् ५५ महीराजस्त बलवॉल्लक्षषोडशसैन्यपः । सयुतः शतभूपालैर्मासान्ते समुपागमत् ६ कृष्णांशे पञ्चदशके सप्ताशे व्रततत्परे । तारकश्च विवाहाय बहुभूपोऽकृभानयत् ५७ मायावर्मा च तं दृष्ट्वा तारकं भूपसंयुतम् । वचनं प्राह बलवान् राजराज वचः शृणु ५८ कितवो नाम मेधावी दैत्यवंशयशस्करः । तेन मे पीडिता बाला रात्रौ घोरतमावृते ५९ हता भूपकुमाराश्च मत्सुतार्थं समागताः । भक्षितास्तेन दैत्येन सयुक्ते यमालयम् ६० तेषां च बहुधा द्रव्य लुण्ठयित्वा मदातुरः । मत्सुतायै ददौ सर्वं तस्मात्त्व दितिज जहि ६१ इति श्रुत्वा महीराजस्सर्वसैन्यसमन्वितः । कितव च समाहूय महायुद्धमचीकरत् ६२ कितवस्त तु मायावी जित्वा सर्वान्महाबलान् । तारक च समाहृत्य गुहायां समुपागमत् ६३ तारकश्च तदा दुःखी ध्यात्वा शंकरमुत्तमम् । पाषाणभूतमगमन्महादेवप्रसादतः ६४ एतस्मिन्नन्तरे प्राप्ता महावतिनिवासिनः । क्षत्रिया दशसाहस्राः कृष्णांशाद्यैश्च पालिताः ६५ महीराजस्तु तान्दृष्ट्वा बलखानिं महाबलम् । उवाच वचनं प्रेम्णा पुत्रशोकेन दुःखितः ६६ तारकः कितवेनैव सहतो दितिजेन वै । यदि त्वं मे सुतं देहि कोटिस्वर्णं ददामि ते ६७ इति श्रुत्वा तु ते धीराः कृष्णांशा देवसिंहकः । वत्सजौ च तथागम्य कितवं रुरुधुर्बलात् ६८ अहोरात्रमभूद्युद्धं तेषां तेन समन्वितम् । कितवस्तु रुषाविष्टः कृष्णांश देवसिंहकम् ६९ बलखानिं मोहयित्वा जगर्ज च पुनः पुनः ।

मोहित होत्साता तिचा भोग घेई व प्रात.काल झाला असता तिला सोडून गिरिकदरीं जाई. ही गोष्ट वर्मदेवास समजली असतां तो मदोन्मत्त राजा पुरोहितास बोलावून लक्ष द्रव्यासह त्यास महीराजाकडे पाठविता झाला व त्याच्या द्वारा त्यानें तारकास वारिलें. तेव्हा बलाढ्य महीराज सोळा लक्ष सैन्याचा अधिपति असल्यामुळें शंभर भूपालासह एक महिन्यानें तेथें येऊन पोंचला. व्रतामध्यें तत्पर असलेल्या कृष्णाशास पंधरावें वर्ष लागलें असता तारक विवाहाकरितां अनेक राजासहवर्तमान तेथें आला. तेव्हा मायावर्मा राजासह असलेल्या त्या तारकास पाहून ह्मणाला " हे श्रेष्ठ राजा, माझें वचन ऐक. दैत्याच्या वंशाचें यश करणारा कितव ह्मणून एक बुद्धिमान् राक्षस आहे. तो घोर अंधकारमय रात्रीं येऊन माझ्या कन्येस पीडा देत असतो. माझ्या कन्येकरिता आलेले सर्व राजकुमार त्यानें नाहींसे करून टाकिले. ह्मणजे त्या दैत्यानें त्यांस खाल्ले व ते यमलोकीं गेले. त्याचें अनेक प्रकारचें द्रव्य लुटून त्या मदोन्मत्तानें तें सर्व माझ्या कन्येस दिलें. यास्तव, तूं त्या दितिपुत्रास मार " ५३-६१. हें ऐकून सर्वसैन्ययुक्त महीराज कितवास बोलावून त्याच्याशीं माठें युद्ध करिता झाला ६२. पण तो मायावी कितव त्या सर्व महाबलवानांस जिकून, तारकास धरून व त्यास घेऊन गुहेमध्यें गेला. तेव्हा तारक दुःखी होऊन उत्तम शंकराचें ध्यान करूं लागला. तेव्हा महादेवाच्या प्रसादानें तो पाषाणासारिखा झाला. इतक्यांत कृष्णाशादिकानीं ज्याचें रक्षण केलें आहे असे महावतींत राहणारे दहा हजार क्षत्रिय तेथें आले. तेव्हा महाबलाढ्य बलखानीस व त्यांस पाहून महीराज पुत्रशोकानें दुःखित होत्साता प्रेमानें ह्मणाला ' दितिपुत्र कितवानें तारकाचें हरण केलें आहे. त्या माझ्या पुत्रास जर तूं परत देशील तर मी तुला एक कोटि सुवर्ण देईन. ' हें ऐकून कृष्णाश, देवसिंह, दोघे वत्सपुत्र इत्यादि ते वीर तेथें येऊन कितवास बलात्कारानें वेढिते झाले. त्याचें त्याच्याशीं अहोरात्र युद्ध झालें. रागावलेल्या कितवानें कृष्णांश, देवसिंह व बलखानि यास मोहित करून वारंवार गर्जना केली. तेव्हा शूर सुखखानि, कितव बलाढ्य आहे असें पाहून आपल्या खड्गानें त्याचें

सुखखानिस्तदा शूरः कितव बलवत्तरम् ७० स्वखड्गेन शिरस्तस्य छित्त्वा राजानमागमत् । प्रयस्ते सुखिनौ भूत्वा सुखखानिं प्रशस्य च ७१ महीराजाय च ददौ तारक कैतव शिरः । तदा भूपसुता देवी सुखखानिं समावरत् ७२ महीपतिस्तदागत्य तत्सुतां मदिरेक्षणाम् । संबुद्ध्वा विविधैर्वाक्यैर्भूमिराजान्तमागमत् ७३ तारकस्य तया सार्धं विवाहो मुदितोऽभवत् । कोटिस्वर्णं नृपात्प्राप्य बलखानिर्महाबलः ७४ प्रययौ बन्धुभिस्सार्धं सश्रियाख्यपुरं शुभम् । सूत उवाच ॥ गुर्जरे नृपतिश्चासीन्मूलवर्मा महाबलः ७५ प्रभावती तस्य सुता दशपुत्रानुजाऽभवत् । बलश्च प्रबलश्चैव सबलो बलवान्बली ७६ सुमूलश्च महामूलो दुर्गो भीमो भयङ्करः । करभो नाम वै यक्षो लङ्केशराजस्य सेवकः ७७ प्रभावतीं समालोक्य मुमोह मदविह्वलः । पञ्चवर्षान्तरं जातं तेन भुक्ता कुमारिका ७८ मूलवर्मा महीराजं समाहूय ससैन्यकम् । वचनं प्राह नम्रात्मा राजराज वच. कुरु ७९ प्रभावतीं शुभां कन्यां नृहराय ददाम्यहम् । इत्युक्त्वा नृहरं पुत्रं समाहूय स्वमन्दिरे ८० ददौ वेदविधानेन सुतां च नृहराय वै । पक्षमात्रान्तरं यक्षः करभस्तत्र चागतः ८१ दम्पती पीडयामास जित्वा सर्वमहीपतीन् । महीराजस्तदा दुःखी बत्सजौ बलवत्तरौ ८२ समाहूय कथितवाऽग्रे रुरोद बलवान्बली । दयालू वत्सजौ वीरौ करभान्तमुपयतुः ८३ करभस्तौ समालोक्य तत्रैवान्तरधीयत । नागपाशेन तौ बद्ध्वा पीडयामास दम्पती ८४ इति श्रुत्वा स कृष्णांशः करभं यक्षकिङ्करम् । बद्ध्वा योगबलेनैव मोचयामास दम्पती ८५ भ्रातरौ तौ समागम्य नागपाशं तु चासिना । छित्त्वा मुमोद बलवान्कोटिस्वर्णं गृहीतवान् ८६ भूमिराज. प्रसन्नात्मा देहलीं मुदितोऽगमत् । सूत उवाच ॥

मस्तक तोडून राजाकडे आला. तेव्हा ते तिघेही आनंदित होऊन सुखखानीची प्रशंसा करू लागले. त्यानीं तारकास व कितवाच्या मस्तकास महीराजाच्या स्वाधीन केलें. तेव्हा देवी भूपकन्या मनानें सुखखानीस वरती झाली. इतक्यात महीपति आला व त्यानें नानाप्रकारच्या वाक्यानी त्या मदिरेक्षणा कन्येस बोध केला व पुनरपि तो महीराजाकडे आला. त्यामुळे तारकाचा तिच्याशीं विवाह ठरला. असो; राजापासून एक कोटि सुवर्ण घेऊन महाबलाढय बलखानि बधूसहवर्तमान सश्रियाख्य नगरास गेला. सूत म्हणतात —गुर्जरदेशामध्यें मूलवर्मा म्हणून महाबलाढय राजा होता. त्याला दहा पुत्राच्या पाठीवर प्रभावती म्हणून कन्या झाली. बल, प्रबल, सबल, बलवान्, बली, सुमूल, महामूल, दुर्ग, भीम व भयंकर अशीं त्याचीं नावें होतीं. करभ म्हणून एक यक्ष लङ्केराजाचा सेवक होता. तो प्रभावतीस पाहून मदाने विह्वल होत्साता मोहित झाला. तिला पाच वर्षे झालीं असता त्यानें तिचा भोग घेतला ६३–७८. पुढें मूलवर्मा सैन्यासह महीराजास बोलावून नम्रपणें म्हणाला 'हे राजाधिराजा, मी सागतों तसें कर. माझी शुभ प्रभावती कन्या मी नृहरास देतों'. असें म्हणून व नृहर पुत्रास आपले मंदिरीं बोलावून त्याने ती नृहरास वेदोक्त विधीनें दिली. एक पक्ष लोटला आहे तोंच करभ यक्ष तेथें आला. त्यानें सर्व राजास जिंकून त्या दंपतीस पीडा दिली. तेव्हा दुःखी झालेला महीराज बलाढय वत्सपुत्रास बोलावून व त्याचे पुढें हा सर्व वृत्तांत सांगून मोठ्याने रडला. तेव्हा ते दोघेही बलाढय, शूर व दयालु वत्सपुत्र करभाकडे आले. त्यास पाहताच करभ तेथेंच गुप्त झाला व त्यास नागपाशानें बांधून त्या दंपतीस पुनः पीडा देऊ लागला ७९–८४. पण हें ऐकून कृष्णांश योगसामर्थ्यानेंच त्या यक्षकिंकर करभास बांधून त्या दांपत्यास सोडविता झाला. पुढें त्या दोघा भ्रात्याजवळ येऊन व खड्गानें नागपाश तोडून तो बलवान् आनंदित झाला. त्यानें एक कोटि सुवर्ण घेतलें ८५,८६. पुढें ज्याचें अंतःकरण प्रसन्न झालें आहे असा महीराज देहलीस आनंदानें

कोऽभीरे च नृपश्चासीत्कैकयो नाम विश्रुतः ८७ दश पुत्राश्च तस्यैव कन्या च मदनावती । कामः प्रकामः संकामो निष्कामो निरपत्रपः ८८ जयश्च विजयश्चैव जयन्तो जयवान्नयः । स भूपो भूमिराजं च समाहूय वचोऽब्रवीत् ८९ पुत्रस्ते वै सरदनो य कन्यां वानुमर्हति । गन्धर्वस्सुकलो नाम मत्कन्यां च शुभाननाम् ९० उर्वोत्स्यायां निशि सद्वृत्य तया सार्द्धं हि दीव्यति । पूर्णिमायां च सप्राप्तः स वै चित्ररथप्रियः ९१ वैशाखस्यासिते पक्षे चाष्टमी चाद्य मङ्गला । वधं कुरु नृपश्रेष्ठ देहलीं गन्तुमर्हसि ९२ इति श्रुत्वा महीराजो लक्षसैन्यसमन्वितः । गृहीत्वा दम्पती शीघ्रं देहलीनगरं ययौ ९३ वैशाख्यां सुखजातायां सुकलो नाम वीर्यवान् । गन्धर्वो दशसाहस्रै रोध नगर रुषा ९४ नगराच्च बहिर्जाता ये शूरा मदविह्वलाः । हत्वा तान्सुकल शीघ्रं राज्ञे दुःखं चकार ह ९५ भयभीतो महीराजो ध्यात्वा सर्वमयीं शिवाम् । सुष्वाप निशि शुद्धात्मा तुष्टाऽभूज्जगदम्बिका ९६ कृष्णांशादीन्बोधयित्वा तैश्च सार्धं समागमत् । तेषां चासीन्महद्युद्ध गन्धर्वेण तदाद्भिकम् ९७ बलखानिश्च बलवाञ्छतगन्धर्वसमुत्तमम् । त्रिदिनान्ते च महता सुखखानिस्तथैव च ९८ सुकलश्च तदा क्रुद्धो गान्धर्वी च ससर्ज ह । बहुधा ते हि गन्धर्वास्तैश्च सार्धं समारुधन् ९९ भयभीतास्तदा सर्वे रामांशं शरण ययुः । आह्लादश्च प्रसन्नात्मा शारदां सर्वमङ्गलाम् १०० दिवासूक्तेन तुष्टाव तदा प्रादुरभूच्छिवा । गन्धर्वान्मोहयित्वाशु द्रावयामास शारदा १ पराजिते च गन्धर्वे कृष्णांशो जनमोहनः । महीराजमुपागम्य कोटिस्वर्णं गृहीतवान् २ षोडशाब्दे च कृष्णांशे

आला. सूत ह्मणतात—काश्मीरामध्यें कैकयनामक प्रसिद्ध राजा होता ८७. त्याला दहा पुत्र व मदनावतीनामक कन्या होती. काम, प्रकाम, सकाम, निष्काम, निरपत्रप, जय, विजय, जयंत, जयवान् व जय अशीं त्याचीं नावें होतीं. तो राजा महीराजास बोलावून ह्मणाला " तुझा सरदन ह्मणून जो पुत्र आहे तो माझ्या कन्येस योग्य आहे. पण सुकल ह्मणून गंधर्व तिला रात्रीं चादण्यात हरण करितो व तिच्यासीं क्रीडा करितो. चित्ररथास प्रिय असलेला तो गधर्व पौर्णिमेच्या दिवशीं येतो ८८-९१. आज वैशाखशुक्ल पक्षातील मंगलकारक अष्टमी आहे. यास्तव, हे राजा, तूं हिच्यासह देहलीस जा व त्याचा वध कर " ९२. हें त्याचें वचन ऐकून एक लक्ष सैन्याने युक्त असलेला महीराज त्या दंपतीस घेऊन त्वरेनें देहलीनगरास आला. तेव्हा सुखकारक वैशाखी पौर्णिमा आली असता सुकलनामक वीर्यवान् गंधर्व दहा सहस्र गंधर्वासह रागानें त्या नगरास वेढा देता झाला. जे वीर मदोन्मत्त होऊन नगराच्या बाहेर पडले त्यास मारून सुकल लागलाच राजास पीडा करूं लागला. तेव्हा भयभीत झालेला पण शुद्ध मनाचा महीराज सर्वमयी शिवेचें ध्यान करून रात्रीं निजला. त्यामुळें ती जगदम्बिका प्रसन्न झाली ९२-९६. तिनें कृष्णांशादिकास ही गोष्ट कळविली व ती त्याच्यासह आली. त्याचें गंधर्वांशीं दिवसभर मोठें युद्ध झालें. बलवान् बलखानि उत्तम शंभर गंधर्वास तीन दिवसांनीं मारिता झाला. त्याचप्रमाणें सुखखानीनेंही गंधर्वास मारिलें. तेव्हा सुकल रागावला व त्यानें गंधर्वांची माया निर्माण केली. त्याबरोबर अनेक गंधर्व उत्पन्न झाले व त्याच्याच साह्यान्यें त्यानें सर्वांचा निरोध केला. तेव्हा ते सर्व वीर भयभीत होत्साते रामांशास शरण आले. तेव्हा आल्हाद प्रसन्न झाला व त्यान सर्वममलरूपी शारदेचें दिवासूक्तानें स्तवन केलें. त्याबरोबर ती शिवा प्रकट झाली व त्या शारदेनें गंधर्वास मोहित करून लागलेंच पळविलें. गंधर्वांचा पराजय झाला असता जनास मोह पाडणारा कृष्णांश महीराजाजवळ आला व त्यानें त्याच्यापासून एक कोटि सुवर्ण घेतलें ९७-१०२. पुढें देवीची पूजा करणारा जो कृष्णांश त्यास सोळावें

समाप्ते वेदिपूजके । मार्गमासे तु संप्राप्ते मर्दनश्च विवाहितः ३ सूत उवाच ॥ पुण्ड्रदेशे महाराजो नागवर्मा महाबलः । बभूव तक्षकपरो धर्मवान्भुवनीतले ४ पत्नी नागवती तस्य तक्षकस्य सुता शुभा । पितुः शापेन संजाता कलिङ्गाधिपतेः सुता ५ दशैव तनयाश्चासन्कन्या तस्य शुभानना । सुवेला नाम विख्याता रूपयौवनशालिनी ६ पुरोहितं समाहूय महीराजाय चोदितः । स गत्वा च कथित्वाऽग्रे मर्दनो वरितो मया ७ महीराजस्तु तच्छ्रुत्वा त्रिलक्षबलसंयुतः । मङ्गलं कारयामास गत्वा नागपुरे शुभे ८ सुवेला पितरं प्राह देहि मे नागभूषणम् । विवाहं हि करिष्यामि नो चेत्प्राणांस्त्यजाम्यहम् ९ इति श्रुत्वा नागवर्मा महीराजान्तमाययौ । सुवेलाया अभिप्रायं वर्णयामास विस्तरात् ११० इत्युक्तः स महीराजो विस्मितः स सुदुःखितः । प्रेषयामास वै पत्रं यत्राह्लादादयः स्थिताः ११ इति श्रुत्वा तदाह्लादः शरपञ्चशतावृतः । कृष्णाश्वत्सजैस्तार्क्ष्यैर्दिनान्ते च समागमत् १२ शतयोजनगामिन्यो वाजिन्यश्च द्वियामके । सहस्रयोजनं वीर्यं तेषां चैव दिने निशि १३ कलांशादुद्भवा अश्वा वाजिनां च हरेः स्वयम् । रक्षाश्वस्य कलांशाश्च कपोता हरिणीभव १४ गायत्रो योऽभवद्वाजी कालचक्रप्रवर्तकः । तत्कलांशात्समुद्भूतो रविदत्तः पपीहकः १५ हरिणी नाम तच्छक्तिः कलांशाद्भूमिमागता । सुखखानिः पपीहस्थो बलखानिः कपोतगः १६ आह्लादश्च करालस्थो बिन्दुलस्थो हरेः कला । गत्वा ते तु महीराजं नत्वा तुङ्गसमं ययुः १७ प्रसन्नः स महीराजो वचनं प्राह नम्रधीः । मम पुत्राश्च युष्माभिः शूरा विवाहिताः १८ तथैव मर्दनं वीर समुद्वाह्य सुखी भव । इति श्रुत्वा स आह्लादो गत्वा भूतलमुत्तमम् १९ रसातलं च

वर्ष लागलें असतां व मार्गशीर्ष महिना लागला असता मर्दनाचा विवाह झाला ३. सूत झणतात.— पुंड्रदेशामध्यें महाराजा नागवर्मा झणून बलाढ्य राजा होता. त्याची तक्षकावर फार भक्ति असे. भूलोकीं तो मोठा धार्मिक होता ४. त्या तक्षकाची शुभ कन्या जी नागवती तीच त्याची पत्नी असून पित्याच्या शापानेंच ती कलिंगाधिपतीची कन्या झाली ५. त्यास दहा पुत्र व ही सुंदर कन्या झाली होती. ती सुवेला या नामाने प्रसिद्ध असून रूपयौवनसंपन्न होती ६. असो, त्या राजानें पुरोहितास बोलावून त्यास महीराजाकडे पाठविलें. तेव्हा तो जाऊन मी मर्दनास वरिलें आहे असें त्याच्यापुढें सांगता झाला. तें ऐकताच महीराज तीन लक्ष सैन्यासह मंगल करवून शुभ नागपुरास गेला. सुवेला पित्यास झणाली " मला नागभूषण दे झणजे मी विवाह करीन; नाहींतर प्राणत्याग करीन. " हें ऐकून नागवर्मा महीराजाकडे आला व सुवेलेचा सविस्तर अभिप्राय त्यास सांगता झाला. हें ऐकताच तो राजा विस्मित व दुःखित झाला. त्यानें आल्हादादिक जेथें होते तेथें पत्र पाठविलें ७ ११. त्यांतील मजकूर जाणून पाचशें शूरांनीं युक्त असलेला आल्हाद, त्यावेळीं कृष्णाश व वत्सराजाचे दोघे पुत्र यांसह सायंकालींच तेथें येऊन पोचला. त्यांच्या घोड्या दोन प्रहरामध्ये शंभर योजनें जाणाऱ्या होत्या. अहोरात्रींत सहस्र योजनें चालून जाण्याचे त्यांचें सामर्थ्य होतें १२,१३. कारण, त्या इंद्राच्या घोड्याच्या अंशापासून उत्पन्न झालेल्या व रत्नाश्वाच्या कलांशरूप होत्या. कपोत हरिणीपासून झालेला होता. गायत्र झणून जो कालचक्र प्रवृत्त करणारा घोडा होता. त्याच्या कलांशापासून झालेला सूर्यानें दिलेला पपीहक होता. हरिणी ही त्याची शक्ति असून ती कलांशतः भूलोकीं आली. असो; सुखखानि पपीहकावर बसला; बलखानि कपोतावर आरूढ झाला, आल्हाद करालावर चढला व कृष्णाश बिंदुलावर बसला व ते सर्वही महीराजाजवळ जाऊन त्यास नमस्कार करून पर्वतशिखरासारिखे उभे राहिले. तेव्हां महीराज प्रसन्न झाला व नम्रपणें

विख्यातं नागिनीं प्राह निर्भयः । सुप्तो हि तव भर्ता च पुण्डरीक शुभानन: ११० बोधयाशु महाराज्ञि नागानां नो दयां कुरु । इत्युक्त्वा सहितो वीरैः पुण्डरीकश्च मत्पतिः ११ रुषाविष्टश्च बलवान्दाक्षयेच वपुस्तव । इति श्रुत्वा विहस्याह तव भर्तुर्न नो भयम् २१ इत्येवं वचनं क्रूरा पद्भ्यां पुच्छमताडयत् । प्रबुद्धश्च तदा राजा नागानां च महाबलः १३ ज्वालामालां स्वदेहाच्च जनयामास वीर्यवान् । दृष्ट्वा तद्विषमुज्ज्वालं स ध्यात्वा सर्वमङ्गलाम् १४ शमयामास बलवान्देवीपूजनतत्परः । पुण्डरीक: प्रसन्नात्मा नागभूषणमुत्तमम् २५ आह्लादाय ददौ शीघ्रं सर्वशृङ्गारसंयुतम् । आह्लादस्तु हयारूढो महीराजाय दत्तवान् १६ विवाहं कारयामास वैवाहिकविधानतः । कोटिस्वर्णं नृपात्यास गृहीत्वा शीघ्रमाययौ २० हयविन्यासमारूढास्ते हया गेहमागताः । ज्ञेयाः पञ्चशतं सर्वे सशूरा गृहमाययुः १८ सूत उवाच ॥ मद्रदेशेषु यश्चासीन्मद्रकेशो महाबल: । पञ्चाब्द पूजयामास स्वर्गवैद्यौ सुरोत्तमौ तयोश्च वरदानेन दश पुत्रा बभूविरे । सुता कान्तिमती जाता रूपयौवनशालिनी १३० स महीराजमाहूय विलक्षबलसंयुतम् । ददौ कन्यां विधानेन मद्रेशः सूर्यवर्मणे ३१ नवोढां तु तदा पत्नीं सूर्यवर्मा गृहीतवान् । स्वगेहाय ययौ शीघ्र महीराजा बलैस्सह ३२ कर्बुरो नाम मघावी बिभीषणसुतो बली । राक्षसस्तत्र मघासो दृष्ट्वा कान्तिमतीं शुभाम् ३३ मद्रकेशस्य तनयां दिव्यशोभासमन्विताम् । जहार पश्यतां तेषां सह्याद्रिगिरिमाययौ ३४ महीराजस्तदा दुःखी विललाप

ह्मणतो " हे शूरहो, तुह्मी माझ्या तीन पुत्राचा विवाह करविलात. त्याचप्रमाणें या वीर मर्दनाचा विवाह करवून सुखी व्हा. " हें ऐकून तो आल्हाद भूलोकाच्या खालीं असणाऱ्या रसातल-नामक लोकास जाऊन निर्भयपणें नागिनीस ह्मणाला— ज्याचें मुख सुंदर आहे असा तुझा पुंडराक भर्ता निजला आहे. यास्तव, तूं त्याम त्वरित जागे कर. तूं नागाची महाराणी आहेस. यास्तव, आह्मावर दया कर. असें बोलून तो महावीर स्तब्ध झाला असता ती ह्मणते " रामावलेला व बलाढ्य असा माझा पति पुंडरीक तुझ्या शरीरास जाळून टाकील ". हें ऐकून आल्हाद हंसून ह्मणतो " तुझ्या भर्त्याचें आह्मास मुळींच भय नाहीं. " असें बोलून त्यानें आपल्या दोन्ही पायानीं त्याच्या पुच्छावर ताडन केलें. तेव्हां तो महाबलाढ्य नागाचा राजा जागा झाला व त्या वीर्यवानानें आपल्या शरीरातून ज्वालाची लाट उत्पन्न केली. तें असह्य विष पाहतांच त्यानें सर्वमंगलेचें ध्यान केलें, व देवीच्या पूजनामध्यें तत्पर असलेल्या त्या बलवानानें त्याचें शमन केलें. तेव्हा ज्याचें अंत:करण प्रसन्न झालें आहे असा पुंडरीक लागलाच सर्व शृंगारासह उत्तम नागभूषण आल्हादास देता झाला. तेव्हा आल्हाद घोड्यावर बसून तो महीराजाकडे आला व त्यानें तें भूषण त्याम दिलें १४–२६. नंतर विवाहसंबंधीं विधानानें त्यानें विवाह करविला आणि राजापासून कोटि सुवर्ण घेऊन ते लागलेंच गृहीं परत आले २७. साराश, अश्वविद्येमध्यें प्रवीण असलेले ते सर्वही घोडे परत आले व ते पाचशें शूरही आपापल्या घरीं गेले असें समजावें २८. सूत ह्मणतात– मद्रदेशामध्यें मद्रकेश ह्मणून बलाढ्य राजा होता. त्यानें पांच वर्षे उत्तम वैद्य जे अश्विनीकुमार त्यांचें पूजन केलें. त्याच्या वरदानानें त्यास दहा पुत्र झाले; व रूप आणि यौवन यांनीं युक्त अशी कांतिमती कन्या झाली. तेव्हा तीन लक्ष सैन्यासह महीराजास बोलावून त्याने आपली कन्या यथाविधि सूर्यवर्म्यास दिला. तेव्हा नूतनविवाहित अशा त्या पत्नीचा सूर्यवर्मा स्वीकार करिता झाला. नंतर सैन्यासह महीराज आपल्या गृहीं चालला २९-३२. इतक्यात कर्बुर नावाचा बलाढ्य व मायावी राक्षस बिभीषणपुत्र तेथें आला व त्या मद्रकेशाच्या दिव्य शोभेनें युक्त

भृशं मुहुः । देहलीगेहमागम्य दूतमाहूय सत्वरम् ३५ कृष्णांशं प्रेषयामास स गत्वा समवर्णयत्। ज्ञात्वा ते तु हयारूढाः शूराः पञ्चशतावृताः ३६ सह्याद्रिगिरिमागम्य कृष्णांशः कर्बुरं यति। निर्भयो वचनं प्राह शृणु राक्षसत्तम ३७ बिभीषणो भक्तराजस्तस्य त्वं दयितः सुतः। तस्मात्त्वया न कर्तव्यं पापं वंशविनाशनम् ३८ रावणेन पुरा सीता संहृता विदितं तव। इति श्रुत्वा स हावाच पुत्र्य दयिता प्रिया ३९ मम गन्धर्वतनया मुनिशापान्महीं गता। अतोऽहं तद्वियोगेन त्यक्त्वा लङ्कां महापुरीम् १४० मद्रकेशमहं प्राप्य मद्रकेशभयादहम्। न जहार प्रियां रम्यां तत्रोषित्वा दिनं बहु ४१ अद्य मे वशगा साऽभूल्लाभा कान्तिमती शुभा। जित्वा मां च गृहाणाशु समर्थोऽस्त्र त्रयं सदा ४२ इति श्रुत्वा स कृष्णांशः खड्गयुद्धमचीकरत्। सप्तरात्रेण तं जित्वा लब्ध्वा कान्तिमतीं शुभाम् ४३ तदा च देहलीं प्राप्य महीराजान्तमाययौ। कोटिस्वर्णं ददौ राजा कृष्णांशाय महात्मने ४४ स वीरो बन्धुभिः सार्धं प्रमदावनमाययौ। सूत उवाच ॥ पट्टनाख्ये पुरे राजा नाम्ना पूर्णामलो बली ४५ वसूनाराधयामास पञ्चवर्षान्तरे मुदा। तदा प्रसन्नास्ते देवा ददुस्तस्मै वरं शुभम् ४६ वरदानाच्च राजातो दश पुत्रा महीपतेः। विद्वन्माला सुता जाता रूपयौवनशालिनी ४७ तद्विवाहार्थमाहूय महीराजं महाबलम्। सप्तलक्षबलैः सार्द्धं तत्पुत्राय सुतां ददौ ४८ महीराजसुतां भीमः पत्नीं प्राप्य मनोरमाम्। गेहमागम्य तैः सार्द्धं देहलीं हर्षमाप्तवान् ४९ तदा पैशाचदेशस्थः सहोदश्च महीपतिः। म्लेच्छैश्च दशसाहस्रैर्विद्वन्मालार्थमुद्यतः १५०

असलेल्या शुभ कांतिमतीनामक कन्येस त्याच्या समक्ष उचलून तो सह्याद्रिपर्वतावर गेला ३३,३४. तेव्हा महीराज दुःखी होऊन अतिशय रडूं लागला. नंतर तो देहलीतील आपल्या गृहीं येऊन दूतास बोलावून लागलाच त्यास कृष्णांशाकडे पाठविता झाला. तेव्हा त्यानें जाऊन सर्व वर्तमान कृष्णांशास कळविलें. ते ऐकून ते शूर पाचशें वीरासह घोड्यावर बसून सह्याद्रिपर्वतावर आले; व निर्भय कृष्णांश कर्बुरास म्हणतो " हे उत्तम राक्षसा, ऐक ३५-३७. बिभीषण श्रेष्ठ भक्त! व त्याचा तूं प्रिय पुत्र! यास्तव, तूं वंशाचा क्षय करणारें पाप न करावेस ३८. पूर्वी रावणानें सीतेचें हरण केलें होतें हें तुला ठाऊक आहे. " हे ऐकून तो म्हणाला " पूर्वी ही स्त्री माझी प्रिय पत्नी व गंधर्वकन्या होती. ती मुनिन्या शापामुळें भूलोकीं आली. यास्तव, मी तिच्या वियोगानें महानगरी लंका सोडून मद्रदेशास आलो, पण मद्रकेशाच्या भयामुळें मीं या रम्य व प्रिय स्त्रीचें हरण केलें नाहीं. तेथें पुष्कळ दिवस राहून ही कांतिमतीनामक कन्या आज मला वश झाली आहे. यास्तव, तूं मला जिंकून हिला घे. आम्ही सर्वदा समर्थ आहों " ३९-४२. हें ऐकून कृष्णांशानें खड्गयुद्ध केलें. सात दिवसांनीं त्यास जिंकून व शुभ कांतिमती घेऊन तात्काल तो देहलीस महीराजाजवळ आला. तेव्हा त्या महात्म्या कृष्णांशास राजानें कोटि सुवर्ण दिले ४३,४४. नंतर तो वीर बंधूंसह प्रमदावनास गेला. सूत म्हणतातः— पट्टनाख्य नगरामध्ये पूर्णामल या नांवाचा बलाढ्य राजा होता ४५. त्यानें मोठ्या आनंदानें पांच वर्षेपर्यंत वसूंचे मोठें आराधन केलें. तेव्हा ते देव प्रसन्न झाले व त्यांनीं त्यास शुभ वर दिला ४६. त्या वरदानामुळें राजास दहा पुत्र झाले. रूपयौवनशाली विद्वन्माला म्हणून कन्या झाली ४७. तिच्या विवाहाकरितां सात लक्ष सैन्यासह बलाढ्य महीराजास बोलावून त्याच्या पुत्रास त्यानें आपली कन्या दिली. तेव्हा भीमनामक महीराजाचा पुत्र मनोरम पत्नीस घेऊन त्यांच्या सहवर्तमान देहलीतील आपल्या गृहीं येऊन आनंदित झाला ४८,४९. त्यावेळीं पैशाच देशांत राहणारा सहोदनामक राजा दहा हजार म्लेच्छांसहवर्तमान विद्वन्मालेकरितां प्रयत्न करूं लागला. बलि देत्यांच्या

बलिदैत्याज्ञया प्राप्तः कुरुक्षेत्रं शुभस्थलम् । भित्त्वा मूर्तीः सुराणां गोरक्तैस्तीर्थजलं कृतम् ५१ पत्रमालिख्य बलवान्महीराजाय धर्मिणे । स्वदूतः प्रेषितस्तेन श्रुत्वा भूपोऽब्रवीदिदम् ५२ भवान्म्लेच्छपतौ राजा विद्धन्मालार्थमुद्यत । मां शब्दवेधिनं विद्धि चौर्यदेशधुरन्धरम् ५३ इत्युक्त्वा स त्रिलक्षैश्च कुरुक्षेत्रमुपागत. । तयोश्चासीन्महद्युद्धमहोरात्र भयानकम्५४निशीथे समनुप्राप्ते ज्येष्ठे मासि तमोमये । पातालाद्बलिरागत्य दैत्यायुतसमन्वितः ५५ नृपसैन्य जघानाशु भक्षयित्वा पुनः पुनः । भयभीतस्तदा राजा शारदां शरण ययौ५६एतस्मिन्नन्तरे देवा कृष्णांशाद्या महाबला । क्षणमात्रेण संप्राप्तास्तदा पदचरा मुने ७ हत्वा दैत्यान्सहस्राणि ते बलिदैत्यमुपाययौ । देशजौ वत्सजौ वीरौ देवसिंहस्तथैव च ५८ स्वखड्गैस्तर्पयामास दैत्यराजं महाबलम् । तदा प्रसन्नो बलवान्दैत्यराजो बलिः स्वयम् ५९ वरं वरय तानाह ते तु श्रुत्वाऽब्रुवन्वचः । आर्यदेशं च ते दैत्या नागमन्तां त्वया सह १६० म्लेच्छदेशे सदा प्राप्य भक्षध्वं म्लेच्छधर्मगान् । इति श्रुत्वा वचो घोरं विप्रियं च बलिः स्वयम् ६१ कृष्णांशमुदयं गत्वा तुष्टाव परया गिरा । तदा प्रसन्नः कृष्णांशो वचनं प्राह निर्भयः ६२ यावदहं भूमिवासी तावत्त्व गेहमावस । तत्पश्चाद्भूमिमागत्य यथायोग्य कुरुष्व भोः ६३ इति तद्वचन श्रुत्वा सहादो बलिसयुतः । पैशाचं देशमगमत्पुनः प्राप्तो रसातलम् ६४ भूमिराजः प्रसन्नात्मा कोटिस्वर्णं ददौ तदा । गजारूढाश्च ते पञ्च सयुग्भ महाबलीम् ६५ सूत उवाच ॥ वर्धनो भूमिराजस्य सुतः सर्वेभ्य उत्तमः । पञ्चमाब्दवयो भूत्वा श्रीदं तुष्टाव भक्तितः ६६ वर्षान्तरे च भगवान्ददौ सर्वं शुभ निधिम् । तत्सर्वनिधिभावन

आज्ञेने तो शुभ स्थल जें कुरुक्षेत्र तेथे आला. देवांच्या मूर्ति फोडून तीर्थादिक गाईंच्या रक्तानें भ्रष्ट केलें व एक पत्र लिहून त्या बलवानानें धार्मिक महाराजाकडे आपल्या दूताबरोबर पाठविले. त्यांतील मजकूर ऐकून राजा असे ह्मणाला " तू म्लेच्छाचा स्वामी असून विद्वन्मालेकरिता प्रयत्न करीत आहेस. पण मी शब्दवेधी आहे व चोरास शासन करण्यास समर्थ आहें असे जाण. " असें बोलून तो तीन लक्ष सैन्यासह कुरुक्षेत्रात आला. त्याचें अहोरात्र मोठें भयकर युद्ध झाले. रात्र पडली असता व ज्येष्ठमास असल्यामुळे तो अंधकारमय झाली असता दहा सहस्र दैत्यासहवर्तमान बलि पातालातून वर आला व राजाच्या सैन्यास वारंवार खाऊन त्यानें तें सैन्य तात्काल नाहींसे करून टाकिलें. तेव्हा भयभीत झालेला राजा शारदेस शरण गेला ५०-५६. इतक्यात कृष्णाशादिक महाबलाढ्य देव, हे मुने, पायानें चालतच एका क्षणात तेथे आले. त्या हजारों दैत्यास मारून ते बलिदैत्याकडे आले. व दोन देशज, दोन वत्सज व एक देवसिंह अशा त्या पाच वीरांनी आपापल्या खड्गानें महाबलाढ्य दैत्यराजास तृप्त केलें. तेव्हा बलवान् दैत्यराज बलि स्वतः प्रसन्न झाला व " वर मागा " असे त्यांस ह्मणाला. तेव्हां त्याचे वचन ऐकून ते ह्मणाले " तुझ्या दैत्यांनी तुझ्यासह आर्यदेशामध्यें येऊं नये५७-६०. सदा म्लेच्छ देशामध्यें येऊन म्लेच्छ धर्माचे आचरण करणाऱ्यास तुही भक्षण करा". हे घोर व अप्रिय वचन ऐकून स्वतः बलि, उदय जो कृष्णाश त्याच्याकडे जाऊन परा वाणीनें त्याची स्तुति करूं लागला. तेव्हा कृष्णांश प्रसन्न झाला व निर्भयपणे ह्मणाला ' जोपर्यंत मी भूलोकीं आहें तोंपर्यंत तूं आपल्या गृहीं रहा व त्यानंतर भूलोकीं येऊन जसे योग्य वाटेल तसें कर ' ६१-६३. हे त्याचे वचन ऐकून बलीसह सहोद पैशाच देशामध्ये आला व पुनः रसातळीं गेला ६४. तेव्हा भूमिराजाचे अंतःकरण प्रसन्न झालें व त्याने कोटि सुवर्ण दिलें. नंतर ते पाचही वीर हत्तीवर बसून महावर्तास गेले. सूत ह्मणतात- भूमिराजाचा सर्वापेक्षां उत्तम पुत्र वर्धन ह्मणून होता. तो पांच वर्षांच्या वयाचा झाला

नृपकोशः समन्ततः ६७ पूर्णो बभूव कणको राजराजयथाधनः । किन्नरी नाम या कन्या मङ्कणस्य प्रकीर्तिता ६८ कुबेरश्च ददौ तस्मै वर्धनाय प्रियाय च । इति ते कथितं सर्वं विवाहचरितं मुने ६९ धुन्धुकारो महाशूरो लक्षसैन्यसमन्वितः । ब्रह्मानन्दमुपागम्य युद्धार्थाय समाह्वयत् १७० एकत्रिंशाब्दके प्राप्ते कृष्णांशे बलवत्तरे । एकाकी मलनापुत्रो दृष्ट्वा सैन्यमुपस्थितम् ७१ ब्रह्मास्त्रं चापमादाय चार्धसैन्यमदाहयत् । पञ्चायुताश्च ते शूरा भयभीता दिशो गताः ७२ धुन्धुकारो रणे त्यक्त्वा भूमिराजमुपागमत् । महीराजस्तदा दुःखी भयभीतः समन्ततः ७३ महीपतिं समाहूय चन्द्रभट्टं च सोऽब्रवीत् । कथं जयो मे भविता तत्सर्वं मन्त्रयाशु वै ७४ महीपतिस्तदा प्राह शृणु भूपशिरोमणे । कृत्वा नारीमयं वेषं चामुण्डं बलशालिनम् ७५ बेलां दत्वा च तद्दोलां ब्रह्मानन्दाय चार्पय । शूराश्चत्वारस्ते सुता धुन्धुकारेण मयुताः ७६ छद्मना च स्वशस्त्रैश्च घातयेयुस्तमर्जितैः । इति श्रुत्वा महीराजो ब्रह्मानन्दाय हर्षितः ७७ तथा कृत्वा ददौ दोलां पञ्चशूरैश्च पालितां । सायंकाले तु समाते माघशुक्लाष्टमीदिने ७८ वेलावपश्च चामुण्डो ब्रह्मानन्दमुपायथौ । छद्मना च त्रिशूलं च बलात्कृत्वा रिपोर्दरे ७९ रुरोद बलवाञ्छूरस्ते तु शूराः समागताः । तारको हृदि ते बाणै सूर्यवर्मा च तोमरैः १८० भीमश्च गदया चाथ वर्धनश्च तदाऽसिना । धुन्धुकारश्च भल्लेन जघान रिपुमूर्द्धनि ८१ मूर्छितं पतितं भूमौ ब्रह्मानन्दं महाबलं । महदभ्रमयुतस्तत्र स्वखड्गं च समाददत् ८२ भीमस्य च शिरः कायाद्वर्धनस्य तथैव च । छित्त्वा तथैव भूमध्ये सूर्यवर्माणमागतः ८३

असतां भक्तीनें श्रीदाचें स्तवन करिता झाला. एका वर्षामध्यें त्या भगवानानें त्यास सर्व शुभनिधि दिला. त्या सर्व निधीमुळें राजाचा कोश चोहोंकडून भरून गेला. तात्पर्य, त्या राजाधिराजा या प्रभावानें सर्व सुखी झाले. मंकणाची किन्नरीनामक जी कन्या सांगितलेली आहे ती कुबेरानें त्या प्रिय वर्धनास दिली. याप्रमाणें, हे मुने, तुला मीं सर्व विवाहाचें वृत्त सांगितलें आहे ६९-६९. महाशूर धुधुकार लक्ष सैन्यासह ब्रह्मानंदाजवळ आला व त्यास युद्धाकरिता आव्हान करूं लागला. बलाढ्य कृष्णांशास एकतिसावें वर्ष लागलें असतां एकटाच मलनापुत्र सैन्य आलें आहे असें पाहून व ब्रह्मास्त्र घेऊन त्यातील अर्धें सैन्य जाळून टाकिता झाला. तेव्हां बाकी राहिलेले पन्नास हजार शूर भयभीत होऊन दश दिशास गेले. धुधुकारानें युद्ध सोडलें व तो भूमिराजाकडे आला. तेव्हा महीराज भयभीत व दुःखी झाला आणि त्यानें लागलेच महीपति व चंद्रभट्ट यास बोलावून म्हटलें "माझा जय कसा होईल याविषयीं त्वरित विचार करा." तेव्हां महीपति म्हणतो "हे भूपशिरोमणे, ऐक. बलाढ्य चामुंडास स्त्रीवेष देऊन व ती वेला म्हणून तिचा दोला ब्रह्मानंदाकडे पाठीव. तुझे चार शूर पुत्र धुंधुकारासह कपटानें आपल्या शस्त्रांनी त्यास स्वसामर्थ्यानें मारोत. " हें ऐकून महीराज आनंदित झाला. व महीपतीनें सांगितल्याप्रमाणें करून पांच शूरांनीं ज्याचें रक्षण केलें आहे अशा त्या मेण्यास त्यानें माघ शुक्ल अष्टमीच्या दिवशीं सायंकाल झाला असतां पाठविलें. वेलेचा वेष घेतलेला चामुंड ब्रह्मानंदाकडे गेला व कपटानें आपला त्रिशूल शत्रूच्या पोटात खुपसून ७०-७९. तो बलवान् वीर रडूं लागला. तेव्हा ते शूर एकदम आले. तारकानें बाणांनीं त्याच्या वक्षःस्थलावर प्रहार केला. सूर्यवर्म्यानें तोमरांनीं ताडन केलें, भीमानें गदा मारिली, वर्धनानें तरवारीचा प्रहार केला व धुंधुकारानें आपला भाला शत्रूच्या मस्तकीं बोंचला. त्याबरोबर महाबलाढ्य ब्रह्मानंद मूर्च्छित होऊन भूमीवर पडला. त्याला फार मोठे व्रण पडले तरी लागलाच सावध होऊन तो आपलें खड्ग उचलता झाला ८०-८२. त्यानें भीमाचें मस्तक धडापासून वेगळे केले, वर्धनाचीही मान तोडून भूमीवर पाडिली व तो

तारको धुन्धुकारश्च चामुण्डश्च तथैव च । ब्रह्मानन्दं तदा त्यक्त्वा महीराजान्तमाययौ ८४ हतेषु तेषु पुत्रेषु महीराजो भयातुरः । वेल्लापार्श्वमुपागम्य रुरोद बहुदुःखितः ८५ इति श्रुत्वा तदा वेला दोलामारुह्य सत्वरम् । ब्रह्मानन्दं ययौ शीघ्रं मूर्च्छितं तं ददर्श ह ८६ कनिष्ठामृतभावेन वेलाया बलवांस्तदा । उत्थाय रुदतीं नारीं ददर्श रुचिरान्विताम् ८७ का त्वं कस्य सुता रम्या सत्यग्रामे मामुपस्थिता । जलं देहि महाभुज्ञ वचनं कुरु सुप्रियम् ८८ इति श्रुत्वा तदा वेला जलं दत्त्वा शुचान्विता । वचनं प्राह वै रात्रौ शृणु त्वं मलनासुत ८९ वेला नाम महीभर्तुः सुताऽहं त्वामुपस्थिता । मत्पतिश्च भवान्वीर छद्मना वज्रकैटभः १९० जीवनं कुरु राजेन्द्र भङ्क्ष्व भोगान्मया सह । इत्युक्तः स तु ताम्प्राह कलिकालं समागतं ९१ जीवनान्मरणं श्रेष्ठं तस्मान्मद्वचनं कुरु । हरिनागरमारुह्य मया सार्द्धं शुभानने ९२ गत्वा तीर्थानि रम्याणि सत्यजानि कलेवरम् । इत्युक्त्वा तौ समारुह्य पूर्वं च कपिलान्तिकम् । गत्वा स्नात्वा च विधिवत्ततोऽग्रे जग्मतुर्मुदा ९३ पृथक्पृथक्सुतीर्थानि स्नात्वा दत्त्वा च जग्मतुः । दक्षिणे सेतुबन्धान्ते पश्चिमे द्वारिकामनु ९४ उत्तरे बदरीस्थाने स्नात्वा तीर्थानि जग्मतुः । गन्धमादनमागत्य ब्रह्मानन्दो महाबलः ९५ वेलामुवाच वचनं भाद्रशुक्लाष्टमीदिने । देहं त्यजामि भो राज्ञि तारकं जहि भूतलं ९६ इति श्रुत्वा तु सा प्राह स्वामिन्मद्वचनं कुरु । कुरुक्षेत्रं मया सार्धं भवान्वै गन्तुमर्हति ९७ स्थित्वा तत्र समस्वान्तो भज त्वं सर्वमङ्गलाम् । अहं महावतीं प्राप्य पुनर्वै देहलीं गतिं ९८ तारकं च तथा हत्वा त्वत्समीपं व्रजाम्यहम् । इत्युक्त्वा स तथेत्युक्त्वा ब्रह्मध्यानपरोऽभवत् १९९ [३७६५]

सूर्यवर्म्याकडे आला. तेव्हा तारक, धुंधुकार व चामुंड यांनीं ब्रह्मानंदास सोडिलें व लागलेंच ते महीराजाकडे आले ८३,८४. ते पत्र मेले असता महीराज भयभीत झाला व वेलेकडे येऊन अतिदुःखित होऊन रडू लागला. ते ऐकून वेला त्वरेनें मेण्यात बसून ब्रह्मानंदाकडे आली. पण तो मूर्च्छित होऊन पडला आहे असें दिसलें. तेव्हा वेलेच्या करागुंठीतील अमृताच्या योगानें तो सावध झाला व रडणाऱ्या त्या सुंदर स्त्रीस त्यानें पाहिलें "तूं कोण व तूं रम्य कन्या कोणाची ? या सत्यग्राममधीं तूं मजकडे का आलीस ? हे सुंदरि, मला पाणी दे. माझें हे अतिप्रिय वचन ऐक". हें ऐकून त्यावेळीं वेला त्यास पाणी देऊन शोकयुक्त होऊन त्यास म्हणते "हे मलनापुत्रा, ऐक. मी वेलानामक महीराजाची कन्या तुजकडे आलें आहें. हे वीरा, तूं माझा पति आहेस. लबाड लोकांनी फसवून तुला कपटानें मारिलें ८९-९०. हे राजश्रेष्ठा, सावध हो व मजसह येथेंच उपभोग घे" असें ती म्हणाली असता तो तिला उलट म्हणतो 'कलिकाल आला असता जीवन राहण्यापेक्षा मरण बरें. यास्तव, मी सांगतों तसें कर. हरिनागरावर बसून हे शोभनानने, तूं मजबरोबर अनेक तीर्थांस चल. मी तेथें आपलें शरीर सोडीन.' असें म्हणून तीं दोघेंही घोड्यावर बसून पूर्वदेशातील कपिलतीर्थी गेलीं. तेथें जाऊन यथाविधि स्नान करून तीं दोघेंही आनंदानें पुढे गेलीं ९१-९३. भिन्न भिन्न उत्तम तीर्थांत स्नान करून व दानें देऊन तीं पुढे चाललीं. दक्षिणेस सेतुबंधापर्यंत, पश्चिमेस द्वारकेपर्यंत व उत्तरेस बदरिकाश्रमीं स्नान करून तीं इतर तीर्थांमध्यें गेलीं. पुढे महाबलाढ्य ब्रह्मानंद गंधमादनपर्वतावर येऊन भाद्रपद शुक्ल अष्टमीच्या दिवशीं वेलेस म्हणाला "हे राज्ञि, मी देहत्याग करितों. तूं भूलोकीं तारकास मार." हें ऐकून ती म्हणते "हे स्वामिन्, माझें म्हणणे ऐका. आपण माझ्यासह कुरुक्षेत्रीं चला, तेथें शांतपणानें राहून तुम्ही सर्वमंगलेचें भजन करा व मी महावतीस जाऊन व पुनः देहलीस येऊन तारकास मारून पुनरपि आपल्याजवळ येईन." तिनें असें सांगितलें असता "ठीक आहे" असें म्हणून तो ब्रह्मानंदामध्ये लीन झाला. ह्याप्रमाणें

इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलिपुराणेतिहाससमुच्चये एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥

सूत उवाच ॥ द्वात्रिंशाब्दे च कृष्णांशे संप्राप्ते योगरूपिणी । वेला नाम शुभा नारी हरिनागरसंस्थिता १ महावतीं समागम्य सभायां तत्र चाविशत् । एतस्मिन्नन्तरे प्रातः कृष्णांशाद्यान्महाबलान् २ नत्वा परिमल भूपं वेला वचनमब्रवीत् । महीपतिं प्रिय मत्वा कृष्णांशं नृप दुष्प्रियम् ३ त्वया मे घातितो भर्ता ब्रह्मानन्दो महाबलः । महीराजसुतैर्दुष्टैस्तारकाद्यैर्महाबलैः ४ नारीवेषं च चामुण्ड धुन्धुकारेण वै कृतम् । स्वामिनं प्रति चागम्य ते जघ्नुश्छद्मना प्रियम् ५ कुरुक्षेत्र स्थितः स्वामी महत्या मूर्छयान्वितः । तस्माच्छूर मया सार्धं गन्तुमर्हथ त प्रति ६ इति घोरतमं वाक्यं श्रुत्वा सर्वे शुचान्विताः । विरभूवंश्च मलना ताम्रां नौ घातितः सखा ७ इत्युक्त्वाऽथैश्च रुरुदुः कृष्णांशाद्या महाबलाः । पत्राणि प्रेषयामासुः स्वकीयान्भूपतीन्प्रति ८ क्रोधयुक्ता तदा वेला लिखित्वा पत्रमुल्बणम् । महीराजाय संप्रेष्य मलना गेहमागमत् ९ तत्पत्रं च महीराजो वाचयित्वा विधानतः । ज्ञात्वा तत्कारणं सर्वं तच्छृणुष्व विशाम्पते १० चिन्ताकलेवरं प्राप्य सुखनिद्रां त्वनाशयत् । आहूय भूपतीन्सर्वान्धैर्यमुद्वान्मुखोऽभवत् ११ चतुर्विंशतिलक्षैश्च शूरैर्भूपसमन्वितैः । कुरुक्षेत्रं ययौ शीघ्रं धृतराष्ट्रांशसंभवः १२ तथा परिमलो भूपो लक्षषोडशसैन्यपः । द्रुपदांशो ययौ शीघ्रं वेलया स्वकुलैः सह १३ स्यमन्तपञ्चकं तीर्थं शिबिराणि चकार ह । ब्रह्मानन्दः स्थितो यत्र समाधिध्यानतत्परः १४ गङ्गाकूलं च ते सर्वे

श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा एकतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३१ ॥

सूत म्हणतात:—कृष्णांशास बत्तिसावें वर्ष लागलें असता योगरूपिणी वेलानामक शुभ स्त्री हरिनागरावर बसून महाबतीस आली व ती सभेमध्यें प्रविष्ट झाली. इतक्यात प्रातःकालींच कृष्णांशादि महाबलाढ्यांस नमस्कार करून ती वेला परिमलराजास म्हणाली " महीपतीस प्रिय मानून व हे राजा, कृष्णांशास अप्रिय मानून तूं माझ्या ब्रह्मानंदनामक महाबलाढ्य पतीस तारकादिक महाबलाढ्य व धूर्त महीराजाच्या पुत्रांकडून मारविलेस. धुंधुकारानें चामुंडास स्त्रीवेष दिला व माझ्या स्वामीकडे येऊन त्यानीं कपटानें माझ्या पतीस मारिलें १–५. तो माझा स्वामी भयंकर मूर्च्छनायुक्त होत्साता साप्रतकाळीं कुरुक्षेत्रात आहे. तरी तुह्मी मजबरोबर त्याच्याकडे चला. " हें अतिशय घोर वाक्य ऐकून ते सर्व शोकानें युक्त झाले. " या राजास व मल्लनेस धिक्कार असो ! या दोघांनीं आमच्या मित्रास मारविलें " अस मोठ्याने म्हणून कृष्णांशादिक महाबलाढ्य वीर मोठ्यानें रडूं लागले. त्यानीं आपल्या राजास तावडतोब पत्रें पाठविलीं. त्यावेळीं क्रोधानें युक्त अमलेल्या वेलेनेही स्वरमतीत पत्र लिहून महीराजास पाठविलें व ती मल्लनेच्या गृहीं आलीं. तें पत्र महीराज यथाविधि वाचविता झाला, व त्यातील सर्व वर्तमान त्यास समजलें. हे राजा, पुढें काय झालें तें ऐक. तो चिंतायुक्त झाला व सुखकारक निद्रेचा त्यानें त्याग केला. सर्व राजांस बोलावून तो युद्धास तयार झाला ६–११. चोवीस लक्ष शूर व राजे यांसहवर्तमान धृतराष्ट्राच्या अंशापासून निर्माण झालेला तो राजा शीघ्र कुरुक्षेत्रास गेला १२. त्याचप्रमाणें सोळा लक्ष सैन्याचा अधिपति परिमलराजा लागलाच वेला व आपले कुल यांसहवर्तमान तेथें आला. तो द्रुपदाचा अंश होय १३. स्यमंतपंचक तीर्थावर त्यानीं आपलीं शिबिरें केलीं. ब्रह्मानंद समाधिध्यानामध्यें तत्पर होऊन तेथेंच होता. विजयाची इच्छा करणारे ते महाबलाढ्य सर्व कौरवांश गंगातीरीं

कौरवांशा महाबला । शिबिराणि विचित्राणि चक्रुस्ते विजयैषिणः १५ कृत्वा ते कार्तिकी-स्नानं दत्त्वा दानान्यनेकशः । मार्गकृष्णद्वितीयायां युद्धभूमिमुपाययुः १६ विष्वक्सेनीयभूपालो लहरस्तत्र चागतः । कौरवांशाश्च तत्पुत्राः षोडशैव महाबलाः १७ पूर्वजन्मनि यन्नाम तन्नाम्ना यश्चिता इह । दुस्सहो दुश्शलश्चैव जलसन्धः समः सहः १८ विन्दस्तथाऽनुविन्दश्च सुबाहुर्दुष्प्रधर्षणः । दुर्मर्षणश्च दुष्कर्णः सोमकीर्तिरनूदरः १९ शलः सत्त्वो विविंशुश्च क्रमाज्ज्ञेया महाबलाः । तोमरान्वयभूपालो बाह्लीकपतिरागतः २० चित्रलक्षैश्च तथा सैन्यैः सप्तपुत्रैश्च भूपतिः । चित्रोपचित्रौ चित्राक्षश्चारुचित्रः शरासनः २१ सुलोचनः सुवर्णश्च पूर्वजन्मनि कौरवाः । तेषामंशाः क्रमाज्जाता अभिनन्दनवेहजाः २२ महानन्दश्च नन्दश्च परानन्दोपनन्दकौ । सुनन्दश्च सुरानन्दः प्रनन्द कौरवांशकाः २३ नृपः परिहरवंशीयो मायावर्मा महाबली । सैन्यलक्षयुतः प्राप्तो दशपुत्रसमन्वितः २४ दुर्मदो दुर्विगाहश्च नैन्दश्च विकटाननः । चित्रवर्मा सुवर्मा च सुदुर्मोचन एव च २५ ऊर्णनाभः सुनाभश्च चोपनन्दश्च कौरवाः । तेषामंशाः क्रमाज्जाताः सुता अङ्गपतेः स्मृताः २६ मत्तः प्रमत्त उन्मत्त सुमत्तो दुर्मदस्तथा । दुर्मुखो दुर्धरो वायुः सुरथो विरथः क्रमात् २७ शुक्रवंशीयभूपालो मूलवर्मा समागतः । लक्षसैन्यैश्च बलवान्दशपुत्रसमन्वितः २८ अयोबाहुर्महाबाहुश्चित्राङ्गश्चित्रकुण्डलः । चित्रायुधो निषङ्गी च पाशी वृन्दारकस्तथा २९ दृढवर्मा दृढक्षत्र पूर्वजन्मनि कौरवाः । तेषामंशा महीं जाता गृहे तन्मूलवर्मणः ३० बलश्च प्रबलश्चैव सुबला बलवान्बली । सुमूलश्च महामूलो दुर्गो भीमो भयङ्करः ३१ कैकयश्चन्द्रवंशीयो लक्षसैन्यसमन्वितः । दशपुत्रान्वितः प्राप्तः कुरुक्षेत्रे महारणे ३२ भीमवेगो भीमबलो बलाकी बलवर्धनः । उग्रायुधो दण्डधरो दृढसन्धो

आपलीं विचित्र शिबिरें करिते झाले. कार्तिकस्नानें करून व अनेक प्रकारची दानें देऊन मार्गशीर्ष कृष्ण द्वितीयेस ते युद्धभूमीवर आले. विश्वक्सेनीय राजा लहर तेथ आला. त्याचे महाबलाढ्य सोळाही पुत्र कौरवाचे अंश होते १४-१७. त्यांचें पूर्वजन्मीं जे नाव होते त्याच नावाचा त्यांनीं या जन्मी आश्रय केला होता. दुस्सह, दुःशल, जलसंध, सम, सह १८, विंद, अनुविंद, सुबाहु, दुष्प्रधर्षण, दुर्मर्षण, दुष्कर्ण, सोमकीर्ति, अनूदर, शल, सत्त्व व विविंसु हीं त्या महाबलवानांची क्रमाने नावें होत. तोमरवंशाचा राजा बाह्लीकपति तीन लक्ष सैन्य व सात पुत्र यांसह आला. चित्र, उपचित्र, चित्राक्ष, चारुचित्र, शरासन, सुलोचन व सुवर्ण नांवाचे पूर्वजन्मी जे कौरव होते तेच अभिनंदनापासून क्रमाने महानंद, नंद, परानंद, उपनंद सुनंद, सुरानंद व प्रनंद या नांवाचे पुत्र झाले १९-२३. परिहरवंशातील मायावर्म म्हणून महाबलाढ्य राजा होता. तो एक लक्ष सैन्यासह दहा पुत्रांसबरोबर घेऊन आला. दुर्मद, दुर्विगाह, नैंद, विकटानंद, चित्रवर्मा, सुवर्मा, सुदुर्मोचन, ऊर्णनाभ, सुनाभ व उपनंद असे जे पूर्वी कौरव होते त्यांच्या अंशापासून अंगपतीस मत्त, प्रमत्त, उन्मत्त, सुमत्त, दुर्मद, दुर्मुख, दुर्धर, वायु, सुरथ व विरथ असे क्रमानें झाले. शुक्रवंशातील मूलवर्मा राजा आला. त्याच्याबरोबर एक लक्ष सैन्य व दहा पुत्र होते. अयोबाहु, महाबाहु. चित्राग, चित्रकुंडल, चित्रायुध, निषंगी, पाशी, वृंदारक, दृढवर्मा व दृढक्षत्र असे पूर्वजन्मीं जे कौरव होते त्यांच्या अंशापासूनच भूलोकी मूलवर्म्याच्या गृही बल, प्रबल, सुबल, बलवान्, बली, सुमूल, महामूल, दुर्ग, भीम व भयंकर असे दहा पुत्र क्रमाने झाले २४-३१. चंद्रवंशातील उत्पन्न झालेला कैकय एक लक्ष सैन्य व दहा पुत्र यासह कुरुक्षेत्रातील महारणांत आला ३२. भीमवेग, भीमबल, बलाकी, बलवर्धन, उग्रायुध, दंडधर, दृढसंध, महीधर, जरासंध

महीधरः ३३ जरासन्धः सत्यसन्धः पूर्वजन्मनि कौरवाः । तेषामंशाः समुद्भूताः कैकयस्य गृहे शुभे ३४ काम प्रकाम. सकामो निष्कामो निरपत्रपः । जयश्च विजयश्चैव जयन्तो जयवाञ्जयः ५ नागवंशोद्भवभूपालो नागवर्मा समागतः । लक्षसेनान्वितः प्राप्तो दशपुत्रसमन्वितः ३६ पूर्वजन्मनि यन्नाम्ना तन्नाम्नो कौरवा भुवि । पुण्ड्रेशपत्तने पुत्रा जाता दश शिवाज्ञया ३७ उग्रश्रवा उग्रसेना सेनानीर्दुष्परायणः । अपराजितः कुण्ड शायी विशालाक्षो दुराधरः ३८ दृढहस्तः सुहस्तश्च सुतास्ते नागवर्मणः । मद्रकेश समायातस्तोमरान्वयसभव. ३९ लक्षसैन्यैर्युतो राजा दशपुत्रसमन्वितः । वातवेगः सुवर्चाश्च नागदन्तोऽग्रयाजकः ४० आदिकेतुश्च वक्री च कवची क्राथ एव च । कुण्डश्च कुण्डधारश्च कौरवा पूर्वजन्मनि ४१ तन्नाम्ना भुवि वै जाता मद्रकेशस्य मन्दिरे । नृपः शार्दूलवंशीयो लक्षसैन्यसमन्वितः ४२ पूर्णामलो नागधेशो दशपुत्रान्वितो ययौ । वीरबाहुर्भीमरथश्चोग्रश्चैव धनुर्धरः ४३ रौद्रकर्मा दृढरथो लोलुश्चाभयस्तथा । अनाधृष्टः कुण्डभेदी कौरवाः पूर्वजन्मनि ४४ पूर्णामलस्य वै गेहे तन्नाम्ना भुवि संभवः । मङ्कणः किन्नरो नाम रूपदेशे महीपतिः ४५ चीनदेशात्परम्पारे रूपदेशः स्मृतो बुधैः । नरः किन्नरजातीयो वसति प्रियदर्शनः ४६ मङ्कणश्च तदा प्राप्तः किन्नरायुतसयुतः । अष्टपुत्रान्वितः प्राप्तो यत्र सर्वे नृपाः स्थिताः ४७ विरावी प्रमथश्चैव प्रमथी दीर्घरोमकः । दीर्घबाहुर्महाबाहुर्व्यूढोरा कनकध्वजः ४८ पूर्वजन्मनि यन्नाम्ना तन्नाम्ना किन्नरा भुवि । विरजांशश्च यो जातो मङ्कणो नाम किन्नरः ४९ नेत्रसिंहः समायातो लक्षसैन्यसमन्वित. । शल्यांशः स तु विज्ञेयः शार्दूलान्वयसभव. ५० तदा गजपती राजा लक्षसैन्यसमन्वितः । सप्राप्त. शकुनेरास्त्यमत्वा गेहेऽस्य पुत्रकान् ५१ मयूरध्वज एवापि लक्षसैन्य-

व सत्यसंध या नांवाचे पूर्वजन्मी जे कौरव होते त्याच्याच अंशापासून कैकेयाच्या शुभ गृहात काम, प्रकाम, सकाम, निष्काम, निरपत्रप, जय, विजय, जयंत, जयवान् व जय असे पुत्र झाले. नागवंशातील नागवर्मा राजा एक लक्ष सैन्य व दहा पुत्र यांसह आला ३३-३९. पूर्वजन्मी भूलोकी कौरव ज्या नावाने प्रसिद्ध होते त्याच नावाने पुण्ड्रदेशाच्या राजास शंकराच्या आज्ञेने दहा पुत्र झाले ३७. उग्रश्रवा, उग्रसेना, सेनानी, दुष्परायण, अपराजित, कुंडशायी, विशालाक्ष, दुराधर, दृढहस्त व सुहस्त असे नागवर्म्याचे पुत्र होते. तोमरवंशामध्ये उत्पन्न झालेला मद्रकेश राजा लक्ष सैन्य व दहा पुत्र यांसह आला. वातवेग, सुवर्चस, नागदंत, अग्रयाजक, आदिकेतु, वक्रशी, कवची, क्राथ, कुंड व कुंडधार असे जे पूर्वजन्मी कौरव होते तेच मद्रकेशाच्या मंदिरी त्याच नावाने उत्पन्न झाले. शार्दूलवंशामध्ये उत्पन्न झालेला पूर्णामलनामक मगधदेशाधिपति एक लक्ष सैन्य व दहा पुत्र यांसह आला. वीरबाहु, भीमरथ, उग्र, धनुर्धर, रौद्रकर्मा, दृढरथ, लोलुप, त्याचप्रमाणे अभय, अनाधृष्ट व कुंडभेदी या नावांचे पूर्वजन्मी जे कौरव होते तेच त्याच नावानें भूलोकी पूर्णामलाच्या गृही उत्पन्न झाले. किन्नरनामक मंकण रूपदेशामध्ये राजा होता. चीन देशाच्या अगदी पलीकडे रूप देश आहे असे ज्ञानी म्हणतात. तेथे किन्नर जातीचा प्रियदर्शन नर रहात असतो ३४-४६. त्यावेळी दहा सहस्र किन्नरासह मंकण आला. त्याने आपले आठ पुत्र बरोबर आणिले होते. ज्या ठिकाणी सर्व राजे होते तेथें तो आला ४७. विरावी, प्रमाथी, दीर्घरोमक, दीर्घबाहु, व्यूढोरा, कनकध्वज व प्रमथ या नावांचे पूर्वजन्मी जे होते तेच भूलोकी त्याच नावाचे किन्नर झाले. विरजाच्या अंशापासून मंकणनामक किन्नर झाला. लक्ष सैन्यासह नेत्रसिंह आला. तो शल्याचा अंश होय असे समजावे. त्याचा शार्दूलवंशामध्ये जन्म झाला होता. तेव्हा राजा गजपति एक लक्ष सैन्यासह

समन्वितः । मकरन्दं गृहं त्यक्त्वा विराटांशः समागतः ५२ वीरसेनः समायातः कामसेन-समन्वितः । लक्षसेनान्वितस्तत्र चोग्रसेनांशसंभवः ५३ लक्षणश्च समायातः सप्तलक्षबलैर्युतः । संस्थाप्य पद्मिनीं नारीं महाकष्टेन भूपतिं ५४ तालनो धान्यपालश्च लक्षसिंहस्तथैव च । भीमस्यांशो युयुत्सोश्च कुन्तिभोजस्य वै क्रमात् ५५ आह्लादश्च समायात कुष्णांशेन समन्वितः । जयन्तेन च वै वीरो लक्षसैन्यान्वितो बली ५६ जगन्नायक एवापि शूरायुतसमन्वित । संप्राप्तो भगदत्तांशो गौतमान्वयसंभव. ५७ अन्ये च क्षुद्रभूपाश्च सहस्राढ्या. पृथक्पृथक् । कुरुक्षेत्र परं स्थान सययुर्वेदविद्बलाः ५८ मूलवर्मा च नृपतिः सपुत्रो लक्षसैन्यपः । नृप परिमल प्राप्य सयुक्तो देहलीपतिः ५९ कैकयो लक्षसंयुक्त्या सपुत्रो नृपतिः स्वयम् । नृपं परिमलं प्राप्य स युद्धार्थमुपस्थितः ६० नत्रसिंहश्च नृपति. सवीरो लक्षसैन्यपः । मयूरध्वज एवापि लक्षपः शशिवंशजम् ६१ वीरसेनश्च लक्षाढ्य सपुत्रश्चन्द्रिरक्षगः । लक्षणः सप्तलक्षाढ्यो युद्धार्थं समुपस्थितः ६२ आह्लादो लक्षसैन्याढ्य पक्षगश्चन्द्रवंशिनः । त्रिलक्षसयुतो राजा चन्द्रवंशो रणोन्मुखः ६३ एवं षोडशलक्षाढ्य स्थितः परिमलो रणे । लहरो भूपतिश्रेष्ठो लक्षपः पुत्रसयुतः ६४ महीराजमुपागम्य युद्धार्थं समुपस्थितः । अभिनन्दन एवापि सपुत्रो लक्षसैन्यप ६५ मायावर्मा च नृपति. सपुत्रो लक्षसैन्यपः । नागवर्मा समायात सपुत्रो लक्षसैन्यपः ६६ मद्रकेशः सपुत्रश्च लक्षसैन्यो रणोन्मुखः । पूर्णामल सपुत्रश्च लक्षपश्चैव पक्षगः ६७ मङ्कुगः किन्नरो नाम सपुत्रस्तत्र संस्थित. । गजराजः समायातो महीराज हि लक्षपः ६८ धुन्धुकारः समायात. पञ्चलक्षपतिः स्वयम् । पुत्रः कृष्णकुमारस्य भगदत्तः समा-

---

आला. तो शकुनीचा अंश होता. तो आपल्या पुत्रास गृही ठेवून आला होता ४८-५१. मयूरध्वजही एक लक्ष सैन्यासह मकरदास गृही ठेवून आला. तो विराटाचा होय. कामसेनासह वीरसेन आला. त्याच्या जवळ एक लक्ष सैन्य होते. तो उग्रसेनाचा अंश होय. सात लक्ष सैन्यासह लक्षण पद्मिनी स्त्रीस सोडून मोठ्या कष्टाने आला तालन, धान्यपाल व तसाच लक्षसिंह हे क्रमानें भीम, युयुत्सु व कुंतिभोज याचे अंश होते ५२-५५. कृष्णांशासह व जयतासह वीर आल्हाद एक लक्ष सैन्य घेऊन आला. जगन्नायकही दहा सहस्र सैन्यासह आला. तो गौतमवंशामध्ये निर्माण झाला असून तो भगदत्ताचा अंश होय. मदोन्मत्त झालेले दुसरेही अनेक क्षुद्र राजे पृथक् पृथक् सहस्र सैन्यानें युक्त होत्साते श्रेष्ठ स्थान जे कुरुक्षेत्र त्यामध्ये आले ५६-५८. राजा मूलवर्मा पुत्रासह लक्ष सैन्य घेऊन राजा परिमलाकडे येऊन मिळाला. कैकय एक लक्ष सेना व पुत्र यासह स्वत. परिमलराजाकडे येऊन युद्धाकरिता उभा राहिला. राजा नेत्रसिंह एक लक्ष सैन्य व दुसरे अनेक वीर यासह आला. लक्ष सैन्याचा अधिपति मयूरध्वजही चंद्रवंशीय राजाकडे आला. पत्रासह एक लक्ष सैन्याने संपन्न असलेला वीरसेन चंद्रवंशाकडेच आला. लक्षण सात लक्ष सैन्यानें युक्त होऊन युद्धाकरिता येऊन थडकला ५९-६२. लक्ष सैन्यानें संपन्न असलेला आल्हाद चंद्रवंशातील राजाच्या पक्षास मिळाला; व तो स्वतः चंद्रवंशीय राजा तीन लक्ष सैन्यांनी युक्त होऊन रणोन्मुख झाला. याप्रमाणे सोळा लक्ष सैन्यानीं युक्त असलेला परिमल युद्धास येऊन राहिला. श्रेष्ठ राजा लहर एक लक्ष सैन्याचा अधिपति असून तो पुत्रासह महीराजाजवळ येऊन युद्धाकरिता तयार झाला. अभिनदन, पुत्र व लक्ष सैन्य यासह त्याच्याकडे आला ६३-६५. पुत्रासह लक्ष सैन्याचा अधिपति राजा मायावर्मा, लक्ष सैन्याचा नायक पुत्रासह नागवर्मा महीराजाकडे आला. मद्रकेश, पुत्र व लक्ष सैन्य यासह रणोन्मुख झाला. लक्ष सैन्य व पुत्र यासह पूर्णामलही त्याच पक्षास येऊन मिळाला. किन्नरनामक मकरण पुत्रासह तेथे आला. लक्ष सैन्याचा नायक गजराज महीराजा-

गत ६९ त्रिलक्षबलसंयुक्तो महीराजं महीपतिम्। दलवाहनपुत्रश्च देशगोपालसंस्थितः ७० अङ्गदस्तत्र संप्राप्तः सायुतो देवकीप्रियः। महीराजमुपागम्य युद्धार्थं समुपस्थितः ७१ कलिङ्गश्च नृप प्राप्तस्त्रिकोणश्च तथैव च। श्रीपतिश्च तथा राजा श्रीतारश्च तथागत ७२ मुकुन्दश्च सुकेतुश्च रुहिलो गुहिलस्तथा। इन्दुवारश्च बलवान्नयन्तश्च तथाविधः ७३ सर्वे दशसहस्राढ्या महीराजमुपस्थिताः। महीराजस्य पक्षे तु सहस्र क्षुद्रभूमिपाः ७४ ते तु साहस्रसेनाढ्या महीराजमुपस्थिताः। तेषां मध्ये च वै भूपान्द्विशतान्दहली प्रति ७५ ससैन्यान्प्रेषयामास राष्ट्ररक्षणहेतवे। एव स देहलीराजा चतुर्विंशतिलक्षपः ७६ युद्धषष्ठादशाहानि सजातं सर्वक्षयम्। शृणु युद्धकथा रम्यां भृगुवर्य सुविस्तरात् ७७ मार्गकृष्णद्वितीयायां महीराजो महाबलः। आहूय लहरं भूप वचन प्राह निर्भयः ७८ भवान्सपुत्र सेनाढ्या धन्धुकारेण रक्षित। चामुण्डेन युतो युद्धे गन्तुमर्हति सत्तम ७९ इति श्रुत्वा ययौ शीघ्र कुरुक्षेत्रे महारणे। तदा परिमलो राजा मयूरध्वजमेव हि ८० समाहूय वचः प्राह शृणु पार्थिवसत्तम। कृष्णांशेन जयन्तेन देवसिंहेन रक्षितः ८१ स भवाङ्लक्षसैन्याढ्यो गन्तुमर्हति वै रणे। इति श्रुत्वा तु वचन मयूरध्वज एव हि ८२ लक्षसैन्यान्वितः प्राप्तो लहरं नृपतिं प्रति। तयोश्चासीन्महद्युद्ध मनयोरुभयो रणे ८३ सेना तु लक्षवीरस्य तत्र युद्धे प्रकीर्तिता। एको रथो गजास्तत्र ज्ञेया पञ्चशत रणे ८४ हयाश्च पञ्चसाहस्राः पत्तयस्तद्गणा दश। एते सैन्या नरा ज्ञेयाः सैन्यपांश्च शृणुष्व भोः ८५ दशानां पञ्चराणां च पतिर्नाम्ना स पत्तिपः। पञ्चानां च हयानां च पतिर्नाम्ना स गुल्मप ८६ पञ्चानां च गजानां च पतिर्नाम्ना गजाधिप। एतैः सार्धं रथी ज्ञेयो रणेऽस्मिन्दारुणे कलौ ८७ उष्ट्रारूढाः स्मृता

कडेच आला. स्वत: धुंधुकार पाच लक्ष सैन्याचा अधिपति होऊन आला. कृष्णकुमाराचा पुत्र भगदत्त तीन लक्ष सैन्यासह राजा महीराजाकडे आला. देशगोपाळामध्ये असणारा दलवाहनपुत्र अंगद दहा हजार सैन्यासह महीराजाच्या पक्षास येऊन मिळाला व युद्धास सिद्ध झाला. तो देवकीस प्रिय होता. राजा कलिंग, तसाच त्रिकोण, श्रीपति, त्याचप्रमाणे राजा श्रीतार, मुकुद, सुकेतु, रुहिल, गुहिल, इदुवार व बलवान् जयत हे सर्व राजे दहा सहस्र सैन्यानें युक्त असून महीराजाकडे येऊन राहिले. महीराजाच्या पक्षात क्षुद्र राजे एक हजार होते. ते एकेक सहस्र सेना घेऊन महीराजाकडे आले. त्यांतील दोनशे राजास महीराजानें सैन्यासह देहलीस राष्ट्राचे संरक्षण करण्याकरिता पाठविलें. याप्रमाणे तो देहलीचा राजा चोवीस लक्ष सैन्यानें युक्त होता. सर्वांचा क्षय करणारें तें युद्ध अठरा दिवस झालें. हे भृगुवर्य, तू ती रम्य युद्धकथा विस्तारपूर्वक ऐक. मार्गशीर्ष कृष्ण द्वितीयेस महाबलवान् निर्भय महीराज लहरराजास बोलावून ह्मणाला "हे उत्तम राजा, तूं पुत्रासह सैन्यानें युक्त होऊन व चामुंडासही बरोबर घेऊन युद्धामध्ये जा. धुधुकार तुझे रक्षण करील." हे ऐकून तो कुरुक्षेत्रातील महारणामध्ये गेला. त्यावेळीं राजा परिमल मयूरध्वजास बोलावून ह्मणाला "हे उत्तम राजा, ऐक. कृष्णांश, जयत व देवसिंह यानी ज्याचें रक्षण केले आहे असा तूं लक्ष सैन्यासह रणामध्ये जा." हे त्याचें वचन ऐकून मयूरध्वज लक्ष सैन्यासह लहरराजावर चाल करून आला. त्या उभय पक्षाचें समरागणामध्ये मोठे युद्ध झालें. त्या युद्धामध्यें एक लक्ष वीरानी युक्त असलेल्या सैन्याची संख्या अशी सांगितलेली आहे. एक रथ, पाचशें हत्ती, पाच हजार घोडे व त्याच्या दसपट पायदळ हे सैन्यातील पुरुष होत असें समजावें. आता सैन्यनायक किती असतात तें ऐक. दहा पायानें चालणाऱ्या लोकावर एक नायक असतो. त्याचे नाव 'पत्तिप'. पाच घोड्याचा एक पति असतो. त्यास गुल्मप असें ह्मणतात. पाच गजाचा गजाधिप या नावाचा एक पति असतो

सूनाश्चत्वारिंशच्च तद्वले । शतघ्नस्तत्र साहस्रास्तेषां मध्ये पृथक्पृथक् ८८ षट्त्रिंशतिः पदचरास्तेषां कर्माणि मे शृणु । दश गोलकदातारो दश तत्पुष्टिकारकाः ८९ दश चार्द्रकरास्तान्वै त्रयस्ते वह्निदायिनः । त्रयो दृष्टिकरा ज्ञेयास्त्रियामेषु पृथक्पृथक् ९० शेषाः शूद्रास्तु सेनानां शूरकृत्यपरायणाः । एवं च लक्षवीराणां सेना तत्र प्रकीर्तिता ९१ तत्रासीत्तुमुलं युद्धं धर्मेण च समन्ततः । प्रातःकालात्समारभ्य मध्याह्ने सैन्ययोर्द्वयोः ९२ तत्पश्चाद्यामसात्रेण सैन्यपा युद्धमागताः । तत्पश्चाच्च महाशूरा धुन्धुकारादयो बलाः ९३ याममात्रं च युद्धाय संस्थिता रणमूर्द्धनि । चामुण्डेन च कृष्णांशो धुन्धुकारेण चेन्दुलः ९४ भगदत्तेन वै देवः कृतान्युद्धदुर्मदम् । सायंकाले तु संप्राप्ते सर्वे शूराः क्षयं गताः ९५ कृष्णांशस्तत्र चामुण्डं जित्वा तु लहराःसुजान् । षोडशैव जघानाशु घटीमात्रेण वीर्यवान् ९६ दध्मौ शङ्खं प्रसन्नात्मा लक्षणान्तमुपागयौ । चामुण्डो धुन्धुकारश्च भगदत्तो युतः शतैः ९७ महीराजमुपागम्य सुषुपुर्निर्भिया निर्भया । इन्दुलो देवसिंहश्च सहस्रैः सयुतौ मुदा ९८ गत्वा परिमलं भूपं रात्रौ सुषुपतुस्तदा । प्रातःकाल तु संप्राप्ते तृतीयायां भयङ्करे ९९ महीराजस्तदाहूय वृ. गजपतिं बली । वचनं प्राह भो राजन्यवीरैः सुरक्षितः १०० स्वकीयैलक्षसैन्यैश्च गन्तुमर्हसि वै रणे । तदा परिमलो भूपो नेत्रसिंहं महीपतिम् १ युद्धायाज्ञापयामास कृष्णांशादीः सुरक्षितम् । तयोश्चासीन्महद्युद्धं सेनयोरुभयोः क्रमात् २ हया हयैः क्षयं जग्मुर्गजाश्चैव तथा गजैः । पद्धराः पद्धरैः सार्द्धं शतघ्नश्च शतघ्निभिः ३ अपराह्णे मुनिश्रेष्ठ नेत्रसिंहो महा-

---

तात्पर्य, या घोर कलियुगामध्ये रणातील रथी इतक्या लोकासह असतो असे समजावें. त्या सैन्यामध्ये उंटावर बसलेले चाळीस दूत असतात असे सांगितलें आहे. त्यामध्ये निरनिराळ्या सहस्र शतघ्नी असतात. त्यातील प्रत्येक शतघ्नीबरोबर छत्तीस पायानी चालणारे लोक असतात. त्यांची कामें कोणतीं तीं मी सांगतों, ऐक. दहा गोळे देणारे, दहा त्यास भरणारे, दहा त्यास आर्द्र करणारे, तीन बत्ती देणारे व तिघे चोहोंकडे दृष्टि ठेवणारे असतात असे समजावें. हे तीन प्रहरानीं निरनिराळे बदलून ठेवावे. आता बाकी राहिलेले सर्व शूद्र असतात. ते सैन्यातील शूरांचीं कामें करणारे होत. याप्रमाणे लक्ष वीरांची सेना सांगितलेली आहे. त्याठिकाणीं चोहोंकडे भयंकर धर्मयुद्ध झालें. तीं दोन्हीं सैन्यें प्रातःकालापासून मध्यान्हकालापर्यंत लढत होतीं. नंतर एक प्रहरभर सेनानायक युद्धास आले. त्यान्यामागून महाशूर व बलाढ्य धुंधुकारादि एक प्रहरभर समरांगणीं येऊन युद्धाकरिता उभे राहिले. कृष्णांश चामुंडाशीं, इंदुल धुधुकाराशी व देवदत्त भगदत्ताशीं असह्य युद्ध करिता झाला. सायंकाल झाला असता सर्व शूराचा नाश झाला. त्याठिकाणीं कृष्णांशाने चामुंडास जिंकून लहराच्या सोळा पुत्रास एका घटकेंत मारिलें व तो वीर्यवान् प्रसन्न होऊन शंख वाजवू लागला आणि शेवटीं तो लक्षणाजवळ आला. चामुंड, धुधुकार व भगदत्त हे शंभर वीरासह महीराजाकडे आले व रात्रीं ते निर्भयपणें निजले. इंदुल व देवसिंह सहस्र वीरासह आनंदानें परिमलराजाकडे जाऊन रात्रीं विश्रांति घेते झाले. तृतीयेस भयंकर प्रातःकाल प्राप्त झाला असतां बलाढ्य महीराज राजा गजपतीस बोलावून ह्मणाला " हे राजा, तूं तीन वीराकडून सुरक्षित आहेस ६६-१००. तूं आपल्या एक लक्ष सैन्यासह युद्धामध्यें जाण्यास तयार हो. " तेव्हां परिमलराजा नेत्रसिंह राजास युद्धाकरिता आज्ञा करिता झाला. कृष्णांशादिकानीं त्याचें उत्तम प्रकारें रक्षण केलें होतें. त्या दोन्हीं सैन्याचें मोठें युद्ध झालें. पुढें क्रमानें घोड्याच्या योगानें घोड्याचा क्षय झाला; गजाच्या योगानें गज नष्ट झाले; पायानें चालणाऱ्या लोकानीं पायदळाशी युद्ध केलें व तोफानी तोफावर मडिमार केला १-३.

बलः । महाराज गजपतिं गत्वा युद्धमचीकरत् ४ परस्परं च विरथौ संछिन्नधनुषौ तदा । खड्गहस्तौ महीं प्राप्य चक्रतू रणमुल्बणम् ५ अन्योन्येन वधं कृत्वा स्वर्गलोकमुपागतौ । इन्दुलस्तं तु चामुण्डं देवा वै धुन्धुकं तथा ६ कृष्णांशो भगदत्तं च जित्वा राजानमाययु । शेषैः पञ्चशतैः शूरैस्तैः सार्धं लक्षणं प्रति ७ पराजिताश्च ते सर्वे सहस्रैः सहिता ययुः । प्रातःकाले तु सम्प्राप्ते महीराजो महाबलः ८ मायावर्माणमाहूय वचनं प्राह निर्भयः । भवान्दशसुतैर्वीरैर्लक्षसैन्यैश्च संयुतः ९ सर्वशत्रुविनाशाय गन्तुमर्हति सत्तम । इति श्रुत्वा स नृपतिर्वाद्यान्संवाद्य चाययौ ११० दृष्ट्वा परिमलो भूपो मायावर्माणमागतम् । जगन्नायकमाहूय वचनं प्राह निर्भयः ११ भवान्दशसहस्रैश्च सार्धं तैस्त्रिभिरन्वितः । गन्तुमर्हति युद्धाय शीघ्रं महिजय कुरु १२ इति श्रुत्वा ययौ शीघ्रं सेनयोरुभयोर्महत् । युद्धं चासीन्मुनिश्रेष्ठ याममात्रं भयानकम् १३ हतास्ते दशसाहस्रा कृष्णांशाद्यैः सुरक्षिताः । शङ्खान्दध्मुश्च ते सर्वे चाङ्गदेशनिवासिनः १४ एतस्मिन्नन्तरे धीराः कृष्णांशाद्यास्तुरंगिकाः । याममात्रेण संजघ्नुर्लक्षसैन्यं रिपोस्तदा १५ अपराह्णे महाराजो मायावर्मा सुतैः सह । कृष्णांशं देवसिंहं च संप्राप्तो जगन्नायकः १६ अथाङ्गभूप दशपुत्रयुक्तं कृष्णांश एवाशु जगाम शीघ्रम् । हयस्थितो वीरवरः प्रमाथी कलैकजातो मधुसूदनस्य १७ ततोऽङ्गभूपस्त्रिभिरेव बाणैस्ताडयन्मूर्ध्नि च पार्श्वयोर्द्वौ अमर्षमाणः बलवान्महीपतिर्दण्डैर्हतः काल इवाशु सर्पः १८ हयं समुड्डीय स पुष्करान्ते ततोऽभ्यगात्तं नृपतिं रथस्थम् । हयस्य पातैर्विरथीचकार स एव भूपोऽसिमुपादधनः १९ तेनासिना छिन्दुलमङ्गशल्यं कृत्वा

हे मुनिश्रेष्ठ, अपराह्णसमयीं महाबलाढ्य नेत्रसिंह महाराजा गजपतीवर चाल करून गेला व त्याच्याशीं युद्ध करिता झाला ४. त्यानीं परस्परास विरथ केलें. एकमेकाचीं धनुष्यें तोडिलीं व शेवटीं हातात खड्ग घेऊन व भूमीवर येऊन ते भयकर युद्ध करू लागले ५. एकमेकानीं एकमेकाचा वध केला व ते दोघेही स्वर्गलोकीं गेले. नतर इंदुलानें चामुंडास, देवसिंहानें धुधुकारास व कृष्णाशानें भगदत्तास जिंकिलें व ते सर्व शेष राहिलेल्या पाचशें शूरासह राजा लक्षणाकडे गेले ६,७. इकडे पराजय पावलेले ते सर्व हजार वीरासह महीराजाकडे गेले. दुसरे दिवशीं प्रातःकाल झाला असता महाबलाढ्य महीराज मायावर्म्यास बोलावून निर्भयपणें असें म्हणाला " हे श्रेष्ठा, तू दहा शूर पुत्र व लक्ष सैन्य यासह सर्व शत्रूंचा नाश करण्याकरिता जा. " हें ऐकताच तो राजा वाद्यें वाजवून निघाला. मायावर्मा राजा आला आहे असें पाहून निर्मळ परिमलराजा जगनायकास बोलावून असें म्हणाला ८-११ " तू दहा सहस्र सैन्य व ते तिघे वीर यासह युद्ध करण्याकरिता त्वरित जा व माझा जय कर. " हे ऐकून तो लागलाच गेला. त्या दोन्ही सैन्याचें मोठे युद्ध झालें. हे मुनिश्रेष्ठा, तें भयकर युद्ध एक प्रहरभर चाललें होते १२,१३. कृष्णाशादिकानीं ज्याचें रक्षण केलें. आहे असे ते दहा सहस्र वीर मेले असता अगदेशामध्यें राहणाऱ्या त्या सर्वानीं शंख वाजविलें. इतक्यात शेवटीं असलेले धीर कृष्णाशादि एका प्रहरामध्ये शत्रूचे एक लक्ष सैन्य मारिते झाले १४,१५. अपराह्णसमयीं महाराजा मायावर्मा पुत्रासह कृष्णाश, देवसिंह व गजनायक यावर आला १६. तेव्हा दहा पुत्रानीं युक्त असलेल्या अंगराजावर कृष्णाश लागलाच चाल करून गेला. तो वीरश्रेष्ठ घोड्यावर बसलेला होता व सर्वांचे कंदन करण्याचें सामर्थ्य मधुसूदनाच्या त्या एका कलेपासून झालेल्या वीरामध्ये होते १७.असो; अंगराजा तीन बाणानीं त्याच्या मस्तकीं व दोन्हीं बाजूंस ताडन करिता झाला. तेव्हा तो कोपाविष्ट झालेला बलवान् राजा दंडाने प्रहार केलेल्या सर्पाप्रमाणे खवळून आपल्या घोड्यास अतरिक्षामध्यें उडवून तदनंतर रथावर बसलेल्या त्या राजाच्या

स कृष्णांशमुवाच वाक्यम् । कल्लोलमायात्तव नाशनाय त्वया जिता भूपतयः प्रधानाः १२० तदैव कीर्तिर्भविता ममाशु हत्वा भवन्त च सुखी भवामि । इत्युक्तवन्त नृपतिं महान्त सेनासिना तस्य शिरो जहार ११ हतेऽङ्गभूपे दश तस्य पुत्रास्तमेव जग्मुर्युधि कौरवांशाः । तानागतान्विन्दुल एव पञ्च जघान बाणैस्तु तदा समन्युः १२ उभौ च देवस्तु जघान तत्र भल्लेन सिद्धेन नृपात्मजौ च । ज्यघ्र सुतं गौतम एव हत्वा द्वौ यौ स कृष्णांश उपाजगाम २३ शङ्खान्प्रदध्मू रुचिराननास्ते प्रदोषकाले शिबिराणि जग्मुः । श्रमान्वितास्ते सुषुपुर्निशायां प्रातः समत्थाय सुकर्म कृत्वा २४ गत्वा सभायां नृपतिं प्रणम्य वाक्यं समूचुः शृणु चन्द्रवंशिन् । अद्यैव सेनापतिरस्ति को वै चाज्ञापयास्मान्नृप तस्य गुप्त्यै २५ श्रुत्वाह भूपोऽथ तु वीरसेनः सकामसेनः स्वबलैः समेतः। रणं करिष्यत्यचिरेण वीरास्तस्मात्सुरक्षध्वमरिभ्य एव च २६ स वीरसेनो नृपतिं प्रणम्य लक्षैः स्वसैन्यैर्युधि संजगाम । तदा महीराज नृपः प्रतापी स नागवर्माणमुवाच तापी २७ रणाय गच्छाशु सुतैः समेतो लक्षैः स्वसैन्यैरुत भूपवर्य । हत्वा रिपुं घोरतमं हि वीरं पतिं महान्तं युधि वीरसेनम् २८ इत्युक्तवन्त नृपतिं प्रणम्य सुवादयामास तदा हि वीरः । तयोर्बभूवाशु रणो महान्वै सुसेनयोः सकुलयुद्धकार्ययोः २९ त्रियाममात्रेण हताश्च सर्वे विमानमारुह्य ययुश्च नाकम् । हतेषु सर्वेषु च नागवर्मा सुतेषु वै यादवभूपमाह ३० भवान्विसैन्यश्च तथैव चाहं

अगावर जाऊन पडला. तेव्हा त्या घोड्याच्या पातामुळे तो राजा विरथ झाला. त्याबरोबर त्याने तरवार घेऊन त्या तीक्ष्ण खड्गाने बिदुलाच्या अगावर प्रहार केला व तो कृष्णांशास ह्मणाला "तुला मारण्याकरिता हा उत्तम काल प्राप्त झालेला आहे. कारण, तू सर्व मुख्य मुख्य राजास जिंकिले आहेस. यास्तव, तुला मारल्याने माझी तत्काल कीर्ति होईल." पण असे बोलणाऱ्या त्या श्रेष्ठ राजाचे कृष्णांशाने आपल्या तरवारीने मस्तक तोडिले १८-२१. पण तो अगराजा मेला असता कौरवाच्या अंशापासून झालेले त्याचे पुत्र त्याच्यावर जाऊ लागले. पण त्या आलेल्या दहा पुत्रांपैकी पाच पुत्रांस क्रोधयुक्त इदुलाने बाणाच्या योगाने मारिलें २२. त्यातील दोघा राजपुत्रास देवसिंहाने आपल्या सिद्ध भाल्याने नाहीसें करून टाकिलें व त्यातील ज्येष्ठ पुत्रास गौतम जगनायकाने यमलोकी पाठविले आणि शेवटी जे दोन राहिले होते त्याचा समाचार कृष्णांशाने घेतला २३. नंतर युद्धमदाने ज्यांची मुखें सुंदर झाली आहेत असे ते सर्व प्रदोषकाली शंख वाजवून आपल्या शिबिरास गेले. रात्री श्रमयुक्त झाल्यामुळे त्यास गाढ झोप लागली व प्रातःकाली उठून आपली सर्व नित्यकर्मे करून सभेमध्ये जाऊन राजास प्रणाम करून ह्मणाले 'हे चंद्रवंशिन्, ऐक. आज कोण सेनापति आहे? त्याच्या रक्षणाकरिता हे राजा, आह्मास आज्ञा कर.' ते ऐकून राजा ह्मणतो 'आज तर कामसेन व आपलें सैन्य यासह वीरसेन आताच युद्ध करणार आहे. यास्तव, हे वीरहो, तुह्मी त्याचें शत्रूपासून रक्षण करा' २४-२६. तेव्हा तो वीरसेन राजास नमस्कार करून आपल्या सैन्यासह संग्रामात गेला. तेव्हा प्रतापी महीराज नागवर्म्यास ह्मणाला "हे श्रेष्ठ राजा, तूं आपल्या पुत्रासह व एक लक्ष सैन्यासह युद्धास जा. शत्रूस मारून व अतिशय घोर वीरास धारातीर्थी पाडून युद्धामध्ये भयकर पराक्रम करणाऱ्या सेनापति वीरसेनास यमलोकी पाठीव." असे सांगणाऱ्या त्या राजास प्रणाम करून त्या वीराने तात्काल वाद्ये वाजविली. नंतर त्या दोन्ही भयंकर युद्ध करणाऱ्या सेनाचें भयंकर युद्ध झाले. तीन प्रहरामध्ये सर्व वीर मेले व विमानामध्ये बसून स्वर्गलोकी गेले. याप्रमाणें सर्व वीर नष्ट झाले असता पुत्रासह असलेला नागवर्मा यादव राजास ह्मणाला "तू जसा सैन्यान्वित आहेस तसाच मी आहे व तू जसा पुत्रयुक्त आहेस तसाच मीही आहे. यास्तव, धर्माचे

भवान्सपुत्रश्च तथाऽहमेव । सम्मृत्य धर्मं कुरु युद्धमाशु ततो रथस्थः सुधनुर्गृहीत्वा ३१ बाणैश्च बाणान्भुवि तौ च छित्त्वा बभूवतुस्तौ विरथौ नृपाग्र्यौ । खड्गेन खड्गं च तथैव छित्त्वा विमानमारुह्य गतौ हि नाकम् ३२ स कामसेनः स्वरिपोश्च पुत्रान्निघान बाणैश्च तदाऽष्टसरूयान् । उग्रष्ठद्वयौ कोपसमन्वितौ त गृहीतखड्गौ च समीयतुश्च ३३ रिपोः शिरो जहरतुरुग्रवेगौ स कामसेनस्य कबन्ध एव । हत्वा रिपू तौ च तदा मिलित्वा स्वर्गं ययुस्ते च विमानरूढाः ३४ हतेषु सर्वेषु तदा त्रयस्ते चामुण्डकाद्या जगनायक ते । रुदध्वा समेताः स्वशरैः कठोरैर्जघ्नुस्तमश्व हरिनागर च ३५ स दिव्यवाजी च तदा स्वपक्षौ प्रसार्य खेनाशु रिपुं जगाम । स धुन्धुकारस्य गज विहाय चामुण्डकस्यैव गज विमर्द्य ३६ रथ च भूमौ भगदत्तकस्य विचूर्ण्य शीघ्र च नभो जगाम । प्रवाद्य शङ्ख जगनायकश्च कृष्णांशमागम्य कथां चकार ३७ निशामुपित्वा जगनायकाद्याः पातः समुत्थाय रण प्रजग्मुः । तदा महीराज उताशुकारी स किन्नरेशं मकण सपुत्रम् ३८ उवाच राजञ्छृणु किन्नराणां महाबलास्ते रिपवो ममैते । विनाशयाशु प्रबलारिघातान्दैवैर्न सार्धं युधि वै मनुष्याः ३९ इत्युक्तवान्मङ्कणभूपतिस्तु ययौ सपुत्रोऽयुतसैन्यपश्च । तमागत तत्र विलोक्य राजा वीरान्स्वकीयांश्च समादिदेश १४० मनोरथस्थो जगनायकश्च स तालनो वै वडवां विगृह्य : करालसस्थश्च तदा जयन्तो विगृह्य चाप तरसा जगाम ४१ पपीहकस्थश्च स रूपणा वै जगाम कृष्णांशसमन्वितश्च । स लङ्घसिंहो गजमत्तसस्थः स धान्यपालो हयमारुरोह ४२ समन्ततः किन्नरसैन्यघोर विनाशयामासु-

---

स्मरण करून त्वरित युद्ध कर' हे ऐकून तो रथावर बसलेला राजा उत्तम धनुष्य घेऊन आपल्या बाणानी त्याचे बाण तोडून भूमीवर टाकिता झाला. ते दोघेही श्रेष्ठ राजे विरथी झाले. त्याचप्रमाणें आपल्या खड्गानें शत्रूच्या खड्गाचे तुकडे करून व एकमेकास मारून विमानात बसून ते स्वर्गलोकीं गेले. तेव्हा कामसेन बाणाच्या योगानें तेथे असलेल्या शत्रूच्या आठ पुत्रास मारिता झाला. तेव्हा बाकी राहिलेले दोघे ज्येष्ठ बधु रागावले व हातामध्ये खड्ग घेऊन पुढें आले. उग्र वेगाने युक्त असलेल्या त्यानी कामसेन शत्रूचे मस्तक तोडिले. तेव्हा त्याच्या कबधानेंच त्या दोन्ही शत्रूस मारून ते सर्व मिळून विमानात बसून स्वर्गलोकीं गेले २७–३४. याप्रमाणें सर्व मरून पडले असता ते चामुडादिक जगनायकास घेऊन आपल्या कठोर बाणानीं सर्व मिळून प्रहार करू लागले. त्यानी हरिनागर घोडयावर प्रहार केला असता तो दिव्य घोडा तात्काल पंख पसरून आकाशमार्गाने शत्रूवर गेला. त्याने धुंधुकाराच्या गजास मारिले, चामुडाच्या गजाचे मर्दन केलें, भगदत्ताच्या रथाचे भूमीवर चूर्ण करून सोडिले व तो लागलाच अतरिक्षात उडून गेला. तेव्हा जगनायकाने शख वाजविला व कृष्णाशाकडे येऊन कथा सागितली ३५–३७. नंतर ते जगनायकादिक सर्व वीर रात्री विश्रांति घेऊन व प्रातःकालीं उठून रणामध्ये गेले. तेव्हा त्वरित कृत्य करणारा महीराज त्या किन्नरेश मकणास पुत्रासह ह्मणाला " हे राजा, तू किन्नराचा अधिपति आहेस. पण हे माझे रिपु फार बलाढय आहेत. यास्तव, हे प्रबल वीरा, तू याचा घात कर. देवासहवर्तमान युद्धामध्ये मनुष्य लढू शकणार नाहीं " ३८,३९. याप्रमाणे महीराजाने सागितले असता मकणराजा पुत्रासह गेला. तो दहा सहस्र सैन्याचा अधिपति होता. तो येत आहे असें पाहून राजा आपल्या वीरास आज्ञा करिता झाला ४०. मनोरथावर बसलेला जगनायक, वडवेवर बसलेला तालन व करालाश्वावर बसलेला जयत धनुष्य सज्य करून वेगाने निघाला; पपीहकावर बसलेला रूपण कृष्णाशासहवर्तमान रणागणीं आला, लङ्घसिंह मत्त गजावर बसून निघाला, धान्यपाल घोडयावर

रुपांशुखड्गैः । विनष्टमाने त्रिसहस्रसैन्ये स किन्नरेशस्तरसा जगाम ४३ ध्यात्वा कुबेरं च गृहीतचापो नभोगतस्तत्र बभूव सूक्ष्मः ४४ अदृश्यमानः स्वशरैः कठोरैर्विनर्त्य सर्वान्हि ननर्द घोरम् । विलप्यमाने च समस्तशूरे जयन्त एवाशु जगाम शत्रुम् ४५ ध्यात्वा महेन्द्र मकणं च बद्ध्वा कृष्णांशमागम्य पदौ ननाम । तदा तु ते शत्रुसहस्रसैन्ये निशम्य बद्धं कणक निजेन्द्रम् ४६ विनर्त्य घोरं रुरुधुश्च सर्वान्मायाविनो गुह्यकमस्त्रमूहुः । दिनेषु सप्तसु तथा निशासु बभूव युद्धं च समन्त-स्तै ४७ श्रमान्विताः सप्त महाप्रवीरा हतेषु सर्वेषु सुतु प्रुश्च वै यदा । तदा कुबेर कणकश्च ध्यात्वा लब्ध्वा वर बन्धनमाशु छित्त्वा ४८ सुप्तान्समुत्थाय च सप्त शूरान्निशीथकाले स चकार युद्धम् । जित्वा च तान्खट्टन वरप्रभावांस्तदेन्द्रलैश्चैव रण चकार ४९ गृहीतखड्गौ रणधीरमन्यौ हत्वा तनो वै भुवि तौ ययुश्च । प्रजग्मतुर्नाकमुपान्तदेवौ सस्तूयमानौ सुरसत्तमैश्च १५० ततः प्रभाते विमले विजाते रुरोद रामांश उताललाप । पापै. कलापै परिपीड्यमान. कुलान्वितः सर्वयुतो मुनीन्द्र ५१ स पञ्चशब्दं गजमारुरोह त्रिलक्षसैन्यैस्तरसा जगाम । तदा महीराज उताह शृण्वन्गच्छध्वमद्यैव मया समेताः ५२ स्वपञ्चलक्षैः प्रबलैश्च शूरैः सार्द्धं रुरोधाशु रिपोश्च सेनाम् । तयोर्बभूवाशु रणः प्रघोरो विनर्ततोर्युद्धनिमित्तकानाम् ५३ त्रियाममात्रेण हताश्च सर्वे द्वयोश्च पक्षा बलशालिनश्च । तदा महीराज उतायथौ वै समण्डलीकश्च धनुर्विगृह्य ५४ सधुन्धुकारश्च तदा जगाम रथस्थितं

बसला ४१,४२. त्या सर्वांनीं मिळून आपल्या उन्नत खड्गांनीं किन्नराच्या सैन्याचा चोहोंकडून सहार केला. पण तीन सहस्र सैन्य नष्ट झालें असता तो किन्नरेश कुबेराचे ध्यान करून हातात धनुष्य घेऊन वेगानें पुढें झाला. तो आकाशामध्यें जाऊन सुक्ष्म रूप घेऊन कोणाच्याही नजरेस न पडता आपल्या घोर बाणांनीं सर्वांस पीडा करून मोठमोठ्याने गर्जना करू लागला. पण आपले सर्व शूर " हायहाय " करूं लागले अहेत असे पाहून जयंत इद्राचे ध्यान करून मंकण शत्रूवर गेला व त्यानें त्यास बाधून कृष्णाशाकडे आणिले व त्यास नमस्कार केला. तेव्हा शत्रूच्या सैन्यातील त्या सहस्र वीरानी आपल्या मंकण स्वामीस बाधिलें आहे असे ऐकून घोर ध्वनि केला व त्या सर्व मायावी शत्रूस चोहोंकडून वेढिलें. त्यानीं गुह्यक अस्त्राचा प्रयोग केला. दिवसा व रात्रीं याप्रमाणे चोहोंकडून सारखा सात दिवस त्याचा संग्राम चालला होता ४३-४७. शेवटीं सर्व वीर मेले असता थकलेले ते सात महावीर निजले. तेव्हा त्या कणकानें कुबेराचे ध्यान केलें, व त्याच्यापासून वर मिळवून, आपलें बंधन तात्काल तोडून त्या निजलेल्या सात शूरास उठविलें व त्यानें मध्यरात्रींच युद्ध केलें. अगोदर त्या महा प्रभावशील वीरास जिंकून शेवटीं तो इंद्रलाशीं युद्ध करू लागला ४८,४९. त्या दोघानींही खड्गें उचलली. ते घोर रणाविषयीं मत्त झाले व एकमेकास प्रहार करून दोघेही भूमीवर पडले व उत्तम देव ज्याची स्तुति करीत आहेत असे ते दोघेही देवरूपीं होऊन स्वर्गास गेले ५०. तदनतर निर्मल प्रभातकाल झाला असता रामाश रडूं लागला. त्याने नानाप्रकारें विलाप केला. हे मुनींद्रा, त्या पापी लोकाकडून सर्व कुलासहवर्तमान तो अतिशय परिपीडित झाला ५१. नंतर तो पंचशब्द गजावर चढला व वेगानें तीन लक्ष सैन्यासह चालला. तेव्हा तें ऐकून महीराज ह्मणतो " चला, आज मजसहवर्तमान सर्व चला " ५२. नतर आपल्या पाच लक्ष प्रबल शूरासह त्याने तात्काल शत्रूची सेना वेढिली. तेव्हा युद्धाच्या निमित्तानें भयंकर आक्रोश करणाऱ्या त्या दोन्ही सैन्यातील वीराचें अतिघोर युद्ध झालें ५३. केवल तीन प्रहरामध्यें त्या दोन्ही पक्षांतील सर्व बलाढ्य वीर मरण पावले. तेव्हा महीराज पुढें झाला व मंडलीकही धनुष्य घेऊन पुढें आला ५४. धुंधुकार रथारूढ झालेल्या उग्र लक्षण वीरावर चाल करून गेला. त्यावेळीं उदय

लक्षणमग्रवीरम् । तदोदयो वै भगदत्तमेव चामुण्डक भीष्मकराजसूनुः ५५ स पञ्चशब्दं गजमास्थितस्तं वै गतः स एवाशु जगाम भूपम् । धनुर्विगृह्याशुगमुल्बणं च नृपस्थितश्चाथ भयङ्करं च ५६ गज प्रमत्तं शिवदत्तमुग्रमाह्लादहन्तारमवाच वाक्यम् । अये प्रमत्ताग्र्य गजेन्द्र शूर जयं च मे देहि शिवप्रदत्त ५७ स मण्डलीको रणदुर्मदश्च रामांश आह्लाद इति प्रसिद्धः । तस्माच्च मां रक्ष जवेन हस्तिन्महाबलात्कालरसाच्च वीरात् ५८ इत्येवमुक्तः स नृपतिं स हस्ती वचस्तमाहाशु शृणुष्व राजन् । यावद्वह वै तनुजीवधारी तावद्भवाञ्छत्रुभयङ्करश्च ५९ इत्युक्तवन्तं च गजं प्रमत्तं स पञ्चशब्दश्च तदा स्वदन्तैः । मुखं चतुर्भिश्च विदार्य शत्रोर्ननर्द घोरं स महेन्द्रदत्तः६० स रुद्रदत्तश्च गजः प्रमत्तो रुषाऽन्वधावत्तरसा गजेन्द्रम् । अरिपुं स्वपद्भ्यां च चखान कुम्भः स्वतुण्डदण्डेन तुद प्रकुर्वन्६१ अवाप मूर्छां च स पञ्चशब्दस्तदाशु भूप प्रति मण्डलीकः । स्वतोमरेणाङ्गवणं प्रदत्त्वा खड्गेन हत्वा गजराजमुग्रम् । जगाम पद्भ्यां स रिपुप्रमाथी यत्र स्थितश्चेन्दुल उग्रधन्वा ६२ उत्थाय पुत्रं च विलप्यमानां पत्नीं स्वकीयां प्रति चाजगाम । तदा प्रमत्तौ च गजौ सुमूर्छां त्यक्त्वा पुनश्चक्रतुरेव युद्धम् । स लक्षणः खड्गवरेण बाणान्रिपोश्च छित्त्वा निजवैष्णवास्त्रम् ६३ दधार चापं च सुमन्त्रयित्वा स धुन्धुकारं च गजं ददाह । हतं च तस्मिन्निजमुख्यबन्धौ स भूमिराजश्च गृहीतचापः ६४ शरेण रौद्रेण च लक्षणं त जवान तत्रातिभयङ्करस्थः । स मूर्छितः शुक्रकुलेषु सूर्यस्तदोदयो वै भगदत्तमेव ६५ समूर्छयित्वा च जगाम शीघ्रं तत्र स्थितो लक्षण एकवीरः । भयान्वितस्त च विलोक्य राजा जवेन दुद्राव च रक्तबीजम् ६६ तदा सुदेवं च स रक्तबीजो जित्वा तु कृष्णांशयुतो जगाम ।

भगदत्तावर च भीष्मकराजाचा पुत्र चामुंडावर चालला. इकडे पचशब्द गजावर बसलेला आल्हाद लगालाच राजावर धनुष्य सज्य करून व त्वरित गमन करणाऱ्या भयकर बाणाचें संधान करून चालला असता मत्त, भयंकर, शिवदत्त, उग्र व आल्हादास मारणाऱ्या गजास महीराज ह्मणतो "हे प्रमत्त गजातील सर्वश्रेष्ठ गजेंद्रा, हे शूरा, मला जय दे. शंकराने तुला दिलेलें आहे९५-९७. तो रणदुर्मद रामाश, मडलीक व आल्हाद या नावानें प्रसिद्ध आहे. हे हस्तिन्, त्या महाबलाढ्य कालरूपी वीरापासून माझे वेगानें रक्षण कर." याप्रमाणें बोलणाऱ्या त्या राजास तो हत्ती ह्मणाला "हे राजा, ऐक. जोंपर्यंत मी आपलें शरीर व जीव धारण करीत आहे तोंपर्यंत तू शत्रूस भयकर आहेस." याप्रमाणे जों तो मत्त गज बोलत आहे तोंच तो महेंद्राने दिलेला पचशब्द आपल्या चारी दातानीं त्या शत्रूचे मुख विदारण करून घोर शब्द करूं लागला ९८-९०. तेव्हा तो रुद्रदत्त मत्त गज रागानें व वेगाने त्या श्रेष्ठ गजावर धावला व त्या आपल्या शत्रूस पायानें तुडवून गडस्थलानीं व शुंडादडानें अतिशय पीडा करिता झाला ९१. त्यावरोबर त्या पचशब्दास मूर्च्छा आली. तेव्हा मडलीकानें आपल्या तोमरानें राजाच्या अंगावर प्रहार करून व खड्गानें त्या उग्र गजश्रेष्ठास वार करून तो शत्रूचें मर्दन करणारा वीर पायानींच जेथे उग्र धनुष्य धारण करणारा इदुल होता तेथे गेला व पुत्रास उठवून शोक करणाऱ्या आपल्या पत्नीकडे तो आला. तेव्हा ते अतिमतगज मूर्च्छेचा त्याग करून पुनः युद्ध करूं लागले. इकडे तो लक्षण आपल्या श्रेष्ठ खड्गाने शत्रूंचे बाण तोडून, आपले वैष्णवास्त्र घेऊन, त्याला धनुष्याशीं जोडून व ते उत्तम प्रकारें अभिमंत्रित करून धुधुकार व गज या दोघासही जाळून टाकिता झाला. तो आपला मुख्य बंधु मेला आहे असें पाहून अतिभयकर भूमिराज हातात धनुष्य घेऊन आपल्या हातातील रौद्र बाणाने त्या लक्षणास मारिता झाला. त्यामुळे शुक्रकुलातील जणु सूर्य असा तो वीर मूर्छित झाला असता उदय भगदत्तास अतिशय मूर्छित करून

बाणेन शीघ्रं स च मूर्छयित्वा पुनश्च देव च स मूर्छयित्वा ६७ तद्बन्धनायोद्य । आशुकारी स लक्ष-णस्तत्र तदा जगाम । प्रणाय चाप च स वैष्णवास्त्रं प्रचोदयामास च रक्तबीजम् ६८ तदा स सामन्तसुतो बलीयान्रण विहायाशु विलोक्य सन्ध्याम् । भयान्वितस्तैश्च युतो ययौ वै यत्र स्थिता भूपतयः सकोपाः ६९ विलोक्य शत्रुं च स रत्नभानोः सुतो ययौ वै शिबिराणि युक्तः । निराक्ष्य भूपः स च चन्द्रवंशी जय स्वकीय सुषुपुस्तु ते वै १७० प्रातश्च काले स च चन्द्रवंशी विलोक्य शुक्रान्वयमाह भूपम् ७१ अये गुर्जरदेशीय मूलवर्मन्सुतैः सह । लक्षसै-न्यान्वितो भूत्वा गन्तुमर्हतु वै भवान् ७२ इत्युक्तः स तु भूपालो युद्धभूमिमुपाययौ । महीराजाज्ञया प्राप्तो नाम्ना पूर्णामलो बली ७३ दशपुत्रान्वितो युद्धे सैन्यलक्षेण संयुतः । तयोश्चा-सीन्महद्युद्धं यामद्वयमवस्थितम् ७४ हतेषु तेषु सर्वेषु तौ नृपौ मसुतैर्बलौ । अन्योन्येन रणं कृत्वा यमलोकमुपागतौ ७५ मार्गकृष्णचतुर्दश्यां प्रभाते विमले रवौ । कैकयो लक्ष-सेनाढ्यो दशपुत्रसमन्वितः ७६ लक्षणानुज्ञया प्राप्तस्तस्मिन्युधि भयानके । मद्रके-शस्तदा राजा दशपुत्रसमन्वितः ७७ लक्षसैन्यान्वितस्तत्र यत्र युद्ध समन्वभत् । परस्परं हताः सर्वे दिनान्ते क्षत्रिया रणे ७८ पन. प्रभाते विमले भगदत्तो महाबलो । त्रिलक्ष-बलसंयुक्तो जगर्ज रणमूर्धनि ७९ दृष्ट्वा त लक्षणो वीरस्त्रिलक्षबलसंयुतः । चकार तुमुलं घोर सेनया च स्वकीयया । अपराह्णे हताः सर्वे सैन्याश्च नृपयोस्तदा १८० भगदत्तः स्वय क्रुद्धो रथस्थो लक्षण ययौ । लक्षणो रथमारुह्य स्वपितुः शत्रुजं नृपम् ८१ त्रिभिर्बाणैश्च

जेथें अद्वितीय वीर लक्षण होता तेथें त्वरेने आला. त्याला पाहताच भयभीत झालेला राजा वेगानें रक्तबीजाकडे गेला. त्यावेळी तो रक्तबीज भुदेवास जिंकून कृष्णाशाशी येऊन भिडला. त्याने आपल्या बाणाने त्यास तात्काल मूर्छित केले व कोणतेही कृत्य त्वरेने करणारा तो देवनिंदकासही मूर्छित करून त्यास बांधण्यास तयार झाला. पण इतक्यात लक्षण तेथे आला. त्याने आपलें चाप सज्ज करून रक्तबीजावर वैष्णवास्त्राचा प्रयोग केला. तेव्हा तो बलाढ्य व भययुक्त सामंतपुत्र सन्यासमय झाला आहे असे पाहून महीराजादिकांसह दुसरे रागावलेले राजे जेथे होते तेथे निघून गेला ६२-६९. याप्रमाणें शत्रु पळून गेला आहे असे पाहून तो रत्नभानूचा पुत्र सर्वांसमवर्तमान आपल्या शिबिरास गेला. तेव्हा चंद्रवंशीय राजा आपला जय झाला आहे असें ऐकून स्वस्थ निजला व ते वीरही विश्रांति घेते झाले ७०. प्रातःकालीं चंद्रवंशीय राजा शुक्रवंशीय राजाकडे पाहून म्हणाला " अरे गुर्जरदेशीय मूलवर्मन्, तू एक लक्ष सैन्याने युक्त होऊन पुत्रासह जा." राजाने याप्रमाणें सांगितलें असता तो भूपाल युद्धभूमीमध्ये आला. इकडे महीराजाच्या आज्ञेने पूर्णामल नांवाचा बलाढ्य वीर दहा पुत्र व एक लक्ष सैन्य यासह युद्धामध्ये येऊन थडकला. एकसारखे दोन प्रहर त्याचे घोर युद्ध झालें. सर्व वीर मेले असता ते दोघे बलाढ्य राजे आपल्या पुत्रासह एकमेकांशीं संग्राम करून यमलोकास गेले ७१-७५. मार्गशीर्ष कृष्ण चतुर्दशीस प्रभातसमयीं निर्मल सूर्योदय झाला असता कैकय राजा दहा पुत्र व एक लक्ष सैन्य यासह लक्षणाच्या आज्ञेने त्या भयंकर युद्धामध्ये प्राप्त झाला. तेव्हा मद्रकेश राजा दहा पुत्रांस बरोबर घेऊन लक्ष सैन्यासह जेथें युद्ध चाललें होतें तेथें आला. सायंकाली ते सर्व क्षत्रिय एकमेकांच्या हातून मरून रणांगणी पडले. पुन निर्मल प्रभात झाली असता महाबलवान् भगदत्त तीन लक्ष सैन्याने युक्त होत्साता रणांगणी येऊन गर्जना करूं लागला. त्यास पाहून लक्षण वीर तीन लक्ष सैन्याने युक्त होत्साता आपल्या सैन्याच्या साहाय्यानें भयंकर व रोमहर्षण युद्ध करूं लागला. अपराह्णसमयीं त्या दोन्ही राजांचें सर्व सैन्य नष्ट

सेतोश्च भल्लेन समताडयत्। भगदत्तस्तदा क्रुद्धो विरथं तं चकार ह ८२ क्रुद्धवन्तं रिपुं घोरं लक्षणः खड्गपाणिकः। हत्वा हयांस्तथा सूतं भगदत्तमुपाययौ ८३ मर्दयित्वा च तच्चर्म छित्त्वा वर्म तदद्भुतम्। त्रिधा चकार बलवान्भगदत्तं रिपोस्सुतम् ८४ सन्ध्याकाले हते तस्मिँल्लक्षणस्तूर्णविह्वलः। एकाकी शिबिरं प्राप्तो हस्तिन्युपरि संस्थितः ८५ भगदत्ते हते तस्मिन्स राजा क्रोधमूर्छितः। स्वकीयान्सर्वभूपांश्च चामुण्डेन समन्वितान् ८६ प्रेषयामास युद्धाय मार्गे च प्रतिपादिते। अङ्गदश्च कलिङ्गश्च त्रिकोणः श्रीपतिस्तथा ८७ श्रीतारश्च मुकुन्दश्च रुहिलो गुहिलस्तथा। सुकेतुनैव भूपास्ते नवायुतबलैर्युताः ८८ वाद्यानि वादयामासुस्तस्मिन्युद्धमहोत्सवे। दृष्ट्वा तांल्लक्षणो वीरो राजभिश्च स्वकीयकैः ८९ सार्द्धं जगाम युद्धाय तथा व्यूह्यायुधद्रिपून। रुद्रवर्मा च नृपतिः शूरैर्दशसहस्रकैः १९० अङ्गदं वैरिणं मत्वा तेन सार्द्धमयुध्यत। कालीवर्माऽयुतैस्सार्द्धं कलिङ्गं प्रत्ययुध्यत ९१ वीरसिंहोऽयुतैस्सार्द्धं त्रिकोणं प्रत्ययुध्यत। ततोऽनुजः प्रवीरश्च श्रीपतिं सोऽयुतैस्सह ९२ नृपः सूर्योधरो वीरोऽयुतार्द्धयो बलवान्रणे। श्रीतारं नृपमासाद्य महद्युद्धमचीकरत् ९३ वामनोऽयुतसंयुक्तो मुकुन्दं प्रति सोऽगमत्। गङ्गासिंहश्च बलवान्महिलं प्रति सायतः ९४ लल्लसिंहो युतैस्सार्धं गुहिलं प्रति सोऽगमत्। त्रिशतानि ततो भूपाः सहस्रार्द्धाः पृथक्पृथक् ९५ क्षुद्रभूपाः क्षुद्रभूपांस्त्रिशतांश्च समाययुः। अन्योन्येन हताः सर्वे कृत्वा युद्धं भयानकम् ९६ चामुण्डस्तु तदा दृष्ट्वा मृतकान्सर्वभूपतीन्। लक्षणान्तमुपागम्य

झालें ७६–८०. तेव्हा रागावलेला भगदत्त स्वतः रथावर बसून लक्षणावर गेला. पण लक्षण वीरही आपल्या पित्याच्या शत्रूपासून उत्पन्न झालेल्या राजावर रथारूढ होऊन चाल करिता झाला. तीन बाणांनी प्रथम त्याला वेध करून नंतर आपल्या भात्याने त्याने त्याच्यावर प्रहार केला. तेव्हा भगदत्त रागावला व त्याने लक्षणास विरथ केलें ८१,८२. इतक्यांत आपला घोर शत्रु रागावला आहे असे पाहून लक्षण वीर हातात खड्ग घेऊन त्याच्या घोड्यास व सारथीस मारून स्वत. भगदत्तावर गेला ८३. त्याची ढाल फोडून व त्याच्या अंगातील अद्भुत वर्म तोडून शत्रूचा पुत्र जो भगदत्त त्याचे त्याने तीन तुकडे केले. संध्यासमयीं त्यास मारिलें असता लक्षण एकटाच त्वरेने हस्तिनीवर बसून आपल्या शिबिरास आला. तो भगदत्त मृत झाला असता राजा अतिशय रागावला व त्यानें चामुंडासहवर्तमान आपल्या सर्व राजास युद्धाकरिता मार्गशीर्षाच्या प्रतिपदेस पाठविलें. अंगद, कलिंग, त्रिकोण, श्रीपति, श्रीतार, मुकुंद, गुहिल, दुहिल व सुकेतु असे नऊ राजे नव्वद हजार सैन्यासह त्या युद्धमहोत्सवाचे प्रसंगीं वाद्ये वाजवीत झाले. त्यास पाहून लक्षण वीर आपल्या राजासह युद्ध करण्याकरिता गेला व व्यूहरचना करून शत्रूशीं लढूं लागला. राजा रुद्रवर्मा दहा सहस्र शूरासह अगद आपला वैरी आहे असें समजून त्याच्याशीं लढू लागला. कालिवर्मा दहा सहस्र वीरासह कलिंगाशीं भिडला ८४-९१. दहा हजार सैन्याने युक्त असलेल्या वीरासिंह त्रिकोणाशी लढू लागला. त्याचा धाकटा भाऊ प्रवीर श्रीपतीबरोबर दहा सहस्र लोक घेऊन लढला. वीर राजा सूर्य अयुत सैन्याने युक्त होऊन रणामध्यें आला; व तो बलवान् श्रीतार राजासमोर येऊन मोठे युद्ध करिता झाला ९२,९३. दहा सहस्र वीरासह वामन मुकुंदाशीं लढला. बलवान् गंगासिंह सहस्र लोकांसह महिलावर गेला. अयुत वीरांनीं युक्त होत्साता लल्लसिंह गुहिलावर चाल करून गेला; आणि प्रत्येक सहस्र सैन्याने युक्त असे तीनशे राजे आपल्यासारख्याच तीनशें क्षुद्र राजावर चाल करून गेले व ते सर्वही भयकर युद्ध करून एकमेकांच्या हातून मरण पावले ९४-९६. तेव्हा चामुंड सर्व राजे गेले आहेत असे पाहून लक्षणाजवळ येऊन मोठें

महद्युद्ध चकार ह ९७ लक्षणो रक्तबीजं तं ज्ञात्वा ब्राह्मणसमतम् । वैष्णवास्त्रं तदा तस्मै न ददौ तेन पीडितः९८ सायकाले तु सम्प्राप्ते लक्षणो हस्तिनीस्थितः । एकाकी शिबिरं प्राप्तश्चामुण्डो नृपमाययौ९९ द्वितीयायां प्रभाते च कृष्णांशो देवसंयुतः॥ शूरैर्दशसहस्रैश्च युद्धभूमिमुपाययौ२०० तारकश्च सचामुण्डो द्विलक्षबलसंयुतः । द्विशतैश्च तथा भूपैः सार्धं युद्धमुपस्थितौ । पुरस्कृत्य नृपान्सर्वान्ससैन्यौ बलवत्तरौ । तेषामन्तु स्थितौ युद्धे तत्र जातो महारणः१ याममात्रेण तौ वीरौ हत्वा सर्वमहीपतीन् । लक्षसैन्यांस्तथा हत्वा संस्थितौ श्रमकर्षितौ २ चामुण्डस्तारको धूर्तः संप्राप्तो छिद्रदर्शिनौ । ताभ्यां श्रमान्वितास्याभ्यां च चक्रतुस्तौ मम रणम् ४ तेषां त्रियाममात्रेण सबभूव महारणः । सायकाले तु संप्राप्ते कृष्णांशश्च निरायुधः५ तलप्रहारेण रिपुं मूर्छयामास वीर्यवान् । एतस्मिन्नन्तरं वीरस्तारको देवसिंहकम् ६ हयं मनोरथं हत्वा शङ्खशब्दमथाकरोत् । तच्छब्दात्स च चामुण्डस्त्यक्त्वा मूर्छां महाबली ७ कृष्णांशस्य शिरः कायादपहृत्य च वेगवान् । गृहीत्वा तौ च शिरसि महीराजमुपाययौ ८ महीराजस्तु तौ दृष्ट्वा परमानन्दनिर्भरः । दत्त्वा दानं द्विजातिभ्यो महोत्सवमकारयत् ९ लक्षणस्य तदा सैन्ये हाहाशब्दो महानभूत । श्रुत्वा कोलाहलं तेषां ज्ञात्वा तौ च हतौ नृपः २१० ब्रह्मानन्दस्तदा मूर्छां त्यक्त्वा वेलामुवाच ह । प्रिये गच्छ रणं शीघ्रं हरिनागरमास्थिता११ मम वेषं शुभं कृत्वा तारकं जहि मा चिरम् । इति श्रुत्वा तु सा वेला रामांशेन समन्विता १२ सहस्रशरमंहिता यद्धभूमिमुपाययौ । श्रुत्वा स लक्षणो वीरस्तालनेत्र समन्वितः १३ सैन्यैश्च दशसाहस्रैर्महीराजमुपाययौ । तृतीयायां प्रभाते च तारको बलवत्तरः १४

युद्ध करिता झाला ९७. त्यानें लक्षणास फार पीडिलें. पण तो रक्तबीज ब्राह्मण आहे असें समजून त्याच्यावर लक्षणानें वैष्णवास्त्राचा प्रयोग केला नाहीं. सायंकाल झाला असता हस्तिनीवर बसलेला लक्षण एकटाच शिबिरास आला व चामुंड महीराजाकडे गेला ९८,९९. द्वितीयेच्या दिवशी प्रातःकालीं देवसिंहासहवर्तमान कृष्णांश दशसहस्र शूर बरोबर घेऊन युद्धभूमींत प्रविष्ट झाला २००. इकडे तारक चामुंडासह दोन लक्ष सैन्य व त्याचप्रमाणें दोनशें राजे यांसह युद्धाकरिता घेऊन उभा राहिला १. सर्व राजास पुढें करून सैन्यासहवर्तमान ते दोघे बलाढ्य वीर युद्धामध्ये त्याच्या मागें राहिले. तेथें भयंकर युद्ध सुरू झालें २ एका प्रहरामध्येच देवसिंह व कृष्णांश या उभय वीरांनीं सर्व राजास व त्याचप्रमाणें एक लक्ष सैन्यास मारिलें, व श्रमामुळें थकून ते स्वस्थ राहिले ३. पण इतक्यांत छिद्र पाहणारे धूर्त चामुंड व तारक तेथें आले व थकलेल्या त्या उभयतांशीं त्यानीं युद्ध केलें. त्याचें तीन प्रहरपर्यंत मोठें युद्ध झालें. सायंकाल झाला असता कृष्णांश आयुधरहित झाला ४,५. तेव्हां त्या वीर्यवानानें शत्रूस तलप्रहारानें मूर्च्छित केलें. इतक्यांत तारक वीरानें देवसिंहास व त्याच्या मनोरथनामक घोड्यास मारून शंखध्वनि केला. त्या शब्दामुळें बलाढ्य चामुंड मूर्च्छा सोडून उठला व त्या वेगवानानें कृष्णांशाचें मस्तक शरीरापासून वेगळें केलें; व त्या दोघांचींही मस्तकें घेऊन ते महीराजाकडे गेले ६--८. तेव्हां महीराज तीं पाहतांच परमानंदानें भरून गेला. ब्राह्मणास दानें देऊन त्यानें मोठा उत्सव करविला ९. तेव्हां लक्षणाच्या सैन्यामध्यें मोठा हाहाकार झाला. तो त्याचा कोलाहल व ते दोघे मेले आहेत असें जाणून १० ब्रह्मानंद तात्काल मूर्च्छा सोडून वेलेस म्हणाला " प्रिये, हरिनागरावर बसून शीघ्र रणामध्ये माझा शुभ वेष घेऊन जा व तारकास मार; उशीर करूं नकोस . " हें ऐकून ती वेला रामांशसहवर्तमान सहस्र शूर बरोबर घेऊन युद्धभूमीमध्ये आली वहें ऐकताच लक्षण वीर तालनासह दहा सहस्र सैन्य बरोबर घेऊन महीराजाजवळ आला. तृतीयेस प्रातःकालीं बलाढ्य तारक तो ब्रह्मानंद आहे असें जाणून मोठें युद्ध

नृपतिः सुत परिहरस्य वै । कलिञ्जरे कृतं राज्यं शार्दूलस्तत्सुतोऽभवत् ३७ तदन्वये च ये भूपाः
शार्दूलीयाः प्रकीर्तिताः । भूपानां बहुधा राष्ट्रं शार्दूलान्वयसंभवम् ३८ बभूव सर्वतो भूमौ
महामायाप्रसादतः । इति ते कथितं विप्र पावकीयमहीभुजाम् ३९ कुलं सकलपापघ्नं यथैव
शशिसूर्ययोः । पुनरन्यत्प्रवक्ष्यामि यथा जातः स्वयं हरिः ४० [४२२८] इति श्रीभविष्ये महा-
पुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

सूत उवाच॥ मध्याह्नकाले संप्राप्ते ब्रह्मणोऽव्यक्तजन्मनः । चाक्षुषान्तरमेवापि महावायुर्बभूव ह १

त्या महात्म्या राजाने बीस वर्षे राज्य केले. त्यानंतर हा गंगावंश भूलोकीं प्रसिद्ध झाला २७. शार्ङ्गदेव हा त्याचा पुत्र होय. तो बलवान् व हरिपूजक राजा गौडदेशामध्ये येऊन हरीच्या ध्यानामध्ये तल्लीन झाला २८. त्यानें दहा वर्षे राज्य केलें. गंगादेव हा त्याचा पुत्र होय. त्यानें बीस वर्षे राज्य केलें. त्या राजाचा अनंग ह्मणून बलवान् पुत्र होता. तो गौडदेशामध्यें राजा झाला. त्याने पित्याइतकें राज्य केलें. त्याच्यापासून राजेश्वर झाला. त्यानेंही पित्याइतके राज्य केलें. त्यास नृसिंह पुत्र झाला. त्यानें पितृतुल्य राज्य केलें. त्याला कलिवर्मा ह्मणून पुत्र होता २९-३१. त्यानें राष्ट्रदेशामध्ये जाऊन, तेथील राजास जिंकून व रम्य महावतीनगरीत वास करून सुख भोगिलें ३२. त्यानें पित्याइतकेच राज्य केलें. त्यास धृतिवर्मा ह्मणून पुत्र झाला. त्यानेंही पित्याइतके राज्य केलें. त्याचा पुत्र महीपति होय ३३. त्याने जयचंद्राच्या आज्ञेने उर्वीमाया या नावाची नगरी वसविली व तेथें निवास केला ३४. कुरुक्षेत्रामध्ये जेव्हा सर्व चंद्रवंशीय क्षत्रिय मेले तेव्हा हा महीपति राजा महावतीचा स्वामी झाला ३५. त्यानंतर सहोहीनाने बीस वर्षे राज्य केलें. दुर्योधनाच्या कलेपासून निर्माण झालेले वीर कुरुक्षेत्रामध्ये मरण पावले ३६. परिहराचा घोरवर्मा ह्मणून जो पुत्र राजा झाला होता त्याने कलिंजरामध्यें राज्य केलें. त्यास शार्दूल पुत्र झाला ३७. त्याच्या वंशामध्यें जे राजे झाले त्यास शार्दूलीय असें ह्मणू लागले. शार्दूलवंशामध्ये उत्पन्न झालेल्या राजांचें राष्ट्र भूलोकीं महामायेच्या योगाने चोहोंकडे पुष्कळ पसरलें. हे ब्राह्मणा, याप्रमाणे पावकीय राजांचें संपूर्ण कुल मीं तुला सांगितले ३८,३९. हें व त्याचप्रमाणे चंद्रसूर्यांचीं कुलें संपूर्ण पापाचा नाश करणारीं आहेत. आतां पुनः हरि स्वतः कसा उत्पन्न झाला तें मी सांगेन ४०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंड-नामक प्रतिसर्गपर्वापैकीं कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चवथ्या खंडाचा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥

सूत ह्मणतात: ज्याचा जन्म अव्यक्त आहे अशा ब्रह्मदेवाचा मध्यान्हकाल प्राप्त झाला असतां

तत्प्रभावेन हेमाद्रिः कम्पमान पुनः पुनः । यथा वृक्षस्तथैवासौ तत्कम्पादेव मण्डलः १ नभसो भूतले प्राप्तस्तदा भूमि प्रकम्पिता । बभूव मुनिशार्दूल सर्वलोकविनाशिनी २ सप्तद्वीपाः समुद्राश्च जलभूता बभूविरे । लोकालोकस्तदा शैलोऽभवत्सोत्तरपर्वतः ४ शेषा भूमिर्लय प्राप्ता मुने मन्वन्तरे लये । सहस्राब्दान्तरं भूमिर्बभूव जलमध्यगा ५ तदा स भगवान्विष्णुर्भवेन विधिना सह । शैशुमारं शुभ चक्र चकार नभसि स्थितम् ६ गृहीत्वा सकलास्तारा ग्रहान्सर्वान्यथाविधि । स्थापयामास भगवान्यथायोग्यं पितामहः ७ पुनर्वै ज्योतिषां चक्रैः शोषिता सकला मही । स्थलीभूत्वाऽयुताब्दान्ते दृश्यमाना बभूव ह ८ तदा स भगवान्ब्रह्मा मुखात्सोम चकार ह । द्विजराज महाप्राज्ञं सर्ववेदविशारदम् ९ भुजाभ्यां भगवान्ब्रह्मा क्षत्रराज महाबलम् । सूर्य च जनयामास राजनीतिपरायणम् १० ऊरुभ्यां वैश्यराज च समुद्र सरितां पतिम् । रत्नाकर च कृतवान्परमेष्ठी पितामहः ११ पद्भ्यां च जनयामास विश्वकर्माणमुत्तमम् । दक्ष नाम कलाभिज्ञ शूद्रराजं सुकृत्यकम् १२ सोमाद्वै ब्राह्मणा जाताः सूर्याद्राजन्यवंशजाः । समुद्रात्सकला वैश्या दक्षाच्छूद्रा बभूविरे १३ सूर्यमण्डलतो जातो मनुर्वैवस्वत स्वयम् । तस्य राज्यमभूत्सर्व प्राणिनां लोकवासिनाम् १४ दिव्यानां च युगानां च तज्ज्ञेय चैकसप्ततिः । तदा स भगवान्विष्णुर्विश्वरूपोऽवतारकः १५ विष्णु पूर्वार्द्धतो जातः परार्द्धाद्वामन स्वयम् । बाल्य सत्ययुगे ह्यासीद्विश्वरूपः सनातन. १६ चतुश्शतानि वर्षाणि परमायुर्नृणां तदा । त्रेतायां यौवन प्राप्त पूर्वार्द्धसंभवो हरि १७ वर्षाणां त्रिशतानां च नृणामायु प्रकीर्तितम् । द्वापरे वार्द्धिका देवा

त्याच्या नेत्रातून मोठा वायु निर्माण झाला, त्याच्या प्रभावाने हेमाद्रि पर्वताचा वृक्षाप्रमाणे वारवार कापू लागला. त्याच्या कंपामुळे एक मंडल अंतरिक्षातून भूलोकी आले. त्यावेळी भूमि कंपायमान झाली. हे मुनिश्रेष्ठा, त्यामुळे ती त्यावेळी सर्व लोकांचा विनाश करणारीच आहे असे वाटले. सात द्वीपे व समुद्र जलमय होऊन गेले. लोकालोकसंज्ञक उत्तरपर्वत मात्र राहिला १-४. व हे मुने, बाकी सर्व भूमि मन्वंतराचा क्षय झाला असता लीन झाली. ती सहस्र वर्षेपर्यंत जलामध्ये होती ५. त्यावेळी तो भगवान् विष्णु ब्रह्मदेव व शंकर यांसह अंतरिक्षामध्ये असणारे शिशुमारनामक शुभ चक्र करिता झाला ६. तेव्हा भगवान् पितामह सर्व तारा व संपूर्ण ग्रह यांची यथाविधि व योग्य स्थली स्थापना करिता झाला ७. नंतर ज्योतींच्या चक्रांनी संपूर्ण पृथ्वी शोषून टाकिली. तेव्हा दहा सहस्र वर्षांनी ती स्थलरूप होऊन दिसू लागली. नंतर तो भगवान् ब्रह्मदेव द्विजश्रेष्ठ, महाप्राज्ञ व सर्व वेदामध्ये निपुण अशा सोमास मुखातून निर्माण करिता झाला. त्या भगवान् ब्रह्मदेवाने दोन्ही बाहूपासून क्षत्रियश्रेष्ठ व राजनीतिपरायण अशा सूर्यास उत्पन्न केले ८-१०. मांड्यापासून वैश्यराज नद्यांचा पति व रत्नाकर असा जो समुद्र त्यास त्या परमेष्ठी पितामहाने उत्पन्न केले ११. त्याने पायापासून उत्तम विश्वकर्म्यास निर्माण केले. त्याचे दक्ष असे नाव असून तो उत्तम कृत्ये व कला यांचा जाणता होता १२. सोमापासून ब्राह्मण झाले, सूर्यापासून क्षत्रियवंशीय झाले, समुद्रापासून संपूर्ण वैश्य झाले व दक्षापासून शूद्रांची उत्पत्ति झाली १३. सूर्यमंडलापासून स्वत वैवस्वत मनु झाला. त्याचे लोकवासी प्राण्यांमध्ये संपूर्ण राज्य झाले. तें देवांच्या एकाहत्तर युगें होते असें समजावें. तेव्हा तो भगवान् विश्वरूप अवतार घेऊन पूर्वार्धामध्ये विष्णु झाला व परार्धामध्ये स्वत वामन झाला. तो विश्वरूपी सनातन देव सत्ययुगामध्ये बाल्याचा अनुभव घेत असे १४-१६. त्यावेळी मनुष्यांचे परम आयुष्य चारशे वर्षे होते. त्रेतायुगात पूर्वार्धामध्ये उत्पन्न झालेला हरि यौवनावस्थेस प्राप्त झाला १७. त्यावेळी पुरुषांचे आयुष्य तीनशे वर्षे सांगितले आहे. द्वापरात तो देव वृद्ध झाला व मनुष्यांचे

नृणामायुः शतद्वयम् १७ कलौ तु मरण प्राप्तो विश्वरूपो हरिः स्वयम्। नृणामायुः शताब्द च केषाश्चिद्धर्मशीलिनाम् १९ परार्द्धाद्धामनो देवो महेन्द्रावरजो हरिः चतुर्भुजो महाश्यामो गरुडोपरि संस्थितः २० विश्वरूपाहितार्थाय त्रियुगी स बभूव ह। वामनाद्धीच त्रियुगी जातो नारायणः स्वयम् २१ श्वेतरूपो हरिः सत्ये हंसाख्यो भगवान्स्वयम्। त्रेतायां रक्तरूपश्च यज्ञाख्यो भगवान्स्वयम् २२ द्वापरे पीतरूपश्च स्वर्णगर्भो हरिः स्वयम्। कलिकाले तु संप्राप्ते मन्वन्तरायां द्वापरे युगे २३ कला तु सकला विष्णोर्वामनस्य तथा कला। एकीभूता च देवक्यां जातो विष्णुस्तदा स्वयम् २४ वसुदेवगृहे रम्ये मथुरायां च देवताः। ब्रह्मण्यास्तुमुर्देव पर ब्रह्म सनातनम् २५ तदा प्रसन्नो भगवान्देवानाह शुभं वचः। देवानां च हितार्थाय दैत्यानां निधनाय च २६ अहं कलौ च बहुधा भवामि सुरसत्तमाः। दिव्ये वृन्दावने रम्ये सूक्ष्मे भूतलसंस्थितम् २७ तत्राहं च रहःक्रीडां करिष्यामि कलौ युगे। सर्वे वेदाः कलौ घोरे गोपीभूताः समन्ततः २८ रंस्यन्ते हि मया सार्द्धं त्यक्त्वा भूखण्डलं तदा। राधया प्रार्थितोऽहं वै यदा कलियुगान्तके २९ समाप्य च रहःक्रीडां कल्किः च भवितास्म्यहम्। युगान्तप्रलयं कृत्वा पुनर्भूत्वा द्विधा तनुः ३० सत्यधर्मं करिष्यामि सत्ये प्राप्ते सुरोत्तमाः। इति श्रुत्वा त ते देवास्तत्रैवान्तर्दधे गताः ३१ एव युगे युगे क्रीडा हरेरद्भुतकर्मणः। ये तु वै विष्णुभक्ताश्च ते हि जानन्ति विश्वगम् ३२ यथैव नृपतेर्दासा स्वराज्ञः कार्यगौरवम्। जानन्ति नापरे विप्र तथा दासा हरेः स्वयम् ३३ विष्णुवाञ्छानुसारेण विष्णुमाया सनातनी।

दोनशें वर्षे आयुष्य होतें. पण कलियुगामध्ये तो विश्वरूप हरि स्वतः मरण पावला व काहीं धार्मिक पुरुषांचे आयुष्य शंभर वर्षे झालें १८,१९. उत्तरार्धांत ये वामन देव या नावानें स्वत हरि महेंद्राचा कनिष्ठ बंधु झाला. तो श्यामसुंदर, चतुर्भुज देव गरुडावर बसला होता २०. तो विश्वरूपाच्या हितार्करिता तीन युगरूप झाला व वामनरूपानें तो स्वत नारायण त्रियुगी झाला २१. सत्ययुगामध्ये हंससंज्ञक भगवान् हरि स्वत श्वेतरूप होता. त्रेतायुगांत तो भगवान् स्वतः रक्तस्वरूप व यज्ञसंज्ञक झाला २२. द्वापरांमध्ये तो हरि स्वत पीतरूप व हिरण्यगर्भनामक झाला. कलिकाल प्राप्त झाला असता द्वापरयुगाच्या सांधींमध्यें विष्णूची संपूर्ण कला व वामनाची कला एकरूप झाली व त्यावेळीं तो स्वत विष्णु देवकीच्या उदरीं वसुदेवाच्या रम्य गृहीं उत्पन्न झाला. त्यावेळीं ब्रह्मदेवादि देवता मथुरेमध्ये येऊन त्या सनातन ब्रह्मरूप श्रेष्ठ देवाची स्तुति करूं लागल्या २३-२९. तेव्हा प्रसन्न झालेला तो भगवान् देवांस असें शुभ वचन बोलला " देवांच्या हितार्करिता व दैत्यांच्या नाशार्करिता २६, हे उत्तम देवहो, मी कलियुगामध्ये बहुत प्रकारे अवतार घेईन. मी कलियुगामध्ये दिव्य, रम्य, सूक्ष्म व भूतलावर असलेलें जें वृंदावन तेथें रहःक्रीडा करीन. त्या घोर कलीमध्यें सर्व वेद भूतलावास मोठ्या, गोपीरूप होऊन व माझ्या सभोंवार राहून मजबरोबर क्रीडा करतील. पूर्वी राधेनें माझी प्रार्थना केली असता रहःक्रीडा संपवून कलियुगाच्या शेवटीं मी कल्कि होईन व युगांतप्रलय करून मी पुनरपि आपली आकृति दोन प्रकारची करून सत्ययुग आणीत असतो, हे उत्तम देवहो, मी सत्यधर्म करीन. " हें ऐकून ते देव तेथेंच गुप्त झाले २७-३१. याप्रमाणें अद्भुत कर्मे करणाऱ्या हरीची प्रतियुगामध्यें क्रीडा होत असते. जे विष्णुभक्त असतात तेच त्या विश्वरूपी देवास जाणतात ३२; म्हणजे हे ब्राह्मणा, ज्याप्रमाणें राजाचे दास आपल्या राजाच्या कार्याचें महत्त्व जाणतात व इतर जाणत नाहींत, त्याप्रमाणें हरीचे दास स्वत. हरीस जाणतात ३३. विष्णूच्या इच्छेप्रमाणें

रचित्वा विविधाँल्लोकान्महाकाली बभूव ह ३४ कृत्वा कालमयं सर्वं जगदेतच्चराचरम् । पश्चात्तु भक्षयित्वा तान्महागौरी भविष्यति ३५ नमस्तस्यै महाकालयै विष्णुमायै नमो नमः । महागौरि नमस्तुभ्यमस्मान्पाहि भयान्वितान् ३६ [४१६१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

ऋषिरुवाच ॥ महीराजान्मुनिश्रेष्ठ के राजानो बभूविरे । तान्नो वद महाभाग सर्वज्ञोऽसि भवान्सदा १ सूत उवाच ॥ पैशाचः कुतकोदीनो देहलीराज्यमास्थितः । बलीगढ महारम्ये यादवै रक्षितं पुरम् २ ययौ तत्र स पैशाच शतायुतसमन्वितः । वीरसेनस्य वै पौत्र भूपेन नृपोत्तमम् ३ स जित्वा कुतकोदीनो देहलीग्राममास्थितः । एतस्मिन्नन्तरे भूपा नानादेश्याः समागताः ४ जित्वा स कुतकोदीनः स्वदेशात्तैर्निराकृतः । सहोदीनस्तु तच्छ्रुत्वा पुनरागत्य देहलीम् ५ जित्वा भूपान्दैत्यवरो मूर्तिखण्डमथाकरोत् । तत्पश्चाद्बहुधा म्लेच्छा इहागत्य समस्तत ६ पञ्च षट सप्त वर्षाणि कृत्वा राज्यं लयं गताः । अद्यप्रभृति देशोऽस्मिञ्छतवर्षान्तरे हि ते ७ भूत्वा चाल्पायुषो मन्दा दुर्बलीर्थविनाशकाः । म्लेच्छभूपा मुनिश्रेष्ठास्तस्मात्त्यजायं मया सह ८ गन्तुमर्हथ वै शीघ्रं विशालां नगरीं शुभाम् । इति श्रुत्वा तु वचनं दुःखात्संत्यज्य नैमिषम् ९ ययुः सर्वे विशालायां हिमाद्रौ गिरिसत्तमे । तत्र सर्वे समाधिस्था ध्यात्वा सर्वमयं हरिम् १० शतवर्षान्तरे सर्वे ध्यानाद्ब्रह्मगृहं ययुः । व्यास उवाच ॥ इत्येवं सकलं भाव्यं योगाभ्यासबलाद्धृतम् ११ वर्णितं च मया तुभ्यं किमन्यच्छ्रोतुमिच्छसि । मन उवाच ॥ भगवन्वेदतत्त्वज्ञ सर्वलोकहिते रत १२ अहो मायाभवो जातो भवान्वेद-

---

सनातन विष्णुमाया नानाप्रकारच्या लोकांस निर्माण करून महाकाली होते ३४. सर्व चराचर जगत् कालमय निर्माण करून व नंतर त्या सर्वांस भक्षण करून ती महागौरी होते ३५. त्या महाकालीस नमस्कार असो. हे महामाये, नमो नम, हे महागौरि, तुला प्रणाम असो भययुक्त अशा आमचे रक्षण कर ३६. याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वांपैकी कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा चतुर्थ खंडाचा पाचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

ऋषि म्हणतात -- हे श्रेष्ठ मुने, महीराजानंतर कोणते राजे झाले ते आम्हांस सांग. हे महाभागा, तूं सर्वदा सर्वज्ञ आहेस सूत -- पैशाच कुतकोदीन देहलीच्या गादीवर बसला. नंतर यादवांनी ज्याचें केलें आहे असें जें बलीगढ म्हणून गांव होतें तेथें तो पैशाच दहा सहस्र शूरांसह गेला व वीरसेनाचा पौत्र भूपरोन म्हणून जो उत्तम राजा होता त्यास कुतकोदीनाने जिंकिलें व तो देहली गांवीं येऊन राहिला. इतक्यांत नानादेशांतील राजे आले, व त्यांनी त्या कुतकोदीनास जिंकून आपल्या देशांतून बाहेर घालविलें पण ते ऐकून सहोदीन पुनः देहलीस आला व राजांस जिंकून तो दैत्यश्रेष्ठ मूर्ती फोडिता झाला. त्यानंतर पन्नास म्लेच्छ चोवीसशें वर्षे आले १ ते, व पांच, सहा किंवा सात वर्षें राज्य करून लय पावले. म्हणजे आजपासून शंभर वर्षे ते मंद अल्पायुषी होऊन या देशांतील देव व तीर्थे यांचा विनाश करणार आहेत. यास्तव, हे मुनिश्रेष्ठहो, तुम्ही मजसह शुभ विशालानगरीस शीघ्र चला " हे वचन ऐकून व मोठ्या दुःखाने नैमिषारण्य सोडून ते सर्व पर्वतोत्तम हिमालयावरील विशालानगरीस ये गेले व सर्वांनी हरीचे ध्यान करून तेथें समाधि लावून बसले. शंभर वर्षांमध्ये ध्यान केल्यामुळे ते सर्व ब्रह्मगृहास गेले. व्यास म्हणतात -- याप्रमाणें पुढें होणारे सर्व योगाभ्याससामर्थ्याने मी तुला अगोदरच सांगितलें. आतां आणखी दुसरें काय ऐकण्याची इच्छा आहे ? मन म्हणतें -- हे भगवन्, तुम्ही वेदतत्त्व जाणणारे व सर्व लोकांचे कल्याण करणारे आहां. मी भूलोकीं

भवो भुवि । अविद्यया च सकल मम ज्ञानं समाहृतम् १३ अतोऽहं विविधा योनीर्गृहीत्वा लोकमागतः । परं ब्रह्मैव कृपया दृष्ट्वा मां मन्दभागिनम् १४ व्यासरूपं स्वयं कृत्वा समुद्धर्तुमुपागतः । नमस्तस्मै मुनीन्द्राय वेदव्यासाय साक्षिणे १५ अविद्यामाहकैर्भावै रक्षणाय नमो नमः । पुनरन्यच्च मे ब्रूहि सूताद्यैः किं कृतं मुने १६ तत्सर्वं कृपया स्वामिन्वक्तुमर्हसि साम्प्रतम् । व्यास उवाच ॥ ब्रह्माण्डे ये स्थिता लोकास्ते सर्वेऽस्मिन्कलेवरे १७ अहङ्कारो हि जीवात्मा सर्वः स्याकोटिहीनकः । पुराणोऽणीरणीयश्च षोडशात्मा सनातन. १८ इन्द्रियाणि मनश्चैव पञ्च चेन्द्रियगोचराः । ज्ञेयो जीवः शरीरेऽस्मिन्स ईशगुणबन्धितः १९ ईशो ह्यष्टादशात्मा वै शकरो जीवशकरः । बुद्धिर्मनश्च विषया इन्द्रियाणि तथैव च २० अहङ्कारस्स चेशो वै महादेवः सनातन । जीवो नारायणस्साक्षाच्छकरेण विमोहितः २१ स बद्धस्त्रिगुणैः पाशैरेकश्च बहुधाऽभवत् । कालात्मा भगवानीशो महाकल्पस्वरूपकः २२ शिवकल्पो ब्रह्मकल्पो विष्णुकल्पस्तृतीयकः । ईशनेत्राणि तान्येव ब्रह्मकल्पश्चतुर्थकः २३ वायुकल्पो वह्निकल्पो ब्रह्माण्डो लिङ्गकल्पकः । ईशवक्त्राणि पञ्चैव तत्त्वज्ञैः कथितानि वै २४ भविष्यकल्पश्च तथा तथा गरुडकल्पक । कल्पो भागवतश्चैव वै मार्कण्डेयकल्पकः २५ वामनश्च नृसिंहश्च वराहो मत्स्यकूर्मकौ । ज्ञानात्मनो महेशस्य ज्ञेया दश भुजा बुधैः २६ अष्टादशदिनेष्वेव ब्रह्मणोऽव्यक्तजन्मनः । कल्पाश्चाष्टादशास्सर्व बुधैर्ज्ञेया विलोमतः २७ कूर्मकल्पश्च तत्राद्यो मत्स्यकल्पो द्वितीयकः । तृतीयः श्वेतवाराह कल्पो ज्ञेयः पुरातनैः २८ द्विधा च भगवान्ब्रह्मा सूक्ष्म स्थूलोऽगुणो गुणी ।

मायेपासून झालो व आपण वेदापासून झाला. अविद्येनें माझें संपूर्ण ज्ञान हरण केले आहे ७-१३. यास्तव, मी नानाप्रकारच्या योनि घेऊन या लोकीं आलों. पण परब्रह्मच कृपेने मज मदभाग्यास पाहून स्वतः व्यासरूपी होऊन माझा उद्धार करण्याकरिता येथें आलें. त्या साक्षिरूपी मुनींद्र वेदव्यासास नमस्कार असो. अविद्येच्या द्वारा मोह पाडणाऱ्या संकटापासून रक्षण करणाऱ्या तुला नमो नमः; वा मुने, पुढे सूतादिकानी काय केलें ते मला सांग १४-१६. हे स्वामिन्, यावेळीं कृपा करून मला ते सर्व सांगण्यास आपणच योग्य आहात. व्यास म्हणतात.— ब्रह्माडामध्यें जे लोक स्थित आहेत ते सर्व या शरीरामध्येही आहेत १७. अहंकारच जीवात्मा होय. तो सर्व रूप व सर्व कोटींनी रहित आहे. हा निर्विकार, अणूहून अणु, षोडशकलात्मक व नित्य आहे १८. इंद्रिये, मन, पाच इंद्रियाचे विषय यांनी जो युक्त असतो तोच या शरीरामध्ये जीव आहे असें जाणावें. तो ईश गुणानीही युक्त आहे. ईश्वर अष्टादशात्मा व शकर जीवाचे कल्याण करणारा आहे. बुद्धि, मन, विषय, त्याचप्रमाणे इंद्रिये व अहंकार इत्यादि तो सनातन महादेवच होय. जीव साक्षात् नारायणच आहे, पण त्यास शकरानें मोहित केले आहे. तो त्रिगुणरूप पाशानी बद्ध होऊन एक असताना अनेक झाला तो कालात्मा भगवान् ईश्वर महाकल्पस्वरूप आहे १९–२२. शिवकल्प, ब्रह्मकल्प व तिसरा विष्णुकल्प हे त्या ईश्वराचे तीन नेत्र होत. चवथा ब्रह्मकल्प २३, वायुकल्प, अग्निकल्प, ब्रह्माड व लिंगकल्प हीं त्या ईश्वराचीं पाच मुखें आहेत, असे तत्त्वज्ञानी सांगितलें आहे. त्याचप्रमाणे भविष्यकल्प, गरुडकल्प, भागवतकल्प, मार्कंडेयकल्प, वामनकल्प, नृसिंहकल्प, वराहकल्प, मत्स्यकल्प व कूर्मकल्प हे त्या ज्ञानरूप ईश्वराचे दहा हात आहेत असे ज्ञानी पुरुषानीं जाणावे. ज्याचा जन्म अव्यक्त आहे अशा ब्रह्मापासून हे अठराही कल्प अठरा दिवसामध्ये उलट क्रमानें झाले, असें विद्वानानी समजावे २४–२७. त्यापैकीं कूर्मकल्प पहिला, मत्स्यकल्प दुसरा व श्वेतवाराहकल्प तिसरा असे पुरातनानीं जाणावे २८. भग-

सगुणः स विराण्नाम्ना विष्णुर्नाभिसमुद्भव २९ निर्गुणोऽव्यक्तरूपश्चाव्यक्तजन्मा स्वभूः स्वयम् । ब्रह्मणः सगुणस्यैव शतायुःकालनिर्मितः ३० ऊनविंशसहस्राणि लक्षैका मानुषाब्दकः । एभिर्वर्षैर्दिनं ज्ञेयं विराजो ब्रह्मणः स्वयम् ३१ निर्गुणोऽव्यक्तजन्मा च कालातीतेश्वरः परः । अव्यक्तं प्रकृतिर्ज्ञेया द्वादशाङ्गानि वै ततः ३२ इन्द्रियाणि मनो बुद्धिरव्यक्तस्य स्मृतानि वै । अव्यक्ताच्च परं ब्रह्म सूक्ष्मज्योतिस्तदव्ययम् ३३ यदा व्यक्ते स्वयं प्राप्तोऽव्यक्तजन्मा हि संस्मृतः । शतवर्षसमाधिस्थो यस्तिष्ठेच्च निरन्तरम् ३४ सूक्ष्मो मनोनिलो भूत्वा गच्छेद्वै ब्रह्मणः पदम् । सत्यलोकमिति ज्ञेयं योगगम्यं सनातनम् ३५ तत्र स्थाने तु मुनयो गताः सर्वे समाधिना । तत्रापित्वा च लक्षाब्दं भूर्लोकाक्षणमात्रकम् ३६ सच्चिदानन्दघनकं ततः प्राप्ता कलेवरं । नेत्राणि च समुन्मील्य सप्तमे द्वितयाह्निके ३७ ददृशुर्मनुजान्सर्वान्पशुतुल्यान्हि सूक्ष्मकान् । षष्टिवर्षायुषस्तान्घोरान्सार्धहस्तोच्छ्रयान्नरान् ३८ क्वचित्क्वाचित्स्थिता वर्णा वर्णसङ्करसन्निभाः । सर्वे म्लेच्छाश्च पाषण्डा बहुरूपमते स्थिताः ३९ तीर्थानि सकला वेदास्त्यक्त्वा भूमण्डलं तदा । गोपीभूत्वा च हरिणा सार्द्धं चक्रुर्महोत्सवम् ४० पाषण्डा बहुजातीया नानापन्थप्रदर्शकाः । कलिना निर्मितान्वर्णान्वञ्चयित्वा स्थिता भुवि ४१ इति दृष्ट्वा तु मुनयो रोमहर्षणमन्तिके । गत्वा तत्र भविष्यन्ति मन प्राञ्जलयो हि ते ४२ तैश्च तत्र स्तुतः सूतो योगनिद्रां सनातनीम् । संत्यक्त्वा कथयिष्यति कल्पाख्यानं मुनीन्प्रति ४३ तच्छृणुष्वेन्द्रियश्रेष्ठ यथा सूतेन वर्णितम् । सूत उवाच ॥ कल्पाख्यान प्रवक्ष्यामि यद्दृष्टं

वान् ब्रह्मदेव दोन प्रकारचा ह्मणजे स्थूल व सूक्ष्म, सगुण व निर्गुण झाला. तो विष्णूच्या नाभीपासून सगुण रूपानें व विराट् या नावानें उत्पन्न झाला२९. तो स्वत. निर्गुण, अव्ययरूप, अव्यक्तजन्मा व स्वयंभू आहे. सगुण ब्रह्माचा शतायुःकाल निर्माण केला आहे ३०. स्वतः विराट् ब्रह्माचा एक दिवस मनुष्यान्या एक लक्ष एकोणीस हजार वर्षांनी होतो असें समजावे ३१. पण निर्गुण व अव्यक्तजन्मा असा जो श्रेष्ठ सर्वेश्वर तो कालातीत आहे. अव्यक्त हीच प्रकृति आहे असें समजावें. हिच्यापासून बारा अंगें होतात ३२,३३. दहा इंद्रिये, मन व बुद्धि ही अव्यक्ताचीच कार्ये आहत असे म्हटले आहे. त्या अव्यक्ताहून ब्रह्म श्रेष्ठ आहे. ते सूक्ष्म, ज्योतिरूप व अव्यय आहे. जेव्हा तो स्वतः अव्यक्तावस्थेस प्राप्त होतो तेव्हा त्यास अव्यक्तजन्मा असें ह्मणतात. शंभर वर्षे एकसारखा तो समाधीमध्ये स्थित असतो ३४. सूक्ष्म मनोरूप वायु निर्माण होऊन तो ब्रह्मस्थानी जातो. ते ब्रह्मपद सत्यलोकच होय असें जाणावें. तें सनातन स्थान योगगम्य आहे ३५. त्या स्थानी समाधीन्या योगाने सर्व मुनि गेले व तेथें भूलोकची एक लक्ष वर्षे ह्मणजे तेथील केवल एक क्षण सच्चिदानंदघनरूपानें राहून तदनंतर पुनः शरीरामध्यें प्राप्त झाले. दुसरा दिवस प्राप्त झाला असता नेत्र उघडून पशुतुल्य व अतिसूक्ष्म झालेल्या सर्व मनुष्यास त्यानी पाहिलें. ते साठ वर्षान्या आयुष्यानें युक्त, भयकर, घोर व सरासरी अडीच हात उंच होते ३६-३८. काही काही ठिकाणी ब्राह्मणादि वर्ण होते. पण ते वर्ण करतुल्यच होते. सर्व म्लेच्छ नास्तिक व नानाप्रकारच्या मताचा स्वीकार करून राहिलेले ३९ त असें दिसलें ३९. तीर्थें व सकल वेद त्यावेळी भूमंडलाचा त्याग करून व गोपीरूप होऊन हरीबरोबर महोत्सव करूं लागले होते ४०. नास्तिक लोक नानाजातींचे होऊन त्यानी नानाप्रकारचे पथ प्रवृत्त केले; व कलीमध्ये निर्माण झालेल्या वर्णास फसवून ते भूलोकी राहिले होते. हे जाणून मुनि लोमहर्षणाकडे जातील व हे मना, ते हात जोडून त्याच्याजवळ उभे राहतील ४१.४२. पुढे त्यानीं ज्याची स्तुति केली आहे असा सूत सनातन निद्रेचा त्याग करून मुनींस कल्पाख्यान

योगनिद्रया ४४ तच्छृणुष्वं मुनिश्रेष्ठा लक्षाब्दान्ते यथाऽभवत् । मुकुलान्वयसंभू
म्लेच्छभूप पिशाचक ४५ नाम्ना तिमिरलिङ्गश्च मध्यदेशमुपाययौ । आर्यान्म्लेच्छांस्तदा भू
श्चित्वा कालस्वरूपक ४६ देहलीनगरीमध्य महद्धर्मकारयत् । आहूय सकलान्विप्रानार्यदे
निवासिन ४७ उवाच वचनं धीमान्यूयं मूर्तिमपूजका । निर्मिता येन या मूर्तिस्तस्य पुत्रस
स्मृता ४८ तस्या किं पूजन शुद्ध शालग्राम शिलामयम् । विष्णुदेवश्च युष्माभि. प्रोक्तः स
न वै हरिः ४९ अतो व सकला वेदा. शास्त्राणि विविधानि च । वृथा कृतानि मुनिभिर्लोकव
नेहतव ५० इत्युक्त्वा नान्बलाद्गृह्य उत्तलदग्नौ समाक्षिपत् । शालग्रामशिलाः सर्वा बलात्ते
सुपूजका ५१ गृहीत्वा चाङ्गुपग्रपु समारोप्य गृह ययौ । तैत्तिर देशमागम्य दुर्ग तत्र चकार स.
शालग्रामशिलानां च स्वासनारोहण कृतम् । तदा तु सकला देवा दुःखिता वासव प्रभुम्
समूचुर्बहुधालप्य देवदेव शचीपतिम् । वय त भगवन्सर्वे शालग्रामशिलास्थिता.
त्यक्त्वा मूर्तीश्च सकला. कृष्णांशेन प्रबाधिता । शालग्रामशिलामध्ये वसामो मुदिता वयम्
शिलास्सर्वाश्च नो देव शालदेशसमुद्भवा. । ताश्च वै म्लेच्छराजन स्वपदारोहणीकृता.
इति श्रुत्वा तु वचन देवानां भगवान्भराट् । ज्ञात्वा बलिकृत सर्व देवपूजानिराकृतम्
चुकोप भगवानिन्द्रो दैत्यान्प्रत्यभ्रवाहन. । गृहीत्वा वज्रमतुल स्वायुध दैत्यनाशनम् ५८ तै
प्रेषयामास देशे म्लेच्छनिवासके । तस्य शब्देन सकला देशाश्च बहुभिन्नकाः ५९ स म्लेच्
मरण प्राप्तस्तदा सर्वसभाजने. । शालग्रामशिला सर्वा गृहीत्वा विबुधास्तदा ६० गण्डक्यां

सांगेल. हे श्रेष्ठ इंद्रिया, सूत व्यास जे सांगणार आहे ते तू ऐक —जे मी योगनिद्रेने पाहिले ते कल्पान्यान तुह्माम सांगेन ४३.४४. हे मुनिश्रेष्ठहो, लक्ष वर्षाच्या अंती जे झाले ते ऐका. मुकु वशात उत्पन्न झालेला पिशाचक म्लेच्छ राजा मध्यदेशामध्ये आला त्याचे नाव तिमिरलिंग ह होत. त्यावेळी येथे जे म्लेच्छ व आर्य राजे होते त्यास जिंकून तो कालस्वरूपी देहलीनगराम मोठ कदन करिता झाला. आर्यदेशामध्य रहाणाऱ्या सर्व ब्राह्मणास बोलावून तो धूर्त ह्मण " तुम्ही मूर्तिपूजक आहात. पण ज्याने जी मूर्ति निर्माण केली ती त्याच्या पुत्रासारखीच होय४५–४ तेव्हा तिचे पूजन करणे चांगले का ? तुम्ही शिलामय शालग्रामास विष्णु देव ह्मणता. पण तो असा नाही ४९. यास्तव, तुमचे सर्व वेद व नानाप्रकारची शास्त्रे मुर्नीना लोकास फसविण्याकरि त्यर्थ निर्माण केली आहेत" असे ह्मणून व त्यास बलात्काराने घेऊन त्याने प्रज्वलित अग्नीमध्ये टाकिले ज्याची उत्तम कार राजा होत होती अशा सर्व शिलामय शालग्रामशिला घेऊन व त्या उठाऱ्या पाठी लादून तो आपल्या गृही गेला तैत्तिरदेशास येऊन त्याने तेथे दुर्ग बांधला५० ५२व आपल्या आ नावर चढण्याकरिता त्याने शालग्रामशिलाच्या पायऱ्या केल्या. तेव्हा सर्व देव दुःखित होऊन अ प्रकारे विलाप करीत देवाधिपति जो वासव त्यास ह्मणाले " हे भगवन्, कृष्णांशाने बोध के असता आम्ही सर्व इतर सर्व मूर्तींचा त्याग करून व शालग्रामशिलाचा आश्रय करून राहि आम्ही त्या शिलामध्ये मोठ्या आनंदाने राहत असो त्या आमच्या सर्व शिला हे देवा, शालदेशाम निर्माण झालेल्या असत. पण म्लेच्छराजाने आपल्या सिंहासनावर चढण्याकरिता त्या सर्वांच्या पाय केल्या आहेत " ५३–५९. हे देवांचे वचन ऐकून तो तेजस्वी भगवान् हे सर्व देवपूजेचे निराक ब्रह्मांनें केले आहे असे समजला ५७. व तो अभ्रवाहन भगवान् इंद्र दैत्यावर फार रागावला त्य दैत्यांचा नाश करणारे वज्रमतुल आपले अतुलम आयुध घेऊन ते म्लेच्छ जेथे राहत होते तेथवर देशावर सोडिले. त्याच्या शब्दाने सर्वा देश छिन्नभिन्न झाले व तो म्लेच्छ स

समाक्षिप्य स्वर्गलोकमुपाययु. । महेन्द्रस्तु सुरैः सार्द्धं गुरुं पूज्यमुवाच ह ६१ महीतले कलौ प्राप्ते भगवन्दानवोत्तमा. । वेदधर्मं समुल्लङ्घ्य मम नाशनतत्पराः ६२ अतो मां रक्ष भगवन्देवैः सार्धं कलौ युगे । जीव उवाच ॥ महेन्द्र तव या पत्नी शची नाम्ना महोत्तमा ६३ ददौ तस्यै वरं विष्णुर्भवितास्मि सुतः कलौ । त्वदाज्ञया च सा देवी पुरीं शान्तिमयीं शुभाम् ६४ गौडदेशे च गङ्गाया. कूले लोकनिवासिनीम् । प्रत्यागत्य द्विजो भूत्वा कार्यसिद्धिं करिष्यति ६५ भवान्वै ब्राह्मणा भूत्वा देवकार्यं प्रसाधय । इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं रुद्रैरेकादशैः सह ६६ अष्टभिर्वसुभिः सार्धमश्विभ्यां स च वासव. । तीर्थराजमुपागम्य प्रयागं च रविप्रियम् ६७ माघे तु मकरे सूर्ये सूर्यदेवमतोषयत् । बृहस्पतिस्तदाभत्य सूर्यमाहात्म्यमुत्तमम् ॥ इन्द्रादिभ्यः कथयामास द्वादशाध्यायमापठन् ६८ [४३१०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये प्रभरवरवचनो नाम षष्ठोऽध्याय ॥ ६ ॥

ऋषय ऊचुः। बृहस्पतिस्तु भगवान्मुनिर्देवान्समास्थितान् । किं प्रोवाच च माहात्म्यं मण्डलस्थस्य वै रवेः १ तत्सर्वं कृपया ब्रह्मञ्छ्रोतुमिच्छामहे वयम् । इति श्रुत्वा वचस्तेषां सूतो वचनमब्रवीत् २ बृहस्पतिं समासीनं जीवरूपं गुणालयम् । प्रयागस्थो महेन्द्रश्च सुरैः सार्द्धमुवाच ह ३ कथयस्व महाभाग सूर्यमाहात्म्यमुत्तमम् । यच्छ्रुत्वेन रविः साक्षात्प्रसन्नोऽद्य भवेत्प्रभुः ४ बृहस्पतिरुवाच ॥ धातृनामा द्विजः कश्चिदपत्यार्थे प्रजापतिम् । तपसा तोषयामास बर्हिष्मतिपुरे स्थितः ५ पञ्चमाब्दे तु भगवान्सन्तुष्टश्च प्रजापतिः । सुतां कन्यां पुनः पुत्रं त्रीण्यपत्यानि ददौ ६ वर्षान्तरे च

पावला. तेव्हा सर्व समाजनांनी त्या सर्व शालग्रामशिला घेऊन गटकीमध्ये टाकिल्या व ते ज्ञानी स्वर्गलोकी गेले. इकडे देवासह महेंद्र पूज्य गुरूस ह्मणाला " हे भगवन्, भूलोकी कलि प्राप्त झाला असता दानवश्रेष्ठ वेदधर्माचे उल्लंघन करून माझा नाश करण्याकरिता तत्पर झाले आहेत ५८ ६२. यास्तव, हे भगवन्, या कलियुगी माझे देवासह रक्षण कर. " गुरु ह्मणाले -- हे महेंद्रा, शची ह्मणून जी तुझी पत्नी आहे ६३ तिला विष्णूने कलियुगी मी तुझा पुत्र होईन असा वर दिला आहे. यास्तव, तुझ्या आज्ञेने ती गंगेच्या तीरावरील गौडदेशामध्ये शांतिमयीनामक जी शुभ नगरी आहे व जेथे सर्व वर्णांचे लोक रहात आहेत तेथे जाऊन व ब्राह्मणी होऊन तुझे कार्य करील व तूही स्वत. ब्राह्मण होऊन देवांचे कार्य कर. असे पूज्य गुरूचे वाक्य ऐकून एकादशरुद्र, अष्टवसु व अश्विनीकुमार यांच्यासह तो इंद्र सूर्यास प्रिय असलेल्या प्रयागनामक श्रेष्ठ तीर्थास आला ६४-६७. माघ महिन्यामध्ये सूर्य मकरराशीस आला असता त्याने सूर्यदेवास संतुष्ट केले. तेव्हा बृहस्पतीने येऊन इंद्रादिकास उत्तम सूर्यमाहात्म्यानें युक्त असलेले बारा अध्याय वाचून दाखविले ६८. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील चतुर्थखंडाचा कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६॥

ऋषि ह्मणतात.— भगवान् बृहस्पति मुनि ज्ञानपणे वसलेल्या देवास मंडलस्थ रवीचे माहात्म्य कसे सांगता झाला ते सर्व. हे मुने, कृपा करून तू आह्मास सांग. आह्मी ते ऐकण्याविषयी उत्सुक आहो. हे त्याचे वचन ऐकून सूत ह्मणाले " वसलेल्या जीवसंज्ञक व गुणस्थानरूप बृहस्पतीस प्रयागस्थ महेंद्र देवासह ह्मणाला " हे महाभागा, मला सूर्याचे उत्तम माहात्म्य सांग. ते ऐकल्यानें आज साक्षात् प्रभु सूर्य प्रसन्न होईल " १-४. बृहस्पति ह्मणाले. -बर्हिष्मतिनगरामध्ये असलेला धातृशर्मा ह्मणून कोणी एक ब्राह्मण पुत्राकरिता तपश्चर्येच्या योगाने प्रजापतीस संतुष्ट करिता झाला ५. तेव्हा पाच वर्षांनतर प्रजापति संतुष्ट झाला. त्याने पुत्र, कन्या व पुनरपि पुत्र अशी तीन अपत्ये त्यास

जनित ह्यपत्य स द्विजोत्तमः । धातृशर्मा परं हर्षमाप्तवान्पुत्रलालनैः ७ क्रियाहाश्च कथ तेषां भवितव्या महोत्तमा । इति चिन्तान्वितो विप्रो गन्धर्वेशं च तुम्बुरुम् ८ हवनैस्तोषयामास वर्षमात्रविधानतः । तुम्बुरुश्च तदागत्य तच्चकार मनोरथम् ९ प्रसन्नस्तु तदा विप्रो वधूजामातर मुदा । दृष्ट्वा तेषां विहार च पुनश्चिन्तां चकार ह १० भूषणानि च वासांसि धनानि विविधानि च । तेषां कथ भविष्यन्ति निर्धनानां ममाशु च ११ षष्टिवर्षमयी भूत्वा चन्दनाद्यैर्धनाधिपम् । विधिवत्पूजयामास वर्षमात्र तु तत्परः १२ तदा प्रसन्नो भगवान्ददौ तस्मै धन बहु । विद्यां यक्षमयीं रम्यां पञ्चस्वर्णप्रदा मुदा १३ सहस्रजापी सपूज्य हवन तद्दशांशकम् । तर्पण मार्जन चैव कृत्वा वाञ्छामवाप्तवान् १४ इत्येवं वर्तमानस्य गत. कालो महान्स्वयम् । मृत्योरागमन तस्य जात रोगसमन्वितम् १ पीडितस्तु रुजा विप्रः शकर लोकशङ्करम् । स्तुतिभिः श्रुतिरूपाभिस्तुष्टाव बलवर्जित. १६ मासमात्रेण भगवान्ददौ ज्ञान स्वय हरः । धातृशर्मा तु तत्प्राप्य भास्कर मोहनाशनम् १७ सूर्यवारव्रतैस्तत्र तोषयामास नम्रधीः । पञ्चाब्दे भगवान्सूर्यो भक्तिभावन वत्सल १८ चैत्र्यां तमाह वचन वर ब्रूहि पुनःपुनः । धातृशर्मा तु तच्छ्रुत्वा भास्कर मोहनाशनम् १९ प्रश्रयावनतो भूत्वा तुष्टाव परया गिरा । धातृशर्मोवाच ॥ प्रवृत्तिश्च निवृत्तिश्च मनसोऽस्य तनौ प्रिया २० रात्रिरूपा प्रवृत्तिश्च निवृत्तिर्दिनरूपिणी । भवतस्तेजसा जाते लोकबन्धनहेतवे २१ अव्यक्ते तु स्थित तेजो भवतो दिव्यसूक्ष्मकम् । विधाभूत तु विश्वाय तस्मै तेजात्मने नम २२ रात्रौ या स्मृता बुद्धिस्तत्पतिर्भगवान्विधिः । भवतस्तेजसा

दिली. त्या उत्तम द्विजास एकेक वर्षाच्या अंतराने तीन अपत्ये झाली. तेव्हा पुत्राचे लालन करीत असता तो धातृशर्मा अति आनंदित झाला ६,७. पुढे याचे अति उत्तम विवाह कसे होतील या चिंतेने युक्त झालेला तो ब्राह्मण गंधर्वाचा ईश जो तुंबुरु त्यास एक वर्ष विधान करून हवनाच्या योगाने संतुष्ट करिता झाला. तेव्हां तुंबुरूने येऊन त्याचा मनोरथ पूर्ण केला तेव्हा तो ब्राह्मण प्रसन्न झाला आणि वधू व जामात यास आणि त्याच्या विहारास आनंदाने पाहून तो पुनरपि चिंता करिता झाला. " माझ्या या निर्धन अपत्यास नानाप्रकारची भूषणे, वस्त्रे व धन कसें प्राप्त होईल ? " ८-११. असे म्हणून तो साठ वर्षांचा झाला असता एक वर्षभर चंदनादिकाच्या योगाने कुबेराचे मोठ्या भक्तीने व विधीने पूजन करिता झाला. तेव्हा प्रसन्न झालेला भगवान् त्यास पुष्कळ धन देता झाला व त्याने आनंदाने पांच स्वर्ण देणारी यक्षमयी रम्य विद्याही त्यास दिली १२,१३. तेव्हा एक सहस्र जप, पूजन, जपाच्या दशांश हवन, तर्पण व मार्जन केल्यानंतर त्याची इच्छा पूर्ण झाली १४. ह्याप्रमाणें वर्तन करणाऱ्या त्याचा पुष्कळ काल निघून गेला, व तो स्वतः रोगग्रस्त होऊन मरणोन्मुख झाला १५. तेव्हा रोगाने पीडिलेला व बलशून्य असा तो ब्राह्मण, लोकशंकर जो शंकर त्याची श्रुतिरूप स्तोत्रांनी स्तुति करू लागला १६. एका महिन्यामध्ये स्वतः भगवान् शंकराने त्यास ज्ञान दिले. तेव्हा धातृशर्मा ते प्राप्त करून घेऊन मोहाचा नाश करणारा जो भास्कर त्यास रविवारव्रतांनी नम्रपणे संतुष्ट करिता झाला. पांच वर्षांनी त्याच्या भक्तिभावाने वत्सल झालेला भगवान् सूर्य चैत्रीपौर्णिमेस त्यास वारंवार म्हणाला " वर माग. " तें ऐकून मोहाचा नाश करणाऱ्या भास्करास धातृशर्मा विनयाने नम्र होऊन परावाणीने स्तवू लागला. धातृशर्मा म्हणतो'—शरीरातील या मनाची प्रवृत्ति व निवृत्ति प्रिय आहे. प्रवृत्ति रात्रिरूप व निवृत्ति दिनरूप असते. या दोन्ही लोकास बद्ध करण्याकरिता तुझ्या तेजापासून झाल्या आहेत. तुझें दिव्य व सूक्ष्म तेज अव्यक्तामध्ये स्थित आहे व ते त्रिविध झाले आहे. त्या तुज विश्वरूप तेजस्वरूपी ईशास नमस्कार असो. जी

जातस्तस्मै ते विधये नमः २३ सात्त्विकी या तनौ बुद्धिस्तत्पतिर्भगवान्हरिः । भवता निर्मितस्त्वात्मस्मै ते हरये नमः २४ तामसी मोहना बुद्धिस्तत्पतिश्च स्वयं शिव । तमोभूतेन भवता जातस्तस्मै नमो नमः २५ देहि मे भगवन्मोक्षं सज्ञाकान्त नमो नमः । बृहस्पतिरुवाच ॥ इत्येव मस्तुतस्तेन भगवान्धातृशर्मणा २६ महेन्द्र वचनं प्राह तं द्विज ज्ञानकोविदम् । मोक्षश्चतुर्विधा विप्र सालोक्य तपसोद्भवम् २७ सामीप्य भक्तितो जात सारूप्यं ध्यानसभवम् । सायुज्य ज्ञानतो ज्ञेयं तेषां स्वामी परः पुमान् २८ द्विगुणो द्विगुणो ज्ञेय आनन्दो मोक्षिणां क्रमात् । देवानां चैव देहेषु ये मोक्षाः पुनरागताः २९ यद्गत्वा न निवर्तन्ते तद्विष्णो परम पदम् । यत्पुरुषेण विप्रेन्द्र सायोज्य मे भवेत्तव ३० मनुमात्रश्च य. कालस्तावत्ते मोक्ष आस्थितः । इत्युक्त्वाऽन्तर्दधे देवस्तेन मोक्षीकृतो द्विजः ३१ सूत उवाच ॥ इत्युक्तवन्त वागीश चैत्रमासे दिवाकर । स्वरूपं दर्शयामास देवदेव सनातनः ३२ शृणुध्व सकला देवा यन्निमित्तः समागतः । काश्मीरे स्वांशमुत्पाद्य देवकार्यं कराम्यहम् ३३ इत्युक्त्वा स्वमुखात्तेजः समुत्पाद्य दिवाकरः । स्वभक्तायै सुकन्यायै द्विजपत्न्यै ददौ हि तत् ३४ धातृशर्मा द्विजो यो वै सूर्ये मोक्षमुपागतः । स वै तत्ते जसा जात काव्यकारस्य मन्दिरे ३५ केशवो नाम विख्यातः सर्वशास्त्रविशारदः । जित्वा विप्रान्वदपरान्महतीं कीर्तिमाप्तवान् ३६ इति ते कथित विप्र यथा जीवेन भाषितम् । पुनः शृणु कथां रम्यां देवेभ्यो जीवनिर्मिताम् ३७ बृहस्पतिरुवाच । मायावत्यां द्विजः कश्चिन्मित्रशर्मेति

बुद्धि राजसी ह्मणून ह्मटलेली आहे तिचा भगवान् विधि स्वामी आहे. तो तुझ्या तनूपासून झालेला असून त्या तुज विधीस नमस्कार असो. शरीरामध्ये जी सात्विकी बुद्धि असते तिचा स्वामी भगवान हरि होय; व तो तुझ्या सत्त्वगुणापासूनच झाला आहे. यास्तव, त्या तुज हरीस नमस्कार असो १७-२४. मोह पाडणारी जी तामसी बुद्धि तिचा पति स्वतः शंकर आहे. तो तमोरूप झालेल्या तुझ्यापासून निर्माण झाला. अशा तुला नमस्कार असो. हे भगवन्, मला मोक्ष दे. हे सज्ञाकान्त, तुला वारंवार नमस्कार असो. बृहस्पति ह्मणतात.– याप्रमाणें त्या धातृशर्म्यानें स्तुति केली असता, हे महेंद्रा, तो त्या विद्वान् ब्राह्मणास ह्मणाला' हे ब्राह्मणा, मोक्ष चार प्रकारचा आहे. सालोक्य तपामुळें मिळतें, सामीप्य भक्तीमुळें मिळतें, सारूप्य ध्यानाच्या योगानें प्राप्त होतें व सायुज्य ज्ञानाच्या योगानें मिळतो असें समजावें. व त्या सर्वांचाही स्वामी परम पुरुष होय. या मोक्ष मिळविलेल्या पुरुषाचा आनंद क्रमानें दुप्पट दुप्पट असतो. देवाच्या देहामध्ये लीन होऊन जे मुक्त होतात ते पुनरपि परत येतात २५-२९. पण जेथे गेल्यावर साधक पुनः परत येत नाहीत ते विष्णूचें परम पद होय. यास्तव, हे श्रेष्ठ ब्राह्मणा, प्रसन्न झालेल्या माझ्या ठिकाणीं तुला सयुज्यमुक्ति प्राप्त होईल एक मनूच्या आयुष्याचा जेवढा काल असतो तेवढा वेळ तू मुक्त अवस्थेमध्यें रहाशील' असें बोलून तो देव गुप्त झाला व त्याने ब्राह्मणास मुक्त केलें. असें बोलणाऱ्या बृहस्पतीस चैत्रमासीं देवाधिदेव सनातन दिवाकर आपलें रूप दाखविता झाला. 'हे सर्व देवहो, मी कशाकरिता आलों आहे तें ऐका. काश्मीरामध्ये आपल्या अंशास उत्पन्न करून मी देवाचे कार्य करीन' ३०-३३. असें बोलून व आपल्या मुखातून तेज काढून त्या दिवाकराने तें द्विजपत्नीस दिलें. ती उत्तम कन्या त्याची भक्त होती ३४. धातृशर्मा ह्मणून जो ब्राह्मण सूर्यामध्ये लीन झाला होता तो सूर्याच्या तेजापासून एका कवीच्या गृही निर्माण झाला ३५. तो केशव या नावानें प्रसिद्ध असून सर्व शास्त्रांत विशारद होता. वेदामध्यें तत्पर असलेल्या ब्राह्मणास जिंकून त्याने मोठी कीर्ति मिळविली ३६. हे ब्राह्मणा, याप्रमाणें बृहस्पतीने जें सांगितलें होतें तें मीं तुला कथन केलें. त्या गुरूनें देवाकरिता निर्माण केलेली दुसरी रम्य कथा तूं पुनः ऐक ३७.

विश्रुतः । काव्यविद्यापरो नित्यं रसिकः कामिनीप्रियः ३८ कुम्भराशिं गते भानौ गङ्गाद्वारे महोत्सवः । बभूव बहुलैर्भूपैः कारितस्तीर्थतत्परैः ३९ तत्रोत्सवे नरा नार्यो बहुभूषणभूषिताः । समाययुर्दर्शनार्थं परमानन्दनिर्भराः ४० मित्रशर्मा तु संप्राप्य कामसेनस्य वै सुताम् । काव्यकेलिकलायुक्तां द्वादशाब्दमयीं शुभाम् ४१ दाक्षिणात्यस्य भूपस्य तनयां मधुराननाम् । दृष्ट्वा तां मृगशावाक्षीं तद्वशित्वमुपागतः ४२ सा तु तं चित्रिणी नाम्ना मित्रशर्माणमुत्तमम् । दृष्ट्वा तु मूर्छिता चासीद्विषमार्तिर्हृदि स्थिता ४३ स्वगेहं पुनरागत्य चित्रिणी भास्करं प्रभुम् । प्रत्यहं पूजयामास बहुमानपुरस्सरा ४४ मित्रशर्मा तु तत्स्थाने गङ्गाकूले मनोहरे । प्रातः स्नात्वा शुचिर्भूत्वा वैशाखे जलमध्यगः ४५ स्नात्वमादित्यहृदयं जपन्सूर्यैकतत्परः । प्रत्यहं द्वादशावर्तैस्तोषयामास भास्करम् ४६ मासान्ते भगवान्सूर्यो ददौ तस्मै हि तद्वरम् । स तु लब्धवरो विप्रः स्वगेहं पुनरागतः ४७ चित्रिणी तु वरं प्राप्य वाञ्छितं लोकभास्करात् । पुनस्तौ पितरौ स्वप्ने भास्करेण प्रबोधितौ ४८ मित्रशर्माणमाहूय वरयामासतुः सुताम् । स्वान्तं निवासयामास कामसेनश्च दम्पती ४९ तौ तु चक्रं मुदाविष्टौ प्रत्यहं सूर्यदैवतम् । ताम्रपात्रे च तच्चक्रं लेखयित्वा त्रियामतः ५० ईजतू रक्तकुसुमैर्व्रतं कृत्वा रविप्रियम् । शताब्दवपुषौ चोभौ निर्जरौ श्रमवर्जितौ ५१ आगतौ मरणं प्राप्य सामीप्यं च स्वर्गतौ । इति श्रुत्वा स्वर्गाप्तिं वैशाख्यां देवराट् स्वयम् ५२ प्रत्यक्षं भास्करं देवं ददर्श सहितः सुरैः । भक्तिनम्रान्मुरान्दृष्ट्वा भगवांस्तिमिरापहः ५३ उवाच वचनं रम्यं देवदेवः परं शुभम् । ममांशजनयो भूमौ

बृहस्पति म्हणतातः—मायावतीमध्ये मित्रशर्मा या नावाने प्रसिद्ध असलेला कोणी एक ब्राह्मण होता. तो रसिक सर्वदा काव्यविद्येमध्ये तत्पर व कामिनीप्रिय असे. मी कुंभराशीस आले असता गंगाद्वारी मोठा उत्सव झाला. तीर्थामध्ये तत्पर असलेल्या अनेक राजांनी तो करविला होता ३८,३९ त्या उत्सवामध्ये परमानंदाने पूर्ण व अनेक भूषणांनी भूषित झालेल्या स्त्रिया व पुरुष दर्शनाकरिता आले ४०. मित्रशर्मा तर तेथे येऊन दाक्षिणात्य कामसेनराजाच्या शुभ व काव्यक्रीडा व कला यांनी युक्त असलेल्या बारा वर्षांच्या सुंदर कन्येस पाहून तिच्या अधीन झाला ४१,४२. चित्रिणी असे तिचे नाव होते. या उत्तम मित्रशर्म्यास पाहून तीही मूर्छित झाली. त्या ब्राह्मणाची मूर्ति तिच्या हृदयामध्ये दृढ बसली ४३. तेव्हा पुन. आपल्या गृही येऊन ती चित्रिणी प्रभु भास्कराचे बहुमानपूरःसर प्रत्यही पूजन करूं लागली ४४. मित्रशर्मा तर गंगातटाकावरील त्या मनोहर स्थानीच प्रातःकाली स्नान करून व शुचिर्भूत होऊन वैशाख महिन्यात जलामध्ये उभा राहिला ४५ व सूर्यतत्पर होऊन त्याने आदित्यहृदयस्तोत्राचा जप केला. प्रतिदिनी बारा आवृत्त्या करून त्याने भास्करास संतुष्ट केले ४६. एका महिन्याच्या शेवटी भगवान् सूर्याने त्यास वर दिला तेव्हा ज्याला वर प्राप्त झाला आहे असा तो ब्राह्मण आपल्या गृही परत आला ४७. इकडे त्या लोकप्रकाशकापासून चित्रिणीलाही इष्ट वर प्राप्त झाला. नंतर भास्कराने स्वप्नामध्ये तिच्या आईबापास बोध केला ४८. तेव्हा मित्रशर्म्यास बोलावून त्याने आपल्या कन्येचा विवाह करविला. कामसेनाने त्या दंपत्यास आपल्याजवळ ठेवून घेतले ४९. तेव्हा ती दोघेही आनंदयुक्त होऊन प्रतिदिनी सूर्यदेवाचें चक्र ताम्रपात्रामध्ये यथाविधि लिहून व रविप्रिय व्रत करून लाल पुष्पांनी पूजा करूं लागलीं. त्यांची शरीरे शंभर वर्षांच्या वयाचीं झाली. व तोपर्यंत ती जरेवाचून व रोगरहित अवस्थेमध्ये राहून शेवटीं मरण पावली व रवीच्या सामीप्यापद प्राप्त झालीं. वैशाख शुद्ध पौर्णिमेस ही सूर्याची कथा ऐकून स्वत. देवराज देवासहवर्त-

भविष्यति सुरोत्तम ५४ सूत उवाच ॥ इत्युक्त्वा स्वस्य बिम्बस्य तेजोराशिं समन्ततः । समुत्पाद्य कृतं कार्यां राम नन्दस्ततोऽभवत् ५५ देवलस्य च विप्रस्य कान्यकुब्जस्य वै सुतः । बाल्यात्प्रभृति स ज्ञानी रामनामपरायणः ५६ पित्रा मात्रा यदि त्यक्तो राघव शरणं गतः । तदा तु भगवान्साक्षाच्चतुर्दशकलो हरिः ५७ सीतापतिस्तदुद्धृदय निवास कृतवान्मुदा । इति ते कथितं विप्र मित्रदेवांशतो यथा ५८ रामानन्दस्तु बलवान्हरिभक्तेश्च सभव । बृहस्पतिरुवाच ॥ शृणु शक्र कथां रम्यां ज्येष्ठमासस्य वै रवेः ५९ अर्यमा नाम वै विप्र पुरा सत्ययुगे ह्यभूत् । वेदवेदाङ्गतत्त्वज्ञो धर्मशास्त्रपरायणः ६० तस्य पत्नी पितृमती श्राद्धयज्ञस्य भूपतेः । तनया च महाभाग्वी सप्त पुत्रानकल्मषान् ६१ अर्यम्णो जनयामास धर्मशास्त्रपरायणान् । एकदा स द्विजो धीमान्विचार्य बहुधा हृदि ६२ धनार्थी भास्करं देवं तुष्टाव बहुपूजनैः । प्रभाते श्वेतकुसुमैश्चन्दनादिभिरर्चनैः ६३ मध्याह्ने रक्तकुसुमैः पीतपुष्पैः पितृप्रसो । मासमात्रं तु विधिना पूजयामास भास्करम् ६४ ज्येष्ठे च भगवान्सूर्यो ददौ तस्मै मणिं शुभम् । तन्मणेश्च प्रभावेन प्रस्थमात्रं च काञ्चनम् ६५ प्रत्यहं जनयामास तेन धर्मं समाचरत् । वापीकूपतडागानि तथा हर्म्याणि भूतले ६६ कारयामास धर्मार्थी सूर्यदेवप्रसादतः । सहस्राब्दवपुर्भूत्वा निर्जरो निरुपद्रवः ६७ त्यक्त्वा कलेवरं रम्यं सूर्यलोकमुपाययौ । उषित्वा तत्र लक्षाब्दं सूर्यरूपो बभूव ह ६८ इत्येवं भास्करस्यैव माहात्म्यं कथितं मया । तस्माच्छक्र सुरैः सार्द्धं भज मण्डलगं रविम् ६९ सूत उवाच ॥

मान भास्करदेवास प्रत्यक्ष पाहता झाला. तिमिरगचा नाश करणारा तो भगवान् भक्तिमुळे नम्र झालेल्या देवास पाहून देवकार्यपर शुभ व रम्य वचन बोलला " हे उत्तम देवा, माझ्या अंशापासून भूलोकी पुत्र होईल " ५०-५४. सूत म्हणतात – असे बोलून आपल्या विवाऱ्या चोहोकडून तेजाची राशि उत्पन्न करून त्याने आपला अंश दिला. त्यामुळे काशीमध्ये रामानंद झाला. तो कान्यकुब्ज देवल ब्राह्मणाचा पुत्र होय बालपणापासून तो ज्ञानी रामनामामध्ये परायण असे ५५,५६. पिता, माता यानी जरी त्याचा त्याग केला होता तरी तो राघवास शरण गेला. तेव्हा तो साक्षात् चतुर्दश कलानीं युक्त असलेला भगवान् सीतापति हरि आनदाने त्याच्या हृदयामध्ये निवास करिता झाला. हे ब्राह्मणा, याप्रमाणे मित्रदेवाच्या अंशापासून बलवान् रामानद कसा झाला व तो हरीचे ठायीं किती भक्ति ठेवीत असे ते तुला सांगितले. बृहस्पति म्हणतात – हे इंद्रा. रवीची ज्येष्ठ महिन्याची उत्तम कथा ऐक ५७-५९. पूर्वी सत्ययुगामध्ये अर्यमा म्हणून ब्राह्मण होता. तो वेद व वेदांग याचे तत्त्व जाणणारा व धर्मशास्त्रामध्ये परायण होता ६०. पितृमती म्हणून त्याची पत्नी होती. ती श्राद्धयज्ञराजाची कन्या होय. त्या महासाध्वीस अर्यमापासून निष्पाप सात पुत्र झाले. ते सर्वही धर्मशास्त्रामध्ये परायण होते. एकदा तो बुद्धिमान् द्विज मनामध्ये पुष्कळ विचार करून ६१,६२, धनाच्या इच्छेनें पुष्कळ प्रकारच्या पूजानी भास्कर देवास संतुष्ट करिता झाला. प्रातःकाली श्वेत पुष्प, चंदन इत्यादि उपचारानीं ६३, मध्याह्नसमयी लाल पुष्पानी व सायंकाली पिवळ्या पुष्पानी तो सूर्याची पूजा करीत असे. याप्रमाणे त्याने एक महिनाभर भास्कराचे यथाविधि पूजन केले ६४. ज्येष्ठामध्ये भगवान् सूर्याने त्यास शुभ मणि दिला, त्या मण्याच्या प्रभावाने त्यास प्रतिदिनीं शेरभर सोने मिळत असे, व त्याच्या योगाने त्याने पुष्कळ धर्मकृत्ये केली. त्या धार्मिकाने सूर्यदेवाच्या प्रसादानें वापी, कूप, तडाग व त्याचप्रमाणे भूलोकी मोठमोठी मंदिरे करविली. पुढे सहस्र वर्षांचे शरीर झाले असता जरारहित व उपद्रवरहित अशा त्या ब्राह्मणाने रम्य शरीर सोडून सूर्यलोकी गमन केले. तेथे एक लक्ष वर्षे राहून तो सूर्यरूप झाला ६५-६८. याप्रमाणे भास्कराचे माहात्म्य मी तुला

इति श्रुत्वा तु ते देवाः पद्यैः सूर्यकथामयैः तोषयाञ्चक्रिरे प्रेम्णा ज्येष्ठमासि रविस्त्वसौ ७० प्रत्यक्षमभवत्तत्र देवानग्रह प्रसन्नधीः । कलौ भयानके देवा मदंशो हि जनिष्यति ७१ निम्बादित्य इति ख्यातो देवकार्यं करिष्यति । सूत उवाच ॥ इत्युक्त्वाऽसौ स्वदेहाच्च तेज उत्पाद्य भूतले ७२ गोविन्दशर्मणो गेहे चोदयामास तत्पुरे । स बालो हरिभक्तश्च साधुसेवी दयान्वितः ७३ षोडशाब्दवपुर्भूत्वा नित्यदा हरिमर्चयत् । एकदा वैष्णवास्तत्र नोतादर्या समागताः ७४ बुभुक्षिताश्च वचन त बाल प्राहुरूर्जिता । यावत्सूर्य. स्थितो व्योम्नि तावदस्मान्हि भोजय ७५ इति श्रुत्वा तथेत्युक्त्वा ददौ तेभ्यश्च भोजनम् । तदा तु भगवान्सूर्यो ह्यस्ताचल मुपागतः ७६ मुहूर्तमभवत्कालः पुनः सूर्य समाह्वयत् । दर्शयामास तान्सूर्य निम्ववृक्षः समानयन् ७७ तदा ते वैष्णवाः सर्वे साधु साध्वियपूजयन् । निम्बादित्य इति ख्यातः स बालो विश्रुतो भुवि ७८ [४४०८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये शाकानन्दनिम्बार्कसमुत्पत्तिवर्णनो नाम सप्तमोऽध्याय ॥ ७ ॥

बृहस्पतिरुवाच । पुरा त्रेतायुगे शक्र शक्रशर्मा द्विजो ह्यभूत् । अयोध्यायां महाभागो देवपूजनतत्परः १ अश्विनौ च तथा रुद्रान्वसून्सूर्यान्पृथक्पृथक् । यजुर्वेदमयैर्मन्त्रैरर्चयित्वा प्रसन्नधीः २ हव्यैश्च तर्पयामास देवांस्तान्यत्यहं द्विजः । तद्भावतस्त्वयस्तेभ्यो देवाः क्षुद्रगणैर्युताः ३ ददुर्मनोरथं तस्मै दुर्लभं सुलभीकृतम् । दशवर्षसहस्राणि निर्जरा निरुपद्रव ४ पश्चात्कलेवरं त्यक्त्वा पश्चात्सूर्यो बभूव सः । लक्षाब्दं मण्डले तस्मिन्नधिकारः कृतस्ततः ५

सांगितले. यास्तव, हे शक्रा, तू देवासहवर्तमान मंडलस्थ रवीचे भजन कर ६९. सूत ह्मणतात— याप्रमाणे कथा ऐकून ते देव सूर्यकथामय पद्यांनीं सूर्यास ज्येष्ठमासीं प्रेमानें संतुष्ट करिते झाले. तेव्हा तो सूर्य त्याच्या पुढे आला व प्रसन्न होऊन त्यास ह्मणाला " हे देवहो, भयकर कलीमध्यें माझा अश उत्पन्न होईल ७०. तो निंबादित्य या नावानें प्रसिद्ध होऊन देवाचें कार्य करील. " असें बोलून व आपल्या देहातून भूलोकीं तेज उत्पन्न करून त्यास त्या नगरातील गोविंदशर्म्याच्या गृहीं जाण्याविषयीं प्रेरणा करिता झाला. तो बालक हरिभक्त, साधूची सेवा करणारा व दय युक्त होता ७१-७३. तो नित्य हरिपूजन करीत असे. तो सोळा वर्षांच्या वयाचा झाल्यावर एकदा वैष्णव त्या तोतादरीमध्ये भुकेनें व्याकुळ होऊन आले; व ते उत्कृष्ट पुरुष त्या बालकास ह्मणाले " जोंपर्यंत सूर्य आकाशामध्ये आहे तोपर्यंत आह्मास भोजन घाल " ७४,७५. हे ऐकून व " ठीक आहे " असें ह्मणून त्यानें त्यास भोजन दिले. पण भगवान् सूर्य अस्ताचलास गेला ७६ व एक मुहूर्त काल टळला. तेव्हा पुनरपि सूर्यास बोलावून त्यास निंबवृक्षाच्या उंचीवर आणून दाखविले ७७. तेव्हा ते सर्व वैष्णव " साधु साधु " असें ह्मणून त्याचा सत्कार करिते झाले. त्या वेळेपासून तो बालक निंबादित्य या नावानें भूलोकीं प्रसिद्ध झाला ७८. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकीं चतुर्थखंडाचा कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

सूत ह्मणतातः—हे इंद्रा, पूर्वी त्रेतायुगात शक्रशर्मा ह्मणून एक ब्राह्मण अयोध्येमध्यें झाला. तो महात्मा देवपूजनामध्यें तत्पर असे १. ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा तो ब्राह्मण यजुर्वेदमय मंत्राच्या योगानें अश्विनीकुमार, रुद्र, वसु व सूर्य याचे पृथक् पृथक् पूजन करून त्या देवास हव्यानीं प्रतिदिनीं तृप्त करीत असे. त्यामुळें प्रसन्न झालेले ते क्षुद्र गणांनी युक्त असलेले तेहेतीस देव त्यास दुर्लभ मनोरथही सुलभ करून देते झाले. तेव्हा दहा सहस्र वर्षेपर्यंत जरारहित व उपद्रवरहित राहून व नंतर शरीर सोडून तो सूर्य झाला. तदनंतर एक लक्ष वर्षे त्याने त्या मंडलात अधिकार चाल-

ब्रह्मलोकं ययौ विप्रः सर्वदेवप्रसादतः । अष्टवर्षसहस्राणि दिव्यानि पदमुत्तमम् ६ विलोक्य मण्डले प्राप्तं तं सूर्यं जपपूजनैः । इति श्रुत्वा तु वचनं महेन्द्रः सुरसंयुतः ७ आषाढे भास्करं देवं पूजयामास नग्नधीः । आषाढपूर्णिमायां च स देवो जगतीतले ८ प्रत्यक्षमभवत्तत्र सुरानाह शृणुध्वं तत् । वृन्दावने महारम्ये जनिष्यामि कलौ भये ९ स द्विजः सूर्यरूपश्च देवकार्यं करिष्यति । माधवस्य द्विजस्यैव तनयः स भविष्यति १० मधुनामा महाभागो वेदमार्गपरायणः । सूत उवाच ॥ इत्युक्त्वा भगवान्सूर्यो देवकार्यार्थमुद्यतः ११ स्वाङ्गात्तु तेज उत्पाद्य वृन्दावनमप्रेषयत् । विमुखान्मधुरालापैर्वशीकृत्य समन्ततः १२ तेभ्यश्च वैष्णवीं शक्तिं प्रददौ भुक्तिमुक्तिदाम् । मध्वाचार्य इति ख्यातः प्रसिद्धोऽभून्महीतले १३ जीव उवाच ॥ द्वापरे च द्विजश्रेष्ठो मेघशर्मा बभूव ह । ज्ञानवान्मतिमान्धर्मी वेदमार्गपरायणः १४ कृषिकृत्यपरे नित्यं तद्धनैश्च दशांशकैः । प्रायच्छ सकलान्देवानर्चयामास भक्तिमान् १५ एकदा पञ्चवर्षन्दे शन्तनौ च महीपतौ । प्रासे तस्य वै देशे अनावृष्टिर्बभूव ह १६ क्रोशमात्रं हि तत्क्षेत्रं पर्जन्यो नैव सिञ्चितम् । धान्यानां द्रोणमात्रश्च भावोऽभूदकमुद्रया १७ मेघशर्मा तदा तत्र धनधान्ययुतोऽभवत् । अन्ये तु पीडिता लोका राजानं शरणं ययुः १८ तदा तु दुःखितो राजा मेघशर्माणमाह्वयत् । द्विजश्रेष्ठ नमस्तुभ्यं गुरुर्भव मम प्रियः १९ अनावृष्टिर्यथा न स्यात्तथा विप्र समादिश । इत्येवं वादिनं भूपं मेघशर्मा वचोऽब्रवीत् २० श्रावणे मासि संप्राप्ते विप्रान्वेदपरायणान् । द्वादशैव समाहूय लक्षमात्रं रवेः स्वयम् २१ जापयित्वा सुमनसा पूर्णिमायां तु तद्व्रती ।

मिला २-५. नंतर तो ब्राह्मण सर्व देवांच्या प्रसादाने ब्रह्मलोकी गेला; व देवांची आठ सहस्र वर्षे ते उत्तम पद पाहून जप व पूजन यांच्या योगाने पुनरपि मंडलांत प्राप्त झालेल्या त्यास सूर्य असे म्हणूं लागले. हे वचन ऐकून देवांसह महेंद्र आषाढामध्ये नग्न बुद्धीने भास्कर देवाचे पूजन करिता झाला. तेव्हा आषाढी पौर्णिमेस तो देव भूलोकी प्रत्यक्ष आला व देवांस म्हणाला " ऐका. घोर कलीमध्ये मी अतिरम्य वृंदावनांत उत्पन्न होईन ६-९. व तो सूर्यरूप द्विज देवांचे कार्य करील. माधव ब्राह्मणाचा तो पुत्र होईल १०. मधुनामक तो उदार द्विज वेदमार्गामध्ये तत्पर असेल." सूत म्हणतात — असें बोलून देवकार्याकरिता तत्पर असलेला भगवान् सूर्य ११ आपल्या अंगांतून तेज उत्पन्न करून वृंदावनास पाठविता झाला. जे धर्मोपासन विमुख झाले होते त्यास मधुर वाणीने सर्व प्रकारें वश करून घेऊन त्यास भोग व मुक्ति देणारी वैष्णवी शक्ति तो देता झाला. तो मध्वाचार्य या नावाने भूलोकी प्रसिद्ध होता १२-१३. गुरु म्हणतात " द्वापरामध्ये मेघशर्मा म्हणून एक श्रेष्ठ ब्राह्मण झाला. तो ज्ञानवान्, बुद्धिमान, धार्मिक व वेदमार्गपरायण होता १४. तो सतत कृषिकर्म करीत असे व त्यामध्ये मिळालेल्या द्रव्याच्या दहाव्या अंशाने प्रत्यही संपूर्ण देवांचे तो भक्तिमान् पुरुष पूजन करीत असे १५. एकदा शंतनु राजा असताना त्याच्या देशामध्ये पांच वर्षे अनावृष्टि झाली १६. पण एक कोसभर लांब असलेल्या त्याच्या क्षेत्रावर मात्र पर्जन्य वर्षाव करीत असे. धान्याच्या एका पायलीस एक मुद्रा इतका भाव चढला. तेव्हा मेघशर्मा तेथे धनधान्यसंपन्न झाला व इतर लोक पीडित होत्साते राजास शरण गेले. तेव्हा दुःखित झालेल्या राजाने मेघशर्म्यास बोलाविलें ' मेघशर्म्या, तुला नमस्कार असो. व हे ब्राह्मणा, ज्याच्या योगाने अनावृष्टि न होईल असा मला उपाय सांग. ' याप्रमाणे बोलणाऱ्या त्या राजास मेघशर्मा म्हणाला १७-२० " श्रावण महिना आला असता बारा वेदपरायण ब्राह्मणांस बोलावून, त्यांच्याकडून सूर्याचा एक सहस्र लक्ष जप करवून, शुद्ध मनाने

सूर्यमन्त्राहुतिर्दद्यौ तद्दशांश हि तद्द्विजैः २१ कारयित्वा विधानेन कृतकृत्यः सुखी भव । इति श्रुत्वा तथा कृत्वा भोजयामास वेदगान् २३ प्रसन्नस्तु तदा सूर्यः पर्जन्यात्मा समन्ततः । भूमिमाच्छाद्य सदिश प्रभूवृष्टिमकारयत् २४ शन्तनुस्तु तदा राजा सूर्यव्रतपरायणः । तद्व्रतेन महापुण्यो बभूव नृपसत्तम. २५ य यं करेण स्पृशति बृद्धा भवति वै युवा । सूर्यदेवप्रभावेन मेधशर्मा तथा ह्यभूत् २६ स वै पञ्चशतायुश्च निर्जरो निरुपद्रव. । त्यक्त्वा प्राणान्विभुत्वा सूर्यलोकमुपागमत् २७ लक्षाब्द भुक्त्वासाद्य ब्रह्मलोक गमिष्यति । इत्येवं वादिनं जीवं पर्जन्यो भगवान्रविः २८ स्वरूप दर्शयामास प्रयाग प्रति चागतः । सुरानाह प्रसन्नात्मा म्लेच्छराज्ये कलौ युगे २९ वृन्दावन समागम्य देवकार्य करोम्यहम् । सूत उवाच ॥ इत्युक्त्वा भगवान्सूर्यो गत्वा वृन्दावन शुभम् ३० श्रीधरो नाम विख्यात पुत्रोऽभूद्वेदशर्मणः । श्रीमद्भागवत शास्त्र समालोक्य विशारद ३१ चकार विदुषामर्थे प्रदीप्त श्रीमतः शुभम् । श्रीमद्भागवत शास्त्र पुराणेभ्यः परि तत्कृतम् ३२ जीव उवाच । पुरा कलौ युगे प्राप्ते प्राशुशर्मा द्विजोऽभवत् । वेदशास्त्ररतो नित्य देवतातिथिपूजक.३३ सत्यवादी महासाधु स्तेयहिंसाविवर्जितः । भिक्षावृत्तिपरो नित्य पुत्रदारपोषकः३४ एकदा पथि भिक्षार्थं गच्छतस्तस्य भूपते । मायाकृत्यकरो धूर्तः कलिस्तत्राक्षिगोचरः ३५ बभूव वाटिकां कृत्वा कलिर्दानमनोहराम् । तमुवाच द्विजो भूत्वा प्रांशुशर्मन्वच शृणु ३६ ममेय वाटिका रम्या तत्र गच्छ सुखी भव । इति विप्रवच. श्रुत्वा वाटिकां तां समागत ३७ कलिस्तु वाटिकामध्ये गत्वा रम्यफलानि च । त्रोटयित्वा ददौ तस्मै भोजनार्थं महाबल ३८

त्याचे व्रत करून व अग्नीमध्ये जपाच्या दशांश प्रमाणाने सूर्यमंत्राहुति त्या ब्राह्मणाकडून यथाविधि देऊन तू कृतकृत्य व सुखी हो. " हे ऐकून व त्याप्रमाणे करून त्या वेदवेत्त्या ब्राह्मणास राजाने भोजन घातले २१–२३. तेव्हा पर्जन्यरूप सूर्य प्रसन्न होऊन व चोहोकडून भूमीस आच्छादित करून तो प्रभु वृष्टि करिता झाला २४. तेव्हा राजा शंतनु सूर्यव्रतामध्ये तत्पर झाला आणि तो नृपश्रेष्ठ त्या व्रताच्या योगाने महापुण्यवान् झाला २५. तो आपल्या हस्ताने ज्याला ज्याला स्पर्श करी तो तो वृद्धही तरुण होत असे. सूर्यदेवाच्या प्रभावाने मेधशर्माही तसाच झाला २६. तो पाचशे वर्षाच्या वयाचा होईपर्यंत निर्जर व निरुपद्रव राहून शेवटी प्राणत्याग केल्यावर स्वत सूर्य होऊन सूर्यलोकास गेला २७ व एक लक्ष वर्षे तेथे राहून तो ब्रह्मलोकी गेला. याप्रमाणे बोलणाऱ्या त्या गुरूस पर्जन्यसंज्ञक भगवान् रवि प्रयागास येऊन स्वरूप दाखविता झाला त्याचे मन प्रसन्न झाले आहे असा तो देवास म्हणाला -- कलियुगामध्ये म्लेच्छराज्य झाले असता २८,२९ वृन्दावनात येऊन मी देवकार्य करीन. सूत म्हणतात:--असें म्हणून भगवान् सूर्य शुभ वृंदावनास जाऊन ३०वेदशर्म्याचा श्रीधरनामक प्रसिद्ध पुत्र झाला. त्या चतुर पुरुषाने श्रीमद्भागवताचे विद्वानाकरिता समालोचन करून ३१ प्रदीप्त, शुभ व श्रीमान् श्रीमद्भागवत शास्त्र सर्व पुराणापेक्षा श्रेष्ठ केले ३२ बृहस्पति म्हणतात -- पूर्वी कलियुग प्राप्त झाले असता प्राशुशर्मा म्हणून ब्राह्मण झाला. तो सतत वेदशास्त्रामध्ये परायण, देव व अतिथि याचा पूजक, सत्यवादी, महासाधु, स्तेय व हिंसा यांनी रहित व नित्य भिक्षा मागून पुत्र व स्त्री याचे पोषण करणारा होता ३३,३४. एकदा, वा राजा, तो भिक्षेकरिता मार्गाने जात असता कपट कृत्ये करणारा धूर्त कलि त्याच्या दृष्टीसमोर आला. तो कलि दानास मनोहर अशी वाटिका करून त्या ब्राह्मणास स्वतः ब्राह्मण होऊन म्हणाला " हे प्राशुशर्मन्, माझे वचन ऐक ३५,३६. ही रम्य वाटिका माझी आहे. तेथे जाऊन तू सुखी हो. " हे ब्राह्मणाचे वचन ऐकून तो त्या बागेमध्ये गेला ३७. तेव्हा महादुष्ट कलि

प्राञ्जलिः प्रणतो भूत्वा प्रांशुशर्माणमब्रवीत् । भक्ष्यश्च विप्र मया सार्द्धं कलिन्दस्य फलं शुभम् ३९ इत्युक्तः स तु तं प्राह विहस्य मधुरस्वरम् । वृक्षे बिभीतके चैव कलिन्दस्य फले तथा ४० कलिः प्राप्तः स्मृतः प्राज्ञैस्तस्मान्नाहं गृह्णाम्यहो । यदि दत्तं फलं भक्त्या त्वयाऽद्य द्विजसेविना ४१ शालग्रामाय वै दत्त्वा प्रसादं तद्ग्रहाम्यहम् । शालग्रामः स्वयं ब्रह्म सच्चिदानन्दविग्रहः ४२ दर्शनात्तस्य चाभक्ष्यो भक्ष्यो भवति निश्चितः । इति श्रुत्वा कलिस्तत्र लज्जितोऽभून्निराशकः ४ द्विजस्तु तत्फलं गृह्य भूनिग्रामुपायथौ । नृपतिस्तत्र चागत्य द्विजमाह प्रसन्नधीः ४४ किं गृहीतं त्वया विप्र दर्शयाशु मम प्रियं कुरु । इति श्रुत्वा प्रांशुशर्मा तत्फलं वत्सपुण्डवत् ४५ गृहीत्वा प्रददौ राज्ञे विस्मितो द्विजसत्तम । तदा तु स कलिर्भूपस्तं विप्रं ताडयं वेतसैः ४६ कारागारे लोहमये कृतवान्न्यायमित्रकः । प्रातःकाले रवौ प्राप्ते प्रांशुशर्मा सुदुःखितः ४७ तुष्टाव भास्करं देवं स्तोत्रैर्ऋग्वेदसंभवैः । तदा प्रसन्नो भगवान्रविः साक्षात्सनातनः ४८ विप्रस्य कर्णयोर्वाक्यमुवाच नभसेरितम् । शृणु विप्र महाभाग कालरूपो हरिः स्वयम् ४९ चतुर्युगं तेन कृतं विश्वपाल्यादिहेतवे । कलिर्विश्वसमूहानां मृत्यवे रचितस्तथा ५० अतो घोरे कलौ प्राप्ते विष्णुमायाविनिर्मितम् । कलिञ्जरं च नगरं तत्रोष्य मुदितो भव ५१ इत्युक्त्वा रक्षणं कृत्वा तस्य विप्रस्य भास्करः । कलिञ्जरे च नगरे प्रेषयामास तं द्विजम् ५२ सपादशतवर्षं च द्विजस्तत्र वसन्रविम् । आराध्य पुत्रपत्नीको रविलोकमुपाययौ ५३ स वै भाद्रपदे मासि सूर्यो भूत्वाऽर्कुताब्दकम् । पश्चाद्ब्रह्मपुर

वाटिकेमध्ये जाऊन व रम्य फळें तोडून त्यास खाण्याकरिता देता झाला ३८. हात जोडून व नम्र होऊन तो प्राशुशर्म्यास ह्मणतो " हे ब्राह्मणा, तूं माझ्यावरोबर हें कलिंदाचे शुभ फळ खा " ३९. त्यानें असें सांगितलें असता तो ब्राह्मण हंसून मधुर स्वरानें बोलणाऱ्या त्या कालीस ह्मणाला – विभ्याच्या वृक्षावर व त्याचप्रमाणें कलिंदाच्या फळांत कलि प्राप्त झाला आहे असें विद्वानांनीं सांगितलें आहे. यास्तव, मी हें घेणार नाही. आतां ब्राह्मणाची सेवा करणाऱ्या तूं हें फळ जर भक्तीनें दिलें असशील तर शालग्रामास समर्पण करून त्याचा प्रसाद मी घेईन. कारण, शालग्राम सच्चिदानंदरूप व स्वत ब्रह्म आहे. त्याच्या दर्शनावरोबर अभक्ष्य पदार्थही निश्चयाने भक्ष्य होतो. हें ऐकून कलि तात्काल लज्जित व निराश झाला ४०–४३. इकडे तो ब्राह्मण तें फळ घेऊन भूमिग्रामास गेला. तेथें ज्याचें मन प्रसन्न आहे असा राजा येऊन त्या ब्राह्मणास ह्मणतो४४" ब्राह्मणा, तू काय घेतलें आहेस तें मला त्वरित दाखीव व माझें प्रिय कर." हें ऐकून प्राशुशर्म्याने तें फळ राजास दिलें व तें पाहून तो उत्तम ब्राह्मण विस्मित झाला तेव्हा या कालिरूपी राजाने त्या ब्राह्मणास वेतानीं ताडन करून लोहमय कारागारामध्यें पाठविलें. प्रात कालीं सूर्योदय झाला असता अतिशय दुःखित झालेला प्रांशुशर्मा४५-४७ ऋग्वेदातील स्तोत्रानीं भास्कराचा स्तुति करूं लागला. तेव्हा साक्षात् सनातन भगवान् रवि प्रसन्न झाला ४८ व त्या विप्राच्या कर्णामध्ये आकाशवाणीरूपाने त्याने असें सांगितलें " हे उदार ब्राह्मणा, ऐक. स्वत हरि कालरूप आहे. त्यानें विश्वाचे रक्षण, उत्पत्ति इत्यादि करण्याकरिता चार युगें केलीं. त्याचप्रमाणे त्याने विश्वसमूहाच्या नाशाकरिता कलि निर्माण केला ४९,५०. यास्तव, घोर कलि प्राप्त झाल्यामुळें विष्णुच्या मायेने निर्माण केलेल्या कलिंजरनगरामध्यें राहून तूं सुखी हो. " असें बोलून व त्या ब्राह्मणाचे रक्षण करून भास्करानें त्या ब्राह्मणास कलिंजरनगरास पाठविलें. नंतर तेथें सव्वाशें वर्षें राहणाऱ्या ब्राह्मणानें आराधन करून पुत्र व पत्नी यासह सूर्यलोकीं गमन केलें. तो भाद्रपद

प्राप्य परमानन्दमाप्तवान् ५४ इति ते कथितं विप्र यथा जीवस्तमब्रवीत्। आगत्य भास्करो देवः पूर्णिमायां तु भाद्रके ५५ अष्टाविंशे कलौ प्राप्ते स्वयं जातः कलिञ्जरे। शिवदत्तस्य तनयो विष्णुशर्मेति विश्रुतः ५६ वेदशास्त्रकलाभिज्ञो वैष्णवो देवपूजकः। चतुर्वर्णान्नरान्विप्र समाहूय हरेर्गृहे ५७ वचनं प्राह धर्मात्मा विष्णुः सर्वेश्वरो हरिः। शृणुतत्कारणं शिष्य विश्वकारणकारकः ५८ भगवान्सच्चिदानन्दश्चतुर्विंशतितत्त्ववान्। देवान्ससर्ज लोकार्थे तस्मात्सर्वेश्वरोऽभवत् ५९ पूर्वं हि सकलान्देवान्पूजयित्वा नरः शुचिः। पश्चाच्च पूजयेद्विष्णुं यथा भूत्वा नृपे पुनः ६० इति श्रुत्वा तु ते सर्वे प्रशस्य बहुशो हि तम्। विष्णुस्वामीति तं नाम्ना कथयञ्जग्मुरुत्सुकाः ६१ इति ते कथितं विप्र विष्णुस्वामी यथाऽभवत्। पुनः शृणु कथां रम्यां बृहस्पतिमुखोद्गताम् ६२ जीव उवाच॥ पुरा चैत्ररथे देशे भगशर्मा द्विजोऽभवत्। स्वर्वेश्यामञ्जुघोषायां मुनिर्मेधाविना भुवि ६३ पितृमातृपरित्यक्तः स बालः श्रद्धयान्वितः। सूर्यमाराधयामास तपसा शतवार्षिकम् ६४ सूर्यमण्डलमध्यस्था सावित्री नाम देवता। सर्वसूर्यस्य जननी कन्या तन्मण्डलस्य वै ६५ प्रसन्ना तपसा तस्य प्रादुर्भूता सनातनी। आश्विने मासि राजानं द्विजं चक्रे च मण्डले ६६ लक्षवर्षसहस्राणि मासि मासि तथाश्विने। प्रकाशं कृतवान्विप्रः पूजितो लोकवासिभिः ६७ तं सूर्यं भज देवेन्द्र स ते कार्यं करिष्यति। इति श्रुत्वाश्विने मासि स रविर्देवपूजनात् ६८ भव्यक्षमगमत्तत्र वचः प्राह सुरान्प्रति। काम्यकुब्जे शुभे देशे वाणीभूषणहायनम् ६९ भवामि सत्य-

---

महिन्यात सूर्य होऊन, तेथें दहा सहस्र वर्षे राहून व ब्रह्मपुरास जाऊन तेथे परमानंदाचा आनंद घेता झाला. हे ब्राह्मणा, गुरूने जसें इंद्रास सांगितलें होतें तसेंच मी तुला सांगितलें. तो भास्करदेव भाद्रपदार्तील पौर्णिमेस येऊन अठ्ठाविसावा कलि लागला असता स्वतः कलिंजरामध्यें शिवदत्ताचा विष्णुशर्मानामक पुत्र झाला ५१-५६. तो वेद, शास्त्रे व कला यांचा जाणता, विष्णुभक्त व देवपूजक होता. हे ब्राह्मणा, चारी वर्णाच्या लोकास हरिमंदिरी बोलावून तो धर्मात्मा विष्णु त्यास म्हणाला " हे शिष्यहो, ऐका. विश्वाच्या कारणास निर्माण करणारा सर्वेश्वर हरि आहे ५७,५८. तो सच्चिदानंदरूप भगवान् चोवीस तत्त्वांनी युक्त होऊन लोकांकरिता देवांस उत्पन्न करिता झाला. यास्तव, तो सर्वेश्वर होय ५९. करिता प्रथम सर्व देवांचे पूजन करून व शुद्ध होऊन नंतर विष्णूचे पूजन करावें. म्हणजे ज्याप्रमाणे सेवक राजाची सेवा करितात त्याप्रमाणे आपणही त्याची सेवा करावी " ६०. हें ऐकून त्या सर्वांनी त्याची बहुत प्रकारे प्रशंसा केली व विष्णुस्वामी असें त्याचें नाव ठेवून त्याच्याविषयीं आनंदानें कथा सांगितल्या. याप्रमाणे हे ब्राह्मणा, विष्णुशर्मा कसा झाला हें मी तुला सांगितलें. बृहस्पतीनें सांगितलेली पुनः दुसरी रम्य कथा ऐक ६१,६२. बृहस्पति म्हणतातः-पूर्वी चैत्ररथ देशामध्यें भगशर्मा म्हणून ब्राह्मण झाला. त्यास मेधावीनामक मुनीने सर्वेश्या जी मंजुघोषा तिच्या ठायीं निर्माण करून मूलोकीं सोडिले ६३. आई व बाप या दोघांनी ज्याचा परित्याग केला आहे असा तो बालक श्रद्धायुक्त होऊन तपश्चर्येच्या योगानें शंभर वर्षे सूर्याची आराधना करिता झाला ६४. तेव्हा सूर्यमंडलामध्ये असणारी सावित्रीनामक देवता जी सर्व सूर्याची जननी व त्या सूर्यमंडलाची कन्या होती ती त्याच्या तपाने प्रसन्न होऊन प्रकट झाली; व त्या सनातनी देवीने आश्विन महिन्यात त्या ब्राह्मणास आपल्या मंडलातील राजा केलें. पुढे लक्षावधि वर्षपर्यंत लोकवासी पुरुषांकडून ज्याची पूजा झाली आहे असा तो ब्राह्मण प्रत्येक महिन्यास व त्याचप्रमाणे आश्विनामध्यें प्रकाश करिता झाला. हे देवेंद्रा, तू त्या सूर्याचें भजन कर म्हणजे तो तुझे कार्य करील. हें ऐकून देवांच्या पूजनाने प्रसन्न झालेला तो रवि आश्विनमहिन्यामध्ये तेथे प्रकट झाला

देवस्य विप्रस्य तनयः शुभः। सूत उवाच ॥ इत्युक्त्वा भगवान्सूर्यो जातः कन्यापुरे शुभे ७०
जित्वा पाषण्डिनो विप्रान्मांसभक्षणतत्परान्। छन्दोग्रन्थं स्वनाम्ना वै कृतवान्देवतप्रियः ७१
मत्स्यमांसाशना विप्रा मृगमेषाजकाशनाः। एकीभय समागम्य चक्रु शास्त्रार्थमुल्बणम् ७२
कलिनाऽधर्ममित्रेण रक्षितास्ते द्विजातयः। त द्विज च पराजित्य मत्स्यकेतु च तद्गृहे ७३ बलाच्च
स्तम्भन चक्रुस्तदा विष्णुप्रियो द्विजः। वैष्णवीं शक्तिमागम्य स्वमुखान्मीनखादितान् ७४
संजीव्य दर्शयामास ते दृष्ट्वा विस्मितास्तदा। शिष्यभूताश्च ते तस्य वैष्णवं मतमागमन् ७५
जीव उवाच ॥ कदाचित्सरयूतीरे देवयाजी द्विजोऽभवत्। सर्वदेवपरो नित्यं वेदपाठपरायणः ७६
तत्सुतस्तु मृतिं प्राप्तो जन्ममात्रे हि दारुणे। तदा तु स द्विजः श्रुत्वा सूर्यदेवमतोषयत् ७७ जिजीव
तत्प्रसादेन दिवस्वान्नाम चाभवत्। षोडशाब्दवपुर्भूत्वा सर्वविद्याविचारदः ७८ अपत्यवान्धर्म-
परः सूर्यव्रतपरायणः। शिवरात्रिदिने प्राप्ते तत्पत्नी भूषणप्रिया ७९ सुशीला नाम विख्याता
पतिसेवार्थमागता। स व्रती रुद्रदेवस्य दृष्ट्वा तां मधुराननाम्८० बलादुगृह्यिता तु निशि लुभुजे
स्मरविह्वलः। मैथुनस्यैव दोषेण तस्य कुष्ठो महानभूत्८१ लिङ्गेन्द्रियं च पतित गुदभ्रष्टो महाङ्ग-
रुक्। केनचिदुपदेशेन रविवारस्य वै व्रतम् ८२ स चक्रे द्वादश प्रेम्णा निराहारो यतेन्द्रियः।
तेन व्रतप्रभावेन सर्वपीडा लय गताः ८३ तदा श्रद्धा रवौ प्राप्ता प्रत्यह स द्विजोत्तमः। आदित्य-
हृदय जप्त्वा कामरूपो द्विजोऽभवत् ८४ नारीभिर्भक्तितः पूर्वं सोऽथ कामिनीयाचितः। ब्रह्मच-
र्यव्रतं कृत्वा ब्रह्मध्यानपरोऽभवत् ८५ शतायुर्ब्राह्मणो भूत्वा ज्ञानवान्रोगवर्जितः। त्यक्त्वा प्राणा-

---

व देवास असें वचन ह्मणाला "मी कान्यकुब्जनामक शुभ देशामध्ये वाणीभूषण या नावाचा सत्यदेव ब्राह्मणाचा पुत्र होतों." सूत ह्मणतात:— असें बोलून तो भगवान् सूर्य शुभ कन्यापुरात निर्माण झाला ६९–७०. मासभक्षण करण्यात तत्पर असलेल्या पाखंडी ब्राह्मणास जिंकून त्यानें आपल्याच नावानें छंदोग्रंथ केला. तो ब्राह्मण देवास प्रिय असे ७१. असो, पुढें मत्स्यमास खाणारे व मृग, मेष आणि अज यास खाणारे ब्राह्मण एक होऊन आले व त्याच्याशीं भयंकर शास्त्रार्थ करूं लागले. अधर्माचा मित्र जो कलि त्यानें त्या ब्राह्मणांचें रक्षण केलें होतें, त्यामुळें त्या ब्राह्मणास जिंकून त्यानीं बलात्कारानें त्याचें स्तभन केलें व त्याच्या गृहीं मासाशन केलें. तेव्हा तो विष्णुभक्त ब्राह्मण वैष्णवी शक्तीच्या आश्रयानें आपल्या मुखानें खालेल्या माशास जीवंत करून दाखविता झाला. ते पाहून ते सर्व तात्काल विस्मित झाले व ते सर्वही त्याचे शिष्य होऊन वैष्णवमतानुयायी बनले ७२-७५. बृहस्पति ह्मणतात, कोणे एके समयीं सरयूतीरीं देवयाजी ह्मणून एक ब्राह्मण होता.तो सर्वदा सर्व देवामध्ये तत्पर व वेदपठनामध्ये परायण असें ७६. त्याचा पुत्र, जन्म होताच भयकर रीतीनें मरण पावला. तेव्हा हे ऐकून त्या ब्राह्मणानें सूर्य देवास संतुष्ट केलें ७७. व त्याच्या प्रसादानें तो पुत्र जीवंत झाला. त्याचें विवस्वान् असें नाव ठेविलें. तो सोळा वर्षांच्या वयाचा झाला असता सर्व विद्येमध्ये निपुण झाला. तो धार्मिक अपत्यवान् सूर्यव्रतामध्ये परायण होता. एकदा शिवरात्रीचा दिन प्राप्त झाला असता सर्व भूषणानीं युक्त व सुशीला या नांवानें प्रसिद्ध असलेली त्याची पत्नी पतिसेवेकरिता आली. तेव्हा तो रुद्रदेवाचें व्रत करणारा ब्राह्मण त्या रमणीय स्त्रीस पाहून कामविह्वल झाला व बलात्कारानें तिला धरून त्यानें रात्रीं तिचा भोग घेतला. तेव्हा मैथुनाच्याच योगाने त्यास मोठा कुष्ठरोग झाला. त्याचें जननेंद्रिय गळून पडलें. गुदा भ्रष्ट झाली व शरीरामध्यें मोठी पीडा होऊं लागली. तेव्हा कोणा एकाच्या उपदेशानें कांहीं आहार न करिता व इंद्रियसंयमन करून त्यानें बारा रविवाराचे व्रत केले. त्या रवीच्या व्रतानें त्याचे सर्व रोग नाहीसे

स्वविर्भूत्वा सूर्यमण्डलमध्यगात् ८६ कार्तिके मासि लक्षाब्द प्रकाशं कृतवान्नभः । तं च मूर्ती महेन्द्र त्वं पूजयाशु सुरैः सह ८७ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा महेन्द्रस्तु मासमात्रं हि भास्करम् । पूजयित्वा विधानेन पूर्णिमायां ददर्श ह ८८ उवाच शक्रं स रविर्देवकार्यं करोम्यहम् । भट्टैर्विद्यामयैर्धूर्तैः सूत्रपाठश्च खण्डितः ८९ धातुपाठोऽन्यथा पठितो भ्रमार्थः स्वरवर्णक । जित्वा ताम्भट्टषण्ढान्वेदमुद्धारयामि भोः ९० इत्युक्त्वा स गतः काश्यां गेहे वै वेदशर्मणः । दीक्षितान्वयभूतस्य नाम्ना कार्यगुणोऽभवत् ९१ द्वादशाब्दवपुर्भूत्वा सर्वशास्त्रविशारदः । शिवमाराधयामास विश्वनाथं शिवाप्रियम् ९२ त्रिवर्षान्ते च भगवांस्तस्मै ज्ञानं महद्ददौ । तस्य ज्ञानप्रभावेन व्यक्तमव्यक्तमत्तमम् ९३ ज्ञातं कार्यगुणेनैव दीक्षितेन तदा हृदि । अव्यक्ते तु यदा बुद्धिः सा विद्या द्वादशाङ्गिनी ९४ व्यक्ताहंकारभूते च बुद्धिर्ज्ञेया बुधैरजा । अविद्या नाम विख्याता षोडशाङ्गस्वरूपिणी ९५ अव्यक्तं तु परं ब्रह्म व्यक्तं शब्दमयं स्मृतम् । अहंकारो लोककरो हि व्यक्ताऽष्टादशाङ्गकः ९६ वृषरूपधरो मुख्यो नन्दियानः स्मृतो बुधैः । शृङ्गाणि तस्य चत्वारि त्रिपादो द्विशिरो वृषः ९७ सप्तहस्तो द्विधा बद्धो नित्यशुद्धो मुखे स्थित । सुबन्तश्च तिङन्तश्च कृदन्तश्चाव्ययस्तथा ९८ द्वौ द्वौ शृङ्गौ च शिरसोर्नन्दियानस्य वै स्मृतौ ।

झाले ७८—८३. तेव्हा त्या उत्तम ब्राह्मणाची सूर्याच्या ठायीं श्रद्धा बसली व तो प्रतिदिनी आदित्यहृदयाचा जप करूं लागला. त्यामुळे तो ब्राह्मण मदनासारखा दिसूं लागला ८४ पूर्वी स्त्रिया ज्याचा तिरस्कार करीत असत त्याचीच आतां कामिनी इच्छा करूं लागल्या. पण हा ब्राह्मण ब्रह्मचर्यव्रत ठेवून ब्रह्मध्यानामध्यें तत्पर झाला. त्या ब्राह्मणाचें शंभर वर्षें आयुष्य झालें आणि तो ज्ञानवान् व रोगरहित विप्र देहत्याग करून सूर्यमंडलामध्ये गेला ८५, ८६ व तो एक लक्ष वर्षेपर्यंत कार्तिकमहिन्यात अंतरिक्षास प्रकाशित करिता झाला. या महेंद्रा, देवासह तूं त्या सूर्याची त्वरित पूजा कर ८७. सूत म्हणतातः— हे ऐकून महेंद्राने एक महिना भास्कराची यथाविधि पूजा केली व पौर्णिमेस त्यास सूर्याचे दर्शन झालें. तेव्हा तो सूर्य इंद्रास म्हणाला " मी देवकार्य करितो. विद्यामय धूर्त भट्टांनी सूत्रपाठाचे खंडन केले. धातुपाठाचे निराळ्याच रीतीनें पठन सुरू केलें आणि स्वर व वर्ण याचा अर्थभ्रंश केला. यास्तव, त्या नास्तिक भट्टांस जिंकून मी वेदाचा उद्धार करिता "८८-९०. असें बोलून तो दीक्षितवंशात उत्पन्न झालेल्या काशींतील वेदशर्म्याच्या घरीं गेला व कार्यगुण या नावानें उत्पन्न झाला. तो बारा वर्षांचा झाला असता सर्व शास्त्रामध्ये निपुण झाला. त्यानें पार्वतीस प्रिय असलेल्या विश्वनाथदेवाची आराधना केली ९१,९२. तीन वर्षांनंतर भगवानाने त्यास मोठे ज्ञान दिले. त्या ज्ञानाच्या प्रभावाने कार्यगुण दीक्षितानें त्यावेळीं हृदयामध्यें व्यक्त व उत्तम अव्यक्त यास जाणलें. ज्यावेळीं अव्यक्तामध्ये बुद्धि तत्पर असते त्यावेळीं ती द्वादश अंगांनी युक्त अशी विद्या होते ९३,९४ व अहंकाररूप व्यक्तामध्ये जेव्हा बुद्धि तत्पर होते तेव्हा ती अजा होते असें शहाण्यांनी समजावें. ती अविद्या या नावाने प्रसिद्ध असून तिचें स्वरूप सोळा अंगांनीं युक्त असते ९५. अव्यक्त परब्रह्म असून व्यक्त शब्दमय ब्रह्म म्हणून म्हटलें आहे. अहंकार लोकांस करणारा व व्यक्त असून त्याची अष्टादश अंगें आहेत ९६. त्यानें वृषरूप धारण केले असून तो मुख्य आहे असे विद्वानांनीं म्हटले आहे. तो नंदिवाहनरूप असून त्यास चार शृंगें, तीन पाद व दोन मस्तकें आहेत. तो वृष आहे ९७. त्यास सात हात असून तो दोन प्रकारे बद्ध झालेला व मुखाचे ठिकाणीं नित्य शुद्ध होऊन राहिला आहे. सुबन्त, तिङन्त, कृदन्त व त्याचप्रमाणें अव्यय, याप्रमाणें त्या नंदिवाहनाचीं प्रत्येक मस्तकावर दोन दोन शृंगें

भूत भव्य भवच्चैव त्रयः पादा हि तस्य वै ९९ रूढिश्च योगरूढिश्च शब्दौ तस्य शिरद्वयम। कर्ता कर्म च करण सप्तदानो विभागक १०० सम्बन्धश्चाधिकारश्च भुजास्तस्य त्रयस्य वै। वाक्य स्वरान्वित ज्ञेयं विभक्त्यन्त पद स्मृतम् १ ताभ्यां बद्धश्च स वृषो नन्दियानाय ते नम। तस्यापरि स्थित नित्यमव्यक्त लिङ्गरूपि यत् २ जातश्च वृषलिङ्गाभ्यां मोऽहकारो हरि स्वयम। नारायण षोडशात्मा बहुमूर्तिरमूर्तिक. ३ इति ज्ञान हृदि प्राप्य तदा सिद्धान्तकोमुदीम। जित्वा भट्टांश्चकाराशु भट्टोजि. प्रथितोऽभवत् ४ जीव उवाच ॥ पुरा काञ्चीपुरे रम्य गणको ब्राह्मणोत्तम। पुरोधा सत्यदत्तस्य राज्ञो वदपरस्य वै ५ एकदा गणको नीमान्सत्यदत्तमुवाच ह। मुहूर्तोऽभिजिदाख्योऽय पुष्यनक्षत्रसयुत ६ हाट कुरु महाराज सांप्रत बहुवस्तुदम। इति श्रुत्वा तथा कृत्वा ढिण्डिमध्वनिना पुरे ७ नगानल्लापयामास तच्छ्रुत्वा सुरोत्तम। अक्रीत यस्य वै वस्तु हाटेऽस्मिन्वैश्यकोविदै ८ मया क्रात च तज्जुष्य सत्यमेतद्वचो मम। इति श्रुत्वा शुद्रजनाश्चक्रुनानाविध वसु ९ वैश्य: सर्व तदा क्रीत महाहाटे हि सोऽभवत्। एकदा लोहकारश्च दारिद्र लोहरूपि यत् १० कृत्वा हाटमुपागम्य शतमुद्रामयाचत। अक्रीत पुरुष राजा ज्ञात्वा लोहदरिद्रकम् ११ क्रीत त शतमुद्राभिर्गृहीत्वा गृहमागमत। कोशागारे तदा राजा स्थापितोऽभूद्दरिद्रक: १२ निर्गत्ये तम उद्भव कर्मा धर्मा च मा तथा। भूपेगृहात्समागत्य पश्यतस्तस्य निर्गता १३ तत्पश्चात्सत्यपुरुषो राजानमिदमब्रवीत्। दरिद्रो

सांगितली आहेत भूत भविष्य व वर्तमान हे त्याचे तीन पाद होत रूढि वरून ठरलेला शब्द व व्युत्पत्ति आणि रूढि यावरून ठरलेला शब्द हींच त्याची दोन मस्तके होत कर्ता, कर्म, करण, सप्रदान, अपादान, सबध व अधिकरण या या वृषाच्या भुजा होत. वाक्य स्वरयुक्त असत असे जाणावे व पद विभक्त्यत असते असे सांगितले आहे ९८-१०१ वाक्य व पद यांच्या योगाने तो वृष बाधलेला आहे तुज नदिरूप वाहनाला नमस्कार असो याप्रमाणे वर्णिलेले नित्य अव्यक्त असे जे लिंगरूपी तत्त्व आहे त्याच्यापासून व या वृषापासून उत्पन्न झालेला जो अहकार तोच स्वत हरि होय. तो नारायण षोडशकली, बहुमूर्ति व मूर्तिशून्य आहे अशा प्रकारचे ज्ञान हृदयामध्ये प्राप्त झाले असता त्याने त्याजवळील भट्टास जिंकून त्यापासून सिद्धान्तकौमुदी केली. त्यामुळे तो भट्टोजी या नावाने प्रसिद्ध झाला २-४ बृहस्पति म्हणतात — पूर्वी रम्य कांचीपुरामध्ये उत्तम गणक (ज्योतिषी) ब्राह्मण होता तो वेदामर्थ तत्पर असणाऱ्या सत्यदत्त राजाचा पुरोहित होता ५ एकदा तो बुद्धिमान गणक सत्यदत्तास म्हणाला " हा पुष्यनक्षत्रयुक्त अभिजित्भजक मुहूर्त आहे ६. यास्तव, हे महाराज, यावेळी पुष्कळ वृस्तु देणारा बाजार भरीव " हे ऐकून व त्याप्रमाणे करून तो राजा नगरामध्ये दवडी फिरवून लोकांस काय आज्ञा करिता झाला ते, हे उत्तम देवा, ते ऐक " या बाजारामध्ये जी वस्तु विकली जाणार नाही तो मी विकत घेतली आहे असे वैश्य पंडितांनी जाणावे हे माझे सत्य वचन आहे. " हे ऐकून शूद्र लोक नानाप्रकारचे पदार्थ करिते झाले ७—९. व ते सर्वही वैश्यांनी विकत घेतले. तो बाजार फार मोठा झाला. एकदा एक लोहार आपले जे लोहरूपी दारिद्र होते ते घेऊन बाजारामध्ये आला व शभर मुद्रा मागू लागला पण त्याचा माल कोणी घेतला नाही, असे जाणून राजाने ते लोहदारिद्र त्याला शभर मुद्रा देऊन घेतले व घरी आल्यावर ते कोशागारामध्ये ठेविले. तात्पर्य, तो राजा दरिद्र आहे असे सिद्ध झाले १०—१२. नतर रात्री अवार पडला असता कर्मी, धर्मा व मा (लक्ष्मी) राजाच्या समक्ष राजाच्या गृहातून निघून

यत्र भूपाल तत्र कर्मा नरो न हि १४ कर्मणा रहितो धर्मो भूतले न स्थिरो भवेत् ।
धर्मेण रहिता लक्ष्मीर्न शोभति कदाचन १५ अहं लक्ष्म्या विहीनश्च न तिष्ठामि
कदाचन । इत्युक्त्वा गन्तुमिच्छन्तं गृहीत्वा करयोर्नृपः १६ नम्रभूतो वचः प्राह
शृणु सत्य मम प्रियम् । न त्याज्यो हि मया देव भवान्किं गन्तुमर्हति १७ इति
श्रुत्वा तु वचनं सत्यदेवो गृहेऽगमत् । तत्पश्चाच्च स्वयं लक्ष्मीस्तद्गेहे गन्तुमुद्यता १८ तामाह
भूपतिर्धीरो देवि त्वं चञ्चला सदा । अचला भव भो मातस्तर्हि मन्मन्दिरं व्रज १९ इति श्रुत्वा
वरं दत्त्वा नृपगेहं ययौ तदा । पुरोधसं तु गणकं समाहूय नृपोत्तमः १२० लक्षस्वर्णं ददौ तस्मै
कथित्वा सर्वकारणम् । पुत्रजन्मनि काले तु समायातं तेन वै धनम् २१ व्ययं कृत्वा धनं सर्वं
पोषयामास बालकम् । पूषा नाम ततो जातो मार्गशीर्षे शुभे दिने २२ स तु सूर्यं समाराध्य
ज्योतिःशास्त्रपरः सुतः । सूर्ये तु मोक्षमापन्नेदेवदेवप्रसादतः २३ तस्माच्च मार्गमासे वै रविं
देवेन्द्र पूजय । सूत उवाच ॥ देवेन्द्रपूजनात्सूर्यस्तदागम्य तदा स्वयम् २४ पूषा नाम वचो
देवानुवाच मधुरस्वरम् । उज्जयिन्यामहं देवा यास्ये रुद्रप्रणोदितः २५ नाम्ना च मिहिराचार्यो
ज्योतिश्शास्त्रप्रवर्तकः । इत्युक्त्वा भगवान्पूषा पुत्रो जातो द्विजस्य वै २६ मूलगण्डान्तविषयेऽभि-
जिद्योगेऽशुभङ्करे । जातमात्रं च तं पुत्रं पिता काष्ठकटाहके २७ धृत्वा क्षिप्त्वा नदीमध्ये
निशीथे समवाहयत् । समुद्रमगमत्पुत्रो राक्षसीभिश्च रक्षितः २८ लङ्कामागम्य तत्रैव ज्योतिःशा-
स्त्रमधीतवान् । जातकं फलितं चैव मूकप्रश्नं तथादितः २९ पठित्वा राक्षसेन्द्रं च बिभीषणमुपा-
गमत् । भक्तराज नमस्तुभ्यं बिभीषण हरिप्रिय १३० आहृतो राक्षसीभिश्च त्वामहं शरणं गत ।

चालल्या. त्याच्या मागोमाग येऊन सत्यपुरुषही राजास असे म्हणाला " जेथें राजा दरिद्री आहे तेथ कर्मा पुरुष रहात नाही १४,१४. कर्मावाचून भूलोकीं धर्म स्थिर होत नाहीं. धर्मावाचून लक्ष्मी कधींही शोभत नाही १९ व लक्ष्मीवाचून मीही कधी रहात नाही" असे बोलून जाण्याची इच्छा करणाऱ्या त्या सत्यपुरुषास दोन्हीं हातानी धरून व नम्र होऊन राजा म्हणाला " हे सत्यदेव, माझे प्रिय वचन ऐक. हे देवा, मी तुला सोडीत नाही. मग तूं जाण्यास कसा समर्थ होशील ? " १६,१७. हें त्याचे वचन ऐकून सत्य-देव त्याच्या गृहात गेला. तेव्हा त्याच्या मागोमाग स्वत. लक्ष्मीही त्याच्या गृहात जाण्यास तयार झाली १८. तेव्हा तो धीर राजा तिला म्हणतो " देवि, तूं स्वत. चंचल आहेस. यास्तव हे माते, तूं जर अचल होत असशील तर माझ्या मंदिरात जा" १९. हें ऐकून वर देऊन ती राजगृहामध्ये गेली. तेव्हा त्या उत्तम राजाने त्या गणकास बोलावून २० व त्यास एक लक्ष सुवर्ण देऊन सर्व वृत्तात सांगितला. त्याला पुत्राच्या जन्मकाळीच हे धन मिळाले २१. तेव्हा त्या सर्व धनाचा व्यय करून त्याने त्या बालकास पोशिले. त्यामुळें मार्गशीर्षातील शुभ दिवशीं तो पूषानामक बालक निर्माण झाला २२. पुढें सूर्याची आराधना करून तो पुत्र ज्योतिषशास्त्रामध्ये निष्णात झाला व देवाधिदेवाच्या प्रसादामुळे त्याचा सूर्यामध्ये मोक्ष झाला २३. तेव्हा बा देवेंद्रा, तूं मार्गशीर्षात सूर्याचे पूजन कर. सूत म्हणतात:— देवेंद्राच्या पूजनामुळे पूषानामक सूर्य त्यावेळीं स्वत: येऊन देवास मधुर स्वरानें म्हणाला " हे देवहो, मी उज्जयिनीमध्ये रुद्रपशूच्या गृही जातो २४,२५ व मिहिराचार्य या नावाने ज्योतिषशास्त्राचा प्रवर्तक होतों. " असे बोलून भगवान् पूषा त्या ब्राह्मणाचा पुत्र झाला. तो मूलगंडातामध्यें व अशुभ करणाऱ्या अभिजिद्योगावर उत्पन्न झाल्यामुळें पित्याने त्यास जन्मतःच काष्ठाच्या कढईत घालून रात्रीं नदीमध्यें सोडून दिले. तो पुत्र वाहत समुद्रामध्ये गेला. तेव्हा राक्षसींनीं त्याचे रक्षण केलें २६-२८. पुढें लंके-मध्यें येऊन त्यानें तेथे वेदशास्त्राचें अध्ययन केलें. जातक, फलित व त्याचप्रमाणें मूकप्रश्न पढिल्यापासून

इति श्रुत्वा च स नृपो वैष्णवं द्विजमुत्तमम् ३१ मत्वा समेषयामास यत्र तज्जन्मभूमिका। म्लेच्छैर्विनाशितं यत्तु वेदाङ्गं ज्योतिषां गतिः। पुनरुद्धरितं तेन त्रिधाभूतं सनातनम् १३२ [४२४०] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये मध्वाचार्यश्रीधराचार्यविष्णुस्वामिबाणभूषणभट्टोजिदीक्षितवराहमिहिराचार्योत्पत्तिवर्णनं नामाष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

सूत उवाच ॥ इत्युक्त्वा भगवाञ्छीघ्रः सूर्यमाहात्म्यमुत्तमम्। प्रयागे तु पुनर्देवानुवाच वचसां पतिः १ प्रतिष्ठाननगरे रम्ये सूर्यो जातो हरात्पुरा। पुरा त्रेतायुगान्ते च तच्छृणुष्व सुरोत्तम २ त्रेतान्ते सिंहलद्वीपे परीक्षितनृपोऽभवत्। वेदधर्मपरो नित्यं देवतातिथिपूजकः ३ कन्या भानुमती तस्य सूर्यव्रतपरायणा। भक्तिभावेन सविता प्रत्यहं तद्गृहे स्वयम् ४ तया कृतं शुभं भक्ष्यं मध्याह्ने भुक्तवान्प्रभुः। रविवारे कदाचित्सा नलिनीसागरं प्रति ५ स्नानार्थमागता कन्या तदा नारद आगतः। दृष्ट्वा मनोरमां बालामेकाकीं जलमध्यगाम् ६ गृहीत्वा वसनं तस्या वचनं प्राह निर्भयः। पाणिं गृहाण मे सुभ्रु त्वद्दृष्ट्या वशमागतः ७ इत्युक्तवन्तं तु मुनिं कुमारी नम्रकन्धरा। उवाच शृणु देवर्षे कन्याऽहं त्व सुतप्रद ८ भवान्देवाङ्गनाभिश्च प्रार्थितः स्वर्गमण्डले। क्व च वै मनका रम्भा क्वाहं मनुजयोनिजा ९ नवद्वारेषु देहोऽस्मिन्दुर्गन्धाः संस्थिताः सदा। नैव देवाङ्गनाङ्गे वै तस्मात्तुभ्यं नमो नमः १० इति श्रुत्वा वचस्तस्या लज्जितं नारदस्तदा। महादेवमुपागम्य चाब्रवीत्सर्वकारणम् ११

शिकून तो राक्षसश्रेष्ठ बिभीषणाकडे आला. 'हे भक्तराज, तुला नमस्कार असो. हे बिभीषणा, तू हरीस प्रिय आहेस २९,३०. राक्षसांनी मला आणिले. मी तुला शरण आलो आहे.' हे ऐकून तो राजा हा उत्तम वैष्णव ब्राह्मण आहे ३१ असे समजून जेथे त्याची जन्मभूमि होती तेथें त्यास पाठविता झाला. तेव्हा ज्या " ज्योतिषां गतिः " या नावाच्या वेदांगाचा म्लेच्छांनी नाश केला होता त्या त्रिविध सनातन ज्योतिषाचा त्याने पुनः उद्धार केला १३२. याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वातील कलियुगीय इतिहाससमुच्चयाचा मध्वाचार्य, श्रीधराचार्य, विष्णुस्वामी, बाणभूषण, भट्टोजीदीक्षित व वराहमिहिर यांच्या उत्पत्तीविषयी आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥

सूत म्हणतात — असें बोलून जीवसंज्ञक भगवान् बृहस्पति प्रयागामध्ये देवास पुनरपि सूर्याचे उत्तम माहात्म्य सांगते झाले १. हे उत्तम देवा, पूर्वी त्रेतायुगाचे शेवटी शंकराच्या आज्ञेने रम्य प्रतिष्ठाननगरामध्ये सूर्य उत्पन्न झाला. ती कथा तू ऐक २. त्रेतायुगाच्या शेवटी सिंहलद्वीपामध्ये परीक्षित राजा झाला. तो वेदधर्मामध्ये परायण व देवता आणि अतिथि यांची सतत पूजा करणारा होता ३. त्याची भानुमति म्हणून सूर्यव्रतामध्ये तत्पर असलेली एक कन्या होती. तिच्या भक्तिभावामुळें स्वत. सूर्य प्रीतिदानी गृही येऊन मध्याह्नसमयीं तो प्रभु तिने कलेले शुभ भक्ष्य अन्न खात असे. एकदा रविवारी ती कन्या स्नान करण्याकरिता नलिनीसागरास गेली असता त्यावेळी नारद तेथे आला व त्या जलामध्ये उतरलेल्या एकट्या मनोरम बालेस पाहून तो निर्भय नारद तिचे वस्त्र धरून तिला म्हणाला " हे सुंदरि, माझे पाणिग्रहण कर. तुला पाहिल्यामुळें मी तुझ्या अधीन झालो आहे. " असें बोलणाऱ्या त्या मुनीस जिचे मस्तक नम्र झाले आहे अशी ती कुमारी म्हणाली " हे देवर्षे, एक. मी कन्या आहे व तूं सुत देणारा आहेस ४-८. स्वर्गलोकी देवांगना तुझी प्रार्थना करीत असतात. मेनका, रंभा इत्यादि देवकन्या कोठें व मनुष्ययोनीमध्ये उत्पन्न झालेली मी कोठे ? ९. नऊ द्वारांनी युक्त असलेल्या या शरीरामध्ये सर्वथा दुर्गंध भरलेले आहेत; पण ते देवांगनाच्या शरीरामध्ये नसतात. यास्तव, तुला

कुष्ठिभूतं मुनिं दृष्ट्वा शङ्करो लोकशंकरः । तुष्टाव भास्करं देवं तदा प्रादुरभूत्प्रभुः ११ नारदस्य शुभं देहं कृत्वा शिवमुवाच ह । आज्ञां देहि महादेव तवार्शां पूरयाम्यहम् १३ इत्युक्त स शिवः प्राह द्विजो भूत्वा भवान्भुवि । गृहाण नृपते. कन्यां रविणा तु तथा कृतम् १४ सविता भानुमत्या च सार्धं कृत्वा तपोऽन्वहम् । सूर्यलोकं पुनः प्राप्तस्स पौषे च प्रकाशकृत् १५ तं भजाशु महेन्द्र त्व देवकार्यं प्रसाधय । सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्य महेन्द्रश्च सुरैस्सह १६ सवितारं पौषमासे तुष्टाव शुभपूजनैः । तदा प्रसन्नो भगवान्देवानाह शुभ वचः १७ अह काश्यां भवाम्यद्य नाम्ना धन्वन्तरिः स्वयम् । रोगैश्च पीडितांल्लोकान्कलिना निर्मितैर्भुवि १८ शमयिष्यामि तत्रेष्य देवकार्यं भविष्यति । इत्युक्त्वा भगवान्सूर्यः काशीनगरमागतः १९ कल्पदत्तस्य विप्रस्य पुत्रो भूत्वा महीतले । सुश्रुत राजपुत्र च विप्रवृद्धसमन्वितम् २० शिष्य कृत्वा प्रसन्नात्मा कल्पवेदमचीकरत् । रोगैश्च क्षयितं देह काल्पमेतत्स्मृतं बुधैः २१ तस्य ज्ञान च तन्त्रेऽस्मिन्कल्पवेदमतः स्मृतम् । धन्वन्तरिस्स भगवान्प्रसिद्धोऽभूत्कलौ युगे २२ यस्य दर्शनमात्रेण रोगा नश्यन्ति तत्क्षणात् । सुश्रुतः कल्पवेद तं धन्वन्तरिविनिर्मितम् २३ पठित्वा च शताध्याय सोऽश्रुत तन्त्रमाकरोत् । बृहस्पतिरुवाच ॥ पुरा पम्पापुरे रम्ये हली नाम्ना द्विजोऽभवत् २४ चतुष्षष्टिकलाभिज्ञो रविपूजनतत्परः । त्यक्त्वा प्रतिग्रह वृत्तिं कारुवृत्तिं महीतवान् २५ कृत्वा वस्त्रकल लौह तथा चित्रकल तथा । धातुमूर्तिकल चैव सर्वकारकलं तथा२६ अविक्रियन्कारकोऽभून्मुद्रापञ्चसहस्रया । कल एको मासमात्र काले तेनैव निर्मितः २७ तद्धनेन

नमस्कार असो " . हें तिचे वचन ऐकून नारद तत्काल लज्जित झाला व महादेवाकडे येऊन ते सर्व वर्तमान त्याने सांगितले १०,११. तेव्हा लोकाचे कल्याण करणारा शंकर तो मुनि कुष्ठरोगी झाला आहे असे पाहून भास्कर देवाची स्तुति करिता झाला. तेव्हा तो प्रभु प्रकट झाला १२. व नारदाचा देह सुंदर करून तो शंकरास ह्मणाला " हे महादेवा, मला आज्ञा कर, ह्मणजे मी तुझी इच्छा पूर्ण करितो " १३. असें बोलणाऱ्या त्या सूर्यास शंकर ह्मणतो " तूं भूलोकीं ब्राह्मण होऊन राजाच्या कन्येचें ग्रहण कर. " तेव्हा रवीने त्याप्रमाणें केलें १४. सूर्य भानुमतीसह प्रतिदिनी तप करून पुनरपि सूर्यलोकी आला व पौष महिन्यात प्रकाश करूं लागला १५. बा महेंद्रा, तूं त्वरित त्या देवाचे भजन कर व देवकार्य सिद्ध करून घे. सूत ह्मणतात -- याप्रमाणे गुरूचे वाक्य ऐकून महेंद्र देवासहवर्तमान शुभ पूजनाच्या योगानें सूर्यास संतुष्ट करिता झाला. तेव्हा तो भगवान् प्रसन्न होऊन देवास असें शुभ वचन बोलला. ' मी आता काशीमध्यें धन्वंतरि या नावानें स्वत. उत्पन्न होतो. कलीनें भूलोकीं निर्माण केलेल्या रोगानी पीडित झालेल्या लोकाच्या व्याधि मी तेथे राहून नाहींशा करीन ह्मणजे देवाचे कार्य होईल. ' असे बोलून भगवान् सूर्य काशीनगरास आला १६-१९. व भूलोकीं कल्पदत्त ब्राह्मणाचा पुत्र होऊन त्याने सुश्रुतनामक राजपुत्रास वृद्ध ब्राह्मणासहवर्तमान शिष्य करून ज्याचे मन प्रसन्न झालें आहे अशा त्यानें कल्पवेद रचिला. रोगाने क्षीण झालेल्या देहास काल्प असें विद्वानानी ह्मटलेलें आहे २०,२१ व त्याचे ज्ञान या तंत्रामध्यें असल्यामुळें यास कल्पवेद असें नाव दिलें. तो भगवान् धन्वंतरि कलियुगामध्ये प्रसिद्ध झाला २२. ज्याच्या केवल दर्शनाने रोग तात्काल नष्ट होतात त्या धन्वंतरीनें निर्माण केलेल्या कल्पवेदाचें सुश्रुताने पठन करून शंभर अध्याय अश्रुत तंत्र स्वत. केलें. बृहस्पति ह्मणतात.-पूर्वी रम्य पंपानगरामध्ये हलीनामक एक ब्राह्मण होता. तो चौसष्ट कलाचा ज्ञाता असून रविपूजनामध्यें तत्पर असे. त्याने प्रतिग्रहवृत्ति सोडून कारागिरी पतकरिली२३-२६. त्याने वस्त्र विणण्याची लोखंडी कळ केली; त्याचप्रमाणें चित्राची कळ केली, धातूंच्या मूर्तीची कळ केली.

सर्वं देव यज्ञैर्माघे हि सोऽर्चयत् । विश्वकर्मा रविः साक्षान्माघमासे प्रकाशकः २८ हलिनो बहुलैर्यज्ञैस्सन्तुष्टः प्रत्यहं प्रभुः । पद्मासरोवरे रम्ये निर्मितं स्तम्भ उत्तमं २९ ज्योतीरूपं महाराम्यस्तत्र प्राप्तो रविः स्वयम् । मध्याह्ने हलिना दत्त भोजन दैवतप्रियम् ३० भुक्त्वा स प्रत्यहं स्वामी मासि दिवाकरः । त्रैलोक्यभावनां चक्रे सर्वदेवमयो हरिः ३१ सहस्रायुर्द्विजो भूत्वा त्यक्त्वा प्राणान्रवि. स्वयम् । भूत्वा मण्डलमध्यास्थ माघमासमतोषयत् ३२ त सूर्यं भज देवेन्द्र स ते कार्यं करिष्यति । सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं वासवो देवतैस्सह ३३ सूर्यमाराधयामास विश्वकर्माणमुत्तमम् । तदा प्रसन्नो भगवांस्त्वष्टा तुष्टिकरो जनान् ३४ सुरानाह वचो रम्य शृणुध्व सुरसत्तमा. । विल्वग्रामे वङ्गदेशे सभवामि निरुक्तकृत् ३५ जयदेव इति ख्यातः कवीनां हि शिरोमणिः । इत्युक्त्वा भगवान्सूर्यो वङ्गदेशमुपायथौ ३६ गेहे कन्दुकिनो जातो ब्राह्मणस्य महीतले । स पञ्चाब्दबपुर्भूत्वा पितृमातृपरायणः ३७ द्वादशाब्द महत्सेवा तत्र तेन तयोः कृता । मृतिमन्तौ च पितरौ प्रेतकृत्येन तर्पितौ ३८ जयदेवेन तौ नाकं मयाश्राद्धे हि जग्मतुः । जयदेवस्तदा विप्रो भूत्वा वैराग्यवान्भुवि ३९ तत्र स्थाने महारम्ये वने वासमकारयत् । त्रिविंशाब्दे ततो प्राप्ते कनचिन्मधुरानना ४० ब्राह्मणेन शुभा कन्या जगन्नाथाय चार्पिता । अर्चावसाने भगवाननिरुद्धस्सनातनः ४१ दारुब्रह्ममयः साक्षादाह तं स्वेन वै वचः । शृणु त्वं भोः सत्यव्रत जयदेवो वपुर्मम ४२ पद्मावतीं सुतां तस्मै निवेदय ममाज्ञया ४३ इत्युक्तस्स द्विज-

---

तात्पर्य, सर्व प्रकारच्या कारागिरीची त्याने यत्र केली व पाच सहस्र मुद्रेला एकेक कळ तो कारागीर विकीत असे. एका महिन्यामध्ये एक कळ तो तयार करी व त्या द्रव्यानें माघ महिन्यामध्ये यज्ञान्या योगानें सूर्य देवाचें पूजन करीत असे. तेव्हा माघ मासामध्ये प्रकाशित होणारा तो साक्षात् प्रभु विश्वकर्मा सूर्य २७, २८. त्या हली ब्राह्मणाच्या पुष्कळ यज्ञानीं संतुष्ट होऊन रम्य पेपा सरोवरामध्ये निर्माण केलेल्या उत्तम स्तंभावर महारम्य व ज्योति रूपानें स्वतः प्रतिदिनीं येऊन मध्याह्नसमयीं हलीने दिलेलें व देवतांस प्रिय असलेलें भोजन खाऊन तो स्वामी प्रतिदिनीं परत जात असे. याप्रमाणे प्रत्येक महिन्यातील दिवाकर करी. पुढे त्याने त्रैलोक्याची भावना केली व सर्वदेवमय हरि आहे असे तो समजला २९-३१. तेव्हा तो ब्राह्मण हजार वर्षे जीवत राहून व पुढे प्राणत्याग केल्यावर स्वत. रवि होऊन व रविमंडलामध्ये राहून माघमासी सर्वास आनदित करिता झाला. बा इद्रा तू त्या सूर्याचें भजन कर. तो तुझे कार्य करील. सूत ह्मणतातः— हें गुरूचें वाक्य ऐकून देवतासह इद्र विश्वकर्मानामक उत्तम सूर्याची आराधना करिता झाला, तेव्हा लोकाचा संताप करणारा भगवान् त्वष्टा प्रसन्न झाला ३२-३४व तो देवास असें रम्य वचन ह्मणाला, हे उत्तम देव हो, ऐका. वंगदेशांतील बिल्वग्रामी मीं निरुक्तकार होतों ३५. मी जयदेव या नावाने प्रसिद्ध असलेला कवीचा शिरोमणी होईन असे बोलून तो भगवान् सूर्य भूलोकच्या वंगदेशांतील कंदुकी ब्राह्मणाच्या घरीं निर्माण झाला. तो पाच वर्षाच्या वयाचा झाला असता पिता व माता याच्या सेवेमध्ये तत्पर झाला ३६, ३७. त्याने त्या उभयताची बारा वर्षेपर्यंत महत्सेवा केली व नंतर ती दोघेंही मृत झालीं असता प्रेतकृत्यानें त्यानें त्यास तृप्त केले ३८. जयदेवाने गयाश्राद्ध केले असता तीं स्वर्गलोकीं गेलीं. तेव्हा जयदेव ब्राह्मण भूलोकीं वैराग्यसंपन्न झाला ३९. तो तेथील महारम्य वनामध्येंच राहूं लागला. त्यास तीस वर्षे झालीं असता कोणी एका ब्राह्मणाने आपली शुभ व सुंदर कन्या जगन्नाथास अर्पिली. तेव्हा पूजेच्या शेवटी तो सनातन काष्ठब्रह्ममय अनिरुद्ध भगवान् त्यास साक्षात् आपल्या मुखाने असे ह्मणाला " हे सत्यव्रता, तू ऐक.

स्तूर्णं दृष्ट्वा वैरागरूपिणम् । तत्र स्थाप्य निजां कन्यां स्वगेहाय मुदा ययौ ४४ सा तु पद्मावती कन्या मत्वा तं सुन्दरं पतिम् । तत्सेवां सा मुदा युक्ता चकार बहुवर्षकम् ४५ निरुक्तं वैदिक चाङ्गं कृतवान्स समाधिना । वर्णागमो गवेन्द्रादौ सिंहे वर्णविपर्ययः ४६ षोडशादौ विकारश्च वर्णनाशः पृषोदरे । वर्णविकारनाशाभ्यां धातोरतिशयेन यः ४७ योगस्तदुच्यते प्राज्ञैर्मयूरभ्रमरादिषु । एव पञ्चविधान्येव निरुक्तानि स्मृतानि वै ४८ शूद्रैश्च नागवंशीयैर्भ्रंशितानि कलौ युगे । जित्वा प्राकृतभाषायाः कर्तॄन्मूढान्कलिप्रियान् ४९ शुद्ध हि पाणिनि. शास्त्रं चकार सुरहेतवे । एकदा तु कलिर्धूर्तोहृदिस्थश्चौरकर्मणाम् ५० नृपदत्तं द्विजस्यैव लुण्ठयित्वा धनं बहु । पद्मावतीं सतीं मत्वा त्यक्त्वा तां वै गतः स्वय ५१ हस्तपादौ द्विजस्यैव कलिश्चोरैः समाच्छिनत् । सदा तु दुःखिता देवी गर्तमध्ये स्थितं पतिम् ५२ निष्कास्य बहुधालप्य पीडय हस्तेन चाहरत् । एकस्मिन्दिवसे राजा मृगयार्थमुपागत ५३ अहस्तपादं च मुनिं जयदेवं ददर्श ह । स पृष्टस्तेन तत्रैव कृत केन तवेदृशम् ५४ स होवाच महाराज हस्तपादविहीनकः । कर्मणाऽहमिह प्राप्तो न केनापि कृतं खलम् ५५ इति श्रुत्वा धर्मपालो नृपतिस्त द्विजोत्तमम् । सपत्नीकं च शिबिकामारोप्य स्वगृह ययौ ५६ तस्य दीक्षां नृप प्राप्य धर्मशालामकारयत् । कदाचिद्वैष्णवा भूतास्ते चौराः कलिनिर्मिताः ५७ धर्मपालगृह प्राप्य राजानमिदमब्रुवन् । वय हि शास्त्रनिपुणास्तव गेहमुपागताः ५८ अस्माभिर्निर्मितं भोज्यं स्वयं विष्णुः शिलामयः । भुनक्ति

जयदेव ही माझीच आकृति आहे ४०,४२. यास्तव, तू माझ्या आज्ञेने ही पद्मावती कन्या त्यास अर्पण कर. ४३. याप्रमाणें देवानें ज्यास सांगितले आहे, असा तो ब्राह्मण लागलाच त्या विरक्त जयदेवास पाहून व त्याच्याजवळ आपली कन्या ठेवून आपल्या गृहीं आनंदानें गेला ४४. इकडे ती पद्मावती कन्या त्या सुंदर पतिविषयी मनामध्ये आदर बाळगून मोठ्या आनंदानें त्याची पुष्कळ वर्षें सेवा करीत राहिली. त्याने एकाग्र मनानें निरुक्तसंज्ञक अंग केले. गवेंद्रादिकात वर्णागम, सिंहामध्यें वर्णविपर्यय, षोडशादिकामध्ये विकार, पृषोदरामध्ये वर्णनाश आणि वर्णविकार व नाश यान्या योगाने धातूचा जो अतिशय योग होतो तो मयूरभ्रमरादिकामध्ये प्राज्ञांनी सांगितला आहे. तात्पर्य याप्रमाणे पाच प्रकारचीं निरुक्ताची अंगें सांगितली आहेत ४५-४८. पण कलियुगामध्यें नागवंशामध्ये उत्पन्न झालेल्या शूद्रानी त्यास अपभ्रष्ट करून सोडिले होते तेव्हा प्राकृत भाषा करणाऱ्या व कलिप्रिय अशा त्या मूढास जिंकून त्यानें देवाकरिता पाणिनीचे शास्त्र शुद्ध केले. एकदा चौर्य कर्म करणाऱ्याच्या हृदयामध्यें असणारा धूर्त कलि राजाने दिलेलें त्या ब्राह्मणाचे पुष्कळ धन लुटवून व पद्मावती साध्वी आहे असे मानून व तिला सोडून तो स्वतः गेला ४९-५१. पण कलीने त्या ब्राह्मणाचे हात व पाय चोराकडून तोडविले व त्यास गर्तेत टाकिलें; तेव्हा दुःखित झालेल्या त्या देवीनें गर्तेमध्यें पडलेल्या आपल्या पतीस वर काढून व पुष्कळ विलाप करून आणि त्यास हाताने धरून घरीं आणिले. एके दिवशीं राजा मृगयेकरितां तेथे आला व जयदेव मुनि हस्तपादहीन आहे असें त्यानें पाहिले. तेव्हा राजानें त्यास विचारिले " तुझी ही अशी अवस्था कोणी केली ? " त्यावर तो ह्मणाला, " महाराज, मी सांप्रतकालीं कर्मामुळें हस्तपादहीन झालों आहे. मला कोणीही अपकार केला नाहीं. हे ऐकून तो धर्मपाल राजा त्या उत्तम ब्राह्मणास पत्नीसह शिबिकेंत घालून आपल्या घरीं आला. स्वमंदिरीं आल्यावर त्याची दीक्षा घेऊन धर्मशाळा करविता झाला. एकदा कलीनें निर्माण केलेले ते चोर वैष्णव होऊन धर्मपालाच्या घरीं आले व त्यास असे ह्मणाले. " आह्मी शास्त्रामध्यें निपुण

प्रगृह्य प्रीत्या तत्पश्य नृपसत्तम ५९ इत्युक्त्वा कलिभक्तास्ते विष्णुरूपं चतुर्भुजम् । नृपाय दर्शयामासुर्भुक्तवन्तं स्वमायया ६० विस्मितो धर्मपालश्च जयदेवमुवाच ह । गुरो मद्भवने प्राप्ता वैष्णवा विष्णुतत्पराः ६१ दृष्टवन्तो हरिं साक्षात्तस्मात्त्वं शीघ्रमाव्रज । इति श्रुत्वा द्विजः प्राप्तो विस्मितोऽभूत्तथा नृपः ६२ तदा तु त द्हि पाखण्डा भूपमूचुर्विहस्य ते । असौ विप्रश्च नृपतेर्गौडदेशे निवासिनः ६३ सूदो भक्ष्यकरस्तस्य कदाचिद्धनलोभतः । गरल मिश्रितं भक्ष्ये तेन पाखण्डरूपिणा ६४ ज्ञात्वा राजा तु त विप्रं शूलमध्ये ह्यरोपयत् । एतस्मिन्नन्तरे राजन्वयं तत्र समागताः ६५ आगस्कृतं द्विजं मत्वा दत्त्वा ज्ञानान्यनेकशः । शूलात्तं हि समुत्तीर्य हस्तौ पादौ नृपोऽच्छिनत् ६६ अस्माक शिष्यभूतो हि राजाऽस्माभिः प्रबोधितः । इत्युक्तमात्रे वचने दुःखिता भूश्च दीर्यिता ६७ चौरॉस्तान्सा हि पाताले चकार सुररक्षितान् । जयदवस्तथाभूतान्दृष्ट्वा चौरान्रुरोद ह ६८ क्रन्दमाने द्विजे तस्मिन्हस्ताद्यौ प्रकृतिं गतौ । विस्मित नृपतिं तत्र सर्वं हेतुमवर्णयत् ६९ श्रुत्वा राजा प्रसन्नात्मा जयदेवमुखे द्रवम् । गीतगोविन्दमेवाशु पठित्वा मोक्षमागमत् ७० इति ते कथित विप्र जयदेवो यथाऽभवत् । कृष्णचैतन्यचरितं यथा जात शृणुष्व तत् ७१ [४६११] इति श्रीभविष्य महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये धन्वन्तरिसुश्रुतजयदवसमुत्पत्तिवर्णनो नाम नवमाऽध्यायः ॥ ९ ॥

जीव उवाच ॥ विष्णुशर्मा पुरा कश्चिद्वेदपारगः । सर्वदेवमय विष्णु पूजयित्वा प्रसन्नधीः १ अन्यैस्सुरैश्च सपूज्यो बभूव हरिपूजनात् । भिक्षावृत्तिपरो नित्यं पत्नीमान्पुत्रवर्जितः २

असलेले विद्वान तुझ्या गृहीं आलों आहों ५२,५८. आह्मी केलेले अन्न स्वतः शिलामय विष्णु प्रतिदिनीं भक्षण करितो. तें हे उत्तम राजा, तूं पहा ५९. असें बोलून ते कलीचे भक्त आपल्या मायेनें चतुर्भुज विष्णु भोजन करीत आहे असें राजास दाखविते झाले ६०; तेव्हा आश्चर्यचकित झालेला धर्मपाल जयदेवास ह्मणाला " हे गुरो, विष्णूच्या भक्तिमध्यें तत्पर असलेले वैष्णव माझ्या घरी आले आहेत त्यानीं मला साक्षात्कार दाखविला यास्तव तू त्वरित ये. " हें ऐकून विस्मित झालेला तो ब्राह्मण तेथें आला. राजाही विस्मित झाला होता ६१,६२. तेव्हा ते नास्तिक हंसून राजास ह्मणाले " हे राजा, हा ब्राह्मण गौड देशामध्यें राहणाऱ्या राजाचा स्वयंपाक करणारा आचारी होता. एकदा धनलोभानें या नास्तिकानें राजाच्या भोजनामध्यें विष घातलें पण ते राजास समजल्यावर त्यानें त्या ब्राह्मणास सुळावर चढविलें, इतक्यात बा राजा, आह्मी तेथें येऊन पोचलों ६३-६५. तो द्विज अपराधी आहे असें जाणून आह्मी त्यास अनेक प्रकारें उपदेश केला तेव्हा त्या राजानें ब्राह्मणास शूलावरून उतरविले व हात पाय तोडविलें ६६. तो राजा आमचा शिष्य. असल्यामुळें आह्मीं त्यास बोध केला. इतक जों ते बोलत आहेत तोच दुःखित झालेली भूमी भंगली व तिनें त्या कलीने रक्षिलेल्या चोरास पाताळात नेलें. तेव्हा त्या चोराची अशी अवस्था झाली आहे हें पाहून जयदेव रडूं लागला ६७. पण तो ब्राह्मण रडूं लागला असता त्याचे हात व पाय पुनः पूर्वीप्रमाणें झाले.तें पाहून राजा आश्चर्यचकित झाला व त्यास जयदेवानें खरा वृत्तान्त सांगितला ६८,६९. तें ऐकून ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा तो राजा जयदेवाच्या मुखातून निघालेलें गीतगोविंद पढून मुक्त झाला ७०. हे ब्राह्मणा, जयदेव कसा झाला हें मी तुला सांगितलें. आतां कृष्णचैतन्याचें चारित्र तूं ऐक. ह्याप्रमाणें श्रीभविष्यपुराणातील चतुर्युग० प्रतिसर्ग० कलियु०चतुर्थखंडातील धन्वंतरी,, सुश्रुत व जयदेव याच्या उत्पत्तीविषयीं नववा अध्याय समाप्त झाला. ॥ ९ ॥

बृहस्पती ह्मणतातः— पूर्वी विष्णुशर्मा ह्मणून कोणी एक वेदपारगत ब्राह्मण झाला. ज्याची बुद्धि

कदाचित्तस्य गेहे वै व्रती कश्चित्समागतः । द्विजपत्नीं तदैकाकीं भक्तिनम्रां दरिद्रिणीम् ३ दृष्ट्वोवाच महाभागः पारसाढ्यो दयापरः । अनेन पारसेनैव लोहधातुश्च काञ्चनम् ४ भवेत्तस्मान्महासाध्वि त्रिदिनान्तं गृहाण तम् । तावदह सरयू स्नात्वा यास्यामि तेऽन्तिकं मुदा ५ इत्युक्त्वा स ययौ विप्रो ब्राह्मणी बहुकाञ्चनम् । कृत्वा लक्ष्मीं समाप्तवासीद्विष्णुशर्मा तदाऽगमत् ६ बहुस्वर्णयुतां पत्नीं दृष्ट्वोवाच हरिप्रिय । गच्छ नारि मदाघूर्ण यत्र वै रसिको जनः ७ अहं विष्णुपरो दीनश्चौरभीतः सदैव हि । मधुमत्तां कथं त्वां वै गृहीतुं भुवि च क्षमः ८ इति श्रुत्वा वचो घोरं पतिभीता पतिव्रता । सस्वर्णं पारसं तस्मै दत्त्वा सेवापराऽभवत् ९ द्विजोऽपि घघरामध्ये तद्द्रव्यं बलतोऽक्षिपत् । त्रिदिनान्ते च स यतिस्तत्रागत्य मुदान्वितः १० उवाच ब्राह्मणीं दीनां स्वर्णं किं न कृतं त्वया । साह भो मत्पतिश्शुद्धो गृहीत्वा पारसं रुषा ११ घघरायां च चिक्षेप ततोऽहं भक्तितत्परा । निर्लोहो वर्तते विप्रस्ततःप्रभृति हे गुरो १२ इति श्रुत्वा तु वचनं स यतिर्विस्मयान्वितः । स्थित्वा दिनान्ते तं विप्रमुवाच बहु भर्त्सयन् १३ दरिद्रो भिक्षुकश्चास्ति भवान्दैवेन मोहितः । देहि मे पारसं शीघ्रं नो चत्प्राणांस्त्यजाम्यहम् १४ इत्युक्तवन्तं यतिनं विष्णुशर्मा तदाऽब्रवीत् । गच्छ त्वं घघराकूले तत्र वै पारसस्तव १५ इत्युक्त्वा यतिना सार्द्धं गृहीत्वा कण्टकान्बहून् । यतिने दर्शयामास पारसानिव कण्टकान् १६ तदा तु स यती विप्रं नत्वा प्रोवाच वक्रधीः । मया वै द्वादशाब्दान्तं सम्यगाराधितः शिवः १५ ततः प्राप्तं शुभं रत्नं

प्रसन्न आहे असा तो विप्र सर्व देवमय विष्णूची पूजा करीत असे, हरिपूजनामुळें तो अन्य देवास पूज्य झाला. तो नित्य भिक्षावृत्तीवर राहत असे, त्यास पत्नी होती, पण पुत्र नव्हता १, २. एकदा त्याच्या गृहीं कोणी एक यति आला व तेथे दरिद्री पण भक्तीनें नम्र अशी एकटी ब्राह्मणपत्नीच आहे असें पाहून ज्याच्याजवळ परिस आहे व जो दयाळू आहे असा तो महाभाग तिला ह्मणाला, " हे महासाध्वी, ह्या परिसाच्या योगाने लोखंड नाण्याची एक धातु सुवर्ण होते. यास्तव, तूं यास तीन दिवस आपल्या जवळ घे. तोंपर्यंत मी शरयूचे स्नान करून तुझ्या येथें आनंदानें येईन " ३–५. असें बोलून तो ब्राह्मण गेला. इकडे तो ब्राह्मणी पुष्कळ सुवर्ण करून लक्ष्मीनें संपन्न झाली. इतक्यात विष्णुशर्मा आला ६. व पुष्कळ सुवर्णानें युक्त असलेल्या पत्नीस पाहून तो हरिप्रिय ब्राह्मण ह्मणाला " हे मदोन्मत्त स्त्रिये, ज्याठिकाणी रसिकजन असतील तेथें तू जा ७. मी विष्णुभक्त, दीन व चोरास सर्वदा भ्यालेला आहें. तेव्हा तुज मदोन्मत्त स्त्रीचा स्वीकार करण्यास मी कसा समर्थ होईन. " हे घोर वचन ऐकून पतीस भ्यालेली ती पतिव्रता सुवर्णासह तो परिस त्यास देऊन त्याच्या सेवेमध्यें तत्पर झाली ८,९. तो ब्राह्मणही तें द्रव्य घेऊन जोराने घघरानदींत फेकून देता झाला. तीन दिवसानीं तो यति तेथें आनंदानें आला व त्या दीन ब्राह्मणीस ह्मणाला ' तूं सुवर्ण का केलें नाहींस ? ' ' माझा पति शुद्ध आहे. त्यानें रागानें परिस घेऊन घघरेंत फेकून दिला. नंतर मी त्याच्या सेवेमध्ये तत्पर आहें. व हे गुरो तो विप्र तेव्हापासून लोहशून्य आहे. " हें वचन ऐकून तो यति आश्चर्यचकित झाला व सायंकालपर्यंत तेथें राहून त्या ब्राह्मणाची पुष्कळ निंदा करीत तो ह्मणाला १०-१३. " तूं दैवानें मोहित झाला आहेस व त्यामुळे दरिद्री व भिक्षा मागत आहेस. माझा परिस त्वरित दे नाहींपेक्षा मी प्राण सोडीन " १४. असें बोलणाऱ्या त्या यतीस विष्णुशर्मा ह्मणाला " तू घघरेच्या तीरीं जा. तेथें तुझा परिस आहे १५. असें बोलून तो यतीबरोबर गेला आणि हातांमध्यें पुष्कळ खडे घेऊन ते सर्वही खडे परिसासारखेच आहेत असें त्यानें यतीस दाखविलें १६. तेव्हा ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो यति

तत्त्वदर्शनेन वै । पारसं बहुधा प्राप्तं मया लोभात्मना द्विज १८ इत्याभाष्य शुभं ज्ञानं प्राप्तो मोक्षमवाप्तवान् । विष्णुशर्मा सहस्राब्दमुषित्वा जगतीतले १९ सूर्यमाराध्य विधिवद्विष्णोर्मोक्षमवाप्तवान् ।स द्विजो वैष्णवं तेजो धृत्वा वै मासि फाल्गुने २०त्रैलोक्यमतपत्स्वामी देवकार्यपरायणः । सूत उवाच॥ इत्युक्त्वा भगवान्गीवः पुनः प्राह शचीपतिम्२१ फाल्गुने मासि तं सूर्यं समाराध्य सुखी भव। इत्युक्तो गुरुणा देवो ध्यात्वा सर्वमयं हरिम्२२ पूजनैर्बहुधाकारैर्देवदेवमपूजयत्। तदा प्रसन्नो भगवान्समभवः सूर्यमण्डलात् २३ चतुर्भुजो हि रक्ताङ्गो यथा यज्ञस्तथैव स । पश्यतां सर्वदेवानां शक्रदेहमुपागमत् २४ तत्तेजसा तदा शक्रः स्वान्तर्लीय स्वक वपुः । अयोनिस्स द्विजो भूत्वा शची देवी तथैव सा २५ तदा तौ मिथुनीभूतौ वैष्णवाग्निप्रपीडितौ । सक्तस्तरं रमतुर्गङ्गाकूले महावने २६ गर्भं धत्ते तदा देवी शची तु द्विजरूपिणी । भाद्रशुक्ले गुरौ वारे द्वादश्यां ब्राह्मम ण्डले २७ प्रादुरासीत्स्वयं विष्णुर्भूत्वा सर्वकलां हरिः । चतुर्भुजश्च रक्ताङ्गो रविकुम्भसमप्रभ २८ तदा रुद्रश्च वसवो विश्वेदेवा मरुद्गणाः । साध्याश्च भास्वराः सिद्धास्तुष्टुवुस्तं सनातनम् २९ देवा ऊचुः॥ कुलिशध्वजपद्मगदाङ्कुशाभं चरण तव नाथ महाभरणम् । रमण मुनिभिर्विधिशभुयुतं प्रणमाम वय भवभीतिहरम् ३० दरचक्रगदाम्बुजमानधरः सुरशत्रुकठोरशरीरहरः । सचराचरलोकभरश्चपलासुरनाशकरस्सुरकार्यकरः ३१ नमस्ते शचीनन्दनानन्दकारिन्महापा-

---

ब्राह्मणास नमस्कार करून ह्मणाला " मी बारा वर्षे शंकराची उत्तमप्रकारें आराधना केली. व त्यामुळें मला हें शुभ रत्न प्राप्त झालें. पण हे द्विजा, आज तुझ्या दर्शनानेंच मज लोभ्याला अनेक परिस मिळाले " १७,१८. असें बोलून त्यास शुभज्ञान प्राप्त झालें व तो मुक्त झाला. इकडे विष्णुशर्मा भूलोकीं सहस्रवर्षे राहून सूर्याची यथाविधि आराधना करून विष्णूमध्ये आपणास मुक्ति मिळविता झाला. तो ब्राह्मण वैष्णव तेज धारण करून फाल्गुन महिन्यामध्ये त्रैलोक्यास प्रकाशित करिता झाला; व याप्रमाणें तो देवकार्यामध्यें परायण झाला. सूत ह्मणतात — असे सांगून भगवान् गुरु पुनः शचीपतीस ह्मणतात " फाल्गुन महिन्यात त्या सूर्याची आराधना करून तूं सुखी हो. याप्रमाणें गुरुनें सांगितलें असता तो देव सर्वमय विष्णूचें ध्यान करिता झाला१९ २३.नानाप्रकारच्या उच्चारानीं त्यानें देवाधिदेवाची पूजा केली. तेव्हा तो भगवान् प्रसन्न झाला व सूर्यमंडलातून निघून इंद्राच्या शरीराजवळ सर्व देवाच्या समक्ष तो आला, तो ज्याप्रमाणें विष्णु असतो त्याचप्रमाणें चतुर्भुज व रक्तवर्ण होऊन आला होता २४. तेव्हां त्याच्या तेजामुळें इंद्र आपल शरीर अंतर्लीन करून व तो अयोनिसंभव ब्राह्मण होऊन राहिला, त्याचप्रमाणें शचीदेवीही ब्राह्मणी झाली, तेव्हा वैष्णवाग्नीनें अतिशय पीडित झालेली तीं दोघें ग्राम्य धर्मामध्ये आसक्त झालीं. गंगेच्या तीरावरील महावनामध्ये एक वर्षपर्यंत तीं रममाण झालीं २५,२६. नतर ब्राह्मणरूपिणी शची देवीनें गर्भ धारण केला. भाद्रपद शुक्ल द्वादशीस गुरुवारीं ब्राह्ममंडली स्वतः विष्णु सर्व कला धारण करून प्रगट झाला. ज्याला चार भुजा आहेत, अग रक्तवर्ण आहे व सूर्यमंडलाप्रमाणें ज्याची शोभा आहे असा तो हरि प्रगट झाला असता रुद्र, वसु, विश्वेदेव, मरुद्गण, साध्य, भास्कर व सिद्ध त्या सनातन देवाची स्तुति करू लागले २७–२९. देव ह्मणाले " हे नाथ वज्र, ध्वज, कमल, गदा व अंकुश या चिन्हानीं चिन्हित झालेलें; अमूल्य आभरणानीं युक्त, मुनीच्या क्रीडेचें स्थान, ब्रह्मदेव व शंकर यानी युक्त व संसारभीतीचें हरण करणारे असे जें तुझे चरणकमल आहे त्यास आम्ही वंदन करितो ३०. तू शंख चक्र, गदा व पद्म यास धारण करणारा, देवशत्रूच्या कठोर शरीराचें हरण करणारा, चराचर लोकाचे पोषण करणारा, चपल दैत्याचें कंदन करणारा व देवाचें कार्य करणारा

वसन्तापदुर्लापहारिन् । सुरारीञ्जिहत्याशु लोकाँश्च धारिन्स्वभक्ताघजाताङ्कोटिप्रहारिन् ३२ त्वयाऽहं स्वरूपेण सत्यं प्रपाल्य त्वया यज्ञरूपेण वेद परेऽयः । स वै यज्ञरूपो भवाँल्लोकधारि-ञ्छचीनन्दन. शक्रशर्मप्रसक्तः ३३ अनर्पितचरोऽचिरात्करुणयाऽवतीर्णः कलौ समर्पयितुमुन्म-तोज्ज्वलरसां स्वभक्तिश्रियम् । हरे पुनरसुन्दरद्युतिकदम्बसन्दीपितः सदा स्फुरतु नो हृदयकन्दरे शचीनन्दनः ३४ विसर्जति नरान्भवान्करुणया प्रपाल्य क्षितौ निवेदयितुमुद्भवः परात्पर स्वकीयं पदम् । कलौ दितिजसंभवाधिव्यथाब्धिसुरमग्नगान्समुद्धर महाप्रभो कृष्णचैतन्य शचीसुत ३५. माधुर्यैर्मधुभिस्सुगन्धवदनं स्वर्णाम्बुजानां वनं कारुण्यामृतनिर्झरैरुपचितः सत्प्रेमहेमाचल । भक्ताम्भोधरधारिणी विजयिनी निष्कम्पसत्सावली । देवी नः कुलदैवतं विजयते चैतन्यकृष्णो हरिः ३६ देवारातिजनैरधर्मजनितैस्सपीडितेयं मही संकुच्याशु कलौ कलेवरमिद बीजाय हा वर्तते । त्वन्नाशैव सुरारयो विदलिताः पातालगाः पीडिताः । म्लेच्छाधर्मपराः सुरेशनमनास्तस्मै नमो व्यापिने ३७ सूत उवाच ॥ इत्यभिष्टूय पुरुषं यज्ञेशं च शचीपतिम् । बृहस्पतिमुपागम्य देवा वचनमब्रुवन् ३८ वयं रुद्रा महाभाग इमे च वसवोऽश्विनौ । केन केनांशकेनैव जनिष्यामो महीतले ३९ तत्सर्वं कृपया देव वक्तुमर्हति नो भवान् । बृहस्पतिरुवाच ॥ अह व कथयि-ष्यामि शृणुध्व सुरसत्तमाः ४० पुरा पूर्वभवे चासीन्मृगव्याधो द्विजाधमः । धनुर्बाणधरो नित्यं

आहेस ३१. हे शचीनदना, हे जनास आनंद देणाऱ्या व हे महत्पाप, संताप व दुष्कीर्ति यांचें हरण करणाऱ्या देवा तुला नमस्कार असो. देवाच्या शत्रूस मारून तात्काल लोकांस धारण करणाऱ्या व आपल्या भक्ताच्या कोटयवधि पापाचा नाश करणाऱ्या देवा, तुला नमस्कार असो ३२. तूं अहंस्वरूपानें सत्याचें रक्षण करावेंस. यज्ञरूपानें तुला वेदाचें पूर्णपणें रक्षण कर्तव्य आहे. हे लोकास धारण करणाऱ्या देवा, तूं यज्ञरूप आहेस. तूं आज शचीपुत्र होऊन इद्रास सुख देण्यास तत्पर झाला आहेस ३३. ज्याला चरूचें अर्पण कोणीही केलें नाहीं असाही तूं तात्काल करुणेनें या कलियुगामध्यें अति उन्नत व उज्वल रसयुक्त अशी आपली भक्तिरूपी संपत्ति समर्पण करण्याकरितां अवतीर्ण झाला आहेस. बा हरे पुनरपि पापरूपी अमंगल तेजसमहास जाळून टाकून तूं व शचीनंदन आमच्या बुद्धिरूपी गुहेमध्यें सदा व्यक्त होऊन रहा ३४. तूं नरास उत्पन्न करितोस व त्यास करु-णेनें भूलोकीं उत्तम प्रकारें पोसून आपलें अव्यक्ताहूनही श्रेष्ठ असणारें पद निवेदन करण्याकरिता तूं अवतार घेतोस. हे शचीपुत्रा, हे कृष्णचैतन्या, हे महाप्रभो, हे इद्रपुत्रा, मानसिक व्यथारूपी समुद्रामध्यें निमग्न झालेल्या आमचा उद्धार कर ३५. मधुर मधूच्या योगाने तुझ मुख सुगंधयुक्त झाले आहे व त्यामुळें सुवर्णकमलाचें तें जणु वनच झाल आहे(असा भास होतो.) वारुण्यामृताच्या झऱ्यानीं युक्त असलेला हा प्रेमाचा जणुं मेरुपर्वत आहे भक्तरूपी मेघास धारण करणारी कंपरहित सात वळ्यानीं युक्त असलेली विजयिनी देवी आमचें कुलदैवत आहे. त्या कृष्णचैतन्य हरीचा जयजयकार असो ३६. देवाच्या अधार्मिक शत्रूजनानीं या पृथ्वीस अतिशय पीडिले आहे. कलियुगामध्ये हें शरीर सकुचित करून ती खरोखर बीजाकरिताच राहिली आहे. देवा तुझ्या नावानेंच देवाचे शत्रु विदीर्ण होऊन पातालात जातात. व म्लेच्छपीडित होत्साते तुज देवाधिदेवास नमन करणारे व धर्मपरायण होतात. त्या तुज व्यापी देवास नमस्कार असो ३७. सूत ह्मणतातः—याप्रमाणे यज्ञाचा ईश जो पुरुष त्याची स्तुति करून सर्व देव इंद्र व बृहस्पति याचेकडे आले व ह्मणाले ३८; "हे महाभागा, आह्मी रुद्र, हे वसु व हे अश्विनी-कुमार यानीं भूलोकीं कोणत्या कोणत्या अंशानीं जन्म घ्यावा तें, बा देवा, आह्मास कृपा करून सांग. बृहस्पति ह्मणतातः— हे उत्तम देवहो, मी तुह्मांस कथा सागतों ऐका ३९,४०. पूर्वजन्मामध्यें एक

मार्गे विप्रविहिंसकः ४१ हत्वा द्विजान्महामूढस्तेषां यज्ञोपवीतकम् । गृहीत्वा हेलया दुष्टो महाक्रोशस्तु तत्कृतः ४२ ब्राह्मणस्य च यद्द्रव्यं सर्वोपममनुत्तमम् । मधुरं क्षत्रियस्यैव वैश्यस्यान्नसमं स्मृतम् ४३ शूद्रस्य वस्तु रुधिरमिति ज्ञात्वा द्विजाधमः । स जघान त्रिवर्णांश्च ब्राह्मणान्बहुलान्खलः ४४ द्विजनाशमसुरास्तर्वे भयभीतास्समन्ततः । परमेष्ठिनमागम्य कथाश्चक्रुश्च कारणम् ४५ श्रुत्वा च दुःखितो ब्रह्मा सप्तर्षीन्प्राह लोककृत् । उद्देशं कुरु तत्रैव गत्वा तस्य द्विजोत्तम ४६ इति श्रुत्वा मरीचिस्तु वसिष्ठादिभिरन्वितः । तत्र गत्वा स्थितास्सर्वे मृगव्याधस्य वै वने ४ - मृगव्याधस्तु तान्दृष्ट्वा धनुर्बाणधरो बली । उवाच वचनं घोरं हनिष्येऽहं च नोऽद्य वै ४८ मरीच्याद्या विहस्याहुः किमर्थं हन्तुमुद्यतः । कुलार्थं वात्मनोऽर्थं वा शीघ्रं वद महाबल ४९ इत्युक्तस्तान्द्विजः प्राह कुलार्थं चात्मनो हितं । हन्मि युष्मान्धनैर्युक्तान्ब्राह्मणाँश्च विशेषतः ५० श्रुत्वा तमाहुस्ते विप्रा गच्छ शीघ्रं धनुर्धर । विप्रहत्या कृतं पापं भुञ्जीयात्को विचारय ५१ इति श्रुत्वा तु घोरात्मा तेषां दृष्ट्वा सुनिर्मलः । गत्वा वराजनानाह भूरिपापो मयाऽर्जितः ५२ तत्पाप च भवद्भिश्च गृहणीयं धनं यथा । ते तु श्रुत्वा द्विजं प्राहुन वयं पापभोजनाः५३ साक्षीयं भूमिरचला साक्षी सूर्योऽयमुत्तम । इति श्रुत्वा मृगव्याधो मुनीनाह कृताञ्जलिः५४ यथा पापं क्षय याति तथा मां ज्ञातुमर्हथ । इत्युक्तास्तेन ते प्राहुः शृणु त्वं मन्त्रमुत्तमम् ५५

अधम द्विज मृगव्याध झाला. तो सतत धनुष्यबाण धारण करून मार्गामध्ये ब्राह्मणांची हिंसा करीत असे ४१. ब्राह्मणास मारून व त्यांचें यज्ञोपवीत घेऊन लीलेने तो दुष्ट व मूर्ख मोठा आक्रोश करीत असे ४२. ब्राह्मणांचें जें द्रव्य तें अत्युत्तम अमृताप्रमाणें, क्षत्रियांचें मधुर व वैश्यांचें अन्नासारखें असतें म्हणून सांगितले आहे व शूद्राची वस्तु रक्तासारखी आहे असें जाणून तो अधम व खल विप्र पुष्कळ ब्राह्मणास व तीन वर्णांच्या लोकास मारीत असे. ब्राह्मणांच्या नाशामुळे सर्व देव सर्व प्रकारें भयभीत झाले व ब्रह्मदेवाकडे जाऊन त्यानीं तें वर्तमान त्यास सांगितले ४३–४५. तें ऐकून दुःखित झालेला ब्रह्मा लोकामध्ये असलेल्या सप्तऋषींस म्हणाला " हे श्रेष्ठ द्विजहो तुम्ही तो जेथे आहे तेथें त्याच्याकडे जाऊन हे काम करा. हे ऐकून मरीचि वसिष्ठादिकासह तेथे गेला व ते सर्वही मृगव्याधाच्या वनात राहिले४६,४४७.इकडे धनुष्यबाण धारण करणारा व बलाढ्य मृगव्याध त्यास पाहून " मी आज तुम्हास मारणार " असें घोर वचन म्हणाला. तेव्हां मरीच्यादिक हसून म्हणाले " तूं आम्हास कशाकरिता मारण्यास तयार झाला आहेस ? कुलाकरिता किंवा आपल्या करिता हें, हे महाबलवाना आम्हास त्वरित सांग. " याप्रमाणें त्यानीं प्रश्न केला असता ब्राह्मण म्हणतो " कुलाकरिता व माझ्या हिताकरिता धनानें युक्त व विशेषतः ब्राह्मण असलेल्या तुम्हास मी मारतो ४८-५०. ते ऐकून ऋषि त्यास म्हणाले " हे धनुर्धर ब्राह्मणा आमच्या बरोबर त्वरित चल व ब्राह्मणाची हत्या केल्याने लागणारें पाप कोण भोगणार हें तूं विचार. हें ऐकून त्याच्या दृष्टीनें जो अति निर्मल झाला आहे असा तो धूर्त पुरुष आपल्या वंशांतील लोकास म्हणाला ' मी आजपर्यंत पुष्कळ पापसंचय केला ५१, ५२. तेव्हा धनाप्रमाणें त्या पापाचाही तुम्ही स्वीकार करावा. ' ते ऐकून ते त्या ब्राह्मणास म्हणाले आम्ही तुझे पाप भोगणार नाहीं ५३. तुझ्या पापास ही अचला पृथ्वी व हा उत्तम सूर्य साक्षी आहे. ' हें ऐकून मृगव्याध हात जोडून मुनीस म्हणतो ' ज्याच्या योगाने माझें पाप नष्ट होईल असा उपाय मला सांगण्यास तुम्ही योग्य आहा. ' त्यानें याप्रमाणें सांगितलें असता ते म्हणाले, ' तूं उत्तम मंत्र ऐक ५४,५५. रामनाम हाच मंत्र सर्व पापसमूहाचा नाश करणारा आहे असें तूं समज. आम्ही

रामनाम हि तज्ज्ञेय सर्वाघौघविनाशनम् । यावत्त्वत्पार्श्वमायास्तावत्त्व जप चोत्तमम् ५६ इत्युक्त्वा ब गता विप्रास्तीर्थात्तीर्थान्तर प्रति । मरा मरा मरेत्येवं सहस्राब्द जजाप ह ५७ जपप्रभावाद्भवद्वनमुत्पलसङ्कुलम् । तस्थाऽमुत्पलारण्यं प्रसिद्धमभवद्भुवि ५८ ततः समर्षयः प्राप्ता वल्मीकात्त निराकृतम् । दृष्ट्वा शुद्धं तदा विप्रमूचुस्ते विस्मयान्विताः ५९ वल्मीकाच्चिस्मृतो यस्मात्तस्माद्वाल्मीकिरुत्तमम् । तव नाम भवद्दिव त्रिकालज्ञ महामते ६० एवमुक्त्वा युर्लोक स तु रामायणं मुनिः । कल्पाष्टादशयुक्तं हि शतकोटिप्रविस्तरम् ६१ चकार निर्मल पद्य सर्वाघौघविनाशनम् । तत्पश्चात्त शिवो भूत्वा तत्र वासमकारयत् ६२ अद्यापि सस्थितः स्वामी मृगव्याधः सनातनः । शृणुष्व च सुराः सर्वं तच्चरित्रं हरप्रियम् ६३ वैवस्वतेऽन्तरे प्राप्ते चाद्ये सत्ययुगे शुभ । ब्रह्मागत्योत्पलारण्य तत्र यज्ञं चकार ह ६४ तदा सरस्वती देवी नदी भूत्वा समागता । तद्दर्शनात्स्वय ब्रह्मा मुखतो ब्राह्मण शुभम् ६५ बाहुभ्यां क्षत्रिय चैव चोरुभ्या वैश्यमुत्तमम् । पद्भ्यां शूद्र शुभाचार जनयामास वीर्यवान् ६६ द्विजराजस्तथा सोमश्चन्द्रमा नामतो द्विजः । लोके सर्वातपः सूर्यः कश्य वीर्यं हि पाति यः ६७ कश्यपो हि द्वितीयोऽसौ मरीचिस्तु ततोऽभवत् । रत्ननामाकरो यो वै स हि रत्नाकरः स्मृतः६८ लोकान्धरति यो द्रव्यैः स तु धर्मो हि नामतः । गम्भीरश्चास्ति सदृशः कोशो यस्य सरित्पतिः ६९ लोकान्दक्षति यः कृत्यैः स तु दक्ष प्रजापतिः । ब्रह्मणोऽङ्गाच्च ते जातास्तस्माद्वै ब्राह्मणाः स्मृता ७० वर्णधर्मेण ते सर्वे वर्णात्मानश्च वै क्रमात् । दक्षस्य मनसो जाताः कन्याः

पुनरपि जोंपर्यंत तुजजवळ येऊ तोंपर्यंत तू या मंत्राचा जप कर.' असे बोलून ते ब्राह्मण तीर्थोतीर्थी गेले. इकडे त्यानें ' मरा मरा मरा ' असा सहस्र वर्षे जप केला. त्या जपप्रभावामुळें तें वन कमलानीं व्याप्त झालें व त्यामुळें तें स्थान भूलोकीं उत्पलारण्य ह्मणून प्रसिद्ध झालें. नतर ते सप्त ऋषि आले व त्यानीं त्यास त्या वारुळातून बाहेर काढिलें व ब्राह्मण शुद्ध झाला आहे असें पाहून ते विस्मित होऊन त्यास ह्मणाले ५६,५९ ' ज्याअर्थी तू वाल्मिकातून निघाला आहेस त्याअर्थी वाल्मिकि असें तुझे उत्तम नाव प्रसिद्ध होईल. हे महाबलवाना, तूं त्रिकालज्ञ होशील.' असें बोलून ते स्वलोकीं गेले. व त्या मुनीने अष्टदश कल्पयुक्त व शंभर कोटि विस्तृत निर्मल पद्यरूप रामायण रचलें. तें सर्व पापसमूहाचें नाश करणारें आहे. नंतर तो शिवरूप होऊन तेथेंच वास करिता झाला ६०–६२. तो स्वामी सनातन मृगव्याध अजून राहिला आहे. हे देवहो शंकरास प्रिय असलेल्या त्याचे सर्व चरित्र तुम्ही ऐका. ६३. आद्य सत्ययुगातील शुभ वैवस्वत मन्वंतर लागलें असता ब्रह्मा उत्पलारण्यामध्ये येऊन तेथें यज्ञ करितां झाला तेव्हा सरस्वती देवी तेथें नदी होऊन आली. तिच्या दर्शनामुळें ब्रह्मदेवानें मुखापासून पासून शुभ ब्राह्मणास, बाहूपासून क्षत्रियास, माड्यापासून उत्तम वैश्यास व पायापासून शुभाचारसपन्न शूद्रास निर्माण केले ६४–६६. द्विजामध्ये श्रेष्ठ असा जो चद्रमा नामक सोम तोच मुख्य द्विज होय. लोकामध्यें सर्वास प्रकाश देणारा जो सूर्य तोच कश्य ह्मणजे जे वीर्य त्याचें पोषण करीत असतो. यास्तव, हा कश्यप दुसरा होय. ह्याच्यापासून मरीचि झाला. रत्नाचा जो आकर त्यासच रत्नाकर असें ह्मटले आहे. द्रव्याच्या योगानें जो लोकास धारण करितो तोच धर्म या नावाचा देव असून त्याचा गंभीर सागर हाच कोश होय ६७–६९. जो कृत्याच्या योगाने लोकास दक्ष करितो तो दक्षप्रजापति आहे. ते सर्वही ब्रह्मदेवाच्या अगापासून निर्माण झाले. यास्तव त्यास ब्राह्मण असें ह्मटलें आहे ७०. व पुढें क्रमानें वर्णधर्माप्रमाणे वर्णरूप झाले. दक्षाच्या पन्नास मानसिक कन्या

पञ्चशतं ततः ७१ विष्णुमायाप्रभावेन कलाभूताः स्थिता भुवि । तदा तु भगवान्ब्रह्मा सोमा-
याश्विनिमण्डलम् ७२ सप्तविंशद्गणं श्रेष्ठं ददौ लोकविवृद्धये । कश्यपायादितिगणं क्षत्ररूपं
त्रयोदशम् ७३ धर्माय कीर्तिंश्रुतिं ददौ स च महामुनिः । नानाविधानि सृष्टानि चास-
न्वैवस्वतेऽन्तरे ७४ तेषां पातस्त्वथ दक्षोऽभूद्विधेराज्ञया भुवि । तत्र वासः स्वयं दक्षः कृत-
वान्यज्ञतत्परः ७५ सर्वे देवगणा दक्षं नमस्कृत्य चरन्ति हि । भूतनाथो महादेवो न ननाम
कदाचन ७६ तदा क्रुद्धः स्वयं दक्षः शिवभागं न दत्तवान् । मृगव्याध शिवः क्रुद्धो वीरभद्रो
बभूव ह ७७ त्रिशिराश्च त्रिनेत्रश्च त्रिपदस्तत्र चागतः । तेनैव पीडिता देवा मुनयः पितरोऽभ-
वन् ८ तदा वै यज्ञपुरुषो भयभीतः समन्तत । मृगभूतो ययौ तूर्णं दृष्ट्वा व्याधः शिवोऽभ-
वत् ७९ रुद्रव्याधेन स मृगो विभिन्नाङ्गो बभूव ह । तदा तं भगवन्ब्रह्मा तुष्टाव मधुरस्वरैः ८०
सन्तुष्टश्च मृगव्याधो यज्ञं पूर्णमकारयत् । तुलाराशिस्थिते भानौ तं रुद्रं चन्द्रमण्डले ८१ स्थाप-
यित्वा स्वयं ब्रह्मा सप्तविंशदिनात्मके । ययौ सत्यलोकं वै स रुद्रश्चन्द्ररूपवान् ८२ इति श्रुत्वा
वीरभद्रो रुद्रो हर्षितमानसः । स्वांश देहात्समुत्पाद्य द्विजगेहमचोदयत् ८३ विप्रभैरवदत्तस्य गेहे
गत्वा स वै शिवः । तत्पुत्रोऽभूत्कलौ घोरे शंकरो नाम विश्रुतः ८४ स बालश्च गुणी ज्ञानी
ब्रह्मचारी बभूव ह । कृत्वा शाङ्करभाष्यं च शैवमार्गमदर्शयत् ८५ त्रिपुण्ड्रश्चाक्षमाला च मन्त्रं पञ्चा-
क्षरं शुभम् । शैवानां मङ्गलकरं शङ्कराचार्यनिर्मितम् ८६ [४६९७] इति श्रीभविष्ये महापुराणे
प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये कृष्णचैतन्यशंकराचार्यसमुत्प-
त्तिवर्णनो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥

उत्पन्न झाल्या ७१. विष्णुमायेच्या प्रभावानें त्या कलारूपीं होऊन भूलोकीं राहिल्या. तेव्हां भगवान् ब्रह्मदेव सोमास सत्तावीस संख्येने युक्त असलेलें श्रेष्ठ अश्विनीमंडल लोकविवृद्धयर्थ देता झाला. त्यानें कश्यपास क्षत्ररूप तेरा कन्याचा अदितीसमूह दिला व त्या महामुनीनें धर्मास कीर्तिप्रभृति कन्या दिल्या. याप्रमाणें वैवस्वत अंतरामध्यें नानाप्रकारची सृष्टि झाली. तेव्हा भूलोकीं ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें दक्ष त्या सर्वांचा स्वामी झाला. त्या यज्ञतत्प दक्षानें स्वतः तेथें वास केला. सर्व देवगण त्या दक्षास नमस्कार करून व्यवहार करीत होते. पण भूतनाथ जो महादेव त्यानें त्यास कधींही नमस्कार केला नाहीं. तेव्हा स्वतः रागावलेल्या दक्षानें शंकराचा यज्ञभाग त्यास दिला नाहीं. तेव्हा मृगव्याध शिव रागावून वीरभद्र झाला ७२—७७. ज्यास तीन मस्तकें आहेत, तीन नेत्र आहेत आणि तीन पाद आहेत असा तो तेथें आला. त्याच्याकडून देव, मुनि व पितर पीडित झाले. तेव्हा यज्ञपुरुष भयभीत होऊन चोहोंकडे मृगरूप होऊन पळूं लागला. तें पाहून शिव लागलाच व्याध झाला ७८,७९. त्या रुद्रव्याधानें त्या मृगाचें अंग विद्ध करून सोडिलें. तेव्हा भगवान् ब्रह्मदेव मधुरस्वरानें त्याची स्तुति करूं लागला. त्यामुळें तो मृगव्याध संतुष्ट झाला व त्यानें तो यज्ञ करविला. सूर्य तुलाराशीमध्यें असतां त्या रुद्राची सत्तावीस दिवसांनीं युक्त असलेल्या चंद्रमंडलामध्यें स्थापना करून स्वतः ब्रह्मदेव सत्यलोकीं गेला व तो रुद्र स्वतः चंद्ररूपी झाला ८०—८२. हें ऐकून वीरभद्ररूपी रुद्राचें मन आनंदित झालें. त्यानें आपल्या देहातून अंश काढून त्यास ब्राह्मणगृहीं पाठविलें ८३. तो शिव भैरवदत्त नामक ब्राह्मणाच्या गृहीं जाऊन घोर कलियुगामध्यें शंकर या नावानें प्रसिद्ध असलेला त्याचा पुत्र झाला ८४. तो ब्राह्मण गुणी, ज्ञानी व ब्रह्मचारी झाला. त्यानें शंकरभाष्य करून शैवमार्ग दाखविला ८५. त्रिपुंड्र, अक्षमाला व पंचाक्षर शुभमंत्र शैवाकरिता मंगलकारक असून त्यास शंकराचार्यांनी निर्माण केलें आहे ८६. ह्याप्रमाणें

बृहस्पतिरुवाच ॥ पुरा तु नैमिषारण्ये विप्रश्चाजगरोऽभवत् । अदान्तशास्त्रनिपुणो ज्ञानवाञ्छम्भुपूजकः १ द्वादशाब्दान्तरे रुद्रस्तुष्टोऽभूत्पार्थिवार्चनात् । तदामत्य ददौ ज्ञानं जीवन्मोक्षत्वमागतः २ संकर्षणं समाराध्य तदुक्तेन द्विजोत्तमः । तुष्टाव पुष्कलाभिश्च स्तुतीभिः परमेश्वरम् ३ अजगर उवाच ॥ सदैक्यं प्रधानं परं ज्योतिरूपं निराकारमव्यक्तमानन्दनित्यम् । त्रिधा तच्च जातं त्रिलिङ्गैक्यभिन्नं पुमान्सत्त्वरूपो रजोरूपनारी ४ तयोर्यच्च शेषं तमोरूपमेव ततश्शेषब्राह्मे नमस्ते नमस्ते । रजश्चादिभूतो गुणस्सैव माया तथा मध्यभूतो नरस्सत्त्वरूपम् ५ तथैवान्तभूतो नपुंसक्क तमोवत्सदैवाद्यनागेश तुभ्यं नमस्ते । नराधाररूपो भवान्कालकर्ता नराकर्षणस्त्वं हि संकर्षणश्च ६ रमन्ते मुनीशास्त्वयि ब्रह्मधाम्नि नमस्ते नमस्ते पुनस्ते नमोऽस्तु । नराङ्गेषु चाधारभूता शिवा या स्मृता योगनिद्रा हि शक्तिस्त्वदीया ७ जीव उवाच ॥ एवं हि संस्तुतो देवो द्विजं चाजगरं प्रभुः । सायुज्यं कृतवान्साङ्गे रुद्रः सर्पो हि सोऽभवत् ८ फणासहस्रसहितो गौराङ्गो गौरविग्रहः । क्षीराब्धौ मन्दिरं यस्य बभूव च गुणाकरम् ९ तं सर्पाख्यं महारुद्रं प्रत्यागत्यात्मभूः स्वयम् । कर्कराशिस्थिते सूर्ये चन्द्रे भगणमण्डले १० तं रुद्रं स्थापयामास चन्द्रमाः स तु चाभवत् । इति श्रुत्वा शेषनागो रुद्रः श्रीगुरुभाषितम् ११ वचनं स प्रसन्नात्मा तेज उत्पाद्य वै मुखात् । विन्ध्याद्रौ जनयामास देवदत्तद्विजगृहे १२ गिरिशर्मा स वै विप्रो विजित्य विदुषां गणान् । काशीपुरीं समायातः शिष्योऽभूच्छङ्करस्य वै १३ इति ते कथितं विप्र यथा

श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युगखंडनामक प्रतिसर्गपर्वापैकीं चतुर्थखंडाचा कलियुगीय इतिहासस्समुच्चयाचा कृष्णचैतन्य व शंकराचार्य यांच्या उत्पत्ति विषयीं दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥

बृहस्पति ह्मणतातः— पूर्वी नैमिषारण्यामध्यें अजगर ह्मणून ब्राह्मण होता. तो वेदांतशास्त्रामध्यें निपुण, ज्ञानवान् व शंभुपूजक असे १, पार्थिवपूजेमुळें बारा वर्षांनीं रुद्र संतुष्ट झाला. तेव्हां त्यानें स्वतः येऊन त्यास ज्ञान दिले. त्यामुळें तो जीवन्मुक्त झाला २. त्या ज्ञानानें संकर्षणाची उत्तम आराधना करून तो द्विजोत्तम पुष्कळ स्तुतींनीं परमेश्वरास स्तवूं लागला. अजगर ह्मणतोः— दिव्यरूप, प्रधान, परम ज्योतिरूप, निराकार, अव्यक्त व नित्य आनंदस्वरूप असं जें तत्त्व तें त्रिविध व त्रिलिंगद्वारा ऐक्य व भिन्न रूपानें निर्माण झाले. पुरुष सत्त्वरूप असून स्त्री रजोरूप आहे. त्या दोघांतून जे शेष राहिलेले आहे तेंच तमोरूप होय. यास्तव त्यासच शेष असें नाव आहे. तुज शेषनामकास नमस्कार असो. रज हा आदिभूत गुण आहे. तीच माया होय. मध्यभूत नर सत्त्वरूप आहे ३-५. त्याचप्रमाणें अंतभूत नपुंसक व तमोयुक्त अशा हे आद्यरूप नागेशा, तुला नमस्कार असो. तूं नराधाररूप, कार्यकर्ता व नरास आकर्षण करणारा संकर्षण आहेस. मुनीश्वर तुझ्या ब्रह्मधाम नामक रूपात रममाण होतात. तुला नमस्कार असो. पुनः पुनः तुला नमस्कार असो. मनुष्याच्या अंगामध्यें आधाररूप अशी जी शिवा मागितली आहे तीच तुझी योगनिद्रा शक्ति होय ६,७. गुरु ह्मणतातः— याप्रमाणें ज्याची स्तुति केली आहे असा तो प्रभु देव रुद्र अजगरास आपल्या अंगीं सायुज्य देता झाला. त्यामुळें ज्याला सहस्र फणा आहेत, अंग गोरें आहे, संपूर्ण आकृति गौरवर्ण आहे व क्षीरसागरामध्यें ज्याचें मंदिर आहे असा तो सर्प गुणसागर झाला. नंतर सर्पसंज्ञक महारुद्राकडे येऊन स्वतः ब्रह्मदेव सूर्य कर्कराशिमध्यें स्थित असतांना चंद्र नक्षत्रगणमंडलामध्ये त्या रुद्राची स्थापना करिता झाला व तो चंद्रमा झाला. हें श्रीगुरूंनीं ह्मटलेलें वचन ऐकून शेष नागरुद्र प्रसन्न झाला व आपल्या मुखांतून तेज उत्पन्न करून त्याच्या योगाने विंध्याद्रिवर देवदत्त ब्राह्मणाच्या घरीं उत्पन्न झाला. त्या ब्राह्मणाचें गिरिशर्मा असें नाव होतें. तो विद्वानांच्या समूहास जिंकून काशीनगरामध्यें आला व शंकराचा शिष्य

रुद्रो बभूव ह। पुनः शृणु कथां विभ यथा जीवेन भाषिताम् १४ जीव उवाच ॥ प्रयागे क्व पुरा ह्यासीद्ब्राह्मणो हरिसेवकः। मन्दभाग्यो दरिद्रार्तो नैर्ऋतो नाम विश्रुतः १५ महत्कष्टेन तस्यैव भिक्षा प्राप्ता दिनान्तके। नैर्ऋतः पुत्रपत्नीको दरिद्रार्तो दिने दिने १६ एकदा नारदो योगी संप्राप्तो वैष्णवप्रियः। पूजितस्तेन विप्रेण विष्णुलोकमुपाययौ १७ दृष्ट्वा नारायणं देवं नमस्कृत्य पुनः पुनः। वचनं प्राह नम्रात्मा सदैव भगवत्प्रियः १८ भगवन्ये सुराः सर्वे सदा त्वत्पूजने रताः। तेषां भक्ताश्च ये भूमौ धनधान्यसमन्विताः १९ त्वद्भक्ताश्च मया दृष्टा दरिद्रार्ताः सदा भुवि। किमर्थं ब्रूहि मे स्वामिन्नार्दन नमोऽस्तु ते २० इत्युक्तो नारदेनैव भगवान्भक्तवत्सलः तमाह वचनं रम्यं तच्छृणुष्व सुरोत्तम २१ मद्भक्तो भगवान्ब्रह्मा दृष्ट्वा नारायणप्रियान्। जनाँश्च स्ववशीकृत्य लोककार्यं करोति हि २२ धर्मोऽधर्मस्तेन कृतो धर्मो वेदमयः स्मृतः। सप्तलोकाश्च धर्मस्य निर्मितास्तेन धीमता २३ भूर्भुवः स्वो महश्चैव जनश्चैव तपस्तथा। सत्यं तथैव क्रमतो नृणां द्विगुणदं सुखम् २४ अधर्मो वेदरहितो भुवि शब्दान्यकर्तृकः। ये शब्दाश्च महावाण्या दूषितास्ते हि लोकगाः २५ वेदेतराः पापमया दैत्यवृद्धिकराः सदा। अधर्मः स तु विज्ञेयः सप्तलोकाश्च तस्य वै २६ भूमिगर्तेषु विधिना निर्मिताः सुखदायकाः। अतलं वितलं चैव सुतलं च तलातलम् २७ महातलं रसा चैव पातालं चान्यधर्मजम्। अन्यधर्मो ह्यधर्मश्च दवादन्ये हि तेऽसुराः २८ धर्मपक्षाः सुरा ज्ञेया असुराश्चान्यधर्मजाः। तया

झाला. याप्रमाणें, हे ब्राह्मणा, रुद्र कसा झाला हें मीं तुला सांगितलें. आता पुनः गुरूनें काय सांगितलें तें तूं ऐक ८–१४. गुरु ह्मणतातः—पूर्वी प्रयागामध्यें हरिसेवक ह्मणून ब्राह्मण होता. तो मंदभागी असून दरिद्रानें पीडित झाला होता. नैर्ऋत या नावानें तो प्रसिद्ध असे १५. दिवस संपता संपता मोठ्या कष्टानें त्याला भिक्षा मिळत असे. तात्पर्य, पुत्र व पत्नि यासह तो नैर्ऋत प्रतिदिनीं दारिद्र्यामुळें क्लेश भोगीत असे. एकदा वैष्णवास प्रिय असलेला नारदयोगी तेथें आला. तेव्हा त्या ब्राह्मणानें त्याची पूजा केली, नतर तो योगी त्रिष्णुलोकीं गेला १६,१७, व नारायण देवास पाहून त्यास पुनः पुनः नमस्कार करून ज्याचें मन नम्र आहे व जो सर्वदा भगवानास प्रिय आहे असा तो मुनि त्यास ह्मणाला १८. "हे भगवन् जे सर्व देव सर्वदा तुझ्या पूजेमध्यें रत असतात त्याचे भक्त भूलोकीं धनधान्य संपन्न असतात १९. पण भूमंडळीं जे तुझे भक्त असतात ते दरिद्राने पीडिले आहेत असें मीं पाहिलें. तर हे स्वामिन् हें अमें कां तें मला सांग. हें जमार्दना तुला नमस्कार असो" २०. याप्रमाणें नारदानें विचारलें असता भक्तवत्सल भगवान् त्यास जें रम्य वचन बोलला तें हे उत्तम देवा, तूं ऐक २१. 'माझा भक्त जो भगवान ब्रह्मा तो नारायणास प्रिय असलेल्या लोकास पाहून व त्यास आपल्या अधीन करून घेऊन लोककार्यें करीत असतो २२. त्यानें धर्म व अधर्म यास केलें. धर्म वेदमय असतो असें ह्मटलें आहे. त्या बुद्धिमानानें सात लोकास धर्माच्या योगानेंच निर्माण केलें. भूः, भुवः, सुवः, महः, जनः, तपः, त्याचप्रमाणें सत्य असें ते लोक क्रमानें आहेत व ते प्रत्येक मनुष्यास क्रमानें दुप्पट सुख देत असतात २३, २४. अधर्म वेदरहित असून तो भूलोकीं शब्दास अन्यथा करीत असतो. महावाणीपासून जे शब्द दूषित होऊन निघाले ते लोकांमध्यें प्रचलित झाले. पण ते अवैदिक, पापमय व सदा दैत्यांची वृद्धि करणारे होत. तात्पर्य, तोच अधर्म होय असें समजावें. भूमिगर्तेमध्ये त्या अधर्माच्या योगानेंच विधीनें सात लोक निर्माण केले. ते सुखदायक आहेत. अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल व पाताल हे अन्य धर्मापासून उत्पन्न झालेले लोक होत. अन्यधर्म ह्मणजे अधर्मच होय. कारण असुर हे देवाहून अन्य

विहीनो यो धर्मो देवैर्दैत्यैश्च दूषितः ३९ विधर्मः स तु विज्ञेयस्तत्र लोका व्यथाकुलाः । तामिस्रमन्धतामिस्रं कुम्भीपाकं च रौरवम् ३० महारौरव एवापि तथा मूर्तिरयस्तथा । इक्षुयन्त्रं शाल्मलं च ह्यसिपत्रवनं तथा ३१ ज्ञेयमित्येव रचितं विधिना चैकविंशतिः । ब्रह्माण्डोऽयं लोकमयः परं तस्माच्च मत्पदम् ३२ मद्भक्ता भूतले ये वै ते गच्छन्ति परं पदम् । देवभक्ताश्च ये लोकाः सप्तलोकान्व्रजन्ति ते ३३ ये तु वै तामसा लोका दैत्यपूजनतत्पराः । ते गच्छन्ति महीलोकानतलादिमथोंस्तथा ३४ पातालाद्योजन लक्षमधो लोकः प्रकीर्तितः । विधर्मतत्परा लोकास्ते गच्छन्ति ह्यधोगतिम् ३५ अतो वै विधिना भ्रष्टा मद्भक्ताश्च दरिद्रगाः । ये मद्भक्ताः सुरान्पूर्वं पूजयित्वा भजन्ति माम् ३६ लक्ष्मीवन्तश्च ते ज्ञेया भुक्तिमुक्तिपरायणाः । प्रयागे नैर्ऋतो विप्रस्यकदा देवान्मम प्रियान् ३७ भजत्यनन्यभावेन तस्मात्स हि दरिद्रवान् । देवैर्दत्तं हि यद्द्रव्यं भोक्तव्यं सर्वदा जनैः ३८ मया दत्तं हि यद्वस्तु ब्रह्माण्डे नास्ति नारद । अतो मदाज्ञया विप्र देहि तस्मै वरं शुभम् ३९ इत्युक्तो नारदो योगी हरिणा विश्वकारिणा । द्विजपत्नी स्थिता गेहे तत्र प्राप्य वचोऽब्रवीत् ४० वर वरय हे साध्वि त्वया यदाञ्छितं हृदि । साह देहि वरं स्वामिन्भूपराज्ञी भवाम्यहम् ४१ इत्युक्त्वा वचनं तत्र दिव्यरूपा बभूव सा । आगतस्तत्र नृपतिर्गृहीत्वा गेहमायथौ ४१ सायंकाले तु समासे द्विजस्तत्र समागत । नारदस्त वचः प्राह शृणु विप्र हरिप्रिय ४३ वरदानाच्च ते पत्नी भूपराज्ञी हि वर्तते । त्वया किं वाञ्छितं वस्तु मत्तः प्राप्य

होत २९—२८. देव धर्मपक्षास असतात व असुर अन्य धर्मापासून उत्पन्न झालेले असतात. या उभय धर्मांहून रहित असा जो धर्म त्यास देव व दैत्य या उभयतानींही दूषित केले आहे २९. तो विधर्म असें समजावें. त्यामध्यें लोक व्यथित होतात. तामिस्र, अंधतामिस्र कुंभीपाक, रौरव, महारौरव, मूर्तिरय, इक्षुयंत्र, शाल्मल, असिपत्रवन याप्रमाणें ब्रह्मदेवानें एकवीस लोक निर्माण केले आहेत असें जाणावें. हें ब्रह्माड लोकमय असून माझें पद त्याच्याहून पर आहे. भूतलीं जे माझे भक्त असतात ते परमपद पावतात व जे लोक देवभक्त असतात ते सप्तलोकास जातात. जे तामस स्वभावाचे असतात, जे दैत्याचे पूजनामध्यें तत्पर असतात, ते तल, अतल इत्यादि महीलोकास जातात ३०-३४. पातालाहून अधोलोक एक लक्ष योजने दूर आहे असें सांगितलें आहे. विधर्मामध्यें जे लोक तत्पर असतात ते या अधोगतीस जातात ३५. यास्तव विधिभ्रष्ट असे जे माझे भक्त असतात ते दरिद्री राहतात; पण जे माझे भक्त पूर्वी देवाची पूजा करून नंतर माझी पूजा करितात ते लक्ष्मीवान् निपजतात व भोग आणि मुक्ति त्यास मिळते असे समजावें. प्रयागामध्यें नैर्ऋत ब्राह्मण मला प्रिय असलेल्या देवास सोडून अनन्यभावानें मलाच भजतो. यास्तव तो दरिद्री आहे. लोकांनीं देवांनीं दिलेलें जें द्रव्य असेल त्याचा सर्वदा भोग घ्यावा ३६—३८. नारदा, मी जी वस्तु देत असतों ती ब्रह्माडामध्यें नसते. यास्तव, हे ब्राह्मणा, माझ्या आज्ञेनें त्यास तू शुभ वर दे ३९. याप्रमाणें विश्वाची रचना करणाऱ्या हरीनें ज्यास सांगितलें आहे असा नारद योगी त्या ब्राह्मणाची पत्नी गृहामध्यें जेथें होती तेथें येऊन ह्मणाला ४०. " हें साध्वि, तुझ्या मनामध्यें जी इच्छा असेल ती मागून घे ". तेव्हा ती ह्मणाली " हे स्वामिन्, मला वर दे; मी राजाची पत्नी होत्यें " ४१. हे बचन बोलतांच ती लागलीच तेथें दिव्यरूपी झाली इतक्यात तेथे राजा आला व तिला घेऊन स्वगृहीं गेला ४२. सायंकाल झाला असता तो ब्राह्मण तेथें आला व नारद त्यास ह्मणाला ' हे हरिप्रिय ब्राम्हणा, ४३ वरदानामुळें तुझी पत्नी राजाची राणी होऊन राहिली आहे. आतां तुला जी वस्तु इष्ट असेल ती मजपासून मागून घेऊन सुखी हो ' ४४. हें ऐकून देवाच्या वश झालेला तो

सुखी भव ४४ इति श्रुत्वा दैवशो वचः प्राह हर्षान्वितः । क्रोष्ट्री भवेच्च मत्पत्नी देहि विप्र वरं मम ४५ इत्युक्तवचनात्क्रोष्ट्री सा बभूव द्विजप्रिया । एतस्मिन्नन्तरे प्राप्तस्तत्पुत्रो गुरुपूजकः ४६ श्रुत्वा तत्कारणं सर्वं नारदं स वचोऽब्रवीत् । मम माता यथा स्वामिंस्तथा शीघ्रं वराद्भवेत् ४७ एतत्त्रिभिर्वरैः प्राप्तं दैवमायाविमोहितैः । तदा तु नारदो दुःखी नैर्ऋतं प्राह वै वचः ४८ ब्रह्माण्डोऽयं देवमयो भवस्तस्य महेश्वरः । अतो भव भजाशु त्वं स ते कार्यं करिष्यति ४९ इत्युक्तवचनो विप्रो भव तं पार्थिवार्चनैः । तुष्टाव परया भक्त्या वर्षमात्रं हि नैर्ऋतः ५० तदा प्रसन्नो भगवान्महेशो भक्तवत्सलः । कुबेरसदृशं दिव्यं ददौ तस्मै महद्धनम् ५१ तद्धनेन स वै विप्रो धर्मकार्यं चकार ह । प्रसिद्धोऽभून्महीपृष्ठे नाम्ना पुण्यजनो धनैः ५२ शिवभक्तिप्रभावेन प्राप्य द्रव्यमकण्टकम् । सहस्राब्दवपुर्भूत्वा त्यक्त्वा प्राणान्दिवं ययौ ५३ वृषराशिस्थिते सूर्ये राजा चन्द्रस्य सोमवत् । नैर्ऋतो नाम विख्यातो रुद्रः सर्वजनप्रियः ५४ इति श्रुत्वा नैर्ऋतस्तु भृगुवर्य गुरुदितम् । स्वांशाद्भूतलमागम्य गिरिनालगिरौ वने ५५ योगिनः सिद्धसाख्यस्य पुत्रोऽभूदनवासिनः । वनशर्मेति विख्यातो वेदशास्त्रपरायणः ५६ द्वादशाब्दवपुर्भूत्वा जित्वा विद्वज्जनान्बहून् । काशीमागम्य तत्त्वार्थी शङ्कराचार्यमुत्तमम् ५७ प्रणम्य तस्य शिष्योऽभूदनशर्मा विशारदः बृहस्पतिरुवाच ॥ वसुशर्मा द्विजः कश्चिन्माहिष्मत्यां पुराभवत् ५८ शिवव्रतपरो नित्यं पुत्रार्थी पार्थिवार्चकः । चतुर्विंशतिवर्षाणि पूजतस्तस्य धीमतः ५९ व्यतीतानि सुरास्तत्र न प्रसन्नोऽभवच्छिवः । तदा तु दुःखितो विप्रो वह्निं प्रज्वाल्य भैरवम् ६० जुहाव स्वाङ्गमांसानि

ब्राह्मण रागाने ह्मणाला, 'हे ब्राह्मणा, माझी पत्नी कोल्ही होवो हा मला वर दे' ४५. हें वचन बोलताच ती द्विजस्त्री कोल्ही झाली. इतक्यामध्यें त्याचा गुरुपूजक पुत्र प्राप्त झाला ४६. व तें सर्व वर्तमान ऐकून नारदास ह्मणाला 'हे स्वामिन माझी माता जशी होती तशीच ती तुझ्या वरामुळें शीघ्र होवो' ४७. दैवाच्या मायेनें मोहित झालेल्या त्या तिघानीं हे तीन वर मागितले. तेव्हा नारद दुःखी होऊन नैर्ऋतास ह्मणाला ४८. 'हे ब्राह्मणा, हें ब्रम्हाड देवमय आहे व शंकर त्याचा महेश्वर आहे. यास्तव, तू त्वरित त्याची सेवा कर. तो तुझें कार्य त्वरित करील' ४९. याप्रमाणें नारदानें ज्यास सांगितलें आहे असा तो नैर्ऋत ब्राह्मण पार्थिव पूजेच्या योगानें त्या शंकरास एक वर्षभर मोठ्या भक्तीने पूजिता झाला ५०. तेव्हा भगवान् भक्तवत्सल महेश प्रसन्न झाला व कुबेरासारखे दिव्य व मोठें धन त्यानें त्यास दिलें ५१. त्या धनानें तो ब्राह्मण धर्मकार्य करिता झाला व त्या धनाच्या योगानें तो पुण्यजन या नावानें भूलोकीं प्रसिद्ध झाला ५२. शिवभक्तीच्या प्रभावानें त्यास निष्कंटक द्रव्य प्राप्त झालें. सहस्र वर्षे शरीर धारण करून त्यानें प्राण सोडिले व स्वर्गलोकीं गमन केलें. सूर्य वृषराशीमध्यें स्थित असता सोमाप्रमाणेंच तो नैर्ऋत या नावानें प्रसिद्ध असलेला सर्व लोकीप्रिय चंद्राचा राजा झाला ५३,५४. बा भृगुवर्या, गुरूनें सांगितलेलें हें ऐकून नैर्ऋतसंज्ञक रुद्र आपल्या अंशानीं भूतलीं गिरिनाल पर्वतावरील वनामध्यें येऊन सिद्धसाख्यनामक वनवासी योग्याचा पुत्र झाला. तो वनशर्मा या नावानें प्रसिद्ध असे. तो वेदशास्त्रामध्ये परायण असून ५५,५६ बारा वर्षांच्या वयाचा झाला असता अनेक विद्वज्जनास जिंकून काशीस आला व तत्त्वाची इच्छा करणारा तो चतुर वनशर्मा उत्तम शंकराचार्यास नमस्कार करून त्याचा शिष्य झाला. बृहस्पति ह्मणतातः— माहीष्मतीमध्यें पूर्वी वसुशर्मा ह्मणून कोणी ब्राह्मण राहत असे. तो शिवव्रतामध्यें तत्पर असून पुत्राच्या इच्छेनें नित्य पार्थिवपूजा करीत असे. त्या बुद्धिमानास पूजा करावयास लागून चोवीस वर्षे झालीं. तरी हे देवहो,

मुखतश्चरणान्तिकम् । न प्रसन्नोऽभवद्रुद्रस्तदा विप्रः शुचान्वितः ६१ गृहीत्वा चोत्तमं मेषं संस्कारं कृतवाञ्छुचिः । तेन मेषेण सहितो ज्वलदग्नौ समाययौ ६२ प्रसन्नो भगवान्रुद्रस्तत्रागत्य गणैर्युतः । स्वरूपं दर्शयामास शुद्धस्फटिकसुन्दरम् ६३ वरं ब्रूहि वचः प्राह वसुशर्माणमुत्तमम् । तच्छ्रुत्वा स प्रसन्नात्मा नत्वा पार्वतिवल्लभम् ६४ प्रश्रयावनतो भूत्वा वचनं प्राह शंकरम् । देहि मे तनयं स्वामिञ्छरणागतवत्सल ६५ इत्युक्तश्शङ्करस्तेन विहस्योवाच तं द्विजम् । पुत्रदाता स्वयं ब्रह्मा भाग्यकर्ता परात्परः ६६ तुभ्यं च शतजन्मान्ते तेन पुत्रो न निर्मितः । तस्मादहं सुतं स्वांशात्तव विप्र ददामि भोः ६७ इत्युक्त्वा स्वमुखात्तेजो निराकृत्य महेश्वरः । तत्पत्न्या जनयामास सकाशाद्वसुवर्मणः ६८ दशमासान्तरे जातः सुपुत्रो मधुराननः । अजस्येव पदश्चैको द्वितीयो नरवक्त्रतः ६९ अजैकपाद इति सप्रसिद्धोऽभून्महीतले । चतुश्शताब्दवपुषि प्राप्ते तस्मिन्सुते प्रिये ७० संप्राप्तो भगवान्मृत्युस्तदा रोगगणैर्युतः । तस्य तैरभवद्युद्धमजैकचरणस्य वै ७१ वर्षमात्रेण तान्सर्वाञ्जित्वा मल्लगणोत्कटः । मृत्युञ्जयः स वै नाम्ना प्रसिद्धोऽभून्महीतले ७२ दुःखितो भगवान्मृत्युस्तेन विप्रेण निर्जितः । परमेष्ठिनमागम्य कथयामास कारणम् ७३ तदा तु भगवान्ब्रह्मा सर्वदेवगणैर्युतः । कुंभगे द्युमणौ देवे चन्द्रमण्डलगं नृपम् ७४ तं द्विजं च चकाराशु रुद्ररूपं भयापहम् । सूत उवाच ॥ इति श्रुत्वा महादेवः स विप्रश्च तदाऽजपाद् ७५ पुरीं माहिष्मतीं प्राप्तः कलिशुद्धिकरः प्रभुः । पुरीशर्मेति विख्यातो यतिदत्तस्य वै सुतः ७६ षोडशाब्दवपुर्भूत्वा जित्वा

शंकर त्याच्यावर प्रसन्न झाला नाहीं. तेव्हा दुःखित झालेल्या त्या ब्राह्मणानें भयकर अग्नि पेटवून ५७–६० मुखापासून चरणापर्यत जें मास होतें तें काढून त्या अंगातील मासानें हवन केलें. तरी रुद्र प्रसन्न झाला नाहीं. तेव्हा शोकयुक्त झालेला ब्राह्मण उत्तम मेष घेऊन पवित्रपणें त्याचा संस्कार करिता झाला. व त्या बकऱ्यासहवर्तमान पेटलेल्या अग्नीमध्यें तो चालला ६१,६२. तेव्हा प्रसन्न झालेला रुद्र गणासह तेथें आला व शुद्ध स्फटिकाप्रमाणें सुदर अमलेलें आपलें स्वरूप त्यानें त्यास दाखविलें ६३. व तो सुशर्म्यास ह्मणाला "उत्तम वर माग." तें ऐकून ज्याचें चित्त प्रसन्न झालेलें आहे असा तो ब्राह्मण पार्वतीवल्लभ शंकरास नमस्कारकरून व विनयानें नम्र होऊन ह्मणाला "हे शरणागतवत्सला, स्वामिन्, मला पुत्र दे" ६४,६५. त्यानें याप्रमाणें ज्यास सांगितले आहे असा शंकर हंसून त्या ब्राह्मणास ह्मणाला " पुत्र देणारा व भाग्य देणारा स्वतः सर्व श्रेष्ठ ब्रह्मा आहे. पण त्यानें शंभर जन्मपर्यत तुला पुत्र दिलेला नाहीं. यास्तव हे ब्राह्मणा, मी तुला आपल्या अंशापासून पुत्र देतों." असें बोलून व आपल्या मुखांतून तेज काढून तें त्यानें वसुशर्म्यापासून त्याच्या पत्नीच्या ठिकाणीं उत्पन्न करावयले ६६–६८. दहाव्या महिन्यात ज्याचें मुख सुंदर आहे असा त्यास पुत्र झाला. पण त्या बालकाचा एक पाय बकऱ्यासारखा व दुसरा पाय मनुष्यासारखा होता ६९. त्यामुळें तो अजैकपाल या नावानें भूलोकीं प्रसिद्ध झाला. त्या प्रिय पुत्रास चौदावें वर्ष लागलें असता भगवान् मृत्यु रोगगणासहवर्तमान् त्याच्याकडे आला; तेव्हा त्या अजैकचरणाचे त्याच्याशीं मोठें युद्ध झालें. मल्लगणामध्यें अतिबलवान् असलेल्या त्या ब्राह्मणानें एका वर्षात त्या सर्वास जिंकिलें व त्यामुळें तो भूलोकीं मृत्युंजय या नावानें प्रसिद्ध झाला ७०—७२. तेव्हा त्या ब्राह्मणानें ज्यास जिंकिलें आहे असा भगवान् मृत्यु दुःखित होऊन ब्रह्मदेवाकडे आला व त्यास सर्व वर्तमान सागता झाला ७३. तेव्हा भगवान् ब्रह्मदेव सर्व गणासहवर्तमान आला व सूर्यदेव कुंभराशीस असताना भयाचें निरसन करणाऱ्या त्या रुद्ररूपी ब्राह्मणास त्यानें चंद्रमंडलातील राजा केलें. सूत ह्मणतातः—हें ऐकून महादेवरूपी तो अजपादविप्र माहीष्मतीपुरीमध्यें आला. तो कलीची शुद्धि करण्यास समर्थ होता. असो.

वेदपरायणान् । शंकराचार्यमागम्य तस्य शिष्यो बभूव ह ७७ इति ते कथितं विप्र यथा मृत्युञ्जयोऽभवत् ७८ [४।२१५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चय आनंदगिरिवनशर्मपुरीशर्म वर्णन नामैकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

सूत उवाच ॥ पुनः शृणु कथां रम्यां प्रयागे जीवभाषिताम् । हिर्बुनाम पुरा चासीद्दानवो लोककण्टकः १ निकुम्भान्वयसंभूतः शक्रतुल्यपराक्रमः । सहस्राब्द तपः कृत्वा तापयामास वै सुरान् २ तदा लोकपतिर्ब्रह्मा लोकरक्षार्थमुद्यतः । वरं ब्रूहीति वचनमुवाच दनुजेश्वरम् ३ नमस्कृत्य विधातारं वचनं प्राह नम्रधीः । यदि देयो वरः स्वामिंस्त्वया विश्वकृता विभो ४ मरणं न च मे भूयात्त्वत्कृतैश्च चराचरैः । इत्युक्तस्तथेत्युक्त्वा ब्रह्मलोकमुपाययौ५ दानवस्तु रौद्रात्मा जित्वा स्वर्गनिवासिनः । आहूय दानवान्दैत्यान्विवरेभ्यः प्रसह्यधी ६ स्वर्गे निवासयामास तं देवा भूतलीकृताः । लक्षाब्द च सुरास्सर्वे बुभुजुः परमापदः ७ एकदा नारदो धीमान्दृष्ट्वा देवांस्तथागतान् । वचनं प्राह योगात्मा भजध्वं लोकशंकरम् ८ स देवश्च महादेवो ब्रह्माण्डेशो विपत्तिहा । इति श्रुत्वा तु वचनं ते देवा विस्मयान्विताः ९ पार्थिवैः पूजयामासुर्देवदेवमुमापतिम् । गतैकादशवर्षाश्च तेषां पूजनकारिणाम् १० तदा प्रसन्नोभगवान्महेशो लोकशंकरः । ज्योतिर्लिङ्गमयो भूत्वा लोकांस्त्रीन्समदाहयत् ११ ये तु वै देवभक्ताश्च शेषाश्चासन्महाभये । अन्ये तु दानवैस्सार्द्धं भस्मीभूता बभूविरे १२ एतस्मिन्नन्तरे ब्रह्मा विष्णुना सह हर्षितः ।

पुरिशर्मा या नावानें प्रसिद्ध असलेला तो त्या नगरींतील यतिदत्ताचा पुत्र झाला, तो सोळा वर्षांच्या वयाचा होऊन वेदपरायण ब्राह्मणास जिकून शंकराचार्याकडे आला व त्याचा शिष्य झाला ७४–७७. याप्रमाणें हे ब्राह्मणा, मृत्युंजय कसा झाला हें मीं तुला सांगितलें ७८. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्युग प्रतिसर्ग कलियुग चतुर्थ खंडातील आनन्दगिरी, वनशर्म व पुरिशर्म याच्याविषयीं अकरावा अध्याय समाप्त झाला. ॥ ११ ॥

सूत ह्मणतातः— प्रयागामध्यें गुरूनें सांगितलेली रम्य कथा तूं पुनः ऐक. पूर्वी एक हिर्बूनामक लोकास पीडा देणारा दानव होता. तो निकुंभ वंशामध्ये उत्पन्न झालेला असून शक्रासारखा पराक्रमी होता. सहस्र वर्षें तप करून त्याने देवास ताप दिला १,२. तेव्हा लोकांच्या रक्षणास तयार असलेला लोकपति ब्रह्मा त्या दनुजेश्वरास 'वर माग.' असें ह्मणाला ३. तेव्हा तो नम्रबुद्धि दैत्य ब्रह्मदेवास नमस्कार करून ह्मणाला. 'हे प्रभो, विश्व करणाऱ्या तुला जर वर द्यावयाचा असेल तर तूं केलेल्या चराचराकडून मला मरण न यावे हा वर दे.' तो असें बोलला असता 'बरें आहे' असें म्हणून देव ब्रम्हलोकीं गेला ४,५. इकडे ज्याचें अंतःकरण भयंकर आहे असा तो राक्षस स्वर्गवासी देवादिकास जिकून व विवरातून दैत्य व दानव यास बोलावून ६ त्यास स्वर्गलोकीं ठेविता झाला व त्याने त्या देवास भूतलीं धाडिलें. सर्व देवांनीं एक लक्ष वर्षें असह्य यातना भोगिल्या ७. तेव्हा एकदा बुद्धिवान् योगरूपी नारद, देव अशा अवस्थेंत पडले आहेत असें पाहून तो त्यास ह्मणतो "तुह्मी लोक शंकराचें भजन करा ८." कारण तो देव ब्रह्माडाचा ईश, महादेव व विपत्ति नाहींशा करणारा आहे." हें त्याचें वचन ऐकून देव विस्मययुक्त झाले. त्यानीं देवाधिदेव उमापतीची पार्थिवानीं पूजा केली. पूजा करिता करितां त्यांची अकरा वर्षें लोटलीं ९,१०. तेव्हा भगवान् लोकमय शंकर प्रसन्न झाला; व ज्योतिर्मय लिंग होऊन त्यानें त्रैलोक्यास जाळिलें ११. जे देवभक्त होते तेवढेंच त्या महाभयातून निभावले व दुसरे सर्व दानवासहवर्तमान भस्मीभूत झाले १२. इतक्यात ब्रह्मदेव विष्णुसहवर्तमान हर्षित होऊन साम-

तुष्टाव स महारुद्र स्तोत्रैस्सामसमुद्भवैः १३ मिथुनस्थे दिवानाथे शशिमण्डलभूपतिम् । हिर्बुध्न च महारुद्रं चकार सुरहेतवे १४ इति श्रुत्वा स हिर्बुध्नो देवकार्यार्थमुद्यत. । हिमालये गिरौ रम्ये पुत्रोऽभूत्साद्यकर्मणः १५ पतिरूपः कलाभिज्ञो भारतीश इति श्रुतः । स जित्वा विदुषां वृन्दान्काशीनगरमागतः १६ शंकराचार्यमागम्य शिष्योऽभूत्तेन निर्जितः । बृहस्पतिरुवाच ॥ मयपुत्रः स्मृतो मायी तपो घोरं चकार ह १७ पदैकेन स्थितः सूर्ये सहस्राब्द प्रयत्नतः । स लोकास्तापयामास तपसा लोकवासिनः १८ तदा प्रसन्नो भगवान्परमेष्ठी पितामहः । त्रयो ग्रामास्तस्मियार्थे क्रमाद्वै तेन निर्मिताः १९ सौवर्णं स्वर्गसदृशं पुर षोडशयोजनम् । तदधो योजनान्ते च राजत च भुवर्मयम् २० तदधो योजनान्ते च भूर्लोकमिव चापरम् । एव पुरनिवासिन्यो दैत्यानां योषितो मुदा २१ शतकोटिमिता दैत्या धर्मात्मानो निवासिनः । गृहीत्वा यज्ञभागं च देवतुल्या बभूविरे २२ तदा निर्बलिनो देवाः क्षुधया पीडिताः प्रभुम् । भगवन्तं महाविष्णु तुष्टुवुः परया गिरा २३ चतुर्युगसमूहानां वर्षाणां भगवन्प्रभो । अधिकारविहीनाश्च वर्तन्ते स्वर्गमण्डले २४ तामसान्तरमेवापि षोडशैव चतुर्युगम् । त्वसंतानि महाविष्णो मायिनां दुःखभुक्तताम् २५ इति श्रुत्वा वचस्तेषां भगवान्मधुसूदनः । दृष्ट्वा संस्कृतवार्तायां दैत्यान्धर्मपरायणान् २६ बौद्धरूपस्स्वयं जातः कलौ प्राप्ते भयानके । आजिनस्य द्विजस्यैव सुतो भूत्वा जनार्दनः २७ वेदधर्मपरान्विप्रान्मोदयामास वीर्यवान् । निर्वेदाः

वेदातील स्तोत्रांनीं महारुद्राची स्तुति करिता झाला १३. दिनकर मिथुन राशी मध्यें असता देवाकरिता हिर्बुस मारणाऱ्या महारुद्राची त्यानें चंद्रमंडलामध्ये स्थापना केली व हें ऐकून तो हिर्बुध्न देवकार्यार्थ तयार झाला. तो रम्य हिमालयपर्वतावर साद्यकर्म्याचा पत्र झाला १४,१५. तो पतिरूप व कलाभिज्ञ असल्यामुळें त्यास भारतीश असे ह्मणत. तो विद्वानांच्या समूहांस जिकीत काशीनगरीं आला व शंकराचार्याकडे येऊन त्यानीं त्यास जिंकिलें असता त्याचा शिष्य झाला. बृहस्पति ह्मणतातः—मयाचा मायी ह्मणून पुत्र होता. त्यानें घोर तप केलें १६,१७. सहस्र वर्षेपर्यत मोठ्या प्रयत्नानें तो सूर्यासमोर एका पायावर उभा राहिला. त्याने आपल्या तपानें लोकवासी लोकास संतप्त केलें १८. तेव्हा प्रसन्न झालेल्या भगवान् परमेष्ठी पितामहानें त्याच्या प्रीत्यर्थ क्रमानें तीन गाव निर्माण केले १९. स्वर्गासारिखें सौवर्णनगर षोडश योजनं विस्तीर्ण केलें. त्याच्या खालीं एक योजन अंतरावर भूवर्लोकमय रुप्याचें नगर रचिलें व त्याच्या खालीं एक योजन अंतरावर भूर्लोकासारिखें लोखंडाचें नगर केले. नंतर त्या नगरामध्यें दैत्याच्या स्त्रिया आनंदानें राहूं लागल्या २०,२१. शभर कोटी धर्मात्मे दैत्य तेथे राहत होते. ते यज्ञभागाचा स्वीकार करून देवासारखें दिसू लागले, तेव्हा क्षुधेनें पीडिलेले देव निर्बल होऊन प्रभु जो भगवान् महाविष्णु त्याची परावाणीनें स्तुति करूं लागले २२,२३. "हे प्रभो, चारी युगाच्या समूहाइतकीं वर्षें आह्मी अधिकारहीन होऊन स्वर्गमंडली राहिलों आहों. हे महाविष्णो, या तामसातरामध्यें सोळा चतुर्युगें आह्मास दुःख भोगतां भोगता निघून गेलीं" २४-२६. हें त्याचें वचन ऐकुन भगवान् मधुसूदन, दैत्य संस्कृत वार्तेमध्यें व धर्मामध्यें परायण आहेत असें पाहून, भयंकर कलिकाल प्राप्त झाला असता स्वतः बौद्धरूपी झाला; व तो वीर्यवान् जनार्दन अजिन द्विजाचा पुत्र होऊन वेदधर्मपरायण ब्राह्मणास मोहित करिता झाला. तेव्हां तामसातरामध्यें सोळावा कलि प्राप्त झाला असता तीन्ही वर्ण वेद रहित, यज्ञरहित व कर्मरहित झाले. तेव्हां कोपाविष्ट झालेले त्रिपुरवासी सर्व दैत्य वेद व यज्ञ यांनीं रहित झालेल्या ब्राह्मणास पीडा करूं लागले व कल्पांतीं दैत्यानीं व्यास भक्षण केले आहे

कर्मरहितास्त्रिवर्णास्तामसान्तरे २८ षोडशे च कलौ प्राप्ते बभूवुर्यज्ञवर्जिताः । तदा दैत्या रुषाविष्टास्सर्वे त्रिपुरवासिनः २९ मनुतान्पीडयामासुर्मयज्ञान्वेदवर्जितान् । क्षय जग्मुर्नरास्सर्वे कल्पान्ते दैत्यभक्षिताः ३० पुनस्सत्ययुगे प्राप्ते कैलासे गुह्यकालये । देवैश्चाराधितः शंभुस्सर्वलोकशिवंकर ३१ उर्ध्वालिंगे वपुः कृत्वा तत्र तस्थौ भयङ्करः । एतस्मिन्नन्तरे देवाः प्रसन्नास्तामसान्तरे ३२ भूमेस्सार गृहीत्वा ते रथं कृत्वा विधानतः । चन्द्रभास्करयोस्सारचक्रे कृत्वा तथैव च ३३ सुमेरोश्च तथा सारात्कर्तुं कृत्वा रथस्य वै । ददौ शिलाय महते यान स्यन्दनरूपि तत् ३४ तदा ब्रह्मा स्वयं प्राप्य बभूव रथसारथिः । वेदाश्च वाजिनश्चासन्देवदेवस्य वै रथे ३५ लोकालोकगिरेः सारो धनुश्चासीन्महात्मनः । घोरं चाजगवं नाम प्रसिद्धमभवद्धनुः ३६ सज्यं चकार भगवांस्तद्धनुः कठिनं महत् । भग्नीभूतमभूच्चाप देवदेवस्य वै रुषा ३७ विस्मितो भगवान्विष्णुस्मारं स्वर्मन्य वै तदा । गृहीत्वाशु धनुर्दिव्यं पिनाकं स चकार ह ३८ सज्यं जातं च रुद्रेण पुष्टिभृतं महद्धनुः । तदा ब्रह्मर्षयस्तुष्टास्तुष्टुवुर्मनसा हरम् ३९ पिनाकीति च तन्नाम्ना प्रसिद्धोऽभून्महेश्वरः । गुणश्चापस्य वै शेषः शक्रो बाणस्तदाऽभवत् ४० शरपक्षौ वह्निवायू शल्यं विष्णुः सनातनः । तेन बाणेन दैत्यानां कोटिमेकया मृता च ख ४१ त्रिपुरं दाहयामास मायिना पालितं शिवः । भस्मीभूते पुरे घोरे तदा लोकपतिर्विधिः ४२ पिनाकिनि महारुद्रे मीनराशिस्थिते रवौ । शशिनो मण्डलस्यैव राजा तत्र चकार ह ४३ स्वाधिकारस्तदा देवा अवापुस्तामसान्तरे । सूत उवाच ॥ इति श्रुत्वा पिनाकी च स्वमुखात्स्वांशमुत्तमम् ४४ समुत्पाद्य हरद्वारं हिमसानौ चकार ह । मच्छन्दो नाम तत्रैव

असे सर्व पुरुष क्षय पावले. तेव्हा पुनरपि सत्ययुग प्राप्त झालें असता कैलासावर गुह्यकालयामध्यें देवांनीं सर्व लोकांचे कल्याण करणाऱ्या शंकराची आराधना केली २७-३१. तेव्हा ज्योतिर्लिंगरूप आकृति करून तो तेथें भय उत्पन्न करीत राहिला. इतक्यांत देव प्रसन्न झाले व त्यांनीं त्या तामसांतरामध्यें भूमीचें सार घेऊन यथाविधि रथ केला. चंद्र व भास्कर यांच्या सारापासून दोन चक्रें केलीं. त्याचप्रमाणें सुमेरूचें सार घेऊन त्याच्यापासून रथाचा ध्वज केला व त्या महेश्वराला त्यांनीं ते स्यंदनरूपी यान दिलें ३२ ३४. तेव्हा स्वत ब्रह्मा आला व तो रथाचा सारथि झाला. वेद त्या देवाधिदेवाच्या रथाचे घोडे झाले ३५. लोकालोकपर्वताचें सार त्या महात्म्याचें धनुष्य झालें व तेंच घोर धनुष्य अजगव या नावानें प्रसिद्ध झालें ३६. त्या कठिण व भयंकर धनुष्यास भगवानानें सज्य केलें पण त्या देवाधिदेवाच्या रागानें त्याचें भस्म झालें. तेव्हा भगवान् विष्णु विस्मित झाला व त्यानें स्वर्गाचें सार घेऊन लागलेंच पिनाकसज्ञक धनुष्य केलें. त्या मोठ्या व पुष्ट धनुष्यास शंकरानें सज्य केलें असता ब्रह्मर्षि संतुष्ट झाले व त्यांनीं शंकराची मनानें स्तुति केली. त्या धनुष्यामुळेंच महेश्वर पिनाकी या नावानें प्रसिद्ध झाला. त्या धनुष्याचा गुण शेष झाला. बाण इंद्र झाला ३७-४०. त्या बाणाचें पंख वह्नि व वायु झालें व त्याचें शल्य सनातन विष्णु झाला. त्या बाणाच्या योगानें दैत्यांची एक कोटि संख्या अंतरिक्षामध्यें मरून गेली ! त्या मायी राक्षसाने रक्षिलेल्या त्रिपुराचें शंकरानें भस्म केलें. त्या घोर नगराचें भस्म झालें असता लोकपति ब्रह्मदेव ४१,४२, महारुद्र जो पिनाकी त्यास, रवि मीन राशीमध्यें स्थित असता, शशिमंडलाचा राजा करिता झाला. तेव्हा त्या तामसांतरामध्यें देवांस त्याचे अधिकार प्राप्त झाले. सूत झणतातः— हें ऐकून पिनाकी आपल्या मुखातून आपला उत्तम अंश काढून त्यास हिमालयपर्वतावरील हरद्वारीं उत्पन्न करिता झाला झणजे तेथेंच मच्छंदनामक शंभुपरायण जो योगी

योगी शंभुपरायणः ४५ गोरक्षस्य गुरुर्यो वै तन्मुखे तेज आविशत् । रंभा नाम्नैव तत्रैव स्वर्वेश्या कामरूपिणी ४६ मच्छन्दं च वशीकृत्य बुभुजे स्मरविह्वला । तयोस्सकाशाद्वै जातस्स पुत्रो रुचिराननः ४७ नाथशर्मेति विख्यातो विद्वाञ्छ्रेष्ठतरोऽभवत् । स जित्वा पण्डितान्भूमौ पुरीं काशीं समागत ४८ शंकराचार्यविजितस्तस्य शिष्यो बभूव ह । बृहस्पतिरुवाच ॥ चाक्षुषान्तरसप्राप्ते द्वादशे द्वापरे युगे ४९ क्षत्रियैस्तालजङ्घीयैर्ब्राह्मणा भृगुवंशजाः । विनाशिताः कुरुक्षेत्रे गृहीत्वा लक्षन बहु ५० बुभुजुर्बलवन्तस्ते दैत्यपक्षा महाधमाः । कस्यचित्तु मुनेः पत्नी गुर्विणी च भयान्विता ५१ हिमतुंगे समागम्य तद्गर्भं मुनिसंभवम् । शतवर्षं दधौ देवी तपसा ज्ञानरूपिणी ५२ मातुरूरू सुतो भित्त्वा ततो जातो महीतले । तेजसा तस्य पुत्रस्य भस्मीभूतमभूज्जगत् ५३ तदा तु सकला देवाः पुरस्कृत्य प्रजापतिम् । यत्र स्थितश्च वै बालस्समाजग्मुर्भयातुराः ५४ पितृभिर्देवतैर्बालस्समाज्ञातो हिमाचले । लोकनाशकरं तेजो जलमध्ये स चाक्षिपत् ५५ जलदेवी च वडवा भूत्वा तत्तेज उत्तमम् । पीत्वा ववाम तत्रैव पीडिता रौद्रतेजसा ५६ तदागत्य स्वयं ब्रह्मा त्रिकुटो यत्र वै गिरिः । तदध सागरे घोरे स्थापयामास लोकपः ५७ मेषगे भुमणौ प्राप्ते शशिमण्डलगे प्रभुम् । तं रुद्र स चकाराशु परमेष्ठी पितामहः ५८ ऊरुजातात्स्मृतो वीर्यो दहनो लोकदाहृतः । वडवामुखतो जातो वाडवो नाम स प्रभुः ५९ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा तु दहनो गुरुवाक्यं मनोहरम् । स्वमुखात्तेज उत्पाद्य कुरुक्षेत्रं चकार ह ६० सारस्वतरय विप्रस्य गृहे जातस्तु वै शिवः । क्षेत्रसंज्ञेति विख्यातो विद्वच्छ्रेष्ठो

होता व जो गोरखाचा गुरु होता त्याच्या मुखामध्ये ते तेज प्रविष्ट झाले. तेव्हा रंभानामक कामरूपी अप्सरा तेथे आली व त्या मच्छंदास आपल्या वश करून कामविह्वल झालेल्या तिनें त्याचा भोग घेतला. त्याच्यापासून एक अतिसुंदर पुत्र झाला ४३-४७. तो नाथशर्मा या नावाने प्रसिद्ध असे. तो सर्वांहून अधिक विद्वान् झाला. भूमीवरील सर्व विद्वानास जिंकून तो काशीनगरीं आला. तेथें शंकराचार्यांनी त्यास जिंकिले व तेथें तो त्याचा शिष्य झाला. बृहस्पति ह्मणतातः— चाक्षुषांतरांतील बारावे द्वापरयुग लागले असता ४८,४९ बलवान् तालजंघीय क्षत्रिय कुरुक्षेत्रांतील भृगुवंशामध्ये उत्पन्न झालेल्या ब्राह्मणास मारून व त्यांचे पुष्कळ धन घेऊन त्याचा उपभोग घेते झाले. ते महाअधम दैत्यपक्षाचे होते. कोणा एका मुनीची गर्भिणी पत्नी भयभीत होऊन हिमालयाच्या शिखरावर गेली व त्या ज्ञानरूपी देवीने मुनीपासून उत्पन्न झालेल्या गर्भास तपाच्या योगाने शंभर वर्षे धारण केलें. तेव्हा तो पुत्र मातेची मांडी फोडून भूलोकी उत्पन्न झाला त्या पुत्राच्या तेजानें जग भस्मीभूत झाले. तेव्हा सर्व देव प्रजापतीस पुढें करून भयभीत होत्साते जेथें तो बालक होता तेथें आले ५०–५४. तेव्हा पितर व देव यांनी ज्यास आज्ञा केली आहे असा तो हिमालयाचलावर राहणारा बालक लोकांचा नाश करणारें तें तेज जलामध्ये टाकिता झाला ५५. तेव्हा जलदेवी घोडी झाली व तिने तें उत्तम तेज प्राशन केले. पण त्या भयकर तेजान जिला पीडा झाली आहे अशा त्या घोडीनें त्यास ओकून टाकिलें ५६. तेव्हा स्वतः ब्रह्मदेव आला व जेथे त्रिकुट पर्वत होता त्याच्याखालीं घोर सागरामध्ये तो लोकपाल त्याची स्थापना करिता झाला; व त्या परमेष्ठी पितामहाने सूर्य मेषराशीस आला असता लागलेंच त्या रुद्रास त्या चद्रमंडलातील प्रभु केले ५७,५८. ऊरू ह्मणजे मांड्या त्यातून उत्पन्न झाल्यामुळे त्यास और्व असें ह्मटले व लोकांस दहन केल्यामुळे त्यास दहन ही संज्ञा प्राप्त झाली. आणि तो वडवेच्या मुखातून उत्पन्न झाल्यामुळे त्या प्रभूचें वाडव असें नांव पडलें. गुरूचे हे मनोहर वाक्य ऐकून दहनाने आपल्या मुखांतून तेज उत्पन्न केले व तो शंकर कुरुक्षेत्रामध्ये येऊन सारस्वत

बभूव ह ६१ शंकराचार्यमागम्य शिष्यो भूत्वा पराजितः । ब्रह्मचर्यव्रती काश्यां तस्थौ शंभुपरायणः ६२ बृहस्पतिरुवाच ॥ एकार्णवे पुरा जाते नष्टे स्थावरजंगमे । शताब्दे ब्रह्मणः प्राप्तेऽव्यक्तजन्मनि लोकगे ६३ अव्यक्तं प्रकृतिर्मायां पीत्वा सर्वजलं मुदा । महाकाली स्वयमूर्तिरन्धकारस्वरूपिणी ६४ एका बभूव तत्रैव प्राकृते कल्पदारुणे । चतुर्युगानां कोटीनां त्रयाणां दारुणे लये ६५ षष्टिलक्षयुतानां च कालस्तत्र व्यतीतवान् । तदा सा प्रकृतिर्देवी नित्यशुद्धा सनातनी ६६ स्वेच्छया च स्वरूपं स्व महागौरमनुत्तमम् । पञ्चवक्त्र दशभुज त्रिनेत्र च दधौ शिवा ६७ भालनेत्रेण सा माता सुरूपं तेजा ददर्श ह । शून्यभूत पर नित्यमविकारि निरञ्जनम् ६८ तदा दिक्षु गत ब्रह्म स्वभुजैः प्रकृतिः पुरा । गृहीतुमिच्छती तत्र न समर्था बभूव वै ६९ विस्मिता प्रकृतिर्माता पञ्चवक्त्रैः सनातनम् । तुष्टाव परया भक्त्या चिर कालात्परात्परम् ७० धातुशब्दैः पादमुखजैः प्रत्ययैर्याम्यवक्त्रजैः । सुब्विभक्तिमयैः शब्दैर्मुखपश्चिमजैः स्थिरा ७१ तिङ्विभक्तिमयैर्नित्या मुखोत्तरमयैर्मुदा । नभोवक्त्रमयैः शब्दैर्वर्णमात्रैर्निरंजनम् ७२ सच्चिदानंदघनक पूर्णब्रह्म सनातनम् । तुतोष तत्तु सर्वज्ञ पञ्चवक्त्रेषु चागमत् ७३ पुरुषत्वमभूद्ब्रह्म स्वयभू नाम चाभवत् । अव्यक्तात्प्रकृतेर्जातोऽव्यक्तजन्मा हि स स्मृतः ७४ तस्य हेतोः स्वयं देवी वरदा लोकरूपिणी । महालक्ष्मीश्च पूर्वाङ्गीजाता षोडशलोकिनी ७५ अष्टादशभुजास्तस्या लोकरक्षणतत्पराः । दृष्ट्वा तदद्भुतं रूपं स्वयभूर्विस्मयान्वितः ७६ भविश्य बहुधा भूत्वा नान्त तस्या

ब्राह्मणाच्या गृहीं उत्पन्न झाला. तो क्षेत्रशर्मा या नावानें प्रसिद्ध व विद्वच्छ्रेष्ठ झाला ५९–६१. पुढें तो शंकराचार्यांकडे आला व त्यानी त्यास जिंकिलें असतां त्यांचा शिष्य झाला नंतर काशीमध्यें ब्रह्मचर्ययुक्त व शंभुपरायण होऊन तो राहिला. बृहस्पति ह्मणतात— पूर्वी ब्रह्मदेवाची शंभर वर्षे झाली असतां व तो अव्यक्तजन्मा लोकांमध्यें गेला असतां स्थावरजंगमाचा नाश झाला व सर्व जलमय होऊन एकच समुद्र झाला. अव्यक्त, प्रकृति किंवा माया असें जिला ह्मणतात ती स्वयंभू, अंधकारस्वरूपिणी महाकाली आनंदानें ते सर्व जल पिऊन त्या भयंकर प्राकृत कल्पामध्यें एकटीच राहिली. त्या भयंकर लयामध्यें तीन कोटि चतुर्युगे व साठ लक्ष वर्षे इतका काल गेला. तेव्हा ती नित्यशुद्धस्वरूपी व सनातनी देवी प्रकृति आपल्या इच्छेनें आपले अत्युत्तम स्वरूप धारण करिती झाली. ते अतिगोरे होते. पांच मुखें, दहा भुजा व तीन नेत्र त्या शिवेनें धारण केले ६२—६७. त्या मातेनें भालनेत्रानें शुभ तेज पाहिलें. व शून्यभूत, श्रेष्ठ, नित्य, अविकारी, निरंजन व सर्वव्यापी असें जें ब्रह्म त्यास आपल्या भुजांनीं धारण करण्याची इच्छा करणारी ती प्रकृति प्रयत्न करूं लागली. पण ती त्यास धरण्यास समर्थ झाली नाही तेव्हा ती प्रकृति माता पांच मुखांनीं त्या परात्पर सनातन ब्रह्माची मोठ्या भक्तीनें दीर्घ काल स्तुति करिती झाली ६८–७०. पूर्वेकडील मुखांनीं निघालेल्या धातुशब्दांनीं, दक्षिणेकडील तोंडातून निघालेल्या प्रत्ययांनीं, पश्चिमेकडील मुखांनी निघालेल्या सुब्विभक्तिमय शब्दांनीं, उत्तरेकडील मुखातून निघालेल्या तिङ्विभक्तिमय शब्दांनी व ऊर्ध्व मुखातून निघालेल्या वर्णमय शब्दांनी ती नित्य व अचला देवी निरंजन, सच्चिदानंदघन, पूर्ण व सनातन ब्रह्माची स्तुति करूं लागली असतां तें सर्वज्ञ ब्रह्म संतुष्ट होऊन पांची मुखामध्ये आलें ७१—७३. त्याबरोबर ते ब्रह्म पुरुषरूप झालें व त्याचें स्वयंभू हें नांव पडलें व अव्यक्त प्रकृतीपासून उत्पन्न झाल्यामुळें त्यास अव्यक्तजन्मा असें झटलें आहे ७४. त्याच्याकरितां ती वर देणारी लोकरूपिणी देवी स्वतः पूर्वांगीपासून महालक्ष्मी झाली. ती षोडशलोकयुक्त असून ७५ तिच्या अठरा भुजा लोकरक्षणामध्यें तत्पर होत्या. तें तिचे

जगाम ह । बृहत्वाद्बृंहणत्वाच्च ब्रह्मा नामेति विश्रुत. ७७ श्रमितो भगवान्ब्रह्मा सत्यलोकमुप स्थितः । मखेभ्य उद्भवैर्देवैर्वेदैस्तुष्टाव शंकरम् ७८ चिर काल तदाद्रौ नर्दानदसमुद्भवः । एकार्णव तदा जात शेत तत्र स्वय प्रभ ७९ सहस्रयुगपर्यन्तमुषित्वाऽव्यक्तरूप स्वयम् । सत्यलोकमुपागम्य पुन सृष्टिं चकार ह ८० अनन्ताः सृष्टयश्चास्मिन्गणरूपा पृथक्पृथक् । तास्विदंकरभत्सर्वं महालक्ष्मीमय जगत् ८१ दृष्ट्वा बहुत्व सृष्टानां महालक्ष्मी सनातनी । विस्मिताऽभच्च सर्वज्ञ भगवन्तमुपायथौ ८२ नत्वावाच्च वचो रम्य कृष्णमव्यक्तमङ्गजम् । भगवन्नित्यशुद्धात्मन्नाद्यात्मन्महतां ८३ कथ तेषां च गणना कर्तव्या च मया सदा । इति श्रुत्वा वचस्तस्या द्विधाभूतश्च सोऽव्यय. ८४ पूर्वार्द्धात्तु रक्ताङ्ग परार्द्धाद्गौरस्तवान् । चतुर्भुजस्य रक्ताङ्गा गौरवर्णश्चतुर्भुज. ८५ सर्वसृष्टिगणानां च स ईशो भगवान्भव. । गणेशो नाम विख्यातश्चेश्वरस्य तु विश्रुत ८६ परश्चतुर्भुजा या वै योगिन्योयो निरंजन । एकदा त्रिपुरो जात शिव. पार्वतिवल्लभ ८७ गणेश पूजयामास महस्रब्दं प्रयत्नत । तदा प्रसन्नो भगवान्गणेश सर्वपूजक ८८ वर वरयते प्राह पार्वतीसहित हरम् । प्रसन्नात्मा भव साक्षा-च्छुभाव च शिवस्यधी ८९ शिव उवाच ॥ नमो विष्णुस्वरूपाय गणेशाय परात्मने । चतुर्भुजाय रक्ताय यज्ञपुरुषकाय च ९० विघ्नहर्त्रे जगद्धर्त्रे सर्वानन्दप्रदायिने । सिद्धीनां पतये तुभ्य निधीनां पतये नम ९१ प्रसन्नो भव देवेश पुत्रो भव मम प्रिय. । इति श्रुत्वादिपूज्यस्तु गणेशो भक्तव-

अशा स्वरूप पाहून स्वयम् आश्चर्यचकित झाला. मग आपले अनेक प्रकारचे रूप करून तिथे अधिष्ठान केले, पण त्याला तिथे अंत लागला नाही. तो फार मोठा व महान् झाल्याचे त्याच वेळी असे नाव पडले ७६ ७७ तो भगवान ब्रह्मदेव ध्यान लावून व सत्य लोकाला सोडून गेल्यावर देवांनी मुखातून निर्माण झालेल्या वेदांनी शंकराची स्तुति केली ७८ जेव्हा बराच काळ ध्यान त्याच्या अंगातून नर्दा व नंदा यांचा उद्भव झाला त्यांच्यापासून जन्मला व एका समुद्राप्रमाणे झाला. तेव्हा तेथे तो स्वयंप्रभु सहस्र युगांपर्यंत राहून नंतर तो अव्यक्तजन्मा स्वतः सत्यलोकास आला व पुनरपि सृष्टि करिता झाला ७९ ८० त्याच्या सर्व रूपरूप भिन्न भिन्न अनेक सृष्टि झाल्या. त्याच्या ध्यानात सर्व जगत् एक व महालक्ष्मीमय झाले ८१ अनेक सृष्टि झाल्या असे पाहून सनातनी महालक्ष्मी आश्चर्यचकित झाली व सर्वज्ञ जो भगवान अव्यक्तजात कृष्ण त्याच्याकडे येऊन त्या नमस्कार करून असे रम्य वचन बोलली " हे भगवन् हे नित्यशुद्धरूप ईश्वर, नर असल्यास निर्माण झाले आहेत तेव्हा मी सर्वदा यांची गणना कशी करावी ?" हे तिचे वचन ऐकून तो अव्यय देवाधिदेव ८३ ८४ तो पुढच्या अंगाने रक्त वर्णाचा व मागच्या अंगाने गौररूप झाला तो रक्तांग देव चार भुजांचा असून तो गौरवर्णही चतुर्भुज होता सर्व सृष्टिसमुदायाचा तो भगवान भव ईश होय. गणेश या नावाने तो विख्यात असून ईश्वराचा नावानेही तो प्रसिद्ध झाला ८५.८६ जो चतुर्भुज व श्रेष्ठ होता तो निरंजन, व योगिनींचा ध्यान करण्यास योग्य होता एकदा त्रिपुरासुर पार्वतीवल्लभ झाल्यावर शिवाने एक सहस्र वर्षे मोठ्या प्रयत्नाने गणेशाचे पूजन केले तेव्हा सर्वांना त्याची पूजा केली आहे असा तो भगवान गणेश प्रसन्न झाला व पार्वतीसह शंकराला " वर माग " असे तो म्हणाला तेव्हा त्याच्या स्तुति करून प्रसन्न झाले आहे व त्याची बुद्धि अतिनम्र आहे असा तो साक्षात भव त्याची स्तुति करू लागला ८७ ८९. शिव म्हणाले—नित्य परात्मा परमात्मा गणेशास नमस्कार असो चतुर्भुजांनी युक्त असलेल्या, यज्ञ पुरुषरूप करणाऱ्या, विघ्नांचा घात करणाऱ्या, जगाचे पोषण करणाऱ्या व सर्वांस आनंद

सलः ९२ पार्वत्याः सर्वदेहात्तु तेजोभूतात्समुद्भवः । तदा कैलासशिखरे सर्वे देवास्समवासवाः ९३ मंगलार्थमुपाजग्मुर्देवदेवस्य मन्दिरे । महोत्सवश्च तत्रासीत्सर्वलोकसुखावहः ९४ एतस्मिन्नन्तरे तत्र सूर्यपुत्रः शनिः स्वयम् । क्रूरदृष्टिः समायात कालात्मा देवमण्डपं ९५ तस्य दर्शनमात्रेण स बालो विशिरा ह्यभूत् । हाहाकारो महांश्चासीत्कैलासे गुह्यकालये ९६ तच्छिरश्चन्द्रलोके वै तुलासंस्थे दिवाकरे । सप्तविंशदहिनान्यैव प्रकाशयति भूतले ९७ निंदितो दैवतैस्तत्र शनिर्जनभयंकरः । गजस्य मस्तकं छित्त्वा दन्तैकेन रागरूपि यत् ९८ तच्छिशोः कंधरे रक्तेऽरोपयत्सूर्यसंभवः । गजयोन्या स्तुतो ब्रह्मा कर्कटस्य तदा शिरः ९९ समारोप्य तु तद्योनिः कर्कटो विशिरीकृतः । एव गजाननो जातो गणेशश्चेश्वरः स्वयम् १०० सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गणेशस्तु गुरोर्वचनमुत्तमम् । स्वमुखात्स्कधमुत्पाद्य काश्यां जातः स चेश्वरः १ दैवज्ञस्य द्विजस्यैव पुत्रो भूत्वा शुभाननः । ढुण्ढिराजस्ततो नाम्ना प्रसिद्धोऽभून्महीतले २ जातकाभरणं नाम ज्योतिःशास्त्र फलात्मकम् । कृत्वा स वेदरक्षार्थे शङ्कराचार्यमागमत् ३ शिष्यो भूत्वा प्रसन्नात्मा गुरुसेवापरोऽभवत् । इति ते कथित विप्र ढुण्ढिराजो यथाऽभवत् १०४ [४८२९] इति श्रीभविष्ये महापुराणे चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये भारतीशगोरखनाथक्षेत्रसंभवढुण्ढिराजसमुत्पत्तिवर्णनो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

बृहस्पतिरुवाच ॥ षोडशाब्दे च संप्राप्ते ब्रह्मणोऽव्यक्तजन्मनः । स उषित्वा च कमले स्थितः सृष्ट्यर्थमुद्यतः १ एतस्मिन्नन्तरे वक्त्रात्समुद्भूता च शारदा । दिव्याङ्ग सुन्दर तस्या दृष्ट्वा ब्रह्मा

देणाऱ्या तुज सिद्धिपतीस व निधिपतीस नमस्कार असो ९०, ९१. हे देवाधिदेवा, प्रसन्न हो. तूं माझा प्रिय पुत्र हो. हें ऐकून ज्याची सर्वांच्या पूर्वी पूजा होत असते असा भक्तवत्सल गणेश पार्वतीच्या सर्व देहातून तेजोरूप होऊन उत्पन्न झाला. तेव्हा मंगल करण्याकरिता इंद्रासहवर्तमान सर्व देव कैलासशिखरावर देवाधिदेवाच्या मंदिरीं आले. त्या वेळीं सर्व लोकास सुख देणारा महोत्सव तेथे झाला ९२-९४. इतक्यात ज्याची दृष्टि क्रूर आहे असा स्वतः कालरूपी सूर्यपुत्र शनि त्या देवमंडलामध्यें आला ९५. पण त्यास पाहिल्याबरोबर तें बालक मस्तकरहित झालें. तेव्हा कैलासपर्वतावरील गुह्यकालयामध्यें मोठा हाहाकार झाला ! ९६. तें मस्तक चंद्रलोकीं गेलें, सूर्य तुलाराशिमध्ये असता भूलोकीं सत्तावीस दिवस प्रकाश पाडीत राहिले ९७. जनास भय देणाऱ्या शनीची देवांनीं निंदा केली. तेव्हा शनीनें एकदंत आणि रक्तवर्ण यानीं युक्त असलेले गजाचे मस्तक तोडून तें त्या पुत्राच्या रक्तवर्ण मानेवर ठेविलें. पण इकडे गजजातीनें ब्रह्मदेवाची स्तुति केली असता खेकड्याचें मस्तक त्याला चिकटवून त्याचे कर्कट(खेकडा) मस्तकवाचूनच केला. याप्रमाणें स्वतः ईश्वर गणेश गजानन झाला ९८-१००. हें गुरूचें उत्तम वचन ऐकून गणेश आपल्या मुखातून स्कंधास उत्पन्न करिता झाला व तो ईश्वर काशीमध्ये दैवज्ञ ब्राह्मणाचा सुंदर पुत्र होऊन निर्माण झाला व तदनंतर तो भूलोकीं ढुंढिराज ह्मणून प्रसिद्ध झाला १०१,१०२. वेदाच्या रक्षणाकरिता जातकाभरण या नावाचा फलस्वरूप ज्योतिषशास्त्राचा ग्रंथ करून तो शंकराचार्याकडे आला १०३ व त्याचा शिष्य होऊन ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा तो गुरुसेवेमध्यें तत्पर होऊन राहिला. हे ब्राह्मणा, याप्रमाणें ढुंढिराज कसा झाला हें मीं तुला सांगितले १०४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्यु० प्रतिस० कालियु० चतुर्थखंडातील भारतीशादिकाच्या उत्पत्तीविषयीं बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥

बृहस्पति ह्मणतात.— अव्यक्तापासून ज्याचा जन्म झाला आहे अशा ब्रह्मदेवास सोळावें वर्ष लागलें असता तो कमलामध्ये राहून सृष्टीकरिता प्रयत्न करूं लागला १. इतक्यात त्याच्या मुखातून

स्मरातुरः १ बलाद्गृहीत्वा तां कन्यामुवाच स्मरपीडितः । रतिं देहि महाभागे रक्ष मां काम-विह्वलम् २ इति श्रुत्वा तु सा माता रुषा प्राह पितामहम् । पञ्चवक्त्रोऽयमशुभा न योग्यस्तव ऊन्धरे ४ चतुर्वक्त्रो वेदमयो योग्यस्सर्वेश्वरे त्वयि । इत्युक्त्वाऽन्तर्दधे माता ब्रह्मा क्रोधान्वितोऽभ-वत् ५ तस्य कोपाग्निना तोयं शुष्कभूतमभूद्भुवि । शान्तिभूतं च तत्कोपे रुद्रजातो भयंकरः ६ भैरवो नाम विख्यातः कालात्मा सत्ववाहनः । स्वनखैश्च नृसिंहाभैः क्षिप्त्वा तत्पञ्चमं शिरः ७ जगर्ज बलवान्रुद्रः शंकरो लोकशंकरः । भयभीतस्तदा ब्रह्मा भैरवं शरणं ययौ ८ नाथ नः पापभूतानां धियो योऽसौ प्रचोदयात् । ब्रह्मभूतमहं स्वामिन्वरेण्यं त्वामुपागतः ९ सवितुस्तद्व-रेण्यं यद्भर्गो देवस्य धीमहि । इति श्रुत्वा स भगवान्भैरवो लोकविश्रुतः १० गाढमूचे रुरावाशु खात्पेतुश्चाश्रुबिन्दवः । ततो वृक्षास्समुद्भूता रुद्राक्षाणां पृथक्पृथक् ११ शिवो ब्रह्मवधाद्भीतस्त-त्कपालं गृहीतवान् । कपाली नाम विख्यातं भैरवस्य तदा ह्यभूत् १२ सर्वलोकेषु पूतानि यानि चायतनानि च । तानि तान्येव गत्वाशु शुद्धो नाभूच्छिवंकर १३ एकदा तेषु वृक्षेषु संस्थितो भगवान्हरः । तदा ब्रह्मवधे दोषस्तत्कृतो दूरमागतः १४ ततःप्रभृति वै शंभुर्धृत्वा रुद्राक्षमुत्तमम् । पुरीं काशीं समायातः कपालस्तेन मोचितः १५ कपालमोचनं नाम तीर्थं जातमघापहम् । एत-स्मिन्नन्तरे ब्रह्मा सर्वदेवसमन्वितः १६ समागत्य महादेवं तुष्टाव स्तुतिभिः स्तवैः । मकरस्थे दिवा-नाथे शशिनश्चेश्वरे शुभम् १७ कपालिनं महारुद्रं चकार भगवान्विधिः । सूत उवाच ॥ इति

शारदा उत्पन्न झाली. तिचें दिव्य व सुंदर अंग पाहून ब्रह्मदेव कामातुर झाला २. त्या कन्येस बलात्कारानें धरून कामानें पीडित झालेला तो तिला म्हणाला " हे अतिमत्त स्त्रिये, मला रति दे व कामविह्वल झालेल्या मजें रक्षण कर. " हें ऐकून ती माता रागाने त्या पितामहास म्हणाली " हें तुझें पाचवें अशुभ मुख तुझ्या मानेवर असणें योग्य नाहीं ३,४. सर्वेश्वर अमा जो तूं त्या तुला चार मुखेंच बरीं आहेत. " असें म्हणून ती माता गुप्त झाली. व ब्रह्मदेव कोपाने संतप्त झाला ५. त्याच्या कोपाग्नीनें भूलोकीचें जल सुकून गेलें. नंतर त्याचा कोप शांत झाला असता भैरव या नावानें प्रसिद्ध असलेला भयंकर कालरूपी सत्ववाहन रुद्र झाला व त्यानें नृसिंहासारख्या आपल्या नखांनीं त्याचें पाचवें शिर उडविलें व लोकांचें कल्याण करणारा तो बलवान् रुद्रसंज्ञक शंकर गर्जना करूं लागला. तेव्हा ब्रह्मदेव भयभीत झाला व तो भैरवास शरण गेला ६–८. " हे नाथ, हे स्वामिन्, आह्मा पाप्यांच्या बुद्धीस जो हा प्रेरणा करितो तो तूं ब्रह्मरूप तेज अहेस व तें तेज सेव्य आहे. यास्तव, अशा तुला मी शरण आलों आहें. जगन्निर्माण करणाऱ्या देवाचें आश्रय करण्यास योग्य असें जें तेज आहे त्याचें आह्मी ध्यान करितो " हें त्याचें वचन ऐकताच तो लोकप्रसिद्ध भगवान् भैरव मोठ्याने अतिशय रडूं लागला. त्याबरोबर अंतरिक्षातून अश्रुबिंदु पडले. त्यांच्यापासून रुद्राक्षाचे भिन्न भिन्न वृक्ष उगवले ९–११. नंतर ब्रह्मवधामुळें भ्यालेल्या शंकराने ब्रह्मदेवाचें कपाल हातीं घेतलें. त्यामुळें त्या भैरवाचे " कपाली " असे नाव प्रसिद्ध झालें १२. सर्व लोकामध्यें जीं जीं पवित्र स्थानें होतीं तेथें तेथें तात्काल जाऊनही तो शंकर शुद्ध झाला नाहीं १३. एकदा त्या वृक्षांच्याखालीं भगवान् हर बसला असता त्या वेळीं ब्रह्मवधामध्ये झालेला दोष त्यास सोडून दूर जाऊन उभा राहिला १४. तेव्हापासून शुभ उत्तम रुद्राक्ष धारण करूं लागला. नंतर काशीनगरी-मध्यें येऊन त्यानें ते ब्रह्मकपाल सोडिलें. त्यामुळें तेथें पापनाशक कपालमोचन तीर्थ झालें. इतक्या-मध्ये सर्व देवासहवर्तमान ब्रह्मदेव तेथें येऊन महादेवाची उत्तम स्तोत्रांनीं स्तुति करूं लागला. भगवान् ब्रह्मदेवाने त्या कपाली महारुद्राम सूर्य मकरस्थ असता चंद्राचा शुभ ईश्वर केलें. सूत

श्रुत्वा गुरोर्वाक्यं कपाली भैरवः शिवः १८ स्वमुखात्स्वांशमुत्पाद्य कार्श्यां जातो ह्ययोनिजः। कपालमोचनात्कुण्डात्समाम्भ्य महीतले १९ यतिरूपो वेदनिधिर्भैरवो नाम विश्रुत। अघोरं पंथकठिन स्वशिष्यात्समचोदयत् २० शङ्कराचार्यमागम्य शिष्यो भूत्वा स भैरवः। डामरं नाम वै तन्त्रं मन्त्रभूत चकार ह २१ कीलिता ये तु वै मंत्रास्तेन चोत्कीलितीकृताः। बृहस्पतिरुवाच॥ मन्दोदरी मयसुता त्रिपुराधिपतेः स्वसा २२ त्रिपरे तु यदा नष्टे महाविष्णु सनातनम्। भक्त्या तुष्टाव सा देवी प्रत्यहं गुप्तभाविनी २३ भक्तिभावात्ततो योगं हरौ प्राप्य महोत्तमम्। विंध्याद्रिकन्धरं घोरं तत्रैवान्तरधीयत २४ चतुर्युगं च द्विशतं तस्या जात समाधितः। वैवस्वतेऽन्तरे प्राप्ते द्वादशे चैव कृतयुगे २५ पुलस्त्यो ब्रह्मणः पुत्रो विश्रवा रोषतोऽभवत्। शताब्दं च तपस्तप्त्वा विश्रवा नाम यो मुनिः २६ सुमालिनोऽस्य दैत्यस्य सुतां वै कैकसीं मुदा। समुद्वाह्य विधानेन पुलस्त्यस्य च विश्रवाः २७ कदलीविपिने रम्ये गन्धमादनपर्वते। स रेमे च तया सार्द्धं विश्रवा भगवानृषिः २८ रावण कुम्भकर्णश्च तयोर्जातौ हि राक्षसौ। रावणो मातृभक्तश्च पितृभक्तस्ततोऽनुजः २९ सहस्राब्दं तपो घोरं चक्रतुस्तौ वरार्थिनौ। तदा प्रसन्नो भगवान्परमेष्ठी पितामहः ३० ददौ ताभ्यां वरं रम्यमजेयं देवदानवैः। तौ तु लब्धवरौ क्रुद्धौ पुष्पकं यानमुत्तमम्३१ गृहीत्वा च बलाद्वीरौ ययुधाते परस्परम्। ताभ्यां विनिर्जिता देवास्त्यक्त्वा स्वर्गं सुखप्रदम् ३२ पार्थिवैः पूजयामासुः शिवकैलासस्थिताः। एकादशाब्दमाराध्य ते देवा गिरिजापतिम् ३३ शंकराच्च वरं प्राप्य निर्भयाश्च तदाऽभवन्। शिवोऽपि च स्वपूर्वार्द्धाज्जातो वै

ह्मणतातः—असें गुरुवाक्य ऐकून कपाली भैरव शिव १९—१८ आपल्या मुखातून आपला अंश उत्पन्न करून काशीमध्यें अयोनिसंभव झाला. कपालमोचन कुंडातून भूलोकीं येऊन तो नित्य व वेदनिधिरूप देव भैरव या नावाने प्रसिद्ध झाला. त्यानें अघोर या नावाचा कठिण पथ आपल्या शिष्यास सांगितला १९, २०. पुढे तो भैरव शंकराचार्यांकडे येऊन त्याचा शिष्य झाला. त्यानें डामरनामक मंत्ररूप तंत्र केलें. जे मंत्र कीलित होते त्यांच्या योगानें त्यानें उत्कीलित केलें. बृहस्पति ह्मणतातः—त्रिपुरासुराची भगिनी व मयासुराची कन्या जी देवी मंदोदरी ती त्रिपुर नष्ट झाला असता सनातन महाविष्णूची प्रतिदिनी गुप्त भाव ठेवून भक्तीनें स्तुति करीत असे. त्या भक्तिभावामुळेंच हराच्या ठायी तिचे अत्युत्तम ऐक्यसाम्य झाले व ती विंध्याद्रीच्या घोर गुहेमध्यें समाधिस्थ होऊन राहिली २१-२४. तिला समाधीमध्ये राहून दोनशें चतुर्युगें निघून गेल्यावर वैवस्वत मन्वंतरातील बारावे कृतयुग लागले असता ब्रह्मदेवाचा पुलस्त्यनामक पुत्र, ज्याला विश्रवा असेंही ह्मणत असतात तो त्याच्या क्रोधापासून उत्पन्न झाला. विश्रवा असें ज्याचें नांव होतें अशा त्या मुनीनें शंभर वर्षें तप केले २५,२६. पुढे सुमालीनामक दैत्याची कैकसी ह्मणून जी कन्या होती तिच्याशीं आनंदाने यथाविधि या पुलस्त्य व विश्रवसनामक ब्राह्मणाने विवाह केला २७. नंतर गंधमादनपर्वतावरील रम्य कदलीवनामध्ये तो विश्रवानामक भगवान् ऋषि तिच्याशीं रममाण झाला २८. त्यांच्यापासून रावण व कुंभकर्ण हे दोघे राक्षस झाले. रावण मातृभक्त व त्याचा धाकटा भाऊ पितृभक्त होता २९. वराची इच्छा करणाऱ्या त्या दोघांनीही सहस्र वर्षें घोर तप केले. तेव्हां भगवान् परमेष्ठी पितामह प्रसन्न झाला ३० व त्याने त्या उभयतास देव व दानव याच्याकडून रम्य अजेयत्व दिलें. तेव्हा ब्यांस वर मिळाला आहे असे ते दोघे रागावले व त्यानीं उत्तम पुष्पक विमान बलात्कारानें घेतले व ते देवांशीं लढूं लागले. त्या दोघा वीरांनीं देवांचा पराजय केला. तेव्हा सुख देणाऱ्या स्वर्गास सोडून देव शंकराच्या कैलासपर्वतीं येऊन राहिले व त्यांनीं पार्थिवानीं शिवपूजा केली. त्या

मानसोत्तरे ३४ गिरौ यत्र स्थिता देवी गौतमस्य तनूद्भवा । अंजनी नाम विख्याता कीशकेसरिभोगिनी ३५ रौद्र तेजस्तदा घोर मुख केसरिणा ययौ । स्वराहुरः कपीन्द्रस्तु बुभुजे तां शुभाननाम् ३६ एतस्मिन्नन्तरे वायु कपीन्द्रस्य तनौ गतः । वाञ्छितामञ्जनीं शुभ्रां रमयामास वै बलात् २ द्वादशाब्दमतो जात दम्पत्योर्मैथुनस्थयोः । तदनु भ्रूणमासाद्य वर्षमात्रं हि सादधत् ३८ पुत्रो जातस्स रागात्मा स रुद्रो वानराननः । कुरूपाच्च ततो मात्रा क्षिप्तोऽभूद्रिरधः ३९ बलादागत्य बलवान्दृष्ट्वा सूर्यमुपस्थितम् । विलोक्य भगवान्रुद्रो देवस्तत्र समागतः ४० वज्रसंताडितो वापि न त्यजत्तं रविम् । भयभीतस्तदा शीघ्रमुस्सुर्यं त्राहीति जल्पितः ४१ श्रुत्वा तदार्तवचन रावणो लोकरावण । पुच्छे गृहीत्वा तं कीशं मुष्टियुद्धमचीकरत् ४२ तदा तु केसरिसुतो रविं त्यक्त्वा रुषान्वितः । वर्षमात्र महाघोरं मल्लयुद्धं चकार ह ४३ श्रमितो रावणस्तत्र भयभीतस्समभवत । पलायनपरो भूतः कीशरुद्रेण ताडितः ४४ एतस्मिन्नन्तरे प्राप्तो विश्रवा भगवानृषिः । स्तोत्रैर्वेदमयैर्देव तुष्टाव परया गिरा ४५ श्रुत्वा तु तदा रुद्रो रावणं लोकरावणम् । त्यक्त्वा पम्पासरस्तीरे निवास कृतवान्बली ४६ स्थाणुभूतः स्थितस्तत्र स्थाणुर्नाम ततोऽभवत् । हन्यमान सुरान्मुख्यान्रावण लोकरावणम् ४७ हन्यंत मुष्टिभिर्येन हनुमानिति विश्रुतः । तपसा तस्य कीशस्य प्रसन्नो भगवान्विधि ४८ नम्रशीर्षवचन प्राह शृणु रुद्र तपोनिधे । वैवस्वतेऽन्तरे प्राप्ते चाष्टाविंशतमे युग ४९ त्रेतायाः पूर्वचरण रामस्साक्षाद्भविष्यति । तस्य भक्ति

देवानीं गिरिजापतीची अकरा वर्षे आराधना केली असता त्यास शंकरापासून वर प्राप्त झाला व त्यामुळें ते निर्भय झाले. इकडे शिवही आपल्या पूर्वीपासून मानसाच्या उत्तरभागी जेथें गौतमाच्या शरीरापासून उत्पन्न झालेली अंजनीनामक प्रसिद्ध देवी होती तेथें उत्पन्न झाला. ती अंजनी केसरीसंज्ञक वानराची पत्नी होती. असो. तें भयंकर रुद्रतेज केसरीच्या मुखीं गेलें. तेव्हा तो श्रेष्ठ कपि कामाने विह्वल झाला व त्यानें त्या सुंदरीचा भोग घेतला. इतक्यात त्या कपीद्राच्या शरीरामध्य वायु शिरला व त्याला जिची इच्छा झाली होती अशा त्या सुंदर अंजनीशीं बलात्कारानें रममाण झाला. याप्रमाणे क्रीडा करणाऱ्या त्या दंपत्याचीं बारा वर्षे निघून गेलीं. तदनंतर ती अंजनी एक वर्षभर गर्भधारण करिती झाली व नंतर तिला पुत्र झाला तो लाल वर्णाचा होता व तो रुद्र व वानराकृति झाला होता. पण तो कुरूप आहे असें समजून अंजनीनें त्यास पर्वताच्या खालीं लोटून दिलें ३१–३९. पण तो बलवान् आपल्या सामर्थ्यानेच वर आला व सूर्य क्षितिजावर आला आहे असें पाहताच तो भगवान् रुद्र तेथें आला. इंद्रानें त्यास वज्राने ताडनही केलें. पण त्यानें सूर्यास सोडिलें नाहीं. तेव्हा भयभीत होऊन " सूर्याचे रक्षण करा " असे तो बोलू लागला. तें आर्त वचन ऐकून लोकास भय देणारा रावण त्या वानराच पुच्छ धरून मुष्टियुद्ध करू लागला ४०–४२. तेव्हा क्रोधयुक्त झालेल्या त्या केसरीपुत्राने सूर्यास सोडून त्याच्याशीं एक वर्षभर घोर मल्लयुद्ध केलें ४३. तेव्हा थकलेला रावण भयभीत होऊन चोहोकडे पळूं लागला. पण त्या वानररूपी रुद्रानें त्यास पुष्कळ ताडन केलें. इतक्यात विश्रवानामक भगवान् ऋषि तेथें आला व वेदमय स्तोत्रानीं परावाणीनें त्या देवाची स्तुति करू लागला. तेव्हा प्रसन्न झालेल्या रुद्रानें लोकास दुःख देणाऱ्या रावणास सोडिलें. व तो बलवान् पंपासरोवराच्या तीरीं निवास करूलागला. तो तेथें एखाद्या स्तंभासारखा होऊन राहिला. ह्मणून त्यास स्थाणु हें नाव प्राप्त झालें. मुख्य देवास मारणाऱ्या व लोकास दुःख देणाऱ्या रावणास त्यानें मुष्टीनीं प्रहार केला. ह्मणून त्यास हनुमान् हे नाव पडलें. असो; त्या वानराच्या

च तपाप्य कृतकृत्यो भविष्यसि । ५० इति चोक्त्वा ददौ तस्मै चन्द्र भाद्रपकाशकम् । रावणाय प्रियां रम्यां ददौ मन्दोदरीं विधि ५१ नैऋतस्यैव दिक्पालस्य बभूव च रावण. । अल्पायुर्मरण प्राप्तो रामेण हरिरूपिणा ५२ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा स हनुमान्ययौ कदलीवने । देहभूतो महीं प्राप्तो बालशर्मेति विश्रुतः ५३ पुरीं काशीं समायातो यत्र वै मणिकर्णिका । रामपक्षे बाल-शर्मा शिवपक्षे तु शकर ५४ मासमात्रं च शास्त्रार्थमेतयोश्चासीन्महात्तम. । शकराचार्ययतिना बालशर्मा पराजित ५५ शिष्यो भूत्वा च तत्रैव गुरुसेवापरोऽभवत् । यश्चकार तन्त्रमत्र सर्व-जातिकथामयम् ५६ [४८८५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये अयोध्यापथिभरतहनुमज्जन्मरुद्रमाहात्म्यबालशर्मसमुत्पत्तिवर्णनो नाम नवोत्तरशततमोऽध्याय. ॥ १३ ॥

बृहस्पतिरुवाच ॥ इद दृश्यं यदा नासीत्सदसदात्मक च यत् । तदाक्षरमय तेजो व्यापकरूपमचिन्त्यकम् १ न च स्थूल न च सूक्ष्म शीत नोष्ण च तत्परम् । आदिमध्यान्तरहितमनागाकारवर्जितम् २ यागिहृद्य पर नित्य शून्यभूत परात्परम् । एका वै प्रकृतिर्माया रेखा या तदधः स्मृता ३ महत्तत्त्वमयी ज्ञेया तदधश्चाऽधरेखका । रजस्सत्त्वतमोभूता ओमित्येव सुलक्षणम् ४ तत्सद्ब्रह्म पर ज्ञेय यत्र प्राप्य पुनर्भव । क्रियता चेव कालेन तत्रेच्छा समपद्यत ५ अहकार-स्ततो ज्ञानस्तत्तन्मात्रका परा । पचभूतात्मता व्यासज्ञानविज्ञानकात्मत. ६ द्वाविंशज्जडभू-

तपश्चर्येने भगवान ब्रह्मदेव प्रसन्न झाला व नम्रपणे म्हणाला " वा तपोनिधे रुद्रा, ऐक. वैवस्वत मन्वतर लागून अठ्ठाविसाव्या युगातील त्रेतायुगाचा पूर्वचरण सुरू झाला असता साक्षात् राम होईल. त्याची सेवा करून तू कृतकृत्य होशील" ४४ ५०. असे बोलून त्याने भाद्रपदामध्ये प्रकाशित होणारा चेंद्र त्याला दिला. ब्रह्मदेवाने रावणास प्रिय व रम्य मंदोदरी दिली. तो रावण नैर्ऋत दिशेचा दिक्पाल झाला. पण थोड्याच वेळाने हरिरूपी रामचेंद्राच्या हातून तो मरण पावला ५१,५२ असे ऐकून तो हनुमान कदलीवनामध्ये अयोनिसंभव देहधारी झाला व बालशर्मा या नावाने प्रसिद्ध होऊन तो भलोकी जेथे मणिकर्णिका होती त्या काशीपरीमध्ये आला. तो रामपक्षामध्ये बालशर्मा व शिवपक्षा-मध्ये शकर होता ५३,५४ त्याचा व शकराचार्यांचा एक मासपर्यंत फार उत्तम शास्त्रार्थ झाला पण शकराचार्य यतीने बालशर्माचा पराभव केला ५५ तेव्हा त्याचा शिष्य होऊन तो तेथेच गुरु-सेवापरायण होऊन राहिला यानें सर्व जातीच्या कथांनी युक्त असलेला तन्त्रमत्रनामक ग्रथ केला ५६. व्यासप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युग० प्रतिसर्ग० कलियु० चतुर्युगखंडातील अयो-ध्यापथी, भरत इत्यादिकाविषयी सांगावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥

बृहस्पति म्हणतात ज्या वेळी सत् व असद्रूप असे हे दृश्य नव्हते तेव्हा अक्षरमय, व्यापकरूप व अचिन्त्य तेज होते. ते स्थूलही नव्हे, सूक्ष्मही नव्हे, शीतही नव्हे व उष्णही नव्हे. असे असून आदि, मध्य व अंत यांनी रहित आणि आकार व नाम यांनी रहित होते. ते केवल योग्यास हितणारे, श्रेष्ठ, नित्य, शून्यरूप व परात्पर असे होते. त्याच्या खालीं एक रेखारूपी शक्ति होती. तिलाच माया व प्रकृति असे म्हटले आहे तीच महत्तत्त्व आहे असे समजावे. तिच्याखालीं सत्त्व, रज व तमोरूप तीन ऊर्ध्व रेखा होत्या. " ॐ " हेच त्याचे उत्तम लक्षण आहे १ -४ ते श्रेष्ठ सद्ब्रह्म होय असे जाणावे. त्या परम स्थानीं प्राप्त झाले असता पुनर्जन्म अति दीर्घकालाने प्राप्त होतो ५. तिच्यापासून अहकार झाला. अहकारापासून सूक्ष्म तन्मात्रे झाली. त्यापासून पंचभूते झाली. पंचमहाभूतापासून ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये झाली. या जड बाबींस तत्त्वास पाहून द्वंद्वभूत इच्छामय प्रभु सगुण झाला बुद्धीच्या योगानें

तांश्च दृष्ट्वा श्वेच्छामयो विभुः । द्वन्द्वभूतश्च सगुणो बुद्धिर्जीवस्समागतः ७ पूर्वार्द्धात्सगुणः सो वै निर्गुणश्च परार्द्धतः । ताभ्यां गृहीत तत्सर्वं चैतन्यमभवत्ततः ८ स विराडिति संज्ञो वै जीवो जातस्सनातनः । विराजो नाभितो जात पद्म तच्छतयोजनम् ९ पद्माच्च कुसुम जातं योजनायाममुत्तमम् । तत्पद्मकुसुमाज्जातो विरञ्चिः कमलासन १० द्विभुजस्स चतुर्वक्त्रो द्विपादो भगवान्विधिः । ज्ञेयः सप्रवितत्यगो महच्चिन्तामवाप्तवान् ११ कोऽहं कस्मात्कुत आयातः का मे जननी को मे तातः । इत्यधि चिन्तयत हृदि देव शब्दमहत्तत्त्वं तमाह १२ तपश्चैव तु कर्तव्य सशयस्यापनुत्तये । तमाकर्ण्य विधिस्साक्षात्तपस्तेपे महत्तरम् १३ सहस्राब्दं प्रयत्नेन ध्यात्वा विष्णु सनातनम् । चतुर्भुज योगगम्य निर्गुणं गुणविस्तरम् १४ समाधिनिष्ठो भगवान्बभूव कमलासनः । एतस्मिन्नन्तरे विष्णुर्बालो भूत्वा चतुर्भुजः १५ श्यामांगो बलवान्स्त्री दिव्यभूषणभूषितः । ब्रह्मणोऽङ्के हरिस्तस्थौ यथा बाल. पितु स्वयम् १६ तदा प्रबुद्धश्च विधिस्त दृष्ट्वा मोहमागतः । वत्स वत्सेति वचन हरिं प्राह प्रसन्नधीः १७ विहस्याह तदा विष्णुरहं ब्रह्मपिता तव । तयोर्विवदतोरेवं रुद्रो जातस्तमोमयः १८ ज्योतिर्लिंगश्च भयदा योजनानन्तविस्तारः । हंसरूप तदा ब्रह्मा वाराहो भगवान्प्रभुः १९ शताब्द तौ प्रयत्नेन जातौ चोर्ध्वमधः क्रमात् । लज्जितौ पुनरागत्य तदा तुष्टुवतुर्मुदा २० ताभ्यां स्तुतो हरः साक्षाद्भवो नाम्ना समागतः । कैलासनिलय कृत्वा समाधिस्थो बभूव ह २१ जात पचयुग तत्र दिव्यं

तो जीवभावास प्राप्त झाला. तो पूर्वार्धानें सगुण व परार्धानें निर्गुण झाला व या दोघांनीं ज्यानें ग्रहण केलें आहे असें सर्व चैतन्य व्यक्त झालें. त्याच्यापासून विराट् या नावाचा सनातन जीव निर्माण झाला. त्या विराटाच्या नाभीपासून कमल उत्पन्न झालें. ते शंभर योजनें दीर्घ होते ६–९. त्या कमलापासून एक योजन विस्तीर्ण असलेले उत्तम पुष्प झालें. त्या पद्मपुष्पापासून कमलासन विरंचि झाला. तो भगवान् ब्रह्मदेव दोन भुजांचा, चार मुखांचा, दोन पायांचा व सात विती लांब शरीराचा होता असें समजावें. त्याला मोठी चिंता उत्पन्न झाली १०,११. मी कोण? कशाकरिता व कोठून आलों? माझी माता कोण व माझा पिता कोण? याप्रमाणें मनामध्यें चिंतन करीत असलेल्या त्या देवास शब्दमय महत्तत्त्वानें सांगितलें "या संशयाचा नाश करण्याकरिता तप करावें." ते ऐकून साक्षात् विधि मोठें तप करिता झाला. त्यानें सहस्र वर्षेपर्यंत मोठ्या प्रयत्नानें सनातन, चतुर्भुज, योगगम्य, निर्गुण व गुणविस्तररूप असा जो भगवान् त्याचें ध्यान केलें १२–१४. तेव्हां तो भगवान् कमलासन समाधिनिष्ठ झाला. इतक्यामध्यें चतुर्भुज विष्णु बालरूपी होऊन आला १५. त्या बलवान् पुरुषाचें अंग श्यामवर्ण असून तो दिव्य भूषणांनीं भूषित झाला होता. लहान मूल जसें पित्याच्या मांडीवर बसतें त्याप्रमाणें तो स्वतः हरि ब्रह्मदेवाच्या मांडीवर बसला. तेव्हां ब्रह्मदेव सावध झाला व त्यास पाहून मोहित झाला. व ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा तो ब्रह्मदेव "हे वत्सा, हे वत्सा" असे हरीस म्हणू लागला. तेव्हां विष्णु हंसून म्हणाला "हे ब्रह्मन्, मी तुझा पिता आहे". याप्रमाणें ते वाद करीत असतां तमोमय रुद्र उत्पन्न झाला. तो ज्योतिर्लिंगरूप, अनेक योजनें विस्तीर्ण व भय देणारा होता. तेव्हां ब्रह्मदेव हंसरूपी झाला व भगवान् विष्णु वराह झाला १६–१९ व त्यांनीं शंभर वर्षेपर्यंत मोठ्या प्रयत्नानें क्रमानें वर व खालीं शोधिले. पण त्यांच्या शरीराचा अंत लागला नाहीं. तेव्हां लज्जित झालेले ते दोघे परत येऊन रुद्राची आनंदाने स्तुति करूं लागले २०. तेव्हां त्यांनीं स्तुति केली असतां हर साक्षात् भव या नावाचा देव होऊन आला व कैलास हें आपलें वसतिस्थान करून तो समाधिस्थ होऊन राहिला २१. त्या रुद्रयोग्याला तेथें राहून देवांचीं पांच युगें झालीं असतां तारकासुरनामक घोर

रुद्रस्य योगिनः । एतस्मिन्नन्तरे घोरो दानवस्तारकासुरः २२ सहस्राब्दं तपः कृत्वा ब्रह्मणो वरमाप्तवान् । भवद्वीर्योद्भवः पुत्र स ते मृत्युं करिष्यति २३ इति मत्वा सुराजित्वा महेन्द्रश्च तदाभवत् । ते सुराश्चैव कैलासं गत्वा रुद्रं प्रतुष्टुवुः २४ वरं ब्रूहीति वचनं सुरान्प्राह तदा शिवः । तेतु श्रुत्वा प्रणम्योचुर्वचनं नम्रकन्धराः २५ भगवन्ब्रह्मणा दत्तो वरो वै तारकाय च । शिवद्वीर्योद्भवः पुत्रः स ते मृत्युं भविष्यति २६ अतोऽस्मान्रक्ष भगवन्विवाहं कुरु शंकर । स्वायंभुवेऽन्तरे पूर्वं दक्षश्चासीत्प्रजापतिः २७ षष्टिकन्यास्ततो जातास्तासां मध्ये सती वरा । वर्षमात्रं भवन्तं सा पार्थिवैः समपूजयत् २८ तस्यै त्वया वरो दत्तः सा बभूव तव प्रिया । तत्पित्रा या कृता निन्दा भवतोऽज्ञानचक्षुषा २९ तस्या दोषात्सती देवी तत्याज स्वं कलेवरम् । सतीतेजस्तदा दिव्यं हिमाद्रौ घोरमागमत् ३० पीडितस्तेन गिरिराड् बभूव स्मरविह्वलः । पित्रीश्वरं स तुष्टाव कामव्याकुलचेतनः ३१ अर्यमा तु तदा तुष्टो ददौ तस्मै सुतां निजाम् । मेनां मनोहरां शुद्धां स दृष्ट्वा हर्षितोऽभवत् ३२ नररूपं शुभं कृत्वा देवतुल्यं च तत्प्रियम् । स रेमे च तया सार्द्धं चिरं कालं महावने ३३ गर्भो जातस्तदा रम्यो नववर्षोत्तमुत्तमः । कन्या जाता तदा सुभ्रूर्गौरी गौरसमा सती ३४ जातमात्रे चासा कन्या बभूव नवहायिनी । तुष्टाव शंकरं देवं भवन्तं तपसा चिरम् ३५ शताब्दं च जले मग्ना शताब्दं वह्निसंस्थिता । शताब्दं च स्थिता वायौ शताब्दं नभसि स्थिता ३६ शताब्दं च स्थिता चंद्रे शताब्दं रविमण्डले । शताब्दं गर्भभूम्यां च स्थिता सा गिरिजा सती ३७ शताब्दं च महत्तत्त्वे गत्वा योगबलेन सा । भवन्तं शंकरं शुद्धं तत्र दृष्ट्वा स्थितास्यवै ३८ त्रिंशताब्दमतो

दानव ब्रह्मदेवापासून "भवान्या वीर्यापासून झालेला पुत्र तुला मारील" असा वर मिळविता झाला. हे ऐकताच तो देवास जिंकून स्वत महेंद्र झाला. तेव्हा देव कलासी जाऊन रुद्राची स्तुति करू लागले २२–२४. ती ऐकून शंकर "वर मागा" असें वचन देवास बोलला. तेव्हा तें ऐकून व नम्रतेनें मस्तक लववून देव नमस्कार करून म्हणाले "हे भगवन्, ब्रह्मदेवानें तारकासुरास शंकराच्या वीर्यापासून होणारा पुत्र तुझा मृत्यु होईल असा वर दिला आहे २५,२६. यास्तव, हे भगवन्, आमचे रक्षण कर. हे शंकरा, तूं विवाह कर. पूर्वी स्वायंभुव मन्वंतरामध्यें दक्ष प्रजापति झाला. त्याला एकदर साठ कन्या होत्या. सती ही त्याची वडिल कन्या होय. तिनें एक वर्षभर पार्थिवांच्या योगानें तुझी पूजा केली २७,२८. तेव्हा तूं तिला वर दिलासच त्यामुळें ती तुझी पत्नी झाली. पूर्व अज्ञानदृष्टीमुळें मंद झालेल्या तिच्या पित्यानें तुझी जी निंदा केली तिच्यामध्यें दोष जाणून तिनें आपलें शरीर टाकिलें. तेव्हा सतीचें तें घोर दिव्य तेज हिमालयपर्वतावर गेलें त्याच्या योगानें पीडित झालेला तो गिरिराज कामविह्वल झाला. तेव्हा ज्याची बुद्धि कामानें व्याकुळ झाली आहे असा तो पितरांच्या ईश्वराची स्तुति करू लागला २९–३१. तेव्हा संतुष्ट झालेला अर्यमा त्यास आपली शुद्ध व मनोहर मेनानामक कन्या देता झाला. तिला पाहून तो पर्वत अतिशय आनंदित झाला व तिला आवडणारें देवतुल्य शुभ मनुष्यरूप घेऊन तो महावनामध्यें तिच्याशीं दीर्घकाल रममाण झाला ३२,३३. तेव्हा तिच्या उदरामध्यें नऊ वर्षे उत्तम व रम्य गर्भ राहिला व योग्य वेळीं ती गौरवर्ण सती गौरी या नावाची सुंदर कन्या उत्पन्न झाली. जन्मावरोबर ती कन्या नऊ वर्षांची झाली व तिनें दीर्घकाल तपश्चर्या करून तुज शंकर देवास पूजिले ३४,३५. ती शंभर वर्षेपर्यंत जलामध्यें बुडून राहिली. शंभर वर्षे अग्नीमध्ये राहिली; शंभर वर्षे वायूमध्यें राहिली; शंभर वर्षे आकाशामध्यें राहिली ३६, शंभर वर्षे चंद्रामध्ये राहिली; शंभर वर्षे रविमंडलामध्ये राहिली; शंभर वर्षे गर्भभूमीमध्ये राहिली व ती गिरिजा सती शंभर वर्षे

जातं तस्मात्त्वं पार्वतीं शिवाम् । वर देहि प्रसन्नात्मा महादेव नमोऽस्तु ते ३९ इति श्रुत्वा वचो रम्यं शंकरो लोकशंकरः । देवानाह तदा वाक्यमयोग्य वचनं हि वः ४० मत्तो ज्येष्ठाश्च ये रुद्राः कुमारव्रतधारिणः । मृगव्याधादयो मुख्या दश ज्योतिस्समुद्भवाः ४१ अहं तेषामवरजो भवो नामैव योगराट् । मायारूपां शुभां नारीं कथं गृह्णामि लोकदाम् ४२ नारी भगवती साक्षात्तया सर्वमिदं ततम् । मातृरूपा तु सा ज्ञेया योगिनां लोकवासिनाम् ४३ अहं योगी कथं नारीं मातरं वरितुं क्षमः । तस्मादहं भवदर्थे स्ववीर्यमाददाम्यहम् ४४ तद्वीर्यं भगवान्वह्निः प्राप्य कार्यं करिष्यति । इत्युक्त्वा वह्नये देवो ददौ वीर्यमनुत्तमम् ४५ स्वयं तत्र समाधिस्थो बभूव भगवान्हरः । तदा शक्रादयो देवा वह्निना सह नित्यशः ४६ सत्यलोकं समागत्याब्रुवन्सर्वं प्रजापतिम् । श्रुत्वा तत्कारणं सर्वं स्वयंभूश्चतुराननः ४७ नमस्कृत्य परं ब्रह्म कृष्णध्यानपरोऽभवत् । ध्यानमार्गेण भगवान्गत्वा ब्रह्मा परं पदम् ४८ हेतुं तदर्णयामास यथा शंकरभाषितम् । श्रुत्वा विहस्य भगवान्स्वमुखात्तेज उत्तमम् ४९ समुत्पाद्य ततो जातः पुरुषो रुचिराननः । ब्रह्माण्डस्य च्छविर्या वै स्थिता तस्य कलेवरे ५० प्रद्युम्नो नाम विख्यातं तस्य जातं महात्मनः । तेन सार्द्धं तदा ब्रह्मा समाप्य स्वं कलेवरम् ५१ ददौ तेभ्यस्तु पुरुष प्रद्युम्न शम्बरार्तिदम् । तेजसा तस्य देवस्य नरा नार्यस्समन्ततः ५२ एकीभूतास्त्रिलोकेषु बभूवुः स्मरपीडिताः । स्थावराः सौम्यभूता वै ते तु कामाग्निपीडिताः ५३ सरिद्भिश्च लताभिश्च मिलितास्तं

महत्तत्त्वामध्यें योगसामर्थ्यानें जाऊन राहिली. नंतर तेथें तुज शुद्र शंकरास पाहून अर्जुन तेथंच राहिली आहे. त्यास आज तीनशें वर्षं झालीं. यास्तव, तूं कन्यारूप पार्वतीस प्रसन्न मनानें वर दे. हे महादेवा, तुला नमस्कार असो " ३७-३९. हें रम्य वचन ऐकून लोककल्याणकारक शंकर देवास ह्मणाला " तुमचें हें वाक्य अयोग्य आहे. कारण, जे मृगव्याधादि मुख्य ज्योतीपासून निर्माण झालेले दहा रुद्र ते माझ्यापेक्षा ज्येष्ठ असून ब्रह्मचर्यव्रत धरून राहिले आहेत ४०,४१. मी त्याचा भवनामक योगिराज धाकटा भाऊ आहे. तेव्हा त्या मायारूपी लोकोत्पादक शुभ स्त्रीचें मी कसें ग्रहण करूं ? ४२. ती स्त्री साक्षात् भगवती असून तिनें हें सर्व व्यापून सोडिलें आहे. लोकवासी योग्यांची ती माता आहे असें समजावें ४३. तेव्हा मी योग्यानें त्या मातृरूपी स्त्रीस कस वरावें ? तस्मात्, मी तुमच्याकरिता आपले वीर्य धारण करितों. तें वीर्य भगवान् अग्नि घेईल व तुमचें कार्य करील " असें बोलून तो देव अग्नीस अनुत्तम वीर्य देता झाला ४४,४५. व स्वत. भगवान् हर तेथें समाधिस्थ होऊन राहिला. तेव्हा अग्नीसहवर्तमान इंद्रादि देव तेथून निघाले ४६ व सत्यलोकीं येऊन ब्रह्मदेवास तें सर्व सागते झाले. तें सर्व वर्तमान ऐकून चतुरानन स्वयंभू परब्रह्मास नमस्कार करून कृष्णध्यानामध्यें परायण झाला. तो भगवान् ब्रह्मदेव ध्यानमार्गानें परम पदास जाऊन शंकरानें जसें सागितलें होत तसेंच त्यास निवेदन करिता झाला. तें ऐकून व हसून भगवानानें आपल्या मुखातून उत्तम तेज काढिलें व त्यापासून सुंदरमुख पुरुष निर्माण झाला. सर्व ब्रह्माडामध्यें जी शोभा होती ती सर्व त्याच्या शरीरामध्यें येऊन राहिली. त्यामुळें त्या महात्म्याचें प्रद्युम्न अस नाव पडलें. तेव्हा त्याच्यासहवर्तमान ब्रह्मदेव देहभानावर आला व शंबरास पीडा देणाऱ्या त्या प्रद्युम्नसंज्ञक पुरुषास त्याने त्याच्या स्वाधीन केलें. त्या देवाच्या तेजानें स्त्री व पुरुष चोहोंकडून एक झाल्या व त्रैलोक्यातील सर्व स्त्रिया आणि पुरुष कामपीडित झाले. सौम्य रूपानें जे स्थावर होते तेही कामाग्नीनें पीडित झाले व वहाणाऱ्या नद्यांशी त्यानीं संगम केला. कालाग्नीसारखा असलेला साक्षात् ब्रह्माडेश शिवसंज्ञक रुद्र आपल्या तिसऱ्या नेत्रातून

बभूविरे । ब्रह्माण्डेशः शिवः साक्षाद्रुद्रः कालाग्निसन्निभः ५४ त्रिनेत्राज्जेज उत्पाद्य शमयामास तद्बधूम् । तदा कुद्ध. स कृष्णांगो गृहीत्वा कौतुमं धनुः ५५ दिव्यान्पंचशरान्घोरान्महादेवाय बंधवे । उच्चाटनेन बाणेन मन्ताऽभूल्लोकशंकरः ५६ वशीकरणबाणेन नारीवश्यः शिवोऽभवत् । स्तंभनेन महादेवः शिवापार्श्वे स्थिरोऽभवत् ५७ आकर्षणेन भगवाञ्छिवाकर्षणतत्परः । मारणेनैव बाणेन मूर्छितोऽभून्महेश्वरः ५८ एतस्मिन्नन्तरे देवी महत्तत्त्वे स्थिता शिवा । मूर्छितं शिवमालोक्य तत्रैवान्तरधीयत ५९ तदोत्थाय महादेवो विललाप भृशं मुहुः । हा प्रिये चन्द्रवदने हा शिवे च घटस्तनि ६० हा उमे सुंदराभे च पाहि मां स्मरविह्वलम् । दर्शनं देहि रभोरु दासभूतोऽस्मि सांप्रतम् ६१ एवं विलप्यमानं तं गिरिजा योगिनी स्वयम् । समागत्य वचः प्राह नत्वा तं शंकरं प्रियम् ६२ कन्याहं भगवन्देव मातृपित्रनुतारिणी । तयोस्सकाशाद्भगवन्मम पाणिं गृहाण भोः ६३ तथेति मत्वा स शिवः प्रयुक्तशरपीडितः । समर्वन्निषेषयामास ते तु गत्वा हिमाचलम् ६४ संबोध्य च विवाहस्य विधिं चक्रुर्मुदान्विताः । ब्रह्माण्डे ये स्थिता देवास्तेषां स्वामी महेश्वरः ६५ विवाहे तस्य संप्राप्ते सर्वे देवास्तमाययुः । अनन्तांश्च गणांश्चैव सुरान्दृष्ट्वा हिमाचलः ६६ गिरिजाशरणं प्राप्य तस्थौ पर्वतराट् स्वयम् । तदा तु पार्वती देवी निधीन्सिद्धीः समन्तत. ६७ चकार कोटिशस्तत्र बहुरूपा सनातनी । दृष्ट्वा तद्विस्मिता देवा ब्रह्मणा सह हर्षिताः ६८ तुष्टुवुः पार्वतीं देवीं नारीरत्नं सनातनीम् । देवा ऊचुः । उ वितर्के च मा लक्ष्मीर्ब-

---

तेज उत्पन्न करून त्या कामव्यथेस शमविता झाला. तेव्हा तो रागावलेला कृष्णपुत्र पुष्पधनुष्य घेऊन व त्यास पाच घोर दिव्य बाण जोडून ते आपला बधु जो महादेव त्याच्यावर सोडिता झाला. उच्चाटन बाणानें लोकशंकर गतियुक्त झाला, वशीकरण बाणानें तो शिव स्त्रीवश झाला; स्तंभन बाणानें महादेव पार्वतीच्या बाजूस स्थिर झाला; आकर्षण बाणानें तो शिव पार्वतीचें आकर्षण करण्यास तयार झाला व मारण बाणानें तो महेश्वर मूर्छित झाला. इतक्यामध्यें महत्तत्त्वामध्यें राहिलेली शिवा देवी शंकर मूर्च्छित झाला आहे असें पाहून तेथेंच गुप्त झाली ४७—५९. तेव्हा महादेव उठून वारंवार अतिशय विलाप करूं लागला. हे प्रिये, हे चद्रमुखि, हे शिवे, हे घटस्तनि, हे उमे, हे सुंदरि, कामविह्वल झालेल्या माझें रक्षण कर. हे सुंदरि, मला दर्शन दे. साप्रतकाली मी तुझा दास झालों आहें. याप्रमाणें तो विलाप करूं लागला असता ती स्वतः योगिनी गिरिजा तेथें येऊन व त्या प्रिय शंकरास नमस्कार करून म्हणाली ६०—६२ " हे भगवन्, हे देवा, मी मातापितराच्या आज्ञेप्रमाणें वागणारी कन्या आहें. यास्तव, हे भगवन्, तू त्याच्या समक्ष माझें पाणिग्रहण कर. " तेव्हा " ठीक आहे " असें म्हणून मदनाच्या बाणानें पीडित झालेला तो शिव समर्षीस पाठविता झाला. तेव्हा ते हिमाचलाकडे जाऊन व त्यास दोन गोष्टी सागून आनदयुक्त होत्साते त्याच्या विवाहाचा विधि करिते झाले. ब्रह्माडामध्यें जे देव होत त्याचा हा स्वामी होय. यास्तव, त्याचा विवाह माडला असता सर्व देव आले. अनंत गणानीं युक्त असलेल्या त्या देवास पाहून हिमालय गिरिजेस शरण आला व तो श्रेष्ठ पर्वत स्वतः तेथेंच तिच्या आश्रयास राहिला. तेव्हा बहुरूपी सनातनी पार्वती देवी चोहोकडे कोट्यावधि निधि व सिद्धि करिती झाली. तें पाहून ब्रह्मदेवासहवर्तमान आनंदित झालेले देव आश्चर्यचकित झाले व त्या स्त्रीरत्नरूप सनातन पार्वती देवीचें स्तवन करूं लागले. देव म्हणतातः— " उ " हें अक्षर वितर्क या अर्थी आहे व " मा " म्हणजे लक्ष्मी; ती या ठिकाणीं बहुरूपानें दिसते. यास्तव, आम्ही तुझें " उमा " असें नाव ठेवितो. तुज उमेला आमचे

हुरूपा विदृश्यते ६९ उमा तस्माच्च ते नाम नमस्तस्यै नमो नमः । कतिचिदयनान्येव ब्रह्माण्डेऽस्मिंश्चिरे तव ७० कात्यायनी हि विख्याता नमस्तस्यै नमो नमः । गौरवर्णाच्च वै गौरी श्यामवर्णाच्च कालिका ७१ रक्तवर्णाद्धैमवती नमस्तस्यै नमो नमः । भवस्य दयिता त्वं वै भवानी रुद्रसंयुता ७२ दुर्गा त्वं योगिदुष्प्राप्या नमस्तस्यै नमो नमः । नान्त जरमुर्वयं ते वै चण्डिका नाम विश्रुता ७३ अंबा त्वं मातृभूता नो नमस्तस्यै नमो नमः । इति श्रुत्वा स्तवं तेषां वरदा सर्वमंगला ७४ देवानुवाच मुदिता दैत्यभीतिं हरामि वः । स्तोत्रेणानेन संप्रीता भवामि जगतीतले ७५ इत्युक्त्वा शंभुसहिता कैलास गुह्यकालयम् । गुहायां मिथुनीभूय सहस्राब्दं मुमोद वै ७६ एतस्मिन्नन्तरे देवा भीरुका लोकनाशनात् । ब्रह्माण च पुरस्कृत्य तुष्टुवुर्गिरिजापतिम् ७७ लज्जितौ तौ तदा तत्र पश्चात्तापं हि चक्रतुः । महान्क्रोधस्तयोश्चासीत्तेन वै दुदुवुः सुराः ७८ प्रद्युम्नो बलवांस्तत्र संतस्थौ गौरिवाचलः । रुद्रकोपाग्निना दग्धो बभूव च तदन्तरः ७९ प्रद्युम्नः स्थूलरूपं च त्यक्त्वा भस्ममयं तदा । सूक्ष्मदेहमुपागम्य विश्रुतोऽभूदनङ्गकः ८० यथापूर्वं तथैवासीत्कार्यं कृत्वा स्मरो विभुः । स्थूलरूपा रतिर्देवी शताब्दं शंकरं परम् ८१ ध्यानेनाराधयामास गिरिजावल्लभं व्रतम् । तदा ददौ वरं देवस्तस्यै रत्यै सनातनः ८२ रतिदेवि शृणु त्वं वै लोकानां हृत्सु जायसे । युवा वयसि संप्राप्ते नृणां देहैः पतिं स्वकम् ८३ भजिष्यसि मदर्धेन प्रद्युम्न कृष्णसंभवम् । स्वारोचिषान्तरः कालो वर्तते चाद्य सुप्रियः ८४ वैवस्वतेऽन्तरे प्राप्ते ह्यष्टाविंशतमे युगे । द्वाप-

---

शतशः नमस्कार असोत. हे शिवे, या ब्रह्माडामध्यें तुझी कतिचित् (कियेक) अयनें (स्थानें) आहेत. यास्तव, कात्यायनी असें तुला समजावें. त्या तुज कात्यायनीस आमचे शतशः नमस्कार असोत. गौरवर्णामुळें गौरी, श्यामवर्णामुळें कालिका ६३—७१ व रक्तवर्णामुळें तूं हैमवती आहस. त्या तुला वारंवार नमस्कार असो. तूं भवाची स्त्री आहेस. यास्तव, तुज रुद्रपत्नीस आम्ही भवानी असें ह्मणतों. व योग्यास दुष्प्राप्य असल्यामुळें तू दुर्गा आहेस. तुला आम्ही शतश नमस्कार करितों. आम्हाला तुझा अंत लागला नाहीं ह्मणून तूं चण्डिका या नावानें प्रसिद्ध आहेस ७२,७३. आमच्या मातेसारखी तूं आहेस ह्मणून तुला आम्ही अंबा ह्मणतों. तुला नमस्कार असो, नमस्कार असो. हा त्याचा स्तव ऐकून वर देणारी व संतुष्ट झालेली सर्वमंगला देवी देवास ह्मणाली " मी तुमची दैत्याविषयींची भीति नाहींशी करितें. या स्तोत्राच्या योगानें मी भूलोकीं अतिशय संतुष्ट होईन " ७४,७५. असें बोलून ती शंभूसहवर्तमान कैलासावरील गुह्यकालयामध्यें गेली व तेथील गुहेमध्यें स्त्रीधर्मानें शंकराची संगत होऊन ती सहस्र वर्षें सुखोपभोग घेती झाली. इतक्यामध्यें लोकनाशामुळें भयभीत झालेले देव ब्रह्मदेवास पुढें करून गिरिजापतीची स्तुति करूं लागले. तेव्हां ते दोघेही लज्जित झाले. त्यांना मोठा पश्चात्ताप झाला व मोठा क्रोधही आला. पण त्याबरोबर सर्व देव पळून गेले ७६—७८. त्यांपैकीं बलवान् प्रद्युम्न मात्र एखाद्या वेलाप्रमाणें तेथें स्थिर होऊन राहिला होता. पण तो बलवान् कृष्णपुत्र रुद्राच्या कोपाग्नीनें दग्ध झाला ७९. तेव्हा प्रद्युम्न आपलें भस्ममय झालेलें स्थूल रूप सोडून सूक्ष्म देहाचा आश्रय करून अनंग या नावानें प्रसिद्ध झाला ८०. व पूर्वीप्रमाणेंच तो प्रभु मदन कार्य करीत राहिला. इकडे स्थूलरूपी रति देवी शभर वर्षें श्रेष्ठ गिरिजावल्लभ शंकराची ध्यानाच्या योगानें आराधना करिती झाली व तिनें व्रतही केलें. तेव्हा तो सनातन देव त्या रतीस असा वर देता झाला. " हे रति देवि, ऐक. तू लोकाच्या हृदयामध्यें उत्पन्न होत असतेस. तेव्हा तेथें पुरुषाला तरुण वय प्राप्त झालें असता

रान्ते च भगवान्कृष्णः साक्षाज्जानिष्यति ८५ तदा तस्य सुत देव प्रद्युम्नं मेरुमूर्धनि । भाजिष्यसि सुखं रम्ये विपिने नन्दने चिरम् ८६ अन्येषु द्वापरान्तेषु स्वर्णगर्भो हि ते पतिः । जन्मवान्वर्तते भूमौ यथा कृष्णस्तथैव सः ८७ मध्याह्ने चैव संध्यायां ब्रह्मणोऽव्यक्तजन्मनः । कल्पे कल्पे हरिस्साक्षात्करोति जनमगलम् ८८ इत्युक्त्वा भगवाञ्छभुस्तत्रैवान्तरधीयत । एव बभूव रुद्राणीगिरिजावल्लभो भवः ८९ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा भवः साक्षात्स्वमुखात्स्वांशमुत्तमम् । समुत्पाद्य तदा भूमौ गोदावर्यां बभूव ह ९० आचार्यशर्मणो गेहे पुत्रो जातो भवांशकः । रामानुजस्स वै नाम्नाऽनुजोऽभूद्रामशर्मणः ९१ एकदा रामशर्मा वै पतञ्जलिमत स्थित । तीर्थात्तीर्थान्तर प्राप्त पुरीं काशीं शिवप्रियाम् ९२ शकराचार्यमागम्य शतशिष्यसमन्वितः । शास्त्रार्थं कृतवान्रम्यं कृष्णपक्षो हरिप्रिय ९३ शकराचार्यविजितो लज्जितो निश भीरुकः । स्वगेहं पुनरायातः शांकरैर्बाकारैर्हतः ९४ रामानुजस्तु तच्छ्रुत्वा सर्वशास्त्रविशारद । भ्रातृशिष्यैश्च सहितः पुरीं काशीं समाययौ ९५ वादो वेदान्तशास्त्रे च तयोश्चासीन्महात्मनोः । शंकरः शिवपक्षश्च कृष्णपक्षस्स वै द्विजः ९६ मासमात्रेण वेदान्ते दर्शितस्तेन वै हरिः । वासुदेवस्स वै नाम सच्चिदानदविग्रहः ९७ वासुदेवस्स वै ज्ञेयो वसुष्वशन दीव्यति । वसुदेवस्स वै ब्रह्मा तस्य सारो हि यः स्मृतः ९८ वासुदेवो हरिस्साक्षाच्छिवपूज्यः सनातन । शकरो लज्जि-

---

तूं त्याच्या देहानीं आपल्या पतीचें सेवन करशील. तो कृष्णपुत्र प्रद्युम्न माझा अर्धा अशानें उत्पन्न होणार आहे. आज अतिप्रिय स्वारोचिष अंतराचा काल आहे. अठ्ठाविसाव्या युगातील वैवस्वत मन्वंतर लागलें असता द्वापराच्या शेवटीं साक्षात् भगवान् कृष्ण उत्पन्न होईल ८१-८५. तेव्हा हे रम्य स्त्रिये, तूं त्याच्या प्रद्युम्ननामक देवरूपी सुताचे मेरुपर्वतावरील गहन नदनवनामध्यें दीर्घकाल आनदानें सेवन करिशील ८६. द्वापरांतर्गत अन्य युगामध्ये तुझा पति हिरण्यगर्भ होऊन भूलोकीं कृष्णाप्रमाणेंच जन्म घेत राहील ८७. कारण, ज्याचा जन्म अव्यक्तापासून झाला आहे अशा ब्रह्मदेवाच्या मध्यान्हसमयीं, संध्यासमयीं व प्रत्येक कल्पामध्यें तो साक्षात् हरि जनमगल करीत असतो. " असें बोलून भगवान् शंभु तेथेंच गुप्त झाला. गिरिजावल्लभ शंकर याप्रमाणे गिरिजापति झाला ८८,८९. सूत म्हणतात:—हें ऐकून साक्षात् भव आपल्या मुखातून उत्तम अंश उत्पन्न करून त्या वेळीं गोदावरीच्या तीरीं निर्माण झाला ९०. आचार्यशर्म्याच्या घरीं तो भवाश पुत्र झाला. तो रामशर्म्याचा कनिष्ठ भ्राता असल्यामुळें त्यास रामानुज असें म्हणत ९१. एकदा पतजलीच्या मतामध्यें स्थिर असलेला रामशर्मा तीर्थोतीर्थीं हिंडत शकरास प्रिय असलेल्या काशीनगरीस आला. शंभर शिष्यांसहवर्तमान शंकराचार्याकडे येऊन त्यानें रम्य शास्त्रार्थ केला. तो हरिप्रिय असलेमुळें कृष्णपक्षीय होता ९२, ९३. शंकराचार्यानीं त्यास जिंकिलें असता तो लज्जायुक्त झाला व शंकराचार्यांच्या वाग्बाणानीं पीडित झाल्यामुळें भयभीत होऊन तो रात्रींच आपल्या गृहीं गेला ९४. पण सर्व शास्त्रामध्ये प्रवीण असलेल्या रामानुजानीं जेव्हा हें ऐकिलें तेव्हा भ्रात्याच्या शिष्यासहवर्तमान तो काशीनगरास आला ९५. त्या दोघा महात्म्याचा वेदातशास्त्रामध्यें वाद झाला. शंकर शिवपक्षाचा व तो ब्राह्मण कृष्णपक्षाचा होता ९६. एक महिनाभर वेदातामध्यें हरीचें प्रतिपादन केलें आहे असें त्यानें दाखविलें. ज्याचें वासुदेव असें नाव आहे तोच सच्चिदानंदस्वरूप होय ९७. द्रव्यामध्यें जो अशानें क्रीडा करितो तो वसुदेव होय. वसुदेव म्हणजे ब्रह्मा होय. कारण, तो त्याचें सार असें म्हटलें आहे ९८. वासुदेव हा साक्षात् हरि होय. तो सनातन देव शकरास पूज्य आहे. हें ऐकून शंकर

तस्तत्र भाष्यशास्त्रे समागतः ९९ पक्षमात्रं शिवैस्सूत्रैर्वर्णवासास वै शिवम् । रामानुजेन तत्रैव भाष्ये सदर्शितो हरिः १०० गोविन्दो नाम विख्यातो वैयाकरणदेवता । गां परां विन्दते यस्मिन्गोविन्दो नाम वै हरिः १ यो गिरिशस्तु न गोविन्दो गिरीणामीश्वरो हि सः । गोपालस्तु न वै रुद्रो गवारूढः प्रकीर्तितः २ क्षेत्रयः पशुपतिः शम्भुर्गोपतिर्नैव विश्रुतः । लज्जितः शंकराचार्यो मीमांसाशास्त्रमागत ३ तयोर्दशदिनं शास्त्रं विवादस्सुमहानभूत् । यस्तु वै यज्ञपुरुषो रामानुजमतप्रियः ४ विच्छिन्नः शंकरेणैव मृगभूतः पराजितः । आचारप्रभवो धर्मो यज्ञदेवेन निर्मितः ५ भ्रष्टाचारस्तदा जातो यज्ञे दक्षप्रजापतेः । इति रामानुजः श्रुत्वा वचनं प्राह नम्रधीः ६ कर्मणे जगितो यज्ञो विश्वपालनहेतवे । कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ७ अक्षरोऽयं शिवः साक्षाच्छब्दब्रह्मणि संस्थितः । पुराणपुरुषो यज्ञो ज्ञेयोऽक्षरकरो भुवि ८ अक्षरात्स तु वै श्रेष्ठः परमात्मा सनातनः । अक्षरेण न वै तृप्तस्तृप्तोऽभूद्यज्ञकर्मणि ९ नाम्ना स यज्ञपुरुषो वेदलोके हि विश्रुतः । प्रपौत्रस्य तदा वृद्धिं दृष्ट्वा स्पर्धातुरः शिवः १०० मृगभूतश्च रुद्रोऽसौ दिव्यबाणैरतर्पयत् । समर्थो यज्ञपुरुषो ज्ञात्वा गुरुमयं शिवम् ११ पलायनपरो भूतो धर्मस्तेन महान्कृतम् । लज्जितः शंकराचार्यो न्यायशास्त्रसमागतः १२ भवतीति भवो ज्ञेयो मृडनीति स वै मृडः । लोकान्भरति यो देवः स कर्ता भर्ग एव हि १३ हरतीति हरो ज्ञेयः स रुद्रः पापरावणः । स्वयं कर्ता स्वयं भर्ता स्वयं हर्ता शिवः स्वयम् १४ शिवाद्विष्णुर्महीं

लज्जित झाला व भाष्यशास्त्रामध्ये आला ९९. पंधरा दिवसपर्यंत शिवसूत्रांनी त्यानें शिवाचें वर्णन केलें व रामानुजानें त्याच भाष्यामध्ये हरीस दाखविलें १००. प्रख्यात गोविंद ही वैयाकरणदेवता आहे. वेदलक्षण वाणी ज्यान्या ठिकाणीं प्राप्त होते तो गोविंदनामक हरि होय १. गिरीश म्हणजे गोविंद नव्हे. कारण, तो पर्वतांचा ईश आहे. गोपाल हा रुद्र नव्हे. कारण, " तो बैलावर बसलेला आहे " असें सांगितलें आहे २. शंभु पशुपति आहे असें समजावें. गोपति असें त्याला कोठेंही म्हटलेलें नाहीं. हे ऐकून शंकराचार्य लज्जित होऊन मीमांसाशास्त्रामध्ये आला तेव्हा त्या शास्त्रात त्या दोघाचा दहा दिवस फार मोठा वाद झाला. " रामानुजान्या मतामध्यें प्रिय असलेला जो यज्ञपुरुष ३,४ तो पराजित होऊन मृगरूप झाला असता शंकराने त्यास विच्छिन्न केले. आचारापासून उत्पन्न होणारा धर्म यज्ञदेवाने निर्माण केला आहे. पण दक्षप्रजापतीन्या यज्ञामध्यें तो भ्रष्टाचार झाला. " हे ऐकून ज्याची बुद्धि नम्र आहे असा रामानुज म्हणाला ५, ६ " विश्वाचें रक्षण करण्याकरिता निमित्तभूत होणारें जे कर्म त्याकरिता यज्ञाम निर्माण केले आहे. कर्म ब्रह्मोद्भव आहे असे जाण व ब्रह्म (वेद) अक्षरापासून उत्पन्न झालें आहे ७. हा साक्षात् शिव अक्षर आहे व तो शब्दब्रह्मामध्यें स्थित आहे. पण यज्ञ हा पुराणपुरुष आहे असे समजावें. तो भूलोकीं अक्षर निर्माण करीत असतो. पण तो सनातन परमात्मा श्रेष्ठ आहे. तो अक्षराच्या योगानें तृप्त होत नसून यज्ञकर्मामध्येंच तृप्त होत असतो ८, ९. लोक व वेद या दोन्हींमध्यें तो यज्ञपुरुष म्हणून प्रसिद्ध आहे. प्रपौत्राची वृद्धि पाहून शंकर स्पर्धा करूं लागला ११०. तेव्हा मृगरूप झालेल्या यज्ञपुरुषास त्या रुद्रानें दिव्य बाणांनीं तृप्त केलें. वस्तुतः यज्ञपुरुष समर्थ होता पण हा शंकर गुरुरूप आहे असे जाणून तो पळूं लागला. खरोखर हा त्यानें मोठा धर्म केला. तेव्हां लज्जित झालेला शंकराचार्य न्यायशास्त्रामध्यें आला. होतो म्हणून भव व सुख देतो म्हणून मृड असें समजावें. जो जगत्कर्ता देव लोकांचें भरण करितो तोच भर्ग होय ११-१३. जो हरण करितो तो हर अर्थात् पापाचा नाश करणारा रुद्रच हर होय

जाता विष्णोर्ब्रह्मा च पद्मभूः । इति श्रुत्वा तु वचनं प्राह रामानुजस्तदा १५ धन्योऽयं भगवा-ञ्छंभुर्यस्याय महिमा परः । सत्यं सत्यं ममाज्ञेय कर्ता कारयिता शिवः १६ रामनाम परं नित्यं कथं शंभुर्जपेद्धरिम् । अनन्ताः सृष्टयः सर्वा उद्भूता यस्य तेजसा १७ अनन्तः शेषतः शेषो रमन्ते योगिनो हि तम् । स च वै मत्प्रभोर्धाम सच्चिदानन्दविग्रहः १८ इति श्रुत्वा तदा वाक्यं लज्जितः शङ्करोऽभवत् । योगशास्त्रे परो देवः कृष्णस्तेनैव दर्शितः १९ कालात्मा भगवान्कृष्णो योगेशो योगतत्परः । सांख्यशास्त्रे च कपिलस्तस्मै तेनैव दर्शितः १२० क वीर्यं पीयते यौ वै स कपिस्तं च लाति यः । कपिलस्स तु विज्ञेय कपी रुद्रः प्रकीर्तितः २१ कपिलो भगवान्विष्णुः सर्वज्ञः सर्वरूप-वान् । तदा तु शंकराचार्यो लज्जितो नम्रकन्धरः २२ शुक्लांबरधरो भूत्वा गोविन्दो नाम निर्मलम् । जजाप हृदि शुद्धात्मा शिष्यो रामानुजस्य वै २३ इति ते रुद्रमाहात्म्य प्रसंगेनोपवर्णितम् । धनवान्पुत्रवान्वाग्मी भवेद्यः शृणुयादिदम् १२४ [५००९] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्ग-पर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये रुद्रमाहात्म्यवर्णनं रामानुजोत्पत्तिवर्णन नाम चतुर्दशोऽध्यायः॥१४॥

सूत उवाच ॥ भृगुवर्य महाभाग शृणु त्वं जीववर्णितम् । पवित्रं वसुमाहात्म्यं सर्ववस्तुसुखप्र-दम् १ बृहस्पतिरुवाच ॥ वैवस्वतेऽन्तरे प्राप्ते चाद्ये सत्ययुगे शुभे । इल्वला नामसी शक्तिः प्रिया

असें समजावें. तो स्वयंकर्ता, स्वयंभर्ता, स्वयंहर्ता व स्वयंशिव आहे १४. शिवापासून भूलोकीं विष्णु झाला व विष्णूपासून पद्मभू ब्रह्मदेव झाला. हे वचन ऐकून त्या वेळीं रामानुज ह्मणाला १५ " हा भगवान् शंभु, की ज्याचा असा श्रेष्ठ महिमा आहे तो धन्य होय. खरोखर शिव कर्ता व करविता आहे हे मला ठाऊक नव्हतें १६. पण हा शंभु हरीचें श्रेष्ठ व नित्य रामनाम का जपतो ? ज्याच्या तेजांत सर्व अनंत सृष्टि उत्पन्न झाल्या व जो अनंत शेषाहूनही शेष राहतो व ज्याच्यामध्यें योगी रममाण होतात तो सच्चिदानंदस्वरूप माझा प्रभु असून तेच त्याचें परम धाम होय" १७,१८. हें वाक्य ऐकून शंकर तात्काल लज्जित झाला. त्याने योगशास्त्रामध्यें कृष्ण हाच श्रेष्ठ देव आहे असें दाखविलें. कालस्वरूपी भगवान् कृष्ण योगेश्वर व योगतत्पर आहे. सांख्यशास्त्रामध्ये कपिल ह्मणून जो आहे तो तो भगवानूच होय अस त्यानें दाखविलें १९—१२०. कं ह्मणजे वीर्य, तें जो पिवतो तो कपि व त्याच जो ग्रहण करितो तो कपिल असें समजावें. कपि ह्मणजे रुद्र असें सांगितलें आहे २१. तात्पर्य, कपिल हा सर्वज्ञ व सर्वरूपी भगवान् विष्णूच होय. तेव्हा लज्जित झालेला शंकराचार्य आपली मान खालीं घालता झाला २२. त्यानें शुक्ल वस्त्र धारण केलें व गोविंद हे शुद्ध नाव ता हृदयामध्यें जपू लागला व त्यामुळे ज्याचें अंत करण शुद्ध झालें आहे असा तो रामानुजाचा शिष्य झाला २३. याप्रमाणें मी प्रसंगाने तुला रुद्रमाहात्म्य सांगितलें. जो हें ऐकतो तो धनवान्, पुत्रवान् व वक्ता होतो १२४. याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्यु• प्रतिस० कलियु० चतुर्थखंडांतील रुद्रमाहात्म्यवर्णन व रामानुजाची उत्पत्ति याविषयी चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

सूत ह्मणतात.— हे महाभागा भृगुवर्या, सर्व वस्तूंस सुख देणारें वसूंचे जें पवित्र माहात्म्य गुरूनें देवास सांगितले ते तू ऐक १. बृहस्पति ह्मणतात.— वैवस्वतमन्वतर लागलें असता पहिल्या शुभ सत्ययुगामध्यें विश्रवस मुनीची भार्या इल्वलानामक तामसी शक्ति पार्थिवपूजनानें शिवाची

---

१ भविष्यपुराणाच्या या प्रतिसर्गपर्वातच तिसऱ्या खंडाच्या अठ्ठाविसाव्या अध्यायात (श्लोक १५) " भविष्यपुराण तामस आहे " असें ह्मटलें आहे. व त्या तामसत्वाचा अतिरेक जर कोठें पहावयाचा असेल तर या अध्यायात व विशेषतः शेवटी शेवटी चांगला प्रत्ययास येईल

विश्रवसो मुनेः २ शिवमाराधयामास सती सा पार्थिवार्चनैः । एतस्मिन्नन्तरे जातो दीक्षितान्वयसंभवः ३ यक्षशर्मा महाधूर्तो यक्षिणीपूजने रतः । तस्य मित्रस्नुषा सुभ्रूरमिता तेन पापिना ४ तेन दोषेण विप्रोऽसौ कुष्ठभूतस्तदाऽभवत् । कुष्ठभूतं द्विजं त्यक्त्वा यक्षिणी मन्त्रवत्सला ५ शिवलोकं ययौ देवी कैलासं गुह्यकालयम् । क्षुधातुरो यक्षशर्मा शिवरात्रे महोत्सवे ६ दर्शितं पूजनं तेन योषिद्भ्यश्चोपदेशतः । प्रभाते सममुप्राप्ते पारणं कृतवान्द्विजः ७ मरणं प्राप्तवान्कुष्ठी तत्रैव शिवमन्दिरे । तेन पुण्यप्रभावेन राजासौत्कर्णाटके राजराज इति ख्यातो मण्डलीको नृपोभवत् । शिवार्चनं मङ्गलदे गेहे गेहे दिने दिने ९ ब्राह्मणैः कारयामास राजराजो महाबलः । शताब्दं भूतले राज्यं कृत्वा तेन महात्मना १० राज्याधिकारं श्रेष्ठस्य सुतस्य प्रददौ नृपः । ततः काशीपुरीं प्राप्य शिवं तुष्टाव पूजनैः ११ त्रिवर्षान्ते महादेवो ज्योतिर्लिङ्गो बभूव ह । राजराजेश्वरो नाम प्रसिद्धोऽभूच्छिवः स्वयम् १२ स नृपः पावितस्तेन त्यक्त्वा प्राणांस्तदा स्वयम् । इल्वलामर्भगामग्र्य पुत्राऽभच्छुभलक्षणः १३ जातः कुत्सितवेलायां रात्रौ घोरतमावृते । कुबेर इति तन्नाम प्रसिद्धमभवद्भुवि १४ तपसा तोषयामास स बालः परमेष्ठिनम् । तस्मै ब्रह्मा तदागत्य लङ्कां नाम पुरीं शुभाम् १५ सुवर्णरचितां रम्यां कारयित्वा ददौ प्रभुः । तिस्रः कोट्यः स्मृता यक्षा लोककार्यपरायणाः १६ तेषां स्वामी स वै चासीद्यक्षराडिति विश्रुतः । किन्नरा बहुरूपाश्च तदादेशनिवासिनः १७ बलिभिः पूजयामासु किन्नरेशस्तदा स्वयम् । गुह्यका नर-

---

आराधना करिती झाली. इतक्यात दीक्षितवंशामध्ये यक्षशर्मानामक महावृत्त पुरुष निर्माण झाला. तो यक्षिणीच्या पूजेमध्यें निमग्न असे. त्या पाप्याने आपल्या मित्राच्या सुंदर स्नुषेचा उपभोग घेतला २–४. त्या दोषानें हा ब्राह्मण तात्काल कुष्ठरोगी झाला. तेव्हा कुष्ठरोगाने व्यापलेल्या ब्राह्मणास सोडून मंत्रावर जिचे प्रेम आहे अशी ती यक्षिणी देवी शिवलोकी ह्मणजे कैलासावरील गुह्यकालयी गेली. इकडे यक्षशर्मा अतिउत्तम शिवरात्रीच्या दिवशीं क्षुधातुर झाला व त्यानें पूजनविधि पाहिला, आणि स्त्रियाच्या सांगण्यावरून प्रभातकाल प्राप्त झाला असता तो ब्राह्मण पारणें सोडिता झाला ९—७. पुढे तो कुष्ठी त्या मंदिरामध्येच मरण पावला व त्या पुण्यप्रभावाने तो कर्नाटकातील राजा झाला ८. तो राजराजा या नावानें प्रसिद्ध असून मांडलिक झाला. त्या महाबलाढ्य राजाने ब्राह्मणाकडून मंगल देणारे शिवपूजन प्रतिदिनीं घरोघर करविलें. त्या महात्म्यानें भूतलीं शंभर वर्षे राज्य केले ९, १०. नंतर आपल्या ज्येष्ठ पुत्राला राज्याधिकार देऊन तो राजा काशीनगरास आला व त्याने शंकरास पूजनाच्या योगाने संतुष्ट केले ११. तीन वर्षानीं महादेव ज्योतिर्लिंगमय झाला. तो स्वतः शंकर राजराजेश्वर या नावानें प्रसिद्ध झाला. त्याने त्या राजास पावन केले असता तो प्राण सोडून त्या वेळीं स्वतः इल्वलेन्या गर्भस्थानीं आला व तिचा तो शुभलक्षणी पुत्र झाला. पण त्याचा जन्म अतिशय घोर अंधकारानें भरलेल्या रात्री निंद्य वेळीं झाला होता. भूलोकीं कुबेर असे त्याचें नांव प्रसिद्ध झालें १२,१३. त्या बालकानें तपाच्या योगानें ब्रह्मदेवास संतुष्ट केलें असता ब्रह्मदेव त्याच्याजवळ आला व त्यास लंकानामक सुवर्णखचित, रम्य व शुभ नगरी करवून ती देता झाला. लोकाच्या कार्यामध्यें परायण असलेले यक्ष तीन कोटि आहेत ह्मणून सांगितलेलें आहे. त्यांचा यक्षराट् या नावानें प्रसिद्ध असलेला तो स्वामी झाला. त्याच्या आज्ञेमध्यें राहणारे अनेक स्वरूपाचे किन्नर त्यास बलि देऊन पूजन करिते झाले. तेव्हा तो स्वतः किन्नराचा ईश झाला. मनुष्यपणामध्यें स्थित असलेले व स्वर्गलोकीं मोलमजुरी करणारे जे गुह्यक होते त्याचाही तो भगवान् कुबेर स्वतः स्वामी झाला.

भावस्था दिव्यमौल्यप्रकारिणः. १८ तेषां स्वामी स वै चासीत्कुबेरो भगवान्स्वयम् । गिरिभ्यो बहुरत्नानि गृहीत्वा लोकहेतवे १९ रक्षोभिः प्रेषयामास गेहे गेहे जने जने । धर्मकार्यकरा ये तु नरा वेदपरायणाः २० तेषां कोशाश्च तेनैव पूरिता नरधर्मिणा । ये तु लोभपरा धूर्ता नराः संचयकारिणः. २१ तेषां राजा स भगवान्द्रव्यदो राक्षसेश्वरः । शवभूता नरा ये वै दाहिता वह्निकर्मणि २२ अग्निद्वारेण तन्मांसं भुञ्जते राक्षसाः सदा । एभिर्विभूतिभिर्युक्तं दृष्ट्वा तं रावणो बली २३ जित्वा निष्कास्य लङ्कायाः स्वयं राजा बभूव ह । कुबेरो दुःखितस्तत्र शंकरं दुःखनाशनम् २४ शरण्यं शरणं प्राप्तस्तदा तु भगवान्हरः । तेन मैत्री कृता रम्या कुबेरेण समं तदा २५ अलकावती नाम पुरी रचिता विश्वकर्मणा । सतां मङ्गलदा तत्र कुबेरो हर्षमाप्तवान् २६ इति श्रुत्वा तदनुजो रावणो लोकरावणः । कैलासं गिरिमागम्य नलकूबरभोगिनीम्२७ दृष्ट्वा पुलस्त्यतनयः परपूर्वां मधुराननाम् । तदा पतिव्रता देवी सुप्रभा प्राह तं रुषा २८ स्नुषेव तव पापात्मन्वर्तेऽहं लोकरावण । कुष्ठी भवत्तव तनौ तेन दोषेण दारुणः. २९ त्वया हृतं विमानं यज्ज्यद्यबन्धोश्च पुष्पकम् । निष्फलत्वमवाप्नोति यथा चौरैर्हृतं धनम् ३० इति शापान्वितो वीरस्तथाभूतः सुदुःखितः । शिवमाराधयामास कैलासे पार्थिवार्चनैः ३१ द्वादशाब्दमतो जातः पूजनं तस्य कुर्वतः । स रुद्रो न प्रसन्नोऽभूत्तदा दुःखी स रावणः ३२ जुहाव वह्नौ क्रमतः शिरांसि पुरुषादनः । स्थूलदेहं च सकलं स रुद्राय तदार्पयत् ३३ भस्मभूतस्तदा रक्षो न मृतो ब्रह्मणो वरात् ।

पर्वतातून अनेक रत्नें काढून त्यांनी दूतांच्या द्वारा घरोघर व प्रत्येक मनुष्याकडे पोचविलीं. जे पुरुष वेदामध्ये परायण असतात व धर्मकार्यें करीत असतात १४–२०, त्यांचे कोश त्याच नरधर्मी कुबेरानें भरून सोडिले आहेत. जे धूर्त व लोभी पुरुष द्रव्यसंचय करणारे असतात त्यांचाही तो भगवान् राजा असून तो राक्षसेश्वरच त्यास द्रव्य देत असतो. मृत झालेले जे पुरुष वह्निकर्मामध्ये दग्ध झालेले असतात त्यांचे मांस अग्नीच्या द्वारा राक्षस सर्वदा भक्षण करीत असतात. अशा प्रकारच्या ऐश्वर्यानें युक्त असलेल्या कुबेरास पाहून बलाढ्य रावण त्यास जिंकिता झाला व त्यास लंकेतून घालवून देऊन स्वतः राजा झाला. तेव्हा कुबेर दुःखित झाला व तो दुःखाचा नाश करणारा असा जो भगवान् शंकर हर त्यास शरण गेला. तेव्हा त्या कुबेराशी त्यानें रम्य मैत्री केली व त्यास आश्रय देऊन विश्वकर्म्याने सज्जनांस मंगल देणारी अलकावतीनामक नगरी रचली असता कुबेर तेथे राहूं लागला व आनंदित झाला२१—२६.हे ऐकून लोकांस दुःख देणारा त्याचा कनिष्ठ भ्राता रावण कैलासपर्वतावर आला व त्यानें कुबेरपुत्र जो नलकूबर त्याची पत्नी पाहिली. तेव्हा त्या पुलस्त्यपुत्र रावणाने त्या सुंदरीस स्पर्श केला. त्याबरोबर ती अतितेजस्वी व पतिव्रता स्त्री त्यास रागानें म्हणाली २७,२८ " अरे महापाप्या, अरे लोकांस रडविणाऱ्या दुष्टा, मी तुझ्या स्नुषेसारखी आहे. असे असता तू मला दुष्ट बुद्धीनें स्पर्श केलास. या दोषामुळें तुझ्या शरीरावर कोड फुटेल २९ व तूं आपल्या बंधूचें जें पुष्पकविमान हरण केलें आहेस तें चोरानीं हरण केलेल्या द्रव्याप्रमाणे निष्फळ होईल ३०. याप्रमाणे शाप झाला असता तो वीर त्या वेळीं अतिशय दुःखी झाला व त्यान पार्थिवपूजनाच्या योगाने कैलासीं राहून शिवाचे पूजन केलें. त्याला पूजन करावयास लागून बारा वर्षे झालीं. पण तो रुद्र प्रसन्न झाला नाही. तेव्हा रावण अतिशय दुःखित झाला ३१,३२. नंतर त्या नरभक्षकानें अग्निमध्ये क्रमानें आपली मस्तकें अर्पण केलीं. त्याने त्या वेळीं रुद्रास आपला संपूर्ण स्थूल देह अर्पण केला ३३. त्या राक्षसाचा देह जरी भस्मरूप झाला होता तरी ब्रह्मदेवाच्या वरामुळें तो मृत झाला नाहीं. अग्नींतून त्याचा दुसरा मनोहर

पावकादुद्भवं चान्यदेहं प्राप्य मनोहरम् ३४ शिवाय वायुरूपाय ददौ स्वाङ्गं पुनर्बली । पिशाचैर्वायुरूपैश्च भक्षितः स च रावणः ३५ न ममार वराद्धोरो वायोर्जातं कलेवरम् । गृहीत्वा स च रुद्राय नभोभूताय चार्पयत् ३६ तदा मातृगणैर्घोरैर्भक्षितोऽभूत्स रावणः । ब्रह्मणो वरदानेन न पञ्चत्वमवाप्तवान् ३७ नभसश्चोद्भव देहं शून्यभूत स रावणः । पुनः प्राप्य शिवायैव सोऽहभूताय चार्पयत् ३८ तदा प्रसन्नो भगवान्रुद्रोऽहकारदेवता । कुबेरस्य यथा मित्रो रावणस्य तथाऽभवत् ३९ एकैकनैव शिरसा कोटिकोटिशिरोऽभवत् । वज्रभूतमभूद्देह देवदेवप्रसादतः ४० एव स रावणो घोरो बभूव वरदर्पितः । देवदैत्यमनुष्याणां पन्नगानां च योषितः ४१ नवोढा रमिताश्चासन्ब्रह्माण्डे तेन रक्षसा । पतिव्रतामतं रम्य वेदधर्म सनातनम् ४२ भग्नीभूतमभूत्सर्व सर्वलोकेषु रक्षसा । क्षुत्तृड्भ्यां वर्जितो नित्य शकरणैव तर्पितः ४३ अन्ये सुरा विना यज्ञैः क्षुधिताः संबभूविरे । ब्रह्माण च पुरस्कृत्य क्षीराब्धौ प्राप्य दुःखिताः ४४ एकीभूय सुरास्सर्वे तुष्टुवुः परमेश्वरम् । तदा प्रसन्नो भगवान्सगुणो निर्गुणो हरिः४५उवाच सकलान्देवान्भक्तिनम्रान्यतेन्द्रियान् । कल्पारुढये श्वेतवाराहे नष्टराः कोऽपि दानव ४६ बभूव च यथैवासौ रावणो लोकरावणः। पुरा मार्कण्डकल्पे च निशुम्भ. शुम्भ एव हि ४७ यथा जातो तथा घोरो कुम्भकर्णश्च रावणः । रावणा बहवश्चासन्हीदृशो नैव रावणः ४८ अह ब्रह्मा तथा रुद्रो यतो जातास्सनातनाः । सा तु वै प्रकृतिर्माया कोटिविश्वविधायिनी ४९ देवसकटघोरेषु समर्थो देवराट स्वयम् । शक्रविघ्ने

देह उत्पन्न झाला. ३४. तेव्हा त्या बलवानानें वायुरूपी शिवास पुनः आपल शरीर अर्पण केलें. तेव्हा वायुरूपी पिशाचानीं त्या रावणास खाल्लें. पण वरामुळें तो घोर पुरुष मरण पावला नाहीं. वायूपासून उत्पन्न झालेलें शरीर ग्रहण करून तो आकाशरूप रुद्रास स्वशरीर अर्पण करिता झाला. तेव्हा त्या रावणास घोर मातृगणानीं भक्षण केलें. पण ब्रह्मदेवाच्या वरदानामुळें तो मरण पावला नाहीं. यामुळें त्या रावणास आकाशातून उत्पन्न झालेले शून्य शरीर पुनः प्राप्त झालें. तेव्हा अहरूप शंकरासच त्यानें तें अर्पण केलें ३९—३८. तेव्हा अहंकाराची देवता असा जो रुद्र भगवान् तो प्रसन्न झाला व ज्याप्रमाणें तो कुबेराचा मित्र होता तसाच तो रावणाचाही झाला. एकेक मस्तकाच्या योगानें त्यास केटीच्या कोटि मस्तकें झालीं. देवाधिदेवाच्या प्रसादानें त्याचे शरीर वज्रासारखें दृढ झालें. याप्रमाणे तो रावण वराने गर्विष्ठ झाला. ब्रह्माडातील देव, दैत्य, मनुष्य व नाग यांच्या नूतनविवाहित स्त्रियाचा त्या राक्षसानें भोग घेतला. वेदधर्मास अनुसरून असलेलें जें सनातन पतिव्रतेविषयीचे रम्य मत तें सर्वही सर्वलोकामध्यें त्या राक्षसाने नाहींसे करून सोडिलें. तो क्षुधा व तृषा यानी रहित असून शंकरच त्यास तृप्त करीत असे ३९—४३. दुसरे जे देव होते ते यज्ञावाचून क्षुधित झाले. ते दुःखयुक्त होऊन व ब्रह्मदेवास पुढे करून क्षीरसागरी गेले ४४. तेथे ते सर्व देव एकत्र जमून परमेश्वराची स्तुति करू लागले असता तो सगुण व निर्गुणरूप भगवान् हरि प्रसन्न झाला ४५ व ज्यानीं इंद्रियाचे नियमन केलें आहे व जे भक्तीनें नम्र आहेत अशा त्या सर्व देवास तो ह्मणाला " जसा हा लोकास दुःख देणारा रावण आज या श्वेतवाराहकल्पामध्यें झाला आहे तसा पूर्वी कोणीही झाला नाहीं. पूर्वी मार्कंडकल्पामध्यें शुंभ व निशुंभ जसे झाले होते त्याप्रमाणे हे घोर रावणकुंभकर्ण आज झाले आहेत. पूर्वी पुष्कळ रावण झाले होते. पण अशा प्रकारचा रावण कोणी झाला नाहीं. मी, ब्रह्मदेव व रुद्र असे आहीं तिघे सनातन देव जिच्यापासून झालों ती प्रकृति माया कोट्यावधि विश्वास निर्माण करणारी आहे. देवावर घोर संकट आलीं असता त्याचें निवारण करण्यास स्वतः इंद्र समर्थ आहे, इंद्रावर संकट आले असता भगवान् हर समर्थ

समुद्भवे समर्थो भगवान्हरः ५० रुद्राणां सङ्कटे घोरे समर्थोऽहं सदा भुवि मयि सङ्कटसम्प्राप्ते समर्थो भगवान्हरि ५१ ब्रह्मणः परमे दुःखे समर्था प्रकृतिः परा । मधुकैटभौ पुरा जातौ दानवौ लोकविश्रुतौ ५२ ताभ्यां दुःखमयो ब्रह्मा तुष्टाव जगदम्बिकाम् । तदा तस्या बलेनाह जघान मधुकैटभौ ५३ अतो मदाज्ञया सर्वे विष्णुमायां सनातनीम् । शरण्यां शरणं प्राप्य कुर्याम जगतो हितम् ५४ इति श्रुत्वा तु ते देव स्तुष्टुवुः प्रकृतिं पराम् । प्रसन्ना च तदा देवी ब्रह्मज्योतिर्मयी शिवा ५५ द्विधाभूता महीं प्राप्ता सीतारामौ परापरौ । त्रिलिङ्गजननी सीता तया तदपर द्विधा ५६ कृत तौ च द्विधा जातौ शब्दार्थौ रामलक्ष्मणौ । शब्दमात्रसमूहानां स्वामी रामस्सनातनः ५७ अर्थमात्रसमूहानामीशः क्लीबस्स लक्ष्मणः । यस्य वज्रमय वीर्यं ब्रह्मचर्यं दृढ तथा ५८ स क्लीबश्च ततोऽन्ये वै क्लीबभूता हि वानराः । परा तु प्रकृतिस्सीता तयोर्मङ्गलदायिनी ५९ भूमिमध्यात्समुद्भूता ह्ययोनिसंभवा शिवा । सहस्र राम रामेति जपित येन धीमता ६० सीतानाम्ना च तस्यैव फल ज्ञेय च तत्समम् । योनिभूतौ च तौ देवौ राघेयस्य गृहे गतौ ६१ इद दृश्य यदा नासीत्तामसी प्रकृतिस्तदा । अक्षरा शेषभूता च स्वय जाता त्रिधेक्षया ६२ पूर्वं शेषस्स वै रामो मध्ये क्लीबस्स लक्ष्मणः । अपरौ पूर्वतो जातौ पुक्लीबौ च परेश्वरौ ६३ परा भागस्तु सा देवी योगनिद्रा सनातनी । अन्यकल्पेषु हे देवाः क्षीरशायी हरिः स्वयम् ६४ रामोऽप्यजस्तथा शेषो रुद्ररूपस्स लक्ष्मणः । सीता भगवती लक्ष्मीर्जाता जनकनन्दिनी ६५

आहे ४९–५०. रुद्रावर घोर सकट आले असता त्याचे निवारण करण्यास सर्वदा भूलोकी मी समर्थ आहे. मजवर सकट आले असता भगवान् हरि समर्थ आहे ५१. व ब्रह्मास परम दुःख झाले असता परा प्रकृति समर्थ आहे. मधु व कैटभ या नावाचे दानव पूर्वी निर्माण झाले होते ५२. त्यान्यापासून ज्याला अतिशय पीडा झाली आहे असा ब्रह्मदेव जगदंबेचे पूजन करिता झाला. तेव्हा तिच्या सामर्थ्याने मी मधुकैटभास मारिले. यास्तव, माझ्या समतीने शरण जाण्यास योग्य असलेल्या सनातन विष्णुमायेस आपण सर्व शरण जाऊन जगाचे हित करू या. " हें ऐकून देव परा प्रकृतीची स्तुति करू लागले. तेव्हा ब्रह्मज्योतिरूप ती शिवा देवी प्रसन्न झाली ५३–५५. तिने दिव्य स्वरूप धारण केले व ती भूलोकी आली. तिचे सीता हे पर रूप व राम हे अपर रूप होय. त्या त्रिलिंगजननी सीतेने ते अपर तत्त्व दोन प्रकारचे केले. तेव्हा शब्द व अर्थ या रूपाचे राम व लक्ष्मण दोन प्रकारें निर्माण झाले. केवळ शब्दसमूहाचा सनातन राम हा स्वामी आहे ५६,५७ व केवल अर्थसमूहाचा ईश्वर लक्ष्मण असून तो क्लीब आहे. त्याचे वीर्य वज्रासारखे असून ब्रह्मचर्यही तसेच दृढ आहे ५८. तात्पर्य, तो याप्रमाणे क्लीब आहे. त्याच्या हून दुसरे जे कित्येक वानर होत ते सर्व क्लीबरूपच होत. परा प्रकृति जी सीता ती त्या उभयतास मगल देणारी असून ती भूमीमधून अयोनिसंभव निर्माण झाली. पण ती योनीचे कारण आहे, ज्या बुद्धिमानाने सहस्र वेळ " राम राम " असे ह्मटले आहे त्यास सीतेच्या एका नामोच्चारानेच तितके फल मिळते असे समजावे. ते दोघे देव योनिरूप असून ते राघेयाच्या गृहीं गेले ५९–६१. ज्या वेळीं हें दृश्य नव्हते तेव्हा तामसी प्रकृति होती व ती तिने प्रकारें विचार करून अक्षर व शेषरूप झाली. पूर्वी जो शेष तोच राम, मध्ये जो क्लीब तो लक्ष्मण व दुसरे दोघे पूर्वीन्यापासून पुरुषरूप व क्लीबरूप परमेश्वर झाले ६२, ६३. जी योगनिद्रा सनातन देवी तोच पर भाग होय. हे देवहो, इतर कल्पामध्ये क्षीरशायी स्वतः जन्मशून्य हरि राम, तसाच रुद्ररूप शेष लक्ष्मण व भगवती जनकनंदिनी सीता झाली ६४,६५. हरीचे सुदर्शन भरत व शंख त्याचा

सुदर्शनश्च भरतो हरेः शङ्खस्ततोऽनुजः । कल्पाख्ये श्वेतवाराहे रामो जातः परात्परः ६६ प्रद्युम्नो भरतो ज्ञेयोऽनिरुद्धः शत्रुहा प्रभुः । तैश्च सर्वे विदलिता राक्षसा रावणादयः ६७ कीर्तिं स्वकीयां लोकेषु पावनीं स्थाप्य स प्रभुः । पुष्पकं च कुबेराय विमानं च तदा ददौ ६८ रुद्रसंख्यासहस्राब्दं राज्यं कृत्वा परं ययुः । सूत उवाच ॥ इति श्रुत्वा कुबेरस्तु प्रथमो वसुदेवता ६९ स्वमुखात्स्वांशमुत्पाद्य वैश्ययोनौ बभूव ह । हरदत्तस्य वैश्यस्य पुत्रो भूत्वा महीतले ७० त्रिलोचनस्य वै नाम मथुरायां बभूव ह । सर्वव्ययं कृत्वा नानातीर्थेषु हर्षितः ७१ पुरीं काशीं समागम्य रामानन्दं च वैष्णवम् । नत्वा तद्वश्यमभवच्छिष्यो भूत्वा त्रिलोचनः ७२ स्वगेहं पुनरागत्य स वैश्यश्चाज्ञया गुरोः । रामभक्तिपरश्चासीत्साधुसेवापरायणः ७३ तदा तु भगवान्रामो दासभूतश्च तद्गृहे । स्थितस्त्रयोदशे मासि सर्ववाञ्छितदायकः ७४ मणिरत्नहिरण्यानि वासांसि विविधानि च । नानाव्यजनयोग्यानि ब्राह्मणेभ्यः स्वयं ददौ ७५ वैष्णवेभ्यो यतिभ्यश्च मनोवाञ्छितदायकः । ततस्त्रिलोचनं प्राह भगवान्रावणार्तिहा ७६ अहं रामो न वै दासस्तव भक्तिविमोहितः । निवासं कृतवान्गेहे तव प्रियहिते रतः ७७ अद्यप्रभृति भो वैश्य वसामि हृदये तव । इत्युक्त्वाऽन्तर्हितो देवः स वैश्यो हर्षमागत. ७८ त्यक्त्वा कलत्रं पुत्रं च प्राप्य वैराग्यमुत्कटम् । उषित्वा सरयूतीरे रामध्यानपरोऽभवत् ७९ [५०८८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये वसुमाहात्म्ये त्रिलोचनवैश्योत्पत्तौ पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

बृहस्पतिरुवाच ॥ स्वायंभुवेऽन्तरे पूर्वं ध्रुववंशसमुद्भवः । राजा प्राचीनबर्हिश्च बभूव मखका-

---

कनिष्ठ बंधु झाला. श्वेतवाराहनामक कल्पामध्यें हा परात्पर राम झाला. प्रद्युम्न भरत व प्रभु अनिरुद्ध शत्रुघ्न झाला असे समजावें. त्यानी रावणादि सर्व राक्षसाचे निर्दालन केलें ६६,६७ व आपली पवित्र कीर्ति लोकामध्य प्रस्थापित करून तो प्रभु त्या वेळीं कुबेरास पुष्पकविमान परत देता झाला व अकरा सहस्र वर्षे राज्य करून शेवटी तो परम पदी गेला. सूत ह्मणतात:— हे ऐकून पहिली वसुदेवता ह्मणजे कुबेर आपल्या मुखातून आपला अंश काढून वैश्ययोनीमध्यें निर्माण झाला. तो भूलोकीं हरदत्त वैश्याचा पुत्र होऊन मथुरेमध्यें त्रिलोचन या नावानें प्रसिद्ध झाला. त्यानें अनेक तीर्थामध्ये आपले सर्व द्रव्य आनंदानें खर्च करून काशीपुरीस गमन केले व तो त्रिलोचन रामानंद वैष्णवास नमस्कार करून व त्याचा शिष्य होऊन त्याच्या स्वाधीन झाला ६८–७२. नंतर गुरूच्या आज्ञेने पुनः आपल्या गृही परत येऊन तो वैश्य रामभक्तीमध्यें व साधूंच्या सेवेमध्य तत्पर झाला ७३. तेव्हा भगवान् राम त्याच्या गृहामध्ये त्याचा दास होऊन तेरा महिने राहिला. व त्याचें सर्व वांछित त्यानें पूर्ण केले ७४. त्यानें मणि, रत्नें, सुवर्ण, नानाप्रकारची वस्त्रे व नानाप्रकारचीं छत्रचामरादि व्यजनें स्वतः ब्राह्मणास दिलीं. तो वैष्णव व यतींस जे इष्ट वाटेल तें देत असे. नतर रावणास मारणारा भगवान् त्रिलोचनास ह्मणाला ७५, ७६ " मी तुझ्या भक्तीने मोहित झालेला राम आहें; दास नव्हे. तुझ्या गृही तुझ्या इष्ट हितामध्ये निमग्न होऊन मी राहिलो होतो ७७. हे वैश्या, आजपासून मी तुझ्या हृदयामध्य राहीन " असे बोलून देव गुप्त झाला व तो वैश्य हर्षयुक्त झाला. त्याने पुत्र व स्त्री यास सोडून व तीव्र वैराग्यान युक्त होऊन सरयूतीरीं निवास केला व तो रामाच्या ध्यानामध्यें निमग्न झाला ७८,७९. ह्याप्रमाणें श्रीभविष्यपुराणातील चतुर्यु० प्रतिस० कालियु० चतुर्थखंडातील त्रिलोचन वैश्याविषयीं पधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥

बृहस्पति ह्मणतात—पूर्वी स्वायंभुव मन्वंतरामध्यें ध्रुवाच्या वंशात उत्पन्न झालेला प्राचीनबर्हि

रक्तः १ नारदस्योपदेशेन त्यक्त्वा हिंसामयं मखम् । ज्ञानवान्वैष्णवो भूत्वा दशपुत्रानजीजनत् २ प्रचेता नाम तेषां वै जातस्तत्रैकरूपिणाम् । पितुराज्ञां पुरस्कृत्य जलमध्ये तपोऽर्थिनः ३ रत्नाकरस्य सिन्धोश्च मग्नभूता बभूविरे । तेषां तु तपसा तुष्टः स्वयंभूश्चतुराननः ४ सप्ताब्धिषु च सप्तांश्च सुतान्संस्थाप्य लोकराट् । रत्नाकरेऽष्टमं पुत्रं नवमं मानसोत्तरे ५ दशमं मेरुशाखायां सुतं कृत्वा मुमोद ह । अपो वहति यो लोके स आपव इति स्मृतः ६ द्वितीयो वरुणो नाम यादसां पतिरुच्यते । ददौ पाशं तदा ब्रह्मा दैत्यबन्धनहेतवे ७ पाशी नाम ततो जातो वरुणस्य महात्मनः । स तु पूर्वभवे चासीद्ब्राह्मणः शक्तिपूजकः ८ आपवो नाम विख्यातो वारुणीपानतत्परः । भद्रकाल्या प्रियो भक्तो नित्यं पूजनतत्परः ९ नानारक्तमयैः पुष्पैर्गुम्फितां रक्तमालिकाम् । रक्तचन्दनसंयुक्तां गृहीत्वा मन्त्रसंयुतः १० भद्रकाल्यै निवेद्याशु नवार्णपरोऽभवत् । धूपैर्दीपैश्च नैवेद्यैस्ताम्बूलैर्ऋतुजैः फलैः ११ पूजयित्वा महालक्ष्मीं भद्रकालीं सनातनीम् । तिलैः साकरया युक्तं मधुना च हविः स्वयम् १२ बह्निद्वारेण संहुत्य तुष्टाव जगदम्बिकाम् । चरित्रं मध्यमं देव्या विष्णुदेवेन निर्मितम् १३ नवार्णवं तेनैव प्रायङ्ग जाप्यतत्परः । एवं वर्षत्रयं जातं तस्य पूजां प्रकुर्वतः १४ प्रसन्नाऽभूत्तदा देवी वरदा सर्वमङ्गला । वरं ब्रूहीति वचनं तमाह द्विजसत्तमम् १५ इति वाक्यं प्रियं श्रुत्वा द्विज आपव नम्रधीः । तुष्टाव दण्डवद्भूत्वा भद्रकालीं सनातनीम् १६ आपव उवाच ॥ विष्णुकल्पे पुरा चासीद्दानवो महिषासुरः । कोटिकोटिसहस्रैस्तु रथैर्वाजिगजैर्युतः १७ त्रैलोक्यं स्ववशं कृत्वा महेन्द्रस्य तदाऽभवत् । स्वारोचिषान्तरः

ह्मणून राजा होऊन गेला. तो यज्ञ करीत असे. पण नारदाच्या उपदेशानें त्याने हिंसामय यज्ञाचा त्याग करून विष्णुभक्ति स्वीकारिली व ज्ञानवान् होऊन त्याने दहा पुत्रास निर्माण केले. त्या एकसारख्या स्वरूपाने युक्त असलेल्या दहाही पुत्राचे प्रचेता असें नाव होते. पित्याची आज्ञा घेऊन जलामध्ये तप करण्याची इच्छा करणारे ते रत्नाकर सागरामध्यें निमग्न होऊन राहिले. त्यान्या तपश्चर्येनें स्वयंभू चतुरानन संतुष्ट झाला १–४ व त्या लोकराजानें सात समुद्रामध्ये त्यातील सात पुत्राची स्थापना करून आठव्या पुत्राची रत्नाकरामध्ये, नवव्याची मानसोत्तरी व दहाव्या पुत्राची मेरुशाखेवर स्थापना केली आणि तो आनंदित झाला. लोकामध्ये जो जलास वाहवितो त्यास आपव असें ह्मटलें आहे. जलजंतूचा अप्पति ह्मणून जो स्वामी आहे तो दूसरा वरुण होय. त्यास ब्रह्मदेवानें दैत्यास बांधण्याकरिता पाश दिला. त्यामुळे त्या महात्म्या वरुणाचें पाशी असें नाव पडले. तो पूर्वजन्मी शक्तिपूजक ब्राह्मण होता. तो आपव या नावानें प्रसिद्ध असून वारुणीपानामध्यें निमग्न असे व भद्रकालीचा प्रिय भक्त असल्यामुळे तिच्या पूजनामध्यें नित्य तत्पर होता ५–९. अनेक रक्तवर्ण पुष्पानीं गुफिलेली रक्तमाला रक्तचंदनयुक्त करून व मंत्रासह ती भद्रकालीस निवेदन करून लागलाच तो नवार्णतत्पर होत असे. धूप, दीप, नैवेद्य, तांबूल व त्या त्या ऋतूमध्ये उत्पन्न होणारी फळे याच्या योगाने भद्रकाली जी सनातन महालक्ष्मी तिचें पूजन करून व तीळ, शर्करा आणि मध यांनीं युक्त असलेलें हवि स्वत. वह्निमुखामध्यें अर्पण करून तो जगदंबेचे स्तवन करीत असे. विष्णुदेवानें निर्माण केलेलें देवीचे मध्यम चरित्र वाचून त्या नवार्णवानेंच रोज जप करण्यामध्ये तो ब्राह्मण तत्पर होत असे. याप्रमाणे तो पूजा करीत असता तीन वर्षे लोटलीं १०—१४. तेव्हा वरदा व सर्वमंगला देवी प्रसन्न झाली व त्या उत्तम ब्राह्मणास 'वर माग' असें ह्मणाली.हे प्रिय वाक्य ऐकून ज्याची बुद्धि नम्र आहे असा आपव ब्राह्मण भूमीवर लोटागण घालून सनातन भद्रकालीची स्तुति करूं लागला. आपव ह्मणतो:—पूर्वी विष्णुकल्पामध्यें महिषासुर राक्षस झाला. तो कोट्यावधि रथ, गज

कालो गतस्तद्राज्यकुर्वंतः १८ ततस्स भगवान्विष्णुस्सर्वदेवसमन्वितः । समुत्पाद्य मुखात्तेजो ज्वालामाली बभूव ह १९ ज्योतिर्लिङ्गात्तदा देवी भवती स्वेच्छया भुवि । सभूय महिष हन्त्री तस्यै देव्यै नमो नमः २० रुद्रकल्पे पुरा चासीद्रुद्रशंभुमुखाद्विवि । रावणश्च सहस्रास्यो जातो ब्रह्माण्डरावणः २१ राक्षसो बलवान्घोरो लोकालोकगिरेरधः । न्यवसद्देवदैत्यानां मनुष्याणां च भक्षकः २२ षष्ठे मन्वन्तरे तेन ब्रह्माण्डं राज्यमाकृतम् । ततो वैवस्वते प्राप्ते त्रेताद्यावंशके प्रभुः २३ स जातो राघवगृहे रामस्संकर्षणः स्वयम् । षाडराड्वपुर्भूत्वा स गतो जनकालये २४ धनुश्चाजगवं घोरं भङ्गित्वा तेन धीमता । तदा ब्रह्मादयो देवा ज्ञात्वा राम सनातनम् २५ सहस्रवदनस्यैव वर्ण्यमास कारणम् । तच्छ्रुत्वा हंसयानं च समारुह्य ससीतया २६ लोकालोकगिरौ प्राप्य घोरयुद्धमचीकरत् । हंसयानपताकायां संस्थितो हनुमान्कपिः २७ वदाश्च वाजिनस्तत्र नेता ब्रह्मा सनातनः । दिव्यवर्षमभूद्घोरं सग्राम तन रक्षसा २८ रावणस्य तदा क्रुद्धो द्विसहस्रैश्च बाहुभिः । अपरौ मूर्च्छायित्वा तौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ २९ जगर्ज बलवान्घोरस्त्रं च ब्रह्माण्डरावणः । ब्रह्मणा संस्तुता माता भवती ब्रह्मरूपिणी ३० सीता शान्तिमयी नित्या तया ब्रह्माण्डरावणः । विनाशिता नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ३१ ब्रह्मकल्पे पुरा चासीत्तालजङ्घान्वयोद्भवः । मुरो नाम महादैत्यो ब्रह्मणा वरदर्पितः ३२ ब्रह्माण्डेश महारुद्र महेन्द्रादिसमन्वितम् । स बभूव परात्त्याधिकारी रौद्र आसनं ३३ देवैस्सार्द्धं महादेवो माधव क्षीरशायिनम् ।

व घोडे यांनी युक्त असे १५-१७. त्रैलोक्य आपल्या वश करून तो त्या वेळी महेंद्र झाला. तो राज्य करीत असता सर्व स्वारोचिष मन्वंतर निघून गेले १८. तदनंतर सर्व देवासहवर्तमान भगवान् विष्णु मुखातून तेज निर्माण करून ज्वालामाली झाला तेव्हा तू भगवती—देवी—भूलोकी स्वेच्छेन त्या ज्योतिर्लिंगापासून निर्माण झालीस व त्या महिषास मारिलस. या तुज देवीस नमस्कार असो. पूर्वी रुद्रकल्पामध्ये उचडलेल्या शंभुमुखातून स्वर्लोकी ब्रह्मांडास पीडा देणारा सहस्रमुखी रावण झाला १९-२१. तो बलवान्, घोर व देव, दैत्य आणि मनुष्ये यांस खाणारा राक्षस लोकालोकपर्वताच्या खाली राहत असे. सहाव्या मन्वंतरामध्ये त्याने सर्व ब्रह्मांडामध्ये आपले राज्य स्थापिले. तदनंतर वैवस्वतमन्वंतर लागून अठ्ठाविसावे त्रेतायुग प्राप्त झाले असता तो प्रभु संकर्षण स्वतः राघवकुलामध्ये राम झाला. तो सोळा वर्षांचा झाला असता जनकसदनी गेला. व त्याने घोर अजगव धनुष्य तोडून टाकिले. तेव्हा ब्रह्मादिक देव राम सनातन ईश्वर आहे असें जाणून सहस्रमुखी रावणाचे वर्तमान त्यास सांगते झाले तें ऐकून सीतेसह तो हंसवाहनामध्ये बसून २२--२६ लोकालोकपर्वतावर आला, त्यानें रावणाशी घोर युद्ध केलें. त्या हंसवाहनाच्या ध्वजावर हनुमान् कपि बसला होता. चार वेद त्याचे घोडे झाले होते व सनातन ब्रह्मदेव सारथि होता. त्या राक्षसाशी देवांचे एक वर्षभर घोर युद्ध झालें. तेव्हा तो रावण रागावला व त्यानें आपल्या दोन हजार बाहूनी त्या अपरप्रकृतिरूप भ्रात्या रामलक्ष्मणास मूर्च्छित केलें व ब्रह्मांडास भयभीत करणारा तो बलवान् घोर राक्षस गर्जना करू लागला. तेव्हा तुज ब्रह्मरूपी मातेचे देवांनी स्तवन केलें. तेव्हा शांतिरूप जी नित्य सीता तिनें त्या ब्रह्मांडातील मथकर रावणास मारिले. तिला माझा नमस्कार असो, नमस्कार असो, नमस्कार असो. पूर्वी ब्रह्मकल्पामध्ये तालजंघाच्या वंशामध्यें उत्पन्न झालेला मुरनामक महादैत्य ब्रह्मदेवाच्या वरामुळे गर्विष्ठ झाला २७—३२. त्यानें ब्रह्मांडाचा ईश जो महारुद्र त्यास महेंद्रादिकांसहवर्तमान जिंकिले व तो रुद्राच्या आसनावर अधिकारी होऊन बसला ३३. तेव्हा देवासहवर्तमान महादेव क्षीरशायी लक्ष्मीपतीकडे जाऊन त्यास

यत्रा निवेदयामास स विष्णुः क्रोधसंयुतः ३४ जगाम गरुडारूढो यत्र दैत्यो मुरः स्थितः । तेन सार्द्धमभूद्युद्धं तस्य देवस्य दारुणम् ३५ सहस्राब्दमतो जातं दृष्ट्वा ब्रह्मा भयान्वितः । परां तु प्रकृतिं नित्यां तुष्टाव श्लक्ष्णया गिरा ३६ प्रसन्ना सा तदा देवी कुमारी सप्तहायनी । चतुर्भुजाऽस्त्रसहिता भूत्वा दैत्यमुवाच ह ३७ पराजितोऽयं भगवान्दैत्यराजेन वै त्वया । विजया नाम मे रम्या कैश्चिन्नाह पराजिता ३८ उन्मीलिनी विजुली च त्रिस्पृशा पक्षवर्द्धिनी । जया जयन्ती विजया वर्षे वर्षे क्रमादहम् ३९ एकादशशुभाचारा विष्णवस्तनया मम । एकादशीति विख्याता वेदमध्ये सदा ह्यहम् ४० अतो मां बलवन्नित्वा विजयां विष्णुमातरम् । पाणिं गृह्णातु मे रम्य सर्वपूज्यो भवान्भवेत् ४१ इति श्रुत्वा मुरो दैत्यस्तस्या रूपेण मोहितः । युयुधे स तया सार्द्धं क्षणार्द्धेन लय गत ४२ त मुर निहतं दृष्ट्वाऽनुजस्तन्नरकासुरः । दैत्यमायां महाघोरां चकार सुरनाशिनीम् ४३ एकादशी स्वयं माया हुंकारेणैव त तदा । नरकेन समं हत्वा जगर्ज जगदम्बिका ४४ तयोस्तेजो महाघोरमन्नमध्येषु चागमत् । दुष्टभूतमभूदन्नं नृणां रोगभयप्रदम् ४५ दृष्ट्वा चैकादशी नाम्ना रविशुक्रावुवाच ह । कुरुतां शुद्धमेवान्न भवन्तौ लोकविश्रुतौ ४६ तदाज्ञया तथा कृत्वा देवपूज्यौ बभूवतुः । एवं मातस्त्वया सर्वं कृतं तस्यै नमो नमः ४७ इति श्रुत्वा भद्रकाली स्तोत्र दिव्यं कथामयम् । आपवं प्राह सा देवी ब्राह्मणं वेदकोविदम् ४८ प्रलये च तदा प्राप्ते नष्टे स्थावरजङ्गमे । एकार्णवे पुरा त्वं वै मत्प्रसादात्सुखी भव ४९

हे सर्व सागता झाला. त्याबरोबर तो विष्णु क्रोधयुक्त झाला ३४ व गरुडावर बसून जेथें तो मुर दैत्य होता तेथें गेला. त्या देवाचें त्याच्याशी भयंकर युद्ध झालें ३५. पण युद्धास आरंभ होऊन सहस्र वर्षें होऊन गेली आहेत असें पाहून ब्रह्मदेव भयभीत झाला व त्यानें मधुर वाणीनें श्रेष्ठ व नित्य प्रकृतीची स्तुति केली ३६. तेव्हा ती देवी प्रसन्न झाली व तिनें सात वर्षाच्या कुमारीचे रूप धरिले आणि जिला चार भुजा आहेत व जी शस्त्रयुक्त आहे अशी ती देवी दैत्यास म्हणाली ३७ " तूं दैत्यश्रेष्ठाने या भगवानाचा पराजय केला पण माझें विजया असे रम्य नाव आहे. माझा कोणींही पराजय केलेला नाहीं. उन्मीलिनी, विजुली, त्रिस्पृशा, पक्षवर्धिनी, जया, जयती व विजया अशीं प्रत्येक वर्षी क्रमानें मला नावे प्राप्त झालीं आहेत. माझ्यामध्ये अकरा शुभ आचार आहेत. वैष्णव हा माझा पुत्र आहे. मी वेदामध्यें सर्वदा एकादशी या नावानें प्रसिद्ध आहें. यास्तव, हे बलवन्, मज विजयानामक विष्णुमायेस जिंकून माझें रम्य पाणिग्रहण कर. त्याच्या योगानें तूं सर्वास पूज्य होशील" ३८-४१ . हें ऐकून मुर दैत्य तिच्या रूपानें मोहित झाला व तिच्याशीं युद्ध करूं लागला. पण एका क्षणामध्ये त्याचा लय झाला४२. तो मुर मृत झाला आहे असें पाहून त्याचा कनिष्ठ भ्राता नरकासुर देवाचा नाश करणारी अतिघोर दैत्यमाया रचिता झाला. तेव्हा जगदंबा एकादशी स्वतःच मायारूपी असल्यामुळे केवल हुंकारानेच नरकासुरासहवर्तमान त्या मायेचा नाश करून गर्जना करूं लागली ४३,४४. नंतर त्या दोन्ही दैत्यांचें अतिघोर तेज अन्नामध्यें आलें. त्यामुळें तें अन्न दूषित होऊन पुरुषास रोग व भय देतें झालें ४५. ते पाहून ती एकादशी देवी रवि व शुक्र यास म्हणाली ' तुम्ही दोघें लोकप्रसिद्ध आहां. यास्तव, हे अन्न शुद्ध करा.' ४६. तेव्हा तिच्या आज्ञेनें त्यानीं तसें केले व त्यामुळें ते देवांस पूज्य झाले. तात्पर्य, हे माते, ज्या तूं असें सर्व केलेंस त्या तुला नमस्कार असो. हें अलौकिक कथानीं युक्त असलेलें स्तोत्र ऐकून ती देवी आपवनामक वेदामध्यें प्रवीण असलेल्या ब्राह्मणास म्हणाली ४७,४८ ' प्रलय प्राप्त झाला असतां व स्थावरजंगम सृष्टीचा नाश होऊन सर्व जलमय झालें असतां माझ्या प्रसादानें अगोदर तूं

स्तोत्रेणानेन सुप्रीता वरदाह सदा नरान् । इत्युक्त्वाऽन्तर्हिता देवी स विप्रो वरुणोऽभवत् ५० सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं भगवान्द्वितियो वसुः । वरुणः स्वमखात्तेजो जनयामास भूतले ५१ देहल्यां स तु वै जातो धर्मभक्तस्य वै गृहे । विधृता तस्य या कन्या गर्भं धत्ते हरिः स्वयम् ५२ इति ज्ञात्वा धर्मभक्तो मुमुदे सुतजन्मनि । नामदेव इति ख्यातः सांख्ययोगपरायणः ५३ आब्रह्मस्तम्बपर्यन्तं सर्वं विष्णुमयं जगत् । ज्ञात्वा दृष्ट्वा गतः काश्यां रामानन्दं हरिप्रियम् ५४ नत्वा तच्छिष्यतां प्राप्य तत्र वासमकारयत् । सिकन्दरो म्लेच्छपतिर्देहलीराज्यमास्थितः ५५ नामदेवं समाहूय सपरीक्ष्य तदा सुखी । अर्बकोटिमितं द्रव्यं ददौ तस्मै कलिप्रियः ५६ नामदेवस्तु तद्द्रव्यैर्गङ्गातीरेऽगमत्तमम् । काश्यामास वै काश्यां शुभ्रसर्वशिलामयम् ५७ दशविप्रान्पञ्चनृपान्पञ्चवैश्यान्छत गवाम् । पुनरुज्जीवयामास शवभूतान्स योगवान् ५८ बृहस्पतिरुवाच ॥ विश्वानर पुरा चासीद्ब्राह्मणो वेदकोविदः । अनपत्यो विधातारं तुष्टाव बहुपूजनैः ५९ वर्षमात्रेण भगवान्परमेष्ठी प्रजापतिः । समागत्य वचः प्राह वरं ब्रूहि द्विजोत्तम ६० इति श्रुत्वा स होवाच भगवंस्ते नमो नमः । प्रकृतेश्च परः पुत्रो भूयात्सम वराच्च वै ६१ इति श्रुत्वा तदा ब्रह्मा विस्मितः प्राह तं द्विजम् । एका वै प्रकृतिर्माया त्रिगुणैर्जननी स्वयम् ६२ मया दृश्यं जगत्सर्वं समुत्पादितमात्मना । प्रकृतेश्च परो यो वै परमात्मा स चाव्ययः ६३ अबुद्धिर्बोधनिरता नश्चक्षुस्तिश्च शृणोति वै । अदेहः स स्पर्शयेत्तत्र चक्षुः पश्यति स्वयम् ६४ अजिह्वोऽत्ति स गृह्णाति स

सुखी हो ४०. या स्तोत्राच्या योगाने मी अतिशय प्रसन्न होऊन मनुष्यास सर्वदा वर देईन " असे बोलून ती देवी गुप्त झाली, व ब्राह्मण वरुण झाला. सूत म्हणतात अशा गुरूचे वाक्य ऐकून दुसरा वसु भगवान वरुण आपल्या सत्त्वाने निर्माण केलेले तेज भूतलावर उत्पन्न करविता झाला ५१,५२ देहलीत धर्मभक्ताच्या घरी तो निर्माण झाला त्याची जी विधवा कन्या होती तिला स्वत हरीपासून गर्भ राहिला व हे जाणून पुत्राच्या जन्मकाली धर्मभक्त आनंदित झाला. नामदेव या नावाने तो प्रसिद्ध असे तो सांख्य व योग यामध्ये परायण होता ५२,५३ आब्रह्मस्तंबपर्यंत सर्व जगत विष्णुमय आहे असे जाणून व पाहून तो काशीस हरिप्रिय रामानंदाकडे गेला ५४ त्यास नमस्कार करून व त्याचा शिष्य होऊन तो तथेच वास करू लागला. इकडे सिकंदरनामक म्लेच्छ राजा देहलीस राज्य करीत होता ५५ त्याने परीक्षा पाहण्याकरिता नामदेवास बोलाविले व त्याची उत्तम प्रकारे परीक्षा करून तो संतुष्ट झाला. नंतर त्या कलिप्रिय राजाने त्यास अर्बकोटि द्रव्य दिले ५६ त्या द्रव्याच्या योगाने नामदेवाने काशीस ते गंगेवर मोठा घाट बांधिला. तो सर्वही शुभ्र पाषाणाचा आहे ५७ दहा ब्राह्मण, पाच राजे, पाच वैश्य व शंभर गाई, इतक्या शवरूप झालेल्या प्राण्यास त्या योग्याने पुन जीवित केले ५८ बृहस्पति म्हणतात — पूर्वी विश्वानर म्हणून कोणी एक वेदवेत्ता ब्राह्मण होता तो अपत्यरहित असल्यामुळे अनेक प्रकारच्या पूजा करून ब्रह्मदेवाची स्तुति करिता झाला ५९ एका वर्षात भगवान परमेष्ठी प्रजापति त्याच्याजवळ आला व "हे उत्तम ब्राह्मणा, वर माग" असे म्हणाला ६० हे ऐकून तो ब्राह्मण " हे भगवन्, तुला नमस्कार असो. तुझ्या वराच्या योगाने प्रकृतीहून पर जो ईश्वर तो माझा पुत्र होवो " ६१ हे ऐकून त्या वेळी विस्मित झालेला ब्रह्मदेव त्या ब्राह्मणास म्हणाला " त्रिगुणांची जननी स्वत माया एकटीच आहे, तिला प्रकृति असेही म्हणतात ६२ तिने स्वत पासून हे सर्व दृश्य जगत उत्पन्न केले. आता प्रकृतीहून जो पर आहे तो अव्यय परमात्मा होय. तो बुद्धिरूप इंद्रियांनी रहित आहे, तरी सर्वसाक्षी आहे. त्याला प्राण्याप्रमाणे कान नसूनही तो ऐकतो. तो जरी निराकार आहे, तरी या

जिघ्रति नसा विना। अमुखो वेदवक्ता च कर्मकारः करं विना ६५ अपादो गच्छति ह्येतन्नलिङ्गो नारिभोगवान्। अगुह्यो हि करात्मेतां सतत्त्वां गुह्यभूतिनीम् ६६ शब्दब्रह्म स्पर्शमय रूपब्रह्म रसात्मकम्। गन्धब्रह्म पर ज्ञेय तस्मै तद्ब्रह्मणे नमः ६७ प्रकृति पुरुष चैव विद्ध्यनादी उभावपि। विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ६८ एकार्थौ तौ च शब्दैकौ रूपैकौ नित्यविग्रहौ। आदिमध्यान्तरहितौ नित्यशुद्धौ सनातनौ ६९ पुंस्त्रीनपुंसकजननी ज्ञेया सा प्रकृतिः परा। पुरुषश्च कविः सूक्ष्मः कूटस्थो ज्ञानवान्पर ७० अजन्मा जन्म आप्नोति मायाजातः स जन्मवान्। कथ स पुरुषो नित्यस्तव पुत्रो भविष्यति ७१ अतो विश्वानरमुने मायाभूतो हरिः स्वयम्। तव पुत्रत्वमाप्नोति वरान्मम जनार्दन ७२ इत्युक्त्वाऽन्तर्दधे देवः पावकस्तद्वरादभूत्। अष्टानां च वसूना च पावको हि पतिस्वयम् ७३ वैश्वानर इति ख्यातोऽभवत्स्वाहापतिः प्रभुः। स तु पूर्वभवे देवः पुराकल्पेऽनलोऽभवत् ७४ नैषधो ब्राह्मणो धीमान्यथा राजा नलस्तथा। सकटाया गते भूरि दमयन्ती पतिव्रता ७५ स्वपितुर्गेहमासाद्यान्वेषयामास भूपतिम्। तदाऽनलो द्विजः प्राप्तो दमयन्तीं प्रति प्रभुः ७६ दृष्ट्वा त मोहमापन्ना दमयन्ती शुभानना। एतस्मिन्नन्तरे तत्र वागुवाचाशरीरिणी ७७ नाय नलस्तव पतिर्ब्राह्मणोऽयं समोहितः। अनलो नाम विख्यातो देववाक्यात्स चाभवत् ७८ महासरस्वती देवीं तुष्टाव स तु मोहितः। तस्य पुण्यप्रभावेन विश्व.-

---

सर्व सृष्टीस व्यापितो. त्याला नेत्रेंद्रिय नसूनही तो स्वतः पाहतो ६३,६४. त्याला जिव्हा नसूनही तो अन्नरस ग्रहण करितो. नासिकेवाचूनच तो वास घेतो. वागिंद्रिय नसूनही तो वेदवक्ता आहे. हातावाचूनच तो काम करितो ६५. त्याला पाय नाहींत, तरी तो गमन करितो. उपस्थेंद्रिय नसूनही स्त्रीभोग घेतो व गुह्येंद्रियावाचूनच तो या तत्त्वमय गुह्यभूत जननीस करितो ६६. शब्दब्रह्म, स्पर्शमय, रूपब्रह्म, रसब्रह्म व गधब्रह्म परम ज्ञेय होय. त्या ब्रह्मास नमस्कार असो. प्रकृति व परप्रकृतिरूप पुरुष ही दोन्हीं अनादि आहेत असें जाण. इंद्रियादि विकार व सुखदुःखादि गुण प्रकृतीपासून निर्माण झाले आहेत असें समज. तीं दोघेंही एका पदार्थाची इच्छा करणारीं आहेत, त्या दोघाचा शब्दही एकच आहे; त्यान्या रूपामध्येंही कांहीं भेद नाहीं, तीं नित्यरूप आहेत; आदि, मध्य व अंत यानीं तीं रहित आहेत, पुरुष व प्रकृति नित्य, शुद्ध व सनातन आहेत ६७–६९. ही श्रेष्ठ प्रकृति पुरुष, स्त्री व नपुसक याची जननी आहे असें समजावे; व पुरुष सर्वज्ञ, सूक्ष्म, निर्विकार, ज्ञानस्वरूप व श्रेष्ठ आहे ७०. वस्तुतः तो जन्मशून्य असूनही आपल्या मायेन्या द्वारा जन्म घेतो व त्यामुळे तो जन्मवान् आहे असें वाटतें. तेव्हा हे ब्राह्मणा, तो नित्य पुरुष तुझा पुत्र कसा होईल? ७१. यास्तव वा विश्वानर मुने, व्यास जनार्दन असेंही ह्मणतात तो स्वत. मायारूप हरि माझ्या वरामुळें तुझा पुत्र होईल" असें बोलून देव गुप्त झाला. नंतर त्यान्या वरामुळें पावक निर्माण झाला. हा पावक आठ वसूचा स्वामी होय ७२,७३. तो वैश्वानर या नांवाने प्रसिद्ध झाला. तो प्रभु स्वाहा देवीचा पति होता. तो देव पूर्वकल्पातील पूर्वजन्मीं अनल ह्मणून नैषधदेशातील बुद्धिमान ब्राह्मण होता. जसा राजा नल होता तसाच तो असे. राजा संकटावस्थेंत पडला असता पतिव्रता दमयंती ७४,७५ आपल्या पित्याच्या गृहीं आली, व तिनें राजाचा शोध करविला. तेव्हा हा ब्राह्मण दमयंतीचा पति प्रभु नल होऊन आला ७६ व त्यास पाहून जिचें मुख सुंदर आहे अशी दमयंती मोहित झाली. इतक्यात तेथें आकाशवाणी झाली कीं, हा तुझा पति नल नव्हे तर अतिशय मोहित झालेला हा अनलनामक ब्राह्मण आहे व तो देवाच्या सागण्यावरून नलरूपी झाला आहे. तेव्हा मोहित झालेला तो ब्राह्मण

नरसुतोऽभवत् ७९ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं पावको भगवान्प्रभुः । स्वमुखात्स्वांशमुत्पाद्य संजातस्तु ततो वसुः ८० रकणो नाम विख्यातो लक्ष्मीदत्तस्य वै सुतः । नगरे काञ्चनपुरे वैश्यजात्यां समुद्भवः ८१ यंकणा नाम तत्पत्नी बभूव च पतिव्रता । सर्वद्रव्यव्ययं कृत्वा धर्मकार्येषु दम्पती ८२ काष्ठमानीय विक्रीय बुभुजाते परस्परम् । रामानन्दस्तस्य गुरू रकणस्य महात्मनः ८३ [५१७१] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये वसुमाहात्म्ये रकणवैश्योत्पत्तिवर्णनो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

बृहस्पतिरुवाच ॥ दितिपुत्रौ महाघोरौ विष्णुना प्रभविष्णुना । सहतौ तु दितिर्ज्ञात्वा कश्यपं समपूजयत् १ द्वादशाब्दान्तरे स्वामी कश्यपो भगवाऋषिः । उवाच पत्नीं स हितं वर ब्रूहि वरान् ते २ सा तु श्रुत्वा नमस्कृत्य वचनं प्राह हर्षिता । अदितिर्मम या देवी सपत्नी पुत्रसंयुता ३ द्वादशतनयास्तस्या मम द्वौ तनयौ स्मृतौ । तदवध्यसुतेनैव विष्णुना सुरपालिना ४ विनाशितौ सुतौ घोरौ ततोऽहं भृशदुःखिता । देहि मे तनय स्वामिन्द्वादशादित्यनाशनम् ५ इति श्रुत्वा वचो घोरं दितिं प्राह सुदुःखितः । ब्रह्मणा निर्मितौ लोके धर्माधर्मौ परापरौ ६ धर्मपक्षास्तु ये लोके नरास्ते ब्रह्मणः प्रियाः । अधर्मपक्षास्तु नरा वैरिणस्तस्य धीमतः ७ अधर्मपक्षौ तनयौ तस्मान्मृत्युमुपागतौ । अतो धर्मप्रिये शुद्धं कुरु तस्मान्महाबलः ८ भविष्यति सुतो धीमांश्चिरजीवी तव प्रियः । इति श्रुत्वा दितिर्देवी कश्यपाद्गर्भमुत्तमम् ९ समाप्य सा शुभाचारा बभूव व्रतधारिणी । तस्या गर्भगते पुत्रे महेन्द्रश्च भयान्वितः १० दासभूतः स्थितो गेहे स दितेरा-

---

देवी महासरस्वतीची स्तुति करूं लागला. त्या पुण्यप्रभावानेंच तो विश्वानराचा पुत्र झाला होता ७७–७९. सूत ह्मणतातः— असे गुरूचे वाक्य ऐकून भगवान् प्रभु पावक आपल्या मुखांतून तेज उत्पन्न करून त्यापासून वसु झाला. तो लक्ष्मीदत्ताचा पुत्र असून रंकण या नावानें प्रसिद्ध होता. तो काञ्चनपुरातील वैश्यजातीमध्ये उत्पन्न झाला ८०,८१. त्याची यंकणानामक पतिव्रता पत्नी होती. त्या दोन्ही स्त्रीपुरुषानी धर्मकार्यामध्ये सर्वद्रव्यव्यय करून, काष्ठें आणून तीं विकून एकमेकाचा निर्वाह केला. त्या महात्म्या रंकणाचा गुरु रामानंदच होय ८२,८३. ह्याप्रमाणें श्रीभविष्यपुराणातील चतुर्यु० प्रतिसर्ग० कलियुगी० चतुर्थखंडातील रंकणनामक वैश्याच्या उत्पत्तीविषयीं सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥

बृहस्पति ह्मणतातः—महाघोर दितिपुत्रास सर्वेश्वर होण्याची इच्छा करणाऱ्या विष्णूनें मारिलें आहे असें जाणून दिति कश्यपाचे पूजन करिती झाली १. बारा वर्षांनीं भगवान् स्वामी कश्यप ऋषि पत्नीस ह्मणाला " हे सुंदरि, हितकारक वर माग. " तेव्हा हे ऐकून हर्षयुक्त झालेली ती नमस्कार करून ह्मणाली " जी माझी सवत देवी अदिति ती पुत्रासह आहे. तिचे बारा पुत्र असून माझे दोनच आहेत. देवांचें रक्षण करणाऱ्या तिच्या विष्णुनामक पुत्राने माझ्या दोन्ही घोर पुत्रास मारिलें. त्यामुळें मला अतिदुःख झालें आहे. यास्तव, हे स्वामिन्, बाराही आदित्याचा नाश करणारा मला पुत्र दे " २—५. हे घोर वचन ऐकून अतिशय दुःखित झालेला कश्यप दितीस ह्मणतो " ब्रह्मदेवानें लोकामध्ये धर्म व अधर्म निर्माण केले. ते क्रमानें श्रेष्ठ व निकृष्ट आहेत. लोकामध्ये जे पुरुष धर्मपक्षास असतात ते ब्रह्मदेवास प्रिय होतात; व जे पुरुष अधर्मपक्षास असतात ते त्या बुद्धिमानाचे वैरी होतात. तुझे पुत्र अधर्मपक्षाचे होते ह्मणून ते मृत्यु पावले. यास्तव हे धर्मप्रिये, तूं आपलें मन शुद्ध कर; ह्मणजे तुला एक महाबलाढ्य, प्रिय, बुद्धिमान् व चिरंजीवी पुत्र होईल. " हें ऐकून ती दिति देवी कश्यपापासून उत्तम गर्भाची प्राप्ति करून घेऊन शुभ

क्षया गुरोः । सप्तमासि स्थिते गर्भे शक्रमायाविमोहिता ११ अशुचिश्च दितिर्देवी सुष्वाप निजमन्दिरे । अङ्गुष्ठमात्रो भगवान्महेन्द्रो वज्रसयुतः १२ कुक्षिमध्यं समागम्य चक्रे गर्भं स सप्तधा । जीवभूतानतिबलान्दृष्ट्वा सप्त महारिपून् १३ एकैकः सप्तधा तेन महेन्द्रेण तदा कृतः । नम्रीभूतैश्च तान्दृष्ट्वा महेन्द्रस्तैः समन्वितः १४ योनिद्वारेण चागम्य प्रणनाम तदा दितिम् । प्रसन्ना सा दितिर्देवान्महेन्द्राय च तान्ददौ १५ मरुद्गणाश्च ते सर्वे त्रिरूपाताः शक्रसेवकाः । स तु पूर्वभवे जातो ब्राह्मणो लोकविश्रुतः १६ इलो नाम स वेदज्ञो यथेलो नृपतिस्तदा । एकदा बलवान्राजा मनुपुत्र इलः स्वयम् १७ एकाकी हयमारुह्य मेरोर्विपिनमाययौ । मेरोरधः स्थितः खण्डः स्वर्णगर्भो हरिप्रियः १८ निवास कृतवांस्तत्र कृत्वा राष्ट्रं महोत्तमम् । इलेनावृतमेवापि कृत तत्र स्थले सुराः १९ इलावृतमिति ख्यातः खण्डोऽभूद्विबुधप्रियः । भारते ये स्थिता लोका इलावृतमुपागताः २० मेरुर्गिरिर्वृक्षमयो विधात्रा निर्मितो हि सः । आरोहणं नरैस्तस्मिन्कृत स्वर्णमयं शुभम् २१ तमारुह्य कृतान्लोकाः स्वर्गलोकमुपागताः । तान्दृष्ट्वा मनुजान्प्राप्तान्सदेहान्स्वर्गमण्डले २२ विस्मिताश्च सुरास्सर्वे महेशं शरणं ययुः । ज्ञात्वा स भगवान्रुद्रो भवान्या सह शंकरः २३ इलावृत्तवने रम्ये स रेमे च तया सह । एतस्मिन्नन्तरे प्राप्तो वैवस्वतसुतो महान् २४ इलो नाम महाप्राज्ञो मृगयार्थी सदाशिवम् । नग्नभूत समालोक्य नेत्रे संमील्य सस्थितः २५ लज्जितां गिरिजां दृष्ट्वा शशाप भगवान्हरः । अस्मिन्खण्डे सदा नार्या भवि-

---

आचरण करणारी व व्रत धारण करणारी झाली. तिच्या गर्भामध्ये पुत्र आहे असें समजताच महेंद्र भयभीत झाला ६-१०. तो गुरूच्या आज्ञेनें दितीच्या गृहीं दास होऊन राहिला. तो गर्भ सात महिन्याचा झाला असता इंद्राच्या मायेनें मोहित झालेली देवी दिति आपल्या मंदिरामध्यें अपवित्र होऊन निजली. तेव्हा भगवान् महेंद्र वज्रासह अंगुष्ठप्रमाण होऊन तिच्या कुक्षीमध्यें शिरला व त्यानें त्या गर्भाचे सात तुकडे केले. पण ते सातही महारिपु अतिबलाढ्य असून जीवंत आहेत असें पाहून महेंद्रानें पुनः त्यातील प्रत्येकाचे सात सात तुकडे केले. व नम्र झालेल्या त्यास पाहून त्याच्यासह महेंद्र योनिद्वाराने बाहेर आला; व त्याने तात्काल दितीस प्रणाम केला. तेव्हा दिति प्रसन्न झाली व तिने त्या देवास महेंद्राचे स्वाधीन केले. ते सर्वही मरुद्गण या नावानें प्रसिद्ध असून इंद्राचे सेवक आहेत. असो. तो मरुत् पूर्वजन्मीं लोकप्रसिद्ध ब्राह्मण झाला. इल असे त्याचे नाव असून तो वेदज्ञ असे. ह्मणजे ज्याप्रमाणें इल राजा होता तसाच तो असे. एकदा बलवान् मनुपुत्र राजा इल स्वतः एकटाच घोडयावर बसून मेरुपर्वताच्या अरण्यामध्यें आला. मेरूच्या खालीं एक हरीस प्रिय असलेलें सुवर्णमय खंड होतें. तेथेच उत्तम राष्ट्र करून तो राहूं लागला. हे देवहो, त्या स्थळीं इलाने सर्व प्रदेश व्यापून टाकिला असल्यामुळे ११—१९ तें खड इलावृत्त या नावानें प्रसिद्ध झालें. तें वृत्त देवास प्रिय आहे. भारतामध्ये जे लोक होते ते इलावृत्तास आले. ब्रह्मदेवानें वृक्षमय मेरुपर्वत निर्माण केला होता. पण त्यावर त्या पुरुषानीं स्वर्णमय सुंदर जिना केला, व त्यावर चढून क्रमानें ते सर्व स्वर्गलोकीं गेले. त्या देहासह स्वर्गमंडळीं आलेल्या मनुष्यास पाहून २०–२२ सर्व देव विस्मित झाले व ते महेश्वरास शरण गेले. तेव्हा सर्व वर्तमान ऐकून कल्याण करणारा भगवान् रुद्र पार्वतीसह रम्य इलावृत्तवनामध्ये आला व तिच्यासीं रममाण झाला. इतक्यामध्यें वैवस्वताचा इलनामक ज्येष्ठ पुत्र तेथें आला २३,२४. तो महाप्राज्ञ मृगयेकरितां तेथें आला असता त्यानें नग्न असलेल्या शिवास पाहून आपले नेत्र मिटले व तो तेथें तसाच राहिला२५.

ष्यन्ति च मां विना २६ इत्युक्त्वा वचन तस्मिन्नार्यस्सर्वा बभूविरे । इला बभूव नृपतेः कन्या जनमनोहरा १७ बहुकाल मरुपृष्ठे महत्तपमचीकरत् । इला समाधिभूता या सप्तविंशचतुर्युगम् २८ जातं तत इला कन्या त्रेतामध्ये तु चन्द्रजम् । बुधदेव पतिं कृत्वा चन्द्रवंशमजीजनत् २९ अयोध्याधिपतिः श्रीमान्यदेलावृत्तमागतः । तस्य राज्ञी मदमती नाम्ना तुष्टाव पार्वतीम् ३० तदा प्राप्त इलो विप्रस्तस्या रूपेण मोहितः । पस्पर्श तां मदमतीं राज्ञीं कामविमोहितः ३१ एतस्मिन्नन्तरे तत्र वागुवाचाशरीरिणी । इला नाय द्विजश्चाय तव रूपविमोहितः ३१ अनिलो नाम तत्रैव विख्यातोऽभूद्द्विजस्य वै । कामाग्निपीडितो विप्रस्स तुष्टाव च पावकम् ३३ छित्त्वा छित्त्वा शिरो रम्य तस्मै जात पुनः पुनः । दत्त्वा तुष्टाव त देव प्रसन्नोऽभूद्धनञ्जयः ३४ प्राह त्वमनपञ्चाशद्विभेदाञ्जनयिष्यसि । तथाह मित्रवान्भूत्वा तत्संरक्षयस्तव कामदः ३५ यथा कुबेरो भगवान्सर्वेशद्वरुणप्रियः । तथाहमनपञ्चाशद्विभेदस्तव वै सखा ३६ इत्युक्ते वचने तस्मिन्दितिकुक्षौ द्विजोत्तम । वायुर्नाम स वै जात. पावकस्य प्रियः सखा ३७ सूत उवाच॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्य वैश्यजात्यां समुद्भवः । धान्यपालस्य वै गेहे मूलगण्डान्तजः सुतः ३८ पितृमातृपरित्यक्त. काश्यां विन्ध्यवने तदा । अलिको नाम वै म्लेच्छस्तत्र स्थाने समागत. ३९ अनपत्यो वस्त्रकारी सुत प्राप्य गृह ययौ । कबीर इति विख्यातः स पुत्रो मधुरानन ४० स सप्ता-

---

पण गिरिजा लाजली आहे असे पाहून भगवान् शंकराने शाप दिला की या खंडामध्ये माझ्यावाचून सर्व स्त्रिया होतील. असें वचन तो बोलला असता त्या खंडामध्ये असलेले सर्व पुरुष स्त्रिया झाल्या. लोकांस मोह पाडणारी इलानामक राजाची कन्या होती. तिने दीर्घ कालपर्यंत मेरुशृंगावर मोठें तप केले. इलेला समाधि लागल्यानंतर सत्तावीस चतुर्युगे झाली. तदनंतर इलाकन्या त्रेतायुगामध्यें चंद्रपुत्र जो बुधदेव त्यास पति करून चंद्रवंशास उत्पन्न करिती झाली २६—२९. जेव्हा श्रीमान् अयोध्याधिपति इल इलावृत्तास आला तेव्हा मदमतीनामक त्याची राणी पार्वतीची स्तुति करिती झाली. इतक्यात तिच्या रूपाने मोहित झालेला इल ब्राह्मण तेथें आला व कामाने मोहित होत्साता तो मदमती राणीस स्पर्श करिता झाला. इतक्यात तेथें आकाशवाणी झाली कीं, "हा इल नव्हे" तुझ्या रूपाने मोहित झालला हा ब्राह्मण आहे ३०—३२. तदनंतर हा अनल या नावाने तेथेच ब्राह्मणाच्या घरी प्रसिद्ध झाला. पुढे कामाग्नीनें पीडित झालेल्या त्या ब्राह्मणाने पावकाची स्तुति केली व त्याने पुन पुन उत्पन्न झालेले आपले रम्य मस्तक तोडून त्यास अर्पण केले व त्या देवाची स्तुति केली. तेव्हा अग्नि प्रसन्न झाला ३३, ३४ व त्यास ह्मणाला " तू आपल्या एकोणपन्नास भागास उत्पन्न करशील. त्याचप्रमाणे मीही तितक्याच संख्येचा होऊन तुझा मित्र होईन व तुझ्या इच्छा पूर्ण करीत राहीन. ज्याप्रमाणें भगवान् कुबेर सर्वांस वरुणास प्रिय होऊन राहिला आहे त्याप्रमाणेच मीही एकोणपन्नास प्रकारचा होऊन तुझा मित्र होईन " ३५,३६. असे त्यानें ह्मटलें असता तो उत्तम द्विज दितीच्या कुक्षीमध्यें वायु या नावाने उत्पन्न झाला. तो अग्नीचा प्रिय सखा होता ३७. सूत ह्मणतातः— असे गुरूचें वचन ऐकून तिसरा वसु वैश्यजातीमध्ये धान्यपालाचे गृहीं मूलगडातावर पुत्ररूपानें उत्पन्न झाला. पण त्या वेळी काशींतील विंध्यवनामध्यें त्याच्या आईबापानीं त्यास टाकिलें. इतक्यात अलीकनामक म्लेच्छ त्या स्थानीं प्राप्त झाला. त्यास अपत्य नव्हते व तो वस्त्रे विणण्याचे काम करीत असे. त्या पुत्रास घेऊन तो आपल्या गृहीं गेला. ज्याचें मुख सुंदर आहे असा तो पुत्र कबीर या नावानें प्रसिद्ध झाला. तो सात वर्षांच्या वयाचा झाल

ऽदवपुर्भूत्वा गोदुग्धापानतत्परः । रामानन्द गुरु मत्वा रामध्यानपरोऽभवत् ४१ स्वहस्तेनैव संस्कृत्य भोजन हरयेऽर्पयत् । तत्प्रियार्थं हरिस्साक्षात्सर्वकामप्रदोऽभवत् ४२ बृहस्पतिरुवाच ॥ उत्तानपादतनयो ध्रुवोऽभूत्क्षत्रियः पुरा । पितृमातृपरित्यक्तः स बालः पञ्चहायनः ४३ गोवर्द्धनगिरौ प्राप्य नारदस्योपदेशतः । स चक्रे भगवद्ध्यान षण्मासौ महाव्रती ४४ तदा प्रसन्नो भगवान्विष्णुर्नारायणः प्रभुः । खमण्डले पदं तस्मै ददौ प्रीत्या नभोमयम् ४५ दृष्ट्वा तद्गदनं रम्य मायाशक्त्या दिशो दश । स्वामिन च ध्रुव मत्वा भक्तिनम्रा बभूविरे ४६ ध्रुवोऽपि भगवान्साक्षात्सर्वपूज्यो बभूव ह । दिक्पतिः स तु विज्ञेयो भगणानां पतिः स्वयम् ४७ नभ पतिः कालकरः शिशुमारपतिस्स वै । पञ्चतत्त्वा स वै माया प्रकृतिस्तत्पतिः स्वयम् ४८ तस्माद्धरायां सभूतो भौमो नाम महाग्रहः । जलदेव्यास्ततो जातः शुक्रो नाम महाग्रहः ४९ वह्निदेव्यां ततो जातश्चाह तत्र महाग्रहः । वासुदेव्यां ध्रुवाज्जातः केतुनाम महाग्रहः ५० ग्रहभूतः स्थितस्तत्र नभोदेव्यां तदुद्भव । राहुनाम तथा घोरो महाग्रह उपग्रहः ५१ पूर्वायां दिशि वै तस्माज्जातश्चैरावतो गजः । आग्नेय्यां दिशि वै तस्मात्पुण्डरीको गजोऽभवत् ५२ वामनः कुमुदश्चैव पुष्पदन्तः क्रमाद्गजाः । सार्वभौमः सुप्रतीको नभोदिक्षु तु तत्सुता. ५३ अभ्रमुः कपिला चैव पिङ्गलाख्या इमा क्रमात् । ताम्रकर्णी शुभ्रदन्ती चाङ्गना चाञ्जनावती ५४ भूमिदिक्षु करिण्याश्च जाता तस्मात्तु तत्प्रियाः । भगिनी च तथा माता सुता चैव स्नुषा तथा ५५ पशुयोन्युद्भवानां च नृणां ता योषितस्सदा । देवयोन्युद्भवानां च नृणां पत्नी स्मृता स्वसा ५६ मनुवंशोद्भवानां च नृणां चान्यो-

असता गाईचे दूध पिऊन राहू लागला व रामानंदास गुरु करून तो रामध्यानामध्ये तल्लीन झाला ३८–४१. तो आपल्या हातानेच भोजन तयार करून हरीस अर्पण करीत असे व त्याच्या प्रीत्यर्थ साक्षात् हरि त्यास सर्व कामना देत असे. बृहस्पति म्हणतात — पूर्वी उत्तानपाद राजाचा ध्रुव म्हणून क्षत्रिय पुत्र झाला. तो बालक पाच वर्षांचा असताच त्याच्या आईबापांनी त्याचा त्याग केला ४२,४३. तेव्हा गोवर्धनपर्वतावर जाऊन नारदाच्या उपदेशाने त्या महाव्रती बालकाने सहा महिने भगवद्ध्यान केले तेव्हा प्रभु भगवान् नारायण प्रसन्न झाला व त्याने प्रीतीने त्यास आकाशमंडलामध्ये नभोमय स्थान दिले ४४,४५. त्याचें मायाशक्तीनें दशदिशेस असणारे रम्य मुख पाहून सर्व लोक ध्रुवास आपला स्वामी मानू लागले व भक्तीनें त्याच्यापुढे नम्र झाले. साक्षात् भगवान् ध्रुवही सर्वांस पूज्य झाला. तो दिशांचा पति आहे असे समजावे. तो स्वतः नक्षत्रगणाचा स्वामी आहे ४६,४७. तो नभ पति कालकर व शिशुमारपति होय. जी पंचतत्त्वांनी युक्त असलेली माया तीही तोच असून तो स्वतः प्रकृतीचा पति होय. त्याच्यापासून पृथ्वीच्या ठायी भौमनामक महाग्रह झाला. जलदेवीच्या उदरी त्याच्यापासून शुक्रनामक महाग्रह झाला. वह्निदेवीच्या ठिकाणी त्याच्याचपासून मोठा महाग्रह झाला. वासुदेवीच्या ठायी ध्रुवापासून केतुनामक महाग्रह झाला ४८–५० व नभोदेवीच्या ठायी त्याच्यापासून उत्पन्न झालेला राहुनामक महाघोर ग्रह उपग्रह होऊन अंतरिक्षामध्ये राहिला आहे ५१. पूर्व दिशेमध्ये त्याच्याचपासून ऐरावत गज झाला आहे. आग्नेय दिशेस त्याच्याचपासून पुंडरीकनामक गज झाला व त्याच्यापुढे क्रमाने प्रत्येक दिशेस वामन, कुमुद, पुष्पदंत, सार्वभौम व सुप्रतीक हे गज झाले. हे अंतरिक्षातील त्या त्या दिशामध्ये त्याच्यापासून उत्पन्न झालेले होत ५२,५३. अभ्रमु, कपिला, पिंगला, ताम्रकर्णी, शुभ्रदंती, चागना व चांजनावती ह्या क्रमाने त्या त्या भूमीवरील दिशामध्ये त्याच्यापासून उत्पन्न झालेल्या हस्तिनी होत या पूर्वोक्त दिग्गजांच्या प्रिय पत्नी होत. पशुयोनीमध्ये उत्पन्न झालेल्या नराच्या

ङ्गवाः स्त्रियः । इति धर्मो विधात्रोक्तो मया प्रोक्तः सुरा हि वः ५७ द्विधा ध्रुवस्य विज्ञेयो भूमेरूर्ध्वमधस्तथा । सद्गुणः स दिवारूपो रात्रिरूपस्तमोगुण ५८ अधोध्रुवे सदा रात्रिर्नारकास्तत्र वै स्थिताः । ऊर्ध्वध्रुवे दिवा नित्यं तपोमध्ये निशा दिवा ५९ महाजनस्तपस्सत्यं तेषु नित्यं दिन स्मृतम् । रौरवश्चान्धकूपश्च तामिस्र च तमोनयम् ६० तेषु नित्य स्मृता रात्रि. कल्पमानं च कोविदैः । स तु पूर्वभवे चासीद्ब्राह्मणो माधवप्रियः ६१ षष्टयब्दं सर्वतीर्थेषु प्रातःस्नानं चकार ह । तीर्थपुण्यात्स वै विप्रो माधवो माधवप्रियः ६२ सुनीत्यां गर्भमासाद्य ध्रुवो भूत्वा रराज ह । षट्त्रिंशच्च सहस्राब्दं राज्य कृत्वा ध्रुवोऽभवत् ६३ सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्य स ध्रुव पञ्चमो वसुः । गुर्जरे देश आगम्य वैश्यजात्यां समुद्भवः ६४ नरश्रीनामविख्यातो गुणवैश्यस्य वै सुतः कुसीदगुणमुख्यश्च नरश्रीपुत्रवत्सलः ६५ त्यक्त्वा प्राणान्ययौ स्वर्गं स वैश्यतनयो ध्रुवः । प्रत्यहं स हरः क्रीडां वृन्दावनमहात्तमे ६६ शिवप्रसादात्प्रत्यक्षां दृष्ट्वा हर्षमवाप्तवान् । यस्य पुत्रविवाहे च भगवान्भक्तवत्सलः ६७ यादवैस्सह सप्राप्तस्तस्य वाञ्छितदायकः । पुरीं काशीं समागम्य नरश्रीर्भक्तराट् स्वयम् ६८ रामानन्दस्य शिष्योऽभूद्विष्णुधर्मविशारदः । बृहस्पतिरुवाच ॥ कदाचिद्भगवान्विर्गङ्गाकूलेऽनसूयया ६९ सार्द्धं तपो महत्कुर्वन्ब्रह्मध्यानपरोऽभवत् । तदा ब्रह्मा हरिश्शंभुः स्वस्ववाहनमास्थिताः ७० वर ब्रूहीति वचन तमाहुस्ते सनातनाः। इति श्रुत्वा वचस्तेषां स्वयभूतनयो मुनिः ७१ नैव किञ्चिदुचः प्राह संस्थितः परमात्मनि । तस्य

भगिनी, माता त्याचप्रमाणें कन्या व स्नुषा ह्या सर्वही सर्वदा स्त्रियाच होत. त्याचप्रमाणे देवयोनिमध्यें उत्पन्न झालेले जे पुरुष त्याची भगिनीच त्याची पत्नी होय असें सांगितले आहे. मनुवंशामध्यें उत्पन्न झालेले जे पुरुष असतात त्याच्या स्त्रिया मात्र अन्य कुलामध्ये उत्पन्न झालेल्या असाव्या, हा ब्रह्मदेवाने सांगितलेला धर्म हे देवहो, मीं तुह्मास सांगितला आहे ५४—५७. हा ध्रुव भूमीच्या खालीं व भूमीच्या वर असा आहे असें समजावे. जो दिवसरूप ध्रुव आहे तो सद्गुणरूप व जो रात्रिरूप आहे तो तमोगुणमय असें जाणावें ५८. ध्रुवाच्या अधोभागीं सर्वदा रात्र असते व तेथे नरकवासी प्राणी राहतात. ध्रुवाच्या ऊर्ध्वभागीं सर्वदा दिवस असतो व भूसंज्ञक मध्यप्रदेशीं दिवस व रात्र ही दोन्हीं असतात ५९. महोलोक, जनोलोक, तपोलोक व सत्यलोक यामध्ये सर्वदां दिवसच असतो असे सांगितलें आहे. रौरव, अंधकूप व तामिस्र हे जे तीन तमोमय नरक आहेत त्यामध्यें सर्वदा रात्र असते असे सांगितलें आहे व पंडितानीं " एक कल्प " हें तिचें प्रमाण ठरविलें आहे. तो ध्रुव पूर्वजन्मीं विष्णुप्रिय ब्राह्मण होता ६०,६१. त्याने साठ वर्षेपर्यंत सर्व तीर्थामध्यें प्रातःस्नान केलें. तेव्हा त्या तीर्थस्नानाच्या पुण्यामुळें तो माधवप्रिय माधवनामक ब्राह्मण ६२ सुनीति राणीच्या गर्भामध्यें उत्पन्न होऊन ध्रुव या नावानें शोभूं लागला. तो छत्तीस हजार वर्षे राज्य केल्यावर ध्रुव झाला ६३. सूत ह्मणतातः— असें गुरूचे वाक्य ऐकून तो पाचवा वसु ध्रुव गुर्जर देशामध्ये येऊन वैश्यजातीमध्यें उत्पन्न झाला ६४. तो गुणवैश्याचा नरश्री या नावानें प्रसिद्ध असलेला पुत्र झाला. पुढें नरश्रीपुत्रावर प्रेम करणारा तो कुसीदगुणमुख्य योग्य समयीं प्राणत्याग करून स्वर्गलोकीं गेला. नंतर तो वैश्यपुत्र चंद्र प्रतिदिनीं अत्युत्तम वृंदावनामध्ये शंकराच्या प्रसादामुळें हरीची क्रीडा प्रत्यक्ष पाहून फार आनंदित झाला. त्याच्या पुत्राचा विवाह मांडला असता भगवान् भक्तवत्सल यादवांसह त्याच्या गृहीं आला व त्यानें त्यास इष्ट पदार्थ दिले. नंतर तो भक्तराज नरश्री स्वतः काशीनगरीस येऊन रामानंदाचा शिष्य झाला व विष्णुधर्मामध्यें प्रवीण होऊन राहिला. बृहस्पति ह्मणतातः—कोणे एके वेळीं भगवान् अत्रि

भावं समालोक्य त्रयो देवाः सनातनाः ७२ अनसूयां तस्य पत्नीं समागम्य वचोऽब्रुवन् । लिङ्ग-हस्तः स्वयं रुद्रो विष्णुस्तद्रसवर्धनः ७३ ब्रह्मा कामब्रह्मरूपः स्थितस्तस्या वशं गतः । रतिं देहि मदापूर्णे नो चेत्प्राणांस्त्यजाम्यहम् ७४ पतिव्रताऽनसूया च श्रुत्वा तेषां वचोऽशुभम् । नैव किञ्चिदुचः प्राह कोपभीता सुरान्प्रति ७५ मोहितास्तत्र ते देवा गृहीत्वा तां बलात्तदा । मैथुनाय समुद्योग चक्रुर्मायाविमोहिताः ७६ तदा क्रुद्धा सती सा वै ताञ्छशाप मुनिप्रिया । मम पुत्रा-भविष्यन्ति यूयं कामविमोहिताः ७७ महादेवस्य वै लिङ्ग ब्रह्मणोऽस्य महाशिरः । चरणौ वासुदेवस्य पूजनीया नरैस्तदा ७८ भविष्यन्ति सुरश्रेष्ठा उपहासोऽयमुत्तमः । इति श्रुत्वा वचो घोर नमस्कृत्य मुनिप्रियाम् ७९ तुष्टुवुर्भक्तिनम्राश्च वेदपाठैश्च ऋङ्मयैः । अनसूया तदा प्राह भवन्तो मम पुत्रकाः ८० भूत्वा शाप मदीयं च त्यक्त्वा तृप्तिमवाप्स्यथ । इत्युक्ते वचने ब्रह्मा चन्द्रमाश्च तदा ह्यभूत् ८१ दत्तात्रेयो हरि साक्षाद्दुर्वासा भगवान्हरः । तत्पापपरिहारार्थं योगवन्तो बभूविरे ८२ एतस्मिन्नन्तरे देवी प्रकृतिस्सर्वधर्मिणी । विधिं विष्णुं हरं चान्यं चक्रे सा गुणरूपिणी ८३ मन्वन्त-मतो जात तेषां योग प्रकुर्वताम् । हर्षिताश्च त्रया देवास्समागम्य च तान्प्रति ८४ उवाच वचन रम्य तेषां मङ्गलहेतवे । चन्द्रमाश्च भवत्सोमो वसुः षष्ठः सुरप्रियः ८५ रुद्रांशश्चैव दुर्वासाः प्रत्यूषः सप्तमो वसुः ।

गंगातटाकीं अनसूयेसह मोठी तपश्चर्या करीत ब्रह्मज्ञानामध्यें तत्पर झाला. तेव्हा आपापल्या वाहनामध्ये बसलेले सनातन ब्रह्मा, विष्णु व महेश " वर माग " असें त्यास वचन बोलले. असें त्याचें वचन ऐकून तो स्वयभूपुत्र अत्रिमुनि परमात्म्यामध्यें तल्लीन असल्यामुळें काहीं एक बोलला नाहीं. तेव्हा त्याचा भाव पाहून ते तिघे सनातन देव ६९–७२ त्याच्या अनसूयानामक पत्नीकडे येऊन ह्मणाले " हे यौवनसंपन्न सुंदरि, आह्मास रति दे; नाहींपेक्षा आह्मी प्राणत्याग करूं. " ज्या वेळीं हे तीन देव तिच्याकडे आले तेव्हा स्वतः रुद्रानें स्वहस्तामध्यें आपलें इंद्रिय धारण केलें होतें. विष्णु त्याच्या रसाची वृद्धि करीत होता व ब्रह्मदेव कामरूप होऊन तिच्या अधीन झाला होता ७३,७४. असो. तें त्याचें वचन ऐकून पतिव्रता अनसूया काहीं एक बोलली नाही. देव रागावतील ह्मणून तिला भीति वाटली ७५. तेव्हा मूढ झालेले ते देव तिला बलात्कारानें धरून अज्ञानानें मोहित झालेले ते सर्व संभोगाविषयीं उद्योग करू लागले. तेव्हा मुनीस प्रिय असलेली ती साध्वी रागावली व तिनें " तुह्मी कामाने मोहित झालेले आहात. यास्तव, माझे पुत्र व्हाल " असा शाप दिला ७६,७७. पुनः ती ह्मणाली " हे देवश्रेष्ठहो, महादेवाचें हें लिंग, ब्रह्मदेवाचें हें मोठें मस्तक व वासुदेवाचे चरण लोकास सर्वदा पूजनीय होतील. हे श्रेष्ठ देवहो, हाच तुमचा श्रेष्ठ उपहास होय. " हे घोर वचन ऐकून व मुनिप्रियेस नमस्कार करून भक्तीमुळें नम्र झालेले ते देव ऋग्वेदातील पाठानीं तिची स्तुति करू लागले. तेव्हा अनसूया ह्मणाली " तुह्मी माझे पुत्र होऊन व माझ्या शापातून मुक्त होऊन तृप्त व्हा. " असें तिनें ह्मटलें असता ब्रह्मदेव तात्काल चंद्रमा झाला, साक्षात् हरि दत्तात्रेय झाला, व भगवान् शंकर दुर्वास झाला. तात्पर्य, त्या पापाचा परिहार करण्याकरिता ते योगी झाले. इतक्यामध्यें सर्व धर्मानीं युक्त असलेली व सर्व-गुणरूपी देवी प्रकृति दुसऱ्या ब्रह्मदेवास, दुसऱ्या विष्णूस व दुसऱ्या शंकरास निर्माण करिती झाली. ते योगाभ्यास करीत असता एक मन्वंतर निघून गेले. तेव्हा आनंदयुक्त झालेले ते तिन्ही देव त्यांच्याकडे येऊन त्यांच्या कल्याणाकरिता असें रम्य वचन बोलले " हा चंद्रमा देवास प्रिय असलेला सोमनामक सहावा वसु होईल ७८–८५. रुद्राच्या अंशरूप असलेला हा दुर्वास प्रत्यूष ह्मणून

दत्तात्रेयमयो योगी प्रभासश्चाष्टमो वसु: ८६ तेषां वाक्य समाकर्ण्य वसवस्ते त्रयोऽभवन् । सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं वसवो हर्षिताशयः ८७ स्वांशेन भूतले जग्मुः कलिशुद्धाय दारुणे। दाक्षिणात्ये राजगृहे वैश्यजात्यां समुद्भवः ८८ पीपानाम सुतः सोमः सुदेवस्य तदा ह्यभूत्। कृतं राज्यपदं तेन यथा भूपेन तत्पुरे ८९ रामानन्दस्य शिष्योऽभूद्द्वारकां स समागतः । हरेर्मुद्रां स्वर्णमयीं प्राप्य कृष्णात्स वै नृपः ९० वैष्णवेभ्यो ददौ तत्र प्रेततत्त्वविनाशिनीम् । प्रत्यूषश्चैव पाञ्चाले वैश्यजात्यां समुद्भवः ९१ मार्गपालस्य तनयो नानको नाम विश्रुत.। रामानन्द समागम्य शिष्यो भूत्वा स नानकः ९२ स वै म्लेच्छान्वशीकृत्य सूक्ष्ममार्गमदर्शयत् । प्रभासो वै शान्तिपुरे ब्रह्मजात्यां समुद्भवः ९३ शुक्लदत्तस्य तनयो नित्यानन्द इति स्मृतः । इति ते वसुमाहात्म्यं मया शौनक वर्णितम् ९४ [५२६५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये वसुमाहात्म्ये कबीरनरश्रीपीपानानककनित्यानन्दसमुत्पत्तिवर्णनं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

सूत उवाच ॥ इत्युक्त्वा तान्सुरान्देवो भगवान्बृहतां पतिः । अश्विनौ चाऽसमालोक्य तयोर्गाथामवर्णयत् १ वैवस्वतऽन्तरे पूर्वं विश्वकर्मा विचित्रकृत् । चित्रगुप्तश्रिय दृष्ट्वा चित्रलेखाविनिर्मिताम् २ स्पर्धाभूतो महामायां तुष्टाव बहुपूजनैः । प्रसन्ना सा तदा देवी चित्रायां तस्य योषिति ३ स्वांशाज्जाता स्मृता सज्ञा सर्वज्ञानकरी स्वयम् । षोडशाब्दे वयःप्राप्ते सज्ञायास्तत्पिता सुखी ४ विवाहार्थी सुरान्सर्वानाह्वयन्मेरुमूर्धनि । यक्षाधीशाश्च षड्विंशःकुबेराद्यास्समागताः ५

सातवा वसु होईल व दत्तात्रेयरूप हा योगी प्रभासनामक आठवा वसु होईल " ८६. हें त्याचें वाक्य ऐकून ते तिघेही वसु झाले. सूत ह्मणतातः— याप्रमाणें गुरूंचें वाक्य ऐकून ते तिघे वसु आनंदित झाले; व आपल्या अंशानें भयंकर कलीची शुद्धि करण्याकरिता भूतलीं गेले. दाक्षिणात्य देशातील राजगृहीं वैश्यजातींत सोम पीपा या नावानें सुदेवाचा पुत्र होऊन उत्पन्न झाला. त्या नगरामध्यें त्यानें एखाद्या राजाप्रमाणेंच अधिकार चालविला ८७-८९. शेवटीं तो रामानंदाचा शिष्य होऊन द्वारकेस गेला व हरीची सुवर्णमय मुद्रा कृष्णापासून प्राप्त करून घेऊन तो राजा ती वैष्णवास समर्पण करिता झाला. ती तेथील प्रेताच्या तत्त्वाचें निरसन करणारी होती. प्रत्यूष वसु पाचालदेशामध्यें वैश्यजातींत उत्पन्न झाला ९०,९१. तो मार्गपालाचा नानकनामक प्रसिद्ध पुत्र होता. तो नानक रामानंदाकडे येऊन त्याचा शिष्य झाला ९२. तो म्लेच्छास वश करून घेऊन त्यास धर्माचा सूक्ष्म मार्ग दाखवीत असे. शातिपुरामध्यें ब्राह्मणजातीमध्यें प्रभास वसु निर्माण झाला ९३. तो शुक्लदत्ताचा पुत्र असून नित्यानद असे त्यांचें नाव होतें. हे शौनका, याप्रमाणे मीं तुला वसूंचें माहात्म्य सागितलें ९४. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्यु० प्रातिस० कलियु० चतुर्थखंडातील कबीरादिकाच्या उत्पत्तीविषयीं सतरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥

सूत ह्मणतातः—त्या देवास असें ह्मणून भगवान् बृहस्पति अश्विनीकुमाराकडे पाहून त्यांची गाथा सागूं लागला. पूर्वी वैवस्वत मन्वंतरामध्यें विचित्र वस्तु निर्माण करणारा विश्वकर्मा चित्रलेखेनें निर्माण केलेली चित्रगुप्ताची संपत्ति पाहून स्पर्धायुक्त झाला व त्यानें अनेक पूजनांच्या योगानें महामायेची स्तुति केली. तेव्हा प्रसन्न झालेली ती देवी चित्रानामक त्याच्या पत्नीच्या ठायीं स्वाशाने उत्पन्न झाली. तिचें संज्ञा असें नाव असून ती सर्वास ज्ञान करून देणारी होती. तिला सोळावें वर्ष लागलें असता त्या संज्ञेचा सुखी पिता विवाहाच्या इच्छेनें सर्व देवास मेरूच्या शिखरावर बोलाविता झाला. तेव्हा कुबेरादि सव्वीस यक्षपति तेथें आले १—५. जलजंतूंचे

यादसां पतयः प्राप्ता दश तत्रैव कामुकाः । पावका ऊनपञ्चाशद्वायवश्च तथा स्मृताः ६ ध्रुवौ द्वौ च स्वयं प्राप्तौ सोमास्तत्रैव षोडश । त्रयोदशाश्च प्रत्यूषाः प्राप्ता विश्वभरक्षकाः ७ षष्ट्युत्तरं च त्रिशतं प्रभासा दिनरक्षकाः । भवाद्याश्च तदा रुद्राः शशिमण्डलरक्षकाः ८ आदित्याश्च स्थितास्सर्वे सञ्ज्ञायाश्च स्वयंवरे । दानवा विप्रचित्त्याद्याश्चतुराशीतिराययुः ९ प्रह्लादाद्यास्तदा दैत्या वासुक्याद्याश्च पन्नगाः । शेषाद्याश्च तदा नागास्तार्क्ष्याद्या गरुडाः स्मृताः १० सर्वे स्वयंवरे प्राप्ता महान्कोलाहलो ह्यभूत् । एतस्मिन्नन्तरे देवी देवकन्यासमन्विता ११ संज्ञा देवान्पति तदा प्रत्यक्षमभवद्दिवि । तां समालोक्य बलवान्बलिः कामविमोहितः १२ करे गृहीत्वा प्रययौ पश्यतां सर्वधन्विनाम् । तदा क्रोधातुरा देवा रुरुधुर्दैत्यसत्तमम् १३ शस्त्रास्त्रैस्तर्पयित्वा त महद्युद्धमकारयत् । दानवाश्च तदा दैत्या नानावाहनसंस्थिताः १४ देवैः सार्द्धं महद्युद्धं तुमुलं चक्रिरे मुदा । दानवैश्च हता देवा. सुरैर्दैत्या विनाशिताः १५ रावभूतैरिलावर्तंऽभूदगम्या वसुन्धरा । पक्षमात्रमभूद्युद्ध दिव्य दानवदेवयोः १६ पाञ्चजन्यस्तथा धाता हयग्रीवश्च मित्रकः । अघासुरोऽर्यमा चैव बलः शक्रस्तथैव च १७ बकासुरश्च वरुणः शकटः प्राशुरेव च । वत्सासुरो भगश्चैव विवस्वांश्च बलिः स्वयम् १८ प्रलम्बश्च तथा पूषा गर्दभः सविता युधि । विश्वकर्मा मयश्चैव कालनेमिर्हरिः स्वयम् १९ काङ्क्षमाणौ च विजयं युयुधाते परस्परम् । पराजिताश्च ते दैत्या युद्ध त्यक्त्वा प्रदुद्रुवुः २० विवस्वांश्च तदा संज्ञां गृहीत्वा रथसंस्थिताम् । विश्वकर्माणमागम्य ददौ तस्मै प्रसन्नधीः २१ विवस्वन्त सुरश्रेष्ठ दृष्ट्वा सञ्ज्ञा वचोऽब्रवीत् । मत्पतिश्च भवान्देवो भवेत्कार्यंकर-

---

दहा कामुक वरुण तेथें प्राप्त झाले. एकोणपन्नास वायु व तितकेच अग्नि येऊन थडकले. स्वतः दोन्ही ध्रुव तेथें आले. सोळा सोम व विश्वाचे सर्व प्रकारें रक्षण करणारे तेरा प्रत्यूष तेथें प्राप्त झाले. अत्यंत तेजस्वी व दिवसाचें रक्षण करणारे तीनशें साठ आदित्य, त्याचप्रमाणें भवादि अकरा रुद्र, शशिमंडलाचें रक्षण करणारे बारा आदित्य इत्यादि सर्व संज्ञेच्या स्वयंवरामध्यें आले. विप्रचित्त्यादिक चवऱ्यायशीं दानव, प्रल्हादादि दैत्य, वासुकि इत्यादि पन्नग, शेषादि नाग व ताक्ष्यादिक प्रसिद्ध असलेले गरुड हेही सर्व त्या स्वयवरामध्यें प्राप्त झाले असता तेथें मोठा कोलाहल झाला. इतक्यात संज्ञा देवी देवकन्यासहवर्तमान अंतरिक्षामध्यें देवाच्या समोर आली. पण तिला पाहून कामाने मोहित झालेला बलाढ्य वीर बल सर्व धनुर्धारी वीर पहात असता तिला हातात धरून जाऊं लागला. त्याबरोबर क्रोधानें व्याकुळ झालेले देव त्या श्रेष्ठ दैत्यास आडविते झाले ६—१३. शस्त्र व अस्त्र याच्या योगानें त्यास तृप्त करून ते त्याच्याशीं मोठें युद्ध करिते झाले. तेव्हा दैत्य व दानव नानाप्रकारच्या वाहनामध्यें बसून देवाशीं मोठें भयंकर युद्ध आनंदानें करूं लागले. दानवानीं देवास मारिलें व देवानीं दैत्याचा विनाश केला. इलावर्तातील सर्व भूमि प्रेतानीं भरून गेली व त्यामुळें त्यांतून जाणे येणे अशक्य झालें. दानव व देव याचे दिव्य युद्ध एक पंधरवडा चाललें होतें. पाचजन्य दैत्य व धाता, हयग्रीव व मित्र, अघासुर व अर्यमा, त्याचप्रमाणें बल व इंद्र १४—१७, बकासुर व वरुण, शकट व प्राशु, वत्सासुर व भग, विवस्वान् व स्वतः बलि १८, प्रलंब व पूषा, गर्दभ व सविता, विश्वकर्मा व मय, कालनेमि व स्वतः हरि याप्रमाणें ते एकमेकाशीं विजयाच्या इच्छेनें लढूं लागले. शेवटीं ते दैत्य पराजित झाले व युद्ध सोडून पळून गेले. तेव्हा विवस्वान् रथामध्यें असलेल्या संज्ञेस घेऊन व विश्वकर्म्याजवळ येऊन ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा तो तिला त्याच्या स्वाधीन करिता झाला १९—२१. तेव्हां देवश्रेष्ठ जो विवस्वान् त्यास पाहून संज्ञा ह्मणाली " आपण देवच माझे पति आहांत. आपण

स्सदा २१ त्वया जिताहं भगवन्बलेर्विप्रियकारिणः। भ्रातृजाग्रहणे दोषो न भवेत्स कदाचन २३ वीरभुक्ता सदा नारी स्त्री रत्नं मुनिभिः स्मृता। चतुर्धा प्रकृतिर्देवी गुणभिन्ना गुणैकिका २४ एका सा प्रकृतिर्माता गुणसाम्यात्सनातनी। सत्त्वभूता च भगिनी रजोभूता च गेहिनी २५ तमोभूता च सा कन्या तस्यै देव्यै नमो नमः। बहवः पुरुषा ये वै निर्गुणाश्चैकरूपिण २६ चैतन्याऽज्ञानवन्तश्च लोके प्रकृतिसंभवाः। अलोके पापजास्सर्वे देवब्रह्मसमुद्भवाः २७ या तु ज्ञानमयी नारी वृणोद्य पुरुष शुभम्। कोऽपि पुत्रः पिता भ्राता स च तस्याः पतिर्भवेत् २८ स्वकीयां च सुतां ब्रह्मा विष्णुर्देवः स्वमातरम्। भगिनीं भगवाञ्छंभुर्गृहीत्वा श्रेष्ठतामगात् २९ इति श्रुत्वा वेदमय वाक्यं चादितिसंभवः। विवस्वान्भ्रातृजां संज्ञां गृहीत्वा श्रेष्ठवानभूत् ३० सुता. कन्यास्तयोर्जाता मनुर्वैवस्वतस्तथा। यमश्च यमुना चैव दिव्यतेजोभिरन्विताः ३१ तदा संज्ञा सती साक्षात्तेजोभूत पतिं स्वकम्। ज्ञात्वा छायां समुत्पाद्य तपसे वनमागता ३२ सावर्णिश्च मनुस्तस्यां शनिश्च तपती तथा। छायायां च समुद्भूताः क्रूरदृष्ट्या विवस्वतः ३३ पुत्रभेदेन तां नारीं मत्वा मायां रुषान्वितः। चकार भस्मभूतां तां विवस्वान्भगवान्रविः ३४ तदा शनिश्च सावर्णिर्विवस्वन्त रुषान्वितम्। ज्ञात्वा च क्रोधताम्राक्षौ युयुधाते परस्परम् ३५ कियता चैव कालेन भग्नभग्नौ विवस्वता। हिमाचले गिरौ प्राप्य तपतुः परमं तप. ३६ त्रिवर्षान्ते च सा देवी महाकाली समागता। अर्चित च वर ताभ्यां ददौ तद्भक्तवत्सला ३७

सर्वदा कार्यकर असल्यामुळें हे भगवन्, अप्रिय करणाऱ्या बलीपासून तुह्मीच मला जिंकिलें आहे. भ्रात्याच्या कन्येचें पाणिग्रहण करण्यामध्यें आपणास कधींही दोष लागणार नाहा २२,२३. स्त्री सर्वदा वीर पुरुषास योग्य आहे व स्त्री हें एक रत्न आहे असें मुनींनीं सांगितलें आहे. प्रकृति देवी गुणाच्या योगानें चार प्रकारानीं भिन्न झाली आहे पण ती गुणसमुदायरूप आहे २४. गुणाच्या साम्यामुळें ती सनातन प्रकृतिरूप माता एक आहे. ती सत्त्वरूपानें भगिनी, रजोरूपानें पत्नी २५ व तमोरूपानें कन्या होय. त्या देवीस नमस्कार असो. जगामध्यें जे असंख्य पुरुष दिसतात ते वस्तुतः निर्गुण व एकरूपी आहेत. ते चैतन्यरूप असूनही अज्ञानयुक्त झाले ह्मणजे लोकामध्यें प्रकृतीपासून उत्पन्न होतात. अलोकामध्यें देव ब्रह्मापासुन उत्पन्न झालेले सर्व पापी असतात२६,२७. व जी ज्ञानमय स्त्री आहे ती ज्या शुभ पुरुषास वरील तो पुत्र, पिता, भ्राता यापैकीं कोणीही जरी असला तरी तिचा पति होतो २८. ब्रह्मदेव आपल्या कन्येस, विष्णु आपल्या मातेस व भगवान् शंभु आपल्या भगिनीस घेऊन श्रेष्ठ झाला आहे २९. हें वेदमय वाक्य ऐकून अदितिपुत्र विवस्वान् भ्रात्याच्या संज्ञानामक कन्येचे पाणिग्रहण करून श्रेष्ठ झाला ३०. त्या दोघापासून पुत्र व कन्या झाल्या. वैवस्वत मनु, यम व यमुना हीं तिघें दिव्य तेजानें युक्त होतीं ३१. तेव्हा साध्वी संज्ञा आपला पति साक्षात् तेजोरूप आहे असें जाणून आपली छाया निर्माण करून व तिला सूर्याजवळ ठेवून तपश्चर्या करण्याकरितां वनामध्यें गेली ३२. नंतर ते छायेच्या ठिकाणीं सावर्णि मनु, शनि व तपती हीं सूर्याच्या क्रूर दृष्टीपासून उत्पन्न झालीं ३३. पुत्र भिन्न स्वभावाचे उत्पन्न झाल्यामुळें ती मायावी स्त्री आहे असें समजून क्रोधयुक्त झालेल्या विवस्वान्नामक भगवान् रवीनें तिचें भस्म करून टाकिले. तेव्हा सूर्य क्रोधयुक्त झाला आहे असे जाणून ज्याचे नेत्र रागाने लाल झाले आहेत असे ते शनि व सावर्णि त्याच्याशीं लढूं लागले. पुढें दीर्घ कालानें सूर्यानें त्याचा पराजय केला. तेव्हा हिमालयपर्वतावर येऊन त्यानीं परम तप केलें ३४-३६. तीन वर्षानीं ती महाकाली देवी आली व त्या भक्तवत्सल देवीनें त्या दोघास जो हवा होता तो

पुनस्तौ च समागम्य युयुधाते विवस्वता । विवस्वान्भयभीतश्च त्यक्त्वा युद्धं पराभवत् ३८ यत्र स्थिता प्रिया संज्ञा वडवारूपधारिणी । कुरुखण्डे महारम्ये तपन्ती तप उल्बणम् ३९ गत्वा ददर्श भगवान्सज्ञां स बोधकारिणीम् । कामातुरो हयो भूत्वा तत्र रेमे तया सह ४० पञ्चवर्षान्तरे सज्ञा गर्भं तस्माद्दधौ स्वयम् । ततयौ च समुद्भूतौ दिव्यरूपपराक्रमौ ४१ पितुर्दुःखं समालोक्य जग्मतू रविमण्डलम् । जित्वा बन्धू दुराचारौ क्रूरदृष्ट्या तदा स्वयम् ४२ बद्ध्वा तौ स्वापितुः पार्श्वं समासौ वडवासुतौ । दृष्ट्वा विवस्वान्भगवान्वैरिणौ समुपागतौ ४३ सपीड्य ताडयामास लोहदण्डैर्भयानकैः । पङ्गुभूतौ पुनस्त्यक्त्वा छायापुत्रौ दिवाकरः ४४ आश्विनेयौ समालोक्य वचनं प्राह तौ मुदा । जीव ईशा यथा मित्रौ नरनारायणौ यथा ४५ एकनाम्ना युवां प्रीतौ नासत्यौ च भविष्यथः । सोमशक्तिरिडा देवी ज्येष्ठपत्नी भविष्यति ४६ पिङ्गला सूर्यशक्तिश्च लघुपत्नी भविष्यति । इडापतिस्त्वं वै नाम द्वितीयः पिङ्गलापतिः ४७ द्वादशस्त्वं नृणां राशेः क्रूरदृष्टिः शनैश्चरः । तस्य शान्तिकरो ज्येष्ठो भविष्यति महीतले ४८ द्वितीयश्च नृणां राशेः सावर्णिर्भ्रमकारकः । तस्य शान्तिकरो भूमौ भविता पिङ्गलापतिः ४९ जन्मराशिस्थिता देवी तपन्ती तापकारिणी । इडा च पिङ्गला तस्याः शान्तिकर्त्र्यौ भविष्यतः ५० इति श्रुत्वा वचस्तस्य सुरवैद्यौ बभूवतुः । सावर्णिश्च शनी राहुः केतुः स्वर्गमतानिनः५१ तपां तु परिहारार्थौ दस्रौ चाश्विनिसभवौ । सूत उवाच ॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं प्रसन्नौ सुरसत्तमौ ५· स्वांशान्महीतले जातौ शूद्रयोन्यां रवेस्सुतौ । चाण्डालस्य गृहे जातश्छागहन्तुरिडापतिः५३ सधनो नाम विख्यातः

वर दिला ३७. तेव्हा पुनरपि ते येऊन सूर्याशीं लढूं लागले. पण सूर्य भयभीत होऊन व युद्ध सोडून मागें फिरला आणि घोडीचें रूप घेऊन प्रिय सज्ञा जेथें भयकर तप करीत होती त्या अतिरम्य कुरुखडामध्ये तो गेला व त्या भगवानाने तेथें बोध करविणाऱ्या सज्ञेस पाहिलें. त्याबरोबर तो स्वतः कामातुर घोडा होऊन तिन्याशीं रममाण झाला. पाच वर्षांनीं त्यान्यापासून स्वतः संज्ञेनें गर्भ धारण केला. नंतर ज्याचें रूप व पराक्रम दिव्य आहेत असे दोन पुत्र तिला झाले ३८–४१ व पित्याचे दुःख पाहून ते सूर्यमंडली गेले. त्यानीं दुराचरणी दोघा बधूस क्रूर दृष्टीनें जिकून व स्वत. त्यास बाधून घेऊन ते वडवापुत्र आपल्या पित्याजवळ आले. तेव्हा भगवान् सूर्य आपले वैरी आले आहेत असे पाहून व त्याम भयकर लोहदंडानीं जोरानें ताडन करून ते छायेचे पुत्र लंगडे झाले आहेत असे पाहिल्यावर तो दिवाकर त्यास सोडिता झाला ४२–४४. नंतर तो सूर्य त्या वडवापुत्रांस पाहून आनदानें म्हणाला " जीव व ईश हे जसे मित्र असतात किंवा नर व नारायण हे जसे मित्र आहेत त्याप्रमाणें तुम्हीही एकाच नावानें प्रसिद्ध व्हा. तुम्हास प्रिय नासत्य हें नाव प्राप्त होईल. सोमाची जी इडाशक्ति ती तुमची ज्येष्ठ पत्नी होईल व पिंगला म्हणून जी सूर्याची शक्ति आहे ती धाकटी पत्नी होईल. एक इलापति व दुसरा पिंगलापति या नावानें प्रसिद्ध व्हा ४५–४७. मनुष्याच्या राशीस क्रूरदृष्टि बारावा शनि आला असता तुमच्यापैकीं ज्येष्ठ भूलोकीं त्याची शाति करणारा होईल ४८; मनुष्याच्या राशीस दुसरा सावर्णि भ्रमोत्पादक आहे. पण पिंगलापति भूलोकीं त्याची शाति करणारा होईल ४९. जन्मराशीमध्यें असलेली तपंती देवी मनुष्यास ताप देणारी होईल. पण इडा व पिंगला या दोघी तिची शाति करणाऱ्या होतील " ५०. असे त्याचे वचन ऐकून ते देवाचे वैद्य झाले व सावर्णि, शनि, राहु, केतु स्वर्गास ताप देऊं लागले ५१. त्याच्या परिहाराकरिता हे दस्रसंज्ञक दोघे अश्विनीकुमार उत्पन्न झाले होते. सूत म्हणतातः—असें गुरूचें वाक्य ऐकून ते उत्तम देव प्रसन्न झाले व ते रविपुत्र भूलोकीं शूद्रयोनी-

पितृमातृपरायणः। शालिग्रामशिलातुल्यं छागमांसमविक्रयत् ५४ कबीरं समुपागम्य शिष्यो भूत्वा रराज वै। स तु सत्यनिधिः पूर्वं ब्राह्मणस्तप आस्थितः ५५ भयभीतं च गां तत्र चाण्डालाय ह्यदर्शयत्। पशुहिंसाकरो यस्माच्चाण्डालस्त्वालय गतः ५६ चर्मकारगृहे जातो द्वितीयः पिङ्गलापतिः। मानदासस्य तनयो रैदास इति विश्रुतः ५७ पुरीं काशीं समागम्य कबीरं रामतत्परम्। जित्वा मतविवादेन शंकराचार्यमागतः ५८ तयोर्विवादमभवदहोरात्रं मतान्तरे। पराजितस्स रैदासो नत्वा तं द्विजसत्तमम् ५९ रामानन्दमुपागम्य तस्य शिष्यत्वमागतः। इति ते कथितं विप्र सुरांशाश्च यथाऽभवन्। कलिशुद्धिकरी लीला तेषां मार्गप्रदर्शिनाम् ६० [५३२५] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चयेऽश्विनीकुमारावतारे सधनरैदाससमुत्पत्तिवर्णनेऽष्टादशोऽध्यायः॥ १८ ॥

सूत उवाच ॥ इत्युक्त्वा भगवाञ्शौनो देवमाहात्म्यमुत्तमम्। स्वमुखात्स्वांशमुत्पाद्य ब्रह्मयोनौ बभूव ह १ इष्टिका नगरी रम्या गुरुदत्तस्य वै सुतः। रोपणो नाम विख्यातो ब्रह्ममार्गप्रदर्शकः २ सूत्रग्रन्थिमयीं मालां तिलकं जलनिर्मितम्। वासुदेवेति तन्मन्त्रं कलौ कृत्वा जने जने ३ कृष्णचैतन्यमागम्य कम्बलं च तदाज्ञया। गृहीत्वा स्वपुरीं प्राप्य कृष्णध्यानपरोऽभवत् ४ अतःपरं शृणु मुने चरित्रं च हरेर्मुदा। यच्छ्रुत्वा च कलौ घोरे जनो नैव भयं व्रजेत् ५ पञ्चाब्दे कृष्णचैतन्ये यज्ञांशो यज्ञकारिणि। काश्मीरसंभवो विप्रः केशवः शारदाप्रियः ६

मध्यें आपल्या अंशाने उत्पन्न झाले. बकऱ्यास मारणाऱ्या चांडालाच्या गृहीं इडापति जन्मास आला ५२,५३ तो सधन या नावाने प्रसिद्ध असून पिता व माता याच्या भक्तीमध्यें तत्पर होता. शालिग्रामशिलेप्रमाणें तो बकऱ्याचें मास विकीत असे ५४. पुढे कबीराकडे येऊन व त्याचा शिष्य होऊन तो शोभूं लागला. असो. पूर्वी तो सत्यनिधि ह्मणून ब्राह्मण होता. तो तपामध्यें बसलेला असताना त्यानें भयभीत झालेला बैल चाडालास दाखविला. त्यामुळे तो पशु हिंसेचा भागीदार झाला व चाडालाच्या गृहीं जन्मास आला. दुसरा पिंगलापति चाभाराच्या गृहीं उत्पन्न झाला. तो मानदासाचा रैदास ह्मणून प्रसिद्ध पुत्र होता ५५–५७. तो काशीमध्यें रामतत्पर कबीराकडे येऊन त्यास मतवादानें जिंकून शंकराचार्याकडे आला ५८. त्या दोघाचा भिन्न भिन्न मतामध्यें अहोरात्र वाद झाला. पण शेवटीं तो रैदास पराभूत झाला. तेव्हा त्या उत्तम ब्राह्मणास नमस्कार करून ५९ तो रामानंदाकडे आला व त्याचा शिष्य झाला. हे ब्राह्मणा, याप्रमाणें देवाचे अंश कसे झाले हें तुला सांगितलें. मार्ग दाखविणाऱ्या अशा त्यांची ही लीला कलीची शुद्धि करणारी आहे ६०. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणांतील चतुर्यु० प्रतिस० कलियुगातील चतुर्थखंडांतील अश्विनीकुमाराच्या उत्पत्तीविषयीं अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥

सूत ह्मणतातः— असें देवाचें उत्तम माहात्म्य सांगून भगवान् गुरु आपल्या मुखातून आपला अंश निर्माण करून ब्राह्मणयोनीमध्यें उत्पन्न झाला. भूलोकीं इष्टिका ह्मणून एक रम्य नगरी होती. तिच्यामध्यें रोपण या नावानें प्रसिद्ध असलेला पुत्र तो झाला. तो ब्रह्ममार्ग दाखविणारा होता १,२. सूत्रांची ग्रंथिमय माला व जलनिर्मित तिलक आणि वासुदेव हा मंत्र कलियुगामध्यें प्रत्येक पुरुषास सांगून ३ तो कृष्णचैतन्याकडे आला व त्याच्या आज्ञेनें प्रसादरूप त्याची कांबळी घेऊन आपल्या गृहीं आला व कृष्णाच्या ध्यानामध्यें तत्पर झाला ४. बा मुने, आतां यापुढे हरीचें उत्तम चरित्र तूं आनंदानें ऐक. तें ऐकिल्यानें घोर कलियुगामध्यें मनुष्यास भय कधींही उत्पन्न होणार नाहीं ५. यज्ञांशनामक यज्ञ करविणारा जो कृष्णचैतन्य त्यास

ग्रामः शान्तिपुरे ग्रामे वाग्देवीवरदर्पितः । सैं तां दिग्विजयं कृत्वा सर्वशास्त्रविशारदः ७ गङ्गाकूले स्तवं रम्य रचित्वा सोऽपठद्द्विजः । एतस्मिन्नन्तरे तत्र यज्ञांशस्समुपागतः ८ उवाच वचनं रम्यं केशवं स्तुतिकारिणम् । सुकृत पूर्तमर्ण च श्रुतीनां सारमेव हि ९ इत्युक्तं भवता स्तोत्रे दूषणं भूषणं वद । समाह केशवो धीमान्दूषण नैव दृश्यते १० इत्युक्त्वा माह भगवान्भूषणं नैव दृश्यते । सुकृतं च स्मृतं धर्मः पूर्त चैतन्यमुच्यते ११ अर्ण वीर्यमिति ज्ञेयं श्रुतिसारमतत्त्रयम् । गङ्गाजले दूषणोऽयं भूषणोऽय कलेवरे १२ इति श्रुत्वा स वै विप्रो विस्मितोऽभूच्च गी गिरः । लज्जित स्वजनं दृष्ट्वा शारदा सर्वमङ्गला १३ विहस्य केशवं प्राह यज्ञांशोऽय रिः स्वयम् । इति श्रुत्वा तु तच्छिष्यः कृष्णमन्त्र उपासकः १४ बभूव वैष्णवश्रेष्ठः कृष्णचैतन्यसेवकः । सूत उवाच ॥ श्रीधरो नाम विख्यातो ब्राह्मणः शिवपूजकः १५ पत्तने नगरे रम्ये तस्य सप्ताहमुत्तमम् । राज्ञा भागवत तत्र कारित सधन बहु १६ गृहीत्वा श्रीधरो विप्रो जगाम श्वशुरालये । तत्रोष्य मासमात्र च स्वपत्न्या सह वै द्विजः १७ स्वगेहमगमन्मार्गे चौराः सप्त तु तं प्रति । शपथ रामदेवस्य कृत्वा सार्द्धमुपाययुः १८ समासे विपिने रम्ये हत्वा ते श्रीधर द्विजम् । गोरथं सधनं तत्र सभार्य जगृहुस्तदा १९ एतस्मिन्नन्तरे रामः सच्चिदानन्दविग्रहः । सप्त तांश्च शरैर्हत्वा पुनरुज्जीव्य तं द्विजम् २० प्रेषयामास भगवांस्तदा वृन्दावने प्रभुः । तदाप्रभृति वै विप्रः श्रीधरो वैष्णवोऽभवत् २१ सप्ताब्दे चैव यज्ञांशो गत्वा शान्तिपुरीं शुभाम् ।

पाचवे वर्ष लागलें असता काश्मीरात उत्पन्न झालेला शारदाप्रिय केशव ब्राह्मण शांतिपुरनामक ग्रामामध्यें आला. तो वाग्देवीच्या वराने गर्विष्ठ झाला होता. सर्व शास्त्रामध्यें निपुण असलेला तो सर्व दिशातील सज्जनास जिंकून गंगेच्या तीरीं आला व तो ब्राह्मण रम्य स्तोत्र रचून त्याचा पाठ करीत राहिला. इतक्यात तेथें यज्ञांश आला ६–८ व स्तुति करणाऱ्या त्या केशवास असें रम्य वचन ह्मणाला " सुकृत, पूर्त व अर्ण हें श्रुतींचें सार आहे असे तूं स्तोत्रात ह्मटलें आहेस. पण त्यातील दूषण व भूषण सांग. " त्यास बुद्धिमान् केशव ह्मणतो " दूषण दिसत नाहीं. " हें ऐकून भगवान् ह्मणाला " भूषणही दिसत नाहीं. कारण, सुकृत ह्मणजे धर्म असें ह्मटलें आहे. पूर्तास चैतन्य ह्मटलें आहे ९–११. अर्ण ह्मणजे वीर्य असे समजावे. यास्तव, हें तीन प्रकारचें श्रुतिसार आहे. गंगाजलामध्यें हें दूषण व शरीरामध्यें हें भूषण आहे " १२. हें ऐकून तो सरस्वतीप्रिय ब्राह्मण आश्चर्यचकित झाला. तेव्हा सर्वमंगला शारदा आपला स्वजन लज्जित झाला आहें असें पाहून हसून केशवास ह्मणाली 'अरे, हा यज्ञांश स्वत: हरि आहे.' हे ऐकून तो त्याचा शिष्य झाला व कृष्णमंत्राची उपासना करूं लागला १३,१४. तो विष्णुभक्तातील श्रेष्ठ भक्त व कृष्णचैतन्याचा सेवक झाला. सूत ह्मणतात— श्रीधरनामक शिवपूजक विख्यात ब्राह्मण पत्तननामक रम्य नगरामध्यें होता. त्याच्याकडून राजाने भागवताचा उत्तम सप्ताह करविला व त्यास पुष्कळ धन दिलें १५, १६. तें घेऊन तो श्रीधर ब्राह्मण श्वशुरगृहीं गेला व तेथें एक महिनाभर राहून आपल्या पत्नीसह स्वगृहीं जाऊं लागला. इतक्यांत त्यास मार्गामध्यें सात चोर भेटले. त्यांनीं रामदेवाची शपथ घेऊन त्याच्यासह प्रयाण केलें १७,१८. नंतर रम्य अरण्यामध्यें आल्यावर त्या श्रीधर ब्राह्मणास मारून ते धनासह तो बैलाचा गाडा व त्याची भार्या यास घेऊन जाऊं लागले १९. पण इतक्यात सच्चिदानंदरूप राम त्या सातही चोरास बाणांच्या योगाने मारून व त्या ब्राह्मणास पुनरपि जीवंत करून तो भगवान् प्रभु त्यास वृंदावनामध्यें पोचविता झाला. तेव्हांपासून तो श्रीधर ब्राह्मण विष्णुभक्त झाला २०,२१.

ब्रह्मज्ञानमुपागम्य यज्ञांशाच्छिष्यतां गतः ११ टीका भागवतस्यैव कृता तेन महात्मना । सूत उवाच ॥ रामशर्मा स्थितः काश्यां शङ्करार्चनतत्परः १३ शिवरात्रे द्विजो धीमानविमुक्तेश्वरस्थले । एकाकी जाग्रतो ध्यानी जप्त्वा पञ्चाक्षरं शुभम् १४ तदा प्रसन्नो भगवाञ्छङ्करो लोकशंकरः । वरं ब्रूहीति वचनं तमाह द्विजसत्तमम् १५ रामशर्मा शिवं नत्वा वचनं प्राह नम्रधीः भवान्यस्य समाधिस्थो ध्याने यस्य परो भवान् १६ स देवो हृदये मह्यं वसेत्तव वरात्प्रभो । इत्युक्ते वचने तस्य विहस्याह महेश्वरः १७ एका वै प्रकृतिर्माया त्रिधा ब्रह्मस्वरूपिणी । शून्यभूताव्ययस्यैव पुरुषस्यार्द्धतेजसम् १८ गृहीत्वा लोकजननी पुंक्लीबौ सुषुवे सुतौ । पुमान्नारायणः साक्षाद्गौरश्चाष्टभुजैर्युतः १९ त्रिधा बभूव भगवान्स्वेच्छया विश्वरक्षकः । अर्धतेजास्स वै विष्णुर्वनमाली चतुर्भुजः ३० क्षीरशायी स आदित्यः स्वयं सद्गुणदेवता । अर्धतेजा द्विधा सैव नरनारायणावृषी ३१ जिष्णुर्विष्णुः स वै ज्ञेयौ पर्वते गन्धमादने । क्लीबः सकर्षणः साक्षाद्ब्रह्मरूपः त्रिधाऽभवत् ३२ पूर्वार्द्धाद्गौरशेषश्च परार्द्धाद्रामलक्ष्मणौ । गौरशेषो द्वापरान्ते बलभद्रः स वै स्वयम् ३३ रामलक्ष्मणयोर्ध्यानं बलभद्रस्य पूजनम् । सदा मया च कर्तव्य तत्प्राप्य त्वं सुखी भव ३४ इत्युक्त्वान्तर्दधे देवो रामानन्दस्य चाभवत् । कृष्णचैतन्यमागम्य द्वादशाब्दवयोव्रतम् ३५ शिष्यो भूत्वा स्थितस्तत्र-कृष्णचैतन्यपूजकः । कृत तदाज्ञया तेनाध्यात्मरामायण शुभम् ३६

नंतर यज्ञांशास सातवें वर्ष लागलें असता शुभ शांतिनगरास जाऊन व यज्ञांशापासून ब्रह्मज्ञानाचें ग्रहण करून तो त्याचा शिष्य झाला. त्या महात्म्यानें भागवताची टीका केली. सूत ह्मणतातः— शंकराच्या पूजेमध्यें तत्पर असलेला रामशर्मा ह्मणून एक ब्राह्मण काशीस होता २२,२३. तो बुद्धिमान् ब्राह्मण शिवरात्रीच्या दिवशीं अविमुक्तेश्वराच्या मंदिरीं एकटाच जागत राहिला. त्यान ध्यान करून शुभ पंचाक्षरी मंत्राचा जप केला २४. तेव्हा लोकाचें कल्याण करणारा भगवान् शंकर त्या उत्तम ब्राह्मणास " वर माग " असें वचन बोलता झाला २५. तेव्हा ज्याची बुद्धि नम्र आहे असा तो रामशर्मा शंकरास नमस्कार करून ह्मणाला ' आपण ज्याच्या ठिकाणीं चित्ताचें ऐकाग्र्य करिता व ज्याच्या ध्यानामध्यें लीन होऊन जाता, तो देव हे प्रभो, तुमच्या प्रसादामुळे माझ्या हृदयामध्यें राहो. ' असें वचन तो बोलला असता महेश्वर त्यास हसून ह्मणतो ' ब्रह्मस्वरूपिणी एक प्रकृतिरूप माया तीन प्रकारची होते. ती स्वतः शून्यभूत असून अव्यय जो पुरुष त्याचेच अर्ध तेज घेऊन ती लोकजननी पुरुष व क्लीब अशा दोन पुत्रास प्रसवली. साक्षात् नारायण हाच पुरुष असून तो गौरवर्ण व आठ भुजांनीं युक्त आहे २६–२९. तो भगवान् आपल्या इच्छेनें तीन प्रकारचा होऊन विश्वाचे रक्षण करीत असतो. अर्ध्या तेजानें युक्त असलेला जो विष्णु तो वनमाली चतुर्भुज ३० क्षीरशायी असून तोच आदित्य व स्वतः सद्गुणाची देवता आहे. तोच आपल्या अर्ध्या तेजानें नर व नारायण ऋषि झाला. विष्णु व जिष्णु तेच होत. गंधमादनपर्वतावरील संकर्षण क्लीब असून तो साक्षात् ब्रह्मरूप होय. तोही तीन प्रकारचा झाला ३१,३२. त्याच्या पूर्व अर्धापासून गौरवर्ण शेष व मागच्या अर्धापासून रामलक्ष्मण झाले. द्वापरान्या शेवटीं स्वतः गौर शेषच बलभद्र झाला. राम व लक्ष्मण याचें ध्यान व बलभद्राचें पूजन मला सर्वदा कर्तव्य आहे. यास्तव, तूंही त्यासच प्राप्त होऊन सुखी हो ' ३३,३४. असें बोलून तो देव गुप्त झाला व रामानंदाला तें ध्यान व पूजन प्राप्त झाले. पुढें तो बारा वर्षाच्या वयाचा द्विज कृष्णचैतन्याकडे येऊन त्याचा शिष्य होऊन तेथे कृष्णचैतन्याची पूजा करीत राहिला. त्याच्या आज्ञेनें त्यानें शुभ

सूत उवाच ॥ निम्बादित्यस्य वै विप्रो रामानुजसमन्वितः । श्रुत्वा यज्ञांशचरितं पुरीं शान्ति-मयीं गतः ३७ यज्ञांशे षोडशाब्दे च नत्वा तौ समास्थितौ । ऊचतुः कृष्णचैतन्य भवता किं मतं स्मृतम् ३८ विहस्याह स यज्ञांशः शाक्तोऽहं शक्तिपूजकः । शैवोऽहं वै द्विजौ नित्य लोकार्थे शंकरव्रती ३९ वैष्णवोऽहं ध्यानपरो देवदेवस्य भक्तिमान् । अहं भक्तिपदं पीत्वा पापपुंसो बलिं शुभम् ४० शक्त्यै समर्प्य होमान्ते ज्ञानाग्नौ यज्ञतत्परः । इति श्रुत्वा द्विजौ तौ तु तस्य शिष्यत्व-मागतौ ४१ आचारमार्गमं गम्य सर्वपूज्यौ बभूवतुः । तदाज्ञयाचारभाष्यं कृत्वा रामानुजो मुनिः ४ उवास तत्र मतिमान्कृष्णचैतन्यपूजकः । निम्बादित्यो गुरोराज्ञां पुरस्कृत्य महामुनिः ४३ कृष्णखण्डं पुराणांगं चक्रे दशसहस्रकम् । तत्रोक्ष्य गुरुसेवाढ्या राधाकृष्णप्रपूजकः ४४ सूत उवाच ॥ विष्णुस्वामी स वै विप्रो गतः शान्तिपुरीं शुभाम् । यज्ञांश ऊनविंशाब्दे नत्वा तं प्राह सद्द्विजः ४५ को देवः सर्वदेवानां पूज्यो ब्रह्माण्डगोचरे । इति श्रुत्वा स भगवानुवाच द्विजसत्तमम् ४६ सर्वपूज्यो महादेवो भक्तानुग्रहकारकः । विष्ण्वीश्वरश्च रुद्रेशो ब्रह्मेशो भग-वान्हरः ४७ विना तत्पूजनेनैव पदार्था निष्फला हि ते । ये तु वै विष्णुभक्ताश्च शंकरार्चनत-त्परा ४८ शिवप्रसादात्सुलभा वैष्णवी भक्तिरुत्तमा । वैष्णवः पुरुषो भूत्वा शंकर लोकशंक-रम् ४९ कर्मभूम्यां समागम्य न पूजति स नारकः । विष्णुस्वामीति तच्छ्रुत्वा शिष्यो भूत्वा च तद्गुणैः ५० कृष्णमन्त्रमुपासित्वा स बभूव शिवार्चकः । वैष्णवी सहिता तेन निर्मिता च तदा-

---

अध्यात्मरामायण केलें ३५,३६. पूर्वी सांगितलेला निंबादित्य ब्राह्मण यज्ञांशाचें चरित्र ऐकून रामानुजासहवर्तमान शांतिमयी नगरीमध्यें गेला ३७. यज्ञांशास सोळांव वर्ष लागलें असता त्यास नमस्कार करून ते दोघे उभे राहिले व कृष्णचैतन्यास ह्मणाले " तुमचें कोणतं मत आहे तें सांगा " ३८. तेव्हा तो यज्ञांश हंसून ह्मणतो " मी शक्तीची पूजा करणारा शाक्त आहें. हे ब्राह्म-णहो, मी लोकाच्या कल्याणाकरिता सर्वदा शंकराचें व्रत करीत असतों. यास्तव, मी शैवही आहें व मी भक्तियुक्त मनानें देवाधिदेवाचें ध्यान करीत असल्यामुळें वैष्णवही आहें. मी भक्तिमदाचें प्राशन करून शक्तीस होमाच्या शेवटीं पापपुरुषाचा शुभ बलिही समर्पण करीत असतों. तात्पर्य, यज्ञामध्यें तत्पर असलेला मी ज्ञानाग्निमध्यें हवन करीत असतों. " हें ऐकून ते दोघे ब्राह्मण त्याचे शिष्य झाले ३९–४१. आचारमार्गामध्यें तत्पर राहून ते दोघेही सर्वास पूज्य झाले. त्याच्या आज्ञेनें आचारभाष्य करून बुद्धिमान् रामानुज मुनि कृष्णचैतन्याची पूजा करीत तेथेंच राहिला. महामुनि निंबादित्य गुरूची आज्ञा घेऊन कृष्णखंडनामक पुराणाचें अंग रचिता झाला. त्याचा ग्रंथ दहा हजार आहे. राधाकृष्णाची पूजा करणारा तोही गुरूच्या सेवेनें संपन्न होऊन तेथेंच राहिला ४२—४४. सूत ह्मणतातः— विष्णुस्वामी ह्मणून जो ब्राह्मण होता तो शुभ शांतिपुरीस गेला. त्या वेळीं यज्ञांशास एकोणिसावें वर्ष लागले होतें. असो. त्यास नमस्कार करून तो ब्राह्मण ह्मणतो ४५ ' या ब्रह्मांडामध्यें सर्व देवांस पूज्य असा कोणता देव आहे ? ' हें ऐकून तो भगवान् त्या उत्तम ब्राह्मणास ह्मणाला " भक्तावर अनुग्रह करणारा महादेव सर्वांस पूज्य आहे. भगवान् हर विष्णूचा ईश्वर, रुद्राचा ईश व ब्रह्मदेवाचाही प्रभु आहे. त्याच्या पूजनावाचून सर्व पदार्थ निष्फल होत. जे विष्णूचे भक्त असून शंकराच्या पूजनामध्यें नेहेमीं तत्पर असतात त्यास शंकराच्या प्रसादामुळें उत्तम विष्णुभक्ति सुलभ होते. जो विष्णुभक्त होऊन लोकशंकर शंकराची या कर्मभूमीमध्यें येऊन पूजा करीत नाहीं तो पुरुष नरकगामी होतो. " हें ऐकून विष्णुस्वामी त्याच्या गुणाच्या योगानें प्रसन्न होऊन त्याचा शिष्य झाला ४६–५० व कृष्णमंत्राची उपासना करून तो

ह्मणा ५१ तत्रोप्य विष्णुभक्तश्च कृष्णचैतन्यपूजक.। सूत उवाच ॥ मध्वाचार्यः कृष्णपरो ज्ञात्वा यज्ञांशमुत्तमम् ५२ गत्वा शान्तिपुरीं रम्यां नत्वा तं प्राह स द्विजः। कृष्णोऽयं भगवान्साक्षात्तदन्ये विश्वकारका ५३ देवा ब्रह्मादयो ज्ञेयास्तर्हि तत्पूजनेन किम्। शक्तिपार्श्वपरा विप्रा वृथा हिंसामयैर्मखैः ५४ अश्वमेधादिभिर्देवान्पूजयन्ति महीतल। इति श्रुत्वा विहस्याह यज्ञांशश्च शचीसुतः ५५ न कृष्णो भगवान्साक्षात्तामसोऽयं च शक्तिजः। चौरोऽय सर्वभोगी च हिंसको मांसभक्षक ५६ परस्त्रियं भजेद्यो वै स गच्छेद्यममन्दिरम्। चौरो यमालयं गच्छेज्जीवहन्ता विशेषतः ५७ एभिश्च लक्षणैर्हीनो भगवान्यकृते परः। यस्य बुद्धि स वै ब्रह्माहंकारो यस्य वै शिवः ५८ शब्दमात्रा गणेशश्च स्पर्शमात्रा यमः स्वयम्। रूपमात्रा कुमारो वै रसमात्रा च यक्षराट् ५९ गन्धमात्रा विश्वकर्मा श्रवणं भगवाञ्छनिः। यस्य त्वक्स बुधो ज्ञेयश्चक्षुस्सूर्यः सनातनः ६० यज्जिह्वा भगवाञ्छुक्रो घ्राणस्तस्याश्विनीसुतौ। यन्मुखं भगवाञ्जीवो यस्य हस्तस्तु देवराट् ६१ कृष्णोऽयं तस्य चरणं लिंगं दक्षः प्रजापतिः। गुदं तद्भगवान्मृत्युस्तस्मै भगवते नमः ६२ हिंसायज्ञैश्च भगवान्स च तृप्तिमवाप्नुयात्। स च यज्ञपशुर्वह्नौ ब्रह्मभूयाय कल्पते ६३ तस्य मोक्षप्रभावेन महत्पुण्यमवाप्नुयात्। विधिहीनो नरः पापी हिंसायज्ञं करोति यः ६४ अन्धतामिस्रनरकं तदोषेण वसेच्चिरम्। महत्पुण्य महत्पाप हिंसायज्ञेषु वर्तते ६५ अतस्तु भगवान्कृष्णो हिंसायज्ञं कलौ युगे। समाप्य कार्तिके मासि प्रतिपच्छुक्लपक्षके ६६ अन्नकूटमयं यज्ञं स्थापयामास भूतले। देवराजस्तदा क्रुद्धोऽनुजं प्रति सदुःखितः ६७ व्रज संप्लाव-

---

शिवपूजकही बनला. त्याच्या आज्ञेनें त्यानें वैष्णवी संहिता रचिली ५१ व तेथें राहून विष्णुभक्त कृष्णचैतन्याची पूजा करू लागला. सूत ह्मणतात—कृष्णाची भक्ति करणारा मध्वाचार्य यज्ञांश उत्तम आहे असें जाणून ५२ व रम्य शांतिपुरीस जाऊन तो त्यास नमस्कार करून ह्मणाला " हा कृष्ण साक्षात् भगवान् असून इतर ब्रह्मदेवादि सर्व देव विश्वास निर्माण करणारे आहेत. व असें जर आहे तर त्याच्या पूजनानें काय होणार ? शक्तिपूजनामध्यें परायण असलेले ते ब्राह्मण अश्वमेधादिक हिंसामय यज्ञाच्या योगानें भूलोकीं देवांस व्यर्थ पूजितात. " हें ऐकून शचीपुत्र यज्ञांश हसून ह्मणतो ५३—५५ " कृष्ण हा साक्षात् भगवान् नव्हे. तो शक्तीपासून उत्पन्न झालेला तामस पुरुष होय. हा चोर, सर्वांचा भोग घेणारा, हिंसक व मांसभक्षक आहे. जो परस्त्रीचें सेवन करितो तो यमसदनीं जातो; चोरही यमसदनीं जातो व विशेषतः जीवांची हिंसा करणारा तर जातोच. या लक्षणांनीं रहित असलेला जो भगवान् तो प्रकृतीहून पर आहे. ज्याची बुद्धि ब्रह्मदेव, अहंकार शिव, ज्याची शब्दमात्रा गणेश, स्पर्शमात्रा स्वतः यम, रूपमात्रा स्कंद, रसमात्रा कुबेर, गंधमात्रा विश्वकर्मा व श्रवणेंद्रिय भगवान् शनि होय; ज्याचें त्वगिंद्रिय बुध, नेत्रेंद्रिय सनातन सूर्य, ज्याची जिव्हा भगवान् शुक्र, घ्राणेंद्रिय अश्विनीकुमार, मुख भगवान् गुरु व ज्याचा हात इंद्र आहे त्या ईश्वराचा हा कृष्ण चरण होय. लिंग दक्ष प्रजापति आहे व त्याची गुदा भगवान् मृत्यु आहे अशा त्या भगवानास नमस्कार असो ५६-६२. हिंसामय यज्ञाच्या योगानेंच तो भगवान् तृप्त होतो. तो यज्ञपशु अग्नीमध्यें हुत झाला असता ब्रह्मभावास समर्थ होतो ६३ व त्याच्या मोक्षप्रभावाने कर्त्यास मोठें पुण्य लागते. जो पुरुष विधिहीन हिंसायज्ञ करितो तो पापी त्या दोषामुळे अधतामिस्र नरकामध्यें दीर्घ काल राहील. हिंसायज्ञामध्यें महत्पुण्यही आहे व महत्पापही आहे. येवढयाचकरितां भगवान् कृष्णाने कलियुगातील हिंसायज्ञ बंद करून कार्तिक महिन्याच्या शुक्लपक्षांतील प्रतिपदेच्या दिवशी भूलोकी अन्नकूटमय यज्ञ स्थापिला. तेव्हां

धामास तदा कृष्णः सनातनीम्। प्रकृतिं स च तुष्टाव लोकमङ्गलहेतवे ६८ तदा सा प्रकृतिर्माता स्वपूर्वाह्णिक्यविग्रहम्। राधारूपं महत्कृत्वा हृदि कृष्णस्य चागता ६९ तच्छक्त्या भगवान्कृष्णो धृत्वा गोवर्धनं गिरिम्। नाम्ना गिरिधरो देव सर्वपूज्यो बभूव ह ७० राधाकृष्णस्तु भगवान्पूर्णब्रह्मसनातनः। अ कृष्णो न भगवान्राधाकृष्णः पर प्रभुः ७१ इति श्रुत्वा वचस्तस्य मध्वाचार्यो हरिप्रियः। शिष्यो भूत्वा स्थितस्तत्र कृष्णचैतन्यपूजकः ७ [५३९७] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये कृष्णचैतन्यसंज्ञांशशिष्यबलभद्रविष्णुस्वामिमध्वाचार्यादिवृत्तान्तवर्णनं एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

सूत उवाच ॥ भट्टोजिरस्य च शुद्धात्मा शिवभक्तिपरायणः। कृष्णचैतन्यमागत्य नमस्कृत्य वचोऽब्रवीत् १ महादेवो गुरुः सर्वे शिव आत्मा शरीरिणाम्। विष्णुर्ब्रह्मा च तद्दासौ तर्हि तत्पूजनेन किम् २ इति श्रुत्वा स यज्ञांशो विष्णुदत्तवरोद्धतः। विहस्याह स भट्टोजिं नाथ शम्भुर्महेश्वरः ३ समर्थो भगवान्शम्भुः कर्ता किन्न शरीरिणाम्। न भर्ता च विना विष्णुं महतांऽय सदाशिवः ४ एकमूर्तेस्त्रिधा जाता ब्रह्मा विष्णुर्महेश्वरः। शाक्तमार्गेण भगवान्ब्रह्मा मोक्षप्रदायकः ५ विष्णुर्वैष्णवमार्गेण जीवानां मोक्षदायकः। शम्भुर्वै शैवमार्गेण मोक्षदाता शरीरिणाम् ६ शाक्तस्याश्रमो गृही यज्ञभुक्तिर्नृवरः। वानप्रस्थाश्रमो यो वै वैष्णव कन्दमूलभुक् ७ यत्याश्रमः सदा रौद्रो निर्गुणः शुद्धविग्रहः। ब्रह्मचर्याश्रमस्तेषामनुगामी महाश्रमः ८ इति श्रुत्वा

रागावलेला इंद्र आपल्या धाकट्या भावाविषयी अतिशय दुःखित झाला व त्यानं व्रजसमुदाय बुडवून मोडिलें. तेव्हा तो कृष्ण जगाच्या मंगलाकरिता सनातन प्रकृतीची स्तुति करूं लागला ६४–६८. तेव्हा ती प्रकृति माता आपल्या पूर्वभागातून दिव्याकृति मोठ राधारूप निर्माण करून कृष्णाच्या हृदयामध्य व्यक्त झाली ६९. तिच्या शक्तीनं भगवान् कृष्ण गोवर्धन पर्वताला उचलून धरिता झाला. त्यामुळेंच गिरिवर या नावानें तो देव सर्वांस पूज्य झाला ७०. तात्पर्य, तो भगवान् राधाकृष्ण सनातन पूर्ण ब्रह्म आहे व त्यामुळेंच केवळ कृष्ण भगवान् नव्हे तर राधाकृष्ण श्रेष्ठ प्रभु आहे. " हें त्याचें वचन ऐकून हरिप्रिय मध्वाचार्य त्याचा शिष्य होऊन तेथें कृष्णचैतन्याची पूजा करीत राहिला ७१, ७२. व्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्यु० प्रतिस० कलियु० चतुर्थखंडातील कृष्णचैतन्याच्या शिष्यांविषयीं एकोणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥

सूत म्हणतात — ज्याचें अंतःकरण शुद्ध आहे व जो शिवभक्तिपरायण आहे असा भट्टोजि कृष्णचैतन्याकडे येऊन व त्याला नमस्कार करून म्हणाला " महादेव सर्वांचा गुरु असून तो शंकर सर्व प्राण्यांचा आत्मा आहे. विष्णु व ब्रह्मदेव त्याचे जर दास आहेत तर त्यांच्या पूजनानें काय लाभ होणार ? " १, २ असें ऐकून तो यज्ञांश भीम वर्षाच्या वयाचा झाला असता भट्टोजीस हंसून म्हणाला " हा शंभु महेश्वर नव्हे ३ व भगवान् शंभुच जर समर्थ आहे तर तो प्राण्यांचा कर्ता का होत नाहीं ? विष्णूवाचून पालन करणाराही दुसरा कोणी नाहीं. हा सदाशिव केवळ संहार करणारा आहे ४ एका मूर्तीपासूनच ब्रह्मा, विष्णु व महेश्वर असे तीन प्रकारचे देव झाले आहेत भगवान् ब्रह्मदेव शाक्तमार्गानेंच मोक्ष देणारा होतो, विष्णु वैष्णवमार्गानें जीवांस मोक्ष देतो व शंभु शैवमार्गानें प्राण्यांचा मोक्षदाता आहे. शाक्तमार्ग हा उत्तम गृहस्थाश्रम असून त्यामध्यें पुरुष यज्ञ करून अवशिष्ट राहिलेलें अन्न भोजन करितो, व पितर हेच त्याचे देव आहेत. वानप्रस्थाश्रम वैष्णव असून त्यामध्यें कंद व मुळें खाऊन पुरुष रहात असतो. यत्याश्रम सर्वदा रुद्राचा आहे. तो निर्गुण व शुद्धरूप आहे, व महाश्रम जो ब्रह्मचर्याश्रम तो या तीन आश्रमांचा अनुयायी आहे " ५-८.

गुरोर्वाक्यं शिष्यो भूत्वा स वै द्विजः । तृतीयाङ्गं च वेदानां व्याचख्यौ पाणिनिकृतम् ९ तदाज्ञया च सिद्धान्तकौमुदीं स चकार ह । तत्रोप्य दीक्षितो धीमान्कृष्णचैतन्यसेवकः १० सूत उवाच ॥ वराहमिहरो धीमान्स च सूर्यपरायण । द्वाविंशाब्दे च यज्ञांशो तमागत्य वचोऽब्रवीत् ११ सूर्योऽयं भगवान्साक्षात्त्रयो देवा यतोऽभवन् । प्रातर्ब्रह्मा च मध्याह्ने विष्णुस्तस्य सदाशिवः १२ अतो रवेः शुभा पूजा त्रिदेवयजनेन किम् । इति श्रुत्वा स यज्ञांशो विहस्याह शुभं वचः १३ द्विधा बभूव प्रकृतिरपरा च परा तथा । नाममात्रा तथा पुष्पमात्रा तन्मात्रका तथा १४ शब्दमात्रा स्पर्शमात्रा रूपमात्रा रसा तथा । गन्धमात्रा तथा ज्ञेया परा प्रकृतिरष्टधा १५ अपराया जीवभूता नित्यशुद्धा जगन्मयी । भूमिरापोऽनलो वायुः ख मनो बुद्धिरेव च १६ अहंकार इति ज्ञेया प्रकृतिश्चापराऽष्टधा । विष्णुर्ब्रह्मा महादेवो गणेशो यमराड् गुह १७ कुबेरो विश्वकर्मा च पराप्रकृतिदेवता । सुमेरुर्वरुणो वह्निर्वायुश्चैव ध्रुवस्तथा १८ सोमो रविस्तथा शेषोऽपराप्रकृतिदेवता । अतः सोमपतिः रुद्रो रविस्वामी विधिः स्वयम् १९ शेषस्वामी हरिः साक्षात्तस्मैस्तेभ्यो नमो नमः । इति श्रुत्वा तदा विप्रः शिष्यो भूत्वा च तद्गुरोः २० तदाज्ञया चतुर्थाङ्गं ज्योतिःशास्त्रं चकार ह । वाराहसहितां नाम बृहज्जातकमेव हि २१ क्षुद्रतन्त्रांस्तथान्यांश्च कृत्वा तत्र स चावसत् । सूत उवाच ॥ वाणीभूषण एवापि शिवभक्तिपरायणः २२ कृष्णचैतन्यमागम्य वचः प्राह विनम्रधीः । विष्णुमाया जगद्धात्री सैका प्रकृतिरुत्तमा २३ तया जातमिदं विश्वं विश्वाद्देवास्समुद्भवाः । विश्वेदेवस्य पुरुषस्तस्माज्जिज्ञा बहुधाऽभवत् २४ ब्रह्मा

असें गुरूचें वाक्य ऐकून तो ब्राह्मण त्याचा शिष्य झाला व पाणिनीनें केलेले व्याकरणनामक जें वेदाचें तिसरें अंग त्याची त्यानें व्याख्या केली ९. त्याच्या आज्ञेने भट्टोजीने सिद्धांतकौमुदी केली व तो बुद्धिमान् दीक्षित तेथेच राहून कृष्णचैतन्याची सेवा करूं लागला १०. सूत ह्मणतात– बुद्धिमान् वराहमिहर सूर्यपरायण होता. यज्ञाशास बाविसावे वर्ष लागलें असता तो त्याच्याकडे येऊन ह्मणाला " ज्याच्यापासून हे तीन देव झाले तो हा साक्षात् भगवान् सूर्य व होय. हा प्रातःकालीं ब्रह्मदेव, मध्याह्नकालीं विष्णु व सायंकालीं सदाशिव होतो. यास्तव, सूर्याचीच शुभ पूजा करावी. या तीन देवाच्या पूजनानें काय होणार? " याप्रमाणें ऐकून तो यज्ञाश हसून असे शुभ वचन बोलला ११-१३ " प्रकृति परा व अपरा अशी दोन प्रकारची झाली. त्यातील नाममात्रा, पुष्पमात्रा, तन्मात्रा, शब्दमात्रा, स्पर्शमात्रा, रूपमात्रा, रसमात्रा व गंधमात्रा अशी ती आठ प्रकारची पर प्रकृति जाणावी. ही अपर प्रकृतीमध्यें जीवरूप, नित्यशुद्ध व जगन्मय होऊन राहते. भूमि, जल, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि व अहंकार अशा प्रकारें ती आठ प्रकारची अपर प्रकृति होय. विष्णु, ब्रह्मदेव, महादेव, गणेश, यम, स्कंद, कुबेर व विश्वकर्मा या परा प्रकृतीच्या देवता आहेत. सुमेरु, वरुण, अग्नि, वायु, ध्रुव १४-१८, सोम, तसाच सूर्य व शेष या अपर प्रकृतीच्या देवता आहेत. यास्तव, सोमाचा स्वामी रुद्र, सूर्याचा स्वामी स्वतः ब्रह्मदेव व शेषाचा स्वामी साक्षात् हरि होय. त्यास नमस्कार असो. नमस्कार असो. " हे ऐकून तो ब्राह्मण त्या गुरूचा शिष्य झाला व त्याच्या आज्ञेनें वेदाचें चवथे अंग जे ज्योतिःशास्त्र तें त्यानें केलें. त्याने वराहसंहितानामक बृहज्जातकही रचिलें १९–२१. त्यानें दुसरींही बरींच क्षुद्र तंत्रें निर्माण करून तेथे वास केला. सूत ह्मणतातः— पुढें शिवभक्तीमध्यें परायण असणारा वाणीभूषणही कृष्णचैतन्याकडे येऊन ज्याची बुद्धि अतिनम्र आहे असा तो त्यास ह्मणाला " विष्णुमाया जगाचें पोषण करणारी व एक आहे. तीच उत्तम प्रकृति होय. तिच्यापासून हें सर्व विश्व निर्माण झाले व विश्वापासून देवांचा समुद्भव झाला. शक्तीपासून निर्माण झालेला तो विश्वेदेवनामक पुरुष बहुत प्रकारचा झाला २२—२४.

विष्णुर्हरश्चैव देवाः प्रकृतिसंभवाः । अते भगवती पूज्या तर्हि तत्पूजनेन किम् २५ इति श्रुत्वा स यज्ञांशो विहस्याह द्विजोत्तमम् । न वै भगवती श्रेष्ठा जडरूपा गुणात्मिका २६ एका सा प्रकृतिर्माया रचितु जगतां क्षमा । पुरुषस्य सहायेन योषितेव नरस्य च २७ देवीभागवते शास्त्रे प्रसिद्धेयं कथा द्विज । कदाचित्प्रकृतिर्देवी स्वेच्छया च जगदिदम् २८ निर्मितं जडभूत तद्दृष्ट्वा बोधित तया । न चैतन्यमभूद्विप्र विस्मिता प्रकृतिस्तदा २९ शून्यभूत च पुरुष चैतन्य समतोषयत् । प्रविष्टा भगवान्देवी मायाजनितगोलके ० स्वप्नवद्वा स्वय जातश्चैतन्यमभवज्जगत् । अतः श्रेष्ठ. स भगवान्पुरुषो निर्गुणः परः ३१ प्रकृत्यां स्वेच्छया जातो लिङ्गरूपस्तदाऽभवत् । पुंल्लिङ्गप्रकृतौ जातः पुंल्लिंगोऽयं सनातनः ३२ स्त्रीलिंगप्रकृतौ जातः स्त्रीलिंगोऽय सनातनः । नपुंसकप्रकृतौ जातः क्लीबरूपः स वै प्रभुः ३३ अव्ययप्रकृतौ जातो निर्गुणोऽयमधोक्षजः । नमस्तस्मै भगवते शून्यरूपाय साक्षिणे ३४ इति श्रुत्वा तु तद्वाक्यं शिष्या भूत्वा स वै द्विजः । त्रिंशद्वर्षे च यज्ञांश तत्र वासमकारयत् ३५ छन्दोग्रन्थ तु वेदाङ्ग स्वनाम्ना तत्र निर्मितम् । राधाकृष्णपरं नाम जप्त्वा हर्षमवाप्तवान् ३६ सूत उवाच ॥ धन्वन्तरिर्द्विजो नाम ब्रह्मभक्तिपरायणः । कृष्णचैतन्यमागम्य नत्वा वचनमब्रवीत् ३७ भवांस्तु पुरुषः श्रेष्ठो नित्यशुद्धस्सनातनः । जडभूता च तन्माया समर्था भगवान्स्वयम् ३८ नित्योऽव्यक्तः परः सूक्ष्मस्तस्मात्प्रकृतिरुद्भवा । अत. पूज्यस्स भगवान्प्रकृत्याः पूजनेन किम् ३९

तात्पर्य, ब्रह्मदेव, विष्णु, शंकर व इतरही देव प्रकृतीपासून निर्माण झाले आहत. यास्तव, ती भगवतीच पूज्य होय. इतराच्या पूजनानें काय होणार ? " २५ हें ऐकून तो यज्ञांश हांसून त्या उत्तम ब्राह्मणास ह्मणाला " भगवती श्रेष्ठ नव्हे. कारण, ती जडरूप व गुणरूप आहे २६. पुरुषाच्या साहाय्यानें जशी स्त्री त्याचप्रमाणें ती एकटीच मायासंज्ञक प्रकृति पुरुषाच्या साहाय्यानें जगाची रचना करण्यास समर्थ आहे २७. हे ब्राह्मणा, देवीभागवतशास्त्रामध्यें ही कथा प्रसिद्ध आहे. कोणे एके वेळी देवी प्रकृति स्वेच्छेनें हे जग निर्माण करिती झाली. पण तें जड आहे असें पाहून तिनें त्यास पुष्कळ बोध केला. पण हे ब्राह्मणा, ते चैतन्ययुक्त झालें नाहीं. तेव्हा विस्मित झालेली प्रकृति निराकार चैतन्यरूप पुरुषास संतुष्ट करिती झाली. त्यामुळें मायादेवीनें निर्माण केलेल्या गोलकामध्यें तो भगवान् शिरला व तो स्वत. स्वप्नाप्रमाणे निर्माण झाला; व संपूर्ण जगत् चैतन्ययुक्त झालें. यास्तव, तो निर्गुण व भगवान् परात्पर पुरुष श्रेष्ठ आहे २८-३१. प्रकृतीच्या ठायीं स्वेच्छेनें निर्माण झालेला तो तात्काळ लिंगरूप झाला. पुल्लिंग प्रकृतीमध्यें झालेला हा सनातन देव पुल्लिंग होय ३२. स्त्रीलिंग प्रकृतीमध्यें झालेला हा सनातन देव स्त्रीलिंग होय. नपुंसक प्रकृतीमध्यें झालेला तो पुरुष क्लीबरूप होय ३३ व अव्यय प्रकृतीमध्यें निर्माण झालेला हा निर्गुण अधोक्षज आहे. त्या निराकार व साक्षी भगवानास नमस्कार असो " ३४. असें त्याचें वाक्य ऐकून तो ब्राह्मण त्याचा शिष्य झाला व यज्ञांशास तीसावें वर्ष लागले असता त्यानें तेथें वास केला ३५. त्यानें वेदागरूप छंदोग्रंथ आपल्या नावानें रचिला व " राधाकृष्ण " या श्रेष्ठ नामाचा जप करून तो परमानंदास प्राप्त झाला. सूत ह्मणतात:— धन्वंतरि नांवाचा ब्राह्मण ब्रह्मभक्तीमध्यें परायण होता. तो कृष्णचैतन्याकडे येऊन व त्यास नमस्कार करून ह्मणाला " भगवान् नित्यशुद्ध, सनातन व श्रेष्ठ पुरुष आहे. त्याची माया जडरूप आहे. तो भगवान् स्वतः समर्थ असून नित्य, अव्यक्त, पर व सूक्ष्म आहे. त्याच्यापासून प्रकृति झाली. यास्तव, तो भगवान् पूज्य होय. प्रकृतीच्या पूजनाने काय होणार ? " ३६-३९. हें ऐकून व हंसून सर्व शास्त्रामध्ये परायण असलेला

इति श्रुत्वा विहस्याह यज्ञांशस्सर्वशास्त्रवित् । नाय श्रेष्ठस्य पुरुषो न क्षमः प्रकृतिं विना ४० पुराणे चैव वाराहे प्रसिद्धं यं कथा शुभा । कदाचित्पुरुषो नित्या नाममात्रः स्वकेच्छया ४१ बभूव बहुधा तत्र यथा प्रेतस्तथा स्वयम् । असमर्थो विरचितुं जगन्ति पुरुषः परः ४२ तुष्टाव प्रकृतिं देवीं चिरकाल सनातनीम् । तदा देवी च तं प्राप्य महत्तत्त्वं चकार ह ४३ सोऽहंकारश्च महतो जातस्तन्मात्र कारणात् । महाभूतान्यतोऽप्यासन्नातं तैश्च जगदिदम् ४४ अतस्सनातनौ चोभौ पुरुषात्प्रकृति. परा । प्रकृतेः पुरुषश्चैव तस्मात्ताभ्यां नमो नमः ४५ इति धन्वन्तरिः श्रुत्वा शिष्यो भूत्वा च तद्गुरोः । तत्रैव चैव वेदाङ्ग कल्पवेदं चकार ह ४६ सुश्रुतादिपरा वापि शिष्या धन्वन्तरेः स्मृताः । सूत उवाच ॥ जयदेवस्स वै विप्रो बौद्धमार्गपरायणः ४७ कृष्णचैतन्यमागम्य पञ्चविंशवयोवृतम् । नत्वावाच वचो रम्यं स च श्रेष्ठ उषापतिं ४८ यस्य नाभेरभूत्पद्म ब्रह्मणा सह निर्गतम् । अतस्स ब्रह्मसूनाम सामवेदेषु गीयते ४९ विश्वो नारायणस्साक्षाद्यस्य केतौ समास्थितः । विश्वंकेतुरतो नाम ननिरुद्धोऽनिरुद्धकः ५० ब्रह्मवला च तत्पत्नी नित्या चोषा महोत्तमा । स वै लोकहितार्थाय स्वयमर्चावतारकः ५१ इति श्रुत्वा विहस्याह यज्ञांशस्त द्विजोत्तमम् । वेदो नारायणस्साक्षात्पूजनीयो नरैः सदा ५२ ततः कालस्ततः कर्म ततो धर्मः प्रवर्तते । धर्मात्कामः समुद्भूतः कामपत्नी रतिः स्वयम् ५३ रत्यां कामात्समुद्भूतोऽनिरुद्धो नाम देवता । उषा सा तस्य भगिनी तेन सार्द्धं समुद्भवा ५४ कालो नाम स वै कृष्णा राधा तस्य सहोदरा ।

यज्ञांश ह्मणाला " हा पुरुष श्रेष्ठ नाहीं व तो प्रकृतीवाचून काहीं करण्यासही समर्थ नाहीं. वराहपुराणामध्यें अशी शुभ कथा प्रसिद्ध आहे. कोणे एके वेळीं नित्य पुरुष आपल्या इच्छेनें नाममात्र झाला व तो अनेक प्रकारचा झाला असता ज्याप्रमाणें शरीर सोडून गेलेला प्रेतपुरुष असतो तसा हा स्वतः परपुरुष सृष्टिरचना करण्यास असमर्थ झाला. तेव्हा त्यानें दीर्घ कालपर्यंत सनातन प्रकृतिदेवीची स्तुति केली. तेव्हां ती देवी त्यास प्राप्त झाली व तिनें महत्तत्त्व केलें. महत्तत्त्वापासून अहंकार झाला. त्याच्यापासून तन्मात्रा व महाभूतें झालीं; व त्याच्यापासून हें सर्व विश्व निर्माण झालें. यास्तव, हीं दोघेंही सनातन होत. व पुरुषाहून प्रकृति श्रेष्ठ आहे व प्रकृतीहून पुरुष श्रेष्ठ आहे. यास्तव, त्या दोघांसही नमस्कार असो " ४०-४५. हे ऐकून धन्वंतरि त्या गुरूचा शिष्य झाला व तेथेंच राहून त्यानें कल्पवेदनामक वेदांग रचिलें. धन्वंतरीचे सुश्रुतादिक दुसरेही पुष्कळ शिष्य सांगितले आहेत. सूत ह्मणतातः— जयदेव ह्मणून ब्राह्मण बौद्धमार्गामध्यें परायण होता. तो पंचवीस वर्षांच्या वयाच्या कृष्णचैतन्याकडे आला व त्यास नमस्कार करून असें रम्य वचन बोलला ' हा उषापति अनिरुद्ध सर्वांहून श्रेष्ठ आहे. ज्याच्या नाभिकमलातून ब्रह्मदेवासहवर्तमान कमल निघालें; त्यास त्यामुळेंच ब्रह्मसू हे नांव सामवेदामध्यें दिलेलें आहे. विश्व हा साक्षात् नारायण असून त्याच्या ध्वजस्थानीं तो बसला आहे. यास्तव, विश्वकेतु असें त्याचें नाव पडलें. हा कोठें प्रतिबद्ध होत नाहीं ह्मणून याला अनिरुद्ध ह्मणतात. उषानामक ब्रह्मवेलाच त्याची नित्य व अत्युत्तम पत्नी होय. लोकाच्या हिताकरिता त्यानें स्वतः अर्चावतार घेतला आहे. ' हें ऐकून व हंसून यज्ञांश त्या उत्तम ब्राह्मणास ह्मणतो " वेद हा साक्षात् नारायण आहे व तो पुरुषास सदां पूज्य होय ४६—५२. त्याच्यापासून काल, कालापासून कर्म व कर्मापासून धर्म प्रवृत्त होतो व धर्मापासून काम उत्पन्न झाला आहे. कामपत्नी स्वतः रति होय ५३. रतीच्या ठायीं कामापासून अनिरुद्धनामक देव उत्पन्न झाला. उषा ही त्याची भगिनी त्याच्याबरोबरच उत्पन्न झालेली आहे ५४. काल ह्मणजे हा कृष्णच होय व राधा ही त्याची भगिनी आहे. कर्मरूप स्वतः ब्रह्म.

कर्मरूपः स वै ब्रह्मा नियतिस्तत्सहोदरा ५५ धर्मरूपो महादेवः श्रद्धा तस्य सहोदरा । अनिरुद्धः कथं चेशो भवतोक्तः सनातन ५६ त्रिधा सृष्टिश्च ब्रह्माण्डे स्थूला सूक्ष्मा च कारणा । स्थूलसृष्ट्यै समुद्भूतो देवो नारायणः स्वयम् ५७ नारायणी च तच्छक्तिस्तयोर्जलसमुद्भवः । जलाज्जातस्य वै शेषस्तस्योपरि समास्थितौ ५८ सुप्ते नारायणे देवे नाभेः पङ्कजमुत्तमम् । अनन्तयोजनायामसुद्भूतं ततो विधिः ५९ विधेः स्थूलमयी सृष्टिर्देवतिर्यङ्नरादिका । सूक्ष्मसृष्ट्यै समुद्भूतः सोऽनिरुद्ध उपापतिः ६० ततो वीर्यमयं तोयं जातं ब्रह्माण्डमस्तके । वीर्याज्जातस्य वै शेषस्तस्योपरि स चास्थितः ६१ तस्य नाभेस्समुद्भूतो ब्रह्मा लोकपितामहः । सूक्ष्मसृष्टिस्ततो जाता यथा स्वप्नेऽपि दृश्यते ६२ हेतुसृष्ट्यै समुद्भूतो वेदो नारायणः स्वयम् । वेदात्कालस्ततः कर्म ततो धर्मादयः स्मृता ६३ त्वद्गुरुश्च जगन्नाथ उड्रदेशनिवासकः । मया तत्रैव गन्तव्यं सशिष्येणाद्य भो द्विजाः ६४ इति श्रुत्वा तु वचनं कृष्णचैतन्यकिङ्कराः । स्वान्स्वाञ्छिष्यान्समाहूय तत्पश्चात्प्रययुश्च ते ६५ शांकरा द्वादशगणा रामानुजमुपाययुः । नामदेवादयस्तत्र गणास्सप्त समागता ६६ रामानन्दं नमस्कृत्य संस्थितास्तस्य सेवकाः । रोपणश्च तदागत्य स्वशिष्यैर्बहुभिर्वृतः ६७ कृष्णचैतन्यमागम्य नमस्कृत्य स्थितः स्वयम् । जगन्नाथपुरीं ते वै ययुर्भक्तितत्पराः ६८ निधय. सिद्धयस्तत्र तेषां सेवार्थमागताः । सर्वे च दशसाहस्रा वैष्णवाः शैवशाक्तिकैः ६९ यज्ञांशं च पुरस्कृत्य जगन्नाथपुरीं ययुः । अवतारो भगवाननिरुद्ध उपापतिः ७० तदागमनमालोक्य द्विजरूपधरो

असून नियति त्याची भगिनी आहे ५५. महादेव धर्मरूप असून श्रद्धा ही त्याची सहोदर भगिनी आहे. तेव्हा अनिरुद्धास तूं सनातन ईश्वर कसें ह्मणतोस ? ५६. ब्रह्माडामध्यें स्थूल, सूक्ष्म व कारण अशी तीन प्रकारची सृष्टि आहे. स्थूलसृष्टीकारिता स्वतः नारायण देव उत्पन्न झाला ५७. नारायणी ही त्याची शाक्त असून त्या दोघापासून जलाची उत्पत्ति झाली. जलापासून शेष झाला व त्याच्याबर तीं दोघेंही राहिलीं. नारायण देव निद्रित झाला असता त्याच्या नाभीपासून एक उत्तम व अनंत योजनें दीर्घ कमल उत्पन्न झालें. त्यान्यापासून ब्रह्मदेव झाला ५८,५९. व ब्रह्मदेवापासून देव, मनुष्य व पशुपक्ष्यादि तिर्यक्प्राणी ज्यामध्यें आहेत अशी स्थूल सृष्टि झाली. नंतर सूक्ष्म सृष्टीकरिता तो उपापति अनिरुद्ध निर्माण झाला ६०. त्याच्यापासून ब्रह्माडाच्या मस्तकी वीर्यमय जल झालें. त्या वीर्यापासून शेष निर्माण झाला; व त्याच्यावर अनिरुद्ध बसला ६१. त्याच्या नाभिकमलापासून लोकपितामह ब्रह्मदेव झाला. नंतर त्या ब्रह्मदेवापासून ज्याप्रमाणें स्वप्नामध्येंही आपणास सृष्टि दिसत त्याप्रमाणें सूक्ष्म सृष्टि झाली ६२. कारणसृष्टीकरिता स्वतः वेदोनारायण निर्माण झाला. वेदापासून काल, त्याच्यापासून कर्म व त्याच्यापासून धर्मादिक झाले असे सांगितलें आहे ६३. तुझा गुरु जो जगन्नाथ तो उड्र देशामध्यें राहणारा आहे. आज हे ब्राह्मणहो, मला शिष्यासहवर्तमान तेथेच जावयाचें आहे " ६४. असें वचन ऐकून कृष्णचैतन्याचे किंकर आपापल्या शिष्यास बोलावून त्यान्यामागून जाऊं लागले ६५. शंकराचे बारा गण रामानुजाकडे आले. नामदेवादि सात गणही तेथें प्राप्त झाले व रामानदास नमस्कार करून त्याचे सेवक होऊन राहिले. रोपणही आपल्या अनेक शिष्यानीं परिवेष्टित होत्साता कृष्णचैतन्याकडे आला व त्यास नमस्कार करून स्वतः तेथें राहिला. नंतर भक्तीमध्यें तत्पर असलेले ते सर्वही जगन्नाथपुरीस चालले. तेथें त्याची सेवा करण्याकरिता नवानिधि व अष्टसिद्धि आल्या. शैव व शाक्त यांच्यासहवर्तमान ते सर्व दहा सहस्र वैष्णव ६६-६९. यज्ञांशास पुढें घालून जगन्नाथपुरीकडे निघाले

मुनिः । जगन्नाथः स्वयं प्राप्तो यत्र यज्ञांशकादयः ७१ यज्ञांशस्त समालोक्य नत्वा वचनमब्रवीत् । किं मतं भवता ज्ञात कलौ प्राप्ते भयानके ७२ तत्सर्वं कृपया ब्रूहि श्रोतुमिच्छामि तत्त्वतः। इति श्रुत्वा तु वचनं जगन्नाथो हरिः स्वयम् ७३ उवाच वचनं रम्य लोकमङ्गलहेतवे । मिश्रदेशोद्भवा म्लेच्छाः काश्यपेनैव शासिताः ७४ संस्कृताः शूद्रवर्णेन ब्रह्मवर्णमुपागताः । शिखासूत्र समाधाय पठित्वा वेदमुत्तमम् ७५ यज्ञैश्च पूजयामासुर्देवदेवं शचीपतिम् । दुःखितो भगवानिन्द्रः श्वेतद्वीपमुपागतः ७६ स्तुत्या मां बोधयामास देवमङ्गलहेतवे । प्रबुद्धं मां वचः प्राह शृणु देव दयानिधे ७७ शूद्रसंस्कृतमन्नं च खादितुं न द्विजोऽर्हति । तथा च शू. जनितैर्यज्ञैस्तृप्तिं न चाप्नुयाम् ७८ काश्यपे स्वर्गते प्राप्ते मागधे राज्ञि शासति । मम शत्रुर्बलिर्दैत्यः कलिपक्षमुपागतः ७९ निस्तेजाश्च यथाऽहं स्यां तथा वै कर्तुमुद्यतः । मिश्रदेशोद्भवं म्लेच्छे सांस्कृतं तेन संस्कृता ८० भाषा देवविनाशाय दैत्यानां वर्द्धनाय च । आर्येषु प्राकृता भाषा दूषिता तेन वै कृता ८१ अतो मां रक्ष भगवन्भवन्तं शरणागतम् । इति श्रुत्वा तदाहं वै देवराजमुवाच ह ८२ भवन्तो द्वादशादित्या गन्तुमर्हन्ति भूतले । अहं लोकहितार्थाय जनिष्यामि कलौ युगे ८३ प्रवीणो निपुणोऽभिज्ञः कुशलश्च कृती सुखी । निष्णातः शिक्षितश्चैव सर्वज्ञः सुगतस्तथा ८४ प्रबुद्धश्च तथा बुद्ध आदित्याः क्रमतो भवा । धाता मित्रोऽर्यमा शक्रो मेघः प्रांशुर्भगस्तथा ८५ विवस्वांश्च तथा पूषा सविता त्वाष्ट्रविष्णुकौ । कीकटे देश आगत्य त

असता अर्वावतार जो भगवान् उत्पन्न अनिरुद्ध तो ते येत आहेत असें पाहून स्वतः द्विजरूप धारण करिता झाल व जेथें यज्ञांशादि होते तेथ तो जगन्नाथ मुनि आला ७०,७१. तेव्हा यज्ञांश त्यास पाहून व नमस्कार करून ह्मणाला " आपण भयंकर कलि प्राप्त झाला असता कोणतें मत कल्याणकर मानिलें आहे ते सर्व कृपा करून मला सांगा. कारण, ते तत्त्वतः ऐकण्याची माझी इच्छा आहे. " हें वचन ऐकून स्वत जगन्नाथ हरि ७२,७३ लोकांच्या कल्याणाकरिता असें रम्य वचन बोलला " मिश्र देशामध्ये उत्पन्न झालेल्या म्लेच्छांस काश्यपानें शासन केले आहे ७४. शूद्रवर्णानें ज्याचा संस्कार केला आहे असे ते ब्रह्मवर्णाप्रत प्राप्त झाले आहेत. शिखा व सूत्र याचे धारण करून व वेदाचें उत्तम पठन करून त्यानीं यज्ञांच्या योगानें देवाधिदेव शचीपतीस पूजिलें. तेव्हा दुःखयुक्त झालेला तो भगवान् इंद्र श्वेतद्वीपास आला व देवांच्या कल्याणाकरितां तो मला स्तुतींच्या योगानें उठविता झाला व मी जागृत झालो असता तो मला ह्मणाला ' हे देवाधिदेवा, हे दयानिधे, ऐक ७५—७७. शूद्राने उत्तम प्रकारे तयार केलेलें अन्न खाणे ब्राह्मणास योग्य नाहीं. तसेंच शूद्रानीं निर्माण केलेल्या यज्ञांच्या योगानें मीही तृप्त होत नाहीं. कश्यपपुत्र मागध देशांतील राज्य करीत होता. पण तो स्वर्गलोकीं गेला असता माझा शत्रु बलि दैत्य कलिपक्षास गेला व ज्या रीतीनें मी निस्तेज होईन तसें करण्यास तयार झाला. त्याने मिश्र देशामध्यें उत्पन्न झालेल्या म्लेच्छजातींत संस्कृत भाषा प्रचलित केली ७८–८० व देवांच्या नाशाकरिता आणि दैत्यांच्या वृद्धीकरिता आर्यामध्यें प्राकृत भाषा प्रचलित करून त्यानें मूलभाषा दूषित केली ८१. यास्तव, हे भगवन्. तुला शरण आलेल्या माझें रक्षण कर. ' हे ऐकून त्या वेळीं मी देवेंद्रास ह्मटलें ८२. तुह्मी बाराही आदित्य भूतलीं गमन करण्यास योग्य आहा. मीही लोकांच्या कल्याणाकरिता कलियुगामध्यें उत्पन्न होईन ८३. प्रवीण, निपुण, अभिज्ञ, कुशल, कृती, सुखी, निष्णात, शिक्षित, सर्वज्ञ, सुगत, प्रबुद्ध व त्याचप्रमाणें बुद्ध हे क्रमाने धाता, मित्र, अर्यमा, शक्र, मेघ, प्रांशु, भग, विवस्वान्, पूषा, सविता, त्वाष्ट्र व विष्णु या आदित्यांचे अवतार होत. हे सर्व देव

सुरा जज्ञिरे क्रमात् ८६ वेदनिन्दां पुरस्कृत्य बौद्धशास्त्रमचीकरत् । तेभ्यो वेदान्समादाय मुनिभ्यः ददुस्सुराः ८७ वेदनिन्दाप्रभावेन ते सुराः कुष्ठिनोऽभवन् । विष्णुदेवमुपागम्य तुष्टुवुर्बौद्धरूपिणम् ८८ हरियोगबलेनैव तेषां कुष्ठं ननाश ह । तदोषान्नग्नभूतश्च बौद्धस्स तेजसाऽभवत् ८९ पूर्वार्धान्नेमिनाथश्च परार्धाद्बौद्ध एव च । बौद्ध राज्यविनाशाय दारुपाषाणरूपधान् ९० अहं सिन्धुतटे जातो लोकमङ्गलहेतवे । इन्द्रद्युम्नश्च नृपतिः स्वर्गलोकादुपागतः ९१ मन्दिरं रचितं तेन तत्राहं समुपागतः । अत्र स्थितश्च यज्ञांश प्रसादमहिमा महान् ९२ सर्ववाञ्छितदं लोके स्थापयामास मोक्षदम् । वर्णधर्मश्च नैवात्र वेदधर्मस्तथा न हि ९३ व्रत चात्र न यज्ञांश मण्डले योजनान्तरे । यैर्नोक्ता यावनी भाषा येन बौद्धो विलोकितः ९४ तस्य पापं महत्पापं स्थितोऽहं तदपापहः । यां विलोक्य नरः शुद्धः कलिकाले भविष्यति ९५[५४९२]इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये कृष्णचैतन्यचरित्रे जगन्नाथमाहात्म्ये विंशोऽध्यायः ॥ २० ॥

सूत उवाच ॥ इति श्रुत्वा वचस्तस्य जगन्नाथस्य धीमतः । कृष्णचैतन्य एवापि तमुवाच प्रसन्नधीः १ भगवन्प्राणिनां श्रेयो यदुक्तं भवता मुने । विस्तरात्तत्कथां ब्रूहि यथा बौद्धसमुद्भवः २ जगन्नाथ उवाच ॥ सहस्राब्दे कलौ प्राप्ते कर्मभूम्यां च भारते । कण्वो नाम मुनिश्रेष्ठस्समाप्तः कश्यपात्मजः ३ आर्यावती देवकन्या कण्वस्य दयिता प्रिया । शक्रात्मजा च संप्राप्ता दम्पती शारदातटे ४ सरस्वतीं नदीरूपां कुरुक्षेत्रनिवासिनीम् । चतुर्वेदमयैः स्तोत्रैः कण्वस्तुष्टाव नम्रधीः ५

कीकट देशामध्यें येऊन क्रमाने उत्पन्न झाले ८४-८६. त्यानीं वेदाची निंदा करून बौद्धशास्त्र रचिलें व त्याच्यापासून वेद घेऊन ते त्यानीं मुनीस दिले ८७. वेदविद्येच्या प्रभावानें ते देव कुष्ठरोगी झाले व विष्णुदेवाजवळ येऊन ते त्या बौद्धरूपी देवाची स्तुति करूं लागले ८८. तेव्हा योगसामर्थ्याने हरीनें त्याच्या कुष्ठाचा नाश केला. पण त्या दोषामुळें तो बौद्धही नग्न झाला. तो आपल्या तेजानें पूर्वार्धापासून नेमिनाथ व परार्धापासून बौद्ध झाला. नंतर बौद्धाच्या राज्याचा नाश करण्याकरिता व लोकाच्या कल्याणाकरिता मी सिंधुतटीं काष्ठरूपी व पाषाणरूपी झालों. इतक्यात राजा इंद्रद्युम्नही स्वर्गलोकाहून आला ८९-९१. त्यानें माझें मंदिर बांधिले असता मी तेथे प्राप्त झालों व हे यज्ञांशा, मी आता येथें राहिलो आहें. येथील प्रसादाचा फार मोठा महिमा आहे. असो; सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या व मोक्ष देणाऱ्या माझी त्यानें लोकामध्यें स्थापना केली आहे. या ठिकाणीं वेदधर्म किंवा वर्णधर्म यातील कांहींही नाही ९२,९३. हे यज्ञांशा, येथून चोहोंकडे एक योजनभर व्रतही निरुपयोगी आहे. ज्याने यावनी भाषा उच्चारिली आहे व ज्यानें बुद्धाचे दर्शन घेतलें आहे त्याला मोठें पाप लागत असतें. पण त्या पापाचा नाश करणारा मी येथें स्थित आहें. कलिकालामध्यें माझें दर्शन घेतल्याने मनुष्य शुद्ध होईल ९४,९५. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युं ० प्रतिस ० कालियु ० चतुर्थखंडातील जगन्नाथाच्या चरित्राविषयीं विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥

सूत ह्मणतातः— त्या बुद्धिमान् जगन्नाथाचे वचन ऐकून ज्याची बुद्धि प्रसन्न आहे असा कृष्णचैतन्यही त्यास ह्मणाला " हे भगवन् हे महामुने, प्राण्यांचें कल्याण ह्मणून जें आपण मला सांगितलें तें विस्ताराने सांगा ह्मणजे बौद्धाची उत्पत्ति कशी झाली तें मला सांगा १,२. जगन्नाथ ह्मणतातः— कलियुग लागून सहस्र वर्षे झालीं असता भारतनामक कर्मभूमीमध्ये श्रेष्ठ मुनि कश्यपपुत्र कण्व तेथें प्राप्त झाला ३. देवकन्या आर्यावती त्या कण्वाची

वर्षमात्रान्तरे देवी प्रसन्ना समुपागता । आर्यसृष्टिसमृद्धौ सा ददौ तस्मै वरं शुभम् ६ दशपुत्रास्तयोर्जाता आर्यबुद्धिकरा हि ते । उपाध्यायो दीक्षितश्च पाठकः शुक्लमिश्रकौ ७ अग्निहोत्री द्विवेदी च त्रिवेदी पाण्ड एव च । चतुर्वेदीति कथिता यथा नाम तथा गुणाः ८ ते वै सरस्वतीं देवीं तुष्टुवुर्नम्रकन्धराः । द्वादशाब्दवयोभ्यश्च तेभ्यो देवी स्वशक्तितः ९ कृत्वा कन्या ददौ माता शारदा भक्तिवत्सला । उपाध्यायी दीक्षिता च पाठकी शुक्लिका क्रमात् १० मिश्राणी च तथा ज्ञेया षष्ठी सा चाग्निहोत्रिणी । द्विवेदिनी तथा ज्ञेया चाष्टमी च त्रिवेदिनी ११ पाण्डायनी च नवमी दशमी तुर्यवेदिनी । तासां च स्वपतिभ्यो वै सुताः षोडश षोडश १२ ते तु गोत्रकरा ज्ञेयास्तेषां नामानि मे शृणु । कश्यपश्च भरद्वाजो विश्वामित्रोऽथ गौतमः १३ जमदग्निर्वसिष्ठश्च वत्सो गौतम एव च । पराशरस्तथा गर्गोऽत्रिर्भृगुश्चाङ्गिरास्तथा १४ शृङ्गी कात्यायनश्चैव याज्ञवल्क्य क्रमात्सुताः एभिर्नाम्ना सुतास्सर्वे ज्ञेया षोडश षोडश १५ सरस्वत्याज्ञया कण्वो मिश्रदेशमुपायथौ । म्लेच्छान्संस्कृतमाभाष्य तदा दशसहस्रकान् १६ वशीकृत्य स्वयं प्राप्तो ब्रह्मावर्ते महोत्तमे । ते सर्वे तपसा देवीं तुष्टुवुश्च सरस्वतीम् १७ पञ्चवर्षान्तरे देवी प्रादुर्भूता सरस्वती । सपत्नीकांश्च तान्म्लेच्छान्भूद्रवर्णांश्च चाकरोत् १८ कारवृत्तिकरास्तस्मै बभूवुर्बहुपुत्रकाः । द्विसहस्रास्तदा तेषां मध्ये वैश्या बभूविरे १९ तन्मध्ये चाचार्य पृथुर्नाम्ना कश्यपसेवकः । तपसा स च तुष्टाव द्वादशाब्दं महामुनिम् २० तदा प्रसन्नो भगवान्कण्वो देववरादूरः । तेषां

प्रिय पत्नी होती. इंद्राच्या आज्ञेनें तें दापत्य सरस्वतीच्या तटाकीं प्राप्त झालें ४. आणि नम्रबुद्धि कण्वानें कुरुक्षेत्रामध्यें असलेल्या नदीरूपी सरस्वतीस चतुर्वेदमय स्तोत्रांनीं स्तविलें ५. याप्रमाणें एक वर्ष होत आहे तोंच ती प्रसन्न झालेली देवी तेथें प्राप्त झाली व आर्यसृष्टीच्या समृद्धीविषयीं तिनें त्यास शुभ वर दिला ६. त्या दापत्यास दहा पुत्र झाले. ते सर्वही आर्यबुद्धीनें युक्त होते. उपाध्याय, दीक्षित, पाठक, शुक्ल, मिश्र, अग्निहोत्री, द्विवेदी, त्रिवेदी, पाड व चतुर्वेदी हीं त्यांचीं नांवें असून जशीं त्यांचीं नावें तसेच त्यांचे गुणही होते ७,८. आपल्या माना लववून त्यांनीं सरस्वती देवीची स्तुति केली. तेव्हा बारा वर्षांच्या वयानें युक्त असलेल्या त्यास देवीनें स्वशक्तीनें कन्या निर्माण करून दिल्या. कारण, ती शारदामाता भक्तिवत्सल होती. उपाध्यायी, दीक्षिता, पाठकी, शुक्लिका, मिश्राणी, तशीच सहावी अग्निहोत्रिणी, द्विवेदिनी, त्याचप्रमाणें आठवी त्रिवेदिनी, नववी पाडायनी व दहावी तूर्यवेदिनी, अशा त्या कन्या क्रमानें होत्या. त्यास त्यांच्या त्यांच्या पतीपासून सोळा सोळा पुत्र झाले ९–१२. ते सर्वही गोत्रकर होते असें समजावें. त्यांचीं नावें मी सांगतों तीं ऐक. कश्यप, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि, वसिष्ठ, वत्स, गौतम, पराशर, त्याचप्रमाणें गर्ग, अत्रि, भृगु, अंगिरा, शृंगी, कात्यायन व याज्ञवल्क्य अशीं त्या पुत्रांचीं क्रमानें नावें होतीं. ते सर्वही सोळा सोळा पुत्र याच नावाचे होते असें समजावें १३–१५. सरस्वतीच्या आज्ञेनें कण्व मिश्र देशास आला व दहा सहस्र म्लेच्छांस संस्कृत वाणीनें आपल्या वश करून तो स्वतः अत्युत्तम ब्रह्मावर्तास आला. नंतर त्या सर्वांनीं तपाच्या योगानें सरस्वती देवीची स्तुति केली. पाच वर्षांनीं ती देवी सरस्वती प्रकट झाली; व तिनें पत्नीसहवर्तमान त्या सर्व म्लेच्छांस शूद्र वर्णाचें केलें १६ १८. ते सर्वही कारागिरीवर आपले उदरनिर्वाह करूं लागले. त्यांस पुष्कळ पुत्र झाले. त्यांपैकीं दोन सहस्र वैश्य झाले १९. हे आचार्या, त्यांच्यापैकीं पृथु या नांवाच्या एका कश्यपाच्या सेवकानें तपश्चर्येच्या योगानें बारा वर्षें त्या महामुनीची स्तुति केली २०. तेव्हा तो भगवान् कण्व प्रसन्न झाला व देवांच्या वरानें श्रेष्ठ झालेल्या

चकार राजानं राजपुत्रपुरं ददौ २१ राजन्या नाम तत्पत्नी मागधं सुषुवे तदा । तस्मै कण्वो ददौ ग्रामं पूर्वस्यां दिशि मागधम् २२ स्वर्गलोकं पुनः प्राप्तः स मुनिः कश्यपात्मजः । स्वर्गते काश्यपे विप्रे ते म्लेच्छाः शूद्रवर्णकाः २३ यज्ञैस्समर्चयामासुर्देवदेवं शचीपतिम् । दुःखितो भगवानिन्द्रस्तद्बन्धुर्जगतीतले २४ वेदान्महर्तुमिच्छन्तो ब्रह्मयोनौ बभूविरे । जिनो नाम द्विजः कश्चित्तत्पत्नी जयनी स्मृता २५ कश्यपाददितेरंशाज्जातौ तौ कीकटस्थले। तयोस्सकाशात्सञ्जाता आदित्या लोकहेतवे २६ कर्मनाशा नदीतीरे पुरी बोधगया स्मृता। तत्रोष्य बौद्धशास्त्राढ्याश्चक्रुः शास्त्रार्थमुत्तमम् २७ वेदाञ्जहृद्रेभ्य आहृत्य विशालां प्रययुः पुरीम् । समाधिस्थान्मुनीन्सर्वान्समुत्थाप्य ददुः स्वयम् २८ गतास्सर्वे सुराः स्वर्गे ततःप्रभृति भूतले । म्लेच्छा बभूविरे बौद्धास्तदन्ये वेदतत्पराः २९ सरस्वत्याः प्रभावेन त आर्या बहवोऽभवन् । तैश्च देवपितृभ्यश्च हव्यं कव्यं समर्पितम् ३० तृप्तिमन्तः सुरास्त्रासस्त आर्याणां सहस्रकाः । सप्तविंशच्छते भूमौ कलौ सवत्सरे गते ३१ बलिना प्रेषितो भूमौ मयः प्राप्तो महासुरः । शाक्यसिंहगुरुर्गेयो बहुमायाप्रवर्तकः ३२ स नाम्ना गौतमाचार्यो दैत्यपक्षविवर्द्धकः । सर्वतीर्थेषु तेनैव यन्त्राणि स्थापितानि वै ३३ तेषामधो गता ये तु बौद्धाश्चासन्समन्ततः । शिखासूत्रविहीनाश्च बभूवुर्वर्णसंकराः ३४ दशकोट्यः स्मृता आर्या बभूवुर्बौद्धपन्थिनः । पञ्चलक्षास्तदा शेषाः प्रययुर्गिरिमूर्द्धनि ३५ चतुर्वेदप्रभावेन राजन्या ब्रह्मवंशजाः । चत्वारिंशभवा योधास्तैश्च बौद्धास्समुज्झिताः ३६ आर्यास्तांस्ते तु संस्कृत्य विन्ध्यार्द्रेर्दक्षिणे

त्यानें त्यास क्षत्रिय केलें व राजपुत्रनगर दिलें २१. तेव्हा राजन्यानामक जी त्याची पत्नी होती तिला मगध ह्मणून पुत्र झाला. त्यास कण्वानें पूर्वेदिशेंतील मागध ग्राम दिला २२. नंतर तो कश्यपपुत्र कण्व मुनि पुनः स्वर्गलोकीं आला. पण हा कश्यप ब्राह्मण स्वर्गलोकीं गेला असता ते शूद्रवर्णाचे म्लेच्छ पुनः यज्ञाच्या योगानें देवाधिदेव इंद्राची पूजा करूं लागले. तेव्हा भगवान् इंद्र आपल्या बांधवासहवर्तमान दुःखित झाला. वेदाचें हरण करण्याची इच्छा करून ते भूलोकीं आले व ब्राह्मणयोनीमध्यें निर्माण झाले. जिन या नांवाचा कोणी एक ब्राह्मण होता त्याची जयनी ह्मणून पत्नी होती. कश्यप व अदिति याच्या अंशापासून तीं दोघें कीकटस्थलीं निर्माण झालीं होतीं. त्याच्यापासून लोककल्याणाकरिता आदित्य निर्माण झाले. कर्मनाशा नदीच्या तीरीं बोधगया ह्मणून एक नदी आहे. तेथें राहून बौद्धशास्त्रामध्यें परिपूर्ण असलेले ते उत्तम शास्त्रार्थ करूं लागले २३–२७. नंतर शूद्रापासून वेदाचें हरण करून ते विशालानगरीस गेले; व समाधिस्थ असलेल्या सर्व मुनींस उठवून त्यानीं ते वेद त्यास दिले २८. नंतर ते सर्वही देव स्वर्गलोकीं गेले. तेव्हापासून भूलोकीं बौद्ध म्लेच्छ झाले व त्याच्यावाचून जे होते ते सर्व सरस्वतीच्या प्रभावानें वेदामध्यें तत्पर राहून आर्य झाले. त्यानीं देव व पितर यांस हव्य व कव्य समर्पण केलें २९,३०. त्यामुळें देव तृप्तियुक्त झाले व आर्यही लक्षावधि झाले. भूलोकीं कलि लागून सत्तावीसशें वर्षें निघून गेलीं असता ३१ बलीनें ज्याला पाठविलें आहे असा महाअसुर मय भूलोकीं प्राप्त झाला. तो अनेक प्रकारच्या मायेस उत्पन्न करणारा असून शाक्यसिंह गुरु असें त्यास ह्मणत असत. पण गौतमाचार्य या नावानें तो प्रसिद्ध होता. तो दैत्यपक्षाची वृद्धि करीत असे. त्यानें सर्व तीर्थामध्यें यंत्रें स्थापिलीं ३२,३३ व त्याच्या खालून जे जात ते सर्वही चोहोंकडे बौद्ध होत. तात्पर्य, ते शिखासूत्रहीन होऊन वर्णसंकर पावले ३४. दहा कोटि आर्य बौद्धपंथी झाले असें सांगितलें आहे. तेव्हा बाकी राहिलेले पाच लक्ष आर्य पर्वतावर निघून गेले ३५. चार वेदाच्या प्रभावाने ब्रह्मवंशामध्यें चाळीस राजे झाले. ते सर्वही योद्धे होते. त्यानीं बौ-

कृतान् । तत्रैव स्थापयामासुर्वर्णरूपान्समन्ततः ३७ आर्यावर्तः पुण्यभूमिस्तत्रस्थाः पञ्चलक्षकाः ॥
सूत उवाच ॥ इति श्रुत्वा वचस्तस्य यज्ञांशो भगवान्हरिः ३८ जगन्नाथस्य शिष्योऽभूद्वेदमार्ग-परायणः । शुक्लदत्तस्य तनयो नित्यानन्दो द्विजोत्तमः ३९ जगन्नाथपदं नत्वा शिष्यो भूत्वा रराज ह । तदा प्रसन्नो भगवाननिरुद्ध उषापतिः ४० अभिषेकं तयोर्भाले महत्त्वत्वे चकार ह । महत्त्वपदवी जाता तदापभृति भूतले ४१ गुरुबन्धू प्रसन्नौ तौ स्वशिष्यान्प्रोचतुर्मुदा । जगन्नाथस्य वदन पद्मनाभेरुषापतेः ४२ दृष्ट्वा यश्चात्र सम्भाष्य स वै स्वर्गमवाप्नुयात् । प्रसाद यश्च भुक्षीयात्तस्य देवस्य सादरम् ४३ कोटिजन्म भवेद्विप्रो वेदपात्रो महाधनी । मार्कण्डेयवटे कृष्णं दृष्ट्वा स्नात्वा महोदधौ ४४ इन्द्रद्युम्नसरस्येव न पुनर्जन्म विद्यते । इमां गाथां शृणुयो वै श्रद्धाभक्तिसमन्वितः ४५ यज्ञांशगमने पुण्य फलं तच्छीघ्रमाप्नुयात् । इति यज्ञांशवचनं श्रुत्वा स ह्यवतारकः ४६ वैष्णवाश्च तथेत्युक्त्वा तत्रैवान्तरधीयत । एतस्मिन्नन्तरे विप्र कलिना प्रार्थितो बलिः ४७ मयदैत्यं समाहूय वचन प्राह दुःखितः ॥ सुकन्दरो म्लेच्छपतिः सदा मद्वृद्धने रतः ४८ सहायं तस्य दैत्येन्द्र कुरु शीघ्रं ममाज्ञया । इति श्रुत्वा बलेर्वाक्यं शतदैत्यसमन्वितः ४९ कर्मभूम्यां मयः प्राप्तः कलविद्याविशारदः ॥ म्लेच्छजातीन्नरान्दुष्टान्रेखागणितमुत्तमम् ५० एकविंशतिमध्यायं कलवेदमशिक्षयत् । तदा कलान्विता म्लेच्छाः कलाविद्याविशारदाः ५१ यन्त्राणि कारयामासुः सप्तस्वेव पुरीषु च । तदधो ये गता लोकास्ते सर्वे म्लेच्छतां गताः ५२ महत्कोलाहल जातमा-

---

द्धाचा उच्छेद करून टाकिला ३६. जे आर्य होते त्यास संस्कारयुक्त करून त्यानीं विध्याद्रीच्या दक्षिणेस नेलें व वर्णरूप अशा त्याची चोहोंकडे स्थापना केली ३७. आर्यावर्त ही पुण्यभूमी होय व तेथें पाच लक्ष आर्य होते. सूत ह्मणतातः—हें वचन ऐकून भगवान् हरि यज्ञांश त्या जगन्नाथाचा वेदमार्गामध्यें परायण असलेला शिष्य झाला. शुक्लदत्ताचा नित्यानंदनामक जो पुत्र होता तो जगन्नाथाच्या चरणास नमस्कार करून त्याचा शिष्य झाला व त्यामुळें तो उत्तम ब्राह्मण शोभूं लागला. तेव्हा प्रसन्न झालेला भगवान् उषापति अनिरुद्ध त्याच्या मस्तकावर अभिषेक करून त्यास महत्त्वयुक्त करिता झाला. तेव्हापासून भूलोकीं महत्त्व ही पदवी प्रचलित झाली ३८-४१. तेव्हा प्रसन्न झालेले ते गुरुबंधु आपल्या शिष्यास आनंदानें ह्मणाले 'पद्मनाभ जो उषापति जगन्नाथ त्याचें मुख जो कोणी येथें येऊन पाहील त्याला सर्वप्राप्ति होईल. त्या देवाचा प्रसाद जो कोणी मोठ्या आदराने भक्षण करील ४२, ४३ तो एक कोटि जन्मपर्यंत वेदपात्र व महाधनिक ब्राह्मण होईल. मार्कंडेयवटवृक्षावर कृष्णाचे दर्शन घेऊन सागरासारख्या इंद्रद्युम्न सरोवरामध्यें स्नान केल्यानें पुनः जन्म घ्यावा लागत नाहीं. ही गाथा जो कोणी श्रद्धा व भक्ति यांनीं युक्त होऊन श्रवण करील त्यास जगन्नाथपुरीत जाण्यात जें पुण्यफल आहे तें तात्काल प्राप्त होईल' हें यज्ञांशाचें वचन ऐकून तो अवताररूप देव व विष्णुभक्त "तथास्तु" असें ह्मणून तेथेंच गुप्त झाले. इतक्यामध्यें हे ब्राह्मणा, कलीनें ज्याची प्रार्थना केली आहे असा बलि, मय दैत्यास बोलावून अतिदुःखी होत्साता असें वचन बोलला "सुकंदर म्लेच्छपति सर्वदा माझी वृद्धि करण्यामध्यें तत्पर आहे ४४-४८. यास्तव, हे दैत्यश्रेष्ठा, माझ्या आज्ञेनें तूं त्यास शीघ्र साहाय्य कर." असें बलीचें वाक्य ऐकून कलाविद्येमध्ये निपुण असलेला मय शंभर दैत्यासहवर्तमान कर्मभूमीमध्यें आला व त्यानें म्लेच्छजातीच्या दुष्ट पुरुषास उत्तम रेखागणित शिकविलें. त्याचे एकवीस अध्याय असून त्यास कलवेद असे ह्मणत. तेव्हां सर्वही म्लेच्छ कलायुक्त व कलाविद्येमध्यें निपुण झाले ४९-५१. सातही नगरामध्यें त्यानीं यंत्रें करविलीं व त्याच्याखालून जे लोक गेले ते सर्व म्लेच्छत्वास प्राप्त

र्णां शोककारिणाम् । श्रुत्वा ते वैष्णवाः सर्वे कृष्णचैतन्यसेवकाः ५३ दिव्यमन्त्रं गुरोश्चैव पठित्वा प्रययुः पुरीः । रामानन्दस्य शिष्यो वै चायोध्यायामुपागतः ५४ कृत्वा विलोमं तं मन्त्र वैष्णवांस्तानकारयत् । भाले त्रिशूलचिह्नं च श्वेतरक्तं तदाऽभवत् ५५ कण्ठे च तुलसीमाला जिह्वा राममयी कृता । म्लेच्छास्ते वैष्णवाश्चासन्रामानन्दप्रभावतः ५६ संयोगिनश्च ते ज्ञेया रामानन्दमते स्थिताः । आर्याश्च वैष्णवा मुख्या अयोध्यायां बभूविरे ५७ निम्बादित्या गतो धीमान्सशिष्य काञ्चिकां पुरीम् । म्लेच्छयन्त्रं राजमार्गे स्थितं तत्र ददर्श ह ५८ विलोमं स्वगुरोर्मन्त्रं कृत्वा तत्र स चावसत् । वंशपत्रसमा रेखा ललाटे कण्ठमालिका ५९ गोपीवल्लभमन्त्रो हि मुखे तेषां रराज ह । तदधो ये गता लोका वैष्णवाश्च बभूविरे ६० म्लेच्छाः संयोगिनो ज्ञेया आर्यास्तन्मार्गवैष्णवाः । विष्णुस्वामी हरिद्वारे जगाम स्वगणैर्वृतः ६१ तत्र स्थितं महायन्त्रं विलोमं तच्चकार ह । तदधो ये गता लोका आसन्सर्वे च वैष्णवाः ६२ ऊर्ध्वपुण्ड्रद्विरेखाभं तन्मध्ये बिन्दुरुत्तमः । ललाटे च स्थितं तेषां कण्ठे तुलसिगोलकम् ६३ मुखे माधवमन्त्रश्च बभूव हितदायकः । मथुरायां समायातो मध्वाचार्यो हरिप्रिय. ६४ राजमार्गे स्थित यन्त्र विलोम स चकार ह । तदधो ये गता लोका वैष्णवास्तस्य पक्षगाः ६५ करवीरपत्रसदृश ललाटे तिलकं शुभम् । स्थितं नासार्द्धभागान्ते कण्ठे तुलसिमालिका ६६ राधाकृष्णशुभ नाम मुखे तेषां बभूव ह । शंकराचार्य एवापि शैवमार्गपरायणः ६७ रामानुजाज्ञया प्राप्तः पुरीं काशीं गणैर्युतः । कृत्वा विलोम तद्यन्त्रं शैवाश्च तदधोऽभवन् ६८ त्रिपुण्ड्रं च स्थित भाले

झाले ५२. त्या वेळीं शोक करणाऱ्या आर्यांचा मोठा कोलाहल झाला ! तो ऐकून कृष्णचैतन्याचे सर्व विष्णुभक्त सेवक गुरूपासून दिव्य मंत्र घेऊन त्या नगरामध्ये आले. रामानंदाचा शिष्य अयोध्येमध्ये आला ५३,५४. तेथील सर्वांस तो मंत्र देऊन त्यानें वैष्णव करविले. त्याच्या मस्तकावर शुभ्र व रक्तवर्ण असें त्रिशूल चिन्ह, कंठामध्ये तुलसीची माला व तोंडात राममय अक्षरें राहिलीं. ते म्लेच्छ रामानंदाच्या प्रभावानें वैष्णव झाले. पण रामानंदाच्या मतामध्यें स्थित असलेले ते सर्वही संयोगी होत असें जाणावें. व अयोध्येमधें जे मुख्य आर्य होते ते वैष्णव झाले ५५–५७. बुद्धिमान् निंबादित्य शिष्यासह काचीनगरीस गेला. तेथें राजमार्गामध्यें म्लेच्छांचें यंत्र आहे असें पाहून व आपल्या गुरूच्या मंत्रानें तें विलोम करून तो तेथेंच राहिला. त्या यंत्राच्या खालून जे लोक गेले ते वैष्णव झाले व ज्यांच्या ललाटावर वेळूच्या पानासारखी रेखा, कंठामध्यें माला व मुखामध्यें गोपीवल्लभमंत्र आहे असे ते शोभू लागले ५८-६०. त्यामध्यें जे म्लेच्छ होते ते संयोगी व जे आर्य होते ते त्यांच्या मार्गाचे वैष्णव असें समजावें. विष्णुस्वामी आपल्या शिष्यसमुदायानें परिवेष्टित होत्साता हरिद्वारीं गेला. तेथें असलेलें जें मोठें यंत्र त्यास त्यानें व्यर्थ करून सोडिलें. त्यामुळें त्याच्या खालून जे लोक गेले ते सर्वही वैष्णव झाले. त्याच्या मस्तकावर दोन रेखाचा चमकणारा ऊर्ध्व पुंड्र व त्यामध्यें उत्तम तिलक, कंठामध्यें तुलसीच्या मण्याची माला व मुखामध्ये हितकारक माधवमंत्र सतत राहिला. हरिप्रिय मध्वाचार्य मथुरेमध्ये आला ६१—६४. राजमार्गामध्यें जें यंत्र होते त्याचा प्रभाव त्याने उलटून सोडिला. त्यामुळे त्याच्या खालून जे लोक गेले ते त्याच्या पक्षाचे वैष्णव झाले ६५. त्याच्या मस्तकावर कल्हारीच्या पानासारखा नासिकेच्या अर्ध्या भागापर्यंत आलेला शुभ तिलक, कंठामध्यें तुलसीची माला व मुखामध्यें राधाकृष्ण हें शुभ नाम राहिलें. शैवमार्गामध्यें परायण असलेला शंकराचार्यही आपल्या शिष्यगणासहवर्तमान रामानुजाच्या आज्ञेनें काशीनगरास आला व म्लेच्छांचें यंत्र निष्फळ करून टाकिल्यामुळें त्याच्या खालून जाणारे शैव झाले ६६-६८.

कण्ठे रुद्राक्षमालिका । गोविन्दमन्त्रश्च मुखे तेषां तत्र बभूव ह ६९ तोतादर्यां च समासस्तदा रामानुजः सुखी । ऊर्ध्वरेखाद्वयोर्मध्ये सूक्ष्मरेखा च पीतका ७० ललाटे तु तथा कण्ठे माला तुलसिका शुभा । उज्जयिन्यां च संप्राप्तो वराहमिहरो गुणी ७१ तद्यन्त्र निष्फलं कृत्वा नराञ्छैवाँश्चकार ह । चिताभस्म स्थितं भाले कण्ठे रुद्राक्षमालिका ७२ शिवेति मङ्गलं नाम तेषां तत्र बभूव ह । कन्याकुब्जे स्वयं प्राप्तो वाणीभूषण एव हि ७३ अर्धचन्द्राकृति पुण्ड्रं रक्तचन्दनमालिका । देव्याश्च निर्मलं नाम तेषां तत्र बभूव ह ७४ धन्वन्तरिः प्रयागे च गत्वा तद्यन्त्रमुत्तमम् । विलोमं कृतवाँस्तत्र तदधो ये गता नराः ७५ अर्द्धं पुण्ड्रं स्मृतं रक्तं सबिन्दु च ललाटके । रक्तचन्दनजा माला कण्ठे तेषां बभूव ह ७६ भट्टोजिः स गतो धीमानुत्पलारण्यमुत्तमम् । त्रिपुण्ड्रं च तथा रक्तं कण्ठे रुद्र क्षमालिका ७७ विश्वनाथेति तन्मन्त्रं तेषां तत्र बभूव ह । रोपणश्चेष्टिकां प्राप्तस्तद्यन्त्रं चैव निष्फलम् ७८ कृत्वा जने जने तत्र ब्रह्ममार्गं ददर्श ह । जयदेवः स्वयं प्राप्तो द्वारकां विष्णुभक्तिमान् ७९ तद्यन्त्रं निष्फल यात तदधो ये गता नराः । रक्तरेखा स्थिता भाले चैका कण्ठे तु मालिका ८० पद्माक्षा मन्त्रगोविन्दस्तत्र तेषां बभूव ह । एवं ते वैष्णवाः शैवाः शाक्तिका बहुधाऽभवन् ८१ निर्गुणाः शाक्तिका ज्ञेयाः सगुणा वैष्णवाः स्मृताः । निर्गुणाः सगुणा ये तु शैवा ज्ञेया बुधैस्तदा ८२ समाधिस्थास्त्वयस्ते देवाः पुण्या बभूविरे । नित्यानन्दः शान्तिपुरे नदीहापत्तने हरिः ८३ कबीरो मागधे देशे रैदासस्तु कलिञ्जरे । सधनो नैमिषारण्ये समाधिस्थो बभूव ह ८४ अद्यापि संस्थितो विप्र वैष्णवानां गणो महान् । यज्ञ-

---

व त्याच्या भालप्रदेशीं त्रिपुंड्र, कंठामध्यें रुद्राक्षमाला व मुखांमध्यें गोविंदमंत्र सतत राहिला ६९. सुखी रामानंद त्या वेळीं तोतादरीमध्यें आला. तेव्हा तेथील लोकाच्या मस्तकावरील दोन ऊर्ध्व रेखांमध्यें एक बारीक पिवळी रेखा व कंठामध्यें तुलसीची शुभ माला दिसू लागली. गुणी वराहमिहर उज्जयिनीमध्यें प्राप्त झाला व तें यंत्र निष्फल करून तेथील लोकास त्यानें शैव केलें. त्यामुळें त्याच्या मस्तकावर चिताभस्म, कंठामध्यें रुद्राक्षाची माला व तोंडामध्यें शिव हें मंगल नाम आलें. कान्यकुब्जामध्यें स्वतः वाणीभूषण प्राप्त झाला ७०–७३. त्यामुळें लोकाच्या मस्तकावर अर्धचंद्राकृति पुंड्र, रक्तचंदनाची माला व मुखामध्यें देवीचें निर्मल नाम प्राप्त झालें ७४. धन्वंतरि प्रयागामध्यें गेला व तें उत्तम यंत्र निष्फल करून त्याच्या खालून जे शिष्य गेले त्यास आपले शिष्य करिता झाला ७५. त्याच्या मस्तकावर रक्तबिंदुयुक्त अर्धपुंड्र व गळ्यामध्यें रक्तचंदनाची माला होती ७६. बुद्धिमान् भट्टोजि उत्तम उत्पलारण्यास गेला. तेव्हा तेथील लोकाच्या मस्तकावर लाल त्रिपुंड्र, गळ्यामध्यें रुद्राक्षमाळा व मुखामध्यें विश्वनाथ हा मंत्र सर्वत्र झाला. रोपण चेष्टिकेत आला. त्याने ते यंत्र निष्फळ करून सोडिलें व तेथील प्रत्येक मनुष्यास त्यानें ब्रह्ममार्ग दाखविला. विष्णुभक्तीनें युक्त असलेला जयदेव स्वतः द्वारकेस आला ७७–७९. त्याबरोबर तें यंत्र निष्फल झालें व त्याच्या खालून जे पुरुष गेले त्याच्या मस्तकावर एक लाल रेखा, गळ्यामध्यें पद्माक्षाची माळा व मुखामध्यें गोविंद हा मंत्र सर्वत्र झाला. याप्रमाणें ते अनेक प्रकारचे वैष्णव, शैव व शाक्त झाले. जे शक्तिभक्त होते ते निर्गुण आहेत असें जाणावें. वैष्णवास सगुण म्हटलें आहे व जे सगुण व निर्गुणही होत ते शैव होत असें शहाण्यानीं समजावें ८०–८२. पुढें समाधीमध्यें ते पुण्यवान् तेहेतीस देव समाधिस्थ झाले. नित्यानंद शांतिपुरामध्यें, हरि नदीह्यपत्तनामध्यें, कबीर मागधदेशामध्यें, रैदास कलिंजरामध्यें व सधन नैमिषारण्यामध्यें समाधिस्थ झाला ८३,८४. हे ब्राह्मणा, वैष्णवांचा मोठा समुदाय अजूनही आहे. मेरुपर्वतावर यज्ञ-

भागमहावृद्धिः संजाता मेरुमूर्धनि ८५ इति ते कथितं विप्र यज्ञांशचरितं शुभम् । यच्छ्रुत्वा च नरा नार्यो महत्पुण्यमवाप्नुयुः ८६ मयाद्या निष्फला दैत्या बलिपार्श्वमुपागताः ८७ [५५७९] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये कृष्णचैतन्यचरित्रं नामैकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥

सूत उवाच ॥ इति श्रुत्वा बलिर्दैत्यो देवानां विजयं महत् । रोषणं नाम दैत्येन्द्रं समाहूयेदं वचोऽब्रवीत् १ सुतस्तिमिरलिङ्गस्य सरुषो नाम विश्रुतः । त्वं हि तत्र समागम्य दैत्यकार्यं महत्कुरु २ इति श्रुत्वा स वै दैत्यो हृदि विप्रान्तरोषणः । ननाश वेदमार्गस्थान्देहलीदेशमास्थितः ३ पञ्चवर्षं कृतं राज्यं तत्सुतो बाबरोऽभवत् । विंशदब्दं कृतं राज्यं होमायुस्तत्सुतोऽभवत् ४ होमायुषा मदान्धेन देवताश्च निराकृताः । ते सुराः कृष्णचैतन्य नदीहोपवने स्थितम् ५ तुष्टुवुर्बहुधा तत्र श्रुत्वा क्रुद्धो हरिः स्वयम् । स्वतेजसा च तद्राज्यं विघ्नभूतं चकार ह ६ तत्सैन्यजनितैर्लोकैर्होमायुश्च निराकृतः । माहाराष्ट्रैस्तदा तत्र शेषशोकैः समास्थितः ७ देहलीनगरे रम्ये म्लेच्छो राज्यं चकार ह । धर्मकार्यं कृतं तेन तद्राज्यं पञ्चहायनम् ८ ब्रह्मचारी मुकुन्दश्च शंकराचार्यगोत्रजः । प्रयागे च तपः कुर्वन्विंशच्छिष्यैर्युतः स्थितः ९ बाबरेण च धूर्तेन म्लेच्छराजेन देवताः । अंशिताः स तदा ज्ञात्वा वह्नौ देहं जुहाव वै १० तस्य शिष्या गता वह्नौ म्लेच्छनाशनहेतुना । गोदुग्धे च स्थितं रोम पीत्वा स पयसा मुनिः ११ मुकुन्दस्तस्य दोषेण

भागाची फार मोठी वृद्धि झाली ८५. हे ब्राह्मणा, मीं तुला याप्रमाणें यज्ञांशाचें शुभ चरित्र सांगितलें. हें ऐकल्यानें स्त्रीपुरुषांस मोठें पुण्य लागतें ८६. असो; मयादिक निष्फल झालेले दैत्य बलीकडे आले ८७. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्यु० प्रतिस० कलियु० चतुर्थखंडातील कृष्णचैतन्याच्या चरित्राविषयीं एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥

सूत ह्मणतातः— याप्रमाणें देवाचा मोठा विजय झाला आहे असें ऐकून बलि दैत्य रोषणनामक श्रेष्ठ दैत्यास बोलावून ह्मणाला १ " तूं तिमिरलिंगाचा सरुषनामक प्रसिद्ध पुत्र होऊन जा व दैत्यांचें मोठें कार्य कर. " हें ऐकून ज्याच्या मनामध्यें अतिशय क्रोध आला आहे असा तो दैत्य देहलीदेशामध्यें राहून वेदमार्गस्थ लोकांचा नाश करिता झाला २,३. त्यानें पांच वर्षं राज्य केलें. त्यानंतर त्याला बाबर ह्मणून पुत्र झाला. त्यानें वीस वर्षं राज्य केलें. त्याला होमायु ह्मणून पुत्र होता ४. त्या मदांध होमायूनें देवतांचें निराकरण केलें असतां ते देव नदीह उपवनामध्यें असलेल्या कृष्ण चैतन्याची नानाप्रकारें स्तुति करूं लागले. व ती ऐकून स्वतः हरि रागावला. त्यानें आपल्या तेजानें तें राज्य विघ्नरूप करून सोडिलें ५,६. त्याच्या सैन्यातील लोकांनींच होमायूचें निराकरण केलें. तेव्हां महाराष्ट्रीयांनीं तेथें शेषशाकाची स्थापना केली असतां तो म्लेच्छ त्या रम्य देहलीनगरात राज्य करिता झाला. त्यानें धर्मकार्य केलें व त्यामुळे त्याचें राज्य पांच वर्षं चाललें. पण इकडे प्रयागामध्यें शंकराचार्याच्या गोत्रामध्यें उत्पन्न झालेला मुकुंदनामक ब्रह्मचारी वीस शिष्यांनीं युक्त होऊन तप करीत राहिला होता. त्यास बाबरनामक धूर्त म्लेच्छराजानें देवतांस भ्रष्ट केलें आहे असें समजताच त्यानें आपला देह अग्नीमध्यें समर्पण केला. म्लेच्छांनीं केलेल्या नाशामुळें त्याचे शिष्यही अग्नीमध्यें प्रविष्ट झाले. पण एकदां गाईच्या दुधामध्यें असलेला एक केस दुधाबरोबर त्या मुनीच्या पोटात गेला. तेव्हा त्या दोषामुळें मुकुंद काश्मीरामध्यें असलेल्या होमायूच

म्लेच्छयोनौ बभूव ह । होमायुषश्च काश्मीरे संस्थितस्यैव पुत्रकः १२ जातमात्रे सुते तस्मिन्नाकाशवाणी शरीरिणी । अकस्माच्च वरो जातः पुत्रोऽयं सर्वभाग्यवान् १३ पैशाचे दारुणे मार्गे न भूतो न भविष्यति । अतः सोऽकबरो नाम होमायुस्तनयस्तव १४ श्रीधरः श्रीपतिः शम्भुर्वरेण्यश्च मधुव्रती । विमलो देववान्सोमो वर्द्धनो वर्तको रुचिः १५ मान्धाता मानकारी च केशवो माधवो मधुः । देवापिः सोमपाः सूरो मदनो यस्य शिष्यकाः १६ स मुकुन्दो द्विजः श्रीमान्दैवात्त्वद्गृहमागतः । इत्याकाशवचः श्रुत्वा होमायुश्च प्रसन्नधीः १७ ददौ दानं क्षुधार्तेभ्यः प्रेम्णा पुत्रमपालयत् । दशाब्दे तनये जाते देहलीदेशमागत १८ शेषशाकं पराजित्य स च राजा बभूव ह । अब्दं तेन कृतं राज्यं तत्पुत्रश्च नृपोऽभवत् १९ सप्तसप्तकबरे राज्यं सप्त शिष्याश्च तत्रियाः । पूर्वजन्मनि ये मुख्यास्ते प्राप्ता भूपतिं प्रति २० केशवो गानसेनश्च वैजवाक्स तु माधवः । म्लेच्छास्ते च स्मृतास्तत्र हरिदासो मधुस्तथा २१ मध्वाचार्यकुले जातो वैष्णवः सर्वरागवित् । पूर्वजन्मनि देवापिः स च वीरबलोऽभवत् २२ ब्राह्मणः पाश्चिमात्यो वै वाग्देवीवरदर्पितः । सोमपा मानसिंहश्च गौतमान्वयसंभवः २३ सेनापतिश्च नृपतेरार्यभूपशिरोमणेः । सूरश्चैव द्विजो जातो दक्षिणश्चैव पण्डितः २४ बिल्वमङ्गल एवापि नाम्ना तन्नृपतेः सखा । नायिकाभेदनिपुणो वेश्यानां स च पारगः २५ मदनो ब्राह्मणो जातः पौर्वात्यः स च नर्तकः । चन्दनो नाम विख्यातो रहःक्रीडाविशारदः २६ अन्यदेशे गताः

पुत्र झाला ७-१२. तो पुत्र होताच एकाएकीं आकाशवाणी झाली " बा होमायु, या भयंकर पैशाच-मार्गामध्यें आजपर्यंत कधीं झाला नाहीं व पुढें कधीं होणार नाहीं असा हा सर्व भाग्यसंपन्न पुत्र होईल. यास्तव, तूं याचें अकबर असें नाव ठेव १३, १४. ज्याचें श्रीधर, श्रीपति, शंभु, वरेण्य, मधुव्रती, विमल, देववान्, सोम, वर्धन, वर्तक, रुचि १५, माधाता, मानकारी, केशव, माधव, मधु, देवापि, सोमपा, सूर व मदन हे शिष्य होते तो हा श्रीमान् मुकुंद ब्राह्मण दैवयोगामुळे तुझ्या गृहीं आला आहे. " ही आकाशवाणी ऐकून ज्याचें मन प्रसन्न झालें आहे असा तो होमायु क्षुधेनें पीडिलेल्या लोकास दानें देता झाला. त्याने आपल्या पुत्राचें प्रेमानें पालन केलें. तो पुत्र दहा वर्षाचा झाला असता होमायु देहलीदेशांत आला व शेषशाकाचा पराभव करून तो राजा झाला. नंतर त्या होमायूनें तेथें एक वर्ष राज्य केलें व त्याच्यामागून त्याचा पुत्र राजा झाला. अकबराम राज्य प्राप्त झालें असता पूर्वजन्मीं त्याचे प्रिय असे जे सात शिष्य होते ते त्या राजाकडे आले १६–२०. केशव दानसेन झाला व माधव वैज-वाक् झाला. ते म्लेच्छ ह्मणनच सांगितलेले आहेत. त्याच्यापैकी मधु ह्मणून जो होता तो मध्वा-चार्याच्या कुलामध्ये वैष्णव झाला. त्याचें नांव हरिदास असे असून तो सर्व रागामध्यें निपुण होता. पूर्वजन्मामध्यें जो देवापि होता तोच वीरबल झाला २१,२२. तो पाश्चिमात्य ब्राह्मण असून सरस्वतीच्या वरानें गर्विष्ठ झाला होता. सोमपा ह्मणून जो होता तो गौतमवंशामध्यें मानसिंह ह्मणून झाला २३. तो आर्य राजाचा मुख्य असा जो अकबर राजा त्याचा सेनापति झाला. सूर ह्मणून जो शिष्य होता तो दाक्षिणात्य ब्राह्मण झाला. तो मोठा पंडित असून बिल्वमंगल असें त्याचें नांव होते. तो राजाचा मित्र असे. नायिकांचा भेद करण्यात तो मोठा चतुर असून वेश्यास पूर्ण-पणें ओळखणारा होता २४,२५. मदन पौर्वात्य ब्राह्मण झाला. तो नर्तक होता. चंदन या नांवाने तो विख्यात असून रहःक्रीडेमध्यें चतुर असे २६. ह्या सात शिष्यांच्या पूर्वी

शिष्यास्तेषां पूर्वांस्त्रयोदश । अनपस्य सुतो जात श्रीधरः शत्रुवेदितः २७ विख्यातस्तुलसीशर्मा पुराणनिपुणः कविः । नारीशिक्षां समादाय राघवानन्दमागतः २८ शिष्यो भूत्वा स्थितः काश्यां रामानन्दमते स्थितः । श्रीपतिः स बभूवान्धो मध्वाचार्यमते स्थितः२९ सूरदास इति ज्ञेयः कृष्णलीलाकर कविः । शंभुर्वै चन्द्रभट्टस्य कुले जातो हरिप्रिय. ३० रामानन्दमते सस्थो भक्तकीर्तिपरायणः । वरेण्यः सोऽग्रभुक्नामा रामानन्दमते स्थितः ३१ ज्ञानध्यानपरो नित्यं भाषाछन्दकरः कविः । मधुव्रती स वै जातो कीलको नाम विश्रुतः ३२ रामलीलाकरो धीमान्रामानन्दमते स्थितः। विमलश्च स वै जातः स नाम्नैव दिवाकरः ३३ सीतालीलाकरो धीमान्रामानन्दमते स्थितः । देववान्केशवो जातो विष्णुस्वामिमते स्थितः ३४ कविप्रियादिरचनां कृत्वा प्रेतत्वमागतः । रामज्योत्स्नामयं ग्रन्थं कृत्वा स्वर्गमुपाययौ ३५ सोमो जातः स वै व्यासो निम्बादित्यमते स्थितः । रहःक्रीडामयं ग्रन्थ कृत्वा स्वगमुपाययौ ३६ वर्द्धनश्च स वै जातो भाक्ता चरणदासकः । ज्ञानमालामय कृत्वा ग्रन्थं रैदासपन्थगः ३७ वर्तकः स च वै जातो रोपणस्य मते स्थितः । रत्नभानुरिति ज्ञेयो भाषाकर्ता च जैमिनेः ३८ रुचिश्च रोचनो जातो मध्वाचार्यमते स्थित । नानागानमयीं लीलां कृत्वा स्वर्गमुपाययौ ३९ मान्धाता भूपतिर्नाम कायस्थः स बभूव ह । मध्वाचार्यो भागवतं चक्रे भाषामयं शुभम् ४० मानकारो नारिभावान्नारीदेहमुपागतः । मीरा

असलेले जे तेरा शिष्य ते अन्य देशामध्यें उत्पन्न झाले. श्राधर अनपाचा पुत्र झाला. तो शत्रूस पूर्णपणें जाणणारा होता. तो तुलसी या नावानें प्रसिद्ध असून पुराणामध्यें निपुण व कवि होता. आपल्या स्त्रीपासून उपदेश घेऊन तो राघवानंदाकडे आला २७,२८ व त्याचा शिष्य होऊन काशिमध्यें रामानंदाच्या मतामध्यें राहिला. श्रीपति ह्मणून जो होता तो अंध होऊन निर्माण झाला. सूरदास असें त्याचे नाव असून तो मध्वाचार्यांच्या मतामध्यें राहिला होता. तो कवि असून त्याने कृष्णाची लीला केली आहे. मुकुंदाचा शंभु ह्मणून जो शिष्य होता तो चंद्रभट्टाच्या कुलामध्यें हरिप्रिय या नावाने प्रसिद्ध झाला. तो रामानंदाच्या मताचा असून भक्ताच्या कीर्तिमध्ये परायण असे. वरेण्य ह्मणून जो शिष्य होता तो अग्रभुक्त या नावानें उत्पन्न होऊन रामानंदाच्या मतामध्य स्थिर झाला. तो सतत ज्ञान व ध्यान यामध्ये तत्पर असे. तो भाषाछंद करणारा कवि होता. मधुव्रती ह्मणून जो त्याचा शिष्य होता तो कीलक या नावानें प्रसिद्ध झाला. त्याने रामाची लीला केली व रामानंदाच्या मताचा स्वीकार केला. मुकुंदाचा विमल ह्मणून जो शिष्य होता तो दिवाकर या नावानें उत्पन्न झाला २९–३३. त्या बुद्धिमानाने सीतेची लीला करून रामानदाच्या मताचा आश्रय केला होता. देववान् विष्णुस्वामीन्या मतामध्यें स्थित असलेला केशव झाला ३४. त्यानें कविप्रियादि करून इहलोक सोडिला व रामज्योत्स्नामय ग्रंथ केल्यामुळें तो स्वर्गास गेला. सोम व्यास झाला. तो निवादित्याच्या मताचा स्वीकार करून राहिला होता. रहःक्रीडामय ग्रंथ करून तो स्वर्गलोकीं गेला ३५,३६. वर्धन ह्मणून जो होता तो चरणदास या नावानें झाला. तो रौयिदासाचा अनुयायी असून त्यानें ज्ञानमालामय ग्रंथ केला होता ३७. व्रतक ह्मणून जो होता तो रोपणाच्या मतामध्ये स्थित असून रत्नभानु या नावाने उत्पन्न झाला. त्यानें जैमिनीअश्वमेधाचा भाषाग्रंथ केला. रुचि, मध्वाचार्यांच्या मतामध्यें असलेला रोचन झाला. अनेक प्रकारच्या गायन लीला करून तो स्वर्गास गेला ३८,३९. माधाता भूपति या नावाचा कायस्थ झाला. तो मध्वाचार्याचा अनुयायी असून त्यानें भाषामय शुभ भागवत राचिलें ४०. मानकर स्त्रीत्वामुळें स्त्रीदेहाप्रत प्राप्त झाला. ती भूपतीची मिरा या नावाने प्रसिद्ध

मामेति विख्याता भूपतेस्तनया शुभा ४१ मा शोभा च तनौ यस्या गतिर्गजसमा किल । सा मीरा च श्रुतैः प्रोक्ता मध्वाचार्यमते स्थिता ४२ एवं ते कथित विप्र भाषाग्रन्थप्रकारणम् । प्रबन्धं मङ्गलकरं कलिकाले भयंकरे ४३ स भूपोऽकबरो नाम कृत्वा राज्यमकंटकम् । शताब्देन च शिष्यैश्च वैकुण्ठभवन ययौ ४४ सलोमा तनयस्तस्य कृत राज्यं पितुः समम् । खुर्दकस्तनयस्तस्य दशाब्दं च कृतं पदम् ४५ चत्वारस्तनयास्तस्य नवरङ्गो हि मध्यमः । पितरं च तथा भ्रातॄञ्जित्वा राज्यमचीकरत् ४६ पूर्वजन्मनि दैत्योऽयमन्धको नाम विश्रुतः । कर्मभूम्यां सदंशेन दैत्यराजाज्ञया ययौ ४ तेनैव बहुधा मूर्तीर्भ्रंशिताश्च समन्ततः । दृष्ट्वा देवास्तदागत्य कृष्णचैतन्यमब्रुवन् ४८ भगवन्दैत्यराजांशः स जातश्च महीपतिः । भ्रंशयित्वा सुरान्वेदान्दैत्यपक्ष विवर्द्धते ४९ इति श्रुत्वा स यज्ञांशो नदीहोपवने स्थितः । शशाप तं दुराचार यथा वशक्षयो भवेत् ५० राज्यमेकोनपञ्चाशत्कृतं तेन दुरात्मना । सेवाजयो नाम नृपो देवपक्षविवर्द्धनः ५१ महाराष्ट्रद्विजस्तस्य युद्धविद्याविशारदः । हत्वा त च दुराचार तत्पुत्राय च तत्पदम् ५२ दत्त्वा ययौ दक्षिणात्ये देशे देवविवर्द्धनः । आले भानामतनयः पञ्चाब्दं तत्पदं कृतम् ५३ तत्पश्चान्मरणं प्राप्तो विद्रधेन रुजा मुने । विक्रमस्य गते राज्ये सप्तयुक्तरक शतम्५४ ज्ञेय सप्तदश विप्र यदालोमा मृतिं गतः । तालनस्य कुले जातो म्लेच्छः फलरुषो बली ५५ मुकलस्य कुल हत्वा स्वयं राज्य चकार ह । दशाब्दं च कृतं राज्यं तेन भूपेन भूतले ५६ शत्रुभिर्मरणं प्राप्तो दैत्यलोकमुपागमत् । महामदस्तत्तनयो विंशत्यब्द कृत प मू ५७ त-ष्ट्र नादरो

असलेली कन्या होय. मा ह्मणजे शोभा तीं जिच्या शरीरामध्यें आहे व जिची गति गजासारखी आहे तिला शहाण्यानीं " मीरा " असें ह्मटलें. ती मध्वाचार्यांच्या मतामध्यें स्थित असे ४१,४२. असो; हे ब्राह्मणा, भयंकर कलिकालामध्यें कल्याणकर भाषामयग्रथ कसे निर्माण झालें तें मी तुला सांगितलें ४३. इकडे तो अकबर नामक राजा पन्नास वर्षे निष्कटक राज्य करून आपल्या सर्व शिष्यासह वैकुंठ लोकीं गेला ४४. त्याचा सलोमा ह्मणून पुत्र होता. त्यानें पित्याइतकें राज्य केलें. खुर्दक हा त्याचा पुत्र होय. त्यानें दहा वर्षे राज्य केलें. त्याला चार पुत्र होते. त्यांतील मधला जो नवरग ह्मणून पुत्र होता त्यानें पित्यास व त्याचप्रमाणे भ्रात्यास जिंकून राज्य केलें. हा पूर्वजन्मीं अंधक नांवाचा प्रसिद्ध दैत्य होता. तो दैत्यराजाच्या आज्ञेनें कर्मभूमीमध्यें येऊन त्याच्या अंशानें उत्पन्न झाला. त्याने चोहोंकडील अनेक मूर्ति फोडिल्या. तें पाहून देव कृष्णचैतन्याकडे आले व ह्मणाले " हे भगवन् दैत्यराजाचा अंश राजा झाला आहे. तो देव व वेद याचा भ्रश करून दैत्यपक्षाची वृद्धि करीत असतो " हें ऐकून नदीहोपवनामध्यें असलेला यज्ञांश ' तुझ्या वशाचा क्षय होईल' असा त्या दुराचाऱ्यास शाप देता झाला४९-५०. त्या दुरात्म्यानें एकोणपन्नास वर्षे राज्य केलें. देवाच्या पक्षाची वृद्धि करणारा सेवाजय ह्मणून राजा होता. त्याचा युद्धविद्येमध्यें चतुर असा एक महाराष्ट्र ब्राह्मण सेनापति होता. त्यानें त्यास मारून व त्याच्या पुत्रास राज्य देऊन तो देवाची वृद्धि करणारा दाक्षिणात्य देशामध्यें गेला. नवरगाचा अलोम ह्मणून पुत्र होता. त्यानें पाच वर्षे राज्य केलें ५१-५३. व हे मुने, नंतर तो विद्रधि रोगानें मरण पावला. विक्रमाचें राज्य झाल्यावर सत्तराशें सत्तर वर्षांनीं आलोमा मरण पावला असें समजावें. तालनाच्या कुलामध्यें बलवान् फलरुष ह्मणून झाला. त्यानें मुकुलाच्या संपूर्ण कुलाचा घात करून स्वतः राज्य केलें. त्या राजानें भूलोकीं दहा वर्षे राज्य चालविलें. पुढें शत्रूंच्या हातून तो मरण पावला व दैत्यलोकीं गेला. महामद हा त्याचा पुत्र होय. त्यानें बीस वर्षे राज्य केलें. त्याच्या राष्ट्रामध्यें नादर ह्मणून एक दैत्य आला. त्यानें आर्यांस

नाम दैत्यो देश उपागमत् । हत्वार्यांश्च सुरांश्चैवा देशं खुरजमाययौ ५८ महामत्स्यो हि मदस्य तनयस्तस्यितुः पदम् । गृहीत्वा पञ्चवर्षान्त स च राज्यं चकार ह ५९ महाराष्ट्रैर्हतो दुष्टस्ताल-नान्वयसंभवः । देहलीनगरे राज्यं दशाब्दं माधवेन वै ६० कृतं तत्र तदा म्लेच्छा आलोमा राज्यमास्थान् । तद्राष्ट्रे बहवो जाता राजानो निजदेशजा ६१ ग्रामया बहवो भूपा देशे देशे बभूविरे । मण्डलीकपदं तत्र क्षयं जात महीतले ६२ त्रिंशद्वत्सरमतो जातं ग्रामे ग्रामे नृपे नृपे । तदा तु सकला देवाः कृष्णचैतन्यमाययुः ६३ यज्ञांशश्च हरिः साक्षाज्ज्ञात्वा दुःखं महीतले । मुहूर्तं ध्यानमागम्य देवान्वचनमब्रवीत् ६४ पुरा तु राघवो धीमान्निहत्वा रावणराक्षसम् । कपी-नुज्जीवयामास सुधावर्षैस्समन्ततः ६५ विकटो वृजिलो जालो वरलीनो हि सिंहलः । जवस्सुमात्रश्च तथा नाम्ना ते क्षुद्रवानराः ६६ रामचन्द्रं वचः प्राहुर्देहि नो वाञ्छितं प्रभो । रामो दाशरथिः श्रीमा-ञ्ज्ञात्वा तेषां मनोरथम् ६७ देवाञ्जनोद्भवाः कन्या रावणाल्लाकरावणात् । दत्त्वा तेभ्यो हरिस्साक्षा-दूचन प्राह हर्षितः ६८ भवन्नाम्ना च ये द्वीपा जालन्धरविनिर्मिताः तेषु राज्ञो भविष्यन्ति भवन्तो हि-तकारिणः ६९ नन्दिन्या गोश्चरुण्डाद्वैजाता म्लेच्छा भयानकाः गुरुण्डा जातयस्तेषां तास्तु तेषु सदा स्थिताः ७० जित्वा तॉश्चगुरुण्डान्वै कुरुध्व राज्यमुत्तमम् । इति श्रुत्वा हरिं नत्वा द्वीपेषु ययु-मुंदा ७१ विकटान्वयसभूता गुरुण्डा वानरानना । वाणिज्यार्थमिहायाता गौरुण्डा बौद्धप-न्थिनः ७२ ईशपुत्रमते संस्थास्तेषां हृदयमुत्तमम् । सत्यव्रत कामजितक्रोध सूर्यतत्परम् ७३ यूय तत्रोष्य कार्यं च नृणां कुरुत मा चिरम् । इति श्रुत्वा तु ते देवाः कुर्युरार्चिकमादरात् ७४

मारून व देवास जिंकून खुराज देशाकडे गमन केले ५४—५८. त्याचा महामत्स्य हणून पुत्र होता. त्यानें आपल्या पित्याचें राज्य घेऊन तें पांच वर्षं चालविलें ५९. तालनाच्या वंशामध्यें उत्पन्न झालेल्या त्या दुष्टास महाराष्ट्रीयानीं मारिलें व देहली नगरामध्यें माधवाने दहा वर्षं राज्य केलें. तेव्हा आलोमानामक म्लेच्छास राज्यप्राप्ति झाली. त्याच्या राष्ट्रातील आपापल्या देशामध्यें अनेक राजे झाले ६०, ६१. देशोदेशीं ग्रामन्यें रक्षण करणारे अनेक राजे झाले. माडलिक हें पद त्यावेळीं भूलोकातून नाहींसें झालें होतें. गांवोंगांवीं भिन्नभिन्न राज्यें होऊन तीस वर्षं झाली असता सर्व देव कृष्णचैतन्याकडे आले ६२, ६३. तेव्हा यज्ञांशनामक साक्षात् हरि भूलोकाचें दुःख जाणून एक क्षणभर ध्यानस्थ झाला व नंतर देवास हणाला ' ६४. पूर्वी बुद्धिमान् राघवानें रावण राक्षसास जिंकून चोहोंकडे अमृताचा वर्षाव करून वानरास उठविलें. त्यात विकट, वृजिल, नाल, वरलीन, सिंहल, जव व सुमात्र या नावाचे जे क्षुद्र वानर होते ते रामचंद्रास हणाले "हे प्रभो, आह्मास जें इष्ट आहे ते दे. तेव्हां श्रीमान् दाशरथिराम त्यांचा मनोरथ जाणून लोकांस दुःख देणाऱ्या रावणापासून देवांगनाच्या अंशरूप अशा ज्या कन्या झाल्या होत्या त्या त्यास देऊन तो आनंदित झालेला साक्षात् हरि त्यास हणाला " जालधरानें निर्माण केलेली नूमच्या नावाचीं जीं बेटें आहेत त्यामध्यें माझे हित करणारे तुह्मी राजे व्हाल ६५-६९. नंदिनी गाईच्या रुंडापासून जे भयंकर म्लेच्छ उत्पन्न झाले ते गुरुंड जातीचे होत. ते तेथें सर्वदा स्थित आहेत. यास्तव त्या गुरुंडास जिंकून तुह्मी उत्तम राज्य करा. " हें ऐकून व हरीस नमस्कार करून ते आनंदानें द्वीपामध्यें गेले. असो; ज्याची वानरासारखीं मुखें आहेत असे विकटवंशामध्यें उत्पन्न झालेले ते गुरुंड व्यापाराकरिता येथें आले. ते गाईच्या रुंडापासून उत्पन्न झालेले सर्वही बौद्धपंथी होत ७०-७२ ते ईशपुत्राच्या मतामध्यें निष्ठा ठेवून राहिलेले आहेत. त्यांचें हृदय उत्तम असून ते सत्यव्रत, जिते-द्रिय व क्रोधशून्य आहेत. ते सूर्याच्या आराधनेमध्यें तत्पर असतात ७३. यास्तव तुह्मी तेथें

नागर्यां कलिकातायां स्थापयामासुरुद्यताः । विकटैः पश्चिमे द्वीपे तत्पत्नी विकटावती ७५ अष्टकौशलमार्गेण राज्यमत्र चकार ह । तत्पतिस्तु पुलोमार्चिः कलिकातां पुरीं स्थित ७६ विक्रमस्य गते राज्ये शतमष्टादशं कलौ । चत्वारिंशे तथाब्दं च तदा राजा बभूव ह ७७ तदन्वये सप्त नृपा गुरुण्डाश्च बभूविरे । चतुष्षष्टिमितं वर्षं राज्यं कृत्वा लय गताः ७८ गुरुण्डे चाष्टमे भूप प्राप्ते न्यायेन शासति । कलिपक्षो बलिर्दैत्यो मुर नाम महासुरम् ७९ आहूय प्रेषयामास देवदेशे महोत्तमे । स मुरो वार्डिल भूप वशीकृत्य हृदि स्थितः ८० आर्यधर्मविनाशाय तस्य बुद्धिं चकार ह । मूर्तिसस्थास्तदा दवा गत्वा यज्ञांशयोगिनम् ८१ नमस्कृत्याब्रवन्सर्वे यथा प्राप्तो मुरोऽसुर' । ज्ञात्वा शशाप कृष्णांशो गुरुण्डान्बौद्धपन्थिनः ८२ क्षयं यास्यन्ति ते सर्वे ये मुरस्य वश गताः । इत्युक्ते वचने तस्मिन्गुरुण्डाः कालनोदिताः ८३ स्वसैन्यैश्च क्षय जग्मुर्वर्षमात्रान्तरे खला । सर्वे त्रिंशत्सहस्राश्च प्रययुर्यममन्दिरे ८४ वारदण्डैस्स च भूपालो वार्डिलो नाशमासवान । गुरुण्डो नवमः प्राप्तो भेकलो नाम वीर्यवान् ८५ न्यायेन कृतवान्राज्यं द्वादशाब्दं प्रयत्नतः । आर्यदेशे च तद्राज्य बभूव न्यायशासति ८६ लार्डलो नाम विख्यातो गुरुण्डो दशमो हितः । द्वात्रिंशाब्द च तद्राज्य कृत तेनैव धर्मिणा ८७ लार्डले स्वर्गते प्राप्ते मकरन्दकुलोद्भवाः । आर्या. प्राप्तास्तदा मौना हिमतुङ्गनिवासिनः ८८ बभ्रुवर्णाः सूक्ष्मनसा वर्तुला दीर्घमस्तकाः । एव लक्षाश्च संप्राप्ता देहल्यां बौद्धपन्थिन. ८९ आर्जिको नाम

राहून मनुष्यांचे कार्य करा, उशीर लावू नका. " हें ऐकून ते देव लागलेंच मोठ्या आदरानें तसेंच करिते झाले. उद्यमयुक्त अशा त्यानीं कलिकाता नगरीमध्यें आपली स्थापना केली. पश्चिम द्वीपामध्यें विकट नामक विकटावती म्हणून राणी असे. ती आठ कौशालाच्या द्वारा येथील राज्य करू लागली. तिचा पति पुलोमार्ची म्हणून होता तो कलिकाता नगरीमध्यें राहिला ७४-७६. कलियुगातील विक्रमाचें राज्य होऊन अठराशें चाळीस वर्षे झालीं असता तो राजा झाला. त्याच्या वशामध्यें सात गुरुंड राजे झाले. व चौसष्ट वर्षे राज्य करून ते लय पावले ७७,७८. गुरुडाचा आठवा राजा राज्यावर बसला असता व तो न्यायानें राज्य करूं लागला असता कलिपक्षाचा बलि नामक दैत्य मुरनामक महादैत्यास अत्युत्तम देवदेशास पाठविता झाला. तो मुर वार्डिल राजाच्या हृदयामध्यें स्थित होऊन व त्यास आपल्या वश करून घेऊन आर्यधर्माच्या विनाशाकरिता त्यास प्रेरणा करिता झाला. तेव्हा मूर्तिमध्यें असलेले देव यज्ञाशयोग्याकडे जाऊन व त्यास नमस्कार करून मुरदैत्य कसा आला तें त्यास सागते झाले. ते जाणून कृष्णाशाने जे मुरास वश झाले आहेत ते सर्व क्षय पावतील असा त्या बौद्रपथी गुरुडास शाप दिला. तो असे बोलला असता कालाने ज्यास प्रेरणा केली आहे असे ते दुष्ट गुरुंड आपल्या सैन्याच्याच हातून मरण पावले. त्या वेळीं सर्व मिळून तीस सहस्र गुरुड यममदनीं गेले ७९—८४. पुढें वार्डिलनामक राजा बारदंडानींच नष्ट झाला. नंतर भेकल या नावाचा वीर्यवान् नववा गुरुड आला. त्याने मोठ्या प्रयत्नानें व न्यायानें बारा वर्षे राज्य केलें. तो न्यायानें राज्य करू लागला असता त्याचें राज्य सर्व आर्य देशभर झालें ८५,८६. लार्डले या नावाचा प्रसिद्ध दहावा गुरुड आला. तो सर्वास हितकर असे. त्या धार्मिक पुरुषाने बत्तीस वर्षे राज्य केलें ८७. नंतर लार्ड ले स्वर्गलोकीं गेला असता मकरंदाच्या कुलामध्ये उत्पन्न झालेले मौनवंशीय आर्य प्राप्त झाले. ते यावेळीं हिमालयाच्या शिखरावर राहत असत. ज्यांचा वर्ण भुरकट असून ज्यांचीं नाकें सूक्ष्म व वर्तुल आहेत आणि मस्तकें दीर्घ आहेत असे ते एक लक्ष बौद्रपक्षीय देहलीमध्यें आले ८८,८९. त्याच्यापैकीं आर्जिक म्हणून

वै राजा तेषां तत्र बभूव ह । तस्य पुत्रो देवकर्णो गङ्गोत्रगिरि मूर्द्धनि ९० द्वादशाब्दं तपो घोरं तेपे राज्यविवृद्धये । तदा भगवती गङ्गा तपसा तस्य धीमतः ९१ स्वरूप स्वेच्छया प्राप्य ब्रह्मलोक जगाम ह । कुबेरश्च त.गत्य दत्त्वा तस्मै महत्पदम् ९२ आर्याणां मण्डलीकं च तत्रैवान्तरधीयत । मण्डलीको देवकर्णो बभूव जनपालक ९३ षष्ट्यब्द च कृतं राज्य तेन राज्ञा महीतले । तदन्वयेऽष्टभूपाश्च बभूवुर्देवपूजकाः ९४ द्विशताब्दं पद कृत्वा स्वर्गलोकमुपाययुः । एकादशश्च यो मौन पन्नगारिरितिः श्रुतः ९५ चत्वारिंशच्च वर्षाणि राज्य कृत्वा प्रयत्नतः । स्वर्गलोकं गतो राजा पन्नगैर्मरण गत ९६ एवं च मौनजातीयैः कृत राज्य महीतले ९७ [५६७६] इति श्रीभविष्य महापुराणे प्रतिसर्गपर्वाणि चतुयुगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये गुरुण्डमौनराज्यवर्णनं नाम द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

सूत उवाच ॥ वैक्रमे राज्यविगते चतुष्यष्ट्युत्तरं मने । द्वाविंशदब्दशतक भूतनन्दिस्तदा नृपः१ कुबेरयक्षकान्मौनान्धनधान्यसमन्वितान् । सार्द्धलक्षान्कलैर्घोरैर्जित्वा तान्युद्धकारिणः २ किल्किलायां स्वय राज्य नागवशैश्चकार ह । आग्नेय्यां दिशि विख्याता पुण्डरीकेण निर्मिता ३ पुरी किलकिला नाम तत्र राजा बभूव ह । पुण्डरीकादयो नागास्तस्मिन्राज्यं प्रशासति ४ गेहे गेहे जनैस्सर्वैः पूजनीया बभूविरे । स्वाहास्वधावषट्कारो देवपूजा महीतले ५ त्यक्त्वा देवानुपागम्य मस्थिता मेरुमूर्द्धनि । शक्राज्ञया कुबेरस्तु शुकधान्यं समन्ततः ६ यक्षैः षडशानादाय देवेभ्यः प्रददौ प्रभुः । मणिस्वर्णादिवस्तूनि मौनराज्येषु यानि वै ७ दत्तानि तानि कोशेषु पुनर्देवश्चकार

तेथील राजा झाला. त्याचा देवगण ह्मणून पुत्र होता. तो गगोत्र पर्वताच्या मस्तकावर आपल्या राज्यवृद्धिकरिता बारा वर्षे घोर तप करीत राहिला. तेव्हा त्या बुद्धिमानाच्या तपानें प्रसन्न झालेली भगवती गगा ९०,९१ स्वेच्छेनें आपलें रूप धारण करून ब्रह्मलोकीं गेली. त्यामुळें कुबेर आला व त्यानें त्यास आर्याचे मोठें माडलिक पद दिलें व तो तेथेंच गुप्त झाला. याप्रमाणें लोकाचें रक्षण करणारा देवकर्ण माडलिक झाला. त्या राजाने भूलोकीं साठ वर्षे राज्य केलें. त्याच्या वशामध्यें आठ देवपूजक राजे झाले. त्यानीं दोनशें वर्षे राज्य करून स्वर्गलोकाचा मार्ग स्वीकारिला. नंतर पन्नगारी या नावाचा जो अकरावा मौन राजा झाला त्यानें प्रयत्नानें चाळीस वर्षे राज्य केलें. व पन्नगाच्या योगानें त्यास मरण आले आहे असा तो राजा स्वर्गलोकीं गेला ९२-९६. तात्पर्य, अशा प्रकारे मौन जातीन्या राजानीं भूलोकीं राज्य केलें ९७. ह्याप्रमाणे श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्यु० प्रतिस० कलियु० चतुर्थखंडातील गुरुड व मौनराजवर्णननामक बावीसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२ ॥

सूत ह्मणतातः— विक्रमाचें राज्य होऊन बावीसशें साठ वर्षे झाली असता त्यावेळीं भूतनदी ह्मणून जो राजा होता त्यानें धनधान्यानें सपन्न असलेल्या व युद्ध करणाऱ्या कुबेर व यक्ष नामक दीड लक्ष मौनास घोर कलाच्या योगानें जिंकून नागवंशीयासहवर्तमान किलकिलीमध्यें स्वतः राज्य केलें. आग्नेयी दिशेमध्यें पुंडरीकानें निर्माण केलेली ती किल्कीला नामक नगरी प्रसिद्ध आहे. तेथील तो राजा झाला. तो राज्य करीत असता पुडरीकादिक नाग घरोघर सर्व लोकास पूज्य झाले. पृथ्वीतलावरील स्वाहा, स्वधा, वषट्कार व देवपूजा याचा त्याग करून व देवाजवळ घेऊन ते मेरूच्या मस्तकीं राहिलें. तेव्हा इद्राच्या आज्ञेनें प्रभु कुबेराने यक्षाकडून चोहोंकडून षडंशरूप शुकधान्य घेऊन तें देवास दिलें. मौन राज्यामध्यें मणि, सुवर्ण इत्यादि ज्या वस्तु दिलेल्या होत्या त्या सर्व परत घेऊन तो पुनरपि आपल्या कोशामध्यें ठेविता झाला. त्या भूतनंदीने मडालिकपद पन्नास

ह । मण्डलीक पद तेन सत्कृतं भूतनन्दिना ८ शतार्द्धं तु ततो राजा शिशुनन्दिर्बभूव ह । नागपूजां पुरस्कृत्य तिरस्कृत्य सुरान्भुवि ९ चकार राज्य विंशाब्दं यशोनन्दिस्ततोऽनुजः । भ्रात्रासनं स्वयं प्राप्तो नागपूजापरायणः १० पञ्चविंशति वर्षाणि स च राज्यमचीकरत् । ततस्तत्तनयो राजा स बभूव प्रवीरकः ११ एकादशाब्दं तद्राज्य कर्मभूम्यां प्रकीर्तितम् । कदाचित्स च बाह्लीके सेनया सार्द्धमागतः १२ तत्र तैरभवद्युद्ध पैशाचैर्म्लेच्छदारुणैः । मासमात्रान्तरे म्लेच्छा लक्षसख्या-मृर्ति गताः १३ तथा षष्टिसहस्राश्च नागभक्ता लय गता. । बादलो नाम तद्राजा रोमजस्थो महा-बलः १४ यशोनन्दिनमाहूय ददौ जालमतीं सुताम् । गृहीत्वा म्लेच्छराजस्य सुतां गेहमुपागतः १५ गर्भो जातस्ततस्तस्यां बभूव तनयो बली । बाह्लीको नाम विख्यात्तो नागपूजनतत्पर १६ तदन्वये नृपा जाता बाह्लीकाश्च त्रयोदश । चतुरशतानि वर्षाणि कृत्वा राज्य मृर्तिं गताः १७ अयोमुखे च बाह्लीके राज्यमत्र प्रशासति । तदा पितृगणास्सर्वे कृष्णचैतन्यमाययुः १८ नत्वोचु-र्वचनं तत्र भगवञ्छृणु मे वचः । वयं पितृगणा भूपैर्नागवश्यैर्निराकृताः १९ श्राद्धतर्पणकर्माणि तैर्वयं वर्द्धितास्सदा । पितृवृद्ध्यासोमवृद्धिस्ततो देवाश्च वर्द्धनाः २० देववृद्ध्याल्लोकवृद्धिस्तस्मा-द्ब्रह्मा प्रजापतिः । ब्रह्मवृद्ध्यापरं हर्षं गेहे गेहे जने जने २१ अतोऽस्मान्रक्ष भगवन्प्रजाः पाहि सनातनीः । इति श्रुत्वा वचस्तेषां यज्ञांशो भगवान्हरिः २२ पुष्यमित्रं धर्मपरमार्यवंशविवर्द्ध-नम् २३ जातमात्रः स वै बालः षोडशार्द्धवयोऽभवत् । अयोनिर्योनिभूतांस्तानयोमुखपुरस्स

वर्षे उत्तम रीतीनें केलें. त्याच्या मागून शिशुनंदी राजा झाला. त्यानें नागपूजा प्रचलित करून व भूलोकच्या देवाचा तिरस्कार करून बीस वर्षे राज्य केलें. त्याच्यामागून त्याचा यशोनंदी ह्मणून जो धाकटा भाऊ होता, त्यानें राज्य आपल्या भाकाचें पासून स्वतः प्राप्त करून घेतलें. तो नागपूजे-मध्ये तत्पर असे १-१०. त्यानें पंचवीस वर्षे राज्य केलें. त्याच्यामागून प्रवीरक नामक त्याचा पुत्र राजा झाला ११. त्यानें कर्मभूमिमध्यें अकरा वर्षे राज्य केलें असें सांगितलेलें आहे. एकदा सैन्यासह तो बाल्हिकामध्यें आला. तेथें पैशाचधर्मी भयंकर म्लेच्छांशीं त्याचें युद्ध झालें. एका महिन्यामध्य म्लेच्छांची एक लक्ष सेना मरण पावली व त्याचप्र-माणें साठ सहस्र नागभक्त नष्ट झाले; तेव्हा बादलनामक रोमजस्थ महाबलाढ्य राजा यशोनंदीस बोलावून त्यास आपली जालमति कन्या देता झाला. तेव्हा त्या म्लेच्छ राजाच्या कन्येस घेऊन तो आपल्या गृहीं आला. पुढें त्याच्यापासून तिच्या ठायीं गर्भ राहिला व त्यास एक बलाढ्य पुत्र झाला. तो बाल्हिक या नावानें विख्यात असून नागपूजनामध्यें तत्पर असे. त्याच्या वंशामध्यें तेरा बाल्हिक राजे झाले व चारशें वर्षे राज्य करून ते मरण पावले. बाल्हिक अयोमुख या ठिकाणीं राज्य करीत असता सर्व पितृगण कृष्णचैतन्याकडे आले व त्यास नमस्कार करून ह्मणाले " हे भगवन्, आमच्या वचनाकडे लक्ष्य दे. आह्मा पितृगणांचें नागवशीय राजानीं निराकरण केलें आहे. श्राद्ध, तर्पण इत्यादि जीं कर्मे त्याच्या योगानें आह्मीं सर्वदां वृद्धि पावत असतों. पितराच्या वृद्धिमुळें सोमाची वृद्धि होते, त्यामुळें देव वृद्धियुक्त होतात; देवाच्या वृद्धिमुळें लोकाची वृद्धि होते, व लोकाच्या वृद्धिमुळें प्रजापति ब्रह्मा वृद्धि पावतो आणि ब्रह्मदेवाची वृद्धि झाल्यानें प्रत्येक मनुष्यास घरोघर आनंद होतो. यास्तव हे भगवन्, आमचें रक्षण कर. या सनातन प्रजेचें पालन कर. हें त्याचें वचन ऐकून भगवान् हरि यज्ञांश आर्यवंशाची वृद्धि करणाऱ्या धर्मपरायण पुष्य-मित्रास निर्माण करिता झाला. तो बालक उत्पत्तिबरोबर साडेसोळा वर्षाचा झाला. तो स्वतः अयो-निसंभव होता. त्यामुळें अयोमुखप्रभृति त्या योनिभूत राजास जिंकून व त्यास देशातून घालवून

रान् १४ जित्वा देशान्शिराक्रम्य स्वयं राज्यं गृहीतवान् । यथा शिवांशतो जातो विक्रमो नाम भूपतिः १५ शकान्गन्धर्वपक्षीयान्जित्वा पूज्यो बभूव ह । नागपक्षांस्तथा भूपान्गोलकास्यान्भयंकरान् १६ पुष्यमित्रस्तदा जित्वा सर्वभूपोऽभवद्भुवि । सप्तविंशच्छतं वर्षं द्विसप्तत्युत्तरंतथा १७ राज्यं विक्रमजं जातं समाप्तिमगमत्तदा । पुष्यमित्रे राज्यपदं प्राप्ते समभवत्तदा २८ शतवर्षं राज्यपदं तेन धर्मात्मना धृतम् । अयोध्या मथुरा माया काशी कान्ध्री ह्यवन्तिका १९ पुरी द्वारावती तेन राज्ञा च पुनरुद्धृताः । कुरुसूकरपद्मानि क्षेत्राणि विविधानि च ३० नैमिषोत्पलवृन्दानां वनक्षेत्राणि भूतले । नानातीर्थानि तेनैव स्थापितानि समन्ततः३१ तदा कलिः सगन्धर्वो देवतापितृदूषकः । ब्राह्मणं वपुरास्थाय पुष्यमित्रमुपागमत् ३२ तत्तोवाच प्रियं वाक्यं शृणु भूप दयापर । आर्यदेशे पितृगण्याः पूजार्हाः श्राद्धतर्पणैः ३३ अज्ञानमिति तज्ज्ञेयं भुवि यत्पितृपूजनम् । मृता ये तु नरा भूमौ पूर्वकर्मवशानुगाः ३४ भवन्ति देहसन्तस्ते चतुराशीतिलक्षधा । छद्मना मयदेवेन पितृपूजा विनिर्मिता ३५ वृथाश्रम वृथा कर्म नृणां च पितृपूजनम् । इति श्रुत्वा वचो घोरं विहस्याह महीपतिः ३६ भवान्मूर्खो महामूढो न जानीषे परं फलम् । भुवर्लोके न ये दृष्टाः शून्यभूताश्च भास्वराः ३७ ये तु ते वै पितृगणाः पिण्डरूपविमानगाः । सत्पुत्रैश्च विधानेन पिण्डदानं च यत्कृतम् ३८ तद्विमानं नभोजातं सर्वानन्दप्रदायकम् । अब्दमात्रं स्थितिस्तेषां पिण्डपायसरूपिणाम् ३९ गीताष्टादशकाध्यायैः सप्तशत्याश्चरित्रकैः । पावितं यत्तु वै पिण्डं त्रिंशताब्दं च तत्स्थितिः ४० श्राद्धतर्पणहीना ये दृश्यन्ते मानवा भुवि । ते सर्वे नारका ज्ञेयाः

देऊन स्वत: राज्य करिता झाला. ज्याप्रमाणें विक्रमराजा शिवाच्या अंशापासून झाला व तो गंधर्वपक्षीय शकास जिंकून पूज्य झाला. त्याचप्रमाणें ज्यांचीं मुखें गोल आहेत व जे भयकर आहेत अशा नागपक्षीय राजास जिंकून हा पुष्यमित्रही भूलोकी सर्वास पूज्य झाला. विक्रमाच्या राज्यास सत्तावीसशेंबहात्तर वर्षं झालीं असता तें राज्य समाप्त झालें. तात्पर्य, पुष्यमित्रानें राज्यपदाची प्राप्ति करून घेतली असता हा प्रकार घडला. त्या धर्मात्म्याने शंभर वर्षं राज्य केलें. अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, आवंतिका, पुरी व द्वारावती या नगरीचा त्या राजानें पुन: उद्धार केला. कुरुसुकरपद्मे व नानाप्रकारचीं क्षेत्रें निर्माण केलीं. व भूलोकीं नैमिषोत्पलसमूहाचीं वनक्षेत्रें निर्माण केलीं. आणि चोहोंकडे त्याने नानाप्रकारचीं तीर्थें स्थापिलीं. तेव्हा देवता व पितर यास दूषित करणारा तो गधर्व कलि ब्राह्मणाचें स्वरूप घेऊन पुष्यमित्राकडे आला १२-३२. व त्यास नमस्कार करून असे प्रिय वाक्य ह्मणाला, हे दयाळु राजा, ऐक. " आर्यदेशामध्यें श्राद्ध व तर्पण यान्या योगानें पितृगण पूजनास योग्य आहेत. पण भूलोकीं पितृपूजन करणें हें अज्ञान आहे असें जाणावें. भूमीमध्ये जे पुरुष मरतात ते पूर्वकर्माच्या अनुरोधानें चवऱ्यायशी लक्ष योनीमध्यें जन्म धारण करितात. पण मय देवानें पितृपूजा कपटानें निर्माण केली आहे. मनुष्याचें पितृपूजन हें कर्म व्यर्थ आहे व त्याचे ते श्रम व्यर्थ आहेत. " हें घोर वचन ऐकून तो राजा ह्मणतो: ३३-३६. ' तूं मूर्ख व महामूढ आहेस. तुला त्याचें परम फल ठाऊक नाहीं. भुवर्लोकामध्यें जे दिसत नाहींत ते शून्यभूत आणि तेजस्वी होतात. पण जे पितृगण आहेत ते पिंडरूप विमानामध्यें बसून जातात. सत्पुत्रानीं यथाविधि केलेलें जें पिंडदान तें सर्व प्रकारचें आनंद देणारें आकाशांतील विमानच होतें. पिंड व पायसरूपी असे जे पितर त्याची तेथें एक वर्षभर स्थिति होते ३७-३९. गीतेच्या अठरा अध्यायानीं व सप्तशतीतील चरित्रानीं जो पिंड पावन केलेला असतो त्याची तीनशें वर्षें स्थिति होते. जे पुरुष भूलोकीं श्राद्ध व तर्पण यावाचून असतात

कुलमेकोत्तरं शतम् ४१ श्राद्धकर्म महाधर्मः श्राद्धोऽयं सर्वकारणम् । इति श्रुत्वा स गन्धर्वः कली राजोऽत्र देहिनाम् ४२ नत्वोवाच नृपश्रेष्ठ प्रसन्नवदनोहि सः । सखा भव ममाशु त्व तवाहं नृप किङ्करः ४३ कलिमित्रो पुष्यमित्रो भवान्भुवि भवेत्सदा । यथा विक्रमराजस्य वैतालस्य च वै सखा ४४ सर्वकार्यकरोऽहं वै तथा तव न संशयः । इत्युक्त्वा च नृप धीरं समादाय स वै कलिः ४५ सप्तद्वीपांस्तथा खण्डान्नभोमार्गाननेकशः । स्वपृष्ठस्थाय राज्ञे च दर्शयामास वीर्यवान् ४६ आर्यधर्म कली स्थाप्य नष्टभूत स वै नृपः । त्यक्त्वा प्राणांश्च यज्ञांशे तेजस्तस्य समागमत् ४७ आन्ध्रदेशोद्भवो राजा सुगदो नाम वीर्यवान् । विना भूप च तं देशं दृष्ट्वा राज्यमचीकरत् ४८ विंशदब्द पद तेन कर्मभूम्यां च सत्कृतम् । तदन्वये सप्तदृष्टि नृपा बभूवुर्बहुपथिनः ४९ पुष्यमित्रगते राज्ये दशोत्तरशतत्रयम् । तस्मिन्काले लयं जग्मुश्चान्ध्रदेशनिवासिनः ५० शताद्धाब्द ततो भूमिर्विना राज्ञा बभूव ह । तदा क्षुद्रा नरा लुब्धा लुण्ठिताश्चौरदारुणैः ५१ दारिद्र्यमगमन्घोरं विना स्वर्णं च भूरभूत् । पुनर्देवेश्च भगवान्प्रार्थितस्तानुवाच ह ५२ देशे कौशलके जात सूर्यांशाच्च महीपतिः । राक्षसारिरिति ख्यातो देवमार्गपरायणः ५३ ममाज्ञया स वै राजा भविष्यति महीतले । इत्युक्त्वान्तर्दधौ विष्णुदेवा लोकानुपागमन् ५४ राक्षसारिमयोध्यायां स्थापयामासुरेव तम् । आन्ध्रराष्ट्रे च यद्द्रव्य राक्षसैश्च समाहृतम् ५५ तद्द्रव्य राक्षसान्निर्जित्वा ग्रामे ग्रामे चकार सः । तारधातोरष्टमौल्य सुवर्णं भुवि तत्कृतम् ५६ आरधातोः शतं

ते सर्व एकशें एक कुलासह नरकामध्य पडतात असें समजावें ४०,४१. श्राद्धकर्म हा मोठा धर्म आहे व हें श्राद्ध सर्व उत्कर्षाचें कारण आहे हें ऐकून तो गंधर्व ह्मणजे इहलोकच्या प्राण्याचा कलिराजा त्या श्रेष्ठ राजास नमस्कार करून ह्मणाला ' हे राजा, मी तुझा किंकर आहे, तूं माझा त्वरित मित्र हो. ह्मणजे तू जो भूलोकीं सर्वदा पुष्यमित्र आहेस तो कलिमित्र होशील. मी ज्याप्रमाण विक्रमराजाचा व वेतालाचा सर्व कार्य करणारा सखा होतों तसाच तुझाही होईन यात काहीं संशय नाहीं; हें बोलत असताना तो प्रसन्नमुख होता असो, असें बोलून व त्या धीर राजास बरोबर घेऊन तो निघाला ४२–४५. त्या वीर्यवानानें आपल्या पाठीवर बसलेल्या राजास सप्तद्वीपें त्याचप्रमाणें खडें व अनेकप्रकारचे आकाशमार्ग दाखविले ४६. पुढे तो राजा कलियुगामध्यें नष्ट झालेल्या आर्यधर्माची स्थापना करून प्राणत्याग करिता झाला; व त्याचें तेज यज्ञाशामध्यें येऊन मिळाले. तेव्हा आंध्र देशामध्यें उत्पन्न झालेला सुगद या नावाचा वीर्यवान् राजा होता. त्यानें तो देश राजावाचून आहे असे पाहून तेथें राज्य केलें ४७,४८. त्यानें या कर्मभूमीमध्यें वीस वर्षे उत्तमप्रकारें राज्य केलें. त्याच्या राज्यामध्यें नाना पथाचे साठ राजे झाले. पुष्यमित्राचे राज्य होऊन तीनशे दहा वर्षे झाली असता त्या समयीं आंध्र देशचे राजे नष्ट झाले ४९,५०. त्यानंतर पन्नास वर्षे ही भूमि राजावाचूनच राहिली. त्यावेळीं पुरुष क्षुद्र व लोभी झाले व भयंकर चोरांनीं त्यांना लुटिलें ५१. घोर दारिद्र्य प्राप्त झालें व भूमि सुवर्णरहित झाली. तेव्हां देवांनीं ज्याची पुनः प्रार्थना केली आहे असा तो भगवान् त्यास ह्मणाला " कौशल देशामध्ये सूर्याच्या अंशापासून राक्षसारि या नावाचा राजा झाला आहे. तो देवमार्गामध्यें परायण आहे. यास्तव माझ्या आज्ञेनें भूलोकीं तो राजा होईल. " असें बोलून भगवान् विष्णु अंतर्धान पावले व देव आपल्या लोकीं आले. त्यानीं त्या राक्षसारिस अयोध्येमध्यें स्थापिलें. आंध्र राष्ट्रांमध्यें राक्षसानीं आणिलेले जें द्रव्य होतें ५२—५५ तें द्रव्य त्यानें राक्षसांस जिंकून गांवोगाव वाटून टाकिलें. त्यानें भूलोकी तार धातूचे आठपट मोलाचें सुवर्ण केलें. आर धातूचें

मौल्यं राजतं तेन वै कृतम् । ताम्रधातोः पञ्चमौल्यमारधातुश्च तत्कृतम् ५७ नागधातोः पञ्चमौल्यं भुवि तेनैव निर्मितम् । ताम्रं पवित्रमधिकं नागो वङ्गस्ततोत्तमः ५८ लौहधातोः शतं मौल्यं वङ्गाऽसौ तेन सत्कृतः । शताद्धाब्दं महीं भक्त्वा सूर्यलोकमुपाययौ ५९ तदन्वये षष्टिनृपा जाता वेदपरायणाः । पुष्यमित्रगते राज्ये चाब्दे सप्तशते गते ६० कौशलान्वयसंभूता भूपाः स्वर्गमुपाययुः । शताद्धाब्दं ततो भूमिर्मण्डलीकं नृपं विना ६१ क्षुद्रभूपाश्च बुभुजे देशे देशे च भागशः । ततो बैदरदेशीयो नाम्ना भूपो विशारदः ६२ आर्यदेशमुपागम्य लक्षसैन्यसमन्वितः । क्षुद्रभूपान्वशीकृत्य मण्डलीको बभूव ह ६३ नानाकलैश्च कर्माणि विचित्राणि महीतले । ग्रामे ग्रामे नराश्चक्रुर्वर्णसङ्करकारकाः ६४ ब्रह्मक्षत्रमयो वर्णो नाममात्रेण दृश्यते । वैश्यप्राया नरा आर्याः शूद्रप्रायाश्च कारिणः ६५ तद्राष्ट्रे मनुजाश्चासन्नाममात्रसुरार्चकाः । षष्टिवर्षं पदं तेन कर्मभूम्यां च सत्कृतम् ६६ ततो नृपा महीं प्राप्ताः षट्संख्यास्तु तदन्वयाः । पुष्यमित्रगते राष्ट्रे शतषोडशसम्मिते ६७ बैदुरा निधनं जग्मुः कलिकाले भयानके । चतुश्शतानि वर्षाणि क्षुद्रभूपा च भूरभूत् ६८ तत्पश्चान्नैषधे राष्ट्रे कालमाली नृपोऽभवत् । क्षुद्रभूपान्वशीकृत्य स्वयं राजा बभूव वै ६९ यमाङ्गया भुवि त्वष्टा नगरी यमुनातटे । निर्मिता योजनायामा कालमालेति विश्रुता ७० तत्रार्यदेशभूपानां पूज्यो राजा स चाभवत् । देवान्पितॄंस्तिरस्कृत्य प्रेतपूजां जने जने ७१ कालमाली च कृतवान्देशनैषधसंस्थितः । द्वात्रिंशद्वर्षराज्यं तद्बभूव जनपीडनम् ७२ तदन्वये षष्टिनृपा बभूवुः प्रेतपूजकाः । शताब्दान्तमभूद्राज्यं तेषां नैषधदेशिनाम् ७३ सहस्राब्दं

रुप्याचें शतमौल्य ठरविलें. ताम्रधातूचें पाच आरधातु मौल्य ठरविलें; व भूलोकीं त्यानेंच नागधातूचें पाच आर हें मोल निर्माण केलें. सगळ्यापेक्षा ताम्र अधिक पवित्र, तसाच नाग व वंग हा धातूही उत्तम होय. लोहधातूचें शभर मोल ह्मणजेच हा वग होय. त्याचा त्यानें मोठा सत्कार केला. त्यानें पन्नास वर्षं पृथ्वीचा भोग घेतला व नंतर तो सूर्यलोकीं गेला. त्याच्या वंशामध्यें साठ वेदपरायण राजे झाले. अमो, पुष्यमित्राचें राज्य होऊन सातशें वर्षं झालीं असता कौसलवंशामध्यें झालेले राजे स्वर्गलोकीं गेले. तेव्हा पन्नास वर्षं भूमि मडलीक राजावांचून होती ५९-६१. हे भार्गवा, त्या वेळीं क्षुद्र राजे देशोदेशीं राज्य करीत होते. तदनंतर विशारद या नावाचा बैदूरदेशीय राजा आर्यदेशामध्यें एक लक्ष सैन्यासह आला. त्यानें सर्व क्षुद्र राजास आपल्या वश करून घेतलें व स्वतः मंडलीक झाला. भूलोकीं पुरुषानीं गावोगांव नानाप्रकारच्या कलांच्या योगानें विचित्र कर्मे केलीं. ते सर्व वर्णसंकर करणारे होते ६२,६४. ब्राह्मण व क्षत्रियरूप वर्ण केवल नाममात्र राहिले होते. आर्यपुरुष प्रायः वैश्य झाले; व शूद्राप्रमाणें कारागिर बनले. त्याच्या राष्ट्रामध्यें सर्व मनुष्यें देवाची केवल नावाची पूजा करीत असत. त्यानें कर्मभूमीमध्यें साठ वर्षं राज्य केलें. त्यानंतर त्याच्या वंशांतील सहा राजे या भूमीमध्यें झाल. पुष्यमित्राचें राज्य होऊन सोळाशें वर्षं झालीं असता हे बैदुर नाहींसे झाले. त्या वेळीं भयंकर कालिकाल प्राप्त झाला होता. चारशें वर्षं पृथ्वी क्षुद्र राजानीं युक्त झाली ६५-६८. त्यान्यामागून नैषध राष्ट्रामध्यें कालमाली राजा झाला. सर्व क्षुद्र राजास वश करून तो स्वतः राजा झाला होता. यमाच्या आज्ञेनें विश्वकर्म्यानें भूलोकीं यमुनेच्या तटाकीं एक योजन विस्तीर्ण असलेली कालमाला या नांवाची प्रसिद्ध नगरी रचिली व तेथें आर्य देशातील राजांचा हा पूज्य राजा राहिला. त्यानें देव व पितर यांच्या पूजेचा तिरस्कार करून प्रत्येक मनुष्याकडून प्रेतपूजा करविली. त्या कालमालीनें आपला नैषध देश चांगल्या प्रकारें वसविला. जनसमूहांस पीडा देणारें तें राज्य बत्तीस वर्षं झालें. त्याच्या वंशामध्यें प्रेतांस पूजिणारे साठ

तु तत्पश्चात्क्षुद्रभूपा मही ह्यभूत् । सुरार्चनं वेदमार्ग श्रुतमात्रं च दृश्यते ७४ पुष्यमित्रगते राज्ये चैकत्रिंशच्छते कलौ । द्वात्रिंशदुत्तरे चैव तदा देवाश्च दुःखिताः ७५ कृष्णचैतन्यमागम्य नत्वोचुर्वचनं प्रियम् । भगवन्कलिकालेऽस्य वर्णाश्चत्वारि भूतले ७६ भ्रष्टाचाराः प्रेतमयाः शतार्द्धाब्दप्रजीविनः । देवान्पितॄंस्तिरस्कृत्य पिशाचान्पूजयन्ति वै ७७ ग्रामे ग्रामे च कूपानि पूजितानि नरैर्भुवि । दृश्यन्तेऽस्माभिरचैव दुःखिताश्च नरा भृशम्७८ भूतप्रेतपिशाचाश्च डाकिन्यश्चाकिनीगणाः । स्वपूजाभिर्मन्दान्धाश्च निन्दयन्ति सुरान्पितॄन् ७९ अतोऽस्मान्दुर्बलान्विद्धि सबलान्भूतनायकान् । कृपया पाहि नः स्वामिञ्छरणागतवत्सल ८० इति श्रुत्वा स यज्ञांशो नदीह्रोपवने स्थितः । नग्नभूतान्सुरान्प्राह मागधे तु महीपतिः ८१ पुरञ्जयो ब्रह्मपरस्तस्य पत्नी पुरञ्जनी । मदाज्ञया तयोः पुत्रो भविष्यति महाबलः ८२ विश्वस्फूर्जिरिति ख्यातो ब्रह्ममार्गपरो गुणी । इत्युक्तवचने तस्मिन्गर्भं धत्ते पुरञ्जनी ८३ दशमासान्तरे जातो विश्वस्फूर्जिर्महाबलः । जातमात्रे सुते तस्मिन्वागुवाचाशरीरिणी ८४ पुष्यमित्रो यथा चासीद्वर्णधर्मप्रवर्तकः । तथायं बालको जातो ब्रह्ममार्गपरो बली ८५ करिष्यति परो वर्णान्कलिन्दयदुमद्रकान् । प्रजाश्च ब्रह्मभूयिष्ठाः स्थापयिष्यति दुर्मतीः ८६ वीर्यवान्क्षत्रमुत्साद्य पद्मवत्यां स वै पुरम् । इत्याकाशवचः श्रुत्वा स नृपस्तु पुरञ्जयः ८७ ददौ दानं क्षुधार्तेभ्योऽतिथिभ्यस्तत्परिच्छदम् । अष्टौ वर्षसहस्राणि चाष्टवर्षशतानि च ८८ कर्मभूम्यां कलौ याते व्यतीतानि तदा मुने । विश्वस्फूर्जिर्नृपश्चासीन्महाबुद्धा महा-

---

राजे झाले व त्या नैषधदेशीयांचें राज्य शभर वर्षेपर्यंत चाललें. त्यानंतर सहस्र वर्षेपर्यंत पृथ्वीवर क्षुद्र राजे झाले व क्वचित् देवपूजा, वेदमार्ग व सामान्य विद्वत्ता दिसू लागली ६९–७४. पुष्यमित्राचें राज्य होऊन कलियुगांतील एकतीसशें बत्तीस वर्षे झालीं असता त्या वेळीं देव अतिशय दुःखित होऊन कृष्णचैतन्याकडे आले व त्यास नमस्कार करून असे प्रिय वचन बोलले ' हे भगवन्, आज या कलिकालामध्ये भूलोकीं जे चार वर्ण होते ते आचारापासून भ्रष्ट होऊन प्रेतासारिखे झाले आहेत. त्यांचें आयुष्य पन्नास वर्षें झालें आहे. ते देवाचा व पितराचा तिरस्कार करून पिशाचाची पूजा करितात ७५-७७. गांवोगांव भूलोकच्या मनुष्यानीं त्या हिसकाची पूजा चालविली आहे. आह्मास साप्रतकालीं मनुष्यें अतिशय दुःखित झालेलीं दिसतात ७८. भूत, प्रेत, पिशाच, डाकिनी, शाकिनी इत्यादिकांचे गण आपल्या पूजेच्या योगानें मदांध होऊन देव व पितर यांची निंदा करीत असतात. त्यामुळें आह्मी दुर्बल झालों आहों व भूतनायक सबल झाले आहेत असें जाण. हे शरणागतवत्सल स्वामिन्, कृपा करून आमचें रक्षण कर ' ७९,८०. हें ऐकून नदीहोपवनामध्यें राहिलेला तो यज्ञांश नग्न झालेल्या त्या देवास ह्मणतो " मागध देशामध्यें पुरंजय या नावाचा ब्रह्मपरायण राजा आहे, पुरंजनी ह्मणून त्याची पत्नी आहे. माझ्या आज्ञेनें त्या दोघापासून महाबलाढ्य पुत्र होईल ८१. तो विश्वस्फूर्जि या नावानें प्रसिद्ध होऊन ब्रह्ममार्गीमध्यें परायण व गुणवान् होईल. " असें वचन तो बोलला असतां पुरंजनी लागलीच गरोदर झाली ८२,८३. दहाव्या महिन्यांत तिला महाबलाढ्य विश्वस्फूर्जि झाला. तो पुत्र उत्पन्न होताच आकाशवाणी ह्मणाली ८४ ' ज्याप्रमाणें पुष्यमित्र वर्णधर्माचा प्रवर्तक होता तसाच हा बालक ब्रह्ममार्गपरायण व बलाढ्य झाला आहे; व तो श्रेष्ठ कलिंद, यदु व मद्रक या नावाचे वर्ण करील. तो मूर्ख प्रजेस ब्रह्मभूयिष्ठ करून सोडील. तो वीर्यवान् क्षत्रियाचा उच्छेद करून पद्मावतीपुर वसवील. ' अशी आकाशवाणी ऐकून तो पुरजय राजा क्षुधार्तास व अतिथींस दानें व वस्त्रे देता झाला. बा मुने, या वेळीं कर्मभूमीमध्यें कलि लागून आठ हजार आठशें वर्षें झालीं असता हा महाबलाढ्य विश्वस्फूर्जि राजा झाला. सर्व क्षुद्र राजास आपल्या वश करून त्या वेळीं

श्लोकः ८९ क्षुद्रभूपान्वशीकृत्य सर्ववर्णांस्तरांस्तदा। स्थापयामास वै ब्राह्मे वर्णे ब्रह्मपरायणे ९० क्षत्रविट्शूद्रका वर्णा पिशाचा वर्णसंकराः। गुरुण्डाद्यास्तथा म्लेच्छा ब्राह्मणास्ते बभूविरे ९१ सन्ध्यातर्पणदेवानां पूजादिविविधाः क्रियाः। चक्रुस्ते वेदविधिना तुल्यभोजनशीलिनः ९२ षष्टिवर्षं कृतं राज्यं तेन सम्यक्कृता मुने। तदन्वये नृपाश्चासन्महस्रा भुवि विश्रुताः९३ अयुताब्दान्तरे जाता ब्रह्ममार्गपरायणाः। तेभ्यश्च दत्तानि भागानि यज्ञमध्ये विधानतः ९४ दैत्येभ्यश्च सुरेभ्यश्च तुल्यकर्माणि चागमन्। विस्मिताश्च सुरास्तत्र यज्ञांशं शरणं ययुः ९५ तदुक्तं कारणं ज्ञात्वा शक्रपुत्र उवाच तान्। वदो नारायणः साक्षाद्विवेकी हंसरूपवान् ९६ नृणां च गुणभेदेन वर्णभेदं चकार ह। सद्गुणो ब्राह्मणो वर्णः क्षत्रियस्तु रजोगुणः ९७ तमोगुणस्तथा वैश्यो गुणसाम्यात्तु शूद्रकः। तृप्तिं यान्ति पितृवृन्दा ब्राह्मणैः क्षत्रियैः सुराः ९८ वैश्यैश्च यक्षरक्षांसि शूद्रैर्दैत्याश्च दानवाः। एकवर्णे च चत्वारो वर्णाः कायस्थ एव सः। ९९ भूतप्रेतपिशाचाद्याः कायस्थैस्तर्पितास्तदा। ब्रह्मवर्णे तु वर्णाश्च स्थिताश्चत्वारि सांप्रतम् १०० ब्रह्मसंकरवर्णोऽयं तेभ्यः पूर्वं हि दानवाः। अर्द्धतृप्ता भविष्यन्ति तर्पयित्वात्स्वर्गवासिनः १०१ अतोऽहं च कलौ घोरे युष्मदर्थे महीतले। सौराष्ट्रनृपतेर्गेहं स्वांशाद्यास्यामि भो सुराः २ इत्युक्त्वा स च यज्ञांशः सोमनाथः कलेकपा। नाम्ना बभूव तद्गेहे सौराष्ट्रनगरीस्थितः ३ जित्वा भूपान्स्वयं राज्यं चकाराब्धितटे मुदा। क्षत्रवर्णमयी भूमिस्तदा जाता कलौ युगे ४ सोमनाथः स वै

न्यानें सर्व वर्णांच्या लोकास ब्रह्मपरायण ब्राह्मवर्णामध्यें स्थापिलें ८९–९०. क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे तीन वर्ण, पैशाचधर्मी लोक, वर्णसंकर पावलेले लोक, गुरुडादिक जातीचे लोक व त्याचप्रमाणें म्लेच्छही ब्राह्मण झाले ९१. सन्ध्या, तर्पण, देवाची पूजा व अशाच आणखी नानाप्रकारच्या क्रिया ते वेदविधीनें करूं लागले. त्या सर्वांचें भोजन एके ठिकाणीं होऊं लागल ९२. बा मुने, याप्रमाणें उत्तम सुधारणा करणाऱ्या त्या राजानें शंभर वर्षं राज्य केलें. त्याच्या वंशामध्यें भूलोकीं प्रसिद्ध असे सहस्र राजे झाले ९३. दहा हजार वर्षांच्या अवकाशामध्यें झालेले ते सर्व ब्रह्ममार्गामध्यें परायण होते. यज्ञामध्यें त्यानीं विधानपूर्वक दिलेले भाग दैत्य व देव याच्याकडे सारखेच येऊं लागले. तें पाहून आश्चर्यचकित झालेले सर्व देव यज्ञाशास शरण गेले ९४,९५. त्यानीं सांगितलेलें कारण ऐकून तो शक्रपुत्र त्यास म्हणाला "वेद हा साक्षात् नारायण असून विवेकी व हंसरूपी आहे ९६. त्यानें गुणाच्या भेदावरून पुरुषाच्या वर्णाचे भेद केले. ज्याचा सत्त्व हा गुण आहे तो ब्राह्मण; ज्याचा रजोगुण आहे तो क्षत्रिय; ज्याचा तमोगुण आहे तो वैश्य व ज्याच्यामध्यें तिन्ही गुण समान आहेत तो शूद्र होय. हे देवहो, पितराचे समूह ब्राह्मण व क्षत्रिय याच्या द्वारा तृप्त होतात. वैश्याकडून यक्षराक्षसाची तृप्ति होते व शूद्र दैत्य व दानव यास तृप्त करितात. एका वर्णामध्यें चारी वर्ण अंतर्भूत झाले म्हणजे तो कायस्थवर्ण होतो व त्या कायस्थाकडून भूत, प्रेत, पिशाच इत्यादि सर्वदा तृप्त होत असतात. साप्रतकालीं चारी वर्ण ब्रह्मवर्णामध्यें राहिले आहेत ९७—१००. हा ब्रह्मसंकररूप वर्ण आहे. त्यामुळें हे देवहो, त्याच्याकडून पूर्वी दानव अर्धे तृप्त होतात व त्यानंतर तुम्ही स्वर्गवासी तृप्त होता. यास्तव, मी घोर कलियुगामध्यें भूलोकीं तुमच्याकरितां सौराष्ट्र राजाच्या घरीं आपल्या अंशापासून उत्पन्न होतों" १,२. असें बोलून तो यज्ञाश एका कलेनें सोमनाथ या नावानें उत्पन्न होऊन सौराष्ट्र नगरातील राजाच्या गृहीं राहिला ३. सर्व राजास जिंकून त्यानें स्वतः समुद्राच्या तटाकीं आनंदानें राज्य केलें. त्या वेळीं कलियुगामध्यें सर्व भूमि क्षत्रमय झाली ४. त्या सोमनाथानें यज्ञाच्या योगानें सर्व देवास तृप्त केलें.

यज्ञैः सुरान्सर्वानतर्पयत् । शताब्दं च कृतं राज्यं तेन देवप्रसादतः ५ तस्य राज्यमय संवत्सरो लोकविश्रुतम् । तदन्वये सार्द्धशतं भूपाश्चासन्सुरप्रियाः ६ अयुताब्दान्तरे किञ्चिदधिके च सुखप्रदाः । कर्मभूम्यां कलौ प्राप्ते हायना अयुतत्रयम् ७ व्यतीतं च ततो दैत्या दुःखिताः कलिमब्रुवन् । पुराऽस्माभिः शताब्दं च तपसा वै महेश्वरः ८ तुष्टीकृतस्तदाऽस्मभ्यं भवान्दत्तो हि तेन वै । अर्धभागं वज्रमय मर्धभागं च कोमलम् ९ तवाङ्गसुन्दर देव कलेऽस्मान्रक्ष दुःखितान् । इति श्रुत्वा च स कलिर्दैत्यपक्षविवर्द्धनः ११० स्वांशाज्जन्म कलौ प्राप्य गुर्जरे देशदारुणे । आभीरी सिंहिका नाम सिंहमांसाशना खला ११ तस्या योनौ समागम्य राहुर्नाम स चाभवत् । यथा राहुर्नभोमार्गे दारुणो हि विधुन्तुदः १२ तथा राहुः कलेरंशो भुवि जातः सुरन्तुदः । जातमात्रे सुते तस्मिन्भूमिकम्पा महानभूत्१३ विपरीता ग्रहाः सर्वे जनयन्ति महद्भयम्।तद्भयात्सकला देवास्त्यक्त्वा मूर्तीः समन्ततः १४ महेन्द्र शरणं जग्मुः सुमेरुगिरिमूर्द्धनि । तदर्थे भगवाञ्छक्रस्तुष्टाव जगदम्बिकाम् १५ कन्यामूर्तिमयी देवी सुरान्प्राह शिवङ्करी । ममाङ्गदर्शनादेवाः क्षुत्तृड्भ्यां च विना सदा १६ भवद्भ्यं च ततो यूयं मद्विलोकनतत्पराः । इति श्रुत्वा तु ते देवा हर्षिता संबभूविरे १७ आभीरीतनयो राहुः कृत्वा राज्यं शत समाः । त्यक्त्वा प्राणान्कलौ लीनो बभूव मुनिसत्तम १८ तदन्वये सार्द्धशतमयुताब्दान्तरेऽभवत् । महानदमत घोरं चिर कालाद्विनाशितम् १९ तैः पुनश्चोद्धृतं भूमौ सर्वे म्लेच्छा बभूविरे । न वेदाश्च न देवाश्च न वर्णाश्च कलौ युगे १२० दृश्यन्ते न

त्यानें देवांच्या प्रसादानें शंभर वर्षे राज्य केलें. तेव्हा त्याचा राज्यमय संवत् लोकामध्यें प्रसिद्ध झाला. त्याच्या वंशामध्यें देवास प्रिय असे दीडशें राजे झाले ५,६ व ते दहा हजार वर्षांहून काहीं अधिक काल प्रजेस सुख देत राहिले. कर्मभूमीमध्यें कलि प्राप्त होऊन आजपर्यंत तीस सहस्र वर्षे होऊन गेलीं. तेव्हा दुःखित झालेले दैत्य कलीस ह्मणाले "पूर्वी आह्मीं शंभर वर्षे तप करून महेश्वरास जेव्हा संतुष्ट केलें तेव्हा त्यानें आह्मास तुला दिलें. हे कलिदेवा, तुझ्या सुंदर अंगाचा अर्धा भाग वज्रासारखा व अर्धा कोमल आहे. यास्तव, आह्मां दुःखितांचें रक्षण कर." हें ऐकून दैत्यपक्षाची वृद्धि करणारा तो कलि ७–१० आपल्या अंशापासून कलियुगात भयंकर गुर्जर देशामध्यें जन्म घेऊन आला. सिंहाचें मास खाणारी सिंहिका नांवाची एक आभीरी होती ११. तिच्या उदरीं उत्पन्न होऊन तो राहु या नांवानें प्रसिद्ध झाला. आकाशमार्गामध्यें ज्याप्रमाणें चंद्रास पीडा देणारा भयंकर राहु असतो त्याप्रमाणें हा कलीच्या अंशरूप राहु देवास पीडा देण्याकरिता भूलोकी उत्पन्न झाला. तो पुत्र उत्पन्न होतांच भयंकर भूकंप झाला व सर्व ग्रह विपरीत होऊन मोठें भय उत्पन्न करिते झाले. तेव्हा त्या भयानें संपूर्ण देव चौहोकडील सर्व मूर्तींचा त्याग करून सुमेरुपर्वताच्या शिखरावर असणाऱ्या महेंद्रास शरण गेले. त्यामुळें त्याच्याकरिता भगवान् इंद्र जगदंबेची स्तुति करू लागला १२-१५. तेव्हा कल्याण करणारी ती देवी कन्येच्या आकृतीची होऊन देवास ह्मणाली "हे देवहो, माझ्या अंगदर्शनामुळेंच तुह्मी सर्वदा क्षुधा व तृषा यांनीं रहित व्हा; व तदनंतर मला पहाण्याकरिता तत्पर व्हा." हें ऐकून ते देव हर्षयुक्त झाले १६,१७. इकडे आभीरीपुत्र राहु शंभर वर्षे राज्य करून व प्राणत्याग करून, हा उत्तम मुने, कलीमध्यें लीन झाला १८. त्याच्या वंशामध्यें दहा सहस्र वर्षामध्यें दीडशें राजे झाले. त्यानीं दीर्घकालापासून नष्ट झालेलें महामदानें घोर मत पुनः प्रचलित केलें व भूलोकीं सर्व म्लेच्छ झाले. कलियुगामध्यें वेद, देव किंवा वर्ण यांपैकीं काहीं दिसेना. कलिकालातील त्याच्या वंशामध्यें मर्यादाही राहिली नाहीं. त्या वेळीं अवशिष्ट राहिलेले सहस्र

च मर्यादा कलिकाले तदन्वये । द्विजशेषाः सहस्राश्च पुनरर्बुदमूर्द्धनि २१ द्वादशाब्दं प्रयत्नेन देवानाराधितुं क्षमाः । अर्बुदाच्च समुद्भूतो राजन्यः खड्गचर्मधृक् २२ जित्वा म्लेच्छान्दुराधर्षान्नाम्ना चार्ववलीं ह्यभूत् । पञ्चयोजनमाना सा भूमिरात्मविवृद्धये २३ निर्मिता तेन शुद्धेन नाम्ना चार्वपुरी श्रुता । शनैः शनैरार्यकुलं पुनस्तत्र ववर्द्ध ह २४ शताब्दार्द्धं प्रयत्नेन तेन राज्यं महत्कृतम् । तदन्वये सार्धशतं नृपाश्चासंस्तदा मुने २५ अयुताब्दान्तरे वीरा म्लेच्छमित्राश्च संकराः । म्लेच्छकन्योद्वहा घोरा नाममात्रार्यमार्गगाः २६ तदा मालवदेशस्थैर्म्लेच्छैर्लक्षमाणकैः । आर्बुदार्यैः समं युद्धमभवद्रोमहर्षणम् २७ वर्षमात्रान्तरे जित्वा मालवस्था महाबलाः । मण्डलीकपदातैश्च मुक्तमार्यैः समन्ततः २८ चत्वारिंशत्सहस्राणि वर्षाणि जगतीतले । म्लेच्छभूपाश्च शतशो बभूवुः स्वल्पजीविनः २९ पञ्चविंशतिसहस्राणि तेषां सङ्ख्या च भूभुजाम् । ये तु पुण्या महीपालाः पूर्वजन्मतपोद्भवा १३० तेषां लीलाश्च मुनिभिः पुराणेषु प्रकीर्तिताः । नानासंवत्सराः सर्वे पैशाचा धर्मदूषकाः ३१ नवत्यब्दसहस्राणि विनीतानि कलौ युगे । जाता म्लेच्छमयी भूमिरलक्ष्मीस्तु जने जने १३२ [५-७८] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

सूत उवाच ॥ ततस्ते सकला दैत्याः कलिना च पराजिताः । कृत्वा च जलयानानि हरिखण्डमुपाययुः १ मनुजा हरिखण्डे च देवतुल्या महाबलाः । अयुध्यस्तान्महाशस्त्रैरयुताब्दयजीविनः २ दशवर्षान्तरे सर्वे मायायुद्धैः पराजिताः । महेन्द्रं शरणं जग्मुर्हरिखण्डनिवासिनः ३ तदा तु भगवान्शक्रो विश्वकर्माणमब्रवीत् । ग्रामश्च नाम

समर्थ द्विज पुनः बारा वर्षे देवाची आराधना करण्याकरिता अर्बुदाच्या शिखरावर गेले. तेव्हा ढालतरवार धारण करणारा एक क्षत्रिय अर्बुदापासून उत्पन्न झाला १९–२२ व अजिंक्य म्लेच्छास जिंकन तो चार्ववलि या नावान प्रसिद्ध झाला. त्या शुद्ध पुरुषानें पाच योजनें प्रमाणाची भूमि आपल्या वृद्धीकरिता निर्माण केली. ती चार्वपुरी या नावानें प्रसिद्ध असे. तेव्हा हळू हळू पुनः तेथें आर्यकुलाची वृद्धि झाली २३,२४. त्यानें प्रयत्नानें पन्नास वर्षे मोठें राज्य केलें. बा मुने, तेव्हा त्याच्या वंशांत दहा सहस्र वर्षामध्यें दीडशें राजे झाले. ते म्लेच्छाचे मित्र असून संकर पावले होते. त्या घोर पुरुषानीं म्लेच्छाच्या कन्यांशीं विवाह केले. ते केवळ नावाचे आर्यमार्गी होते २५,२६. तेव्हा मालव देशामध्यें असणाऱ्या एक लक्ष म्लेच्छानीं आर्बुद आर्यांशीं भयंकर युद्ध केलें. एका वर्षामध्यें त्या महाबलाढ्य मालवदेशस्थानीं त्यास जिंकून मंडलीकपद घेतलें. व आर्य चोहोंकडे निघन गेले २७,२८. नंतर भूलोकीं चाळीस हजार वर्षे शेंकडो अल्पायुषी म्लेच्छ राजे झाले २९. त्या राजाची पंचवीस हजार संख्या होती. पण जे पुण्यवान् राजे पूर्वजन्माच्या तपोबलानें उत्पन्न झाले होते त्यांची लीला मुनींनीं पुराणामध्यें वर्णिलेली आहे. ते सर्व अनेक संवत् करणारे, पैशाचधर्मी व वैदिक धर्मास दूषित करणारे होते ३०,३१. याप्रमाणें कलियुगातील नव्वद सहस्र वर्षे गेलीं. सर्व भूमि म्लेच्छमय झाली व प्रत्येक मनुष्य दरिद्री झाला १३२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्यु० प्रतिस० कलियु० चतुर्थखंडातील तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥

सूत ह्मणतातः—तदनंतर कलीनें ज्यास पुढें घातलें आहे असे ते सर्व दैत्य जलयानेकरून हरिखंडामध्यें आले १. हरिखंडातील मानव देवांसारिखे महाबलाढ्य होते. त्यानीं त्या दहा सहस्र वर्षे जगणाऱ्या लोकांशीं महाशस्त्रानीं युद्ध केलें २. दहा वर्षामध्यें मायावी युद्धानीं त्यानीं त्या सर्वांचा

यन्त्रोऽयं संस्थितः] सप्तसिन्धुषु ४ त्वया विरचिता तात तत्प्रभावान्नरा भुवि । अन्यखण्डे न गच्छन्ति स च यन्त्रस्तु मायिना ५ मयेन श्रंशितो भ्रात्रा म्लेच्छैः सार्द्धं समन्ततः । सप्तद्वीपेषु यास्यन्ति मनुजा मम कैरिणः ६ अतो नः पाहि मर्यादां भूमध्ये भवता कृताम् । इति श्रुत्वा विश्वकर्मा दिव्ययन्त्रमचीकरत् ७ तेन यन्त्रप्रभावेन भ्रमितास्ते बभूविरे । भ्रमियन्त्रान्महावायुर्जातो म्लेच्छविनाशकः ८ तद्वायोरभवत्पुत्रो वात्यो वात्या समुद्भवः दैत्ययक्षांश्च पैशाचान्त्रित्वा ज्ञानमयो बली ९ ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्यास्त्रिवर्णास्तेन सत्कृता. । बलान्म्लेच्छान्त्रवर्णमयान्कृत्वा वात्यो महाबलैः १० शताद्धांब्दं मण्डलीक पदं भुवि गृहीतवान् । तदन्वये सहस्राश्च नृपाश्चासन्कलौ युगे ११ वायुरक्षास्त्रिवर्णाढ्याः षोडशाब्दसहस्रके । वायोर्जातः स्वयं ब्रह्मा वायोर्जातः स वै हरिः १२ वायोर्जाता महादेवः सर्वं वायुमयं जगत् । विना वायु मृताः सर्वे वायुना भुवि जीवित. १३ इति मत्वा तु ते लोका वायु च स्वतर्पयन्, पुनस्तदा कलिर्घोरो दैत्यराजं बलिं प्रभुम् १४ नत्वा निवेदयामास दुःखितोऽभूत्तदा बलि । वामनान्तिकमागम्य कलिर्मित्रेण सयुतः १५ नत्वोवाच स वै राजा देवदेव जनार्दनम् । त्वया कलिः कृतो मह्यं प्रसन्नेन सुरोत्तम १६ वार्त्तेर्द्विजैः कर्मभूमः स कलिस्तु निराकृतः । एकपादो व्यतीतोऽयं किञ्चिन्न कलेः प्रभो १७ मया सम्यक्तु वै भुक्ता भूमिर्देवेन्द्रमायया । सहस्राब्द कलौ प्राप्ते मया भुक्त महीतलम् १८ ततः सार्द्धं सहस्राब्दं देवैर्भुक्त सुरस्थलम् । ततः पञ्चशतं वर्षं किञ्चिदधिकमेव च १९ मया भुक्ता कर्मभूमिः सर्वलोकस्य कारणात् । ततः सार्द्धं सहस्राब्द देवैर्भुक्तेय-

---

पराजय केला. तेव्हा हरिखंडनिवासी महेंद्रास शरण गेले ३. त्याबरोबर भगवान् शक्र विश्वकर्म्यास म्हणाला ' अरे बाबा, सात समुद्रामध्यें तूं उत्पन्न केलेलें हें भ्रमिनामक यंत्र ठेविलें होतेंस व त्याच्या प्रभावानें आजपर्यंत भूलोकचे मनुष्य दुसऱ्या खंडामध्यें जात नसत.पण तें तुझें यंत्र मायावी मयानें आपल्या भ्रात्याच्या व म्लेच्छाच्या साहाय्यानें चोहोंकडून तोडून टाकिलें. त्यामुळें माझे वैरी जे मानव ते सप्तद्वीपामध्ये संचार करू लागले. यास्तव, आता तू केलेली भूलोकची आमची मर्यादा राख. ' हें ऐकून विश्वकर्मा एक दिव्य यंत्र करिता झाला ४–७. त्या यंत्राच्या प्रभावानें ते सर्व भ्रमिष्ट झाले. त्या भ्रमियंत्रापासून म्लेच्छाचा नाश करणारा महावायु निर्माण झाला. त्या वायूपासून वातीच्या ठायीं वात्यनामक एक पुत्र झाला. दैत्य, यक्ष व पिशाच यास जिंकून तो ज्ञानमय बलाढ्य वीर ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णाचा सत्कार करिता झाला. त्या महाबलवान् वात्याने म्लेच्छास बलात्कारानें वर्णमय करून ८–१० पन्नास वर्षं भूलोकचें मंडलीकपद स्वीकारिलें. कलियुगामध्ये त्याच्या वंशात सहस्र राजे झाले. सोळा सहस्र वर्षांमध्ये झालेले ते सर्वही वायुपक्षीय तीन वर्णांनीं संपन्न होते. ' वायूपासून स्वतः ब्रह्मदेव झाला; वायूपासून स्वत. हरि झाला व वायूपासून महादेव झाला. तात्पर्य, सर्व जगत् वायुमय आहे. वायूवाचून सर्व मृत होत असून वायूच्या योगानेंच सर्व जीवत राहतात ' ११–१३. असे मानून त लोक वायुस तृप्त करिते झाले. तेव्हा पुनरपि घोर कलि दैत्यराज व प्रभु जो बलि त्यास नमस्कार करून सर्व सागता झाला. तेव्हा बलि दुःखित झाला व कलिमित्रासह वामनाकडे येऊन व त्यास नमस्कार करून तो राजा देवाधिदेव जनार्दनास म्हणाला ' हे उत्तम देवा, माझ्यावर प्रसन्न झालेल्या तू कलि निर्माण केलास. पण त्या कलीस वाय द्विजांनीं कर्मभूमींतून घालवून टाकिलें. हे प्रभो, कलीचा जवळ जवळ एक पाद निघून गेला १४–१७. देवेंद्राच्या मायेनें मीं भूमीचा उत्तम प्रकारें भोग घेतला. कलीचीं सहस्र वर्षं होईपर्यंत मीं भूतलाचा उपभोग घेतल्यावर तदनंतरें दीड हजार वर्षें देवानीं देवस्थलाचा भोग

मुत्तमा २० ततः सार्द्धसहस्राब्दं किञ्चिदूनं मया धृता । सार्द्धद्विरात्सहस्राब्दं दैवैर्दैत्यैस्तथा मही २१ भुक्ता दैत्यैः पुनर्दैवैस्तथा दैवैश्च दानवैः २२ त्वया दत्ता हि मे देव कलिः कलिविनाशन । नाधिकार कृतं नाथ सत्य सत् प्रिय क्षम २३ इति श्रुत्वा बलेर्वाक्यं भगवान्वामनो हरिः । स्वांशान्महीतले प्राप्तो दैत्यपक्षविवर्द्धनः २४ कामशर्मा तदा विप्रो यमुनातटसंस्थितः । हरिं तुष्टाव मनसा द्वादशाब्दं प्रयत्नतः २५ तदा तु वामनः श्रीमान्वरं प्राह द्विजोत्तमम् । वरं ब्रूहि द्विजश्रेष्ठ यत्ते मनसि संस्थितम् २६ इति श्रुत्वा कामशर्मा तुष्टाव श्लक्ष्णया गिरा । कामशर्मोवाच ॥ नमो देवाय महते सर्वपूज्याय ते नमः २७ धर्मप्रियाय धर्माय देवदैत्यकराय च । दैवाधीनसुखं भर्त्रे कर्मकर्त्रे नमो नमः २८ दैवाधीनाश्च ते देवा दैवोल्लङ्घाश्च दानवाः । तेषां भर्ता क्रमाकर्ता तस्मै देवाय ते नमः २९ पुत्रो भव हरे स्वामिन्सफलं वाञ्छितं कुरु । इति श्रुत्वा हरिः साक्षाद्वामनो बलिरक्षकः ३० स्वपूर्वार्द्धद्विवह्न्यां तत्पन्न्यां च समुद्भवः । द्विधा भूत्वा महीं जातौ दिव्याङ्गौ दिव्यविग्रहौ ३१ भोगसिंहः केलिसिंहो देवपो दैत्यपो हरिः । जित्वा वात्योद्भवान्भूपान्कल्पक्षेत्रमुपस्थित ३२ रहःक्रीडावती नाम नगरी मयनिर्मिता । तत्रोष्य बलवन्तौ तौ दधतुश्च कलेर्धुरम् ३३ पत्नीयं सर्वधर्माणां सारभूता सनातनी । पतिव्रतायां ये जाता नरा

घेतला. त्यानंतर पाचशें वर्षापेक्षा काहीं थोडी अधिक वर्षे सर्व लोकाकरितां मी कर्मभूमि भोगिली. त्यानंतर या उत्तम भूमीचा देवांनीं पुनः दीड सहस्र वर्षे भोग घेतला १८–२२. त्यानंतर जवळ जवळ दीड सहस्र वर्षे पृथ्वीचें मीं धारण केलें. तात्पर्य, साडेतीस हजार वर्षे भूलोकाचें पालन देव व दैत्य यांनीं केलें. या भूमीचा प्रथम दैत्यांनीं व नंतर देवांनीं व पुन देवांनीं आणि पुनः दैत्यांनीं याप्रमाणे भोग घेतला २१,२२. हे कलिविनाशन देवा, तूं हा कलि मला दिलास. पण हे नाथ, हे सत्यप्रिय, खरोखर यानें मुळींच अधिकार चालविला नाहीं. याविषयीं मला क्षमा कर' २३. हें बलीचें वाक्य ऐकून वामनसंज्ञक भगवान् हरि आपल्या अंशानें भूलोकीं आला. तो दैत्यपक्षाची वृद्धि करणारा होता २४. त्या वेळीं कामशर्मानामक ब्राह्मण यमुनेच्या तीरीं राहत होता. त्यानें मनानें प्रयत्नपूर्वक बारा वर्षे हरीची स्तुति केली. तेव्हा श्रीमान् वामन त्या द्विजोत्तमास ह्मणाला " हे द्विजश्रेष्ठा, तुझ्या मनामध्यें जो वर असेल तो माग " २५,२६. हें ऐकून कामशर्मा मधुर वाणीनें त्याची स्तुति करूं लागला. कामशर्मा ह्मणतो.— महत्त्वयुक्त देवाला नमस्कार असो. तुज सर्वपूज्य पुरुषास मी नमस्कार करितों. ज्याला धर्म प्रिय आहे, जो स्वतः धर्म आहे; जो देव व दैत्य यास करीत असतो; दैवाच्या अधीन असलेल्या पुरुषाचें जो पोषण करीत असतो व जो कर्म करणारा आहे त्या देवाला नमस्कार असो. देव देवाच्या अधीन असतात व दानव दैवाचें उल्लघन करणारे आहेत. पण क्रमानें त्यांचें पोषण व सहार करणाऱ्या तुज देवाला नमस्कार असो २७–२९. हे हरे, हे स्वामिन्, माझा पुत्र हो व माझें वांछित सफल कर. हे ऐकून बलिरक्षक वामनरूप साक्षात् हरि आपल्या पूर्वार्धापासून त्या ब्राह्मणाची पत्नी जी देवहूति तिच्या ठायीं उत्पन्न झाला. तो दोन प्रकारचा होऊन भूलोकीं दोन दिव्य व सुंदर शरीरें धारण करून उत्पन्न झाला ३०,३१. ह्मणजे तो हरि भोगसिंह व केलिसिंह या नांवानें देवांचे पालन करणारा व दैत्यांचे पालन करणारा झाला. वात्यकुलामध्यें उत्पन्न झालेल्या राजांस जिंकून तो कल्पक्षेत्रामध्यें आला ३२. तेथें मयासुराने निर्माण केलेली रहःक्रीडावती ह्मणून जी नगरी होती तेथें ते दोघेही बलाढ्य वीर राहून कलीचा भार धारण करिते झाले. त्यांची सर्व धर्मांची सारभूत अशी जी सनातनी पतिव्रता पत्नी होती तिच्या ठिकाणीं जे नर झाले ते आर्य व देवांस प्रिय असे होते. पण दूषित

आर्याः सुरप्रिया ३४ दूषितायां नरा जातास्ते सर्वे वर्णसंकराः । इति संचिन्त्य भगवान्कृत्वा कामनयं वपु ३५ दिने दिने सहस्राणि योषितो बुभुजे हरिः । ता. सर्वा गर्भमाधाय यमौ सुषुविरे मुदा ३६ नार्यां तया सहोदर्यां रेमिरे ते सहोदराः । एवं च बहुधा सृष्टिस्तेषां जाता कलौ युग ३७ पूर्वजातांस्त्रिवर्णांश्च भक्षयित्वा दिने दिने । कर्मभूम्यां वर्धयिरे पक्षिणश्च यथा द्रुमे ३८ उभयाब्दसहस्रान्ते तैरन्नाः पूर्वमानवाः । तदा कलेश्च चरणो द्वितीयो भुवि चागमत् ३९ सांप्रत वर्तते वार्ता किन्नराणां च भूतले । द्विकिष्कुमात्राश्च नराः सार्द्धा दैत्यमयाः स्मृताः ४० यथा खगाः कर्महीनाश्चत्वारिंशाब्दजीविनः । भूमिगाश्च तथा ते वै भेदं तेष्वेषु नैव भोः ४१ दृश्यन्ते चाद्य युष्माभिर्भूतले किन्नरा नराः । द्वितीयचरणान्ते च भविष्यन्त्येवमेव हि ४२ न विवाहो न भूपश्च नाधमो न हि कर्मकृत् । भविता च तदा तेषां द्वितीयचरणान्तिके ४३ सपादलक्षाब्दमितमद्यप्रभृति भो द्विजाः । भागकल्पन्थयोद्भूता भविष्यन्ति महीतल ४४ अतो मया च सहिता भवन्तो मुनिसत्तमाः । कृष्णचैतन्यमागम्य गमिष्यामस्तदाज्ञया ४५ व्यास उवाच ॥ इति श्रुत्वा तु मुनयो विशालापुरिवासिनः । भो मनस्ते गमिष्यन्ति यज्ञांश प्रति हर्षिताः ४६ नत्वा सर्वे मुनिश्रेष्ठा यज्ञांश यज्ञरूपिणम् । वचन च वदिष्यन्ति देह्याज्ञां भगवन्प्रभो ४७ इन्द्रलोक गमिष्यामो नाकमध्य मनोहरम् । इति श्रुत्वा तु यज्ञांशः सर्वशिष्यसमन्वितः ४८ तैः सर्वैः सह स्वर्लोक गमिष्यति सुरप्रियः । तदा कलिः सम दैत्यैर्भजिष्यति महीत-

---

ह्मणून जी पत्नी होती तिच्या ठायीं जे नर झाले ते सर्व वर्णसंकररूप होते. पण या गोष्टीचा विचार करून भगवान् काममय शरीर धारण करिता झाला व त्या हरीनें प्रतिदिनीं सहस्र स्त्रियांचा उपयोग घेतला. तेव्हा त्या सर्व गरोदर होऊन आनदानें जुळ्या मुलास जन्म देत्या झाल्या ३३-३६. पुढें त्या सहोदर स्त्रीजींच ते सहोदर पुरुष रममाण झाले. याप्रमाणे कलियुगामध्यें त्याची असंख्य सृष्टि झाली ३७. पूर्वी झालेल्या त्रिवर्णांच्या लोकास प्रतिदिनीं भक्षण करून वृक्षावरील पक्ष्याप्रमाणें ते कर्मभूमीमध्यें वाढले ३८. याप्रमाणें दोन सहस्र वर्षे झालीं असता त्यानीं पूर्वीच्या सर्व मानवास खाऊन टाकिलें. त्या वेळीं भूलोकीं कलीचा दुसरा चरण लागला होता ३९. आता यापुढें भूलोकीं किन्नरांची वार्ता चालणार. ते दैत्यस्वभावाचे पुरुष केवळ अडीच हात उंच होते असे सांगितलें आहे. ज्याप्रमाणें पक्षी कर्महीन व चाळीस वर्षे वाचणारे असतात त्याप्रमाणेच हे भूमीवरील प्राणीही झाले. आज तुह्मास भूतलावरील किन्नररूप नरामध्यें व याच्यामध्यें मुळींच भेद दिसणार नाहीं. असो. कलीच्या दुसऱ्या चरणाच्या शेवटीं ते सर्व अशा प्रकारचे होणार आहेत ४०-४२. त्या द्वितीय चरणाच्या अंतीं त्यांच्यामध्यें विवाहपद्धति राहणार नाहीं, राजा राहणार नाहीं, कोणत्याही प्रकारचा उद्योग राहणार नाहीं व कोणी कर्म करणाराही राहणार नाहीं ४३. हे ब्राह्मणहो, आजपासून सव्वा लक्ष वर्षेपर्यंत भोगकेलीच्या वंशामध्ये उत्पन्न झालेले लोक भूलोकीं होतील ४४. यास्तव, अहो उत्तम मुनिहो, माझ्यासहवर्तमान तुह्मी कृष्णचैतन्याकडे चला व त्याच्या आज्ञेने आपण स्वर्गलोकीं जाऊं ४५. व्यास ह्मणतातः—हे मना, हें ऐकून विशालापुरीमध्यें असणारे मुनि, मोठ्या आनदानें यज्ञांशाकडे जातील ४६ व ते सर्वही मुनिश्रेष्ठ यज्ञरूपी यज्ञाशास नमस्कार करून "हे प्रभो, हे भगवन्, आह्मास आज्ञा दे. आह्मी स्वर्गलोकांतील मनोहर इंद्रलोकास जातों" असें वचन बोलतील व हें ऐकून देवप्रिय यज्ञांश सर्व शिष्यांसहवर्तमान त्या सर्वांसही बरोबर घेऊन स्वर्गलोकीं जाईल व कलि दैत्यासह भूलोकचा उपभोग घेईल ४७-४९. हे उत्तम इंद्रिया, आता आणखी दुसरें काय ऐकण्याची इच्छा करतेस तें सांग. मन ह्मणतेः—हे भगवन्, हे प्रभो, भोगकेलीचें चरित्र विस्तारपूर्वक सांगा. कलियुगामध्यें

लम् ४९ किमन्यच्छ्रोतुमिच्छा ते हृदीकोत्तम तद्वद । मन उवाच ॥ भगवन्विस्तरादब्रूहि भोग-कलिचरित्रकम् ५० कलौ यथा भविष्यन्ति मनुजास्तत्तथा प्रभो । व्यास उवाच ॥ भोगसिंहे केलि-सिंहे वामनांशसमुद्भवे ५१ जित्वा दैत्या नरमया नरान्वात्योद्भवान्भुवि । वामनांशमुपागम्य हर्षिताः सर्वभूविरे ५२ तदा तु दुःखिता देवास्त्यक्त्वा मूर्तीः समन्ततः । कृष्णचैतन्यमागम्य नत्वोचुर्नतकन्धराः ५३ भगवंस्तत्प्रसादेन चरणः प्रथमः कलेः । भुक्ता तथा मही स्वामिन्नित्वा दैत्यपूजकान् ५४ किं कर्तव्यं च यज्ञांश नमस्ते करुणाकर । इति श्रुत्वा हरिः प्राह शृणुध्वं सुरसत्तमाः ५५ अहं स्वर्गं गमिष्यामि भवद्भिः सह हर्षितः । अतो यूयं सुराः सर्वे देववंशान्नरान्सदा ५६ उत्थाय शीघ्रमागम्य गच्छध्वं च त्रिविष्टपम् । इति सूतेन कथिते मुनिन्यति सुमण्डलम् ५७ देवा विमानमादाय तत्र यास्यन्ति भो मनः । सूतादींश्च मुनीन्सर्वान्समारुह्य सुरास्तदा ५८ यज्ञांशं च गमिष्यन्ति नदीहोपवने तदा । आह्लादश्च तदा योगी गोरखाद्यास्तथैव च ५९ शंकराद्याश्च रुद्रांशा नृपो भर्तृहरस्तदा । अन्ये तु योगनिष्ठाश्च गमिष्यन्ति हितप्रदा ६० तैः सार्द्धं कृष्णचैतन्यो देवलोकं गमिष्यति । तदा तौ वामनांशौ च द्वितीयचरणे कलौ ६१ योगनिष्ठां समाधाय कल्पक्षेत्रे वसिष्यतः । तदैव सकला दैत्या हर्षितास्तैर्नृभिर्मुहुः ६२ विवरान्बर्द्धयिष्यन्ति पातालाद्यान्समन्ततः । कलेस्तृतीयचरणे सम्प्राप्ते किन्नराश्च ते ६३ शनैः शनैः क्षयं भूमौ गमिष्यन्ति समन्ततः । षड्विंशाब्दसहस्रं च तृतीयचरणे गते ६४ रुद्राज्ञया भृङ्गऋषिर्भूतपक्षो गमिष्यति । सौरभी नाम तत्पत्नी जनिष्यति महाबलान् ६५ कोलकल्पान्नरान्घोरान्सर्वांकिन्नरभक्षकान् । षड्विंशाब्दवयस्तेषां भविष्यति दा कलौ ६६ शरण वामनांशं च गमिष्यन्ति सकिन्नराः ।

मनुष्यें कशीं होतील तें मला ऐकूं दे. वामनाच्या अंशापासून भोगसिंह व केलिसिंह उत्पन्न झाले असता नररूपी दैत्य वात्यकुलामध्यें झालेल्या भूलोकच्या नरास जिकून वामनांशाजवळ आले व अत्यंत आनंदित झाले ५०—५२. तेव्हा दुःखयुक्त झालेले देव चोहोंकडील मूर्तींचा त्याग करून व कृष्णचैतन्याकडे येऊन त्यास नमस्कार करून व मस्तकें लववून ह्मणाले ५३ " हे भगवन्, तुझ्या प्रसादानें कलीच्या प्रथम चरणांत आह्मीं दैत्यपूजकास जिकून पृथ्वीचा भोग घेतला. आतां हे स्वामिन्, हे यज्ञांश, हे करुणाकरा, आह्मीं काय करावें ? तुला नमस्कार असो. " हें ऐकून हरि ह्मणाला ५४ " अहो उत्तम देवांनों, ऐका ५५. मी तुह्मासहवर्तमान आनंदानें स्वर्गास जाईन. यास्तव, हे देवहो, तुह्मी सर्व देववंशांत उत्पन्न झालेल्या मनुष्यांस घेऊन त्वरित या व स्वर्गलोकीं चला. " याप्रमाणें सूताने मुनींस सांगितलें असतां हे मना, देव सुंदर मंडलाकार विमान घेऊन तेथें जातील व सूतादिक सर्व मुनींस त्यांत बसवून नदीहोपवनामध्यें असलेल्या कृष्णाशाकडे येतील. त्या वेळीं योगी आल्हाद व त्याचप्रमाणें गोरख इत्यादि योगी, शंकरादि रुद्राचे अंश, राजा भर्तृहर व दुसरेही हितकारक योगनिष्ठ पुरुष तेथें जातील व त्यांच्यासहवर्तमान कृष्णचैतन्य देवलोकीं जाईल. तेव्हा कलियुगांतील द्वितीय चरणामध्यें ते दोघे वामनांश योगनिष्ठा धारण करून कल्पक्षेत्रामध्ये राहतील. त्या राजाकडून वारंवार आनंदित झालेले सर्व दैत्य ५६-६२ पातालादि विवरें चोहोंकडून भरभराटीस आणतील. कलीचा तिसरा चरण लागला असतां ते भूलोकचे किन्नर हळु हळु चोहोंकडून नाहींसे होतील. तृतीय चरणाचीं सव्वीस हजार वर्षें झालीं असतां भृंगाचा पक्ष घेणारा भृंगऋषि रुद्राच्या आज्ञेनें भूलोकीं जाईल. त्याची सौरभीनामक पत्नी महाबलाढ्य, डुकरासारख्या, घोर व सर्व किन्नरांस खाणाऱ्या नरांस उत्पन्न करील. त्या वेळीं कलियुगामध्ये त्यांची सव्वीस वर्षांची आयुष्यमर्यादा होईल. तेव्हा

भोगसिंहः केलिसिंहस्तैश्च सार्द्धं महद्रणम् ६७ करिष्यते दशाब्दं च पुनस्तैश्च पराजितौ ।
दैत्यैः सार्द्धं च पाताले वामनांशौ गमिष्यतः ६८ भृङ्गसृष्टिर्महाघोरा भविष्यति तदा कलौ ।
मातृः स्वसॄः सुतास्ते वै नराश्च पशुरूपिणः ६९ भुक्त्वा प्रीत्या च कामान्धा जनिष्यन्ति सुतान्बहून् । कलेस्तृतीयचरणे समाप्ते तास्तु सप्रजाः ७० तिर्यग्योनिधरा घोराः क्षयिष्यन्ति कलौ युगे । कलेश्चतुर्थचरणे सम्प्राप्ते तु तदा नराः ७१ विंशदब्दवयस्काश्च मरिष्यन्ति च नारकाः । यथा जलमनुष्याश्च तथैव वनजा नराः ७२ कन्दमूलफलाहारा भविष्यन्ति कलौ तदा । अलोका ये तु विख्यातास्तामिस्राद्या भयानकाः ७३ ते सर्वे पूर्णमेष्यन्ति कर्मभूमिभवैर्नरैः । यथा सत्यस्य प्रथमे चरणे सत्यलोककः ७४ द्वितीये च तपोलोको जनलोकस्तृतीयकः । चतुर्थे स्वर्गलोकश्च पूरितः कर्मभूमिजैः ७५ त्रेतायुगाद्यचरणे भुवर्लोक ध्रुवास्पदम् । स्वर्गलोकं यथा तैश्च मनुजैः पूरितं स्मृतम् ७६ द्वितीये ऋषिलोकं च तृतीये ग्रहविष्टपम् । चतुर्थे च भुवर्लोक पूरितं कर्मजैर्नरैः ७७ द्वापराद्यपदे पूर्णे भवेद्द्वीपः सुपुष्करः । द्वितीये शाल्मलः क्रौञ्चस्तृतीये द्वीपशक्रः ७८ जम्बुद्वीपश्चतुर्थे च चरणे मुनिभिः स्मृतः । कलेश्च चरणे चाद्येऽधश्चोर्ध्वं पूरितं जगत् ७९ द्वितीये सप्तपातालस्तृतीये भूतविष्टपम् । पूरितं मनुजैस्तत्र कर्मभूमिसमुद्भवैः ८० तदाद्य नारकास्सर्वे पूर्णमेष्यन्ति तैर्नरैः । इति ते कथितं सर्वं यत्पृष्टोऽहं त्वयानघ ८१ [५८८९]
इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥

किन्नरांसहवर्तमान दैत्य भोगसिंह व केलिसिंहसंज्ञक वामनाशास शरण जातील आणि भोगसिंह व केलिसिंह त्यान्यार्शी दहा वर्षे मोठें युद्ध करतील व त्यांनीं पराजय केला असता ते दोघेही वामनाश दैत्यांसह पुनः पातालामध्यें जातील ६३—६८. त्या वेळीं कलियुगामध्य भृंगाची सृष्टि महाघोर होईल. ते पशुरूपी नर कामाध होऊन मोठ्या प्रेमानें माता, भागिनी व कन्या यांचा भोग घेतील व असंख्य पुत्रास उत्पन्न करतील. कलीचा तिसरा चरण संपला असता ती सृष्टि घोर व तिर्यग्योनि धारण करणारी होऊन कलियुगामध्ये नाश पावेल. कलीचा चतुर्थ चरण लागला असता त्या वेळीं मानव वीस वर्षान्या वयांच होऊन मरतील व नरकगामी होतील. ज्याप्रमाणें जलमनुष्ये असतात त्याचप्रमाणे ते वनामध्यें निर्माण झालेले पुरुष होतील. त्या कलियुगामध्यें ते कद, मूलें व फलें खाऊ लागतील. तामिस्रादिक जे भयकर अलोक ह्मणून प्रसिद्ध आहेत ते सर्व कर्मभूमीमध्ये उत्पन्न झालेल्या नरांनीं भरून जातील. ज्याप्रमाणे सत्ययुगान्या प्रथम चरणामध्यें सत्यलोक, द्वितीय चरणामध्यें तपोलोक, तृतीय चरणामध्ये जनलोक व चतुर्थ चरणामध्यें स्वर्गलोक कर्मभूमीमध्ये उत्पन्न झालेल्या मनुष्यानीं परिपूर्ण झाला होता ६९–७५; त्रेतायुगाच्या आद्य चरणामध्य भुवर्लोक, ध्रुवस्थान व स्वर्गलोक ज्याप्रमाणे त्या मनुष्यानीं भरून जातो असें ह्मणतात ७६ व दुसऱ्या चरणामध्ये ऋषिलोक, तिसऱ्या चरणामध्यें ग्रहस्थान व चवथ्या चरणामध्ये भुवर्लोक कर्मोत्पन्न नरानी भरून जातो ७७; द्वापराचा आद्यचरण पूर्ण झाला असता सुपुष्कर द्वीप, दुसऱ्या चरणामध्ये शाल्मलद्वीप, तृतीय चरणामध्यें राहिलेलें क्रौंच द्वीप व चतुर्थ चरणामध्यें जंबुद्वीप जसें पूर्ण होतें असें मुनींनीं सागतेलेले आहे; तसेंच कलीच्या प्रथम चरणामध्यें अधः व ऊर्ध्व असें संपूर्ण जगत् भरून गेलें ७८,७९. दुसऱ्या चरणात सप्त पाताल व तृतीय चरणात भूतस्थान कर्मभूमीमध्यें उत्पन्न झालेल्या मनुष्यानीं भरून गेलें आहे ८०. आतां या चवथ्या चरणामध्ये त्या नराच्या योगाने सर्व नरक भरून जातील. हे मना, याप्रमाणें तूं जें विचारलें होतेस तें मी तुला सागितलें ८१. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणाच्या चतुर्यु० प्रतिस० कलियु० चतुर्थखंडातील चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥

व्यास उवाच ॥ चतुर्थचरणे जातैर्मनुजैरेकविंशतिः । अजीर्णभूता नरका यास्यन्ते च यमालयम् १ नमस्ते धर्मराजाय नश्च तृप्तिकराय च । वचनं शृणु सर्वज्ञ नश्च जातमजीर्णकम् २ यथा भवामः सुकृतिं तथा कुरु सुरोत्तम । इति श्रुत्वा धर्मराजश्चित्रगुप्तेन संयुतः ३ ब्रह्माणं च समिष्यन्ति सन्ध्यायां च कलौ युगे । चतुरश्च यमान्दृष्ट्वा परमेष्ठी पितामहः ४ तदीरितं स्वयं ज्ञात्वा क्षीराब्धिं प्रति यास्यति । पूजयित्वा जगन्नाथं देवदेवं वृषाकपिम् ५ सांख्यशास्त्रमयैः स्तोत्रैः संतोष्यति परं प्रभुम् ६ जय जय जय निर्गुण गुणधारिन् अगजगजीवतत्त्वशुभकारिन् । सारभूत सद्गुणमय तत्त्वैर्देवान्रचयति पाति गुणतत्त्वैः ॥ तस्मै नमो नमो गुणराशे देववृन्दहृदि कृष्ण विकाश । रजोभूततत्त्वैरथ उताश्च विरचिति भुवि च नरान्स्वयमाशु । पाति हन्ति यो देव उदारस्तस्य शिरसि संस्थितजगभारः ॥ पाहि नाथ दैत्यविनाशिन्कालजनितलीलागुणभासिन् ८ तथामिति वचन प्रभ श्रुत्वा ह्यजेभिवाशु । यथा जनिष्यति स प्रभुस्तच्छ्रुणु वै मन आशु ९ नम्रीभूतान्सुरान्विष्णुर्नमोवाक्येन तान्प्रति । वादिष्यति वचो रम्य लोकमङ्गलहेतवे १० भोः सुराः सभलग्रामे कश्यपोऽयं जनिष्यति । नाम्ना विष्णुयशा. रूयातो विष्णुकीर्तिस्तु तत्प्रिया ११ कृष्णलीलामय ग्रन्थ नरांस्ताञ्छ्रावयिष्यति । तदा ते नन्दिनो भूत्वा चैकीभूय समन्ततः १२ त द्विज विष्णुयशस गृहीत्वा निगडैर्दृढैः । बद्ध्वा सर्वे सपत्नीक कारागारे दृढा यसे १३ करिष्यन्ति महाधूर्ता नरका इव दारुणाः । विष्णुकीर्त्या स भगवान्पूर्णा नारायणो

व्यास ह्मणतातः– चतुर्थ चरणामध्यें उत्पन्न झालेल्या मनुष्याच्या योगानें व्यास अजीर्ण झालें आहे असे एकवीस नरक यमाच्या गृहीं जातील व " आमचीं तृप्ति करणाऱ्या तुज धर्मराजाला नमस्कार असो. हे सर्वज्ञा, आमच वचन ऐक. आह्मास अजीर्ण झालें आहे. यास्तव, हे उत्तम देवा, ज्याच्या योगानें आह्मी स्वस्थ होऊ असें कर " असें ह्मणतील. हें ऐकून चित्रगुप्तासह धर्मराज कलियुगाच्या सन्ध्यासमयीं ब्रह्मदेवाकडे जाईल. चतुर परमेष्ठी पितामह त्या यमास पाहून व त्याचें ह्मणणें स्वतः ऐकून घेऊन क्षीरसागरीं जाईल व त्या जगन्नाथ देवाधिदेव वृषाकपीची पूजा करून त्या परम प्रभूची सांख्यशास्त्रमय स्तोत्रानीं स्तुति करील १–७ " हे निर्गुण, हे गुणाधार, हे स्थावर व जंगमरूप शुभ जीवतत्त्व करणाऱ्या ईश्वरा, तुझा जयजयकार असो. हे सारभूत, हे सद्गुणमय, तू गुणाऱ्या सत्त्वानीं व तत्त्वाऱ्या योगानें देवाची रचना व पालन करितोस. हे गुणराशे, तुला नमस्कार असो. देववृंदाऱ्या हृदयामध्यें, हे कृष्णा, तू विकास पावत असतोस. रजोरूप भूततत्त्वापासून तू तात्काळ भूलोकीं मनुष्यास निर्मीत असतोस व जो उदार देव स्वतः त्याचें पालन करितो व त्याचा संहार करितो त्याच्याच मस्तकावर हा जगाचा भार आहे. हे दैत्याचा नाश करणाऱ्या देवा, व हे कालापासून निर्माण झालेल्या लीलाचे गुण प्रकाशित करणाऱ्या ईश्वरा, आमचें रक्षण कर. " हे त्याचे वचन ऐकून तो प्रभु तात्काळ भूलोकीं कसा उत्पन्न होईल, तें हे मना, तूं आता ऐक. नम्र झालेल्या त्या देवास विष्णु लोकाच्या मंगलाकरिता ' नमो ' असें वाक्य उच्चारून रम्य वचन बोलेल ८–१०. अहो देवानों, सभल ग्रामामध्यें हा कश्यप उत्पन्न होईल. तो विष्णुयशा या नावानें प्रसिद्ध होऊन विष्णुकीर्ति ह्मणून त्याची प्रिय पत्नी असेल ११. तो कृष्णलीलामय ग्रंथ मनुष्यास ऐकवील. तेव्हा ते नंदिकुलोत्पन्न चोहोंकडून एके ठिकाणीं जमून त्या विष्णुयशा ब्राह्मणास पकडतील व त्याच्या पत्नीसह दृढ शृखलानीं बांधून त्यास लोखंडाच्या दृढ कारागारामध्यें टाकितील. कारण, ते भयंकर व महाधूर्त नरकगामीच लोक असतील. पण तो भगवान् पूर्ण नारायण हरि व सर्व लोकांचें कल्याण करणारा महाविष्णु विष्णुकीर्तीच्या ठायीं जन्म.

हरिः १४ जनिष्यति महाविष्णुः सर्वलोकशिवङ्करः । निशीथे तमसोद्भूते मार्गकृष्णाष्टमीदिने १५ ब्रह्माण्डं मङ्गलं कुर्वन्सुराभ्यादुर्भविष्यति । ब्रह्मा विष्णुर्हरश्चैव गणेशो वासवो गुहः १६ यद्वह्निः पितृपतिर्यक्षो वरुणः सविभीषणः । चित्तो वायुर्ध्रुवो विश्वे रविः सोमः कुजो बुधः १७ गुरु शुक्रः शनी राहुः केतुस्तत्र गमिष्यति । पद्यैकैकेन ते देवाः स्तोष्यन्ति परमेश्वरम् १८ महत्तमा मूर्तिमयी तवाजा तदास्य पूर्वाज्जनितोऽहमादौ । मया ततं विश्वमिदं सदैव यतो नमस्तत्पुरुषोत्तमाय १९ अजस्य याम्याज्जनितोऽहमादौ विष्णुर्महत्कल्पकरोऽधिकारी । स्वकीयनाम्ना तु मया ततं तद्विश्वं सदैवं च नमो नमस्ते २० अव्यक्तपाश्चात्यमुखाच्च जन्मा शिवोऽहमादौ सुरतत्त्वकारी । मया महत्कल्पकरस्तृतीयस्त्वदाज्ञया देव नमो नमस्ते २१ प्रधानवक्त्रोत्तरतोऽहमादौ जातो गणेशः किल कल्पकर्ता । मया ततं विश्वमिदं सदैव तस्मै नमः कारुणिकोत्तमाय २२ अजार्द्धवक्त्राज्जनितोऽहमादौ मरुन्महत्कल्पकरा महेन्द्रः । मया ततं विश्वमिदं स्वकल्पे यदाज्ञया देव नमो नमस्ते २३ प्रधानभालाक्षिसमुद्भवोऽहं वह्निर्महत्कल्पकरो गुहाख्यः । विनिर्मितं विश्वमिदं मया तद्यदाज्ञया नाथ नमो नमस्ते २४ अजाभुजात्पूर्वगताच्च जातश्चादौ महत्कल्पकरोऽहमग्निः । ब्रह्माण्डमेतच्च मया ततं वै ब्रह्माण्डकल्पाय नमो नमस्ते २५ अजाभुजादक्षिणतोऽहमादौ जातो महत्कल्पकरः स धर्मः । मया सदैवं रचितं समग्रं लिङ्गाख्यकल्पाय नमो नमस्ते २६

घेईल. तो मार्गशीर्ष कृष्ण अष्टमीच्या दिवशी अधारात्रीं भरलेल्या मध्यरात्री देवास सर्व ब्रह्माड मंगलरूप करीत प्रकट होईल. त्या वेळीं ब्रह्मदेव, विष्णु, हर, गणेश, इंद्र, गुह, अग्नि, यम, यक्ष, वरुण, विभीषण, चित्त, वायु, ध्रुव, विश्वेदेव, रवि, चंद्र, मंगल, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु व केतु तेथें प्राप्त होतील व ते देव एकेक पद्यानें परमेश्वराची अशी स्तुति करितील. " तुझी अति मोठी व मूर्तिमयी अशी जी जन्मशून्य माया तिच्या पूर्वमुखातून मी प्रथमत उत्पन्न झालों व ज्याच्या सामर्थ्यानेंच मीं देवासह हे सर्व विश्व व्यापिलें आहे त्या पुरुषोत्तमास नमस्कार असो. जन्मशून्य असा जो ईश्वर त्याच्या दक्षिणमुखातून मी प्रथमत. उत्पन्न झालो. मी सर्वांमध्यें प्रवेश करणारा, महाकल्प करणारा व अधिकारी आहें. आपल्या विष्णु या नावानेंच देवासह हें सर्व विश्व मी ज्याच्या सामर्थ्यानें व्यापिलें त्या तुला नमस्कार असो १२–२०. अव्यक्ताच्या पाश्चात्य मुखापासून प्रथमत. उत्पन्न झालेला मी शंकर आहे. मी मोठा कल्प करणारा व हे देवा, तुझ्या आज्ञेने तिसरा देव झालों आहें. तुला नमस्कार असो. मी प्रथम उत्तरेकडील प्रधान मुखातून झालो. मी कल्पकर्ता गणेश आहें. ज्याच्या सामर्थ्यानें देवासह मीं हे सर्व विश्व व्यापिलें आहे त्या तुज उत्तम कारुणिकास नमस्कार असो. मी प्रथमत. अजाच्या अर्ध मुखापासून उत्पन्न झालो. मी देवाचा महाकल्प करणारा महेंद्र आहें. मी ज्याच्या आज्ञेनें हें विश्व आपल्या कल्पामध्यें व्यापिलें आहे त्या देवाला नमस्कार असो. मी ललाटावरील मुख्य नेत्रापासून उत्पन्न झालो. अग्नीचा महत्कल्प करणारा मी गुहसंज्ञक आहे. हे नाथ, ज्याच्या आज्ञेनें मीं हे विश्व निर्माण केलें त्या तुला नमस्कार असो २१—२४. प्रथमत. मी ज्या जन्मशून्य ईश्वराच्या पूर्वेकडील हस्तापासून उत्पन्न झालों व महत्कल्प करणारा अशा मी अग्नीनें ज्याच्या सामर्थ्यानें हें ब्रह्माड व्यापिलें आहे त्या ब्रह्माडकल्पास नमस्कार असो २५. मी शक्तीच्या दक्षिणेकडील भुजेपासून उत्पन्न झालों. मी महत्कल्प करणारा धर्म आहें. मीं देवासह संपूर्ण विश्व रचिलें. तुज लिंगसंज्ञक कल्पास नमस्कार असो. अजेच्या पश्चिम भुजेपासून निर्माण झालेला व महत्कल्प करणारा असा मी यक्ष आहे. मीं संपूर्ण विश्व व्यापिले आहे. तुज मत्स्याख्य

अजाभुजात्पश्चिमतोऽहमादौ जातो महत्कल्पकरः स यक्षः । मया तत विश्वमिद समग्र मत्स्या-
रूयकल्पाय नमो नमस्ते २७ प्रधानबाहूत्तरतोऽहमादौ जातो महत्कल्पकर प्रचेताः । मया ततं
नाथ तवाज्ञयेदं कर्मारूयकल्पाय नमो नमस्ते २८ ब्रह्माण्डतमसो जातस्त्वद्दासोऽह विभीषणः ।
मया ततं त्रिलोक च नमस्ते मनुरूपिणे २९ ब्रह्माण्डसदृगुणाज्जातश्चित्तोऽह मनुकारकः । मया
ततं च त्रैलोक्य स्वायभुव नमोऽस्तु ते ३० ब्रह्माण्डरजसो जातो वायुर्मन्वन्तर ततम् ।
मया स्वारोचिषा स्वामिन्नमस्ते मनुरूपिणे ३१ ब्रह्माण्डमनसो जातो ध्रुवोऽह मनुकारक. ।
मयोत्तमं च रचितं नमस्तेऽस्तु तवाज्ञया ३२ ब्रह्माण्डश्रवणाज्जातो विश्वकर्माहमीश्वरः ।
मया ततं रैवतं च नमो देव तवाज्ञया ३३ ब्रह्माण्डदेहतो जातस्सूर्योऽह चाक्षुषप्रदः ।
तवाज्ञया ततं विश्वं मनुरूपाय ते नम ३४ ब्रह्माण्डनेत्रतो जातः सोमाऽह तु मया ततम् ।
वैवस्वतान्तरं रम्यं नमस्ते मनुरूपिणे ३५ ब्रह्माण्डरसनाज्जातो मोहोऽह, मनुकारक. ।
नमस्ते मनुरूपाय मया सावर्णिक ततम् ३६ ब्रह्माण्डघ्राणतो जातो बुधोऽह नाथ किङ्करः ।
निर्मितं ब्रह्मसावर्ण्यं मया तात नमो नमः ३७ ब्रह्माण्डवक्त्रतो जातो जीवोऽह मनुकारकः ।
मया वै दक्षसावर्ण्यं तत तत्त्व नमो नम ३८ ब्रह्माण्डकरतो जातः शुक्रोऽह तव किङ्करः ।
निर्मितं रुद्रसावर्ण्यं मया तुभ्य नमो नमः ३९ ब्रह्माण्डपदतो जातो मन्दोऽह नाथ तेऽनुग. । तत
वै धर्मसावर्ण्यं प्रभो तस्मै नमो नमः ४० ब्रह्माण्डलिङ्गतो जातो राहुश्चाह तव प्रिय. । मया भौम

कल्पास नमस्कार असो. मी प्रथमतः उत्तरेकडील प्रधान बाहूपासून निर्माण झालेला व महत्कल्प करणारा प्रचेता (वरुण) आहे. हे नाथ, तुझ्या आज्ञेनें मीं हें व्यापिलें आहे. तुज कूर्मसंज्ञक कल्पास नमस्कार असो २६--२८. ब्रह्माडाच्या तमोगुणापासून झालेला मी तुझा दास विभीषण आहे. मीं त्रलोक्य व्यापिलें आहे. तुज मनुरूपी ईश्वरास नमस्कार असो २९. ब्रह्माडाच्या सत्त्वगुणापासून झालेला मी मनु करणारा चित्त आहें. मीं त्रैलोक्यास व्यापिलें आहे. हे स्वायंभुव, तुला नमस्कार असो. ब्रह्माडाच्या रजोगुणापासून झालेला मी वायु आह. हे स्वामिन्, स्वारोचिष या नावाच्या मन्वंतरास मीं व्यापिलें आहे. तुज मनुरूपी ईश्वरास नमस्कार असो. ब्रह्माडाच्या मनापासून झालेला व मनु करणारा मी ध्रुव आहें. मी तुझ्या आज्ञेनें उत्तमाची रचना केली आहे. तुला नमस्कार असो ३०–३२ ब्रह्माडाच्या श्रवणेंद्रियापासून झालेला मी विश्वकर्मा ईश्वर आहे. मी तुझ्या आज्ञेनें रैवतास व्यापिलें आहे. हे देवा, तुला नमस्कार असो ३३. ब्रह्माडाच्या देहापासून झालेला व प्राण्यास नेत्रसंबधीं शक्ति देणारा मी सूर्य आहे. मीं तुझ्या आज्ञेनें विश्वास व्यापिलें आहे. तुज मनुरूपास नमस्कार असो ३४. ब्रह्माडाच्या नेत्रापासून झालेला मी सोम आहें. मीं रम्य वैवस्वत मन्वंतरास व्यापिले आहे. तुज मनुरूपी ईश्वरास नमस्कार असो ३५. ब्रह्माडाच्या रसनेंद्रियापासून झालेला व मनंस करणारा मी मोह आहे. तुज मनुरूपी ईश्वरास नमस्कार असो. मीं सावर्णी मन्वंतर व्यापिलें आहे ३६. ब्रह्माडाच्या प्राणापासून झालेला मी बुध, हे नाथ, तुझा किंकर आहें. हे तात, मीं ब्रह्मसावर्ण्य निर्मिले. तुला नमस्कार असो. ब्रह्माडाच्या मुखापासून झालेला व मनु करणारा मी जीव आहे. मीं दक्षसावर्ण्यास व्यापिले आहे. तुला नमस्कार असो ३७,३८. ब्रह्माडाच्या हस्तापासून झालेला मी शुक्र तुझा किंकर आहें. मीं रुद्रसावर्ण्यास निर्माण केले. तुला नमस्कार असो. ब्रह्माडाच्या पायापासून झालेला मी शनि, हे नाथ, तुझा अनुयायी आहे. मीं धर्मसावर्ण्य व्यापिलें आहे. हे प्रभो, तुला नमस्कार असो ३९,४०. ब्रह्माडाच्या लिंगापासून झालेला व तुला प्रिय असलेला

कृतं नाथ नमस्ते मनुरूपिणे ४१ ब्रह्माण्डगुह्यतो जातः केतुश्चाहं तवानुगः । मौतं मन्वन्तरं सृष्टं तस्मै देवाय ते नमः ४२ व्यास उवाच ॥ इति तेषां स्तवान्स्वामी श्रुत्वा देवान्वादिष्यति । वरं ब्रूहीति वचनं तं तं प्रति मनः क्रमात् ४३ इति श्रुत्वा तु ते देवा बालरूपं हरिः स्वयम् । नम स्कृत्य कथिष्यन्ति वाञ्छितं लोकहेतवे ४४ भवान्ब्रूहि तु लोकानां कल्पे कल्पे समुद्भवम् । तथा मन्वन्तरे चैव श्रोतुमिच्छामहे वयम् ४५ कल्कयुवाच ॥ अष्टादशमहाकल्पाः प्रकृतेश्च तनौ स्थिताः । आद्यो ब्रह्ममहाकल्पस्तत्र ब्रह्मा पर पुमान् ४६ तत्पूर्वार्द्धात्समुद्भूताश्चयस्त्रिंशच्च देवताः । पराद्धाद्भगवान्ब्रह्मा योगिध्येयो निरञ्जनः ४७ तस्मिन्कल्पे तु या लीला ब्रह्मपौराणिकैः स्मृता । शतकोटिप्रविस्तारो ब्रह्मपौराणिकस्य वै ४८ पुराणपुरुषस्यान्ते महाकल्पः स्मृतो बुधैः । ब्रह्मा-ण्डप्रलये कल्पो युगदैवसहस्रकः ४९ कल्पाश्चाष्टदशाः ख्यातास्तेषां नामानि मे शृणु । कूर्मकल्पो मत्स्यकल्पः श्वेतवाराहकल्पकः ५० नृसिंहकल्पश्च तथा तथा वामनकल्पकः । स्कन्दकल्पो राम-कल्पः कल्पो भागवतस्तथा ५१ तथा मार्कण्डकल्पश्च तथा भविष्यकल्पकः । लिङ्गकल्पस्तथा ज्ञेयस्तथा ब्रह्माण्डकल्पकः ५२ अग्निकल्पो वायुकल्पः पद्मकल्पस्तथैव च । शिवकल्पो विष्णु-कल्पो ब्रह्मकल्पस्तथा क्रमात् ५३ द्विसहस्रमितावर्तैरेषां कल्पो महान्स्मृतः । सहस्रयुगपर्यन्तं ब्रह्माण्डायुः प्रकीर्तितम् ५४ यन्नाम्ना च स्मृतः कल्पस्तस्माज्जातो विराडयम् । चतुर्दशमनूनां च मध्ये कल्पः स कालवान् ५५ स्वायंभुवान्तरे यद्वै जात जातं चतुर्युगम् । तस्मिंश्चतुर्युगे सर्वे नृणामायुर्हरे शृणु ५६ लक्षाब्द वै सत्ययुगे त्रेतायामयुताब्दकम् । द्वापरे च सहस्राब्द कलौ

मी राहु आहें. हे नाथ, मीं भौम मन्वंतर केलें. तुज मनुरूपी ईश्वरास नमस्कार असो ४१. ब्रह्माडा-च्या गुह्यापासून झालेला मी तुझा अनुयायी केतु आहे. मीं भौत मन्वतर रचिलें. त्या तुज देवास नमस्कार असो" ४२. व्यास ह्मणतात— हे मना, याप्रमाणे त्यांची स्तुति ऐकून तो स्वामी देवास वर मागा असें ह्मणून त्यातील प्रत्येकाशीं क्रमानें बोलेल ४३. ते ऐकून ते देव बालरूपी हरीस स्वतः नमस्कार करून लोकांच्या कल्याणाकरिता आपलें वांछित सांगतील४४ 'हे भगवन्, प्रत्येक कल्पाताल त्याचप्रमाणें मन्वतरातील लोकांचा समुद्भव कसा होतो तें सांग.तें ऐकण्याची आह्मास इच्छा आहे'४५. कल्कि ह्मणतो.—प्रकृतीच्या तनूमध्ये अठरा महाकल्प आहेत. पहिला ब्रह्ममहाकल्प.तेथें ब्रह्मदेव हाच श्रेष्ठ पुरुष आहे. त्याच्या पूर्वार्धापासून तेहेतीस देवता व परार्धापासून योग्यास ध्यान करण्यास योग्य असलेला निरंजन ब्रह्मा झाला ४६,४७. त्या कल्पामध्यें जी लीला झाली ती ब्राह्मपौराणिकांनीं सांगितली आहे. ब्रह्मपुराणाचा शंभर कोटि विस्तार आहे ४८. पुराणपुरुषाच्या शेवटीं ज्ञानी पुरुषांनीं महाकल्प सांगितला आहे. ब्रह्माडप्रलयामध्यें देवांच्या सहस्रयुगात्मक एक कल्प सांगितला आहे ४९. एकंदर कल्प अठरा सांगितलेले आहेत. त्यांची नांव मी सांगतों, ऐका. कूर्मकल्प, मत्स्यकल्प, श्वेतवाराहकल्प ५०, नृसिंहकल्प, तसाच वामनकल्प, स्कंदकल्प, रामकल्प, भागवतकल्प, मार्कंडकल्प, भविष्यकल्प, लिंगकल्प, ब्रह्माडकल्प, अग्निकल्प, वायुकल्प, पद्मकल्प, शिवकल्प, विष्णुकल्प व त्याचप्रमाणें ब्रह्मकल्प हे कल्प क्रमानें सांगितलेले आहेत. यांच्या दोन सहस्र आवृत्त्या झाल्या असता एक महाकल्प होतो. सहस्र युगें हें ब्रह्मांडाचें आयुष्य सांगितलें आहे ५१–५४. ज्यांच्या नांवानें कल्प सांगितला आहे त्यांच्यापासून विराट् पुरुष उत्पन्न होतो. तो कोलवान् कल्प चवदा मनूंमध्यें होतो. स्वायंभुव मन्वंतरामध्यें जीं जीं वारंवार चार युगें झालीं त्या सर्व चतुर्युगामध्ये मनुष्यांचें आयुष्य किती होतें तें, हे हरे, तूं ऐक ५५, ५६. सत्ययुगामध्यें लक्ष वर्षें, त्रेतायुगामध्यें दहा सहस्र वर्षें, द्वापरामध्यें सहस्र वर्षें व कलियुगामध्यें

चायुश्शताब्दकम् ५७ स्वारोचिषेऽन्तरे देव जातं जात चतुर्युगम् शृणु तत्र नृणामायुस्सत्येऽशीति-सहस्रकम् ५८ त्रेतायां च तदर्द्धाब्द द्वापरे तु तदर्द्धकम् । कलौ द्विकसहस्राब्द नृणामायुः प्रकीर्तितम् ५९ औत्तमस्यान्तरे चैव सत्ये षष्टिसहस्रकम् । त्रेतायां च तदर्द्धाब्दं द्वापरे तु तदर्द्धकम् ६० कलौ सार्द्धसहस्राब्दं नृणामायुः प्रकीर्तितम् । तामसान्तरके चैव षट्त्रिंशाब्दसहस्रकम् ६१ नृणामायुः सत्ययुगे त्रेतायां च तदर्द्धकम् । द्वापरे च तदर्द्धाब्द कलौ वर्षसहस्रकम् ६२ रैवतान्तरके चैव सत्ये त्रिंशत्सहस्रकम् । त्रेतायां च तदर्द्धाब्दं द्वापरे च तदर्द्धकम् ६३ कलौ चाष्टशताब्दायुर्नृणां वेदैः प्रकीर्तितम् । चाक्षुषान्तरके चैव सत्ये तुर्यसहस्रकम् ६४ त्रेतायां त्रिसहस्राब्द द्वापरे द्विसहस्रकम् । कलौ सहस्रवर्षान्त नृणामायुः प्रकीर्तितम् ६५ वैवस्वतेऽन्तरे चैव सत्ये तुर्यसहस्रकम् । त्रेतायां त्रिशताब्द च द्वापरे द्विशताब्दकम् ६६ कलौ शताब्दक प्रोक्तमायुर्वेदैस्तथा नृणाम् । सावर्णिकेऽन्तरे देव नृणां विंशत्सहस्रकम् ६७ आयु सत्ये तदर्द्ध तु त्रेतायां च प्रकीर्तितम् । द्वापरे च तदर्द्धाब्द त दर्द्धाब्द तु वै कलौ ६८ ब्रह्मसावर्णिके चैव सत्ये दशसहस्रकम् । त्रेतायां च तदर्द्धाब्द द्वापरे तु तदर्द्धकम् ६९ कलौ चैव तदर्द्धाब्दं नृणा-मायुः प्रकीर्तितम् । दक्षसावर्णिके चैव तथाब्दायुश्चतुर्युगं ७० रुद्रसावर्णिके चैव सत्ये चाष्ट-सहस्रकम् । त्रेतायां च तदर्द्धाब्द द्वापरे च तदर्द्धकम् ७१ कलौ तदर्द्धक ज्ञेय नृणामायुः पुरा-तने । धर्मसावर्णिके चैव तथाब्दायुश्चतुर्युगे ७२ भौममन्वन्तरे चैव सत्य तुर्यसहस्रकम् । त्रेतायां

मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षे असतें ५७. हे देवा, स्वारोचिष मन्वंतरातील प्रत्येक चतुर्युगात मनुष्याचें आयुष्य किती असतें ते तू ऐक. सत्ययुगामध्यें ऐशी सहस्र वर्षे, त्रेतायुगामध्ये चाळीस सहस्र वर्षे, द्वापरामध्यें वीस सहस्र वर्षे व कलियुगामध्यें मनुष्याचें आयुष्य दोन सहस्र वर्षे असतें असें सांगितलें आहे ५८,५९. औत्तमाच्या मन्वंतरामध्यें सत्ययुगात साठ सहस्र वर्षे, त्रेतायुगात त्याच्या अर्धी वर्षे, द्वापरामध्यें त्याच्याही अर्धी वर्षे व कलियुगामध्यें मनुष्याचें आयुष्य दीड हजार वर्षे सांगितलें आहे. तामस मन्वतरामध्ये सत्ययुगातील मनुष्याचे आयुष्य छत्तीस सहस्र वर्षे, त्रेतायुगामध्यें त्याच्या अर्धे, द्वापरामध्यें त्याच्याही अर्धे व कलियुगामध्यें एक सहस्र वर्षे असते. रैवत मन्वंतरामध्यें सत्ययुगात तीस सहस्र, त्रतायुगात पधरा सहस्र, द्वापरात साडेसात सहस्र व कलियुगामध्यें मनुष्याचे आयुष्य आठशें वर्षे असतें असे वेदानीं सांगितलें आहे. चाक्षुप मन्वंतरामध्यें सत्ययुगात चार सहस्र, त्रेतायुगात तीन सहस्र, द्वापरामध्यें दोन सहस्र व कलियुगामध्यें मनुष्याचें आयुष्य एक सहस्र वर्षेपर्यंत सांगितलें आहे ६०–६९. वैवस्वत मन्वेतरातील सत्ययुगामध्ये चार सहस्र वर्षे, त्रेतायुगामध्यें तीनशे वर्षे, द्वापरामध्यें दोनशे वर्षे व त्याचप्रमाणे कलियुगात मनुष्याचे शंभर वर्षे आयुष्य असतें असें सांगितलें आहे. हे देवा, सावर्णि मन्वतरातील मनुष्याचे आयुष्य सत्ययुगात बीस सहस्र वर्षे, त्रेतायुगात त्याच्या निम्मे सांगितलें आहे, द्वापरामध्यें पाच सहस्र वर्षे व कलियुगामध्यें त्याच्या अर्धी वर्षे मनुष्याचें आयुष्य असतें ६६–६८. ब्रह्मसावर्णि मन्वतरामध्यें सत्ययुगात दहा सहस्र वर्षे, त्रेतायुगात त्याच्या अर्धे म्हणजे पाच हजार वर्षे, द्वापरांत अडीच हजार वर्षे व कलियुगात सव्वा हजार वर्षे मनुष्याचें आयुष्य सांगितलें आहे. दक्षसावर्णि मन्वंतरामध्ये ब्रह्मसावर्ण्यमन्वंतरातील आयुष्याइतकेंच चतुर्युगातील मनुष्याचें आयुष्य असतें ६९,७०. रुद्रसावर्णि मन्वंतरामध्ये सत्ययुगात आठ सहस्र वर्षे, त्रेतायुगात त्याच्या अर्धी वर्षे, द्वापरांत त्याच्या अर्धी म्हणजे दोन हजार वर्षे ७१ व कलियुगात त्याच्याही अर्धे मनुष्याचें आयुष्य असते असे समजावें. धर्मसावर्णिक मन्वंतरातील चतुर्युगामध्यें होणाऱ्या वर्षाचें आयुष्यही याप्रमाणेंच समजावें ७२. भौम मन्वंतरामध्यें सत्ययुगांतील

त्रिसहस्राब्दं द्वापरे च तदर्द्धकम् ७३ कलौ तदर्द्धकं ज्ञेयं नरायुश्चार्षसम्मतम् । भौतमन्वन्तरे चैव सत्ये तुर्यशताब्दकम् ७४ त्रेतायां त्रिशताब्दं च द्वापरे तु तदर्द्धकम् । तदर्द्धकं कलौ घोरे नृणामायुः प्रकीर्तितम् ७५ मन्वन्तरे तु यन्नाम्ना भूपाश्चासञ्चतुर्युगे । तन्नाम्ना च नृपा जातास्तेषां लीलाः पृथक्पृथक् ७६ एवमन्यत्र वै ज्ञेयं युगे तुर्ये मनौ मनौ । यो मनुस्तस्य वंशाश्च दिव्यैकयुगसम्मतौ ७७ युगान्ते कर्मभूमेश्च लयः कल्प. स वै स्मृतः । मन्वन्ते सर्वभूमेश्च प्रलयः स च कल्पकः ७८ पुराणपुरुषस्यैव दिनान्त प्रलयो हि यः । मुख्यकल्प स वै ज्ञेयः सर्वलोकविनाशकः ७९ षड्विंशत्कल्पसाहस्रैर्महाकल्पो हि यः स्मृतः । यदा पुराणपुरुषो मेषराशौ समास्थितः ८० तदा ब्रह्मा सुरैः सार्द्धं भूपं स्वायंभुवं गतः । यदा पुराणपुरुषो मकरे च समागतः८१ स्वायंभुवमनोर्मध्ये वाराहोऽभूत्स वै भुवि । यदा पुराणपुरुषो गतः सिंहे स्वकेच्छया ८२ स्वारोचिषमनोरन्ते नृसिंहोऽभूत्स वै भुवि । यदा पुराणपुरुषो वृषराशौ समास्थितः ८३ तदौत्तममनोर्मध्ये रुद्रोऽभूत्सगणो भुवि । यदा पुराणपुरुषो मीनराशौ समास्थितः ८४ तामसान्तेऽभवन्मत्स्यः स वै भुवि सनातनः । यदा पुराणपुरुषो युग्मराशौ समास्थितः ८५ वैवस्वतमनोमध्ये कृष्णोऽभूद्भुवि स प्रभुः । यदा पुराणपुरुषः कर्कराशौ समास्थितः ८६ रैवतान्तेऽभवत्कूर्मः स वै भुवि सनातनः । यदा पुराणपुरुषः कन्याराशौ समास्थितः ८७ चाक्षुषान्ते जामदग्न्योऽभवद्रामः स वै भुवि । यदा पुराणपुरुषः प्राप्तोऽलौ च स्वकेच्छया ८८ वैवस्वतमनोरादौ वामनोऽभूत्स वै

मनुष्यांचे आयुष्य चार सहस्र वर्षे, त्रेतायुगात तीन सहस्र वर्षे, द्वापरात त्याच्या निम्मे व कलियुगात त्याच्याही निम्मे आयुष्य ऋषींस समत आहे. भौत मन्वंतरामध्यें सत्ययुगातील मनुष्यांचें आयुष्य चारशे वर्षे, त्रेतायुगातील मनुष्यांचे आयुष्य तीनशें वर्षे, द्वापरामध्यें त्याच्या अर्धी वर्षे व घोर कलीमध्यें मनुष्यांचें आयुष्य त्याच्याही निम्म ह्मणजे पाऊणशें वर्षे सांगितलें आहे ७३–७५. मन्वंतरातील चारी युगामध्यें एकदा ज्या नावानें राजे झाले ते राजे पुनः त्याच त्याच नावानें उत्पन्न होतात व त्याच्या लीला भिन्न भिन्न असतात व त्याचप्रमाणें चतुर्युगामध्यें व प्रत्येक मनूमध्येंही इतरत्र असेंच होतें असें समजावें. जो मनु असतो त्याचे वंशज देवांच्या एकाहत्तर युगें राहतात ७६,७७. युगान्या अंतीं कर्मभूमीचा जो लय होत असतो त्याला कल्प ह्मणतात. मनूच्या अंतीं सर्व भूमीचा जो प्रलय होतो त्यास कल्पक असें ह्मणतात ७८. पुराण पुरुषाच्या दिवसाच्या अंतीं जो प्रलय होतो तो सर्व लोकाचा विनाश करणारा मुख्य कल्प आहे असें समजावें. सव्वीस सहस्र कल्पाच्या योगानें महाकल्प होतो असे सांगितलें आहे. ज्या वेळीं पुराण पुरुष मेष राशीमध्यें होता तेव्हा ब्रह्मदेव देवासहवर्तमान स्वायंभुव राजाकडे गेला. जेव्हा पुराण पुरुष मकर राशीमध्यें आला तेव्हा स्वायंभुव मनूमध्यें तो भूलोकीं वराह झाला. जेव्हा पुराण पुरुष आपल्या इच्छेनें सिंहराशीमध्ये गेला; तेव्हा स्वारोचिष मन्वंतरामध्यें तो भूलोकीं नृसिंह झाला. जेव्हा पुराणपुरुष वृषभराशींमध्यें येऊन राहिला ७९—८३. तेव्हा उत्तमसंज्ञक मनूमध्यें भूलोकीं गणासह रुद्र झाला. जेव्हा पुराणपुरुष मीन राशीमध्यें आला ८४, तेव्हा तामस मन्वंतरामध्यें तो सनातन देव भूलोकीं मत्स्य झाला. जेव्हां पुराणपुरुष मिथुनराशीमध्यें आला तेव्हां तो प्रभु भूलोकीं वैवस्वत मन्वंतरामध्ये कृष्ण झाला. पुराण पुरुष जेव्हा कर्क राशीमध्यें येऊन राहिला; तेव्हा तो सनातन भूलोकी रैवत मन्वंतरामध्यें कूर्म झाला. जेव्हा पुराण पुरुष कन्याराशीस आला तेव्हां चाक्षुष मन्वंतरामध्यें भूलोकीं जामदग्न्य राम झाला. जेव्हा तो पुराण पुरुष आपल्या इच्छेन वृश्चिक राशीमध्ये आला तेव्हा वैवस्वत मनूच्या पूर्वी तो भूलोकी वामन झाला.

भुवि । यदा पुराणपुरुषस्तुलाराशौ समास्थितः ८९ वैवस्वतमनोर्मध्ये कल्की नाम्नाहमागतः । यदा पुराणपुरुषः कुंभराशौ समास्थितः ९० सावर्णिकादौ भविता बुद्धो नाम्ना स वै भुवि । यदा पुराणपुरुषो धनूराशौ समास्थितः ९१ वैवस्वतमनोर्मध्ये रामो दाशरथिर्भुवि । यदा पुराणपुरुषो मकराशौ समास्थितः ९२ सर्वपूज्योऽवतारश्च न भवेद्वै कदाचन । अस्मिंश्चतुर्युगे देवाः पुराणपुरुषस्य हि ९३ त्रयोऽवताराः कथितास्तथा नान्यच्चतुर्युगे । त्रेतायाः प्रथमे पादे रामो दाशरथिः प्रभुः ९४ द्वापरस्य तथा कृष्णः शेषेण सह वै भुवि । कलेश्शेषे तथाहं वै द्वात्रिंशाब्दसहस्रके ९५ अतः खण्डः पवित्रोऽयं नृणां पातकनाशनः । इमं चतुर्युगं खण्डं यः पठेच्छ्रावयेच्च यः ९६ जन्मप्रभृति पापानि तस्य नश्यन्ति नान्यथा । इति वः कथितं देवा महाकल्पचतुष्टयम् ९७ द्वितीयो यो महाकल्पो विष्णुकल्पः स वै स्मृतः । तत्कथा पठिता देवा विष्णुपौराणिकैर्नरैः ९८ शतकोटिप्रविस्तारो विष्णुपौराणिकस्य वै । तत्रैव च महाकल्पो विष्णोर्नाभिसमुद्भवः ९९ पूर्वार्द्धाद्ब्रह्मगवान्ब्रह्मा सर्वदेवसमन्वितः । परार्द्धाद्ब्रह्मगवान्विष्णुः पुराणपुरुषः स वै १०० तृतीयो यो महाकल्पः शिवकल्पः स वै स्मृतः । शिवपूर्वार्द्धतो जातो विष्णुस्तस्माद्विधिः स्वयम् १ शतकोटिप्रविस्तारः शिवपौराणिकैः स्मृतः । चतुर्थो यो महाकल्पः पद्मकल्पः स वै स्मृतः २ गणेशस्तत्र भगवान्पुराणपुरुषासने । गणेशादभवद्रुद्रो रुद्राद्विष्णुः सुरोत्तमः ३ विष्णोर्नाभिसमुद्भूतः परमेष्ठी पितामहः । कल्पे कल्पे क्रमाद्देवाश्चासन्समन्ततः ४ पञ्चमो यो महाकल्पो वायुकल्पः स वै स्मृतः । महेन्द्रस्तत्र भगवान्पुराणपुरुषासने ५ महेन्द्राद्भवत्प्राणो

जेव्हा पुराण पुरुष तुलाराशीमध्यें आला तेव्हां वैवस्वत मन्वंतरामध्यें मी कल्की या नांवानें होऊन आलों. पुराणपुरुष कुंभराशीस आला असतां सावर्णिकाच्या पूर्वी तो बुद्ध या नांवानें होणार आहे. जेव्हां पुराणपुरुष धनूराशीमध्यें आला ८५—९१, तेव्हां वैवस्क्त मन्वंतरामध्यें भूलोकीं दाशरथि राम झाला. पुराण पुरुष मकर राशीस आला असतां त्या वेळीं सर्वपूज्य असा अवतारच होणार नाहीं. हे देवहो, या चतुर्युगामध्यें पुराण पुरुषाचेच तीन अवतार जसे सांगितले आहेत तसे अन्य चतुर्युगामध्यें नाहींत. ह्मणजे त्रेतायुगाच्या प्रथम पादामध्यें प्रभु दाशरथि राम होतो ९२–९४. त्याचप्रमाणें द्वापराच्या अंतीं शेषासह कृष्ण होतो व कलियुगाचीं बत्तीस हजार वर्षें राहिलीं असता मी होतो ९५. त्यामुळें हें खंड पवित्र व मनुष्यांच्या पातकांचा नाश करणारें होतें. हें चतुर्युगखंड जो वाचील व दुसऱ्यास ऐकवील त्याचीं जन्मापासून झालेलीं पापें नष्ट होतील यांत कांहीं संशय नाहीं. हे देवहो, याप्रमाणें मीं तुह्मांस महाकल्पाचें चरित्र सांगितलें ९६,९७. दुसरा जो महाकल्प आहे त्याला विष्णुकल्प असें ह्मटलें आहे. त्याची कथा विष्णुपौराणिकांनीं सांगितली आहे. विष्णुपुराणाचा शंभर कोटि विस्तार आहे व त्यामध्येंच विष्णूच्या नाभीपासून उत्पन्न झालेला महाकल्प वर्णिला आहे. त्याच्या पूर्वार्धापासून सर्व देवासहवर्तमान भगवान् ब्रह्मदेव व परार्धापासून भगवान् विष्णु झाला. तोच पुराणपुरुष होय. तिसरा जो महाकल्प त्याला शिवकल्प असें ह्मटलें आहे. शिवाच्या पूर्वार्धापासून विष्णु झाला व त्याच्यापासून स्वतः ब्रह्मदेव झाला. त्याचा विस्तार शंभर कोटि आहे; असें शिवपौराणिकांनीं सांगितलें आहे. जो चवथा महाकल्प आहे त्यास पद्मकल्प असें ह्मटलें आहे. तेथें पुराणपुरुषाच्या आसनावर भगवान् गणेश असून गणेशापासन रुद्र व रुद्रापासून उत्तम देव विष्णु झाला. विष्णूच्या नाभिकमलापासून परमेष्ठी पितामह झाला. प्रत्येक कल्पामध्यें प्रथमतः देव क्रमानें चोहोंकडून झाले ९८–१०४. पांचवा जो महाकल्प त्याला वायुकल्प असें ह्मटलें आहे. त्या कल्पामध्यें पुराणपुरुषाच्या आसनावर भगवान् महेंद्र असतो.

महेन्द्रादिन्द्रियाणि च । इन्द्रियेभ्यश्च तद्वास्तेषां नामानि मे शृणु ६ शनिर्बुधो रविः शुक्रो विश्वकर्मा बृहस्पतिः । इन्द्रो विष्णुस्तथा ब्रह्मा रुद्रः सोमः क्रमात्स्मृताः ७ सृष्टिकर्ता स वै ब्रह्मा लिङ्गेन्द्रियसमुद्भवः । सृष्टिपाता स वै विष्णुश्चतारी पदोद्भवः ८ चतुर्विंशतितत्त्वेषु कल्पे कल्पे प्रभुर्गतः । सनत्कुमारो हंसश्च वाराहो नारदस्तथा ९ नारायणौ च कपिलावात्रेयौ यज्ञाश्वकण्टकौ । वृषभश्च पृथुर्मत्स्यः कूर्मो धन्वन्तरिस्तथा ११० मोहिनी च नृसिंहश्च वामनो भार्गवस्तथा । रामो व्यासो बलः कृष्णो बुद्धः कल्की स्वतत्त्वगा ११ गुह्यजन्मा महादेवः सृष्टिदैत्यविनाशकः । एव जातास्त्रयो देवा महाकल्पे च पञ्चमे १२ षष्ठो यस्तु महाकल्पो वह्निकल्प स वै स्मृतः । स्कन्दस्तत्रैव भगवान्पुराणपुरुषासने १३ पुरुषाद्व्ययतः स्कन्दः स्कन्दस्तस्मान्महार्चिमान् । सूर्यरूपा महार्चिर्या तस्या जातो हरिः स्वयम् १४ वह्निरूपा महार्चिर्या तस्या जातः पितामहः । चन्द्ररूपा महार्चिर्या ब्रस्या जातः स वै हरः १५ ऋषयो मुनयो वर्णा लोका जाताः पितामहात् । आदित्या विश्ववसवस्तुषिताभास्वरानिलाः १६ महाराजिकसाध्याश्च देवा विष्णुसमुद्भवाः । यक्षराक्षसगन्धर्वाः पिशाचाः किन्नरादयः १७ दैत्याश्च दानवा भूतास्तामसा रुद्रसंभवाः । कल्पे कल्प समुद्भूतमेव ब्रह्माण्डगोचरं १८ सप्तमो यो महाकल्पः स वै ब्रह्माण्डकल्पकः । पावकस्तत्र भगवान्पुराणपुरुषासने १९ अचिन्त्यतेजसस्तस्मात्पुरुषाद्वह्निरुद्भवः । ततो जातो महाब्धिश्च तस्माज्जात विराण्मयम् ११० रोमे रोमे ततस्तस्य ब्रह्माण्डाः कोटिशोऽभवन् । ब्रह्माण्डाभवद्ब्रह्मा सर्वलोकपितामहः २१ तस्माज्जातो विभुर्विष्णुस्त-

---

त्या महेंद्रापासून प्राण झाला. महेंद्रापासून इंद्रियें झालीं व इंद्रियांपासून देव झाले. त्यांचीं नावें मी सांगतों तीं एका ५,६. शनि, बुध, रवि, शुक्र, विश्वकर्मा, बृहस्पति, इंद्र, विष्णु, त्याचप्रमाणें ब्रह्मदेव, रुद्र व सोम हे देव क्रमाने झाले असें सांगितलें आहे ७ लिंगेंद्रियापासून उद्भवलेला ब्रह्मदेव सृष्टिकर्ता होय. अवतारी पदापासून उद्भवलेला जो विष्णु तोच सृष्टीचा पालक होय ८. प्रत्येक कल्पामध्ये तो प्रभु चोविस तत्त्वामध्ये असतो सनत्कुमार, हस, वाराह, नारद, नरनारायण, कपिल, आत्रेय, यज्ञाश्व व कंटक, वृषभ, पृथु, मत्स्य, कूर्म, धन्वतरि, मोहिनी, नृसिह, वामन, भार्गव, राम, व्यास, बलभद्र, कृष्ण, बुद्ध व कल्की हे आपापल्या तत्त्वामध्यें असतात ९–११. महादेव गुह्य स्थानापासून जन्माम आला. तो सृष्टि व दैत्य याचा सहार करणारा आहे. याप्रमाणे पाचव्या महाकल्पामध्यें तीन देव झाले १२. जो सहावा महाकल्प झाला त्याला वह्निकल्प असें म्हटलें आहे. त्या कल्पामध्ये पुराण पुरुषाच्या आसनावर भगवान् स्कंद असतो १३. अव्यय पुरुषापासून निघाल्यामुळे त्याला महार्चिमान् स्कंद म्हणतात. सूर्यरूपी जी मोठी ज्वाला तिच्यापासून स्वत: हरि झाला. वह्निरूप जी मोठी ज्वाला तिच्यापासून पितामह झाला व चंद्ररूपी जी मोठी ज्वाला तिच्यापासून हर झाला १४, १५. ऋषि, मुनि, ब्राह्मणादि वर्ण व लोक पितामहापासून झाले. बारा आदित्य, दहा विश्वेदेव, आठ वसु, छत्तीस तुषित, चवसष्ट आभास्वर, एकोणपन्नास वायु, दोनशें वीस महाराजिक, बारा साध्य व देव हे विष्णूपासून झाले व यक्ष, राक्षस, गंधर्व, पिशाच, किन्नरादिक, दैत्य, दानव, भूत इत्यादि तामस प्राणी रुद्रापासून निर्माण झाले. तात्पर्य, प्रत्येक कल्पामध्यें ब्रह्माडामध्यें याप्रमाणेच सर्व उत्पन्न झाले. सातवा जो महाकल्प तो ब्रह्माडकल्प होय. त्या कल्पात पुराणपुरुषाच्या आसनावर भगवान् पावक असतो १६–१९. त्याचें तेज अचिंत्य आहे अशा त्या पुरुषापासून अग्नि उद्भवला. त्याच्यापासून महासागर झाला व त्याच्यापासून विराट्रूप झालें २०. नंतर त्याच्या प्रत्येक रोमामध्यें कोटयावधि ब्रह्माडें झालीं.

स्माज्जातो हरः स्वयम् । शतकोटिप्रविस्तारो ब्रह्माण्डाख्यपुराणके २१ त्रिनेत्रं पञ्चवक्त्रं च दशबाहुर्भवस्य च । अष्टादशानां कल्पानां वायुर्वै वैदिकै स्मृतः २३ महाकल्पेऽभवन्सर्वे द्विसहस्राः क्षय गताः । अष्टमो यो महाकल्पो लिङ्गकल्पः स वै स्मृतः २४ तत्रैव भगवान्धर्मः पुराणपुरुषासन । अचिन्त्याव्यक्तरूपश्च जातो धर्म. सनातनः २५ धर्मात्कामः समुद्भूतः कामाल्लिङ्गत्रिधाऽभवत् । पुंल्लिङ्गः क्लीबलिङ्गश्च स्त्रीलिङ्गश्च सुरोत्तम २६ पुंल्लिङ्गादभवद्विष्णुः स्त्रीलिङ्गाच्च महेन्दिरा । क्लीबलिङ्गात्स वै शेषस्तस्यांपरि स च स्थितः २७ त्रिभ्यस्तमोमयेभ्यश्च जातमेकार्णवं जगत् । सुप्ते नारायणे देवे नाभेः पङ्कजमुत्तमम् २८ जात तस्मात्स वै ब्रह्मा तस्माज्जातो विराडयम् । शतकोटिप्रविस्तारैर्लिङ्गपुराणकैः कथा २९ गीता चैव विधेरग्रे तस्य सारोऽयमुत्तमः । नवमो यो महाकल्पो मत्स्यकल्पः स वै स्मृतः १३० कुबेरस्तत्र भगवान्पुराणपुरुषासने । अव्ययाच्च समुद्भूतो धूलिवृन्दो महांस्तथा ३१ रजोभूताच्च तस्माच्च कुबेरस्य समुद्भवः । कुबेरादुद्भवन्मत्स्यो वेदमूर्तिश्च सद्गुणः ३२ मत्स्योदरात्समुद्भतो विष्णुर्नारायणो हरिः । विष्णोर्नाभेः समुद्भतो ब्रह्मा लोकपितामहः ३३ ब्रह्मणश्चोद्भव देव देवादेवा बभूविरे । चतुर्विंशतितत्त्वानि तैर्देवैर्जनितानि वै ३४ कल्पे कल्प क्रमादेव कल्पनामान्यकारयत् । मत्स्यकल्पे तु मत्स्यश्च महामत्स्यात्समुद्भवः ३५ तन्मत्स्याद्भगवान्विष्णुस्ततो ब्रह्मण उद्भवः । कूर्मकल्पे महामत्स्यात्कूर्मो जातः स कच्छपः ३६ कूर्माच्च भगवान्विष्णुस्ततो ब्रह्मा ततो विराट् । श्वेतवाराहकल्पे च वराहाद्विष्णुरुद्भवः ३७ विष्णोर्नाभेश्च स ब्रह्मा ततो जातो विराडयम् । एव

ब्रह्माडापासून सर्व लोकाचा पितामह जो ब्रह्मदेव तो निर्माण झाला. त्याच्यापासून प्रभु विष्णु झाला व विष्णूपासून स्वतः हर झाला. ब्रह्माडसज्ञक पुराणाचा शंभर कोटि विस्तार सागितला आहे. त्या भवास पाच मुखे, दहा बाहु व तीन नेत्र असतात. तो अठरा कल्पाचा वायु असें वैदिक लोकानीं सागितलें आहे. महाकल्पामध्यें सर्व दोन सहस्र देव होऊन क्षय पावले ! आठवा जो महाकल्प तो लिगकल्प होय २१-२४. त्या कल्पामध्यें पुराणपुरुषाच्या आसनावर भगवान् धर्म असतो. तो अचिन्य व अव्यक्तरूप असून त्याच्यापासून सनातन धर्म उत्पन्न झाला. धर्मापासून काम उत्पन्न झाला, कामापासून लिग तीन प्रकारचें झालें. हे उत्तम देवा, पुल्लिग, स्त्रीलिग व क्लीबलिग असे ते तीन प्रकार होत २५,२६. पुल्लिगापासून विष्णु झाला. स्त्रीलिगापासून महालक्ष्मी झाली व क्लीबलिगापासून तो शेष झाला आणि त्याच्यावर तो भगवान् बसला; व त्या तमोमय त्रिवर्गापासून एक सागरयुक्त जगत् निर्माण झालें. नारायण देव निद्रित झाला असता त्याच्या नाभीपासून उत्तम कमल झालें. त्याच्यापासून ब्रह्मदेव झाला, व त्या ब्रह्मदेवापासून हा विराट् झाला. लिगपौराणिकानीं शतकोटि ग्रंथविस्तारानें ब्रह्मदेवाच्या पुढें जी कथा गाइली तिचें हें उत्तम सार होय. नवव्या महाकल्पास मत्स्यकल्प ह्मटलें आहे २७—३०. त्या कल्पामध्यें पुराणपुरुषाच्या आसनावर भगवान् कुबेर असतो. अव्ययापासून फार मोठा धुळीचा समुदाय उत्पन्न होतो व त्या रजसमूहापासून या कुबेराचा उद्भव होतो. कुबेरापासून वेदमूर्ति व सद्गुणरूपी मत्स्य उद्भवतो ३१,३२. त्या मत्स्याच्या उदरातून नारायण हरि जो विष्णु तो उद्भवला. विष्णूच्या नाभीपासून लोकपितामह ब्रह्मा उद्भवला. ब्रह्मयापासून दैव झालें. दैवापासून देव झाले. त्या देवानीं चोवीस तत्त्वें उत्पन्न केलीं ३३,३४व त्यानीं क्रमानें याप्रमाणें प्रत्येक कल्पात कल्पाचीं नावें करावेलीं. मत्स्यकल्पामध्यें महामत्स्यापासून मत्स्य उद्भवला ३५. त्या मत्स्यापासून भगवान् विष्णु व त्याच्यापासून ब्रह्मदेवाचा उद्भव झाला. कूर्मकल्पामध्ये महामत्स्यापासून कूर्म झाला. तोच कच्छप होय ३६. त्या कूर्मापासून

सर्वे च वै कल्पा ज्ञेयाः सर्वत्र वै बुधैः ३८ दशमो यो महाकल्पः कूर्मकल्पः स वै स्मृतः। प्रचेतास्तत्र भगवान्पुराणपुरुषासने ३९ प्रकृतेश्च परोऽव्यो वै तुरीयोऽव्यय एक च। शून्यभूतात्ततो जातः प्रचेता भगवान्स्वयम् १४० तस्माज्जातो महानब्धिस्तत्र सुप्वाप स प्रभुः। नारायण इति ख्यातः स वै जलपतिः स्वयम् ४१ तदर्द्धाच्च महाकूर्मस्ततः शेषो महानभूत्। त्रिधाऽभवत्स वै शेषो भूमा शेषश्च भौमनी ४२ भूमा स वै विराड् ज्ञेयः शेषोपरि स चास्थितः। भौमनी च महालक्ष्मीः सा भूम्नो हृदि संस्थिता ४३ भूम्नो जातः स वै ब्रह्मा सृष्टिस्थितिविनाशकः। त्रिधा मूर्तिः स वै ब्रह्मा कल्पकल्पे क्रमादयम् ४४ पदं सुषुप्तभूतं यत्पुराणपुरुषासनम्। यत्र गत्वेन्द्रियाण्येव तृप्तिं प्राप्य क्षयन्ति वै ४५ अहंकारस्तदागत्य चैतन्यं मनसि स्थितम्। वञ्चयित्वा पुनर्लोकं करोति स्वकलीलया ४६ तुरीयशक्तिर्या ज्ञेया महाकाली सनातनी। महाकल्पैश्च तैः सर्वैस्तदङ्गं श्रुतिभिः स्मृतम् ४७ नमस्तस्यै महाकाल्यै मम मात्रे नमो नमः। यतः पुराणपुरुषा भवन्ति च लयन्ति च ४८ दशैव च महाकल्पा व्यतीतानीह भोः सुराः। सांप्रतं वर्तते यो वै महाकल्पो भविष्यकः ४९ तदुत्पत्तिं शृणुध्वं भो देवाः सर्विगणा मम। अचिन्त्यमक्षरं यच्च तुरीयं च सदा स्थितम् १५० यद्गत्वा न निवर्तन्ते नरास्तत्रैव तत्पदम्। अनेकसृष्टिरचनाः सन्ति तस्यैव लीलया ५१ तस्यान्तं न विदुर्देवाः कथं जानन्ति वै नराः। भूतो भूतो महाकल्पो दृष्टो वेदैस्तदीरितः ५२ भाव्या ये तु महाकल्पा न वै जानन्ति ते सदा। त्रयस्त्रिंशन्महाकल्पाः कैश्चिद्वेदैरुदी-

---

भगवान् विष्णु, त्याच्यापासून ब्रह्मा व त्याच्यापासून विराट् झाला. श्वेतवाराहकल्पामध्ये वराहापासून विष्णूचा उद्भव झाला ३७. विष्णूच्या नाभीपासून ब्रह्मदेव झाला व त्याच्यापासून विराट् झाला. याप्रमाणें ज्ञानी पुरुषांनीं सर्वत्र सर्व कल्प जाणावे. दहावा जो महाकल्प त्याला कूर्मकल्प असें झटलें आहे. त्या कल्पामध्यें पुराणपुरुषाच्या आसनावर भगवान् प्रचेता असतो ३८,३९. जो प्रकृतीहून पर, तुरीयसंज्ञक व अव्यय त्या निराकारापासून हा स्वतः भगवान् प्रचेता झाला १४०. त्याच्यापासून महासागर झाला व त्यात नारायण या नावानें प्रसिद्ध असलेला तो प्रभु निजला. तो स्वतः जलपतीच होय ४१. त्याच्या अर्ध्या भागापासून महाकूर्म झाला. त्याच्यापासून मोठा शेष झाला. तो शेष भूमा, शेष व भौमनी या नांवानें तीन प्रकारचा झाला ४२. भूमा झणजे तो विराट् असें समजावे. तो शेषावर बसला. महालक्ष्मी जी भौमनी ती भूमाच्या हृदयावर राहिली ४३. भूमापासून तो सृष्टि, स्थिति व विनाश करणारा ब्रह्मा झाला. तो ब्रह्मा प्रत्येक कल्पामध्यें क्रमानें तीन शरीरानें युक्त होत असतो ४४. सुषुप्तरूप जें पद तेंच पुराण पुरुषाचें आसन होय. तेथें गेल्यानें इंद्रियें तृप्त होऊन क्षीण होतात ४५. पण अहंकार त्याच्याकडे येऊन व मनामध्यें स्थित असलेल्या चैतन्यास फसवून पुनः आपल्या लीलेनें लोक निर्माण करितो. जी तुरीयशक्ति तीच सनातन महाकाली होय, असें जाणावें. ती त्या सर्व महाकल्पासहवर्तमान त्याचें अंग होय असें श्रुतींनीं सांगितलें आहे. त्या महाकालीस नमस्कार असो. जिच्यापासून पुराण पुरुष उत्पन्न होतात व जिच्यामुळें लय पावतात त्या माझ्या मातोश्रीस नमस्कार असो ४६–४८. हे देवहो, दहा महाकल्प होऊन गेले. आतां जो भविष्यमहाकल्प चालला आहे ४९ त्याची उत्पत्ति, अहो देवांनों, ऋषिगणासह तुम्ही माझ्या तोंडून ऐका. जें अचिंत्य, अक्षर, तुरीयसंज्ञक, सर्वदां विद्यमानरूप १५०, जेथें गेल्यावर पुरुष पुनरपि संसारामध्यें परत येत नाहींत तेथेंच तें पद आहे. त्याच्याच लीलेनें अनेक सृष्टींची रचना होते ५१. त्याचा अंत देवांस लागत नाहीं. मग मनुष्यांस कसा लागणार? वेदांनीं प्रत्येक वेळीं मागें होऊन गेलेला जो महाकल्प तो तेवढाच पाहिला व त्याचेंच वर्णन केलें.

रिताः ५३ अष्टादशमहाकल्पाः पृथक्त्वान्नोपवर्णिताः । एकादशमहाकल्पाः कैश्चित्प्रोक्ताः पुरातनैः ५४ अतोऽहं निश्चयेनाद्य भाव्यकल्पेषु भोः सुराः । वेदानां वचनं सत्यं नान्यथा च भवेत्क्वचित् ५५ तदव्ययात्समुद्भूतो राधाकृष्णः सनातनः । एकीभूत द्वयोरङ्गं राधाकृष्णो बुधैः स्मृतः ५६ सहस्रयुगपर्यन्तं यत्तेपे परमं तपः । तदा स च द्विधा जातो राधाकृष्णः पृथक्पृथक् ५७ सहस्रयुगपर्यन्तं तेपतुस्तौ परं तपः । तयोरङ्गात्समुद्भूता ज्योत्स्ना तत्तमनाशिनी ५८ तज्ज्योत्स्नायाः समुद्भूतं दिव्यं वृन्दावनं शुभम् । एकविंशत्प्रकृतयो योजने योजने स्मृता. ५९ दिव्यं वृन्दावनं जातं चतुराशीतिसंमिते । क्रोशायामं महारम्य तद्विस्तारं शृणु मे प्रभो ६० इन्द्रियप्रकृतीनां च दशानां ग्रामास्तु दश । गोकुलं वार्षभं नान्द भाण्डीरं माथुरं तथा ६१ व्रजं च यामुनं मान्यं श्रेयस्कं गौपिकं क्रमात् । मात्राभूतदशभ्यश्च प्रकृतिभ्यः समुद्भवम् ६२ तथा दशवनं रम्यं तेषां नामानि मे शृणु । वृन्दावनं गोपवनं बहुलावनमेव च ६३ मधुशृङ्गं कुञ्जवनं वनं दधिवनं तथा । रहःक्रीडावनं रम्यं वेणुपद्मवनं क्रमात् ६४ मनसः प्रकृतेर्जातो गिरिगोवर्द्धनो महान् । दिव्यं वृन्दावनं दृष्ट्वा परमानन्दमाप सः ६५ कृष्णाद्दुदभवन्गोपास्त्रयः कोट्यो गुणात्मकाः । श्रीदामाद्याः सात्त्विकाश्च राजसा अर्जुनादयः ६६ कंसाद्यास्तामसा जाता दिव्यलीलाप्रकारिणः । राधाङ्गाद्दुद्भवा गोप्यस्तिस्रः कोट्यस्तथा क्रमात् ६७ ललिताद्याः सात्त्विकाश्च कुब्जाद्या राजसास्तथा । तामसाः पूतनाद्याश्च नानाहेलाचरित्रकाः ६८ सहस्रयुगपर्यन्तं तेषां लीला बभूव ह । ततस्तौ तान्समाहृत्य तेपतुश्च पुनस्तपः ६९ द्विधा जातः स वै कृष्णो राधा

पुढें होणारे जे महाकल्प आहेत त्यास ते कधींच जाणत नाहींत. कित्येक वेदानीं तेहेतीस महाकल्प सांगितले आहेत. अठरा महाकल्प भिन्न भिन्न नावानीं त्यानीं वर्णिलेले आहेत. काहीं जुन्या विद्वानानीं अकरा महाकल्प सांगितले आहेत. यास्तव, हे देवहो, मी निश्चयानें आज व भावी कल्पामध्यें असणार ! वेदाचें वचन सत्य आहे; तें कधींही अन्यथा होणार नाहीं ५२–५५. असो; त्या अव्ययापासून सनातन राधाकृष्ण निर्माण झाला. स्त्री व पुरुष या उभयतांचें अंग एकरूप झालें असल्यामुळें ज्ञात्यानीं त्यास राधाकृष्ण म्हटलें ५६. त्यानें सहस्र युगापर्यंत जेव्हा परम तप केलें तेव्हा तो राधाकृष्ण पृथक् पृथक् दोन प्रकारचा झाला. सहस्र युगापर्यंत त्या उभयतानींही परम तप केलें. तेव्हा त्या दोघाच्या अंगापासून तमाचा नाश करणारी ज्योत्स्ना झाली. त्या ज्योत्स्नेपासून दिव्य व शुभ वृंदावन निर्माण झालें. त्यात योजनायोजनावर एकवीस प्रकृति सांगितल्या आहेत ५७–५९. तात्पर्य, चवऱ्यांयशी योजनें दीर्घ व एक कोस विस्तीर्ण असें तें अतिरम्य अलौकिक वृंदावन झालें. हे प्रभो, त्याचें चिन्ह मजपासून ऐक. दहा इंद्रियाच्या प्रकृतींचे क्रमानें गोकुल, वार्षभ, नाद, भाडीर, माथुर, व्रज, यामुन, मान्य, श्रेयस्क व गौपिक हे दहा ग्राम झाले. दहा मात्रारूप प्रकृतींपासून रम्य दहा वनें निर्माण झालीं. त्यांचीं नावें मी सांगतों, ऐक. वृंदावन, गोपवन, बहुलावन, मधुशृंग, कुंजवन, वन, दधिवन, रहःक्रीडावन, रम्यवन व वेणुपद्मवन हीं तीं क्रमानें होत. मनाच्या प्रकृतीपासून मोठा गोवर्धन पर्वत झाला. असो; तें दिव्य वृंदावन पाहून तो परम आनंदयुक्त झाला ६०—६५. कृष्णापासून गुणरूप तीन कोटि गोप झाले. त्यातील श्रीदामादि सात्त्विक गोप, अर्जुनादि राजस गोप व कंसादि तामस गोप झाले. ते सर्वही दिव्य लीला करणारे होते. त्याचप्रमाणें क्रमानें राधेच्या अंगापासून तीन कोटि गोपी झाल्या ६६,६७. त्यातील ललितादिक सात्त्विक, कुब्जादिक राजस व पूतनादिक तामस होत. त्या नानाप्रकारच्या लीला करणाऱ्या होत्या. सहस्र युगापर्यंत त्याची लीला झाली. तेव्हा

देवी तथा द्विधा । सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ७० पूर्वार्द्धात्स च वै जातः परार्द्धात्कृष्ण एव हि । एकशीर्षा त्रिनेत्रा च द्विपदी द्वौसहस्रकरा ७१ पूर्वार्द्धात्सा तु वै जाता राधा देवी परार्द्धतः । पुरुषः प्रकृतिश्चैतौ तेपतुः परमं तपः ७२ सहस्रयुगपर्यन्तं दिव्यवृन्दावने शुभे । तपसा वर्धमाने तौ नाऽऽनन्तो ह्यनन्तकः ७३ एकीभूतौ तु तत्पश्चात्संस्थितौ मैथुनेच्छया । तदङ्गरोमकूपेषु ब्रह्माण्डाः कोटिशोऽभवन् ७४ कोट्यर्धयोजनायामास्ते तु सर्वे पृथक्पृथक् । हृदि रोमसमुद्भूतो ब्रह्माण्डोऽय च भोः सुराः ७५ ब्रह्माण्डादुद्भवो ब्रह्मा पद्मपुष्पे समास्थितः । स पद्मो योजनायामो भूमिमण्डलसंस्थितः ७६ यतो जातं विधेः पद्मं तद्वै पद्मसरोवरम् । प्रसिद्धं पुष्करक्षेत्रं तत्पद्मसरसं सुराः ७७ विस्मितः स तदा ब्रह्मा नररूपश्चतुर्मुखः । नाले नाले गतः सो वै दिव्यं जातं शतं समाः ७८ नान्तं जगाम पद्मस्य पुनर्ब्रह्मा स चागतः । मायया मोहितस्तत्र रुरोद बहुधा तदा ७९ रोदनाद्रुद्र उत्पन्नः स च तत्क्षेमकारकः । किं रोदिषि महाभाग त्वदीशो हृदये तव १८० इति श्रुत्वा वचस्तस्य ब्रह्मा लोकपितामह । समाधिभूतो हृदये चिरं तेपे स्वकेच्छया ८१ दिव्यवर्षशताब्दे तु प्रादुर्भूतो हरिः स्वयम् । वचनं प्राह भगवान्मेघगम्भीरया गिरा ८२ कर्मभूमिरियं ब्रह्मञ्जीवान्ता जीवकारिणी । सहस्रयोजनायामा विश्वस्मिन्भूमिमण्डले ८३ हिमाद्रिरुत्तरे तस्याः पूर्वेऽब्धिश्च महोदधिः । रत्नाकरः पश्चिमेऽब्धिर्दक्षिणे वडवाग्निकः ८४ अतः सर्वे

त्या दोघांनीं त्याचा आपणामध्य उपसंहार करून पुनः तप केलें ६८,६९. तेव्हा तो कृष्ण दोन प्रकारचा झाला व तशीच राधा देवीही दोन प्रकारची झाली. तो पूर्वार्धानें सहस्र मस्तकें, सहस्र नेत्र व सहस्र पाद यानीं युक्त असलेला पुरुष झाला व परार्धानें कृष्णरूपच राहिला. जिला एक मस्तक आहे, तीन नेत्र आहेत, दोन पाद आहेत व दोन सहस्र हस्त आहेत अशी ती देवी राधा पूर्वार्धापासून झाली व परार्धानें राधा देवीच राहिली. याप्रमाणें प्रकृति व पुरुष अशा त्या दोघांनीं त्या दिव्य व शुभ वृंदावनामध्यें सहस्र युगापर्यंत परम तप केलें. तपाच्या योगानें तीं दोघेंही वृद्धि पावलीं. तो अनंतरहित ईश्वर अनंत या नावानें प्रसिद्ध झाला. नंतर तीं दोघेंही मैथुनाच्या इच्छेनें एकरूप होऊन राहिली. तेव्हा त्याच्या अंगावरील रोमकूपामध्यें कोटयवधि ब्रह्मांडें झालीं ७०–७४. तीं सर्वेही पृथक् पृथक् असून पन्नास लक्ष योजनें विस्तीर्ण होतीं. हे देवहो, हे ब्रह्माडहृदयामध्यें रोमरूपानें उत्पन्न झाले. ब्रह्माडापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला. तो पद्मकमलावर बसला होता. तें पद्म एक योजन विस्तीर्ण असून भूमिमंडलावर राहिलेलें होतें ७५,७६. ज्याच्यापासून विधीचें पद्म झालें तेंच पद्मसरोवर होय. हे देवहो, ते पद्मसरोवर पुष्करक्षेत्र या नावानें प्रसिद्ध आहे ७७. अशा, त्या वेळी नररूप चतुर्मुख ब्रह्मदेव विस्मित झाला; व तो देवार्ची शंभर वर्षें कमलाच्या प्रत्येक दंडामध्ये जाऊन त्याचा शोध करूं लागला. पण त्यास कमलाचा अंत लागला नाही. तेव्हा ब्रह्मदेव पुनः परत आला व मायेनें मोहित झालेला तो त्या वेळीं अनेक प्रकारें रडूं लागला ७८,७९. त्याच्या रोदनापासून रुद्र उत्पन्न झाला. तो त्याचें क्षेम करणारा होता. 'हे महाभाग, का रडतोस ? तुझा ईश तुझ्या हृदयामध्येंच आहे.' असें त्याचें वचन ऐकून लोकपितामह ब्रह्मदेव हृदयामध्यें समाधि लावून चिरकाल स्वेच्छेनें तप करिता झाला ८०,८१. देवार्ची शंभर वर्षें झाल्यावर स्वतः हरि प्रकट झाला व तो मेघासारख्या गंभीर वाणीनें ह्मणाला " हे ब्रह्मदेवा, सर्व भूमंडलामध्यें एक सहस्र योजनें विस्तीर्ण असलेली ही कर्मभूमि जीवाचा अंत करणारी व जीवास उत्पन्न करणारी आहे.

भविष्यन्ति लोकाश्चोर्ध्वं तथा ह्यधः । कर्मभूमेर्मध्यभूतः पुष्करोऽयं सनातनः ८५ मत्तो वेदा-
न्भवान्प्राप्य करिष्यति मख शुभम् । यज्ञाद्दत्वा भविष्यन्ति त्रिधाभूता गुणत्रयात् ८६ सिद्धा
विद्याधराश्चैव चारणाः सात्त्विकास्त्रिधा । गन्धर्वयक्षरक्षांसि राजसा गिरिसंस्थिताः ८७
पिशाचगुह्यकाः भूतास्तामसा गामिनो ह्यधः । तथा स्वधामयाद्यज्ञात्त्रिधा पितृगणा विधे ८८
भविष्यन्ति सुरै रम्या विमानसदृशाश्च ये । खेचरा गौरवर्णाश्च इय मास्ते सात्त्विकाः स्मृताः८९
गिरिद्वीपमया रम्याः सरोरूपाश्च राजसाः । भूचरास्ते भविष्यन्ति त्रिधा पितृगणा विधे १९०
बिले तलमया ये तु नारका यातनामयाः । तामसास्ते भविष्यन्ति पितरोऽधो महीतले ९१
व्ययभूताश्च ते लोका वृद्धा मध्याः क्षयाः क्रमात् । इयं भूमिर्महाभागा सर्वदा च सनातनी ९२
मेरुर्वै च नमेरुश्च द्वीपाश्चासस्तथा न हि । इलावर्तादिखण्डाश्च सन्ति नैव क्वचित्क्वचित् ९३
ये तु तारामया लोका विमानसदृशा विधे । स्वेच्छया च करिष्यन्ति रक्षिता यज्ञकर्मणा ९४
यज्ञो नास्ति यदा भूमौ तदा ते भगणा विधे । विघ्नभूताश्चरिष्यन्ति नित्यवक्रातिचारिणः ९५
कर्मभूमिश्च गौर्ज्ञेया श्रुतिरूपा जगन्मयी । यस्तां पाति च भो ब्रह्मन्स गोप इति विश्रुतः ९६
गोपशक्तिः स वै गोपो गोपीनामर्चको हरिं । कोटिकोटिसहस्राश्च सर्वे गोपा हरेः कला. ९७
तावन्तश्चैव ब्रह्माण्डा गोपनाम्ना प्रकीर्तिताः । कर्मभूमेस्तथोर्ध्वं च रविर्योजनलक्षकः ९८
ततश्शशी तथामानस्ततश्चोर्ध्वं भमण्डलम् । द्विलक्षयोजनगतस्ततो मौमस्तथाविधः ९९

तिन्या उत्तरेस हिमालय पर्वत, पूर्वेस महोदधि सागर, पश्चिमेस रत्नाकरनामक सागर व दक्षिणेस वडवाग्निनामक समुद्र आहे ८४. या लोकापासून सर्व ऊर्ध्व व त्याचप्रमाणे अधोलोक होतील. हे सनातन पुष्करक्षेत्र कर्मभूमीन्या मध्यभागी आहे ८५. माझ्यापासून तुला वेद प्राप्त होऊन तूं शुभ यज्ञ करशील. त्या यज्ञापासून तीन गुणामुळे तीन प्रकारचे झालेले देव निर्माण होतील. सिद्ध, विद्याधर व चारण हे तीन प्रकारचे सात्त्विक, गंधर्व, यक्ष व राक्षस हे पर्वतावर राहणारे राजस आणि पिशाच, गुह्यक व भूत हे अधोभागी जाणारे तामस होत. त्याचप्रमाणे हे विधे, स्वधामय यज्ञापासून तीन प्रकारचे पितृगण होतील. त्यातील जे अंतरिक्षामध्ये विमानासारिखे व देवासारखे रम्य असून गौरवर्ण, आकाशामध्ये संचार करणारे व श्यामवर्ण असतील ते सात्त्विक असें म्हटलें आहे. जे पर्वत व द्वीपमय अथवा रम्य सरोवररूप असतील ते राजस होत. ते भूमीवर संचार करीत असतात. तिसऱ्यामध्ये जे तलमय असून नरकयातना भोगीत असतात ते पितर तामस होत. ते भूमीच्या खालीं असतात. जे लोक व्ययरूप असतात ते क्रमान वृद्धि पावतात, मध्यम स्थितीमध्ये असतात व क्षय पावतात. ही महा उदार भूमि सर्वदा नित्य आहे ८६-९२. मेरु, नमेरु व त्याचप्रमाणें द्वीपे कधीं असतात व कधीं नसतात. इलावर्तादि खंडें केव्हा केव्हा असतात व केव्हा केव्हा नसतातही. हे ब्रह्मदेवा, जे लोक तारामय व विमानासारखे आहेत, ते यज्ञकर्मान्या योगाने लोकान्याकडून रक्षित झाले असतां स्वेच्छेनें हित करितात. पण भलोकीं जेव्हा यज्ञ नाहींसा होतो तेव्हा हे ब्रह्मदेवा, ते नक्षत्रगण विघ्नरूप होऊन संचार करितात. ते सतत वक्र गतीनें जाऊं लागतात. श्रुतिरूप व जगन्मय कर्मभूमि गाय आहे असें समजावें. हे ब्रह्मदेवा, तिचें जो रक्षण करितो तो गोप या नावानें प्रसिद्ध आहे. त्या गोपशक्तीनें युक्त असलेला जो गोप तोच गोपीचा पूजक हरि होय. हजारों कोटि किंवा जेवढे म्हणून गोप आहेत ते सर्व या हरीच्या कलारूप होत ९३—९७ व तितकींच ब्रह्मांडें गोपाच्या नावानें सांगितलेलीं आहेत. त्याचप्रमाणें कर्मभूमीच्या ऊर्ध्वभागीं एक लक्ष योजनांच्या अंतरावर रवि आहे ९८. त्याच्यापुढें तितक्याच अंतरावर चंद्रमा आहे. त्याच्यापुढें दोन लक्ष योजनावर नक्षत्रमंडल

भौमाद्बुधस्तथा ज्ञेयो बुधाच्च बृहतांपतिः । गुरोः शुक्रस्तथामानः शुक्रात्सौरिस्तथा गतः १०० शने राहुस्तथा ज्ञेयो राहो केतुस्तथोर्ध्वगः । सप्तलक्षमितं ज्ञेयं केतोः सप्तर्षिमण्डलम् १ लक्षैकादशगाः सर्वे ततश्चोर्ध्वं ध्रुवास्पदम् । लक्षयोजनगं चैव ततश्चोर्ध्वं महत्पदम् २ लक्षयोजनगं ज्ञेयं ततश्चोर्ध्वं जनास्पदम् । लक्षयोजनग ज्ञेयं तदूर्ध्वं तपसः स्थलम् ३ एव च कर्मभूमेश्च तपः कोट्यर्धयोजनम् कर्मभूमेरधश्चैव पातालाः सप्त चान्तराः ४ लक्षयोजनगा ज्ञेयास्ततश्चाधोगताश्च ये । नरकाश्च क्रमाज्ज्ञेया भूमेः कोट्यर्द्धयोजनाः - कर्मभूमेरुत्तरे च खण्डान्यष्टौ ततः परम् । लवणाब्धिस्ततो द्वीपस्ततः क्षीराब्धिरेव हि ६ ततो द्वीपस्ततः सिन्धुस्ततो द्वीपस्ततोऽब्धिकः । कोट्यर्द्धलक्षमानेन योजनेन विधे स्वयम् ७ कर्मभूमेः स वै ज्ञेयो लोकालोको महाचलः । लोकालोको दक्षिणे च पश्चिमे च स वै गिरिः ८ पूर्वे च कर्मभूमेश्च लोकालोकस्तथाविधः । एतेषां समुदायानां ब्रह्माण्डोऽयं प्रकीर्तितः ९ त्वत्तो भविष्यति विधे कल्पपर्यन्तमेव हि । ओमित्यक्षर ब्रह्म ततो विष्णुस्त्रिधाऽभवत् ११० अयं विष्णुः स वै कृष्ण इह विष्णुः स वै विराट् । इति विष्णुः स वै ज्ञेयः पुराणपुरुषोत्तम ११ पुराणपुरुषो ज्ञेय आदिब्रह्मा चिरायुगः । दैवे युगसहस्रे द्वेऽहोरात्रं तस्य कीर्तितम् १२ इह विष्णो रोमकूपेषु ब्रह्माण्डाः कोटिशोऽभवन् । अथ विष्णुरह ब्रह्मन्विघ्नहा तव भूतले १३ इत्युक्त्वान्तर्दधे विष्णुर्ब्रह्मा सृष्टिमचीकरत् । तेन प्रोक्त यतो भाव्य महाकल्पो हि स स्मृत। १४ भाविष्यो नाम

आहे. त्याच्यापुढें तितक्याच अंतरावर मंगळ आहे ९९. भोमाच्यापुढें बुध आहें असें जाणावें. बुधाच्या पुढें बृहस्पति आहे. त्या गुरूच्या पुढे तितक्याच अंतरावर शुक्र आहे. त्याचप्रमाणें शुक्राच्या पुढें शनि आहे २००. शनीच्या पुढें राहु व त्याचप्रमाणें राहूच्या वर तितक्याच अतरावर केतु आहे असें समजावें. केतूच्या पुढें सात लक्ष अंतरावर सप्तर्षिमंडल आहे असें समजावें १. त्याच्यापुढें या सर्वांपासून अकरा लक्ष योजनाच्या अंतरावर ध्रुवस्थान आहे. त्याच्यापुढे एक लक्ष योजनें महापद आहे. त्याच्यापुढें ऊर्ध्वभागीं एक लक्ष योजनें जनस्थान आहे व त्याच्या ऊर्ध्व एक लक्ष योजन अतरावर तपःस्थल आहे असें जाणावें. याप्रमाणें कर्मभूमीपासून तपःस्थान अर्धकोटि योजनें दूर आहे. कर्मभूमीच्या खालीं सात पाताललोक आहेत ते एक लक्ष योजनाच्या अंतरावर असतात असें समजावें. त्याच्याही अधोभागीं जे क्रमानें नरक आहेत ते भूमीपासून अर्धकोटि योजनावर आहेत असें समजावें २-९. कर्मभूमीच्या उत्तरेस आठ खंडें आहेत.त्याच्यापुढे लवणाब्धि आहे. त्याच्यापुढे द्वीप, त्याच्याही पुढें क्षीरसागर, त्याच्यापुढें द्वीप, त्याच्यापुढें सिंधु, त्याच्यापुढें पुनः द्वीप व त्याच्यापुढें पुनः अब्धि आहे. हे विधे, पुढें कर्मभूमीपासून एक कोटि व अर्धा लक्ष इतक्या योजनप्रमाणावर तो लोकालोकनामक महापर्वत आहे असे समजावें. त्याचप्रमाणें कर्मभूमीच्या दक्षिणेसही लोकालोक आहे. पश्चिमेसही तो पर्वत आहे व पूर्वेसही तशा प्रकारचा लोकालोक आहे. या सर्वांच्या समुदायांचें हें एक ब्रह्माड होतें असे सांगितलें आहे ६--९. बा विधे, हें एक कल्पपर्यंत तुझ्यापासून होईल. " ॐ " हें एकाक्षर ब्रह्म आहे. त्याच्यापासून विष्णु तीन प्रकारचा झाला. आज जो विष्णु आहे तोच कृष्ण व येथें जो विष्णु आहे तोच विराट् होय. तात्पर्य, याप्रमाणें तो विष्णुच पुराण पुरुषोत्तम आहे असें समजावें. १०,११ दीर्घ आयुष्यानें युक्त असलेला पुराण पुरुष आदिब्रह्मा आहे असें समजावें. देवाचीं दोन सहस्र युगें हींच त्याची अहोरात्र सांगितली आहे. या स्थलीं विष्णूच्या रोमकूपांमध्यें कोटयावधि ब्रह्मांडें झालीं. हे ब्रह्मदेवा, भूतलीं तुझ्या विघ्नांचा नाश करणारा मी आज विष्णु आहें १२,१३.

विख्यातो द्विसहस्रभवायुषा । पूर्वार्धश्च परार्धश्च पुराणपुरुषस्य हि १५अष्टादशसहस्राणि कल्पाः पूर्वार्धके गताः । परार्धः सांप्रतं ह्येषो जातः तस्य दिनद्वयम् १६ अद्याह कूर्मकश्चैव वह्नेः मत्स्यः प्रकीर्तितः । तृतीयः श्वेतवाराहो दिवसस्तस्य कल्पवान् १७ तथा मध्याह्नकालो हि सांप्रतं वर्तते सुराः । भाविष्याख्ये महाकल्पे कथा भाविष्यकैर्जनैः १८ कथिता ब्रह्मणश्चाग्रे शतकोटिप्रविस्तरैः । दशलक्षणसंयुक्तं शतकोटिप्रविस्तरम् १९ महापुराणं कथितं पुराणं पञ्चलक्षणम् । पञ्चविंशत्सहस्रं च कल्पे कल्पे प्रकीर्तितम् २२० कल्पनाम्ना पुराणं च महादेवेन निर्मितम् । अष्टादशपुराणानि निर्मितानि शिवात्मना २१ द्वापरान्ते च भगवान्व्यासः सत्यवतीसुतः । तान्यव जनयामास लोकमङ्गलहेतवे २२ व्यास उवाच ॥ इति कल्किवचः श्रुत्वा ते देवा विस्मयान्विताः । नमस्कृत्य गमिष्यन्ति स्व स्वं धाम प्रहर्षिता २२३[६१९०*] इति श्रीभाविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगेतिहाससमुच्चये पञ्चविंशोऽध्यायः ॥२५॥

व्यास उवाच ॥ तदा स भगवान्कल्किः पुराणपुरुषोद्भवः । दिव्यं वाजिनमारुह्य खड्गी वर्मी च चर्मधृक् १ म्लेच्छांस्तान्दैत्यभूतांश्च हत्वा योगं गमिष्यति । षोडशाब्दसहस्राणि तद्योगाग्निप्रतापिता २ भस्मभूता कर्मभूमिर्निर्जीवा भविता तदा । ततोऽनुयोगजनितो मेघो भूत्वा लयंकरः ३ लयवृष्ट्या च सा भूमिर्जलमध्ये गमिष्यति । तदा कलियुगो घोरो बलिपार्श्वं गमि-

असें बोलून विष्णु अंतर्धान पावला व ब्रह्मदेवानें सृष्टि केली. त्यानें साधीतलेलें ज्या अर्थी होणार आहे त्या अर्थी त्यास भाविष्य या नावानें प्रसिद्ध असलेला महाकल्प असें झटलेलें आहे. तो दोन हजार भवाच्या आयुष्यानें होईल. तो पुराणपुरुषाच्या पूर्वार्ध व परार्धरूप आहे १४,१५. पूर्वार्धामध्यें अठरा सहस्र कल्प होऊन गेले आहेत. साप्रतकालीं त्याचा परार्ध आहे व त्याचे दोन दिवस झाले आहेत. आज मी कूर्म आहे. ब्रह्मकल्पामध्यें मलाच मत्स्य असें झटलें होतें. त्याचा कल्पयुक्त तिसरा दिवस श्वेतवाराह होय १६,१७. त्याचप्रमाणें हे देवहो, साप्रतकालीं माध्याह्न समय चालला आहे. भाविष्याख्य महाकल्पामध्यें जी कथा झाली ती भाविष्यक जनानीं ब्रह्मदेवाच्या पुढें शतकोटि विस्तारानीं साधितली. महापुराण दश लक्षणानीं व शंभर कोटि विस्तारानें युक्त असतें, असें साधितलें आहे. पुराण पाच लक्षणानीं युक्त असतें. प्रत्येक कल्पामध्यें तेवीस हजार पद्यें साधितलेलीं आहेत १८–२०. पुराण कल्पाच्या नांवानें महादेवानें निर्मिलें आहे. फार काय पण अठराही पुराणे शिवरूप ईश्वरानेच निर्माण केलीं आहेत २१. द्वापराच्या शेवटीं सत्यवतीपुत्र जो द्वैपायन व्यास त्यानें लोककल्याणाकरिता तींच पुन. निर्माण केलीं २२. व्यास झणतातः– हें कल्कीचें वचन ऐकून ते देव आश्चर्यचकित होऊन व त्यास नमस्कार करून आनंदानें आपापल्या धामीं जातील २२३. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्यु० प्रतिस० कलियु० चतुर्थखंडातील पंचविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २५ ॥

व्यास झणतातः— तेव्हा तो पुराण पुरुषापासून उत्पन्न झालेला भगवान् कल्कि ढाल, तस्वार, चिलखत इत्यादि घेऊन, दिव्य अश्वावर आरूढ होऊन व त्या दैत्यरूप म्लेच्छास मारून समाधिस्थ होईल. त्याच्या सोळा हजार वर्षे लाविलेल्या समाधीपासून योगाग्नि होईल व योगाग्नीनें अतिशय संतप्त झालेली ही कर्मभूमी त्या वेळीं भस्मरूप व निर्जीव होईल. त्यानंतर त्याच्या योगामुळें उत्पन्न झालेला लयकारक मेघ प्रलयकारक धाराचा वर्षाव

* ह्यापूर्वी काही अध्यायाचे शेवटीं नजरचुकीनें श्लोकसख्या चुकीची पडल्यामुळें ७८ या संख्येनें कमी आली आहे, तो मिळवून या ठिकाणी बरोबर बरोज दिली आहे.

ष्यति ४ गते कलियुगे घोरे कर्मभूमिं पुनर्हरिः । कृत्वा स्थलमयीं रम्यां यज्ञैर्देवान्यजिष्यति ५ यज्ञभागमुपादाय देवास्ते बलसंयुताः । वैवस्वतं मनुं गत्वा कथयिष्यन्ति कारणम् ६ कल्किनो वदनाज्जातो ब्राह्मणो वर्ण एव हि । बाहोः क्षत्र विशो जान्वोः शूद्रो वर्णस्तदङ्घ्रयोः ७ गौरो रक्तस्तथा पीतः श्यामस्ते ब्राह्मणादयः । देव्याः शक्तिं समादाय जनिष्यन्ति सुतान्बहून् ८ एकविंशक्किंकुनिता मनुजा धर्मरूपिणः । जातिधर्ममुपादाय यजिष्यन्ति मुरान्मुदा ९ तदा वैवस्वतो धीमान्नत्वा तं कल्किनं हरिम् । अयोध्यायां राजपदं करिष्यति तदाज्ञया १० तच्छिक्षातो भवेत्पुत्रो यः स इक्ष्वाकुरेव हि । पितृ राज्यं पुरस्कृत्य भूमौ दिव्यं शतं समाः ११ दिव्यवर्षशतायुश्च त्यक्त्वा देहं गमिष्यति । यदा तु भगवान्कल्की ब्रह्मसत्रं करिष्यते १२ तदा चत्वारिवेदाश्च मूर्तिमन्तश्च साङ्गकाः । अष्टादशपुराणैश्च तत्रायास्यन्ति हर्षिताः १३ स्तोष्यन्ति कल्किनं देवं पुराणपुरुषांशकम् । कार्तिके शुक्लपक्षे च नवम्यां गुरुवासरे १४ यज्ञकुण्डाच्च पुरुषो भविष्यति महोत्तमः । नाम्ना सत्ययुगो ज्ञेय सत्यमार्गप्रदर्शकः १५ दृष्ट्वा तं पुरुषं रम्यं तदा ब्रह्मादयः सुराः । तां तिथिं वर्णयिष्यन्ति कर्मक्षयकरीं मनः १६ अस्यां तिथौ च मनुजा धातृवृक्षतटे मुदा । योऽर्चयिष्यति यान्देवान्देवास्ते तस्य वश्यगाः १७ अक्षया नवमी नाम युगादिनवमी हि सा । लोकमङ्गलदात्री च सर्वकिल्बिषनाशिनी १८ धातृमूलतले यो वै मालतीं तुलसीं मुदा । संस्थाप्य वेदविधिना शालग्राम यजन्ति ये १९ जीवन्मुक्ताश्च ते ज्ञेयाः पितृणां

करील. त्यामुळे ती भूमि जलामध्ये बुडून जाईल. तेव्हा घोर कलि बळीजवळ गमन करील १-४. व तो घोर कलि येऊन निघून गेला असता हरि पुनरपि कर्मभूमीस रम्य स्थलमय करील व यज्ञांच्या योगाने देवांचे पूजन करील ५. नंतर यज्ञभागाचा स्वीकार करून ते देव सामर्थ्ययुक्त होतील व वैवस्वत मनूकडे जाऊन ते त्यास सर्व वृत्तांत निवेदन करतील. कल्कीच्या मुखापासून झालेला जो वर्ण तोच ब्राह्मण होय. बाहूपासून क्षत्रिय, माड्यापासून वैश्य व त्याच्या पायापासून शूद्रवर्ण झाला ६,७. ते ब्राह्मणादि गौर, रक्त, पीत व श्याम वर्णाचे होत. देवीच्या शक्तीचा आश्रय करून ते अनेक पुत्रांस उत्पन्न करितील ८. त्या वेळचे मानव धर्मरूपी व एकवीस हात उंच असतील. जातिधर्माचा आश्रय करून ते आनंदाने देवांचे यजन करतील ९. तेव्हा बुद्धिमान् वैवस्वत मनु त्या कल्किनामक हरीस नमस्कार करून त्याच्या आज्ञेने अयोध्येमध्ये राजपद करील. त्याच्या शिक्षेपासून होणारा जो पुत्र तोच इक्ष्वाकु होय. ज्याचे आयुष्य देवांची शंभर वर्षे आहे असा तो भूलोकी पित्याचें राज्य दिव्य शंभर वर्षे स्वीकारून देहत्याग करून जाईल. त्यावेळी भगवान् कल्कि ब्रह्मसत्र करील. त्या वेळी मूर्तिमंत चार वेद अंगे व अठरा पुराणें यासह तेथे आनंदाने येतील १०—१३. व ते पुराण पुरुषाच्या अंशापासून झालेल्या कल्कि देवाची स्तुति करितील. कार्तिकाच्या शुक्लपक्षातील नवमीस गुरुवारी यज्ञकुंडातून एक अत्युत्तम पुरुष होईल. तो सत्ययुग नांवाचा होय असे समजावे १४,१५. तेव्हा त्या रम्य पुरुषास पाहून ब्रह्मादिक देव त्या तिथीस ही कर्मक्षय करणारी तिथि आहे असें म्हणतील. हे मना, या तिथीस जो मानव आनंदानें आवळीच्या वृक्षाखालीं ज्या देवांची पूजा करील ते देव त्याच्या वश होऊन राहतील १६,१७. तिचें अक्षया नवमी हे नांव पडेल. ती युगादिनवमी होय. ती सर्व लोकांस मंगल देणारी व सर्व पापांचा नाश करणारी आहे. जे कोणी धात्रिवृक्षाच्या खालीं जाई व तुळस यांची आनंदाने स्थापना करून तेथे वेदोक्त विधीनें शालग्रामाची पूजा करितील ते पितरांची तृप्ति करणारे व जीवन्मुक्त आहेत असे समजावें. आवळीच्या झाडाखालीं जाऊन जो कोणी श्राद्ध

तृप्तिकारकाः । धातृवृक्षतले गत्वा यो वै श्राद्धं करिष्यति २० गयाश्राद्धसहस्रस्य लप्स्यते च फलं परम् । यः करोति तथा होमं सहस्रमखसन्निभम् २१ मृत. सन्स्वर्गमाप्नोति सकुलः सपरिच्छदः । इत्युक्तवचने तेषां कल्की देवो मुदान्वितः २२ तथास्त्वित्येव वचन वदिष्यति सुरान्प्रति । इत्युक्त्वा भगवान्कल्की पश्यतां देवरूपिणाम् २३ तत्रैवान्तर्गतो भूत्वा सुपुत्रश्च भविष्यति । गते तस्मिन्भगवति कर्मभूमिः सुदुःखिता २४ विरहाग्निमती भूत्वा बीजांस्तान्संक्षपिष्यति । तस्मिन्काले महादैत्या पातालतलवासिनः २५ प्रह्लाद च पुरस्कृत्य गमिष्यन्ति सुरान्प्रति । खरोष्ट्रगृध्रमहिषकाककर्कसमास्थिताः २६ सिंहव्याघ्रवृकारूढाः शृगालश्येनवाहनाः । प्रासपट्टिशखड्गांश्च भुशुण्डिपरिघादिकान् २७ गृहीत्वा वेगवन्तस्ते गर्जिष्यन्ति पुन. पुनः । तदा शक्रादयो देवास्त्यक्त्वा क्षीराद्रणा मुदा २८ स्वायुधानि गृहीत्वाशु करिष्यन्ति रण महत् । दिव्यवर्षमय घोर युद्ध तेषां भविष्यते २९ मृतान्मृताञ्जगे दैत्यान्भार्गवो जीवयिष्यति । श्रमभृतास्तथा देवास्त्यक्त्वा युद्ध समन्ततः ३० क्षीराब्धिं च गमिष्यन्ति यत्र साक्षाद्धरि स्वयम् । तेषां स्तुत्या स भगवान्देवमङ्गलहेतवे ३१ स्वपूर्वार्द्धे स रूप च करिष्यति सनातन. । स च हंसो हरिः साक्षाच्छतसूर्यसमप्रभः३२ शुक्रं प्रह्लादमुखांस्तेजसा तापयिष्यति। तदा पराजिता दैत्यास्त्यक्त्वा गां दुःखिता भृशम् ३३ वितलं च गमिष्यन्ति महादेवेन रक्षिताः । पुनस्ते सकला देवा निर्भया निरुपद्रवाः ३४ वैवस्वतस्य तनय चाभिरक्षन्ति भूपदे । दिव्यवर्षशतायुश्च स इक्ष्वाकुर्भविष्यति ३५ वर्षाणां च प्रमाणेन नृणामायुश्चतुश्शतम् । इति ते

करील त्याला सहस्र गयाश्राद्धाचे फल मिळेल. त्याचप्रमाणेच जो कोणी होम करितो तो त्याचा होम सहस्र यज्ञासारखा फलदायक होतो. त्या वृक्षाच्या खाली मृत झालेला पुरुष आपल कुल व परिवार यासहवर्तमान स्वर्गास जातो. ते अस वचन बोलले असता कल्कि देव आनंदयुक्त होत्साता " तथास्तु " एवढेच वचन देवास बोलेल व असे बोलून तो भगवान् कल्कि ते सर्व देवरूपी पाहत असताच तेथेच गुप्त होऊन निघून जाईल. तो भगवान् गुप्त झाला असता कर्मभूमि अतिदुःखित व विरहाग्नियुक्त होऊन त्या सर्व बीजाचा क्षय करील. त्या वेळी पातालतलावरील राहणारे सर्व महादैत्य प्रल्हादास पुढे करून देवांकडे जातील व गाढव, उंट, गिधाड, रेडे, कावळे, खेकडे, सिंह, व्याघ्र, लांडगे, शृगाल व श्येन पक्षी यांवर बसलेले ते हातात ढाल, तरवार, पट्टा, प्रास, भुशुंडि, परिघ इत्यादि घेऊन व वेगयुक्त होऊन वारंवार गर्जना करू लागतील. तेव्हा शक्रादि तेहेतीस देवांचा समुदाय आनंदाने आपली आयुधे उचलून त्यांच्याशी मोठे रण करील. देवांच्या एक वर्षभर त्यांचे घोर युद्ध होईल १८—२९. पण रणामध्ये मेलेल्या दैत्यास शुक्र जिवंत करील व त्यामुळे थकलेले देव चोहोकडून युद्ध सोडून जेथे स्वतः साक्षात् हरि राहतो त्या क्षीरसागरी जातील. नंतर त्यांच्या स्तुतीने प्रसन्न झालेला तो सनातन भगवान् देवांच्या कल्याणाकरिता आपल्या पूर्वार्धासमान एक आकृति निर्माण करील. तोच हंसनामक साक्षात् हरि होय. त्याची शंभर सूर्यासारखी प्रभा असल्यामुळे तो आपल्या तेजाने शुक्र व प्रल्हादादि दैत्य यांस ताप देईल व त्यामुळे महादेवाने ज्यांचे रक्षण केले आहे असे पराजित झालेले ते दैत्य अतिदुःखाने पृथ्वीचा त्याग करून वितलनामक अधोलोकी जातील. तेव्हा पुनः ते सर्व देव निर्भय व निरुपद्रवी होऊन वैवस्वताच्या पुत्रास भूपदावर स्थापितील. तो इक्ष्वाकु देवांची शंभर वर्षे येथे राहील, त्या वेळी मनुष्यांचे आयुष्य चारशे वर्षे असेल. हे मना, याप्रमाणे तू मला जे विचारिले होतेस ते सर्वही मी तुला सांगितले. चार युगांचे व राजांचे भिन्न भिन्न चरित्र मी तुला निवेदन केले आहे. ज्ञान, ध्यान, शम व दम हे

कथितं सर्वं यत्पृष्टोऽहं मनस्त्वया ३६ चतुर्युगानां चरितं नृपाणां च पृथक्पृथक् । चतुष्पादो हि धर्मस्य ज्ञानं ध्यानं शमो दमः ३७ आत्मज्ञानं स वै ज्ञानं ध्यानमध्यात्मचिन्तनम् । मनःस्थिरत्वं च शमो दमस्त्विन्द्रियनिग्रहः ३८ चतुर्लक्षाब्दकान्येव द्वात्रिंशच्च सहस्रकम् । तत्संख्यया हि धर्मस्य पादश्चैकः प्रकीर्तितः ३९ प्राह्णमध्याह्नसायाह्नं त्रिसन्ध्यं च भवेत्सदा । एकैकेन पदा तस्य विराजो भुवि वर्तते ४० यदा धर्मो भवेद्वृद्धस्तदायुश्च विवर्धते । सप्तश्लोकसहस्राणि खण्डेऽस्मिन्कथितं मया ४१ अतश्चोत्तरखण्डं हि वर्णयामि मनः शृणु ४२ [६२३२][१८३८२] इति श्रीभविष्ये महापुराणे प्रतिसर्गपर्वणि चतुर्युगखण्डापरपर्याये कलियुगीयेतिहाससमुच्चये षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥ इति चतुर्थःखण्डः ॥ ४ ॥

इति तृतीयं प्रतिसर्गपर्व चतुर्युगखण्डापरपर्यायं समाप्तम् ॥ ३ ॥

धर्माचे चार पाद आहेत. आत्म्याचा साक्षात्कार हेंच ज्ञान, अध्यात्मचिंतन हेच ध्यान, मनाचा स्थिरपणा हाच शम व इंद्रियाचा निग्रह हाच दम होय. चार लक्ष बत्तीस हजार इतक्या वर्षसंख्येनें धर्माचा एक पाद होतो असें सांगितलें आहे. प्राण्ह, मध्यान्ह व सायान्ह हे तीन संध्याकाल त्या विराटाच्या एकेक पादानें भूलोकीं सदा होत असतात ३०-४०. ज्या वेळी धर्माची वृद्धि होते तेव्हा आयुष्यही वाढतें. या खंडामध्यें मीं सात सहस्र श्लोक सांगितले आहेत ४१. हे मना, आता मी यापुढें उत्तरखंडाचें वर्णन करितों तें ऐक ४२. ह्याप्रमाणें श्रीभविष्यमहापुराणातील चतुर्युगखंड ही ज्याला पर्यायसंज्ञा आहे अशा प्रतिसर्गपर्वांपैकीं कलियुगीयेतिहाससमुच्चयातील सव्विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २६ ॥

येथें हें चवथें खंडही समाप्त झालें ॥ ४ ॥

ह्याप्रमाणें हें तिसरे प्रतिसर्गपर्व समाप्त झालें ॥ ३ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

